UNIVERSAL
LIBRARY
OU_192062
UNIVERSAL
LIBRARY

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प ३७ वें

# द्विखंड हिंदुस्थान

लेखक

बाबू राजेन्द्र प्रसाद

अनुवादक

नारायण गणेश गोरे

जुलै १९४६ ]

[ मूल्य ११ रुपये

एकमेव विक्रेते
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
१२ टिळक रोड, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

प्रकाशक
अप्पासाहेब पंत
औंध प्रकाशन ट्रस्ट, औंध
संस्थान औंध

मुद्रक
गंगाधर शंकर दाते
कलागृह छापखाना
६६६ सदाशिव पेठ, पुणें २

# आमचें प्रकाशन

* १, २ सत्याचे प्रयोग ( खंड १ तृतीयावृत्ति, खंड २ द्वितीयावृत्ति ) : म. गांधी   २—८—०
* ३ खादी–मीमांसा ( सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति ) —बाळुभाई मेहता   २—०—०
४ स्वराज्य–शिष्टाई : म. गांधी ( शिल्लक नाहीं )   ०—६—०
५ संयम कीं स्वैराचार? ( खंड १ ला ) : म. गांधी   १—८—०
६ हिंडलग्याचा प्रसाद : —काका कालेलकर ( शिल्लक नाहीं )   ०—९—०
* ७ हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना : —एस्. राधाकृष्णन्   १—४—०
* ८ उपनिषदांतील दहा गोष्टी ( तृतीयावृत्ति ) : —शंकरराव देव   ०—१२—०
* ९ विद्यार्थी–जीवन ( द्वितीयावृत्ति ) : —श्री. स. महाजन   ०—८—०
*१० फिलिफाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास : —त्र्यं. र. देवगिरीकर   १—४—०
११ कॉंग्रेसचा इतिहास ( द्वितीयावृत्ति ) : —डॉ. पट्टाभि सीतारामय्या   २—८—०
१२ समाजवाद्च कां? ( द्वितीयावृत्ति ) : —जयप्रकाश नारायण   २—०—०
१३ खानबंधूंचा अल्प परिचय : —महादेवभाई देसाई   ०—९—०
१४ जवाहरलाल नेहरू ( आत्मचरित्र ) : —पं. नेहरू ( शिल्लक नाहीं )   ५—०—०
*१५ विश्राम ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी   १—[illegible]
*१६ भारतीय संस्कृति ( चतुर्थावृत्ति ) : साने गुरुजी   [illegible]—०—०
१७ प्रसाद–दीक्षा : म. गांधी   १—०—०

१८ भिल्ल साधु गुलामहाराज :
—शं. वि. ठकार ( शिल्लक नाहीं ) ०—६—०

*१९ आधुनिक भारत : आचार्य जावडेकर ५—०—०

*२० हिमालयांतील प्रवास ( तृतीयावृत्ति ) :
—काका कालेलकर २—४—०

२१ गांधीजींचें विविध दर्शन ( द्वितीयावृत्ति ) :
संकलनकार : एस्. राधाकृष्णन् २—८—०

* २२ जिवंत व्रतोत्सव : काका कालेलकर १-१२-०

२३ गांधीविचारदोहन : किशोरलाल मश्रूवाला १—४—०

२४ सत्याग्रही महाराष्ट्र : प्रेमा कंटक ३—०—०

* २५ अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र? ( द्वितीयावृत्ति ) :
—जॉन रस्किन २—०—०

* २६ जीवन-दर्शन (द्वितीयावृत्ति) : महाकवि खलिल जिब्रान १-१२-०

२७ ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र : जे. सी. कुमारअप्पा १—४—०

२८ बापू : घनश्यामदास बिडला १—८—०

२९ संस्कृतीचें भवितव्य : एस्. राधाकृष्णन् १—०—०

३० महात्मा गौतम बुद्ध : एस्. राधाकृष्णन् १—०—०

३१ जीवन आणि साहित्य : आचार्य स. ज. भागवत २—८—०

३२ प्राचीन साहित्य : कविसम्राट् रवींद्रनाथ टाकुर १—८—०

३३ संयम कीं स्वैराचार? ( खंड २ रा ) : म. गांधी . १-१२-०

३४ हिंदु-मुसलमान-ऐक्य : आचार्य जावडेकर ३—०—०

३५ गीता-हृदय ( तृतीयावृत्ति ) : साने गुरुजी ०-१२-०

३६ हिंदूंचें समाजकारण : काका कालेलकर २—४—०

३७ द्विखंड हिंदुस्थान : डॉ. राजेन्द्र प्रसाद ११—०—०

---

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील सरकारी विद्याखात्यांनीं शाळांतील वाचनालयांकरितां व बक्षिसांकरितां मंजूर केलीं आहेत.

# प्रस्तावना

अखिल भारतीय मुस्लिम–लीगनें मार्च १९४० मध्यें भरलेल्या आपल्या लाहोर–अधिवेशनांत पाकिस्तानचा ठराव पास केला. तेव्हांपासून हिंदु–विभाग आणि मुसलमान विभाग अशा दोन भागांमध्यें हिंदुस्थानची फाळणी करावी या प्रश्नाला महत्त्व प्राप्त झालें आहे. या प्रश्नासंबंधीं विपुल लिखाण झालेलें असून त्यावर बरेंच वाङ्मयहि निर्माण झालेलें आहे. तथापि, या प्रश्नाच्या सर्व बाजूंची सांगोपांग चर्चा करणाऱ्या एका निराळ्या ग्रंथाची आवश्यकता आहे असें मला वाटतें. 'द्विखंड हिंदुस्थान' या ग्रंथांत या प्रश्नासंबंधींची सर्व माहिती आणि साहित्य थोडक्यांत एकत्रित करण्याचा प्रयत्न मीं केला असून आपलें स्वतःचें मत बनवितांना वाचकास त्याचें साहाय्य होऊं शकेल. एकत्रित केलेल्या या साहित्यावरून बनलेलीं माझीं मतें मीं ठिकठिकाणीं दर्शविलीं आहेत; पण माझ्या निष्कर्षांपासून हें सर्व साहित्य मीं अगदीं अलिप्त ठेविलें आहे, अशी माझी खात्री आहे. माझ्या निष्कर्षांकडे दुर्लक्ष करून वाचकाला आपलीं मतें बनवितां येतील.

या ग्रंथाचे सहा भाग पाडिले आहेत. हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान अशीं दोन राष्ट्रें आहेत या सिद्धांताचा ऊहापोह पहिल्या भागांत केला असून त्याचें सार पुढीलप्रमाणें आहे:–या द्विराष्ट्र–सिद्धांताला इतिहासाचा व दैनंदिन जीवनांतील वस्तुस्थितीचा आधार नाहीं आणि अनेक सुप्रसिद्ध व प्रातिनिधिक मुसलमान गृहस्थांचाहि त्यास पाठिंबा नाहीं. तथापि, मुसलमान हें एक स्वतंत्र राष्ट्र आहे असें मानिलें, तरी इतर देशांचा अनुभव आणि अत्यंत अधिकारी व आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या अगदीं अलीकडील लेखकांनीं या विषयासंबंधीं केलेला जोरदार युक्तिवाद लक्षांत घेतां एक बहुराष्ट्रिकांचें राज्य स्थापूनच हिंदु–मुसलमानांची ही समस्या सोडविणें इष्ट आहे. असें सामर्थ्यवान् संघराज्यच आपल्या निरनिराळ्या राष्ट्रिकांना सांस्कृतिक स्वायत्ततेची हमी देऊं शकेल.

बहुराष्ट्रिकांचें एक राज्य न बनवितां अनेक राष्ट्रीय राज्यें बनविल्यास त्यांना राष्ट्रीय अल्पसंख्याकांचा प्रश्न तर सोडवितां येणार नाहींच; पण त्यामुळें सांपत्तिक, अर्थशास्त्रीय, औद्योगिक व राजकीय, आणि लष्करी संरक्षण व डावपेंच यांबाबत आणखी नवीन कुलंगडीं मात्र उत्पन्न होतील.

हिंदु–मुसलमानांचा प्रश्न कसा उत्पन्न झाला, त्याची वाढ होत होत त्याला सध्यांचें स्वरूप कसें प्राप्त झालें आणि जातीय संघर्षाचा आधार वाढवीत गेल्यामुळें जाति–जातींमधील मतभेद अधिकाधिक कसे वृद्धिंगत होत गेले, याचें विस्तृत विवेचन दुसऱ्या भागांत आलें आहे.

तिसऱ्या भागांत आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या फाळणीच्या योजना सारांशरूपानें देण्यांत आल्या आहेत.

अखिल भारतीय मुस्लिम–लीगच्या लाहोर–ठरावांतील अनिश्चितपणा व संदिग्धता आणि त्यामुळें त्याच्या गुणावगुणांचा विचार करतांना उत्पन्न होणारी अडचण, यांचें विवरण चवथ्या भागांत केलें आहे. यापुढें ठरावांत वापरलेल्या शब्दांचे रूढ अर्थ गृहीत धरून या ठरावाचें पृथःक्करण करण्यांत आलें आहे व पाकिस्तानच्या सीमा निश्चित केल्या आहेत.

पांचव्या भागांत मुसलमानी राज्यांची साधनसामग्री दिली असून फाळणीची योजना कशी अव्यवहार्य आहे, तें दर्शविलें आहे.

सहाव्या भागांत हिंदु–मुसलमान–प्रश्न सोडविण्याकरितां अनेक गृहस्थांनीं आणि संस्थांनीं सुचविलेल्या निरनिराळ्या योजना दिल्या आहेत.

यांतील १ला, ३ रा, ४ था, ५ वा व ६ वा हे भाग बंकिपूर–जेलमध्यें प्रकृति मधूनमधून चांगली असतांना लिहिले गेले आहेत. त्यामुळें त्या भागांच्या लेखनांत अपरिहार्यतेनें राहिलेल्या कांहीं उणीवा दिसून येतील. जेलमधून मुक्तता झाल्यानंतर प्रस्तुत पुस्तकाचा २ रा भाग लिहिण्यास मला वेळ मिळाला; पण पूर्वीं लिहिलेले भाग तपासण्यास मात्र फुरसत मिळाली नाहीं. जेलमध्यें पुस्तकें मिळण्याची अडचण डॉ. सच्चितानंद सिंह यांच्या कृपेनें बऱ्याच प्रमाणांत दूर झाली. सिंह–ग्रंथालयांतून पुस्तकें पुरविण्यास त्यांनीं परवानगी दिली. बिहारच्या

वरिष्ठ विधिमंडळाचे अध्यक्ष सर राजीव रंजन प्रसाद सिंह यांनींहि बिहार-विधिमंडळाच्या ग्रंथालयांतील पुस्तकें मला पुरविलीं. मुंबईचे श्री. शांतिकुमार मोरारजी यांनीं बरीचशीं पुस्तकें आणि कांहीं माहिती आंकडेवारीनिशी पुरविली. या सर्व सद्‌गृहस्थांचा मी आभारी आहें. मुंबईचे श्री. के. टी. शहा आणि पिलानी येथील बिर्ला-कॉलेजचे प्रो. बाळकृष्ण यांनीं कांहीं अमूल्य सूचना केल्या त्याबद्दल त्यांचा आणि आपल्या ग्रंथालयाचा मुक्तहस्तानें उपयोग करूं दिल्याबद्दल बिर्ला-कॉलेजचा मी आभारी आहें. जमशेदपूर येथील टाटा-कामगार-संघाचे सेक्रेटरी श्री. एम्. जोम यांनीं मूळ लेखनाची टंकलिखित प्रत तयार करून दिल्याबद्दल आणि श्री. एस्. एच्. राझी, एम्. डी. मदन व एम्. के. घोष यांनीं ती तपासून दिल्याबद्दल त्यांचे मी आभार मानतों. श्री. जोम यांना मूळ लेखनाची टंकलिखित प्रत तयार करण्यास परवानगी दिल्याबद्दल बिहार-सरकारचाहि मी आभारी आहें. जमशेदपूर येथील टाटांच्या संशोधन-प्रयोगशाळेचे श्री. एम्. के. घोष यांनीं पुस्तकांतील आंकडे तपासून ग्राफ तयार केले, याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. या पुस्तकाचा २ रा भाग लिहीत असतांना अनेक प्रकारचें साहाय्य करणारे श्री. मथुरा प्रसाद आणि चक्रधर शरण यांचेहि आभार मला मानिले पाहिजेत. त्यांच्यामुळें माझें हें सर्व लेखन ग्रंथरूपानें बाहेर पडत आहे.

इतरांचें विधान किंवा अवतरण उद्धृत करतांना त्या त्या ठिकाणीं मीं तसा निर्देश केला आहेच.

सदाकत आश्रम,<br>
दिघाघाट, पाटना,<br>
१५ डिसेंबर, १९४५

—राजेन्द्र प्रसाद

# अनुक्रमणिका

## भाग पहिला

## द्विराष्ट्र–सिद्धान्त


१. पाकिस्तानचा पाया: द्विराष्ट्र–सिद्धान्त ... ... ३
२. राष्ट्र आणि राज्य ... ... ... १४
३. मुसलमान: एक स्वतंत्र राष्ट्र ... ... ... २७
४. राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय ... ... ... ४५
५. दुसऱ्या एका दृष्टिकोनांतून दिसणारें चित्र... ... ५३
   १. धर्म– ... ... ... ५४
   २. सामाजिक जीवन– ... ... ... ७०
   ३. भाषा– ... ... ... ८७
   ४. कला– ... ... ... ९३
   ५. एक देश– ... ... ... १०७
   ६. एक इतिहास– ... ... ... १११


## भाग दुसरा

## त्रिपक्षीय संघर्ष


६. प्रास्ताविक ... ... ... १३५
७. 'फोडा आणि झोडा'ची राजनीति व ईस्ट् इंडिया कंपनी १४१
८. वहाबी आंदोलन ... ... ... १४६
९. सर सय्यद अहमद खानांचा पूर्वकाल ... ... १५२
१०. अलीगढ–कॉलेजचे इंग्रज प्राध्यापक व अलीगढचें राजकारण १६०
११. स्वतंत्र मतदारसंघाचा उगम ... ... १७६
१२. मुस्लिम लीगची स्थापना व लखनौ–करार ... १८५

१३. खिलाफत–आंदोलन व तदनंतरचा काळ ... १९२
१४. ब्रिटिशांचें खोल कारस्थान ... .. ... २०३
१५. वाढते मतभेद ... ... ... २२५
१६. दुसऱ्या भागाचें सार ... ... ... २६२

भाग तिसरा

## फाळणीच्या विविध योजना

प्रास्तविक ... ... ... २७७
१७. हिंदी 'संघ–राज्या'ची योजना ... ... २७९
१८. अलीगढच्या प्राध्यापकांची योजना ... ... २८७
१९. सी. रहमत अलींची योजना ... ... २९१
२०. डॉ० लतीफ यांची योजना ... ... २९७
२१. शिकंदर हयातखानांची योजना ... ... ३०७
२२. सर अबदुल्ला हरून–कमिटीची योजना ... ... ३१४
२३. फाळणीच्या कल्पनेचें मूळ ... ... ३२१

भाग चवथा

## अखिल भारतीय मुस्लिम–लीगचा पाकिस्तानवरील ठराव

२४. ठरावाची संदिग्धता व त्याचा अभिप्रेत अर्थ ... ३३१
२५. संदिग्धपणापासून होणारे तोटे ... ... ३४३
२६. ठरावाचें पृथक्करण ... ... ... ३५४
२७. ठरावाचें पृथक्करण ( पुढें चालू ) ... ... ३६८
२८. शीख आणि बंगाली लोकांची फाळणी ... ... ४१२

भाग पांचवा

## मुसलमानी राज्यांची साधनसामग्री

२९. शेती ... ... ... ४१९
१. पूर्व-विभाग– ... ... ... ४१९
२. वायव्य-विभाग– ... ... ... ४३१
३०. खनिज पदार्थ ... ... ... ४४३
३१. जंगलें ... ... ... ४४९
३२. उद्योगधंदे ... ... ... ४५०
३३. कर आणि खर्च ... ... ... ४६४
३४. फाळणीच्या सूचनेवर टीका ... ... ... ४९१
१. पाकिस्तानचें समर्थन ... ... ... ४९१
२. विभक्तीकरणाच्या युक्तिवादाचें खंडन ... ४९५
३. पाकिस्तानवादाचें खंडन ... ... ५१८

भाग सहावा

## पाकिस्तानचे पर्याय

३५. क्रिप्स्–योजना ... ... ... ५२५
३६. प्रो० कूपलंड यांची प्रादेशिक योजना ... ... ५२८
३७. सर सुलतान अहमद यांची योजना ... ... ५४६
३८. सर आर्देसर दलाल यांची योजना ... ... ५५६
३९. सर राधाकुमुद मुकर्जी यांचा नवा दृष्टिकोण ... ५६२
४०. कम्युनिस्ट–पक्षाचा पाकिस्तानला पाठिंबा ... ... ५७०
४१. सप्रू–समितीच्या सूचना ... ... ... ५८०
४२. डॉ. आंबेडकरांची योजना ... ... ... ५८९
४३. श्री. एम्. एन्. रॉय यांच्या योजनेचा मसुदा ... ५९५
४४. भरतवाक्य ... ... ... ... ५९९
ग्राफ ( १ ते १२ )

स्वास्थ्य आणि सुख यांऐवजीं सेवा आणि त्याग, ऐश्वर्याच्या
ऐवजीं दारिद्र्य, राजगृहाच्या ऐवजीं कारागृह आणि
शिकंदर मंझीलच्या ऐवजीं सदाकत आश्रम
यांचा स्वीकार करणारे
सच्चे मुसलमान, कट्टर राष्ट्रीय आणि ज्वलंत देशभक्त

**मझहर-उल्-हक**

यांच्या

**पवित्र स्मृतीस**

—राजेन्द्र प्रसाद

भाग पहिला

# द्विराष्ट्र-सिद्धान्त

# १. पाकिस्तानचा पाया : द्विराष्ट्र–सिद्धान्त

मुसलमानी हिंदुस्थान आणि मुसलमानेतर हिंदुस्थान अशीं हिंदुस्थानचीं दोन वेगवेगळीं छकलें पाडून प्रत्येक छकलाला स्वतंत्र व सार्वभौम शासनाधिकार देण्यांत यावे अशी जी सूचना मांडण्यांत येत असते ती या सिद्धांतावर आधारलेली आहे कीं हिंदु व मुसलमान या दोन जमाती म्हणजे दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत. मुस्लिम लीगच्या लाहोर येथील अधिवेशनांत या विभागणीच्या सूचनेला पाठिंबा देणारा ठराव संमत करण्यांत आला. त्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना जिनासाहेब म्हणाले कीं "राष्ट्र या शब्दाची कोणतीहि व्याख्या घेतली तरी त्या व्याख्येनुसार मुसलमान हे जमात म्हणजे एक स्वतंत्र राष्ट्र आहेत असें दिसून येईल. म्हणून अशा लोकांना त्यांची स्वतःची अशी पितृभूमि असणें, त्यांच्या मालकीचा असा देश असणें आणि त्यांचें स्वतंत्र शासन किंवा सरकार असणें अवश्यकच आहे."[१] "इस्लाम व हिंदुत्व यांचें खरें स्वरूप आपल्या हिंदु मित्रांना कां आकलन होऊं नये तें समजत नाहीं. धर्म या शब्दाच्या वाच्यार्थाच्याच दृष्टीनें पाहिलें तर या दोन जीवनदृष्टि केवळ धार्मिक नसून त्या भिन्न व स्वतंत्र अशा दोन समाजव्यवस्था आहेत असें दिसून येईल. हिंदु-मुसलमान मिळून एक समान राष्ट्रीयत्व कधींकाळीं निर्माण करतां येईल हें केवळ एक स्वप्नच आहे. हिंदुस्थानचें एक राष्ट्र बनवण्याची ही भ्रामक कल्पना मर्यादेबाहेर गेली असून आपल्या देशांतील हरतऱ्हेच्या अस्वस्थतेला तीच कारणीभूत होत आहे. ही कल्पना आपण वेळींच सुधारली नाहीं तर ती हिंदुस्थानच्या विनाशास कारण होईल. हिंदूंचे व मुसलमानांचे धर्मपंथ, सामाजिक रूढी, वाङ्मय हीं पृथक् आहेत. त्यांच्यांत रोटी-बेटी-व्यवहार होत नाहीं. खरें पाहूं गेलें तर त्यांच्या संस्कृतीच एकमेकांपासून भिन्न असून त्या परस्पर-विरोधी अशा विचारांवर व समजुतींवर आधारलेल्या आहेत. हिंदुमुसलमानांची ऐतिहासिक स्फूर्तिस्थानेंहि भिन्न

---

१. जिनांचीं अलीकडचीं भाषणें व लेख, पृ. १५५.

आहेत हें उघडच आहे. दोघांचीं पुराणें वेगळीं, विभूति वेगळ्या, कथाप्रसंग वेगळे. अनेक प्रसंगीं तर असेंहि दिसून येतें कीं एक जिला पूज्य मानते ती व्यक्ति दुसऱ्या जमातीच्या दृष्टीनें त्याज्य ठरते. एकीला जो आपला जय वाटतो तो दुसरीला आपला पराभव वाटतो. अशीं दोन राष्ट्रें एकाला बहु-संख्य पक्ष व दुसऱ्याला अल्पसंख्य पक्ष कल्पून एकाच शासनसत्तेच्या गाड्याला जुंपण्याचा प्रयत्न झाल्यास त्यांतून वाढता असंतोष निर्माण होऊन अंतीं त्या शासनसत्तेच्या राज्यशकटाचा नाश झाल्याविना राहणार नाहीं."[१]

कॉन्फेडरसी ऑफ इंडिया या नांवाचें पुस्तक 'एक पंजाबी' या टोपण नांवानें कोणीं लिहिलें आहे. त्यांनीं याच सिद्धांतानुसार आपलें प्रतिपादन केलेलें आहे. ते म्हणतात, "यापूर्वीच्या आपल्या विवेचनावरून आपणांस समजून येईल कीं हिंदु व मुसलमान या दोन अगदीं भिन्न अशा जमाती आहेत. त्यांच्या संस्कृतींमध्यें ढळढळीत भेद आहेत. त्यांचे एकमेकींवर परि-णाम घडलेले असले तरी त्या एकमेकींत विलीन होणें शक्य नाहीं. त्यांच्या-संवयी व रूढी, समाजरचना, धार्मिक, राजकीय आणि संस्कृतिविषयक कल्पना, त्यांचीं नैतिक मूल्यें, त्यांच्या परंपरा, भाषा, वाङ्मय, कला, जीवनदृष्टि हीं सगळीं परस्परांहून भिन्न इतकेंच नव्हे तर परस्परविरोधी आहेत. त्यांच्या जीव-नांतील महत्त्वाच्या बाबतींत जी विसंगतता आहे ती एकराष्ट्रीयत्वाला सहाय्यक ठरणारी नव्हे. तिच्यामुळें परस्परांविषयीं संशय व गैरसमज पैदा होतात. या दोन जमातींमध्यें मूलतःच भेद आहेत. भूतकालापासून आतांपर्यंत त्यांची परस्परांशीं स्पर्धा सुरू आहे. गेल्या हजार वर्षांच्या अवधींत त्यांनीं एकमेकींवर अनेक आघात केलेले आहेत. त्यांच्यांत एवढी मोठी दुफळी पडलेली आहे कीं पुन्हां ती मिटवून घेणें दुरापास्त झालेलें आहे. गेलीं कांहीं शतकें दोघींना समान असणारी जर कोणती एकादी गोष्ट आपल्या दृष्टोत्पत्तीला येत असेल तर ती म्हणजे दोघींच्याहि मानेवर असलेलें परसत्तेचें जोखड. तें एकदां दूर झालें कीं त्यांच्यांत फाटाफूट सुरू होईल आणि सध्यां विशेष तीव्रतेनें भासत नसलेले त्यांच्यांतील विरोध उत्कटत्वानें प्रकट होऊं लागतील."[२]

---

१. जिनांचीं अलीकडचीं भाषणें व लेख, पृ. १५३.

२. 'एक पंजाबी': कॉन्फेडरसी ऑफ् इंडिया, पृ. १५०–१५१.

अलीगडचे आचार्य सय्यद झाफरुल हसन आणि महमद अफझल हुसेन कादरी यांनीं एक पुस्तिका लिहिली असून त्यांनीं हिंदुस्थानच्या फाळणीची एक योजना तयार केली आहे. 'एका पंजाब्या'इतकेंच त्यांनींहि आपलें म्हणणें आग्रहानें मांडलें आहे. ते म्हणतात, "त्यांत ( म्हणजे १९३५च्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्यांत ) जर कोणता मूलभूत दोष असेल तर तो असा आहे कीं हिंदूंच्याहून भिन्न असें मुसलमानांचें राष्ट्र आहे, त्यांचे दृष्टिकोण व त्यांच्या आकांक्षा परस्पर-विरुद्ध आहेत आणि त्यांचा समावेश एका राष्ट्रांत होणें अशक्य आहे या निर्विवाद सत्याकडे त्यांत दुर्लक्ष झालेलें आहे." पुनश्च ते म्हणतात, "आम्हीं हिंदुस्थानांतील मुसलमानांनीं इतर गोष्टींबरोबर याहि मुद्द्यावर विशेष भर दिला पाहिजे व तो आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत राहिलें पाहिजे, कीं, हिंदुस्थानांतील मुसलमान हे एक स्वतंत्र राष्ट्र आहेत. हिंदूंच्याहून व इतर बिगर-मुसलमानांहून सर्वस्वीं निराळें असें त्यांचें राष्ट्रीय अस्तित्व आहे. झेक लोक आणि सुडेटन जर्मन यांच्यामध्यें जितका भेद आहे त्यापेक्षांहि अधिक भेद मुसलमान व हिंदु यांच्यामध्यें आहे."

'पाकिस्तान—एक राष्ट्र' या नांवाचें पुस्तक एल्. हमझा यांनीं लिहिलेलें असून तें लिहिण्यांत त्यांचे पुढील दोन उद्देश आहेत:—( १ ) हिंदुस्थान हा एक देश नसून तो एक देशसंघ आहे व त्यांत परस्परांहून अत्यंत भिन्न अशा समाजस्थिति नांदत आहेत आणि ( २ ) त्यांतील रहिवाशांमधली वांशिक व सांस्कृतिक भिन्नता इतकी मोठी आहे कीं आधुनिक राजकीय परिभाषेंत ज्याला राष्ट्र म्हणतां येईल अशा एका राष्ट्राचे रहिवासी असें त्यांना म्हणतां येणार नाहीं; त्यांना अनेक राष्ट्रांचे राष्ट्रिकच समजलें पाहिजे.[१] हे भेद वर्णन करून दाखवीत असतां तर त्यांच्या काव्यशक्तीला बहर आलेला आहे. त्यांनीं "हिंदु-धर्म वर्षाऋतूंत रुजलेला आहे तर इस्लाम सहाऱ्यांत विकसलेला आहे,"[२] असें वर्णन केलेलें आढळतें. 'हिंदुस्थानच्या वायव्येकडील टापूचें वैशिष्ट्य ठळकपणें जर कशानें लक्षांत येत असेल तर तें या भागांत दिसून येणाऱ्या उंटांच्या

१. एल्. हमझाः पाकिस्तान—एक राष्ट्र, पृ, ७ . २. उक्त ग्रंथ, पृ. ४५.

वैपुल्यामुळें.[१] 'आमच्या अनेक शास्त्रांत—भूगोलांत, इतिहासांत, तत्त्वज्ञानांत—उंटाचा उल्लेख आढळेल. हे उल्लेख इतके विपुल आहेत कीं केवळ त्यांच्यावरून मानवी संस्कृतीच्या विकासांतील एका कालखंडाच्या इतिहासाचा बोध आपणांला होण्यासारखा आहे. आशियाच्या नैऋत्य कोपऱ्यांतल्या एका जमातीच्या स्वयंस्फूर्त उदयाच्या रूपानें अवतीर्ण होऊन जिनें आपल्या अनिरुद्ध संचाराच्या कवेमध्यें त्या काळीं ज्ञात असलेलें सारें भूखंड कवळून टाकलें आणि इतिहास-प्रवाहांत मन्वंतर घडवून आणलें त्या शक्तीचें उंट हें प्रतीक असें समजण्यास हरकत नाहीं. आज शतकें उलटून गेल्यामुळें आपल्या डोळ्यांना अरबांच्या वैभवशाली इतिहासाचे उज्ज्वल रंग मंद भासत आहेत. शतकानुशतकें चालू राहिलेल्या अरबांच्या या विजययात्रेचें उंट हेंच वाहन असून वाळवंटांतील वाळू गगनांत उडवून दिशा धुंद करणाऱ्या सायमून (वादळी वारे) वाऱ्यांची पार्श्वभूमि तिला लाभलेली आहे. अरबांचें वैभव आतां लयास गेलेलें असलें तरीहि आपल्या अफाट पसरलेल्या वैराणपणामुळें आणि त्यांत वस्ती करून राहिलेल्या मानवांच्या धर्मविषयक व संस्कृतिविषयक कल्पनांच्या मूलभूत एकरूपतेमुळें इतरांहून स्पष्टपणें भिन्न दिसणाऱ्या या भूखंडांत अजूनहि उंट हाच मानवाचा सहाय्यक आहे.

या उंटांच्या प्रदेशांत अद्यापिहि वीरांच्या हातांत वांकड्या पात्यांच्या तलवारीच असतात, तेथें तंबोरीवरच सूर छेडले जातात; मशिदी आणि मुएज्जिन, घुमट आणि मनोरे हीं इस्लामी संस्कृतीचीं चिन्हें अजूनहि तेथें आहेत."[२] उंट वगैरेंसारख्या पुराव्यावर आपल्या युक्तिवादाची इमारत रचणाऱ्या या लेखकाच्या ध्यानांत ही गोष्ट तेवढी आलेली दिसत नाहीं, कीं अरेबियांतल्याप्रमाणेंच राजपुतान्यांतहि उंट असल्याकारणानें हिंदुस्थानपासून त्याचा वायव्य भाग तेवढा तोडून अलग करावा हा युक्तिवाद लंगडा ठरतो. राजपुतान्यांत उंट आहेत पण तेथें वांकड्या पात्यांच्या तलवारी व तांबोरीन, माशिदी व मुएज्जिन आणि घुमट व मनोरे यांपैकीं कांहींच दिसून येत नाहीं. लेखकाचा

१. एल्. हमझा: पाकिस्तान—एक राष्ट्र, पृ. ७०. २. उक्त ग्रंथ, पृ. ७२.

हा युक्तिवाद खरा मानल्यास भरपूर पावसाच्या प्रदेशांतच आढळून येणाऱ्या शेत-वाड्यांनीं व फळांफुलांनीं समृद्ध अशा पूर्व भागाची फाळणी करावी ही मागणी पण फोल ठरते. आणि हाच तर्क पुढें चालवल्यास भरपूर पाऊसपाणी असणाऱ्या मलाया द्वीपकल्पांत मुसलमानांची वस्ती असावी हेंहि तर्कविरुद्धच ठरेल, त्याची वाट काय ?

नैसर्गिक भेदाचा मुद्दा पुढें करून वायव्येला एक पाकिस्तान स्थापावें असें म्हणणाऱ्यांच्या युक्तिवादांतला पोंचटपणा श्री. एफ्. के. दुराणींच्या नजरेंतून सुटलेला नाहीं. या गृहस्थांनीं "दि मीनिंग ऑफ् पाकिस्तान" (पाकिस्तानचा अर्थ) म्हणून एक पुस्तक लिहिलें आहे, त्यांत ते म्हणंतातः—

"मुसलमान पाकिस्तानांतले असोत वा हिंदुस्थानांतले असोत त्या सर्वांचें मिळून एकच राष्ट्र मानलें पाहिजे आणि हिंदुस्थानांतले जे आपले धर्मबांधव आहेत त्यांना आपण पाकिस्तानांत राहणारांनीं आपले भाईबंदच मानलें पाहिजे."[१]

एल्. हमझा यांच्या मुद्द्याविषयीं त्यांनीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे:—"पाकिस्तान—एक राष्ट्र या ग्रंथाच्या कर्त्याचा सारा युक्तिवाद पंजाब, काश्मीर, सरहद्दप्रांत, सिंध व बलुचिस्तान या वायव्येकडील प्रांतांचें भौगोलिक स्वरूप बाकीच्या हिंदुस्थानपेक्षां निराळें आहे एवढ्याच मुद्द्यावर आधारलेला आहे. कांहीं प्रांतांत इतर प्रांतांहून पाऊस अधिक पडतो. कांहीं प्रांतांत मुख्य पीक गव्हाचें, तर कांहींमध्यें भाताचें. भरपूर पावसाच्या टापूंत वृक्ष-वनस्पतींची समृद्धि आहे, पण जेथें पावसाचें मान कमी तेथें झाडझाडोराहि आहे. प्रांतोप्रांतींच्या फळांफुलांत फरक आढळतो. वायव्येची रुक्ष भूमि उंटांचें नैसर्गिक असें स्थान आहे. दक्षिण हिंदुस्थान, बंगाल व आसाम या भागांतला आर्द्र प्रदेश हत्तींना मानवणारा आहे. वायव्येकडील कोरड्या हवामानांत वाढणारीं माणसें देशांत इतर ठिकाणीं आढळून येणाऱ्या सांवळ्या रंगाच्या व किरकोळ देहाच्या माणसांहून निराळ्या प्रकारचीं आहेत. अनेक वंशांचे

---

१. एफ्. के. खान दुराणीः पाकिस्तानचा अर्थ, पृ. ८ (प्रस्तावना).

रहिवासी असलेल्या, अनेक अक्षांश–रेखाशांचा प्रदेश व्यापणाऱ्या आणि सागर, पर्वत, वाळवंट इत्यादि विविध भौगोलिक घटकांचा परिणाम–विषय बनलेल्या या अवाढव्य देशांत इतक्या विविध प्रकारचे मानवसमूह आणि धनधान्यें उत्पन्न होणें साहजिक आणि अपरिहार्यहि आहे. मुसलमानी हिंदुस्थानच्या मर्यादा ठरवण्याच्या दृष्टीनें या गोष्टी गैरलागू समजल्या पाहिजेत. कारण एकदां आपण ही विचारसरणी पत्करली कीं पाकिस्तानव्यतिरिक्त हिंदुस्थानच्या विभागांत वसणाऱ्या, निराळ्या प्रकारची पोषाखाची पद्धति असणाऱ्या व आपल्याहून निराळ्या प्रकारचें अन्न सेवन करणाऱ्या मुसलमानांवर आपणांला कोणताहि हक्क सांगतां येणार नाहीं. त्यांना परकें मानावें लागेल, त्यांचे व आपले हितसंबंध एक असें म्हणतां येणार नाहीं. पाकिस्तानांतल्या एकाहि मुसलमानाला ही विचारसरणी क्षणभर देखील मान्य होणार नाहीं. खरें म्हणजे पंजाबांतील एकहि मुसलमान हा युक्तिवाद विचार करण्यालायक आहे असें मानण्याससुद्धां तयार होणार नाहीं."[१]

द्विराष्ट्रसिद्धांत शाबीत करण्यासाठीं इतर कांहींजणांनीं निराळाच खटाटोप चालवलेला आहे. "थॉट्स् ऑन् पाकिस्तान" (पाकिस्तानसंबंधींचे विचार) या ग्रंथाचे कर्ते डॉ. भीमराव अंबेडकर हे त्यांपैकीं प्रमुख होत. मुसलमानी आक्रमकांनीं व बादशहांनीं हिंदूंचीं हजारों देवळेंरावळें जमीनदोस्त करून त्यांतील मूर्तींचा विच्छेद कसा केला आणि देवळांच्या जागीं मशिदी कशा उभारल्या किंवा देवळांचे खांब व चिरे काढून ते मशिदी बांधण्यासाठीं कसे उपयोगांत आणले; आपल्या हातीं गवसलेल्या हिंदूंना कुराण माना नाहीं तर शिरच्छेदाला तयार व्हा असा धाक दाखवूनहि ज्या हजारों हिंदूंनीं कुराण मानण्यास नकार दिला त्यांचे हालहाल कसे केले आणि हजारोंना कसें जिवें मारण्यांत आलें, त्याचीं वर्णनें इतिहासांतून जमा करण्याचा उद्योग या मंडळींनीं चालवलेला आहे. हे जुलूम हिंदु विसरलेले नाहींत, हिंदूंना त्याचा विसर पडणें शक्य नाहीं, त्या जुलमांच्या स्मृति हिंदूंच्या मनावर वज्रलेप

१. एफ्. के. खान दुराणी: पाकिस्तानचा अर्थ, पृ. १–२.

झालेल्या आहेत, असें दर्शविण्याचा हेतु या प्रयत्नांच्या मागें आहे. मशिदीं-समोरील वाद्यवादन किंवा गोहत्या यांच्यासारख्या कारणांमुळें उद्भवलेल्या दंग्यांचा पुरावा पुढें करून असाहि युक्तिवाद लढवण्यांत येत असतो कीं हिंदु-मुसलमानांतील पूर्वींचें वैमनस्य अद्यापि कायम असून ब्रिटिशांच्या जोखडा-खालीं दोघांच्याहि माना गुंतलेल्या असल्या आणि ब्रिटिशांच्या सत्तेचा चाबूक दोघांच्याहि पाटीवर बसत असला तरीहि या दोन जमातींत सलोखा निर्माण झाल्याचें दिसून येत नाहीं.

पण हिंदुस्थानचे दोन तुकडे पाडले पाहिजेत असा सिद्धांत प्रस्थापित करावयास निघालेल्या या मंडळीच्या वरील युक्तिवादापासून हिंदुस्थानचा कांहीं भाग तोडून काढून तो मुसलमानांना बहाल करावा असा निष्कर्ष कसा काय निघतो, तें कांहीं लक्षांत येत नाहीं.

मुसलमानांनीं केलेले अत्याचार हे भ्रष्टाकाराचे आणि विध्वंसनाचे प्रकार होते. हिंदूंच्या धार्मिक दृष्टीनें तो भ्रष्टाकार होता तर कलेच्या दृष्टीनें तो विध्वंस होता. अशा प्रकारचे भ्रष्टाकार व विध्वंस इस्लामला संमत होते आणि इस्लामी धर्म असल्या दुराचरणाला उत्तेजन देणारा धर्म आहे असें या मंडळींना सुचवावयाचें आहे काय? आणि गत कालांत अशा आचरणाला इस्लामी धर्माकडून अनुमति किंवा उत्तेजना मिळाली असेल तर आतां त्या प्रकारची अनुमति किंवा उत्तेजना इस्लामी धर्माकडून मिळण्याचें बंद झालें आहे असें समजावयाचें काय? याबाबत इस्लामचें धोरण बदललें असल्याचा पुरावा काय? ही बर्बरता स्वतःला इस्लामी धर्माचे अनुयायी म्हणवणाऱ्या साहसी व्यक्तींच्या हातून घडली, त्यांनीं इस्लामी धर्माचा आसरा केवळ स्वतःचा स्वार्थ साधण्यास्तव घेतला, त्यांच्या आचरणाचा आणि इस्लामचा वास्त-विक कांहीं संबंध नव्हता असें म्हणावयाचें असेल तर इस्लामी धर्माचा गैर-फायदा घेणारे सत्ता-लोलुप लोक पुन्हां निपजणार नाहींत किंवा भविष्य काळीं आपल्या सत्तेचा दुरुपयोग ते करणार नाहींत हें तरी कशावरून! हिंदुस्थानपासून वायव्येकडील टापू वेगळा करण्यांत आला आणि तेथें

मुसलमानी सत्ता प्रस्थापित झाली म्हणजे त्यांत वस्ती करून राहणाऱ्या अभागी लोकांवर पूर्ववत् अत्याचार करण्याची नामी संधि मुसलमानांना सांपडेल असें तर सुचवण्याचा या लेखकांचा मानस नाहीं ? हा त्यांचा उद्देश असेल तर असल्या कोणत्याहि योजनेला कोणीहि बिगर-मुसलमान संमति देईल ही आशा फोल आहे.

इस्लामची शिकवणूक अशा प्रकारें अहिष्णुतेची नसेल, शांततेचीं व सहिष्णुतेचीं जीं मूलभूत तत्त्वें इस्लामनें पुरस्कारलीं त्यांच्या सर्वस्वीं विरुद्ध असे हे अत्याचार असतील तर गत घटनांचीं मढीं मुद्दाम उकरून काढून त्यांचें प्रदर्शन मुसलमान व मुसलमानेतर जनतेपुढें करण्यांत कोणता शहाणपणा ? ज्या कटु स्मृति विसरून जाण्यांतच सर्वांचें कल्याण आहे त्या या खटाटोपामुळें पुन्हां ताज्या झाल्याशिवाय राहतील काय ? इस्लामच्या नांवावर इस्लामला संमत नसलेले अनाचार करून ज्या मुसलमानांनीं इस्लामी धर्माच्या इतिहासाला कलंक लावला त्यांच्या दुष्कृत्यांचें हें लज्जास्पद प्रकरण विसरून जाणें मुसलमानांच्या हिताचेंच नाहीं काय ? तीं कृत्ये त्यांनीं स्वार्थबुद्धीनेंच केलेलीं होतीं, धर्मप्रसाराच्या हेतूनें नव्हे. इस्लामी धर्मानें गत कालांत व आजहि आपल्या प्रचारासाठीं याहून उच्चतर अशा साधनांची योजना केलेली आहे. इतिहासांतलें हें जुलुमी प्रकरण विसरून जाणें मुसलमानेतरांच्या दृष्टीनेंहि हितप्रदच ठरेल. कारण त्यामुळें अनन्वित कृत्यें करणाऱ्या या धर्मासंबंधींच्या भेसूर कल्पना त्यांच्या मनांतून दूर होतील आणि सलोख्याचें वातावरण निर्माण होण्यास व त्याची वाढ होण्यास मदत होईल.

या ऐतिहासिक घटना म्हणजे मुसलमानी सत्तेचें एक अवश्यमेव अंग आहे असें मुसलमान व मुसलमानेतर जनता मानूं लागेल तर भूतकालांतल्या घटनांची पुनरावृत्ति पूर्वीच्याच पद्धतीनें करण्याची सत्ताहि पूर्वीच्याच मार्गांनीं मुसलमानांना हस्तगत करावी लागेल हें ओघानेंच सिद्ध होतें. या घटनांचे उल्लेख ज्या साहित्यांत सांपडतात त्यावरून हेंहि समजून येण्यासारखें आहे कीं त्या काळच्या मुसलमानांना मनःपूत वागण्याचे अधिकार मुसलमानेतरांकडून

कांहीं स्वखुषीनें दिले गेलेले नव्हते. त्यानंतर आतांपर्यंत शतकांचा कालावधि लोटला असून तेवढ्या अवधींत जगांत जीं कांहीं स्थित्यंतरें घडलीं तीं आणि आजची जगांतली स्थिति यांच्यामुळें हिंदी मुसलमानांचा जो दृष्टिकोन पूर्वी होता त्यांत कांहींच फरक झालेला नसेल तर मुसलमानेतर जनतेनें तरी आपली गत कालांतली विरोधी भूमिका सोडून हे जुलुमी प्रकार पुन्हां चालू देण्यास संमति काय म्हणून द्यावी? त्या वेळीं घडलेल्या अत्याचारांचा जगांतल्या साऱ्या सुसंस्कृत लोकांनीं--हिंदुस्थानांतील मुसलमानांनींसुद्धां—धिक्कारच केलेला आहे. हे प्रकार इस्लामला मान्य आहेत असें तरी असलें पाहिजे किंवा अमान्य आहेत असें तरी असलें पाहिजे. इस्लामला ते मान्य असतील तर त्यांची पुनरावृत्ति घडण्याचा थोडासा सुद्धां संभव ज्यामुळें निर्माण होईल अशा प्रकारच्या कोणत्याहि इस्लामी राज्याला कोणाहि मुसलमानेतरांची अनुमति मिळणें अशक्य आहे. "इस्लामी राज्याचें अंतिम ध्येय इस्लामी धर्मांतल्या तत्त्वानुसार जगभर क्रांति घडवून आणणें हें राहणार"[1] असें पंजाबीनीं आपल्या पुस्तकांत म्हटलें आहे. वर निर्देश केलेला सिद्धांत खरा मानल्यास अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ति इस्लामी राज्यांत झाल्याशिवाय राहणार नाहीं हें तर्कसिद्ध होय. पण जर हे प्रकार इस्लामला मंजूर नसतील तर त्यांचें स्मरण पुनरुज्जीवित करण्यापासून कोणतेंहि कल्याण साधणार नाहीं. मुसलमानेतरांचीं मनें अधिक कलुषित होण्यास मात्र त्यांची स्मृति कारणीभूत होईल. देशाची फाळणी कोणाला मान्य होवो वा न होवो, निष्कारण एकाद्याचें मन दुखवणें हें कोणाचेंहि उद्दिष्ट असू शकत नाहीं ही गोष्ट प्रत्येकासच मान्य होण्यासारखी आहे. बरें हिंदुमुसलमानांचे गतकालांतले संबंध हे अशा प्रकारचे असल्याकारणानें ते एकत्र नांदण्यास राजी होणेंच शक्य नाहीं तेव्हां त्यांनीं विभक्त होण्याचें ठरवणेंच इष्ट, असें सिद्ध करण्याचा या लेखकांचा हेतु असेल तर त्यांच्या प्रतिपादनाचा परिणाम नेमका उलटा होण्याचा संभव दिसतो आहे हें त्यांनीं ध्यानांत घ्यावयास नको काय? कारण पूर्वी आलेल्या कटु अनुभवांची

---

१. 'एक पंजाबी': कॉन्फेडरसी ऑफ् इंडिया, पृ. २६९–२७०.

चव पाकिस्तानांत राहणाऱ्या आपल्या क्रोडों बांधवांना पुन्हां चाखावी लागेल अशी धास्ती असल्याकारणानें विभक्तीकरणाच्या तत्त्वाला हिंदु जनता कधींहि मान्यता देण्याला तयार होणार नाहीं. तात्पर्य, हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाचा व्यावहारिक रीतीनें विचार करण्याच्या कामीं गत कालांतील अनिष्ट घटनांचे उल्लेख व तत्संबंधींचे उतारे हे केवळ निरुपयोगीच ठरतात.

अशा प्रकारच्या इतिहास–संशोधनाचा उद्देश किंवा त्याची उपयुक्तता याबद्दलचा विचार बाजूला ठेवला आणि त्यासाठीं लागणारा व्यासंग व कुशाग्रबुद्धि यांचा विचार केला तरीहि असेंच दिसून येतें कीं जीर्णशीर्ण झालेल्या बाडांतून किंवा कोऱ्याकरकरीत आधुनिक ग्रंथांतून असलीं अवतरणें धुंडाळून काढण्यासाठीं उपर्युक्त दोन गुणांचीहि अवश्यकता फारशी नसते. अगदीं अलीकडच्या काळापर्यंत सर्वसामान्यपणें राजे व नेते, त्यांची भलीबुरीं कृत्यें, त्यांनीं मारलेल्या लढाया व मिळवलेले जय, त्यांच्या दरबारांचें वैभव व त्यांच्या महालांतील कारस्थानें हेच इतिहासाचे विषय समजले जात व त्यांच्या विस्तृत वर्णनांनीं इतिहासग्रंथ भरलेले असत. शांततेनें व न कुरकुरतां आपलें नित्याचें जीवनकार्य करीत राहण्यांत संतोष मानणारा, शेतांत नांगर चालवून किंवा घरबसल्या चरखा व माग, पटाशी व रंधा, सुई व दोरा किंवा असलींच नानाविध हत्यारें वापरून निढळाच्या घामानें स्वतःचें पोट भरणारा जो सामान्य मनुष्य त्याच्याकडे या ग्रंथकारांचें फारच थोडें लक्ष जाई. साधु व संत, पंडित व द्रष्टे, शास्त्रवेत्ते व समाजवेत्ते, कवि व तत्त्वज्ञ, कलावंत व गुणी जन यांच्या कार्यालाहि त्यांच्या लेखनांत योग्य तें महत्त्व देण्यांत येत नाहीं. हे ग्रंथकार पुष्कळदां मुसलमान राजेरजवाड्यांच्या पदरीं असत. तेव्हां आपण आपल्या मिठाला आणि धर्माला जागलें पाहिजे असें त्यांना वाटे. त्यांची अशी भ्रामक समजूत असावी कीं आपल्या मुसलमान राजानें किंवा नेत्यानें काफिर म्हणजे पाखंडी लोकांवर जे जुलूम केले त्यांचें वर्णन केल्याशिवाय स्वतःच्या धन्याची स्वधर्मनिष्ठा पुरेशी सिद्ध होणार नाहीं आणि पुढील पिढ्यांतल्या मुसलमान राजांना गिरवण्यासाठीं कित्ता म्हणून आणि जित जनतेच्या

उरांत धडकी भरवण्याचें साधन म्हणून त्या दुष्कृत्यांचें तपशीलवार रसभरित वर्णन केल्यावांचून आपलें धर्मप्रेम व्यक्त होणार नाहीं. हीं वर्णनें अतिशयोक्तीचीं आहेत किंवा असत्य आहेत असें म्हणण्याचें कारण नाहीं. त्या घटना घडल्या असतील; पण त्याचबरोबर हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे कीं नमूद करण्यालायक अशा तेवढ्याच घटना त्या काळीं घडल्या असें नव्हे. शेंकडों वर्षें परस्परांच्या सुखदुःखाचे वांटेकरी होऊन हिंदुमुसलमान एकत्र कसे नांदले, दोन्ही जमातींतल्या साधुफकीरांनीं परस्परांच्या चालीरीतींवर, धर्मकर्मांवर, जीवनावर व परिस्थितीवर कसा परिणाम घडवून आणला, अपत्यजन्माच्या व लग्नविधीच्या प्रसंगीं मुसलमान कुटुंबांत दिसून येणाऱ्या सोहळ्यांचें हिंदूंच्या सोहळ्यांशीं कसें साम्य दिसून येतें, उलट त्याच रीतीभातींच्या बाबतींत हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या प्रांतांत राहणाऱ्या मुसलमानांत हिंदूंच्या प्रमाणेंच कशी तफावत दिसून येते, हजारों हिंदूंना मुसलमानी धर्म स्वीकारावयास लावण्याचें श्रेय मुसलमान विजेत्यांच्या तलवारींपेक्षां मुसलमान साधुपुरुषांच्या बोधालाच कसें अधिक दिलें पाहिजे, इत्यादि मुद्द्यांचें तितक्याच बारकाईनें वर्णन करावयाचें ठरवलें तर बादशहांच्या व जेत्यांच्या क्रूर कृत्यांनीं इतिहासाचीं जितकीं पृष्ठें भरलेलीं आहेत त्यांच्यापेक्षां किती तरी अधिक पृष्ठें भरून काढतां येतील. बादशहा-नबाबांचीं कृष्णकृत्यें वर्णन करण्यासाटीं खर्चीं पडलेलीं पानें आणि वर उल्लेखिलेल्या कृत्यांचें वर्णन केलें असतां लागणारीं पानें यांच्यांतील परस्पर प्रमाण देशांतील राजरजवाडे, बादशहा-नबाब इत्यादींची संख्या आणि देशांतील सामान्य जनांची संख्या यांच्यांतील प्रमाणाइतकेंच भरेल. या दोन जमातींतले लोक एकमेकांविरुद्ध दंगेधोपे करण्यांत, खूनलूटमार करण्यांत, जाळपोळ करण्यांत जेवढा काळ घालवतात त्या काळाचें, शांततेच्या, परस्परसलोख्याच्या, सहकार्याच्या, सहानुभूतीच्या व दयाभावनेच्या वातावरणांत नेहमीं व्यतीत होत असणाऱ्या काळाशीं तुलना करतां जें प्रमाण पडेल तेंच प्रमाण या दोन तऱ्हांच्या इतिहास-ग्रंथांमध्यें पडत असल्याचें दिसून येईल. वस्तुस्थिति अशी असतांहि अनिष्ट घटनांना आजच्या काळांतल्या वृत्तपत्रांतून

देखील अवास्तव महत्त्व देण्यांत येत असतें. हींच वृत्तपत्रांची अवतरणें प्रमाण मानून यानंतर ५०० वर्षांनीं जर कोणीं आपल्या काळाचा इतिहास लिहावयास घेतला आणि हीं अवतरणें त्यानें उद्धृत केलीं तर ब्रिटिशांचा शांतता व सुव्यवस्था दाखवणारा राजदंड विद्यमान असतांहि हिंदुस्थानांत एक दिवसदेखील शांततेचा गेला नाहीं असें त्या इतिहासकाराला सहज दाखवून देतां येईल. सारांश योग्य त्या सर्व साधनांची उणीव असल्याकारणानें सामाजिक व सांस्कृतिक प्रवाह, त्यांचे समाजजीवनावर घडून आलेले खोल व चिरस्थायी परिणाम आणि त्यांपासून अनाकलनीय अशा पद्धतीनें जनमनाची बनत गेलेली जडण–घडण या सर्वांचें संपूर्ण व समावेशक चित्रण करणारा ग्रंथ लिहिणें ही सुलभ गोष्ट नाहीं.

## २. राष्ट्र आणि राज्य

हिंदुस्थानच्या वायव्येकडील व पूर्वेकडील प्रदेशांत अलग व स्वतंत्र मुसलमानी राज्यें प्रस्थापित करण्यांत यावीं ही मागणी म्हणजे बाकीच्या हिंदुस्थानांत वस्ती करून असणाऱ्या हिंदु आदिकरून सर्व रहिवाशांहून पृथक् असें मुसलमानांचें एक राष्ट्र आहे या सिद्धांतावर आधारलेली असल्याकारणानें राष्ट्र म्हणजे काय तें स्पष्ट समजून घेतलें पाहिजे. हिंदुस्थानचें भौगोलिक ऐक्य हें एक सत्य आहे हें कोणालाहि नाकारतां येणार नाहीं. भौगोलिक घटना बदलणें मानवाला शक्य नसतें. श्री. के. एफ्. दुराणी यांनीं स्वच्छ लिहूनच टाकलें आहे कीं "हिंदुस्थानसारखा पर्वत आणि समुद्र यांनीं स्पष्टपणें अखड म्हणून रेखलेला दुसरा देश आढळत नाहीं हें डॉ. वेणीप्रसाद यांचेंच मत मला उलट पक्षीं मान्य आहे." सुलेमान पर्वतापासून आसामच्या टेकड्यांपर्यंत आणि हिमाचलापासून हिंदी महासागरापर्यंतचा प्रदेश त्यांत वंशाचे, वातावरणाचे व भूरचनेचे कितीहि भेद दिसत असले तरी एक अखंड भूभागच आहे."[१]

---

१. एफ्. के. खान दुराणीः पाकिस्तानचा अर्थ, पृ. २.

मग राष्ट्र म्हणजे काय? राष्ट्र कशाचें बनतें? विभक्तीकरणाचे जे पुरस्कर्ते आहेत त्यांनीं हे प्रश्न उपस्थित करून त्यांचीं उत्तरेंहि दिलीं आहेत आणि आपल्या उत्तराच्या पुष्टीकरणार्थ विद्वान् ग्रंथकारांचे हवाले दिलेले आहेत. या प्रश्नाची श्री. दुराणी यांनीं विस्तारपूर्वक चर्चा केलेली असून त्यांनीं जे कांहीं निष्कर्ष काढले आहेत ते उद्धृत करण्यासारखे आहेत. ते हे:—"(१) भौगोलिक दृष्ट्या हिंदुस्थान एक असला तरी त्यांतली जनता तशी नाहीं. राज्याची किंवा राष्ट्राची घडण बनवतांना जनतेचें महत्त्व असतें, भौगोलिक लक्षणांचें नव्हे. रेनान् या विचारवंतानें म्हटल्याप्रमाणें, "नद्यांच्या व पर्वत-राजींच्या वळणानुसार माणसांच्या मनोवृत्तींना वळण लावणें शक्य नाहीं." रेनान् म्हणतो कीं "भूमि म्हणजे एक आधार होय. ती कर्मक्षेत्र आहे, रण-क्षेत्र आहे. पण मानवच तिच्यांत आत्मा ओततो. राष्ट्र असें ज्या पवित्र वस्तूला म्हणतात तींतलें मुख्य द्रव्य म्हणजे मानव. कोणत्याहि जड पदार्थाच्या सहाय्यानें राष्ट्राची मूर्ति पुरी करतां येणें शक्य नाहीं."...(२) खरें म्हणजे राष्ट्राच्या घडणीमध्यें भौगोलिक घटकाप्रमाणेंच वंश हा देखील निर्णायक घटक नाहीं....(३) धर्म आणि राजकारण यांची गल्लत करूं नये आणि केवळ राजकारणाच्याच पायावर एकराष्ट्राची प्रस्थापना करण्यांत यावी या कल्पनेचा प्रचार हिंदु पुढारी गेलीं वीस वर्षें करीत आले आहेत. नुसत्या राजकारणाच्या पायावर राष्ट्राची उभारणी करणें शक्य आहे काय? राष्ट्र-प्रस्थापनेसाठीं निव्वळ राजकीय संबंध पुरे होत नाहींत असें राज्यशास्त्रज्ञांचें मत आहे."[१] दुराणी यांनीं आपल्या या मताच्या समर्थनार्थ लॉर्ड् ब्राइस् व प्रो. सिज्विक् यांचे उतारे दिले आहेत. "एकाच शासनसंस्थेचें आज्ञा-पालन करणें यापरत्या ऐक्याच्या दुसऱ्या कोणत्याहि स्नेहबंधाची भावना समाज-घटकांत नसेल तर अशा निव्वळ राजकीय पायावर आधारलेल्या समा-जाची परिस्थिति सापेक्षतया असमाधानकारक व अस्थिर असते. परचक्रें आणि अंतर्गत असंतोष यांच्यामुळें वारंवार जे विध्वंसक आघात समाजावर

१. एफ्. के. खान दुराणी: पाकिस्तानचा अर्थ, पृ. ४–६.

होतात त्यांचा प्रतिकार करून समाजदेह अविच्छिन्न राखण्याची शक्ति अशा प्रकारच्या समाजांत नांदत नाहीं. म्हणून एका राज्याच्या प्रजाजनांमध्यें 'राष्ट्र' या शब्दांत स्थूलमानानें अभिप्रेत असलेलीं बंधनेंहि असणें अवश्य ठरतें असें आपण मानतों,"[१] असें सिज्विक् म्हणतात. ते असेंहि लिहितात कीं, ज्या राज्याला राष्ट्र ही पदवी प्राप्त झालेली आहे त्यासंबंधींची आधुनिक काळांतील कल्पना अशी कीं एका शासनसंस्थेच्या शासनाखालीं राहत असल्यामुळें जे परस्पर-संबंध त्या राज्याच्या प्रजाजनांत निर्माण होतात त्यांपेक्षां कांहीं तरी अधिक त्यांच्यांत निर्माण झाले असले पाहिजेत. आपण एकमेकांचे आहों, एकाच देहाचे अवयव आहों अशी जाणीव सामान्यतः त्यांच्यांत असावी. म्हणजे चुकांमुळें किंवा क्रान्तीमुळें त्यांच्यावरची शासनसंस्था जरी नष्ट झाली तरीहि दृढपणें एकजूट टिकवून राहण्याची त्यांची वृत्ति नष्ट होणार नाहीं. ही जाणीव त्यांच्या ठिकाणीं असेल तर त्यांना आपण 'राष्ट्र' ही संज्ञा देऊं; मग त्यांच्यामध्यें इतर कोणत्याहि उणिवा असोत."[२] राष्ट्रीयत्वाची लॉर्ड् ब्राइस् यांनीं पुढीलप्रमाणें व्याख्या केली आहे:—'कांहीं विशिष्ट भावनांनीं सांधलेला आणि एकत्र आकर्षित झालेला मानव-समूह म्हणजे राष्ट्र.' स्पष्टीकरणार्थ ते पुढें म्हणतात, "धार्मिक व वांशिक भावना या त्यांत प्रमुख होत. पण समान भाषा, समान वाङ्मय, गत कालांत एकत्र बजावलेल्या कामगिऱ्या व भोगलेलीं संकटें यांच्या स्मृति, वर्तमान कालांतील समान चालीरीती, समान विचार-प्रणाली, समान ध्येयें व आकांक्षा यांच्यामुळें निर्माण होणाऱ्या एकत्वाच्या भावनेचाहि त्यांत समावेश होतो. कांहीं ठिकाणीं हे सर्व भावनाबंध अस्तित्वांत असल्याकारणानें त्या समूहांतील व्यक्ति एकजुटीनें राहत असतील तर कांहीं ठिकाणीं त्यांपैकीं एकादीदुसरी भावना अस्तित्वांत नसेलहि. या भावनांचें प्रमाण जितकें अधिक तितकी एकीची भावना अधिक दृढ. पण कोणतेंहि उदाहरण घेतलें तरी भावनांची संख्या

---

१. एफ्. के. खान दुराणी: पाकिस्तानचा अर्थ, पृ. ७. २. उक्त ग्रंथ, पृ. ९.

महत्त्वाची नसून महत्त्व असतें तें प्रत्येक भावनाबंध किती बळकट आहे याचें."[1] अशाच इतर कांहीं विद्वानांचे हवाले दिल्यानंतर श्री. दुराणी या निर्णयाप्रत पोंचलेले आहेत कीं 'राष्ट्रीयत्व ही वस्तुतः एक जाणीव आहे, केवळ एक मानसिक अवस्था आहे.'[२] या त्यांच्या निष्कर्षाला डॉ. अंबेडकरांचा पाठिंबा आहे. त्यांचें पुढील मत श्री. दुराणींनीं उद्धृत केलें आहे:—'राष्ट्रीयत्व ही आपलेपणाची अशी एक जाणीव आहे कीं जी त्या जाणिवेनें युक्त असणाऱ्या साऱ्या व्यक्तींना इतक्या समर्थपणें संघटित करते कीं तिच्यापुढें आर्थिक विरोधांतून व सामाजिक उच्चनीचतेतून उद्भवणारे भेदभाव निष्प्रभ ठरतात; त्याचबरोबर जे आपले नाहींत त्यांच्यापासून आपलेपणाच्या भावनेनें एकजूट झालेल्या समाजाला ती अलग राखते."[3]

म्हणून श्री. दुराणी यांनीं अंतिम निष्कर्ष असा काढला आहे कीं, 'हिंदु व मुसलमान यांच्यांत समष्टिभाव किंवा आत्मीयता किंचिन्मात्र देखील नाहीं. ते एका पंक्तीला बसत नाहींत. त्यांच्यांत बेटी–व्यवहार होत नाहीं. एकाचें अन्न दुसऱ्याला विषासमान वाटतें. मुसलमानांच्या स्पर्शानें सुद्धां हिंदु मनुष्य आपण अपवित्र झालों असें मानतो. ज्यांच्यांतून समष्टिभाव निर्माण होईल असे सामाजिक संबंधहि परस्परांमध्यें आढळत नाहींत. म्हणून एक अविभाज्य समष्टि निर्मिण्यासाठीं एकजूट होणें या दोन गटांना मानसिक दृष्ट्या केवळ अशक्यच आहे.'[४]

राष्ट्रीयत्वासंबंधींची ही कल्पना त्या मानानें आधुनिक व नवोदित कल्पना आहे असें म्हणतां येईल. गेल्या दोन किंवा फार तर तीन शतकांमध्यें या कल्पनेचा विकास झालेला आहे. लॉर्ड् ब्राइस् व प्रो. सिज्विक् यांनीं उल्लेखिलेल्या प्रवृत्ति राष्ट्र या पदवीस पोंचलेल्या समाजांत कमीअधिक प्रमाणांत आढळून येतात हें खरें, पण त्यांपैकीं एक एक प्रवृत्ति वेगवेगळी घेऊन ती एकाद्या समाजांत विद्यमान आहे किंवा नाहीं, असल्यास तिचें प्रमाण काय,

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ८.

२. उक्त ग्रंथ, पृ. ११. ३. उक्त ग्रंथ, पृ. १२. ४. उक्त ग्रंथ, पृ. १३.

हें शोधून त्यावरून त्या समाजाला राष्ट्र म्हणतां येईल किंवा काय हें ठरवणें योग्य होणार नाहीं. या सर्व प्रवृत्तींच्या सभोंवारचें ऐतिहासिक वातावरण आणि त्या वातावरणांत परस्परांवर घडून आलेल्या त्यांच्या क्रिया-प्रतिक्रिया यांचा संकलित परिणाम होऊन राष्ट्रीयत्वाचें स्वरूप बनत असतें. स्टॅलिन्नें दाखवून दिल्याप्रमाणें 'राष्ट्र हें मुख्यत्वेंकरून एक समष्टि आहे, निश्चित स्वरूप असलेली समष्टि आहे.' ती 'वांशिक किंवा जमातीच्या स्वरूपाची'च असेल असें नाहीं. त्याचप्रमाणें 'मानवांच्या जुजबी मेळाव्या'चें स्वरूप तिला नसून राष्ट्र म्हणजे 'लोकांची स्थिर अशी संहति' होय. समान भाषा हें राष्ट्राचें विशेष लक्षण आहे. त्याचें दुसरें विशेष लक्षण म्हणजे एक विशिष्ट भूमिभाग त्याच्या ताब्यांत असणें. संबद्ध असें आर्थिक जीवन किंवा आर्थिक सुसंबद्धता हें आणखी एक लक्षण होय. याखेरीज राष्ट्राची विशेष अशी कांहीं आध्यात्मिक प्रकृति असते, मानसिक घडण असते. तिलाच राष्ट्राचें शील किंवा त्याचे गुणविशेष असें म्हणतात आणि ते त्या राष्ट्राच्या स्वतंत्र अशा संस्कृतींतून प्रकट होत असतात. "ऐतिहासिक परंपरेनें विकसत आलेली व समान संस्कृतीच्या द्वारा जिची भाषिक, प्रादेशिक, आर्थिक व मानसिक सुसंबद्धता व्यक्त होत आली आहे अशी सुस्थिर समष्टि म्हणजे राष्ट्र" अशी व्याख्या स्टॅलिन्नें केलेली आहे.[१]

राज्य व राष्ट्र यांच्यामध्येंहि आपणांस भेद केला पाहिजे. तीं दोन्ही नेहमीं समव्याप्त नसतात. बहुराष्ट्रिक राज्यें म्हणजे अनेक राष्ट्रें एकाच छत्राखालीं असलेलीं राज्यें पूर्वीं होतीं आणि सध्यांहि आहेत. उदाहरणार्थ कॅनडांतील इंग्रज व फ्रेंच् लोक हे भिन्न राष्ट्रिक असूनहि त्यांचें एकच राज्य बनलेलें आहे. इंग्रज व बोअर् यांनीं दक्षिण आफ्रिकेंत घनघोर युद्ध करून रक्ताचे पाट वाहवले; पण नंतर परस्परांच्या संमतीनें एक राज्य स्थापलें. युनायटेड् स्टेट्स्मध्यें अनेक राष्ट्रांतील लोक एकाच राज्याचे नागरिक म्हणून वस्ती करून राहिले आहेत. सोव्हिएट् रशियांत अनेक राष्ट्रें समाविष्ट आहेत. त्यांना

---

१. जे. स्टॅलिन् : मार्क्सिझम् अँड् दि क्वेश्चन् ऑफ् नॅशनॅलिटीज्, पृ. ६.

राज्यकारभार चालवण्याचें स्वातंत्र्य असून राज्यघटनेप्रमाणें त्यांना संयुक्त राज्यांतून फुटून वेगळें होण्याचा हक्कहि देण्यांत आलेला आहे. राज्यकारभार चालवण्याचें जें स्वातंत्र्य या लोकसत्ताक घटकांना देण्यांत आलेलें आहे त्याचा सांप्रत इतका विस्तार करण्यांत आलेला आहे कीं त्यांना स्वतःचें सैन्य ठेवतां येतें, परराष्ट्रांशीं प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करतां येतात, त्यांच्याशीं करार करतां येतात व परस्परांच्या देशांत वकिलाती ठेवतां येतात. स्विस् लोकांचें उदाहरण तर सुप्रसिद्धच आहे. त्यांच्या राज्याभोंवतालच्या फ्रान्स्, जर्मनी व इटली या तीन राष्ट्रांविषयीं आपुलकी बाळगणाऱ्या लोकांचें हें राज्य बनलेलें आहे. सी. ए. मॅकार्ट्नें म्हणतात, 'राष्ट्रीयत्व किंवा राष्ट्रीय भावना या शब्दांत दोहोंपैकीं कोणती तरी एक भावना अभिप्रेत असते.[1] त्या भावनांचा उगम अगदीं पृथक् अशा स्थानापासून झालेला असून त्यांच्यांतील सार–द्रव्येंहि भिन्न असतात. परंतु व्यवहारांत सर्वसाधारणपणें एक भावना दुसरीशीं एकरूप होऊन गेलेली आढळते. योगायोगानें इंग्लंडांत ऐतिहासिक घटनाच अश्या घडत गेल्या कीं त्यांच्यामुळें दोन्ही भावनांना जवळजवळ एकरूपता प्राप्त झाली आणि भाषेमध्यें इंग्रजी भाषा बोलणाऱ्यांच्या मनांतील गल्लतीचें प्रतिबिंब उमटून एकाच इंग्रजी शब्दावर दोन्ही भावना व्यक्त करण्याची जबाबदारी लादण्यांत आली. वस्तुस्थिति अशी असली तरीहि राष्ट्राविषयीं वाटणारी आपुलकी या अर्थाचा राष्ट्रीयत्व हा शब्द आणि एकाद्या राज्यांतल्या प्रजाजनाला प्राप्त होणारें नागरिकत्व या अर्थी वापरण्यांत येणारा राष्ट्रीयत्व हा शब्द दोन्ही मूलतः भिन्न होत. त्यांचीं उपादान–कारणेंच भिन्न असतात. आणि त्या दोन मनोवृत्तींचीं उद्दिष्टेंहि अलग अलग असणें अगदीं संभवनीय असतें.

'पहिल्या प्रकारच्या भावनेला व्यक्तिगत राष्ट्रीयत्वाची भावना असें नांव देण्यास हरकत नाहीं. हें राष्ट्रीयत्व व्यक्तीला पुष्कळदां जन्मतः परंपरेनें प्राप्त झालेलें, व्यक्तिगत व परिस्थितिसिद्ध असतें. व्यक्तीचा रहिवास कोणत्या ठिकाणीं आहे, तेथील रहिवाशांपैकीं बहुसंख्याक लोकांमध्यें ती भावना वसत आहे किंवा

---

१. सी. ए. मॅकार्ट्नें : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज्.

नाहीं, यावरहि व्यक्तिगत राष्ट्रीयत्वाची भावना अवलंबून नसते. तसेंच व्यक्ति ज्या राजवटीखालीं राहत असते तिच्या स्वरूपावर किंवा राज्यचालकांच्या भावना तत्समान आहेत किंवा नाहींत या गोष्टीवरहि ती अवलंबून नसते. एवंगुणविशिष्ट राष्ट्रीय भावना ज्या व्यक्तींच्या ठायीं असेल त्यांची समष्टि म्हणजे राष्ट्र होय'[1] असें मॅकार्ट्ने यांनीं तत्संबंधीं विवेचन केलेलें आहे. ही जाणीव ज्या विशेष भावनांवर बहुतांशीं आधारलेली असते त्या म्हणजे वंश, भाषा व धर्म यांच्या विषयींच्या त्रिविध भावना होत. या अर्थाचा समावेश अल्प-संख्याकांच्या हक्कांबाबतच्या सनदांत किंवा तहनाम्यांत नेहमीं केलेला असतो. तत्त्वतः विचार केल्यास या अर्थाला राजकीय महत्त्व मुळींच नाहीं. बर्लिन्-मधील रहिवासी हा जितक्या प्रमाणांत जर्मन् तितक्याच प्रमाणांत ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, ब्राझिल् किंवा होनोलुलू येथें राहणारा जर्मन्हि जर्मन्च होय.

'राज्याचें अधिष्ठान व उद्दिष्ट हें याहून सर्वस्वीं भिन्न असतें. बहुविध लोकांचे सामान्य सामाजिक व्यवहार ज्या साधनाच्या योगानें नियंत्रित व (बहुशः) संरक्षित केले जातात तें साधन म्हणजे राज्य. जे जन समष्टि बनवून राज्य निर्माण करतात त्यांनाहि इंग्रजींत राष्ट्र याच नांवानें संबोधण्यांत येतें त्याला नाइलाज आहे. वास्तविक राष्ट्र ही वर वर्णिल्याप्रमाणें राज्याहून सर्वस्वीं भिन्न अशी एक नैसर्गिक समष्टि आहे. लोकांच्या व्यवहारांतला किती अंश सामान्य सामाजिक स्वरूपाचा समजून त्याला सरकारच्या शासनाधिकारांतला म्हणून मानावयाचें हें कायमचें ठरलेलें नाहीं. त्याचें प्रमाण दर युगांत व दर देशांत वेगवेगळें आढळून येतें. कांहीं देशांत सरकारचा शासनाधिकार संरक्षणाच्या पलीकडे क्वचित्च जात असेल. उलट कांहीं ठिकाणीं अगदीं खाजगी संबंधाव्यतिरिक्त जीवनाचें सर्वच क्षेत्र त्यानें व्यापल्याचें दिसून येईल. तथापि वैयक्तिक राष्ट्रीयत्वाची जी सांस्कृतिक लक्षणें आहेत तीं शासनाधिकाराच्या कक्षेबाहेरचीं आहेत असेंच आजच्या घटकेलाहि मानण्यांत येतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे......सरकारकडून जीं कार्यें पार पाड-

---

१. सी. ए. मॅकार्ट्ने : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज्, पृ. ६.

ण्यांत येतात त्यांपैकीं बहुतेकांचा वैयक्तिक राष्ट्रीयत्वाच्या प्रश्नाशीं कांहींच संबंध नसतो. देशाचें संरक्षण, सार्वजनिक सुव्यवस्थेचें रक्षण, गुन्ह्याचें निवारण व शासन, दळणवळणाच्या साधनांची तरतूद, सार्वजनिक संपत्तीची निगा, करांचें समप्रमाण व त्यांची वसुली, या राज्यांतील हरएक प्रजाजनाच्या सामान्य हिताच्या गोष्टी होत, मग तो खिस्ताचा अनुयायी असो वा महंमदाचा असो, त्याची भाषा इंग्रजी असो, वेल्श् असो किंवा यिद्दिश्[१] असो. या ज्या राजकीय व सामाजिक प्रवृत्ति आहेत त्या पार पाडणें हेंच शासनसंस्थेचें खरें कर्तव्य असून त्यांपासून सर्वांचेंच हितसाधन होत असल्याकारणानें सर्वांनींच त्या पार पाडण्याच्या कामीं सहाय्य केलें पाहिजे.'[२]

सारांश, वैयक्तिक राष्ट्रीयत्व हा राज्यसंस्थापनेच्या बाबतींतला महत्त्वाचा घटक असला तरी तो नेहमींच त्यांतला एकमेव घटक असेल असें नाहीं, इतकेंच काय पण त्याला प्राधान्य असेल असेंहि नाहीं. केवळ राजकीय संबंध राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला पुरेसे नाहींत हें कबूल केलें तरी त्यांचें महत्त्व फार आहे हें अमान्य करतांच येणार नाहीं. एकाद्या गटावर जर बाहेरून दडपण पडलेलें असेल तर जूलियन् हक्स्ले यांनीं म्हटल्याप्रमाणें राष्ट्रीयत्वाच्या वाढीस सहाय्यक ठरणाऱ्या घटकांत अशा बाह्य दडपणाला प्रामुख्य प्राप्त होईल.' आणि हिंदुस्थानांत तसेंच झालें आहे.—पण तत्संबंधीं विचार नंतर करूं.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर एकराष्ट्रीय राज्यांच्या प्रश्नाबाबत खूपच खोल अभ्यास झालेला असून त्या विषयावर विपुल वाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे. १९३४ सालीं सी. ए. मॅकार्ट्नें यांचा अधिकृत ग्रंथ प्रसिद्ध झाल्या-नंतर या विषयाचा अभ्यास चालू राहिला. वर त्यांच्या ग्रंथांतलेच उतारे मीं सविस्तर दिले आहेत. वैयक्तिक राष्ट्रीयत्व व राजकीय राष्ट्रीयत्व यांच्यामध्यें

१. यिद्दिश् म्हणजे युरोप व अमेरिका खंडांतील ज्यू लोक बोलतात ती ( जर्मन् भाषेचा पोटभेद असलेली ) भाषा.

२. सी. ए. मॅकार्ट्नें : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज्, पृ. ११–१२.

भेद मानावा, राज्य ही संज्ञा राष्ट्र या संज्ञेशीं समव्याप्त मानूं नये, एकराष्ट्रीय राज्यें प्रस्थापित करण्याचे प्रयत्न अपेशी ठरलेले असून त्यांमुळें नवीनच समस्या निर्माण झाल्या आहेत, अशा राज्यांत अल्पसंख्यांना देण्यांत आलेली वागणूक समाधानकारक वा आशाजनक नाहीं, एकराष्ट्रीय राज्यें स्थापन करून अल्पसंख्याकांचे प्रश्न सोडवतां येणार नाहींत, कारण अल्पसंख्याकांचे विसदृश गट ज्यांत अजीबात नाहींत असे संपूर्णतया एकजिनसी समाज आढळून येत नाहींत, म्हणून सर्व अल्पसंख्याक राष्ट्रिकांना त्यांचें गुणविशिष्ट राष्ट्रीयत्व विकसित करण्यास स्वातंत्र्य देणारें बहुराष्ट्रिक राज्य प्रस्थापित करणें हाच एक उपाय ठरतो, अशा स्वरूपाचे जे निष्कर्ष मॅकार्ट्‌ने यांनीं प्रतिपादन केले होते त्यांना त्या प्रश्नाबाबत त्याउपरान्त झालेल्या अभ्यासानें बळकटीच आणलेली आहे.

'राष्ट्रीयत्व व आधुनिक काळांतील राज्य या दोन शक्ति एकरूप नाहींत, समांतर नाहींत किंवा संबद्धहि नाहींत'[१] असें मत फ्राइड्मान् यांनीं व्यक्त केलें आहे. त्यांनीं दिलेला निर्णय असा आहे कीं "राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या भूमिकेवर आधारलेलें सार्वभौम राज्याचें उद्दिष्ट हें स्वभावतःच स्वयंविरोधी असून जोंपावेतों अशा प्रकारचें राज्य हेंच सर्वश्रेष्ठ ध्येय मानलें जाईल तोंपर्यंत सध्यांचे बिकट प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवणें अशक्य आहे हें दाखवून देण्याचा प्रयत्न या छोट्याशा सिंहावलोकनांत केलेला आहे. या प्रश्नासंबंधीं ज्यांनीं गंभीरपणें विचार केलेला आहे त्यांचें या निर्णयाबाबत एकमत असल्याचें दिसतें. मॅकार्ट्‌ने यांनीं या प्रश्नाचा कसून अभ्यास केल्यानंतर अशी शिफारस केलेली आहे कीं सोव्हिएट् रशिया व ग्रेट्ब्रिटन् या देशांतील अनुभवांनुसार बहुराष्ट्रिक राज्यांची स्थापना करणेंच इष्ट ठरेल"[२] प्रो. कार् यांच्या 'राष्ट्रांचें भवितव्य' (फ्यूचर् ऑफ् नेशन्स्) या ग्रंथांतील ४९व्या पृष्ठावरील मत फ्राइड्मान् यांनीं संमतिपूर्वक उद्धृत केलें आहे. तें मत असः—"जरी

१. डब्ल्यू. फ्राइड्मान् : दि क्रायसिस् ऑफ् दि नॅशनल् स्टेट् (१९४३), पृ. ९. २. उक्त ग्रंथ, पृ. ४०.

एकादा लोकसमुदाय बऱ्याचशा प्रमाणांत एकवंशोत्पन्न व एकभाषी असा असला आणि समान परंपरेनें व समान संस्कृतीमुळें निगडित झालेला असला तरी प्रथम–दर्शनींच तेवढीं कारणें त्या समाजाचें स्वतंत्र व राजकीय संस्थान प्रस्थापित करण्यासाठीं किंवा तें टिकवून ठेवण्यासाठीं पुरेशीं आहेत असें मानण्यांत येतां कामा नये."[1] त्याचप्रमाणें डी. एच्. कोल् यांच्या युरोप, रशिया, व भावी काल ( युरप्, रशिया अँड् दि फ्यूचर् ) या पुस्तकांतील १४व्या पृष्ठावरील पुढील वाक्यहि त्यांनीं उद्धृत केलें आहेः—"परंतु या विसाव्या शतकांत इतःपर राष्ट्रीयता हा राज्यसंस्थापनेचा पाया होऊं शकणार नाहीं."[2]

त्यांनीं काढलेला आणखी एक निष्कर्ष असा आहे कीं राष्ट्रीयत्वावर आधा-लेलें राज्य हें जर लहान असेल तर सध्यांच्या जगांतल्या यांत्रिक व तांत्रिक परिस्थितींत त्याचा निभाव लागणें अशक्य होय. आपल्या चतुःसीमेंतील प्रजेच्या जीवनाच्या गरजा त्या राज्याला साधारणपणें भागवतां येतीलहि. परंतु परचक्रापासून स्वरक्षण करणें त्याला अशक्य होईल. "आधुनिक युद्धशास्त्रा-नुसार स्वसंरक्षणाचा अर्थहि फार विस्तृत झालेला आहे. सर्व प्रकारची साधन-सामग्री आणि मनुष्यबळ व द्रव्यबळ यांचा सांठा त्यासाठीं अवश्यक असल्या-कारणानें प्रबळ राष्ट्रें आणि अल्पबळाचीं एकराष्ट्रीय राज्यें यांच्या सामर्थ्यांतील तफावत अधिकच ठळकपणें नजरेंत भरते."[3] आपल्या विवेचनाचें सार त्यांनीं पुढीलप्रमाणें दिलें आहेः—या परीक्षणावरून उघड होते ती गोष्ट अशी कीं आजच्या काळांतील राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रवृत्ति एकराष्ट्रीय राज्याला प्रतिकूल होत चाललेल्या आहेत......एकराष्ट्रीयत्व आणि आधुनिक राज्य-सत्ता हीं जेव्हां आपापल्या मर्यादा सोडूं पाहतात तेव्हां त्या दोघांच्या मधील मित्रत्वाच्या संबंधावर गंडांतर येतें......राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या पद्धतीमुळें जो पेंच उत्पन्न झालला आहे त्याचा परिहार बहुराष्ट्रिक राज्यपद्धतीनेंच

---

१. डब्ल्यू. फ्राइड्मान् : दि क्रायसिस् ऑफ् दि नॅशनल् स्टेट् (१९४३), पृ १३३. २. उक्त ग्रंथ, पृ. ९. ३. उक्त ग्रंथ, पृ. १४०.

होण्यासारखा आहे. बहुराष्ट्रिक राज्य हें बलशाली असें संयुक्त राज्य असेल; आणि त्यांतल्या विविध राष्ट्रीय गटांना सांस्कृतिक स्वातंत्र्यहि देण्यांत येईल. परंतु त्याचबरोबर त्या गटांना राजकीय, लष्करी व आर्थिक सार्वभौमत्वाचा हक्क मात्र सोडून द्यावा लागेल.[१]

"रॉयल् इन्स्टिटयूट् ऑफ् इंटर्नॅशनल् अफेअर्स्" या संस्थेच्या विद्यमानें १९४५ सालीं एकराष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या प्रश्नासंबंधीं मि० ए. कोब्रान् यांनीं लिहिलेला प्रबंध प्रकाशित करण्यांत आला. पुढील अवतरणावरून दिसून येईल कीं त्यांचे निष्कर्ष मॅकार्ट्ने व फ्राइड्मान् यांच्या निष्कर्षांसारखेच आहेत. ते लिहितात:—"राजकीय संस्था वा राज्ययंत्र या दृष्टीनें पाहूं लागल्यास राष्ट्र ही एक व्यवहारोपयोगी संघटना असल्याचें दिसून येतें. राजकीय हेतु—त्यांच्याबरोबर आर्थिक हेतूंचा समावेश झालेला असूं शकेल—साध्य करण्यासाठीं राजकीय चातुर्याचा उपयोग करून ही संघटना निर्माण केलेली असते. राजकारण हा व्यवहाराचा प्रांत आहे, आणि कायदा, सुव्यवस्था, शांतता व आर्थिक योगक्षेम ही सुखी जीवनाची चतुःसूत्री त्यांत ज्या प्रमाणांत सिद्धीस जाईल, त्या प्रमाणांत तें (राजकारण) यशस्वी समजावयाचें. याच्या उलट, राष्ट्र ही एक सांस्कृतिक वस्तु असून ती स्वयमेव चांगली आहे, ती स्वयंसिद्ध आहे, ती मानवी जीवनांतील अनिवार्य अशी प्रवृत्ति आहे असें सर्वसाधारणपणें मानण्यांत येतें. मानवाच्या उच्चतर मनोराज्याची ती रहिवासी असून ती कला व वाङ्मय, तत्त्वज्ञान व धर्म यांच्या द्वारा प्रकट होत असते....या दोन्ही मनोवृत्तींना दुर्दैवानें एकच नांव देण्यांत येत असलें तरी त्यांच्या उद्दिष्टांतील भिन्नता मूलगामी आहे. हा भेद केवळ शाब्दिक स्वरूपाचा नाहीं हें सहज सिद्ध करून दाखवितां येईल."[२] स्वतःचें वैयक्तिक राष्ट्रीयत्व न सोडतांहि आपलें संयुक्त राजकीय राष्ट्रीयत्व टिकवून ठेवणाऱ्या कॅनडांतील फ्रेंच् व ब्रिटिश् लोकांचें आणि समान सांस्कृतिक पार्श्वभूमि असूनहि वेगवेगळ्या

---

१. डब्ल्यू. फ्राइड्मान् : दि क्रायूसिस् ऑफ् दि नॅशनल् स्टेट् (१९४३), पृ. १६३–१६४. २. ए. कोब्रान् : राष्ट्रीय स्वयं-निर्णय, पृ. ६०.

राज्यांत वांटल्या गेलेल्या अमेरिकेंतल्या स्पॅनिश् लोकांचें अशीं दोन्ही उदाहरणें त्यांनीं दिलेलीं आहेत. "सांस्कृतिक व राजकीय राष्ट्रीयत्वांना एकसंस्थ करण्याचे प्रयोग अयशस्वी झाल्याचे अनेक दाखले देतां येतील. त्यांना एकाच सांच्यांत दडपून बसवण्याचे जे प्रयोग आधुनिक कालांत झाले त्यांचे परिणाम बहुशः घोरच झाल्याचें दिसून येतें."[१]

कोबान् यांनीं नंतर असाहि मुद्दा मांडलेला आहे कीं राज्यसंस्थापनेची पात्रता राष्ट्रीयत्वाच्या भावनेवरून ठरवावी असें म्हटलें, तरी त्या भावनेचें स्वरूप कालागणिक, देशागणिक, इतकेंच काय, पण व्यक्तीगणिक बदलत जात असल्यानें राष्ट्रीयत्वाची कसोटी अनित्य ठरते. अशा राज्यांतली प्रजा एकजिनसी असेल असें त्यांतलें जें गृहीत कृत्य आहे तेंहि निखालस असत्य आहे. कारण जगांतील मानव-समाजाची वांटणी एकजिनसी गटांत करणें शक्य नाहीं. कोबान् यांचा अंतिम निर्णय असा आहे कीं 'विद्यमान जगांत संस्कृत्युद्भव राष्ट्रें व राजकारणाधिष्ठित राज्यें यांची जी गिचमीड झालेली आहे ती पार पुसून टाकून जगाची कोरी पाटी बनवणें आतां शक्य नसल्यामुळें एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेवर आधारलेलीं राज्यें प्रस्थापित करणें हाच सुस्थिर राजकीय समष्टि निर्माण करण्याचा एकमेव आदर्श असल्याबद्दलची कल्पना सोडावी लागणार हें स्पष्टच आहे. बहुराष्ट्रिक राज्याला पुन्हां एकवार राज्यशास्त्रीय सिद्धांताची पदवी प्राप्त व्हावयास हवी......राजकीय शासनसंस्था व राष्ट्रीयत्व यांना बहुतेक ठिकाणीं समरूप बनवतां येत नाहीं असाच आपला गेल्या शतकांतला आणि अगदीं अलीकडच्या काळांतला अनुभव आहे...सांस्कृतिक एकरूपता असलेल्या राष्ट्रीय शासन-सत्तेला राजकीय संघटनेचा एकमेव पाया मानून चालण्याचा खटाटोप व्यवहारांत असमर्थनीय ठरलेला आहे, शास्त्रीयदृष्ट्या तर तो केव्हांहि समर्थनीय नव्हताच.'[२]

राष्ट्रीयत्व व राज्य या दोन पृथक् सत्तांविषयीं वा वस्तूंविषयीं जो घोटाळा

---

१. ए. कोबान् : राष्ट्रीय स्वयं-निर्णय, पृ. ६०.

२. उक्त ग्रंथ, पृ. ६२-६३.

माजलेला आहे, तो राष्ट्रीय स्वयं–निर्णयाचें तत्त्व स्वयंप्रमाण आहे आणि तदनुसार हरएक सांस्कृतिक गटाला आपल्यासाठीं सवतें राज्य प्रस्थापित करण्याचा जन्मसिद्ध हक्क असतो असें मानल्यामुळें उत्पन्न झालेला आहे. परंतु अशा प्रकारचें स्वयंप्रमाण तत्त्व असल्याची मान्यता कधींच देतां येणार नाहीं आणि राष्ट्रीय स्वयं–निर्णयाचें तत्त्व देखील समाजांत वावरणाऱ्या मनुष्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाप्रमाणेंच अनेक दृष्टींनीं मर्यादित असावयास पाहिजे हें कबूल करणें भाग आहे.

'जगांतील छोट्या राष्ट्रांचा विचार केला तर त्यांच्यापैकीं अनेकांच्या बाबतींत राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर आधारलेल्या त्यांच्या सार्वभौम राज्यपद्धति भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक व राजकीय दृष्टींनीं त्याज्य ठरत असल्याचें दिसून येत नाहीं काय?' असा कोब्रान् यांचा सवाल आहे. ते पुढें लिहितात, 'एकाद्या राष्ट्रांतील बहुसंख्य लोक जरी एकादे वेळीं विभक्त राज्याची इच्छा करीत असले, तरी परिस्थिति त्यांच्याविरुद्ध असल्यास केवळ त्यांच्या इच्छेमुळें परिस्थितींत पालट घडून येणार नाहीं बर्कनें म्हणून ठेवलें आहे त्याप्रमाणें 'आपण जर लहान मुलांप्रमाणें चांदोबासाठीं रडारड करावयास लागलों तर मग लहान मुलांप्रमाणें आपणांवर अखेरपर्यंत रडतच बसण्याची पाळी येईल.'[१] या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या तर हिंदुस्थानच्या फाळणीची कल्पना त्याज्य ठरते एवढीच पुस्ती मला येथें जोडावीसें वाटतें. सबंध देशांत मुसलमानांचें जें प्रमाण आहे, किमानपक्षीं तेवढ्याच प्रमाणाची मुसलमानेतरांची अल्पसंख्या विभक्तीकरणानंतर अस्तित्वांत येणाऱ्या मुसलमानी राज्यांतहि राहणार असल्यामुळें फाळणीचा युक्तिवाद अधिकच अयुक्तिक ठरतो. हिंदुस्थानची आर्थिक व लष्करी परिस्थिति पाहिली तरीहि सर्व देश एक मोठें राज्य म्हणून अखंड राहावा, स्वतंत्र अशा छोटेखानी राज्यांत त्याच्या चिरफळ्या करून टाकणें अनिष्ट ठरेल, असाच निष्कर्ष निघतो. विभक्तीकरण हें विध्वंसक कार्य आहे; म्हणून इतर सर्व उपाय हरले अशी

१. ए. कोब्रान् : राष्ट्रीय स्वयं–निर्णय, पृ. ७४.

निकराची वेळ आल्यावांचून त्याचा अवलंब केला तर तें अन्याय्य ठरेल. अशी परिस्थिति हिंदुस्थानांत येऊन ठेपल्याचें मुस्लिम लीगव्यतिरिक्त कोणताहि दुसरा गट म्हणत नाहीं. तथापि येथें तसा निकराचा प्रसंग उद्भवला असल्याचें मानलें, तरी कोणताहि विभाग अलग केल्यानें त्याचें निराकरण होणार आहे असें दिसत नाहीं. कारण, तसें केल्यानंतरहि २ ते ३ कोटि मुसलमान हिंदुस्थानांत आणि सुमारें २ ते ४॥ कोटि हिंदु पाकिस्तानांत शिल्लक राहतातच. म्हणून आधुनिक विचार–प्रवाहाशीं जो सुसंगत असेल, शतकानुशतकांच्या इतिहासाच्या विरुद्ध जो जाणार नाहीं, भौगोलिक प्रमाणांना जो धाब्यावर बसवणार नाहीं, आधुनिक जागतिक परिस्थितीचा विचार करतां ज्याच्या योगानें देशाचें संरक्षण अत्यंत बिकट होऊन बसणार नाहीं, ज्याचा स्वीकार केला असतां नव्यानें प्रस्थापित व्हावयाच्या या राज्यांतील सामान्य प्रजाजनाच्या वांट्याला नित्य दारिद्र्य व हाल येणार नाहींत, ज्याच्यामुळें हिंदु व मुसलमान राज्यांना आपल्या सरहद्दी बदलून घेण्याचीं कारस्थानें सदैव खेळत राहण्याची अवश्यकता राहणार नाहीं, ज्याचा अंगीकार त्वेषाच्या भरांत केलेला नसेल आणि ज्याच्यामुळें कायमच्या दुहीचें बीज रोंवलें जाणार नाहीं, असा मार्ग आपणांस सुचतो कां तें आपण पाहावयास हवें आहे.

## ३. मुसलमान : एक स्वतंत्र राष्ट्र

फाळणीचा युक्तिवाद सिद्ध केला, तरी तेवढ्यावरून हिंदुमुसलमानें मिळून एक राष्ट्र होणें शक्य नाहीं, असें सिद्ध होत नाहीं. त्यासाठीं आणखी हेंहि सिद्ध करावें लागतें कीं मुसलमान म्हणजे एक भिन्न राष्ट्र असून त्यांचें स्वतंत्र राज्य प्रस्थापित होणें जरुरीचें आहे. श्री. दुराणी यांचे यासंबंधींचे विचार स्पष्ट आहेत. ते म्हणतात, "पुरातन काळचे हिंदु हे एकराष्ट्रीय नव्हते. तो एक जनसमूह होता, कळप होता."

'हिंदुस्थानांतील मुसलमानांचाहि तोच मासला होता. वस्तुस्थिति पाहिली तर असें दिसतें कीं धर्मप्रवर्तक पैगंबराच्या आयुष्यांतच इस्लामला राज्य–

पदवी प्राप्त झालेली होती. सुसूत्र अशी राजनीति इस्लामपाशीं होती; किंबहुना, इस्लाम हीच एक राजनीति आहे असें म्हटल्यास तें उचित होईल... इस्लामी राज्य हे धर्माधिष्ठित राज्य असतें असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं. इस्लाम ही लोकसत्ताच आहे आणि ती संभाळणें हें प्रत्येक मुसलमानाचें कर्तव्य आहे. ला इस्लामा–इल्ला बे जमाअत–हू. "सुसंघटित समष्टीशिवाय इस्लाम अशक्य आहे" असे महात्मा उमरचे उद्गार आहेत. दुर्दैवानें हें इस्लामी राज्य फार काळ टिकलें नाहीं. ओम्मादांनीं व अब्बासिदांनीं त्याचा नाश करून टाकला आणि त्याच्या जागीं 'मुल्की' राजवटीची म्हणजे अरेरावी व वंशपरंपरा चालणाऱ्या राजसत्तेची स्थापना केली...या दोन राजवंशांच्या अमदानींतच देवदेवता–विचार आणि सूफी वेदान्त या दोन गोष्टींचा मुसलमानी समाजांत शिरकाव होऊन त्याचें राजकीय जीवन विकृत व भ्रष्ट बनलें...या दोन गोष्टींच्या योगानें मुसलमानी मनाला अनिष्ट वळण लागलें आणि इस्लामचें 'नैतिक–राजकीय तत्त्वज्ञाना'चें मूळ मिश्र स्वरूप पालटून तो एक प्रकारचा "धर्म" बनला. त्यामुळें 'इस्लाम हें मानव व ईश्वर यांच्यांतील गुप्त अशा परस्परसंबंधाचें तत्त्वज्ञान आहे' असा कोटिक्रम राजकारणी शब्दपंडित पुढें मांडूं लागले....मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकला त्या वेळीं धर्म व राजकारण भिन्न आहेत ही कल्पना जगांतल्या सर्व मुसलमानांत रूढ झालेली होती. ज्या लोकांनीं हिंदुस्थान पादाक्रांत केला ते लोक मुसलमानी राज्याचे राष्ट्रीय वृत्तीचे सैनिक नव्हते. अरेराव बनलेल्या बादशहाची ती भाडोत्री फौज होती. त्यांनीं हिंदुस्थानांत जें राज्य प्रस्थापित केलें तें कांहीं राष्ट्रीय मुसलमानी राज्य नव्हतें. अरेराव बादशहा आणि त्याचे आश्रित यांच्या फायद्यासाठींच स्वराज्याचें जतन व शोषण करण्यांत येत होतें. हिंदुस्थानांतील मुसलमानी साम्राज्याला मुसलमानी म्हणण्यांत येई तें बादशाहीचा मुकुट धारण करणारा स्वतःला इस्लामचा अनुयायी म्हणवीत असे एवढ्याचसाठीं. आपल्या हिंदुस्थानांतील सुदीर्घ राजवटीच्या काळांत राष्ट्रीयत्वाची भावना मुसलमानांच्या मनांत कधींच जागली नाहीं...त्यामुळें हिंदु व

मुसलमान असे दोन समाज एकाच बादशाहीच्या गुलामगिरीच्या जोखडाला बांधले गेल्याचें दृश्य इतिहासांत दिसून येतें. राष्ट्रीयत्वाची भावना किंवा राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा यांना दोन्ही समाज सारखेच पारखे झालेले होते.

'हिंदुमुसलमानांच्या धर्मविषयक कल्पना, श्रद्धा व आचार यांत तडजोड होणें अशक्य असल्याबद्दल आतांपर्यंत पुष्कळांनीं लिहिलेलें आहे...तथापि त्या दोघांच्याहि धर्मांत असें कांहीं तरी आहे कीं ज्यामुळें हे दोन्ही समाज शेंकडों वर्षें गुण्यागोविंदानें एकत्र नांदले. ब्रिटिश राजवटीमध्यें त्यांच्या मनांत जें किल्मिष शिरलेलें आहे तें जर धुऊन टाकतां आलें आणि एका शतकापूर्वीच्या त्यांच्या पूर्वजांमध्यें जी धार्मिक वृत्ति होती ती पुनरुज्जीवित करणें शक्य झालें तर एका राज्यांतले प्रजाजन म्हणून ते पुन्हां गोडीगुलाबीनें एकत्र राहूं शकतील. दोघांच्याहि धर्मांतला तो विशेष म्हणजे त्यांतली सहिष्णु वृत्ति होय...दोन समाजांत निर्माण झालेले हे संबंध जर अव्याहतपणें चालू राहिले असते, तर योग्य कालानंतर देहानें व मनानें एकाकार झालेलें एक–राष्ट्र या देशाच्या भूमीवर अवतरलें असतें. तो काळ पुन्हां कधीं तरी परतून येईल काय ?'[१]

'शेंकडों वर्षें घनिष्ट संबंध आलेला असतां आणि सलोख्याचा व्यवहार चालू असतांहि हिंदु व मुसलमान अशा प्रकारें विभक्तच राहिले. त्या दोन प्रवाहांचा संगम झालाच नाहीं. ते दोन समाज म्हणजे दोन राष्ट्रें झालीं होतीं. त्यांचें स्वरूप इतकें भिन्न राहिलें कीं राज्यशास्त्रज्ञांच्या परिभाषेंत ज्याला राष्ट्रीयत्व म्हणतात ती भावना त्यांच्यांत कधीं काळीं निपजती आणि कार्य–चेतन बनती, तर तिची प्रतिक्रिया या दोन समाजांवर भिन्न भिन्न प्रकारें होणें अपरिहार्यच होतें; त्यांचा विकास दोन वेगळ्या राष्ट्रांत होण्यावांचून गत्यंतर नव्हतें. पृथक्–राष्ट्रीयत्वाची भावना सचेतन बनणें म्हणजेच राष्ट्रीयत्वाचा किंवा राष्ट्रपदाचा उगम होणें होय. हिंदूंच्या व मुसलमानांच्या बाबतींत हाच प्रकार झालेला आहे.'[२] 'या दोन समाजांची परिणति अस्मितायुक्त

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ३४–४४.

२. उक्त ग्रंथ, पृ. ४७.

राष्ट्रांत झालेली आहे, आणि ही नवीन अस्मिता जमेस धरून त्यांच्यांतल्या संबंधांची पुनर्घटना करण्याचे प्रयत्न जोंपर्यंत होणार नाहींत, तोंपर्यंत परस्परांत शांति नांदणार नाहीं.'[१]

असा परिणाम कशामुळें घडून आला याचें परीक्षण केल्यानंतर श्री. दुराणी यांनीं पुढील निष्कर्ष काढला आहे:—'एका शब्दांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, पंक्तिप्रपंचाची आणि सोम्याचें पोट मारून गोम्याला भरवण्याची जी नीति ब्रिटिशांनीं स्वीकारली, तिचाच हा प्रत्यक्ष परिणाम होय.'

'हिंदु—मुसलमानांतल्या राष्ट्रीय भावनेची वाढ आस्तेकदम होत गेली असून तिला पक्वता केव्हां आली, त्याचा नक्की काळ सांगतां येणार नाहीं. तिचें स्वरूप प्रारंभीं दोन समाजांतील आर्थिक चढाओढींत, विशेषतः सरकारी नोकऱ्यांविषयींच्या चढाओढींत दिसून आलें. पुढें राजकीय चढाओढींत आणि अखेरीस आतां राष्ट्रीय वैमनस्यांत त्या भावनेचें रूपांतर झालें आहे.'[२]

ब्रिटिशांच्या अंमलाखालीं मुसलमानांच्या अवनतीस व विनाशास ज्या अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांपैकीं पुढील गोष्टींचा उल्लेख श्री० दुराणी यांनीं केलेला आहे:—(अ) बंगालमधील उद्योगधंदे व व्यापार यांचा नाश; (आ) बंगालमधील कायम—धारा—पद्धति. तिच्यामुळें निकृष्ट दर्जाच्या हिंदु महसूल—अधिकाऱ्यांना जमीनदाऱ्या मिळाल्या आणि वरिष्ठ मुसलमान अधिकाऱ्यांच्या हातीं चौपदरी येऊन त्यांच्या जागा युरोपियन् अधिकाऱ्यांस देण्यांत आल्या; (इ) मुसलमानी शिक्षणपद्धति ज्यांच्या सहाय्यानें चालू होती, त्या सारा—माफ जमिनी सरकारनें आपल्या ताब्यांत घेतल्याकारणानें शिक्षणाची अवनति झाली; (ई) शिक्षणाची अव्यवस्था झाल्याकारणानें सरकारी नोकरींतून मुसलमानांची पीछेहाट होणें आणि सरकारी नोकऱ्यांमध्यें हिंदूंची ठेकेदारी प्रस्थापित होणें क्रमप्राप्त झालें. ती ठेकेदारी अद्यापिहि गलिच्छ कारवाया करून टिकवून धरण्यांत आलेली आहे. सरकारी नोकऱ्यांमध्यें दिसून येणाऱ्या या विषमतेचें

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ४८.

२. उक्त ग्रंथ, पृ. ४८.

हिंदी राजकारणांत बऱ्याच प्रमाणांत प्रतिबिंब उमटलेलें असून या दोन जमातीं मधील वैमनस्याला ती पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली आहे.

त्याचबरोबर हिंदु जमात अधिक आक्रमणशील होत चालल्याचें आणि या दोन जमातींमधील अविश्वास व राजकीय स्पर्धा वाढत जात असल्याचें प्रत्यास येतें. हा प्रकार विशेषेंकरून बंगालमध्यें व उत्तर हिंदुस्थानांत चालू असल्याचा पुरावा पुढीलप्रमाणें:—(अ) 'वन्दे मातरम्' गीतामागची मनोभावना; (आ) १८५७च्या बंडानंतर अस्तित्वांत आलेला दुजाभाव; बंडाला प्रारंभ हिंदूकडून झाल्यावर मग मुसलमानांनीं त्यांत उडी घेतली; पण त्याचा बीमोड होतांच हिंदूंनीं विश्वासघात केला आणि ते खबरी बनले; त्यामुळें सरकारचा सारा रोष मुसलमानांकडे वळला. परिणामीं जी दडपशाही झाली तिच्यांत हजारों मुसलमानांची आहुति पडली, त्यांची मालमत्ता जप्त करण्यांत आली, आणि त्यांच्या पोरक्या मुलाबाळांना ख्रिस्ती पाद्र्यांच्या हवालीं करण्यांत आलें; ( इ ) १८६७ सालीं बनारसमधील हिंदूंनीं सर्वसामान्य भाषा बनलेल्या उर्दूविरुद्ध चळवळ सुरू केली. उर्दू भाषेच्या ऐवजीं व्रजभाषा व अरबी लिपीच्या ऐवजीं नागरी लिपि वापरावी असें त्यांचें म्हणणें होतें. त्याचा परिणाम होऊन 'गेलीं पंचाहत्तर वर्षे उर्दू विसरून जाण्याचा व तिच्या ऐवजीं हिंदी शिकण्याचा हिंदूंनीं प्रयत्न चालवलेला असून आतां तर हिंदूंचें अन्तःकरण यथातथ्य बोलून दाखवणारे श्री० गांधी निर्लज्जपणें असें म्हणूं लागले आहेत कीं "हिंदूंवरील मुसलमानांच्या अधिराज्याची स्मृति करून देणारे जे शब्द हिंदी भाषेंत असतील त्या सर्वांची हकालपट्टी करण्यांत यावी;"'[1] (ई) आपल्या गतेतिहासाविषयीं हिंदूंच्या मनांत उत्पन्न झालेली आस्था. "पूर्वीं तिची वाण असल्यामुळें त्या समाजांतली राष्ट्रीयत्वाची वाढ खुंटलेली होती."[2] ब्रिटिश् मुलकी अधिकारी व ख्रिस्ती धर्मोपदेशक यांनीं "हिंदूंच्या मनांत मुसलमानांसंबंधीं द्वेषाचें व वैरभावाचें विष कालवण्यासाठीं बुद्धिपुरःसर लिहिलेल्या" या

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ६७.

२. उक्त ग्रंथ, पृ. ६८.

ग्रंथांच्या अभ्यासामुळेंच हिंदूंच्या मनांत अशा प्रकारची आस्था उत्पन्न झाली; (उ) "शिवाजी–उत्सवाची नवीन टूम काढणाऱ्या व कॉंग्रेसच्या श्रेष्ठींत अग्रेसर असणाऱ्या बाळ गंगाधर टिळक नामक कट्टर मराठ्यानें सुरू केलेली गोहत्या–प्रतिबंधक चळवळ."[१]

'सर सय्यद अहमदखान यांच्या राजकीय धोरणावर याच विविध घटनांचा परिणाम झाला आणि त्यांनीं आपल्या सहधर्मीयांना कॉंग्रेसपासून चार पावलें दूर राहण्याचा सल्ला दिला.' 'बंगालमधील हिंदूंच्या वृत्तपत्रांनीं मुसलमान हे बंडखोर आहेत, तेव्हां त्यांना सरकारी नोकरींत घेण्यांत येऊं नये'[२] असा जो प्रचार चालवलेला होता त्याचाहि सरसाहेबांच्या धोरणावर थोडाथोडका परिणाम झाला नव्हता.

अशा प्रकारें १८५७नंतरच्या काळांत आपण एक–समाज आहों अशी हिंदु–मुसलमानांची भावना कधींच झाली नाहीं. 'सरकारला आणि जनतेला सर सय्यद अहमदखान यांनीं बजाविलें कीं ज्या देशांतली जनता एकजिनसी असेल तेथेंच प्रातिनिधिक संस्था परवडतील; परंतु हिंदुस्थानसारख्या अठरापगड जातींच्या देशांत प्रातिनिधिक संस्थांचा प्रारंभ केल्यास सामाजिक व राजनैतिक अनवस्था[३] उद्भवण्याचा धोका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीं.' १९०६ सालीं लोकप्रतिनिधींचीं कायदेमंडळें प्रस्थापित होणार असल्याचें जेव्हां कळून आलें, तेव्हां मुसलमानांच्या शिष्टमंडळानें स्वतंत्र प्रतिनिधित्वाची मागणी केली व ती मान्यहि करण्यांत आली.

'स्वतंत्र मतदारसंघ नसते तर एकजिनसी एकदिलाचें राष्ट्र निर्माण झालें असतें असें मुळींच नाहीं. त्याचा परिणाम हिंदूंचा मुसलमानांवर वरचष्मा प्रस्थापित होण्यांत झाला असता.'[४]

हिंदु समाजांतील धार्मिक पुनर्जागृतीचा काळ क्रमाच्या दृष्टीनें राजकीय जागृतीच्या पूर्वीचा. असें असलें तरी १९०७ सालापर्यंत गांधीप्रणीत जातिमुळें

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ७४.

२. उक्त ग्रंथ, पृ. ७०. ३. उक्त ग्रंथ, पृ. ७८. ४. उक्त ग्रंथ, पृ. ७९.

भेदातीत राष्ट्रवादाची दृष्टि हिंदुसमाजांत विकसित झालेली नव्हती. हिंदु हिंदु म्हणून आणि मुसलमान मुसलमान म्हणून उजळ माथ्यानें वावरत. जातीय वृत्तीला हीन लेखण्यांत येत नसे. हिंदु व मुसलमान आपल्या व्यतिरिक्त जातींतल्या प्रतिस्पर्ध्याला आदरभावनेनें, सहिष्णुतेनें व समजूतदारपणानें वागवीत असत. या वातावरणाचें प्रतिबिंब, १९०७ सालीं प्रथम पंजाबांत स्थापन होऊन नंतर अखिल–भारतीय स्वरूप प्राप्त झालेल्या हिंदुमहासभेंत व १९०६ सालीं स्थापन करण्यांत आलेल्या मुस्लिम लीगमध्यें दिसून येत असे.

'ब्रिटिशांच्या दडपशाहीची धडकी भरलेली असल्यामुळें सर सय्यद अहमदखान यांच्या नेतृत्वाच्या काळांतील मुसलमानांचें धोरण राजनिष्ठेचें व हांजी-हांजीखोरपणाचें बनलेलें होतें. याच धोरणाचा वारसा 'अलीगड गट' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या मंडळीकडे आला आणि त्या धोरणाच्या वेळची परिस्थिति पुढें पालटली तरी ती परंपरा कायमच राहिली'[1] (अ) १९११ सालीं इटलीनें तुर्कस्थानवर केलेला हल्ला व त्यांत ब्रिटन्नें घेतलेला भाग; (आ) १९११च्या डिसेंबरांत रद्द ठरवण्यांत आलेली बंगालची फाळणी; (इ) १९१२च्या उत्तरार्धांत बाल्कन् राष्ट्रांनीं तुर्कस्थानवर चढवलेला हल्ला व त्याला ब्रिटिशांकडून मिळालेला संपूर्ण पाठिंबा; (ई) रस्तेबांधणीच्या योजनेला केलेल्या विरोधामुळें कानपुरांत झालेली मुसलमानांची कत्तल; या घटनांमुळें मुसलमानांच्या राजनिष्ठेला हादरे बसले. मुस्लिम लीगच्या दृष्टिकोणामध्यें त्यामुळें समूळ पालट घडून येऊन तिनें जबाबदार राज्यपद्धति हें आपलें ध्येय असल्याचें जाहीर केलें आणि आपलें उद्दिष्ट काँग्रेसच्या उद्दिष्टाच्या ओळीला आणून बसवलें. नंतर दोन्ही संस्था आपलीं वार्षिक अधिवेशनें एकाच ठिकाणीं भरवूं लागल्या. शेवटीं १९१६मध्यें सुप्रसिद्ध लखनौ–करार झाला. १९१९-च्या सरकारी कायद्यांत त्याचा समावेश करण्यांत आलेला आहे. त्या करारामुळें मुसलमान जमातीला न्याय मिळाला असें नाहीं. तथापि त्या कराराचा

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ८३.

अभिप्रेत अर्थ फार दूरगामी आहे. कारण, 'हिंदु व मुसलमान हीं दोन भिन्न राष्ट्रें असून कॉंग्रेस ही हिंदूंची तशीच मुस्लिम लीग ही मुसलमानांची प्रतिनिधि' असल्याची कबुली कॉंग्रेसनें त्या कराराअन्वयें दिलेली आहे. पण आतां मात्र आपण अखिल राष्ट्राचें प्रतिनिधित्व करीत आहों,[1] असा दावा करून कराराच्या वेळच्या आपल्या भूमिकेपासून कॉंग्रेस ढळली आहे."

राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा अतिरेक झाल्यामुळें पहिलें महायुद्ध पेटलें. त्या युद्धामुळें राष्ट्रीयत्वाची भावना अधिकच कडवी बनली आणि जे समाज पूर्वी त्या जहरापासून अलिप्त होते, त्यांच्या अंगांत तें जहर भिनून गेलें. 'हिंदुस्थानांतील जनतेच्या मनांत परकीय सत्तेच्या जोखडापासून मुक्त होण्याची अत्यंत तीव्र लालसा निर्माण झाल्याकारणानें १९१९ ते १९२२च्या काळांत दिसून आलेली हिंदुमुसलमानांतील जूट शक्य झाली.'[2] 'परंतु हिंदुस्थानच्या भौगोलिक अखंडत्वावर आधारलेल्या राष्ट्रीयत्वाच्या मोहक चित्राची भुरळ श्री० गांधींनीं व त्यांच्या सहकाऱ्यांनीं स्वतःवर पडूं दिली.' 'राजकारणांत धर्माला लुडबूड करूं देतां कामा नये अशी भाषा कॉंग्रेसमधील राजकारणी पंडित बोलूं लागले' आणि भौगोलिक रचना, राजकारण व आर्थिक परिस्थिति यांवर आधारलेलें एक अखंड हिंदी राष्ट्र उभारण्याचे प्रयत्न कॉंग्रेसनें सुरू केले. वस्तुतः ती असेंच गृहीत धरून चालली होती कीं अशा प्रकारचें अखंड राष्ट्र अस्तित्वांत आहेच. तिचें हें गृहीत कृत्य अगदीं निराधार होतें. त्याचा पायाच चुकलेला होता. त्यामुळें कॉंग्रेसनें त्याच्यावर जी राष्ट्रीयत्वाची इमारत उभी करण्याचा प्रयत्न केला, ती अवघ्या तीन वर्षांच्या आंतच कोलमडून पडली....महात्मा तुरुंगांत जाऊन बसला आणि हिंदुमुसलमानांच्या एकीचा हा डोलारा खालीं आला. स्वामी श्रद्धानंद आणि पंडित मदन मोहन मालवीय तुरुंगांतून मुक्त झाले व त्यांनीं मुसलमानांच्या विरुद्ध उघडपणें व निर्लज्जपणें प्रचार सुरू केला. १९२३मध्यें अखिलभारतीय हिंदु–महासभेचें पुन्हां

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ८४–८५.

२. उक्त ग्रंथ, पृ. ९०.

संघटन करण्यांत आलें...इतर जमातींच्या हितसंबंधांना अपाय न होईल अशा प्रकारें हिंदूंच्या हितासंबंधांचें जतन करण्याचें १९०७ व १९१५सालचें धोरण टाकून देऊन एका नव्याच विचारसरणीचा अंगीकार करण्यांत आला. हिंदु हे स्वयंसिद्ध असें एक राष्ट्र आहेत, हिंदुस्थान ही हिंदूंची पवित्र मायभूमि आहे, त्यांत मुसलमान, खिस्ती, पार्शी इत्यादिकांना स्थान नाहीं आणि हिंदवी राज्य स्थापणें हें हिंदूंचें राजकीय ध्येय आहे असें या नव्या विचारसरणीचें तात्पर्य होतें.'[1]

१९२५ सालीं कैलासवासी लाला हरदयाळ यांचें 'मेरे विचार' हें चोपडें हिंदुस्थानांत येऊन दाखल झालें आणि नियतकालिकांनीं त्याचा देशभर प्रचार केला. श्री० इंद्रप्रकाश यांच्या 'आपला मतभेद कोठें आहे?' (व्हेअर् वुई डिफर्?) या पुस्तकांच्या आधारें व डॉ० अंबेडकर यांनीं आपल्या ग्रंथामध्यें उद्धृत केलेल्या अवतरणांवरून श्री० दुराणी यांनीं त्यांपैकीं कांहीं अवतरणें आपल्या निबंधांत दिलीं आहेत. मूळ शब्दांतच मी त्यांचा सारांश देत आहें:—राज्य हिंदूंच्या मालकीचें असावें आणि त्यांत मुसलमानांना राहण्याची मोकळीक राहावी. परंतु तें कदापि मुसलमानी राज्य होणार नाहीं किंवा हिंदुमुसलमानांचें सार्वत्रिक राज्य असेंहि त्याचें स्वरूप होणें शक्य नाहीं...'स्वराज्य-प्राप्तीसाठीं आम्हांला ( म्हणजे हिंदूंना ) मुसलमानांच्या राहण्याची अवश्यकता नसून आमचें संयुक्त शासन येथें प्रस्थापित करण्याचा आमचा मानस नाहीं...हिंदुस्थानांतील हिंदुवंशाचें व पंजाब प्रांताचें भवितव्य पुढील चार आधारांवर अवलंबून आहे:—( १ ) हिंदुसंघटन, (२) हिंदुराज्य, ( ३ ) मुसलमानांची शुद्धि आणि ( ४ ) अफगाणिस्थान व सरहद्दीचा टापू जिंकून घेऊन त्यांची शुद्धि.[2] १९२३पासून आतांपर्यंतची हिंदु-

---

१. एल्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ९१–९३.

२. हिंदुमहासभेच्या १९३७ सालच्या अहमदाबाद येथील अधिवेशनांतील श्री. वि. दा. सावरकर यांचें भाषण. एफ्. के. खान दुराणी यांनीं तें आपल्या 'पाकिस्तानचा अर्थ' या पुस्तकांत पृ. १०२ वर उद्धृत केलें आहे.

महासभेची नीति याच धोरणानुसार ठरत गेलेली आहे. याला पुरावा म्हणून श्री० सावरकरांच्या विधानांतील लांबलचक उतारे श्री० दुराणी यांनीं उद्धृत केले आहेत. 'हिंदुस्थान हें एकमुखी व एकजिनसी राष्ट्र आहे असें आज मानतां येणार नाहीं; उलट, हिंदुस्थानांत मुख्यतः हिंदु व मुसलमान अशीं राष्ट्रें आहेत.' श्री० दुराणी यानंतर लिहितात कीं, श्री० सावरकरांचे सिद्धांत ऐतिहासिक सत्य व राज्यशास्त्रीय तत्त्वें यांना पूर्णपणें धरूनच असल्याकारणानें त्यांत दोष दाखवून देणें अशक्य आहे. पण ते आपल्या या सिद्धांताला सोडून बोलूं लागतात तेव्हां भांडणाचा मुद्दा उपस्थित होतो. या देशांतल्या हिंदूंत व मुसलमानांत ज्या तऱ्हेची भावना जागृत झालेली आहे तशा प्रकारची पृथक्–राष्ट्रीयत्वाची भावना ज्या वेळीं दोन जमातींमध्यें निर्माण होते त्या वेळीं अन्तर्गत संघर्ष व यादवी यांसारख्या अनिष्ट गोष्टी टळाव्या म्हणून त्यांनीं विभक्त होऊन आपापलीं स्वतंत्र राष्ट्रीय सरकारें स्थापन केलेलीं बरीं असेंच कोणीहि राज्य–शास्त्र–विशारद् म्हणेल. अखिल–भारतीय मुस्लिम लीगचा दावा आहे तो हाच. पण राष्ट्रीयत्वाच्या भौगोलिक सिद्धांताचें मोठ्या कुशाग्रतेनें एकदां खंडन केल्यानंतरहि श्री० सावरकर पुन्हां त्याच भौगोलिक प्रमाणांचा आश्रय घेऊं पाहतात आणि हा देश म्हणजे हिंदूंची पवित्र भूमि आहे अशा प्रकारचीं कारणें सांगून सबंध देशाचा वारसा हिंदूंच्याकडे येत असल्याबद्दलचा दावा मांडतात. म्हणजे सर्व देशावर हिंदूंचें आधिपत्य असलेलें एकमुखी शासन चालावें आणि त्यांत मुसलमानांना दुय्यम दर्जाचें व नीच स्थान प्राप्त व्हावें अशी त्यांची दृष्टि आहे. याचाच अर्थ असा कीं हिंदु हे शास्ते म्हणून व मुसलमान हे शासित म्हणून येथें राहावे अशी त्यांची कल्पना आहे.'[१]

श्री. दुराणी राष्ट्रसभेची भूमिका याहून चांगली आहे असें मानीत नाहींत. "राष्ट्रसभेचा जन्म म्हणजे हिंदूंच्या पुनर्जागृतीच्या चळवळीचा परिपाक होता. खरें म्हणजे राष्ट्रसभेबरोबरच हिंदुराष्ट्राचा जन्म झाला. राष्ट्रसभेच्या प्रारंभींच्या काळांत कांहीं मुसलमान तिच्यांत सामील होते ही

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १०५.

गोष्ट खरी. तरीहि ती हिंदूंची संस्था हें जें तिचें स्वरूप तें, कांहीं थोडकासा काळ वगळल्यास, कधींच नाहींसें झालें नाहीं. ती जन्मखूण तिच्या देहावर कायमची उमटलेली आहे आणि आजकाल तर ती अधिकच ठळकपणें दिसून येत आहे."[१] लखनौ–कराराच्या समयीं ही वस्तुस्थिति राष्ट्रसभेनें स्पष्टपणें मान्य केलेली होती. श्री. गांधी व अली–बंधू यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या असहकाराच्या चळवळीच्या वेळचा अल्पसा काळ मात्र असा होता कीं तेव्हां राष्ट्रसभेचें जातीय स्वरूप लुप्त झालें होतें. पण त्या चळवळीला जबरदस्त अपयश आलें आणि मुसलमानांना अतोनात नुकसान सोसावें लागलें. पण त्या काळांत सुद्धां हिंदुमुसलमानांच्या एकीला तडे गेल्याचें दिसून येऊं लागलें होतें. 'हिंदुसमाजाच्या अन्तःकरणाचें फार सखोल ज्ञान श्री० गांधींना आहे.... चूक हिंदूंची आहे हें ठाऊक असलें तरी हिंदुसमाजाच्या मताला डावलण्याची छाती त्यांनीं कधींहि केलेली नाहीं. ते स्वतः चांगले बुद्धिमान् असल्याकारणानें गोपूजेसारख्या हिंदूंच्या धार्मिक समजुतींसंबंधीं त्यांना खरी आस्था वाटणें शक्य नाहीं. पण हिंदुसमाजाला खुष ठेवण्यासाठीं त्यांना अनेकवार असें जाहीरपणें बोलून दाखवावें लागलें आहे कीं गोहत्या बंद होणार नसेल तर तें स्वराज्य कवडीमोल ठरेल.'[२]

१९२३ सालीं हिंदुमहासभेची पुनर्घटना झाल्यानंतर तिचें हिंदुराज्य-प्रस्थापनेचें ध्येय साध्य करण्यासाठीं म्हणून त्रिविध कार्यक्रम आंखण्यांत आला. 'मुसलमान अल्पसंख्य असले तरी लष्करी सामर्थ्याविषयीं त्यांना प्रतिष्ठा प्राप्त झालेली असून हिंदु बहुसंख्य असतांहि त्यांना शेळ्यामेंढ्यांप्रमाणें गणण्यांत येत आहे.'[३] १९२३ सालीं नव्या विचारसरणीचा स्वीकार केल्यावर हिंदु-समाजांत वीरवृत्ति जागृत करण्यासाठीं व मुसलमानांविषयीं हिंदूंच्या मनांत बसलेली भीति काढून टाकण्यासाठीं हिंदुमहासभेनें एक नवीन क्लृप्ति शोधून काढली. देशभर तिनें योजनापूर्वक दंगे घडवून आणले. शहरांतील रस्त्यांवर

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १०९.

२. उक्त ग्रंथ, पृ. ११०–१११. ३. उक्त ग्रंथ, पृ. ११३.

लहानसहान प्रमाणावर लढाया खेळण्यांत आल्या. रक्तपाताच्या या खेळांत मुसलमानांना निर्भयपणें कसें तोंड द्यावें हें हिंदूंनीं शिकावें असा त्यांतला उद्देश होता... हिंदूंच्या मनांत मुसलमानांबद्दल जोंपर्यंत धास्ती होती तोंपर्यंत दंगे उद्भवण्याचें भय नसे. हे दंगे म्हणजे हिंदुसमाजाला लष्करी शिक्षण देण्याच्या शाळाच होत्या.'[१] त्या काळांत पंडित मालवीयांच्या दौऱ्यांबाबत वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या हकीकतींवरून दिसून येईल कीं या दंग्यांच्या योजनेचें सूत्रचालकत्व प्रामुख्यानें पंडित मालवीयांकडे होतें. 'पंडित मालवीय एकाद्या शहराला भेट देऊन गेले कीं नंतर कांहीं आठवड्यांनीं तेथें दंगल होई.'[२] श्री० गांधी १९२४मध्यें जेव्हां तुरुंगांतून सुटले तेव्हां सारा देश पंडित मालवीयांच्या मवाली राजकारणाच्या फेऱ्यांत गवसलेला त्यांना दिसून आला. पण परिस्थितीला तोंड देण्याचें धैर्य त्यांना झालें नाहीं.... महात्म्यानें आग विझवण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं आणि पांच वर्षें (म्हणजे १९२३ ते १९२७) हिंदु हिंदुस्थानच्या राजकारणाचीं सूत्रें हवीं तशीं हलविण्याची मोकळीक त्यांनीं कुटिलबुद्धि मालवीयांना दिली.[3] हिंदूंच्या मनांत सायमन–समितीवर बहिष्कार घालावयाचा होता. हिंदुमुसलमानांनीं एकजुटीनें बहिष्कार पुकारावा अशी त्यांची इच्छा होती. 'म्हणून आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें हिंदु पुढाऱ्यांनीं आपली मजलस गुप्तपणें भरवून मुसलमान–विरोधी दंगे बंद करण्याचें ठरवलें आणि एकाएकीं सगळीकडचे दंगे शांत झाले.'[४] 'श्री० गांधींनीं तोंडाला खीळ घालून ठेवली होती. पंडित मालवीय, लाला लजपतराय प्रभृति हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांनीं साऱ्या देशभर जो रक्तपाताचा हैदोस माजवला होता तो थांबविण्यासाठीं श्री० गांधींनीं काडीमात्र प्रयत्न केला नाहीं. १९२८च्या अखेरीअखेरीस ते निवृत्ति सोडून राजकाणांत उतरले ते पूर्वींसारखे हिंदुमुसलमानांचे अखिलभारतीय नेते म्हणून नव्हे तर

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ११४.

२. उक्त ग्रंथ, पृ. ११४. ३. उक्त ग्रंथ, पृ. ११५–११६.

४. उक्त ग्रंथ, पृ. ११६.

एकट्या हिंदुसमाजाचे नेते म्हणून. हिंदु–राष्ट्रीयत्वाची व हिंदु–राज्याची पंडित मालवीयांची विचारसरणी श्री० गांधींनीं उचलल्यावर स्वतः मालवीयांनीं नेतृत्वाचीं सूत्रें खालीं ठेवलीं व ते आपल्या खासगी जीवनांत हळू हळू अन्तर्धान पावले. तेव्हांपासून श्री० गांधी एकट्या हिंदु–समाजाचेंच नेतृत्व करीत आहेत आणि ही गोष्ट त्यांनीं अनेकवार मान्य केलेली आहे. धोरणांच्या आणि खास करून सभासदत्वाच्या बाबतींत राष्ट्रसभेला निव्वळ हिंदूंच्या राष्ट्रीय संघटनेचें रूप प्राप्त झालेलें आहे.'[१] राष्ट्रसभा व हिंदुमहासभा यांच्या कार्यकर्त्यांची देवाणघेवाणहि होत असते. राष्ट्रसभा व हिंदुमहासभा या दोन संस्थांपैकीं एका संस्थेचा सभासद असणाराला दुसऱ्या संस्थेचा सभासद होतां येऊं नये अशा अर्थाचा ठराव १९२८मध्यें मुंबईच्या ऑ० इं० कॉं० कमिटींत आला असतां तो धुडकावून देण्यांत आला; 'पण मुस्लिम लीगवरचा बहिष्कार मात्र जशाचा तसाच ठेवण्यांत आला.'[२] केवळ हिंदु–समाजाचे नेते[3] म्हणून १९२८पुढें श्री० गांधी ओळखले जाऊं लागल्यानंतर त्यांनीं असहकाराची चळवळ सुरू केली; पण मुसलमान–समाज तिच्यापासून पूर्णपणें अलग राहिला. १९३१मध्यें गोलमेज–परिषदेसाठीं ते गेले त्याच्या आधीं दोन्ही समाजांचें एकमत व्हावें म्हणून प्रयत्न करण्यांत आले. पण श्री० गांधींनीं त्या प्रयत्नांना सुरुंग लावला. आपल्या हातचें बाहुलें बनलेले तथाकथित राष्ट्रीय मुसलमान आपला देश सोडणार नाहींत हें पक्कें ठाऊक असल्याकारणानें श्री० गांधींनीं अशी अट घातली कीं मुसलमानांनीं सर्वसंमत अशा मागण्या मांडाव्या.[४]

'१९३५ सालची राज्यघटना अमलांत आल्यावर ती राबवण्याच्या बाबतींत राष्ट्रसभेशीं सहकार्य करण्याचा ठराव मुस्लिम लीगनें केला. राष्ट्रसभा व लीग यांचें ध्येय समान असल्याकारणानें निवडणुकीच्या वेळीं राष्ट्रसभेकडून लीगला विरोध करण्यांत येणार नाहीं अशी श्री० जिनांना उमेद वाटत होती... पण

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. ११७.

२. उक्त ग्रंथ, पृ. ११८. ३. उक्त ग्रंथ, पृ. १२०.

४. उक्त ग्रंथ, पृ. १२१.

राष्ट्रसभेनें दंड थोपटून आव्हान दिलें, लीगच्या उमेदवारांविरुद्ध तिनें आपले उमेदवार उभे केले आणि देशांत ब्रिटिश् सरकार व राष्ट्रसभा असे दोनच पक्ष असल्याबद्दल राष्ट्रसभेचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं गर्जना केली.' १९३७तला राष्ट्रसभेचा विजय अपूर्व असला तरी तो मुख्यतः हिंदु मतदारांच्या क्षेत्रापुरता मर्यादित होता. एकंदर ४८२ मुसलमान–जागांपैकीं फक्त ५८ जागांकरतांच आपले उमेदवार उभे करण्याचा धीर राष्ट्रसभेनें केला. त्यांतले ३२ उमेदवार अपेशी झाले. निवडणुकींत प्राप्त झालेल्या यशामुळें राष्ट्रसभेचें माथें भडकून गेलें होतें. मुस्लिम लीगनें आपला गाशा गुंडाळावा, निदान पक्षीं राजकीय संस्था म्हणून काम करण्याचें तिनें बंद करावें अशी भाषा राष्ट्रसभा बोलूं लागली. मुसलमान–जनता–संपर्काच्या चळवळीला प्रारंभ झाला आणि मुसलमानांनीं आपल्या जातीय संस्था सोडून व्यक्ति म्हणून राष्ट्रसभेंत दाखल व्हावें असा प्रचार चालू झाला. हा प्रचार मुसलमानांना उद्देशूनच चाले. हिंदूंना मात्र एकाच वेळीं राष्ट्रसभेचे व महासभेचे सभासद होण्याची मुभा होती.'[१] 'राज्यघटनेप्रमाणें अल्पसंख्याकांचे हितसंबंध व इतर खास हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठीं गव्हर्नरांना जे विशेष अधिकार देण्यांत आलेले होते ते वापरण्यांत येणार नाहींत असें आश्वासन मिळाल्यावांचून' मंत्रिमंडळें बनविण्याचें राष्ट्रसभेनें नाकारलें.[२] तिकडे युद्धाचीं अभ्रें जमूं लागलीं होतीं. म्हणून देशांत शांतता टिकावी या उद्देशानें सरकारनें शरणागतीचा मार्ग पत्करला, राष्ट्रसभेनें मागितलेली हमी दिली आणि मुसलमानांचा पुन्हां एकवार गळा कापला! अधिकार–ग्रहण केल्याबरोबर राष्ट्रसभेनें पहिली घोषणा केली ती ही कीं मंत्रिमंडळांत मुसलमानांना घेण्यास ती बांधलेली नाहीं. या धोरणानुसार ओरिसामध्यें मुसलमान सभासदांवांचून मंत्रिमंडळ बनवण्यांत आलें आणि मध्यप्रांतांतील मुसलमान मंत्र्याची कांहीं तरी कारणें शोधून काढून थोडक्याच दिवसांत बोळवण करण्यांत आली. राष्ट्रसभेची

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १२३–१२४.

२. उक्त ग्रंथ, पृ. १२६.

यानंतरची दुसरी घोषणा अशी होती कीं आपल्या पक्षाचा राजीनामा देऊन मुसलमानांनीं राष्ट्रसभेच्या प्रतिज्ञापत्रकावर सही केली तर त्यांचा समावेश आपल्या मंत्रिमंडळांत करण्यास आपण तयार आहों.'[1]

कांहींहि असलें तरी राष्ट्रसभेची राजवट मुसलमानांच्या दृष्टीनें कमालीची अन्याय्य व जाचक झाली ही वस्तुस्थिति आहे...ज्या प्रांतांत हिंदु बहुसंख्य होते तेथें ते असें वागूं लागले कीं जणूं कांहीं हिंदु–राज्यच सुरू आहे!... दरोबस्त सार्वजनिक इमारतींवर व शाळांवर राष्ट्रसभेचें निशाण फडकावण्याचे आदेश राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं दिले....हिंदूंच्या सार्वभौमत्वाच्या पुनः–प्रतिष्ठापनेचें व मुस्लिमद्वेषाचें प्रतीकच असें जें वन्दे मातरम् गीत तें सगळ्या सार्वजनिक प्रसंगीं गाण्याविषयीं हुकूम जारी झाले किंवा अनुज्ञा तरी देण्यांत आली. राष्ट्रसभेच्या हुकमतीखालीं आलेल्या प्रांतांपैकीं कांहीं ठिकाणच्या कायदे-मंडळांनीं वन्दे मातरम् गीत गाऊनच आपल्या कार्यक्रमाला प्रारंभ केला.'[2] पंडित मालवीयांनीं १९१३ ते १९२७च्या दरम्यान मुसलमानांच्या बाबतींत सामुदायिक दहशतीची व दंग्यांची जी मोहीम धूमधडाक्यानें सुरू केली होती ती पुन्हां सुरू करण्यांत आली.' तत्संबंधींचा तपशील शरीफ–अहवालाच्या दान खंडांत, श्री० फझलुल हक्क यांच्या निवेदनांत व के. एफ्. अब्दुल रह-मानखान यांच्या अहवालांत सांपडेल.[3]

हिंदु अपराध्यांचें संरक्षण करण्याचें जें तंत्र राष्ट्रसभेच्या प्रांतिक सरकारांनीं अवलंबलें होतें त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:—(१) मुसलमान जेथें आपला गोहत्येचा हक्क सोडून देण्यास व माफी मागण्यास तयार असतील तेथें दोन्ही पक्षांत तडजोड घडवून आणण्याच्या कामीं दुय्यम दर्जाच्या अधि-काऱ्यांस प्रोत्साहन देणें आणि (१) पुरावा नष्ट होऊन अपराध्यांना सही-सलामत सुटतां यावें म्हणून पोलिसांना गुन्ह्यांच्या चौकशीच्या कामीं दिरंगाई करूं देणें. मुसलमानी टापूंतल्या सौम्य न्यायाधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यांत आल्या व मुसलमान वस्तीवर प्युनिटिव्ह् पोलीस लादण्यांत आले.

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १२७–१२८.

२. उक्त ग्रंथ, पृ. १२९–१३०. ३. उक्त ग्रंथ, पृ. १३१.

चांदूर विस्त्रा येथें एका हिंदु गृहस्थाचा खून केल्याच्या आरोपावरून चाल-लेल्या खटल्यांत कांहीं मुसलमानांना फांशीच्या व कांहींना जन्मठेपेच्या शिक्षा देण्यांत आल्या होत्या. त्या आरोपींना दोषमुक्त ठरवतांना वरिष्ठ न्यायालयानें दिलेल्या निकालांतील विस्तृत उतारे श्री० दुराणी यांनीं यानंतर दिले आहेत. सेशन–कोर्टाचा न्यायाधीश इंग्रज होता एवढी गोष्ट मात्र जातां जातां ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. या सर्व प्रकरणावरील श्री० दुराणींची मल्लिनाथी येणें-प्रमाणें:—मध्यप्रांताच्या पंतप्रधानाला काडीमात्र लाजलज्जा असती तर त्यानें आत्महत्याच केली असती, निदान सार्वजनिक कार्याला तरी कायमचा राम-राम ठोकला असता. जवळ जवळ सर्व शिक्षा पुरी भोगलेल्या कैद्याला तुरुं-गांतून सोडल्याबद्दल श्री० युसुफ यांना बडतर्फ करण्यांत आलें होतें. पण प्रजाजनांच्या जीविताविरुद्ध ही गलिच्छ कारवाई केल्याबद्दल राष्ट्रसभेनें पंडित शुक्लांना (पंतप्रधानांना) कोणताहि जाब विचारला नाहीं....राष्ट्रसभेचे हुकुम-शहा व पंडित शुक्लांचे पालक जे श्री० गांधी ते सत्य, अहिंसा व आंतर नाद यांच्यासंबंधीं चोवीस घंटे वटवट करीत असतात. सर्वशक्तिमान् प्रभु असल्या भोंदूशीं एक अक्षरहि बोलत नसेल याविषयीं मला तरी संदेह नाहीं. श्री० गांधी ज्याला आपला आंतला आवाज म्हणतात तो दुसऱ्याच कोणाचा तरी आवाज असला पाहिजे. तें कसेंहि असो, न्यायाची व सुराज्याची हीं अशा प्रकारचीं उदाहरणें डोळ्यांसमोर घडत असतां हिंदूंच्या हातांखालीं शासित म्हणून राहण्यास हिंदी मुसलमान कालत्रयीं कबूल होणार नाहींत.'[१]

राष्ट्रसभेच्या मुसलमानांवरील अत्याचारांचें वर्णन त्यांनीं असेंच पुढें चालू ठेवलें आहे. ते लिहितात, 'कांहीं ठिकाणीं मुसलमानांना 'आजाँ' देण्यास व खाण्यासाठीं गाईची कत्तल करण्यास बंदी करण्यांत आली. त्यांच्या मशिदी व श्मशानें पार उध्वस्त करण्यांत आलीं. तथापि मुसलमानांचा मुसलमानपणा नाहींसा करण्याची, त्यांची संस्कृति व सामाजिक एकी नष्ट करण्याची...सर्वांत इरसाल शक्कल म्हणजे वर्धा–शिक्षण–योजना. तिचा मासला मध्यप्रांतांतील

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १३४–१३५.

विद्या-मंदिर-योजनेनें[1] चाखवलेला होताच. पुढें तीच योजना राष्ट्रसभेच्या अखिल भारतीय भावी सरकारकडून सर्वांच्या माथीं बळजबरीनें लादण्यांत यावयाची होती. राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले तेव्हां एवढें तापत्रय सोसलेल्या मुसलमानांना साहजिकच आपण एका संकटांतून मुक्त झाल्या-प्रमाणें वाटलें. नंतर वैयक्तिक सत्याग्रह झाला. पुढें क्रिप्स-योजना आली. त्यांतल्या शर्ती उदार होत्या; पण त्यांत राष्ट्रसभेच्या दृष्टीनें एक गोम होती. हिंदुस्थानांतल्या मुसलमानी प्रांतांना फुटून जाण्याची व स्वतंत्र मुसलमानी राज्य प्रस्थापित करण्याची सवड त्यांत ठेवलेली असल्यामुळें ती योजना राष्ट्र-सभेच्या घशाखालीं उतरणें शक्य नव्हतें.

'ऑ. इं. कॉ. कमिटीनें ८ ऑगस्ट १९४२ रोजीं जो 'उघड बंडा'चा ठराव केला तो ठराव म्हणजे 'दारापाशीं ससैन्य येऊन ठेपलेल्या जपानला उंबरठा ओलांडून आंत येण्याचें व सर्व देश जिंकून घेण्याचें उघड उघड निमंत्रणच होतें. या दृष्टीनें विचार केला तर ऑगस्ट्चा ठराव म्हणजे देशाशीं केलेल्या अतिभयंकर निमकहरामीचा एक नमुना ठरतो. जपानशीं सांस्कृतिक संबंध असल्याचें हिंदु लोक सांगतात. पण मुसलमानांचा जपानबरोबर कसला-हि संबंध नसल्याकारणानें मुसलमानांच्या बाबतींत तर तो ठराव म्हणजे विश्वास-घाताचा कळसच होता.[2] 'आपल्या प्रदीर्घ राजवटींत व्हाइसरॉय् लॉर्ड् लिन्-लिथ्गो यांनीं एकदांच तडफदारपणानें व परिणामकारक रीतीनें कामगिरी बजावली. आणि श्री० गांधींचें अललटुर्रचें नाटक पहिल्या अंकांतच खलास करण्यांत आलें. हिंदु राज्याच्या छळापासून मुसलमानी हिंदुस्थान बचावण्याची ही दुसरी वेळ.'[3]

'इस्लाम हें एक नैतिक-राजकीय तत्त्वज्ञान आहे हें खरें. पण हिंदुस्थानां-तील मुसलमानांकडे पाहिलें तर त्यांचें राजकीय विचारसामर्थ्य एकंदरींत हीन प्रतीचें असल्याचेंच दिसून येतें. पण ते ज्या परिस्थितींत वास्तव्य करून

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १३५-१३६.
२. उक्त ग्रंथ, पृ. १३९-१४०. ३. उक्त ग्रंथ, पृ. १४१.

आहेत ती परिस्थितिच अशी आहे कीं ती त्यांची ढिलाई चालूं देणार नाहीं. हिंदूंनीं त्यांच्याविरुद्ध जें 'संकुल' युद्ध पुकारलें आहे त्यामुळें मुसलमान समाज भांबावलेल्या व आश्चर्यमूढ स्थितींत होता. १९३८ सालीं मुसलमानांना ही जाणीव होत चालली कीं हिंदुमुसलमानांच्या संयुक्त राष्ट्रांत आपणांला स्थान मिळण्याचा संभव नाहीं. आणि त्या वर्षाअखेर देशांतल्या कोनाकोपऱ्यांतून आवाज उठूं लागले कीं 'हिंदुस्थानांत दोन राष्ट्रें असून मुसलमानांचें स्वयंसिद्ध असें एक निराळें राष्ट्र आहे.'[1] अखिल भारतीय मुस्लिम लीगनें आपल्या १९४० मार्चच्या लाहोरच्या अधिवेशनांत जो पाकिस्तानचा ठराव केला तो 'मुसलमानांच्या मनांत जी राजकीय श्रद्धा आधींपासूनच दृढमूल होऊन बसली होती तिचा आविष्कार होता.'[2] श्री० दुराणींच्या मतें १९३८ सालीं हिंदी मुसलमानांना आपण पृथक् राष्ट्र असल्याची जाणीव झाली आणि पाकिस्तान हस्तगत करण्याचा त्यांनीं दृढ निश्चय केला. 'त्यामुळें मुसलमानांचीं अन्तःकरणें चैतन्यमय होऊन गेलीं आहेत. अपरिचित, स्वप्नांतहि दुर्लभ, असीम अशा शक्यता त्यांना त्यांत दिसूं लागल्या आहेत. ज्या राज्यांत छळ, अन्याय व शोषण यांपासून मानव भयमुक्त असेल, ज्यांत तो स्वार्थपरायणता, लोभीपणा, दारिद्र्यशंका यांपासून अलिप्त असेल,...ज्या राज्यांत तें इस्लामी असलें तरी, किंबहुना तें इस्लामी असल्यामुळेंच, नागरिक हक्कांच्या व आर्थिक फायद्यांच्या बाबतींत हा 'मुसलमान तो बिगर–मुसलमान' असा पंक्तिप्रपंच करण्यांत येणार नाहीं, असें पाकिस्तानचें राज्य होईल. त्या राज्याला 'हुकूमत–इ–इलाही' किंवा 'देवाचें राज्य' असें मुसलमान म्हणतात. कांहीं लोकांनीं अर्थ न समजल्यामुळें त्याचें धर्म–राज्य असें भाषांतर केलें आहे. पण इस्लामी राज्य हें धर्म–राज्य असत नाहीं....तें लोक–राज्य असतें. "आम्ही म्हणजेच राज्य" अशी त्यांतील प्रजाजनांची भावना असते आणि तशी उघड घोषणा करण्याचाहि त्यांना हक्क असतो.'[3]

---

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १५३–१५४.
२. उक्त ग्रंथ, पृ. १५७. ३. उक्त ग्रंथ, पृ. १५८–१५९.

श्री. दुराणींच्या प्रतिपादनांतले उतारे इतक्या विस्तारानें येथें दिले आहेत तें त्यांचीं विधानें किंवा त्यांचे निष्कर्ष मला मान्य आहेत म्हणून नव्हे. त्यांपैकीं अनेक विधानें व निष्कर्ष उघडच हास्यास्पद व असत्य आहेत. परंतु द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताची बांधणी कशी होत गेली तें त्यांनीं क्रमवार मांडून दाखवलेलें असल्याकारणानें आणि 'हिंदु व मुसलमान हे केवळ दोन भिन्न समाज नसून तीं दोन पृथक् राष्ट्रें आहेत, करारनामा करून हीं मूलत:च भिन्न असलेलीं राष्ट्रें एकत्र सांधून त्यांचें एक राष्ट्र बनवतां येणार नाहीं, हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाचा तर्कशुद्ध निकाल या दोन समाजांपैकीं एकानें दुसऱ्याला स्वत:मध्यें सामील तरी करून घ्यावें, नष्ट करावें किंवा निरुपद्रवी तरी करून टाकावें म्हणजेच होईल,' असा निश्चित सिद्धांत सर्वांच्या आधीं मांडणाऱ्यांपैकीं आपण एक होतों असें श्री. दुराणींचें म्हणणें असल्यामुळें हे उतारे सविस्तर दिले आहेत. त्यांनीं असेंहि म्हटलें आहे कीं 'मी स्वत: मुस्लिम राज्याचा प्रजाजन असल्याकारणानें साहजिकच माझा आग्रह असा आहे कीं, इस्लामच्या संस्थापनेसाठीं मुसलमानांनीं हिंदुस्थान पुन्हां पादाक्रांत करावा आणि तें आपलें राजकीय ध्येय मानावें. अजूनहि माझें तेंच मत आहे; कारण माझी अशी दृढ श्रद्धा आहे कीं हिंदुस्थानला केवळ इस्लाममुळेंच आपली राजकीय मुक्ति साध्य करून घेतां येईल.'[१]

## ४. राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय

१९३८ सालापासून आपण स्वतंत्र राष्ट्र असल्याची जाणीव हिंदी मुसलमानांना झालेली आहे हा मुख्य सिद्धांत वादासाठीं मान्य केला तरी हिंदु-मुसलमानांचीं दोन पृथक् राज्यें बनवल्यानंतर त्या दोहोंत उरणाऱ्या अल्प-संख्याकांची परिस्थिति सुधारेल किंवा काय आणि त्यामुळें या समस्येचा निकाल समाधानकारक रीतीनें लागेल किंवा काय याचा विचार आपणांला अधिक तावडतोब कर्तव्य आहे. यासाठीं पाश्चात्य देशांचा इतिहास अभ्यासून

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, पृ. १४६.

तेथें अलीकडच्या काळांत जे अनुभव आलेले आहेत त्यांपासून बोध घेणें फायद्याचें होईल. महायुद्धानंतर रसातळास पोंचलेल्या मध्ययुरोपियन् साम्राज्यांच्या भग्नावशेषांतून अनेक नवीन राज्यें निर्माण करण्यांत आलीं ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. हीं राज्यें यावच्छक्य एकजिनसी राहावीं असे प्रयत्न करण्यांत आले. त्यांचा परिणाम असा झाला कीं महायुद्धापूर्वी जे समाज अल्पसंख्य होते ते या नवीन राज्यांच्या स्थापनेनंतर बहुसंख्य बनले आणि छिन्नविछिन्न झालेल्या जुन्या राज्यांतील बहुसंख्याकांना नवीन राज्यांत अल्पसंख्याकांचा दर्जा प्राप्त झाला. अल्पसंख्याकांचा छळ झाला तर जगांत अस्वस्थता माजेल अशी धास्ती वाटत असल्यामुळें अल्पसंख्याकांना कोणत्या प्रकारची वागवणूक देण्यांत यावी हा आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला. आणि बहुतेक नवनिर्मित राष्ट्रांना आपल्या देशांतल्या अल्पसंख्याकांच्या संरक्षणाबद्दल करारनामे करून द्यावे लागले. यांनाच 'अल्पसंख्याकांचे तहनामे' असें म्हणतात. त्या तहांतील कलमें पाळलीं जातील याची जिम्मेदारी राष्ट्रसंघानें आपणाकडे घेतली.

मुसलमानांचें व हिंदूंचें युरोपांतल्याप्रमाणें पृथक् पृथक् राज्य स्थापणें हा हिंदुस्थानच्या फाळणीचा उद्देश आहे. आपापलें सांस्कृतिक, आत्मिक, आर्थिक व राजकीय जीवन आणि आपापलें भवितव्य आपापल्या प्रकृतीस अनुसरून घडवण्याची मोकळीक हिंदु-मुससलमानांना मिळावी हा या योजनेचा हेतु आहे. हें ध्येय जर साध्य होण्यासारखें असेल तर त्याबद्दल मतविरोध दर्शविण्याचें कारणच नाहीं. परंतु हिंदु व मुसलमान हे समाज अशा प्रकारें पसरलेले आहेत व एकमेकांत मिसळून गेलेले आहेत कीं केवळ हिंदूंचें किंवा केवळ मुसलमानांचें एकजातीय राज्य देशाच्या कोणत्याही भागांत स्थापणें अशक्य आहे. त्यांत अन्यजातीय बरेचसे लोक येणारच. बहुसंख्य रहिवाशांच्या धर्मानुसार उघडपणें प्रस्थापित झालेल्या या राज्यांना हिंदूंच्या व मुसलमानांच्या राष्ट्रीय राज्यांचें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य आहे. आणि असें स्वरूप त्यांना एकदां प्राप्त झालें कीं राष्ट्रीय राज्यांत ज्या

मनःप्रवृत्ति व जीं तत्त्वज्ञानें बळावतात तीं येथेंही जोर केल्याशिवाय राहतील हें शक्य नाहीं. 'जोंपर्यंत अशा राज्यांची सूत्रचालना करणारीं बहुसंख्याकांचीं राष्ट्रं (म्हणजे हिंदुस्थानच्या बाबतींत मुसलमान राज्यांतले मुसलमान व हिंदु राज्यांतले हिंदु) फक्त आपल्या समाजाचीं ध्येयें व आकांक्षा साध्य करून घेण्यासाठीं आपल्या हातांतील राज्याधिकारांचा साधनें म्हणून उपयोग करण्याचे शास्त्रीय दृष्टया खुळचट व व्यावहारिक दृष्टया असाध्य प्रयत्न करीत राहतील तोंपर्यंत अल्पसंख्याकांना असह्य परिस्थितींतच जीवन कंठावें लागणार. कोणत्याहि प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संरक्षणामुळें ती परिस्थिति सुसह्य करतां येणार नाहीं.'[१] असें मत मॅकार्ट्‌ने यांनीं व्यक्त केलें आहे. एकराष्ट्रीय राज्य व अल्पसंख्याक या दोन गोष्टींचा समन्वय अशक्य आहे. हा पेंच सोडवण्याचे दोन मार्ग दिसतात: पैकीं एक असा कीं अल्पसंख्याकांना निकालांत काढावें म्हणजे ( अ ) अल्पसंख्याक जमाती वगळल्या जातील अशा प्रकारें सरहद्दींची आंखणी करावी किंवा ( आ ) लोकसंख्येची देवाणघेवाण करावी.[२]

---

१. सी. ए. मॅकार्ट्‌ने : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज्, (१९३४), पृ. ४२१.

२. 'पाकिस्तान'च्या योजनेला पाठिंबा देणाऱ्या डॉ. अंबेडकरांचें म्हणणें आहे कीं, 'बहुसंख्य व अल्पसंख्य जमातींना एकमुखी सरकारच्या लोखंडी चौकटींत दामटून बसवणें...हा जातीय समस्या सोडवण्याचा प्रशस्त मार्ग नव्हे.' सध्यांच्या प्रांतिक सरहद्दींची पुन्हां आंखणी करून, पाकिस्तानमधून बिगर–मुसलमान टापू वगळून व रहिवाशांची अदलाबदल करून हा प्रश्न सोडवण्यांत यावा. या गोष्टी अशक्य असतील तर पाकिस्तान देऊनहि जातीय प्रश्नाची मेख तशीच राहणार. म्हणून सरहद्दींची फेर–आंखणी करावी व रहिवाशांची अदलाबदल करावी हाच मार्ग ते सुचवतात. या गोष्टी करणें शक्य होईल व एकजात मुसलमानांचें पाकिस्तान स्थापतां येईल अशी त्यांची कल्पना आहे. पण हिंदुस्थानांत एकजात हिंदुच राहतील, त्यांत मुसलमानांची अल्पसंख्या उरणार नाहीं यासाठीं काय मार्ग काढावा तें त्यांनाहि

दुसरा मार्ग म्हणजे राज्याचा तात्त्विक पाया बदलून त्याला राष्ट्रीयत्वातीत किंवा बहुराष्ट्रिक स्वरूप द्यावें.

तथापि हिंदु व मुसलमान सर्व देशभर अशा प्रकारें विखुरलेले आहेत आणि त्यांचे समाज असे मिसळून गेलेले आहेत कीं दुसऱ्या समाजांतील लोक वगळून एकजात मुसलमानांचा किंवा हिंदूंचाच समाज असलेला टापू वेगळा तोडून त्याचें पृथक् राज्य स्थापणें जमणार नाहीं. त्यांत दुसऱ्या समाजाचे

---

सुचवतां आलेलें नाहीं. वरील उपाय केल्यास हा प्रश्न बराचसा कमी बिकट होईल व त्यामुळें एकंदरींत हिंदूंचें हितच होईल एवढेंच सुचवून त्यांनीं समाधान मानलें आहे. पाहा:—पाकिस्तान अथवा हिंदुस्थानची फाळणी (पाकिस्तान ऑर् इंडिया डिव्हायूडेड्): प्रकरण ६वें, पृ. ९५–१०७.

लीगच्या ठरावाचा न्याय्य अर्थ लावून त्याप्रमाणें सरहद्दींची फेर–आंखणी कोणत्या प्रकारची होईल याचा सविस्तर विचार मीं केलेला आहे. पण १९४४मध्यें महात्मा गांधींशीं झालेल्या चर्चेच्या वेळीं आहेत त्याच सरहद्दी कायम ठेवण्याचा आग्रह जिनासाहेबांनीं धरल्याचें प्रसिद्ध झालें आहे. रहिवाशांच्या अदलाबदलीच्या बाबतींत एवढेंच ध्यानांत ठेवलें म्हणजे पुरे कीं डॉ. अंबेडकरांच्या म्हणण्याप्रमाणें सरहद्दी असल्या तरीहि वायव्य मुस्लिम राज्यांतून ६१ लाख व पूर्व राज्यांतून १ कोटि ३४ लाख रहिवाशांची बदली करावी लागेल. 'तुर्कस्तान, ग्रीस् व बल्गेरिया यांच्यांतील रहिवाशांच्या अदलाबदलीच्या वेळीं सुमारें दोन कोटि लोकांची अदलाबदल करावी लागली' अशी जी माहिती डॉ. अंबेडकरांनीं दिलेली आहे ती त्यांना कोठून मिळाली तें समजत नाहीं. या तीन राज्यांतील अल्पसंख्याकांची एकूण संख्या ३५ लाखांपेक्षां जरा अधिक एवढीच होती. बल्गेरिया व ग्रीस् यांतील रहिवाशांची अदलाबदल करण्यासाठीं नेमलेल्या समितीला फक्त १,५४,६९१ रहिवाशांचा प्रश्न सोडवावा लागला आणि ग्रीस् व तुर्कस्तान यांच्या बाबतींत अदलाबदल केलेल्या रहिवाशांची संख्या ५,४५,५५१ होती असें मॅकार्ट्ने यांनीं नमूद केलें आहे.

पुष्कळ लोक येणारच व त्यांची भलीभक्कम अल्पसंख्या तेथें बनणारच. ही गोष्ट सर्वांनाच मान्य असल्यामुळें एकजात मुसलमानांचें राज्य स्थापावें अशी मागणी कोणी करीत नाहीं. हिंदु वा मुसलमान ज्यांत बहुसंख्य असतील आणि ज्यांत दुसऱ्या समाजाची अल्पसंख्या असेल अशीं राज्यें बनवण्यांत यावीं अश्याच सूचना करण्यांत येत असतात. देशाची फाळणी कशीहि केली तरी त्यांत एकजिनसी समाज उपलब्ध होणें असंभवनीय आहे.

रहिवाशांची अदलाबदल करून एकजिनसीपणा आणतां येईल काय? डॉ० एम्. ए. लतीफ व डॉ० अंबेडकर यांच्या व्यतिरिक्त कोणीं हा उपाय सुचवलेला नाहीं. १९४०च्या मार्चमध्यें भरलेल्या लाहोर येथील लीगच्या अधिवेशनांत जिनांनीं असें म्हटलें होतें कीं, 'हिंदुस्थानची फाळणी झाल्या-नंतर रहिवाशांच्या अदलाबदलीचा विचार शक्य तों करावा लागेल.'[1] परंतु या योजनेंत बसणाऱ्या रहिवाशांची अवाढव्य संख्या, अदलाबदलीच्या कामीं होणारा खर्च व त्रास आणि त्याचबरोबर ज्यांना देशांतर करावें लागणार त्या हिंदु व मुसलमान रहिवाशांचें आपल्या जमीनजुमल्यांसंबंधींचें प्रेम, हीं सारीं लक्षांत घेऊन इतर सर्वांनीं हा मार्ग अशक्य कोटींतला मानलेला आहे. युरोपांतील अल्पसंख्याकांचा याबाबतचा अनुभव येथें नमूद करण्या-सारखा आहे.

शांतता–तहानुसार ऐच्छिक देशांतर व सक्तीचें देशांतर असे दोन्ही उपाय करून पाहण्यांत आले. मॅकार्ट्‌नें लिहितात, 'खऱ्या ऐच्छिक देशांतरांचें प्रमाण फारच अल्प होतें.'[2] 'हिंदुस्थानांत यापेक्षां कांहीं निराळा अनुभव येईल असें मानण्याचें कारण नाहीं. तुर्कस्तान व ग्रीस् यांच्या दरम्यान मात्र पर-स्परांत सक्तीच्या देशांतराचा उपाय योजण्यांत आला. मॅकार्ट्‌नेचा निर्णय असा आहे कीं, 'अल्पसंख्याकांचे प्रश्न सोडवण्याचा उपाय म्हणून देशांतराच्या

---

१. जिनांचे लेख व त्यांचीं भाषणें, तिसरी आवृत्ति, पृ. १५८.

२. सी. ए. मॅकार्ट्‌ने : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज् (१९३४), पृ. ४४०–४४१.

मार्गांचा आपणाला जो कांहीं अनुभव आलेला आहे, त्यावरून त्याचा पुन्हां प्रयोग करून पाहण्यास उत्साह वाटत नाहीं. युद्धानंतरची तुर्कस्तान व ग्रीस् या देशांतली परिस्थिति फारच विलक्षण होती. अधिक सुस्थिर वातावरण असेल तर त्या वेळीं झालेल्या हालअपेष्टा पुन्हां भोगाव्या लागण्याचें व त्या वेळच्या सारखें आर्थिक नुकसान पुन्हां सोसण्याचें कारण पडणार नाहीं असें कोणी म्हणतील. त्यावर उत्तर असें आहे कीं तो मार्ग मूलतःच फार जहाल आहे. परिस्थिति सुस्थिर असेल आणि बहुसंख्य व अल्पसंख्य यांच्यांतील संबंध सलोख्याचे असतील तर देशांतराची अवश्यकता राहणार नाहीं आणि ऐच्छिक देशांतराला एकजण सुद्धां तयार होणार नाहीं. रहिवाशांच्या मनाविरुद्ध त्यांना देशांतर करावयास सक्तीनें भाग पाडणें उघड उघडच एक पाशवी कृत्य आहे. ऐच्छिक देशांतराचे प्रकार कधीं घडतच नाहींत ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. ऐच्छिक देशांतरांचे अपवादात्मक दाखले दृष्टीस पडतात; पण वस्तुतः परिस्थितीपुढें निरुपाय होतो म्हणूनच तीं घडून आलेलीं असतात. एवंच हा मार्ग हालअपेष्टांचा आहे हें निःसंशय. प्रश्न येवढाच कीं या हालअपेष्टा रहिवाशांवर उघड्या डोळ्यांनीं लादावयाच्या कां मिटल्या डोळ्यांनीं ?'[१]

'येणेंप्रमाणें अल्पसंख्याकांची हकालपट्टी करून त्यांचा प्रश्न सोडवण्याचे सारे उपाय पूर्णपणें निष्फळ ठरले आहेत...म्हणून संमिश्र समाजांनीं युक्त अशा राज्यांनीं अल्पसंख्यांचें हें अंतर्गत दडपण सदैव सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे असें दिसतें...राज्यांतील बहुसंख्य प्रजाजनांची जीं राष्ट्रीय व सांस्कृतिक ध्येयें असतील त्यांच्याशीं राज्यांतल्या एकूणएक व्यक्तींचीं राजकीय ध्येयें एकरूप झालीं पाहिजेत ही जी एकराष्ट्रीय राज्याची कल्पना अलीकडे उदयास आली आहे तीच आजकालच्या माजलेल्या अस्वस्थतेचें मूळ कारण आहे. तत्त्वतः भिन्न असणाऱ्या या दोन गोष्टींची गल्लत करण्याचें एकदां बंद केलें म्हणजे अनेकविध राष्ट्रगटांच्या राष्ट्रिकांना संपूर्ण सलोख्यानें एकाच राज्यांत

१. सी. ए. मॅकार्ट्ने : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज्, पृ. ४४८–४४९.

नांदण्यास अडचण पडणार नाहीं आणि आज अल्पसंख्याक राष्ट्रिकांच्या वांट्याला जी अपमानास्पद परिस्थिति येत आहे तिचा अनुभव लहानांतल्या लहान गटाला देखील घ्यावा लागणार नाहीं'[१] असा निष्कर्ष मॅकार्टने यांनीं काढला असून सोव्हिएट् यूनियन्‌चें उदाहरण दिलें आहे. हिंदुस्थानांतील समस्येकडेहि त्यांनीं दृष्टिक्षेप टाकला आहे. 'युरोपांतील अल्पसंख्याकांच्या झगड्यांचा विचार ते करतील तर हिंदुस्थानांतील ब्रिटिश् राज्यकर्त्यांचेंच काय पण तद्देशीय रहिवाशांचेंहि कांहीं नुकसान होणार नाहीं असें म्हणावेसें वाटतें. हिंदुस्थानांतल्या आजच्या परिस्थितींत दोन पृथक् संघर्ष दिसून येतात. एक तद्देशीय रहिवाशांचा इंग्रजांबरोबर चाललेला संघर्ष व दुसरा हिंदूंचा मुसलमानांबरोबर सुरू असलेला संघर्ष. (इतर किरकोळ जमातींच्या सदैव चाललेल्या झटापटींचा उल्लेख येथें केलेला नाहीं.) हिंदुस्थानांतले इंग्रज हे कांहीं तद्देशीय वरिष्ठवर्गीय लोक नाहींत. ते परकीय सरकारचे प्रतिनिधि आहेत. त्यामुळें त्यांच्याबरोबर चाललेला झगडा हा बऱ्याच अंशीं हॅप्स्‌बर्ग् घराण्याबरोबर चाललेल्या मॅग्यार् लोकांच्या झगड्यासारखा दिसतो. ब्रिटिश राज्यकर्त्यांना हिंदी मुसलमानांकडून जें सहाय्य मिळत आहे तें हॅप्स्‌बर्ग् राजघराण्याला जर्मनांच्या व हंगेरींतील क्रोटांच्याकडून होणाऱ्या मदतीची स्मृति करून देतें. हंगेरींतले मॅग्यार् व इतर राष्ट्रीय गट यांच्यांतील संघर्षाचा कळस हंगेरीच्या अंतर्गत राजकारणांत ढवळाढवळ करण्याचा आपला हक्क हॅप्स्‌बर्ग् घराण्यानें जवळ जवळ सोडून देईपर्यंत जसा झाला नाहीं तसाच हिंदुस्थानांत ब्रिटिश् आहेत तोंपर्यंत तद्देशीय समाजांतील झगड्यांचा सोक्षमोक्ष होणार नाहीं. हिंदुस्थानला जसजशी स्वराज्याधिकारांची प्राप्ति होत जाईल तसतसें तेथील संघर्षांना पूर्व युरोपांतील राज्यांच्या चिंधड्या उडवणाऱ्या संघर्षांचें स्वरूप अधिकाधिक प्रमाणांत येत जाईल....म्हणून जे इतिहासाचें वाचन करतात त्यांना इतिहासापासून धडा घेण्याची सद्बुद्धि सुचो येवढीच आपण

१. सी. ए. मॅकार्टने : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज् (१९३४), पृ. ४५०.

प्रार्थना करूं या.'[१] अशा एका धड्याचा उल्लेख लेखकानें आपल्या पुस्तकाच्या पूर्वार्धांत केलेला आहे. आपण हिंदुस्थानांतल्या लोकांनीं त्याच्यापासून बोध घेतल्यास ठीक होईल. मॅग्यार् व हॅप्सबर्ग् घराणें यांच्या खऱ्या लढ्याला प्रारंभ झाल्यावर क्रोट् इत्यादि बहुतेक अल्पसंख्याकांनीं सरकारची बाजू उचलली आणि मॅग्यारांचा बंदोबस्त करण्यांत आला. परिणाम असा झाला कीं व्हिएन्नाची नोकरशाही हंगेरीवर आपला अंमल गाजवूं लागली. मॅग्यारांचा हेतु तर सिद्धीस गेलाच नाहीं, पण स्लाव्ह् लोकांच्या आकांक्षाहि तृप्त करण्यांत आल्या नाहींत. या परिस्थितीला उद्देशून एक विनोदी मॅग्यार् आपल्या क्रोट् मित्राला म्हणाला कीं 'आम्हांला शिक्षा म्हणून जें मिळालें तेंच तुम्हांला बक्षीस म्हणून मिळालें आहे.'[२]

हिंदुस्थानचा प्रश्न हिंदुमुसलमानांचीं दोन राज्यें स्थापून सोडवण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं हिंदुस्थान जसें पूर्वींपासून व आजहि राष्ट्रातीत राज्य होतें व आहे तसेंच तें पुढेंहि राहूं देणें इष्ट होणार नाहीं काय? मुसलमानांचीं पृथक् राज्यें स्थापण्याची मागणी मुस्लिम लीगनें केल्याला सहा वर्षें देखील पुरीं झालीं नाहींत. पण शेंकडों वर्षांची परंपरा ती मागणी मान्य केल्यास उच्छिन्न होणार आहे. एकराष्ट्रीय राज्यें स्थापन करण्याच्या भरीस न पडता राष्ट्रातीत असें हिंदुस्थानचें राज्य बळकट करण्याचें उद्दिष्ट आपण ठेवावें आणि त्याच्या राष्ट्रातीतत्वाला बाध येईल अशा ज्या कांहीं समजुती व घटना आपल्या जीवनांत असतील त्या दूर करण्यासाठीं झटावें.

लॉर्ड् अॅक्टन् यांचे उतारे द्विराष्ट्रवादी आपल्या मताच्या मंडनार्थ देत असतात. मॅकार्ट्ने यांनीं त्यांचाच जो एक उतारा घेऊन आपल्या ग्रंथाची समाप्ति केली आहे,[३] तोच येथें उद्धृत करणें मीहि उचित समजतों. लॉर्ड् अॅक्टन् लिहितात, 'कर्तव्यपालनाचें स्वातंत्र्य उपलब्ध होणें हें नागर समाजाचें

---

१. सी. ए. मॅकार्ट्ने : नॅशनल् स्टेट्स् अँड् नॅशनल् मायनॉरिटीज्, (१९३४), पृ. ४८०–४८१. २. उक्त ग्रंथ, पृ. ११८. ३. उक्त ग्रंथ, पृ. ५०१.

ध्येय मानलें तर ज्या राज्यांत कोणत्याहि प्रकारची दडपशाही न करतां अनेक पृथक् राष्ट्रें समाविष्ट झालेलीं आढळतात त्या राज्याला सारदृष्टीनें पूर्ण कोटीला गेलेलें राज्य मानावयास हरकत नाहीं. ज्यांमध्यें वंशमिश्रण मुळींच झालेलें नसेल तीं राज्यें अपूर्ण समजावीं; आणि ज्या राज्यांत वंशमिश्रणाचे प्रयत्नहि होण्याचें बंद झालें असेल तीं राज्यें जीर्ण समजावीं. अनेक वंशांच्या लोकांना जें राज्य राजी राखूं शकत नाहीं तें स्वयंनिषेधित राज्य होय. इतर वंशांना निःसार करण्याचा, त्यांना पचवण्याचा किंवा त्यांची हकालपट्टी करण्याचा प्रयत्न जें राज्य करील तें आपला तेजोवध करून घेईल; आणि जें राज्य त्यांना देशांत थारा देणार नाहीं तें स्वराज्याचा पायाच उखडून टाकील.'

## ५. दुसऱ्या एका दृष्टिकोनांतून दिसणारें चित्र

येथपर्यंतच्या विवेचनांत हिंदुमुसलमान हे भिन्न असून त्यांच्यांत एकी होणें शक्य नसल्यासंबंधींचें बरेंच प्रतिपादन आपल्या पाहण्यांत आलें. पण प्राप्त परिस्थितीकडे पाहण्याचा दुसराहि एक दृष्टिकोण आहे. तो कोणता तें जरा पाहूं या.

'आपण ज्याला "राष्ट्र" असें म्हणतों तो महान् समन्वय सिद्ध होण्यासाठीं अनेकविध मानवी व्यवहारांचें, आकांक्षांचें व भावनांचें नैसर्गिक रीत्या किंवा कृत्रिम रीत्या सहाय्य झालेलें असतें. भाषा, धर्म, कला, कायदे, इतकेंच काय पण अन्न, हावभाव, शिष्टाचार, वेष, क्रीडा या सर्वांचे संस्कार त्यांत समाविष्ट असतात' असें ज्यूलियन् हक्स्लेनें म्हटलें आहे.[१] तो पुढें लिहितो, "'राष्ट्रीयत्व' म्हणून संबोधण्यांत येणाऱ्या सामूहिक विशिष्ट भावनेचें पृथक्करण करावयास घेतलें कीं ती केवळ शारीरिक संबंधापेक्षां बऱ्याच विस्तृत अशा पायावर आधारलेली असल्याचें दिसून येतें. एका निश्चित भौगोलिक मर्यादेतील क्षेत्रांत वस्ती असणें, हवामानामुळें जीवनाला एक विशिष्ट वळण लागलेलें असणें, सर्वांना सामान्य अशी परंपरा हळूहळू तयार होणें, सामाजिक संस्था व संघटना, समान धार्मिक विधि, समान व्यापार व व्यवसाय—

१. ज्यूलियन् हक्स्ले : रेस् इन् युरप् ( युरोपांतील वंश ), पृ. ३.

या सर्व गोष्टींचा इतर अनेक असंख्य गोष्टींसारखाच राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याच्या कामांत थोड्याबहुत प्रमाणांत उपयोग होत असतो. समान भाषेचें महत्त्व फार आहे. समान–भाषिक लोकांत "एकच रक्त" असतें अशी जी भ्रामक समजूत असते तिच्यामुळें त्यांच्यांतल्या बंधुभावाला बळकटी येते. परंतु सामूहिक एकीची प्रवृत्ति वृद्धिंगत करणाऱ्या ज्या विविध भावना आहेत त्यांत परकीयांच्या हस्तक्षेपाविरुद्ध होणाऱ्या प्रतिक्रियेला पहिलें स्थान द्यावें लागेल. तिचें सामर्थ्य एका रक्ताच्या काल्पनिक भावनेपेक्षां किंवा ऐतिहासिक संबंधांच्या भावनेपेक्षांहि अधिक असतें. इतर कोणत्याहि भावनेपेक्षां तिच्या-मुळेंच सामुदायिक अस्मितेचा विकास झालेला आहे. परकीयांचें दडपण हें राष्ट्रीयत्वाच्या विकासाचें मोठ्यांतलें मोठें कारण आहे असें बहुतकरून आढळून येतें."[१]

वर उल्लेखिलेल्या गोष्टींपैकीं विशेष महत्त्वाच्या अशा कांहीं गोष्टी घेऊन त्यांचा हिंदुस्थानांतील हिंदु–मुसलमानांवर कसा काय परिणाम झालेला आहे तें पाहूं.

### १. धर्म—

धर्मापासूनच आरंभ करतों. हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान भिन्न-धर्मीय आहेत आणि त्यांचीं सामाजिक जीवनें धर्मावरच आधारलेलीं आहेत हें खरें. त्यांचे कांहीं धार्मिक आचार परस्परांहून खूपच वेगळे आहेत आणि त्यांच्यांत समन्वय होणें सकृद्दर्शनीं अशक्यप्राय वाटतें हेंहि खरें. पण त्यांच्या धर्मांतील कांहीं मूलगामी तत्त्वांचें निरीक्षण केलें तर एकाच व्यापक धर्माच्या अनुयायांमध्यें जेवढे मतभेद सांपडतात त्यांपेक्षां अधिक मतभेद हिंदु–मुसल-मानांच्या धर्मांत दिसून येणार नाहींत. फक्त प्रार्थनेचीं आसनें व पाण्याचे हौज आंत असलेल्या मुसलमानांच्या मशिदीचा कर्मठ साधेपणा आणि सालं-कृत मूर्ति व इतर साजसरंजाम असलेल्या हिंदु मंदिरांचें वैभव यांच्यामध्यें विरोध दिसतो. पण साधे प्रॉटेस्टंट् किंवा प्रेस्बिटेरियन् चर्च् आणि शृंगारलेलें

१. ज्यूलियन् हक्स्ले : रेस् इन् युरप् ( युरोपांतील वंश ), पृ. १५.

रोमन् कॅथॉलिक् चर्च् यांच्यांतील विरोधाहून तो अधिक नाहीं. मुसलमानांचेंच उदाहरण घेतलें तरी सनातनी सुन्नी पंथीयांना शियांचे ताझिये व ताबूत, सेपार व आलम, पाइक व बहिस्ती इत्यादि प्रकार बिलकुल आवडत नाहींत. हिंदूंच्या दुर्गेची मिरवणूक त्यांना जितकी धर्मबाह्य वाटते तितकेच हेहि प्रकार निषिद्ध वाटतात. पण म्हणून इंग्लंडांतील कॅथॉलिक् व प्रॉटेस्टंट् एकराष्ट्रीय नाहींत किंवा सुन्नी व शिया यांचें मिळून एक राष्ट्र बनलेलें नाहीं असा मुद्दा कोणीहि उपस्थित करीत नाहीं. हिंदूंतही असे पंथ आहेतच कीं जे इतरांच्या मंदिरांवर व मूर्तींवर तद्वत्‌च धार्मिक आचारांवर व उत्सवांवर टीका करतात; तरीहि त्यांना हिंदुच समजलें जातें.

पण आचार व उत्सव, उपासनेच्या तऱ्हा व विधि, यांचीं बाह्य आवरणें दूर करून ज्यांनीं जीवनाच्या, मृत्यूच्या व मरणोत्तर जीवनाच्या गहन रहस्यांत अवगाहन केलेलें आहे असे जे उभय धर्मांतील तत्त्वचिंतक त्यांनीं ईश्वराचें एकत्व, आत्म्याची अमरता, जड सृष्टीचें क्षणभंगुरत्व व आत्मिक जीवनाचें अक्षरत्व यांविषयीं एकाच प्रकारची श्रद्धा व्यक्त केलेली आहे. हिंदूंचा वेदान्त व मुसलमानांचा सूफीवाद हीं एकाच बिंदूवर येऊन पोंचणारीं दर्शनें आहेत, मग त्यांना परस्परांपासून स्फूर्ति मिळालेली असो किंवा ब्रह्मजिज्ञासू मनाच्या अंतिम अनुभवांतून दोघांनाहि समान प्रेरणा प्राप्त झालेली असो. या दोन्ही तत्त्वज्ञानांचा अभ्यास केलेल्या डॉ. भगवानदासांसारख्या विद्वानाला दोन्ही धर्मांतील मान्य ग्रंथांतून समानार्थक वचनें सहज काढून दाखवितां येतील.

'मुसलमानी गूढवादाचें तिसरें परदेशीय उगम–स्थान म्हणजे हिंदुस्थान होय. हिंदुस्थान व पर्शियाचें आखात यांच्यामध्यें घनिष्ट संबंध होता हें आधींच्या एका प्रकरणांत सांगितलें आहेच. व्यापारासमवेत कल्पनांची देवाण–घेवाणहि चालू होती. पोलाद व तलवारी, सोनें व रत्नें इत्यादि व्यवहारोपयोगी वस्तु आणि कमान व घुमट यांच्यासारखे शिल्प–प्रकार जर हिंदुस्थानांतून पर्शिया व इराक या देशांत गेले तर हिंदी तत्त्वज्ञानविषयक

विचारहि तेथवर पोंचले असतील हें सयुक्तिक दिसतें. उमय्यादांच्या पहिल्या राजांच्या कारकीर्दींत अनेक हिंदूंची अर्थखात्यांत नेमणूक झालेली होती; खलिफ मुआविया यानें तर त्यांची एक वसाहत सिरियामध्यें, विशेषत: अँटिओक् व हेजाज्मध्यें, वसवली होती. काशगरमध्येंहि त्यानें हिंदूंना घरें बांधून दिलीं. खलिफाच्या राज्यांतील शहरांमधून मुसलमानांच्या मांडीला मांडी लावून हिंदु लोक बसत उठत असत. खोरासान, अफगाणिस्तान, सिस्तान व बलुचिस्तान हे देश इस्लामी बनण्यापूर्वी बुद्धधर्मी किंवा हिंदुधर्मीच होते.' बल्ख येथें एक विस्तीर्ण विहार ( मठ ) होता व त्याच्या अध्यक्षाला बारामक म्हणत. त्याचे वंशज अब्बासाईद खलिफांच्या पदरीं बारामकी वझीर म्हणून सुविख्यात झाले.

अरबांनीं हिंदी वाङ्मय व शास्त्रें यांचा पूर्वापार चांगला व्यासंग ठेवलेला होता. दुसऱ्या हिजरी शतकांत किताब–उल–बुद व बिलाव्हर् व बुदासिफ्, तसेंच सिंद–हिंद (सिद्धांत), शुश्रुद (सुश्रुत) व स्ताक (चरक) नामक खगोलशास्त्र व आयुर्विद्या यांवरील ग्रंथ; कलिलाह् दमनाह् ( पंचतंत्र ) व किताब सिंदबाद हे कथाग्रंथ; शनक (चाणक्य) व बिडपा (हितोपदेश) हे (राज–)नैतिक ग्रंथ; आणि तर्कशास्त्र व युद्धशास्त्र यांवरील ग्रंथ त्यांनीं अरबीमध्यें भाषांतरित केले होते.

ज्या ज्या लोकांशीं त्यांचा संबंध येई त्या त्या लोकांच्या चालीरीती, त्यांचे शिष्टाचार, त्यांचीं शास्त्रें व धर्म यांची माहिती मिळविण्याविषयीं अरब प्रवासी सदैव उत्सुक असत. अल्–किंडी यानें हिंदी धर्मावर ग्रंथ लिहिला. सुलेमान व मसूदी यांनीं आपल्या प्रवासांत माहिती गोळा करून नंतर ती आपल्या ग्रंथांत समाविष्ट केली. अल्–नादिम, अल्–अशरी, अल्–बिरूनी शाहरस्तनी इत्यादि अनेक ग्रंथकारांनीं हिंदी धर्मांचा व दर्शनांचा ऊहापोह करण्याकरतां आपल्या ग्रंथांचीं प्रकरणेंच्या प्रकरणें खर्च केलीं आहेत.

'साधु पुरुषाचा आदर्श म्हणून बुद्धाची कथा मुसलमानी वाङ्मयांत रूढ झाली आणि मुसलमानी संतचरित्रकारांनीं इब्न अधमच्या कथेला बुद्ध-

कथेचा पेहेराव चढविला. जोडीनें पर्यटन करणारे व एकाच स्थळीं दोन रात्रींहून अधिक वास न करणारे हिंदी यति तर मुसलमान साधकांच्या साक्षात् परिचयाचे असत. त्यांनीं या यतींपासूनच स्वच्छता, शुचिता, सत्य व अपरिग्रह या चतुष्टयाच्या दीक्षा घेतल्या. जपमाळेचा प्रसाद त्यांना यतींकडूनच मिळाला. मग निर्वाणाची कल्पना, संयमाचे अष्टविध मार्ग, योगक्रिया व सिद्धि यांचा प्रवेश ताना, तरीका किंवा सलूक, मोराकाबा व करामत किंवा मुजिझा या नांवांनीं इस्लाममध्यें झाला असल्यास नवल तें कोणतें ?'[१]

'तथापि आपल्या प्रतिपादनाच्या धृष्टतेमुळें साऱ्या इस्लामी दुनियेंत कोणीं खळबळ उडवून दिली असेल तर ती हुसेन–बिन–मन्सूर अल–हल्लाज यांनीं. त्यांनीं अनेक देशांचें पर्यटण केलें होतें, त्यांत हिंदुस्थानहि होता. ते तीन वेळां मक्केची यात्रा करून आले. अखेरीस त्यांचें कार्य इतकें सलूं लागलें कीं इ. स. ९२२मध्यें त्यांना अटक करण्यांत आली.'[२] कबीर, दादू, नानक आदिकरून हिंदी साधुसंतांनीं मुसलमानांच्या सूफीवादाची भाषा स्वीकारली.

इब्न–अल्–अरबी व अब्दुल करीम जिली यांच्या विचारसरणींत आणि इब्न–अल्–फरीद व अब्री सैद इब्न अबुलखैर यांच्या काव्यांत मन्सूरचे सिद्धांत पतकरण्यांत आले. या विचारसरणीचा प्रभाव पुढें हिंदुस्थानसह अनेक दूरदूरच्या देशांवर पडला.

'जिलीला हिंदुधर्माची माहिती होती. त्यानें नमूद केलेल्या दहा धर्मपंथांत ब्राहिमा(ब्रह्मन्)चा अन्तर्भाव झालेला आहे. हिंदु लोक ईश्वराचें स्वयंसिद्ध स्वरूप भजतात, प्रेषिताचा उल्लेख त्यांच्या धर्मांत आढळत नाहीं असें तो लिहितो. हिंदूंचे पवित्र ग्रंथ त्यांना ईश्वरानें नव्हे तर अब्राहामानें (ब्रह्मयानें)

१. ताराचंद्रकृत 'इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम ऑन् इंडियन् कल्चर्', ( इस्लामचा हिंदी संस्कृतीवर झालेला परिणाम ) या ग्रंथांतील डॉ० भगवानदासांचा उतारा, पृ. ६७. २. उक्त ग्रंथ, पृ. ६९–७०.

प्रकट करून दाखवले. हे ग्रंथ पांच होते. पण पांचवा ग्रंथ अति गहन असल्या-कारणानें बहुतेक ब्राह्मणांना त्याचें आकलन होत नसे. ज्यांना तो समजे ते बहुधा मुसलमान होत. जिली म्हणतो पांचवा ग्रंथ म्हणजेच वेदांत असावा. त्यांतल्या अद्वैत सिद्धांतामुळें जिलीला इस्लामपेक्षां तो भिन्न आहे असें भासलें नसावें.'[१] 'सायुज्यता(वस्ल)–मोक्षाच्या (फना)मार्गानें जाऊं पाह-णाऱ्या मुस्लिम साधकाला नेहमींच गुरूची अवश्यकता असते. कारण "ज्याला गुरु नाहीं त्याचा गुरु( इमाम ) सैतान बनतो" अशी म्हण आहे. सूफी पंथांत गुरू(पीर किंवा शेख)ला केंद्रस्थानीं कल्पून त्याच्या सभोंवार सूफी मठसंस्थेची आंखणी केलेली असते. आपल्या मुर्शिद(गुरू)ची मूर्ति मनांत ठेवावी, सतत ध्यानाच्या व चिंतनाच्या योगानें अखेरीस तल्लीन–तदाकार होऊन जावें, चेतनाचेतनाच्या ठिकाणीं त्यालाच पाहावें व अहंका-राचा मुर्शिदच्या ठिकाणीं लय करावा अशी शिकवणूक शिष्याला देण्यांत येत असते. सद्गुरु शिष्याला या गुरु–तादात्म्य–स्थितीपासून पायरीपायरीने अखर ईश्वरैक्याप्रत घेऊन जातो. महंमदांनीं 'स्वतःला ईश्वरार्पण करावें' असें सांगि-तलें; तर 'ईश्वराचा भूलोकांतील प्रतिनिधि जो गुरु त्याला आत्मसमर्पण करावें' असें सूफी पंथानें प्रतिपादिलें.[२]

उत्तर हिंदुस्थानांत हाजी वारिस अली शाह नांवाचे एक सूफी संत होऊन गेले त्यांची कबर बाराबांकी जिल्ह्यांत ( संयुक्त प्रांत ) देवा शरीफ या गांवीं आहे. त्यांचे शिष्यगण आपल्या नांवापुढें 'वारिसी' ही उपाधि लावतात. त्यांच्या शिष्यांची संख्या फार मोठी असल्याचें सांगतात. सूफींची शिकवण हाजीसाहेबांनीं माजक्या पर्शियन् काव्यचरणांत सारांशरूपानें मांडली असून उदाहरणादाखल ते फारसी चरण खालीं देवनागरी लिपींत दिले आहेतः—

१. ताराचंद्रकृत 'इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर्' ( इस्लमचा हिंदी संस्कृतीवर झालेला परिणाम ) या ग्रंथांतील डॉ॰ भगवानदासांचा उतारा, पृ. ७७–७८. २. उक्त ग्रंथ, पृ. ८१.

मन हमीं गो–एं के पीर–ए–मन खुदास्त,
पेश–ए–मुन्किर ईं सखुन गुफ्तन खतास्त;
एक स्वाले में कुनुम ऐ मर्दुमन्,
पास जवाब ऊरा देहुंद ऐ मोमिनन्,
हेझुम अंदर नार चून शुद सोख्ता
रिश्ता अंदर जामे शुद चून दोख्ता
पास वारा हे झाम बागोएं या के तार
रिश्ता रा जामा बागोएं या के तार
चून के पीर–ए–मुन फना फिलाह् शुद
रुफ्त बश्रियत हमा अल्लाह् शुद
पास बे पाये ऊ कुनुम् हरदम सजूद,
वाक्फ करदम दर रहुश जान ओ वजूद
अश्कि अझ जुम्ले आलम बर्तार अस्त
झान के ईन मिल्लत खुदाई अकबर अस्त

याचें भाषांतर असें:—मी म्हणतों कीं पीर हा माझा ईश्वर आहे. अश्रद्ध(मुन्किर) मनुष्याला हें सांगणें चूक आहे. हे मानवा, तुला माझा एकच सवाल आहे. सश्रद्धांनो, त्याचें तुम्ही उत्तर द्या. जेव्हां अग्नीमध्यें इंधन जळतें, पटामध्यें तंतु विणला जातो, तेव्हां त्याला मीं इंधन म्हणावें कीं अग्नि? तंतु म्हणावें कीं पट? त्याचप्रमाणें माझ्या पिराचा ईश्वरांत लय झाला तेव्हां मानव–देह नष्ट झाला—सारेंच ईश्वरमय झालें. म्हणून मी हर क्षणाला त्याच्या चरणांना नमन करतों. त्याच्या मार्गानें जाण्यासाठीं मीं माझें जीवन व माझा देह समर्पण केला आहे. प्रेम ही परमपुरुषाची भक्ति असल्याकारणानें प्रेमाचें मोल विश्वाहून मोठें आहे.

तपस्येची व साधनेची बिकट वाट दाखवण्यासाठीं वाटाड्या गुरु अवश्यक आहे असें सांगणारे किती तरी उल्लेख हिंदु–धर्म–ग्रंथांत आढळतील. गुरुविना प्रगति अशक्यप्राय होय. 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः।

गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः॥' असें नित्याच्या दैनिक स्तोत्रांत म्हटलेलेंच आहे. गुरुप्राप्ति व्हावी व त्यानें आपणास दीक्षा द्यावी असेंच हिंदुमात्राला वाटत असतें. सद्गुरूचा शोध हें तो आपलें कर्तव्य समजतो.

'इतर कोणत्याहि सूफीपंथांत गुरूची जी योग्यता तीच कबीरपंथांतहि असल्याचें दिसतें. "मानवोपासना ईश्वरोपासनेच्या तोडीची आहे" असें ज्याप्रमाणें सूफी मानतात त्याचप्रमाणें कबीरपंथीहि मानतात. कबीर म्हणतात, "गुरूंनाच गोविंद(ईश्वर) मान."

इतकेंच नव्हे तर 'हरि कोपला तर त्यावर कांहीं उपाय सांपडेल; पण गुरु कोपल्यावर कोणाची मात्रा चालणार नाहीं' असेंहि त्यांनीं म्हटलें आहे.

सूफीपंथाप्रमाणेंच कबीरपंथी मानतात कीं, 'गुरुमूर्तीचेंच वास्तविक चिंतन करावयाचें असतें. खरी पूजा गुरुचरणांचीच असते. गुरु–वैखरी हीच भवसागरांतील नौका. तीच तत्त्वतः सत्य असते. तीनहि लोकांत व नवखंडांत गुरूहून श्रेष्ठ कोणी नाहीं.'[१]

'कबीरपंथाप्रमाणेंच नानकपंथांतहि गुरूचें स्थान महत्त्वाचें आहे. जिवाचा शिवाप्रत जाणारा जो प्रवास त्याचा मार्ग दाखवण्यासाठीं गुरु पाहिजेच असें सर्व सूफी लोकांप्रमाणेंच नानकहि प्रतिपादन करी.'[२]

इस्लाम व वेदान्त या दोन्ही दर्शनांचा मनावर गाढ परिणाम झालेले सत्पुरुष म्हणून प्रत्येक उत्तर–हिंदुस्थानी मनुष्यास कबीर व नानक यांची स्मृति होईल. कबीरदासांच्या साक्या व त्यांचीं भक्तिपर पदें असंख्य हिंदु आळवीत असतात आणि हजारों हिंदूंच्या घरांत पूजापाठाच्या प्रसंगीं सकाळ-संध्याकाळ गायिलीं जात असतात.

'अशा प्रकारें कबीरांनीं जगद्धर्माचें दर्शन हिंदुस्थानला घडवलें; ज्याचा आश्रय हिंदु–मुसलमानांना करतां येईल असा मार्ग बनवून दिला. कोणाहि मुसलमानाला वा हिंदूला असल्या धर्माविषयीं आक्षेप घेतां आला नसता.

---

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् ( हिंदी संस्कृतीवर इस्लामचा परिणाम ), पृ. १५८. २. उक्त ग्रंथ, पृ. १५७.

कबीरांच्या कार्याचें हें विधायक अंग होतें. पण त्याचें एक विनाशक अंगहि होतें. पुरातन मार्गावर माजलेलें जंगल तोडल्यावांचून नवीन वाट करणें अशक्यच होतें. म्हणून सत्याचें मुख झांकून टाकणाऱ्या किंवा हिंदुस्थानांतील जमातींना परस्परांपासून वेगळ्या करणाऱ्या साऱ्या बाह्य उपाधींवर कबीरांनीं निर्भयपणें, आवेशानें व प्रखर वाणीनें जोराचा हल्ला चढवला. हिंदु किंवा मुसलमान कोणाचीहि गय त्यांनीं केली नाहीं.

'बुद्धापासून साऱ्या समाजसुधारकांनीं जें सोडून देण्यास साग्रह सांगितलें होतें त्याचा म्हणजे डामडौल, यज्ञ, सिद्धि, पोकळ उपासना, मंत्रपठन, यात्रा, उपवास, मूर्तिपूजा, ब्राह्मणांचें वर्चस्व, जातिभेद, अन्न व स्पर्श यांसंबंधींचे पूर्वग्रह या सगळ्यांचा त्याग करा असें त्यांनीं हिंदूंना सांगितलें. मुसलमानांना पैगंबर व कुराण, मक्केची यात्रा व रोजे, नियमित प्रार्थना, अवलिया व पीर यांची पूजा हीं वर्ज्य करण्याचा त्यांनीं उपदेश केला. 'यच्चयावत् सचेतन सृष्टीविषयीं आदर–बुद्धि ठेवा असें त्यांचें हिंदुमुसलमानांना सांगणें होतें. रक्तपात टाळा असेंहि ते सांगत. जन्म किंवा दर्जा यापासून प्राप्त होणारा मान त्यागा, निवृत्ति व प्रवृत्ति यांचा अतिरेक टाळून जीवन ईश्वरार्पण करा असा उपदेश ते करीत. हिंदुमुसलमान एक आहेत, ते एकाच ईश्वराला भजतात, ते एकाच पित्याचीं लेंकरें आहेत, एकच रक्त त्यांच्या देहांतून वाहत आहे, असें ते पुनः पुनः बजावीत.'[१]

गुरु नानकांची सर्व शिकवणूक म्हणजे दोन्ही धर्मांतील मूलभूत तत्त्वांचा समन्वय आहे ही गोष्ट सर्वांना विदित आहे. 'हिंदुमुसलमानांचें ऐक्य हें गुरु नानकांचें जीवनकार्य होतें. समाज–देहावरील व्रण भरून यावयाचे असतील तर धार्मिक लढे बंद करणें जरूरीचें आहे हें त्यांनीं ओळखलें होतें.'[२] नानकांनीं स्वतःची कधींच गय केली नाहीं; तेव्हां ते इतरांची गय करतील हें शक्यच नव्हतें. बुद्धि निश्चिन, विशद व सदसद्विवेकाविषयीं अत्यंत जागरूक

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् ( हिंदी संकृतीवर इस्लामचा परिणाम ) पृ. १६३–१६५. २. उक्त ग्रंथ, पृ. १६८.

ठेवून त्यांनीं हिंदुधर्माच्या व मुसलमान–धर्माच्या अंधश्रद्धेवर व कर्मकांडावर निष्ठुरपणें घाव घातले आहेत.[१] कबीर जन्मानें मुसलमान होते तर नानक हिंदु होते. परंतु बाह्यात्कारीं भेद व अलिप्तता कायम असतांहि आंतून या दोन धर्मपंथांमध्यें जो समन्वय चालू होता त्याचें फल म्हणजेच हे दोन सत्पुरुष होत.

केवळ तत्त्वज्ञानाच्या व धर्माच्या क्षेत्रांतच तेवढा हा समन्वय चालू होता असें नव्हे. मुस्लिम राजांनीं देवालयांना व मठांना वतनें दिल्याचीं आणि धार्मिक हिंदूंना व पंडितांना जहागिरी बहाल केल्याचीं हवीं तेवढीं उदाहरणें आढळून येतील. उध्वस्त व भ्रष्ट केलेल्या मंदिरांची जशी नांवनिशीवार यादी केलेली आहे तशीच ज्या मंदिरांना व मठांना मुसलमान बादशहांकडून इनामें मिळालेलीं आहेत त्यांची यादी जर एखाद्या विद्वानानें केली तर एक उपयुक्त काम केल्यासारखें होईल.

'सर्वसाधारणपणें हिंदुमुसलमानांत सांस्कृतिक सहकार्य होतच नसे हें जर खरें असतें तर हिंदूंच्या देवस्थानांना व विद्यापीठांना मुसलमान राज्यकर्त्यांकडून आणि मुसलमानांना हिंदु राजांकडून सनदा मिळत गेल्या हें कसें ? आदिलशाही, कुतुबशाही व असफशाही राजवंशांकडून ब्राह्मणांना मिळालेलीं शेंकडों वर्षासनें दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासाचा अभ्यास करणारांना पाहावयास मिळालीं असतील. त्याचप्रमाणें मराठी राज्यकर्त्यांनीं दिल्लीच्या बादशाहीशीं झगडे सुरू झाल्यानंतर देखील मुसलमानांच्या देवस्थानांना इनामें दिल्याचे दाखले आहेत.[२] बहारमधील दोन उदाहरणें मला येथें नमूद करावींशीं वाटतात. लक्षावधि रुपयांचें उत्पन्न असलेल्या बोधगयेच्या महंतांच्या जमीनदारीचा मुख्य भाग दिल्लीच्या महंमदशहाकडून बहाल झालेला आहे. बादशहाच्या फर्मानाप्रमाणें मस्तीपुर तरडीह हें गांव लालगीर महंताला देण्यांत

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन कल्चर् ( हिंदी संस्कृतीवर इस्लामचा परिणाम ), पृ. १७२.

२. अतुलानंद चक्रवर्ती : कॉल् इट् पॉलिटिक्स् !, पृ. ४४.

आलें. हा लालगीर मूळ संस्थापकानंतरचा चौथा पुरुष होता. हिंदुस्थानांतली कदाचित् सर्वांत मोठी जमीनदारी असें जिचें वर्णन करतां येईल त्या दरभंग्याच्या जमीनदारीचा प्रारंभ अकबर बादशहानें प्रस्तुतच्या महाराजांच्या पूर्वजाला त्याची विद्वत्ता व धार्मिक वृत्ति पाहून दिलेल्या इनामापासून झालेला आहे. 'आपल्या हिंदु प्रजाजनांचें शिक्षण वाढावें म्हणून शेरशहानें त्यांना (वक्फ म्ह०) इनामें दिलीं व त्यांची व्यवस्था इच्छेनुसार ठेवण्याची मोकळीक दिली. त्याच्या या धोरणामुळें तो सर्व जातींच्या व धर्मपंथांच्या प्रजाजनांना प्रिय झाला होता.'[१]

डॉ० सय्यद महमूद यांजकडून मिळालेलीं आणखी थोडीं उदाहरणें येथें देतों:—

काश्मीरचा सुलतान झैनुलाब्दिन अनेकवार अमरनाथाच्या व शारदा देवीच्या देवळांत दर्शनाला जात असे; यात्रेकरूंच्या सोयीसाठीं त्यानें तेथें धर्मशाळा वगैरे बांधवल्या होत्या.

१७८०च्या सुमारास हरद्वारवर नजीबाबादच्या पटाणांचा अंमल होता. यात्रेकरूंच्या सोयीसाठीं नबाबानें मोठमोठ्या धर्मशाळा बांधल्या. त्या अजूनहि आहेत आणि हिंदूंच्याच ताब्यांत आहेत.

१५८८मध्यें गुरु अर्जुन देवांनीं अमृतसर येथें एक मोठा तलाव खोदला आणि तेथें उपासनेसाठीं एक मंदिर त्याच वर्षीं बांधण्याचें ठरवलें. मियाँ पीर ऊर्फ बाला पीर या मुसलमान सत्पुरुषाच्या हस्तें हर–मंदिराच्या पायाचा चिरा बसवण्यांत आला. (सरदार उधमसिंग यांच्या 'अमृतसर दरबारचा इतिहास' या ग्रंथांतून.)

अलमगीर बादशहाच्या काळचा सुप्रसिद्ध इतिहासकार बताल्याचा सुजनराय मुनशी यानें आपल्या 'खुलासत–उल–तवारिख' या ग्रंथांत शाह शमसुद्दिन दर्यायी यांची कबर असलेल्या देपालिवाल नांवाच्या खेड्याचा उल्लेख

---

१. ईश्वरी प्रसाद : हिस्टरी ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया (हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाचा इतिहास), पृ. ३३९.

केला आहे. या कबरीच्या दर्शनाला अनेक लोक अजूनहि जातात. सुजनराय लिहितो, "शाह शमसुद्दिनावर हिंदु, मुसलमान, दोघांचीहि मोठी श्रद्धा आहे. पण दीपालि नांवाचा हिंदु भक्तीच्या बाबतींत इतर हिंदुमुसलमानांहून श्रेष्ठ ठरला. शाह दर्यायी यांच्या मृत्यूनंतर हिंदुमुसलमानांच्या संमतीनें दीपालीला पहिला विश्वस्त व कबरेचा देखरेखनवीस नेमण्यांत आलें....कांहीं सालांपूर्वी हिंदु लोकांना काढून टाकावें, ते काफिर आहेत, अशा प्रकारची खटपट मुसलमानांनीं चालवली. पण अलमगिरी सरकारनें त्यांचें म्हणणें मानलें नाहीं. अलमगीर बादशहाच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या वर्षांत हा ग्रंथ लिहिला जात आहे. अद्यापि हिंदूंच्याकडेच या कबरेची देखरेख आहे."

आजच्या घटकेलाहि (दक्षिण) हैद्राबादमधील एका (बुजुर्गाच्या) सत्पुरुषाच्या दर्ग्याचा मुतवल्ली ब्राह्मण कुटुंबांतलाच असतो. त्या दर्ग्याला निझामानें मोठी जहागीर दिलेली असून जनतेकडून त्याला खूप देणग्या मिळत असतात. हिंदु मुतवल्लीला काढून टाकण्याचा मुसलमानांनीं प्रयत्न केला; पण निझामानें त्यांचें चालूं दिलें नाहीं.

हैद्राबादेंतील सीतारामाच्या मंदिराला व माहूर (अदिलाबाद) येथील दुसऱ्या एका मंदिराला निझाम सरकारकडून अजूनहि वर्षासनें चालू आहेत. त्यांचें वार्षिक उत्पन्न ५० ते ६० हजारांपर्यंत आहे. निझामानें नांदेडच्या गुरुद्वाराला दिलेल्या जहागिरीचें उत्पन्न वर्षाकांठीं वीस हजार रुपये आहे.

पर्शियन् भाषेंतल्या कांहीं सनदांचीं अवतरणें देऊं या. पुढील सनद हिजरी सन ११६७मधील असून ती अहमदशाह बहादूर गाझीनें दिलेली आहे:—

"अकबराबाद जिल्ह्यांतील कसबे अचनेरा येथील जमीनदार व शेतकरी यांस जाहीर व्हावें कीं सतरा बिघे महसूल–माफ जमीन "पुण्यार्थ" म्हणून शीतलदास बैरागी यास श्रीठाकुरजींच्या भोग–नैवद्यांसाठीं दिली आहे. या जमिनीच्या उत्पन्नांतून बैरागी यांनीं श्री ठाकुरजींची पूजा–अर्चा इत्यादिकांचा खर्च भागवावयाचा आहे.

अचनेऱ्याच्या बाजाराचे चौधरी यांस विदित व्हावें कीं श्री ठाकुरजी यांच्यासाठीं त्यांनीं वीस भार (मापें) धान्य देण्याचें आहे. उपर्युक्त बैरागी यांस तें अखंड मिळत जावें. तारीख ३ रमझान, ११३१ फसली."

चिंचवड येथील श्रीमोरयाचे प्रख्यात देवस्थानचा खर्च चालवण्यासाठीं शहाबुद्दिन खानानें दिलेल्या जहागिरीच्या सनदेंतील उतारा:—

## कौलनामा

परगणा पुणेंपैकीं चिंचवड गांवाचे मूरत गोसावी यांच्या नांवें, त्यांना कौलनामा हवा आहे अशाबद्दल खान–इ–हिकमत निशाँ नहर खाँ यांनीं कळवल्यावरून असें लिहून देण्यांत येत आहे कीं त्यांनीं आपल्या आप्तेष्टांसमवेत सदरहू गांवांत वास्तव्य करावें आणि जमिनीला बरकत येईल असें वर्तावें. परमश्रेष्ठ अल्लाच्या कृपेनें त्यांच्यावर संकट न येवो ! याविषयीं कौलनाम्याची तारीख १२ झिकाद, १३२६ हिजरी.

अलाहाबादमध्येंहि अशा प्रकारच्या वर्षासनांचीं दोन फर्मानें आढळतात. त्यांपैकीं एक महेश्वरनाथाच्या सुप्रसिद्ध मंदिराच्या पुजाऱ्याला दिलेलें आहे. तें औरंगझेबानें दिलें होतें.

बनारस जिल्ह्यापैकीं मौजे वस्ती गांवचा रहिवासी, जगजीवन यांचा पुत्र गिरधर, हवेली परगण्यांतील महेश्वर गांवचा जदु मिश्र आणि पंडित बलभद्र मिश्र या सर्वांना औरंगझेबाच्या हातचीं वर्षासनें आहेत. हे सर्वजण भिक्षुक होते.

मुलतानमधील तुतलामाईच्या देवळासाठीं कल्याणदास मिश्र याला शंभर रुपयांचें वर्षासन औरंगझेबानें दिलें होतें, तें अद्यापि चालू आहे. (एक्स्ट्रा असिस्टंट् कमिशनर् हुकुमचंद यांनीं लिहिलेला मुलतान जिल्ह्याच्या जमाबंदीचा अहवाल पाहा.)

महाकाल–मंदिरांतील नंदादीपासाठीं उज्जयनीच्या भांडारांतून रोज चार शेर तूप देण्याविषयींचें आज्ञापत्र हि० स० ११५३मध्यें सुलतान महंमद मुराद बक्श यानें दिलें.

सर्वसाधारणपणें असें विधान करतां येईल कीं पुष्कळ मुसलमान बादशहा विद्येचे पुरस्कर्ते होते आणि ते केवळ फारसी व अरबीच नव्हे तर संस्कृत व दुसऱ्या हिंदी वाङ्मयाच्या व हिंदी शास्त्रांच्या अध्ययनाला उत्तेजन देत असत. हिंदुस्थानांतील विद्याभ्यासाची वाढ व्हावी म्हणून त्यांनीं जे जे उपाय योजले त्यांचा येथें नुसता सारांश देणें सुद्धां शक्य नाहीं. "बादशाही आश्रयाखालीं अनेक विषयांवरील संस्कृत पुस्तकांचीं फारसी व अरबी भाषांत भाषांतरें झालीं. स्वतः संस्कृतचा अभ्यास करणारे व तिच्या उत्तेजनासाठीं सढळ हातानें खर्च करणारे अनेक मुसलमान अमीर–उमराव असत. त्यांच्यापैकीं अनेकांनीं स्वतः संस्कृत ग्रंथांचीं फारसी भाषेंत भाषांतरें केलीं, इतरांकडून करवलीं आणि अशा प्रकारें संस्कृत विद्या मुसलमानांना उपलब्ध करून दिली. हिंदु विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत पुष्कळदां संस्कृत ग्रंथांचा समावेश झालेला असे. तात्पर्य, संस्कृत विद्येला सर्व बाजूंनीं उत्तेजन देण्यांत येई"[१] मुसलमानी अमदानींतील हिंदुस्थानच्या शिक्षणाविषयीं डॉ० कझिन्स् लिहितात, "मुसलमान बादशहा व नबाब स्वतःच अभ्यासक बनले आणि आपल्या बौद्धिक व्यासंगांत त्यांनीं हिंदी संस्कृतीचा समावेश करून घेतला. मोंगल चित्रकला ज्याप्रमाणें रजपूत चित्रकलेशीं समरस होऊन गेली त्याचप्रमाणें मुसलमानी वाङ्मय हिंदी वाङ्मयाशीं समरस झालें. हिंदूंचें विदग्ध वाङ्मय फारसीमध्यें भाषांतरित झालें व फारसी संस्कृतीचा प्रभाव हिंदु संस्कृतीवर पडला."[२]

मुसलमानी संत–सत्पुरुषांच्या कबरींत किंवा दर्ग्यांत आजहि मुसलमानांच्या बरोबरीनें हिंदु लोक जमत असतात. अजमीर शरीफ येथील उरुसासाठीं सर्व देशांतून व बहारमधील बहार शरीफ, मनेर शरीफ व फुलवारी शरीफ येथील उरुसांना सगळ्या बहार प्रांतांतून हिंदु जात असतात. मुसलमानी सत्पुरुषांशीं अनेक हिंदूंचे गुरुशिष्यांसारखे संबंध आहेत.

---

१. एस्. एम्. जाफर: एज्युकेशन् इन् मुस्लिम् इंडिया ( मुसलमानी अंमलाखालील हिंदुस्थानांतलें शिक्षण ), पृ. १५.

२. उक्त ग्रंथ, पृ. १५; ७–६–१९३५ च्या 'ईस्टर्न् टाइम्स्'मधून उद्धृत.

मोहरमच्या सणांत हिंदु जनता सामील होत असते ही गोष्ट उत्तर हिंदुस्थानांत सर्वांना ज्ञात आहे. कांहीं वर्षांपूर्वी तर या सणांत भाग घेणाऱ्या हिंदूंची संख्या मुसलमानांपेक्षांहि अधिक असे. हिंदु फक्त मिरवणुकींतच भाग घेत असें नाहीं, मुसलमानांप्रमाणेंच ते आपल्या घरीं मोहरम पाळीत, मोहरमचे दिवस सुतकाचे दिवस मानीत, प्रार्थना करीत, गोड–धोड करीत नसत व विवाह, घरभरणी यांसारखीं शुभ कार्यें मोहरमच्या दिवसांत वर्ज्य मानीत. कित्येक हिंदूचे ताबूत असत आणि हिंदूचे मुलगे पाइक व बहिस्ती बनत व हिरवा पेहराव चढवीत. मोहरमांत लाठी–काठी, पट्टा, फरीगदगा यांतलें कौशल्य दाखवण्याची चढाओढ हिंदुमुसलमानांच्या आखाड्यांमध्यें लागत असे. बहुतेक आखाडे तर हिंदुमुसलमानांचे संमिश्र आखाडेच असत.

मोहरमच्या मिरवणुकी वाद्यें दणदणावीत मशिदींवरून नेल्या तरी कोणी आक्षेप घेत नसे. अलीकडे हिंदूंच्या सवाद्य मिरवणुकी मशिदीवरून गेल्या कीं डोकीं फुटतात, तसे प्रकार पूर्वी होत नसत. हिंदूंच्या मिरवणुकींतील वाद्यवादनाला मुसलमानांच्याकडून कांहीं ठिकाणीं हरकत घेण्यांत येते; पण बहुतेक प्रसंगीं वाजंत्री मुसलमानच असतात ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. त्याचप्रमाणें बकरीदच्या दिवशीं मुसलमानांकडून होणाऱ्या गोवधाला हिंदु हरकत घेतात; पण ती गाय पुष्कळदां हिंदु धन्यानेंच पैशाच्या आशेनें मुसलमानाला समजून उमजून विकलेली असते. मोठमोठ्या शहरांतून व विशेषतः लष्करी हद्दींतून जो गोवध दररोज होत असतो तोहि हिंदु सहन करतात. कायद्यानें गोहत्या बंद केली नसली तरी हिंदूंना राजी राखण्यासाठीं गाय मारूं नये असें आग्रहपूर्वक सांगणाऱ्या बाबरापासून पुढें होऊन गेलेल्या बादशहांचीं किती तरी उदाहरणें आहेत! हिंदु शेजाऱ्यांचीं मनें दुखावूं नयेत म्हणून गोमांस अजीबात वर्ज्य मानणारीं अनेक खानदानी मुसलमान घराणींहि पाहण्यांत येतात. 'ईदच्या दिवशीं गाईचा वध करण्यांत येत नसे असें दिसतें.

कारण, "त्या दिवशीं ऐपत असेल त्यानें बकरें मारावें व आपल्या घरीं सण साजरा करावा" असा परवानगीवजा उल्लेख आढळून येतो.[१]

राजपुत्र नसीरुद्दिन महंमद हुमायून याच्या नांवें जहिरुद्दिन महंमद बादशहा गाझी ( बाबर ) यानें करून ठेवलेलें गुप्त मृत्युपत्र येथें उद्धृत करण्यालायक आहे:—

'पुत्रा ! हिंदुस्थानच्या राज्यांत अनेक भिन्न भिन्न धर्म नांदत आहेत. या राज्याची गादी खुदानें तुला दिली म्हणून त्याची स्तुति गाऊं या. आपल्या अंतःकरणांतील धर्मासंबंधींचे सारे पूर्वग्रह काढून टाकून, प्रत्येक धर्माप्रमाणें न्यायदान करणें हें तुझें कर्तव्यकर्म आहे. गोवध टाळ. त्यायोगानें हिंदी जनतेचीं अन्तःकरणें तूं जिंकून घेशील आणि येथील प्रजाजन राजाशीं एकनिष्ठ राहतील.

'सरकारी आज्ञांचें पालन करणाऱ्या कोणत्याहि जमातींचीं देवळें वगैरे उध्वस्त करूं नको. न्याय असा दे कीं ज्यायोगानें राजावर प्रजा व प्रजेवर राजा प्रसन्न होईल. जुलूम—जबरदस्तीच्या तलवारीपेक्षां उपकारांच्या तलवारीमुळें इस्लामचें कार्य अधिक सिद्धीस जाईल.

'शिया व सुन्नी यांच्यांतील भेदांकडे दुर्लक्ष कर, नाहींपेक्षां इस्लामचें व्यंग उघडें होईल.

'चतुर्विध धातूंच्या संवादित्वाप्रमाणें (ज्यांच्या एकवाक्यतेनें मनुष्य—देह बनलेला असतो) भिन्न—धर्मीय जमातींचें संवादित्व राज्यांत नांदूं दे. म्हणजे राज्य विविध झगड्यांपासून मुक्त राहील. समन्वयपटु असा जो तैमूर त्याच्या आठवणी तुझ्या डोळ्यांसमोर सदैव राहूं देत, म्हणजे तुला राज्यशासनाचा योग्य बोध होत जाईल. ता. १ जमादिलावल, ९३५ हिजरी.'[२]

---

१. ईश्वरी प्रसाद : ए शॉर्ट् हिस्टरी ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया क्वोटिंग् पेल्सार्ट् ( हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाचा संक्षिप्त इतिहास ), पृ. ७३८ वरील पेल्सार्ट्चा ( ७४व्या पृष्ठावरील ) उतारा.

२. कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजचे प्रमुख, डॉ. बाळकृष्ण, यांच्या संग्रहीं असलेल्या बाबरच्या मृत्युपत्राच्या नकलेचें ३०–५–१९२६च्या 'सर्च्‌लाइट्'-मध्यें प्रसिद्ध झालेलें भाषांतर.

डॉ. सय्यद महमूद यांनीं मला दिलेलीं मुसलमानांच्या सहिष्णुतेचीं उदाहरणेंहि येथें नमूद करण्यास हरकत नाहीं.

फारी सौझा हा सुप्रसिद्ध पोर्तुगीझ इतिहासकार आपल्या 'दख्खनकी हालत' या ग्रंथांत लिहितो, 'हिंदु व मुसलमान एकमेकांकडे नोकरीस राहत आणि मुसलमान राजे हिंदूंची वरिष्ठ जागांवर नेमणूक करीत व त्यांना बहुमानाच्या पदव्या देत. याचा अर्थ असा कीं हिंदूंच्या बाबतींत पंक्तिप्रपंच करण्यांत येत नसे आणि त्यांना आपले धार्मिक आचार व उत्सव बिनविरोध पार पाडतां येत. हिंदूंच्या धार्मिक समजुतींसंबंधीं मुसलमान फार आदरभाव दर्शवीत.'

'एशियाटिक् स्टडीज्' या पुस्तकाच्या २८९व्या पृष्ठावर सर् आल्फ्रेड् लिआल् लिहितात, 'संबंध हिंदुस्थानला मुसलमान बनवण्याचें तर दूरच राहिलें, मुसलमानी राज्यांतील वरिष्ठ जागा देखील संपूर्णपणें मुसलमानांनीं भरल्या असेंहि कधीं झालें नाहीं.'

औरंगझेबानें शहाजहान बादशहा व त्याचे वजीर यांच्याकडे अनेक कर्तबगार हिंदूंची नेमणुकीसाठीं शिफारस केली होती. उदाहरणार्थ एलिचपूरच्या दिवाणाची जागा रिकामी झाली तेव्हां रामकरण नांवाच्या एका रजपूत अधिकाऱ्याची मोठी जोरदार शिफारस औरंगझेबानें केली होती, पण कांहीं कारण घडून शहाजहाननें ती मान्य केली नाहीं. म्हणून औरंगझेबानें याहून लायक मनुष्य मिळणार नाहीं असें दुसऱ्यांदां लिहून कळवलें. ( रुकआत–अलमगिरी खं. १, पृ. ११४ ) रुकआत अलमगिरी व अदब–इ–अलमगिरी यांमध्यें अशींच अनेक उदाहरणें आढळून येतात.

औरंगझेबानें हिंदूंना बळजबरीनें बाटवलें अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण त्याची मनःप्रवृत्ति दर्शवणाऱ्या एका विलक्षण प्रसंगाचा येथें उल्लेख करावासा वाटतो. शहाजहाननें धांधेऱ्याचा राजा इंद्रामण याला वारंवार केलेल्या आज्ञाभंगाबद्दल अटक केली होती. औरंगझेबाची दख्खनचा सुभेदार म्हणून जेव्हां नेमणूक झाली तेव्हां त्यानें राजा इंद्रामणाची सुटका करण्याविषयीं आग्रहाची शिफारस केली. पण शहानजहानचा इंद्रामणावर येवढा धुस्सा

झालेला होता कीं त्यानें औरंगझेबाची शिफारस फेंटाळून लावून असें लिहलें कीं इंद्रामणानें वारंवार आज्ञाभंग केलेला आहे; तरी पण तो मुसलमान होण्यास कबूल असेल तर त्याला मुक्त करावें. औरंगझेबानें या अटीचा कडक निषेध केला. आणि या अटीची अंमलबजावणी करतां येणार नाहीं, ही अट राजनीतीला सोडून आहे, अदूरदर्शीपणाची आहे आणि राजाला सोडण्यांत येणार असेल तर तें स्वतः राजानेंच पुढें केलेल्या अटींवर सोडण्यांत यावें असें बादशहाला लिहून कळवलें. मुख्य वजीर शाफाउल्लाखान याला औरंगझेबानें या प्रकरणीं लिहिलेलें पत्र अदब–इ–अलमगिरीमध्यें वाचावयास मिळेल.

## २. सामाजिक जीवन—

एकमेकांच्या सामाजिक जीवनांवर हिंदु–मुसलमानांच्या सहवासामुळें जो परिणाम घडून आला तो देखील कांहीं कमी नजरेंत भरण्यासारखा नव्हता. मनुष्याच्या आयुष्यांतले तीन अत्यंत महत्त्वाचे प्रसंग म्हणजे जन्म, विवाह व मृत्यु, तत्संबंधींचे जे संस्कार व उत्सव आहेत त्यांचें उदाहरण पुरावा म्हणून या बाबतींत देतां येईल. बहारमधील मध्यमवर्गीय हिंदु–मुसलमानांत ज्या समान रीतीभाती आहेत त्यांचीं उदाहरणें मी येथें देणार आहें.

जन्माला आलेलें मूल पुरुष असेल तर त्याच्या जन्म–दिवशीं गाणीं म्हणण्याची चाल दोन्ही समाजांत रूढ आहे. त्या गाण्यांना तेथें सोहर असें म्हणतात. शेजारीपाजारी स्त्रिया एकत्र जमून गाणीं म्हणतात व सोहळा करतात. बाळंतिणीच्या खोलीच्या दाराशीं विस्तव पेटत ठेवतात आणि लोखंडाचा तुकडा, 'मुथि आसिज' जातीचा निवडुंग व आणखी कांहीं वस्तु भुतेंखेतें दूर राहावीं म्हणून दाराशीं ठेवण्यांत येतात. जन्मानंतर सहाव्या दिवशीं बाळबाळंतिणीला विधिपूर्वक स्नान घालतात. या समारंभाला 'छठी' म्हणजे सहाव्या दिवसाचा समारंभ म्हणतात. बाळंतीण लेंकराला मांडीवर घेते आणि आकाशाकडे पाहून तारे मोजते. विसाव्या दिवसाचे व पन्नासाव्या दिवसाचे अनुक्रमें 'बिस्तौरी' व 'छीला' असे दुसरे समारंभ आहेतच. बाळंतपणानंतर सहाव्या दिवसापर्यंत बाळंतीण अशुद्ध आहे असें मानतात आणि इतरांच्या

अन्नाला तिला स्पर्श करूं देत नाहींत, भुताखेतांची व अन्नाला स्पर्श न करण्याची कल्पना सनातन मुसलमान धर्माला अपरिचित अशी आहे. तोच प्रकार बाळंतपणानंतर ठराविक दिवशीं स्नान घालण्याच्या विधीच्या बाबतींतहि आहे. पण या चाली रूढ झालेल्या असून मुसलमानांच्या घरांतहि त्या पाळण्यांत येतात.

मुलाला जन्मतः जें जावळ असतें तें काढून टाकण्याच्या संस्काराला देखील हिंदूंत व मुसलमानांत बरेंच महत्त्व प्राप्त झालेलें आहे. हिंदूंत त्याला 'मुंडन' म्हणतात व मुसलमानांत 'अकिका' म्हणतात. दोन्ही समाजांत आढळून येणाऱ्या या संस्कारांतील सारखेपणा लक्षांत घेण्यासारखा आहे.

अगदीं कायदेशीरपणानें पाहूं गेलें तर इस्लामी धर्माप्रमाणें विवाह हा करार मानलेला आहे. वधू व वर पत्नी व पति म्हणून नांदण्याचें ठरवितात. इतर कोणत्याहि कराराप्रमाणें या वैवाहिक करारासाठीं साक्षीदार लागतात व करार पूर्ण होण्याकरतां शुल्क द्यावें लागतें. हा करार मोडतां येतो; पण इतर करारांप्रमाणेंच तो मोडल्याबद्दल नुकसान-भरपाई द्यावी लागते. नुकसान-भरपाईची रक्कम विवाहाच्या वेळींच मुक्रर करण्यांत येत असली तरी विवाह-करार मोडेपर्यंत भरपाई स्थगित ठेवण्यांत येत असते. विवाहाचा मुख्य विधि म्हणजे 'निकाह्'. उभय पक्षांची मान्यता साक्षीदारासमोर मिळाली कीं थोड्याच मिनिटांत हा विधि संपतो. विवाहाच्या निमित्तानें जो समारंभ होतो त्याला 'शादी' म्हणतात. हिंदु-समाजांतील विवाह हा करार नसून तो धर्मसंस्कार असल्याकारणानें तो शास्त्रार्थाच्या दृष्टीनें अविच्छेद्य असतो. विवाहाचे वेळीं प्रतिज्ञा करतात ती धार्मिक प्रतिज्ञा असते. साक्षीदार केवळ मानवी नसतात. सूर्य, चंद्र, अग्नि, आपोदेवता इत्यादि चराचर सृष्टीचीं प्रतीकें साक्षी असतात. युगान्तीं मानवाचा आत्मा ब्रह्मांत लीन होईपर्यंत विनाश न पावणारे असे हे साक्षीदार आहेत. यथासांग केल्यास हिंदु-विवाह-विधीला बराच वेळ लागतो. या वर्णनावरून हें स्पष्ट होतें कीं या दोन समाजांतील विवाह-विधींत मूलतःच फरक आहे. पण व्यवहारांत काय घडतें तें पाहिल्यास असें दिसून

येतें कीं शास्त्रविहित संस्काराचा जो भाग तो हिंदु–मुसलमान आपापल्या धर्मानुसार उरकीत असले तरी त्याला जोडलेला उत्सवाचा जो भाग आहे त्याला बऱ्याच प्रमाणांत सारखेपणा आलेला आहे. डामडौल व मिरवणुकी, जेवणावळी व हौस–मौज, स्त्रियांचीं गाणीं, अहेर, उखाणे–पाखाणे, रुसणीं–फुगणीं हीं सर्व सारखींच आहेत. इस्लामनें डामडौल निषिद्ध मानलेला आहे. हिंदु–धर्म तत्संबंधीं तटस्थ आहे. तथापि आजकाल विवाह–समारंभ म्हटला कीं दोन्ही समाजांत ज्या गोष्टी घडतात त्यांतला फरक दाखविणें कठिण जाईल.

विवाह–समारंभाचें तपशीलवार वर्णन थोडेसें मनोरंजक वाटेल.

बहारमधील मुसलमानांत विवाहाच्या निमित्तानें जे आचार–धर्म पाळण्यांत येतात त्यांच्यावर हिंदु–आचारांची खूपच छाप पडलेली आहे. मुसलमानी विवाहविधींतला 'निकाह्' हा मुख्य विधि असतो हें वर सांगितलेंच आहे. पुष्कळदां निक्याला जोडूनच 'शादी' म्हणजे विवाहोत्सवाचा कार्यक्रम उरकण्यांत येतो. पण कधीं कधीं शादी व निकाह् निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या स्थळीं होतात. शादीसाठीं नवरदेवाचा पक्ष आपल्या सामाजिक प्रतिष्ठेला व संपत्तीला शोभेल अशा डामडौलानिशीं वधूपक्षाच्या निवासस्थानाकडे जातो. पण त्यांच्यासाठीं जानोशाची व्यवस्था वेगळ्या घरांत किंवा पुष्कळ वेळां तंबूंत केलेली असते. विवाहदिनाच्या आधीं कांहीं दिवस वराच्या व वधूच्या घरीं कांहीं विधि करण्यांत येत असतात. 'रात–जागा' म्हणून एक विधि असतो. त्यासाठीं बायका–मंडळी रात्रभर जागून एक प्रकारचें पक्वान्न रांधतात. एक दिवस आंतील अंगणांत मांडव उभारण्यांत येतो; त्या वेळीं करण्यांत येणाऱ्या विधीला 'मांडवा' म्हणतात. आणखी एका दिवशीं 'कंडूरी'चा विधि करतात. त्या दिवशीं अन्न शिजवून तें पितरांच्या नांवानें वांटून टाकण्यांत येतें. हें अन्न फक्त सय्यद घराण्यांतल्या बायकांनींच सेवन करावें अशी वहिवाट आहे. मग ठरलेल्या दिवशीं वरात निघते व वर वधू–गृहीं जातो. विवाहापूर्वीं कांहीं दिवस नवऱ्यामुलीला 'मायुन' किंवा 'माजा' पाळावा लागतो. त्या काळांत ती घराबाहेर पडत नाहीं. घरांत देखील कुटुंबांतील कांहीं निवडक

बायकाच तिची गांठ-भेट घेऊं शकतात. तिच्या अंगाला दररोज 'उबटन' लावतात. आणि विवाहाच्या दिवशींच ती घर सोडून बाहेर येते.

हिंदु-समाजांत हा 'मांडवा' ऊर्फ 'मंडप'-विधि लग्नाआधीं दोन दिवस शुभ मुहूर्त पाहून साजरा करतात. मुलीला हळद लावतात तो विधि फार महत्त्वाचा मानण्यांत येतो. मुलीला दोनदां लग्न-हळद लागत नाहीं अशी म्हण आहे. याचा अर्थ असा कीं मुलीचा पुनः विवाह होणें शक्य नसतें. हिंदूंमध्येंहि मुलीला कांहीं दिवस एकीकडे ठेवतात आणि तिला स्नान घालीत नाहींत. लग्नापूर्वी एकदोन दिवस तिला समारंभानें स्नान घालण्यांत येतें. हिंदु-मुसलमानांच्या वरातीचा नोकझोक एकसारखाच असतो.

बहारमधील हिंदूंमध्यें अशी प्रथा आहे कीं मिरवणूक वधू-गृहीं पोंचली कीं वधूच्या घरांतल्या स्त्रिया वराच्या अंगावर पाणी शिंपडतात, मस्तकावर तांदूळ टाकतात, कपाळाला कुंकमतिलक लावतात व त्याला ओंवाळून त्याचें स्वागत करतात. मुलीचा बापहि त्याचें समारंभपूर्वक आदरातिथ्य करतो व त्याला अहेर देतो. इतर पाहुण्यांचें स्वागत करून त्यांना साखरपाणी देण्यांत येतें. तेथून वरपक्ष आपल्या जानोशाकडे जातो. त्याला 'परिचावन' म्हणतात. नंतर कांहीं वेळानें वधूपक्षीय मंडळी कांहीं बायका-मंडळींसह खाद्य-पेयें घेऊन वरपक्षाकडे जातात व त्यांना जेवणाचें निमंत्रण करतात. वराकडील वडीलधाऱ्या व्यक्ती अहेर करतात, त्याला 'धुर्चाक' म्हणतात.

त्यानंतर कांहीं वेळानें वरपक्ष वधूगृहीं जातो. वधू मंडपांत बसलेली असते. वराचा थोरला भाऊ तिला पोषाख, दागदागिने, मेवामिठाई व उटणें, अत्तरें वगैरेंनीं भरलेली खास घाटाची करंडी देतो. याच वेळीं फक्त वराच्या थोरल्या भावानें वधूला स्पर्श करावयाचा असतो व त्यानें तिचें मुखावलोकन करावयाचें असतें. त्याला 'कन्या-निरीक्षण' म्हणतात. त्यानंतर ऐन लग्नविधि होतो. वराला व वधूला मंडपांत एकत्र आणतात. देव-पूजन उरकल्यानंतर वधूचे आईबाप विधिपूर्वक कन्यादान करतात. उभय पक्षांचें जवळचें गणगोत त्या वेळीं उपस्थित असतें. बहारमध्यें पडद्याची चाल कडक आहे; म्हणून

लग्नविधीच्या वेळीं वधू—पक्षाच्या स्त्रिया उपस्थित असल्याकारणानें वरपक्षाकडील लग्नविधींत प्रत्यक्ष भाग घेणारा उपाध्याय व इतर कांहीं नातलग यांच्या व्यतिरिक्त कोणाहि पुरुषाला हजर राहतां येत नाहीं. तेथें उपस्थित असलेल्यांच्या साक्षीनें लग्न लागतें. सूर्यचंद्रादिक ईश्वराच्या विभूतींना साक्षी म्हणून आवाहन करण्यांत येतें. नंतर लाजा—होम होतो. अग्नीला प्रदक्षिणा करून वरानें वधूच्या कपाळीं कुंकुम चर्चिलें कीं लग्नविधि समाप्त होतो. त्याला ‘सिंदूर—दान’ म्हणतात.

मुसलमानांमध्यें ‘बारी’ म्हणून समारंभ आहे. त्या वेळीं वरपक्ष आपल्या जानोशांतून कापडचोपड, तेल, मेवामिठाई इत्यादि घेऊन वाजत गाजत वधू—गृहीं जातो. मिरवणुकीच्या अग्रभागीं ‘सोहागपुडा’ नेतात. त्यांत हुबेहूब हिंदूंच्या प्रमाणेंच मेवामिठाई, कापडचोपड वगैरे जिनसा असतात. वधूपक्षाला ते जिन्नस मिळाले कीं ते आपल्या वतीनें वरपक्षाला कपड्यालत्त्यांचा अहेर करतात, त्याला ‘खिल्लत’ म्हणतात. ते कपडे नवरा—मुलगा अंगांत घालतो. निकाह् आधींच झालेला नसेल तर तो या वेळीं उरकून घेतात. हिंदु लोकांत वधूच्या कपाळाला कुंकुम लावतात त्याप्रमाणें मुसलमानांत वधूच्या कपाळीं चंदन लावतात, त्याला ‘मांगभरी’ म्हणतात. त्या वेळीं प्रसंगोचित अशीं काव्यें व गाणीं म्हणण्यांत येतात. हिंदूंमध्येंहि धुर्वाक व कन्या—निरीक्षण या प्रसंगीं कविता व गाणीं म्हणण्याची प्रथा आहे. तरुण वर्ग व पंडित यांच्यामध्यें कधीं गंभीरपणें तर कधीं विनोदानें चर्चाहि होते. लग्नाच्या हरएक विधीच्या वेळीं हिंदूंत काय किंवा मुसलमानांत काय स्त्रिया प्रसंगाला साजेशीं गाणीं गातात. त्यांचे विषय व चाली सारख्याच असल्याचें आढळतें.

एका दिवसाच्या वास्तव्यानंतर वरपक्ष वधूच्या घरून परततो. दुसऱ्या दिवशीं नवऱ्या मुलाला पुनः मंडपांत आणतात आणि तेथें कांहीं विधि करण्यांत येतात. त्यांना धार्मिक महत्त्व कांहीं नसतें. हिंदूंमध्यें नवऱ्या मुलाला ‘उबटन’ लावतात तें तो अहेर मिळाल्याशिवाय लावूं देत नाहीं. संध्याकाळीं नायका नवऱ्या मुलाला घेऊन नवरीच्या खोलीवर नेतात आणि ‘कोह-

बार' म्हणून एक विधि करतात वरपक्षाची मंडळी परतण्यापूर्वी 'मुँह–देखी'-चा विधि उरकतात. अखेरीला 'बिदाई'चा म्हणजे 'निरोपा'चा समारंभ होतो. मुसलमानांमध्यें देखील नवऱ्या मुलाला मांडवांत घेऊन जातात व तेथें 'रू–नुमाई'चा (मुख–दर्शनाचा) समारंभ करण्यांत येतो. त्या वेळीं वर व वधू एकमेकांचे चेहरे आरशांत पाहतात. उभयतां वधूवर वराच्या घरीं जावयास निघतात, तेव्हां वराला अहेर करण्याची चाल हिंदु–मुसलमान दोघांतहि आहे.

वराच्या घरापाशीं नवरी मुलगी येऊन पोंचल्यावर नवऱ्या मुलाच्या बहि-णीचा नवरा वाहन थांबवतो व देणगी (अहेर) मिळाल्याशिवाय गृहप्रवेश करूं देत नाहीं. हिंदु–समाजांतहि मेव्हण्याचा अडथळा दूर करण्यासाठीं असाच अहेर करतात.

अशा प्रकारें हिंदु–मुसलमानांच्या चालीरीतींत खूप साम्य आहे. मुसल-मानी धर्माला त्यांतली एकहि मान्य नाहीं इतकेंच नव्हे तर त्यांतल्या कांहीं चालीरीती सनातनी व कर्मठ मुसलमानांना धर्मविरुद्ध वाटतील अश्या असू-नहि त्या चालू आहेत हें विशेष.

हिंदुधर्माला लग्न–विच्छेद मान्य नाहीं. एकदां झालेला लग्नसंबंध आमर-णच टिकतो असें नव्हे तर मृत्यूनंतरहि त्याचा विच्छेद करतां येत नाहीं. अर्थात्च हिंदुधर्माप्रमाणें विधवेला पुनर्विवाहाची मोकळीक नाहीं. इस्लामला पुनर्विवाह अमान्य नाहीं. खरें म्हणजे विधवा–विवाहाला खुद्द पैगंबरांची मान्यता मिळालेली होती. कारण खुद्द त्यांनींच विधवांशीं विवाह केले होते. तरीहि हिंदूंच्या रीतीभातींचा मुसलमानांवर येवढा प्रभाव पडलेला आहे कीं उत्तर–हिंदुस्थानांत तरी निदान विधवा–विवाह धार्मिक किंवा सामाजिक दृष्ट्या निषिद्ध ठरलेला नसतांहि खानदानी मुसलमान घराण्यांत असे विवाह प्रशस्त मानण्यांत येत नाहींत.

मनुष्य मेल्यानंतर जे विधि करण्यांत येतात ते हिंदु–मुसलमान आपापल्या धर्मानुसार करतात. मुसलमानांमध्यें दफनापूर्वी प्रार्थना करतात व दफन झाल्यावर पुनः प्रार्थना करतात. तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशीं, तसेंच दहाव्या

व चाळीसाव्या दिवशीं गरिबांना मृताच्या प्रीत्यर्थ अन्नसंतर्पण करतात. इस्लामी धर्मानुसार हे विधि विहित आहेत किंवा कसें तें मला ठाऊक नाहीं; पण त्यांचें हिंदु-विधींशीं पुष्कळसें साम्य आहे हें निःसंशय.

हिंदूंमधील जातिव्यवस्थेचाहि परिणाम हिंदी मुसलमानांवर झाल्याशिवाय राहिलेला नाहीं. सय्यद, शेख, पठाण, मलिक, मोमिन, मन्सूर, रायीन, कसाब, राकी, हज्जाम, धोबी यांसारखीं मुसलमानांतील भेददर्शक किती तरी जातींचीं नांवें सांगतां येतील. त्यांपैकीं कांहीं व्यवसायांवरून निर्माण झालेल्या आहेत तर कांहीं जन्मावरून व वंशावरून बनलेल्या आहेत. जी गोष्ट विधवा-विवाहाची तीच पोटजातींतील लग्नसंबंधांची. एका पोटजातीच्या व्यक्तीनें दुसऱ्या पोट-जातीच्या व्यक्तीशी विवाह करणें सामाजिक किंवा धार्मिक दृष्ट्या निषिद्ध ठरवलेलें नसलें तरी बहुतकरून असे संबंध पोटजातींतल्या पोटजातींतच होतात. मुसल-मानांशीं ज्यांचा घनिष्ट संबंध येतो त्यांना ही गोष्ट उमजून येते कीं हिंदू-तल्याप्रमाणेंच मुसलमानांमधील पोटजातींमध्येंहि एक प्रकारची अलिप्तपणाची व अस्मितेची भावना विकसित झालेली आहे. एकच उदाहरण दिलें तरी पुरे. बंगालमध्यें जेवढी प्रतिष्ठा हिंदु भंग्याला हिंदु-समाजांत असते, तेवढीच प्रतिष्ठा मुसलमान भंग्याला मुसलमान-समाजांत असते. इस्लामला हे जातिभेद मंजूर आहेत असें मुळींच नाहीं; पण हा परिस्थितीचा प्रभाव आहे. आणि त्याच्यावर मात करणें हिंदुस्थानांतील मुसलमानांना शक्य झालेलें नाहीं.

येथें हेंहि नमूद करून ठेवलें पाहिजे कीं बाटवलेल्या हिंदूंचे मोठमोठे गट मुसलमानांत आलेले आहेत, त्यांनीं हिंदु-समाजांतील अनेक चालीरीती धर्मान्तरानंतरहि आपल्याबरोबर आणल्या असून त्या इतक्या वर्षांनंतर अद्यापिहि चालू आहेत. मलकाना रजपुतांचेंच उदाहरण घ्या ना ! हिंदु असतांना ते जे आचारधर्म पाळीत ते अजूनहि त्यांच्यामध्यें रूढ आहेत. असे आणखीहि अनेक दुसरे गट आहेत कीं जे आपल्या पूर्वरूढींना अद्यापि चिकटून आहेत.

कित्येक मुसलमानांच्या पोट-जातींनीं इस्लामचे स्वतंत्र कायदे असून सुद्धां

धर्मांतरापूर्वीचे आपले वारसाहक्काचे कायदे अगदीं आतां–आतांपर्यंत कायम ठेवले होते, ही गोष्ट लोकविश्रुतच आहे. खोजा, कच्छीमेमन व बोहरी या सिंध, गुजराथ आणि मुंबई येथील धनाढ्य मुसलमान जमाती आहेत. हिंदुस्थानांतच नव्हे तर दक्षिण व पूर्व आफ्रिका, अरबस्थान, इराण, मलाया. इत्यादि अनेक देशांबरोबर त्यांचे व्यापारी संबंध आहेत. १९३७ सालापर्यंत त्यांपैकीं कित्येकांनीं हिंदु रीतिरिवाज कायम ठेवले होते इतकेंच काय पण वारसा–कायदाहि ते हिंदूंचाच पाळीत असत. बलुची व पंजाबी मुसलमान देखील आपआपले रूढ कायदेच पाळतात. मोपल्यांमध्यें स्थानिक 'मुरुम क्कथयम्' कायदा प्रचलित आहे. १९३७ सालापासून मात्र या मूसलमानांना स्थानिक रूढी कांहींहि असली तरी शरियत् कायदा लागू करावा असें कायद्यानें ठरवण्यांत आलें.

मुसलमानांबरोबर अन्नोदक घेण्यास हिंदु कधींहि तयार नसतात ही गोष्ट सत्यच आहे. पण सर्व हिंदु परस्परांच्या पंक्तीला बसतात असें तरी कोठें आहे ? ब्राह्मण रजपुताबरोबर सहभोजन करीत नाहीं आणि रजपूत बनियाच्या अगर कायस्थाच्या पंक्तीला बसत नाहीं. ब्राह्मणांत देखील शाकद्वीपी ब्राह्मण शरयूपारी ब्राह्मणाबरोबर व दक्षिणी ब्राह्मण बंगाली किंवा मैथिली ब्राह्मणाबरोबर अन्नोदक–व्यवहार करीत नाहीं. या जातीपातींच्या भूलभुलय्यांत एकादा अहिंदु शिरूं पाहील तर तो गोंधळून गेल्याशिवाय राहणार नाहीं. जातीप्रमाणें व पोटजातीप्रमाणेंच हे फरक केलेले आहेत असेंहि नाहीं. अन्नांचे प्रकार व अन्न शिजवण्याचे प्रकार यांच्यावरूनहि स्पर्शास्पर्श मानण्यांत येतो. बहारमध्यें इतर जातीच्या माणसाच्या हातची पक्की म्हणजे तळलेली रसोई निषिद्ध मानीत नाहींत, पण ती केवळ भाजून बनवलेली असेल तर निषिद्ध मानतात. बंगालमध्यें तसें नाहीं. कांहीं भाज्यांत मीठ घातलेलें असेल तर त्या निषिद्ध, पण मीठ घातलेलें नसेल तर त्या निषिद्ध नाहींत! जो जन्मतः या वातावरणांत वाढलेला नाहीं त्याला हे भेद व आचार उमजणार नाहींत व त्यांचा तात्त्विक आधार काय हें तर त्याहून उमजणार नाहीं. बरें या भेदामुळें परस्परां-

विषयीं कटु भावना निर्माण होतात असेंहि नाहीं. भेदाभेद साहजिक आहेत असेंच मानण्यांत येतें. अर्थात् मीं वर्णन केलेल्या या सर्व चाली-रीती सर्वसामान्य हिंदु लोकांतच रूढ आहेत. आधुनिक शिक्षण ज्यांना मिळालेलें आहे किंवा ब्रह्म—समाजाच्या वा आर्य—समाजाच्या सुधारकी मतांची छाप ज्यांच्यावर पडलेली आहे, अथवा महात्मा गांधींचा समभाव ज्यांना पटलेला आहे अशांविषयीं मी बोलत नाहीं. अशा सुशिक्षित व सुधारक हिंदूंनीं वरील प्रकारच्या भावनांचा पुष्कळ अंशीं त्याग केलेला असून दुसरे कित्येकजण असे आहेत कीं व्यवहारांत हे आचार ते पाळीत असले तरी त्यांच्या बुद्धीला ते पटत नाहींत आणि त्यांचें समर्थनहि ते करीत नाहींत.

ज्या मुसलमानांचा हिंदूंशीं निकट संबंध आलेला आहे आणि ज्यांना हिंदूंच्या जातपातीचा परिचय झालेला आहे त्यांना हे भेदाभेद समजूं शकतात. त्यांत तुच्छताबुद्धीचा कांहींहि संबंध नसून ते भेद परंपरेनें चालत आलेले असल्याकारणानेंच त्यांचा स्वीकार करण्यांत आलेला आहे ही गोष्ट मुसलमान जाणून असल्याकारणानें ते ती गोष्ट जिवाला लावून घेत नाहींत. त्यामुळें हिंदूंच्या लग्न, अपत्य—जन्म इत्यादि सोहळ्यांत मुसलमान मंडळींना निमंत्रण असलें तर ते खुल्या दिलानें भाग घेतात व आपल्या घरच्या समारंभासाठीं हिंदूंनाहि निमंत्रण करतात. अन्नोदकाच्या भेदामुळें त्यांच्या परस्पर—स्नेहसंबंधांत अंतर पडलेलें नाहीं. आपले जातिधर्म न सोडतां हिंदु आपल्या मुसलमान मेहमानांना जेवणावळ करतो आणि हिंदूंच्या भक्ष्याभक्ष्याच्या चालींत ढवळाढवळ न करतां मुसलमान हिंदु पाहुण्यांना खाना देतात. अर्थात् हें माझें लिहिणें देखील सर्वसामान्य साध्यासुध्या हिंदुमुसलमानांसंबंधींचें आहे. जातपातीच्या समर्थनासाठीं किंवा तदंतर्गत दोष झांकण्याच्या हेतूनें मीं हें लिहिलेलें नाहीं. वस्तुस्थिति काय आहे ती सांगितली; पण आतां काळ बदल-लेला असून त्याबरोबरच माणसांची दृष्टि व वृत्ति या देखील पालटल्या आहेत. लिहिण्याचा मतलब असा कीं उत्तरोत्तर हिंदुमुसलमानांपैकीं अधिकाधिक मंड-ळींना हे भेद जाचक वाटूं लागलेले असल्याकारणानें शक्य तितक्या जाति-

भेदांचें शक्य तितक्या तांतडीनें उच्चाटन करणें इष्टच ठरत असलें तरी दोन समाजांमध्यें सलोखा, स्नेह व बंधुभावना नांदण्याच्या मार्गामध्यें गत काळीं किंवा चालू काळांत अडथळे निर्माण करणाऱ्या गोष्टी म्हणून त्यांना अवास्तव महत्त्व देणें वाजवी ठरणार नाहीं.

हिंदुस्थानांतील बहुतेक प्रांतांत हिंदुमुसलमानांची संमिश्र वस्ती असलेलींच खेडीं आढळून येतात, मग तो प्रांत बहुसंख्य मुसलमान वस्तीचा असो किंवा बहुसंख्य हिंदु वस्तीचा असो. अशा खेड्यांतून खराखुरा स्नेहभाव वा शेजार-धर्म दिसून येतो. हिंदु मनुष्य आपल्या मुसलमान शेजाऱ्याला तद्वत्‌च मुसल-मान आपल्या हिंदु शेजाऱ्याला निःसंकोचपणें 'भाई', 'चचा' किंवा 'काका' म्हणतो. दोन्ही समाजांत सामान्य अशीं नांवें देखील आढळून येतात. कनिष्ठ वर्गांत तर हा प्रकार सर्रास दिसून येतो. हिंदूंचीं नांवें मुसलमानांनीं व मुसल-मानांचीं नांवें हिंदूंनीं जशींच्या तशींच किंवा थोडाफार फरक करून घेतलेलीं आहेत. हा प्रकार व्यवसाय–निदर्शक आडनांवांच्या किंवा पदव्या, किताब वगैरें-च्या बाबतींतच तेवढा आहे असें नव्हे तर व्यक्तींच्या विशिष्ट नांवांच्या बाबतीं-तहि आहे.

जुनें ग्रामीण जीवन आतां हळूहळू लयास जात आहे. पण मी स्वतः बहार-मधील एका खेड्यांत जन्मलों व वाढलों असून माझा खेड्याबरोबरच्या संबं-धाचा धागा अद्यापि देखील तुटलेला नाहीं. त्यामुळें माझ्या तरुणपणीं खेड्या-मध्यें जें सर्वसामान्य जीवन दिसून येई त्याचें वर्णन आत्मविश्वासानें करणें मला शक्य आहे. तें जीवन अजूनहि सर्वस्वीं नष्ट झालेलें नाहीं. प्रत्येक खेडें बहु-तेक बाबतींत जवळजवळ स्वयंपूर्णच असे. खेड्याची जमीन तेथलेच लोक कसीत. जरूर तो कारागिरांचा सच खेड्यामध्येंच असे. निरनिराळ्या पेशाचे व दर्जाचे रहिवासीहि असत. नमुन्यादाखल एखादें खेडें घेतलें तर त्यांत शेत-मालक व शेतमजूर, जमीनदार व ब्राह्मण असत. बहुतेक खेड्यांतून हिंदु-मुसलमानांची वस्ती असे. हरएक खेड्यांत सुतार व लोहार, न्हावी व धोबी, कुंभार व कासार, भडभुंजा व तेली, तद्वत्‌च मेहेतर किंवा भंगी, चांभार आणि

डोंब यांचींहि घरें असत. खेडेगांवच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्यें यांपैकीं प्रत्येकाचा उपयोग असे व त्याच्या कामाबद्दल त्याला वस्तुरूपानें मोबदला देण्यांत येई. मूल जन्मलें, घरांत लग्न निघालें अगर मृत्यु झाला, कीं या व्यवसायी लोकांपैकीं कोणा ना कोणाला तरी तत्संबंधीं होणाऱ्या विधीमध्यें कांहीं ना कांहीं कामें उरकावीं लागत आणि घराण्याच्या इतमामाप्रमाणें त्यांना त्या कामगिरीबद्दल बक्षिसी किंवा मेहनताना देण्यांत येई. या पेशावाल्यांपैकीं कोणी मुसलमान असत; पण तेहि ठराविक कामें पार पाडीत व त्यांना ठरलेल्या दरानें मेहनताना देण्यांत येई. हिंदूंच्या अनेक समारंभांत न्हाव्याकडे महत्त्वाची कामगिरी असते. चूडाकरणांत, लग्नसमारंभांत, तद्वत्च मर्तिकाबाबत होणाऱ्या विधींत न्हाव्याची गरज असते. अनेक खेड्यांतून हिंदु न्हावी नसतो. अशा ठिकाणीं अन्नोदक वाढण्याचें काम वगळून बाकीचीं सारीं कामें हिंदु न्हाव्याप्रमाणेंच मुसलमान न्हावी करतो. मुसलमान न्हाव्याकडून हीं कामें करून घेण्यांत हिंदूंना कांहीं दोष वाटत नाहीं. आणि ही धार्मिक स्वरूपाचीं पण कदाचित् इस्लामी धर्माला अमान्य अशीं कामें करण्याला मुसलमान न्हावीहि नकार देत नाहीं. पति जिवंत असणाऱ्या हिंदु बाईच्या हातांत चुडे असलेच पाहिजेत. लग्नादिक शुभ प्रसंगीं जेव्हां नवे चुडे भरतात तेव्हां किंवा एरवींच्या प्रसंगीं बांगड्या पुरवणारे लोक हटकून मुसलमान असतात आणि ज्या सधन हिंदु कुटुंबांमध्यें पडदा कडकपणें पाळण्यांत येतो त्यांच्या राणीवशांत मुसलमान कासारांच्या बायकांचें येणेंजाणें असतें. तसेंच धोबी किंवा भंगी पुष्कळदां मुसलमान असतो. तरीहि तो समारंभांतलें आपलें काम विनाकसूर पार पाडतो. आणखी एक अशीच जात आहे, ती म्हणजे माळ्यांची. समारंभाच्या वेळींच नव्हे तर हर तऱ्हेच्या धार्मिक उत्सवाचे वेळीं व रोजच्या पूजेसाठीं फुलें पुरवण्याचें काम त्याच्याकडे असतें. हिंदु असो किंवा मुसलमान असो, माळी देखील आपली कामगिरी नीट बजावतो. माळी मुसलमान आहे तेव्हां त्याच्या हातचीं फुलें देवाला कशीं वाहावीं अशी शंका हिंदु माणसाच्या मनांत येणार नाहीं किंवा मंदिरांतल्या मूर्तीच्या पूजेसाठीं किंवा अन्य एकाद्या धार्मिक

विधीसाठीं आपण फुलें कशीं द्यावीं असा प्रश्न मुसलमान माळयाच्या मनांत उद्भवणार नाहीं. हे सारे व्यवहार आज शेंकडों वर्षे चालू आहेत. दोन समाजांतील घनिष्ट संबंधापासूनच ते निर्माण झाले असले पाहिजेत.

**पोषाख—**

पोषाखाच्या बाबतींत इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां स्थानिक हवामानाचा परिणाम सर्वांत अधिक होत असतो. त्यामुळें हिंदुस्थानमध्यें प्रांतानिहाय व पोषाख करणाऱ्याचे ऐपतीनुसार पोषाखाच्या भिन्नभिन्न तऱ्हा आढळून आल्यास नवल नाहीं. समाजांतील कनिष्ठवर्गीय लोकांच्या व गरीब लोकांच्या पोषाखांत फारसे भेद नसतात. त्याचप्रमाणें समाजांतील वरिष्ठवर्गीय लोकांच्या कपडयालत्यांतहि विशेष फरक नसतो. गरीब लोक व सधन मंडळी यांच्या पोषाखांत मात्र खूपच तफावत असते. पंडित मोतीलाल नेहरू, सर तेज बहादुर सप्रू, डॉ० सच्चिदानंद सिंह, पंडित जवाहरलाल नेहरू, बहार प्रांतिक हिंदु—महासभेचे अध्यक्ष कुमार गंगानाद सिंह, मुस्लिम लीगचे पुढारी नबाब महंमद इस्माईल किंवा चौधरी खलिकुझ्झमन् इतकेंच काय पण खुद्द कय्द–इ–अझम जिना यांच्या पोषाखांतले भेद एकाद्या परदेशीय मनुष्याच्या ध्यानांत सहजासहजीं येणार नाहींत. त्याचप्रमाणें सरदार शार्दूलसिंग कवीश्वर व सरदार मंगलसिंग या शिखांच्या पोषाखांत आणि मौलाना झाफर अली व मौलाना अबुल कलम आझाद यांच्या पोषाखांत फरक आहे असें त्याला भासणार नाहीं. शिखांचें शिरस्त्राण वेगळें दिसेल येवढेंच काय तें. बहार, बंगाल, संयुक्त प्रांत किंवा पंजाब या प्रांतांतील एकाद्या खेड्यांत मुसलमान शेतकरी आपल्या शेतांत राबत असतात तेथें जर एकादा परदेशी मनुष्य जाईल तर हिंदु शेतकऱ्यापेक्षां वेगळा पोषाख मुसलमान शेतकऱ्यानें केलेला आहे असें त्याला दिसणार नाहीं. फेझ टोपी मीं विचारांत घेतलेली नाहीं. कारण ती हिंदुस्थानी चीज नाहीं. शिवाय तिचा प्रघात नुकताच पडलेला असून तुर्कस्तानचें अनुकरण म्हणून कांहीं मुसलमान, विशेषेंकरून सुशिक्षित मुसलमान, ती वापरूं लागले आहेत. तिकडे तुर्की लोकांनीं मात्र फेझ टोपी वापरणें सोडून दिलें आहे.

कांहीं ठिकाणीं हिंदूंच्यापेक्षां मुसलमानांत पायजमे वापरण्याचा प्रघात अधिक प्रमाणांत दिसून येतो. त्यामुळें तेथील मुसलमानांचा तो विशिष्ट पोषाख आहे असें म्हणतां येईल. परंतु पायजमे वापरणाऱ्या हिंदूंची संख्याहि थोडीथोडकी नाहीं आणि मुसलमानांपैकीं फार मोठी संख्या पायजमे वापरणारी आहे असेंहि नाहीं. धोतर हा शब्दच संस्कृतोद्भव असून तो खास हिंदूंचा आहे; पण हिंदुस्थानांतील हजारों मुसलमान तें या ना त्या प्रकारें वापरीत असतात. शहरांखेड्यांतील मुसलमान जनतेचा—विशेषेंकरून खेड्यांतील मुसलमान जनतेचा ज्यांना परिचय आहे त्यांना ही गोष्ट सत्य असल्याची सहज खात्री पटेल.

साजशृंगाराच्या वस्तु तर पडद्याच्या आडकाठीला न जुमानतां पार जनान्यापर्यंत पोंचल्या आहेत. स्त्रियांचे अनेक अलंकार हिंदु–मुसलमानांत सारखेच दिसून येतात. त्यांचीं नांवें हिंदूंच्या अगर मुसलमानांच्या भाषेंतून आलेलीं असून तीं हिंदु–मुसलमान–स्त्रियांच्या तोंडीं बसलेलीं आहेत. त्याचप्रमाणें साडी हा सगळ्या हिंदुस्थानांतील स्त्रियांचा वेष बनला आहे. हिंदुस्थानच्या वायव्य भागांत जेथें स्त्रिया तुमानी घालतात तेथें मुसलमान बायकाच नव्हे तर शिख व हिंदु बायका देखील तुमान वापरतात. डोंगराळ मुलुखांत थंडी फार असल्याकारणानें सर्वच लोकांत तुमानींचा प्रचार आहे.

**पडदा—**

हरएक परदेशी माणसाला विलक्षण वाटेल अशी हिंदुस्थानांत जर कोणती चाल असेल तर ती पडद्याची चाल. पडद्यालाच कांहीं ठिकाणीं गोषा असें म्हणण्यांत येतें. ही खास इस्लामी रूढि आहे. पण हिंदुस्थानांत तिचें एक स्वतंत्र तंत्रच बनलें आहे. इस्लामी शरियतप्रमाणें मुसलमानांच्या स्त्रियांना घराबाहेर जाण्याची मनाई नाहीं, मात्र त्यांनीं आपल्या इतर अवयवांप्रमाणें चेहराहि बुरख्याआड झांकून घेतला पाहिजे असें मला सांगण्यांत आलें. हिंदुस्थानमध्यें मुसलमानी स्त्रियांना सर्वसाधारणपणें घराबाहेर जाऊं देण्यांत येत नाहीं. अर्थात् ज्यांना घरीं बसून राहण्याची ऐपत आहे अशांच्या बाबतींतच हें शक्य होतें. गरिबांना तशी ऐपत नसल्याकारणानें त्यांना अनेक कामांसाठीं घराबाहेर पडावेंच लागतें.

हिंदूंच्या रूढीला पडदा मुळींच मान्य नाहीं. निःसंकोचपणें वावरणाऱ्या आणि स्त्रियांना भाग घेतां येण्यासारखीं जीं जीं कामें आहेत त्या त्या कामांत पुरुषांना साथ देणाऱ्या स्त्रियांसंबंधींचे उल्लेख संस्कृत वाङ्मयांत भरपूर आढळतात. पडद्याचा जो रिवाज हिंदूंमध्यें आढळतो तो सर्वस्वीं मुसलमानांपासून उचललेला आहे आणि मुसलमानांचा वरचष्मा जेथें विशेष जाणवला तेथें पडद्याचा नियम विशेष कडकपणें अंमलांत आणण्यांत आला असें दिसतें. ही चाल दक्षिण हिंदुस्थानांत रूढ नाहीं. कारण तेथें मुसलमानांचें वर्चस्व उत्तर हिंदुस्थानांतल्याइतकें खोलवर रुजलेलें नाहीं. तेथें ज्यांनीं मुसलमानी राज्यकर्त्यांचें अनुकरण केलें, अशा समाजांतल्या कांहीं वर्णांतच तेवढी ही चाल शिरली. सध्यां पडदा टाकून देण्याची चळवळ मुसलमानांच्यापेक्षां हिंदु-समाजांत अधिक यशस्वी होत आहे याचें कारण असें कीं मुसलमानी धर्मांत पडद्याच्या चालीचें जसें समर्थन केलेलें आहे तसें हिंदुधर्मांत केलेलें नाहीं.

येथवरच्या विवेचनावरून दिसून येईल कीं या दोन समाजांचे परस्परांवर बरेच संस्कार झालेले आहेत आणि दोघांचे धर्म भिन्न असल्यामुळें त्यांच्या सामाजिक रीतीभातींना जरी निःसंशय वेगवेगळें व पृथक् वळण मिळालेलें असलें तरी ते दोन समाज शांततेनें व एकदिलानें एकत्र राहत आले आहेत. तथापि ते एकरूप मात्र कधींच झाले नाहींत. एक दुसऱ्यांत पार मिसळून गेला असेंहि घडलें नाहीं. तसा प्रकार अपेक्षितहि नव्हता. कारण इस्लाम हा परदेशांत उदित झालेला आणि आपल्या अनुयायांच्या जीवनाला शिस्त लावून तें नियंत्रित करणाऱ्या व अगदीं वेगळ्या पार्श्वभूमीवर आधारलेल्या संपूर्ण अनुशासनानें युक्त असा धर्म होता. येवढी एक गोष्ट लक्षांत घेतली तरी देखील इस्लामनें हिंदुधर्माला पचवून टाकणें किंवा स्वतःच हिंदुधर्माशीं एक-रूप होऊन जाणें इस्लामच्या बाबतींत सर्वस्वीं अशक्य न मानलें तरी किती दुष्कर होतें हें समजून येईल. हिंदु वाङ्मय, वेदांत व धर्म हीं अत्यंत विक-सित असून कोट्यवधि लोकांच्या आदरास पात्र झालेलीं आहेत. कालांतरानें हिंदी भूमीवर जे जें भिन्न धर्मपंथ निपजले ते ते हिंदुधर्मानें आत्मसात् करून टाकले

आहेत. हिंदुधर्माच्या बुद्धधर्माशीं असलेल्या संबंधाविषयीं बोलतांना प्रोफेसर् न्हिस् डेव्हिड्स् म्हणतात, 'जगांत आतांपर्यंत कधीं आढळून आलें नसेल असें विचारांचे व भाषणाचें स्वातंत्र्य हिंदुधर्मानें दिलेलें आहे !'[१] स्वातंत्र्याची ही परंपरा वेदोपनिषदांच्या काळापासून चालत आलेली असून निरनिराळे मतपंथ व दर्शनें येथें कशीं निर्माण होत गेलीं असतील त्याची संगति ह्या परंपरेवरून लावतां येते. हिंदुधर्मीय व्यक्तीनें स्वीकारलाच पाहिजे असा एकादा मंत्र दाखवतां येत नाहीं याचें कारण हेंच. तथापि वैयक्तिक व सामाजिक जीवनाच्या कांहीं यमनियमांविषयीं हिंदुधर्माचा आग्रह आहे. पण हे नियम स्थलकालानुसार बदलत आलेले आहेत. समाज–सुधारणेसाठीं हिंदुधर्मांत त्यामुळें हवी तेवढी सवड मिळत गेलेली आहे. अंगच्या या लवचीकपणामुळेंच बदलत्या परिस्थितीशीं जमवून घेणें हिंदूंना शक्य झालें असून सदृश तत्त्वज्ञान व दीर्घ धार्मिक परंपरा नसलेल्या अनेक समाजांना आपणांत समरस करून टाकतां आलें आहे. सामाजिक लवचीकपणा व विचार–स्वातंत्र्य या गुणांच्या जोरावर हिंदुसमाजानें आपल्यांतूनच निघालेल्या भिन्न मतपंथांना आत्मसात् केलें इतकेंच नव्हे तर बुद्धासारख्या भिन्न मतांच्या प्रणेत्यांना देवतापद देण्यासहि मागेंपुढें पाहिलें नाहीं. बुद्धाचा धिक्कार करणारीं वचनें हिंदूंच्या ग्रंथांतून काढून दाखवतां येतील, नाहीं असें नाहीं. असें असलें तरीहि बुद्धाला दशावतारांतील एक अवतार मानण्यांत आलेलें आहे. बुद्धासंबंधींच्या धोरणांत हा जो विरोध दिसतो तो दोन दर्शनें समरस होत असतांना त्या काळीं चालू असलेल्या विचारमंथनाचें प्रतीक आहे. आज अशी स्थिति आहे कीं बुद्धधर्म, म्हणजे त्या धर्माचें तत्त्वज्ञान व नीतिनियम हीं हिंदुधर्मानें इतकीं आत्मसात् करून टाकलीं आहेत कीं बुद्धधर्म म्हणून निराळा असा कांहीं प्रकार हिंदुस्थानांत राहिलेलाच नाहीं. बुद्धधर्म हिंदुधर्माचीच एक शाखा होती आणि त्याच्या तत्त्वज्ञानाची पार्श्वभूमि हिंदु विचारपद्धति व विवेचनपद्धति यांचीच बनलेली होती. त्यामुळें हिंदुधर्मांत तो सहज विलीन

---

१. न्हिस् डेव्हिड्स् : बुद्धिस्ट् इंडिया (बुद्धधर्मीय हिंदुस्थान), पृ. २५८.

झाला. पण ज्या देशांत येथल्याप्रमाणें अनुकूल परिस्थिति नव्हती तेथें स्वतंत्र धर्म–मत म्हणून त्याचा विस्तार झाला. असो. हिंदुधर्माची परंपरा ही अशा प्रकारची असल्याकारणानें हिंदुधर्मानें इस्लाम आत्मसात् केला नाहीं; त्याला आत्मसात् करणें हिंदुधर्माला शक्य झालें नाहीं यांत नवल नाहीं. पण ते शेजारीं शेजारीं राहिले व विकसले ही गोष्ट उभय समाजांच्या कल्याणाचीच झाली असें माझें मत आहे. त्यांच्या दीर्घ सहजीवनांमधील जुने विसरलेले प्रसंग पुनः उकरून काढून हे दोन समाज भिन्न होते असें सिद्ध करीत बसणें हिताचें नाहीं असें मला निश्चितपणें वाटतें. कारण त्यामुळें वैमनस्य व शत्रुत्वच निर्माण होतील. उलट दोन्ही समाज शेंकडों वर्षे गोडीगुलाबीनें व सलोख्यानें एकत्र नांदले असून भविष्य काळांतहि एकमेकांना सोडून राहणें त्यांना शक्य नाहीं ही गोष्ट ओळखून त्याप्रमाणें वागण्यांतच कल्याण आहे, इतकेंच नव्हे तर तसें वागणें आपल्या प्रतिष्ठेला पोषकहि आहे.

अखेरीस दोघां इतिहासाचार्यांच्या ग्रंथांतील उतारे देऊन मी हा प्रकरण-विभाग संपवणार आहें. त्यांपैकीं एक डॉ० ताराचंद हे हिंदु आहेत. त्यांच्या ग्रंथांतील अनेक अवतरणें आतांपर्यंत या पुस्तकांत उद्धृत केलेलींच आहेत. दुसरे आचार्य सलाहुद्दिन खोदाबक्ष हे मुसलमान असून ते कलकत्ता–विद्यापीठांत कायदा व इस्लामी इतिहास या विषयांचे प्राध्यापक आहेत.

डॉ० ताराचंद लिहितात, 'हिंदी लोकांच्या जीवनाच्या अंगोपांगांवर मुसलमानांचा जो प्रभाव पडला त्याचें पुरेसें वर्णन करणें कठिण आहे. तथापि चालीरीती, घरगुती जीवनांतल्या नाजूक गोष्टी, गायन, वेषभूषा, पाकसिद्धि, लग्नसमारंभ, उत्सव व यात्रा आणि मराठे, रजपूत व शीख यांच्या दरबारांतील मानपान व शिष्टाचार, या सर्वांवर घडून आलेले मुसलमानी संस्कार जितके ठळक व रंगदार आहेत तितके इतर कोठेंच आढळणार नाहींत. बाबरच्या काळच्या हिंदुस्थानांतील हिंदुमुसलमानांची राहणी व त्यांचे विचार इतके सारखे होते कीं त्यांचें विशिष्ट "हिंदुस्थानी" वळण बाबराच्याहि लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. ही परंपरा–संपत्ति बाबराच्या वंशजांनीं इतकी

उज्ज्वल व विपुल–वैभवान्वित केली कीं आपल्या देहावसानानंतर त्यांनीं मागें ठेवलेल्या त्या संस्कृति–धनाचा आजहि तुम्हांआम्हांला अभिमान वाटावा.'[१]

आचार्य सल्लाहुद्दिन लिहितात, 'आर्यन् लोकांहून सेमेटिक् वंशाचे लोक जितके भिन्न तितकेच मुसलमान हे हिंदूंच्याहून भिन्न आहेत असें आम्हांस सदोदित सांगण्यांत येत असतें. त्यांच्यामध्यें मूलगामी भेद आहेत, त्यांच्या संबयी, त्यांच्या प्रकृति, त्यांच्या सामाजिक रीतीभाती, वंश, लक्षणें या सगळ्यांत भेद असून ते इतके जिव्हाळ्याचे व इतके विस्तृत आहेत कीं या दोन समाजांचा एकोपा घडून येणें ही केवळ असंभाव्य घटना आहे, निव्वळ अव्यवहार्य स्वप्न आहे असें कोणी म्हणतात. परंतु हा युक्तिवाद निर्दोष आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. मुसलमान परकीय जेते म्हणून हिंदुस्थानांत आले आणि ब्रिटिश् आम्हां हिंदुमुसलमानांच्या विषयीं जसे आज बेपर्वा आहेत तसेच त्या वेळीं मुसलमानहि हिंदूंविषयीं पूर्णपणें बेपर्वा होते ही गोष्ट मान्य केली तरी आज शेंकडों वर्षे ते शेजारी म्हणून राहिले आहेत, देशांतील रहिवाशांशीं मनमोकळेपणें ते मिसळत आहेत, त्यामुळें साहजिकच परस्परांवर परिणाम घडून आलेला आहे, हिंदी स्त्रियांना पत्नी म्हणून त्यांनीं स्वीकारलें आहे, स्थानिक आचार–विचार उचलले आहेत, होतां होतां अखेरीस स्थानिक स्वभाव–विशेष व स्थानिक वैशिष्ट्यें त्यांच्या रोमरोमांत पुरीं भिनून गेलेलीं आहेत या गोष्टी आपणांला विसरतां येणार नाहींत. याचें निर्विवाद प्रत्यंतर आपणांला लग्न–समारंभामध्यें दिसून येतें. कारण हा समारंभ संपूर्णपणें हिंदूंचाच समारंभ आहे. त्या वेळीं स्त्रिया अहेवपणाचें प्रतीक म्हणून जो कुंकवाचा टिळा लावतात, विधवांच्या वेषासंबंधीं व अन्नासंबंधीं मुसलमानांत जे नियम पाळण्यांत येतात, विधवाविवाह मुसलमानांकडून जे अप्रशस्तच नव्हे तर निषिद्ध मानण्यांत येतात, सारांश मुसलमानी झनान्यांत जे शेंकडों बारीकसारीक आचार रूढ झालेले दिसून येतात, त्यांवरून याबद्दलचा पुरावा मिळतो.

---

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् ( इस्लामचा हिंदी संस्कृतीवर झालेला परिणाम ), पृ. १४१–१४२.

हिंदुस्थानांतल्या या दोन प्रमुख समाज–विभागांमध्यें केवळ वरकरणी संबंधांपेक्षां गाढ संबंध होते असेंच यावरून प्रत्ययास येतें. याहून स्पष्ट पुरावा एक भाषा व वेषसाम्य यांवरून मिळतो. आणि कोणीं कांहींहि म्हटलें तरी मुसलमानांपैकीं बहुसंख्य लोक हिंदूंचेच मुसलमान बनले आहेत. हिंदुत्व व इस्लाम यांचा परस्परांवर परिणाम घडून आलेला आहे, सामाजिक चालींवर त्यांचे संस्कार उमटलेले आहेत, धार्मिक विचार त्यांच्या विशिष्ट छटांनीं रंजित झालेले आहेत, हीं विधानें केवळ मनःपूत कल्पना नसून त्यांना सुनिश्चित वस्तुस्थितीचा आधार आहे.'[१]

आमच्या सामाजिक जीवनाच्या ज्या अतिमनोज्ञ व अतिपेलव पटांत या अतिरम्य ताण्याबाण्याचे तंतु असंख्य हिंदुमुसलमान स्त्री–पुरुषांच्या बुद्धिपुरःसर प्रयत्नांमुळें अथवा सहजगत्या झालेल्या त्यांच्या व्यवहारांमुळें शेंकडों वर्षांच्या काळांत विणले गेलेले आहेत, त्याच्या, आडमुठ्या राजकारणाच्या अविवेकी व निष्ठुर आघातांनीं, चिंध्या चिंध्या होणार कीं काय?

**३. भाषा—**

उत्तर हिंदुस्थानांत सांप्रत जी भाषा बोलण्यांत येते व लोकांना समजते ती हिंदुमुसलमानांच्या सहप्रयत्नांचें फळ आहे असें जरी न मानलें तरी तिच्यावर दोन्ही समाजांची छाप उमटलेली आहे हें निःसंशय. तिचा उगम संस्कृतपासून आणि सामान्य जनांच्या व्यवहारांतून संस्कृत भाषेचा लोप झाल्यानंतर प्रचलित झालेल्या संस्कृतोद्भव प्राकृत व पाली भाषांपासून झाला हें निश्चित. मुसलमान आक्रमकांच्या भाषा त्यांच्या जमातींनुसार वेगवेगळ्या असत. अरबी व पर्शिअन् भाषांपैकीं ज्या कोणत्या भाषेचा प्रभाव त्यांच्या जमातीच्या बोलीवर अधिक पडला असेल तीवर या आक्रमकांच्या भाषेचें स्वरूप अवलंबून असे. मुसलमानी राजवटींत पर्शियन् ही दरबारी भाषा बनली आणि तिचा अभ्यास हिंदूंतील वरिष्ठ–वर्गीयांकडून, विशेषतः राजकाजाशीं

१. डॉ० सच्चिदानंद सिंह : सम् एमिनंट् बिहार् कॉंटेंपररीज् (कांहीं प्रख्यात समकालीन बिहारी) या पुस्तकांतील उतारा, पृष्ठें १८५–१८६.

ज्यांचा निकट संबंध येत असे अशा लोकांकडून होऊं लागला. पण ती जनतेची भाषा कधींच बनली नाहीं; व तसें होणें शक्यहि नव्हतें. हिंदुस्थानांतील बहुसंख्य मुसलमान जन्मानें हिंदु असल्यामुळें पर्शियन् भाषा मुसलमानी जनतेची भाषा बनणें त्या काळीं देखील संभवनीय नव्हतें. म्हणून मुसलमान राज्यकर्ते व हिंदु—मुसलमान प्रजाजन यांच्यांतील व्यवहारासाठीं उपयुक्त होईल अश्या एका भाषेची जरुरी होती. त्यामुळें दोघांचेहि हात लागून ही नवी भाषा बनूं लागली. अमीर खुश्रूच्या वेळींच तिची इतकी वाढ झाली होती कीं त्यानें काव्यरचनेसाठीं तिचा उपयोग केला. खुश्रूचें काव्य अजूनहि लोकप्रिय आहे. उर्दू व हिंदी या दोन वेगळ्या भाषा मानण्यांत आल्या तरी दोन्ही भाषांचे अभिमानी हें कबूल करतातच कीं दोन्ही भाषांच्या वाढीस व समृद्धीस हिंदूंनीं तसाच मुसलमानांनीं हातभार लावलेला आहे. धार्मिक स्फूर्तीसाठीं हिंदु संस्कृतकडे व मुसलमान अरबीकडे व पर्शियन्कडे वळत. त्यामुळें त्या भाषांतले शब्द ते साहजिकच उचलीत; पण येथील भाषेची घडण कायम ठेवण्याची मात्र दक्षता घेण्यांत येई. घडण हाच भाषेचा देह. तो उत्तर हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या भाषेचीं हिंदी व उर्दू हीं जीं दोन स्वरूपें त्यांत सारखाच असल्याचें दिसून येतें. त्या भाषांच्या शब्दसंग्रहांत मात्र भेद दिसून येतो. म्हणून, उत्तर हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोक आपल्या शिक्षणानुसार किंवा वळणानुसार लिहितांना संस्कृत किंवा अरबी व पर्शियन् भाषांतल्या शब्दांचा कमीअधिक प्रमाणांत उपयोग करीत असले तरी त्या भागांत हिंदु—मुसलमान जनतेकडून बोलली जाणारी व तिला समजणारी अशी एकच भाषा प्रचलित आहे असें ठरतें. पण जिला हिंदुमुसलमानांचें सामान्य धन असें म्हणतां येईल अश्या या भाषेच्या बाबतींतहि आतां झगडे सुरू व्हावे ही दुर्दैवाची गोष्ट समजली पाहिजे.

हिंदी भाषेच्या व वाङ्मयाच्या विकासाला अगदीं अमीर खुश्रूच्या वेळेपासून आतांपावेतों मुसलमानांनीं किती मोलाचें सहाय्य केलेलें आहे तें हिंदीच्या कैवाऱ्यांना विसरतां येणार नाहीं किंवा त्याच्याकडे त्यांना काणा-

डोळाहि करतां येणार नाहीं. पंडित रामनरेश त्रिपाठी यांनीं 'कविता–कौमुदी'चा जो खंड संकलित केलेला आहे त्यांतल्या मुसलमानांनीं केलेल्या कवनांच्या वेंच्यांकडे नुसती नजर टाकली तरी वरील म्हणण्याचा प्रत्यय येईल. हिंदी लेखक जिला हिंदी भाषा असें म्हणतात तिचाच उपयोग मुसलमान कवींनीं या कवितांत केलेला आढळतो, इतकेंच नाहीं तर त्यांनीं केलेली भक्तिपर पदेंहि त्यांत असून त्या कवितांचे विषयहि हिंदुधर्मापैकींच आहेत. हिंदूंच्या वाङ्मयांतला बराचसा भाग सीतारामांच्या व राधाकृष्णांच्या पदांनीं भरलेला असतो. गोरखपुरच्या गीता–प्रेसतर्फे प्रसिद्ध झालेल्या एका छोट्याशा खंडांत फक्त मुसलमानांनींच रचलेलीं भक्तिपर कवनें संकलित केलेलीं असून तीं वाचलीं असतां कोणत्याहि भक्ताला आनंद झाल्यावांचून व स्फूर्ति वाटल्यावांचून राहणार नाहीं. गिरिधराच्या 'सवाया' त्याच्या चातुर्य व विनोद या गुणांमुळें उत्तर हिंदुस्थानमध्यें जश्या घरोघर ऐकूं येतात, त्याचप्रमाणें रहिमानाच्या दोह्यांचीहि स्थिति आहे. उपनिषदांची व वेदान्ताची उच्च शिकवण आणि त्यांचें तत्त्वज्ञान दुष्प्राप्य ठिकाणीं होतें तेथून तें खेड्यापाड्यांतल्या सामान्य माणसाच्या पातळीवर आणून ठेवणारा तत्त्ववेत्ता भक्त म्हणून कबीराचें नांव यापूर्वींच येऊन गेलेलें आहे. योग्यांच्या गहन गिरिकंदरांतील एकांतवासांतून वेदान्ताला बाहेर काढून कबीरानें त्याला शेतकऱ्यांच्या खेड्यांत व खोपटांत नेऊन पोंचविलें. तुलसीदासांनीं उत्तर हिंदुस्थानांत आणि महाप्रभु चैतन्यांनीं बंगाल व ओरिसा या प्रांतांत जसा भक्तिमार्गाचा प्रसार केला तसाच योगविद्येचा व वेदांताचा प्रसार कबीरांनीं उत्तर हिंदुस्थानांत केला.

त्याचप्रमाणें उर्दूमध्यें हिंदूंनीं जी भर टाकलेली आहे ती कोण नाकबूल करील? किंवा उर्दू भाषा व वाङ्मय यांचे जे भोक्ते व भक्त आहेत त्यांत बरेचसे हिंदु आहेत हें कोण अमान्य करील? म्हणून भाषेचा प्रश्न उपस्थित करून हिंदुमुसलमानांत वादंग निर्माण करूं पाहणें हें केवळ ऐतिहासिक घटनेच्याच नव्हे तर रोजच्या आयुष्यांतील अनुभवाच्याहि विरुद्ध आहे.

परंतु हिंदी व उर्दू भाषाच तेवढ्या मुसलमानी राज्यकर्त्यांच्या ऋणी आहेत

असें नव्हे. प्रांतिक भाषांच्या वाढीला देखील मुसलमान राज्यकर्त्यांकडून कांहीं थोडीथोडकी मदत व उत्तेजन मिळालेलें नाहीं. उत्तरेस हिंदीला, पश्चिमेकडे मराठीला व पूर्वेकडे बंगालीला वाङ्मयीन भाषांचा जो गौरव प्राप्त झाला त्या गौरवाचे हिंदु व मुसलमान दोघेहि वांटेकरी आहेत. मुसलमानांनीं आपल्या तुर्की व पर्शियन् भाषांचा त्याग करून हिंदूंच्या भाषेचा स्वीकार केला. आपल्या शिल्पकलेंत व चित्रकलेंत त्यांनीं ज्याप्रमाणें परिस्थित्यनुरूप फेरफार केले त्याचप्रमाणें आपल्या भाषेंतहि केले; त्यामुळें एका नवीन माध्यमाची निर्मिति झाली. त्याचेंच नांव उर्दू. हिंदुमुसलमानांनीं तिचा स्वीकार-केला आणि मग एक नवीनच घटना घडून आली. एका विशिष्ट वाङ्मय-प्रकारासाठीं हिंदी भाषेचा उपयोग करण्यांत येऊं लागला तर दुसऱ्या एका वाङ्मयप्रकारासाठीं उर्दूचा आश्रय करण्यांत येऊं लागला....हिंदीवर मुस्लिम संस्कृतीचा गाढ परिणाम झालेला असून शब्दसंपत्ति, व्याकरण, दृष्टांत, छंद व शैली यांमध्यें त्याच्या खुणा आढळून येतात. हिंदीप्रमाणेंच मराठी व बंगाली भाषांची आणि विशेषतः पंजाबी व सिंधी भाषांचीहि स्थिति आहे.'[१]

केवळ मुसलमानी विद्येच्याच संवर्धनापुरते बंगालच्या राज्यकर्त्यांचे प्रयत्न मर्यादित नव्हते. आपल्या विद्याभिरुचीला त्यांनीं जी नवीन दिशा लावली ती बंगाली बोलणाऱ्यांच्या दृष्टीनें विशेषच महत्त्वाची आहे. बंगाली रहिवाशांच्या प्रयत्नांमुळें नव्हे तर मुसलमानांच्या प्रयत्नांमुळें बंगाली भाषेला वाङ्मयीन भाषेचें स्थान प्राप्त झालें ही गोष्ट बंगाल्यांना कदाचित् विपरीत वाटेल...... बंगालच्या मुसलमान राज्यकर्त्यांचें लक्ष प्रथम रामायण व महाभारत या पुराण-ग्रंथांनीं वेधून टाकलें आणि त्यांच्या सांगण्यावरून त्या दोन्ही ग्रंथांचीं भाषांतरें त्यांच्या राज्याच्या बोलींत म्हणजेच बंगालींत झालीं. महाभारताचें पहिलें बंगाली भाषांतर बंगालच्या नाझिरशहाच्या आज्ञेवरून करण्यांत आलें ( इ. स. १२८२–१३८५). तो प्रांतिक भाषेचा मोठा अभिमानी होता. आपलें एक गीत

---

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् ( हिंदी संस्कृतीवर इस्लामचा झालेला परिणाम ), पृ. १३९–१४०.

नाझिरशहाला अर्पण करून महाकवि विद्यापतीनें त्याला अमर केलें आहे.... कीर्तिवासाला रामायणाचें बंगाली भाषांतर करण्यास सांगितलें तें बंगालच्या मुसलमान राजानें कीं कंस नारायण या हिंदु राजानें, याबद्दल शंका आहे. परंतु राजा कंस नारायणाच्या आज्ञेवरून भाषांतर झालें असें मानलें तरी त्याच्या अगोदर मुसलमान बादशहांनीं घालून दिलेल्या उदाहरणांचा परिणाम त्याच्यावर झाला असावा हें निर्विवाद आहे....बादशहा हुसेन शहा हा बंगाली भाषेचा मोटा आश्रयदाता होता. त्यानें भागवत पुराण बंगालींत उतरवण्यासाठीं हलधर बसूची नेमणूक केली. हुसेन शहाचा सेनापति परगलखान व त्याचा मुलगा छुतिखान यांचीं नांवें महाभारताच्या एका भागाचे बंगाली भाषांतरकार म्हणून अजरामर झालीं आहेत.'[1]

भाषेच्या प्रश्नाचा विचार जरा निराळ्या दृष्टीनें करावयास हवा. द्विराष्ट्र–वाद्यांना त्यापासून अनुकूल पुरावा मिळत नाहीं. कारण भाषा ही प्रदेशानुसार बदलत जाते; ती समाजानुसार बदलत नाहीं. बंगाली ही बंगालमधील हिंदूंची तशीच मुसलमानांचीहि भाषा आहे; त्याचप्रमाणें गुजराथी गुजराथची व पंजाबी पंजाब प्रांताची भाषा असून पंजाबच्या सीमेपासून पूर्वेकडे बंगालच्या सीमेपर्यंतचा व हिमालयाच्या पायथ्यापासून मध्य व दक्षिण हिंदुस्थानांतल्या मराठी व तेलगू भाषा बोलणाऱ्यांच्या प्रांतसीमांपर्यंतचा जो टापू आहे त्यांत एकच भाषा चालते; मग तिला तुम्ही हिंदी किंवा उर्दू किंवा हिंदुस्थानी म्हणा किंवा आणखी कोणतेंहि नांव द्या. उत्तरेकडील भाषा दक्षिण हिंदुस्थानांतल्या तेलगू, तामीळ, कानडी व मल्याळम् या भाषांहून भिन्न आहेत. उत्तरेकडील भाषांच्या उपभाषा समाजांत प्रचलित असून सामान्य लोक त्यांचाच वापर करतात. पण जेथल्या रहिवाशांची भाषावार विभागणी केली असतां ती धर्मवार केलेल्या विभागणीशीं जुळेल असा एकहि भाग हिंदुस्थानांत नाहीं.

---

१. एन्. एन्. लॉ : प्रमोशन् ऑफ् लर्निंग् इन् इंडिया डयूरिंग् महॉमेडन् रूल् ( मुसलमानी अमदानींत हिंदुस्थानांत झालेली विद्येची वाढ ), पृ. १०७–११०.

आपल्या देशांतील भाषांची विभागणी टापूवार झालेली आहे; ती समाजानुसार किंवा धर्मानुसार झालेली नाहीं. हिंदुस्थानच्या ईशान्य भागांतील हिंदु–मुसलमान रहिवाशांची सामान्य भाषा बंगाली आहे आणि त्या रहिवाशांपैकीं बहुसंख्य मुसलमान आहेत. पंजाबमधल्या हिंदु, शीख व मुसलमान रहिवाशांची भाषा पंजाबी आहे. परिस्थिति ही अशी असल्याकारणानें पाकिस्तानच्या वायव्य विभागांत जे चारपांच टापू समाविष्ट करावे असें म्हणण्यांत येत असतें त्या सर्वांना सामान्य अशी एक भाषा असल्याचें दाखवणें अशक्य झालें आहे. बंगालीहून हिंदी जितकी भिन्न, सिंधी अथवा काश्मिरीहून पुश्तू जितकी भिन्न तितकी तरी निदान पंजाबी भाषा पुश्तूहून, सिंधीहून किंवा बलुचीहून भिन्न आहे. तेव्हां भाषेच्या आधारें राष्ट्रीयत्वाचें प्रमाण बसवावयाचें असेल तर सर्व बंगाली लोकांना, मग ते हिंदु असोत वा मुसलमान असोत, त्यांची भाषा एक असल्यामुळें एकत्रच ठेवावें लागेल हें निश्चित. त्याचप्रमाणें पंजाबी, सिंधी, पठाण व बलुची यांच्या भाषा परस्परांहून भिन्न असल्याकारणानें त्यांना एक राष्ट्र बनवून राहतां येणार नाहीं हेंहि निश्चित.

हिंदुमुसलमानांच्या धार्मिक वाङ्मयाचीं स्फूर्ति–स्थानें अनुक्रमें संस्कृत भाषेंत व अरबी भाषेंत आहेत. तेथूनच त्यांचा उगम होतो. तामीळ किंवा सिंधी बोलणारा हिंदु मनुष्य ज्याप्रमाणें संस्कृत वाङ्मयापासून स्फूर्ति मिळवितो त्याचप्रमाणें बंगाली बोलणारा हिंदुहि त्याच वाङ्मयापासून स्फूर्ति मिळवितो. उलट पंजाबी मुसलमान काय किंवा दक्षिणी अथवा पूर्वदेशीय मुसलमान काय स्फूर्तीसाठीं अरबी वाङ्मयसरितेकडेच वळतो. हिंदूंच्या व मुसलमानांच्या धार्मिक विचारांचीं व ध्येयांचीं स्फूर्ति–स्थानें वेगवेगळीं असून तीं देशाच्या कोणत्याहि प्रांतांतल्या प्रचलित भाषेहून भिन्न अश्या भाषांत ग्रथित झालेलीं आहेत. तथापि दोघांमधील व्यवहाराच्या भाषा मात्र सारख्याच असून कांहीं भागांतल्या या समान भाषा वाङ्मय–दृष्ट्या समृद्धहि आहेत.

हिंदी व उर्दू या दोन पृथक् भाषा असून हिंदी हिंदूंची व उर्दू मुसलमानांची भाषा आहे असें मानल्यास देशाच्या फाळणीमुळें उर्दूवर काय परि-

णाम घडून येईल तें पाहूं. फाळणीनंतर प्रत्येक विभागानें आपल्याला इष्ट वाटेल त्या प्रकारें आपला विकास साधावा, मात्र अल्पसंख्याकांचे भाषा वगैरे विषयांबाबतचे हक्क सुरक्षित राखावे अशी योजना आहे. पण मुसलमान विभागांत मोडणाऱ्या एकाहि प्रांतांतील रहिवाशांची मातृभाषा उर्दू नाहीं. त्यामुळें तेथील रहिवाशांवर ती लादावी तरी लागणार किंवा वायव्य व ईशान्य भागांत तिचें कृत्रिम उपायांनीं भरण–पोषण तरी करावें लागणार. मध्यभागांत तर मुसलमानेतरांचीच बहुसंख्या आहे आणि त्यांची भाषा हिंदी हें तर आपण आरंभींच मान्य करून बसलों आहों. तेव्हां तेथेंहि उर्दूला फार तर अल्पसंख्याकांची भाषा म्हणून संरक्षण मिळेल. अशा परिस्थितींत उर्दूला थोर व गौरवाचें भवितव्य प्राप्त करून घेण्याची आशा कितपत राखतां येईल?

आणि हिंदी व उर्दू या जर खरोखरच सर्वस्वीं भिन्न अश्या भाषा असतील तर त्यांना पृथक्पणें वाढूं द्यावें आणि शुद्ध संस्कृत किंवा शुद्ध पर्शियन् व अरबी शब्द घुसडून बोजड न बनविलेल्या सर्वसामान्य लोकांच्या भाषेला सर्व देशाची भाषा म्हणून विकसित होण्याची संधि देण्यांत यावी.

### ४. कला—

कलांमध्यें अत्यंत महत्त्वाच्या कला म्हणजे स्थापत्य, शिल्प, चित्रलेखन, गायन व नृत्य. मुसलमानांच्या आगमनापूर्वी यांपैकीं प्रत्येक कलेचा संस्कृत व कांहीं प्रांतिक भाषांप्रमाणें या देशांत बराच विकास झालेला होता. त्यामुळें मुसलमानांच्या कलांमध्यें त्या विलीन होऊन जाण्याची अपेक्षाच नव्हती. त्यांनीं मुसलमानांपासून जें जें आत्मसात् करण्यासारखें होतें तें तें आत्मसात् केलें आणि उत्तर हिंदुस्थानांतील भाषेप्रमाणेंच एक नवीन समन्वय साधला. कांहीं बाबतींत तर या कलांनीं इस्लामी संस्कृतीवर आपला प्रभावहि पाडला.

### (अ) स्थापत्य—

हिंदुस्थानच्या इतिहासांतील हिंदूंच्या अथवा बौद्धांच्या वर्चस्वाच्या काळांतल्या स्थापत्यापेक्षां मुसलमानी अमदानींतलें स्थापत्य बऱ्याच निराळ्या प्रका-

रचें होतें. तथापि तें केवळ परदेशी रोप होतें आणि बाहेरून आयात करून येथल्या अपरिचित भूमींत लावण्यांत आलें होतें असें म्हणणें मात्र युक्त होणार नाहीं. ताजमहालाच्या बांधकामाला कुशल हिंदु स्थापत्यविशारदांचा व कलावंतांचा हात देखील लागला नसेल किंवा मुसलमानी राजवटीच्या काळांत उभारण्यांत आलेल्या हिंदूंच्या मंदिरांना मुसलमान कारागिरांचा स्पर्शहि झाला नसेल ही कल्पनाच मनाला पटत नाहीं. उत्तर–हिंदुस्थानांत आजकाल बांधल्या जाणाऱ्या हिंदूंच्या घरांचींच नव्हे तर देवालयांचीं कामें देखील बहुतकरून मुसलमान गवंडी व कारागीरच करतात. मुसलमानी रियासतींत बांधण्यांत आलेल्या इमारतींपैकीं कांहीं विख्यात इमारतींच्या बांधकामांत हिंदूंच्या व मुसलमानांच्या कलांचें मिश्रण दिसून येतें असें कांहीं स्थापत्यविशारदांनींहि म्हटलें आहे.

'मुसलमानांनीं धार्मिक, मुलकी किंवा लष्करी कामांसाठीं ज्या इमारती बांधल्या त्या मुसलमानी–सिरियन्–ईजिप्शियन् पद्धतींच्या किंवा इराणी अथवा मध्य आशियांतल्या पद्धतीच्याहि नव्हत्या. हिंदूंच्या इमारती, देवळें, राजवाडे किंवा समाध्या हीं देखील शुद्ध हिंदु पद्धतीचीं नव्हतीं. मुसलमानी स्थापत्यांतला कडकडीत साधेपणा त्यांमध्यें जरा सौम्य करण्यांत आला होता आणि हिंदूंच्या स्थापत्यांतील अलंकारातिरेकाला जरा नियंत्रण घालण्यांत आलें होतें. कारागिरी, अलंकार–वैपुल्य व एकंदर बांधकामाची तऱ्हा हीं हिंदु पद्धतीचींच राहिलीं. साधे घुमट, घोटीव अंगाच्या भिंती, आंतलीं प्रशस्त दालनें हे प्रकार मुसलमानांकडून स्वीकारण्यांत आले. तेराव्या शतकानंतर जीं जीं बांधकामें झालीं त्यांतील कलागुण सारखेच आहेत, मग तीं मुसलमानांनीं केलेलीं असोत कीं हिंदूंनीं केलेलीं असोत. अर्थात् स्थानिक परंपरा व प्रादेशिक वैशिष्ट्यें यांमुळें बांधणीच्या धाटणींत फरक झालेला आहे आणि ज्या उद्देशांनीं इमारती बांधण्यांत आल्या त्या उद्देशांच्या विविधतेप्रमाणें बांधकामांतहि भिन्नता दिसून येत आहे.

"फर्ग्यूसन यांनीं हिंदी–मुसलमानी बांधकामांचे जे विविध प्रकार कल्पिले

आहेत त्यांपैकीं दिल्ली, अजमीर, आग्रा, गौर, माळवा, गुजराथ, जौनपुर विजापुर येथील अरब, पठाण, तुर्क, पर्शीयन, मोंगल, अथवा हिंदी राज्यकर्त्यांनीं बांधलेल्या माशिदींचे घुमट, कबरी किंवा राजवाडे घ्या, हिंदु देवळांचा आभास उत्पन्न करण्यासाठीं काढलेल्या 'मेहरपी' घ्या, बहुधा हिंदु पद्धतीनें बांधलेल्या कमानी घ्या किंवा अलंकारांत व रचनेंत समाविष्ट असलेला प्रतीकवाद घ्या. या सर्व गोष्टींवरून एकच सत्य प्रतीत होईल, तें हें कीं ज्या अनेक मतपंथांचा समन्वय होऊन हिंदुधर्म बनला आहे त्यांपैकींच मक्केच्या पैगंबराचा एक पंथ आहे आणि आपण सश्रद्ध मुसलमान असलों तरी हिंदुत्व सोडण्याचें आपणांस कारण नाहीं अशीच हिंदी कारागिरांची समजूत होती."[१] हें मत हॅवेल्नें आपल्या प्रबंधांत इतक्या चातुर्यानें सिद्ध केलें आहे कीं त्यासाठीं आणखी पुरावे देत बसण्याचें कारणच नाहीं.'[२] 'अठराव्या शतकांत ही शैली हिंदुस्थानमध्यें सर्वत्र पसरली. दूरचा नेपाळहि तिच्या कक्षेंतून सुटला नाहीं.'[३] ही हिंदु–मुसलमानी शैली हिंदुस्थानांतल्या स्मृतिमंदिरांच्या बांधणीपुरतीच उपयोगांत आली असेंहि नाहीं.[४] घरें, रस्ते, घाट अशांसारख्या नित्योपयोगी स्थापत्यांमध्येंहि तिचा प्रभाव उमटला.'[५] एकाच प्रांतांतील एकाद्या हिंदूचें आणि एकाद्या मुसलमानाचें घर घेतलें तर त्यांच्या आंखणींत किंवा बांधणींत कांहीं तफावत आढळून येणार नाहीं. पण हवामानाच्या फरकामुळें दोन प्रांतांतील घरांच्या बांधणींत मात्र भेद दिसून येईल !

### ( आ ) शिल्प—

हिंदु मंदिरांमध्यें मूर्तींचें महत्त्व विशेष असल्याकारणानें तेथील शिल्पकला परिणतावस्थेला गेलेली होती. मूर्ति व मूर्तिपूजा इस्लामनें निषिद्ध ठरवलेलीं आहेत. त्यामुळें मूर्तिकलेचा विकास इस्लामी देशांत झाला नाहीं. साहजिकच

---

१. हॅवेल् : इंडियन् आर्किटेक्चर् ( हिंदी स्थापत्य ), पृष्ठ १०१.

२. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् ( हिंदी संस्कृतीवर झालेला इस्लामचा परिणाम ) पृ. २४३–२४४. ३. उक्त ग्रंथ, पृ. २५५. ४. उक्त ग्रंथ, पृ. २५६. ५. उक्त ग्रंथ, पृ. २५७.

तिकडील शिल्पकलेचा हिंदी कलेवर कसलाच परिणाम घडून आला नाहीं. 'पर्शियन् राज्यकर्त्यांचें अनुकरण करून हिंदुस्थानच्या बादशहांनीं, त्यांतल्या-त्यांत मोंगल बादशहांनीं, आपल्या इमारती, राजवाडे व क्रीडास्थानें सुशोभित करण्यासाठीं चित्रकारांप्रमाणेंच शिल्पकारांचेंहि सहाय्य घेतलें.'[१]

(इ) चित्रकला—

मनुष्याकृतीचें रेखाटन, संगीत व विशेषतः वाद्यवादन आणि नृत्य हीं इस्लामनें निषिद्ध ठरवलेलीं नसलीं तरी त्यांचा पुरस्कारहि केलेला नाहीं. या विषयाबाबतची इस्लामची भूमिका विरोधाची नसली तरी अनास्थेची असून सुद्धां हिंदुमुसलमानांच्या संगीत—कला व चित्र—कला परस्परांशीं पूर्णपणें समरस बनल्याचें दिसतें. 'हिंदुस्थानांतील पहिल्या मुसलमान राज्यकर्त्यांकडून चित्रकलेला इतर कलांप्रमाणें उत्तेजन मिळालें नाहीं. मूर्तिपूजेशीं तिचा निकटचा संबंध येत असल्याकारणानें इस्लामच्या प्रारंभींच्या काळांत तर ती बहिष्कृतच गणली जात असे. त्यामुळें क्वचित्च एकादा बादशहा किंवा अमीर—उमराव रूढीचें उल्लंघन करून या कलेकडे वळे. परंतु ज्या अनेक हिंदूंनीं धर्मांतर करून मुसलमानी धर्म स्वीकारला होता त्यांच्या पूर्वींच्या आवडीनिवडी सर्वस्वीं सुटल्या नव्हत्या. त्यांना चित्रकला प्रिय होती. त्यामुळें आपणांला वाटते तितकी या कलेची आबाळ तत्कालीन मुसलमानांकडून झाली नसावी. नव्यानेंच मुसलमान बनलेल्या या लोकांनीं व त्यांच्या वंशजांनीं तिचा सांभाळ केला असावा. जे मुसलमान परदेशांतून आले होते व ज्यांच्यावर पर्शियन् संस्कृतीची छाप पडलेली होती त्यांनींहि तितक्याच उत्साहानें नसला तरी जरा कमी उत्साहानें त्या कलेचा पुरस्कार केला असावा. म्हणजे राजाश्रयाचा लाभ झाला नसला तरी सर्वसामान्य जनांचा बराच आश्रय तिला प्राप्त झाला असावा असें दिसतें.

'परंतु मोंगल बादशहांची गोष्ट निराळी होती. कलांवर त्यांचें प्रेम होतें आणि विविध कलांना त्यांनीं आश्रय दिला होता. कलेच्या बाबतींत त्यांचे

---

१. एस्. एम्. जाफर् : कल्चरल् आस्पेक्ट्स् ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया (हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाच्या संस्कृतीचीं स्वरूपें), पृ. ११०.

स्वतःचे असे कांहीं विचार होते. आपल्या तैमूरीय पूर्वजांच्या ग्रंथालयांतून उपलब्ध होण्यासारखे चित्रकलेचे जेवढे उत्तमोत्तम नमुने होते ते सगळे बाबर आपल्याबरोबर घेऊन आला होता. चित्रकलेचे भोक्ते व चित्रकार म्हणून त्या घराण्यांतील पुरुषांची ख्याति होती. अत्यंत मोलाच्या व अभिमानास्पद ठेव्याप्रमाणें मोंगल बादशहा या चित्रांचें जतन करीत असत.'[१]

'हिंदु, जैन व बौद्ध यांची मुसलमानी काळापूर्वींचीं जीं चित्रें आहेत, त्यांचेंच असें एक वेगळें स्वतंत्र स्वरूप आहे. त्या काळच्या चित्रकारांना प्रेरणा देणारी व रेखाटनाला अर्थपूर्णता प्राप्त करून देणारी त्यांची जी वस्तुमात्राकडे पाहण्याची दृष्टि होती तीहि स्वतंत्र होती. विविध वांशिक अनुभूतींच्या समन्वयांतून निर्माण झालेल्या संस्कृतीचा सौंदर्यमय आविष्कार त्यांत झालेला आहे. आनंद व खेद, सुख व दुःख, जय व अपजय, प्रेय व श्रेय, आसक्ति व अनासक्ति, लालसा व इंद्रिय–दमन, तद्वत्‌च आकांक्षा, कार्य–प्रवृत्ति व विषयासक्ति आणि संतोष, कार्य–निवृत्ति व प्रशांत गांभीर्य या विरोधी द्वंद्वांच्या पलीकडची अशी साम्यावस्था त्या समन्वयांत अभिप्रेत आहे....अजंठ्याचीं भित्ति–चित्रें हा प्राचीन काळच्या चित्रकलेचा एकमेव अवशेष आतां शिल्लक राहिलेला आहे.... विनय–पिटक या खिस्तपूर्व ग्रंथांत व महाभारत, रामायण, शाकुंतल इत्यादि काव्य–नाटकांत चित्रकलेचे उल्लेख विद्वानांना आढळून आले आहेत. अत्यंत प्राचीन अशा अनेक गुहांतून भित्ति–चित्रांचे अवशेष सांपडतात. पण एका काळीं हिंदुस्थानभर पसरलेल्या व वैपुल्यानें बहरलेल्या या कलेचें वास्तविक स्वरूप पुरेशा प्रमाणांत दाखविणारे अवशेष अजंठ्यालाच पाहावयास मिळतात. शिळांतून खोदून काढलेल्या तेथील मंदिरांचीं छतें व त्यांच्या भिंती चित्रांनीं सजविलेल्या आहेत....खिस्ती कालगणनेच्या पहिल्या सहाशें वर्षांत हें चित्रकाम झालेलें आहे. महत्त्वाकांक्षा व धर्मश्रद्धा या दोन्ही प्रवृत्तींचें

---

१. एस्. एम्. जाफर्: कल्चरल् आस्पेक्ट्स् ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया (हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाच्या संस्कृतीचीं स्वरूपें), पृ. १२५–१२६.

सारखेंच संतर्पण करणाऱ्या या कलाकृति चित्रित करण्यासाठीं तत्कालीन नृपतींनीं व धनपतींनीं आपलीं भांडारें रितीं केलीं असावीं.'[१]

'बाबरनें हिंदुस्थान जिंकून घेतला त्या वेळीं चित्रकार बिहझाद हा कलेच्या प्रांगणांत सूर्यासारखा तळपत होता. त्याची शैली "आदर्श शैली" मानण्यांत येत होती. बाबरासारख्या चित्रकलेच्या मर्मज्ञांनीं आणि पर्शियांतला आपला विजनवास संपवून हिंदुस्थानांत परतल्यानंतर हुमायूननें व इतर चघताई उमरावांनीं बिहझादचाच आदर्श हिंदी चित्रकारांसमोर मांडला व त्यांना त्या उस्तादाचें अनुकरण करण्यास फर्मावलें. अशा प्रकारें बिहझाद व त्याचे शिष्य (शागीर्द) हे हिंदी चित्रकारांचे आचार्य बनले आणि तैमूरीय परंपरेचें कलम अजंठ्याच्या रोपट्यावर बांधण्यांत आलें. आत्यंतिक व्यक्तिनिष्ठता हा या परंपरेचा विशेष आहे. जनता व समुदाय यांच्याविषयीं आस्था या कला–पद्धतींत दिसून येत नाहीं. व्यक्तीच्या आकृतींतील हरएक तपशील निरखून तो चित्रांत उतरवण्यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न या पद्धतीचे चित्रकार करतात. जीवनाच्या प्रेरणांची दुर्दम्य जाणीव त्यांना होत असे आणि त्या जाणिवेची उन्मादकारी शक्ति ते आपल्या चित्रांमध्यें ओतीत असत.'[२] 'अजंठ्यांतील चित्रांप्रमाणेंच या चित्रांच्या बाबतींतहि भावनांचा आविष्कार रेषांच्या द्वाराच केला जातो. पण या दोन चित्र–पद्धतींतील रेषांच्या स्वरूपांत केवढा भेद आहे![३]

'या दोन भिन्न कलाविषयक जाणिवांचें मोंगल बादशहांच्या कृपाछत्राखालीं जेव्हां मीलन झालें तेव्हां चित्रलेखनाची एक नवीच शैली निपजली.... त्याचा परिणाम असा झाला कीं मूळ हिंदु व मुसलमानी शैल्यांतील सामर्थ्य व गतिमत्ता यांचें प्रमाण नव्या शैलींत कमी झालें आणि तिच्यांत एक प्रकारचा निबरपणा व शिष्टता हे गुण शिरले. पण त्याचबरोबर रंगांची आश्चर्यजनक खुलावट व रेषेचा अतीव नाजूकपणा यांचाहि लाभ नव्या चित्रशैलीला

---

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् (हिंदी संस्कृतीवर झालेला इस्लामचा परिणाम), पृ. २५८–२५९.

२. उक्त ग्रंथ, २६५–२६६. ३. उक्त ग्रंथ, पृ. २६८.

झाला. या नव्या शैलीची उत्क्रांति झपाट्यानें होत गेली. हिंदु व मुसलमान चित्रकारांना बाबरानें तैमूरीय पद्धतीचा परिचय बहुधा आग्रा मुक्कामीं करून दिला असावा. मौज अशी कीं या सुरुवातीच्या चित्रपद्धतींत सुद्धां नजरेंतून न सुटण्याइतपत हिंदी वातावरण उमटलेलें दिसतें. क्लार्कनें या चित्रपद्धतीला हुमायूनची पद्धति असें नांव दिलेलें आहे....तदनंतर अकबराच्या अमदानींत होऊन गेलेले कलाकार याच परंपरेंत तयार झाले असावे. फुरुख, कलमक, शिराझचा अब्दुस समद, ताब्रिझचा मीर सय्यद अली व मिस्किन अशीं जीं चार मुसलमान उस्तादांचीं नांवें अबुल फझल देतो त्यांनींच अकबराच्या पदरच्या कलाकारांना पढवलें असावें. त्यांचे शिष्य हिंदु होते. ते पूर्वीच्या परंपरेंत शिकून चांगले प्रसिद्धीस आल्यामुळेंच त्यांना दरबारचें बोलावणें आलें असावें. त्यांनीं आपल्या कलापटुत्वानिशीं या मुसलमानी उस्तादांची शागिर्दी पत्करली असावी आणि त्यांना प्रिय असणाऱ्या पद्धतीनुसार चित्रें काढण्यास सुरुवात केली असावी. अकबराच्या अमदानीच्या आरंभींच नवीन हिंदु–मुसलमानी शैली पूर्ण विकसित स्वरूपांत दृष्टीस पडते, त्याचा हा असा उलगडा असावा. ऐन–ए–अकबरींत दासवन्त, बसावन, केशवलाल, मुकुंद, माधव, जगन्नाथ, महेश, खेमकरण, तारा, सेनवाला, हरिबंस आणि राम इतक्या नांवांचा उल्लेख आलेला आहे. तत्कालीन चित्रांवर आणखी कित्येक हिंदु चित्रकारांचीं नांवें आढळून येतात....बांकीपुर येथील 'खुदाबक्ष' ग्रंथालयांत ठेवलेल्या हस्तलिखितांमधील चित्रांत तुलसी, सुरजन, सूरदास, शंकर, इसार, राम, असर, बनवाली, नंद, नन्हा, जगजीवन, धर्मदास, नारायण इत्यादि नांवें दृष्टीस पडतात. कांहीं स्थळीं चित्रकारांच्या मूळ गांवांचेहि उल्लेख आहेत. त्यांत ग्वाल्हेर, गुजराथ व काश्मीर येवढ्यांचाच उल्लेख आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मध्ययुगाच्या प्रारंभींच्या काळांत हिंदु–संस्कृतीचीं केंद्रें ह्याच ठिकाणीं होतीं आणि अकबराचे चित्रकारहि याच ठिकाणांहून आलेले दिसतात. अजंठ्यानंतर हिंदु–चित्रकलेची परंपरा अखंड चालू राहिलेली होती हें यावरून सिद्ध होतें; तसेंच मोंगल–चित्रकला ही केवळ मध्य–आशियांतल्या

व पर्शियांतल्या चित्रकलेची शाखा नसून प्राचीन परंपरेला नव्या जमान्यांत प्राप्त झालेलें तें एक अभिनव स्वरूप आहे हेंहि त्यावरून सिद्ध होतें.'[१]

एका बाजूनें अजंठ्याच्या भित्ति–चित्रांची शैली व दुसऱ्या बाजूनें अस्सल समरकंदी व हिराती लघुचित्रांची शैली मिळून जी हिंदु–मुसलमानी शैली निर्माण झाली तिला पुढें अनेक शाखा फुटल्या. मूळ दोन शैल्यांपैकीं जिचें अनुकरण त्यांनीं ज्या मानानें केलें त्या मानानें त्यांच्या स्वरूपांत फरक पडत गेला. जयपुर, कांगडा व हिमालयाच्या टेकड्यांमधील हिंदु राज्यें यांच्यांतल्या रजपूत व पहाडी शैल्यांचा कल प्राचीन हिंदु–पद्धतीकडे अधिक होता; तर दख्खन, लखनौ, काश्मीर, पाटणा, येथील कलमें मुसलमानी शैलीच्या बाजूला अधिक झुकलेलीं होतीं. शीख–पद्धति या दोहोंच्या मधली होती. कांहीं-हि असलें तरी दिल्ली व आग्रा येथील दरबारांत वाढलेल्या मूळ खोडाचीच ही फूट होती.'[२]

पाटण्याचे श्री० पी. सी. मनुक यांच्या संग्रहीं हिंदी चित्रांचा अत्यंत मूल्य-वान् संग्रह असून त्यांचें त्या विषयांतील ज्ञानहि कांहीं सामान्य नाहीं. त्यांनीं 'हिंदुस्थानांतील चित्रकला' म्हणून एक निबंध लिहलेला आहे. त्यामध्यें मोंगल–काळांतल्या चित्रकलेच्या विकासासंबंधीं चर्चा केल्यानंतर ते लिहितात, 'मनुष्य–देहाचें किंवा कोणत्याहि प्राण्याचें चित्र काढणें हें 'हराम' आहे असेंच सनातनी मुसलमान मानीत असे. कारण त्याच्या धर्माप्रमाणें चित्र-लेखन निषिद्ध मानण्यांत आलेलें आहे. "तूं आपल्यासाठीं कोणतीहि प्रतिमा बनवूं नकोस" हें मूसाचें वचन इस्लामी धर्मात अतिरेकाला पोंचलेलें होतें. पर्शियाचा सुविनीत राजा शाह अब्बास व प्रारंभींचे मोंगल बादशहा यांच्या राजवटींमध्यें मुसलमानांनीं हा निषेध मानला नाहीं हें खरें. परंतु मुसल मानांच्या कलाकृतींनीं नेत्रादि इंद्रियांना संतोष मिळत असला तरी आपल्या

---

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् ('हिंदी संस्कृतीवर झालेला इस्लामचा परिणाम ), पृ. २६८–२७१.

२. उक्त ग्रंथ, पृ. २७२.

आत्म्याची तुष्टि त्या करीत नाहींत. उलट त्यांचे जे हिंदु शिष्य व सहकारी होते त्यांच्या मार्गांत धर्माची आडकाठी नव्हती, आपलीं दैवतें त्यांना सचेतन व इंद्रिय–गोचर वाटत, त्यांना परंपरारूढ देहाकार त्यांस देतां येई. त्यामुळेंच कदाचित् हिंदु चित्रकारांच्या कृति आत्म्याला संतुष्ट करीत असाव्या. आत्मा तृप्त होणें हीच श्रेष्ठ कलेची कसोटी आहे. दीर्घ कालापासून कला व धर्म यांच्यामध्यें निकट साहचर्य नांदत आलें आहे आणि युरोपमध्यें पुनरुज्जीवनाच्या कालखंडांत ज्या अभिजात कलाकृति तयार झाल्या त्यांचे विषय धार्मिक किंवा प्राचीन ग्रीसच्या व रोमच्या कथांमधून घेतलेले पौराणिक होते हें विसरून चालणार नाहीं.'[१]

## (ई) संगीत—

हिंदुस्थानांतील आधुनिक संगीतावर इस्लामचा थोडथोडका प्रभाव पडलेला नाहीं आणि त्यानें इस्लामपासून थोडीथोडकी स्फूर्ति मिळविली आहे असेंहि नाहीं. इस्लामचें पाऊल या देशांत पडण्यापूर्वीच येथील संगीत चांगलें परिणत झालेलें होतें. सनातनी मुसलमान या कलेचा पुरस्कार करीत नसत हें खरें असलें तरी आधुनिक संगीताची उभारणी हिंदु–मुसलमानांच्या सहप्रयत्नांनींच झालेली आहे. त्याचा देह हिंदु आहे व देहावरील अलंकार–आभरणें हीं समन्वय–जन्य आहेत. नानाविध वाद्यांचा जन्म व विकास यांचा इतिहास लिहिण्यांत आला तर त्यांना प्राप्त झालेलें सध्यांचें स्वरूप हें हिंदु-मुसलमानांच्या जोड–प्रयत्नांचें फळ आहे असें प्रत्ययास येईल. अनेक वाद्यांच्या बाबतींत मुसलमानांनाच श्रेयाचा बहुतेक वांटा द्यावा लागेल आणि कांहीं वाद्यांच्या बाबतींत तर साऱ्या श्रेयाचे धनी तेच ठरतील. सध्यां प्रचारांत असलेल्या रागरागिण्या बांधण्यांतहि मुसलमान उस्तादांनीं फार मोठी मदत केलेली आहे.

'इस्लामी अंमलाच्या सुरुवातीला चित्रकलेप्रमाणेंच संगीताचीहि आबाळ झाली....संगीत मनाची इतकी कांहीं पकड घेतें कीं त्याला दुसऱ्या कशाचा

---

१. सर्चलाइट्–वाढदिवसाचा वार्षिक अंक, १९२६, पृ. १५.

विचार करणेंच अशक्य होतें. म्हणूनच संगीत बहिष्कृत ठरवण्यांत आलें असावें....तथापि मानवी प्रवृत्तींचाच अखेर विजय झाला आणि चित्रकलेचा अभ्यास जितक्या उत्साहानें चालू झाला, त्याहून ज्यास्त नसला तरी तितक्याच उत्साहानें संगीताचा व्यासंग सुरू झाला. संगीतप्रेमी इराण देशाशीं इस्लामचा संबंध आल्यामुळें आणि संगीताला आत्मोन्नतीचें आध्यात्मिक प्रगतीचें साधन समजणाऱ्या सूफींच्या प्रभावामुळें मुसलमानांची या कलेबाबतची दृष्टि पुष्कळच बदलली आणि संगीताला चिकटवण्यांत आलेला कलंक बराचसा दूर झाला. हिंदुस्थानांत मुसलमानांनीं वस्ती केल्यानंतर हिंदूंच्या सामाजिक व धार्मिक जीवनांत संगीताला केवढें प्राधान्य आहे हें जेव्हां त्यांना समजलें तेव्हां तर परिस्थिति अधिकच निवळली. मशिदींतली प्रार्थना सनातन पद्धतीनुसार कोणत्याहि प्रकारच्या संगीताचें सहाय्य न घेतां करण्यांत येत असली तरी हर तऱ्हेच्या उत्सवांतून संगीताला मानाचें स्थान मिळूं लागलें, इतकें तें लोकप्रिय होऊन बसलें होतें. सूफी–पंथीयांच्या संगीताच्या शोकामुळें अर्धवट धार्मिक स्वरूपाच्या मजलसी भरवून तेथें भक्तिप्रेमाच्या कव्वाल्या धंदेवाईक गायकांकडून किंवा कव्वालांकडून म्हणवून घेण्याचा प्रघात सुरू झाला.'[१] 'मुसलमानकालीन हिंदुस्थानमध्यें संगीत अतिशय लोकप्रिय झालेलें होतें.... हिंदी मुसलमानांपैकीं बहुसंख्य मुसलमान मूळचे हिंदु होते. संगीताचा छंद फार असल्यामुळें त्यांनीं धर्मान्तरानंतर सुद्धां त्याचा त्याग केला नसावा. पुढें संगीतानें मुसलमानी समाजाच्या सर्व थरांत प्रवेश मिळवला असावा आणि अशा प्रकारें त्याला लोकप्रियता लाभली असावी. इतर कलांप्रमाणेंच संगीत–कलेच्या योगानें हिंदुमुसलमानांमधील दळणवळणाचा आणखी एक मार्ग उपलब्ध झाला....'[२]

'संगीत–कलेला सुद्धां बादशहाकडून उदार आश्रय मिळून त्याच्या अमदा-

---

१. एस. एम्. जाफर्: कल्चरल् आस्पेक्ट्स् ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया (हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाच्या संस्कृतीचीं स्वरूपें), पृ. १५५–५६. २. उक्त ग्रंथ, पृ. १६४–१६५.

नींत तिचा परमोत्कर्ष झाला. त्याच्या दरबारांत हिंदु, इराणी, दुराणी, काश्मिरी, असे अनेक स्त्री-पुरुष कलावंत होते....जगद्विख्यात गायक मियाँ तानसेन मूळचे हिंदु असून ते बादशहाच्या पदरीं होते. त्यांची कबर ग्वाल्हेरीला असून ती हिंदी गायकांच्या यात्रेचें ठिकाण बनली आहे. त्याच काळांत तानसेनांचे व प्रतितानसेन जे रामदास त्यांचे गुरु हरिदास प्रसिद्ध होते. रामदास हे लखनौचे राहणारे. एका प्रसंगीं खान-इ-खानान यांच्याकडून त्यांना एक लाख रुपयांची बक्षिशी मिळाली होती असें सांगतात....अकबराच्या काळीं संगीत-कला मध्यान्हींच्या सूर्याच्या तेजानें तळपत होती. त्या काळच्या अनेक रागरागिण्या आतां व्यासंगाच्या अभावीं विसरून गेल्या आहेत....हिंदुमुसलमानांमध्यें सांस्कृतिक देवाण-घेवाण कशी चालत असे तें संगीताच्या क्षेत्रांत स्पष्ट दिसून येतें. आपल्या जवळचें कलाधन एक समाज दुसऱ्याला देत होता. ही विनिमय-क्रिया अकबराच्या जमान्यांतच नव्यानें सुरू झाली असें नाहीं. किती तरी आधींपासूनच ती चालत आलेली होती....ख्याल हा हिंदी संगीताचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. तो जौनपुरचे सुलतान हुसेन शरकी यांनीं शोधून काढला असें म्हणतात. उलट हिंदूंनीं ध्रुपदाची भर मुसलमानी संगीतांत घातली....केवळ बादशहा व सुभेदारच काय ते संगीत-कलेविषयीं आपलेपणा दाखवीत असें नाहीं; अनेक उमराव मंडळीहि स्वतःच्या व स्वकुटुंबीयांच्या मनोरंजनासाठीं संगीताचा उपयोग करीत असत.'[१] 'शहाजहान संगीताचा मोठा आश्रयदाता होता. त्याला स्वतःलाहि चांगलें गातां येत असावें असें दिसतें. त्याच्या पदरीं असलेले दोन सुविख्यात गायक म्हणजे रामदास व महापात्र हे होत.'[२]

सध्यां हयात असणाऱ्या सर्वोत्कृष्ट गायकांची यादी केल्यास असें दिसून येईल कीं एकंदर लोकसंख्येमध्यें मुसलमानांचे जें प्रमाण आहे किंवा मुसल-

---

१. एन्. एन्. लॉ : प्रमोशन् ऑफ् लर्निंग् इन् इंडिया ड्यूरिंग् महॉमेडन् रूल् ( मुसलमानी अमदानींत हिंदुस्थानांत झालेली विद्येची वाढ ), पृ. १५५-१५८. २. उक्त ग्रंथ, पृ. १८३.

मानांना कायदेमंडळांत मिळालेल्या प्रतिनिधित्वाचें जें प्रमाण आहे त्यापेक्षांहि या यादीमधील मुसलमानांचें प्रमाण अधिक आहे. खऱ्या रसिकांनीं भरविलेल्या कोठल्याहि भारदस्त मैफलीकडे नजर टाकली तर हिंदी संगीतामध्यें व्यक्त होणाऱ्या समन्वयजन्य हिंदी संस्कृतीचें दर्शन आपणांला झाल्यावांचून राहणार नाहीं.

हिंदुमुसलमानांच्या सहजीवनाच्या प्रयोगाचा आढावा घेतांना श्री. एस्. एम्. जाफर आपल्या ग्रंथांत लिहितातः—

'जे मुसलमान हिंदुस्थानांत आले त्यांनीं येथेंच वास्तव्य केलें, ते येथलेच बनले. हिंदूंच्या देशांत येऊन त्यांच्याशीं कायमचें वैर धरून राहावें हें त्यांना शक्य वाटलें नाहीं. सहवासाबरोबर परस्परांमध्यें दळणवळण चालू झालें, सहिष्णुता आली. कालांतरानें परिस्थिति–वश होऊन शेजार स्नेहाचा व्हावा म्हणून कांहीं तरी मार्ग शोधून काढणें त्यांना भाग पडलें. पर्शियन् व संस्कृत यांचा ताणाबाणा विणून एक सामान्य भाषा त्यांनीं बनवली आणि हिंदु–मुस्लिम संस्कृतींचा मिश्रप्रवाह आपापलीं पुराणीं पात्रें सोडून उर्दूच्या नव्या कालव्यांतून वाहूं लागला. अशा प्रकारें बनलेली नव–संस्कृति निर्भेळ मुसलमानी नव्हती किंवा निर्भेळ हिंदुहि नव्हती. दोघींचें तें एक रुचिर मिश्रण होतें. मुसलमानी बादशहांनीं व नबाबांनीं हिंदु कला व वाङ्मय, शास्त्रें व तत्त्वज्ञानें यांना उत्तेजन दिलें आणि आपल्या विद्यालयांचे दरवाजे जातपात, दर्जा, धर्म यांचा विचार न करतां सर्वांना खुले ठेवले. साधुसंतांप्रमाणें त्यांनींहि आपल्या क्षेत्रांत हिंदु–मुसलमानांना जवळ आणण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, दोघांमध्यें जवळ जवळ संपूर्ण समन्वय घडून आला. मुसलमानांच्या मशिदींत जाऊन हिंदु लोक मेवामिठाई वांटीत असतील किंवा कुराणाकडे कौल मागत असतील, संकटें दूर पळावीं म्हणून कुराणाच्या प्रती जवळ ठेवीत असतील, मुसलमानांचे सण साजरे करीत असतील आणि मुसलमान हिंदूंच्या आचारांत सहभागी होत असतील तर त्याचा अचंबा वाटावयास नको....हिंदी मुसलमानांपैकीं फार मोठी संख्या मुळांत

हिंदु असलेल्यांची असल्याकारणानें धर्मांतरानंतर देखील त्यांचे पूर्वापार चालत आलेले आचार व त्यांच्या संवयी हीं तशींच राहिलीं होतीं. धर्म बदलला म्हणून त्यांच्या भोंवतींची परिस्थिति बदलली नव्हती, वातावरण बदललें नव्हतें. सामाजिक तटबंदी, भ्रामक समजुती, जातिभेद हीं त्यांच्या अंगांत मुरून गेलीं होतीं. त्यामुळें समन्वयांतून जो मिश्र हिंदु–मुसलमान–समाज निर्माण झाला त्यांत हिंदु–समाजाचीं अनेक वैशिष्ट्यें तशींच कायम राहिलीं.'[1]

संस्कृति ही अत्यंत संमिश्र वस्तु असून राष्ट्राच्या घटक द्रव्यांप्रमाणेंच तिचीं घटक द्रव्यें कोणतीं तें सांगणें फार कठिण आहे. पण विशिष्ट संस्कृतींत जन्माला आलेल्या व वाढलेल्या व्यक्तीस ती इतरांहून निराळी आहे हें उमजल्यावांचून राहत नाहीं. एकाच संस्कृति–क्षेत्रांत निरनिराळे क्षेत्र–विभाग किंवा उपसंस्कृति असणें आणि त्यांचा मुख्य संस्कृतीशीं अवयव–अवयवी–भाव असणें शक्य असतें.

विविध किंबहुना विरोधी अशा सामाजिक, धार्मिक व अन्य शक्तींच्या समन्वयजनित परिणामाची निदर्शक अशी जी संस्कृति असेल तिच्यांत उप–समूह व उप–विभाग असणारच. पण त्यांचें अस्तित्व सर्वोपरि संस्कृतीचें अनस्तित्व सिद्ध करीत नाहीं. कारण ती मूल–संस्कृति सर्व उपसमूहांत व उप-विभागांत संचरलेली असतेच. आपणांला ज्या वेळीं एका संस्कृतीची दुसऱ्या संस्कृतीशीं तुलना करावयाची असते त्या वेळीं तिच्यांतल्या एका उपसमूहाची दुसऱ्या उपसमूहाशीं तुलना न करतां एका सर्वोपरि संस्कृतीची दुसऱ्या सर्वोपरि संस्कृतीशीं तुलना करणें हाच युक्त मार्ग असतो. उपसमूहांमध्यें आपसांत भेद असतात, नाहीं असें नाहीं. पण त्यांच्यांत सामान्य अशाहि अनेक गोष्टी असतात आणि त्यांमुळें दुसऱ्या संस्कृतींपासून हे गट वेगळे पडतात. हिंदुस्थानांतील हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पार्शी, शीख यांच्यामध्यें आपसांत अनेक बाबतींत फरक आहेत, परंतु युरोपियनांसारख्या एकाद्या

---

१. एस्. एम्. जाफर् : कल्चरल् आस्पेक्ट्स् ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया (हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाच्या संस्कृतीचीं स्वरूपें), पृ. २०६–२०७.

परकीयाहून ते सर्वजण वेगळे आहेत असें दर्शवणारी सामान्य अशी कांहीं तरी वस्तुहि त्या सर्व गटांत आहे, याबद्दल कोणाच्या मनांत शंका असेल तर त्यानें ब्रिटिशांचे वसाहतींचे प्रदेश, संरक्षित प्रदेश व अंकित प्रदेश यांमध्यें हिंदी माणसाला कसें वागवण्यांत येतें तें पाहावें म्हणजे हिंदुस्थानमधील हिंदु व मुसलमान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत या सिद्धांताचें पार खंडन झाल्याचा पुरावा त्याला मिळेल. हिंदी मनुष्य हिंदु असो, मुसलमान असो अगर शीख, पारशी किंवा खिश्चन असो, दक्षिण आफ्रिकेचा, ऑस्ट्रेलियाचा, कॅनडांतला किंवा केनियांतला गोरा माणूस त्यांच्यांत भेद करीत नाहीं. या काळ्या आदमीला डोकें वर करूं देतां कामा नये, त्याचा आपल्या संस्कृतीला विटाळ होऊं देतां कामा नये आणि आपल्या राहणीचें मान त्याला खालीं आणूं देतां कामा नये येवढेंच तो जाणतो. त्याची ही वागणूक परतंत्र हिंदी माणसांशींच अशी असते असें नाहीं. चिनी लोक तर स्वतंत्र आहेत आणि हें महायुद्ध सुरू होईपर्यंत जपान्यांना आदरानें नसलें तरी सौजन्यानें वागवण्यांत येत होतें; अशी परिस्थिति असतांहि दोन्ही गोलार्धांतील युरोपियन् संस्कृतीचे व राहणीचे संरक्षक असें स्वतःला समजणाऱ्या या लोकांकडून चिन्यांजपान्यांना हिंदी माणसांप्रमाणेंच वागवण्यांत येत असे. असा पंक्तिप्रपंच आशियांतील व युरोपांतील संस्कृतींमध्यें असलेल्या भेदांवरून करण्यांत येत असतो. असो. या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं हिंदु-मुसलमानांत कोणतेहि भेद असले तरी ज्या संस्कृतीमुळें पश्चिमेकडून किंवा पूर्वेकडून, जुन्या जगांतील राष्ट्रांतून किंवा नव्या जगांतील देशांतून येणाऱ्या परकीयांहून हिंदी मनुष्य वेगळा असल्याचें दिसून येतें, त्या हिंदी संस्कृतीचा विकास साधण्याच्या कामीं हिंदु व मुसलमान तन-मन-धनानें खपले आहेत. सहवासाचा येवढा दीर्घ इतिहास आणि केवळ युद्धाच्या समयींच नव्हे तर शांततेच्या काळींहि दोघांनीं सहकार्यानें केलेले परिश्रम लक्षांत घेतले तर झाला हा समन्वय नैसर्गिकच ठरतो. आंब्याचीं दोन रोपटीं एकत्र जोडण्यांत आलीं किंवा एकाचें कलम दुसऱ्यांत भरलें तर परिणामीं मधुरतर फळांचीच प्राप्ति

होत असते. म्हणून त्यांना खेंचून एकमेकांपासून अलग करणें चुकीचें ठरेल. त्याचप्रमाणें हेंहि लक्षांत ठेवणें अधिक महत्त्वाचें आहे कीं इतका दीर्घ काळ लोटल्यानंतर, नवीन वृक्ष अनेक वादळांशीं झुंजून अधिक समर्थपणें व एकदिलानें उभा असतांना त्याची चीरफाड करणें वाटतें तितकें सोपें आढळणार नाहीं. तो प्रयत्न यशस्वी झालाच तर दोन्ही रोपट्यांचें त्यामुळें नुकसान होईल. दोन्ही रोपें त्यायोगानें दुबळ होतील आणि सर्व बाजूंनीं घाव घालणाऱ्या दुष्मनांना त्यांचें शरीर उघडें सांपडेल.

( ३ ) एक देश—

उत्तरेला हिमालयाच्या हिमाच्छादित गिरिशिखरांपासून दक्षिणेला जवळजवळ विषुववृत्तापर्यंत पसरलेल्या हिंदुस्थानच्या भूमींत विविध हवामानें व भूरचनेचे प्रकार आहेत. समुद्रापासून अगदीं अलग असा विस्तीर्ण प्रदेश आपल्या देशामध्यें असून सुमारें चार हजार मैलांची समुद्र–किनाऱ्याची पट्टीहि त्याला मिळालेली आहे. राजपुतान्याचीं व सिंधचीं वाळवंटें आणि बंगालचीं व आसामचीं सदा हरित मैदानें येथें आहेत. ईशान्येच्या आसाम प्रांतांत आणि पश्चिम घाटाच्या फांट्यावर दरसाल अमाप पाऊस पडतो. उलट राजपुतान्याच्या व सिंधच्या वाळवंटांत आणि आंध्राच्या कांहीं भागांत नांवालाच चार थेंब पडतात ! आंतल्या कांहीं ठिकाणीं, विशेषतः पंजाब व सरहद्द प्रांतांत, कमालीची उष्णता तशीच कमालीची थंडी असते, तर या द्वीपकल्पाच्या दक्षिण भागांतल्या किनारा–पट्टींत थंडी व उन्हाळा असे ऋतुमानाचे भेद जवळजवळ नाहींतच म्हटलें तरी चालेल. इतर अनेक गोष्टींप्रमाणेंच वातावरणाच्या व भूरचनेच्या बाबतींतली ही विविधता व विभिन्नता देखील रहिवाशांच्या धार्मिक व सामाजिक भेदांशीं जुळती असल्याचें दिसून येत नाहीं. थंड व रुक्ष वायव्य भाग आणि आर्द्र, वादळी आणि सदा हरित पूर्व व ईशान्य भाग यांच्या हवामानांत व भूरचनेंत सर्वथैव भेद असले तरी जिच्या आधारावर हिंदुस्थानची फाळणी करण्याविषयींची मागणी पुढें मांडण्यांत येत असते अशी फार मोठी मुसलमानांची संख्या या दोन्ही भागांत आहे.

हवामानांतील व भूरचनेंतील या भेदांचा त्या भागांतील रहिवाशांवर म्हणजे त्यांच्या पेहरावावर, त्यांच्या घरांच्या बांधणीवर, अनेक सामाजिक चालीरीतींवर व एकंदरींत त्यांच्या जीवनांवर बराच परिणाम झालेला आहे. पण हे सर्व अंतर्गत भेद असले तरीहि प्रायः दुर्लंघ्य असे पर्वतांचे व सागरांचे अडथळे निर्माण करून जणूं कांहीं निसर्गानेंच हा अखंड देश शेजारच्या प्रदेशांपासून अलग करण्याचें ठरविलें असावें. हिंदुस्थानच्या प्रत्येक सम्राटानें, आक्रमकानें व जेत्यानें (मग तो हिंदु—काळांतील असो किंवा मुसलमानी राजवटींतला असो) हा संबंध देश आपल्या छत्राखालीं आणण्याचे कमीजास्त प्रमाणांत यशस्वी प्रयत्न केल्याचें दिसून येतें. आपल्या प्रत्यक्ष अंमलाखालीं नाहीं तरी निदान आपल्या सार्वभौमत्वाखालीं सगळा देश यावा ही महत्त्वाकांक्षा प्रत्येक राज्यकर्त्यानें धरल्याचें आढळतें. मात्र देशाच्या वायव्येला असा एक टापू सदैव राहिलेला आहे कीं जो कोणाचाच म्हणतां येणार नाहीं. तो आज हिंदी राजाच्या ताब्यांत असेल तर उद्यां परकीयांच्या हुकमतीखालीं जाईल. या देशाचें सार्वभौमत्व प्राप्त करून घेण्यांत इंग्रजांनीं चक्रवर्ती हिंदु राजांचें व मुसलमान बादशहांचेंच अनुकरण केलेलें आहे. सध्यां जसे प्रांत आहेत तशीं पूर्वी राज्यें असत व त्यांचे आपसांत झगडे चालत. पण अशा राज्यांतल्या एकाद्या रहिवाशानें किंवा राजानें आपण हिंद्वेतर आहों किंवा आपला प्रदेश भारतवर्षाच्या बाहेरचा आहे असें कधीं मनांत देखील आणल्याचा पुरावा मिळणार नाहीं. संध्या करतांना प्रत्येक हिंदूला संकल्पाच्या वेळीं एक श्लोक म्हणावा लागतो. हा सगळा देश एक आहे आणि आपल्या लहानशा लोट्यांतील पाण्यांत सिंधु, गंगा व कावेरी यांचीं जलें एक झालेलीं आहेत असें मनोमय चित्र श्लोकद्वारा तो आपल्या डोळ्यांसमोर आणीत असतो. क्वचित् प्रसंगीं एकादा चक्रवर्ती साऱ्या देशावर आपलें सार्वभौमत्व गाजवीत असतांनाच तेवढ्या अशा प्रकारच्या कल्पना प्रचलित असत असें नाहीं. देशाच्या वेगवेगळ्या भागांत स्वतंत्र राजे राज्य करीत असतां, दिल्लीच्या तख्तावर मुसलमान राजे विराजमान असतां आणि नंतर अनेक मुसलमानी शाह्या देशामध्यें

स्वतंत्रपणें राज्यकारभार हांकीत असतांहि हीच भावना हिंदुमात्राच्या मनांत कायम होती. आणि आज साऱ्या देशावर इंग्रज सरकारचा अंमल चालू असला तरीहि तोच मंत्र अजूनहि जपण्यांत येत आहे. हिंदुस्थानांत यात्रेचीं जीं चार प्रसिद्ध स्थळें आहेत, त्यांना धामें म्हणतात. त्यांची यात्रा केल्यास परम पुण्याची प्राप्ति होते असें हिंदु लोक मानतात. दक्षिण टोंकाचा रामेश्वर, हिमालयांत १५००० फूट उंचीवर वसलेला बद्रिकाश्रम, पूर्व–किनाऱ्यावरची जगन्नाथ–पुरी व काठेवाडांतली पश्चिम–समुद्रावरची द्वारका हीं तीं चार धामें होत. सिंहासनावर कोणीहि असला आणि कारभाराच्या सोयीसाठीं अथवा राजकारणामुळें देशाचे कसेहि विभाग पडलेले असले तरी आज ज्या प्रदेशाला हिंदुस्थान म्हणून आपण म्हणतों त्याच्याहून कमी प्रदेश असलेल्या हिंदुस्थानचें चित्र हिंदूंच्या मनश्चक्षूंसमोर कधींच आलेलें नाहीं. हिंदु–परंपरेप्रमाणें देशाच्या ज्या चतुःसीमा ठरलेल्या होत्या त्याच जश्याच्या तश्या मुसलमानी व मागाहून इंग्रजी राज्यकर्त्यांनीं मान्य केल्या आहेत.

किंबहुना 'द्वि–राष्ट्र'–कल्पना परवां परवां पुढें मांडण्यांत येईपर्यंत हिंदुस्थानच्या कोणत्याहि विभागाला हिंदुस्थानच्या बाहेरचा प्रदेश असें खुद्द मुसलमानांनींहि कधीं मानलें नव्हतें. हिंदुस्थानच्या कोणत्याहि मुसलमान नेत्यानें या देशाचा एकादा तुकडा आपल्या मूळच्या देशाला जोडून घेण्याचा विचारहि कधीं मनांत आणला नाहीं. ज्यांना शक्य झालें ते ते येथेंच कायम झाले आणि हिंदुस्थानांतील ज्या प्रांतांनीं त्यांची सत्ता मानली नाहीं त्यांना आपल्या काबूंत आणण्याचे प्रयत्न त्यांनीं केले. हिंदुस्थानच्या वायव्य सीमेवरची एक पट्टी देशाच्या नैसर्गिक सीमा–रेषेच्या कधीं अलीकडे तर कधीं पलीकडे होत असली तरी तेवढ्यावरून हिंदुस्थानच्या अखंडत्वासंबंधीं जें विधान वर केलें आहे त्याला मुळींच बाध येत नाहीं.

मुसलमान राज्यकर्ते होते तेव्हांच नव्हे तर ब्रिटिश् अमदानी चालू झाल्यानंतरहि आतां–आतांपर्यंत ब्रिटिश् हिंदुस्थानांतील त्याचप्रमाणें संस्थानांतील मुसलमानांनीं हिंदुस्थानच्या कोणत्याहि विभागाला हिंदुस्थानबाहेरचा मान-

त्याचा दाखला नाहीं. वायव्य व पूर्व विभागांत स्वतंत्र राज्यें स्थापन करावीं असा दावा करणारी मुस्लिम लीगसुद्धां त्या विभागांना हिंदुस्थानबाहेरचे मानीत असेल असें मला वाटत नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें 'पाकिस्तानी राष्ट्रीय आंदोलना'चे संस्थापक—अध्यक्ष सी. रहमतअली हीच एक व्यक्ति अशी आहे कीं जिनें हिंदुस्थानची भौगोलिक एकता मान्य करणें म्हणजे 'मिल्लती'च्या मानेवर हिंदुत्वाचें जूं ठेवण्यासारखें आहे" अशी उघड घोषणा केली असून "हिंदुस्थानबरोबरचे संबंध तोडा" व "हिंदुत्वापासून मिल्लतीचें रक्षण" करून "विशाल इस्लामिस्थानाची सेवा करा" असें आपल्या धर्मबांधवांस बजावलें आहे.[1] अखिलभारतीय मुस्लिम लीगला त्यांनीं हें नांव धारण केल्याबद्दल असा ठपका दिला आहे कीं, 'हिंदुत्वाचा छाप तिच्या नांवावरच पडलेला असून त्यामुळें आपली मिल्लत ( राष्ट्र ) हिंदुत्वाच्या तोंडीं दिल्याचें पातक तिच्या माथीं येतें.' नांवांचें महत्त्व आपण कमी लेखूं नये. नांव हें व्यवच्छेदक चिन्ह आहे. नांव धारण करणाऱ्यांचें व्यक्तित्व नांवावरून सिद्ध होत असतें. याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे नांव हें एक नैतिक प्रतीक असतें आणि प्रतीक असल्याकारणानें तें उगमस्थान बनतें....सदोष नांव धारण करण्याची चूक हातून घडल्यामुळें मुसलमानांचा तोटा झालेला आहे; आपल्या राष्ट्रीयत्वाला त्यामुळें बट्टा लागलेला आहे, "हिंदी" असा छाप त्यामुळें आपल्यावर बसला आहे. "हिंदी" या शब्दांत कांहीं गैर आहे म्हणून मी आक्षेप घेतों आहें असें नव्हे. दुसऱ्या कोणत्याहि नांवाइतकेंच हें नांवहि आदरणीय आहे. पण आपण "हिंदी" नसल्यामुळें स्वतःला किंवा आपल्या संघटनांना "हिंदी" म्हणवून घेणें हा धर्मद्रोह ठरतो.[2] ही चूक लक्षांत घेऊन इस्लामच्या 'वायव्येकडील पांच आधार—स्तंभां'ना रहमतअलींनीं १९३२ सालीं पाकिस्तान असें नांव दिलें. पुढें १९३७ सालीं त्यांनीं

---

१. 'पाकिस्तान् नॅशनल् मुव्हमेंट्'च्या 'सुप्रीम् कौन्सिल्'ला सी. रहमत अली यांनीं लिहिलेलें "दि मिल्लत् ऑफ् इस्लाम् अँड् दि मीनेस् ऑफ् 'इंडियानिझम्' " नांवाचें पत्र, पृ. ७. २. उक्त पत्र, पृ. १५.

बंगालला बंग–इ–इस्लाम व (दक्षिण) हैद्राबादेला उस्मानिस्तान अशीं नांवें बहाल केलीं. हे तीन विभाग म्हणजे इस्लामी राष्ट्राचे तीन किल्ले असून 'हिंदुस्थान'च्या द्विराष्ट्रीय उपखंडांत त्यांना केवळ लहरीखातर सामील करून टाकण्यांत आलेलें आहे[१] असा या गृहस्थांचा युक्तिवाद आहे. एवंच हिंदुस्थान हें अनेक देशांचें मिळून बनलेलें एक उपखंड आहे असें श्री० रहमत अली व 'पाकिस्तान–राष्ट्रीय–आंदोलन'वाले मानूं लागले ते सन १९३३नंतरच. या बाबतींत त्यांचें नेतृत्व मान्य करणारी एकादी ख्यातनाम व्यक्ति किंवा संस्था आतांपर्यंत पुढें आल्याचें माझ्या माहितींत नाहीं. राज्यकारभारासाठीं देशाचे विभाग पाडणें मनुष्याला शक्य असतें; पण मनुष्याला देश बनवतां आले आहेत कीं काय किंवा त्याला देश बनवतां येणें शक्य होईल किंवा काय याबद्दल मात्र मला शंका वाटते. युरोप खंडांत ज्या ज्या वेळीं देशविच्छेदनाचे प्रयत्न करण्यांत आले तेव्हां तेव्हां त्यापासून द्वेषाचें व कटुतेचें विषच निर्माण होऊन परिणामीं रक्ताचे पाट वाहले आहेत. जगाची धूळदाण उडवणारें प्रस्तुतचें महायुद्ध त्यांतूनच उद्भवलेलें आहे. या अनुभवापासून आपण सावध झालें पाहिजे व योग्य तो बोध घेतला पाहिजे.

**( ऊ ) एक इतिहास—**

नवव्या शतकांत महमद बिन कासिमनें सिंधच्या किनाऱ्यावर पाय ठेवला तेव्हांपासून मुसलमानांच्या या देशावरील आक्रमणांना प्रारंभ झाला. अठराव्या शतकांत अहमदशहा अबदालीनें आपली शेवटची स्वारी हिंदुस्थानवर केली तोंपर्यंत मुसलमानांचीं आक्रमणें चालूच होतीं. आठशें नऊशें वर्षें ह्या ज्या स्वाऱ्या सतत चालू होत्या त्यांपैकीं एक तरी स्वारी धर्मवेड्या किंवा धर्मप्रेमी लोकांनीं केवळ स्वधर्मप्रसारासाठीं केलेल्या धार्मिक आक्रमणाच्या स्वरूपाची होती किंवा काय याबद्दल शंकाच आहे. इतर आक्रमणांप्रमाणेंच हीं

१. 'पाकिस्तान् नॅशनल् मुव्ह्मेंट्'च्या 'सुप्रीम् कौन्सिल'ला सी. रहमत अली यांनीं लिहिलेलें "दि मिल्लत् ऑफ् इस्लाम् अँड् दि मीनेस् ऑफ् 'इंडियानिझम्'" नांवाचें पत्र, पृ. १ ते १६.

आक्रमणें देखील धार्मिक निष्ठेपेक्षां ऐहिक धनाच्या लालसेनेंच प्रेरित झालीं होतीं. सुरुवातीच्या आक्रमणांना या देशाचे रहिवासी जे हिंदु त्यांनीं एकट्यांनींच तोंड दिलें. त्यामुळें त्यांच्या संघर्षाला हिंदु आणि मुसलमान यांच्यामधील लढायांचें स्वरूप प्राप्त झालें. सुरुवातीपासूनच मुसलमानी आक्रमकांची इच्छा या देशांत वस्ती करून राहण्याची होती. अकराव्या शतकांतील शहाबुद्दिन घोरीपासून पुढें जे पठाण, तार्तर, तुर्क, मोंगल किंवा अफगाण आक्रमक हिंदुस्थानवर चाल करून आले त्यांनीं देशाच्या कांहीं भागांवर आपलें राज्य स्थापन करून तेथून आपल्या राज्याच्या चतुःसीमा वाढविण्याचे उद्योग चालवले. राज्यविस्तार वाढत गेला तसें आपल्या दिल्लीच्या राजधानींत बसून राज्याची व्यवस्था ठेवणें त्यांना मुष्किल होऊं लागलें. त्यामुळें राज्याच्या दूरच्या प्रदेशांवर सुभेदार नेमणें त्यांना अवश्य झालें. मध्यवर्ती सत्ता दुर्बळ झाली कीं त्या संधीचा फायदा घेण्यास व स्वतःला स्वतंत्र राज्यकर्ते म्हणून जाहीर करण्यास हे सुभेदार हयगय करीत नसत. त्यामुळें हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या राजवटीच्या काळांत आपणांला दोन प्रकारचीं युद्धें आढळून येतात. दिल्लीच्या बादशहांना हवे असलेले अनेक प्रदेश प्रारंभींच्या काळांत हिंदूंच्या ताब्यांत असल्याकारणानें आपलें राज्य वाढविण्यासाठीं त्यांना साहजिकच हिंदूंच्या बरोबर युद्धें करावीं लागलीं. पण पुढें लवकरच मुसलमानांचीं स्वतंत्र राज्यें देशांत प्रस्थापित झालीं आणि मग दिल्लीच्या बादशहांना हिंदूंच्या विरुद्ध नव्हे तर स्वतंत्र मुसलमान बादशहांविरुद्ध किंवा बंड करून स्वतःच राजे बनलेल्या मुसलमान सुभेदारांविरुद्ध मोहिमा काढाव्या लागल्या. या स्वाऱ्यांत व लढायांत हिंदु लोक दोन्ही पक्षांकडून लढत असल्याचें दिसून येतें. घोरीच्या पाठीमागून जे मुसलमान आक्रमक हिंदुस्थानवर चाल करून आले त्यांना येथल्या मुसलमानी राज्यावरच हल्ले चढवावे लागले आणि दिल्लीच्या तख्तावर जो कोणी मुसलमान बादशहा असेल त्याच्याशीं दोन हात करून त्याला परास्त करावें लागलें. तैमूरच्या व नादिरशहाच्या स्वाऱ्या झाल्या त्या दिल्लीच्या बादशाहीवरच झाल्या आणि

दिल्लीच्या बादशहांनींच त्यांच्या स्वाऱ्यांना तोंड दिलें. मोंगल साम्राज्य प्रस्थापित करण्यापूर्वी बाबराला इब्राहिम लोदी या मुसलमान राज्यकर्त्यालाच पानपताच्या समरांगणावर लोळवावें लागलें ! मेवाडच्या संग राण्याशीं बाबराचें युद्ध जुंपलें तेव्हां संग राण्याच्या बाजूला फक्त रजपूतच होते असें नाहीं. मेवाडचा हसनखान आणि शिकंदर लोदीचा पुत्र महंमद लोदी हे संगाच्या बाजूला होते. महंमद लोदीला दिल्लीचा राजा म्हणून संगानें मान्यता दिलेली होती. १५२७मध्यें कानव्याच्या लढाईत या त्रिवर्गांच्या हिंदुमुसलमान फौजांचा पाडाव केल्यानंतरच बाबराचें साम्राज्य सुस्थिर झालें. हुमायूनचें राज्य कांहीं वर्षे शेर शहा नामक मुसलमान पठाणाच्या हातीं गेलें होतें. शेर शहाच्या मृत्यूनंतर तें परत हातीं आल्यावर राज्याला बळकटी आणण्यासाठीं अकबराला मुसलमान राज्यकर्त्यांशींच युद्धें खेळावीं लागलीं. प्रांतांवर नेमलेल्या सुभेदारांचीं बंडें मोडून काढण्यांत व स्वतंत्र मुसलमानी बादशाह्या जिंकून घेण्यांत अकबरापासून थेट औरंगझेबापर्यंतच्या सर्व मोंगल सम्राटांचा किती तरी काळ व त्यांचे किती तरी श्रम खर्ची पडलेले आहेत ! विजापुर व गोवळकोंडा येथील बादशाह्या नेस्तनाबूद करण्यासाठीं औरंगझेबाला किती तरी वर्षे दक्षिणेंत तळ ठोकावा लागला होता ! यांपैकीं अनेक मोहिमा दिल्लीच्या बादशहांच्या वतीनें हिंदु सेनापतींच्याच नेतृत्वाखालीं पार पडलेल्या आहेत. अकबराचे सेनापति मानसिंग व भगवानदास आणि औरंगझेबाचे सेनानी जसवंतसिंग व जयसिंग यांनीं केवळ मुसलमान राज्यकर्त्यांचा व सुभेदारांचाच बंदोबस्त केला असें नाहीं; देशांत राज्य करणाऱ्या हिंदु राजांचाहि त्यांनीं समाचार घेतला. तात्पर्य, मुसलमानांच्या अमदानींत हिंदुस्थानवर व हिंदुस्थानांत ज्या स्वाऱ्या वगैरे झाल्या त्या हरएक युगांतील हरएक युद्धाला कारणीभूत होत असणाऱ्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, घराण्या–घराण्यांतील यादवी, साम्राज्य–तृष्णा वगैरे हेतूंमुळेंच झाल्या हें स्पष्ट आहे.

म्हणून इ. स. १२०६मध्यें कुतबुद्दिन ऐबकानें आपलें राज्य प्रस्थापित केल्यापासून अठराव्या शतकाच्या अखेरीला इंग्रजांचा पाय येथें घट्ट होई-

पर्यंतच्या सहाशें वर्षांचा जो इतिहास आहे तो, एका बाजूला हिंदु व दुसऱ्या बाजूला मुसलमान यांच्यामध्यें अव्याहत चाललेल्या लढ्यां–झगड्यांचाच इतिहास आहे हें खरें ठरत नाहीं. या काळामध्यें हिंदु–मुसलमानांत जेवढे झगडे झाले त्यांपेक्षां अधिक झगडे मुसलमानां–मुसलमानांत झाले हें सिद्ध करून दाखवण्याचें हें स्थळ नव्हे आणि त्यासाठीं लागणारी जागाहि आपणां-पाशीं नाहीं. तेव्हां त्या घटनांकडे केवळ धांवता दृष्टिक्षेप टाकणेंच आपणांस शक्य होईल.

दिल्लीला सुलतानांचें राज्य होतें तो पहिला व मोंगल अमदानी चालू होती तो दुसरा, असे या कालाचे दोन खंड कल्पितां येतील. पहिल्या कालखंडामध्यें मुसलमानांची सत्ता हिंदुस्थानांत नुसती रूढ झाली येवढेंच नव्हे तर हिमा-लयापासून रामेश्वरम्‌पर्यंतचा व पश्चिम–समुद्रापासून पूर्व–समुद्रापर्यंतचा सारा देश त्यांच्या हातीं आला आणि मुसलमानांच्या आधिपत्याखालीं अनेक स्वतंत्र व अर्ध–स्वतंत्र राज्यें देशांत प्रस्थापित झालीं. दिल्लीच्या तख्तावर अनेक वंशांचे बादशहा आले व गेले. हिंदूंपासून हिंदुस्थानचा प्रदेश जिंकून घेण्यांत, आपल्याच अधिकाऱ्यांनीं बळकावलेले सुभे परत जिंकण्यांत आणि कधीं कधीं आपलें आसन संभाळून ठेवण्यांत दिल्लीच्या सुलतानांची हयात गुजरत असे. ११९३ ते १५२६च्या दरम्यान पांच घराण्यांतले ३५ सुलतान दिल्लीच्या गादीवर बसले. प्रत्येक घराणें धर्मानें इस्लामीच होतें. एका घराण्याला उख-डून त्याची जागा बळकावणारें दुसरें घराणेंहि इस्लामीच असे. या पस्तीस बादशहांपैकीं एकोणीस बादशहांचे खून झाले; ते कांहीं हिंदूंनीं केले नाहींत, मुसलमानांनींच केले !

जीं स्वतंत्र व अर्ध–स्वतंत्र राज्यें त्या काळांत उदयास आलीं त्यांतल्या पुढील राज्यांचा उल्लेख करण्यासारखा आहेः—बंगाल, जौनपूर, गुजराथ, माळवा, खानदेश आणि बहामनी. या बहामनी राज्याचे पुढें तुकडे पडून त्याचीं वऱ्हाड, अहमदनगर, विजापुर, गोवळकोंडा व बिदर अशीं पांच राज्यें झालीं. वरील प्रत्येक राज्याचा स्वतंत्र इतिहास आहे आणि तो, शेजारच्या

मुसलमान राजांशीं व दिल्लीच्या बादशहाशीं, त्याचप्रमाणें क्वचित् प्रसंगीं देशांत तत्कालीं देखील टाण मांडून बसलेल्या हिंदु राजांशीं झालेल्या लढ्यां–झगड्यांनीं भरलेला आहे.

हिंदुस्थानांतील मुसलमान राज्यकर्त्यांना वेळोवेळीं वायव्य सरहद्द ओलांडून चाल करून येणाऱ्या मुसलमानांशीं मुकाबले करावे लागत असत. हें काम इतकें नित्याचें होऊन बसलें होतें कीं अल्लाउद्दीनच्या वेळेपासून अशा प्रकारच्या आक्रमणांना तोंड देतां यावें म्हणून सरहद्दीवर कांहीं ना कांहीं तरी प्रकारचा बंदोबस्त नेहमीं सज्ज ठेवावा लागे.

बाबरानें १५२६मध्यें इब्राहिम लोदीचा पानपतच्या मैदानावर पराभव करून मोंगल साम्राज्याचा पाया घातला. परंतु दिल्लीचें तख्त म्हणजे फुलांची शेज नव्हे हें त्याच्या वंशजांच्या प्रत्ययास आलें. त्याचा मुलगा जो हुमायून त्याला आपल्या कामरान नामक भावाबरोबर लढाई करावी लागली. कामरान बापाकडून मिळालेल्या 'काबूल व कंदाहार'च्या राज्यावर समाधान मानण्यास तयार नव्हता. त्यानें सगळा पंजाब प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. दुसरे दोघे बंधु हिंदाल व मिर्झा अस्करी यांच्याशींहि हुमायूनला दोन हात करावे लागले. हिंदाल लढाईत कामास आला व कामरान कैद झाला. त्याचे डोळे काढण्यांत आले. अस्करीलाहि अटक करण्यांत आली होती; पण त्याला कामरानप्रमाणें मक्केच्या यात्रेला जाण्याची परवानगी देण्यांत आली.

उत्तर हिंदुस्थानांत आपलें स्थान कायम ठेवण्यासाठीं हुमायूनला सतत झगडा करावा लागला. गुजराथच्या बहादुरशहाचें पारिपत्य करण्यासाठीं त्याला गुजराथवर स्वारी करावी लागली. पण शेरखानानें उचल केल्यामुळें त्याला गुजराथेवरील ताबा टिकविणें अशक्य झालें. बहारच्या या अफगाण राज्यकर्त्याकडूनच अखेर हुमायूनला हार खावी लागली व राज्य गमावून हिंदुस्थानांतून परागंदा होऊन पर्शियाच्या बादशहाकडे मदतीसाठीं पदर पसरावा लागला!

शेरशहानंतर त्याचा मुलगा सलीमशहा गादीवर आला. त्याचे अफगाण

उमराव अनावर झाल्यामुळें त्यांपैकीं कित्येकांना कैदखाना दाखविणें किंवा यमसदनास पाठविणें त्याला भाग पडलें. पंजाबच्या सुभेदारानेंहि बंड केलें; पण त्याचा पराभव झाल्यावर तो काश्मिरांत पळून गेला व तेथेंच मरण पावला.

सलीमशहाच्या मागून त्याचा मुलगा फिरोझशहा तख्तनशीन झाला. पण पुढें लवकरच त्याचा मामा मुबारिझखान यानें त्याचा खून केला आणि महंमदशहा हें नांव धारण करून तो स्वतःच गादीवर बसला. त्याचा कारभार हेमू नांवाचा हिंदु पाहत असे. त्याच्या उमरावांनीं बंडावा मांडला आणि दिल्ली व आग्रा हीं शहरें इब्राहिम सुर यानें बळकावलीं. इब्राहिम सुराचा पराभव शिकंदर सुरानें केला. हुमायून अश्या संधीची वाटच पाहत होता. त्यानें हिंदुस्थानांत माजलेल्या गोंधळ–गडबडीचा फायदा घेऊन हिंदुस्थानवर स–सैन्य चाल केली. सरहिंद येथें त्यानें शिकंदर सुराचा पाडाव केला. अशा प्रकारें १५५५मध्यें आपलें राज्य त्यानें परत जिंकून घेतलें. पण त्यानंतर लवकरच त्याचें देहावसान झालें.

हुमायूनच्या पश्चात् अकबराला राज्यपद मिळालें. त्याचा धाकटा भाऊ महंमद हकीम याच्या ताब्यांत काबूलचें राज्य होतें. त्या वेळीं काबूलला हिंदुस्थानचें नाममात्र मांडलिक राज्य असें समजण्यांत येत असे. अकबर त्या वेळीं अल्पवयस्क असून बैरामखान हा त्याचा पालक होता. हेमूनें दिल्लीवर स्वारी करून मोंगलांचा सेनापति फरीदबेग याचा पराभव केला. या त्याच्या नालायकीबद्दल बैरामनें त्याला देहांताची शिक्षा दिली. हेमूनें विजयानंतर विक्रमादित्य हें बिरुद धारण करून साम्राज्य–संपादनाची महत्त्वाकांक्षा धरली. पण त्याचा पानपतावर पराभव होऊन बैरामनें त्याचा वध केला. त्यानंतर शिकंदर सूर शरण आल्याकारणानें सूर घराणें १५५६मध्यें संपुष्टांत आलें.

बैरामखानच्या पालकत्वाला अकबर कंटाळून गेला होता. त्याची आई हमिदा बेगम, दूध–आई माहाम आकाह् व दूध–भाऊ अधामखान यांचीहि त्याला फूस होतीच. अकबरानें १५६०मध्यें बैरामखानाला कामावरून दूर केलें. बैरामखानानें अधिकाराचीं सूत्रें खालीं ठेवण्याचें कबूल केलें व तो

मक्केच्या यात्रेसाठीं निघाला. तो कदाचित् बंड करील अशी शंका आल्यामुळें त्यानें यात्रेला लवकर निघावें म्हणून अकबरानें पीर महंमदला सैन्य देऊन त्याच्या मागोमाग पाठवलें. यामुळें चिडून जाऊन बैरामखानानें बंड केलें आणि तो पंजाबच्या रोखानें निघाला. स्वतः अकबर त्याच्या पाठलागासाठीं निघाला. तो पुन्हां शरण आला तेव्हां त्याची पूर्वींची सेवा लक्षांत घेऊन अकबरानें त्याला पुनरपि मक्केला जाण्याची परवानगी दिली. पण यात्रेच्या वाटेवर असतां गुजराथमध्यें पाटण मुक्कामीं एका जुन्या वैऱ्यानें बैरामचा खून केला.

अकबराचे सेनापति पीर महंमद व अधामखान यांनीं अत्यंत क्रूरपणें माळव्याचें राज्य तेथील मुसलमान राजाकडून जिंकून घेतलें.

अकबराला पुढील बंडांचा बीमोड करावा लागला:—(१) माळव्यांत पीर-महंमदाच्या जागीं नेमण्यांत आलेल्या अब्दुल्लाखान उझबेग याचें, (२) जौन-पुरमध्यें खान झमानचें, (३) उझबेगांनीं सिंहासनावरील हक्क उचलून धर-लेल्या मिर्झा हकीम नामक स्वतःच्या भावाचें.

मुझफ्फर शहापासून अकबरानें १५७३मध्यें गुजराथ प्रांत जिंकून घेतला. अकबराच्या कारकीर्दींतली ही फार महत्त्वाची घटना आहे.

शेर शहाच्या कारकीर्दींत बंगालचें आधिपत्य अफगाण उमरावांकडे असे. परंतु १५६४मध्यें बहारच्या सुलेमानखानानें गौर कबजांत घेतलें व तो स्वतःच 'बहार व बंगाल'चा स्वामी बनला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बायाझिद राज्यावर आला. परंतु त्याच्या प्रधानांनीं त्याचा खून करून त्याचा धाकटा भाऊ दाऊद याला गादीवर बसवलें. दाऊदनें झमानियाचा किल्ला बळकावल्या-कारणानें तो बादशहा अकबराच्या रोषास पात्र झाला होता. अकबरानें आपला सेनापति मुनिमखान याला त्याच्या पारिपत्यासाठीं रवाना केलें व पाठोपाठ खुद्द अकबरहि निघाला. १५७६मध्यें लढाईत पराभव होऊन दाऊद मारला गेला आणि बंगाल व बहार साम्राज्याला जोडून टाकण्यांत आले. पुढें १५९२-मध्यें ओरिसा पादाक्रांत करण्यांत आला.

बंगालची सुभेदारी मुझफ्फरखान तुर्बातीला देण्यांत आली. त्याचा कडक

अंमल व अन्याय्य जमीन—महसुलाची पद्धति यांच्यामुळें स्थानिक राजेरजवाडे कावून गेले होते. अकबराची 'सुलह्—इ—कुल'ची म्हणजेच सर्व—धर्म—सम-भावाची भूमिका मुसलमानांत अप्रिय होत चालली होती. जौनपुरच्या काझीच्या संमतीनें उलेमांनीं फतवा काढला कीं बादशहाविरुद्ध हत्यार उचलणें कायद्या-विरुद्ध नाहीं. या वातावरणाचा फायदा घेऊन चगताईपैकीं काकशाल नांवाच्या एका प्रतिष्ठित जमातीनें बाबा खान यांच्या नेतृत्वाखालीं बंड पुकारलें व गौरवर त्यांनीं चाल केली. बादशहानें त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं तोडर-मल्ला रवाना केलें. इकडे मुझफ्फरखान मारला गेला व बहार व बंगाल हे दोन्ही प्रांत बंडखोर काकशालांच्या हातीं लागले. तथापि अखेरीस त्यांचें बंड मोडून काढण्यांत आलें.

हकीम पुन्हां पंजाबवर चालून आला; पण अकबरानें त्याला पिटाळून लावलें. १५८५मध्यें हकीम वारल्यानंतर काबूलचें राज्य दिल्लीला जोडण्यांत आलें आणि तेथलीं अधिकारसूत्रें राजा मानसिंगाच्या हातीं देण्यांत आलीं. सरहद्दी-वरील जमातींनाहि नरम आणण्यांत आलें. काश्मीरच्या मुसलमान राज्यकर्त्याला दांतीं तृण धरावयास लावून तें राज्य तद्वत्च मिर्झा जानीचें सिंधमधील राज्य मोंगली साम्राज्यांत सामील करण्यांत आलें. कंदाहारचा कबजा १५९५-मध्यें घेण्यांत आला. हिंदुस्थान आणि हिंदुकुश पर्वतापलीकडील अफगाण मुलूख स्वाधीन करून घेतल्यावर अकबर दक्षिणेकडे वळला. बुऱ्हान निझाम-शहाची बहीण चांदबिबी हिचा तडफदार प्रतिकार मोडून काढून अकबरानें सन १६००मध्यें अहमदनगर घेतलें. नंतर बऱ्हाणपुरावर चाल करून त्यानें खानदेशचा राज्यकर्ता मिरान बहादुर याच्यापासून १६०१मध्यें आसिरगढ घेतला.

दख्खनकडे अकबर निघाला तेव्हां त्यानें राजधानीच्या बंदोबस्तासाठीं मागें शहाजादा सलीम याला ठेवलें होतें व मानसिंग आणि शाह कुलीखान यांच्या-सह मेवाडवर स्वारी करावी असा आदेश देऊन ठेवलेला होता. पण शहा-जाद्यानें बंड उभारलें व आपण स्वतंत्र असल्याचें जाहीर केलें. अकबर दक्षिणे-

करून परतला. अलाहाबाद येथें सलीमनें सवता सुभा स्थापन केला; पण अखेरीस त्यानें अकबराची क्षमा मागितली. दरबारी लोकांनीं कारस्थान करून सलीमच्या ऐवजीं त्याचा वडील मुलगा खुश्रू याला गादीवर बसवण्याचा घाट घातला होता. पण तें कारस्थान फसलें व अकबराच्या मृत्यूनंतर १६०५मध्यें जहांगीर हें नांव धारण करून सलीमच गादीवर बसला.

आग्रयाहून निसटून अनेक उमरावांच्या मदतीनें स्वतःच्या मुलानें—खुश्रूनें उभारलेलें बंड मोडण्याचें काम सलीमला प्रथम हातीं घ्यावें लागलें. खुश्रूचा पराभव होऊन त्याला गिरफ्तार करण्यांत आलें व बेड्या ठोकून त्याला बादशहासमोर उभें करण्यांत आलें. त्याला कैदेंत ठेवण्यांत आलें व त्याच्या अनुयायांना जबर शिक्षा करण्यांत आल्या. खुश्रूचें वागणें फार मिठास असल्याकारणानें कारस्थानी लोकांचें कडें पुन्हां त्याच्याभोंवतीं जमलें आणि बादशहाला ठार करून खुश्रूच्या नांवें द्वाही फिरवण्याचा मनसुबा रचण्यांत आला. परंतु हेंहि कारस्थान उघडकीस आलें. तेव्हां खुश्रूचे डोळे काढण्यांत येऊन त्याला कित्येक वर्षें भुयारामध्यें एकांतवासांत ठेवण्यांत आलें. १६१६मध्यें त्याचा हाडवैरी जो असफ़खान त्याच्या हवालीं खुश्रूला करण्यांत आलें. असफ़खानानें त्याला शहाजहानच्या हातीं सुपूर्द केलें आणि शहाजहाननें १६२२मध्यें त्याचा वध करवला. त्याच्या मृत्यूनंतर जहांगीरला पश्चात्ताप झाला आणि त्याच्या शवाचें मोठ्या इतमामानें पुनरपि दफ़न करण्यांत आलें. ती जागा 'खुश्रू—बाग' म्हणून अलाहाबादमध्यें अजून प्रसिद्ध आहे. खुश्रू हा शहाजहानचा प्रतिस्पर्धी होता त्याचप्रमाणें नूरजहानचा जांवई शहरियार हाहि त्याचा प्रतिस्पर्धी होता. शहाजहाननें देखील सन १६२२मध्यें बापाविरुद्ध बंड पुकारलें आणि बादशहाच्या मृत्यूपर्यंत त्याचा बंडावा चालूच राहिला. यशापयशाची चव चाखीत बरींच वर्षें त्यानें काढलीं आणि आपले मुलगे दारा व औरंगझेब यांना दरबारांत ओलीस म्हणून पाठवण्याचा प्रसंगहि त्याच्यावर आला. बंगालमधील अफ़गाणांचीं व आपल्या महाबतखानसारख्या उमरावांचीं बंडेंहि जहांगीरला मोडावीं लागलीं. महाबतखाननें तर एकदां जहांगीर व नूरजहान यांनाच कैद

केलें होतें ! १६२०मध्यें कांग्र्याच्या कब्जासाठीं काढलेली मोहीम व अकबराच्या कारकीर्दीपासून प्रतिकार करीत राहिलेल्या मेवाडला चीत करण्यासाठीं काढलेली मोहीम या जहांगीरनें हिंदूंच्या विरुद्ध काढलेल्या दोन महत्त्वाच्या मोहिमा होत. मध्यंतरीं पर्शियननांनीं वेढा घालून कंदाहार जहांगीरपासून जिंकून घेतलें.

जहांगीरच्या मृत्यूनंतर तख्त मिळवण्याचा प्रयत्न शहरियारनें करून पाहिला; पण त्यांत तो अयशस्वी ठरला. त्याला कैद करून त्याचे डोळे काढण्यांत आले. आपला सासरा असफ़खान याच्या मदतीनें आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांची रवानगी यमसदनास करून शहाजहान सम्राट् बनला. असफ़खानानें राजघराण्यांतल्या दरोबस्त राजपुत्रांची निर्दयपणें कत्तल केली ! अनेक राजस्त्रियांनीं आत्महत्या केल्या. शहाजहानचें मूळचें नांव 'खुर्रम' होतें. दख्खनच्या मुसलमान राज्यावर त्यानें चढवलेल्या मोहिमेवरून जहांगीरनें त्याला शहाजहान ही पदवी बहाल केली होती. १६२८मध्यें तख्तनशीन झाल्यावर शहाजहानला बुंदेल्या राजाचें बंड मोडावें लागलें. पुढच्याच वर्षी त्यानें खान जहान लोदी या दख्खनच्या बंडखोर सुभेदाराचेंहि पारिपत्य केलें. लोदी व त्याचे शंभर अनुयायी यांचीं डोकीं उडवण्यांत आलीं !

अकबरानें खानदेश (१५९९) व अहमदनगर (१६००) जिंकून आपल्या साम्राज्यांत सामील करून घेतलीं होतीं. पण अहमदनगर कधींच पूर्णपणें त्याच्या अंकित झालें नाहीं. मलिक अंबरच्या यशस्वी प्रतिकारामुळें जहांगीरच्या कारकीर्दीत अहमदनगरवर कबजा करण्याचे मनसुबे विशेष यशस्वी झाले नाहींत. शहाजहानचे विजय देखील क्षणजीवीच ठरले आणि दख्खनचे सुलतान तसेच ताठर राहिले ! परंतु १६३३मध्यें अहमदनगरच्या राज्याची इतिश्री झाली. विजापुर व गोंवळकोंडा हीं राज्यें मात्र तशींच स्वतंत्र राहिलीं. विजापुरकरांनीं अहमदनगरला सहाय्य केलें आणि शहाजीनें निझामशाहींतल्या एका राजपुत्राला गादीवर बसवलें म्हणून बादशहाला कोप आला होता. त्यांना धडा देण्यासाठीं बादशहानें आपले सेनापति तिकडे धाडले. त्यांनीं गोवळकोंड्याच्या बादशहाला शरण येण्यास लावलें. हा दणका

पाहून विजापुरकरांनींहि बादशहाचें आधिपत्य मान्य केलें. त्यानंतर दख्खनचा सुभेदार म्हणून औरंगझेबाची नेमणूक झाली. पण हा सलोखा फार काळ टिकला नाहीं. पुन्हां लढाया सुरू होऊन मोंगलॅ फौजांनीं बिदर घेतलें. विजापुरकरांना गुलबर्ग्यास नामोहरम करण्यांत आलें व १६५८मध्यें वेढा घालून 'कल्याणी' किल्ल्याचा पाडाव करण्यांत आला. या लढ्याचीं राजकीय कारणें कांहींहि असलीं तरी दख्खनचे सुलतान शिया होते हेंहि दिल्लीच्या सुन्नी बादशहाचा त्यांना चिरडण्याचा जो प्रयत्न चालला होता त्याचें एक कारण होतेंच.

जहांगीरच्या कारकीर्दींत पर्शियनांनीं कंदाहार जिंकून घेतलें होतें तें परत मिळवण्याचे अनेक प्रयत्न शहाजहानच्या कारकीर्दीमध्यें करण्यांत आले. ते बेत सिद्धीस जाऊन १६३९मध्यें तें परत मोंगलांच्या ताब्यांत आलें, तो प्रकार असाः—तेथील पर्शियन् सुभेदार अली मर्दानखान याच्यासंबंधीं पर्शियाच्या शहाला संशय आला. शहा आपलें पारिपत्य करील या भीतीनें अली मर्दाननें शहाजहानला बोलावणें पाठवलें. तेव्हां मोंगल फौज शहरावर चालून आली व तिनें सहजासहजीं शहराचा ताबा मिळवला. पण पार्शियनांनीं चिकाटी सोडली नाहीं. त्यांनीं १६४९मध्यें पुन्हां कंदाहारावर ताबा मिळविला. दिल्लीच्या बादशहाच्या तर्फे अनेक स्वाऱ्या कंदाहारवर करण्यांत आल्या, कंदाहारला वेढे घालण्यांत आले; पण या मोहिमांवर बारा कोटि रुपये खर्च करूनहि यश पदरांत पडलें नाहीं तें नाहींच !

बल्ख व बदख्शान जिंकून घेण्याचाहि शहाजहाननें प्रयत्न करून पाहिला. राजपुत्र मुराद याला मोठ्या सैन्यानिशीं त्या कामगिरीवर रवाना करण्यांत आलें. बोखाऱ्याचा अधिपति नाझ महंमदखान व त्याचा मुलगा यांच्यांतील वैमनस्याचा फायदा घेऊन मुरादनें १६४६मध्यें बल्खमध्यें प्रवेश मिळविला. नाझ महंमद पळून गेला. परंतु मुराद तेथें राहिला नाहीं; तो हिंदुस्थानला परतला. म्हणून दुसरी मोहीम औरंगझेबाच्या अधिपत्याखालीं काढण्यांत आली. प्रथम समोरासमोर लढाईला तोंडच लागेना. पण जेव्हां मोंगलांनीं व रजपुतांनीं बंदुका डागल्या तेव्हां उझ्बेग–फौज रण सोडून गेली आणि औरंग-

झेबानें मोठया इतमामानें बल्खमध्यें प्रवेश केला. औरंगझेबानें तेथील अधिकार माधुसिंग हाडा या रजपूत राजाच्या हातीं सुपूर्द केले. औरंगझेब तसाच पुढें निघाला, पण वाटेंत फार अडचणी आल्याकारणानें त्याला निरुपाय होऊन परत फिरावें लागलें. माघारीं येतांना त्याच्या सैन्याचे फार हाल झाले आणि मागें राहिलेले रजपूत अन्नपाण्यावांचून तडफडून मृत्युमुखीं पडले! ही मोहीमहि अयशस्वी झाली. तिला चार कोटि रुपये खर्च आला.

१६५७च्या सप्टेंबरांत शहाजहान आजारी पडला. तो मेला अशी बातमी पसरल्यामुळें जनतेंत अस्वास्थ्य माजून गादीसाठीं लढाया सुरू झाल्या. दारा, शुजा व मुराद या आपल्या भावांना कंठस्नान घालून औरंगझेबानें राज्यपद कसें मिळवलें ती हकीकत सर्वश्रुतच आहे. विजापुर व गोवळकोंडा यांच्या विरुद्ध त्याला दीर्घकाळपर्यंत कसें झगडावें लागलें तें मागें येऊन गेलेंच आहे. २५० वर्षांच्या उज्ज्वल कारकीर्दीनंतर तीं दोन्ही राज्यें लयास गेलीं.

औरंगझेबाचा फौजेंत ज्याप्रमाणें हिंदु सेनापति असत त्याचप्रमाणें त्याच्या हिंदु प्रतिस्पर्ध्यांच्या म्हणजे शिवाजीच्या पदरीं देखील अनेक मुसलमान सैन्याधिकारी असत. त्यांपैकीं सिद्दी हुलाल व नूरखान वगैरे कांहीं लोक सेनापतीसारख्या मोठया हुद्द्यावर होते. शिवाजीच्या आरमारांत सिद्दी संबळ, सिद्दी मिस्त्री व दौलतखान असे निदान तीन तरी मुसलमान दर्यासारंग होते असें दिसतें.'[1]

आपसांत मारामाऱ्या करण्यापलीकडे हिंदुस्थानांतील मुसलमान राज्यकर्त्यांनीं कांहींच केलें नाहीं हें दाखविण्याच्या हेतूनें कांहीं येवढी लांबलचक ऐतिहासिक समालोचना मीं केलेली नाहीं. वास्तविक त्यांनीं दुसरीं किती तरी कार्यें केलीं आहेत! वैभवाच्या शिखराला पोंचलेलें साम्राज्य त्यांनीं स्थापन केलें, कलांना त्यांनीं उत्तेजन दिलें आणि हिंदुस्थानचें एक–राष्ट्रीय राज्य प्रस्थापित करण्याच्या कामांत दीर्घकालीन प्रयत्नानंतर त्यांना यश आलें. अर्थात् तत्कालीन जगांत इतर ठिकाणीं असलेल्या राज्यांप्रमाणेंच या राज्याचेंहि स्वरूप

१. मेहता व पटवर्धन : दि कम्यूनल् ट्रँगल् (त्रिपक्षीय संघर्ष), पृ. १८.

होतें. सहाशें वर्षांपेक्षां अधिक काल त्यांनीं हिंदूंना छळलें, त्यांच्याशीं त्यांच्या सदैव लढायाच चालू होत्या आणि त्यामुळें हिंदु-मुसलमानांत वैमनस्याची व कटुतेची अशी कांहीं भावना निर्माण झालेली आहे कीं ती पुसली किंवा विसरली गेलेली नाहीं आणि ती पुसणें अथवा विसरणें शक्यहि नाहीं, अशा प्रकारच्या ज्या कल्पना कांहीं लोकांनीं केलेल्या आहेत त्या मान्य करणें म्हणजे इतिहासाचा एकांगी विचार करण्याप्रमाणें असून हिंदूंच्यापेक्षां मुसलमानांच्या बरोबरच मुसलमानांचे अधिक झगडे झालेले आहेत ही वस्तुस्थिति नजरेला यावी येवढ्याच हेतूनें मीं हीं उदाहरणें दिलीं आहेत.

हिंदुस्थानबाहेरील चीन, मलाया, व ब्रह्मदेश या पूर्वेच्या प्रदेशांत आणि अरबस्थान, पर्शिया, अफगाणिस्थान, ईजिप्त, तुर्कस्थान, सायरेनाइका, ट्रिपोली व खुद्द युरोप या पश्चिमेकडील देशांत, ब्रिटिशांच्या सैन्यांतील हिंदी पलटणींना लढावयास पाठवल्याचे दाखले अलीकडच्या इतिहासांत मिळतात. टर्कीचें साम्राज्य धुळीस मिळविण्याच्या कामांत मुसलमान शिपायांनीं मदत केलेली आहे. विरुद्ध बाजूला मुसलमानी राष्ट्र आहे कीं काय याची त्यांनीं कधींहि कदर केलेली नाहीं. बरें, यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं आहे असेंहि नाहीं. हिंदुस्थानबाहेरच्या इस्लामी देशांचा इतिहास पाहूं गेलें तर मुसलमान मुसलमानांशीं लढल्याचें, एका मुसलमान राजाशीं किंवा देशाशीं लढून, त्याला पराभूत करून, त्याला जिंकल्याची हवीं तितकीं उदाहरणें सांपडतील !

मुसलमानानें मुसलमानाचें रक्त सांडूं नये असा पैगंबरांचा आदेश होता. त्यांच्या हयातींतच कांहीं प्रसंग असे आले कीं लढाई चालू असतां एकाद्यानें आपण मुस्लिम असल्याचें जाहीर केल्यावर त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवावा कीं नाहीं याबद्दल शंका असल्यामुळें त्या माणसाला मारावें किंवा नाहीं असा मुद्दा उपस्थित झाला. अशा प्रसंगीं म्हणजे मनुष्यानें एकदां आपलें मतांतर झाल्याचें जाहीर केल्यानंतर त्याला मारूं नये, जीवदान द्यावें, असाच निर्णय पैगंबरांनीं दिलेला आढळतो. परंतु पैगंबरांच्या मृत्यूनंतर त्यांचा साक्षात् सहवास घडलेल्या अनुयायांना आणि त्यांच्या निकटवर्ती लोकांनाहि त्यांच्या या

आदेशाचा विसर पडला असावा. हजरत उस्मान हे केवळ खलिफाच होते असें नाहीं. पैगंबरांच्या दोन मुलींशीं त्यांचा विवाह झालेला असल्याकारणानें ते पैगंबरांचे निकटचे आप्त होते. तथापि त्यांच्या विरुद्ध बंड करणाऱ्या मुसलमानांनीं त्यांचा वध करण्यास कमी केलें नाहीं. चौथे खलिफा हजरत अली हे पैगंबरांचे चुलत भाऊ व जांवई होते. त्यांनाहि पैगंबरांच्या विधवा पत्नी हजरत आयेषा यांच्याशीं युद्ध करावें लागलें आणि तेहि शेवटीं हजरत उस्मानप्रमाणें मुसलमानांकडूनच मारले गेले! हजरत अलींच्या मुलांचीहि तीच अवस्था झाली. पैगंबरांच्या मृत्यूनंतर थोड्याच वर्षांत घडलेल्या या घटना आहेत. आणि त्या देखील हजरत अलीसारख्या खुद्द पैगंबरांच्या हातून पहिली धर्मदीक्षा मिळविणाऱ्या व्यक्तीच्या बाबतींत घडलेल्या आहेत. मग नंतरचे मुसलमान परस्परांशीं लढले असतील तर त्यांत नवल कशाचें?

प्राचीन काळच्या लढायांची गोष्ट तशी नसली तरी, मुसलमानांमध्यें ज्या लढाया पुढें पुढें झाल्या त्यांमध्यें इस्लामी धर्माचा, त्याच्या प्रसाराचा किंवा संरक्षणाचा कांहींच प्रश्न नव्हता. विजय मिळवून आपलें बस्तान नीट बसलें कीं प्रत्येक जेता किंवा राजा देशाच्या परिस्थितीकडे व प्रजाजनांकडे लक्ष देऊन जें करणें बिनधोक वाटेल किंवा फलदायी वाटेल तें करीत असे. राज्यकारभारावर व प्रजाजनांच्या जीवनावर म्हणजे राजा व प्रजा या दोघांवर इस्लामचा परिणाम खासच होत असे. पण या म्हणण्याचा असा अर्थ होत नाहीं कीं हिंदुस्थानांत किंवा बाहेरच्या देशांत राज्य करणाऱ्यांचें उद्दिष्टच इस्लामच्या प्रसाराचें किंवा संरक्षणाचें असे. हिंदुस्थानांत तर विशेषेंकरून मुसलमान राज्यकर्त्यांची व सर्वसाधारण मुसलमानांची स्थिति बेटांप्रमाणेंच होती. येथील अफाट जनतेच्या समुद्रांत त्यांचे गट लहानशा बेटांप्रमाणें असत व धर्मान्तरामुळें त्यांच्यांत एकसारखी भर पडत राही. स्वारी करण्यासाठीं किंवा जेते म्हणून जे मुसलमान परदेशांतून इकडे येत त्यांची संख्या येथील मुसलमानेतरांच्या मानानें अत्यल्प असे. सध्यां जी मुसलमानांची संख्या दिसत आहे तिच्यांतील फार मोठें प्रमाण धर्मान्तरामुळें मुसलमान बनलेल्या हिंदूंचें व त्यांच्या वंशजांचें आहे.

लष्करी मामल्यांमध्यें दोन्ही समाजांत जर इतका विश्वास, स्नेहभाव व सहकार्य दिसून येतात तर मुलकी कारभारांत सर्वसामान्य लोकांच्या व्यवहारांत तर त्या भावना अधिकच प्रमाणांत आढळाव्या असें तर्कबुद्धीला वाटणें सयुक्तिकच आहे आणि इतिहासांतील घटनांवरून या तर्काला पाठिंबाच मिळतो.

'हिंदूंना अधिकारावर नेमणें त्यांच्या राजवटींत अवश्यकच झालें होतें. गझनीच्या महमूदच्या पदरीं पुष्कळ हिंदु सैन्य होतें. मध्य–आशियांत तें सैन्य त्याच्या वतीनें लढलें आणि नियाल्तगिन या त्याच्या मुसलमान सेनानीनें बंड पुकारलें तेव्हां तें त्याच्या तिलक नांवाच्या हिंदु सेनापतीनें दडपून टाकलें. हिंदुस्थानांत कायम वास्तव्य करण्याचें कुतुबुद्दिन ऐबकानें निश्चित केल्यानंतर येथील मुलकी कारभाराशीं परिचित असलेल्या हिंदु अधिकारी–मंडळाला कामावर नेमण्यावांचून त्याला दुसरें गत्यंतरच नव्हतें. कारण त्यांच्यावांचून जमीन महसुलासकट साऱ्याच राज्यकारभाराच्या गाड्याला खीळ पडली असती. मुसलमान आपल्याबरोबर कांहीं कारागीर, कारकून वगैरे मंडळी घेऊन आले नव्हते. त्यांच्या इमारती हिंदूंनींच उभारल्या, त्यांचीं शिक्के–नाणीं येथील टांकसाळींतच पाडण्यांत आलीं आणि त्यांचे जमाखर्च हिंदु कारकुनांनींच लिहिले. हिंदूंच्या कायद्याच्या बाबतींत हिंदु पंडितांकडूनच सुलतानाला सल्ला मिळत असे आणि ब्राह्मण ज्योतिषीच त्याला ग्रहमान सांगत असत.[१] पहिल्या इब्राहिम अदिलशहाच्या (इ. स. १५३४–१५५८) कारकीर्दीबाबत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं तेव्हांपासून सार्वजनिक जमाखर्च पर्शियनच्या ऐवजीं हिंदीमध्यें ठेवण्यांत येऊं लागले आणि त्या कामावर ब्राह्मण लोकांची नेमणूक झाल्याकारणानें लवकरच त्यांना सरकारांत मोठें महत्त्व प्राप्त झालें. युसुफ अदिलशहाच्या कारकीर्दींत हिंदूंना महसूल खात्यांत बरेच अधिकार प्राप्त झाले होते.'[२]

---

१. ताराचंद : इन्फ्ल्युअन्स् ऑफ् इस्लाम् ऑन् इंडियन् कल्चर् (हिंदी संस्कृतीवर इस्लामचा झालेला परिणाम), पृ. १३६–१३७.

२. एन्. एन्. लॉ : प्रमोशन् ऑफ् लर्निंग इन् इंडिया ड्यूरिंग महॉमेडन् रूल् (भारतांत मुसलमानी अमदानींत झालेली विद्येची वाढ), पृ. ९३.

सुलतान महंमद तघलकाच्या पदरीं 'अनेक हिंदु अधिकारी होते. त्याच्या जमाबंदी–खात्यांतला सर्वांत वरिष्ठ अधिकारी रतन नांवाचा हिंदु होता. अकबराचा प्रख्यात अर्थसचिव जो राजा तोडरमल त्यानें राज्यकारभारांत पुष्कळ दूर–गामी सुधारणा घडवून आणल्या. राज्यांतल्या सर्वोच्च अधिकाऱ्यांमध्यें त्याची गणना होती. औरंगझेबाचा अर्थसचिव रघुनाथ हा देखील हिंदुच होता.'[1]

अजूनहि हिंदी संस्थानांतून हिंदु–मुसलमानांच्या नेमणुकी सर्वश्रेष्ठ पदावर होतात, तेथें धर्मभेदाचा प्रश्न आडवा येत नाहीं. हैदराबादचे महाराजा सर् किशन प्रसाद यांचें, तसेंच म्हैसूरचे (आतां जयपुरचे) सर् महंमद इस्माईल यांचें उदाहरण याबाबत देण्यासारखें आहे.

ब्रिटिशांच्या विरुद्ध १८५७मध्यें झालेलें बंड हिंदुमुसलमानांनीं मिळूनच केलें होतें. दिल्लीचा नाममात्र बादशहा बहादुरशहा याच्या निशाणाभोंवतीं ते सारेजण गोळा झाले होते. बंड अयशस्वी झालें म्हणून बहादुरशहाच्या नशिबीं कारावास व हद्दपारी येऊन मोंगलांचें बादशाही घराणें कायमचें रसातळाला गेलें. पण बंड जर कां यशस्वी झालें असतें तर बहादुरशहाचेंच साम्राज्य पुनः प्रस्थापित झालें असतें यांत संदेह नाहीं.

१८५७चा उठाव फसल्यानंतरचीं कांहीं वर्षें ब्रिटिश् सरकारकडून मुसलमानांना खूप दडपशाही सहन करावी लागली. उलेमा मंडळी तर ब्रिटिशांच्या पूर्ण कह्यांत कधींच आलीं नाहींत. राज्याधिकाराची फार मोठी परंपरा मुसलमानांच्या पाठीशीं असल्याकारणानें ब्रिटिशांच्या हस्तक्षेपाची त्यांना अत्यंत चीड येत असे. "परकीयांच्या अशा प्रकारच्या हस्तक्षेपामुळें राष्ट्रीयत्वाच्या वाढीला अधिकांत अधिक चालना मिळते," हे ज्यूलियन् हक्स्ले[2] यांचे उद्गार मागें[3] उद्धृत केले आहेत, त्यांना अनुसरून येथें घडलेल्या सर्व घटना हिंदी

१. मेहता व पटवर्धन : दि कम्यूनल् ट्रँगल् (त्रिपक्षीय संघर्ष), पृ. १९.

२. ज्यूलियन् हक्स्ले : रेस् इन् युरप् (युरोपांतील वंश), पृष्ठ ३.

३. पृष्ठ ५४ पाहा.

राष्ट्राच्या बनावाला कारणीभूत झाल्या असल्या तर त्यांत नवल नाहीं. हिंदी राष्ट्राचें स्वतंत्र अस्तित्व आग्रहानें प्रतिपादन करणाऱ्यांत हिंदु–मुसलमान दोघेहि होते. दोघांचे धर्म भिन्न व दोन्ही धर्मांच्या अनुयायांची संख्याहि देशांत अत्यंत मोठी, असें असतांहि हिंदी राष्ट्रीयत्वाच्या मुद्द्यावर त्यांची एकवाक्यता होती. कॉंग्रेसला मिळण्यापासून अनेक मुसलमानांना परावृत्त करणाऱ्या सर सय्यद अहमदखानांचे विचारहि प्रारंभीं असेच होते. हिंदुमुसलमान हे जणूं एकाद्या युवतीच्या दोन डोळ्यांसारखे असून एका डोळ्याला धक्का लागला तर दुसऱ्या डोळ्यांतून पाणी आल्यावांचून राहणार नाहीं असें ते म्हणत. हिंदी राष्ट्रसभेंत जे मुसलमान सामील झालेले आहेत त्यांच्या भाषणांतील उतारे या मुद्द्याच्या समर्थनार्थ देण्याची तर अवश्यकताच नाहीं.

'द्वि–राष्ट्र'–सिद्धांताविषयींची ही चर्चा दोन प्रसिद्ध हिंदी मुसलमानांचे कांहीं विचार उद्धृत करून मी संपवणार आहें. पहिलें स्थान सर् सय्यद अहमदखान यांच्या भाषणांतील दोन उताऱ्यांना देण्यांत येत असून चालू काळांतील दोन सुप्रसिद्ध मुसलमानांचे उद्गार शेवटीं दिले आहेत. १८५८ सालीं गुरुदासपुर येथील एका सभेंत सर् सय्यदनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले होते:—

'अगदीं प्राचीन काळापासून एका देशांतील रहिवाशांना उद्देशून राष्ट्र हा शब्द योजण्यांत आलेला आहे, मग त्या रहिवाशांच्या स्वभाव–विशेषांत कांहींहि फरक असोत. हिंदुमुसलमान बंधूंनो, हिंदुस्थानाव्यतिरिक्त दुसऱ्या एकाद्या देशांत तुमची वस्ती आहे काय? तुम्ही एकाच भूमींत वसलेले नाहीं काय? एकाच भूमींत तुमचें दहन–दफन होत नाहीं काय? एकाच भूमीवर तुम्ही वर्तत व नांदत नाहीं काय? 'हिंदु' व 'मुसलमान' हे शब्द फक्त धर्मभेद दाखवण्यासाठीं आहेत हें लक्षांत ठेवा. बाकी हिंदु असो, मुसलमान असो, खिस्ती असो, जो कोणी या देशांत वसत–वावरत असेल तो एकाच राष्ट्राचा समजला पाहिजे. म्हणून हे सर्व पंथ म्हणजे एकाच राष्ट्राचे विभाग असें

मानलें पाहिजे. सर्वांची अशी ही जी भूमि आहे तिच्या कल्याणासाठीं झाडून साऱ्यांनीं एकजूट केली पाहिजे.'[१]

याच विषयावर दुसऱ्या एका प्रसंगीं लाहोरास त्यांनीं असे उद्गार काढले कीं—

'राष्ट्र या शब्दांत मी हिंदु व मुसलमान या दोघांचाहि समावेश करतों, कारण त्या शब्दाचा माझ्या मतें तोच एक अर्थ होणें शक्य आहे. त्यांची धार्मिक श्रद्धा कोणती आहे त्याचा विचार मला विशेष महत्त्वाचा वाटत नाहीं. कारण, धर्म–श्रद्धा ही दृष्टि–गोचर होणारी गोष्ट नसते. पण आपण एकाच देशाचे रहिवासी आहों, एकाच सरकारच्या हुकमतीखालीं आहों, आपणां सर्वांच्या कल्याणाचा उगम एकाच स्थानीं आहे, आणि भूकमारीच्या यातना आपणां सर्वांना सारख्याच होत असतात, या गोष्टी मात्र दृष्टीला दिसण्यासारख्या आहेत. या निरनिराळ्या कारणांस्तव हिंदुस्थानांत राहणाऱ्या या दोन समाजांना मी एकाच नांवानें म्हणजे हिंदु या नांवानें संबोधतों. हिंदु म्हणजे हिंदुस्थानचा रहिवासी असा माझा अभिप्रेत अर्थ आहे. कायदे-मंडळांत असतांना या राष्ट्राची भरभराट कशी होईल याची चिंता माझ्या मनाला सदैव वाटत असे.' (इंडियन् नेशन्–बिल्डर्स्, सर् सय्यद अहमदखान, पृष्ठ ४१–४२).[१]

श्री. अतुलानंद चक्रवर्ती यांच्या 'हिंदूज् अँड् मुस्लिम्स् ऑफ् इंडिया' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत, असामान्य इतिहासकार सर् शफत अहमद-खान यांनीं हिंदुस्थानमध्यें गत कालांत झालेल्या सामाजिक व सांस्कृतिक विकासाचा आढावा घेऊन असा निष्कर्ष काढला आहे कीं,

'आपल्या राष्ट्रांतल्या हरएक व्यवहार–क्षेत्रामध्यें आपण साधारणपणें सम-जतों त्यापेक्षां किती तरी अधिक प्रमाणांत एकजुटीचें व सलोख्याचें वाता-वरण होतें. हिंदी संस्कृतीचा इतिहास पाहिला तर या दोन समाजांतील कनिष्ठ-

---

१. रेझॉल करीम यांच्या 'पाकिस्तान् एक्झॅमिन्ड्' (पाकिस्तानचें परीक्षण) या पुस्तकांत ११७व्या पृष्ठावर उद्धृत.

वर्गीय व वरिष्ठ वर्गीय यांमध्यें मानासिक देवाणघेवाण व भावनांचें ऐक्य सतत विद्यमान असल्याचें दिसून येतें आणि आशियांतल्या इतर कोणत्याहि राष्ट्रांत आढळणार नाहीं असा राष्ट्रीयत्वाचा संपूर्ण साक्षात्कार हिंदी भाषांतील अभिजात ग्रंथांमध्यें पाहावयास मिळतो. ज्या या समन्वयामुळें वरिष्ठ वर्गांतील व सामान्य जनांतील अभिरुचि व मनःप्रवृत्ति शुद्धतर बनल्या तो राष्ट्राच्या रोमरोमीं मुरला असून त्यानें राष्ट्राला निर्मल केलें आहे. आपल्यांतील राजकीय मतभेदांना मी क्षुद्र मानीत नाहीं; परंतु ते मतभेद कितीहि असले तरी आपल्या बुद्धिधर्मांत, आपल्या परंपरेंत, आपल्या संवयींत, आपल्या विचार–क्षेत्रांत ऐक्याचें एक बळकट सूत्र गोवलेलें असून जवळजवळ एक हजार वर्षांतील घटनांच्या भट्टींत तावून सुलाखून निघालें असल्याकारणानें तें अमर व अविच्छेद्य बनलें आहे ![1] 'सामाजिक घटनांकडे केवळ राजकारणाच्या दृष्टीनें पाहण्याची व राष्ट्रदेहांत निर्माण झालेल्या रोगांना केवळ राजकीय अस्वास्थ्य समजून चालण्याची जी अदूरदृष्टि आपल्या ठिकाणीं उत्पन्न झाली आहे ती, हिंदुमुसलमान–संस्कृतींच्या गाढ अभ्यासानें व आपल्या वैभवसंपन्न गतकालांतील विचार–प्रवाहांना ज्या शक्तींनीं वळण लावलें त्यांचें अधिकतर ज्ञान करून घेऊन, नाहींशी करणें'[2] जरुरीचें आहे, असें सर् शफतखानांनीं प्रस्तावनेनंतरच्या भागांत सुचविलें आहे.

सर् सुलतान अहमद यांनीं देखील आपलें मत कमी खणखणीत शब्दांत मांडलेलें नाहीं. ते लिहितात, "आज हिंदु–मुसलमानांत जी तेढ निर्माण झालेली आहे तिच्यामुळें मोंगलांच्या काळापासून गेलीं शेकडों वर्षें जो बंधुभाव या दोन समाजांत वसत आहे तो लयास जाण्याचा धोका निर्माण झालेला आहे. हिंदुस्थान फोडूं पाहणें म्हणजे या देशांत मुसलमानी राजवटीनें जें एक विधायक कार्य केलें त्याचाच विच्छेद करण्यासारखें आहे. सध्यांच्या हिंदी

---

१. अतुलानंद चक्रवर्ती : हिंदूज् अँड् मुसल्मान्स् ऑफ् इंडिया ( हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान ), पृ. १९–२० ( प्रस्तावना ).

२. उक्त ग्रंथ, पृ. १६ ( प्रस्तावना ).

मनुष्याला त्याच्या पूर्वजांपेक्षां अधिक ज्ञान आहे यांत शंका नाहीं. पण त्याच्या डोळ्यांतलीं कल्पनाचित्रें, आर्यन–सारासेन–युतीचें भव्य चित्र रेखाटलेल्या चित्रपटाच्या मानानें क्षुद्र वाटतात. पूर्वकालीन हिंदी नेत्यांनीं व विचारवंतांनीं दोन धर्मांचें ऐक्य साधण्याचे यत्न केले. राजपुत्र दारा शेकोहूनें त्यांना 'मज्मा–उल–बहरीन' किंवा दोन नद्यांचा संगम असें म्हटलें आहे; कबीर व नानक यांनीं त्या दोघांना एकरूप बनवण्याचा प्रयत्न केला व 'रहीम व राम' यांना प्रार्थनेमध्यें एकत्र आणून बसवलें. हिंदु व मुसलमान उस्तादांनीं आपल्या प्रतिभा–बळानें अश्या कांहीं कला उत्पन्न केल्या व असे कांहीं व्यवसाय निर्माण केले कीं त्यांच्या योगानें उभय समाजांच्या मनाची तृप्ति होऊन त्यांच्या व्यावहारिक गरजांचाहि परिहार झाला. आनंदाचीं व सौंदर्याचीं समान अधिष्ठानें निर्मिलीं गेलीं. इतिहासाच्या सिद्ध–हस्तानें बनवलेलें हें मंदिर धुळीस मिळविण्यासाठीं आज हिंदी मनुष्य सज्ज झालेला आहे. त्या इतिहासाचें मर्म आकलन करण्याची पात्रता त्याच्या ठिकाणीं नसल्याकारणानें तो त्याला दूषण देऊं लागला आहे.

' हिंदु मुसलमान यांच्यामध्यें इतक्या समान गोष्टी असूनहि त्या दोघांची एकी भंग पावत आहे ही घटना आश्चर्य–जनक होय. उभयतांना सामान्य असणाऱ्या गोष्टींचा आधार घेऊन ऐक्याचा विस्तार करीत जाणें हें आपण आपलें कर्तव्य मानावयास हवें. संगीत व वाङ्मय, चित्रकला व स्थापत्य, यांच्यांतील समानता येवढेंच पैतृक धन आपणांला लाभलेलें आहे असें नव्हे. हिंदुमुसलमानांचे संघर्ष अनेक रणांगणांवर चालू असतां दोघांना सामान्य असें राजकीय भवितव्यहि निर्माण होत गेलें आहे. सामाजिक जीवनामध्येंहि दोन्ही समाजांच्या आचारांचा व व्यवहारांचा गोफ विणला गेलेला आहे. राहणीच्या समान पद्धति बाबराच्या काळीं देखील आढळून येऊं लागल्या होत्या आणि हिंदुमुसलमानांच्या कमालीच्या संमिश्र राहणीला उद्देशूनच बाबर बादशहानें कुचेष्टेच्या स्वरांत तिचा "हिंदुस्थानी पद्धत" असा उल्लेख केलेला आहे. त्यानंतर लष्करी छावण्यांमधून उर्दूचे बोल ऐकूं येऊं लागले. मानवाला सर्वांत

प्रिय असा जो धर्म त्यामध्यें सुद्धां त्या वेळेपासूनच एका धर्माचा दुसऱ्या धर्मावर परिणाम झाल्याच्या खुणा दिसूं लागल्या होत्या. हिंदूंच्या धर्माला मुसलमानांच्या साहचर्यानें एक नवीन वळण लागलें, एक नवीन छटा त्याच्यावर चढली. उलट, मुसलमानांच्या धर्मालाहि हिंदु स्वरूप प्राप्त झालें. हा बदल त्या वेळच्या कर्मठ मुसलमानांच्या नजरेंतून सुटला नाहीं.

'हिंदुस्थानांतले मुसलमान देशीच बनून गेले. हें त्यांचें भवितव्य कुतुबुद्दिनानें आपलें दिल्लीचें राज्य गझनीच्या तख्तापासून अलग केलें तेव्हांच ठरून गेलें होतें. आपल्या प्रजाननांपैकीं कोणत्याहि पंथाच्या अनुयायांबद्दल मुसलमान राज्यकर्त्यानें भेदभाव दर्शवूं नये हा आदेश अगदीं स्पष्टपणें व निक्षून देण्यांत आलेला होता. "सर्व धर्ममतांकडे त्यानें सहानुभूतीच्या नजरेनें पाहावें, एकाला पोटच्या मुलाप्रमाणें व दुसऱ्याला सवतीच्या मुलाप्रमाणें वागवूं नये" असा दंडक घालण्यांत आलेला होता. बाबराची 'स्मरणावलि' व अबुल फझलची 'ऐन–इ–अकबरी' यांची तुलना केली, तरी हिंदुस्थान ही आपली मातृभूमि म्हणून त्याच्याविषयीं वाटणाऱ्या प्रेमाची भावना कशी वाढत गेली याचा नीट बोध होईल. "हिंदुस्थान हा असा देश आहे कीं त्यांत सुखावह गोष्टींची वाणच दिसून येते" अशी तक्रार आपल्या 'स्मरणावलीं'त त्या साम्राज्यसंस्थापकानें मांडली आहे. पण अकबर गादीवर येईपर्यंतच्या काळांत हिंदुस्थानविषयींची ही परकेपणाची भावना पार लुप्त झाली होती! त्याचा इतिहासकार जो अबुल फझल त्यानें "हिंदुस्थानच्या रमणीयते"ची मुक्तकंठानें स्तुति केली असून माझ्या "मातृभूमीच्या प्रेमा"मुळें माझ्याकडून विषयांतर झालें याबद्दल 'मला क्षमा करावी' असें त्यानें वाचकांस विनविलें आहे.'[1]

१. सर् सुलतान अहमद : ए ट्रीटी बिट्वीन् इंडिया अँड् दि युनायटेड् किंग्डम् (हिंदुस्थान व संयुक्त राज्य यांच्यामधील तह), पृ. ६१.

भाग दुसरा

# त्रिपक्षीय संघर्ष

## ६. प्रास्ताविक

मुसलमानांचा हिंदुस्थानबरोबर दीर्घकाळपर्यंत जो संबंध घडून आला त्या काळांत मुसलमान राज्यकर्त्यांनीं, साधुसंतांनीं व इतरांनीं हिंदु–संस्कृतीपैकीं शक्य तेवढा भाग आत्मसात् करण्याचे प्रयत्न सतत चालविले होते. त्यांच्या या प्रयत्नांसारखेच प्रयत्न हिंदूंनींहि आपल्या बाजूनें चालवलेले होते. दोन्ही समाज एकरूप होऊन गेले नाहींत ही गोष्ट यद्यपि खरी, तथापि दोन्ही समाजांना सामान्य अश्या गोष्टींची वाढ हळुहळू पण निश्चितपणें होत होती आणि कालगतीनें जिला हिंदुस्थानी संस्कृति म्हणतां येईल अशी संस्कृति निर्माण झाली होती. राजकीय क्षेत्रामध्यें अश्या संस्कृतीच्या पोटीं आधुनिक परिभाषेंत ज्याला राष्ट्र असें म्हणतात, तशा एका राष्ट्राचा जन्म होणें अपरिहार्य असतें. हिंदु–मुसलमानांवर आधिपत्य गाजवणारी ब्रिटिश् सत्ता देशांत स्थापन झाल्या-वर येथेंहि तसेंच घडून आलें. हिंदूंचें व मुसलमानांचें मिळून एक राष्ट्र बनलेलें आहे असें प्रतिपादन करणाऱ्या अधिकारी मुसलमान पुरुषांचे उद्गार यापूर्वीं आम्हीं उद्धृत केले आहेतच. परंतु आजकाल अखिल भारतीय मुस्लिम लीग व तिचे पुढारी हिंदूंच्याहून वेगळें असें मुसलमानांचें एक स्वतंत्र राष्ट्र असल्याबद्दल तितक्याच अभिनिवेशानें सांगत असतात, याचीहि आम्हांला जाणीव आहे. असें घडून येण्याचें कारण काय? त्याचें उत्तर हुडकण्यासाठीं आपणांला कांहीं ऐतिहासिक घटनांचा विचार करावयास हवा.

येथील मुसलमानी राज्यकर्त्यांची वृत्ति सर्वसाधारणपणें सहिष्णुतेचीच होती. त्यांपैकीं कांहींनीं धर्मवेडेपणाचें प्रदर्शन अधुनमधून केलें असलें, तरी प्रारंभापासून हिंदूंबरोबर न्यायानें वागण्याचा प्रयत्न करण्यांत येत होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. अगदीं सुरुवातीच्या काळांत घडलेलें एक उदाहरण देतां येईल. महंमद बिन कासिमनें ब्राह्मणाबाद पदाक्रांत केलें तेव्हां तेथील नागरिकांनीं त्याला 'आम्हांला आमच्या धर्मानुसार पूजा–अर्चा करण्याची अनुज्ञा मिळावी' अशी विनंति केली. कासिमनें त्याबाबत इराकचा सुभेदार

हज्जाज याच्याकडे विचारणा केली असतां त्याच्याकडून पुढीलप्रमाणें उत्तर आलें:—'ते ( हिंदु लोक ) शरण आले असल्याकारणानें आणि त्यांनीं खलिफाला करभार देण्यास मान्यता दिलेली असल्याकारणानें आतां त्यांच्याकडून दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची अपेक्षा करतां येणार नाहीं. ते आतां आपल्या आश्रयाला आलेले आहेत. तेव्हां त्यांच्या जीविताला किंवा धनाला आपणांस हात लावतां येणार नाहीं. त्यांना आपल्या दैवतांची उपासना करण्याची मोकळीक देण्यांत येत आहे. आपल्या धर्मानुसार वागण्याला कोणासहि मज्जाव करण्यांत येऊं नये. त्यांनीं आपापल्या घरांत इच्छेस येईल तसें राहावें.'[1] पैगंबराच्या शिकवणुकीला आणि जे बिगर–मुसलमान शरण येऊन जिझिया कर देण्याचें मान्य करीत त्यांच्याशीं प्रारंभींचे खलिफा जशा प्रकारची वर्तणूक ठेवीत, त्या वर्तणुकीला अनुसरूनच हा निकाल होता.

मुसलमान धर्म–वेत्त्यांनीं अवश्य व योग्य म्हणून कांहींहि सांगितलें तरी मुसलमान राज्य–कर्ते स्वतंत्र बुद्धीनें त्यांना योग्य दिसेल त्या मार्गानें जाण्यांत कसूर करीत नसत. त्यामुळें राज्यकारभार धर्मापासून अलग होत गेला. अल्लाउद्दिन खिलजीच्या राज्यांत सबंध उत्तर व दक्षिण हिंदुस्थानचा समावेश होत होता. उलेमांनीं राज्यकारभारांत ढवळाढवळ करावी हें त्याला पसंत नसे. कायदा हा राजाच्या इच्छेनुसार चालावा, त्याचा पैगंबराच्या अनुशासनांशीं कांहींहि संबंध नाहीं अशी मर्यादा त्यानें घालून दिली. शिक्षा देण्याविषयींचा राज्य–कर्त्यांचा हक्क त्यानें उचलून धरला आणि अप्रामाणिक व लांचखाऊ अधिकाऱ्यांना देहदंड देणें रूढ कायद्याच्या विरुद्ध आहे असा निर्वाळा काझींनीं दिला असतांहि त्यानें तें कृत्य न्यायास धरून आहे असें ठरविलें. राज्यपदाची व्याख्या पुढील अर्थपूर्ण शब्दांमध्यें त्यानें काझींना सांगितलेली आहे:—'बंड उद्भवून हजारों जीवांचा नाश होऊं नये म्हणून राज्याच्या स्वास्थ्याच्या व लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीनें मला ज्या योग्य वाटतील त्या आज्ञा मी देत

---

१. ईश्वरी प्रसाद : ए शॉर्ट् हिस्टरी ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया ( हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाचा संक्षिप्त इतिहास ), पृ. ४६.

असतों. माझ्या आज्ञा लोक ऐकत नाहींत, त्यांचा ते अनादर करतात; आणि ते त्यांचा भंग करतात म्हणून त्यांना वठणीवर आणणें मग मला भाग पडतें. हें माझें करणें कायद्याला धरून आहे कीं नाहीं तें मला ठाऊक नाहीं. जें राज्याच्या हिताचें व प्रसंगाला योग्य असें मला वाटतें तें करण्याची आज्ञा मी देतों; देवाच्या न्यायासनासमोर उभें राहिल्यानंतर माझा इन्साफ कसा होईल त्याचीहि कांहीं कल्पना मला नाहीं.'[१] अरेराव पण लोकहितैषी राज्यकर्त्यांच्या तोंडचा हा नेहमींचा युक्तिवाद आहे. भिन्न भिन्न धर्म व रूढि अनुसरणाऱ्या जनसमुदायांचा अधिपति या नात्यानें राजाचीं कर्तव्यें आणि एका विशिष्ट धर्माचा अनुयायी या नात्यानें त्याचीं कर्तव्यें यांत कसा संपूर्ण फरक पडतो तें या उद्गारांवर दिसून येतें.

बाबरानें आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवलेल्या आदेशांचा उल्लेख मागें सविस्तर येऊन गेलाच आहे. मोंगल बादशहांनीं तदनुसार वर्तन ठेवलें म्हणून साम्राज्याचा विस्तार होत गेला. तें धोरण सुटल्यामुळें अशी परिस्थिति निर्माण झाली कीं, अखेरीस साम्राज्याच्या ठिकऱ्या उडाल्या. हिंदूंच्या भावनांविषयीं जी आस्था मोंगल अमदानींत दाखवण्यांत येई तिचा परदेशीं लोकांनीं सुद्धां उल्लेख केलेला आढळतो. ईदच्या प्रसंगीं गोवध करीत नसत असें दिसतें. कारण, "त्या (म्हणजे ईदच्या) दिवशीं ज्याला ज्याला शक्य होईल त्या प्रत्येकानें आपल्या घरीं बकऱ्याचा बळी द्यावा व मोठा सण म्हणून तो दिवस साजरा करावा,"[२] असें आम्हांस सांगण्यांत आलें आहे. अर्थात् हे दोन्ही समाज एकमेकांत मिसळून जाऊन कधींहि एकरूप होऊन गेले नाहींत तरी स्नेहभावानें शेजारीं शेजारीं राहिले यांत नवल कसलें ?

मि० एफ्. के. खान दुराणी यांनीं त्या परिस्थितीचा सारांश दिला

---

१. ईश्वरी प्रसाद : ए शॉर्ट् हिस्टरी ऑफ् मुस्लिम् रूल् इन् इंडिया (हिंदुस्थानांतील मुसलमानी अंमलाचा संक्षिप्त इतिहास), पृ. १२६.

२. उक्त ग्रंथ, पृ. ६९८, पेल्सार्ट्चा ७४ व्या पृष्ठावरील उतारा.

असल्यामुळें त्यांतील एक बराच लांबलचक उतारा देण्यापेक्षां मला अधिक चांगलें कांहीं करतां येईलसें वाटत नाहीं:

"पुरातन काळचे हिंदू हे एकराष्ट्रीय नव्हते. तो एक जन–समूह होता, कळप होता.

"हिंदुस्थानांतील मुसलमानांचाहि तोच मासला होता. वस्तुस्थिति पाहिली तर असें दिसतें कीं धर्म–प्रवर्तक पैगंबराच्या आयुष्यांतच इस्लामला राज्य–पदवी प्राप्त झालेली होती. सुसूत्र अशी राजनीति इस्लामपाशीं होती, किंब-हुना इस्लाम हीच एक राजनीति आहे असें म्हटल्यास तें उचित होईल.... इस्लामी राज्य हें धर्माधिष्ठित राज्य असतें असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं. इस्लाम ही लोकसत्ताच आहे आणि ती संभाळणें हें प्रत्येक मुसलमानाचें कर्तव्य आहे. "ला इस्लामा–इल्ला बे जमाअत–हू. म्हणजे सुसंघटित समष्टी-शिवाय इस्लाम अशक्य आहे" असे महात्मा उमरचे उद्गार आहेत. दुर्दैवानें हें इस्लामी राज्य फार काळ टिकलें नाहीं. ओटमादांनीं व अब्बासिदांनीं त्याचा नाश करून टाकला आणि त्याच्याजागीं 'मुल्की' राजवटीची म्हणजे अरेरावी व वंशपरंपरा चालणाऱ्या राज–सत्तेची स्थापना केली.[१]

"मुसलमानांनीं हिंदुस्थान जिंकला त्या वेळीं धर्म व राजकारण भिन्न आहेत ही कल्पना जगांतल्या सर्व मुसलमानांत रूढ झालेली होती. ज्या लोकांनीं हिंदुस्थान पादक्रांत केला ते लोक मुसलमानी राज्याचे राष्ट्रीय वृत्तीचे सैनिक नव्हते. अरेराव बनलेल्या बादशहाची ती भाडोत्री फौज होती. त्यांनीं हिंदु-स्थानांत जें राज्य प्रस्थापित केलें तें कांहीं राष्ट्रीय मुसलमानी राज्य नव्हतें. अरेराव बादशहा आणि त्याचे आश्रित यांच्या फायद्यासाठींच स्वराज्याचें जतन व शोषण करण्यांत येत होतें. हिंदुस्थानांतील मुसलमानी साम्राज्याला मुसलमानी म्हणण्यांत येई, तें बादशाहीचा मुकुट धारण करणारा स्वतःला इस्लामचा अनुयायी

---

१. एफ्. के. खान दुराणी : दि मीनिंग् ऑफ् पाकिस्तान ( पाकिस्तान म्हणजे काय ? ), पृ. ३४–३५.

म्हणवीत असे येवढ्याचसाठीं. हिंदुस्थानांतील आपल्या सुदीर्घ राजवटीच्या काळांत राष्ट्रीयत्वाची भावना मुसलमानांच्या मनांत कधींच जागली नाहीं. बादशाही धोरण आरंभापासून अखेरपर्यंत त्या (राष्ट्रीयत्वाच्या) भावनेच्या वाढीला अपकारक व विरोधीच होतें."[१]

"त्यामुळें हिंदु व मुसलमान असे दोन समाज एकाच बादशाहीच्या गुलामगिरीच्या जोखडाला बांधले गेल्याचें दृश्य इतिहासांत दिसून येतें. राष्ट्रीयत्वाची भावना किंवा राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा यांना दोन्ही समाज सारखेच पारखे झालेले होते.

" हिंदुमुसलमानांच्या धर्मविषयक कल्पना, श्रद्धा व आचार यांत तडजोड होणें अशक्य असल्याबद्दल आतांपर्यंत पुष्कळांनीं लिहिलेलें आहे.... तथापि त्या दोघांच्याहि धर्मांत असें कांहीं तरी आहे, कीं ज्यामुळें हे दोन्ही समाज शेंकडों वर्षें गुण्यागोविंदानें एकत्र नांदले. ब्रिटिश् राजवटीमध्यें त्यांच्या मनांत जें किल्मिष शिरलेलें आहे तें जर धुऊन टाकतां आलें आणि एका शतकापूर्वीच्या त्यांच्या पूर्वजांमध्यें जी धार्मिक वृत्ति होती ती पुनरुज्जीवित करणें शक्य झालें, तर एका राज्यांतले प्रजाजन म्हणून ते गोडीगुलाबीनें पुनः एकत्र नांदूं शकतील. दोघांच्याहि धर्मांतला तो विशेष म्हणजे त्यांतली सहिष्णु वृत्ति होय."[२]

'फोडा आणि झोडा' हे राजनीतीचें फार प्राचीन सूत्र आहे. सर्व देशांतल्या सर्व जेत्यांनीं सर्व काळीं तें वापरलेलें आहे. परसत्तेला एकदां मान्यता दिली म्हणजे मग परसत्ताधाऱ्यांनीं या नीतीचा अवलंब केल्यास त्यांना विशेष दोष देतां येणार नाहीं. म्हणून इतर परकी जेत्यांपेक्षां उच्चतर भूमिका ब्रिटिशांनीं घेतली नाहीं आणि 'फोडा व झोडा ही रोमन् लोकांची प्राचीन नीति होती आणि आपणहि तिचाच अंगीकार केला पाहिजे' असा जो सल्ला मौंट् स्टुअर्ट् एल्फिन्स्टन् यानें दिला होता, त्याला अनुसरूनच ब्रिटिश् राज्यकर्ते वागले म्हणून ब्रिटिशांना नांवें काय म्हणून ठेवण्यांत यावीं ? हिंदुस्थानांत आपण जें

---

१. एफ्. के. खान दुराणी : दि मीनिंग् ऑफ् पाकिस्तान ( पाकिस्तान म्हणजे काय ? ), पृ. ३५–३६. २. उक्त ग्रंथ, पृ. ३६–३७.

कांहीं करतों तें उच्च ध्येय-वादानें व निर्भेळ लोकहित-बुद्धीनें करतों अशा प्रकारची साधुपणाची ऐट जेव्हां ते मारतात, तेव्हां मात्र त्यांची चीड येणें साहजिक आहे. प्रस्तुत काळीं हिंदुमुसलमानांत जे दुर्लंघ्य भेद माजल्यासारखे दिसत आहेत त्यांना ब्रिटिशांनीं बुद्धिपुरःसर अंगीकारिलेली ही नीति थोडी-थोडकी कारणीभूत झालेली नाहीं. हिंदुस्थानचे राज्यकर्ते म्हणून इंग्रज आपलें बस्तान येथें नुकतेंच बसवूं लागले होते त्या वेळींच म्हणजे ईस्ट् इंडिया कंपनीच्या अमदानींतच या नीतीचा प्रारंभ झालेला आहे आणि तीच नीति अद्यापि चालू आहे हें माजी भारतमंत्री मि० अमेरी किंवा हिंदुस्थानच्या कारभाराशीं संबंध असलेले त्यांच्याचसारखे इतर इंग्रज वरिष्ठ अधिकारी यांची अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेलीं मतें वाचलीं तरी लक्षांत येईल. शेजारी म्हणून आणि एकाच राज्यांतले प्रजाजन म्हणून हिंदुमुसलमानांनीं एकत्र नांदावें याकरतां जी पूर्वीच्या काळांतल्यासारखी मनःप्रवृत्ति असा-वयास हवी, ती निर्माण करणें जें इतकें कठिण होऊन बसलें आहे तें ब्रिटि-शांच्या या धोरणामुळेंच.

म्हणून हिंदुस्थानांतील जातीय प्रश्न असा नाहीं, कीं जो हिंदुमुसलमानांना स्वतःच्या इच्छेनुसार हवा तेव्हां सोडवतां येईल. तिसऱ्या एका पक्षाचा म्हणजे ब्रिटिश् सरकारचा हात त्यांत शिरकलेला आहे. आणि तो फार महत्त्वाचा पक्ष बनलेला आहे. हिंदुमुसलमानांच्या बरोबरीनें ब्रिटिश् सरकारचा पक्षहि देशांत विद्यमान असल्यामुळें ज्याचें 'त्रिपक्षीय संघर्ष' असें यथार्थपणें वर्णन करतां येईल, असा संघर्ष येथें निर्माण झाला आहे. ब्रिटिशांचा पक्ष जसजसा प्रबळ होत गेला, तसतशी हिंदु-मुसलमानांतील विरोधालाहि तीव्रता प्राप्त होत गेली.

# ७. 'फोडा आणि झोडा'ची राजनीति व ईस्ट् इंडिया कंपनी

मोंगल साम्राज्याच्या अंतकाळीं देशामध्यें जीं स्वतंत्र राज्यें प्रस्थापित झालेलीं होतीं त्यांच्या आपापसांतील झगड्यांची व विरोधांची संधि साधून हिंदुस्थानांत आपलें साम्राज्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न ईस्ट् इंडिया कंपनीकडून चालू असतां कंपनीनें आपल्या वतीनें जे गव्हर्नर् देशामध्यें नेमले होते, त्यांनीं या अन्तर्गत कलहांचा फायदा घेऊन ब्रिटिशांच्या विरुद्ध हिंदी लोकांचा एकोपा न होऊं देण्याचें धोरण आंखलें होतें. प्रथम निझाम व कर्नाटकचे नबाब यांच्याबरोबर मराठ्यांची जूट न होऊं देण्याचें व नंतर निझाम व टिपू सुलतान यांच्याबरोबर त्यांची एकी न होऊं देण्याचें उद्दिष्ट कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं आपणांसमोर ठेवलें होतें. "त्याच्याच पुत्रांची मदत नसती तर हिंदुस्थान पादाक्रांत करणें कदापि शक्य झालें नसतें," हे माल्कम्चे उद्गार खरे आहेत,' असें डब्ल्यू, एम्. टॅरेन्स् यांनीं लिहिलें आहे. ते म्हणतात, 'प्रथम अर्काटवाले निझामाविरुद्ध व निझाम अर्काटविरुद्ध लढले, नंतर मराठे मुसलमानांबरोबर व अफगाण हिंदी लोकांविरुद्ध लढले.'[१] खुद्द मराठयांमध्यें देखील जी फूट पडली तिला मराठ्यांच्या दरबारीं इंग्रजांनीं चालविलेल्या कारवायाच बऱ्याच अंशीं कारणीभूत होत्या. 'मराठयांच्या इतिहासांत दोन व्यक्ति अश्या आहेत, कीं ज्या मराठी साम्राज्याच्या उदयास व पतनास कारणीभूत झाल्या. शिवाजीच्या शौर्यामुळें व प्रतिभेमुळें मराठी सम्राज्याचा पाया भरला गेला, तर रघुनाथरावाच्या बिनधोरणी वृत्तीमुळें व कारस्थानांमुळें मराठी साम्राज्याचा नाश झाला.'[२]

ग्रॅंट् डफ् हा इतिहासकार लिहितो, 'मि० मॉस्टिन्ला मुंबई—सरकारनें

---

१. डब्ल्यू. एम्. टॅरेन्स् : एम्पायर् इन् एशिया (आशिया खंडांतील साम्राज्य), पृ. १९.

२. बी. डी. बसू : राइज् ऑफ् खिश्चन् पॉवर् इन् इंडिया (हिंदुस्थानांत खिस्ती सत्तेचा उत्कर्ष), पृ. २०९.

पुण्याला पाठविलें तें या हेतूनें कीं गृहकलह माजवून किंवा दुसऱ्या कांहीं युक्त्या–प्रयुक्त्या योजून मराठे हैदराला व निझामाला जाऊन मिळणार नाहींत अशी व्यवस्था करा.'[३] मॉस्टिन्नें राघोबाला मदत दिली व राघोबा त्याच्या हातांतलें बहुलें बनला. निझामाशीं व हैदरअलीशीं लढाई पुकारण्याची चिथावणी त्यानेंच दिली. पण या लढायांपासून मराठ्यांचा कोणताहि फायदा झाला नाहीं. मुंबई–सरकारच्या हातीं राघोबाचीं सूत्रें गेलेलीं आहेत आणि तो पेशवे–पदावर अधिक काळ राहिला तर मराठ्यांच्या सत्तेला लवकरच राम म्हणावा लागेल, हें नाना फडणवीस ओळखून होता. नाना व इतर प्रधान आपणाला प्रतिकूल झालेले आहेत असें पाहून राघोबा गुजरातकडे पळून गेला आणि त्यानें मुंबईच्या कंपनी–सरकारकडे मदत मागितली. तें मदत देण्यास एका पायावर तयार होतें. मराठी साम्राज्य कमकुवत बनावें, पश्चिम किनाऱ्यावर कंपनीला हातपाय पसरण्यासाठीं संधि मिळावी आणि विशेषेंकरून साष्टीबेट व वसई द्वीपकल्प हीं आपणाला तोडून देण्यांत यावीं यासाठीं तर तें टपूनच बसलेलें होतें.

'फोडा व झोडा ही नीति लागू करतांना हिंदुमुसलमानांचे धर्म निराळे म्हणून त्यांच्यांत पंक्तिप्रपंच करण्यांत येत नसे. मुसलमानांना हिंदूंच्या प्रमाणेंच मुसलमानांच्याहि विरुद्ध चिथावण्यांत येई आणि हिंदूंना मुसलमानांच्या प्रमाणेंच हिंदूंच्याहि विरुद्ध फूस देण्यांत येत असे. एकाची मदत घेऊन दुसऱ्याला भरडून काढावयाचें आणि मग त्याचीहि तीच गत करावयाची, हा यांतला मुख्य उद्देश असे. वॉरन् हेस्टिंग्ज्च्या कारकीर्दींत रोहिल्यांना ज्या रीतीनें वागवण्यांत आलें तीवरून या धोरणाचें स्वरूप स्पष्ट होईल. औधच्या वजिराच्या सरहद्दीवरील कांहीं टापू रोहिल्यांच्या ताब्यांत होता. त्या टापूंतला राज्यकारभार स्थानिक प्रमुखांच्या व पंथांच्या मार्फत चाले. त्यांना त्या मुलुखांत खूपच मोकळीक मिळत असल्याकारणानें इतर जमातींच्या मानानें रोहिल्यांच्या जमाती अधिक सुखांत असत. रोहिले हे स्विस् लोकांप्रमाणें हाडानें शांतताप्रिय होते. औधचा

३. ग्रँट् डफ् : हिस्टरी ऑफ् दि मराठाज् (मराठयांचा इतिहास), पृ. ३४०.

मुलूख व मराठ्यांच्या प्रदेश या दोहोंच्यामध्यें रोहिल्यांचा टापू येत होता. मराठ्यांनीं वजिराच्या मुलुखाला शह दिला होता आणि रोहिल्यांनीं आपणांला पलीकडे जाण्यासाठीं वाट द्यावी म्हणून त्यांना बऱ्याच सवलती देण्यास मराठे तयार होते. पण रोहिल्यांनीं त्या अटी कबूल केल्या नाहींत. इंग्रजांचा आग्रह पडल्यामुळें व तह पाळला जाईल अशी इंग्रजांनीं हमी दिलेली असल्यामुळें औधच्या वजिराबरोबर रोहिल्यांनीं मैत्रीचा तह केला होता; त्यामुळें मराठ्यांच्या अटी फेटाळून लावल्यानंतर मराठ्यांचा उपसर्ग त्यांनाच सहन करावा लागला. पण मराठ्यांच्या स्वारीचें संकट टळून गेल्याबरोबर रोहिल्यांचा टापू गिळंकृत करण्याबद्दलचा गुप्त करार वजीर व गव्हर्नर् जनरल् यांच्यामध्यें झाला. आपल्या शत्रूपासून आपलें रक्षण करण्यासाठीं आपण तैनाती लष्कर बाळगीत असल्याची बतावणी वजिरानें करावी, मात्र त्याच्यावर फक्त कंपनीचीच हुकमत चालावी व त्यांतील अधिकारीहि कंपनीचेच असावेत, या गोष्टीला हेस्टिंग्ज्नें वजिराची मान्यता मिळविली. याचा मोबदला म्हणून वजिरानें कांहीं ठराविक रक्कम द्यावी असें ठरलें. कंपनीचा फायदा वाढावा या दृष्टीनेंच रोहिलखंडाच्या खरेदीलाहि मान्यता देण्यांत आली होती....निमित्त सांपडतांच इंग्रज फौजांनीं औधच्या लष्कराच्या मदतीला जाऊन रोहिल्यांचा निःपात करावा व तो टापू वजिराच्या राज्याला जोडून द्यावा आणि या कामगिरीबद्दल वजिरानें कंपनीस ४० लक्ष रुपये व मोहिमेला लागणारा सर्व खर्च द्यावा, असा गुप्त करार वजीर आणि कंपनी यांच्यांत करण्यांत आला.'[१] निमित्तें काय, हवीं तेवढीं सांपडलीं. रोहिलखंडावर स्वारी करण्यांत आली आणि मोठ्या शौर्याचा प्रतिकार केल्यानंतर रोहिल्यांना हार खावी लागली. जयामुळें प्राप्त होणाऱ्या हक्कांचा इतका दुरुपयोग क्वचित्च करण्यांत आला असेल! "रोहिल्याचें नांव धारण करणाऱ्या प्रत्येक मनुष्याचा वध तरी करण्यांत आला किंवा त्याला जीव बचावण्यासाठीं परागंदा

---

१. डब्ल्यू. एम्. टॉरेन्स् : एम्पायर् इन् एशिया (आशिया खंडांतील साम्राज्य), पृ. १००–१०१ वरील उताऱ्यावरून संकलित.

तरी व्हावें लागलें!" अर्थात्च हें क्रूरकर्म तहाच्या कलमांना सोडून होतें असें म्हणतां येणार नाहीं. जरूर वाटली तर "रोहिल्यांचें बीज राहूं देऊं नये" असें कलम तहांतच असल्याचें खुद्द वॉरन् हेस्टिंग्ज्च्या पत्रावरून दिसून येतें. पत्रांतील भाषा त्याचीच आहे.'[1] या व्यवहारामध्यें तहनाम्यावर सही केल्याबद्दलची बक्षिसी म्हणून हेस्टिंग्ज्नें वीस हजार पौंड खिशांत टाकले आणि कंपनीच्या तिजोरींत चार लाख पौंडांची भरती झाली, असें टॉरेन्स्नें लिहिलें आहे.

पुढें खुद्द नबाबाची पाळी आली. कंपनीला आणखी पैसे हवेसे झाले. तिजोरी खाली असल्याची सबब नबाबानें पुढें केली. त्यानंतर 'पत्र—व्यवहार झाला आणि लखनौकरांची तिजोरी रिती न करतांच कलकत्तेकरांची तिजोरी भरून काढण्याची ती कुप्रसिद्ध युक्ति शोधून काढण्यांत आली—गव्हर्नर जन-रल् व नबाब यांनीं सरळ तिसऱ्याला लुबाडावें असें ठरलें. "जिला लुबाडाव-याचें असें ठरलें ती व्यक्ति या लुटारूंपैकीं एकाची आईच होती!" असें लॉर्ड् मेकॉलेनें लिहिलें आहे.'[2] मयत वजिराची आई व विधवा पत्नी यांच्यापाशीं गडगंज संपत्ति असून बारा लक्ष पौंडांपर्यंत लूट हातीं लागेल असा अंदाज होता.

'हिंदुस्थानांतल्या राजेरजवाड्यांना तैनाती फौजा म्हणून भाड्यानें फौजा द्यावयाच्या आणि या मार्गानें त्यांच्यापैकीं प्रत्येकाचें स्वातंत्र्य व सामर्थ्य नष्ट करावयाचें असें धोरण हेस्टिंग्ज्नें घालून दिलें होतें. अशा प्रकारच्या फौजा औधमध्यें ठेवण्यांत तेथील राजसत्तेला कमकुवत व परावलंबी करण्याचा आपला उद्देश होता हें हेस्टिंग्ज्नेंच मान्य केलेलें आहे. हेस्टिंग्ज्च्या कारस्थानांत वजीर सामील झाला; पण हा साथीदार पुढें स्वतःच त्याच्या भक्ष्यस्थानीं कसा पडला तें नंतर घडलेल्या हकिकतीवरून स्पष्ट दिसून येतें.'[3]

एका हिंदी राज्यकर्त्याला दुसऱ्याविरुद्ध उठवावयाचें आणि शेवटीं

---

१. डब्ल्यू. एम्. टॉरेन्स् : एम्पायर् इन् एशिया (आशिया खंडांतील साम्राज्य), पृ. १०२.

२. उक्त ग्रंथ, पृ. ११६. ३. उक्त ग्रंथ, पृ. १०१.

प्रत्येकाला नामोहरम करावयाचें या ब्रिटिशांच्या नीतीचीं अधिक उदाहरणें देणें अनवश्यक आहे. त्यांनीं ही नीति फक्त हिंदुस्थानांतच अंमलांत आणलेली आहे असें नाहीं, तर इतर देशांतहि त्यांनीं तिचा प्रयोग केलेला असून तेथेंहि तिच्यामुळें विध्वंस घडून आलेला आहे.

एकोणिसावें शतक उजाडण्याच्या सुमारास मोंगल साम्राज्याचें सामर्थ्य तर पूर्णपणें नष्ट झालेंच होतें, पण मोंगल साम्राज्य छिन्नभिन्न होऊन जीं अनेक राज्यें उदित झालीं होतीं तीहि लयास गेलीं होतीं किंवा कमालीचीं दुबळीं बनलीं होतीं. त्यामुळें देशामध्यें कंपनीला कोणी प्रतिस्पर्धी न उरून देशाचें स्वामित्व निर्विवादपणें तिच्या हातीं आलेलें होतें. कांहीं हिंदी राज्यें अजूनहि स्वतंत्र होतीं. त्यांपैकीं कांहींचें स्वातंत्र्य खरें होतें तर कांहींचें नामधारी होतें. पण तीं कोलमडून पडेपर्यंत त्यांच्याहि बाबतींत कंपनीनें पूर्वीचेंच धोरण कायम ठेवलें. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पादाच्या अखेरीपर्यंत मराठा साम्राज्याची इतिश्री झाली आणि ज्या मराठा सरदारांची गादी कायम राहिली त्यांनाहि मांडलिक बनून राहावें लागलें. औधचें राज्य नांवाला स्वतंत्र होतें, पण ब्रिटिशांनीं धडक मारली असती तर तिच्या विरुद्ध टिकाव धरून राहण्याचें त्राण त्याच्यांतहि उरलेलें नव्हतें; आणि कांहीं वर्षांनंतर ब्रिटिशांनीं जेव्हां धडक मारली तेव्हां औधचें स्वातंत्र्य खरोखरच गडगडलें व औध प्रांत ब्रिटिश राज्याला जोडण्यांत आला. टिपू सुलतानाचा केव्हांच पराभव होऊन तो मारला गेला होता आणि त्याचा मुलूख कंपनीच्या राज्यांत सामील करून घेण्यांत आला होता. निझामानें ब्रिटिशांशीं दोस्ती केली होती. त्याच्यापासून ब्रिटिशांना धोका राहिलेला नव्हता. पंजाब व वायव्य भागांत मात्र शिखांनीं आपलें जें राज्य स्थापलें होतें, त्याच्याकडे ब्रिटिश साशंकतेनें पाहत होते. मोंगल बादशहा हे नांवाचेच बादशहा राहिले होते. देशांतल्या कोणत्याहि मोठ्या टापूवर त्यांची हुकमत अशी राहिलेली नव्हती.

## ८. वहाबी आंदोलन

राजकीय दृष्ट्या ‘देशांतील अतिशय प्रबळ गट’ ही मुसलमानांची प्रतिष्ठा लयास गेली असली, तरी त्यांच्याविषयीं इंग्रजांच्या मनांत स्नेहाची भावना नव्हती. धर्म-सुधारणेच्या ज्वलंत भावनेनें उत्स्फूर्त झालेल्या व्यक्ति त्याच सुमारास मुसलमानी समाजांत अवतीर्ण झाल्या. आपला जो राजकीय अधःपात झाला तो इस्लामच्या तत्त्वांपासून आपण च्युत झाल्यामुळें झाला असून इस्लामच्या आद्य तत्त्वांचा पुनःस्वीकार आपण करावा आणि काळाच्या ओघा-बरोबर इस्लामला विहित नसणाऱ्या ज्या अनेक चालीरीती आपणांमध्यें रूढ झाल्या आहेत त्यांचें उच्चाटन करावें असा उपदेश ते करूं लागले. मौलवी शरियतुल्ला हे अशा आद्य सुधारकांपैकीं एक होते. बंगालमधील फरीदपूर जिल्ह्यांतल्या बहादुरपूरचे ते रहिवासी होते. अरबस्तानांत वीस वर्षेंपर्यंत वास्तव्य करून स्वदेशीं परत आल्यावर एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत त्यांनीं ‘फ्राइझी’ नामक पंथाची स्थापना केली. त्यांच्या मागून त्यांचे पुत्र दुधु मियाँ हे त्यांच्या पाठीवर आले. त्यांनीं आपलें मुख्य स्थान बहादुरगड येथें कायम केलें आणि शेतकरी-वर्गांत प्रचार करण्यास प्रारंभ केला. ते केवळ सामाजिक सुधारणेचाच नव्हे, तर जमीनदारांच्या छळापासून शेतकऱ्यांचें रक्षण करण्या-चाहि उपदेश करीत.

कांहीं वर्षांनीं रायबरेलीच्या सय्यद अहमदांनीं आपल्या कार्याला प्रारंभ केला. त्यांच्या चळवळीच्या शाखा देशांत सगळीकडे पसरल्या होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धात त्यांनीं फार मोठी कामगिरी बजावली. सय्यद अहमदांचा जन्म रायबरेली येथें झाला व त्यांचें शिक्षण दिल्लीला झालें. केवळ विद्वान् म्हणून नव्हे, तर एक सात्त्विक मुसलमान म्हणून त्यांची ख्याति सर्वत्र पसरली होती. तत्कालीन अनेक विद्वान् उलेमा त्यांना आपले नेते मानीत. वेश्याव्यवसाय व मद्यपान यांसारख्या घातुक दुराचारांविरुद्ध त्यांनीं खूप जोराचा प्रचार केला. असें सांगतात कीं, पंजाबांतील शीख मुसल-

मानांना छळीत, त्यांच्या धर्मकृत्यांत अडथळे आणीत आणि त्यांचीं धर्म-स्थानें भ्रष्ट करीत; म्हणून शिखांविरुद्ध मुसलमानांनीं जें जिहाद किंवा धर्म-युद्ध पुकारलें त्याचे सूत्रधार सय्यद अहमदच होते. शिखांचें राज्य हें दार-उल-हरब म्हणजे शत्रुराष्ट्र आहे अशी घोषणा करून सय्यद अहमदांनीं त्याच्याविरुद्ध जिहाद पुकारलें. तत्पूर्वी मराठयांनींहि आपलें राज्य प्रस्थापित केलें होतें, पण त्यांनीं मुसलमानांच्या धर्मांत कधीं ढवळाढवळ केली नाहीं. त्यांच्या धर्मकृत्यांना मराठयांनीं मोकळीक ठेवली होती. ते काझींचा कार-भारहि चालूं देत. त्यामुळें मराठयांच्या व रजपुतांच्या राज्यांना मुसलमान लोक दार-उल-हरब न म्हणतां दार-उल-इस्लाम म्हणजे इस्लामी राज्य असेंच मानीत असत. शिखांच्या विरुद्ध धर्मयुद्ध पुकारण्याची सय्यद अहमद ब्रेलवी यांनीं सिद्धता केली आणि माणसें व पैसा गोळा करण्यासाठीं त्यांचे शिष्य देशभर रवाना झाले. स्वतः सय्यदसाहेबांना लढाईचा थोडाफार अनु-भव होता. म्हणून जमलेल्या फौजेचें आधिपत्य त्यांनीं आपल्याकडेच घेतलें. ब्रिटिश अधिकाऱ्यांना या तयारीची खबर देण्यांत आली होती, पण त्यांच्या-कडून कोणताहि अडथळा झाला नाहीं. कारण ब्रिटिशांनीं शिखांचें राज्य राहूं दिलें असलें, तरी त्यांच्याविषयीं ब्रिटिशांच्या मनांत स्नेहभाव होता असें नाहीं. या धर्मयुद्धाच्या तयारीसंबंधीं सर सय्यद अहमद खानांनीं येणेंप्रमाणें लिहून ठेवलें आहेः—

'त्या काळीं शिखांविरुद्ध धर्मयुद्ध पुकारण्याचा प्रचार मुसलमान जनतेमध्यें मुसलमान लोक खुलेपणानें करीत असत. त्या युद्धासाठीं हजारों सशस्त्र मुसल-मान व प्रचंड युद्धसाहित्य गोळा करण्यांत आलें होतें. कमिशनर आणि मॅजिस्ट्रेट यांना ज्या वेळीं या सिद्धतेची खबर लागली तेव्हां त्यांनीं वर सर-कारला लिहून कळवलें. सरकारनें स्पष्ट शब्दांत लिहून पाठवलें कीं, तुम्हीं या बाबतींत ढवळाढवळ करूं नये. जिहादवाल्यांचा कांहीं पैसा दिल्लीच्या एका महाजनानें दाबला, तेव्हां दिल्लीचे कमिशनर विल्यम् फ्रेजर यांनीं हुकूमनामा

करून तो त्याच्याकडून वसूल केला व सरहद्दीकडे पाठवला.'[1] 'सवानन अहमदिया' या ग्रंथांत ११९व्या पृष्ठावर महंमद जाफरसाहेब म्हणतात कीं, सरकार [म्हणजे ब्रिटिश सरकार] सय्यदसाहेबांच्या विरुद्ध असतें, तर त्यांना हिंदुस्थानांतून कोणतीहि रसद मिळूं शकती ना. पण शिखांचें सामर्थ्य कमी व्हावें हीच त्या वेळच्या ब्रिटिश सरकारची मनापासूनची इच्छा होती.'[2] मार्गांत अडचण नसल्यामुळें सय्यद अहमद फौजेनिशीं सिंधमधून बोलनखिंड उतरून अफगाणिस्तानांत उतरले आणि तेथून पुनः मुरडून खैबरखिंड पार करून त्यांनीं १७२४मध्यें पंजाबवर स्वारी केली. १८३०मध्यें पेशावर हातीं येईपर्यंत त्यांची ही मोहीम चालू होती. पेशावरांतील शिखांचा सुभेदार सुलतान महंमद खान यानें सय्यदांशीं एकनिष्ठ राहण्याचें वचन दिल्याकारणानें त्याच्याकडेच सुभेदारी चालू ठेवण्यांत आली. मौलवी मजहर अली यांना काझी नेमण्यांत आलें. सरहद्दीच्या रहिवाशांना धार्मिक स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्यांत सय्यदसाहेब अशा प्रकारें यशस्वी झाले. परंतु सुलतान महंमद खान आणि काझी मझहर अली यांच्यामध्यें जुना वैरभाव होता. म्हणून सय्यद अहमदांनीं पेशावर सोडतांच सुलतान महमदानें काझी मजहर अलींचा भर दरबारांत खून करविला आणि स्थानिक पुढाऱ्यांशीं संगनमत करून सय्यद अहमदांनीं नेमलेल्या तहसीलदारांचेहि खून पाडले! या घटनांमुळें सय्यदसाहेब इतके उद्विग्न झाले कीं, १८३८च्या अखेरीस त्यांनीं आपल्या अनेक अनुयायांसह सरहद्द सोडली. १८३१मध्यें वयाच्या ४५व्या वर्षीं एका लढाईत ते मारले गेले.'

त्यांच्या मृत्यूनंतर सय्यदसाहेबांचें सैन्य पांगलें; परंतु सरहद्द प्रांतांतील स्वात नदीच्या खोऱ्यांत सित्ताना या गांवीं जिहाद्यांनीं आपलें मुख्य ठाणें

---

१. एम्. तुफेल् अहमद : मुसलमानोंका रोशन् मुस्तकब्वल, पृ. १०२ वरील उताऱ्याचें भाषांतर. सदर उतारा सर सय्यद अहमद खान यांचा एक लेख ८ सप्टेंबर १८७१च्या इन्स्टिटयूट गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाला होता त्यांतून घेण्यांत आला होता. २. उक्त ग्रंथ, उतारा, पृ. १०३.

कायम करून हिंदुस्थानांतून मिळणाऱ्या मदतीवर आपलें धर्मयुद्ध सुरू ठेवलें. पंजाब जिंकीपर्यंत ब्रिटिश सरकारनें या सर्व प्रकारांकडे कसा कानाडोळा केला तें सर विल्यम् हंटर यांच्या 'इंडियन् मुसलमान्स्' या ग्रंथांतील पुढील अवतरणावरून समजून येईल:—'आपल्या हातीं पंजाब येईपर्यंत जिहादी आपल्या शेजारच्या मुलुखांतील हिंदूंवर एकसारखे छापे व धाडी घालीत असत व त्यांच्या कत्तली करीत असत. ब्रिटिश मुलखांतील धर्मवेड्या मुसलमानांची ते आपल्या सैन्यांत दरसाल भरती करीत. शिखांवर राग काढणाऱ्या या धर्मविशा लोकांना आपले जे प्रजाजन जाऊन मिळत होते त्यांना प्रतिबंध करण्याची आपण जरा देखील दक्षता ठेवली नाहीं. वायव्य प्रांतांत मोठमोठे निळीचे कारखाने मालकीचे असलेल्या एका इंग्रज गृहस्थानें असें सांगितलें कीं, त्याच्या पदरच्या सर्व सश्रद्ध मुसलमानांमध्यें आपल्या मजुरींतून कांहीं ठराविक रक्कम सित्तान्याच्या छावणीच्या खर्चासाठीं वेगळी काढून ठेवण्याचा प्रघात होता. जे अधिक हिंमतवान् असत ते तेथल्या धर्मवेड्या पुढाऱ्यांच्या पथकांत काम करण्यासाठीं जात. आपल्याकडे नोकरीस असलेले हिंदु मुकादम दर वर्षी बापदाद्यांच्या श्राद्धासाठीं ज्याप्रमाणें रजा मागत, त्याचप्रमाणें या जिहादवाल्यांना मदत करणें हें आपलें धार्मिक कर्तव्य असल्यामुळें आपणालाहि दर वर्षी कांहीं महिन्यांची रजा मिळावी अशा प्रकारची मागणी १८३० ते १८४६ पर्यंतच्या काळांत मुसलमानांकडून करण्यांत येत असे.'[१] सर विल्यम् हंटर पुढें लिहितात, 'आपण पंजाब काबीज केल्यावर जी धाड पूर्वी शिखांवर पडत होती ती आपल्यावर पडूं लागली. सित्तान्याचे लोक हिंदूंच्याप्रमाणें इंग्रजांनाहि पाखंडीच समजत. त्यामुळें तलवारीनें त्यांचा निःपात केला पाहिजे असें त्यांना वाटे. ज्या बंडाळीकडे आपण दुर्लक्ष केलें किंवा जिच्याबद्दल आपण निदानपक्षीं बेफिकीर राहिलों तीच आतां आपल्या नशिबीं आली.[२]

१. 'डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर् : इंडियन् मुसलमान्स् (हिंदुस्थानांतील मुसलमान), पृ. २०, उपरोक्त तुफेल अहमदकडून ११०व्या पृष्ठावर उद्धृत.

२. उक्त ग्रंथ, पृ. ११–२२.

सय्यद–पंथाचे शिष्य बंगालमध्यें राजशाही येथें, बहारमध्यें पाटण्यांत आणि पंजाबच्या सरहद्दीवरच्या गांवांत म्हणजे देशांतील दूरदूरच्या स्थळीं फितुरीचा प्रचार करीत असल्याचें आढळून आलें. हा सर्व काळ त्यांनीं सरहद्दीवरील टोळ्यांच्या मनांत ब्रिटिशांविषयीं दुष्मनीची भावना जागृत ठेवली होती. पुढील एकाच गोष्टीवरून पुष्कळ बोध होईल. १८५० ते १८५७पर्यंत सरहद्दीवरील पुंडाव्यामुळें आपणांला सोळा मोहिमा काढाव्या लागून एकंदर ३३,००० सैन्य तिकडे पाठवावें लागलें; आणि १८५७ ते १८६३पर्यंतच्या काळांत या मोहिमांची संख्या वाढून वीस झाली आणि ६०,००० सैन्य (खेरीज बाजारबुणगे व पोलीस) पाठवावें लागलें.'[1]

जिहादवाल्यांच्या कार्याचा यापेक्षां अधिक तपशील आपणांला पाहण्याची आवश्यकता नाहीं. सय्यद अहमद ब्रेलवींचे इकडील अनुयायी त्यांना पुढेंहि सहाय्य करीत राहिले येवढें सांगितलें कीं पुरे. त्यांच्या शिष्यांपैकीं दोन प्रमुख शिष्य मौलवी विलायत अली व मौलवी इनायत अली हे पाटण्याचे असून सख्खे भाऊ होते. पंजाब जिंकून घेतल्यावर ब्रिटिश सरकारनें जिहादवाल्यांना हिंदुस्थानांत परत येण्यास भाग पाडलें तेव्हां आपल्या अनुयायांसह मौलवी विलायत अली पाटण्यास परत आले. कांहीं वर्षें आपण सरहद्दीकडे फिरकणार नाहीं अशी हमी त्यांना द्यावी लागली. ती मुदत संपल्यानंतर त्यांनीं व त्यांच्या भावानें आपली मालमत्ता विकून टाकली आणि हिजरात करून ते सित्तान्याकडे निघाले. तेव्हांपासून हिजरातीच्या किंवा देशत्यागाच्या आंदोलनास प्रारंभ होऊन तें बराच काळ चालू राहिलें. १८५७च्या बंडामुळें त्या आंदोलनाला भर आला. १८६४ सालीं ब्रिटिशांनीं सरहद्द प्रांतांमध्यें आगे कदम करण्यास सुरुवात केल्यावर सरहद्द व हिंदुस्थान यांच्यांतील दळणवळण बंद पाडणें जरूर झालें. १८६४ ते १८७०च्या दरम्यान हिंदी लोकांच्या विरुद्ध बंडखोरीच्या आरोपावरून पांच खटले करण्यांत आले. त्यांतले जे

---

१. डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर् : इंडियन् मुसल्मान्स् (हिंदुस्थानांतील मुसलमान), पृ. २४.

सर्वांत महत्त्वाचे आरोपी होते ते पाटण्याच्या या बंधुद्वयांच्या घराण्यांतले किंवा त्यांच्या शिष्य–परंपरेंतलेच होते. सरहद्दीकडच्या आपल्या नातेवाइकांशीं पत्र-व्यवहार ठेवल्याचे व त्यांना आर्थिक सहाय्य केल्याचे आरोप त्यांच्यावर ठेवण्यांत आले. त्यांपैकीं कांहीं आरोपींना फांशीची शिक्षा देण्यांत आली, पण ती नंतर कमी करून त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली. १८२४पासून ब्रिटिश सरकारनें जे उद्योग चालवले होते त्यांपेक्षां वाईट असें कोणतेंहि कृत्य या मंडळींनीं केलेलें नव्हतें, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. खुद्द ब्रिटिश सरकारनें एके काळीं जिहादवाल्यांच्या नांवांवर भरलेल्या हुंड्या स्वीकारून त्या सरहद्दीकडे रवाना देखील केल्या होत्या. सय्यद अहमद ब्रेलवींनीं ही जी चळवळ सुरू केली आणि जी त्यांच्या शिष्यांनीं त्यांच्या मरणोत्तर चालू ठेवली तिला ‘वहाबी आंदोलन’ असें म्हणण्यांत येतें. सामाजिक व धार्मिक सुधारणांचा उपदेश करतांना वहाबी लोक जिहादच्या किंवा धर्मयुद्धाच्या मार्गाचाहि उपदेश करीत असत. हिंदुस्थान खिस्त्यांच्या वर्चस्वाखालीं आल्याकारणानें तो शत्रुदेश बनला. त्यामुळें त्याच्या विरुद्ध धर्मयुद्ध पुकारणें हें त्यांच्या मतें त्यांचें कर्तव्य होऊन बसलें. ‘या पंथाच्या वाङ्मयामध्यें पुनर्जागृत मानवाचा आद्य धर्म म्हणून या कर्तव्याला अग्रस्थान देण्यांत आल्याचें आढळून येतें.’[१] धर्मयुद्ध अशक्य झालें तर देशत्याग करावा असा पर्याय सुचवण्यांत आला होता.

वहाबी आंदोलनामुळें जी परिस्थिति निर्माण झाली तिला सरकारनें दोन प्रकारें तोंड दिलें. एक तर राजकीय खटल्यांच्या योगानें वहाबी संघटना छिन्नविच्छिन्न होऊन गेली. दुसरें म्हणजे त्यांच्या उपदेशाविरुद्ध प्रचार सुरू करण्यांत आला व जिहाद–विरोधी फतवे उलेमांच्याकडून मिळवून ते प्रसृत करण्यांत आले. सर विल्यम् हंटर म्हणतात, ‘मला नेहमीं असें वाटतें कीं, अत्युत्तम माणसें आपल्या बाजूला येत नाहींत हा हिंदुस्थानांतील आपल्या भूमिकेचा अत्यंत कटु असा परिणाम आहे....परंतु अलीकडे हें हार्डीमांसीं मुरलेलें वैमनस्य दूर झालें आहे ही कांहीं लहानसहान गोष्ट म्हणतां येणार नाहीं.’[२]

---

१. डब्ल्यू. डब्ल्यू. हंटर् : इंडियन् मुसल्मान्स् (हिंदुस्थानांतील मुसलमान), पृ. ६४–६५. २. उक्त ग्रंथ, पृ. १४४.

ही सर्वच घटना 'फोडा व झोडा' या नीतीचें उदाहरण आहे. जोंपर्यंत शिखांचा कांटा ब्रिटिशांच्या पायांत सलत होता, तोंपर्यंत त्यांच्या विरुद्ध जिहाद पुकारण्यास मुसलमानांना उत्तेजन देण्यांत आलें. पण एकदां शिखांचा पराभव होऊन पंजाब प्रांत पदरांत पडल्यानंतर जिहाद्यांना बंडखोर ठरवून जन्मठेपेच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या आणि त्यांची संघटना मोडून टाकण्यांत आली.

## ९. सर सय्यद अहमद खानांचा पूर्वकाल

१८५७ चें बंड बऱ्याच दिवसांपासून जमत आलेल्या कारणांतून उद्भवलेलें होतें. त्या कारणांत शिरण्याची किंवा बंडाची प्रगति कशी होत गेली तें पाहण्याची येथें आवश्यकता नाहीं. पण एक गोष्ट निश्चित आहे ती ही कीं, बंडामध्यें हिंदु व मुसलमान दोघेहि सामील होते आणि दोघेहि दिल्लीच्या बादशहाच्या निशाणाभोंवतीं गोळा झाले होते. दोन्ही समाजांना जबरदस्त नुकसान सोसावें लागलें. परंतु मुसलमानांपासूनच इंग्रजांनीं देशाचा बराचसा भाग जिंकून घेतलेला असल्याकारणानें त्यांचें मुसलमानांसंबंधींचें धोरण विशेष कडक राहिलें. १८४८ मध्यें लॉर्ड इलेन्बरोनें लिहून ठेवलें होतें कीं, 'लोकसंख्येपैकीं एकदशांश लोक आपल्या विरुद्ध निश्चितपणें असतां, उरलेल्या नऊदशांश राजनिष्ठ प्रजेचा मनापासूनचा पाठिंबा मिळवण्याचा यत्न न करणें अगदीं वेडगळपणाचें ठरेल असें माझें मत आहे. मुसलमानजमात ही मूलतःच आपणांला विरोधी असल्या कारणानें हिंदूंना चुचकारणें हीच आपली खरी नीति असावयास पाहिजे.'[१] परंतु ही नीति विशेष यशस्वी झाल्याचें दिसत नाहीं. कारण १८५७ च्या बंडांत मुसलमानांच्या बरोबरीनें हिंदूंनींहि मोठ्या उत्साहानें भाग घेतला होता. तथापि या अनुभवानंतरहि राज्यकर्त्यांची या नीतीवरील श्रद्धा कमी झाली नव्हती, असें पुढील उताऱ्यावरून दिसतें:—

'लॉर्ड् कॅनिंगवर लॉर्ड् एलेन्बरोनें जो आरोप ठेवला होता त्याच्या व्यति-

---

१. अतुलानंद चक्रवर्ति : पृ. ३५.

रिक्त कलकत्याच्या युरोपियनांनीं लार्ड कॅनिंग् यांना परत बोलावण्याविषयीं योग्य त्या अधिकाऱ्यांकडे एक अर्जहि गुदरला होता. शिपायांच्या बंडानंतर कलकत्ते-कर युरोपियनांनीं जी मुसलमानविरोधी डरकाळी फोडली होती तिला लॉर्ड कॅनिंग्कडून पाठिंबा न मिळाल्याचा आरोप त्याच्यावर करण्यांत आला होता.' कलकत्तेकरांची ही तक्रार बरोबर लागू पडली. सर विल्यम् हंटर लिहितो, 'बंडानंतर ब्रिटिश लोक मुसलमानांनाच आपले खरे शत्रू असें लेखूं लागले.' धन व मान यांनीं युक्त अशीं अनेक मुसलमान घराणीं या दडपशाहीमुळें धुळीस मिळालीं. केवळ मुलकी कारभारांतच नव्हे, तर खास करून लष्करी लोकांमध्यें देखील पूर्वीच्या जमान्यांत मुसलमानांच्याकडे सर्वोच्च अधिका-राच्या जागा असत. मुलकी कारभारांतून मुसलमानांची पीछेहाट होण्याला दोन कारणें घडलीं:—ब्रिटिशांचें धोरण त्यांच्याविरुद्ध होतें हें एक कारण. दुसरें कारण असें कीं, पूर्वी कटु अनुभव आला असल्याकारणानें मुसलमान रुसून घरांतच बसून राहिले व त्यांनीं इंग्रजी शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला नाहीं; आणि इंग्रजी शिक्षणाशिवाय नोकरी मिळणें उत्तरोत्तर अवघड होत गेल्या-मुळें मुसलमान त्यांतून साहजिकच वगळले गेले.

सरकारच्या या धोरणामध्यें १८७०च्या सुमाराला बदल घडून आला. सर विल्यम् हंटर यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर तर सरकारी धोरणांत विशेष सुधारणा दिसूं लागली. सरसाहेबांनीं आपल्या ग्रंथाची समाप्ति पुढील शब्दांत केली आहे:—

'या पूर्वीच्या प्रकरणावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. देशाच्या सरहद्दीवर बंडखोरांची एक कायमची छावणी पडलेली आहे ही एक, आणि देशामध्यें सरकारविरुद्ध कायमचें कारस्थान चालू आहे ही दुसरी. सशस्त्र बंडखोरांशीं इंग्रज सरकार बोलणें करील हें शक्यच नाहीं. जे शस्त्र उचलूं पाहातील त्यांचा शस्त्रानेंच निःपात करावयास हवा....परंतु बेइमानीबद्दल कडक शासन करणें जरूर असलें, तरी असंतोषाला उगीच कारण राहणार नाहीं याची काळजी घेणें हें देखील आमचें कर्तव्य आहे....पण ब्रिटिशांच्या राजवटींत

आपणांवर अन्याय झालेला आहे हें शल्य मुसलमानांच्या अंतःकरणांतून जेव्हां दूर होईल तेव्हांच ही गोष्ट साध्य होईल.'[१]

ब्रिटिश अंमलाखालीं मुसलमानांवर—विशेषेंकरून बंगाली मुसलमानांवर—कशा प्रकारें जुलूम—जबरदस्ती झाली, त्यांना त्यांच्या पदांपासून व प्रतिष्ठेपासून कसें वंचित करण्यांत आलें, त्यांना कोणत्या प्रकारें दैन्यावस्था प्राप्त झाली, त्यांच्या शिक्षणाची कशी हेळसांड करण्यांत आली व त्यांच्या शिक्षणसंस्थांचीं वतनें इत्यादि कशीं खालसा करण्यांत आलीं त्याबद्दलची हकिकत सर विल्यम् यांनीं दिलेली आहे. त्यांना न्यायानें वागवण्यांत यावें आणि त्यांना मानवेल अशी शिक्षणपद्धति चालू करावी असें त्यांनीं आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें आहे. यासंबंधीं त्यांनीं काढलेला निष्कर्ष असा:—"या मार्गानें गेल्यास अखेरीस आपल्या योजनेनुसार मुसलमान युवकांना शिकवून तयार करण्याच्या कामांत आपणांस यश येईल. त्यांच्या धर्मांत यत्किंचितहि ढवळाढवळ न करतां, त्यांना त्यांचीं धर्मविषयक कर्तव्यें कोणतीं तें समजावून देतां देतांच आपणांला त्यांचा धर्म कमी कडवा बनवतां येईल. थोड्याच काळापूर्वी जो हिंदुसमाज जगामध्यें कट्टरांतला कट्टर होता तो जसा आतां चांगला सहिष्णु बनला आहे, त्याचप्रमाणें मुसलमानांची येती पिढीहि सहिष्णु बनेल.'[२] सरकारच्या बदलत्या धोरणाचें सूतोवाच या वाक्यांत झालेलें होतें. या धोरणानुसारच पुढें अलीगढ—शिक्षण—योजनेला प्रोत्साहन देण्यांत आलें. अलीगढ कॉलेजच्या इंग्रज प्राध्यापकांना याच धोरणापासून प्रेरणा मिळाली आणि कॉलेजला आर्थिक लाभ झाला.

१८५७च्या पूर्वीच्या ब्रिटिश फौजेंत हिंदु, मुसलमान, शीख व पुरभय्ये यांची सरमिसळ भरती झालेली असे. पण वाढत्या राष्ट्रीय ऐक्याच्या जाणिवेंतून जो सहप्रयत्न १८५७त निर्माण झाला त्यामुळें सरकारचे डोळे उघडले आणि तदनंतर हा एकोपा नाहींसा करण्याचा उद्योग त्यांनीं आरंभिला. सर जॉन् लॉरेन्स् लिहितो, 'बंडापूर्वीच्या सैन्यांत जो अतिशय मोठा दोष होता, आणि

१. हंटर : पृ. १४७. २. उक्त ग्रंथ, २१४.

ज्याचे घातुक परिणाम आपल्याला सोसावे लागले, तो म्हणजे बंगाल प्रांतांतील फौजेंतला बंधुभाव आणि एकोपा. त्याला उपाय म्हणजे लष्करामध्यें युरोपियन सैनिकांचा व या देशांतील भिन्नभिन्न जातींचा एकमेकांना शह बसेल असें करणें.''[१]

या धोरणाचा परिणाम लष्कराची पुनर्घटना करण्यांत झाला. जमाती, पंथ, जाती यांच्यांतील भेदांप्रमाणें सैन्यांत अशी गटबंदी करण्यांत आली कीं, सैनिकांची आपल्या जातिपंथांबाबतची निष्ठा एकीकडे कायम राहील व दुसरीकडे एकाच्या वैशिष्ट्यांना व प्रभावाला दुसऱ्याचा शह बसेल. 'बंगाल' सैन्यांत सध्यां ज्यांना संयुक्तप्रांत व बहार असें म्हणतात, त्याच प्रांतांतल्या लोकांचा बहुतेक भरणा होता आणि १८५७च्या बंडांत त्यांनींच प्रामुख्यानें भाग घेतला होता. उलट, नुकत्याच जिंकून घेतलेल्या पंजाबांतील सैनिकांनीं ब्रिटिशांना बंडाच्या वेळीं चांगली मदत केली होती. म्हणून पुरभय्यांना क्रमाक्रमानें सैन्यांतून कमी करण्यांत येऊन अधिकाधिक पंजाब्यांची वर्णी तेथें लावण्यांत आली. श्री. चौधरी यांच्या मॉडर्न् रिव्ह्यूमधील लेखांतले जे आंकडे डॉ. अंबेडकरांनीं उद्धृत केले आहेत त्यांतील हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतील लोकांच्या प्रमाणावरून वरील विधान खरें असल्याचें दिसून येईल.

### कोष्टक १.

| वर्ष | पंजाब सरहद्दप्रांत व काश्मीर | नेपाळ गढवाल कुमाऊन | सं. प्रांत बहार | दक्षिण हिंदुस्थान | ब्रह्मदेश |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १०५६ | १० टक्क्यांहून कमी | नगण्य | ९० टक्क्यांहून कमी नाहीं | — | — |
| १८५८ | ४७ टक्के | ६ टक्के | ४७ टक्के | — | — |
| १८८३ | ४८ ,, | १७ ,, | ३५ ,, | — | — |

१. मेहेता व पटवर्धन : कम्यूनल् ट्रँगल्, पृ. ५४.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १८९३ | ५३ ,, | २४ ,, | २३ ,, | — | — |
| १९०५ | ४७ ,, | १५ ,, | २२ ,, | १६ टक्के | — |
| १९१९ | ४६ ,, | १४·८ ,, | २५·५ ,, | १·२ ,, | १·७ टक्के |
| १९३० | ५८·५ ,, | २२ ,, | ११ ,, | ५·५ ,, | ३ ,, |

आतां तर असें सांगण्यांत येऊं लागलें आहे कीं, देशांतल्या कांहीं जाती लढाऊ व कांहीं बिनलढाऊ आहेत. हिंदुस्थानच्या वायव्य प्रदेशांतील जात व जमाती लढाऊ असून संयुक्तप्रांत व बहारमधील लोक लढाऊ नाहींत असें मानण्यांत येतें. पण याच लोकांच्या फौजांनीं ब्रिटिशांना पंजाब व सरहद्दप्रांत मिळवून दिले आणि १८५७च्या बंडानंतर ब्रिटिशांनीं बुद्धिपुरःसर ठरविलेल्या धोरणानुसार त्यांना बिनलढाऊ जातींच्या सदरांत ढकलून देण्यांत आलें, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. १८५७ नंतरच्या धोरणाचा परिणाम असा झाला कीं, संयुक्त प्रांतीय व बहारमधील लोकांचे सैन्यांतून जवळजवळ उच्चाटन होऊन, शीख, गुरखे आणि गढवाली यांचाच भरणा सैन्यांत करण्यांत आला.

१८५७साली बंडखोरांच्या हातून सर सय्यद अहमद खान यांचें नुकसान झालें होतें. त्यांनीं बंडखोरांविरुद्ध ब्रिटिशांची बाजू घेतली होती. मुसलमानांवर जो गहजब गुदरला त्यामुळें त्यांच्या अंतःकरणाला वेदना झाल्या. इंग्रजी विद्या नसल्याकारणानें त्यांना सरकारी नोकऱ्यांस मुकावें लागत असल्याचेंहि त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. ते राष्ट्रीय वृत्तीचे गृहस्थ होते. हिंदु व मुसलमान मिळून एक राष्ट्र बनलेलें असून दोघेहि हिंदुस्थानचे रहिवासी असल्यामुळें या राष्ट्राला हिंदुराष्ट्र असेंच म्हटलें पाहिजे असें त्यांचें मत होतें. आपल्या पूर्वायुष्यांत ते एकाद्या राष्ट्रीय वृत्तीच्या व्यक्तीप्रमाणेंच लिहीत व बोलत असत आणि हिंदु व मुसलमान दोघेहि त्यांना 'राष्ट्रीय नेते'च मानीत. मुसलमानांची स्थिति सुधारावी व विशेषेंकरून त्यांना विद्यासंपादनासाठीं सवलती मिळाव्या म्हणून त्यांना जी तळमळ लागलेली होती ती उचितच होती. नोकरीच्या निमित्तानें

त्यांची जेथें जेथें नेमणूक होई, तेथें तेथें शाळा स्थापन करण्याच्या कामीं ते सहाय्य करीत. त्यांपैकीं कांहीं शाळा अजूनहि चालू आहेत. ब्रिटिश राज्य हें हिंदी लोकांचें भलेंच करील आणि त्यांत कांहीं दोष असल्यास ते राज्यकर्त्यांच्या नजरेस आणण्याची खोटी, कीं ते दूर करण्यांत येतील अशी श्रद्धा त्यांना वाटत असे. हा त्यांचा दृष्टिकोन तत्कालीन राजकीय पुढाऱ्यांच्या दृष्टिकोनाबर-हुकूमच होता. हिंदी राष्ट्रीयसभेची स्थापना करणाऱ्या नेत्यांची सुद्धां विचार-सरणी तशीच होती. त्यांच्या राजकीय आकांक्षांशीं सरसाहेबांच्या राजकीय आकांक्षा जुळत्या होत्या. नोकरी, सामाजिक संबंध व राजकीय किंवा घटना-त्मक अधिकार यांच्या बाबतींत वंश, वर्ण इत्यादि सबबींवर हिंदी व युरो-पियन् लोकांत भेद करतां कामा नये असें त्यांचें म्हणणें असे. म्हणून व्हाइस-रॉयच्या कौन्सिलचे ते सभासद असतांना त्यांनीं इलबर्ट बिलाला पाठिंबा दिला आणि आग्ऱ्याला दरबार भरला असतां युरोपियन् लोकांसाठीं व्यास-पीठावर खुर्च्या व हिंदी लोकांसाठीं खालीं खुर्च्या ठेवलेल्यां पाहतांच ते दर-बार सोडून निघून गेले. त्यांनीं सायंटिफिक् सोसायटी नामक एक संस्था स्थापन केली होती. तिच्या सभासदांत हिंदु, मुसलमान व युरोपियन् लोकांचा समावेश होता. त्या सोसायटीमध्यें निबंध–वाचन होत असे. 'तहझिब–उल–अखलाक'मध्यें ते लिहितात,

"राज्यकर्त्यांची बरोबरी जोंपर्यंत राष्ट्र करूं लागलें नाहीं व आपल्या देशां-तील शासन–संस्थेंत तें भाग घेऊं लागलें नाहीं, तोंपर्यंत कोणत्याहि राष्ट्रांला मान व प्रतिष्ठा मिळण्याची आशा करावयास नको. कारकुनांच्या किंवा तसल्याच दुसऱ्या क्षुद्र जागांवर जोंपर्यंत हिंदु व मुसलमान खर्डेघांशीं करीत राहतील, तोंपर्यंत इतर राष्ट्रें त्यांच्याविषयीं आदर दाखविणार नाहींत; किंबहुना जें सरकार आपल्या प्रजाजनांसंबंधीं योग्य आदर दर्शवीत नाहीं त्या सर-कारचीहि प्रतिष्ठा राहणें शक्य नाहीं. राज्यकर्त्यांच्या बरोबरीचीं पदें ज्या वेळीं माझ्या देशबांधवांना प्राप्त होतील, त्या वेळीं या राष्ट्राचा मानसन्मान होऊं लागेल. इतर देशांतल्या सरकारांनीं कळकळीनें, सचोटीनें व न्यायबुद्धीनें

आपल्या प्रजाजनांना सर्वोच्च पदापर्यंत पोंचण्याचे हक्क बहाल केले आहेत. पण हिंदी लोकांच्या मार्गांत मात्र अनेक अडचणी व अडथळे उभे आहेत. आपणांस निश्चयानें व चिकाटीनें काम केलें पाहिजे आणि संकटें येतील म्हणून भिऊन आपण मागें सरकतां कामा नये."[१]

१८५३मध्यें स्थानिक स्वराज्याबाबतच्या कायद्यांची चर्चा कौन्सिलमध्यें चालू असतां सरसाहेबांनीं अशी सूचना केली कीं, हिंदुस्थानांत विविध धर्मांचे व पंथांचे लोक असल्यामुळें स्थानिक स्वराज्याच्या मंडळावरील कांहीं जागा नेमणूक करून भरण्यांत याव्या. एकतृतीयांश जागा सरसाहेबांच्या सूचने-प्रमाणें नेमणुकी करून भरण्याचें ठरलें. विशिष्ट हितसंबंधांचे प्रतिनिधि असलेल्या परंतु निवडून न आलेल्या लोकांना सरकारनें त्या जागांवर नेमावें यासाठीं ही तरतूद होती. पण त्या वेळीं सरसाहेबांनीं मुसलमानांसाठीं राखीव जागा ठेवण्याची किंवा त्यांच्यासाठीं स्वतंत्र मतदारसंघ स्थापन करण्याची मागणी केली नव्हती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हिंदु व मुसलमान मिळून एक-राष्ट्र बनलेलें आहे असें त्यांचें मत असल्याकारणानें अशा प्रकारची मागणी पुढें मांडणें त्यांना शक्यच झालें नसतें. त्यांचें हें मत पुढील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल.

"राष्ट्र (कौम) हा शब्द एका देशांतील रहिवाशांना उद्देशून वापरण्यांत येतो...हिंदु व मुसलमान हे धर्मवाचक शब्द आहेत हें लक्षांत असूं द्या; या देशांत जे हिंदु, मुसलमान, इतकेंच काय, पण ख्रिश्चन राहतात त्या सर्वांचें मिळून एकच राष्ट्र बनलेलें आहे. हे सर्व गट एका राष्ट्रांत मोडत असल्या-कारणानें त्यांच्या देशाचें ज्यापासून कल्याण होईल त्यापासून त्यांचेंहि कल्याण साधेल...देशांतील रहिवाशांच्या धर्मांतील भेदांवरून त्यांचीं वेगवेगळीं (दोन) राष्ट्रें आहेत असें मानण्याचा काळ आतां निघून गेलेला आहे."[२]

दुसऱ्या एका प्रसंगीं ते म्हणाले, 'आर्यन् लोकांना ज्या अर्थी हिंदु

---

१. तुफेल अहमद : पृ. २८१–२८२. २. उक्त ग्रंथ, पृ. २८३.

म्हणण्यांत येतें, त्याच अर्थीं मुसलमानांना देखील हिंदु म्हणजे हिंदुस्थानचे रहिवासी म्हणण्यांत यावें."[1]

पंजाबमधील हिंदूंना उद्देशून भाषण करतांना ते एकदां म्हणाले होते कीं, 'स्वतःला उद्देशून तुम्ही हिंदु हा शब्द वापरला आहे तो माझ्या मतें बरोबर नाहीं. कारण माझ्या मतें तो शब्द धर्मवाचक आहे. हिंदुस्थानांतील हरएक रहिवासी स्वतःला हिंदु म्हणूं शकेल. म्हणून मी हिंदुस्थानचा रहिवासी असून सुद्धां तुम्ही माझी गणना हिंदूंत करावयास तयार नाहीं याचें मला दुःख वाटत आहे.'

अशा मतांच्या व्यक्तीला मुसलमानांप्रमाणें हिंदूंनींहि आपण नेता मानावें यांत आश्चर्य कोणतें ? सिव्हिल् सर्व्हिस्च्या परीक्षा विलायतेंत व हिंदुस्थानांत एकाच वेळीं घेण्यांत याव्या म्हणून प्रचार करण्याकरतां सुरेंद्रनाथ बानर्जी यांची सभा १८८४ मध्यें त्यांनीं पुढाकार घेऊन भरवली आणि ते स्वतःच तिचे अध्यक्ष झाले, याचेंहि आश्चर्य वाटावयास नको. राष्ट्रीय आंदोलनांतील पुरःसर जे बंगाली लोक, त्यांचे ते फार मोठे चहाते होते, यांतहि कांहीं नवल नाहीं.

पण अशीं मतें असणाऱ्या या गृहस्थांनीं १८८५ सालीं म्हणजे तदनंतर कांहीं वर्षांनीं स्थापन झालेल्या राष्ट्रसभेपासून अलग राहण्याचा उपदेश मुसलमानांना करावा ही एक मोठी नवलाची व रहस्यमय गोष्ट वाटते. अलीगढ कॉलेजच्या इंग्रज प्राध्यापकांचा जो प्रभाव सरसाहेबांवर त्या सुमारास पडूं लागला, त्यावरून त्यांच्यांमध्यें घडून आलेल्या फरकाचा उलगडा होतो. त्यानंतरचा पंधरावीस वर्षांचा मुसलमानी राजकारणाचा इतिहास म्हणजे या धूर्त इंग्रजांनीं हिंदी राजकारणांत पाडलेल्या दुहीचा इतिहास आहे; आणि ती दुही तेव्हांपासून—मध्यंतरींचीं कांहीं वर्षें सोडल्यास—आतांपर्यंत एकसारखी वाढतच गेली आहे.

---

१. तुफेल अहमद : पृ. २८३.

## १०. अलीगढ–कॉलेजचे इंग्रज प्राध्यापक व अलीगढचें राजकारण

वर सांगितलेंच आहे कीं, मुसलमानांनीं इंग्रजी विद्या शिकावी याची सर सय्यद अहमदांना अत्यंत उत्सुकता लागून राहिलेली होती. १८७५ सालीं त्यांनीं एक शाळा उघडली. तिचा विकास 'महॉमेडन् अँग्लो–ओरिएंटल् कॉलेजमध्यें होऊन नंतर त्याचें अलीगढच्या मुस्लिम युनिव्हर्सिटींत रूपांतर झालें. कोणी एक बेक नांवाचा इंग्रज त्या संस्थेंत प्राध्यापक बनला आणि १८८३ सालापासून १८९९ पर्यंत म्हणजे मृत्यूपर्यंत तो संस्थेंत त्याच हुद्यावर राहिला. बेकसाहेबांची स्वारी ऐन वेळेवर येऊन दाखल झाली होती. हिंदूंमध्यें जें इंग्रजी शिक्षण फैलावलें होतें, त्या शिक्षणाबरोबरच स्वातंत्र्याच्या व लोकसत्तेच्या कल्पनांचाहि प्रसार झाला होता, आणि त्या कल्पनांना आतां वाचा फुटूं लागली होती. राष्ट्रीय वृत्तीची वाढ झपाट्यानें होत चालली होती, आणि या वाढत्या राष्ट्रवादाला पायबंद घालण्यासाठीं इतके दिवस दूर ढकललेल्या मुसलमानांना आपल्या कृपाछत्राखालीं घेण्याचा काळ आला आहे याची जाणीव इंग्रजांना होऊन चुकली होती. या नीतीचा पुरस्कार बेकनें मोठ्या हिरीरीनें केला. 'सर सय्यद अहमदांना राष्ट्रीयवादापासून अलग करण्याचे, ब्रिटिश उदारमतवाद्यांबद्दलची त्यांची निष्ठा कट्टरांकडे वळवून आणण्याचे, आणि सरकार व मुसलमान यांमध्यें सलोखा घडवून आणण्याबाबत त्यांना उत्साही बनवण्याचे भगीरथ प्रयत्न मि. बेकनें चालवले होते, आणि त्याच्या प्रयत्नांना यशहि कल्पनातीत आलें.'[१] पहिल्या प्रथमच जर कोणती गोष्ट बेकनें केली असेल तर ती म्हणजे सर सय्यदांनीं अनेक वर्षें चालवलेल्या 'इन्स्टिटयूट् गॅझेट' या वृत्तपत्राचीं संपादकीय सूत्रें आपल्या हातीं घेणें. कॉलेजांतल्या पूर्वीच्या युरोपियन् प्रोफेसरांप्रमाणें न वागतां बेक् मुसलमान विद्यार्थ्यांत मनमोकळेपणानें मिसळत असे. त्यामुळें विद्यार्थीवर्गात तो फार लोकप्रिय झाला होता. त्याचें पाहून इतर इंग्रज अध्यापक देखील तसेंच करूं लागले व त्यांनीं कॉलेजांत

---

१. मेहेता व पटवर्धन, : कम्यूनल् ट्रँगल्, पृ. ५८.

अनेक संस्था काढण्याच्या कामीं हातभार लावला. त्यांच्या वजनामुळें कॅालेजच्या कार्यक्रमांत व खेळांत जिल्ह्याचे अधिकारी सामील होण्यास सुरुवात झाली. हा सलोखा इतका वाढत गेला कीं, १८८८सालीं त्या प्रांताचे ले० गव्हर्नर सर ऑक्लंड् कॉल्व्हिन् यांनीं अलीगढ–कॉलेजांतील विद्यार्थी इंग्लंडांतील विश्वविद्यालयांतल्या व पब्लिक् स्कूलसमधल्या विद्यार्थ्यांच्या बरोबरीचे असल्याचें बोलून दाखवलें. इंग्रजी तऱ्हेच्या राहणीचे सर सय्यद हे मोठे चहाते होते. विद्यार्थ्यांना त्या तऱ्हेच्या राहणीचें वळण लावण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. परंतु ती राहणी हिंदुस्थानसारख्या सापेक्षतया गरीब देशाच्या मानानें फार महागाईची ठरते, अशी टीका त्यांच्याच सहकाऱ्यांनीं व पाठीराख्यांनीं केली आहे. तथापि, अलीगढचें हें वळण, तेथील युरोपियन प्राध्यापक–अध्यापक यांचें सरकार-दरबारीं असणारें वजन व सरकारच्या धोरणांत झालेला बदल यांचा परिणाम होऊन अलीगढच्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकऱ्या मिळूं लागल्या. या नवीन परिस्थितीचाहि सर सय्यद अहमदांच्या मनावर परिणाम झाल्यावांचून राहिला नसावा. इन्स्टिटयूट् गॅझेट्चें संपादकत्व नांवाला सर सय्यदांच्याकडे असलें, तरी खरें संपादकीय नियंत्रण बेक्च्या हातीं आल्यानंतर पत्राचें धोरण बदललें. त्या काळीं सर सय्यदांकडे बंगाली लोकांची चहा फार असे. 'बंगाली लोकांच्या गुणांची तावत्कालपर्यंत सर सय्यदांच्या मनावर फार छाप बसलेली होती. त्यांच्याचमुळें शिक्षणामध्यें इतकी प्रगति झाली असून स्वातंत्र्याचा व स्वदेशाभिमानाचा प्रसार देशांत घडवून आणण्यास तेच कारणीभूत आहेत असें त्यांचें मत होतें. हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या शिरोभागीं ते आहेत आणि त्यांचा आपणांस मोठा अभिमान वाटतो असें ते बोलून दाखवीत.'[१] 'बेक्नें इन्स्टिटयूट् गॅझेट्मधून बंगाल्यांच्या व त्यांच्या चळवळींच्या विरुद्ध लिहावयास प्रारंभ केला. हें लेखन सर सय्यदांचें आहे अशा समजुतीनें बंगाली लोकांनीं सरसाहेबांवर टीकास्त्र सोडलें, आणि अशा प्रकारें बंगाल्यांबरोबरच्या खुल्या लढ्याला तोंड लागलें.'[२] बेक्नें बंगाल्यां-

---

१. तुफेल अहमद : पृ. २०१. २. उक्त ग्रंथ, पृ. २९२.

संबंधीं वातावरण कलुषित करण्यांत इकडे यश मिळवलें होतें. अशा वेळीं हिंदी राष्ट्रसभेचें पहिलें अधिवेशन मुंबई मुक्कामीं १८८५च्या डिसेंबरांत श्री० डब्ल्यू. सी. बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं भरवण्यांत आलें.

कोणत्याहि हिंदी माणसाला आक्षेप घेतां येण्याजोगें राष्ट्रसभेच्या उद्देशांमध्यें कांहींहि सांपडण्यासारखें नव्हतें. पहिल्या अधिवेशनामध्यें जे ठराव पास करण्यांत आले, त्यांत भारत–मंत्र्यांच्या कौन्सिलची निवडणूक होत जावी, प्रांतिक कायदे–मंडळांतील लोकप्रतिनिधींच्या जागांची वाढ करावी, कायदे-मंडळें पंजाबांत व संयुक्त प्रांतांत स्थापन करावीं, सिव्हिल् सर्व्हिसच्या परीक्षा दोन्ही देशांत एकदमच घेण्यांत याव्या, लष्करी खर्चांत वाढ करूं नये व उत्तर ब्रह्मदेश पादाक्रांत करण्यांत येऊं नये, या मागण्या करण्यांत आलेल्या होत्या. सिव्हिल् सर्व्हिसची परीक्षा व कायदेमंडळांची वाढ यांबाबत सर सुरेन्द्रनाथ बानर्जींनीं आपल्या अलीगढ येथील १८८४सालच्या जाहीर सभेंतल्या भाषणांत ऊहापोह केलेलाच होता. ती सभा खुद्द सरसाहेबांनीं भरवली होती आणि तिचें अध्यक्षपदहि त्यांच्याचकडे होतें. या सूचनांना अंग्लो–इंडियन् वृत्तपत्रांकडून मात्र विरोध होत होता. बेक्साहेबाचें लिखाणहि त्या वृत्तपत्रांतूनच प्रसिद्ध होत असे. सर सय्यदसाहेबांनीं त्या वेळीं विरोधाचा शब्दहि उच्चारला नाहीं; पण पुढें १८४६सालीं डिसेंबरांत महॉमेडन् एज्युकेशनल् कॉंग्रेसच्या प्रस्थापनेच्या प्रसंगीं त्यांनीं असे विचार प्रकट केले कीं, राजकीय प्रश्नांची चर्चा करून मुसलमानांना आपली प्रगति करतां येईल असें ज्यांना वाटत असेल, त्यांच्याशीं आपण सहमत नसून आपणाला विद्यासंपादन हाच मुसलमानांच्या प्रगतीचा एकमेव मार्ग आहे असें वाटतें.

राष्ट्रीय सभेचें दुसरें अधिवेशन १८८६ सालीं कलकत्ता येथें दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आलें. खटल्याचे वेळीं पंचांची उपस्थिति, न्याय व अंमलबजावणी या खात्यांची फारकत व देशाच्या संरक्षणासाठीं स्वयंसेवकांची भरती यांसंबंधींचे ठराव त्या अधिवेशनामध्यें करण्यांत आले. पहिल्या दोन अधिवेशनांत जे ठराव झाले, त्यांत मुसलमानांच्या

हिताला विरोधी असा कांहींच भाग नव्हता. सिव्हिल् सर्व्हिस्‌ची परीक्षा एकाच वेळीं घेण्यांत यावी या मागणीला स्वतः सर सय्यदांचा पाठिंबा होताच. न्यायखातें व अंमलबजावणीचें खातें वेगवेगळें करण्याची मागणी मुसलमानी अंमलांतल्या प्रत्यक्ष वहिवाटीला धरूनच होती. कंपनीच्या राजवटींत हीं दोन्ही खातीं एकत्र करण्यांत आलीं होतीं. पुढें त्यांची फारकत झाली; पण १८५७ नंतर तीं पुन्हां एकत्र केलीं गेलीं. कायदे—मंडळांतील लोकप्रतिनिधींची वाढ करावी व ज्या प्रांतांत तीं नाहींत तेथें त्यांची स्थापना करण्यांत यावी या मागण्यांनाहि सरसाहेबांनीं पूर्ववयांत पाठिंबा दिलेला होता. १८८३सालीं त्यांनीं निवडणुकीच्या पद्धतीबाबत तेवढा आपला मतभेद दर्शविला होता इतकेंच. एकंदरींत सर सय्यदांना राष्ट्रसभेला विरोध करण्याचें कांहींच कारण नव्हतें; पण राष्ट्रीय सभेची चळवळ क्रांतिकारक चळवळ आहे असा ज्या कांहीं अंमलदारांनीं ग्रह करून घेतलेला होता, त्यांच्या व विशेषतः बेक्‌च्या मतांचा प्रभाव सरसाहेबांच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. सनदशीर राजकारणाच्या मर्यादेंतच कार्य करीत राहण्याचा संयम राखण्याइतपत मुसलमानांचें शिक्षण अद्यापि प्रगत झालेलें नाहीं, म्हणून ते एकदां उठले तर त्यांचा असंतोष पुन्हां १८५७च्या मार्गानेंच प्रकट होण्याचा संभव आहे, असें या गृहस्थानें सर सय्यदांच्या मनांत भरवून दिलें; आणि राजकीय चळवळींत भाग घेतल्यानें मुसलमानांची हानीच होईल याविषयीं सरसाहेबांची पक्की खात्री होऊन चुकली. ह्यूम्‌साहेबांनीं सर सय्यदांना एक अनावृत पत्र लिहिलें, हें सर सय्यदांच्या उत्तरासह १२ डिसेंबर १८८७च्या इन्स्टिट्यूट् गॅझेट्‌मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

बद्रुद्दिन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखालीं १८८७च्या डिसेंबरांत मद्रास येथें राष्ट्रीय सभेचें जें तिसरें अधिवेशन भरलें होतें, त्याला अनेक मुसलमान उपस्थित होते. सरकारच्या वरिष्ठ अंमलदारांची भूमिका अद्यापि राष्ट्रसभा—विरोधी नसल्याकारणानें मद्रास येथें राष्ट्रसभेंत आलेल्या प्रतिनिधींना गव्हर्नरांनीं खाना दिला. राष्ट्रीय सभेच्या मद्रास येथील अधिवेशनांत जे ठराव संमत

झाले त्यांत लष्करामध्यें हिंदी लोकांना अधिकारांच्या जागा देण्यांत याव्यात, हिंदुस्थानांत लष्करी शिक्षणाचें विद्यालय स्थापावें, हत्यारांच्या कायद्यांत सुधारणा करावी, हजाराहून कमी उत्पन्नावरचा कर माफ करावा व यांत्रिक शिक्षणाला उत्तेजन देण्यांत यावें, अशा मागण्या करण्यांत आल्या होत्या. महॉमेडन् एज्युकेशनल् कॉंग्रेसचें अधिवेशन देखील लखनौ येथें त्याच सुमारास भरलें. त्या अधिवेशनानंतर भरलेल्या जाहीर सभेंत सर सय्यद अहमदांनीं राष्ट्रीय सभेविरुद्ध आपलें पहिलें भाषण केलें. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, हिंदी लोक व इंग्रज यांच्यांत समानता असली पाहिजे असें नेहमीं आग्रहानें सांगणाऱ्या सर सय्यद अहमदांची मजल येथपर्यंत गेली कीं, निवडणुकी करून कायदेमंडळांचे सभासद मुक्रर करण्यांत येऊं नयेत, कारण निवडणुकींमुळें सामान्य माणसें निवडून येतील आणि त्यांना उद्देशून 'माझे सन्माननीय सहकारी' असे शब्द व्हाइसरॉयांनीं उच्चारण्याइतकी त्यांची लायकी असणार नाहीं, आणि ते बी. ए. व एम्. ए.च्या पदव्या धारण करणारे पदवीधर जरी असले, तरी त्यांना खान्याच्या वेळीं इंग्रज सरदारांबरोबर बसूं देणें शक्य होणार नाहीं इत्यादि उद्गार त्यांनीं काढले! सरकारनें देशांतील रईस म्हणजे खानदानी लोकांनाच कायदेमंडळावर नेमल्यास त्यांत सरकारचा दोष नाहीं असें त्यांना वाटूं लागलें. सिव्हिल् सर्व्हिसची परीक्षा दोन्हीकडे घेण्यांत यावी, या सूचनेलाहि त्यांच्याकडून विरोध होऊं लागला. इंग्लंडांत होणाऱ्या परीक्षेमध्यें एकादा उमराव किंवा एकादा शिंप्याचा पोर उत्तीर्ण झाला तरी त्याची जातकुळी येथें माहिती नसल्याकारणानें लोक ह्या दोघांना सारखाच मान देतात; पण सिव्हिल् सर्व्हिसची परीक्षा या देशांतच घेतली गेल्यास लोकांना उमेदवारांची जातपात ठाऊक होईल आणि मग परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारावर आलेल्या कनिष्ठ जातीच्या अधिकाऱ्यापुढें मान तुकवण्यास उच्च वर्गीय लोक तयार होणार नाहींत, असा कोटिक्रम सर सय्यद करूं लागले.

श्री० बद्रुद्दिन तय्यबजींनीं सर सय्यद अहमदांना लिहून कळविलें कीं, राष्ट्रीय सभेला येणाऱ्या मुसलमान प्रतिनिधींनीं जर एकाद्या गोष्टीला विरोध

दर्शविला तर तिचा विचार राष्ट्रीय सभा करणार नाहीं. त्यावर सरसाहेबांनीं असें उत्तर दिलें कीं, राष्ट्रीय सभा ही राजकीय संस्था आहे आणि तिनें घेतलेला कोणताहि राजकीय प्रश्न मुसलमानांच्या हिताशीं अविरोधी असणें शक्य नाहीं. सर सय्यद अहमदांची दिशाभूल करण्यांत व त्यांचीं मतें पार पालटून टाकण्यांत बेक्साहेब कसा संपूर्णपणें यशस्वी झाला हें यावरून दिसून येतें. सर सय्यदांच्या भाषणामुळें मुसलमानांनीं राष्ट्रीय सभेकडे अजिबात पाठ फिरविली आणि हिंदुस्थानमध्यें प्रातिनिधिक सरकारच्या स्थापनेला ते विरोध करूं लागले, असें जें विधान सर थिओडोर मॉरिसन् यांनीं आपल्या अलीगढ कॉलेजच्या इतिहासांत केलें आहे त्याचें आश्चर्य वाटावयास नको. १८८८च्या मार्चमध्यें सर ऑक्लंड् कोल्व्हिन् यांनीं अलीगढ कॉलेजला भेट दिली, तेव्हां त्यांना देण्यांत आलेल्या मानपत्राला उत्तर देतांना त्यांनीं संस्थेची व तेथील विद्यार्थ्यांची न भूतो न भविष्यति अशी स्तुति केली ! पुढें १८८८च्या डिसेंबरांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अलाहाबादेला भरलें. तें अधिवेशन भरूं नये म्हणून सर ऑक्लंड् यांनीं व त्यांच्या सरकारनें जंग जंग पछाडले, पण अखेरीस त्यांचें कांहींहि न चालतां अधिवेशन भरलेंच. राष्ट्रीय सभेची स्थापना करण्याच्या कामांत ह्यूमसाहेबांना उत्तेजन देणारे लॉर्ड् डफरिनहि एव्हांना राष्ट्रसभाविरोधी बनले होते.

याच वेळीं गोरक्षणाच्या चळवळीला प्रारंभ झालेला होता. सरकार-पक्षीय मुसलमानांनीं ती संधि साधून अलाहाबादेस एक सभा भरविली आणि तींत केवळ गोरक्षणाच्याच विरुद्ध नव्हे, तर मुसलमानांनीं राष्ट्रीय सभेंत सह-भागी होण्याच्याहि विरुद्ध ठराव समंत केला. मुसलमानांनीं राष्ट्रीय सभेंत जाऊं नये असा फतवाहि कांहीं मंडळींनीं काढला. त्याच्या विरुद्ध फतवा मौलवी अब्दुल कादीर लुधियानवी यांनीं मिळवून तो अनेक विद्वानांच्या सह्यांनिशीं प्रसिद्ध केला. लुधियाना, जालंदर, होशियारपूर, कपूरथळा, अमृतसर, चाप्रा, गुजरात, जौनपूर, फेरोझपूर, कसूर, मुझफ्फरनगर, दिल्ली, रामपूर, बरेली, मोरादाबाद येथल्या व खुद्द मदिना आणि बगदाद-शरीफ येथीलहि उलेमांच्या

सह्या या फतव्यावर होत्या. फतव्यावर सह्या करणाऱ्यांमध्यें त्या काळचे अनेक पंडित व धर्मज्ञ सामील होते. ऐहिक बाबतींत राष्ट्रीय सभेंतल्या हिंदूंच्या-बरोबर मुसलमानांनीं कार्य करण्यास हरकत नाहीं, असें त्या फतव्यांत म्हटलें होतें. एकीकडे सर सय्यद अहमद खानांचें थोर व्यक्तिमत्व राष्ट्रीय सभेच्या विरुद्ध खडें उभें राहिलें होतें, तर दुसरीकडे श्री० तय्यबजी, अली महंमद भीमजी व रहमतुल्ला सयानी यांच्या नेतृत्वाखालीं मुंबई व मद्रास येथील मुसलमान राष्ट्रीय सभेला अनुकूल झाले होते आणि मुसलमानांनीं राष्ट्रीय सभेंत जावें याबद्दल त्या काळच्या सर्व उलेमांनींहि आपली संमति दर्शविली होती.

१८८८च्या ऑगस्टांत युनायटेड् इंडियन् पेट्रिऑटिक् ॲसोसिएशन् या संस्थेची अलीगढ येथें स्थापना झाली. तींत हिंदु व मुसलमान दोन्ही समाजांतील लोक होते. संस्थेचे उद्देश येणेंप्रमाणें होते:—( १ ) हिंदुस्थानांतील सर्वच जमाती, वरिष्ठ वर्गाचे लोक व राजेरजवाडे राष्ट्रीय सभेमध्यें नाहींत ही गोष्ट वृत्तपत्रें व पत्रकें यांच्याद्वारा पार्लमेंट्च्या सभासदांच्या कानीं घालावयाची व राष्ट्रीय सभेकडून केल्या जाणाऱ्या विधानांचें खंडन करावयाचें; (२) राष्ट्रीय-सभेला विरोधी असणाऱ्या देशांतील हिंदु व मुसलमान संस्थांची माहिती पार्लमेंट्ला व इंग्रज लोकांना पुरवावयाची; (३) कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामीं मदत करावयाची. हिंदुस्थानावरील ब्रिटिश हुकमत बळकट करण्याच्या व राष्ट्रीय सभेपासून लोकांना परावृत्त करण्याच्या कामीं खटपट करावयाची. ही सर्व योजना म्हणजे बेक्च्या खटपटीचें फळ होतें. ही योजना पार पाडण्यासाठीं बेक् व सर सय्यद अहमद यांना अधिकार देण्यांत आले. असोसिएशन्ची एक शाखा इंग्लंडमध्यें मॉरिसन् नामक एका इंग्रजाच्या घरींच उघडण्यांत आली. हाच गृहस्थ पुढें बेक्च्या मृत्यूनंतर अलीगढ-कॉलेजचा प्राध्यापक बनला. अनेक हिंदु व मुसलमान जमीनदार व कांहीं युरोपियन् लोक या संस्थेचे सभासद बनले. संस्थेचे आश्रयदाते म्हणून संस्थानिकांची योजना करण्याचें ठरवण्यांत आलें. औधच्या तालुकदार ॲसोसिएशन्मध्यें राजा शिवप्रसाद यांनीं अशी सूचना मांडली कीं, 'एक इंडियन्

लॉयल् असोसिएशन् (हिंदी राजनिष्ठ मंडळी) स्थापण्यांत यावी आणि पेट्रिऑटिक् असोसिएशन्ला तिची शाखा म्हणून जोडून घेण्यांत यावें. राजासाहेबांनीं अशीहि सूचना केली होती कीं, हिंदी भाषांतून भाषणें करण्याची बंदी करण्यांत यावी; कारण तसें न केल्यास शांततेला धोका उत्पन्न होण्याचा व बंड माजण्याचा संभव आहे.' या सूचनेचा उद्देश राष्ट्रीय सभेला दडपून टाकण्याचा होता. सरकार, युनायटेड् इंडियन् पेट्रिऑटिक् असोसिएशन्-सारख्या संस्था व राजा शिवप्रसाद यांच्यासारख्या व्यक्ती या सर्वांचा विरोध असतांहि अलाहाबादच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला १२४८ प्रतिनिधी उपस्थित होते. त्याच्या आदल्या वर्षीच्या अधिवेशनांत फक्त ६०७ प्रतिनिधी होते. अलाहाबादेला हजर राहिलेल्या मुसलमान प्रतिनिधींनीं असें बोलून दाखविलें कीं, अलीगढच्या पुढाऱ्यांनीं विरोध सुरू केल्याकारणानेंच आपल्या प्रतिनिधींची संख्या वाढली आहे. राष्ट्रीय सभेच्या अलाहाबादच्या अधिवेशनाविरुद्ध येवढें रान उठविण्यांत आलें असलें, तरी त्यांत पास झालले ठराव पाहिले तर त्यांत मद्य–नियंत्रणाला, पाठिंबा, शिक्षणावर अधिक खर्च करण्याची मागणी, कायम–धारापद्धति सर्वत्र लागू करण्यांत यावी अशी सूचना व मिठावरील कराला विरोध अशा प्रकारच्याच गोष्टी दिसून येतील.

हिंदुस्थानांत लोकसत्ताक राज्यपद्धति सुरू करण्यांत यावी अशा अर्थाचा एक ठराव ब्रॅड्लॉ यांनीं १८८९मध्यें पार्लमेंट्मध्यें दाखल केला. बेक्नें त्याच्याविरुद्ध अर्ज गुदरला. हिंदुस्थानांत भिन्न जमातींची वस्ती असल्याकारणानें लोकसत्ताक पद्धति हिंदुस्थानला मानवणार नाहीं असें अर्जांत नमूद केलें होतें. अलीगढ कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या टोळ्या सह्या गोळा करण्यासाठीं पाठवून बेक्नें त्या अर्जावर पुष्कळ सह्या मिळविल्या. एक टोळी खुद्द बेक्साहेबांच्याच नेतृत्वाखालीं दिल्लीला गेली. 'साहेबमजकुरांनीं स्वतः जुम्मा मशिदीच्या दारापाशीं आसन ठोकलें आणि मशिदींत प्रार्थनेसाठीं जाणाऱ्यांच्या सह्या बेक्च्या आदेशानुसार विद्यार्थिगणांनीं गोळा केल्या. हिंदु लोक गोहत्या बंद करण्याच्या खटपटींत असून त्यांच्याविरुद्ध सरकारकडे हा अर्ज

पाठवण्यांत येत आहे अशी थाप सह्या देणारांना मारण्यांत आली! वरील विधान अलीगढच्या कॉन्फरन्स गॅझेट्मध्यें विलायत हुसेनसाहेब यांनीं केलें आहे. अशा मार्गांनें २०७३५ सह्या मिळविल्यावर १८९०सालीं तो अर्ज पार्लमेंट्कडे पाठवून देण्यांत आला.''[१]

मुसलमानांच्या नांवानें राष्ट्रीय सभेला विरोध करण्याचें हें कार्य युनायटेड् इंडियन् पेट्रिऑटिक् असोसिएशन्नें कांहीं वर्षें चालविलें. नंतर १८९३मध्यें महॉमेडन्–अँग्लो ओरिएंट्ल् डिफेन्स असोसिएशन् ऑफ अपर इंडिया नामक एक नवीनच संस्था स्थापण्यांत आली. या मंडळाचे उद्देश येणेंप्रमाणें होतेः—(अ) मुसल्मानांची विचारसरणी इंग्रजांसमोर व सरकारसमोर मांडणें आणि त्यांच्या राजकीय हक्कांचें संरक्षण करणें; (आ) मुसल्मानांत राजकीय चळवळीचा प्रसार न व्हावा म्हणून तिला प्रतिबंध करणें; (इ) ब्रिटिश राज्य बळकट व्हावें, कायदा व सुव्यवस्था नांदावी व लोकांत राजनिष्ठा निर्माण व्हावी म्हणून हरप्रयत्न करणें. पेट्रिऑटिक् ॲसोसिएशन् ही हिंदु–मुसलमानांची संयुक्त संस्था होती असें दिसतें. ब्रिटिश राज्याला मजबुती आणण्यासाठीं सुद्धां हिंदु–मुसलमानांत सहकार्य व्हावें ही गोष्ट बेक्ला परवडण्यासारखी नव्हती, म्हणून त्यानें डिफेन्स् ॲसोसिएशन् स्थापन करून मुसलमानांना देशांतल्या इतर जमातींपासून वेगळें काढलें. परागतिक इंग्रजांच्याबरोबर मात्र त्यांचें सूत जमवून देण्यांत आलें होतें आणि तरीहि संस्थेचें नांव ठेवण्यांत आलें होतें 'डिफेन्स् ॲसोसिएशन्' (संरक्षक मंडळ). हें नांव देखील १८८३सालीं लॉर्ड् रिपन्ला विरोध करण्यासाठीं स्थापन झालेल्या अँग्लो–इंडियन् डिफेन्स ॲसोसिएशन्कडून उसनेंच घेण्यांत आलें होतें. या नव्या डिफेन्स् ॲसोसिएशनचें चिटणिशीपण बेक्महाशयांनाच देण्यांत आलें.

ॲसोसिएशन्च्या पहिल्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगीं भाषण करतांना बेक्नें असा मुद्दा मांडला कीं, ब्रॅडलॉ यांच्या ठरावाविरुद्ध पेट्रिऑटिक् ॲसोसिएशन्नें सह्या गोळा केल्या असल्या, तरी त्या ॲसोसिएशन्मध्यें दोन दोष

१. तुफेल अहमद : पृ. ३११–१२

आहेत. ती हिंदु-मुसलमानांची संयुक्त संस्था असून तिला इतर अनेक संस्था जोडण्यांत आलेल्या आहेत हा एक दोष, आणि संस्थेमार्फत सार्वजनिक सभा भरविण्यांत येतात व त्यामुळें लोकजागृति निर्माण होते हा तिच्यांतला दुसरा दोष. डिफेन्स् ॲसोसिएशन् ही फक्त मुसलमानांची संस्था राहील, तिच्यांत हिंदूंना जागा मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें सार्वजनिक सभा भरविणें व चळवळ करणें हीं कामें ती करणार नाहीं. ती इतर संस्था स्वतःला जोडूनहि घेणार नाहीं. ॲसोसिएशन्चें एक कौन्सिल किंवा विधिमंडळ असेल व त्या विधिमंडळाच्या हातीं संस्थेचें सर्व काम सुपूर्त करण्यांत येईल. सर्वसाधारण सभासदांच्या हातीं तें काम सोपवण्यांत येणार नाहीं. बेक्च्या या भाषणां-मधील एक अर्थपूर्ण भाग उद्धृत करण्यालायक आहे : 'गेल्या कांहीं वर्षांत देशांमध्यें दोन प्रकारच्या चळवळी सामर्थ्यवान् बनत चाललेल्या दिसतात. एक राष्ट्रीय सभेची व दुसरी गोहत्या-विरोधाची. पहिली संपूर्णपणें इंग्रजांच्या विरुद्ध आहे, तर दुसरी मुसलमानांच्या विरुद्ध आहे. इंग्रज सरकारची सत्ता कांहीं हिंदु-गटांच्या हातीं संक्रमित व्हावी, राज्यकर्ते कमकुवत बनावेत, जनतेच्या हातीं शस्त्रें यावीं, लष्कराचें सामर्थ्य खची व्हावें आणि त्याच्यावर होणारा खर्च कमी करावा हे राष्ट्रीय सभेचे उद्देश आहेत. या उद्देशांविषयीं सहानुभूति बाळगणें मुसलमानांना शक्य होणार नाहीं. गोवध करण्याची मुसलमानांना बंदी व्हावी आणि इंग्रजांना व मुसलमानांना अन्नासाठीं गोहत्त्या करतां येऊं नये, हे गोवधविरोधी चळवळीचे उद्देश आहेत. गोहत्त्या बंद पाडण्यासाठीं आपल्या विरोधकांवर बहिष्कार घालून त्यांना नरम करण्याचे उद्योग त्यांनीं आरंभले आहेत. त्यामुळें मुंबई, अझमगढ वगैरे ठिकाणीं दंगे होऊन रक्तपात झाला आहे. म्हणून मुसलमानांनीं व इंग्रजांनीं हिंदूंना विरोध करण्यासाठीं एक होणें जरुरीचें झालें आहे. त्याचप्रमाणें लोकसत्ताक राज्य-पद्धति हिंदुस्थानला अनुकूल नसल्याकारणानें तिलाहि विरोध करणें आवश्यक आहे. खरी राज्यनिष्ठा व कार्यैक्य निर्माण व्हावें म्हणून आपणांला प्रचार करावयास हवा.'[१]

---

१. तुफेल अहमद : पृ. ६१५.

ब्रॅड्लॉच्या ठरावाविरुद्ध बेक्नें २०,००० सह्यांचा अर्ज कसा केला तें आपण वाचलेंच. सिव्हिल् सर्व्हिस्‌ची परीक्षा दोन्ही देशांत घेण्यांत यावी या मागणीविरुद्धहि बेक्नें असाच एक खलिता रवाना केला. या खलित्यांतील विनंति मान्य करण्यांत आल्याची बातमी इकडे पोंचतांच डिफेन्स्-कौन्सिल्नें आभार-प्रदर्शक ठराव केला आणि त्याला अशी पुस्ती जोडली कीं, एकदम परीक्षा घेण्याची पद्धति सुरू केल्यास हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेच्या स्थैर्याला ती विघातक ठरेल आणि हिंदुस्थानची नैतिक व ऐहिक भरभराट ज्यावर अवलंबून आहे, त्या जीविताचें व वित्ताचें संरक्षण करणें अशक्य होऊन बसेल!

चढाओढीच्या परीक्षांच्या निकालावरून नेमणुकी करण्याची पद्धति हिंदुस्थानांत सुरू करण्याविरुद्ध बेक्नें चळवळ सुरू केली. नौकरीसाठीं परीक्षांतील श्रेष्ठ गुणांवर अवलंबून न राहतां मुसलमानांनीं आपल्या राजनिष्ठेवर हवाला ठेवून राहणें अधिक चांगलें, असाहि मुद्दा बेक्नें मांडला होता. डिफेन्स्-ॲसोसिएशन्‌च्या वतीनें इंग्लंडांतहि प्रचार करण्यांत आला आणि १८९५मध्यें स्वतः बेक्नें तेथें एक व्याख्यान दिलें. इंग्रज-मुसलमान-ऐक्य शक्य आहे, पण हिंदु-मुसलमान-ऐक्य असंभवनीय असून प्रातिनिधिक राज्य-पद्धति हिंदुस्थानला योग्य अशी नाहीं, हा बेक्च्या व्याख्यानांतला प्रतिपाद्य विषय होता. हिंदुस्थानांत प्रातिनिधिक राज्यपद्धति सुरू केली तर बहुसंख्य हिंदूंचा अल्पसंख्य असणाऱ्या मुसलमानांवर जोरा चालू होईल, असें त्यानें सांगितलें. व्याख्यानांत कधीं मुसलमानांची पाठ थोपटली, तर कधीं ते नीटपणें न वागल्यास किंवा त्यांनीं हिंदूंची नीति अनुसरल्यास त्यांचा सर्व-नाश होईल अशी धमकीहि त्यानें देऊन ठेवली.

त्याच सुमाराला सरहद्दीवरील आपलें आक्रमक धोरण नेटानें पुढें दामटण्याचा विचार सरकार करीत होतें आणि लष्करावरील खर्चांत वाढ करण्याची सरकारची इच्छा होती. राष्ट्रीय सभेचा याला विरोध होता. डिफेन्स् ॲसोसिएशन्‌च्या १८९६ सालच्या वार्षिक अहवालांत बेक्नें असे विचार प्रदर्शित केले कीं, सैन्य व आरमार यांच्या सामर्थ्यांत वाढ करण्याची आवश्यकता निर्माण

झालेली आहे. लष्करी खर्चांत काट करण्याच्या विरुद्ध आपली असोसिएशन् असल्याचा प्रस्ताव स्वतः सर सय्यद् अहमद् यांनीं मांडला. ठरावावर भाषण करतांना ते म्हणाले कीं, येथील गोऱ्या सैनिकांची संख्या अल्प आहे आणि सरहद्दीच्या संरक्षणाच्या दृष्टीनें देशांतील लष्कर अपुरें असल्याबद्दल आपण एका प्रसंगीं लॉर्ड डफरिन् यांची खात्री पटविली आहे.[1] याच्या उलट, सरहद्दीवरील सरकारच्या आगे कदम धोरणाचा निषेध करणारे ठराव राष्ट्रीय सभेनें केले आणि असेंहि सुचविलें कीं, सरहद्दीबाबत मैत्रीचें धोरण स्वीकारण्यांत यावें व खातखोऱ्यांवर करण्यांत येणारा भरमसाट खर्च बंद करावा. ध्यानांत ठेवण्याची गोष्ट अशी कीं, एकजात मुसलमान असणाऱ्या सरहद्द प्रांतीय जनतेच्या मृत्यूस व विनाशाला कारणीभूत होणाऱ्या आक्रमक धोरणाला राष्ट्रीय सभा विरोध करीत होती, तर महॉमेडन् डिफेन्स् ॲसोशिएशन् 'लष्कर व लष्करी खर्च यांत वाढ करण्यांत यावी' अशी मागणी करीत होती!

एकीकडे सर सय्यदांच्या विषयीं निष्ठा, तर दुसरीकडे मुसलमान जनतेच्या खऱ्या कल्याणाची ओढ यांच्यामध्यें ज्या अनेक मुसलमान व्यक्तींच्या मनाची ओढाताण सुरू होती, त्यांना या घटनांनीं आपलें अन्तर्निरीक्षण करण्यास उद्युक्त केलें. ही गोष्ट पुढें १९०७ सालीं नबाब व कार-उल्-मुल्कांनीं जें लिहिलें त्यावरून दिसून येते. ते लिहितात, "हा सारा प्रकार पाहून समाजाच्या कल्याणाचा विचार ज्यांच्या मनांत होता त्यांना चिंता वाटूं लागली व त्यांच्यांत चर्चा सुरू झाली. शेवटीं सर सय्यद अहमदांच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा आणि त्यांचें सामर्थ्य, प्रतिष्ठा व थोरपणा यांचा विचार बाजूस सारून व त्यांच्याविषयीं वाटणाऱ्या आदराकडे दुर्लक्ष करून केवळ समाजहितावरच दृष्टि ठेवावी अशा निर्णयावर विश्वस्तांपैकीं कांहीं मंडळी आली. लाहोरच्या 'पैसा-अखबारा'मध्यें एक लेखमाला प्रसिद्ध करण्याचें निश्चित करण्यांत आलें. हे लेख निनांवीं प्रसिद्ध व्हावयाचे नव्हते. नबाब मोहसिन-उल्-मुल्क, शम्सुल-उलेमा मौलवी, ख्वाजा अल्ताफ हुसेन हाली व स्वतः नम्र लेखक

---

१. तुफेल अहमद : पृ. ३३०.

यांच्या नांवांवर ते प्रसिद्ध व्हावेत असें ठरलें. पहिला लेख मीं लिहिला व तो सल्ल्यासाठीं नबाब मोहसिन–उल्–मुल्क बहादुर व हालीसाहेब यांच्याकडे रवाना केला. त्या वेळीं ते बहुतकरून अलीगढ मुक्कामींच राहत असावेत. इतक्यांत नेत्याच्या ( म्ह. सर सय्यदांच्या ) मृत्यूचें वर्तमान माझ्या कानीं आलें. त्याबरोबर लेख परत पाठवावे अशी तार मीं नबाबबहादुरांना केली. कारण सरसाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अंगच्या अलौकिक गुणांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींचा विचार आमच्या डोक्यांत येणें शक्यच नव्हतें. लेखमाला प्रसिद्ध करण्याचा बेत त्या वेळीं रद्द करण्यांत आल्यामुळें आणि त्यांच्या मृत्यूनंतर या तक्रारींना अवकाशच न राहिल्यामुळें ही हकिगत अलीगढ कॉलेजच्या हिताच्या दृष्टीनें मी आतां प्रसिद्ध करीत आहें."[१]

सर सय्यदांच्या मृत्यूनंतर बेक्नें आपलें मागचेंच धोरण पुढें चालू ठेवलें. पण बेक्च स्वतः १८९९ मध्यें मरण पावला.

अलाहाबाद कोर्टाचे सरन्यायाधीश सर आर्थर स्ट्रॅची यांनीं म्हटल्याप्रमाणें बेक् हा जगाच्या पाठीवरच्या वेगवेगळ्या प्रदेशांत साम्राज्याचा इमला उभारण्यासाठीं आपापल्या परीनें खपणाऱ्या अनेक इंग्रजांपैकीं एक होता आणि एकाद्या सैनिकाप्रमाणें आपलें कर्तव्य बजावीत असतांच त्याला मरण आलें होतें.

बेक्च्या मागून थिओडोर मॉरिसन् अलीगढ–कॉलेजचा प्राध्यापक बनला. इंग्लंडांतील पेट्रिऑटिक् ॲसोसिएशनची शाखा मॉरिसन्च्या घरींच काढण्यांत आली होती हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. तेव्हां बेक्च्या नंतर अलीगढ–कॉलेजचें प्राध्यापकत्वच काय, पण त्याच्या राजकारणांतील वारसादेखील मॉरिसन्कडे यावा हें साहजिकच होतें. हिंदु–मुसलमानांमध्यें दुही माजवण्याचें जें कार्य अलीगढच्या इंग्रज प्राध्यापकांनीं चालविलें होतें, तें त्या वेळीं घडून आलेल्या कांहीं घटनांमुळें सुकर झालें. सन १९००च्या एप्रिलमध्यें संयुक्त प्रांताच्या सरकारनें एक ठराव प्रसृत केला आणि त्यावरून

---

१. तुफेल अहमद : पृ. ३३४.

'उर्दू-नागरी' वाद माजला. कोर्टाच्या कामकाजांत नागरी लिपि वापरण्यास परवानगी असावी या सरकारच्या म्हणण्याला हिंदूंनीं पाठिंबा दिला; पण त्याला मुसलमानांनीं विरोध केला. नागरी लिपि वापरण्याची परवानगी असावी म्हणून कित्येक वर्षें हिंदूंची खटपट चालू होती; पण सर सय्यद अहमदांच्या विरोधामुळें त्यांना हार खावी लागत होती. १९००सालीं प्लेगची सांथ संयुक्त प्रांतांत सुरू झाल्याकारणानें सरकारनें प्लेगच्या रोग्यांना वेगळें काढण्याची पद्धत चालू केली. त्यावरून दंगे उद्भवले व त्यांत हिंदु-मुसलमानांनीं भाग घेतला. १९००सालीं १ एप्रिल रोजीं असाच एक दंगा कानपूरमध्यें सुरू झाला आणि त्यामुळें सरकारला चिंता वाटूं लागली. या दंग्यानंतर पंधरवड्याच्या आंतच कोर्ट-कचेऱ्यांत देवनागरी लिपीला अनुमति देणारा ठराव जाहीर झाला. त्याचा परिणाम हिंदु-मुसलमानांमध्यें बेबनाव होण्यांत झाला. अलीगढ येथें १९००सालच्या मे महिन्यांत छत्तारीच्या नबाबांच्या अध्यक्षतेखालीं निषेधाची सभा भरवण्यांत आली. नबाब मोहसिन-उल्-मुल्कांनीं मोठें आवेशयुक्त भाषण केलें आणि आपला नवा हुकूम मागें घेण्याची विनंति सरकारला करणारा ठराव सभेमध्यें समंत करण्यांत आला. पण सभेच्या अध्यक्षांवर सरकारची गैरमर्जी झाल्याकारणानें त्यांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन टाकला! त्यानंतर नबाब मोहसिन-उल्-मुल्क हे अध्यक्ष झाले व त्यांनीं या विषयावर कांहीं भाषणें केलीं. नंतर प्रांताच्या ले० गव्हर्नरनें स्वतः अलीगढला भेट दिली, तेथल्या विश्वस्तांच्या गांठी घेतल्या आणि नबाब मोहसिन-उल्-मुल्क यांनीं एक तर उर्दू कॉन्फरन्सचे अध्यक्ष म्हणून राहावें, नाहीं तर कॉलेजची चिटणिशी तरी संभाळावी असें विश्वस्तांनीं बजावलें. यापुढें कॉलेजचे चिटणीस राहून त्यांना राजकीय आंदोलन चालवतां येणें शक्य नव्हतें. तेव्हां कॉलेजच्या कामाचें महत्त्व लक्षांत घेऊन विश्वस्तांच्या आग्रहानुसार त्यांनीं उर्दू कॉन्फरन्सचें अध्यक्षपद सोडून दिलें. पेट्रिऑटिक् ॲसोसिएशन् व महॉमेडन् डिफेन्स् ॲसोसिएशन् याहि संस्थांचा उद्देश राष्ट्रीय सभेला व तिच्या मागण्यांना विरोध करणें हाच होता. पण त्यांचें कार्य मात्र राजकीय समज-

ण्यांत येत नसे; आणि सर सय्यद अहमद खानासारख्या कॉलेजच्या चिटणि-सालाच नव्हे, तर बेक्सारख्या प्राध्यापकाला देखील त्या कार्यांत भाग घेण्याची सरकारकडून सदर परवानगी मिळाली होती, नव्हे—त्यासाठीं उत्तेजन देण्यांत येत होतें. पण नबाव मोहसिन—उल्—मुल्कना मात्र उर्दू कॉन्फरन्स्चे अध्यक्ष म्हणून राहण्याची परवानगीहि नाकारण्यांत आली. कारण, कॉन्फरन्स्चें कार्य राजकीय आहे असें सरकारनें ठरवलें. यांतलें सरकारचें धोरण उघडच होतें. बेक् वगैरेंचें कार्य सरकारच्या पथ्यावर पडणारें होतें, नबाबांचें कार्य सरकारला प्रतिकूल होतें.

मुसलमानांतील नागरी—विरोधी चळवळ मारून टाकणें महा दुष्कर आहे हें मॉरिसन् जाणून होता. म्हणून कोणत्याहि प्रकारची राजकीय संघटना केली तरी ती मुसलमानांच्या हिताला अपायकारक ठरेल असा सल्ला त्यानें मुसल-मानांना देण्यास सुरुवात केली. लोकसत्ताक पद्धतीची अनिष्टता तो दाखवून देऊं लागला आणि १९०१साली इन्स्टिटयूट् गॅझेट्मध्यें प्रसिद्ध झालेल्या एका पत्रांत त्यानें असा युक्तिवाद केला कीं, हिंदुस्थानांत 'लोकसत्ता प्रस्थापित झाली तर अल्पसंख्याकांना हिंदूंचें केवळ हमाल बनावें लागेल.'[1] मुसल-मानांची स्वतंत्र संघटना स्थापन करणेंहि इष्ट होणार नाहीं. कारण सरकारच्या धास्तीनें समाजांतले बडे लोक तिच्यापासून दूरच राहतील आणि त्यामुळें मुसलमानां—मुसलमानांतच फळया पडतील. म्हणून 'माझ्या मतें मुसलमानांच्या कल्याणाच्या दृष्टीनें विचार करतां कोणतीहि राजकीय संस्था काढणें हितकारक न ठरतां हानिकारकच ठरेल. गेल्या वीस—पंचवीस वर्षांत सरकार त्यांना सवलती देत आलें आहे. पण राष्ट्रीय सभेप्रमाणें त्यांनींहि संघटना करण्यास प्रारंभ केला व ते हक्क मागूं लागले म्हणून जर पार्लमेंटनें चौकशी—समिति नेमली, तर मुसल-मानांचा जेवढा फायदा होईल त्यापेक्षां अधिक फायदा आपलें भवितव्य मुसल-मानांनीं सर अँथनी मॅक्डोनेल्च्या हातीं सुपूर्त केल्यास होईल.'[2] सरकारी अधिकारी मुसलमानांबद्दल सध्यां जी आपुलकी दाखवीत आहेत ती त्यांनीं

---

१. तुफेल अहमद : पृ. ३४९. २. उक्त ग्रंथ, पृ. ३४९.

राजकीय मागण्या करण्यास प्रारंभ केल्यावर नष्ट होईल. म्हणून मुसलमानांनीं कायदेमंडळांच्या सभासदांना सल्लामसलत देण्यासाठीं एक कौन्सिल बनवावें, त्याचा कारभार अधिकारी व्यक्तींच्या हातीं सोंपवावा व त्यांना पुरेसें राजकीय वाङ्मय वगैरे पुरवण्याची व्यवस्था करावी म्हणजे झालें. मुसलमानांनीं राजकारणापेक्षां आर्थिक गोष्टींकडेच अधिक लक्ष पुरवावें असाहि सल्ला मॉरिसन्नें मुसलमानांना देऊन ठेवला.

पण या सूचना कधींच अंमलांत आल्या नाहींत. कारण, जरूर असलेला पैसा जमा होईना. त्यामुळें मौलवी तुफेल अहमद यांनीं म्हटल्याप्रमाणें कांहीं काळपर्यंत तरी मुसलमानांमधील साऱ्या राजकीय चळवळींना मूठमाती मिळाली.

नागरी–उर्दू–वादामध्यें राजकारण येतें म्हणून त्यांत कॉलेजच्या चिटणिसांनीं भाग घेण्यास सरकारचा विरोध असला, तरी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा राजकीय कार्यासाठीं उपयोग करावयास सरकार हयगय करीत नसे. त्या काळीं रशिया व इंग्लंड हीं प्रतिस्पर्धी राष्ट्रें होतीं व पर्शियाच्या दरबारीं आपलें वजन पाडण्याकरतां त्यांच्यांमध्यें अहमहमिका सुरू होती. १९०२सालीं पर्शियांतून कांहीं विद्यार्थी आणवून त्यांना अलीगढ कॉलेजांत शिक्षण देऊन तयार करण्याची योजना लॉर्ड कर्झन्नें केली. मॉरिसन्नें त्यावर असें सुचवलें कीं, कॉलेजतर्फे एका शिष्टमंडळानें पर्शियाला भेट द्यावी. शिष्टमंडळाचा खर्च कॉलेजच्या तिजोरींतून देण्याला नबाब मोहसिन–उल्–मुल्कनीं आक्षेप घेतांच मॉरिसन्नें त्यांच्यावर दडपण आणून त्यांची संमति मिळवली ! अखेरीस कॉलेजचें शिष्टमंडळ पर्शियांत गेलें आणि त्या देशांतील कांहीं सरदार घराण्यांतील तरुण अलीगढ कॉलेजचे विद्यार्थी बनले.

पण मॉरिसन्चें नेतृत्व मान्य करण्यास सर्वच मुसलमान तयार होते असें नाहीं. नबाब मोहसिन–उल्–मुल्कनीं १९०१ मध्यें महॉमेडन् पोलिटिकल् ऑर्गनायझेशन् नामक एक संस्था काढली व ती यशस्वी व्हावी म्हणून आटोकाट प्रयत्न केले. या संस्थेचें उद्दिष्ट सौम्यच होतें; पण सरकारी अधिकाऱ्यांची

पसंती मिळूं न शकल्याकारणानें त्यांचें सारे यत्न वायां गेले. मुसलमानांच्या राजकीय संघटनेची जरुरी खुद्द सरकारलाच जेव्हां भासूं लागली, तेव्हांच त्यांची राजकीय संघटना प्रस्थापित होणें किंवा ती यशस्वी रीतीनें कार्य करूं लागणें कसें शक्य झालें, तें आतां पाहूं या.

## ११. स्वतंत्र मतदारसंघाचा उगम

ईस्ट् इंडिया कंपनीच्या अंमलाखालीं सर्वांत आधीं बंगाल प्रांत आला. इंग्रजी विद्येची सुरुवातहि प्रथम तेथेंच झाली. तत्कालीन धोरणानुसार मुसलमानांना सरकारनें बुद्धिपुरःसर वगळलें. सरकारच्या सर्व खात्यांमधून हिंदूंचीच भरती झाली. थोर समाजसुधारक, पट्टीचे कायदेपंडित, तज्ज्ञ डॉक्टर, शास्त्रज्ञ, वक्ते, लेखक आणि इंग्रजी विद्येचें आकंठ पान केलेले व इंग्रजी संस्थांविषयीं, विशेषतः, इंग्रजी राज्यघटनेविषयीं कमालीचा आदर असणारे पुरुष हिंदु समाजांतूनच निर्माण झाले. अशा तऱ्हेच्या व्यक्ती ज्या समाजांत निर्माण होत होत्या तो समाज सरकारी खात्यांतल्या कारकुनीवर फार दिवस संतोष मानून राहील ही गोष्ट शक्यच नव्हती. इंग्रजी पद्धतीच्या प्रगतिशील संस्था येथेंहि सुरू व्हाव्यात असे विचार त्यांपैकीं अनेकांच्या मनांत येऊं लागले. देशामधील सुशिक्षितवर्गांत जागृति घडवून आणण्याला या लोकांचेच प्रयत्न बरेचसे कारणीभूत झाले. हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना देखील बऱ्याच अंशीं त्यांच्यामुळेंच झाली. तिच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. डब्ल्यू. सी. बानर्जी हे बंगालीच होते. प्रगतिशील विचारांच्या सर्वच व्यक्तींकडून बंगाली लोकांनीं साहजिकच वाहवा मिळविली होती. सर सय्यद अहमद खान हे त्यांच्या चाहत्यांपैकीं एक होते हें मागें येऊन गेलेंच आहे. पण बंगाली लोकांची अशा प्रकारें प्रशंसा सुरू झाल्यामुळेंच ब्रिटिश अधिकाऱ्यांचीं मतें त्यांच्याविषयीं साशंक झालीं. त्यांच्याविषयीं आपल्या मनांत वसणाऱ्या तिरस्काराची व भीतीची भावना इंग्रज लोक उघडपणें बोलून दाखवूं लागले. कलकत्याच्या नगरपालिकेचे अधिकारी म्हणून त्यांनीं जी कर्तबगारी व कर्तव्यनिष्ठा व्यक्त केली,

तिच्याबद्दल त्या वेळच्या बंगालच्या ले० गव्हर्नरकडून त्यांना धन्यवाद मिळाले होते. बंगाल्यांचा हा वाढता प्रभाव लॉर्ड कर्झन्‌सारखा जहांबाज मनुष्य सहन करील हें शक्यच नव्हतें. त्यानें अधिकारावर आल्याबरोबर प्रथम कलकत्ता नगरपालिकेंतल्या लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या कमी करून टाकली! त्याच-प्रमाणें सरकार–नियुक्त अध्यक्ष नेमून नगरपालिकेला सरकारच्या अंकुशा-खालीं आणावयाचें असें त्यानें ठरवलें. सर्व देशांतल्या नाहीं, तरी उत्तर–हिंदु-स्थानांतल्या राष्ट्रीय जागृतीच्या केंद्रस्थानावर व उगमस्थानावर चढवण्यांत आलेल्या या हल्ल्याची लोकांना साहजिकच चीड आली. त्यामुळें कर्झन्‌-साहेबांचा पारा आणखी वर चढला आणि १९०३ च्या डिसेंबरांत चितगांव व डाक्का हे प्रांत बंगालपासून अलग करून ते आसाममध्यें सामील करून टाकण्याची एक योजना त्यांनीं आंखली. या त्यांच्या योजनेविरुद्ध प्रचंड चळ-वळ झाली. डाक्क्याचे नबाब सलीमुल्लाखान यांनीं देखील या योजनेचें वर्णन "पाशवी योजना" या शब्दांनीं केलें. कलकत्ता विश्वविद्यालयाच्या वार्षिक पदवीदान–समारंभाच्या वेळीं पौर्वात्यांना सत्याची चाड नसते असे उद्गार काढल्यामुळें कर्झन्‌साहेब व हिंदी लोक यांच्यांतील संघर्ष आणखी वाढला. त्यांच्या या भाषणाचा निषेध करण्यांत आला. सतत होणाऱ्या विरोधाच्या माऱ्यामुळें साहेबमजकुरांचें पित्त अधिकच खवळलें. त्यांनीं डाक्क्याला भेट दिली तेव्हां तेथील जाहीर सभेंत त्यांनीं असें सांगितलें कीं, त्या वेळीं बंगाल प्रांतांत मोडणारा प्रदेश फारच मोठा असल्यामुळें तो छाटून प्रांताच्या लेफ्टनंट् गव्ह-र्नरावरील कामाचा बोजा कमी करावा येवढाच या फाळणीचा उद्देश नसून ज्यांत मुसलमानांच्या हातीं अधिकाराचीं सूत्रें राहतील असा एक मुसलमानी प्रांत निर्माण करण्याचा हेतूहि या फाळणीमध्यें आहे. अनेक मुसलमान या आमिषाला भुलले. फाळणीला विरोध करणारे नबाब सलीमुल्लाखान देखील तिचे कैवारी बनले! त्यांचे बंधु ख्वाजा अतिकुल्ला यांनीं मात्र आपली विरोधी भूमिका कायम ठेवली. फाळणीनंतर थोडक्याच दिवसांत नबाबसाहेबांना एक लाख पौंडांचें कर्ज नाममात्र व्याजानें देण्यांत आलें व अशा प्रकारें त्यांना

फाळणीला अनुकूल करून घेण्यांत आलें, असें विधान श्री. गुरुमुख निहालसिंग यांनीं केलें आहे.[१] पुढें ए. रसूल व ख्वाजा अतिकुल्ला यांच्या नेतृत्वाखालीं हिंदु–मुसलमानांनीं एकमुखानें केलेल्या विरोधाला न जुमानतां बंगाल प्रांताची फाळणी करण्यांत आली. सर हेन्री कॉटन् यांच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, 'प्रांतामध्यें रूढ झालेल्या आत्मीयतेच्या भावनेची विघटना करण्याच्या व ऐक्याचा विध्वंस करण्याच्या उद्देशानेंच ही योजना आंखण्यांत आली होती. राज्यकारभार सुलभ करण्याचा हेतु तींत मुळींच नव्हता. देशाभिमानांतून निर्माण झालेल्या राष्ट्रीय वृत्तींचा उच्छेद करून त्यांचें वाढतें सामर्थ्य खच्ची करून टाकण्याच्या लॉर्ड कर्झन्च्या धोरणाचाच ही योजना म्हणजे एक भाग होता.' 'पूर्व बंगालमध्यें मुसलमानांच्या शक्तीची वाढ करावी म्हणजे हिंदुसमाजाच्या वाढत्या शक्तींना शह देतां येईल'[२] या उद्देशानें फाळणीची योजना करण्यांत आली होती असें स्टेट्स्मन् या पत्रानेंसुद्धां लिहिलें होतें.

फाळणीच्या प्रश्नावर माजलेली कटुता मागें ठेवून लॉर्ड् कर्झन् येथून निघून गेले. फाळणीमुळें उसळलेल्या संघर्षांत केवळ बंगाल्यांनींच भाग घेतला असें नाही, तर देशांतल्या इतर प्रांतांतले लोकहि त्यांत सामील झाले होते. माणसानें योजावें एक व व्हावें भलतेंच असा प्रकार अनेक बाबतींत होतो. हिंदुस्थानाच्या बाबतींत तसेंच झालें. राजकीय जीवनाचा ओघ कुंठित करण्यासाठीं जो उपाय सरकारनें योजला, त्यामुळें राजकारणाला उलट भरतीच आली आणि १८५७ पासूनच्या काळांत कधीं झाली नव्हती तेवढी जागृति फाळणीविरोधाच्या चळवळीमुळें देशांत घडून आली.

१९०५च्या नोव्हेंबरांत जेव्हां लॉर्ड् मिंटो हे गव्हर्नर जनरल् झाले, त्या वेळीं वातावरण खूप तापलें होतें. अधिकारावर आल्यानंतर थोड्याच

---

१. गुरुमुख निहालसिंग : हिंदुस्थानांतील सनदशीर आणि राष्ट्रीय प्रगतीच्या मर्यादा, पृ. ३१९.

२. मेहेता–पटवर्धन : पृ. ६४.

महिन्यांनीं त्यांनीं जॉन् मोर्ले यांना खलिता धाडला कीं, 'राष्ट्रसभेच्या विषयीं बोलावयाचें तर......तिला आपण मान्यता दिली पाहिजे आणि तिच्यांतील उत्कृष्ट व्यक्तींशीं मैत्री जोडली पाहिजे. पण आपणांला सर्वस्वीं विरुद्ध असलेली बरीच मंडळी त्यांत असावी आणि त्यांच्यामुळें भविष्यकाळ धोक्याचा होणार आहे अशी शंका माझ्या मनाला वाटते....राष्ट्रसभेच्या उद्देशाला शह कोणत्या प्रकारें द्यावा याचा विचार मी बरेच दिवस करीत आहें. नरेंद्रमंडळ स्थापलें किंवा हीच कल्पना अधिक वाढवून केवळ संस्थानिकांचेंच नाहीं, तर संस्थानिकांव्यतिरिक्त थोडेसे बडे लोक घेऊन एक प्रिव्ही कौन्सिल प्रस्थापित केलें आणि दिल्लीसारख्या शहरांत वर्षाकांठीं एक किंवा दोन आठवडे त्याची बैठक भरवीत गेलें, तर राष्ट्रसभेच्या सामर्थ्याला शह देतां येईल अशी माझी कल्पना आहे. अशा कौन्सिलांत चर्चेसाठीं कोणते विषय घ्यावयाचे व कार्यपद्धति कोणती ठेवावयाची याचा काळजीपूर्वक विचार करावा लागेल हें खरें. पण अशा प्रकारच्या योजनेमुळें हिंदुस्थानांत शांतता टिकून राहणें, ज्यांच्या हिताच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे अशा व्यक्तींकडून, राष्ट्रसभेच्या विचारसरणीपेक्षां निराळी विचारसरणी आपणांला ऐकावयास सांपडेल....''[१]

लॉर्ड् मिंटो यांना मोर्ले यांनीं ६ जूनच्या पत्रांत असें लिहून कळवलें कीं, 'हिंदुस्थानांत एक नवें चैतन्य निर्माण झालें असून तें साऱ्या देशभर फैलावत चाललें आहे,' असें सारेच जण आम्हांला बजावून सांगत आहेत. लॉरेन्स्, चिरोल्, सिड्ने लो, सगळ्यांच्या तोंडीं हीच भाषा आहे कीं, "पूर्वींच्याच पद्धतीनें तुम्हांला राज्यकारभार चालवतां येणार नाहीं. राष्ट्रसभा व तिचीं तत्त्वें तुम्हांला पटोत न पटोत, तुम्हांला तिच्याशीं तडजोड केलीच पाहिजे. थोड्याच काळानंतर मुसलमान लोक देखील तुमच्याविरुद्ध राष्ट्रसभावाल्यांना जाऊन मिळतील याची खात्री असूं द्या, इत्यादि इत्यादि."[२]

राष्ट्रसभेला व सर्वसामान्यपणें हरएक राष्ट्रीय उत्थापनाला शह देण्यासाठीं

१. लेडी मिंटो : हिंदुस्थान, मिंटो आणि मोर्ले, पृ. २८–२९.

२. उक्त ग्रंथ, पृ. ३०.

नरेंद्र–मंडळ स्थापन करण्याची कल्पना त्या वेळीं फलद्रूप झाली नाहीं; पण दुसरी एक अधिक परिणामकारक योजना हुडकून काढण्यांत आली. लॉर्ड् मिंटोनें आपल्या कौन्सिलच्या विचारानें सुधारणा–योजनेचा एक आराखडा तयार करावयास घेतला. हिंदुस्थानांतील मवाळ गटांचें तरी त्यामुळें समाधान करतां येईल अशी आशा मिंटो यांना वाटत होती. इकडे ही योजना पुरी होत असतां दुसरीकडे देशाच्या राजकारणांतून मुसलमानांना फोडून काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. मौलवी सय्यद तुफेल अहमद मंगलोरी लिहतात, "३० जुलै १९०६ रोजीं अलीगढचे रईस हाजी महमद इस्माइल खानसाहेब यांनीं अर्जाचा एक मसुदा कॉलेजचे सन्माननीय चिटणीस नबाब मोहसिन–उल्–मुल्क बहादुर यांच्याकडे रवाना केला; त्यांत मुसलमानांनींहि आपल्या हक्कांची मागणी करावी असें सुचवलें होतें. हाजीसाहेब तेव्हां नैनीताल येथें राहत होते व त्यांची अधिकाऱ्यांकडे ये–जा होती. सुशिक्षित मुसलमानांनीं सामान्यत: या सूचनेकडे लक्ष पुरवलें. त्या वेळीं कॉलेजला सुटी असल्याकारणानें कॉलेजचे प्राध्यापक आर्क् बोल्ड् हे सिमल्यास गेले असून तेथील बड्या अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेत होते. शिष्टमंडळ घेऊन येण्याबाबत त्यांचें व्हाइसरॉयच्या खाजगी चिटणिसांशीं बोलणें झालें. या विचारविनिमयानंतर आर्क्बोल्डनीं नबाब मोहसिन–उल्–मुल्क यांना जें पत्र लिहिलें, तें छापून शिष्टमंडळाच्या सभासदांना वाटण्यांत आलें. अलीगढ–कॉलेजचे प्राध्यापक मुसलमानांच्या राजकारणांतलीं तपशिलाचीं सूत्रें देखील कशीं हालवीत असत आणि सरकारतर्फेचे अलीगढ येथील रेसिडेंट असल्याप्रमाणें कसें कार्य करीत याची कल्पना सदरील पत्राचा जो सारांश खालीं देण्यांत येत आहे त्यावरून येईल.

"कर्नल् डन्लॉप् स्मिथ् (व्हाइसरॉयचे खाजगी चिटणीस) यांच्याकडून मला आतां असें कळवण्यांत आलें आहे कीं, मुसलमानांच्या शिष्टमंडळाची भेट घेण्यास व्हाइसरॉय तयार आहेत, तेव्हां भेटीची विनंति करणारा अर्ज रीतसर करण्यांत यावा. या बाबतींत पुढील गोष्टींचा विचार करावयास हवा आहे:—

"पहिला प्रश्न सरकारकडे करावयाच्या अर्जासंबंधींचा. मुसलमानांच्या कांहीं पुढाऱ्यांनीं—मग ते निवडण्यांत आलेले असोत किंवा नसोत—अर्जाखालीं सह्या केल्या म्हणजे पुरे. शिष्टमंडळांत कोणाचा समावेश व्हावा हा दुसरा प्रश्न. शिष्टमंडळांतले प्रतिनिधी सर्व प्रांतांतून घेतलेले असावेत. व्हाइसरॉयांना उद्देशून करावयाच्या निवेदनांत काय असावें हा तिसरा प्रश्न. या बाबतींत माझें मत असें आहे कीं, या निवेदनांत राजनिष्ठा व्यक्त केलेली असावी आणि स्वराज्याच्या दिशेनें पाऊल टाकावयाचें सरकारनें ठरवलें असल्याकारणानें हिंदी लोकांना अधिकाराच्या जागा मिळण्याचा मार्ग खुला झाल्याबद्दल सरकारचे आभार मानण्यांत यावेत. निवडणुकीची पद्धति स्वीकारण्यांत आली, तर मुसलमान अल्पसंख्याकांचें अकल्याण होईल अशी चिंता व्यक्त करण्यांत यावी आणि नेमणुकीचें किंवा धार्मिक मतानुसार प्रतिनिधित्व देण्याचें तत्त्व अमलांत आणल्यास मुसलमानांच्या मतांना योग्य तो मान मिळेल अशी आशा व्यक्त करण्यांत यावी. निवेदनांत असेंहि मत नमूद करून ठेवावें कीं, हिंदुस्थानसारख्या देशांत जमीनदारांच्या मतांनाहि योग्य तो मान देण्यांत यावयास हवा.

"माझें व्यक्तिगत मत असें आहे कीं, निवडणुकीची पद्धति सुरू करण्यास अनुकूल वेळ अद्यापि आली नसल्याकारणानें नेमणुकीची पद्धति उचलून धरणेंच मुसलमानांच्या दृष्टीनें अत्यंत शहाणपणाचें ठरेल. निवडणुकीची पद्धति अमलांत आल्यास मुसलमानांना योग्य तो अधिकाराचा वांटा मिळविणें अत्यंत जड जाईल.

"पण या सर्व बाबतींत मला पडद्याआडच राहावयास हवें, म्हणून पुढाकार तुम्हींच घेतला पाहिजे. मुसलमानांच्या हिताविषयीं माझ्या मनांत किती कळकळ आहे तें तुम्ही जाणतांच. त्यामुळें यावच्छक्य मदत मी आनंदानें करीनच. मी तुमच्यासाठीं निवेदन तयार करून देईन. तुम्हीं मुंबईमध्यें मसुदा तयार करून घेतला तर मी तो तपासून देईन. सुंदर भाषेंत अर्ज तयार करण्याची कला मला अवगत आहे. परंतु नबाबसाहेब, कृपा करून येवढें मात्र ध्यानांत ठेवा कीं,

थोड्या अवधींत परिणामकारक कार्य करून दाखवावयाचें असेल, तर तुम्हांला त्वरा करावयास हवी."[१]

या सल्ल्यानुसार नबाब मोहसिन–उल्–मुल्कांनीं शिष्टमंडळाचें सोंग उभें केलें. व्हाइसरॉयना सादर करावयाचें निवेदन तयार करण्यांत आलें आणि हिज् हायनेस् दि आगाखान यांच्या नेतृत्वाखालीं १ ऑक्टोबर १९०६ रोजीं व्हाइसरॉय यांची शिष्टमंडळानें भेट घेतली. त्या दिवशींच्या आपल्या दैनंदिनींत लेडी मिंटो लिहितातः—

'आजचा दिवस मोठा महत्त्वपूर्ण ठरला. मला कोणीसें म्हटलें त्याप्रमाणें तो "हिंदी इतिहासांतला मन्वंतराचा" दिवस ठरला. देशांत सर्वत्र जी अस्वस्थता माजलेली आहे आणि जनतेमधील सर्व वर्गांमध्यें व पंथांमध्यें जें असमाधान पसरलेलें आहे त्याची आम्हांला जाणीव आहे. मुसलमानांची लोकसंख्या ६ कोटी २० लक्ष असून ते सरकारशीं अत्यंत एकनिष्ठ आहेत. आपल्याला योग्य तितकें प्रतिनिधित्व मिळत नाहीं, आपला अनेक प्रकारें अपमान करण्यांत येतो व हिंदूंना सवलतीनें वागविण्यांत येतें याची त्यांना चीड येते. ही त्यांच्या मनांतील भावना चेतविण्याचें कार्य प्रचारक मोठ्या दक्षतेनें करीत असतात आणि त्यांनीं या प्रचंड समाजाचें सहकार्य मिळविण्यासाठीं जिवापाड प्रयत्न केलेले आहेत. मुसलमान–तरुणवर्ग संदेहावस्थेंत होता, राष्ट्रीयसभेंतील जहालांशीं सहकार्य करण्याकडे त्यांच्या मनाचा कल होत होता. राजनिष्ठ मुसलमानांना पाठिंबा देण्यांत येऊं नये असा आरडाओरडा सगळीकडे सुरू झाला व चळवळ करून आपल्या मागण्या आपण प्राप्त करून घेऊं असे बोल प्रचारांत उमटूं लागले. परंतु कृतीला प्रारंभ करण्यापूर्वी व्हाइसरॉयला आपल्या गाऱ्हाण्यांचें निवेदन करण्याचें मुसलमानांनीं ठरविलें. भेटीसाठीं आजचा दिवस मुक्रर करण्यांत आला होता. सर्व देशांतून सुमारें सत्तर प्रतिनिधी येऊन दाखल झाले आहेत. भेटीचा समारंभ नृत्यगृहांत आज सकाळीं झाला. बोलणीं ऐकण्यासाठीं मी व मुली बाजूच्या दारानें गेलों. मिंटो आपल्या

१. लेडी मिंटो : हिंदुस्थान, मिंटो आणि मोर्ले, पृ. ३६०–६१.

अधिकारी-वर्गासह सामोरे गेले व व्यासपीठावरच्या आसनावर ते बसले. आगाखान हे खोजा समाजाचे धर्मगुरु आहेत. आपण अलीचे वंशज असल्याचें ते सांगतात. खोजा समाजाचे ते 'ईश्वरदत्त' राजे आहेत. मात्र त्यांच्या हुकमतीखालीं कोणताहि प्रदेश नाहीं. उत्कृष्ट भाषेंत लिहिलेलें तें दीर्घ निवेदन वाचून दाखवण्यासाठीं आगाखानांची निवड करण्यांत आली होती. त्यांत मुसलमानांच्या आकांक्षा व गाऱ्हाणीं मांडण्यांत आलीं होतीं. नंतर अत्यंत विचारपूर्वक तयार केलेलें आपलें उत्तर मिंटोंनीं वाचून दाखविलें. ते म्हणाले, 'युरोपियन पद्धतीच्या प्रातिनिधिक संस्था हिंदुस्थानांतल्या लोकांना अगदीं अपरिचित आहेत किंवा त्या येथें प्रस्थापित करण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करणें आवश्यक आहे. हें निवेदन केल्याबद्दल तुम्हीं माझी क्षमायाचना करण्याचें कारण नाहीं. पाश्चिमात्य देशांतील सर्वच राजकीय तंत्रें पौर्वात्य देशांत पिढ्यान् पिढ्या रूढ झालेल्या परंपरांमध्यें, प्रवृत्तींमध्यें घुसडून द्यावींत हें मलादेखील पसंत पडण्यासारखें नाहीं....कोणतीहि प्रातिनिधिक पद्धति अस्तित्वांत आली तरी मुसलमानांना जें प्रतिनिधित्व मिळणार असेल, तें मुसलमान जमातीला म्हणून देण्यांत यावें. मग ते प्रतिनिधी नगरपालिकांतले असोत, जिल्हा बोर्डावरचे असोत किंवा कायदेमंडळांतले असोत असाच तुमच्या निवेदनाचा आशय आहे असें मी समजतों. सध्यां जे मतदारसंघ आहेत त्यांच्याकडून मुसलमान प्रतिनिधी निवडून दिले जातील हें संभवनीय दिसत नाहीं, आणि यदा कदाचित् एकाद्या मुसलमानाला निवडून देण्यांत आलेंच तरी त्याला आपल्या मतांना हरताळ फासून अल्पसंख्य जमातीला विरोधी असणाऱ्या बहुसंख्याकांच्या मतांचा स्वीकार करावा लागेल, आपल्या जमातीचा प्रतिनिधि तो बनूं शकणार नाहीं, असे मुद्दे तुम्हीं मांडले आहेत; आणि केवळ संख्येवरून आमचें स्थान न ठरवितां आमच्या समाजाच्या राजकीय महत्त्वावरून-व त्यानें बजावलेल्या साम्राज्याच्या सेवेवरून तें ठरविण्यांत यावें अशी न्याय्य मागणी तुम्हीं केली आहे. मी तुमच्याशीं पूर्णपणें सहमत आहें. या खंडतुल्य भूमीमधल्या नानाविध समाजांच्या समजुती, परंपरा लक्षांत न घेतां

व्यक्तिशः मतदानाच्या हक्काच्या आधारें प्रतिनिधींच्या निवडणुकीची योजना आंखण्यांत आली, तर हिंदुस्थानवर गडांतर येईल याविषयीं तुमच्याच इतकी माझीहि खात्री आहे.' "[१]

त्याच दिवशींच्या रोजनिशींत लेडी मिंटो पुढें लिहितात, "एका अधिकाऱ्याकडून आज संध्याकाळीं मला पुढीलप्रमाणें चिठ्ठी आली:—'आज एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना घडून आली हें वृत्त आपल्याला कळविण्यासाठीं मी दोन ओळी लिहीत आहें. हिंदी राजकारणाच्या व हिंदुस्थानच्या इतिहासावर बराच काळपर्यंत परिणाम घडवून आणील असें राजकारण आज सिद्धीस गेलें. या राजकारणाचें मोल थोडेंथोडकें नाहीं. कारण राजद्रोही विरोधकांच्या गटापासून ६ कोटी २० लक्ष मुसलमानांना आज परावृत्त करण्यांत आलें.'" व्हाइट् हॉलमध्येंहि अशाच तऱ्हेचें मत व्यक्त करण्यांत आलें. शिष्टमंडळाच्या भेटीचा वृत्तान्त हातीं पडल्यानंतर २६ ऑक्टोबर रोजीं मोर्ले यांनीं पुढीलप्रमाणें लिहलें:—

"मोर्ले यांच्याकडून मिंटो यांस—

मुसलमानांच्या विषयीं तुम्हीं जें कांहीं लिहिलें, तें अतिशय मनोरंजक वाटलें. तुमच्या उद्यानोपहाराच्या वेळीं अदृश्यपणें मला वावरतां आलें नाहीं याचेंच मला वाईट वाटत आहे. जें झालें तें शंभर टक्के उत्तम झालें. तुमची प्रतिष्ठा व वैयक्तिक अधिकार यांचा पक्का ठसा या घटनेवर उमटला आहे. तुमच्या भाषणाचा दुसरा एक सुपरिणाम असा घडून आला आहे कीं, येथील टीकाकारांचे सारे बेत त्यामुळें ढांसळून गेले आहेत! हिंदी सरकारचें स्वरूप जनता विरुद्ध नोकरशाही अशा प्रकारचें असल्याची हूल त्यांना इतःपर उठवितां येणार नाहीं. अशा प्रकारचें समीकरण मांडण्याइतकी हिंदुस्थानांतली परिस्थिति सोपी नाहीं हें माझ्या जहालांतील जहाल मित्रांना आतां तरी उमगेल अशी मला उमेद वाटते."[२]

लॉर्ड मिंटो यांचा चरित्रकार बुचॅन् लिहितो, 'संकटकाल येऊन ठेपला असतां या भाषणामुळें राजद्रोह्यांच्या सामर्थ्यांत मुसलमानांची भर पडण्याचें

---

१. लेडी मिंटो : पृ. ४५–४७. २. उक्त ग्रंथ. पृ. ४७–४८.

टळलें, ही गोष्ट कल्पनातीत फायद्याची ठरली.'[१] 'इस्लामी हक्कांची सनद' या शब्दांत त्यानें मिंटोच्या भाषणाचें वर्णन केलें आहे.

शिष्टमंडळाची यथास्थित जाहिरात इंग्लंडमधील वृत्तपत्रांतून होईल असाच सारा बनाव रचण्यांत आला होता असें मौलवी तुफेल अहमद यांनीं लिहिलें आहे. १९०६ च्या ऑक्टोबर १ ला शिष्टमंडळ व्हाइसरॉयांच्या भेटीला गेलें आणि त्याच दिवशीं तिकडे लंडन 'टाईम्स्'मध्यें मुसलमानांच्या अकलहुषारीची तारीफ करणारा एक लंबाचवडा लेख प्रसिद्ध करण्यांत आला. युरोपियन् पद्धतीचीं प्रातिनिधिक कायदेमंडळें मुसलमानांना कधींच पसंत नव्हतीं, इंग्लंडप्रमाणें हिंदुस्थानांत राष्ट्र असें कांहीं विद्यमानच नाहीं, तेथें अनेक धर्मपंथ आहेत, इत्यादि विधानें त्यांत करण्यांत आलीं होतीं. इतर वर्तमानपत्रांतूनहि याच नमुन्याचे लेख प्रसिद्ध करण्यांत आले. 'हिंदुस्थानचें एकराष्ट्र बनावें याचें केवढें वैषम्य इंग्रज वृत्तपत्रांना वाटत होतें, देश खंड–विखंड झाल्यानें त्यांना कशा आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या आणि धर्माच्या नांवानें परस्परांमध्यें कलहाग्नि पेटवून त्यांच्यांत चिरकालीन वैरभाव निर्माण करणें ही त्यांना केवढी आत्मश्लाघेची गोष्ट वाटत होती, हें या लेखांवरून प्रत्ययास येतें.'[२] मिंटोची योजना पुरी होईपर्यंत कांहीं अवधि लोटला. व्हाइसरॉय व भारतमंत्री यांच्यामध्यें भाराभर पत्रव्यवहार झाला आणि अखेरीस मुसलमानांसाठीं सवत्या मतदारसंघांची प्रस्थापना करण्यांत आली !

## १२. मुस्लिम लीगची स्थापना व लखनौ–करार

शिष्टमंडळाच्या भेटीच्या प्रसंगानंतर लगेच अखिल भारतीय मुस्लिम लीगची स्थापना करण्यांत आली. नोव्हेंबर १९०६रोजीं नबाब सलीमुल्ला यांनीं एक परिपत्रक प्रसिद्धीसाठीं दिलें आणि तद्द्वारा ऑल् इंडिया मुस्लिम कॉन्फेडरसी स्थापण्याविषयीं सूचना त्यांनीं केली. शेवटीं डिसेंबरांत डाक्का येथें परिषद भरून

१. बुचॅन् : लॉर्ड मिंटो, पृ. २४४.

२. तुफेल अहमद : पृ. २६३.

सर्व देशांतले पुढारी परिषदेला हजर राहिले. नबाब वकार–उल्–मुल्क अध्यक्ष-स्थानीं होते. तेथें अखिल भारतीय मुस्लिम लीगची स्थापना करण्यांत आली. नबाब वकार–उल्–मुल्कांना चिटणीस व नबाब मोहसिन–उल्–मुल्कांना सहाय्यक चिटणीस नेमण्यांत आलें होतें. पण नबाब मोहसिन–उल्–मुल्क पुढें लवकरच दिवंगत झाले. परिषदेमध्यें बंगालच्या फाळणीला पाठिंबा देणारा व बहिष्काराला विरोध दर्शविणारा ठराव पास झाला. लंडन टाइम्सनें लीगचें स्वागत केलें. चमत्काराची गोष्ट अशी कीं, हिंदुमहासभेची प्रस्थापना देखील त्याच सालीं झाली. रॅम्से मॅक्डोनल्ड् यांनीं आपल्या 'दि अवेकनिंग् ऑफ इंडिया' (हिंदुस्थानांतील जागृति) या पुस्तकामध्यें अधिकारीवर्गानें या प्रसंगीं कोणती भूमिका पार पाडली याचें वर्णन पुढील शब्दांत केलें आहे:— 'मुसलमान पुढाऱ्यांना कांहीं ॲंग्लो–इंडियन् अधिकाऱ्यांकडून प्रेरणा मिळालेली आहे. त्यांनीं सिमला व लंडन येथील सूत्रें ओढलीं आणि बुद्धिपुर:सर द्वेषबुद्धीनें त्यांनीं हिंदु–मुसलमान समाजांमध्यें मुसलमानांच्या बाजूनें पक्षपात करून वैमनस्याचें बीज पेरलें.'[1] स्वतंत्र मतदार–संघामुळें भेद निर्माण झाला येवढेंच नव्हे, तर तो उत्तरोत्तर वाढत गेला.

मुस्लिम लीगचीं अधिवेशनें सालोसाल होत होतीं आणि फाळणीला पाठिंबा देणारे व फक्त कायदेमंडळांतूनच नव्हे, तर स्थानिक संस्थांतूनहि स्वतंत्र मतदारसंघ मागणारे ठराव संमत करण्यांत येत होते. नोकऱ्यांतच काय, पण प्रिव्ही कौन्सिलमध्यें सुद्धां मुसलमानांचें योग्य तें प्रमाण ठेवण्यांत यावें अशी मागणी करण्यांत येत होती. १९१०च्या जानेवारीमध्यें दिल्लीला भरलेल्या लीगच्या अधिवेशनाचे आगाखान हे अध्यक्ष होते. सरकारकडून देण्यांत आलेल्या सुधारणांविषयीं त्यांनीं समाधान व्यक्त केलें आणि आपण विरोध दर्शविल्यास सरकार त्या मागें घेईल म्हणून विरोध करण्यांत येऊं नये असा इषाराहि त्यांनीं देऊन ठेवला. त्या वेळीं घडून आलेल्या एका प्रसंगावरून सरकारच्या धोरणावर झगझगीत प्रकाश पडतो. पूर्वीं हिंदी–उर्दू–वादांत पुढाकार घेतल्या-

---

१. मेहेता व पटवर्धन यांच्या पुस्तकांत उद्धृत, पृ. ६६.

बद्दल अलीगढ कॉलेजचे चिटणीस नबाब मोहसिन-उल्-मुल्क यांना त्या काळचे ले० गव्हर्नर सर अँथनी मॅक्डोनेल् यांनीं कानपिचक्या दिल्या होत्या आणि कॉलेजच्या चिटणिसांनीं कोणत्याहि राजकीय संस्थेशीं संबंध ठेवूं नये या सबबीवर नबाबसाहेबांना 'अंजुमन-इ-हिमायत उर्दू'चा राजीनामा द्यावयाला लावलें होतें, ही गोष्ट वाचकांच्या स्मरणांत असेलच. किंबहुना, ले० गव्हर्नरांची मजल येथपर्यंत गेली होती कीं, निझामाकडून त्यांना मिळालेली नबाब ही पद्वी सरकारी पत्रव्यवहारांत वापरण्यांत येऊं नये असा हुकूमहि त्यांनीं सोडला होता. परंतु त्याच नबाबसाहेबांनीं मुस्लिम शिष्टमंडळाची यंत्रणा रचली आणि कॉलेजच्या चिटणीसपदावर असतांहि ते लीगचे सहाय्यक चिटणीस बनले याबद्दल मात्र सरकारनें मुळींच आक्षेप घेतला नाहीं! डाक्क्याच्या परिषदेचे अध्यक्ष व लीग स्थापन झाल्यानंतर तिचे सर चिटणीस बनलेले वकार-उल्-मुल्क हेच नबाब मोहसिन-उल्-मुल्कांच्या मृत्यूनंतर कॉलेजचे चिटणीस बनले. नंतरहि ते लीगच्या कार्यांत भाग घेतच असत. लीगची मुख्य कचेरीच अलीगढ येथें आणण्यांत आली व १९१०पर्यंत ती तेथेंच राहिली. पुढें नबाबसाहेब व कॉलेजचे इंग्रज प्राध्यापक यांच्यामध्यें कांहीं मतभेद निर्माण होऊन गव्हर्नरनें प्राध्यापकांची बाजू घेतली. पुढें गव्हर्नरला आपला हुकूम मागें घ्यावा लागला; पण तो सूड घेतल्यावांचून राहिला नाहीं. अलीगढच्या प्रभावापासून लीगला मुक्त करावें या बुद्धीनें लीगचे अध्यक्ष आगाखान यांनीं लीगची मुख्य कचेरी अलीगढहून हालवून लखनौला नेऊन ठेवली. त्यांच्या या अनपेक्षित कृत्याचा परिणाम असा झाला कीं, कॉलेजच्या इंग्रज प्राध्यापकांच्या हातून लीगच्या राजकारणाच्या नाड्या निसटल्या.

दिल्ली-दरबारांत १९११ च्या डिसेंबरमध्यें बादशहांनीं बंगालची फाळणी रद्द केल्याची जी घोषणा केली, तिच्यामुळें अनेक मुसलमानांना चांगलाच धक्का बसला! नबाब सलीमुल्लांचा तर असा दारुण मनोभंग झाला कीं, १९१२ च्या मार्चमध्यें लीगच्या कलकत्त्याच्या अधिवेशनाचें अध्यक्षीय कार्य पुरें झाल्यानंतर आपण सर्व समाजकार्यांतून निवृत्त होत असल्याचें त्यांनीं जाहीर केलें व पुढें लवकरच त्यांचें देहावसान झालें.

याच सुमारास इतरहि अशा कांहीं घटना घडून येत होत्या कीं, त्यांचा मुसलमानांवर बराच परिणाम झाल्याविना राहिला नाहीं. त्या काळीं जे अत्यंत विद्वान् मुसलमान होते त्यांमध्यें मौलवी शिबली नउमानी यांची गणना होत असे. त्यांनीं लिहिलेलीं पैगंबर व सर सय्यद अहमद खान यांचीं चरित्रें म्हणजे उर्दूतले आदर्श ग्रंथ समजले जातात. अझमगड येथील ॲकॅडेमीचे ते संस्थापक होते. तिच्यातर्फे अत्यंत मौल्यवान् असे ऐतिहासिक ग्रंथ प्रसिद्ध होत असत. तें कार्य शिबलींच्या मृत्यूनंतरहि मौलाना सुलेमान नादवी यांच्या देखरेखीखालीं चालू आहे. शिबलींची सर्व उमर सर सय्यदांचे सहकारी म्हणून गेली असली, तरी आयुष्याच्या उत्तरार्धांत त्यांना सर सय्यदांच्या धोरणाविषयीं व राष्ट्रसभेसंबंधींच्या त्यांच्या भूमिकेविषयीं संदेह वाटू लागला होता. हिंदुस्थानच्या स्वतंत्रतेचा जो अधिक मूलभूत प्रश्न त्याच्याकडे मुसलमानांचें लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न ते करीत होते व राष्ट्रीय सभेचे केवळ टीकाकार बनून त्यांनीं समाधान मानूं नये असा उपदेश ते करीत होते. ९ ऑक्टोबर १९१७ मध्यें लखनौ येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'मुस्लिम गॅझेट्' पत्रांतील एका लेखांत लीगचें राजकारण व भूमिका यांची चर्चा केल्यानंतर त्यांनीं लिहिलें होतें कीं, 'फळावरून झाडाची परीक्षा होत असते. आपल्या राजकारणांत गांभीर्य असतें, तर त्यामुळें लढ्याचा उत्साह, क्लेश सोसण्याची सिद्धता व ध्येयास्तव त्याग हे गुण आपल्या ठिकाणीं निर्माण झाले असते.'[१]

अशाच प्रकारचे आणखीहि प्रसंग घडत होते. 'सुधारलेलीं कायदेमंडळें सुरू झाल्यावर निरनिराळ्या समाजांच्या हितसंबंधांतील साम्य व हिंदुस्थानांतलें ऐन जिनसी ऐक्य प्रतीत होऊं लागलें होतें; आणि सर्वांपेक्षां अधिक परिणाम दूर देशांतल्या व विशेषेंकरून तुर्कस्तानांत व पर्शियांत चाललेल्या राष्ट्रीय आंदोलनांचा होऊन देशांतल्या मुसलमान तरुणांमध्यें अधिकाधिक राष्ट्रीय वृत्ति बाणत चालली होती....ट्रिपोली व बाल्कन्स् येथील प्रकरणांच्या वेळीं ब्रिटिशांनीं तुर्कस्तानबाबत जी वृत्ति प्रकट केली, तिच्यामुळें त्यांचें अंतरंग उघड

१. तुफेल अहमद : पृ. ३८९; त्याचप्रमाणें मेहेता व पटवर्धन : पृ. ३०.

झालें आणि ब्रिटिशांच्या मित्रत्वाच्या आश्वासनांतला दांभिकपणा व पोकळपणा हिंदी मुसलमानांना कळून चुकला! उलटपक्षीं, युरोपियन् राष्ट्रांनीं तुर्कस्तान-बाबत स्वीकारलेल्या धोरणामुळें त्या राष्ट्राला जें दुःख सहन करावें लागलें, त्याबद्दल हिंदुस्थानांतील राष्ट्रीय वृत्तीच्या वृत्तपत्रांतून बंधुभावाची व सहानुभूतीची भावना व्यक्त होत असल्याचें पाहून हिंदी मुसलमानांच्या मनावर परिणाम घडून आला.'[१] १९१२ सालीं डॉ० अन्सारींनीं रुग्णसहाय्यक-मंडळ स्थापलें व त्या मंडळासह ते तुर्कस्तानांत रवाना झाले. 'जमीनदार' पत्राचे संपादक मौलाना झफरअली हे टर्किश् रेड क्रेसेंट्साठीं जमवलेली रक्कम कॉन्स्टँटिनोपल्च्या वजिराला नजर करण्याकरतां स्वतः तिकडे गेले. मौलाना अबुल कलम आझादांनीं 'अल्-हिलाल' पत्र सुरू केलें. राष्ट्रवाद, स्वातंत्र्य व त्याग यांच्या आदर्शामुळें व त्याचबरोबर पत्राच्या स्फूर्तिप्रद भाषेमुळें तें वृत्तपत्र इतकें लोकप्रिय झालें कीं, उर्दू भाषेंतल्या कोठल्याहि वृत्तपत्राला त्याची सर आली नाहीं. मौलाना महंमद अली 'कॉमरेड्' हें पत्र इंग्रजी भाषेंतून चालवीत होते. त्यांच्या लेखनामुळें मुसलमानांच्या भावनांचा लोंढा राष्ट्रवादाकडे वळविण्यास सहाय्य झालें. या साऱ्या वातावरणाचा लीगवर देखील परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं, आणि सर इब्राहिम रहिमतुल्ला यांच्या अध्यक्षतेखालीं लखनौ येथें १९१३ सालच्या मार्चमध्यें भरलेल्या अधिवेशनांत लीगची घटना बदलण्यांत आली. ब्रिटिश साम्राज्याच्या अन्तर्गत व हिंदुस्थानला मानवेल अशी स्वयंशासनाची पद्धति सनदशीर मार्गांनीं प्राप्त करून घेणें हें लीगचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें. इतर साधनांबरोबरच राष्ट्रीय ऐक्याची भावना वृद्धिंगत करून, हिंदी जनतेंत सार्वजनिक हिताची बुद्धि जागृत करून व यासाठीं इतर समाजांशीं सहकार्य करून सध्यां अस्तित्वांत असलेल्या राज्य-कारभाराच्या पद्धतींत उत्तरोत्तर सुधारणा करीत करीत स्वयंशासनाच्या ध्येया-प्रत पोंचावयाचें, असा मार्गक्रम आंखून देण्यांत आला. अशा प्रकारें लीगचें ध्येय राष्ट्रीय सभेच्या ध्येयाशीं समांतर आल्याकारणानें पुढें लवकरच घडून आलेल्या जातीय ऐक्याचा व सहकार्याचा मार्ग निष्कंटक झाला.

---

१. गुरुमुख निहालसिंग : पृ. ४९०-९१.

१९१४ च्या ऑगस्टांत पहिलें महायुद्ध सुरू झालें. हिंदी जनतेंत मोठी खळबळ उडाली आणि कांहीं मडळींनीं हिंदुस्थानची स्वतंत्र लोकशाही प्रस्थापित करण्याच्या धाडसी योजना आंखल्या. अशा मंडळींत मुसलमानच प्रामुख्यानें होते. शेख–उल्–हिंद मौलाना महमद उल् हसन, त्यांचे सहकारी मौलाना हुसेन अहमद नादवी व मौलवी अझिझ गुल यांना पकडून माल्टामध्यें स्थानबद्ध करण्यांत आलं. दोस्तांच्या विरुद्ध लढाईत उतरलेल्या तुर्कस्तानबद्दल सहानुभूति व्यक्त केली म्हणून व आपले विचार निर्भीडपणें व्यक्त केले म्हणून मौलाना महंमद अली, शौकत अली, आझाद व हजरत मोहानी यांना नजरबंद करून ठेवण्यांत आलें. १९१५ च्या डिसेंबरांत लीग व राष्ट्रीय सभा यांचीं अधिवेशनें मुंबई मुक्कामींच भरलीं. पंडित मदनमोहन मालवीय, श्रीमती सरोजिनी नायडू व महात्मा गांधी आदिकरून कित्येक राष्ट्रसभेचे पुढारी लीगच्या अधिवेशनास हजर राहिले. आगाखानांनीं लीगच्या कायम अध्यक्ष–पदाचा राजीनामा दिला. हिंदुस्थानसाठीं राष्ट्रसभेच्या सहकार्यानें एक योजना बनविण्याकरतां लीगनें एक समिति मुक्रर केली. लखनौ येथें पुन्हां एकवार लीग व राष्ट्रसभा यांचीं अधिवेशनें एकाच वेळीं व एकाच स्थळीं भरलीं. दरम्यानच्या काळांत समितीनें एक योजना तयार केली होती. नऊ वर्षांपूर्वी सुरतेला जहाल व मवाळ यांमध्यें पडलेली फूट भरून निघालेली असल्या-कारणानें राष्ट्रीय सभेचें सामर्थ्य वाढलें होतें. त्यामुळें लखनौच्या अधिवेशनाला सर सुरेंद्रनाथ बानर्जी व पंडित मदनमोहन मालवीय यांच्यासारखे केवळ मवाळ पुढारीच नव्हे, तर लोकमान्य टिळकांसारखे जहाल नेतेहि उपस्थित होते. मुसलमानांसाठीं स्वतंत्र मतदारसंघ मान्य करून आणि पंजाब व बंगाल प्रांतांव्यतिरिक्त इतर सर्व प्रांतांतून मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां बरेंच अधिक प्रतिनिधित्व देऊं करून राष्ट्रीय सभा व लीग यांच्यांत तडजोड घडवून आणण्यांत आली. त्याचप्रमाणें असेंहि ठरलें कीं, एकाद्या जमातीच्या हितसंबंधांविषयीं कोणतेंहि बिल किंवा त्याचें एकादें कलम किंवा एकादा ठराव प्रांताच्या कायदेमंडळामध्यें बिनसरकारी सभासदाकडून मांडण्यांत आला

असतां त्या जमातीच्या कायदेमंडळांतील प्रतिनिधींपैकीं तीनचतुर्थांश प्रतिनिधींनीं जर विरुद्ध मतें दिलीं, तर त्या बिलासंबंधींची, कलमांसंबंधींची अथवा ठरावांसंबंधींची कारवाई पुढें चालवण्यांत येऊं नये. राष्ट्रीय सभा व लीग यांच्यामध्यें झालेल्या तडजोडीव्यतिरिक्त लखनौ येथें राज्यसुधारणेची एक योजनाहि पुढें मांडण्यांत आली आणि ही सुधारणा मान्य करून स्वयंशासन देण्याच्या दिशेनें सरकारनें निश्चित पाऊल टाकावें अशी मागणी करून ब्रिटिश साम्राज्याची पुनर्घटना करण्यांत येईल तेव्हां, परावलंबित्वाच्या दर्जाऐवजीं हिंदुस्थानला साम्राज्यांतील स्वयंशासित प्रदेशांच्या बरोबरीचें स्थान देण्यांत यावें या मुद्याचेंहि प्रतिपादन करण्यांत आलें. लीगच्या लखनौ येथील अधिवेशनाचे अध्यक्ष जनाब एम्. ए. जीना हे होते. राष्ट्रीय सभेतील लोकमान्य टिळकांसकट सर्व पुढाऱ्यांनीं लखनौ–कराराला पसंती दर्शविली. लीगचे इतर ठरावहि राष्ट्रीय सभेच्या ठरावांच्या धर्तीवरच झाले आणि लीग व राष्ट्रीय सभा यांच्यामध्यें लखनौला मित्रसंधि घडून आल्याचें दृश्य पाहावयास सांपडलें.

जो कार्यक्रम राष्ट्रीय सभेनें अंगीकृत केला होता त्याला मुस्लिम लीगकडून अशा प्रकारें मनःपूर्वक पाठिंबा मिळूं लागला. पुढच्या सालीं बंदिवासांत असलेल्या मौलाना महंमद अलींना लीगनें आपल्या अधिवेशनाचे अध्यक्ष निवडल्यामुळें लीगमधील नव्या प्रवृत्तीचें प्रत्यंतर मिळालें. पूर्वीच्या दोन अधिवेशनांप्रमाणेंच लीगचें १९१७च्या डिसेंबरांतलें अधिवेशनहि राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाबरोबरच कलकत्त्यास भरवण्यांत आलें. महात्मा गांधी व श्रीमती नायडू हीं उभयतां लीगच्या अधिवेशनाला उपस्थित होतीं आणि अलीबंधूंना मुक्त करण्याची मागणी करणाऱ्या ठरावाला पाठिंबा देऊन त्यांनीं अधिवेशनाच्या बैठकींत भागहि घेतला होता.

## १३. खिलाफत–आंदोलन व तदनंतरचा काळ

पुढील वर्षी १९१८च्या डिसेंबरांत राष्ट्रीय सभेच्या दिल्ली येथील अधिवेशनासमवेत लीगचें अधिवेशन सुरू होईपर्यंतच्या एका वर्षाच्या काळांत देशामध्यें व जगामध्यें अनेक घटना घडून आलेल्या होत्या. दरम्यान मि. मॉंटेग्यूंनीं हिंदुस्थानला भेट दिली होती आणि १९१७च्या ऑगस्ट्मध्यें जाहीर झालेल्या ब्रिटिशांच्या धोरणानुसार त्यांनीं व्हाइसरॉय लॉर्ड चेम्स्फर्ड यांच्या सहाय्यानें सुधारणेच्या योजनेसंबंधींचा आपला अहवाल तयार केला होता. महायुद्धाचा निकाल दोस्तांना अनुकूल व जर्मनी व तुर्कस्थान यांना प्रतिकूल लागला होता. तुर्कस्तानच्या पराभवामुळें असे कांहीं प्रश्न उपस्थित झाले होते कीं, त्यांचा हिंदुस्थानांतील मुसलमानांवर निश्चितपणें परिणाम घडून येणार होता. महायुद्ध चालू होतें तोंपर्यंत ब्रिटिश प्रमुखांकडून अशीं आश्वासनें मिळत गेलीं कीं, युद्धानंतर तुर्कस्तानला सौजन्यानें वागविण्यांत येईल आणि मेसापोटेमिया व अरबस्तान यांतील मुसलमानांच्या पवित्र स्थानांना अपाय पोंचेल असें कोणतेंहि कृत्य करण्यांत येणार नाहीं. तुर्कस्तानवर पराभवानंतर कोणत्या शर्ती लादण्यांत येणार यासंबंधीं कोणत्याहि प्रकारची सुस्पष्ट कल्पना अद्यापि आलेली नसली, तरी ब्रिटिशांच्या चिथावणीमुळें अरबस्तानांत जे प्रकार घडून आले होते त्यामुळें हिंदी मुसलमानांचीं मनें अस्वस्थ झालीं होतीं. ब्रिटिशांनीं फूस दिल्याकारणानें तुर्कस्तानपासून अलग होऊन अरबांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें होतें. कानपूरचा दंगा सरकारनें निष्ठुरपणें दडपून टाकला होता व लीगच्या दिल्ली येथील अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून जें भाषण डॉ० एम्. ए. अन्सारी यांनीं केलें होतें, तें सरकारनें आक्षेपार्ह ठरवलें होतें. त्यामुळें मुसलमानांच्या भावना अधिकच प्रक्षुब्ध झाल्या. हिंदीं मुसलमानांच्या राजकारणामध्यें उलेमांनीं पुनरपि प्रवेश केला आणि राजकीय आंदोलनांत ते प्रामुख्यानें भाग घेऊ लागले. स्वयंनिर्णयाचा हक्क हिंदुस्थानलाहि देण्यांत यावा अशी मागणी लीगतर्फे करण्यांत आली.

तहाचीं कलमें जेव्हां प्रसिद्ध झालीं तेव्हां खलिफा, त्याचे प्रदेश व त्याचे अधिकार यांसंबंधीं हिंदी मुसलमानांना देण्यांत आलेलीं वचनें लटकीं असल्याचें दिसून आलें. खिलापत दुर्बळ झाल्यामुळें इस्लामचीं पवित्र क्षेत्रें बिगर-मुसलमानांच्या ताब्यांत जाणार असा रंग दिसूं लागला. हिंदुस्थानांत जें खिलापत-आंदोलन झालें तें दोस्तांच्या, विशेषतः ब्रिटिशांच्या विरुद्ध, खलिफाला पाठिंबा देणारें होतें. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं हिंदूंनीं खिलापत-चळवळीला अन्तःकरणपूर्वक पाठिंबा दिला. ब्रिटिशांची तुर्कस्तानविरोधी नीति पाहून भारतमंत्री मॉंटेग्यू यांनाहि धास्ती वाटली आणि व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग् यांनीं एक तार पाठवून ब्रिटिशांनीं इस्तंबूल सोडावें, पवित्र क्षेत्रांवर सुलतानाचें सार्वभौमत्व राहूं द्यावें आणि थ्रेस व स्मर्ना हे टापू तुर्कस्तानला परत करावेत असें कळवलें. वाटाघाटी चालू असतांच ही तार प्रसिद्ध झाल्या-कारणानें मि० मॉंटेग्यू यांना राजीनामा द्यावा लागला. हिंदुस्थानांत जनतेच्या भावना अधिकाधिक कटु बनत चालल्या होत्या. जनतेचें लक्ष मुख्य मुद्द्या-कडे वेधून घेण्यासाठीं मध्यवर्ती खिलापत-समितीची स्थापना करण्यांत येऊन तिच्या शाखा देशभर फैलावण्यांत आल्या. मौलाना महंमद-उल्-हसन, शेख-उल्-हिंद यांच्या नेतृत्वाखालीं उलेमांनीं जमायत-उल्-उलेमा-इ-हिंदची प्रस्थापना केली. हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या मनांतील खिलापत-प्रकरणासंबंधींच्या भावनांची जाणीव अधिकाऱ्यांना करून देण्याच्या उद्देशानें व खिलापतीचे तुकडे करून मुसलमानांच्या पवित्र क्षेत्रांच्या रक्षणाचें कार्य करण्यास ती असमर्थ ठरेल असें कांहींहि करण्यांत येऊं नये अशी खिला-पतीची तरफदारी करण्यासाठीं इंग्लंडला शिष्टमंडळें रवाना करण्यांत आलीं. हीं शिष्टमंडळें अपेशी ठरलीं आणि शांततेच्या तहनाम्यासाठीं चाललेल्या वाटाघाटींवरून हें स्पष्ट झालें कीं, मुसलमानांच्या भावनांचा मुलाहिजा दोस्त करणार नसून पूर्वी दिलेलीं आश्वासनें जरूर तर मोडून देखील तुर्कस्तानवर कडक अटी लादण्याचा त्यांचा निर्धार झालेला आहे. अशा परिस्थितींत देश-भर उठाव होणार हें अपरिहार्यच ठरलें. येथून पुढें खिलापत-परिषद व

जमायत–उल्–उलेमा–इ–हिंद या मुसलमान समाजांतल्या दोन अत्यंत कार्यकारी व प्रभावी संघटना बनल्या आणि कांहीं वर्षेंपर्यंत मुसलमान समाजाचें नेतृत्व त्यांच्याच हातीं राहिलें. लीगचें अधिवेशन राष्ट्रसभेच्या अधिवेशनाबरोबर भरविण्यांत येई आणि हकीम अजमलखान, डॉ० अन्सारी, मौलाना हजरत मोहानी व अलाबंधू यांच्यासारख्या अत्यंत प्रगतिशील मुसलमानांची योजना अध्यक्षस्थानीं करण्यांत येत असे.

रौलॅट् कायदे या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या सरकारी कायद्यांविरुद्ध चळवळ चालू होती, त्याच वेळीं हें खिलापतीचें आंदोलनहि उभें राहिलें. देशांतल्या सर्व जमातींमध्यें प्रचंड प्रक्षोभ निर्माण करणाऱ्या या कायद्यांच्या तपशिलांत शिरण्याचें कारण नाहीं. महायुद्धानंतर भारत–संरक्षण कायद्यांपैकीं जीं कलमें बाद होणार होतीं तीं जशींच्या तशीं किंवा थोड्या फेरबदलानें कायम ठेवावींत या उद्देशानें व सर सिड्ने रौलॅट् यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या सिडिशन् कमिटीच्या (राजद्रोह–चौकशी–समितीच्या) शिफारशींनुसार हा कायदा बनवण्यांत आला होता, येवढें सांगितलें म्हणजे पुरे. या कायद्याविरुद्ध झालेल्या चळवळीमुळें सबंध देशांत अभूतपूर्व जागृति उत्पन्न झाली. पंजाब व मुंबई प्रांतांत आणि दिल्ली वगैरे शहरांत दंगे झाले, सरकारी दडपशाहीचा वरवंटा फिरूं लागला आणि अमृतसर येथें जालियनवाला बागेचें हत्याकांड घडून तदनंतर पंजाब प्रांतांत लष्करी कायदा पुकारण्यांत आला. लष्करी कायद्याच्या अमदानींत जीं घोर कृत्यें सरकारकडून तेथें घडलीं, तीं नंतर बऱ्याच दिवसांनीं लोकांना समजलीं, आणि त्यांच्या संबंधींची माहिती लॉर्ड् हंटर् यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलेल्या चौकशी–समितीच्या कामकाजाच्या वेळीं विशेषेंकरून उजेडांत आली. राष्ट्रसभेनेंहि आपली समिती नेमून स्वतंत्र चौकशी केली. दोन्ही समित्यांचे अहवाल ज्या वेळीं प्रसिद्ध झाले, तेव्हां देशांत संतापाची लाट उसळली. खिलापतीच्याबद्दल मुसलमानांच्या मनांत राग होताच, त्यांत या रागाची भर पडली आणि त्यामुळें राष्ट्रसभा व लीग यांच्यामध्यें सहकार्य निर्माण झालें. दोन्ही संस्थांना सामान्य अशी कार्याची दिशा ठरविण्यांत

येऊन अहिंसक असहकाराचा कार्यक्रम निश्चित करण्यांत आला. जमायत उल्–उलेमानें एक फतवा काढून अहिंसक असहकाराच्या कार्यक्रमास अनुज्ञा दिली. या फतव्यावर ९२५ प्रसिद्ध मुसलमान धर्मकोविदांच्या सह्या होत्या. अनेक उलेमांना तुरुंग दाखवण्यांत आला. या वेळीं सरकारविरुद्ध लोकमत इतकें खवळलेलें होतें कीं, अनेक मुसलमानांनीं 'हिजराती'चा म्हणजे देशत्यागाचा मार्ग स्वीकारला आणि त्यामुळें ओढवलेल्या अवर्णनीय हालअपेष्टा सहन केल्या.

१९२० च्या सप्टेंबरांत कलकत्ता येथें भरलेल्या खास अधिवेशनांत राष्ट्रसभेनें अहिंसक असहकाराचा ठराव संमत केला. तोच पुढें डिसेंबर महिन्यांत नागपूर येथें भरलेल्या वार्षिक अधिवेशनांत पक्का करण्यांत आला. १९२१ सालीं कार्याला जणुं पूर आला होता. स्वराज्यसंपादनाप्रीत्यर्थ आणि पंजाब व खिलापतीसंबंधींचीं गाऱ्हाणीं दूर करून घेण्यासाठीं केलेल्या संयुक्त राजकीय कार्यक्रमाच्या आणि सर्व जातींमधील एकोप्याच्या दृष्टीनें तें साल अपूर्व ठरलें. सविनय कायदेभंग व करबंदी यांच्या विषयींची योजना स्वीकृत होण्याच्या आधींच सरकारनें विविध समाजांतल्या हजारों स्त्री–पुरुषांना तुरुंगांत डांबून टाकलें. मौलाना महमद अली व शौकत अली, हुसेन अहमद, अबुल कलम आझाद, देशबंधु दास, पंडित मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय इत्यादि राजकीय पुढारी व राष्ट्रसभेचे आणि खिलापतीचे शेंकडों कार्यकर्ते त्या सालच्या अखेरीस कैदेंत पडले. परंतु या दोन्ही संस्थांचीं वार्षिक अधिवेशनें अहमदाबाद येथें अपार उत्साहानें साजरीं झालींच. करबंदीचा व सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम मंजूर करण्यांत आला. पण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला सुरुवात होण्याच्या आधींच चौरीचुरा येथें भयंकर दंगल उडाल्यामुळें तो कार्यक्रम मागें घेण्यांत आला. त्यानंतर महात्मा गांधींना अटक होऊन सहा वर्षांची सजा देण्यांत आली. गांधीजींच्या शिक्षेनंतर चळवळ एकाएकीं थांबली. तिला पुनः संघटित करण्याचे प्रयत्न करण्यांत आले, पण ते विफल झाले.

अहमदाबाद येथें भरलेलें मुस्लिम लीगचें अधिवेशन हेंच राष्ट्रसभेसमवेत भरलेलें तिचें शेवटचें अधिवेशन. मौलाना हजरत मोहानी हे लीगचे अध्यक्ष

असून देखील राष्ट्रसभा, खिलापत–समिति, अथवा जमायत–उल्–उलेमा यांच्या बरोबरीनें पाऊल टाकणें लीगला झेपत नाहीं असें दिसूं लागलें. या संस्थांप्रमाणें सविनय कायदेभंगाला अनुकूल असा ठराव लीगनें केला नाहीं. सात वर्षे ती राष्ट्रसभेशीं सदृश अशा मार्गानें चालली; आपली घटना तिनें बदलली, पण सविनय कायदेभंगाचा ठराव झाल्यानंतर मात्र राष्ट्रसभा, खिलापत–समिति व जमायत–उल्–उलेमा यांच्या समवेत आपलीं वार्षिक अधिवेशनें भरवण्याचें तिनें बंद केलें.

मौलवी सय्यद तुफेल अहमद लिहितात, "येथें असा प्रश्न उपस्थित होतो कीं, लीग आपल्या समकालीन संस्थांच्या मागें कां पडली? या प्रश्नाचें उत्तर मौलना शिबली यांच्या लेखनांत मिळतें. त्यांचा लेखनाचा मथितार्थ असा: 'सिमल्याला गेलेलें शिष्टमंडळ हा लीगचा पाया आहे, आणि लीगची घटना कशाहि प्रकारची बनवण्यांत आली, तरी त्या शिष्टमंडळाची प्रवृत्ति लीगमध्यें उतरल्यावांचून राहणार नाहीं. लीगच्या इमारतीच्या पायाचा पहिला चिराच चुकीचा बसवण्यांत आलेला आहे. त्यामुळें त्याच्यावर कोणतेंहि बांधकाम उभारलें तरी तें ओळंब्याच्या बाहेरच जाणार. हिंदूंना जे कांहीं अधिकार व जागा मिळतील त्यांपैकीं मुसलमानांच्या पदरांत काय पडावयाचें त्याचें प्रमाण बांधलेलें असावें, हेंच काय तें लीगचें राजकारण! पण हें खरें राजकारणच नव्हे. सरकारच्या विरुद्ध जनतेच्या मागण्या काय याचा विचार खऱ्या राजकारणामध्यें होत असतो. ती दृष्टि ठेवली म्हणजे राजकारण हें धर्माइतकेंच सामर्थ्यवान् बनतें असें दिसून येईल. पण ही दृष्टि त्या संघटनेंत नसल्याकारणानें मुस्लिम लीगचा सभासद स्वतःच्या पदराला खार लावून घेण्यास तयार नसतो आणि श्रेष्ठ दर्जाचा निश्चय व धैर्यहि त्याच्या अंगीं दिसून येत नाहीं.' "[१]

उत्साहाची ही ज्योत दीर्घ काळपर्यंत तेवत राहाणें शक्य नव्हतें. सविनय कायदेभंग परत घेतल्यानंतर व महात्माजींना शिक्षा झाल्यानंतर जनतेंत वैक्लब्याची व वैफल्याची भावना निर्माण झाली. इतर कोणत्याहि संस्थेपेक्षां लीगची

१. तुफेल अहमद : पृ. ४१०.

फारच दैना उडाली आणि तिच्या १९२३सालच्या लखनौच्या अधिवेशनाला पुरेशी गणसंख्या नसल्याकारणानें तें रद्द करावें लागलें! त्यानंतर १९२४, १९२५ व १९२६सालीं जीं अधिवेशनें झालीं, त्यांवरून लीग आणि राष्ट्र-सभा यांच्यांतील मतभेद वाढत जात असल्याचें दिसून येऊं लागलें.

१९२१मध्यें हिंदु-मुसलमानांचे संबंध अत्यंत मैत्रीचे होते. बकरीदच्या सणाच्या दिवशीं अनेक ठिकाणीं मुसलमानांनीं आपण होऊन गोहत्या बंद ठेवली होती आणि खिलाफत-चळवळींत हिंदूंनीं भाग घेतल्याकारणानें हिंदु-मुसलमानांची एकी आतां पक्की झाली असें वाटूं लागलें होतें. पण त्याच सुमाराला कांहीं प्रसंग असे घडून आले कीं, दुधांत मिठाचा खडा पडावा तसा प्रकार झाला. खिलाफत-चळवळीला मलबारमध्यें खूप जोर चढला होता. तेथें मुसलमानांची बरीच वस्ती आहे. तेथील मुसलमानांना मोपले म्हणतात. इतर ठिकाणच्या प्रमाणें तेथील हिंदूंनीं देखील खिलाफत-चळवळींत भाग घेतला होता. अहिंसेची शिकवणूक इतर प्रांतांत जितपत आत्मसात् करण्यांत आली होती, तितपत देखील ती तेथें आत्मसात् झालेली नसल्यामुळें तेथील चळवळीला हिंसक स्वरूप प्राप्त झालें. तिकडे दंगल झाल्याबरोबर मौलाना महमद अली शांततारक्षणासाठीं मलबारकडे निघाले. त्यांना तेथें जाऊं दिलें असतें, तर त्यांनीं तेथील परिस्थिति खासच आटोक्यांत आणली असती. पण सरकारनें त्यांना वाटेंतच अटक केली व इतर पुढाऱ्यांनाहि तिकडे जाण्यास मज्जाव केला. जनता अनावर झाली आणि अशा बाबतींत येणाऱ्या नित्याच्या अनुभवाप्रमाणें सरकारच्या दडपशाहीनेंहि भेसूर स्वरूप धारण केलें. तेथील मोपल्यांना जशा कडक शिक्षा झाल्या, तशाच कांहीं हिंदूंच्या पुढाऱ्यांनाहि झाल्या. पण जे हिंदू सरकारच्या बाजूला मिळाल्याचा किंवा आपल्या बाजूला नसल्याचा मोपल्यांना संशय आला, त्यांच्यावर मोपल्यांनीं अत्याचार केल्याच्या वार्ता कानांवर येऊं लागल्या. हिंदूंना जबरदस्तीनें मुसलमान बनवल्याचे आरोपहि करण्यांत आले. या बातम्यांत निःसंशय अतिशयोक्ति असली, तरी त्यांच्यामुळें हिंदूंच्या मनांत कटुता निर्माण झाली व तिचें लोण उत्तर

हिंदुस्थानपर्यंत पोंचलें. परंतु जोंपर्यंत पुढारी बाहेर होते, विशेषतः महात्मा गांधी बाहेर होते, तोंपर्यंत परिस्थिति काबूंत राहिली. असहकाराचे एक पुढारी स्वामी श्रद्धानंद हे आपल्या धैर्यशाली व छातीठोक वर्तनानें मुसलमानांच्या प्रेमादराला पात्र झाले होते. ते इतके कीं, दिल्लीच्या जुम्मा मशिदींत मुसलमानांनीं त्यांचें व्याख्यानहि करविलें होतें. अशा या पुरुषाच्या मनावर मोपल्यांच्या कृत्यांचा फार मोठा परिणाम झाला आणि तुरुंगांतून मुक्त होतांच त्यांनीं शुद्धिसंघटनाची चळवळ हातीं घेतली.

स्वामी श्रद्धानंदांच्या शुद्धीच्या चळवळीवर राष्ट्रीय व मुसलमान अशा दोन्ही प्रकारच्या लोकांकडून बरीच टीका झालेली आहे. स्वामींनीं सुरू केलेली चळवळ समयोचित असो वा नसो, ख्रिश्चन व मुसलमान लोकांनीं तिच्यासंबंधीं आक्षेप कां घ्यावेत तें समजणें मुष्किल आहे. त्यांचा धर्मांतराचा धंदा तर अष्टौप्रहर चालूच असतो आणि हिंदूंना आपल्या धर्मांत आणण्याचें कार्य सुरू असतें. अशा स्थितींत बिगर–हिंदूंना हिंदुधर्मांत आणण्याचें कार्य हिंदूंनीं सुरू केलें, तर त्यांना नांवें ठेवण्याचा हक्क बिगर हिंदूंना व विशेषतः धर्मांतराच्या कार्यांत जे स्वतःच गुंतलेले आहेत त्यांना पोंचत नाहीं. इतरांच्याप्रमाणें आपल्या धर्माचा प्रसार करण्याचा हक्क हिंदूंनाहि असावयास हवा. पण मनुष्य नेहमींच तर्कानें किंवा न्याय्य मार्गानें चालतो असें नाहीं. शुद्धीविषयीं व विशेषेंकरून श्रद्धानंदांच्या विषयीं मुसलमानांच्यामध्यें वैषम्याची भावना निर्माण झाली आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, पुढें कांहीं काळानंतर एका मुसलमानाच्या हातून त्यांचा खून झाला. मुसलमानांनींहि आपल्या बाजूनें तबलिग व तंझिमची चळवळ हातीं घेतली.

१९२२ च्या उत्तरार्धांत मुलतानमध्यें भयंकर दंगे होऊन हिंदूंचीं देवालयें भ्रष्टवण्यांत आलीं. अनेक हिंदूंना ठार करण्यांत आलें, आणि पुष्कळ हिंदूंचीं घरें लुटण्यांत व जाळण्यांत आलीं. पुढें अनेक वर्षेंपर्यंत देशभर चालू राहिलेल्या जातीय दंग्यांमधील हा पहिला दंगा होय. राष्ट्रसभेच्या आणि खिलाफतीच्या कार्यकर्त्यांनीं व इतर हिंदु–मुसलमान राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनीं ही लाट

थांबवण्याची पराकाष्ठा केली पण उपाय चालेना. पाकिस्तानच्या कांहीं कैवाऱ्यांनीं या सर्व दंग्यांचें खापर हिंदूंच्या माथीं फोडलें आहे. या दंग्यांची योजना हिंदू पुढाऱ्यांनीं आंखलेली होती, त्यांत त्यांचा दुसरा कांहीं नसला तरी येवढा तरी उद्देश खासच होता कीं, मुसलमानांच्या समोर नेहमीं बकऱ्यांप्रमाणें राहणाऱ्या हिंदूंना त्यांच्यांशीं दोन हात करण्याचें शिक्षण द्यावयाचें, असे आरोप करण्यापर्यंत कांहीं लेखकांची मजल गेलेली आहे. झालेल्या घटनांचें हें आपमतलबी स्पष्टीकरण आहे आणि पाकिस्तानचा युक्तिवाद सजवण्यासाठीं त्याचा उपयोग करण्यांत येत असतो हें स्पष्ट आहे. गेल्या तीस वर्षांत घडून आलेल्या हिंदु–मुसलमानांच्या दंग्यांचा निर्विकारपणें जर अभ्यास केला, तर या देशाच्या इतिहासांतील कांहीं ठराविक आणीबाणीच्या वेळा साधून ते उद्भवलेले आहेत याचा दाखला मिळेल. ब्रिटिशांच्या हातची राजसत्ता हिंदी लोकांना देण्यांत यावी ही मागणी ज्या ज्या वेळीं उग्र व दुर्दम्य बनली, किंवा हिंदुस्थानांतील दोन जमातींमध्यें ज्या ज्या वेळीं ध्येयाचा व कार्याचा एकोपा दिसून येऊं लागला, त्या त्या वेळीं हें दंग्यांचें भूत उभें राहिलेलें आहे. १९१६–च्या डिसेंबरांत राष्ट्रसभा व लीग यांच्यांत दिलजमाई झाली, आणि पाठोपाठ १९१७ सालामध्यें 'होमरूल'च्या (स्वराज्याच्या) चळवळीचा धूमधडाका उडाला. लगेच १९१७ च्या उत्तरार्धांत बहार प्रांतामधील शहाबाद येथें जातीय दंगा उद्भवून हिंदूंनीं मुसलमानांचें मनस्वी नुकसान केलें आणि उपरान्त सरकारकडून हिंदूंचें त्याहिपेक्षां अधिक नुकसान करण्यांत आलें. पुढच्या सालीं म्हणजे १९१८ मध्यें संयुक्त प्रांतांतील कटारपूर मुक्कामीं असेच भयंकर दंगे झाले व त्यांचे परिणामहि शहाबादमधील दंग्याप्रमाणेंच घडून आले. खिलापत व पंजाब प्रकरण यांच्यामुळें १९१९ ते १९२२ चे दरम्यान दोन जमातींत जवळजवळ संपूर्ण मतैक्य घडून आलें होतें. नंतर लगेच १९२२ मध्यें पुन्हा दंग्यांची लाट उसळली व पुढें कांहीं वर्षें ती तशीच कायम राहिली.

१९२४सालीं प्रकृतींत फार बिघाड झाल्याकारणानें मुदत पुरी होण्याच्या अगोदरच गांधीजींची तुरुंगांतून सुटका झाली. सभोंवार उसळलेला जातीय

दंग्यांचा कहर व सर्वत्र चालू असलेली हत्त्या व विध्वंस हीं पाहून गांधीजींच्या अन्तःकरणाला वेदना झाल्या आणि त्यांनीं आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें एकवीस दिवसांचें उपोषण करण्याचें ठरवलें. ही यादवी थांबवावी व जातीय संबंध अधिकाधिक बिघडत जाऊं नयेत म्हणून हिंदु–मुसलमानांच्या अन्तः-करणांना साद घालावी या हेतूनें उपवासाचा हा मार्ग अंगीकारण्यांत आलेला होता. राष्ट्रसभेचे तत्कालीन अध्यक्ष मौलाना महमद अली यांनीं सर्व जमातींचे प्रतिनिधी व देशांतील सर्व पुढारी यांची बैठक तांतडीनें भरवली. धार्मिक जमातींचे अधिकार कोणते, कर्तव्यें काय, यांची मर्यादा घालून देणारे व झग-ड्याची परिस्थिति निर्माण झाल्यास कसें वागावें यासंबंधीं सूचना देणारे समतोल ठराव संमत करून घेण्याच्या दृष्टीनें ही बैठक यशस्वी झाली असें म्हणतां येईल. उमेद अशी होती कीं, या बैठकीमुळें परिस्थिति निवळेल. बैठकींत घेण्यांत आलेल्या निर्णयांना योग्य ती प्रसिद्धि देण्यांत आली असती आणि त्यांतील सूचना प्रामाणिकपणें पाळण्यांत आल्या असत्या, तर परिस्थिति खासच आटोक्यांत आली असती. कोणत्याहि एकाच जमातीला सर्व दोष देणें योग्य होणार नाहीं. वरकरणीं पाहिलें तर जातीय दंगे धार्मिक निमित्ता-वरून उपस्थित झाल्यासारखे दिसत असले, तरी पुष्कळ प्रसंगीं राजकीय पार्श्वभूमि त्यांच्या मागें असते. आणि एकदां दंगा होऊन गेला, कीं वैमनस्य व साशंकता यांचें जें शेपूट मागें उरतें, तेंच पुढील गडबडीला कारणीभूत होतें. दंग्यांच्या वेळीं परिस्थिति इतकी बिनसते कीं, एरवीं शांत व समतोल असणाऱ्या माणसांचीं माथीं देखील भडकतात आणि कारणांची चिकित्सा करून तडजोडीचे उपाय योजण्याचें भान त्यांना राहात नाहीं. दंग्यानंतर मागाहून प्रत्ययास येणारे परिणाम इतके घोर असतात कीं, सलोखा घडवून आणण्याचे प्रयत्न कोणी करूं लागला तरी गैरसमज होतो, अर्थाचा अनर्थ करण्यांत येतो. दंग्याला कारण कोण याबद्दलचा वादविवाद चिघळत ठेवण्या-पासून किंवा त्याची स्मृति ताजी ठेवण्यापासून कोणतेंहि हित नाहीं, ही गोष्ट कोणत्याहि विचारी माणसाला वास्तविक पटण्यासारखी आहे. पोलिस व कोर्टें

यांच्याकडून जी दीर्घसूत्री चौकशी चालू असते ती कधीं कधीं वर्षानुवर्षें चालू राहाते आणि त्यामुळें समाजाच्या भावनांवरील ताण कायम राहातो. कारण, साक्षीपुराव्यांत देखील धर्मानुसार फळ्या पडलेल्या असतात, आणि आपापल्या जातीचा बचाव करणारे कैवारी पुढें सरसावत असतात. अशा वेळीं खाजगी प्रयत्नांनीं सलोखा घडवून आणण्याची व खटले काढून घेण्याची खटपट एकाद्यानें केली, तर अत्याचारी लोकांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न म्हणून त्याचा निषेध झाल्यावांचून राहात नाहीं! अनेक वेळां खरी परिस्थिति अशी असते कीं, वातावरणांत खळबळ उत्पन्न करणारे जे कारस्थानी लोक असतात, ते दंग्यांतून सहीसलामत बाहेर येण्याइतके हुषार असतात आणि पोलिसांच्या व कोर्टांच्या तावडींत ते कधीं सांपडत नाहींत. खटल्यांच्या कैचींत साधेभोळे लोकच गवसतात. क्षणिक भावनेच्या भरांत घडलेल्या कृत्यांविषयीं माथें थंड झाल्यावर त्यांना पश्चात्तापहि होतो. अशा लोकांना वांचवण्याचा प्रयत्न करण्यांत नैतिक दृष्टीनें किंवा दुसऱ्या कोणत्याहि दृष्टीनें गैर कांहींच नाहीं. समाजांतील वैमनस्य कमी होणार असेल आणि मैत्रीचें व सलोख्याचें वातावरण प्रस्थापित होणार असेल, तर वरील प्रकारचे प्रयत्न करण्यामध्यें वावगें काय आहे? परंतु हे डावपेंच स्वतःच बचाव करण्याच्या उद्देशानें हिंदू मंडळी करीत असतात असा आरोप कांहीं व्यक्तींच्याकडून जाणूनबुजून करण्यांत येत असतो. परंतु वरील प्रकारचे प्रयत्न करणारी मंडळी कोणत्याहि एकाच समाजांतील व्यक्तींसाठीं काम करीत नाहींत, सलोखा घडून आला तर उभय पक्षांच्या लोकांचें हित होतें, ही गोष्ट स्पष्ट करून दाखवण्याची आवश्यकता नाहीं. कांहीं दंग्यांच्या कारणांसंबंधीं ज्या चौकशा झाल्या त्यांच्या अहवालांवरून असें दिसून येतें कीं, सरकारनें खंबीर धोरण ठेवलें असतां दंगे टाळतां येतात, इतकेंच नव्हे, तर सुरू झालेले दंगेहि थांबवतां येतात. मुंबई शहरीं झालेल्या भयंकर दंग्यांमध्यें ८९ हिंदू, ५४ मुसलमान, १ युरोपियन व १ पारशी इतकीं माणसें मेलीं व ६४३ जखमी झालीं. नंतर दंगे-चौकशी-समितीनें चौकशी करून असें मत व्यक्त केलें कीं, 'पोलिस कमिशनरनें ज्या

वेळीं लष्कर बोलावण्याचें ठरवलें, त्याच्या जरा अगोदरच तें बोलावण्यांत यावयास हवें होतें. या मुद्यामध्यें बराच अर्थ आहे असें आम्हांला वाटतें. कांहींहि असो, अलीकडे घडून आलेल्या दंग्यांतील अनुभवांवरून असें दिसतें कीं, दंगा उपस्थित झाल्यानंतर लगेच लष्कराची पुरेशी कुमक मागवणें व इतरहि कडक उपाय योजणें इष्ट आहे....'

१९३१ मध्यें कानपुरांत भयंकर दंगे झाले. कानपूर येथील दंग्याच्या कारणांसंबंधीं चौकशी–समितीच्या अहवालांत म्हटलें आहे कीं, "अधिकाऱ्यांनीं तांतडीचे व कडक उपाय योजले नाहींत; कारण, राष्ट्रसभेच्या कार्याला व्यापारीवर्गानें मदत केली हें त्यांना पसंत पडलें नव्हतें. सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीशिवाय त्यांना आपल्या जीवित–वित्ताचें रक्षण करणें अशक्य आहे हा धडा व्यापारीवर्गाला शिकवण्याचा त्यांचा हेतु होता, असें एका साक्षीदारानें सांगितलें. दंग्याच्या वेळची पोलिसांची वृत्ति अक्षम्य व निषेधार्ह होती. दंग्याच्या काळांत घडलेल्या निरनिराळया प्रसंगीं पोलिसांनीं बेपर्वाई व निष्क्रियता दाखवली या बाबत सर्व साक्षीदारांत एकवाक्यता आहे. साक्षीदारांमध्यें युरोपियन व्यापारी, सर्व मतांचे हिंदू व मुसलमान, लष्करी अधिकारी, उत्तर हिंदुस्थानी व्यापारी मंडळाचा चिटणीस, हिंदी ख्रिश्चन समाजाचे प्रतिनिधी, इतकेंच काय, पण हिंदी अधिकारीहि होते. साक्षीमध्यें आढळून येणाऱ्या या एकवाक्यतेकडे दुर्लक्ष करणें अशक्य आहे....पोलिसांच्या डोळयांदेखत गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडत असतांहि त्यांनीं कांहीं हालचाल न केल्याचीं उदाहरणें कित्येक साक्षीदारांनीं दिलीं...त्या वेळीं पोलिसांच्या हलगर्जीपणाबद्दल व निष्क्रियतेबद्दल तक्रारी झाल्या होत्या हें अनेक साक्षीदारांनीं व स्वतः जिल्हा मॅजिस्टेटनेंहि आपल्या बयाणांत सांगितलें आहे."[1]

---

१. के. बी. कृष्णन् : दि प्रॉब्लेम् ऑफ मायनॉरिटीज्, पृ. २७२–७३.

# १४. ब्रिटिशांचें खोल कारस्थान

१९२६ च्या डिसेंबरांतलें गौहत्तीचें राष्ट्रसभेचें अधिवेशन भरण्याच्या जरा आधीं, स्वामी श्रद्धानंदांचा त्यांच्या राहात्या घरांतच रुग्णशय्येवर एका धर्मपिसाट मुसलमानाच्या हातून खून झाला. त्यांची भेट घेण्याच्या निमित्तानें त्या मुसलमानानें त्यांच्या खोलीपर्यंत प्रवेश मिळवला होता. त्या प्रसंगानंतर साहजिकच सर्व देशभर हाहाःकार माजला. हिंदू व मुसलमानांमधील सामाजिक, धार्मिक व राजकीय मतभेद मिटवण्यासाठीं आणखी प्रयत्न करण्याची जरुरी भासूं लागली. १९२० सालीं मॉटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा अमलांत आल्यानंतर राष्ट्रसभेनें व खिलापत–समितीनें कायदेमंडळांवर बहिष्कार घातला होता आणि १९२० च्या निवडणुकीशीं या दोन्ही संघटनांनीं असहकार केला होता ही गोष्ट येथें लक्षांत ठेवली पाहिजे. १९२२ सालीं सविनय कायदेभंगाची चळवळ जवळजवळ मागें घेण्यांत आल्यानंतर या दोन्ही संस्थांतील पुढाऱ्यांत मतभेद निर्माण झाल्याकारणानें कायदेमंडळांवरील बहिष्कार उठवण्यांत आला आणि १९२३ च्या अखेरीस व त्यानंतर झालेल्या निवडणुकींतून राष्ट्रसभेच्या व खिलापतीच्या कार्यकर्त्यांनीं भागहि घेतला. कायदेमंडळांतील राष्ट्रसभेचें कार्य स्वराज्यपक्षाच्या द्वारा चालत असे. सुधारणा–कायदा राबवावा असें स्वराज्यपक्षाचेंहि मत नव्हतें. पण कायदेमंडळांतून सरकारशीं असहकार करावा अशी त्या पक्षाची भूमिका होती. म्हणून राज्यघटनेंत बदल व्हावा अशी मागणी मध्यवर्ति कायदेमंडळांतील राष्ट्रसभेच्या सभासदांनीं केली. त्यांनीं राज्यकारभाराचा खर्च नामंजूर केला आणि अशा प्रकारें कायदेमंडळाची संमति न मिळाल्यामुळें आपले जादा अधिकार वापरून खर्च मंजूर करण्यावांचून सरकारला गत्यंतर ठेवलें नाहीं. राष्ट्रसभेंत नसलेल्या अनेक मुसलमान खासदारांनींहि या कार्यांत राष्ट्रसभावाल्या खासदारांशीं सहकार्य केलें. म्हणजे देशामध्यें अशा प्रकारचें अस्वास्थ्य असतांहि मध्यवर्ति कायदेमंडळांतील हिंदू व मुसलमान सभासदांमध्यें थोड्याफार प्रमाणांत सहकार्य दिसून येत होतें.

राजकीय सुधारणांचा अधिक हप्ता देणाऱ्या सर्व सूचना सरकारनें आतां-पर्यंत धुडकावून लावल्या होत्या. पण या प्रकारची विरोधी भूमिका सरकारला फार दिवस टिकवून धरतां येणार नाहीं आणि कांहीं तरी जातीय सलोखा झाल्यावांचून कोणत्याहि तऱ्हेची प्रगति शक्य नाहीं, अशी जाणीव झालेली होती. म्हणून हिंदू व मुसलमान पुढाऱ्यांच्या समवेत विचारविनिमय करून दोन समाजांत माजलेली दुःखद दुही दूर करण्यासाठीं कोणते उपाय योजावेत, तें ठरवण्याच्या प्रयत्नांना ताबडतोब सुरवात करण्याचा अधिकार गौहत्तीच्या राष्ट्रसभेनें आपल्या कार्यकारी मंडळास दिला. राष्ट्रसभेचे अध्यक्ष श्री० श्रीनिवास अय्यंगार यांनीं कांहीं हिंदु–मुसलमान पुढाऱ्यांच्या व मध्यवर्ति कायदेमंडळांतील सभासदांच्या गांठीभेटी घेतल्या व अनौपचारिक बोलणीं केलीं. १९२७ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस कांहीं मुसलमान समाजांतील शिष्टमंडळी दिल्लीस जमली व त्यांनीं मुसलमानांच्या मागण्या तयार केल्या. पुढील गोष्टी मान्य करण्यांत आल्यास प्रांतिक व मध्यवर्ति कायदेमंडळासाठीं संयुक्त मतदार-संघांना संमति देण्यास त्यांनीं तयारी दर्शवली : (अ) सिंध स्वतंत्र प्रांत कर-ण्यांत यावा; (आ) सरहद्द प्रांत व बलुचिस्तान यांना इतर प्रांतांच्या बरोबरीनें वागवण्यांत यावें; (इ) पंजाब व बंगाल प्रांतांत मुसलमानांच्या संख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळावें; आणि (ई) मध्यवर्ति कायदेमंडळांत त्यांच्या प्रतिनिधींचें प्रमाण एकतृतीयांशाहून कमी नसावें. नंतर मे आणि ऑक्टो-बरमध्यें झालेल्या अखिल भारतीय राष्ट्रसभा–समितीच्या दोन्ही बैठकींत वरील मागण्यांना बहुतांशीं मान्यता दर्शविणारे ठराव संमत करण्यांत आले आणि हिंदु–मुसलमान प्रश्नाच्या सामाजिक व धार्मिक स्वरूपाविषयीं कांहीं नियम सुचवण्यांत आले. राष्ट्रसभेचें पुढील अधिवेशन मद्रासमध्यें भरलें, तेव्हां अखिल भारतीय राष्ट्रसभा समितीच्या ठरावांतील धोरणानुसार ठराव करण्यांत आला. दुसऱ्या एका ठरावानें कार्यकारी समितीला असा अधिकार देण्यांत आला कीं, तिनें देशांतल्या इतर संस्थांनीं नियुक्त केलेल्या सदृश समित्यां-समवेत विचारविनिमय करावा आणि नागरिकांच्या अधिकार–सनदेवर

आधारलेली स्वराज्याची घटना बनवून तिनें ती अखिल भारतीय राष्ट्रसभा-समिति, इतर संस्थांचे प्रतिनिधी व पुढारी आणि प्रांतिक व मध्यवर्ति कायदे-मंडळांचे सभासद यांच्या खास राष्ट्रीय परिषदेपुढें विचारासाठीं, संमतीसाठीं मांडावी. त्याच आठवड्यांत तिकडे कलकत्त्याला भरलेल्या लीगच्या अधि-वेशनांतहि एक ठराव करण्यांत येऊन राष्ट्रसभेच्या कार्यकारी समितीबरोबर व इतर संस्थांबरोबर हिंदुस्थानच्या राज्यघटनेबाबत विचारविनिमय करण्या-साठीं, आणि राष्ट्रसभेनें सुचवल्याप्रमाणें भरवण्यांत येणाऱ्या राष्ट्रीय परिषदेंत भाग घेण्यासाठीं एक उपसमिति नेमण्यांत आली. लीगच्या अधिवेशनांत वर नमूद केलेल्या मुसलमानांच्या मागण्यांचा पुनरुच्चार करण्यांत आला व त्या मान्य झाल्यासच स्वतंत्र मतदारसंघ सोडून देण्यास मुसलमान तयार होतील, या मुद्यावर भर देण्यांत आला. विचारस्वातंत्र्य, धर्मसंबंधीं कायदे, गोहत्या व वाद्यवादनाबाबतचे प्रश्न व धर्मांतर या विषयांबाबत मद्रासमधील अधि-वेशनांत राष्ट्रसभेनें जो निर्णय दिला होता, त्याचाहि अन्तर्भाव या लीगच्या ठरावांत करण्यांत आला होता. लीगमध्यें त्याच सुमाराला दुफळी पडली होती. एका पक्षानें आपलें अधिवेशन कलकत्त्यास, दुसऱ्या पक्षानें आपलें अधिवेशन सर मियाँ महमद शफी यांच्या अध्यक्षतेखालीं लाहोरास भरवलें होतें. वर दिलेले ठराव कलकत्ता-अधिवेशनांत मंजूर झाले होते. त्या अधि-वेशनाचे अध्यक्ष मौलवी महमद याकूब असून जनाब जिना हे त्या अधि-वेशनाचे मार्गदर्शक होते.

राष्ट्रसभा व लीगमधील कलकत्त्याचा गट यांच्यांत सलोखा घडवून आण-ण्यास व त्याचबरोबर खुद्द लीगमध्यें दुफळी पडण्यास ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या, त्या येथें नमूद करून ठेवण्यासारख्या आहेत. राजकीय सुधारणेसंबंधीं-च्या सर्व सूचनांना सरकारनें वाटाण्याच्या अक्षता लावल्या होत्या हें मागें सांगितलेंच आहे. लॉर्ड बर्कनूहेड् हे त्या वेळीं भारतमंत्री होते. १० डिसेंबर १९२५रोजीं त्यांनीं व्हाइसरॉय लॉर्ड रेडिंग् यांना पत्र लिहिलें आणि हिंदु-स्थान सरकारच्या १९२०च्या कायद्यांत म्हटल्याप्रमाणें त्या कायद्याची अंमल-

बजावणी कशी काय चाललेली आहे, यासंबंधीं अहवाल सादर करण्यासाठीं चौकशीमंडळ नेमण्याचा काळ समीप आला असल्याचें पुढील शब्दांत कळवलें:

'राजकीय सौदा करण्याच्या किंवा स्वराज्यपक्षांत आणखी फाटाफूट करण्याच्या दृष्टीनें चौकशी–मंडळाचा उपयोग करण्याची संधि तुमच्या दृष्टिपथांत कधीं काळीं आली, तर तुमचा सल्ला मला मिळावा अशी माझी इच्छा आहे... सौदा पटवण्याच्या दृष्टीनें त्याचा कांहीं उपयोग होण्यासारखा असेल, तर तुम्ही या प्रसंगाचा पूर्ण उपयोग करून घ्यावा आणि येथील सरकारचा त्या कामीं तुम्हांला पाठिंबा मिळेल अशी खात्री असू द्यावी.'[1]

परंतु १९२७सालांत इंग्लंडमध्यें उत्पन्न झालेल्या परिस्थितीमुळें त्यांचा निरुपाय झाला. 'इंग्लडमधील आगामी सार्वत्रिक निवडणुकीसंबधीं जे अंदाज वर्तवण्यांत येत होते ते भयसूचक होते. मजूरपक्षीय सरकार येण्याचा संभव दिसूं लागला होता. १९२८च्या चौकशी–मडळांतील सभासदांचीं नांवें सुचवण्याचा अधिकार आपल्या मागून येणाऱ्या सरकारच्या म्हणजे कर्नल् वेजवुड् व त्याच्या मित्रांच्या हातीं देण्यांत जो धोका होता, तो पत्करण्याची लॉर्ड बर्कन्हेड्ची यत्किंचितहि तयारी नव्हती. कारण, तसें करण्यानें "स्वराज्यपक्षांत आणखी फाटाफूट" करण्याचा त्यांचा बेत फसला असता.'[2] चौकशी–मंडळाची नेमणूक झाल्याची घोषणा १९२७च्या नोव्हेंबरांत करण्यांत आली. अध्यक्ष सर जॉन सायमन् यांच्यासह मंडळामध्यें सात सभासद होते. त्यांत एकहि हिंदी मनुष्य नव्हता. मंडळासमोर तपासणीसाठीं आपलें म्हणणें मांडण्याकरतां मध्यवर्ति कायदेमंडळाला एक समिति नेमण्यास सांगण्यांत यावयाचें होतें. मंडळावर एकाहि हिंदी इसमाची नेमणूक करण्यांत आली नाहीं हा अपमान आहे, पाणउतारा आहे, असें हिंदी लोकांनीं मानलें आणि फक्त राष्ट्रसभेनेंच नव्हे, तर राष्ट्रसभेच्या व खिलापत–समितीच्या बाहेर असणाऱ्या अनेक मुसलमानांनींहि सायमन्–मंडळावर बहिष्कार घालण्याचें ठरवलें. देशांतल्या

---

१. के. बी. कृष्णन् : दि प्रॉब्लेम् ऑफ मायनॉरिटीज्, पृ. ३०७.

२. अतुलानंद चक्रवर्ती : कॉल इट् पॉलिटिक्स्?, पृ. ५८.

सर्व राजकीय गटांमध्यें सौम्य वृत्तीच्या मानल्या जाणाऱ्या व राष्ट्रसभेनें बहिष्कार घातला असतांहि मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा राबवणाऱ्या मवाळांनींहि बहिष्काराला साथ दिली. सायमन्–मंडळाशीं सहकार्य करावें कीं नाहीं, या व विभक्त मतदारसंघाच्या प्रश्नावर अखिल भारतीय मुस्लिम लीगमध्यें फूट निर्माण झालेली होती. हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या गटांत फूट असणें किती महत्त्वाचें आहे याची लार्ड बर्कन्हेड् यांना पुरेपूर जाणीव होती. 'भारतमंत्री म्हणून त्यांनीं व्हाइसरॉय लॉर्ड रेडिंग् यांना असा सल्ला दिला होता कीं, "हे विरोध मूलगामी आहेत आणि प्रचंड लोकसंख्येचे व दुराराध्य असे समाजविभाग त्यांच्या आहारीं गेलेले आहेत, ही गोष्ट जितकी सुस्पष्ट होईल, तितकीच त्यांच्यांत सलोखा घडवून आणण्याचें कार्य मात्र आपणच काय तें करूं शकूं ही गोष्टदेखील स्पष्ट होईल."[१] हिंदुस्थानांत सायमन–मंडळावर बहिष्कार पडला तेव्हां व्हाइसरॉय लॉर्ड डर्बिन् यांना त्यांनीं पुनरपि लिहिलें कीं, 'बहिष्काराला प्रतिकूल भासणारे मुसलमान, दलितवर्ग, व्यापारीवर्ग, आणि इतर अनेक गट यांच्यावरच बहिष्कार हाणून पाडण्याचा बाबतींत आपली सर्व मदार आहे. विरोधाच्या भिंतींत खिंडार पाडण्याचें कार्य, मंडळाची भेट चालू असतांनाच सुरू करणें उचित होईल किंवा काय, तें तुम्हीं व सायमन् यांनींच ठरवावयाचें आहे.'[२]

१९२८ च्या फेब्रुवारींत त्यांनीं पुन्हां एकवार व्हाइसरॉयला कळवलें कीं, 'सायमन्–मंडळावर ज्यांनीं बहिष्कार घातलेला नाहीं अशा सर्व महत्त्वाच्या व्यक्तींच्या, विशेषतः मुसलमानांच्या व दलितवर्गीयांच्या गांठी सायमननीं वारंवार घ्याव्यात असें मी सुचवीन. प्रातिनिधिक मुसलमानांबरोबर झालेल्या त्यांच्या मुलाखतींना जास्तींत जास्त प्रसिद्धि मिळण्याची व्यवस्था व्हावी असें मी म्हणेन. आपलें सर्व धोरण आतां अगदीं स्पष्ट आहे. सायमन्–मंडळाला मुसलमानांनीं बगलेंत मारलें आहे, आतां ते हिंदूंच्या हित-

१. अतुलानंद चक्रवर्ती : कॉल इट् पॉलिटिक्स्?, पृ. ५७.

२. उक्त ग्रंथ, पृ. ५७.

संबंधांना सर्वथा विघातक असा अहवाल सादर करतील, अशी धास्ती अफाट संख्या असणाऱ्या हिंदूंच्या मनांत उत्पन्न करून त्यांना गर्भगळित करून सोडावयाचें, त्यायोगें मुसलमानांचा पाठिंबा आपल्या पदरांत पाडून घ्यावयाचा आणि जिनाला तसेंच लोंबकळत ठेवावयाचें, हें आपलें धोरण आहे.'[१]

ब्रिटिश सरकारचें धोरण हें अशा प्रकारचें असल्यामुळें, लाहोर मुक्कामीं सर महमद शफी यांनीं लीगची सवती सभा घेतली आणि जिनासाहेबांना मूळ लीगच्या कलकत्ता–अधिवेशनामध्यें 'तसेंच लोंबकळत ठेवण्यांत' आलें, या घटनेचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

राष्ट्रसभा, मुस्लिम लीग व इतर पक्ष यांच्यामध्यें १९२८ च्या प्रारंभीं, हिंदुस्थानसाठीं राज्यघटना तयार करण्याच्या कामीं जें सहकार्य दिसून आलें, त्याला सायमन्–मंडळ नेमून सरकारनें केलेला राष्ट्राचा अपमान व अंगांत मुत्सद्दीपणा असेल तर सर्व संमत अशी राज्यघटना तयार करून दाखवण्याविषयीं लॉर्ड बर्कन्हेड् यांनीं दिलेलें आव्हान, या गोष्टी कारणीभूत झाल्या होत्या. वर उल्लेखलेल्या ठरावांनुसार जी सर्वपक्षीय परिषद भरली, तिनें राज्यघटना बनवण्याच्या कामाला प्रारंभ केला आणि बरेंचसें काम उरकल्यानंतर उरलेलें काम एका समितीच्या हातीं सोपवण्यांत आलें. त्या समितीचे पंडित मोतीलाल नेहरू हे अध्यक्ष होते. समितीनें जो अहवाल तयार केला, तो नेहरू–अहवाल म्हणून ओळखला जातो. लखनौ येथें सर्वपक्षीय परिषदेची बैठक भरून त्या अहवालावर चर्चा झाली आणि त्यांत कांहीं फेरफार सुचवण्यांत आले. शेवटीं तो अहवाल १९२८ डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत कलकत्ता येथें भरलेल्या सर्वपक्षीय परिषदेच्या अधिवेशनांत मांडण्यांत आला. मध्यंतरींच्या काळांत इतरांच्या कारवाया सुरू होत्याच, आणि अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींशींहि मतभेद निर्माण झालेले होते. याचें सार पुढील तीन कलमांत सांगतां येईलः (१) मध्यवर्ति कायदेमंडळांतले मुसलमानांचे प्रतिनिधी एकतृतीयांशाहून कमी असूं नयेत; (२) नेहरू–अहवालांत सुचवल्या-

१. के. बी. कृष्णन्: दि प्रॉब्लेम् ऑफ मायनॉरिटीज्, पृ. ६०८.

प्रमाणें सार्वजनिक मतदानाचा हक्क देण्यांत न आल्यास पंजाब व बंगालमधील विधिमंडळांत केवळ लोकसंख्येच्या प्रमाणावरून कायदेमंडळांमधील जागांचें प्रमाण ठरवण्यांत यावें, त्यांत कमीअधिक होऊं नये. दहा वर्षांनंतर या बाबत फेर–विचार करण्याची मोकळीक असावी; (३) शेषाधिकार प्रांतांकडे जावेत, मध्यवर्ति सरकारकडे जाऊं नयेत. हे तीन मुद्दे जनाब जिनांनीं ठरावाच्या स्वरूपांत परिषदेपुढें मांडले. तत्संबंधीं विचार करण्यासाठीं नेमलेल्या समितीच्या बैठकींत त्या मुद्यांवर दीर्घ काळपर्यंत खल झाला, पण पहांटेपर्यंत ऊहापोह होऊनहि ऐकमत्य होईना. शेवटीं परिषदेनें हे मुद्दे फेटाळून लावले. तदनंतर लीगनें परिषदेंतून जवळजवळ अंग काढून घेतल्याप्रमाणेंच केलें, आणि तिचें कलकत्त्यासच चालू असलेलें अधिवेशन तहकूब ठेवण्यांत येऊन एकंदर परिस्थितीचा विचार करण्यासाठीं तें पुढें जरूर तेव्हां भरवण्यांत यावें, असा निर्णय घेण्यांत आला.

आदल्या वर्षी लीगच्या ज्या गटानें लाहोर येथें आपलें सवतें अधिवेशन भरवलें होतें, तो गटहि स्वस्थ बसलेला नव्हता. मद्रास येथें राष्ट्रसभेनें केलेला ठराव त्यानें नापसंत करून राज्यघटनेची योजना आंखण्यासाठीं व इतर संस्थांच्या सहकार्यानें राज्यघटना तयार करण्यासाठीं एक समिति नेमली. लाहोर–अधिवेशनामध्यें स्वीकारण्यांत आलेल्या तत्त्वांनुसार राज्यघटना बनवावी व नंतर ती सायमन्–मंडळासमोर मांडावी असेंहि ठरलें. मुसलमानांमधील निरनिराळ्या गटांतले मतभेद मिटवण्यासाठीं एक गोलमेज–परिषद भरवण्याचा अधिकार आणखी दुसऱ्या एका ठरावान्वयें अध्यक्षांना देण्यांत आला. तदनुसार ३१ डिसेंबर १९२८ रोजीं एक मुस्लिम सर्वपक्षीय परिषद दिल्ली येथें भरवावयाचें ठरलें. लॉर्ड मिंटोच्याकडे १९०६ सालचें शिष्टमंडळ घेऊन जाणाऱ्या आगाखानांना या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंति करण्यांत आली व ती त्यांनीं मान्य केली. कलकत्त्याच्या सर्वपक्षीय परिषदेच्या कारभारामुळें कांहीं मुसलमानांचीं मनें कलुषित झालेलीं होतीं. त्यांपैकीं मौलाना महमद अली व मौलवी शफी दाउदी यांच्यासारख्या अत्यंत प्रमुख व्यक्ती या

दिल्लीच्या बैठकीला उपस्थित राहिल्या. मुसलमानांच्या सर्वपक्षीय परिषदेचें निमंत्रण स्वीकारण्यास अखिल भारतीय मुस्लिम लीगनें कलकत्ता येथें नकार दिला होता. दिल्लीच्या परिषदेनें जो ठराव केला तो सारांशरूपानें असा होता कीं : ( अ ) हिंदी परिस्थितीशीं जुळेल असा राज्यशासनाचा एकच प्रकार आहे, तो म्हणजे संयुक्त राज्यपद्धतीचा. संयुक्त शासनाच्या घटक राज्यांकडे संपूर्ण स्वायत्तता व सर्व शेषाधिकार देण्यांत यावेत व मध्यवर्ति सरकारकडे राज्यघटनेनुसार दिलेले सामान्य हितसंबंधांबाबतचे अधिकार तेवढेच राहावेत; ( ब ) जातीय प्रश्नाबाबतच्या कोणत्याहि बिलाला, ठरावाला किंवा सुधारणेला त्या जातीच्या तीनचतुर्थांश सभासदांचा विरोध असेल, तर तें बिल वगैरे मध्यवर्ति अथवा प्रांतिक कायदेमंडळांत मांडण्यांत किंवा चर्चेस घेण्यांत येऊं नये; ( इ ) कायदेमंडळें व इतर संस्था यांच्यांतील मुसलमान प्रतिनिधींची निवड मुसलमानांच्या स्वतंत्र मतदार-संघातर्फे करण्यांत यावी, ज्या प्रांतांतील कायदेमंडळांत त्यांची बहुसंख्या असेल ती तशीच राहावी, आणि ज्या प्रांतांत त्यांची अल्पसंख्या आहे तेथें प्रचलित कायद्याप्रमाणें मिळालेल्या प्रतिनिधित्वाहून कमी जागा त्यांना यापुढें देण्यांत येऊं नयेत; मध्यवर्ति कायदेमंडळांतील त्यांचें प्रतिनिधित्व शेंकडा तेहतीसपूर्णांक एकतृतीयांश टक्के असावें; (ई) सिंधचा वेगळा प्रांत बनवण्यांत यावा; (उ) सरहद्द प्रांत व बलुचिस्थान यांना इतर प्रांतांप्रमाणेंच सुधारणा मिळाव्यात; मुसलमानांना सर्व खात्यांत पुरेशा जागा मिळाव्यात; मुस्लिम संस्कृतीच्या रक्षणासाठीं व मुसलमानांच्या शिक्षण वगैरेंच्या संवर्धनासाठीं पुरेशा तरतुदी करण्यांत याव्यात व सरकारी साहाय्यांतला पुरेसा भाग त्यांच्या संस्थांना मिळावा.

या ठरावांतील तत्त्वांशीं जुळती नसणारी कोणतीहि राज्यघटना कोणीहि बनवली, तरी ती हिंदी मुसलमानांना मान्य होणार नाहीं, असें या ठरावामध्यें बजावून सांगण्यांत आलेलें होतें.

मुस्लिम लीग व मुस्लिम सर्वपक्षीय परिषद या दोन गटांत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न जनाब जिनांनीं केला. त्यांनीं प्रमुख लोकांच्या विचारानें

तडजोडीला आधारभूत अशा एका ठरावाचा खर्डा तयार केला. या कच्च्या खर्ड्यातच मुसलमानांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं त्यांच्या मतें आवश्यक असलेलीं चौदा कलमें त्यांनीं समाविष्ट केलेलीं होतीं. त्यांच्या चौदा मुद्यांचा सारांश पुढीलप्रमाणें देतां येईल:

१. आगामी राज्यघटनेचें स्वरूप संयुक्त असावें, शेषाधिकार प्रांतांकडे असावेत.

२. सर्व प्रांतांना समान स्वायत्तता असावी.

३. सर्व कायदेमंडळें व प्रातिनिधिक संस्था अशा निश्चित तत्त्वांवर बनवण्यांत याव्यात, कीं प्रत्येक प्रांतांतील अल्पसंख्याकांना पुरेसें व परिणामकारक प्रतिनिधित्व मिळावें; परंतु बहुसंख्याकांना त्यामुळें अल्पसंख्याक किंवा अल्पसंख्याकांशीं समसंख्य बनवण्यांत येऊं नये.

४. मध्यवर्ति कायदेमंडळांत मुसलमानांचें प्रतिनिधित्व एक तृतीयांशाहून कमी नसावें.

५. जातीय गटांचें प्रतिनिधित्व स्वतंत्र मतदारसंघातर्फे व्हावें. तथापि, कोणत्याहि जातीला कोणत्याहि वेळीं स्वतंत्र मतदारसंघाचा त्याग करून संयुक्त मतदारसंघ स्वीकारण्याची मोकळीक असावी.

६. प्रांतांची कशीहि पुनर्रचना झाली, तरी पंजाब, बंगाल व सरहद्द प्रांत यांच्यांतील मुसलमानांच्या बहुसंख्येवर तिचा कोणत्याहि प्रकारें परिणाम होतां कामा नये.

७. सर्व जातींना धर्म–मतें, प्रार्थना इत्यादि धार्मिक कर्मे, प्रचार, संघटन व शिक्षण यांसंबंधीचें पूर्ण स्वातंत्र्य असावें.

८. आपल्या जातीहिताला अपायकारक असल्यामुळें जर एखाद्या जातीच्या सभागृहांत असणाऱ्या सभासदांपैकीं एकतृतीयांश सभासदांनीं कोणत्याहि ठरावाला वगैरे विरोध दर्शविला, तर तो ठराव किंवा ठरावाचा भाग कोणत्याहि कायदेमंडळांत किंवा तत्सम संस्थेंत संमत करण्यांत येऊं नये.

९. सिंध प्रांत मुंबई प्रांतापासून अलग करावा.

१०. इतर प्रांतांप्रमाणेंच सरहद्द प्रांतांत व बलुचिस्तानांत सुधारणा कायद्याचा अंमल चालू करावा.

११. सर्व खात्यांतून, कार्यक्षमता संभाळून मुसलमानांना पुरेशा जागा मिळाव्यात अशी राज्यघटनेंत तरतूद करावी.*

१२. मुसलमानी संस्कृति, शिक्षण, भाषा, धर्म, कायदा, धर्मादायसंस्था, यांना संरक्षण मिळावें, त्यांचें संवर्धन व्हावें आणि सरकारी सहाय्याचा योग्य भाग त्यांना मिळावा म्हणून पुरेशी तरतूद करावी.

१३. मध्यवर्ति किंवा कोणतेंहि प्रांतिक मंत्रिमंडळ त्यांतील एकतृतीयांश मंत्री मुसलमान असल्यावांचून बनवण्यांत येऊं नये.

१४. हिंदी संयुक्त राज्य ज्या राज्यांचें मिळून बनलेलें असेल, त्यांच्या संमतीवांचून मध्यवर्ति कायदेमंडळाच्या घटनेंत कोणताहि फरक करण्यांत येऊं नये.

ज्या लीगचे जनाब जिना हे अध्यक्ष होते, तींत राष्ट्रीय वृत्तीच्या मुसलमानांचा वरचष्मा होता ही गोष्ट ध्यानांत ठेवावयास हवी. शफीसाहेबांची लीग आपल्याच ठरावाला कवटाळून बसली होती आणि मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेंत ती जवळजवळ विलीन होऊन गेल्याप्रमाणेंच होती. जनाब जिनांचा हा चौदा कलमी मसुदा राष्ट्रीय मुसलमानांव्यतिरिक्त सर्व मुसलमानांच्या मागण्यांचा खर्डा बनला. हे चौदा मुद्दे मॅक्डोनल्ड् यांच्या जातीय निवाड्यांत साधारणतः जसेच्या तसे अन्तर्भूत करण्यांत आलेले असल्यामुळें त्यांना वेगळेंच महत्त्व आलेलें आहे. नेहरू—अहवाल मान्य करावा कीं नाहीं, या प्रश्नावर राष्ट्रीय मुसलमान व मुस्लिम सर्वपक्षीय परिषदवाले मुसलमान यांच्यांत मतभेद उत्पन्न झाले. नेहरू—अहवाल स्वीकारावा असें राष्ट्रीय मुसलमानांचें म्हणणें होतें.

डिसेंबर १९२८च्या कलकत्ता येथील अधिवेशनांत राष्ट्रसभेनें असा ठराव केला होता कीं, सरकारनें जर नेहरू—अहवाल मान्य केला नाहीं व त्यांत शिफारस केल्याप्रमाणें ३१ डिसेंबर १९२९पर्यंत वसाहतींच्या बरोबरीचा दर्जा हिंदुस्थानला जर देण्यांत आला नाहीं, तर राष्ट्रसभेनें अहवालांतील भूमिका

सोडून द्यावी व स्वातंत्र्याचा आग्रह धरावा. १९२९साली राष्ट्रामध्यें फार मोठी जागृति उत्पन्न झाली. विचारविनिमयासाठीं इंग्लंडांत जाऊन आल्यानंतर ३१ ऑक्टोबर १९२९रोजीं लॉर्ड आयर्विन् यांनीं अशी घोषणा केली कीं, सायमन–मंडळानें आपला अहवाल सादर केल्यानंतर ब्रिटिश सरकार हिंदी प्रश्नाचा विचार करण्यासाठीं निरनिराळ्या पक्षांच्या व हितसंबंधांच्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील व संस्थानांतील प्रतिनिधींना एका गोलमेज–परिषदेसाठीं निमंत्रण देईल. घोषणेमध्यें असेंहि म्हटलें होतें कीं, 'हिंदुस्थानच्या राज्यघटनेची नैसर्गिक परिणति म्हणजे वासाहतिक स्वराज्य होय असाच अर्थ १९१७च्या जाहीरनाम्यांत अभिप्रेत असल्याचें त्यांचें (ब्रिटिश सरकारचें) मत आहे, हें स्पष्टपणें जाहीर करण्याचा अधिकार मला देण्यांत आलेला आहे.' गोलमेज परिषद भरणार ती वासाहतिक स्वराज्याची घटना ठरवण्याकरतां भरणार असा या शब्दांचा अर्थ आहे किंवा कसें, याविषयीं शंका उपस्थित झाल्याकारणानें या घोषणेचा विचार करण्यासाठीं दिल्लीला भरलेल्या पुढाऱ्यांच्या परिषदेनें त्यासंबंधीं स्पष्टीकरण करण्यांत यावें, अशी मागणी केली. २३ डिसेंबर रोजीं म्हणजे राष्ट्रसभेच्या लाहोर येथील अधिवेशनाच्या किंचित् आधीं महात्मा गांधी, पंडित मोतीलाल नेहरू, विठ्ठलभाई पटेल, सर तेजबहादुर सप्रू व जनाब जिना यांनीं व्हाइसरॉयांची मुलाखत घेतली. वासाहतिक स्वराज्याची घटना बनवण्यासाठीं परिषद बोलावण्यांत येत असल्याचा निर्वाळा देण्यास व्हाइसरॉय तयार नव्हते. तेव्हां कलकत्त्याच्या अधिवेशनांत झालेल्या ठरावानुसार राष्ट्रसभेनें असा निर्णय घेतला कीं, राष्ट्रसभेच्या घटनेंतील पहिल्या कलमांत स्वराज्य असा जो शब्द आहे, त्याचा अर्थ इतःपर पूर्ण स्वातंत्र्य असा करण्यांत येईल आणि नेहरू–अहवालांतील योजना बाद झाली असें मानण्यांत येईल. करबंदीसह सविनय कायदेभंगाच्या कार्यक्रमाला सुरवात करण्याचा अधिकारहि तिनें अखिल भारतीय राष्ट्रसभा–समितीला देऊन ठेवला. नंतर १९३०च्या मार्चपासून सविनय कायदेभंगाची मोहीम सुरू झाली व ती एक वर्षपर्यंत चालू राहिली. सायमन्–मंडळाचा अहवाल

१९३०च्या मध्याच्या सुमाराला सादर करण्यांत आला, आणि तदनंतर हेमंत ऋतूमध्यें लंडन मुक्कामीं गोलमेज–परिषद बोलावण्यांत आली. राष्ट्रसभेचा कोणीहि प्रतिनिधि परिषदेला गेला नव्हता. ब्रिटिश हिंदुस्थानांतले मुसलमानादि प्रतिनिधी व संस्थानांचे प्रतिनिधी परिषदेला गेले होते. हिंदुस्थानासाठीं संयुक्त राज्यघटना असावी व ब्रिटिश हिंदुस्थानांतले प्रांत आणि सामील होऊं इच्छिणारीं संस्थानें किंवा संस्थानांचे गट यांचा तिच्यांत अंतर्भाव करण्यांत यावा असा निर्णय घेण्यांत आला. सिंध प्रांत अलग करावा व सरहद्द प्रांतांत सुधारणा–कायदा सुरू करावा असेंहि ठरलें. मतदारसंघ संयुक्त असावेत कीं विभक्त या प्रश्नावर जीं मतें व्यक्त करण्यांत आलीं, त्यांवरून विभक्त मतदारसंघ कायम ठेवावेत, ज्या पक्षांना त्यांचा फायदा मिळत आहे त्यांच्या संमतीशिवाय ते रद्द करण्यांत येऊं नयेत असा सूर दिसून आला. संयुक्त सरकार व घटक राज्यें यांच्या अधिकारांच्याविषयीं तपशीलवार चर्चा झाली आणि त्यांच्या वेगवेगळ्या याद्याहि बनवण्यांत आल्या. परंतु शेषाधिकारांसंबंधीं संपूर्ण निर्णय घेण्यांत आला नाहीं आणि संयुक्त विधिमंडळांत मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाचें प्रमाण काय असावें, तेंहि नक्की करण्यांत आलें नाहीं.

पहिली गोलमेज–परिषद समाप्त झाल्यानंतर सरकारच्या वतीनें लॉर्ड आयर्विन् व राष्ट्रसभेच्या वतीनें महात्मा गांधी यांच्यामध्यें तडजोड करण्यांत आली, आणि त्यामुळें १९३१च्या हेमंत ऋतूंत भरणाऱ्या दुसऱ्या गोलमेज–परिषदेंत भाग घेण्यासाठीं राष्ट्रसभेचा मार्ग खुला झाला. याच सुमारास बनारस, कानपूर वगैरे ठिकाणीं हिंदु–मुसलमानांचे भयंकर दंगे झाले. राष्ट्रीय मुसलमानांनीं नॅशनॅलिस्ट् मुस्लिम कॉन्फरन्स् (राष्ट्रीय मुस्लिम परिषद) स्थापन केली होती. मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेंत अखिल भारतीय मुस्लिम लीग व खिलाफत परिषद या दोन्ही संस्था कार्यक्रमाच्या दृष्टीनें जवळजवळ विलीन होऊन गेल्या होत्या. राहिलेल्या या दोन गटांत मतदारसंघांवरूनच मतभेद होते. राष्ट्रीय मुसलमान संयुक्त मतदारसंघांना अनुकूल, तर इतर मुसलमान प्रतिकूल होते. राष्ट्रीय मुस्लिम परिषदेचें अधिवेशन १९३१च्या एप्रिलांत लखनौ येथें

सर अली इमाम यांच्या अध्यक्षतेखालीं भरवण्यांत आलें. त्यांनीं असें जाहीरपणें सांगितलें कीं, एके काळीं विभक्त मतदारसंघांच्या मागणीविषयीं अत्याग्रह धरणाऱ्या गटांपैकीं मी एक होतों; इतकेंच नव्हे, तर लॉर्ड मिंटो यांच्याकडे गेलेल्या शिष्टमंडळाचा मी एक सभासद होतों. परंतु काळजीपूर्वक विचार केल्यानंतर मी अशा निर्णयाप्रत आलेलों आहें कीं, विभक्त मतदारसंघ हे केवळ हिंदी राष्ट्रवादाला विरोधी आहेत येवढेंच नव्हे, तर खुद्द मुसलमानांनाहि ते निश्चित अपायकारक ठरणार आहेत. या परिषदेनें असा ठराव केला कीं, राज्यघटनेंत संस्कृति, भाषा आदिकरून गोष्टींचें संरक्षण करणाऱ्या मूलभूत हक्कांची घोषणा समाविष्ट करण्यांत यावी; ती राज्यघटना संयुक्त स्वरूपाची असावी व शेषाधिकार घटक राज्यांकडे सोपवण्यांत यावेत; कार्यक्षमतेच्या किमान मर्यादा संभाळून व कोणत्याहि जमातीला नोकऱ्यांपैकीं रास्त वांटा मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं अशा प्रकारें पब्लिक सर्व्हिस् कमिशन्मार्फत नोकऱ्या देण्यांत याव्यात; सिंध अलग करावा; बलुचिस्तान व सरहद्द प्रांत यांच्यामध्यें इतर प्रांतांप्रमाणेंच राज्यकारभार चालू करावा. संयुक्त विधिमंडळ व प्रांतिक विधिमंडळ यांच्यांतील प्रतिनिधींच्या प्रमाणाविषयीं व प्रतिनिधित्वाच्या पद्धतीविषयीं ठरावांत असें सुचवण्यांत आलें होतें कीं, सार्वत्रिक मतदानाचा हक्क देण्यांत यावा, संयुक्त मतदारसंघ असावेत आणि ३० टक्क्यांहून कमी लोकसंख्या असलेल्या अल्पसंख्याकांना लोकसंख्येच्या प्रमाणांत राखीव जागा ठेवून त्यांना अधिक जागांसाठीं निवडणुकी लढवण्याचा अधिकार देण्यांत यावा. मुस्लिम सर्वपक्षीय परिषद व राष्ट्रीय मुस्लिम परिषद यांच्यांत एकोपा व्हावा म्हणून खटपट झाली, पण ती अखेरीस अयशस्वी ठरली. २२ जून १९३१ रोजीं सिमला येथें तडजोडीसंबंधींच्या निरनिराळ्या सूचनांचा विचार करण्यासाठीं एक संयुक्त परिषद भरवण्याचें घाटत होतें. पण त्याबद्दल डॉ० अन्सारी यांनीं एका जाहीर निवेदनांत असे उद्गार काढले कीं, 'सिमल्यास पोंचल्यानंतर तेथील वातावरण तडजोडीला अनुकूल नसल्याचें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें. आम्हांला जी धास्ती वाटत होती, ती दुर्दैवानें

खरी ठरली आहे. सिमला येथील प्रतिकूल परिस्थिति जनतेच्या पूर्ण परिचयाची असल्याकारणानें ज्यांचा नामनिर्देश करण्याची आवश्यकता नाहीं, अशांच्या कारवायांसमोर ऐक्यसाधक शक्ती निष्प्रभ बनल्या आणि दोन गटांतील मतभेद मिटवील अशी योजना बनवण्याचे सारे श्रम निष्फळ ठरले.'[१]

राष्ट्रसभेचे एकमेव प्रतिनिधि म्हणून गोलमेज–परिषदेसाठीं महात्मा गांधींना पाठवण्यांत आलें. ब्रिटिश हिंदुस्थानांतून सरकारनें जे प्रतिनिधी निमंत्रित केले होते, त्यांत अनेक मुसलमान होते. पण डॉ० अन्सारींना निमंत्रण देण्याची महात्मा गांधींनीं केलेली सूचना मात्र सरकारनें फेटाळून लावली. गोलमेज–परिषदेनें ज्या अनेक समित्या नेमल्या त्यांत अल्पसंख्याक–समिति म्हणून एक समिति असून अल्पसंख्याकांचे प्रश्न तिच्या हवालीं करण्यांत आले होते. परंतु सर्वसंमत अशी कोणतीहि योजना करण्यांत तिला यश आलें नाहीं. त्यामुळें अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत, त्याचप्रमाणें इतर अनेक प्रश्नांबाबत कोणताहि अंतिम निर्णय न घेतांच दुसरी गोलमेज–परिषद बरखास्त झाली. परंतु या अपयशाचें कोणत्याहि हिंदी इसमाला आश्चर्य वाटलें नाहीं. पडद्याआडून सूत्रेंच अशीं हालवण्यांत येत होतीं कीं, कोणत्याहि प्रकारची तडजोड होणें अशक्य व्हावें. मि. एड्वर्ड् थॉम्प्सन् लिहितातः 'गोलमेज–परिषदेच्या वेळीं हटवादी मुसलमान व कांहीं टराविक लोकसत्ताद्वेषी ब्रिटिश कंपू यांच्यामध्यें सहज नजरेला येण्यासारखें मेतकूट जमलें होतें. या संगनमतामुळेंच प्रगतीच्या मार्गांत खरे अडथळे येत असतात, असें हिंदुस्थानांतले लोक वारंवार सांगत आलेले आहेत. त्यांचें हें म्हणणें खरें असल्याचें पुराव्यानिशीं सिद्ध करतां येईल असें मला वाटतें. पूर्वीं हिंदुस्थानमध्यें आपण 'फोडा व झोडा' या नीतीप्रमाणें वागत असूं याबद्दल शंकाच नाहीं. हिंदु–मुसलमानांच्या झगडयांमुळें मनांत फुटणाऱ्या आनंदाच्या उकळ्या वॉरन् हेस्टिंग्ज्च्या काळापासून होऊन गेलेल्या इंग्रजांनीं कधींच लपवण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. हे झगडे ब्रिटिशांच्या दृष्टीनें फार मोलाचे आहेत ही गोष्ट

---

१. १९३१ सालचें ॲन्युअल् रजिस्टर, पृ. ३०५.

एल्फिन्स्टन्, माल्कम् व मेट्कॉफ् यांच्यासारख्या पुरुषांनीं देखील मान्य केलेली आहे.'[१]

दुसऱ्या गोलमेज–परिषदेचा उपसंहार करीत असतां रॅम्से मॅक्डोनल्ड् यांनीं असें जाहीर केलें कीं, 'जबाबदार संयुक्त राज्यघटनेच्या तत्त्वाला ब्रिटिश सरकारनें दिलेली मान्यता कायम आहे. संधिकाळांत कांहीं संरक्षक बंधनें व कांहीं राखीव विषय ठेवण्यांत येतील; परंतु गव्हर्नरांच्या अधिकारांतील प्रांतांमधील कारभारांत जास्तींत जास्त स्वातंत्र्य देण्यांत येईल; त्यांत बाहेरून ढवळाढवळ करण्यांत येणार नाहीं; सरहद्द प्रांताला इतर गव्हर्नरांच्या प्रांतांप्रमाणेंच दर्जा देण्यांत येईल. राज्यकारभाराला लागणाऱ्या पैशांची सोय झाली, तर सिंध प्रांत वेगळा करण्यांत येईल. जातीय प्रश्नाबाबत त्यांनीं असें सांगितलें कीं, जातीय प्रश्न हा प्रगतीच्या मार्गांतील मोठ्यांत मोठें विघ्न आहे. पण बादशहांच्या सरकारचा असा निश्चय झालेला आहे कीं, प्रगतीचा मार्ग या उणीवेमुळें अडूं देतां कामा नये. याचा अर्थ असा कीं, बादशहांच्या सरकारला तुमच्या प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाचाच नव्हे, तर राज्यघटनेमध्यें कोणते पासंग व कोणतीं नियंत्रणें घालून ठेवावयाचीं त्या प्रश्नाचाहि निवाडा करावा लागणार आहे; आणि केवळ बहुमतवाल्यांच्या शक्तीच्या द्वारा प्रकट होणाऱ्या लोकसत्तेच्या अनियंत्रित व जुलमी वापरापासून अल्पसंख्याकांचा बचावहि बादशहांच्या सरकारलाच करावा लागणार आहे.'[२]

ही घोषणा झाल्यानंतर जातीय निवाडा ब्रिटिश सरकारकडून प्रसिद्ध होणें क्रमप्राप्तच ठरलें. १९३२च्या ऑगस्टांत तो प्रसिद्ध करण्यांत आला. प्रांतिक कायदेमंडळांमधील ब्रिटिश हिंदुस्थानांतील जातींच्या प्रतिनिधित्वापुरतीच या योजनेची व्याप्ति बुद्धिपुरःसर मर्यादित करण्यांत आलेली होती; मध्यवर्ति विधिमंडळांतील प्रतिनिधित्वांत हिंदी संस्थानांच्या प्रश्नाचा अंतर्भाव होत असल्यामुळें व त्याबद्दल अधिक विचार करणें अवश्य वाटल्यामुळें तत्संबंधींचा

---

१. एड्वर्ड् थॉम्प्सन् : एन्लिस्ट् इंडिया फॉर फ्रीडम्, पृ. ५०.

२. ॲन्युअल् रजिस्टर, खंड २ रा, १९३१, पृ. ४४६.

निर्णय तहकूब ठेवण्यांत आला होता. उमेद अशी होती कीं, प्रतिनिधित्वाच्या पद्धतीविषयीं व प्रमाणाविषयीं एकदां घोषणा केली, कीं मग जातीय प्रश्नाचा उलगडा करण्याचा मार्ग त्या जाती स्वतःच शोधून काढतील. नवीन सुधारणा–कायदा पार्लमेंटांत मंजूर होण्यापूर्वी सरकारला जर असें दिसून आलें कीं, जातींनीं आपल्याला संमत अशी एक निराळी योजना बनवली आहे, तर जातीय निवाड्याच्या ऐवजीं ती योजना मान्य करण्याची शिफारस सरकार पार्लमेंटला करील. या जातीय निवाड्यान्वयें मुसलमान, युरोपियन व शीख यांना स्वतंत्र मतदारसंघांमार्फत आपल्या जातींचे प्रतिनिधी निवडण्याचा हक्क बहाल करण्यांत आला होता. मुंबईच्या कांहीं विशिष्ट सर्वसाधारण मतदार-संघांत मराठ्यांसाठीं राखीव जागा ठेवण्यांत आल्या होत्या. दलितवर्गाला दिलेल्या जागांसाठीं खास मतदारसंघांतून प्रतिनिधी निवडण्यांत यावयाचे होते. दलितवर्गीयांनाच त्यांच्यासाठीं मतें देण्याचा अधिकार होता. त्या-व्यतिरिक्त सर्वसाधारण मतदारसंघांतून मतें देण्याचाहि अधिकार दलितवर्गी-यांना देण्यांत आलेला होता. इंडियन–ख्रिश्चन व अँग्लो–इंडियन यांनाहि राखीव जागा व स्वतंत्र जातीय मतदारसंघ देण्यांत आले होते. बऱ्याच जागा स्त्रियां-साठीं राखून ठेवण्यांत आल्या होत्या व त्यांची जातवार वांटणी केलेली होती. मजूर–मतदारसंघांतून निवडावयाच्या मजूर–प्रतिनिधींच्या वेगळ्या जागा होत्याच. व्यापार व उद्योगधंदे, खाणी व मळे यांच्याकरतां स्वतंत्र जागा ठेवण्यांत आलेल्या होत्या. जमीनदारांचाहि स्वतंत्र मतदारसंघ करण्यांत आला होता व त्यांच्याकरतां राखीव जागा होत्याच. म्हणजे लोकसंख्येचे जातवार विभाग करण्याचें मोर्ले–मिंटो सुधारणेंतलें जें तत्त्व होतें, त्याचा बराच विस्तार करण्यांत आला होता आणि मॉंटेग्यू–चेम्स्फर्ड् सुधारणांच्या मर्यादादेखील ओलांडण्यांत आल्या होत्या, हें यावरून दिसून येईल. '१९१९सालीं मत-दारांचे दहा तुकडे करण्यांत आले होते; या कायद्यानुसार आतां त्यांचीं सतरा छकलें करण्यांत आलीं. स्त्रियांची व ख्रिश्चनांची इच्छा नसतांहि त्यांच्या माथीं स्वतंत्र मतदारसंघ लादण्यांत आले. दलितवर्गीयांना सवतें प्रतिनिधित्व बहाल

करून हिंदुसमाजाला अधिकच दुर्बल करण्यांत आलें. धर्म, धंदा व नोकरी यांच्या आधारें गट पाडण्यांत आले. समाजाचीं शक्य तेवढीं खांडोळीं करण्यांत आलीं.'[१]

विविध जातींमध्यें जागांची जी वांटणी करण्यांत आली होती, तीदेखील कांहीं कमी विलक्षण नव्हती. जातिविषयक प्रत्येक चर्चेच्या वेळीं बंगाल व पंजाब प्रांतांची समस्या निर्माण होतेच. या दोन्ही प्रांतांत मुसलमान बहुसंख्य आहेत; पण त्यांचें आधिक्य फारच अल्प आहे. त्यांचें लोकसंख्येंतील प्रमाण शेंकडा सुमारें ५५ टक्के पडतें. दोन्ही प्रांतांमध्यें आपण बहुसंख्य असलों, तरी आपणांसाठीं स्वतंत्र मतदारसंघ व त्याचप्रमाणें राखीव जागा देण्यांत याव्यात अशी मुसलमानांच्या तर्फे मागणी करण्यांत आली होती. बंगालमधील युरोपियनांनाहि भरमसाट जादा जागा देण्याची ब्रिटिश सरकारची इच्छा असल्याकारणानें तेथील परिस्थिति बिकट होऊन बसली. इकडे पंजाबांत बिगर मुसलमानांत हिंदू व शीख असे दोन गट पडत होते. स्वतंत्र मतदारसंघांचें व राखीव जागांचें तत्त्व स्वीकारण्यांत येणार असेल, तर शीख हीदेखील एक महत्त्वाची अल्पसंख्य जमात असल्याकारणानें इतर प्रांतांत ज्याप्रमाणें अल्पसंख्य मुसलमानांना जादा जागा देण्यांत आलेल्या आहेत, त्याचप्रमाणें पंजाबांतहि शिखांना जादा जागा देण्यांत आल्या पाहिजेत, असा आग्रह शिखांनीं धरला. बंगाल व पंजाब प्रांताव्यतिरिक्त इतर प्रांतांत मॉंटेग्यू–चेम्स्‌फर्ड् सुधारणा–कायद्यान्वयें मुसलमानांना जितक्या जागा देण्यांत आल्या होत्या, तेवढ्या जागा थोड्याफार फरकानें, जातीय निवाड्यांतहि देण्यांत आल्या. बंगालमधील एकंदर लोकसंख्येंत हिंदूंचें प्रमाण ४४·८ इतकें होतें. त्यांना एकंदर २५० जागांपैकीं ८० जागा म्हणजे शेंकडा फक्त ३२ टक्के जागा देण्यांत आल्या. ५४·८ टक्के लोकसंख्या असणाऱ्या मुसलमानांना ११९ जागा म्हणजे शेंकडा ४७·६ टक्के जागा मिळाल्या; आणि ०१ टक्का शिरगणती असणाऱ्या युरोपियनांना २५ म्हणजे शेंकडा १० टक्के जागांचें दान करण्यांत आलें! म्हणजे बहुसंख्य

---

१. मेहेता–पटवर्धन : पृ. ७२.

मुसलमानांना अल्पसंख्य बनवलें, अल्पसंख्य हिंदूंना न्यायानें जें मिळावयाचें तेंहि दिलें नाहीं; आणि ही लुबाडणूक कशाकरतां, तर युरोपियनांना त्यांच्या वास्तविक वांटणीपेक्षां २,५०,००० पट अधिक जागा देण्यासाठीं. मुसलमान व हिंदू या दोघांच्याहि प्रतिनिधित्वांत जातीय निवाड्यामध्यें कपात करण्यांत आली असली, तरी त्यांतल्या त्यांत हिंदूंचें नुकसान झालेलें आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. याचा अर्थ असा कीं, बंगालमधील अत्यल्पसंख्य युरोपियनांना ज्या जादा जागा देण्यांत आल्या, त्या फक्त बहुसंख्याकांच्या जागांमध्येंच घट करून देण्यांत न येतां दुसऱ्या एका अल्पसंख्याक जमातीला लुबाडून देण्यांत आल्या. म्हणजे तेथील अल्पसंख्याकांना हक्काच्या जादा जागा मिळण्याचें तर बाजूसच राहिलें, पण त्यांना बहुसंख्याक जमातीच्या मानानें अधिक प्रमाणांत नुकसान मात्र सोसावें लागलें. पंजाब प्रांतामध्यें देखील हिंदूंना अल्पसंख्य म्हणून न्याय्यतः अधिक जागा मिळणें जरूर होतें. परंतु तेथेंहि शिखांना जादा जागा देतां याव्यात, म्हणून हिंदूंच्या प्रतिनिधित्वामध्यें काट मारण्यांत आली. त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या दोन्ही प्रांतांतील कायदेमंडळांमध्यें मुसलमानांचा गट सर्वांत मोठा असला आणि स्वतंत्र मतदारसंघातर्फे त्यांच्या राखीव जागांचे प्रतिनिधी निवडण्यांत येत असले, तरी विधिमंडळांतील एकंदर जागांच्या मानानें पाहिलें, तर त्यांना अल्पसंख्याकांचाच दर्जा प्राप्त झालेला आहे. बहुसंख्य वस्ती असलेल्या प्रांतांप्रमाणेंच अल्पसंख्य वस्ती असलेल्या प्रांतांमध्येंहि जागांच्या बाबतींत घस सोसावी लागल्यामुळें जातीय निवाडयावर हिंदूंनीं कडाडून हल्ला चढवला असल्यास नवल काय ? बंगालमध्यें तर बहुसंख्य जमातीला कराव्या लागलेल्या त्यागाच्या जवळजवळ दुप्पट त्याग हिंदूंना करावा लागला होता. तेव्हां जातीय निवाडयाला विरोध होणार याची कल्पना सरकारला होतीच. निवाडयासंबंधीं सरकारी पत्रकांत असें म्हटल होतें कीं, 'प्रतिवादीला मान्य होईल त्याहून वादीची प्रतिनिधित्वाबद्दलची मागणी जितक्या प्रमाणांत अधिक होती, तितक्या प्रमाणांत तिच्यांत घट होणें निवाडा देतांना अपरिहार्यच होतें. खरी गोष्ट अशी

आहे कीं, निवाडा जितका अधिक न्याय्य व रास्त करावा, तितका तो सर्व पक्षांना निराशाजनक वाटण्याचा संभव आहे. पण या वादांत ब्रिटिश सरकारचे हितसंबंध मुळींच गुंतलेले नसल्याकारणानें आणि सर्वांच्या अधिकांत अधिक हिताची दृष्टि डोळ्यांसमोर ठेवूनच हा अति बिकट प्रश्न सोडवण्यासाठीं ते हा निवाडा करीत असल्यामुळें, ज्या निर्मळ बुद्धीनें तो देण्यांत येत आहे त्याच निर्मळ बुद्धीनें हिंदी लोक त्याचा स्वीकार करतील, आणि प्रामाणिकपणें त्याची अंमलबजावणी करतील अशी आशा आहे. अखेरीस हेंहि सांगून ठेवण्यास हरकत नाहीं कीं, सुधारणा—कायदा मंजूर होण्यापूर्वी या निवाड्याहून भिन्न अशी जर एखादी योजना हिंदुस्थानांतील विविध जातींनीं आपसांत मान्य केली, तर ती खुषीनें स्वीकारण्यांत येईल असें आश्वासन भारतमंत्र्यांकडून देण्यांत आलेलें आहे.'

या वादांत ब्रिटिश सरकारचे हितसंबंध मुळींच गुंतलेले नाहींत, येवढें मात्र खरें ! त्यामुळेंच तर हरएक प्रांतांत त्यांनीं हिंदूंवरच शिस्त धरली, त्यामुळेंच त्यांनीं बंगाल प्रांतांत हिंदू अल्पसंख्य असूनहि त्यांच्या जागा छिनावून घेतल्या. मुसलमानांच्यापेक्षांहि अधिक प्रमाणांत त्यांना घस सोसण्यास लावलें, आणि तें देखील युरोपियनांना २,५०,००० पट अधिक प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठीं ! इतर प्रांतांमध्यें मुसलमानांना जेवढ्या प्रमाणांत जादा जागा देण्यांत आल्या होत्या, तेवढ्या प्रमाणांत पंजाबमध्यें शिखांना जागा देण्यास सरकारनें नकार दिला, आणि बहुसंख्य मुसलमान वस्ती असणाऱ्या प्रांतांतसुद्धां केवळ स्वतंत्र मतदारसंघच नाहीं, तर जोडीला राखीव जागादेखील मुसलमानांना देण्याचें धोरण सरकारनें ठेवलें तेंदेखील या निःस्वार्थीपणामुळेंच. जातीय सलोखा अशक्य करून टाकणारी परिस्थिति निर्माण करून ठेवल्यानंतर सरकारनें साळसूदपणें आश्वासन देऊन ठेवलें कीं, परस्परांच्या संमतीनें सर्व जातींनीं दुसरी एकादी योजना तयार केल्यास आपण ती आनंदानें मान्य करूं !

ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें या दोहोंमध्यें १९३५ च्या कायद्यामुळें संस्थानिकांच्या बाजूनें पक्षपात झालेला आहे. हिंदुस्थानच्या लोकसंख्येपैकीं

फक्त २३ टक्के लोकसंख्या संस्थानांत आहे. पण संयुक्त राज्यांतल्या कनिष्ठ विधिमंडळांत २३ टक्के व वरिष्ठ विधिमंडळांत ४० टक्के जागा संस्थानिकांना बहाल करण्यांत आलेल्या आहेत. म्हणजे संस्थानिकांचा आडोसा घेऊन संयुक्त राज्याच्या कनिष्ठ विधिमंडळांमध्येंहि सरकारनें ३३ टक्के प्रतिनिधींचा एक सरकारनियुक्त गट घुसडून देण्याची युक्ति शोधून काढली आहे! एका हातानें दिलेलें दान दुसऱ्या हातानें हिरावून घेण्याची याहून नामी युक्ति शोधूनहि सांपडणें कठिण.

जातीय निवाडा प्रसिद्ध झाल्यानंतरहि देशांत जातीय तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला आणि तो जवळजवळ सिद्धीसहि गेला होता. पण सरकारनें पुन्हां ढवळाढवळ केल्याकारणानें तो यशस्वी होणें अशक्य कसें झालें, तें पुढील वृत्तान्तावरून समजून येईल. १६ ऑगस्ट् १९३२ रोजीं जातीय निवाडा प्रसिद्ध करण्यांत आला. तदनंतर महात्मा गांधींनीं उपोषण केलें आणि पुणें—कराराप्रमाणें दलितवर्गीयांचे बाबतचा जातीय निवाड्यांतला निर्णय फिरवून घेतल्यावर पंडित मालवीय व मौलाना शौकत अली यांच्यामध्यें जातीय निवाड्याच्या ऐवजीं दुसरी एकादी योजना तयार करण्याविषयीं पत्र-व्यवहार सुरू झाला. प्रारंभींचीं बोलणीं आशादायक वाटत होतीं. महात्मा गांधींना सोडण्यांत यावें, निदानपक्षीं, वाटाघाटी करण्यासाठीं त्यांच्या मुलाखती घेण्याची तरी संधि देण्यांत यावी, अशा अर्थाची विज्ञप्ति शौकत अलींनीं व्हाइसरॉय यांना ऑक्टोबर ६ ला केली. लगेच दुसऱ्या दिवशीं मुस्लिम सर्व—पक्षीय परिषदेच्या अध्यक्षांच्या वतीनें एक निवेदन अशा अर्थी प्रसिद्ध करण्यांत आलें कीं, संयुक्त विरुद्ध स्वतंत्र मतदारसंघांचा प्रश्न पुन्हां चर्चेला घेणें अप्रस्तुत आहे आणि विभक्त मतदारसंघाचा हक्क सोडून देण्यास मुसलमान-समाज सिद्ध होणार नाहीं. परंतु, बहुसंख्य जमातीनें जिव्हाळ्याच्या सर्व प्रश्नांचा समावेश करणाऱ्या कांहीं निश्चित सूचना पुढें मांडण्यांत पुढाकार घेतल्यास, त्यांचा विचार करण्याची मुसलमानांची तयारी आहे. हें निवेदन सिमल्याहून काढण्यांत आलें होतें. ९ ऑक्टोबरला व्हाइसरॉयच्या खाजगी चिटणिसांनीं

मौलाना शौकत अलींना तारेनें असा जबाब पाठवला कीं, 'आपण जी गोष्ट करूं पाहात आहांत, तिला सर्व मुसलमान समाजाचा पाठिंबा मिळेल याची तुम्हीं प्रथम खात्री करून घ्यावयास हवी. या बाबतींत तुमचें लक्ष मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेच्या अध्यक्षांनीं व इतरांनीं ७ ऑक्टोबरला काढलेल्या निवेदनाकडे वेधण्यांत येत आहे.'[1] मौलाना शौकत अलींच्या ६ तारखेच्या तारेला व्हाइसरॉयांच्या खाजगी चिटणिसांनीं हें ७ तारखेचें निवेदन प्रसिद्ध होईपर्यंत उत्तरच पाठवलें नाहीं, आणि ९ तारखेला पाठवलेल्या उत्तराच्या तारेंत या निवेदनाचा मुद्दाम उल्लेख केला हें स्पष्टच आहे. पुढें २६ ऑक्टोबर रोजीं जेव्हां मौलाना शौकत अलींनीं पुन्हां एकवार विनंति केली आणि सर्वांना हितकारक असा सलाखा घडवून आणण्यासाठीं व्हाइसरॉयनीं जातीय प्रश्नाशीं संबंध असलेल्या व्यक्तींपाशीं आपलें वजन खर्च करावें असें सुचवलें, तेव्हां त्या विनंतीला दुसऱ्याच दिवशीं तडकाफडकीं उत्तर असें देण्यांत आलें कीं, सविनय कायदेभंगाचा मार्ग श्री० गांधी जोंपर्यंत निश्चितपणें सोडून देणार नाहींत, तोंपर्यंत मौलानांच्या विनंतीला रुकार देतां येणार नाहीं. गांधीजींच्या भेटी घेऊं देण्याबद्दल यानंतर कलेल्या विनंत्यांना असें उत्तर मिळालें कीं, ऑक्टोबरच्या २७ तारखेला जें पत्र प्रसिद्ध झालें, त्याचा अर्थ मुलाखतींची परवानगी देण्यांत येणार नाहीं असाच होता.

सरकारच्या या वृत्तीमुळें नाउमेद न होतां एक सर्वपक्षीय मुस्लिम परिषद लखनौ मुक्कामीं १६ ऑक्टोबर १९३२ रोजीं भरवण्यांत आली व हिंदूंच्या आणि शिखांच्या प्रतिनिधींबरोबर वाटाघाटी करण्यासाठीं परिषदेतर्फे एक समिति नेमण्यांत यावी, या पंडित मदनमोहन मालवीय यांच्या सूचनेचा एकमतानें स्वीकार करण्यांत आला. येवढ्यावरच न थांबतां जातीय प्रश्नाचा निकाल एकमतानें लावण्याच्या दृष्टीनें वाटाघाटी करण्यासाठीं एका समितीची नेमणूकहि परिषदेनें करून टाकली. १९३२ नोव्हेंबरच्या ३ ऱ्या तारखेपासून अलाहाबाद मुक्कामीं ऐक्य परिषदेच्या बैठकींना प्रारंभ झाला. ६३ हिंदू, ११ शीख,

१. ॲन्युअल् रजिस्टर, १९३२, खंड २ रा, पृ. २८१–८२.

३९ मुसलमान व ८ हिंदी–खिश्चन परिषदेच्या बैठकीला आले होते. तडजोड घडवून आणण्यासाठीं व परिषदेला अहवाल सादर करण्यासाठीं परिषदेनें दहा जणांची एक समिति नेमली. या समितीच्या बैठकी रोज भरत असत. ज्या मुद्यांबाबत मतभेद झालेले होते किंवा होण्यासारखे होते, त्यांच्यापैकीं बहुतेक मुद्यांवर समितीनें ठराव केले. अत्यंत वादग्रस्त अशा पंजाबच्या व बंगालच्या प्रश्नांवर देखील हिंदु–मुसलमानांपुरती तडजोड घडून आली. शेंकडा ५१ टक्के जागा मुसलमानांसाठीं राखून ठेवाव्यात आणि त्यांची निवड संयुक्त मतदार–संघातर्फे व्हावी या गोष्टीला हिंदूंनीं मान्यता दिली. शेषाधिकार मध्यवर्ति सरकारकडे असावेत कीं घटक राष्ट्रांना ते द्यावेत, या प्रश्नावरहि एक सर्व-मान्य असा मसुदा तयार करण्यांत आला. दुसरा एक ठराव असा होता कीं, संयुक्त मतदारसंघ मान्य करावा; पण उमेदवारांनीं त्यांच्या जातीच्या मतदाना-पैकीं किमान ३० टक्के मतें तरी मिळवलेलीं असलीं पाहिजेत. तसें न झाल्यास ज्या उमेदवारांना त्यांच्या जातीपैकीं अधिकांत अधिक मतें मिळालेलीं असतील ते निवडून आले असें मानण्यांत येईल. मध्यवर्ति कायदेमंडळामध्यें मुसल-मानांना बत्तीस टक्के प्रतिनिधित्व मिळावें असेंहि सर्वानुमतें ठरलें. कांहीं मुद्यांबाबत दोन्ही पक्षांना घस सोसावी लागली, तर कांहीं बाबतींत त्यांचा फायदा झाला.

पण एक मुद्दा असा राहिला होता कीं, ज्याच्याविषयीं नुसत्या हिंदु-मुसलमानांत एकमत होऊन भागणारें नव्हतें. तो मुद्दा म्हणजे बंगालमध्यें युरोपियनांना देण्यांत आलेल्या भरमसाट जादा प्रतिनिधित्वाचा. परिषदेंत जी तडजोड झालेली होती, तदनुसार हिंदु–मुसलमानांना मिळून ९५·७ टक्के जागा मिळाव्यात असें ठरलें होतें. अर्थात् युरोपियनांना देण्यांत आलेल्या १० टक्के जागा त्यांच्या पदरांत पडणें शक्यच नव्हतें. तेव्हां हिंदु–मुसलमानांनीं कलकत्त्याला जाऊन युरोपियनांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा करावी असें ठरून अलाहाबादेच्या अधिवेशनानंतर परिषद तहकूब करण्यांत आली.

मध्यवर्ति कायदेमंडळांतील मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न जातीय

निवाड्यामध्यें अनिर्णित ठेवण्यांत आलेला होता आणि पुरेसा पैसा उभा करणें शक्य झाल्यास सिंध प्रांत अलग करावा असें सशर्त विधान त्यांत केलेलें होतें, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. युरोपियनांच्या बरोबर वाटाघाटी करण्यासाठीं मुसलमान प्रतिनिधींसमवेत इकडे पंडित मालवीय कलकत्त्याकडे निघाले असतां, तिकडे मुसलमानांना ३३⅓ टक्के जागा मध्यवर्ति कायदेमंडळांत देण्याचा व सिंध प्रांत वेगळा करून त्याला मध्यवर्ति सरकारच्या तिजोरींतून खर्चासाठीं पैसा पुरवण्याचा बादशहांच्या सरकारनें निर्णय घेतला आहे असें सर सॅम्युअल् होअर् यांनीं घोषित केलें व पंडित मालवीय व मुसलमान प्रतिनिधी यांच्यावर मात केली. कित्येक आठवडे विचारमंथन करून महत्प्रयासानें हिंदु, मुसलमान, शीख, खिश्चन व इतर गट यांच्यामध्यें सर्व बाबतींत ऐकमत्य घडवून आणण्याचें जें कार्य ऐक्य—परिषदेनें केलें होतें, तें सर सॅम्युअल् होअर् यांच्या ऐन वेळच्या वक्तव्यानें धुळीस मिळालें. कितीहि न्याय्य तडजोड घडवून आणली, तरी तिच्याविरुद्ध आक्षेप घेणारा एकादा तरी गट जोंपर्यंत उभा करणें शक्य आहे, आणि कोणतीहि सर्वमान्य योजना केली, तरी तिच्यापेक्षां सरस अटी देण्यास ब्रिटिश सरकार जोंपर्यंत तयार आहे, तोंपर्यंत सर्व पक्षांत ऐकमत्य होण्याची अपेक्षा धरणेंच फोल होय.

## १५. वाढते मतभेद

जातीय निवाड्यानें दलितवर्गाला देखील स्वतंत्र मतदारसंघ व राखीव जागा दिलेल्या होत्या हें आपण पाहिलेंच. पण महात्मा गांधींच्या उपवासामुळें तें कलम सुधारण्यांत आलें. जातीय निवाडयानुसार देण्यांत आलेल्या जागांपेक्षां किती तरी अधिक जागा दलितवर्गीयांना मिळाल्या व त्यांच्या निवडणुकीसाठीं एक खास पद्धति मुक्रर करण्यांत आली. उभय पक्षांना सम्मत अशी एकादी योजना राज्यघटनेला कायद्याचें स्वरूप प्राप्त होण्यापूर्वीं करण्यांत आली, तर जातीय निवाडयांत बदल करण्यांत येईल असें जें वचन देण्यांत आलेलें होतें, तदनुसार वरील फेरफार करण्यांत आला. अलाहाबादेच्या ऐक्य-

परिषदेचा हेतूदेखील हाच होता कीं, मुसलमान व इतर जमाती यांच्यामध्यें तडजोडीची योजना घडवून आणून तिच्याप्रमाणें जातीय निवाड्यामधील मुसलमानांच्यासंबंधींचीं कलमें बदलून घ्यावयाचीं. ऐक्य–परिषदेचे हे प्रयत्न यशस्वी होण्याच्या बेताला आले असतां सर सॅम्युअल् होअरनीं सुरुंग लावून त्यांच्या कशा चिंधड्या उडवल्या तें आपण वाचलेंच. पण त्यामुळें जातीय निवाड्याला असलेला हिंदूंचा व शिखांचा विरोध मावळला नाहीं. सुधारणा–कायद्याचें एरंडाचें गुऱ्हाळ पार्लमेंटांत चालू होतें आणि इकडे जातीय निवाड्याच्या विरोधकांचें सामर्थ्य वाढत चाललें होतें. जातीजातींमध्यें सलोखा न झाला, तरी त्यामुळें सुधारणा–कायद्याचा मार्ग रोखला जाणार नाहीं, अशी घोषणा ब्रिटिश सरकारनें करून ठेवलेली असल्याकारणानें त्यांनीं १९३२ च्या ऑगस्टांत जातीय निवाडा प्रसिद्ध करून टाकला. पण सुधारणा–कायदा पार्लमेंटांत पसार होईपर्यंत तीन वर्षें गुजरून १९३५ चा जून महिना उजाडला. दरम्यान राष्ट्रसभा आणखी एका लढ्याच्या दिव्यांतून पार झाली होती. आपलें मत व्यक्त करण्याची मोकळीक तिला जेव्हां मिळाली, तेव्हां जातीय निवाड्याबाबतचा हिंदु–मुसलमानांतील तीव्र मतभेद पाहून तिनें त्या निवाड्याला होकार अथवा नकार यांपैकीं कांहींच न देण्याचें, मुंबई येथील १९३४ ऑक्टोबरच्या आपल्या अधिवेशनांत ठरवलें. नंतर कांहीं आठवड्यांनीं जेव्हां मध्यवर्ति विधिमंडळाच्या निवडणुकी सुरू झाल्या, तेव्हां राष्ट्रसभेनें जातीय निवाड्याबाबत स्वीकारलेलें हें तटस्थतेचें धोरण साहजिकच टीकेचा विषय बनलें. बहुतेक प्रांतांमध्यें राष्ट्रसभेचे उमेदवार यशस्वी झाले. बंगालमधील सभासदांना मात्र राष्ट्रसभेच्या कार्यक्रमांतले इतर मुद्दे मान्य असले, तरी जातीय निवाड्याबाबत स्वतःला पटेल ती भूमिका स्वीकारण्याची मुभा देण्यांत आली होती. जातीय निवाड्याबद्दल माजलेली वादाळी व सरकारची नीति यांचा साहजिक परिणाम जातींमध्यें बेबनाव होण्यांत झाला. १९३५ सालीं राष्ट्रसभेचे अध्यक्ष व मुस्लिम लीगचे अध्यक्ष यांच्या दरम्यान तडजोड घडवून आणण्याचा पुन्हां एक प्रयत्न झाला, पण तो यशस्वी ठरला नाहीं.

१९३५ च्या जूनमध्यें हिंदुस्थान सरकारचा नवा कायदा पास झाला आणि तदनुसार १९३७ च्या प्रारंभीं निवडणुकी करण्यांत आल्या. अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या १९३६ च्या एप्रिलमध्यें मुंबई येथें भरलेल्या अधिवेशनांत हिंदी जनतेच्या इच्छेविरुद्ध तिच्या गळ्यांत हें राज्यघटनेचें लोढणें अडकवण्याचा जोरदार निषेध करण्यांत आला. राज्यघटनेच्या प्रांतांसंबंधींच्या भागांमध्यें अनेक आक्षेपार्ह कलमें असलीं व त्यांच्यामुळें मंत्रिमंडळांच्या आणि विधिमंडळांच्या अधिकारांना व जबाबदाऱ्यांना हरताळ फांसला गेलेला असला, तरी राज्यघटनेचा तो भाग राबवून त्यापासून जी कांहीं इष्ट प्राप्ति होईल तेवढी पदरांत पाडून घ्यावी; संयुक्त राज्यघटनेची योजना ब्रिटिश हिंदुस्थानाच्या दृष्टीनें अत्यंत प्रतिगामी, विपरीत, अपायकारक व घातुक असून संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति हें जें हिंदुस्थानचें प्रिय उद्दिष्ट, तें प्राप्त करून घेण्याची आशा याच्यामुळें अमर्यादित काळपर्यंत दुरावणार आहे, खंडित होणार आहे; त्याचप्रमाणें संयुक्त राज्यघटनेची ही योजना हिंदुस्थानच्या हितास्तव वापरणेंहि अशक्य आहे, इत्यादि विचार त्या ठरावांत व्यक्त केलेले होते. यावरून हें लक्षांत येईल कीं, संयुक्त राज्यघटनेचा निषेध मुसलमानांच्या हितसंबंधांना बाध येईल म्हणून करण्यांत आलेला नव्हता, तर हिंदुस्थानचें उद्दिष्ट तिच्यामुळें अमर्यादित काळपर्यंत लांबणीवर पडेल व ती राबवल्यापासून हिंदुस्थानचें कल्याण साधतां येणार नाहीं, या कारणांस्तव ती निषिद्ध ठरवण्यांत आलेली होती. लीगनें एक निवडणूक–मंडळ ( पार्लेमेंटरी बोर्ड ) नेमलें व त्यानें बनवलेल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्याच्या आधारें निवडणुकी लढवण्यांत आल्या. त्या जाहीरनाम्यांत असें म्हटलें होतें कीं : 'ठिकठिकाणच्या विधिमंडळांतील आमच्या प्रतिनिधींनीं ज्या प्रमुख तत्त्वांनुसार कार्य करावें अशी आमची अपेक्षा आहे तीं तत्त्वें अशीं : ( १ ) प्रस्तुतच्या प्रांतिक व मध्यवर्ति राज्यघटनांच्या ऐवजीं पूर्णपणें लोकसत्ताक अशा घटना ताबडतोब अमलांत याव्यात; ( २ ) तसें घडून येईपर्यंतच्या काळांत प्रांतोप्रांतींच्या विधिमंडळांतील लीगच्या प्रतिनिधींनीं राष्ट्रीय

जीवनाच्या विविध अंगांमध्यें जनतेच्या उद्धारार्थ चालू राज्यघटनेचा अधिकांत अधिक उपयोग करून घेत जावा. विभक्त मतदारसंघ विद्यमान् आहे तोंपर्यंत मुस्लिम लीगचा पक्ष अस्तित्वांत असणें क्रमप्राप्तच ठरत असलें, तरी लीगच्या ध्येयाशीं व उद्दिष्टांशीं सदृश अशीं ध्येयें व उद्दिष्टें असणाऱ्या दुसऱ्या एका किंवा अनेक गटांबरोबर मनमोकळें सहकार्य ती करीत जाईल. निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत जो कार्यक्रम देण्यांत आला होता, त्यांत मुसलमानांसंबंधींचे खास असे दोनच मुद्दे होते: (अ) मुसलमानांच्या धार्मिक हक्कांचें संरक्षण करावें; व (ब) मुसलमानांची सर्वसाधारण परिस्थिति सुधारण्यासाठीं उपाययोजना करावी. दडपशाहीचे कायदे मागें घेणें, हिंदुस्थानच्या हिताला व जनतेच्या मूलभूत स्वातंत्र्याधिकारांना अपायकारक असणाऱ्या आणि देशाच्या पिळणुकीचीं साधनें बनणाऱ्या योजना फेटाळणें, राज्यकारभाराचा व लष्कराचा खर्च कमी करणें, उद्योगधंद्यांची वाढ करणें, देशहिताला पोषक होईल अशा प्रकारें चलनाचें व चलनविनिमयाचें नियंत्रण करणें, ग्रामीण जनतेची सुधारणा करणें इत्यादि जे इतर मुद्दे जाहीरनाम्यांत समाविष्ट होते, ते धर्मातीत अशा सार्वजनिक बाबींसंबंधींचे मुद्दे होते. निवडणुकींच्या वेळीं सर्व प्रांतांतल्या मुसलमानांच्या जागांसाठीं लीगनें उमेदवार उभे केले नाहींत. जेथें केले, तेथें ती फारशी यशस्वी झाली नाहीं. उलट, राष्ट्रसभेनें बहुतेक सर्व–साधारण बिगर–मुसलमान जागांसाठीं व थोड्याशा मुसलमान जागांसाठीं आपल्यातर्फे उमेदवार उभे केले होते. निवडणुकींचा निकाल पुढीलप्रमाणें लागला:

### कोष्टक २.

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| प्रांत | एकंदर जागा | राष्ट्रसभेला मिळालेल्या जागा | मुसलमानांसाठीं एकंदर जागा | लीगनें मिळवलेल्या जागा | इतर मुस्लिम गटांनीं मिळवलेल्या जागा |
| मद्रास | २१५ | १५९ | २८ | ११ | १७ |
| मुंबई | १७५ | ८६ | २९ | २० | ९ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| बंगाल | २५० | ५४ | ११७ | ४० | ७७ |
| सं. प्रांत | २२८ | १३४ | ६४ | २७ | ३७ |
| पंजाब | १७५ | १८ | ८४ | १ | ८३ |
| बिहार | १५२ | ९८ | ३९ | — | ३९ |
| मध्यप्रांत | ११२ | ७० | १४ | — | १४ |
| सरहद्द प्रांत | ५० | १९ | ३६ | — | ३६ |
| आसाम | १०८ | ३३ | ३४ | ९ | २५ |
| ओरिसा | ६० | ३६ | ४ | — | ४ |
| सिंध | ६० | ७ | ३६ | — | ३६ |
| एकंदर... | १५८५ | ७१४ | ४८५ | १०८ | ३७७ |

एकंदर प्रांतांपैकीं पांच प्रांतांत राष्ट्रसभेला बहुमत मिळाल्याचें वरील कोष्टकावरून दिसून येईल. मुंबई व सरहद्द प्रांतांमध्यें स्वतंत्रपणें निवडून आलेले कांहीं प्रतिनिधी राष्ट्रसभेला येऊन मिळाले आणि त्यामुळें बहुसंख्य होऊन राष्ट्रसभेला त्या दोन प्रांतांमध्येंहि आपलीं मंत्रिमंडळें बनवणें शक्य झालें. मुसलमानांची जेथें बहुसंख्या आहे अशा म्हणजे बंगाल, पंजाब, सरहद्द व सिंध या प्रांतांत देखील मुस्लिम लीगला बहुमत मिळालें नाहीं. इतकेंच नव्हे, तर मुसलमानांच्या राखीव जागांपैकीं सुद्धां बहुसंख्य जागा या प्रांतांपैकीं एकाहि प्रांतांत लीगला मिळवतां आल्या नाहींत. त्यामुळें इतर मुसलमान अथवा बिगर मुसलमानगटांबरोबर सहकार्य केल्यावांचून आपलें मंत्रिमंडळ बनवणें तिला शक्य नव्हतें. चार प्रांत तर असे होते कीं, ज्यांमध्यें लीगला एकदेखील जागा मिळाली नाहीं. पंजाबांत फक्त एकच जागा मिळाली होती. पुढें मंत्रिमंडळें बनवण्याची वेळ आली तेव्हां 'सनदशीर कार्यामध्यें मंत्र्यांचा सल्ला गव्हर्नरांकडून डावलण्यांत येणार नाहीं किंवा हस्तक्षेप करण्याचे आपले खास अधिकार ते वापरणार नाहींत, अशी विधिमंडळांतील राष्ट्रसभापक्षाच्या नेत्यांची खात्री होऊन तसें जाहीरपणें त्यांना सांगतां येणार

नसेल' तर मंत्रिमंडळें बनवण्यास आपण तयार नसल्याचें राष्ट्रसभेनें सांगितलें. गव्हर्नरांकडून तसें आश्वासन न मिळाल्याकारणानें राष्ट्रसभापक्षानें मंत्रिपदें स्वीकारलीं नाहींत. गव्हर्नरांच्या ज्या खास जबाबदाऱ्या समजण्यांत येत होत्या, म्हणजे ज्या बाबतींत गव्हर्नराला आपल्या स्वतःच्याच मुखत्यारींत, मंत्र्यांचें मत न घेतांच निर्णय घेण्याचा किंवा मंत्र्यांचा विचार घेतल्यानंतर स्वतःची तारतम्य बुद्धि चालवून निर्णय घेण्याचा अधिकार दिलेला होता, त्यासंबंधीं राष्ट्रसभेनें हें आश्वासन मागितलें होतें. 'प्रांतांच्या शांततेला, सुव्यवस्थेला भयंकर धोका निर्माण झाला असतां त्याचें निवारण करणें, अल्पसंख्याकांच्या न्याय्य हक्कांचें संरक्षण करणें, सनदी नोकर व त्यांचे अवलंबित यांच्या न्याय्य हितसंबंधांचें—यांत काय काय समाविष्ट होत असेल तें असो—रक्षण करणें, ब्रिटिश लोक व ब्रिटिश उद्योगधंदे यांच्याविषयीं पंक्तिप्रपंच करण्यांत येईल तर त्याचें निराकरण करणें, मागासलेल्या टापूंमध्यें शांतता व सुव्यवस्था राहील, संस्थानें व संस्थानिक यांच्या हक्कांचें रक्षण होईल, आणि गव्हर्नर जनरलनें आपल्या मुखत्यारींत दिलेल्या हुकमांची व आदेशांची अंमलबजावणी होईल अशी दक्षता राखणें, इत्यादि मुद्दे गव्हर्नरांच्या खास जबाबदाऱ्यांच्या सदरांत घातलेले होते. ही यादी पाहिली कीं, खास जबाबदाऱ्यांच्या कक्षेंत राज्यकारभाराचें सारेंच क्षेत्र समाविष्ट केलेलें आहे, हें सर सॅम्युअल् होअर यांचें विधान सार्थ आहे असें वाटूं लागतें.'[१]

अल्पसंख्याकांच्या हक्कांचें रक्षण करण्याची जबाबदारी ही सर्व राज्यकारभारांतल्या इतर अनेक बाबींतली एक बाब आहे, आणि 'अल्पसंख्याकां'मध्यें मुसलमान व इतर एतद्देशीय अल्पसंख्य जमातींबरोबरच हिंदुस्थानांतल्या इंग्रज लोकांचाहि समावेश करण्यांत आलेला आहे, हें ध्यानांत घेतलें पाहिजे. वस्तुस्थिति अशी असतां राष्ट्रसभेनें मागितलेलें आश्वासन देतां येणार नाहीं असें जाहीर करतांना भारतमंत्री लॉर्ड् झेट्लंड् यांनीं अल्पसंख्य जमातींच्या हिताविरुद्ध राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं कार्य सुरू केल्यास कोणती परिस्थिति

१. चिंतामणि व मसानी : इंडियाज् कॉन्स्टिटयूशन् अॅट् वर्क्, पृ. ९१–९२.

उद्‌भवेल याचें शब्दचित्र पुढीलप्रमाणें रेखाटलें होतें: 'मंत्रिमंडळानें अल्पसंख्याकांच्या शाळांच्या संख्येंत कपात केली तरी तें कृत्य राष्ट्रसभेच्या सूचनेप्रमाणें न्याय्य ठरेल आणि त्याला सदनशीर कार्यांत न मोडणारें कार्य असें म्हणतां यावयाचें नाहीं. यामुळें अल्पसंख्याकांचें रक्षण करण्याची मोकळीक गव्हर्नरांना राहाणार नाहीं. राज्यघटनेनुसार अशा तऱ्हेचीं कृत्यें करणें शक्य होईल याची जाणीव असल्यामुळेंच तर पार्लमेंटानें हीं संरक्षक बंधनें घालून ठेवलीं आहेत.'[१] अल्पसंख्याक जमातींविषयीं अशा प्रकारें केलेला उल्लेख सहेतुक करण्यांत आला होता आणि त्याचा हवा तोच परिणाम पुढें घडूनहि आला.

राष्ट्रसभेला केवळ आपल्याच मंत्रिमंडळांपुरतीं हीं आश्वासनें हवीं होतीं असें नव्हे. इतर प्रांतांमधील विधिमंडळांतल्या बहुसंख्य पक्षांना राष्ट्रसभेला पाठिंबा देऊन या आश्वासनांविषयीं आग्रह धरतां आला असता आणि मंत्रिमंडळांच्या सनदशीर कार्यामध्यें गव्हर्नराकडून होणारा हस्तक्षेप थांबवून राज्यकारभारावरचीं बंधनें बऱ्याच अंशीं ढिलीं करून घेतां आलीं असतीं. पण त्यांनीं तसें केलें नाहीं आणि आश्वासनें न मिळवतांच आपलीं मंत्रिमंडळें प्रस्थापित केलीं. परंतु राष्ट्रसभेनें धीर धरला. त्यानंतर जी चर्चा झाली तिच्यावरून असें दिसून आलें कीं, राष्ट्रसभेच्या मंत्र्यांच्या सनदशीर कार्यांत सहजासहजीं किंवा वारंवार ढवळाढवळ करणें शक्य होणार नाहीं. पण इकडे हा वाद चालू असतां तर्काला सोडून असणाऱ्या मुद्यांना राजकारणांत प्राधान्य कसें मिळतें, याचा विलक्षण अनुभव आला. राष्ट्रसभेनें मागितलेलीं आश्वासनें हीं सर्व लोकमतानुवर्ति मंत्रिमंडळांच्या हिताच्या दृष्टीनेंच मागण्यांत आलेलीं असून देखील तीं फक्त राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांच्याच मतलबासाठीं मागण्यांत येत आहेत, असें सांगण्यांत येऊं लागलें! राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें आपले अधिकार अल्पसंख्याकांच्या विरुद्ध वापरतील असा संभव आहे, अशी कळ भारतमंत्र्यांनीं लावली आणि आश्वासनें मागण्यांत राष्ट्रसभेचा हाच उद्देश असला पाहिजे असें म्हणून मुस्लिम लीगनें भारतमंत्र्यांच्या खोडसाळ विधानाला

---

१. चिंतामणि व मसानी : इंडियाज् कॉन्स्टिटयूशन् अॅट् वर्क्, पृ. १०६.

संमति दर्शविली! पण येवढ्यावरच लीग थांबली असें नाहीं. मुसलमान–अल्प-संख्याकांना दडपून टाकण्यासाठीं आपल्या अधिकारांचा उपयोग करतां यावा म्हणूनच राष्ट्रसभेनें आश्वासनांची मागणी केलेली होती, असें लीगचे प्रचारक म्हणत होते! अल्पसंख्याकांच्या हक्कसंरक्षणाव्यतिरिक्त राज्यकारभाराचें जें विस्तीर्ण क्षेत्र या आश्वासनांच्या कक्षेंत येत होतें, त्याच्याकडे लीगच्या या प्रचारकांनीं संपूर्णपणें दुर्लक्ष केलेलें होतें. वास्तविक घडून आलें तें असें कीं, राजीनामे देऊन किंवा राजीनामे देण्याची धमकी देऊन गव्हर्नरांना राष्ट्र-सभेच्या मंत्र्यांनीं आपल्या सल्ल्याबरहुकूम वागावयास लावण्याचे अनेक प्रसंग उद्भवले; परंतु राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं अल्पसंख्याकांच्या हक्कांवर गदा आणली व गव्हर्नराला त्या कृत्यास निरुपायानें सम्मति द्यावी लागली, असा प्रसंग चुकून एकदां देखील आला नाहीं.

दरम्यानच्या काळांत झालेल्या चर्चेनुसार १९३७च्या जुलैमध्यें जेव्हां राष्ट्र-सभेनें मंत्रिपद स्वीकारण्याचें ठरवलें, तेव्हां मुस्लिम लीगबरोबर संयुक्त मंत्रि-मंडळें बनवावींत किंवा काय, असा प्रश्न उत्पन्न झाला. ज्या प्रांतांमध्यें लीगचा एकहि प्रतिनिधि विधिमंडळांत नव्हता अशा ठिकाणीं म्हणजे बिहार, ओरिसा व मध्यप्रांतांत संयुक्त मंत्रिमंडळें स्थापण्याचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता. संयुक्त प्रांतांत व मुंबई इलाख्यांत तसे प्रयत्न करण्यांत आले, पण ते सफळ झाले नाहींत. कांहीं एका निश्चित कार्यक्रमानुसार व निश्चित धोरणानुसार राष्ट्रसभा विधिमंडळांत गेलेली होती. तेव्हां ज्यांना तो कार्यक्रम व तें धोरण मान्य नाहीं त्यांना मंत्रिमंडळांत घेणें, मतदारांची फसवणूक केल्यावांचून राष्ट्र-सभेला शक्य झालें नसतें. धार्मिक कारणांस्तव आक्षेप घेतां येईल, असें कोणतेंहि कलम राष्ट्रसभेच्या कार्यक्रमांत नव्हतें व खास मुसलमानांकडून विरोध व्हावा असा जातीय स्वरूपाचा तो कार्यक्रम नव्हता. तो राजकीय व आर्थिक स्वरूपाचा कार्यक्रम असल्याकारणानें त्याला सम्मति देणाऱ्या मुसल-मानांचें मुसलमानपण नाहींसें होण्याचा संभव नव्हता. त्यामुळें आपला कार्य-क्रम अमान्य करणाऱ्या मुसलमानांपेक्षां तो मान्य करणाऱ्या मुसलमानांना

राष्ट्रसभेनें जवळ करावें हें साहजिकच होतें. एकजिनसी मंत्रिमंडळ असावें हें जें राज्यघटनाशास्त्रांतलें सर्वज्ञात व सर्वमान्य तत्त्व आहे, तदनुसार राष्ट्रसभेनें आपल्याच सभासदांचें मंत्रिमंडळ बनवण्याचा निश्चय केला. त्यांत कांहीं मुसलमानहि होते. राष्ट्रसभापक्षाचे जे मुसलमान सभासद होते, त्यांतूनच कांहींची निवड मंत्रिपदांसाठीं करण्यांत आली. राष्ट्रसभेकडून घडलेला महान् अपराध तो हाच. लॉर्ड झेट्लंड्नीं जी फुसकुली सोडलेली होती, तिचा यानंतर प्रचारासाठीं यथेष्ट उपयोग करून घेण्यांत आला.

मंत्रिमंडळांतील एकंदर जागांपैकीं किती जागा मुसलमानांना व इतर अल्पसंख्याकांना मिळाल्या तें पाहिलें, तर त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाहून अधिक जागा मिळाल्याचें दिसून येतें. ११ प्रांतांतील ७१ मंत्र्यांमध्यें २६ मुसलमान, १० इतर अल्पसंख्याक आणि ३५ हिंदू अशी वर्गवारी होती; 'हिंदु–राष्ट्रसभेचे प्रांत' असें मानण्यांत येणाऱ्या प्रांतांतील ३५ मंत्र्यांपैकीं ६ मुसलमान होते आणि ५ इतर अल्पसंख्य जमातींतले होते. नंतर कांहीं काळानें सरहद्द प्रांत व आसाम प्रांत या आणखी दोन प्रांतांत राष्ट्रसभेनें मंत्रिमंडळें स्थापन केलीं. त्यामुळें मुसलमान मंत्र्यांच्या संख्येंत आणखी भर पडली. सरहद्द प्रांतांतील चार मंत्र्यांपैकीं मुख्य प्रधानासह तीन मंत्री मुसलमान होते, आणि आसामांत तीन मुसलमान व पांच मुसलमानेतर मंत्री होते. या आंकड्यांवरून लीगच्या भरमसाट व अजब विधानांचें सहजच खंडन होण्यासारखें आहे.

१९३७ च्या जुलै महिन्याच्या दुसऱ्या–तिसऱ्या आठवड्यांत राष्ट्रसभेनें मंत्रिपदें स्वीकारलीं, आणि मंत्रिपदें घेऊन उणेपुरे आठ महिने झाले असतील नसतील तोंच २० मार्च १९३८ रोजीं अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या कौन्सिलनें असा एक ठराव पास केला कीं, राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें असलेल्या प्रांतांतून मुसलमानांवर आणि विशेषेंकरून लीगच्या कार्यकर्त्यांवर व सभासदांवर अन्याय, जुलूम वगैरे चालू असल्याच्या अनेक तक्रारी आमच्या मध्यवर्ति कचेरीकडे आलेल्या असल्यामुळें याबाबत सर्व तऱ्हेची माहिती गोळा

करण्याकरतां, जरूर ती चौकशी करण्याकरतां, योग्य ते उपाय योजून कौन्सिलकडे वेळोवेळीं अहवाल सादर करण्याकरतां (पुढील) सभासदांची एक समिति नेमण्यांत येत आहे. पिरपूरच्या राजेसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या या समितीनें आपला अहवाल १५ नोव्हेंबर १९३८ ला सादर केला. पिरपूर-अहवालांतील तक्रारींच्या तपशिलांत शिरणें येथें शक्य होणार नाहीं. पण तो प्रसिद्ध झाल्यानंतर राष्ट्रसभेच्या मंत्र्यांनीं त्यांत नमूद केलेल्या तक्रारींची चौकशी केली व त्यांना सविस्तर उत्तरें देणारीं सरकारी पत्रकें काढलीं. कांहीं तक्रारींचा ऊहापोह प्रांतीय विधिमंडळांतहि झाला. निःपक्षपाती न्यायासनासमोर या आरोपांची छाननी कधींहि झाली नाहीं. लीगचे त्या काळचे एक प्रमुख सभासद फझलुल हक्क यांनीं पंडित नेहरूंना आव्हान दिलें होतें. तें स्वीकारून हक्कसाहेबांनीं सुचवल्याप्रमाणें सत्य परिस्थिति काय आहे तें पाहण्यासाठीं त्यांच्यासमवेत हिंडण्याची पंडित नेहरूंनीं तयारी दर्शवली. पण हक्कसाहेबांना कधींच फुरसत मिळाली नाहीं! १९३९ च्या ऑक्टोबरांत प्रस्तुत ग्रंथाचा लेखक राष्ट्रसभेचा अध्यक्ष असतां त्यानेंहि जनाब जिनांना असें लिहलें होतें कीं, निःपक्षपाती अधिकारी नेमून मुसलमानांतर्फे करण्यांत आलेल्या तक्रारींची चौकशी करण्यांत यावी. त्यासाठीं फेडरल कोर्टाचे सर मॉरिस ग्वायर याचें नांवहि लेखकानें सुचवलें होतें. पण ही सूचना जनाब जिनांनीं मान्य केली नाहीं. त्यांनीं असें उत्तर दिलें कीं : 'ही बाब सध्यां व्हॉइसरायांच्याकडे विचारासाठीं गेलेली आहे आणि आमच्या गरजा भागतील असे उपाय योजण्यास व जरूर ते इलाज करण्यास, त्याचप्रमाणें ज्या प्रांतांमध्यें राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें अधिकारारूढ आहेत तेथील मुसलमानांच्या मनांत पुन्हां विश्वास निर्माण करण्यास योग्य असे अधिकारी तेच आहेत.' व्हाइसरॉयनें, अथवा राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें ज्या प्रांतांमध्यें अधिकारपदांवर होतीं त्यांपैकीं एकाहि प्रांताच्या गव्हर्नरानें, अथवा राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांचा कारभार जेवढा काळ चालू होता तेवढा सर्व काळ भारतमंत्री असणाऱ्या लॉर्ड झेटलंडनें मुसलमानांच्या अथवा दुसऱ्या एकाद्या अल्पसंख्याक गटाच्या

विरुद्ध राष्ट्रसभेनें कोणतीहि अत्याचाराची गोष्ट केल्याचा एकदां देखील आरोप केला नव्हता. वर उद्धृत केलेल्या उत्तरामध्यें जनाब जिनांनीं हवाला दिलेल्या अर्जाच्या बाबतींत व्हाइसरॉयनें काय इलाज योजले, किंवा व्हाइसरॉय-बरोबर यासंबंधांत जिनांनीं त्यानंतर काय पत्रव्यवहार वगैरे केला, तें आम्हांला समजलेलें नाहीं. पुढें या प्रकारांची चौकशी करण्यासाठीं बादशाही चौकशी-समिति नेमण्यांत यावी अशीहि जनाब जिनांनीं मागणी केली होती; पण सर-कारनें ती मान्य केली नाहीं आणि हें प्रकारण तेथेंच संपुष्टांत आलें. आपल्या हातून अल्पसंख्याकांच्या हिताला व विशेषतः मुसलमानांच्या हिताला विघातक असें कांहीं कृत्य झालेलें असल्यास अथवा तसें धोरण अमलांत आलें असल्यास तें दाखवून द्यावें, अशी विनंति राजीनामे सादर करण्यापूर्वी राष्ट्रसभेच्या मंत्र्यांनीं प्रांतिक गव्हर्नरांना करावी, असा आदेश राष्ट्रसभेच्या निवडणूक-मंडळानें आपल्या मंत्रिमंडळांना दिला होता. पण एकाहि गव्हर्नराला एकादें देखील उदाहरण दाखवून देतां आलें नाहीं. उलट, संयुक्त प्रांताचा गव्हर्नर सर हॅरी हेग याच्यासारखा माणूस—कीं ज्याच्या मनांत राष्ट्रसभेबद्दल लवमात्रदेखील आपुलकी असल्याची शंका कोणी घेणार नाहीं—त्यानेंदेखील स्वतः सेवानिवृत्त झाल्यानंतर मुसलमानांशीं न्यायानें व रास्तपणानें वागण्याची दक्षता राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं अत्यंत कसोशीनें घेतल्याबद्दलची ग्वाही दिलेली आहे. एवंच काय, कीं अत्याचार म्हणून ज्यांना म्हणण्यांत येत असतें, ते केवळ तोंडचे आरोप ठरलेले आहेत. त्यांच्याबद्दल केव्हांहि पुरावा मिळालेला नाहीं, कीं चौकशी झालेली नाहीं. तथापि, या आरोपांना लीगच्या कार्यक्रमा-मध्यें मुख्य स्थान देण्यांत आलेलें असून प्रचारासाठीं मसाला म्हणून त्यांचा भरपूर उपयोग करण्यांत येत असतो.

या आरोप—पत्रांपैकीं कांहीं मुद्यांचा ओझरता उल्लेख मी करणार आहें. देशांमधील दोन प्रमुख समाजांतील झगड्यांचें कारण म्हणून 'वन्दे मातरम्' गीताचा नामनिर्देश करण्यांत येतो. हें गीत गेल्या शतकाच्या सत्तरीच्या सुमाराला रचण्यांत आलेलें असून या शतकाच्या प्रारंभापासून केवळ बंगाल

प्रांतांतच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानांत तें लोकप्रिय होऊन बसलें आहे. तेव्हांपासून राष्ट्रसभेच्या व इतर संस्थांच्या मेळाव्यांतून तें गाण्याचा नित्याचा प्रघात पडलेला आहे. जनाब जिना हे जेव्हां सुमारें पंधरा वर्षेपर्यंत राष्ट्रसभेचे एक प्रमुख सभासद होते, त्या वेळींहि तें गाण्यांत येत असे; पण त्या वेळीं त्यांना मुसलमानांच्या दृष्टीनें आक्षेपार्ह असें त्यामध्यें कांहींहि आढळून आलें नव्हतें! जेव्हां राष्ट्रसभेला मुसलमान समाजाचा न भूतो न भविष्यति असा पाठिंबा होता त्या खिलापत–चळवळीच्या काळामध्येंहि तें गीत गाण्यांत येतच असे; पण त्या वेळींहि कोणी त्याला हरकत घेतली नव्हती. असा या गीताचा इतिहास असतां राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें आल्यावर तक्रारींचें व झगड्याचें एक प्रमुख कारण म्हणून त्याचा निर्देश करण्यांत येऊं लागला आणि पिरपूर-अहवालामध्यें तर त्याला पहिलें स्थान देण्यांत आलें! परंतु सर्व तऱ्हेच्या आक्षेपांचें निरसन करण्याच्या व सर्व प्रकारचे गैरसमज काढून टाकण्याच्या बुद्धीनें राष्ट्रसभेच्या कार्यकारीमंडळानें असा आदेश दिला कीं, गीताचीं पहिलीं दोनच कडवीं म्हणण्यांत यावींत. धार्मिक स्वरूपाचा जो कांहीं आक्षेप गीता-संबंधीं घेतां येण्यासारखा होता, त्याचें निराकरण अशा प्रकारें करण्यांत आलें खरें; पण त्या गीताला ज्या कथेची पार्श्वभूमि आहे, ती कथा मुसलमानांना दृष्टिआड करणें शक्य व्हावयाचें नाहीं असा नवीनच मुद्दा उपस्थित करण्यांत आला. बंगाल प्रांताच्या बाहेर हजारांत असा एकादाच मनुष्य सांपडेल, कीं ज्याला या पार्श्वकथेची कांहीं माहिती आहे. पण 'वन्दे मातरम्' गीताला आक्षेप घेण्यासाठीं कांहीं तरी कारण शोधून काढणें आवश्यक झालें, तेव्हां या पार्श्वकथेची सबब पुढें करण्यांत आली.

दुसरी तक्रारीची बाब म्हणजे तिरंगी ध्वज. खिलापत–चळवळीच्या काळांत राष्ट्रसभेला मुसलमानांचा पाठिंबा होता त्या वेळीं या ध्वजाला विशेष प्रामुख्य प्राप्त झालें. राष्ट्रीय ध्वज म्हणून हिंदू व मुसलमानांनीं त्याला मान्यता दिली होती. 'वन्दे मातरम्' गीताप्रमाणेंच हा ध्वज देखील ब्रिटिश सरकारच्या रोषाला पात्र झालेला होता. 'वन्दे मातरम्' गीत व तिरंगी ध्वज हीं क्रांतीचीं प्रतीकें

आहेत असें सरकार समजे व त्यांना दडपून टाकण्याचा प्रयत्न करी. अनेक हिंदूंनीं व मुसलमानांनीं तुरुंगवास पत्करून, लाठीमार सोसून, इतकेंच काय, पण मरणाचा स्वीकार करून त्याचें जतन केल्याचा गौरव या तिरंगी ध्वजाला प्राप्त झालेला होता. राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें अधिकारावर येईपर्यंत मुसलमानांनीं मुसलमान म्हणून त्या ध्वजाला कधींहि हरकत घेतलेली नव्हती. तिरंगी झेंडा हें हिंदूंचें निशाण आहे, असेंहि नाहीं.

राष्ट्रसभेच्या कार्यक्रमांपैकीं ज्या आणखी एका गोष्टीला मुसलमान आपणांवरील आक्रमण असें मानतात, ती गोष्ट म्हणजे राष्ट्रसभेचा जनतासंपर्क. गेलीं निदान पंचवीस वर्षें तरी राष्ट्रसभेला जनसंघटनेचें स्वरूप आलेलें आहे, ही गोष्ट वेळोवेळीं झालेल्या सत्याग्रहाच्या आंदोलनांवरून सिद्ध झालेली आहे. तिनें हांक मारतांच स्वातंत्र्यासाटीं कष्ट सोसण्यास जनता पुढें सरसावली आहे. त्या आंदोलनांची तपशीलवार माहिती येथें देण्याचें कारण नाहीं. मुसलमानांनींहि त्या आंदोलनांत भाग घेऊन हालअपेष्टा सहन केलेल्या आहेत. तेव्हां मुसलमान जनतेशीं आपला संबंध जोडण्याचा प्रयत्न राष्ट्रसभेनें केला तर त्यांत गुन्हा काय होतो, तें समजणें कठिण आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानांशीं दोन शब्द बोलण्याचा अधिकार फक्त मुस्लिम लीगलाच आहे आणि राजकीय, आर्थिक किंवा दुसऱ्या कोणत्याहि सर्वसाधारण हिताच्या बाबतींत मुसलमानांशीं विचारविनिमय करण्याचा हक्क दुसऱ्या कोणत्याहि संस्थेंतील हिंदूला, मुसलमानाला किंवा अन्य जातीय मनुष्याला नाहीं, असें म्हणणें असेल तर मात्र गोष्ट निराळी! हरएक स्वतंत्र देशांमध्यें प्रत्येक व्यक्तीला किंवा गटाला आपलीं ध्येयें व आपले कार्यक्रम जनतेसमोर मांडण्याचा हक्क असतो; तसा हक्क नसेल तर तो असावयास पाहिजे. पाकिस्तानांत देखील व्यक्तींचे हे हक्क नाकारण्यांत येणार नाहींत अशी उमेद आहे. राष्ट्रसभाच काय, दुसरी कोणतीहि राष्ट्रीय किंवा जातीय, धार्मिक किंवा सामाजिक, राजकीय किंवा आर्थिक संस्था असली, तरी ती हे नागरिक-हक्क गमावण्यास तयार होणार नाहीं. आणि या हक्कांविरुद्ध जी आरडाओरड करण्यांत येत असते तिच्यावरून

भाषणस्वातंत्र्याच्या व संघटनास्वातंत्र्याच्या हक्कांसंबंधींचें अज्ञानच व्यक्त होत असतें. विभक्त मतदारसंघांमुळें धार्मिक व जातीय भेदांनुसार समाजाचीं छकलें पडलेलीं आहेत, आणि धार्मिक व जातीय भेदांना अवास्तव महत्त्व प्राप्त झालें आहे, ही गोष्ट मुसलमानांच्याहि लक्षांत येऊन चुकली आहे. खुद्द लीगमध्यें देखील या प्रश्नांवर दुफळी झाली होती आणि विभक्त मतदार-संघांना विरोधी असणाऱ्या गटाचें नेतृत्व जनाब जिनांनीं केलें होतें. इतरांनीं जिनासाहेबांचें न मानल्यामुळें त्यांना आपलें म्हणणें सोडावें लागलें ही गोष्ट निराळी. पण जातीय मतदारसंघ तत्त्वतः सदोष आणि व्यवहारतः खोडसाळ-पणाचे आहेत हें राष्ट्रसभेचें मत जर अजूनहि कायम असेल, तर तिला कोणी काय म्हणून दोष द्यावा? परंतु आतां जी मागणी लीगकडून करण्यांत येत आहे, ती विभक्त मतदारसंघ कायम ठेवावेत, इतर जातींच्या उमेदवारांना मतें देण्यास मतदारांना प्रतिबंध करण्यांत यावा व उमेदवारांना दुसऱ्या धर्मांच्या मतदारांचीं मतें मागण्याचा हक्क असूं नये एवढ्याच पुरतीं मर्यादित राहिलीं नसून आपल्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि संघटनेनें मुसलमानां-बरोबर कसलाहि संपर्क ठेवूं नये असें लीग म्हणूं लागलेली आहे! तिची ही मागणी मान्य करणें म्हणजे विभक्त मतदारसंघांत असलेलें विष निवडणुकींच्या व्यतिरिक्त इतर कार्यांतहि भिनूं दिल्याप्रमाणें होईल. किंबहुना, त्यामुळें आपल्या समाजाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि समाजांतील लोकांशीं संबंध ठेवणें मुसल-मानांना अशक्य होऊन बसेल. लीगच्या या नव्या मागणीमुळें कोणती परि-स्थिति निर्माण होईल त्याची नुसती कल्पना केली, तरी ती किती त्याज्य आहे हें लक्षांत येतें.

लीगच्या टीकेचा विषय झालेला आणखी एक मुद्दा म्हणजे वर्धा—शिक्षण—योजना. त्या योजनेचें मूलतत्त्व असें आहे कीं, पुस्तकांच्या द्वारा शिक्षण देण्यापेक्षां व्यवसायांच्या द्वारा शिक्षण देणें अधिक श्रेयस्कर असतें. पाश्चात्य देशांतल्या मानसशास्त्रज्ञांनीं व शिक्षणविशारदांनीं ही पद्धति स्वीकारली असून सार्जंट—योजनेंतहि मूलतः तिला मान्यता देण्यांत आलेली आहे. ज्या

समितीनें वर्ध्यास बसून ही योजना घडवली तिचे डॉ० झकीर हुसेन हे अध्यक्ष होते. डॉ० झकीर हुसेन हे कांहीं कोणी सामान्य शिक्षणवेत्ते नाहींत. एके काळीं अलीगढ विश्वविद्यालयांत असलेले व नंतर काश्मीर संस्थानामध्यें डायरेक्टर ऑफ पब्लिक् इन्स्ट्रक्शन्स्च्या अधिकारावर असलेले ख्वाजा जी. सय्यदेन यांचें सहाय्य डॉ० झकीर हुसेन यांना मिळलेलें होतें. अशा दोन नामवंत मुसलमान शिक्षणशास्त्रज्ञांनीं बनवलेली योजना ही मुसलमानांचें अहित करण्याच्या हिंदूंच्या कारखान्यांतलाच एक भाग कसा असूं शकेल, तें समजणें दुरापास्त आहे. तिच्यांतला दोष म्हणजे इतकाच कीं, त्या योजनेची कल्पना महात्मा गांधींनीं जनतेसमोर मांडली होती आणि तत्संबंधीं चर्चा करण्यासाठीं भरलेल्या परिषदेचीं निमंत्रणेंहि त्यांनींच पाठविलीं होतीं ! या योजनेला आतां व्यवहार्य स्वरूप देण्यांत आलें असून डॉ० झकीर हुसेन यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं तिची अंमलबजावणी दिल्ली येथील जामिया–मिलियामध्यें चालू आहे. दिल्ली–व्यतिरिक्त देशांत दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं इतक्या यशस्वी रीतीनें वर्धा–शिक्षणाचा अभ्यासक्रम चालू असेल, असें मला वाटत नाहीं. तरीहि या योजनेला राष्ट्रसभेच्या अत्याचारांच्या यादींत ढकलण्यांत आलें आहेच. मध्यप्रांतांत विद्यामंदिर–योजना म्हणून जी एक योजना आंखण्यांत आलेली होती, तिच्यासंबधीं लीगकडून खास आक्षेप घेण्यांत आले होते ही गोष्ट येथें नमूद करावयास हवी. मध्यप्रांताच्या मुख्य प्रधानांनीं ७ फेब्रुवारी १९३९ ला प्रांतिक विधिमंडळांतल्या मुसलमान सभासदांची एक बैठक भरवली होती व त्या बैठकीला अखिल भारतीय मुस्लिम लीगचे सरचिटणीस नबाब जादा लियाकत अली खान हे निमंत्रणावरून उपस्थित राहिलेले होते. त्या बैठकीमध्यें विद्यामंदिर–योजनेचें पंतप्रधानांनीं विशदीकरण केलें आणि ग्रामीण विभागांतील रहिवाश्यांची निरक्षरता, जातिधर्म लक्षांत न घेतां दूर करण्याच्या हेतूनें ती आंखण्यांत आलेली असल्याचें आणि त्यांकडून मिळालेल्या मदतीच्या साहाय्यानें ती चालवण्यांत येणार असल्याचें सांगितलें. या कार्यासाठीं एक खाजगी संस्था नोंदवण्यांत आली आणि सरकारनें संस्थेला आर्थिक सहाय्य करावें असें ठरलें.

मुसलमानांची इच्छा असेल, तर त्यांनीं अशाच प्रकारची स्वतंत्र संस्था स्थापन करावी असेंहि पंतप्रधानांनीं सुचवलें होतें. नबाबजाद्यांनीं असें मत प्रदर्शित केलें कीं, मुसलमान आपल्या संस्थेला मदिनातुल–इल्म असें नांव देतील व या योजनेला 'मदिनातुल–इल्म–योजना' असें म्हणतील. विद्यामंदिर संस्थेइतकीच मदत मुसलमानांच्याहि संस्थेला व योजनेला देण्याचें अभिवचन पंतप्रधानांनीं दिलें. विद्यामंदिर–योजनेसंबंधींच्याच नव्हे, तर इतर सर्व गोष्टींसंबंधींच्या तक्रारींची मोकळेपणानें तपशीलवार चर्चा झाली आणि प्रांतिक विधिमंडळांतील सभासदांना व लीगच्या सरचिटणीसांना समाधानकारक वाटेल अशा प्रकारें सर्व तक्रारी निकालांत काढण्यांत आल्या. तडजोडीच्या खर्ड्यांवर पंतप्रधान व नबाबजादा लियाकत अली खान यांच्या सह्या झाल्या आणि योजनेविरुद्ध मुसलमानांनीं चालवलेला सत्याग्रह व सत्याग्रहामुळें उद्‌भवलेले खटले मागें घेण्यांत आले. १९ फेब्रुवारी १९३९ रोजीं सरकारनें या हकिकतीबद्दल एक पत्रकहि प्रसिद्ध केलें. इतकें होऊन देखील राष्ट्रसभेच्या अत्याचारांच्या यादीवर विद्यामंदिर–योजनेचें नांव कायम राहिलें तें राहिलेंच! पुढें तत्संबंधींचा वाद फझलुल हक्क यांनीं जेव्हां पुनरपि उकरून काढला, तेव्हां म्हणजे १९३९ च्या डिसेंबरांत मध्यप्रांत सरकारनें हा तडजोडीचा खर्डा नबाबजाद्यांच्या संमतीनें प्रसिद्ध केला. राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळानें राजीनामा दिल्यानंतर एक महिन्यानें घडलेली ही हकिकत असून सरकारनें प्रसिद्ध केलेला तडजोडीचा कागद २२ डिसेंबर १९३९ च्या नागपूरच्या 'हितवादां'त वाचावयास मिळेल.

राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांवरील आणखी एक आरोप असा आहे कीं, त्यांच्या अमदानींत हिंदु–मुसलमानांचे दंगे घडून आले. अशा प्रकारचे दंगे देशांत घडून येतात ही गोष्ट दुर्दैवानें खरी आहे. पण राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें अधिकारावर येण्यापूर्वींहि दंगे झालेले आहेत आणि मंत्रिपदें राष्ट्रसभेनें सोडून दिल्यानंतरहि ते झालेले आहेत. मोर्ले–मिंटो सुधारणेबरोबरच देशामध्यें सुरू करण्यांत आलेल्या विभक्त मतदारसंघांच्या पद्धतीनंतर दंग्यांचें क्षेत्र व संख्या यांच्यांत उत्तरोत्तर वाढ होत गेलेली आहे, ही गोष्ट अमान्य करतां येणार नाहीं.

कोणत्याहि एका विशिष्ट दंग्याचें उदाहरण घेऊन त्याची चर्चा करणें येथें शक्य होणार नाहीं. ज्या दंग्यांचीं प्रकरणें न्यायालयांत गेलीं त्यांच्याबद्दलचे निकालहि तेथें झालेलेच असणार. परंतु वऱ्हाडांत घडून आलेल्या एका घटनेवर दुराणी यांनीं विशेष जोर दिला असून हायकोर्टाच्या निकालपत्रांतील कांहीं उद्‌गारांचा निर्देश करून त्यांनीं मध्यप्रांताच्या पंतप्रधानांना 'प्राणत्याग करण्याचा किंवा सार्वजनिक जीवनापासून निवृत्त होण्याचा' सल्लाहि देऊन टाकलेला आहे. म्हणून त्या प्रकरणाबाबतच्या कांहीं गोष्टींचा उल्लेख येथें करण्यास हरकत नाहीं. या प्रकरणांत एका प्रमुख हिंदु गृहस्थाचा खून झाला होता व कांहीं जणांना जखमा झाल्या होत्या. गुन्ह्याचा तपास मि. बी. जी. टेलर नांवाच्या युरोपियन डेप्युटी इन्स्पेक्टर–जनरलच्या देखरेखीखालीं करण्यांत आला. खटल्याचें काम गुन्हा घडून आला त्या जिल्ह्यांत न चालतां, आरोपीच्या इच्छेनुरूप नागपूर मुक्कामीं चाललें. खटला चालवणारे न्यायाधीशहि मि. एम्. एन्. क्लार्क नांवाचे एक युरोपियन आय्. सी. एस्. अधिकारी होते. पुढें थोडक्याच दिवसांत त्यांची बढती नागपूर हायकोर्टाच्या न्यायमूर्तींच्या जागेवर करण्यांत आली, त्यावरून ते चांगले वाकबगार न्यायाधीश असावेत असा तर्क होतो. राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिल्यानंतर हा खटला चालला आणि सेशन कोर्ट व हायकोर्ट यांचे निवाडे तर राजीनामे दिल्यानंतर कित्येक महिन्यांनीं जाहीर झाले. खालच्या कोर्टाचे निकाल वरच्या कोर्टांत फिरतात ही नित्याच्या अनुभवांतील गोष्ट आहे. तसाच प्रकार याहि बाबतींत झाला. एका गोष्टीचा विशेष बोभाटा करून तिचा दोष पंतप्रधानांच्या पदरीं बांधण्यांत येत असतो. त्यांनीं म्हणे एक असें भाषण केलें कीं, त्यायोगानें गुन्ह्याच्या चौकशीमध्यें पक्षपातीपणा निर्माण झाला. हें भाषण विधिमंडळांत मांडण्यांत आलेल्या तहकुबीच्या सूचनेवर बोलतांना करण्यांत आलेलें होतें आणि 'आलेल्या बातम्यांवरून समजलेल्या हकिकतीची माहिती देणें' हा भाषणाचा हेतु असल्याचेंहि स्पष्ट करण्यांत आलेलें होतें. प्रकरण घडून आल्यानंतर तीन दिवसांच्या आंत, हें प्रकरण कोर्टांत पोंचण्यापूर्वीं ही

चर्चा झाली. जातीय तेढ त्रिकोपास गेल्याच्या बातम्या कानांवर आल्यामुळें पंतप्रधान त्या गांवीं जाऊन आले. आपल्या समवेत त्यांनीं विधिमंडळाच्या तीन मुसलमान सभासदांनाहि नेलें होतें. त्यांपैकीं एक गृहस्थ के. एस्. अब्दुल रहमान खान हे प्रांतिक मुस्लिम लीगचे चिटणीस होते. पंतप्रधानांनीं खामगांव येथें जाहीर सभेंत भाषणहि केलें. विधिमंडळांतील चर्चेच्या वेळीं हा गुन्हा काळजीपूर्वक पूर्वयोजना करून व क्रूरपणें करण्यांत आला असें पंतप्रधानांनीं म्हटल्याची तक्रार करण्यांत आलेली होती. पण चर्चेच्या प्रसंगीं मुसलमान सभासदांनीं देखील गुन्ह्याचें वर्णन 'खून' या शब्दानेंच केलें होतें व त्याचा अत्यंत कडक शब्दांत निषेध केला होता. खुद्द पंतप्रधानांच्या वर्तणुकीबद्दल तर चर्चेच्या प्रसंगीं के. एस्. अब्दुल रहमान खान यांनीं पुढील प्रकारचे प्रशंसोद्गार काढले: ' खामगांवीं पंतप्रधानांनीं केलेलें भाषण ऐकून मी खुष झालों. त्यांनीं ज्या उदात्त भावना व्यक्त केल्या आहेत व जें मार्गदर्शन केलें आहे त्यांचें अनुकरण माझ्या मित्रमंडळींनीं केलें असतें, तर किती बरें झालें असतें."[१] गुन्ह्याच्या तपासाबाबत हायकोर्टानें ठपका दिल्याकारणानें पोलिसांच्या तपासाच्या वेळच्या वर्तनाची चौकशी करण्यासाठीं व त्यांत कांहीं गैरप्रकार घडले असल्यास त्याला जबाबदार असणाऱ्या माणसांचीं नांवें सादर करण्यासाठीं सरकारनें मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश न्यायमूर्ति मॅक्लिन् यांची नेमणूक केली. मुसलमानांचा छळ केल्याच्या तक्रारी निराधार आहेत याबद्दल न्यायमूर्ति मॅक्लिन् यांची खात्री पटली. गुन्ह्याचा पुरावा म्हणून पोलिसांनीं खोटे साक्षीदार आणले नाहींत असें त्यांना आढळून आलें व त्यांनीं पोलिसांना दोषमुक्त ठरवलें. खालच्या कोर्टांत सिद्ध होऊन वरच्या कोर्टांत नाशाबित झालेल्या प्रत्येक खटल्याबद्दल पंतप्रधानाला जबाबदार धरण्यांत येऊं लागलें, तर राज्यकारभार अशक्य होऊन बसेल. मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिल्यानंतर म्हणजे पंतप्रधान हे पुन्हां साधे नागरिक बनल्यानंतर हा खटला चालला

---

१. सी. पी. लेजिस्लेटिव्ह् असेंब्ली प्रोसीडिंग्ज्, १९३९, पृ. २०७–०८.

असल्याकारणानें सेशन् जज्जावर सेवानिवृत्त पंतप्रधानांच्या अधिकाराचें दडपण पडण्याचा संभव होता असेंहि सूचित करतां येण्यासारखें नाहीं.

राष्ट्रसभेच्या अत्याचाराचें आणखी एक उदाहरण म्हणून उर्दू–हिंदी–वाद पुढें करण्यांत येत असतो. हा फार जुनाट वाद आहे आणि तो अजूनहि चालूच आहे. तो वाद चिघळवून मुसलमानांवर अन्याय होईल असें राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं कांहींच केलेलें नाहीं. उलट, या वादांत कांहीं तरी तडजोड निघावी या दृष्टीनेंच त्यांनीं प्रयत्न केले. पण त्यांतून कांहीं निष्पन्न होण्यापूर्वींच मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले.

त्यानंतरचा १९३७ पासून आजपर्यंतचा जातीय प्रश्नाचा इतिहास म्हणजे तडजोडीसाठीं पुनःपुनः राष्ट्रसभेनें केलेले प्रयत्न, मुस्लिम लीगच्या वाढत्या मागण्या, ब्रिटिश सरकारनें लीगला कधीं अप्रत्यक्षपणें दिलेला पाठिंबा, तर कधीं तिच्याबद्दल दर्शवलेली नापसंती आणि सरकारच्या या वर्तनामुळें देशांत सतत कायम राहिलेलें पगदस्ती वातावरण यांचा इतिहास आहे. राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांच्या अत्याचाराचें कुभांड कसें रचण्यांत आलें तें आपण पाहिलेंच. लीगचें कशामुळें समाधान होईल तें समजून घ्यावें म्हणजे राष्ट्रसभेला व व देशाला तिच्या मागण्यांचा विचार करून शक्य तर त्या पार पाडतां येतील या उद्देशानें १९३३ सालीं महात्मा गांधी व त्या वेळीं राष्ट्राध्यक्ष असलेले श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं प्रयत्न करून पाहिला. जनाब जिनांचे चौदा मुद्दे ब्रिटिश सरकारनें प्रायः मान्य करून त्यांचा अन्तर्भाव १९३५ च्या राज्यघटनेंत अगोदरच केलेला असल्याकारणानें, लीगच्या कोणत्या कोणत्या मागण्या शेष आहेत हें जाणून घेणें आवश्यक होतें. जिनासाहेब व प्रस्तुत ग्रंथाचा कर्ता यांच्यामध्यें १९३५ सालाच्या प्रारंभीं ज्या वाटाघाटी झाल्या त्या १९३५ चा कायदा पास होण्यापूर्वीं झालेल्या होत्या आणि संयुक्त मतदारसंघ हा त्या वाटाघाटींचा आधारभूत विषय होता. पण १९३५च्या कायद्यानुसार विभक्त मतदारसंघच काय, पण इतरहि मागण्या सरकारनें मान्य केल्या. तदनंतर पदरांत पडलेले विभक्त मतदारसंघ अथवा इतर दुसरे मुद्दे

सोडून देण्यास लीग तयार होईल अशी अपेक्षा करणेंच व्यर्थ होतें. लीगनें जीं जीं संरक्षणें मागितलीं होतीं तीं सर्व प्राप्त झालेलीं होतीं, मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या पंजाब, सिंध, सरहद्द व बंगाल या प्रांतांत आणि अधून-मधून आसाममध्येंहि मुसलमानी मंत्रिमंडळें अस्तित्वांत होतीं, तरी देखील मुसलमानांचा छळ होत असून त्यांचे हितसंबंध आपल्या खास व राखीव अधिकारांचा उपयोग करून सुरक्षित राखण्याबद्दलचीं ब्रिटिश सरकारनें दिलेलीं सर्व आश्वासनें व कायद्यांतलीं सर्व संरक्षणें निरुपयोगी ठरलीं असल्याचें लीगनें ठरवून टाकलें. हा लीगचा निर्णय बरोबर तरी म्हटला पाहिजे किंवा तो भीतिजन्य व संशयजन्य अशा भ्रामक मनोगंडांचा परिणाम तरी मानला पाहिजे. लीगचा निर्णय जर वस्तुस्थितीस धरून असेल, तर मुसल-मानांची बहुसंख्या असणारे प्रांत हिंदुस्थानपासून उद्यां अलग केले आणि तेथें स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं तरी देखील त्या ठिकाणच्या मुसलमान रहि-वाशांचें संरक्षण होईल हें शक्य दिसत नाहीं. मग ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य आहेत तेथली गोष्ट तर बोलावयासच नको. पण हा केवळ संशय-जन्य व भीतिजन्य भ्रामक मनोगंड असेल, तर कालमानानें संशयाचा व भीतीचा निरास होतो कीं काय याची वाट पाहात बसण्याव्यतिरिक्त कांहींच करतां येणार नाहीं. पण लीगच्या मागण्यांचें शेपूट लांबतच चाललें असून तिनें तडजोड अशक्य करून ठेवली आहे. एका बाजूला महात्मा गांधी, श्री. सुभाषचंद्र बोस व पंडित जवाहरलाल नेहरू आणि दुसऱ्या बाजूला जनाब जिना यांच्यांत दीर्घकालपर्यंत पत्रव्यवहार व वाटाघाटी झाल्या, परंतु त्यांची मजल तडजोडीचीं बोलणीं करणाऱ्या पक्षांचा तत्संबंधींचा अधिकार काय, याची छाननी करण्यापलीकडे गेलीच नाहीं! संबंध मुसलमान समाजाची मुस्लिम लीग हीच एकमेव प्रातिनिधिक संस्था आहे अशी मान्यता तिला देण्यांत यावी व राष्ट्रसभेनें हिंदुसमाजाच्या वतीनें बोलावें असा जिनासाहेबांनीं हट्ट धरला. राष्ट्रसभेनें यांपैकीं एकहि मुद्दा मान्य केला नाहीं आणि राष्ट्र-सभेला तशी मान्यता देणें खरोखर अशक्यच होतें. त्यामुळें लीगच्या मागण्यांची

जंत्री बनवण्यापर्यंत देखील या वाटाघाटींची उडी जाऊं शकली नाहीं.

लीगव्यतिरिक्त देशांमध्यें मुसलमानांच्या दुसऱ्या संस्था असून लीगचा हा दावा त्यांना मान्य नाहीं हें विसरतां कामा नये. वेळोवेळीं निरनिराळ्या नांवांनीं स्थापन झालेल्या राष्ट्रीय मुसलमानांच्या संस्थांचा येथें उल्लेख करावासा वाटतो. चिवट मनोवृत्तीचे व त्यागी असे अहरार घ्या; राष्ट्राच्या स्वातंत्र्या-साठीं सतत लढत राहिलेले, हालअपेष्टा सहन केलेले आणि मुसलमानी विद्येचे प्रतिनिधी व धर्मज्ञ म्हणून समाजांत विशिष्ट स्थान असलेले जमायत–उल्–उलेमाचे कार्यकर्ते घ्या; स्वतःची निराळी परिषद असलेले व लीगपासून आपल्या हक्कांचें रक्षण व्हावें म्हणून कायदेशीर संरक्षणें मागणारे शिया मुसलमान घ्या; (खुद्द जनाब जिना व इतर कांहीं प्रमुख मुसलमान शिया असूनहि शिया परिषदेला संरक्षणें हवींशीं वाटत आहेत हें विशेष.) मुसलमान समाजांत बहुसंख्या नसली तरी ज्यांची बरीच संख्या आहे असें मोमिन घ्या; त्यांची स्वतंत्र जमायत असून मुस्लिम लीगचा दावा त्यांनीं पुनःपुनः व उघडाउघड नाकबूल केला आहे. बलुचिस्तानांतील खुद्दाम–इ–वतन या संस्थेंत संघटित झालेले राष्ट्रीय मुसलमान, सरहद्द प्रांतांतील खुदाई खिदमत-गार, बंगालमधील कृषकप्रजावाले आणि अल्लामा मश्रिकींचे खाकसार घ्या; यांच्यापैकीं प्रत्येकाचे लीगशीं अनेक बाबतींत मतभेद आहेत. या पक्षांच्या बळासबधीं निरनिराळे अंदाज करण्यांत येत असतात. त्यांचे अनुयायी मुसल-मानांमध्यें आपलें बहुमत असल्याचें सांगतात, तर लीगवाले आपलेंच बहुमत असल्याचा दावा करीत असतात.

राष्ट्रसभा म्हणजे हिंदूंची संस्था अशी मान्यता देणें राष्ट्रसभेला शक्यच नव्हतें. तशी मान्यता देणें म्हणजे आपल्या परंपरेवर बोळा फिरवण्याप्रमाणें, आपला इतिहास खोटा पाडल्याप्रमाणें व आपल्या भविष्याचा नाश केल्याप्रमाणें झालें असतें. देशांतील सर्व धर्मांच्या व जातीजमातींच्या अंतःकरणांत राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याचा जो ध्यास आहे, त्याचें प्रतिनिधित्व आपण करीत आलों आहोंत असा राष्ट्रसभेचा दावा आहे. मुसलमानांच्या किंवा दुसऱ्या

कोणत्याहि धार्मिक गटांच्या हितसंबंधांपासून वेगळे असे हिंदूंचे जे कांहीं हितसंबंध असतील त्यांचें प्रतिनिधित्व राष्ट्रसभा करते असें म्हणतां येणार नाहीं. त्यामुळें आपण एकट्या हिंदूंचीच जातीय संघटना आहोंत ही भूमिका राष्ट्रसभेला कबूल होणें शक्यच नव्हतें. तेव्हां लीगच्या म्हणण्याला राष्ट्रसभेनें दिलेला हा नकार वस्तुस्थितीला धरूनच होता. तथापि, जातीय प्रश्न सोडवण्याचे उपाय शोधून काढण्यासाठीं मुस्लिम लीगबरोबर सहकार्य करण्याची राष्ट्रसभेची तयारी होती. परंतु येवढ्यानें नबाब जिनांचें समाधान न झाल्याकारणानें 'प्रथम ग्रासे मक्षिकापातः' असा वाटाघाटींचा प्रकार झाला.

या मुद्याच्या समर्थनार्थ दोन—चार उतारे दिले तरी पुरे होतील. ३ मार्च १९३८ रोजीं गांधीजींना लिहिलेल्या पत्रांत जिनासाहेब लिहितातः 'आतां आपण अशा स्थितीला येऊन पोंचलों आहोंत कीं, इतःपर संदेह मुळींच राहूं देतां कामा नये. हिंदुस्थानांतील मुसलमानांची एकमेव, अधिकृत व प्रातिनिधिक संस्था म्हणून तुम्ही लीगला मान्यता द्या, आणि तुम्ही राष्ट्रसभेचें व देशांतील इतर हिंदूंचें प्रतिनिधित्व करा. या भूमिकेवरूनच आपणांला पुढें बोलणीं करतां येतील व तडजोडीचीं साधनें निर्माण करतां येतील.'[१] श्री. सुभाषचंद्रांच्या बरोबर वाटाघाटी चालू असतां जनाब जिनांनीं पुढीलप्रमाणें एक योजना सुचवली होतीः 'हिंदी मुसलमानांची अधिकृत संस्था जी अखिल भारतीय मुस्लिम लीग व हिंदूंच्या संघटित मताची प्रातिनिधिक व अधिकृत अशी संस्था जी राष्ट्रसभा त्यांनीं हिंदु—मुसलमानांत तडजोडीसंबंधींचा दोन प्रमुख जमातींमधील करारनामा म्हणून पुढील अटींना संमति दिलेली आहे.' अधिक विचारविनिमय झाल्यावर जिनासाहेबांनीं वरील वाक्यरचनेंत पुढीलप्रमाणें बदल केला.

'राष्ट्रसभा व हिंदुस्थानांतील मुसलमानांची अधिकृत व प्रातिनिधिक संस्था जी मुस्लिम लीग त्यांनीं हिंदु—मुसलमानांतील तडजोडीच्या पुढील अटींना करार म्हणून मान्यता दिलेली आहे.' अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या कार्यकारी

---

१. यूनिटी टॉक्स्, पृ. २८.

मंडळानें अशा अर्थाचा एक ठराव केला कीं, 'हिंदुस्थानांतील मुसलमानांची लीग हीच अधिकृत व प्रातिनिधिक संस्था आहे या भूमिकेव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि भूमिकेवरून राष्ट्रसभेबरोबर हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाबाबत वाटा-घाटी करणें मुस्लिम लीगला शक्य होणार नाहीं.' १९३८ च्या २ ऑगस्टला श्री. सुभाषचंद्र बोस यांना लिहिलेल्या पत्रांत जिनासाहेब एक पाऊल पुढें गेले आहेत. ते लिहितात : 'राष्ट्रसभा जी समिति नेमील तिला हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडवावयाचा असल्याकारणानें त्या समितींत राष्ट्रसभेनें मुसलमानांचा अन्तर्भाव केल्यास लीगच्या कौन्सिलला तें इष्ट वाटणार नाहीं.' सर तेजबहादुर सप्रूंनीं १९४१ च्या फेब्रुवारीमध्यें जिनासाहेबांना जेव्हां असें सुचवलें कीं, हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडवण्यासाठीं त्यांनीं व महात्मा गांधींनीं भेटावें, त्या वेळीं १९ फेब्रुवारी रोजीं त्यांना दिलेल्या उत्तरांत जनाब जिनांनीं कळविलें कीं, 'हिंदु-समाजाच्या वतीनें श्री० गांधींना किंवा दुसऱ्या कोणत्याहि पुढाऱ्याला भेटण्यास व हिंदु-मुसलमानांचा प्रश्न सोडवणाऱ्या कामीं यथाशक्ति मदत करण्यास मी नेहमींच तयार आहें.'

अशा प्रकारची मागणी पूर्वीं कधींहि करण्यांत आलेली नसल्याकारणानें ही शक्कल नव्यानेंच काढण्यांत आली आहे हें स्पष्ट होतें. लखनौ-कराराच्या वेळीं ज्या वाटाघाटी झाल्या त्या मुस्लिम लीगला मुसलमानांच्या एकमेव अधि-कृत संस्थेचें पद बहाल न करतां आणि राष्ट्रसभेला संघटित हिंदुमताची प्रतिनिधि न ठरवतांच करण्यांत आल्या होत्या. १९३५ सालीं त्या वेळच्या राष्ट्रसभेच्या अध्यक्षांनीं जिनांच्याबरोबर जें बोलणें केलें, त्यांतदेखील हा मुद्दा कधींच उपस्थित करण्यांत आलेला नव्हता. इतकेंच नाहीं, तर हिंदुमहासभेच्या दृष्टीनें पंडित मदनमोहन मालवीयांची अनुमति राष्ट्रसभेशीं झालेल्या करा-राला जोंपर्यंत मिळणार नाहीं, तोंपर्यंत तो करार पक्का झाला असें मानण्यास जिनांची तयारी नव्हती ! आणि कराराला हिंदुमहासभेची सम्मति आपण मिळवून देऊं अशी हमी राष्ट्रसभेच्या अध्यक्षांना देणें शक्य न झाल्यामुळें तर वाटाघाटी फिसकटल्या.

स्वतःच्या प्रातिनिधिक दर्जाला मान्यता मिळावी व राष्ट्रसभेला हिंदुसंस्थेचा दर्जा प्राप्त व्हावा येवढा आग्रह धरूनच लीग थांबली नाहीं. हिंदु–मुसलमान प्रश्न सोडवण्यासाठीं नियुक्त होणाऱ्या समितीमध्यें सभासद म्हणून कोणाचा अन्तर्भाव व्हावा हें ठरवण्याचा अधिकारहि ती आपल्याकडे घेऊं पाहात होती असें वरील अवतरणावरून दिसून येतें. जिनासाहेबांशीं बोलणीं करतांना मौलाना अबुल कलम आझादांना आपल्या बरोबर आणण्याची इच्छा महात्मा गांधींनीं व्यक्त केली, तेव्हां जिनांनीं त्या गोष्टीला नकार दिला.

जिनांबरोबर केलेल्या संभाषणाच्या ओघांत आणि दीर्घकाल त्यांच्याबरोबर चालू असलेल्या पत्रव्यवहाराच्या द्वारा लीगच्या दृष्टीनें कोणत्या मुद्यांबाबत चर्चा व तडजोड होणें आवश्यक आहे तें समजून घेण्याचा पंडित जवाहर-लालांनीं प्रयत्न करून पाहिला पण त्यांना कांहीं थांगपत्ता लागला नाहीं. ज्या मुद्यांच्याबाबत चर्चा व तडजोड होणें आवश्यक आहे असें आपणांस वाटतें, त्यांच्यासंबंधीं मला कांहीं तरी माहिती द्यावी अशा प्रकारची कळकळीची विनंति त्यांनीं जनाब जिनांना केली असतां, जिनांनीं १७ मार्च १९३८ रोजीं त्यांना पुढील प्रकारचा जबाब पाठवला होताः 'आमचे चौदा मुद्दे तुमच्या ऐकिवांत असतीलच,' असें लिहून जिनांनीं १२ जुलै १९३८ च्या 'स्टेट्स्मन्' पत्रांत 'मुसलमानांच्या दृष्टिकोनांतून' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेल्या एका लेखाचा व १ मार्च १९३८ रोजीं 'न्यू टाइम्स्' पत्रांत प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या एका लेखाचा हवाला दिला. पुढें त्या लेखांतील मुद्यांचें पंडित नेहरूंनीं आपल्या ६ एप्रिल १९३८ च्या लेखांत पृथक्करण करून तत्संबंधीं राष्ट्रसभेची भूमिका कोणती याचें जेव्हां विवरण केलें, तेव्हां १२ एप्रिल १९३८ च्या उत्तरादाखल लिहलेल्या पत्रांत जनाब जिना त्यांच्या-वरच उलटून लिहिते झाले कीं, 'तुम्हीं आपल्या लेखांत कांहीं मुद्दे मांडले असून माझ्या सूचना म्हणून पत्रारंभींच तुम्हीं ते माझ्या अंगाला चिकटवले आहेत.' या वृत्तीमुळें लीगच्या मतें राष्ट्रसभेनें कोणते मुद्दे विचारांत घ्यावयास हवे होते, याचा साहजिकच कोणाला कांहींच बोध झाला नाहीं.

१९३९ च्या सप्टेंबरांत जेव्हां महायुद्ध सुरू झालें, तेव्हां महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं पुन्हा एकवार प्रयत्न करून पाहिला, पण व्यर्थ! पंडितजींनीं मोठ्या वैतागानें १६ डिसेंबर १९३९ रोजीं लिहलें, "दुर्दैव असें आहे कीं, या प्रश्नांची व्यवस्थित चर्चा करण्याच्या अवस्थेपर्यंत देखील आम्ही जाऊन पोंचत नाहीं. ऐन चर्चेला प्रारंभ होण्यापूर्वींच अनेक तऱ्हांच्या शर्तींच्या अडसरांनीं व अडथळ्यांनीं वाट अडवलेली असते....हे अडथळे सदैव कायमच असल्यामुळें आणि त्यांत आणखी अडथळ्यांची भर टाकण्यांत येत असल्याकारणानें मला निरुपायानें असें वाटूं लागलें आहे कीं, खरा अडथळा आमच्या राजकीय दृष्टिकोनांतील व राजकीय ध्येयांतील भिन्नतेपासूनच निर्माण झालेला आहे."

राष्ट्रसभेबरोबर चर्चा करण्यासाठीं मतभेदांचे मुद्दे कोणते तें दर्शवण्यास मुस्लिम लीग नाखुष असली तरी व्हाइसरॉयच्या समोर मात्र त्यांतले कांहीं मुद्दे अधूनमधून व्यक्त करून दाखवण्यास ती तितकी नाखुष नसते. मत-भेदांपासून स्वतःचा फायदा करून घेण्याच्या बाबतींत सरकारहि नाखुष असतें असें नाहीं. मतभेद राहावेत म्हणून देशांतील मुस्लिम लीगचें आसन बळकट करण्यासाठीं मदत करणें सरकारला क्रमप्राप्त झालेलें आहे. हिंदुस्थानला संयुक्त राज्यघटना द्यावी असा आग्रह मुस्लिम सर्वपक्षीय परिषदेनेंच धरला होता हें वाचकांना स्मरत असेलच. १९३५ च्या कायद्यान्वयें तशी योजना तयार होईतोंपर्यंत इकडे जनाब जिनांचा दृष्टिकोन अजिबात पालटून गेलेला होता, आणि त्यांच्या टीकेचा सारा भडिमार घटनाकायद्यांतल्या संयुक्त राज्य-पद्धतीसंबंधींच्या तरतुदीवरच होऊं लागला होता. पुढें १९३९च्या ११ सप्टेंबरला व्हाइसरॉयनें जाहीर केलें कीं, युद्ध चालू असेपर्यंत संयुक्त राज्यपद्धति अमलांत आणण्यासाठीं चालू असलेली तयारी स्थगित करण्यांत येईल. लीगच्या कार्यकारी मंडळानें एक ठराव करून व्हाइसरॉयच्या या आश्वासनाविषयीं पसंती व्यक्त केली आणि अशी इच्छा व्यक्त केली कीं, संयुक्त राज्यपद्धतीची योजना सर्वस्वीं रद्द करण्यांत यावी व हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेच्या

प्रश्नाचा मुळासकट फेरविचार करण्यांत यावा. "अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या संमतीवांचून व पसंतीवांचून हिंदुस्थानच्या राज्यघटनाविषयक प्रगती-बाबत कोणतीहि घोषणा करण्यांत येणार नाहीं आणि अशा प्रकारच्या संमती-वाचून व पसंतीवांचून कोणतीहि राज्यघटनेची योजना बादशहांच्या सरकार-कडून बनवली अथवा स्वीकारली जाणार नाहीं," असें आश्वासनहि या ठरावामध्यें मागण्यांत आलें होतें.

यावर लॉर्ड लिन्लिथ्गोनें २३ डिसेंबर १९३९ रोजीं उत्तर दिलें तें असें कीं, "हिंदुस्थानाचा जो राजकीय विकास व्हावयाचा असेल त्याच्या स्थैर्याच्या व यशाच्या दृष्टीनें मुसलमान समाजाच्या समाधानाचें महत्त्व किती आहे याची बादशहांच्या सरकारला कल्पना नाहीं असें नव्हे. तेव्हां तुमच्या समाजाच्या विचारांना त्याच्या हिंदुस्थानांतील विशिष्ट स्थानामुळें जी प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे तिला कमी लेखण्यांत येईल कीं काय, अशी शंका बाळग-ण्याचें तुम्हांला कारण नाहीं." जनाब जिनांनीं ६ फेब्रुवारी १९४० रोजीं व्हाइसरॉयची मुलाखत घेतली. मुलाखतीनंतर प्रसिद्ध झालेलें सरकारी पत्रक म्हणतें : "व्हाइसरॉयनीं जिनांना असें आश्वासन दिलें कीं, सर्व अल्पसंख्याक जमातींचे वाजवी हक्क रक्षण करणें किती अगत्याचें आहे याची बादशहांच्या सरकारला पूर्ण जाणीव असून या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष होईल अशी धास्ती त्यांनीं मनांत मुळींच बाळगूं नये." परंतु येवढ्या आश्वासनानें लीगचें समाधान झालें नाहीं. जिनांनीं २३ फेब्रुवारी १९४० ला व्हाइसरॉयना जें पत्र लिहिलें, त्यांत सरकारी पत्रकांतील वरील वाक्यें उद्धृत केल्यानंतर लीगच्या कार्यकारी मंडळाचा दृष्टिकोन विशद करून ते पुढें लिहितात : "मुस्लिम लीगनें जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याचें या आश्वासनानें निराकरण होत नाहीं असें मला खेदपूर्वक म्हणावेंसें वाटतें. कारण त्यामुळें हिंदुस्थानांतील ९ कोटी मुसलमानांच्या भवितव्याची भिस्त, चर्चा व सल्लामसलत या गोष्टींवरच ठेवल्याप्रमाणें होते आणि ब्रिटिश हिंदुस्थानच्या भवितव्याचीं सूत्रें ब्रिटिशांच्याच हातीं राहातात, ही परिस्थिति आम्हांला मान्य नाहीं." "हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेसंबंधीं

अथवा मध्यंतरींच्या व्यवस्थेसंबंधीं कोणतेंहि वचन कोणत्याहि पक्षाला आमच्या मान्यतेवांचून अथवा आमच्या संमतीवांचून देण्यांत येणार नाहीं" असें निश्चित आश्वासन सरकारकडून मिळण्याबद्दल जिनांनीं आग्रह धरला. व्हाइस-रॉयमार्फत ब्रिटिश सरकारनें जिनांची समजूत घालण्याचा आणखी एक प्रयत्न केला. भारतमंत्र्यांनीं १ एप्रिल १९४० रोजीं लॉर्डांच्या सभेंत एक निवेदन केलें आणि तें व्हाइसरॉय यांनीं जिनांना पत्रद्वारें कळवलें. तें निवेदन असें होतें : "राज्यघटनेबाबतच्या विषयांची पाहाणी सर्व पक्षांच्या व हितसंबंधांच्या प्रतिनिधींसमवेत करण्यांत येईल असें जें अभिवचन बादशहांच्या सरकारनें दिलेलें आहे त्यांत 'हम करे सो कायदा' अशी वृत्ति अभिप्रेत नसून वाटा-घाटींचा मार्ग सूचित केलेला आहे. हिंदुस्थानांतील जमातींमध्यें बऱ्याच प्रमाणांत एकमत होणें आवश्यक आहे हें तर खरेंच. कारण त्याशिवाय ज्या संयुक्त हिंदुस्थानाच्या आदर्शानें अनेक हिंदी व इंग्रज व्यक्तींना कार्यस्फूर्ति दिली तो प्रत्यक्षांत उतरणें अशक्य होईल. बादशहांच्या हिंदुस्थानांतील प्रजा-जनांपैकीं ८ कोटी मुसलमान प्रजेला ज्या राज्यपद्धतींत शांततेनें व सुखासमाधा-नानें राहतां येणार नाहीं अशी कोणतीहि राज्यपद्धति हिंदुस्थानावर लादण्याचा प्रयत्न या देशांतील कोणतेंहि सरकार किंवा पार्लमेंट करील हें मला संभव-वनीय वाटत नाहीं." या जादा खुलाशानेंहि लीगच्या कार्यकारी मंडळाचें समाधान झालें नाहीं. जिनांनीं २५ जून १९४० ला व्हाइसरॉयची पुन्हां एकदां भेट घेतली आणि त्यांना तत्पूर्वीं पाठवलेल्या आपल्या पत्रांतील मुद्यांचें एक टिपण सादर केलें. व्हाइसरॉयला सादर केलेल्या टिपणांतील मुद्दे असे :—

( १ ) हिंदुस्थानची फाळणी करण्याबद्दल आणि वायव्य व आग्नेय भागांत स्वतंत्र मुसलमान राज्यें स्थापन करण्याबद्दल लाहोरच्या ठरावामध्यें जीं मूल-भूत तत्त्वें प्रतिपादन केलेलीं आहेत, त्यांना कोणत्याहि प्रकारें विरुद्ध असणारी घोषणा अथवा निवेदन बादशहांच्या सरकारनें करूं नये.

( २ ) मुसलमानी हिंदुस्थानच्या पूर्वपसंतीशिवाय व संमतीशिवाय ब्रिटिश सरकारला कोणतीहि तात्पुरती किंवा कायमची राज्यघटना स्वीकारतां

येणार नाहीं, असें निश्चित व निरपवाद आश्वासन बादशहांच्या सरकारनें दिलें पाहिजे.

( ३ ) मध्यवर्ति व प्रांतिक सरकारांमध्यें मुस्लिम नेत्यांना समप्रतिष्ठ सहकारी म्हणून घेण्यास ब्रिटिश सरकार तयार असेल, तरच युद्धप्रयत्नांची कसोशी करणें व हिंदी साधनसामग्रीची संपूर्ण जमवाजमव शक्य होईल. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर मुस्लिम हिंदुस्थानच्या नेत्यांवर बरोबरीच्या व्यक्ती म्हणून संपूर्ण विश्वास टाकण्यांत आला पाहिजे, आणि मध्यवर्ति व प्रांतिक सरकारांमध्यें त्यांना समान अधिकार व नियंतेपण प्राप्त झालें पाहिजे.

( ४ ) तात्पुरत्या व युद्धकालीन म्हणून खालील गोष्टी करण्यांत याव्यात :

( अ ) सध्यांच्या राज्यघटनेच्या मर्यादा संभाळून व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाची वाढ करण्यांत यावी. राष्ट्रसभेचे प्रतिनिधी कार्यकारी मंडळांत येणार असतील तर हिंदूंच्या बरोबरीनें मुसलमान घेण्यांत आले पाहिजेत. आणि राष्ट्रसभेचे प्रतिनिधी येणार नसतील तर राज्यकारभाराची जबाबदारी मुसलमानांच्या शिरावर पडणार असल्याकारणानें सध्याच्या कार्यकारी मंडळांत जी भर घालण्यांत येणार तिच्यापैकीं बहुसंख्य सभासद मुसलमान नेमण्यांत आले पाहिजेत.

( ब ) व्हाइसरॉयांच्या अध्यक्षासकट १५ पेक्षां कमी नाहीं इतक्या सभासदांचें एक युद्धमंडळ नेमावें व व्हाइसरॉय हे त्याचे अध्यक्ष असावेत. राष्ट्रसभेचे प्रतिनिधी त्यांत असतील तर मुसलमानांना हिंदूंच्या इतक्या जागा व राष्ट्रसभेचे प्रतिनिधी नसतील, तर बहुसंख्य जागा देण्यांत याव्यात.

( क ) सूचित केलेल्या युद्धमंडळांतील व गव्हर्नर–जनरलच्या कार्यकारी मंडळांतील मुसलमान सभासद आणि गव्हर्नरांचे मुसलमान सल्लागार मुस्लिमलीगच्या पसंतीचेच असावेत.

मुस्लिम लीगच्या हातांत राज्यसत्तेचें वाण द्यावें हाच या मागण्यांचा अर्थ आहे, ही गोष्ट व्हाइसरॉयच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. म्हणून ६ जुलै १९४० रोजीं दिलेल्या उत्तरांत त्यांनीं असें म्हटलें कीं, "मुस्लिमांच्या

हितसंबंधांना पुरेसें प्रतिनिधित्व मिळावें या गोष्टीचें महत्त्व मान्य करण्यास आपण सिद्ध असलों तरी कोणत्याहि एका गटाच्या शिरावर कमी किंवा अधिक 'जबाबदारी' पडण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण 'जबाबदारी पडणार ती गव्हर्नर–जनरलच्या सर्व कौन्सिलावर पडणार आहे.' प्रस्तुतच्या कायद्यानुसार व कार्यपद्धतीनुसार गव्हर्नर–जनरलच्या कौन्सिलमध्यें समावेश करण्यासाठीं कोणाचीं नांवें सुचवावींत तें गव्हर्नर–जनरलचा सल्ला घेऊन ठरवण्याची जबाबदारी भारतमंत्र्यांच्याच हातीं राहाणार, हें स्पष्टच आहे. हीं माणसें नेमण्याचा हक्क कोणत्याहि राजकीय पक्षाच्या अधीन राहाणार नाहीं; मग तो पक्ष कितीहि महत्त्वाचा असो." व्हाइसरॉयने असेंहि कळवलें कीं, "मला आणखीहि एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते ती ही कीं, माझ्या वाढवलेल्या कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून किंवा बिनसरकारी सल्लागार म्हणून ज्या मुसलमान सद्गृहस्थांची नेमणूक करावी लागेल, त्यांची निवड करण्याचा हक्क मुस्लिम लीगकडे सुपूर्त करणें घटनेच्या दृष्टीनें अशक्यच आहे. पण तशा नेमणुका करण्याचा प्रसंग आलाच तर तुम्ही ज्या सूचना कराल त्यांचा पूर्ण विचार करण्यांत येईल, याविषयीं तुम्हांला संदेह बाळगण्याचें कारण नाहीं."

सरकारचें धोरण विशद करणारी एक घोषणा ७ ऑगस्ट १९४० रोजीं व्हाइसरॉयनें केली. हिंदुस्थानाच्या राज्यघटनेचा जेव्हां फेरविचार करण्यांत येईल तेव्हां १९३५च्या सगळ्याच कायद्याची छाननी करण्यांत येणार असल्याबद्दल सरकारनें पूर्वीं केलेल्या घोषणांचा उल्लेख करून ते म्हणाले कीं, हिंदुस्थानच्या शांततारक्षणाची व योगक्षेमाची आपणांवर असलेली जबाबदारी अशा कोणत्याहि शासनसंस्थेच्या हातीं सुपूर्द करण्याचा विचार ब्रिटिश सरकार मनांत आणणार नाहीं कीं, ज्या शासनसंस्थेची सत्ता हिंदुस्थानांतल्या राष्ट्रीयजीवनांतील कांहीं सामर्थ्यशाली गट उघडपणें अमान्य करीत आहेत. त्याचप्रमाणें अशा गटांना जबरदस्तीनें त्या शासनसंस्थेमुळें मान तुकावण्यास लावण्याचें कामहि ब्रिटिश सरकार करणार नाहीं. युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांतील मुख्य घटकांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ नवीन राज्य-

घटनेची आंखणी करण्याप्रीत्यर्थ नेमण्याचें आश्वासन त्यांनीं सरकारतर्फे दिलें. कांहीं प्रातिनिधिक हिंदी गृहस्थांना गव्हर्नर–जनरलच्या कार्यकारी मंडळांत सामील होण्याचें निमंत्रण देण्याची व युद्ध–सल्लागारमंडळ नेमण्याची सरकारची इच्छा असल्याचेंहि त्यांनीं जाहीर केलें. व्हाइसरॉयच्या या देकाराविषयीं हाऊस ऑफ कॉमन्स्मध्यें चर्चा चालू असतां मि. अमेरी यांनीं हिंदुस्थानी लोकांत मतभेद आहेत या मुद्द्यावर विशेष भर दिला. ते म्हणाले : "हिंदुस्थानांत जो घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झालेला आहे तो बादशहांचें सरकारविरुद्ध एकदिल झालेली हिंदी जनता यांच्यामध्यें निर्माण झालेला नसून तो मुख्यतः हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांतील मुख्य गटांमध्येंच झालेला आहे. म्हणून त्याचा उलगडा बादशहांचें सरकार व हिंदी जनतेचे प्रतिनिधि या दोन पक्षांत समझौता घडवून आणण्याच्या साध्या व सुलभ वाटणाऱ्या मार्गानें होण्यासारखा नसून अनेक पक्षांमध्यें तडजोड घडवून आणण्याच्या अधिक बिकट मार्गानेंच होऊं शकेल. बादशहांचें सरकार हा त्या अनेक पक्षांपैकीं केवळ एक पक्ष आहे." मुसलमान, दलित वर्ग व हिंदी संस्थानिक यांचा त्यांनीं अनेक पक्षांपैकीं कांहीं पक्ष म्हणून निर्देश केला. पण त्याच वेळीं, हिंदुस्थान हा स्वयंपूर्ण व स्वतंत्र असा एक भूप्रदेश असून प्राचीन संस्कृतीचें व सर्व रहिवाशांना समान अशा दीर्घ इतिहासाचें वैभव त्याला लाभलेलें आहे असेंहि त्यांनीं सांगितलें. वरील सर्व हकिकतीवरून हिंदुस्थानांतील तीन पक्षांपैकीं जो तिसरा पक्ष तो हळूहळू पण अखंडपणें बलिष्ठ होत चालल्याचें आढळून येईल. एकीकडे लोकसत्ताक तत्त्वप्रणालीचा पोकळ उदो उदो चालू असल्याचें दिसतें, तर दुसरीकडे 'हिंदी राष्ट्रीय जीवनांतील विविध गटां'ना उत्तेजन देण्यांत येत असल्याचा अनुभव येतो. घटनात्मक प्रगति होण्यासाठीं पुरेसें ऐकमत्य असावयास हवें असा आग्रह धरण्यांत येतो आणि हिंदुस्थान व ब्रिटन यांच्यामध्यें वांधा निर्माण झालेला नसून तो खुद्द हिंदी लोकांमध्येंच निर्माण झाल्याचें सांगण्यांत येतें. कोणतीहि घटनात्मक योजना अमलांत येण्यापूर्वीं लीगची पसंति व संमति मिळवली पाहिजे, आणि प्रातिनिधिक संस्थां-

तील मुसलमान प्रतिनिधींची निवड करण्याचा अखत्यार एकट्या लीगलाच प्राप्त झाला पाहिजे, अशा मागण्या लीगने केल्या कीं ऐसपैस सर्वसाधारण घोषणा करून पहिल्या मागणीविषयीं टाळाटाळीचें धोरण स्वीकारण्यांत येतें तर दुसरी मागणी सरळ सरळ नाकारण्यांत येते. वायव्य व आग्नेय भाग देशापासून तोडून वेगळे करा असें तिनें सुचवलें कीं, हिंदुस्थान हा एक स्वयंपूर्ण व स्वतंत्र भूभाग असून प्राचीन परंपरा व सर्व रहिवाशांना समान असा सुदीर्घ इतिहास त्याला लाभलेला आहे असें म्हणावयाचें. भावी राज्यघटनेपुरती व्हाइसरॉयची घोषणा लीगच्या कार्यकारीमंडळाला समाधानकारक वाटली, पण व्हाइसरॉयच्या कार्यकारीमंडळाची वाढ करण्यासंबंधींची सूचना मात्र तिला सर्वस्वीं नापसंत होती. लीगनें सादर केलेल्या चार नांवांपैकीं व्हाइसरॉयनें दोन नांवें कार्यकारी मंडळासाठीं निवडावीं, हें व्हाइसरॉयचें म्हणणें लीगला पसंत पडलें नाहीं. युद्ध–सल्लागारमंडळाच्या बाबतहि अशीच सूचना व्हाइसरॉयनें केली होती, तिच्यावरहि नापसंतीचाच शिक्का बसला. पुन्हां वाटाघाटी करण्यांत आल्या, पण गाडी पुढें सरकेना. २९ सप्टेंबर १९४० रोजीं भरलेल्या अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या कौन्सिलच्या बैठकीमध्यें जनाब जिनांनीं असें निवेदन केलें कीं, ब्रिटिश सरकारला आपल्या हातचीं अधिकारसूत्रें खालीं ठेवण्याची मुळीं देखील इच्छा नसून ९ कोटी लोकसंख्येच्या मुसलमान राष्ट्राशीं त्यांनीं खेळ चालवलेला आहे. येणेंप्रमाणें सरकार व मुस्लिम लीग यांच्या दरम्याक जनाब जिनांच्या भाषेंत बोलावयाचें तर 'युद्ध-करार' करण्याचा प्रयत्न तेवढ्या वेळेपुरता तरी निष्फळ ठरला.

त्या वर्षाच्या अखेरीला राष्ट्रसभेनें भाषण–स्वातंत्र्याच्या हक्काच्या समर्थनार्थ वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. चळवळ मुसलमानांच्या अथवा लीगच्या विरुद्ध नव्हती हें उघडच होतें. ज्या हक्काच्या रक्षणासाठीं ती सुरू करण्यांत आली त्याचा फायदा इतरांच्याचप्रमाणें मुसलमानांनाहि मिळालाच असता. तरीहि चळवळ आपल्या विरुद्धच सुरू करण्यांत आलेली आहे असा ग्रह मुस्लिम लीगनें करून घेतला. 'आपली सत्याग्रहाची चळवळ मोठ्या आवे-

शानें सुरू करण्यांत व चालवण्यांत श्री. गांधींचा खरा उद्देश काय आहे, त्याविषयीं आम्हांला यत्किंचितहि संदेह नाहीं' असें लीगच्या कौन्सिलनें आपल्या ठरावांत म्हटलें असून पुढें तिनें सरकारला असें बजावलें आहे कीं, "मुसलमानांच्या मागण्यांना अपायकारक अथवा विरोधी अशी कोणतीहि सवलत राष्ट्रसभेला देण्यांत आल्यास मुस्लिम लीग आपली सर्व शक्ति पणास लावून त्याचा प्रतिकार केल्याशिवाय राहाणार नाहीं. त्याचप्रमाणें वेळ पडल्यास या देशांतील मुसलमानांच्या हक्करक्षणासाठीं व हितरक्षणासाठीं या झगड्यांत उडी घेऊन जरूर तो लढा करण्यासहि आम्ही मागेंपुढें पाहाणार नाही, ही गोष्टहि आम्ही येथें नमूद करून ठेवूं इच्छितों."

त्यानंतरचें लीगचें अधिवेशन मद्रास येथें १९४१ च्या एप्रिलमध्यें भरलें, तेव्हां लीगच्या घटनेमध्यें फेरफार करून पाकिस्तानची प्राप्ति हें लीगचें ब्रीदवाक्य ठरवण्यांत आलें.

ब्रिटिश सरकार व मुस्लिम लीग यांच्यामधील सौद्याचा यापुढील टप्पा म्हणजे क्रिप्स्–शिष्टाई. १९४२ च्या मार्च महिन्यांत ब्रिटनच्या युद्धमंडळाचे एक सभासद सर स्टॅफोर्ड क्रिप्स् हे सरकारच्या धोरणाची व योजनेची घोषणा बरोबर घेऊन हिंदुस्थानांत दाखल झाले. बादशहांच्या इतर वसाहतींच्या बरोबरीच्या दर्जावर संयुक्त हिंदुस्थानाची स्थापना करण्यांत यावी अशी त्या योजनेंतील कल्पना होती. हिंदुस्थानच्या नवीन घटनेची आंखणी कशी करावी याचा क्रम त्यामध्यें घालून देण्यांत आला होता आणि अशा प्रकारची राज्यघटना बनवण्यांत आल्यास ती मान्य करण्याची व अमलांत आणण्याची हमी बादशहांच्या सरकारनें दिली होती. नवीन राज्यघटना ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या प्रांताला मान्य नसेल त्याला आपली प्रचलित राज्यघटना कायम ठेवण्याची व मागून निश्चय झाल्यास त्याला संयुक्त हिंदुस्थानांत सामील होण्याची मुभा असावी, अशी तरतूद योजनेमध्यें करण्यांत आलेली होती. जे असमाविष्ट प्रांत असतील त्यांचा दर्जा संयुक्त हिंदुस्थानच्या समान मानण्यास आणि त्यांच्यासाठीं नवीन राज्यघटना बनवण्यास बादशहांच्या सरकारची तयारी आहे असेंहि

त्यांत नमूद केलेलें होतें. घोषणेमध्यें देशाच्या राज्यकारभारांत भाग घेण्याचें हिंदी नेत्यांना निमंत्रण देण्यांत आलें होतें, आणि हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या नियंत्रणाचे व त्याच्या मार्गदर्शनाचे अधिकार हिंदुस्थान–सरकारच्या हातांतच ठेवण्यांत आले होते.

अखिल हिंदुस्थानच्या संघ–राज्यांतून कोणत्याहि प्रांताला फुटून वेगळें होण्याचा हक्क या घोषणेच्या द्वारा देण्यांत आलेला होता, आणि हिंदी संघ–राज्यांतून स्वतंत्र अशा मुसलमानी राज्याची स्थापना करण्यांत यावी, ही मुस्लिम लीगची मागणी जवळजवळ मान्य केली गेली होती. हिंदुस्थानचें अखंडत्व या घोषणेमुळें खंडित होणार आहे हें कारण दाखवून राष्ट्रसभेला ती घोषणा त्याज्य ठरवतां आली असती; पण तिनें तसें केलें नाहीं. उलट, तिनें आपली भूमिका पुढील शब्दांत स्पष्ट केली : ‘ कोणत्याहि टापूंतील रहिवाशांना त्यांच्या जाहीर व प्रस्थापित इच्छेविरुद्ध हिंदुस्थानी संघ–राज्यांत राहण्यास भाग पाडावें असे विचार राष्ट्रसभेच्या मनांत येणार नाहींत. परंतु हिंदुस्थानच्या अखंडत्वाचा विच्छेद करणें सर्वांच्याच हिताला विघातक ठरेल ही गोष्ट मात्र आम्ही निदर्शित करूं इच्छितों. संरक्षणाचें खातें लोकप्रतिनिधींच्या हातीं सोपवण्यास नकार देण्यांत आल्याकारणानें राष्ट्रसभेनें क्रिप्स्–योजना त्याज्य ठरवली. राष्ट्रसभेचा हा निर्णय कळेपर्यंत मुस्लिम लीगच्या कार्यकारीमंडळानें कांहीं हालचाल केली नाहीं. पण मग मात्र आहे या स्वरूपांत योजना मान्य करतां येणार नाहीं, असा ठराव करून टाकला. अप्रत्यक्षपणें पाकिस्तानच्या संभाव्यतेची कबुली घोषणेमध्यें देण्यांत आलेली असल्याबद्दल ठरावामध्यें आनंद व्यक्त करण्यांत आला, परंतु हिंदु व मुसलमान अशा दोन पृथक् व प्रमुख राष्ट्रांना संयुक्त हिंदुस्थान स्थापण्यास भाग पाडणें या दोन राष्ट्रांतील रहिवाशांच्या सुखाच्या व शांततेच्या दृष्टीनें हितावह होणार नसल्याबद्दल आपलें ठाम मतहि ठरावांत नमूद करण्यांत आलें. संघ–राज्यांत समाविष्ट होण्याच्या बाबतींत प्रांताचें मत काय आहे तें अजमावण्याची जी पद्धति सुचवलेली होती, तिच्यावरहि लीगनें आक्षेप घेतला. लीगचें म्हणणें असें होतें कीं, ज्या प्रांतांत मुसलमान बहुसंख्य असतील तेथील

सर्व रहिवाशांचीं मतें न घेतां फक्त मुसलमानांचीं मतेंच घेण्यांत यावींत. तसें न केल्यास मुसलमानांच्या जन्मसिद्ध स्वयंनिर्णयाच्या हक्कावर हरताळ फांसल्याप्रमाणें होईल. हिंदी संघ—राज्यांपासून विभक्त राहण्याचा हक्क ब्रिटिश सरकारनें प्रांतांना दिला; पण तो हक्क देतांना नियम असा घातला कीं, या प्रश्नाला विधिमंडळांतील मतदानापैकीं किमान साठ टक्के तरी मतें अनुकूल पडलीं पाहिजेत; परंतु तसें बहुमत मिळणें अशक्य झालें, तर अल्पसंख्येनें मागणी केल्यानंतर प्रांतांतील सर्व सज्ञान पुरुष रहिवाशांच्या मतांनुसार त्या प्रश्नाचा निर्णय करावा. या निर्णयपद्धतीवर लीगचा आक्षेप असा कीं, विधिमंडळांतील मतदानावरून त्या त्या प्रांतांमधील मुसलमान रहिवाशांच्या मनोगताची खरी परीक्षा होणें शक्य नाहीं, म्हणून सार्वत्रिक मतदान मुसलमान रहिवाशांपुरतेंच मर्यादित ठेवण्यांत यावें. बंगाल व पंजाब प्रांतांतल्याप्रमाणें शेंकडा ४५ टक्क्यांइतकी जरी अल्पसंख्य गटांची शक्ति असली, तरी त्यांच्याकडे अजिबात लक्ष देऊं नये असा लीगनें आग्रह धरला. देशाच्या विच्छेदनासारख्या प्रश्नाबाबत किंवा युगानुयुगें ज्या लोकांचा सहवास घडला त्यांच्यापासून अल्पसंख्याकांना विलग करावें कीं काय, याच्यासारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत देखील अल्पसंख्य गटांना मतप्रदर्शन करण्याचा अधिकार असूं नये, असें लीगचें म्हणणें होतें.

क्रिप्स्–शिष्टाई अपेशी झाल्यानंतर ७ ते ९ ऑगस्ट् १९४२ पर्यंत मुंबई येथें अखिल भारतीय राष्ट्रसभा–समितीचें जें अधिवेशन भरलें होतें, तेथें सुप्रसिद्ध 'चले जाव'चा ठराव संमत झाला. पूर्वी अनेक प्रसंगीं केलेल्या प्रयत्नांप्रमाणेंच या अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वींहि राष्ट्रसभेनें अशी घोषणा केली होती कीं, आपल्या स्वतःसाठीं नव्हे, तर हिंदी जनतेसाठीं आपण सत्ता मागत असून खरे अधिकार मिळत असतील तर मुस्लिम लीग अधिकारारूढ झाली तरी आपली हरकत नाहीं. या उलट, १६ ते २० ऑगस्ट्पर्यंत लीगच्या कार्यकारी मंडळाची सभा चालून जो ठराव मंजूर करण्यांत आला त्याच्यांत पुढीलप्रमाणें विधानें करण्यांत आलेलीं आहेत :

'हिंदू वरिष्ठ वर्गीयांच्या हातीं सत्ता देण्यास ब्रिटिश सरकारला भाग पाडून हिंदुस्थानांतील मुसलमानांना व इतर गटांना वेळोवेळीं दिलेलीं वचनें व त्यांच्या-संबंधीं स्वतःच्या शिरावर असलेली नैतिक जबाबदारी ही पार पाडण्याच्या कामीं ब्रिटिश सरकारला केवळ असमर्थ बनवण्याच्याच उद्देशानें नव्हे, तर राष्ट्रसभेच्या अटी व हुकूम यांच्यापुढें मुसलमानांना मान तुकवण्यास लावण्याच्या हेतूनें ही चळवळ चालू करण्यांत आलेली आहे, असें या कार्यकारी-मंडळाचें बिचारान्तीं मत बनलेलें आहे....'आपल्या मागण्या मान्य करण्यांत आल्यास बरोबरीच्या नात्यानें जबाबदारीचें ओझें स्वीकारण्यास लीग तयार आहे अशी सूचना ब्रिटिश सरकारला करून लीगच्या कार्यकारी–मंडळानें मुसलमानांना आदेश दिला कीं, त्यांनीं राष्ट्रसभेनें सुरू केलेल्या आंदोलनांत कोणत्याहि प्रकारचा भाग घेण्या-पासून अलिप्त राहावें. तेव्हांपासून हें आंदोलन मुसलमानांच्या विरुद्ध चालू आहे असें मानण्यांत येऊं लागलें आणि राष्ट्रसभावाल्यांना तुरुंगांतून मुक्त करण्याच्या अगोदर आणि पेचप्रसंग उलगडण्यासाठीं राष्ट्रसभेशीं कोणत्याहि प्रकारच्या वाटाघाटी सुरू करण्याच्या अगोदर ऑगस्ट्–ठराव राष्ट्रसभेनें मागें घ्यावा असा लीगच्या प्रचारकांचा अट्टाहास सुरू झाला. राष्ट्रसभेनें जपान-बरोबर संगनमत केलेलें होतें वगैरेसारख्या आरोपांचा खुद्द ब्रिटिश सरकारनें इन्कार केल्यानंतर सुद्धां लीगकडून ते आरोप करण्यांत येतच आहेत !

१९४४ च्या सप्टेंबरांत महात्मा गांधींनीं जनाब जिनांच्याबरोबर दीर्घ-काळपर्यंत वाटाघाटी केल्या, परंतु त्या निष्फळ ठरल्या. पाकिस्तानाच्या सुस्पष्ट अशा चतुःसीमा कोणत्या असतील, त्याच्या राज्यघटनेचें स्वरूप काय राहील व त्यामधील अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची तरतूद काय असेल यासंबंधींची कांहीं माहिती मिळविणें देखील त्या वाटाघाटींत शक्य झालें नाहीं.

युद्धोत्तर जी राज्यघटना बनवली जाईल तिला बाधक न ठरेल अशा प्रकारची मध्यंतरीच्या काळापुरती तडजोड करण्याविषयीं लॉर्ड वेव्हेल् यांनीं १९४५ च्या जूनमध्यें सूचना केली. या सूचनेंतलें एक मूलभूत कलम असें होतें की, व्हाइसरॉयच्या कार्यकारी–मंडळांतील दलितवर्गीय सभासदांव्यतिरिक्त

हिंदू सभासद व मुसलमान सभासद यांची संख्या समान असावी. मध्यवर्ति सरकारांत हिंदूंच्या बरोबरीचें प्रतिनिधित्व आपणास मिळावें हा लीगचा हट्ट या सूचनेमुळें पुरवण्यांत आलेला होता. १९३७ सालापासून हिंदुस्थानांतील इतर अल्पसंख्य गटांचें संरक्षण करण्याची खास जिम्मेदारी मुस्लिम लीग व जिनासाहेब यांनीं स्वतःच्या शिरावर घेतलेली दिसते! 'हिंदूंची अधिकृत व प्रातिनिधिक अशी संस्था' जी राष्ट्रसभा ती आतां 'अल्पसंख्याकांना छळूं व दडवूं पहात आहे,' अशी राष्ट्रसभेच्या नांवानें दवंडी पिटण्याचें कार्य लीगनें स्वतःच्या मागण्यांचा पुरस्कार करीत असतां चालवलेलें आहे. दलितवर्ग हा हिंदुसमाजापेक्षां भिन्न वर्ग असून त्याला लीगकडून संरक्षणाची अपेक्षा आहे असें लीग मानीत असते. राष्ट्रसभा ज्या जनतेची प्रतिनिधि आहे, त्या जनतेच्या वाढत्या शक्तीला शह देण्यासाठीं उपयोगी पडणारें एकमेव प्यादें आपल्या बाजूला असावें म्हणून ब्रिटिश सरकार दक्षता घेत असतें आणि लीगच्या सतत वाढत्या मागण्या पुऱ्या पाडण्यासाठीं तें तिला सवलतींमागून सवलती देत असतें. दलितवर्गीयांव्यतिरिक्त हिंदू व मुसलमान यांच्यामध्यें अधिकारसमता ठेवण्यासंबंधीं देण्यांत आलेली ही जी नवीन सवलत आहे, ती सरकारच्या आतांपर्यंतच्या लीगचे लाड पुरवण्याच्या नीतीला धरूनच होती. पण पूर्वीच्या प्रसंगीं जो अनुभव आला तोच याहि वेळीं आला. लीगचें समाधान झालें नाहीं आणि कार्यकारी–मंडळावर घेण्यांत येणाऱ्या सर्व मुसलमान सभासदांचा निर्देश मीच करणार असा हट्ट जनाब जिनांनीं घेतल्याकारणानें लॉर्ड् वेव्हेल् यांची योजनाहि बारगळली. योजनेच्या अपयशाचा धनी मी आहें असें जें लॉर्ड् वेव्हेल्नीं म्हटलें तें अगदीं खरें होतें. वेव्हेल्साहेबांच्या योजनेच्या प्रसंगानें मुस्लिम लीगच्या गटातर्फे जी मागणी पुढें टाकण्यांत आली तिचा अर्थ असा होतो कीं, दलितवर्गाव्यतिरिक्त हिंदूंच्या बरोबरीचे नव्हे, तर दलितवर्गासकट हिंदू व इतर अल्पसंख्याक या सर्वांच्या बरोबरीचे हक्क मुस्लिम लीगला देण्यांत आले पाहिजेत. सिमला–परिषदेनंतर १४ जुलै १९४५ला पत्रप्रतिनिधींना दिलेल्या मुलाखतीच्या प्रसंगीं जिनासाहेब म्हणाले कीं :—

'सूचित केलेल्या कार्यकारी मंडळांत आमची शक्ति एकतृतीयांशावर येऊन बसेल. दलितवर्ग, शीख, ख्रिश्चन वगैरे सर्व अल्पसंख्याकांचें ध्येय राष्ट्रसभेप्रमाणेंच आहे. अल्पसंख्याक म्हणून त्यांचीं गाऱ्हाणीं असलीं, तरी त्यांचें ध्येय व विचारप्रणाली अखंड हिंदुस्थानच्या कल्पनेला धरूनच आहे. ते अखंड हिंदुस्थानच्या विरुद्ध असणें शक्यहि नाहीं. वांशिक व सांस्कृतिकदृष्टया हिंदु समाजाशीं ते पूर्णपणें निगडित झालेले आहेत. अल्पसंख्याकांच्या पदरांत न्याय्य हक्कांचें पुरेपूर माप टाकण्यास माझा विरोध नाहीं. ते कोणत्याहि प्रांतांत वसत असोत, त्यांना पूर्ण संरक्षण देण्यांत आलें पाहिजे. पण प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांचीं मतें निश्चितपणें आमच्या विरुद्धच जाणार आणि त्यामुळें व्हाइसरॉयच्या खास मताव्यतिरिक्त दुसरें कोणतेंहि संरक्षण आम्हांला उरणार नाहीं. पण बहुमतानें जें धोरण ठरवण्यांत येईल किंवा तत्त्वें स्वीकारण्यांत येतील अथवा राज्यकारभारामध्यें व कायद्यांमध्यें ज्या उपाययोजना करण्यांत येतील, त्यांच्या विरुद्ध उठल्या-बसल्या सहजासहजीं वापरतां येण्यासारखा हा अधिकार नसतो, हें सर्वच घटनाशास्त्राच्या अभ्यासकांना ठाऊक आहे.' तेव्हां अल्पसंख्याक समाजाला बहुसंख्याकांचें स्थान देणें अथवा निदानपक्षीं, बहुसंख्याकांच्या समान दर्जावर त्याला आणून बसवणें याव्यतिरिक्त अल्पसंख्याकांच्या रक्षणाचें दुसरें कांहीं साधन उरत नाहीं. या युक्तिवादामध्यें अल्पसंख्य समाजांचे आपण रक्षणकर्ते असल्याचा बहाणा जिनासाहेबांनीं सोडला असून केवळ दलितवर्गीयांचें व शिखांचेंच नव्हे, तर ख्रिश्चनांचें ध्येय देखील राष्ट्रसभेप्रमाणेंच असल्याविषयींची जाणीव त्यांना झालेली असून प्रत्यक्ष व्यवहाराच्या वेळीं त्यांचीं मतें राष्ट्रसभेच्या बाजूला व लीगच्या विरुद्ध पडतील अशी भीतीहि त्यांनीं व्यक्त केल्याचें आढळून येतें. मुसलमानांचें रक्षण करण्यास समर्थ असणाऱ्या व्हाइसरॉयच्या जादा मताचा अधिकार परिणामशून्य व भ्रामक ठरणार अशी शंका त्यांना वाटत आहे. हिंदुस्थानांतील कोणत्याहि गटाकडून आपणाला पाठिंबा मिळण्याची उमेद लीगला धरतां येऊं नये, स्वतःच निर्दिष्ट न केलेल्या मुसलमानांच्या पाठिंब्याचा

देखील भरंवसा तिला वाटूं नये, यापेक्षां लीगच्या धोरणाचा व विचारसरणीचा स्पष्ट धिःकार तो कोणता असणार ?

## १६. दुसऱ्या भागाचें सार

जातीय प्रश्नाच्या इतिहासाचें आपण बरेंच दूरवर जाऊन अवलोकन केलें. मुसलमानांची बाजू व ब्रिटिश सरकारनें या घटनेमध्यें पार पाडलेली भूमिका यांचाहि आपण विशेष तपास केला. आतां येथवर केलेल्या सुदीर्घ चर्चेचे विभाग पाडून आपण त्यांचा सारांश काढूं या.

ईस्ट् इंडिया कंपनीची शक्ति वाढत चालली होती व हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेचा पाया भरला जात होता तो पहिला कालखंड. पुरातन काळापासून चालत आलेल्या 'फोडा व झोडा' या तत्त्वावर कंपनीची नीति आधारलेली होती आणि एका राजाविरुद्ध दुसऱ्याची कड घ्यावयाची व कंपनीविरुद्ध त्यांना एकोपा करूं द्यावयाचा नाहीं, हे त्यांच्या नीतीचें सार होतें. एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम पादाच्या अखेरीपर्यंत जवळजवळ सर्व स्वतंत्र हिंदी संस्थानिक शरण तरी आले होते किंवा इंग्रजांशीं सख्य साधून तरी राहिले होते. मोंगल बादशहा निर्बळ बनून दिल्लीच्या तख्तावर नामधारी सत्ताधीश होऊन राहिलेला होता. जीं स्वतंत्र संस्थानें अद्यापि तगून राहिलेलीं होतीं, तींहि पुढें लवकरच निकालांत निघालीं.

यानंतरच्या कालखंडांत या ना त्या निमित्तानें प्रदेशांमागून प्रदेश कंपनीनें जिंकून घेऊन आपल्या सत्तेची दृढ स्थापना केली. परकीय अमलाविरुद्ध गाढ व सर्वदूर असंतोष पसरलेला होता. सत्ता व प्रतिष्ठा यांचीच तेवढी हानि मुसलमानांना विशेष जाणवली असें नव्हे, तर त्यांच्या ऐहिक वैभवाचा लोपहि त्यांना जाणवला. मुसलमानांमध्यें समाजसुधारणेच्या आंदोलनाला चालना मिळाली, पण त्याला पंजाबांत राज्याधिकारावर असणाऱ्या शिखांच्या विरुद्ध पुकारलेल्या 'जिहादा'चें स्वरूप प्राप्त झालें. या धर्मयुद्धाला ब्रिटिशांनीं प्रत्यक्ष पाठिंबा दिलेला असो वा नसो, हिंदुस्थानच्या वायव्य भागांत शिखांची स्वतंत्र

सत्ता विद्यमान् होती तोंपावेतों मुसलमानांनीं पुकारलेल्या या धर्मयुद्धाकडे त्यांनीं कानाडोळा केला खास. शिखांच्याकडून पंजाब प्रांत जिंकून घेतल्या-नंतर मात्र जिहादचें आंदोलन भरङ्कन काढण्यांत आलें.

आंतल्या आंत खदखदत असलेला हा असंतोष १८५७ च्या बंडाच्या रूपानें उफाळून वर आला. हिंदू व मुसलमान दोघेहि त्यांत सामील झाले. दोघेहि दिल्लीच्या बुड्ढया बादशहाच्या निशाणाभोंवतीं गोळा झाले. बंड फसलें, मोंगल साम्राज्याची इतिश्री झाली व हिंदुस्थानचें सार्वभौमत्व इंग्लंडच्या राणीच्या हातीं गेलें. बंडाच्या पाठोपाठ जो दडपशाहीचा वरवंटा फिरवण्यांत आला, त्यामुळें मुसलमानांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. दडपशाही-मुळें माजलेल्या हाहाःकारांतून देशाचें डोकें वर निघेपर्यंत बऱ्याच वर्षांचा अवधि लोटला.

नव्यानें प्रचलित झालेल्या इंग्रजी शिक्षणाचा फायदा हिंदूंनीं पदरांत पाडून घेतला, पण मुसलमानांची रुष्टता कायमच राहिली व ते इंग्रजी विद्येंत मागें पडले. मुसलमानांची शैक्षणिक उन्नति करण्यासाठीं सर सय्यद अहमद खान यांनीं चळवळ सुरू केली आणि त्यांनीं अलीगढ कॉलेजची स्थापना केली. राजकीय जागृतीच्या दृष्टीनें पाहिलें तर १८८५ सालीं हिंदी राष्ट्रसभेची स्थापना होऊन त्यामुळें सर्व प्रांतांतील सर्व इंग्रजी शिकलेल्या हिंदी सुशिक्षितांना एकत्र येण्याची व सामाजिक दृष्टया महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा करून तक्रारी दूर करण्यासाठीं सरकारला सूचना करण्याची सोय झाली. बेक् नामक एक गृहस्थ अलीगढ कॉलेजचा प्राध्यापक बनून आला आणि त्यानें तेथील विद्यार्थ्यांचींच नव्हे, तर प्रायः सर्व मुस्लिम राजकारणाचीं सूत्रेंच आपल्या हातीं घेतलीं. त्याच्या सल्लयाचा परिणाम होऊन सर सय्यदांनीं मुसलमानांना राष्ट्रसभेपासून दूर राहाण्याचा सल्ला दिला. तरीहि अनेक मुसलमानांनीं आपला राष्ट्रसभेबरोबरचा संबंध कायम ठेवलाच. परंतु इंग्लंडमधील हुजूरपक्षीय मंडळींशीं सख्य करण्याच्या व मुसलमानांच्या प्रगतीप्रीत्यर्थ येथील सरकारी अधिकाऱ्यांवर विसंबून राहाण्याच्या वृत्तीला अनुकूल अशा प्रकारची शिकवणूक अलीगढ

कॉलेजांत मिळत गेली. बेक्च्या व त्याच्यामागून प्राध्यापक झालेल्या मॉरिसन्च्या प्रेरणेनें व त्यांच्याच मार्गदर्शनानें पेट्रिऑटिक् असोसिएशन् व महॉमेडन् डिफेन्स असोसिएशन् यांची स्थापना झालेली होती व काम चाललेलें होतें.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत लॉर्ड कर्झन्नें बंगालची फाळणी केली. मुसलमानांची बहुसंख्या असलेला एक प्रांत निर्माण करणें हा त्यांतला स्पष्ट उद्देश होता. फाळणीच्या योजनेला तीव्र विरोध झाला. फाळणीला विरोध करणाऱ्यांच्यांत बरेच प्रतिष्ठित मुसलमान असले, तरीहि सरकारच्या अपेक्षेनुसार बंगालमधील हिंदु- सलमानांत तेढ निर्माण झालीच. लॉर्ड् कर्झन्च्या निवृत्तीनंतर लॉर्ड् मिंटो व्हाइसरॉय्च्या जागेवर आले. त्यांनीं भारतमंत्री लॉर्ड मोर्ले यांच्याशीं विचारविनिमय करून राज्यसुधारणेची एक योजना बनवली. राजकीय सुधारणेसंबंधींचा विचार चालू असतांच व्हाइसरॉयच्या खाजगी चिटणिसांशीं दळणवळण असणारे त्या वेळचे अलिगढ कॉलेजचे प्राध्यापक आर्क् बोल्ड् यांच्या सल्ल्यानुसार मुसलमानांचें एक शिष्टमंडळ उभें करण्यांत आलें. आगाखानांच्या नेतृत्वाखालीं व्हाइसरॉयकडे नेण्यांत आलेल्या शिष्टमंडळाला उत्तर म्हणून मुसलमानांच्या खास मागण्यांना मान्यता आणि विभक्त मतदारसंघांतून विधिमंडळासाठीं प्रतिनिधी निवडण्याची सवलत त्यांना देण्यांत आली. या चतुराईमुळें राजद्रोह्यांना सामील होण्यापासून मुसलमान निवृत्त झाले ही फार मोठी कामगिरी व्हाइसरॉयनें बजावली आहे, असे धन्योद्गार येथील व इंग्लंडमधील ब्रिटिशांनीं काढले. येणेंप्रमाणें दुहीचें जें बीज पेरलें गेलें, त्याचा आतां वृक्ष बनला असून त्याचीं मुळें खोलवर व शाखा दूरवर पसरलेल्या आहेत. त्यांपासून देशाचें अपरिमित नुकसान व ब्रिटनचें कायमचें हित साधलें असून हिंदी स्वातंत्र्याचा मार्ग या अडथळयामुळें रोखला गेला आहे.

नाखुषीनें कां होईना, पण राष्ट्रसभेनें विभक्त मतदारसंघांना मान्यता दिली; येवढेंच नाहीं, तर ज्या प्रांतांमध्यें मुसलमान अल्पसंख्य होते, तेथें त्यांच्या

लोकसंख्येच्या मानानें बऱ्याच अधिक प्रमाणांत त्यांना प्रतिनिधित्व देण्यासहि ती तयार झाली. १९१६ च्या डिसेंबरांत राष्ट्रसभा व अखिल भारतीय मुस्लिम लीग यांच्यामध्यें लखनौ–करार झाला आणि ब्रिटिश सरकारकडे एक संयुक्त मागणी करण्यांत आली. ह्याचे दोन भाग होते. विभक्त मतदारसंघ व विधिमंडळांतील मुसलमानांचें प्रतिनिधित्व यांचा विचार एका भागांत होता; आणि देशाच्या राज्यकारभारांत जनतेला वाटा मिळावा अशी सौम्य स्वरूपाची राजकीय मागणी दुसऱ्या भागांत होती. मि. मॉंटेग्यू व लॉर्ड चेम्स्फर्ड् यांच्या नांवांनीं जी राजकीय सुधारणेची योजना प्रत्यक्ष बनवण्यांत आली, तिच्यामध्यें विभक्त मतदारसंघासंबंधींचा भाग पूर्णतया समाविष्ट करण्यांत आला होता; पण प्रांतिक कारभारांत द्विदल राज्यपद्धति म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीचा समावेश करून राजकीय मागणीला मात्र वाटाण्याच्या अक्षता लावण्यांत आलेल्या होत्या!

युरोपांत व हिंदुस्थानांत चालू असलेल्या घडामोडींचा परिणाम होऊन देशांतील सर्व जातींच्या व पंथांच्या लोकांमध्यें अधिकाधिक जागृति सतत निर्माण होत होती. पंजाबांतील अघोर घटना व खिलापत–प्रकरण यांच्यामुळें हिंदू व मुसलमान दोघेहि एकाच सामुदायिक आंदोलनांत सामील होऊन गेले आणि राष्ट्रसभा, खिलापत–समिति, जमायत–उल्–उलेमा व इतर संस्था एकाच कार्यक्रमासाठीं सहकार्यानें झटूं लागल्या. लॉर्ड लॉइड्नें म्हटल्याप्रमाणें जयश्रीची माळ त्यांच्या गळ्यांत जवळजवळ पडलीच होती. व्हाइसरॉय 'भांबावून–गोंधळून' गेले अशी चळवळ झाली. हिंदू व मुसलमानांपैकीं बहुतेक अव्वल दर्जाचे नेते तुरुंगांत पडल्यानंतर आणि पोलिसांवर जनतेकडून अत्याचार झाला म्हणून सविनय कायदेभंगाची चळवळ मागें घेण्यांत आल्यानंतर हिंदु–मुसलमानांमधील दंग्यांना सुरवात झाली व ते पुढें कित्येक वर्षें चालू राहिले. सहकार्याचीं व सहश्रमाचीं स्फूर्तीप्रद चित्रें दिसेनाशीं होऊन यादवीनें व झगड्यानें त्यांची जागा घेतली. राष्ट्रसभा व मुसलमानांच्या संघटना यांनीं एकमतानें ज्या अहिंसक असहकाराच्या कार्यक्रमाचा

स्वीकार केला होता त्याचें सामर्थ्य क्षीण होऊन तो पुढें अजिबात बंद पडला.

गौहत्ती येथील राष्ट्रसभेच्या अधिवेशनानंतर हिंदु—मुसलमानांचा प्रश्न सोडवण्याची खटपट करण्यांत आली; पण तोंपर्यंत त्या प्रश्नाचें स्वरूप बिकट होऊन बसलें होतें. १९२७च्या प्रारंभीं हिंदु—मुसलमान पुढाऱ्यांत विचारविनिमय होऊन कांहीं प्रमुख मुसलमान नेत्यांनीं 'मुसलमानांच्या मागण्या' असें ज्यांना म्हणतात, त्या पुढें मांडल्या. त्या चतुर्विध स्वरूपाच्या होत्या. विभक्त मतदारसंघांचें अनिष्टत्व हिंदी विचारवंतांना समजून चुकलें होतें. मुसलमानांच्या मागण्यांमध्यें विभक्त मतदारसंघ रद्द करण्याची तयारी दर्शवण्यांत आलेली होती; पण ती पुढील मुद्दे मान्य करण्यांत आल्यास. ते मुद्दे असे : (१) सिंधचा स्वतंत्र प्रांत करावा; (२) इतर प्रांतांप्रमाणेंच सरहद्द प्रांतांत व बलुचिस्तानांत राज्यकारभार सुरू व्हावा; (३) बंगाल व पंजाब प्रांतांतील मुसलमानांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत त्यांना विधिमंडळांमध्यें प्रतिनिधित्व देण्यांत यावें; (४) मध्यवर्ति कायदेमंडळांतील त्यांचें प्रतिनिधित्व एकंदर जागांच्या एक-तृतीयांशाहून कमी नसावें.

अधिक विचार व वाटाघाटी होऊन आतां राष्ट्रसभा व लीग यांच्या दरम्यान तडजोड होणार असें मद्रासमध्यें १९२७च्या डिसेंबरांत राष्ट्रसभेचें अधिवेशन भरल तेव्हांचें वातावरण होतें.

१९२० च्या राजकीय सुधारणांवर राष्ट्रसभा व मुस्लिम संस्था यांनीं बहिष्कार घातला होता. देशांतील एकाहि पक्षाचें त्यांच्यामुळें समाधान झालेलें नव्हतें. देशांतील मवाळ गट मात्र त्या राज्यकारभारांत भाग घेत होता. १९२० च्या सुधारणांत बदल करावा म्हणून जनतेचा अट्टाहास चालला होता, तर सरकारनें आपलें विरोधी धोरण कायम ठेवलें होतें. शेवटीं १९२७ सालच्या अखेरीस सरकारनें चालू राज्यकारभाराबद्दलचा अहवाल सादर करण्यासाठीं एक चौकशीमंडळ नेमलें. या मंडळामध्यें एकाहि हिंदी गृहस्थाला घेण्यांत आलेलें नव्हतें. त्यामुळें साहजिकच लोकांना चीड आली. राष्ट्रसभा, मुस्लिम लीग, प्रागतिक इत्यादि सर्वच गटांची भावना एकाच प्रकारची होती.

राष्ट्रसभेनें व प्रागतिकांनीं मंडळावर बहिष्कार घालण्याचें ठरवलें. पण बहिष्काराच्या व विभक्त मतदारसंघांच्या प्रश्नावर मुस्लिम लीगमध्यें दुफळी माजली. मद्रास येथील राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत संमत करण्यांत आलेल्या ठरावानुसार नेमण्यांत आलेल्या समितीनें इतर गटांबरोबर व समित्यांबरोबर सहकार्य करून हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणांचा एक आराखडा तयार केला. तिनें तयार केलेल्या अहवालालाच 'नेहरू–अहवाल' या नांवानें संबोधण्यांत येतें. कलकत्ता येथें भरलेल्या सर्व पक्षांच्या अखिल भारतीय परिषदेला तो अहवाल सादर करण्यांत आला होता. मध्यवर्ति विधिमंडळामध्यें मुसलमानांचें प्रतिनिधित्व एकतृतीयांशापेक्षां कमी नसावें, सार्वत्रिक मतदानपद्धति चालू होणार नसल्यास बंगाल व पंजाबमध्यें मुसलमानांना लोकसंख्येच्या प्रमाणांत जागा देण्यांत याव्यात व शेषाधिकार मध्यवर्ति सत्तेकडे राहावेत अशा उपसूचना लीगतर्फे परिषदेमध्यें मांडण्यांत आल्या. त्या फेटाळण्यांत आल्यावर लीग परिषदेमधून बाहेर पडली. मुस्लिम–सर्वपक्षीय–परिषदेची स्थापना झाली आणि कांहीं काळानंतर लीगच्या दोन्ही फळ्या मुस्लिम–सर्वपक्षीय–परिषदेंत विलीन होऊन जनाब जिनांचे चौदा मुद्दे हीच मुसलमानांची मागणी बनली.

मुसलमानांच्या मागण्यांमधील दोन मुख्य कलमें अशीं होतीं कीं, हिंदुस्थानकरतां जी राज्यघटना बनवण्यांत येईल ती संयुक्त असावी आणि प्रांतांमधील विधिमंडळें आदिकरून प्रातिनिधिक संस्था अशा निश्चित तत्त्वानुसार चालवण्यांत याव्यात, कीं प्रत्येक प्रांतांतील अल्पसंख्याकांना पुरेसें व परिणामकारक प्रतिनिधित्व मिळावें. पण कोणत्याहि प्रांतांतील बहुसंख्याकांना त्यामुळें अल्पसंख्य बनण्याचा अथवा समसंख्य बनण्याचा देखील धोका उरूं नये. संयुक्त राज्यपद्धतीची सूचना पहिल्या गोलमेज परिषदेंत मान्य करण्यांत आली. परंतु गोलमेज परिषदेच्या अल्पसंख्याक–समितीला सर्वसंमत योजना बनवण्याच्या कामीं अपयश आल्याकारणानें मि. मॅक्डोनल्ड् यांनीं ज्याला जातीय निर्णय असें म्हणतात तो निर्णय दिला. जिनांच्या चौदा मुद्यांपैकीं बहुतेक मुद्दे या निर्णयामध्यें स्वीकारण्यांत आलेले आहेत. दोन मुद्यांबाबत मात्र

असा निकाल देण्यांत आला होता कीं, मध्यवर्ति कायदेमंडळांत मुसलमानांच्या प्रतिनिधित्वाचें प्रमाण काय असावें याचा निर्णय नंतर देण्यांत यावा व राज्य-कारभारासाठीं अवश्य तो पैसा उभा करणें शक्य झाल्यासच सिंधचा स्वतंत्र प्रांत बनवावा. या निर्णयामुळें हिंदू व शीख यांचेवर अन्याय झालेला आहे. ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य होते, तेथें त्यांना पूर्वीं मिळालेल्या जादा जागा कायमच ठेवण्यांत आल्या आहेत. पण बंगालमध्यें अल्पसंख्य म्हणून हिंदूंना जादा जागा देण्याऐवजीं त्यांची लोकसंख्या शेंकडा ४४·८ असूनहि फक्त ३२ टक्के प्रतिनिधित्वावर त्यांची बोळवण करण्यांत आलेली असून, हिंदूं-वरील हा अन्याय प्रांताच्या लोकसंख्येमध्यें शेंकडा ·०१ टक्के प्रमाणांत असणाऱ्या युरोपियनांना शेंकडा १० टक्के प्रतिनिधित्व देतां यावें म्हणून केलेला आहे. मुसलमानांच्या प्रतिनिधित्वामध्येंहि त्यामुळें घट झाली असली, तरी हिंदूंना मुसलमानांच्यापेक्षां अधिक घस सोसावी लागली आहे. पंजाबांत देखील अल्पसंख्य म्हणून हिंदूंना जादा जागा मिळण्याऐवजीं त्यांना घस सोसून शिखांसाठीं अधिक जागांची सोय करावी लागलेली आहे. मुसलमानांना इतर प्रांतांमध्यें जितक्या प्रमाणांत जादा प्रतिनिधित्व मिळालें आहे, तितक्या प्रमा-णांत तें पंजाबमध्यें शिखांना मिळालेलें नाहीं. या पंक्तिप्रपंचामुळें हिंदूंकडून व शिखांकडून जातीय निर्णयाला साहजिकच विरोध झाला. तथापि, त्या विरो-धाला न जुमानतां १९३५ च्या कायद्यांत जातीय निर्णयाचा समावेश करण्यांत आला. पुढें जातीय निर्णयाला पर्याय शोधून काढण्याच्या बुद्धीनें अलाहाबाद येथील ऐक्य–परिषदेमार्फत जे प्रयत्न करण्यांत आले, ते ब्रिटिश सरकारनें उधळून टाकून ऐक्य–परिषदेंत झालेली तडजोड धुळीस मिळवली.

१९३५ चा कायदा मंजूर झाल्यावर मुस्लिम लीगनें फिरून कोलांटी उडी मारली. मुस्लिम–सर्वपक्षीय–परिषद व लीग संयुक्त राज्यघटनेसाठीं सतत आरडाओरड करीत होत्या व जिला ब्रिटिश सरकारनें मान्यता देऊन १९३५ च्या कायद्यांत समाविष्ट करून टाकली होती, त्याच संयुक्त राज्य-पद्धतीला या संस्थांकडून मोठ्या हिरीरीनें विरोध होऊं लागला. १९३५ च्या

कायद्यान्वयें तदनंतर ज्या निवडणुकी झाल्या, त्यांत चार प्रांत असे होते कीं, जेथें लीगला एक देखील जागा जिंकतां आली नाहीं, आणि ज्या प्रांतांत मुसलमानांची बहुसंख्या आहे तेथेंहि मुसलमानांच्या जागांपैकीं बहुसंख्य जागा लीगला मिळवतां आल्या नाहींत. अशा परिस्थितींत इतर गटांशीं सहकार्य केल्याशिवाय लीगला एकाहि प्रांतांत मंत्रिमंडळ बनवणें शक्य नव्हतें; आणि कांहीं प्रांतांत लीगचा एकहि प्रतिनिधि नसल्यामुळें व एक सोडून इतर कोणत्याहि प्रांतांत मुसलमान जागांपैकीं देखील बहुसंख्य जागा लीगला मिळालेल्या नसल्यामुळें तिच्या सहकार्यानें संमिश्र मंत्रिमंडळ स्थापणें राष्ट्रसभेला शक्य नव्हतें. एवंच, एकाहि प्रांतांत स्वतःचें मंत्रिमंडळ स्थापन न करतां आल्यानें लीगचा तीळपापड उडाला व तिनें राष्ट्रसभेशीं वैर धरलें. मंत्रिपदांवराल राष्ट्रसभेचें आसन स्थिर होतें न होतें, तोंच राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनी मुसलमानांवर केलेल्या जुलमांची एक जंत्रीच्या जंत्री लीगतर्फे प्रसिद्ध झाली. परंतु ज्या गव्हर्नरांच्या शिरावर अल्पसंख्याकांचें रक्षण करण्याची जबाबदारी टाकण्यांत आलेली होती, त्यांना राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं मुसलमानांवर केलेल्या अन्यायांचें एकहि उदाहरण दाखवतां आलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर अधिकारावर असतांना व अधिकार–निवृत्त झाल्यानंतरहि त्यांनीं राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं केलेल्या राज्यकारभाराविषयीं प्रशंसोद्गारच काढले. हिंदुस्थानच्या सर न्यायाधीशासारख्या व्यक्तींकडून मंत्रिमंडळांवरील आक्षेपांची छाननी करून घेण्यांत यावी म्हणून राष्ट्रसभेनें केलेले प्रयत्न जिनांनीं फेटाळून लावले. आपसांतल्या मतभेदांची चर्चा करून तडजोड निघते का पाहावी म्हणून राष्ट्रसभेनें जे जे प्रयत्न केले त्यांचा मार्ग, लीगला मुस्लिम हिंदुस्थानची एकमेव प्रतिनिधि मानावी अशी मागणी करून जनाब जिनांनीं सुरवातीला बंद करून टाकला! ही मागणी राष्ट्रसभेकडून मान्य करवून घेऊन केवळ राष्ट्रसभेंतल्या मुसलमानांचीच नव्हे, तर लीगच्याव्यतिरिक्त संस्थांमध्यें असणाऱ्या मुसलमानांची स्थिति त्रिशंकूप्रमाणें करावी व राष्ट्रसभेला निव्वळ हिंदूंची प्रतिनिधि ठरवावें हा या मागणीचा हेतु होता. दुसरें

महायुद्ध सुरू झाल्यावर राष्ट्रसभेच्या मंत्र्यांनीं राजीनामे दिले, तेव्हां लीगनें तो दिवस 'मुक्तिदिन' म्हणून साजरा केला. हिंदुस्थानाच्या बाबतींत युद्ध-हेतूची अंमलबजावणी कशाप्रकारें करणार याचें स्पष्टीकरण करावें, युद्धोत्तर स्वातंत्र्याचें अभिवचन द्यावें व युद्धकालामध्यें राष्ट्रीय सरकार स्थापन करावें या राष्ट्रसभेच्या मागण्या सरकारनें धुडकावून लावल्या; पण लीगच्या म्हणण्यास रुकार देऊन १९३५च्या कायद्यांतला संयुक्त राज्यघटनेचा भाग सरकारनें तहकूब ठेवला, आणि हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनांतील संस्थानिक, मुसलमान, अस्पृश्य आदिकरून जे महत्त्वाचे घटक आहेत, त्यांची पसंति व संमति ज्यांना नसेल अशा राज्यघटनेबद्दलच्या कोणत्याहि योजना चालू करण्यांत येणार नाहींत असें जाहीर करून टाकलें! इतक्यानें देखील समाधान न झाल्याकारणानें १९४०मध्यें लीगनें पाकिस्तानचा ठराव आपल्या लाहोर येथील अधिवेशनामध्यें संमत केला, आणि त्यानंतरच्या मद्रास येथील अधिवेशनांत पाकिस्तानची प्राप्ति हा लीगच्या ब्रीदाचा एक भागच बनवला.

मद्रास अधिवेशनापावेतों मुसलमान ही हिंदुस्थानांतील एक अल्पसंख्य जमात असून तिचे हितसंबंध सुरक्षित ठेवणें आवश्यक आहे असेंच लीग व मुसलमानांच्या इतर संस्था मानीत असत. ते हितसंबंध सुरक्षित राहावेत म्हणून विभक्त मतदारसंघांपासून जिनांच्या चौदा मुद्द्यांपर्यंत सर्व तऱ्हेच्या योजना वेळोवेळीं सुचवण्यांत आल्या व सरकारनेंहि त्यांचा स्वीकार केला. हिंदुस्थानची राज्यघटना संयुक्त स्वरूपाची असावी ही त्यांनीं केलेल्या सूचनांपैकीं अत्यंत महत्त्वाची अशी सूचना होती, तीहि मान्य करण्यांत आली. परंतु इतकें करूनहि लीगचें समाधान झालें नाहीं. हिंदुस्थानच्या वायव्य व पूर्व भागांत मुसलमानांची बहुसंख्या असल्याकारणानें तेथें स्वतंत्र मुसलमानी राज्यें स्थापण्याचा लीगनें संकल्प केला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत लीग व ब्रिटिश सरकार यांच्यामध्यें ज्या वाटाघाटी चालू होत्या त्यांत लीगकडून पुढें टाकण्यांत आलेल्या मागण्या अशा होत्या कीं : (१) पाकिस्तान देण्यांत यावें; निदानपक्षीं, अखेरची राजकीय योजना जेव्हां होईल त्या वेळीं पाकि-

स्तानाच्या योजनेला विघातक ठरेल असें कोणतेंहि विधान वा कृत्य करण्यांत येऊं नये; ( २ ) मध्यंतरींच्या काळांत व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाची जी वाढ करण्यांत येईल, तिच्यांत राष्ट्रसभेनें भाग घेतल्यास बहुसंख्य जागा मुसलमानांना देण्यांत याव्यात; ( ३ ) मुसलमानांचीं नांवें निर्दिष्ट करण्याचा अधिकार मुस्लिम लीगलाच असावा, इतर कोणत्याहि संस्थेला तो असूं नये. हिंदूंच्या व राष्ट्रसभेच्या जुलमापासून इतर अल्पसंख्याकांचें रक्षण करण्याचा भार आपल्या शिरावर आहे अशी ऐट मुस्लिम लीग मारीत असे. दलितवर्ग हा हिंदूंच्याहून भिन्न वर्ग आहे व ती एक स्वतंत्र अल्पसंख्या आहे असें लीगचें म्हणणें होतें. वर ज्या लीगच्या मागण्या सांगितल्या त्यांच्यापैकीं पहिली मागणी हिंदी संस्कृतीमधून फुटून निघण्याचा हक्क प्रांतांना आहे असें जाहीर करून ब्रिटिश सरकारनें जवळजवळ मान्यच केली. दुसरी मागणी मान्य केल्याचें शब्दशः अभिवचन दिलेलें नसलें, तरी व्हाइसरॉयच्या कार्यकारी–मंडळामध्यें हिंदूंना व मुसलमानांना सारख्या प्रमाणांत घेतल्यामुळें ती व्यवहारतः मान्य केल्याप्रमाणेंच आहे. कार्यकारी–मंडळांमधील जागा स्वीकारून हिंदुमहासभेनेंहि या वांटणीच्या प्रमाणाला मान्यता दर्शवली ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे. लीगची तिसरी मागणी मात्र ब्रिटिश सरकारनें अमान्य करून आपल्याला पसंत पडेल त्या व्यक्तीला नेमण्याचा आपला हक्क अबाधित राखला. हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याचें आश्वासन देण्यांत यावें आणि प्रत्यक्ष युद्धाच्या हालचालींव्यतिरिक्त सर्व अखत्यार आतांच्या आतां हिंदी लोकांकडे सोपवण्यांत यावेत, असा राष्ट्रसभेनें आग्रह धरलेला होता. या राष्ट्रसभेच्या मागण्या सरकारकडून फेटाळण्यांत आल्याकारणानें मुंबई येथें अखिल भारतीय राष्ट्रसभा–समितीनें सविनय कायदेभंगाला संमति देणारा ८ ऑगस्टचा ठराव पास केला आणि नंतर राष्ट्रसभेच्या पुढाऱ्यांना अटक होऊन प्रचंड आंदोलनास प्रारंभ झाला. ऑगस्टचा ठरावाचा रोख आपल्याच विरुद्ध असून तो मागें घेण्यांत यावा अशी मागणी मुस्लिम लीगनें केली. पुढें ब्रिटिश सरकारनें नव्या योजना पुढें मांडल्या, त्यांनाच 'वेव्हेल्–योजना' असें म्हणतात.

वेव्हेल्–योजनेचा विचार करतां यावा म्हणून राष्ट्रसभेच्या कार्यकारी–मंडळाच्या सभासदांना मुक्त करण्यांत आलें. लॉर्ड् वेव्हेल् यांनीं एक बैठक भरवून तिच्यासाठीं राष्ट्रसभा व लीग यांचे प्रतिनिधी, मध्यवर्ति विधिमंडळांतील पक्षांचे नेते आणि प्रांतांचे मुख्य प्रधान यांना बोलावलें होतें. वेव्हेल्-योजनेमध्यें मूलगामी महत्त्वाचा असा मुद्दा हा होता कीं, कार्यकारी–मंडळामध्यें मुसलमान व दलित-वर्गाव्यतिरिक्त हिंदू यांना समान जागा मिळाव्यात. १९४१ सालापासूनच हें प्रमाण व्यवहारामध्यें अमलांत असल्याचा उल्लेख वर येऊन गेलेलाच आहे. परंतु या वेळीं मात्र योजनेचा एक भाग म्हणून त्याचा ब्रिटिश सरकारकडून स्वीकार करण्यांत आला; परंतु वेव्हेल्नें बोलावलेली बैठक निष्फळ ठरली. आपण निर्दिष्ट केलेले लोकच कार्यकारी–मंडळांत घेण्यांत आले पाहिजेत, असा लीगनें हट्ट धरला. जनाब जिनांची नाखुषी होण्याचें आणखी एक कारण असें होतें कीं, 'दलितवर्ग, शीख, ख्रिश्चन इत्यादि सर्वच अल्पसंख्यांकांचें ध्येय राष्ट्रसभेच्या ध्येयाशीं सदृश' असल्याकारणानें 'कारभार चालवतांना त्यांचीं मतें निरपवादपणें राष्ट्रसभेच्याच बाजूनें पडतील. व्हाइसरॉयच्या खास मताखेरीज दुसरें कोणतेंहि रक्षण मुसलमानांना उपलब्ध होणार नाहीं,' अशी शंका त्यांना वाटूं लागली. कार्यकारी–मंडळामध्यें हिंदू व मुसलमानांत समानता असावी ही मागणी व्यवहारतः मान्य केल्यानंतर जिनासाहेबांचा आतां असा हेका चालू झाला आहे कीं, मुसलमान व इतर सर्व अल्पसंख्याकांसकट हिंदू यांच्यांत समप्रमाण ठेवण्यांत आलें पाहिजे. कदाचित् या समप्रमाणानेंहि पुरेसें संरक्षण मिळत नाहीं असें वाटून उद्यां कदाचित् मुसलमानांनाच बहुसंख्य जागा मिळाव्यात अशीहि मागणी करण्यांत येईल !

येणेंप्रमाणें १९३० सालापासून मुस्लिम लीगच्या मागण्या व ब्रिटिशांनीं दिलेल्या सवलती यांच्यामधील तीन अवस्था आपल्या नजरेखालून गेल्या. राज्यघटना संयुक्त स्वरूपाची असावी व अल्पसंख्याकांना विधिमंडळांतून परिणामकारक व पुरेसें प्रतिनिधित्व मिळावें, असा आग्रह प्रारंभींच्या अवस्थेंत धरण्यांत आला होता. परंतु कांहीं प्रांतांत मुसलमान बहुसंख्य असून इतर

जातींची अल्पसंख्या असल्याकारणानें मुसलमानांच्याप्रमाणेंच त्या जातीदेखील स्वतःसाठीं जास्त प्रतिनिधित्व मागतील असा संभव होता. म्हणून परिणामकारक व पुरेशा प्रतिनिधित्वाची मर्यादा अशी ठरवण्यांत आली कीं, अल्पसंख्याकांना देण्यांत येणाऱ्या प्रतिनिधित्वामुळें कोणत्याहि प्रांतामधील बहुसंख्याक रहिवाशांना अल्पसंख्याक किंवा समसंख्याक बनण्याची पाळी येऊं नये. पुढें ब्रिटिश सरकारकडून संयुक्त राज्यपद्धतीच्या मागणीला रुकार देण्यांत आला. तसेंच ज्या प्रांतांमध्यें मुसलमान अल्पसंख्य होते, तेथें त्यांना भरमसाट जादा प्रतिनिधित्व देण्यांत आलें. बंगाल व पंजाबमधील हिंदूंना मात्र त्याच मापानें जादा प्रतिनिधित्व देण्यास नकार देण्यांत आला. बंगालमधील हिंदूंना त्यांच्या लोकसंख्येंतील प्रमाणाच्या मानानें कमी प्रतिनिधित्व मिळालें आणि युरोपियनांवर जागांची खैरात करण्यासाठीं हिंदूंना मुसलमानांच्यापेक्षां अधिक घस सोसावी लागली.

यानंतर दुसरी अवस्था. संयुक्त राज्यपद्धतीला मान्यता देऊन १९३५-च्या कायद्यांत तिचा अन्तर्भाव सरकारनें केला न केला तोंच लीगनें तिचा धिक्कार केला, आणि हिंदुस्थानच्या वायव्य व पूर्व भागांत स्वतंत्र मुसलमानी राज्यें स्थापन करण्यांत यावींत अशी मागणी लीगनें पुढें टाकली. मुसलमानेतर बहुसंख्य जमातींचा विचार करीत असतां बहुसंख्य जमातीला अल्पसंख्य वा समसंख्य बनवूं नये या मुद्द्याचा लीगला विसर पडला. राष्ट्रसभेनें सहकार्य केल्यास हिंदू व मुसलमानांना समप्रतिनिधित्व देऊन बहुसंख्य हिंदूंना अल्पसंख्य बनवावें असेंहि ती सुचवूं लागली! याहि वेळीं ब्रिटिश सरकारनें संयुक्त राज्यपद्धति तहकूब करून मुसलमानांना नापसंत असेल अशी कोणतीहि राज्यपद्धति स्वीकारण्यांत येणार नाहीं असें अभिवचन दिलें. हिंदु–मुसलमानांमधील समप्रतिनिधित्वाच्या मागणीलाहि सरकारनें शास्त्रतः नसली, तरी व्यवहारतः मान्यता दिली.

तिसऱ्या अवस्थेंत हिंदु–मुसलमानांच्या समप्रतिनिधित्वाचा मुद्दा सरकारी सूचनांमध्येंच अन्तर्भूत करण्यांत आल्याचें आढळून येतें. पण सर्व मुसलमान

प्रतिनिधींचीं नांवें निर्दिष्ट करण्याचा आपला हक्क नाकारण्यांत आल्याची सबब दाखवून लीगनें सरकारी सूचना फेटाळल्या व दलितवर्ग, शीख, ख्रिश्चन वगैरे अल्पसंख्याक हमेशा हिंदूंशींच सहकार्य करणार, हें निश्चित असल्या-कारणानें मुसलमानांना आपले हितसंबंध सुरक्षित राखतां येणार नाहींत असा युक्तिवाद लीग करूं लागली. केवळ बहुसंख्याक हिंदूंच्याच नव्हे, तर हिंदूंच्या-सकट इतर सर्व अल्पसंख्याकांच्या संयुक्त प्रतिनिधित्वाहून अधिक प्रबळ प्रति-निधित्व देशांतील अल्पसंख्याक अशा मुसलमानांना दिल्यावांचून आपल्या हित-संबंधांचें संरक्षण होणें मुसलमानांना आतां अशक्य वाटूं लागलें आहे!

लीगच्या मागण्या व ब्रिटिशांच्या मनधरण्या यांच्यांत जी ही शर्यत लाग-लेली आहे, तिच्यांत लीग ब्रिटिशांच्या नेहमीं दोन पावलें पुढें असल्याचें दिसून येतें. देशांत बहुसंख्य असणारे जे हिंदू व इतर अल्पसंख्य जमाती त्यांना तर मैदानांत प्रवेश मिळण्यालाहि मज्जाव आहे; मग त्यांनीं या सामन्यांत भाग घेणें दूरच राहिलें! अशा परिस्थितींत हिंदुस्थानांतील त्रिपक्षांपैकीं ब्रिटिशांचा पक्ष अधिकाधिक महत्त्वास चढावा व उरलेल्या दोन पक्षांतील म्हणजे हिंदू व मुसलमानांतील दृष्टिकोन भिन्न होत जावेत, यांत नवल नाहीं.

भाग तिसरा

# फाळणीच्या विविध योजना

# प्रास्ताविक

हिंदु व मुसलमान हीं दोन पृथक् राष्ट्रें आहेत, या सिद्धांताचा येथवर बराच खल करण्यांत आलेला आहे. हिंदुस्थानवर दीर्घ कालपर्यंत चालू असलेल्या मुसलमानांच्या राजवटीमध्यें संपूर्णतया ना हिंदु ना मुसलमान अशी हिंदु–मुसलमानांची संयुक्त संस्कृति दोन्ही जमातींतल्या लोकांकडून बुद्धिपुरःसर झालेल्या प्रयत्नांमुळें आणि त्या काळांत अखंड चालू राहिलेल्या आर्थिक, राजकीय, सामाजिक व धार्मिक घटनांच्या प्रभावामुळें निर्माण होत चालली होती. मुसलमानी हिंदुस्थान व बिगर मुसलमानी हिंदुस्थान अशीं हिंदुस्थानचीं दोन छकलं पाडण्याच्या योजनेला आधार दाखवण्याच्या हेतूनें हा द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत गेल्या कांहीं वर्षांतच पोतडीच्या बाहेर काढण्यांत आलेला आहे, हेंहि आपण समजून घेतलें. तथापि १९४० नंतर मुस्लिम लीगनें हिंदुस्थानची फाळणी करून घेण्याचा आपला निर्धार अनेकवार जाहीर केलेला आहे, आणि अखिल भारतीय मुस्लिम लीगला देशांतील मुसलमानांच्या फार मोठया गटाचा पाठिंबा आहे, ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. म्हणून फाळणीच्या समर्थनार्थ जो अवांतर युक्तिवाद मांडण्यांत येत असतो, तो बाजूला ठेवून त्या योजनेच्या गुणावगुणांवरूनच तिच्या व्यवहार्यतेचें मोजमाप आपण करून पाहिलें पाहिजे. या योजनेला अनुकूल व प्रतिकूल असें पुष्कळच बोलण्यांत व लिहिण्यांत आलेलें आहे. दोन्ही पक्षांनीं अभिनिवेशानें आपापली तरफदारी केलेली असून त्यांत भावनाविवशताहि थोडीथोडकी आढळून येत नाहीं. अर्थात् भावनेलाहि किंमत असते. तिची किंमत कमी समजून अथवा तिच्याकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. परंतु जी वस्तुस्थिति आहे, तिच्या अनुरोधानें भावनांना आवरणें किंवा त्यांना वळण देणें अशक्य असूं नये. वस्तुस्थिति लक्षांत न घेतां ज्या योजना आंखण्यांत येतात, त्या वस्तुस्थितीच्या प्रभावामुळें ऐनवेळीं कोलमडून पडल्याचे दाखले मिळतात. म्हणून ज्यांना ज्यांना या समस्येसंबंधीं आस्था वाटते–मग ती

अनुकूल किंवा प्रतिकूल स्वरूपाची असो—त्यांच्या त्यांच्यासमोर वस्तुस्थिति काय आहे, तें मांडण्याची माझी इच्छा आहे. पण तें करण्यापूर्वी हिंदुस्थानची फाळणी करून त्याची स्वतंत्र राज्यांत विभागणी करण्याविषयींच्या अथवा सांस्कृतिक दृष्टीनें व सांस्कृतिक कारणास्तव देशांतील विविध प्रांतांची व संस्थानांची पुनर्घटना करण्यासंबंधींच्या ज्या योजना करण्यांत आलेल्या आहेत, त्यांचा आढावा घेणें युक्त ठरेल. लीगकडून अद्यापि कोणतीहि सविस्तर योजना प्रसिद्ध झालेली नसून फाळणीच्या वेळीं कोणतीं सर्वसाधारण तत्त्वें पाळण्यांत यावीत तेवढें दर्शवण्यापलीकडे लीगनें कांहींच स्पष्टीकरण केलेलें नसल्याकारणानें सध्यां अस्तित्वांत असलेल्या विविध योजनाच विचारांत घेणें आवश्यक ठरतें. १९४०च्या मार्चमध्यें लीगनें याबाबदचा आपला पहिला ठराव पास करण्याच्या अगोदर अनेक योजना प्रसिद्ध केल्या होत्या. पण त्यांपैकीं एकाद्या योजनेचा स्वीकार केला अथवा स्वतःची स्वतंत्र योजना लीगनें मांडली, असें अद्यापि घडलेलें नाहीं. तिनें फक्त सिद्धांत मांडून योजना बनवण्याचें कार्य भविष्यकालावर सोपवलें ! हे सिद्धांत सांगितल्यालाहि पांच वर्षे उलटून गेलीं असून या क्षणापर्यंत लीगनें एकहि योजना पुढें मांडलेली नाहीं. त्यामुळें लीगच्या सूचनेची परीक्षा करावयास निघालेल्या माणसाला अडचण निर्माण होते आणि लीगकडून अधिकृत नसलेल्या व्यक्तींकडून व गटांकडून वेळोवेळीं मांडण्यांत आलेल्या योजनांचाच त्याला विचार करणें भाग पडतें. आतांपावेतों जितक्या योजना प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांपैकीं एकाहि योजनेचा लीगच्या ठरावाला आधारभूत असणाऱ्या तत्त्वांशीं संपूर्ण मेळ बसत असल्याचें दिसून येत नाहीं, हें आतांच सांगून ठेवलेलें बरें. यापुढील विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट होईलच; तथापि, येथें विविध योजनांचें सार काढून लीगनें घालून दिलेल्या कसोट्यांच्या दृष्टीनें त्यांच्यामध्यें कोणत्या उणीवा आढळून येतात, तें दाखवून देणें उचित ठरेल.

आतांपर्यंत वेळोवेळीं ज्या योजना प्रसिद्ध झालेल्या आहेत त्यांचे दोन वर्ग पडतात : (१) स्वतंत्र मुसलमान व बिगर–मुसलमान राज्यें प्रस्थापित करण्या-

विषयींच्या योजना; व (२) सांस्कृतिक दृष्टीनें आणि सांस्कृतिक कारणास्तव प्रांत व राज्यें यांची फेरवांटणी करण्याविषयींच्या योजना. संरक्षण, परराष्ट्रीय धोरण, राष्ट्रसंवर्धन या बाबतींत स्वतःची पृथक् व्यवस्था असणारीं संपूर्णपणें स्वतंत्र अशीं मुस्लिम व बिगर-मुस्लिम राष्ट्रें स्थापावींत, असा पहिल्या वर्गांत मोडणाऱ्या योजनांचा उद्देश असून, निरनिराळ्या घटकांवर मर्यादित स्वरूपाचा नियंत्रणाधिकार असलेल्या मध्यवर्ति सत्तेची कल्पनादेखील त्यांना त्याज्य वाटते; दुसऱ्या वर्गांतील योजनांमध्यें घटक भागांना खूपच स्वातंत्र्य दिलेलें असलें, तरी सर्व देशावर कितीहि मर्यादित स्वरूपाची कां होईना पण सत्ता चालवणाऱ्या संयुक्त अथवा मध्यवर्ति शासनाची कल्पना मान्य केल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.

## १७. हिंदी 'संघ-राज्या'ची योजना

'ए पंजाबी' नामक गृहस्थांनीं 'कॉन्फेडरसी ऑफ इंडिया' (हिंदुस्थानचें संघ-राज्य) नांवाचें एक पुस्तक लिहलेलें असून त्यांत बराच तपशीलवार विचार मांडलेला आहे. हिंदुस्थानच्या सांप्रतच्या भूभागाची अनेक देशांत फाळणी करून त्यांची फेरगुंफण पुढील प्रकारचें हिंदी संघ-राज्य प्रस्थापित करून करण्यांत यावी अशी ही योजना आहे.

(१) **सिंधुदेश-मंडळ :** पंजाब (अंबालाविभाग, कांग्रा जिल्हा व होशियारपूर जिल्ह्यांपैकीं उना व गरशंकर तहसील हे पूर्वेकडील हिंदु वस्तीचे टापू वगळून), सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान, बहावलपूर, अंब, दिर, स्वात, चित्रळ, खैरपूर, कालात, लासबेला, कपूरथळा व मालरकोटला हे याचे घटक समजण्यांत यावेत. या सिंधु मंडळाला 'सिंधु-स्तान' असें नांव लेखकानें सुचवलें असून त्यांत ३,९८,८३८ चौ. मैलांचा प्रदेश येईल. त्याची लोकसंख्या ३,३०,००,००० असेल आणि या लोकसंख्येपैकीं शें. ८२ टक्के मुसलमान, ६ टक्के शीख व ८ टक्के हिंदू असतील, असा त्याचा अंदाज आहे.

(२) **हिंदु-मंडळ :** संयुक्तप्रांत, मध्यप्रांत, बंगालच्या कांहीं टापूसह

बिहार, ओरिसा, आसाम, मद्रास, मुंबई आणि राजस्थान व दक्षिणी संस्थानांत अन्तर्भूत असणाऱ्या संस्थानांव्यतिरिक्त संस्थानें, या घटकांचा त्यांत समावेश होईल. या घटकांचें क्षेत्रफळ व त्यांची लोकसंख्या यांसंबंधीं लेखकानें गणित केलेलें नसलें, तरी तें येणेंप्रमाणें आहे :

क्षेत्रफळ ............७,४२,१७३ चौ. मैल
लोकसंख्या......२१,६०,४१,५४१
हिंदूंचें शेंकडा प्रमाण ......८३·७२
मुसलमानांचें शें. प्रमाण ...११·००

(३) **राजस्थान-मंडळ :** राजपुताना व मध्य हिंदुस्थान यांच्यांतील विविध संस्थानांचा यांत समावेश होईल. त्याचें क्षेत्रफळ व लोकसंख्या येणेंप्रमाणें :

क्षेत्रफळ ...............१,८०,६५६ चौ. मैल
लोकसंख्या............१,७८,५८,५०२
हिंदूंचें शें. प्रमाण ............८६·३९
मुसलमानांचें शें. प्रमाण ........८·०९

(४) **दक्षिणी संस्थान-मंडळ :** हैद्राबाद, म्हैसूर व बस्तार संस्थान, यांचा त्यांत अंतर्भाव होईल. त्यांचें क्षेत्रफळ व लोकसंख्या:

क्षेत्रफळ ..................१,२५,०८६ चौ. मैल.
लोकसंख्या..............२,१५,१८,१७१
हिंदूंचें शें. प्रमाण ..............८५·२८
मुसलमानांचें शें. प्रमाण .........८·९०

(५) **वंग-मंडळ :** पूर्व बंगालमधील बहुसंख्य मुसलमान वस्तीचे भाग, आसाम प्रांतांतील गोलपारा व सिल्हेट जिल्हे आणि त्रिपुरा व इतर संस्थानें, यांचा घटक म्हणून या मंडळांत अन्तर्भाव व्हावा. या मंडळाचें क्षेत्रफळ व लोकसंख्या पुढीलप्रमाणें असेल :

क्षेत्रफळ....................७०,००० चौ. मै.
लोकसंख्या............३,१०,००,०००
मुसलमानांचें शें. प्रमाण...........६६·१
हिंदूंचें शें. प्रमाण ...............३२·६

या टापूंतील परिस्थितीचा परिचय नसल्याकारणानें आपल्या सूचनांमध्यें तत्रस्थ मुसलमानांना आवश्यक ते फेरफार करावे लागतील ही गोष्ट 'पंजाबी' यांनीं मान्य केली आहे. त्यांनी दिलेली शेंकडेवारी साधारणपणें ठीक असली, तरी त्यांचे आंकडे अगदीं बिनचूक नाहींत. बंगालमधील ज्या जिल्ह्यांचा त्यांनीं वंग-मंडळांत समावेश केलेला आहे ते जिल्हे येणेंप्रमाणें : दिनाजपूर, रंगपूर, मालडा, बोगरा, राजशाही, मुर्शिदाबाद, पाबना, मेमनसिंग, नादिया, जेसोर, फरिदपूर, डाक्का, टिप्पेरा, नोआखली, बाकरगंज, खुल्ना व चितगांव.

या योजनेनुसार हिंदुस्थानची वांटणी पांच मंडळांत होऊन त्यांपैकीं दोन मुसलमानी असतील व त्यांत मुसलमानांची बहुसंख्या असेल. उरलेल्या तिहींत हिंदू बहुसंख्य असतील. सिंधु-मंडळांत शेंकडा ८ टक्के हिंदू व ६ टक्के शीख म्हणजे एकंदर १४ टक्के मुसलमानेतर अल्पसंख्या राहील आणि वंगमंडळांत तर हिंदूंचें प्रमाण ३२·६ टक्के असेल, ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. हिंदूंचीं जीं तीन मंडळें राहणार त्यांत मुसलमानांच्या अल्पसंख्येचें प्रमाण शेंकडा ११ टक्के, व ८·०९ व ८·९ राहील.

या पांच मंडळांचें मिळून एक संघ-राज्य बनवण्यांत येईल. 'वरील प्रकारच्या हिंदुस्थानी संघ-राज्यांतील प्रत्येक मंडळाला स्वतःचा गव्हर्नर् जनरल् व त्याच्या हाताखालीं प्रांतिक गव्हर्नर नेमतां येतील. संघ-राज्याच्या अखत्यारींतील खात्यांसंबंधीं व त्याच्या कक्षेंत येणाऱ्या संस्थानांच्या हक्क वगैरेंच्या बाबतींत हे गव्हर्नर मध्यवर्ति शासनसत्तेला जबाबदार राहतील. मध्यवर्ति सत्ता व्हाइसरॉयच्या हातीं असावी, व देशांतील मंडळांतून घेतलेल्या सभासदांच्या मध्यवर्ति विधिमंडळाचें त्याला सहाय्य मिळावें. प्रत्येक घटकमंडळांतून किती सभासद घ्यावयाचे तें त्याच्या भौगोलिक महत्त्वावरून व लोकसंख्या, क्षेत्रफळ, आर्थिक

परिस्थिति यांच्यावरून ठरवण्यांत यावें. परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, नैसर्गिक जलप्रवाह, ब्रिटिश हिंदुस्थानच्या मंडळांना सामील झालेल्या संस्थानासंबंधींचे बादशहाचे हक्क व कर्तव्यें इत्यादि बाबी त्या त्या मंडळाच्या गव्हर्नर जनरलांच्या ताब्यांत देण्यांत याव्यात व ते व्हाइसरॉयला जबाबदार असावेत. संघ–राज्यांत जीं घटकमंडळें सामील होतील त्यांनीं संघ–राज्याच्या खर्चासाठीं प्रत्यक्ष आपल्या तिजोरींतून पैसा उचलून द्यावा अथवा कांहीं ठराविक खात्यांचें उत्पन्न मध्यवर्ति सत्तेकडे लावून द्यावें.'[१] 'कोणत्याहि परिस्थितींत वायव्य भागांतील मुसलमानांनीं जकातीचें उत्पन्न मध्यवर्ति सरकारकडे लावून देऊं नये.' लेखकानें दोन गोष्टींचें स्पष्टीकरण विशेष आग्रहपूर्वक केलेलें दिसतें. 'हिंदुस्थानच्या चिरफळ्या करून त्या लोकसंख्येच्या व संस्कृतीच्या अनुरोधानें निरनिराळ्या जमातींत वांटून टाकावयाच्या व अशा प्रकारें देशाचें अखंडत्व छिन्नविच्छिन्न करून टाकावयाचें, हा या पंचघटकात्मक संघ–राज्याचा हेतु नाहीं. एका कुटुंबांतील घटकांनीं आपल्या स्नेहसंबंधाला धक्का न लावतां आपसांत केलेल्या वांटणीच्या स्वरूपाची ही फाळणी आहे. म्हणून सांस्कृतिक दृष्टया भिन्न भिन्न जमातींना या भूप्रदेशांतले निरनिराळे भाग द्यावेत, पण ते संघ–राज्याची स्थापना करून पुन्हां एकत्र सांधावेत असा या विभक्तीकरणाचा अर्थ आहे,'[२] असें लेखक म्हणतो. त्याचें दुसरें विधान असें आहे कीं, 'ज्या द्विराष्ट्रवादी मुसलमानांना आपला संबंध हिंदुस्थानाबाहेरील देशांशीं जोडतां यावा म्हणून फाळणी हवी आहे, त्यांना असें स्वच्छ सांगून टाकणें आमचें कर्तव्य आहे कीं, अशा परदेशीय उद्देशांनीं प्रेरित होऊन फाळणीची मागणी करणें योग्य नव्हे. आपण विभक्ति–संयुति–वादी असावयास हवें. हिंदु–हिंदुस्थान व मुस्लिम–हिंदुस्थान यांचें संघ–राज्य बनवण्याची कल्पना हिंदूंना नापसंत झाली तर आपण फक्त वांटप करून घेण्याची मागणी करावी, आपला प्रदेश हिंदुस्थानपासून पूर्णपणें अलग करण्याची मागणी करावी....आपल्यामध्यें पर-

१. कॉन्फेडरसी ऑफ इंडिया : ए पंजाबी, पृ. १२–१३.

२. उक्त ग्रंथ, पृ. १५.

रक्ताचा अंश अत्यल्प आहे. हिंदूंच्या प्रमाणेंच आपण देखील याच भूमीच्या कुशींत वाढलेले आहोंत. आपलें भवितव्य याच देशांत बनणार आहे, पर-देशांत नव्हे. ही जाणीव आम्हांला असल्याकारणानेंच वायव्येकडील मुस्लिम विभागाचा निर्देश पाकिस्तान या शब्दानें करण्याऐवजीं आम्हीं तो 'सिंधु-स्थान'. या शब्दानें केलेला आहे.'[1] तथापि, लेखकाचा हा अंतिम आशय नाहीं, ही गोष्ट ग्रंथाच्या शेवटच्या पृष्ठावरून उघड होते. 'हिंदुस्थानपासून आपला विभाग विभक्त करून घेणें हें कांहीं अंतिम साध्य नव्हे, तर आदर्श इस्लामी राज्यस्थापनेचें तें केवळ एक साधन आहे. सूचित केलेल्या फाळणी-मुळें हिंदूंच्या आर्थिक दास्यांतून आपली मुक्तता होईल हें निःसंशय; परंतु आदर्श इस्लामी राज्य प्रस्थापित करणें हा आपला हेतु असल्याकारणानें त्यांत संपूर्ण स्वातंत्र्य अभिप्रेतच आहे. संपूर्ण स्वातंत्र्य हस्तगत झाल्यानंतर इस्लामेतर जगांत आपलें आदर्श इस्लामी राज्याचें ध्येय फार काळ शाबूत ठेवणें अशक्य होऊन बसेल. म्हणून इस्लामी सांच्याबरहुकूम सर्वच जगांत क्रान्ति घडवून आणण्याची आवश्यकता आपणांला प्रतिपादन करावी लागेल. आणि तशी शुद्ध इस्लामी क्रान्ति जगभर घडवून आणणें हेंच आपलें अंतिम ध्येय राहील. ही क्रान्ति घडवून आणण्याचीं कांहीं साधनें येवढ्याच दृष्टीनें, फाळणी, हिंदूंच्या आर्थिक दास्यांतून मुक्तता व ब्रिटिशांच्या राजनैतिक गुलामगिरीचा शेवट या गोष्टींचें महत्त्व आहे.[2] आपलें ध्येय साध्य करून घेण्यासाठीं रहि-वाशांची अदलाबदल करण्याचा मार्ग लेखकाला संमत नाहीं. 'रहिवाशांची अदलाबदल न करतां हिंदुस्थानपासून बहुसंख्य मुसलमान रहिवाशी असलेले प्रदेश वेगळे करणें आम्हांला परवडेल. सिंधु–मंडळ व वंग–मंडळ यांच्या-विषयीं ज्या सूचना केलेल्या आहेत, तदनुसार विभक्तीकरण केल्यास सिंधु-मंडळांतील २,५७,१४,६५७ मुसलमान व वंग–आसाम मंडळांतील सुमारें २,३०,००,००० मुसलमान हिंदूंच्या जोखडांतून मुक्त होतील. तथापि,

१. कॉन्फेडरसी ऑफ इंडिया : ए पंजाबी, पृ. १७.

२. उक्त ग्रंथ, पृ. २६९–७०.

२,८९,६३,२४३ मुसलमान हिंदुप्रांतांत उरतीलच.'[१] म्हणजे लखकाच्या 'हिंदूंच्या जोखडांतून' ६३ टक्के मुसलमानांची मुक्तता होईल आणि ३७ टक्क्यांहून थोडे अधिक मुसलमान त्या जोखडाखालीं राहतील.

मुस्लिम लीगच्या सूचनांपेक्षां ही योजना मूलतः भिन्न आहे. कारण संघ–राज्याची कल्पना त्यांत गृहित धरलेली आहे. सर्वस्वीं स्वतंत्र अशीं मुस्लिम व मुस्लिमेतर राज्यें प्रस्थापित करून संरक्षण, दळणवळण, परराष्ट्रीय राजकारण इत्यादि खात्यांवर त्याचा संपूर्ण अधिकार असावा अशा प्रकारची ही योजना नाहीं. देशाच्या निरनिराळ्या प्रदेशांची फेरवांटणी पांच विभागांत करावी व प्रत्येक विभागांत अनेक कनिष्ठ पोटविभाग असावेत, हें या योजनेचें सार आहे. कनिष्ठ विभाग हे बऱ्याच अंशीं स्वयंपूर्ण असतील व त्यांचीं संयुक्त राज्यें बनवण्यांत येतील; आणि या संयुक्त राज्यांचें पुन्हां देशव्यापी संघ–राज्य बनवण्यांत येईल.

मुस्लिम लीगनें हिंदी संस्थानांच्या बाबतींतलें आपलें धोरण मुळींच विशद केलेलें नाही हें पुढें दिसून येईलच. पण या योजनेंत सर्व संस्थानांचा समावेश करण्यांत आलेला असून त्यांना या ना त्या संयुक्त राज्यांत गोवण्यांत आल्याचें आढळतें.

संबध हिंदुस्थान किंवा त्यापैकीं कोणताहि एकादा भाग ब्रिटिश साम्राज्या-पासून सर्वस्वीं स्वतंत्र व्हावा अशी या योजनेंतील विचारसरणी नाहीं हें स्पष्ट असून गव्हर्नर जनरल, व्हाइसरॉय व प्रांतिक गव्हर्नर यांचीं पदें कायम ठेवा-वींत असें गृहित धरूनच या योजनेची उभारणी करण्यांत आलेली आहे.

'वायव्य अथवा पूर्व प्रदेशासारख्या बहुसंख्य मुसलमानी वस्ती असलेल्या टापूंत जरूर ते चतुःसीमांचे फेरफार करावेत आणि तेथें स्वतंत्र राज्यें प्रस्थापित करावींत' ही जी मुस्लिम लीगच्या ठरावांतील मागणी आहे, तिचें साधारण समाधान या योजनेमुळें होऊं शकेल. पण पंजाब व बंगाल प्रांतांतील मुसल-मानांची अल्प वस्ती असलले भाग त्या योजनेप्रमाणें मुसलमानी राज्यांतून वग-

१. कॉन्फेडरसी ऑफ इंडिया : ए पंजाबी, पृ. २०४.

ळण्यांत आलेले आहेत, त्यांची वाट काय ? हे टापू ज्या कारणांस्तव लेखकानें आपल्या योजनेंतून वगळले आहेत, त्याच कारणांस्तव आणखीहि कांहीं मुलूख मुस्लिम राज्यांतून बाद करावा लागेल असें दिसतें. उदाहरणार्थ, जलंदर विभागांतील प्रत्येक जिल्ह्यांत हिंदू व शीख बहुसंख्य आणि मुसलमान अल्पसंख्य असल्याकारणानें सिंधु-मंडळांतून सबंध जलंदर विभाग वगळावा लागेल. हिंदु, मुसलमान व शीख या तीन प्रमुख जमातींचे जिल्हावार आंकडे जर आपण पाहिले, तर कांग्रा व होशियारपूर या दोन जिल्ह्यांत हिंदूंची भारी बहुसंख्या असल्याचें दिसून येतें. लुधियाना जिल्ह्यांत मुसलमानापेक्षां शीख बहुसंख्य आहेत. जलंदर व फिरोझपूर या दोन जिल्ह्यांत मात्र हिंदु व शीख या दोन जमाती वेगवेगळ्या घेतल्यास मुसलमानांची संख्या त्यांच्याहून अधिक भरेल. पण त्यांची लोकसंख्या एकत्र केल्यास मूसलमान अल्पसंख्य ठरतील. लाहोर विभागांतल्या अमृतसर जिल्ह्यामध्येंहि हिंदू व शीख एकत्र केल्यास मुसलमानांहून ते बहुसंख्य ठरतील. म्हणजे बिगर-मुसलमान शेंकडा ५४, तर मुसलमान शेंकडा ४६ असें प्रमाण पडेल. वंग-मंडळाचें उदाहरण घेतलें तर त्यांत गोलपारा जिल्ह्याचा समावेश करण्यांत लेखकानें अन्याय केलेला आहे. कारण बिगर-मुसलमानांच्या मानानें त्या जिल्ह्यांतील मुसलमान अल्पसंख्य आहेत. मुसलमानी प्रादेशिक घटक निर्माण करण्याच्या उद्देशानें जर ही फाळणी सुचवण्यांत येत असेल, तर बिगर-मुसलमानांची बहुसंख्या असलेले टापू मुसलमानी प्रदेशांत काय म्हणून ओढून घेण्यांत यावेत ?

विभक्तीकरणाच्या जेवढया म्हणून योजना सुचवण्यांत आलेल्या आहेत त्यांच्यासंबंधीं सर्वसामान्य आक्षेप 'पंजाब्यां'च्या योजनेला लागू पडतातच. पण त्यांच्या योजनेबद्दल एक खास आक्षेप उपस्थित होण्यासारखा आहे. तो असा कीं, त्यांनीं हिंदुस्थानचे जे पांच विभाग कल्पिलेले आहेत, ते कोणत्याहि बुद्धिगम्य तत्त्वानुसार कल्पिलेले आहेत असें वाटत नाहीं. वायव्य व पूर्व भागांतील मुस्लिम-राष्ट्रसंघांतील रहिवाशांत मुसलमान बहुसंख्य आहेत, येवढेंच विशिष्ट लक्षण त्या भागामध्यें दिसून येतें. हिंदु-राष्ट्रसंघ हिमालयापासून कन्याकुमारी-

पर्यंत व ईशान्येच्या चीन–हिंदुस्थानच्या सरहद्दीपासून अरबी समुद्रापर्यंत पसरलेला असणार. पण त्याच्या दरम्यान इतर राष्ट्रसंघाचे प्रदेश येणारच. त्यामुळें हिंदु–राष्ट्रसंघांत समाविष्ट असलेल्या राष्ट्रांचे परस्परसंबंध कायम राहाण्यासाठीं अनेक घोळ काढावे लागतील. या विस्तीर्ण हिंदु–प्रदेशांत सिंधी, बलुची, व पुश्तू यांव्यतिरिक्त हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या सर्व भाषा चालू राहतील. तसेंच, देशांतील सर्व रूढ धर्म व पंथ त्यांत असतीलच. फरक काय तो त्यांच्या अनुयायीवर्गाच्या संख्येंत व त्यांच्या परस्परांशीं असणाऱ्या प्रमाणांत होईल. ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांचेहि प्रदेश त्यांत सरमिसळ झालेले असणार. पुन्हां त्या प्रदेशांत दोन कोटी मुसलमान असतीलच. इतके भेद व इतकीं वैविध्यें असलेल्या या प्रदेशांचें जर एक संयुक्त–राज्य स्थापणें ‘पंजाब्यां’ना शक्य वाटतें, तर सबंध हिंदुस्थानचेंच एक संयुक्त–राज्य स्थापन करण्यास कोणती हरकत आहे? राजपुताना व मध्यहिंदुस्थानी संस्थानें यांचें एक राज्य करतां येईल असें म्हटल्यावर भाषैक्यामुळें, छत्तीसगड किंवा ओरिसा संस्थानांपैकीं असणाऱ्या बस्तार संस्थानाला आपल्या नैसर्गिक गटांतून फोडून काढून त्याला हैदराबाद मंडळांत घुसडून काय म्हणून द्यावयाचें, असा प्रश्न निर्माण होतोच. सदरहूप्रमाणेंच म्हैसूर संस्थानाला साधारणतः चिकटूनच असलेल्या त्रावणकोर व कोचीन संस्थानांना दक्षिणी संस्थानांतून वेगळें करून हिंदुराष्ट्रसंघाशीं जोडण्याचें कारण काय तें समजत नाहीं. हैदराबाद संस्थानांतील रहिवाशांत मराठी, तेलगु व कानडी या तीन भाषा प्रचलित आहेत. त्या व्यतिरिक्त राज्यकर्त्यांची भाषा जी उर्दू ती आहेच. तेव्हां म्हैसूर, कोचीन व त्रावणकोर यांना दक्षिणी संस्थानांतच सामील करण्यास हरकत नसावी. कारण त्यामुळें फार तर एकाच भाषेची म्हणजे मल्याळी भाषेची भर सध्यां प्रचलित असलेल्या भाषांत पडेल.

श्री. एम्. आर्. टी. नामक गृहस्थांनीं सुचवलेल्या योजनेचा एक आराखडा ‘ईस्टर्न टाइम्स्’ मध्यें प्रसिद्ध झाला होता. पण तो आराखडा ‘पंजाब्यां’-च्या योजनेशीं सामान्यतः मिळताजुळता असल्याकारणानें त्याचा विचार येथें स्वतंत्रपणें केलेला नाहीं.

## १८. अलीगढच्या प्राध्यापकांची योजना

दुसरी एक योजना सय्यद झफरुल हसन व महमद अफझल हुसेन काद्री या अलीगढच्या प्राध्यापकांनीं सुचवलेली आहे. हिंदुस्थानची विभागणी सर्वस्वी विभक्त व सार्वभौम अशा अनेक राज्यांत करण्यांत यावी, अशी ती योजना असून तीं राज्यें पुढीलप्रमाणें असतील :

( १ ) पाकिस्तान : पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध, बलुचिस्तान आणि काश्मीर, मंडी, चंबा, साकित, सुमिन, कपूरथळा, मालरकोटला, चित्रळ, दिर, कालात, लोहास, बिलासपूर, सिमला टेकड्यांतील संस्थानें, भावलपूर इत्यादि संस्थानें वगैरे.

लोकसंख्या...............३,९२,७४,२४४

मुसलमान ...............२,३६,९७,५३८ किंवा ६०·३ टक्के

( २ ) बंगाल ( हौरा व मिदनापूर जिल्हे वगळून ), बिहारपैकीं पूर्णिया जिल्हा, आसाममधील सिल्हेट जिल्हा.

लोकसंख्या...............५,२५,७९,२३२

मुसलमान ...............३,०१,१८,१८४ किंवा ५७ टक्के

( ३ ) या व्यतिरिक्त प्रदेश समाविष्ट असलेला तो हिंदुस्थान. ( म्हणजे हैदराबाद, पाकिस्तान, बंगाल व पाकिस्तानांतील संस्थानें वगळून.)

लोकसंख्या...............२१,६०,००,०००

मुसलमान ...............२,०९,६०,००० किंवा ९·७ टक्के

( ४ ) हैदराबाद, वऱ्हाड व कर्नाटक मिळून होणारा हैदराबाद विभाग.

लोकसंख्या...............२,९०,६५,०९८

मुसलमान ...............२१,४४,०१० किंवा ७·५ टक्के

(५) दिल्ली, मीरत डिव्हिजन, रोहिलखंड डिव्हिजन व आग्रा डिव्हिजनपैकीं अलीगड जिल्हा इतक्यांचा बनलेला दिल्ली—विभाग.

लोकसंख्या............१,२६,६०,०००

मुसलमान ..............३५,२०,००० किंवा २८ टक्के

(६) मलबार व दक्षिण कॅनरा मिळून होणारा मलबार प्रांत.

लोकसंख्या............४९,००,०००

मुसलमान ............१४,४०,००० किंवा २७ टक्के

हिंदुस्थानांतील ५०,००० किंवा त्यापेक्षां अधिक वस्ती असलेल्या शहरांना स्वतंत्र नगरें मानण्यांत येईल, व त्यांना बऱ्याच प्रमाणांत स्वायत्तता देण्यांत येईल. अशा नगरांतील मुसलमानांची संख्या १३,८८,६९८ इतकी भरेल. सध्यांप्रमाणें ग्रामीण वस्तींतल्या मुसलमानांनीं पांगलेलें न राहतां जेथें मुसलमानांची बहुसंख्या आहे अशा गांवीं त्यांनीं एकठाय वस्ती करून राहावें म्हणून त्यांचें मन वळवण्यांत येईल.

पाकिस्तान, बंगाल व हिंदुस्थान हीं जीं उपरिनिर्दिष्ट तीन राज्यें होतील, त्यांच्यामध्यें संधि–विग्रहांबाबतचा करार पुढील मुद्दयांनुसार व्हावा :

( १ ) परस्परांस मान्यता व परस्पर–सहकार्य.

( २ ) पाकिस्तान व बंगाल ही मुसलमानांची मातृभूमि असल्याबद्दल व हिंदुस्थान ही हिंदूंची मातृभूमि असल्याबद्दल मान्यता देण्यांत यावी. हिंदु-मुसलमानांना आपापल्या मातृभूमींत वस्ती करण्यासाठीं जाण्याची इच्छा असल्यास त्यांना तसें करूं द्यावें.

( ३ ) हिंदुस्थानांतील मुसलमानांना एक अल्पसंख्य राष्ट्र म्हणून व पाकिस्तान आणि बंगालमधील मोठ्या राष्ट्रांचा एक विभाग म्हणून मान्यता मिळावी.

( ४ ) हिंदुस्थानांतील मुसलमान अल्पसंख्य व पाकिस्तानांतील बिगर-मुसलमान अल्पसंख्य यांना ( अ ) लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व आणि ( ब ) सर्व ठिकाणीं विभक्त मतदारसंघ, स्वतंत्र प्रतिनिधित्व आणि तिन्ही राष्ट्रांकडून आश्वासित अशीं सर्व तऱ्हेचीं संरक्षणें देण्यांत येतील. तिन्ही राज्यांतील शीख, नीच वर्णीय हिंदू इत्यादि मोठ्या अल्पसंख्य गटांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत विभक्त मतदारसंघ देण्यांत यावेत.

( ५ ) मुसलमानांची अधिकृत अशी एकादी राजकीय संघटनाच हिंदुस्थानांतील मुसलमानांची एकमेव प्रतिनिधि असेल.

पाकिस्तान, हिंदुस्थान व बंगाल या तीन स्वतंत्र राज्यांचे ग्रेट ब्रिटनबरोबर मित्रभावाचे करार स्वतंत्रपणें झालेले असतील व त्या तीन राज्यांत बादशहांचे प्रतिनिधी असावेत, असें ठरल्यास वेगवेगळे तीन प्रतिनिधी नेमण्यांत येतील. त्यांच्यामध्यें आपआपसांत किंवा त्यांच्यांत व बादशहांच्या सरकारांत कांहीं वाद निर्माण झाल्यास तो तोडण्यासाठीं तीन राज्यांचें एक संयुक्त न्यायालय असेल.

हैदराबादची स्थिति कांहीं विशेष स्वरूपाची आहे. ब्रिटिश सरकारनें त्याला आपला 'दोस्त' असें मानलेलें आहे. तहनामे पाहिले तर हैदराबाद हें एक सार्वभौम राज्य असल्याचें दिसून येईल. राज्यकारभाराच्या व्यवस्थेसाठीं वऱ्हाड व कर्नाटक हे दोन प्रांत ब्रिटिश सरकारनें हैदराबादकडून घेतले होते, ते आतां त्याला परत करणें उचित होय. हे टापू परत केल्यानंतर हैदराबादेंत मोडणाऱ्या सर्व प्रदेशांसह एक सार्वभौम राज्य म्हणून—निदानपक्षीं, नेपाळच्या दर्जाचें सार्वभौम राज्य म्हणून—त्याला मान्यता मिळाली पाहिजे. कर्नाटक परत मिळाला, कीं हैदराबादला समुद्र—किनारा मिळेल आणि मग मुस्लिम हिंदुस्थानचा दक्षिणेकडील आधारस्तंभ असें त्याचें स्वरूप बनेल.

'पंजाब्यां'च्या योजनेवर जे आक्षेप घेतां येण्यासारखे आहेत, तेच याहि योजनेच्या बाबतींत लागू पडतील. मुसलमानांची बहुसंख्या असलेला प्रदेशच मुसलमानी राज्यांत समाविष्ट करावा, हा मुस्लिम लीगचा दंडकहि या योजनाकारांनीं मानलेला नाहीं. हिंदूंची भारी बहुसंख्या असलेला अंबाला विभाग व बिगर—मुसलमानांची तशाच प्रकारची बहुसंख्या असलेला जलंदर विभाग त्यांनीं आपल्या पाकिस्तानांत अन्तर्भूत केलेला आहे. तसेंच हिंदूंची बहुसंख्या असलेले बंगालमधील जिल्हे व मुसलमानेतर बहुसंख्येनें असणारे आसामांतील भाग त्यांनीं पूर्व विभागांत समाविष्ट केले आहेत. हिंदूंची बहुसंख्या असलेला बिहारमधील पूर्णिया जिल्हा देखील त्यांनीं पूर्व विभागांत बिनदिक्कत ढकललेला आहे !

वऱ्हाड व कर्नाटक यांची भर घालून त्यांनीं हैदराबादचें एक सार्वभौम राज्य बनवण्याचें ठरवलें आहे. तेथील बहुसंख्य रहिवाशी हिंदू असतां, मुसलमानांचें प्रमाण शेंकडा फक्त १०.४ इतकेंच असतां, हैदराबादेला मुस्लिम विभाग कां म्हणण्यांत यावें तें कळत नाहीं. तेथील राज्यकर्ता मुसलमान आहे येवढीच गोष्ट हैदराबादेला मुसलमानी विभाग ठरवण्यास निर्णायक समजण्यास पुरेशी मानली, तर हिंदु राजा असलेल्या काश्मीरला पाकिस्तानशीं काय म्हणून जोडण्यांत यावें अशी शंका उपस्थित होते.

सर्व देशभर अनेक पृथक् व स्वतंत्र नगरें निर्माण करून विद्यमान् भेद अधिकच वाढवण्याचा प्रयत्न या योजनेमध्यें केलेला आहे. हिंदु व मुसलमान यांची तुलना लेखकांनीं झेक व सुडेटन् जर्मन् यांच्याशीं केलेली असल्याकारणानें हीं स्वतंत्र नगरें भावी काळांत डॅन्झिग् तर बनणार नाहींत ना, अशी भीति मनाला वाटते. झेक लोकांनीं सुडेटन् जर्मनांचा छळ केल्याची सबब पुढें करून झेकोस्लोव्हाकियावर जर्मनांनीं हल्ला चढवला, तसा हल्ला हिंदुस्थानवर चढवण्याची मुसलमानांना फूस देण्यासाठीं ही योजना केलेली नसली म्हणजे मिळवलें !

हिंदु व मुसलमान राज्यांनीं परस्परांना मान्यता द्यावी व आणि परस्परांशीं सहकार्य करावें असा लेखकाचा विचार दिसतो. परंतु या दोन राज्यांत संधिविग्रहाचे करार कोणत्या तत्त्वांवर होणार, याचा विचार मांडतांना हिंदुस्थानांतील मुसलमानांना एक स्वतंत्र राष्ट्र व मोठया राष्ट्राचा एक भाग मानावें असें सांगणारे हे लेखक पाकिस्तानांत व बंगालमध्यें राहाणाऱ्या हिंदूंना समान हक्क देण्याविषयीं मात्र ब्रहि उच्चारीत नाहींत ! तसेंच एका राजकीय मुसलमानी संघटनेकडेच हिंदुस्थानांतील मुसलमानांचे अधिकृत प्रतिनिधित्व राहील असें म्हणणाऱ्या या लेखकांनीं पाकिस्तानांतील व बंगालमधील हिंदूंना मात्र त्यांचें प्रतिनिधित्व कोणत्याहि एकमेव राजकीय संघटनेकडे सोपवण्याचा अधिकार दिल्याचें आढळून येत नाहीं.

तात्पर्य, 'तुमचे पोहे व आमचा कोंडा फुंकून फुंकून खाऊं' अशा मतलबी

तत्त्वानुसार हिंदुस्थानांत स्वतंत्र मुसलमानी राज्यें प्रस्थापित करण्याच्या बुद्धीनें बनवलेली ही योजना आहे.

## १९. सी. रहमत अलींची योजना

'दि मिल्लत ऑफ इस्लाम् अँड् दि मीनेस् ऑफ 'इंडियानिझम्' या नांवाच्या आपल्या पुस्तिकेमध्यें चौधरी रहमत अलींनीं एक योजना मांडली आहे. ही पुस्तिका १९४० सालीं प्रकाशित झाली. लेखक १९३३ सालीं स्थापन झालेल्या पाकिस्तान नॅशनल मुव्हमेंट्चे प्रस्थापक–अध्यक्ष आहेत. पाकिस्तानच्या मागणीपुरतीच ही चळवळ प्रारंभीं मर्यादित होती आणि पंजाब, अफगानिया ( म्हणजे अफगाणी रहिवाशी प्रामुख्यानें असणारा वायव्य सरहद्द प्रांत ), काश्मीर, सिंध व बलुचिस्तान इतके प्रांत घटक म्हणून या पाकिस्तानांत समाविष्ट व्हावेत अशी त्यांतली कल्पना होती. या योजनेला जो पाठिंबा मिळाला, त्यावरून १९४० सालीं 'फक्त या प्रांतांत आपली चळवळ चालू ठेवण्यास नव्हे, तर बंगाल व उस्मानिस्तान ( दक्षिण हैदराबाद ) यांच्या बाबतचा आमच्या कार्यक्रमाचा जो दुसरा भाग, त्याचाहि प्रारंभ करण्यासाठीं आम्हाला उत्तेजन मिळालें.'[१] 'एकादां आपण "हिंदुस्थानां"त राहावयाचें ठरवलें कीं, आपणांला यावच्चंद्र दिवाकरौ हिंदुस्थानवाद्यांच्या दास्यांत खितपावें लागेल हें स्पष्ट आहे. हिंदुस्थानवादाचे देव्हारे त्याच्या धूर्त गणांनीं म्हणजे हिंदी देशभक्तांनीं माजवून ठेवले असून त्याचा त्यांनीं एक नवीन पंथच बनवला आहे. त्यांच्या ताटाखालच्या मांजराप्रमाणें असलेले क्षुद्र मुसलमान संधिसाधू या वादासमोर गुडघे टेकीत असून, ब्रिटिश साम्राज्यवाद्यांकडूनहि या वादाला पाठिंबा देण्यांत येत आहे.'[२]

अखिल भारतीय मुस्लिम लीगला तिनें घेतलेल्या नांवाबद्दल चौधरी साहेबांनीं ठपका दिलेला आहे. 'मुस्लिम लीग आपल्या मिल्लतीसाठीं हिंदी लोकांहून

---

१. दि मिल्लत ऑफ इस्लाम अँड दि मीनेस् ऑफ इंडियानिझम्, पृ. १.

२. उक्त ग्रंथ, पृ. ४.

पृथक् असें राष्ट्रीयत्व मागण्यास अखेर एकदांची तयार झाली असली, तरी "समान मातृभूमि म्हणून" ती अद्यापि हिंदुस्थानला कवटाळून राहिलेलीच आहे.'[१] 'हिंदुस्थानचें भौगोलिक अखंडत्व मान्य करणें म्हणजे हिंदुस्थान-वादाचें जोखड मिल्लतीच्या मानेवर ठेवण्याप्रमाणें आहे.'[२] 'त्यांनीं आतां निश्चयपूर्वक "हिंदुस्थान"चा त्याग करावयास हवा. म्हणजेच त्यांनीं "हिंदु-स्थाना"बरोबरचे सर्व संबंध तोडून टाकून, हिंदुस्थानवादापासून मिल्लतीचें व "अखिल इस्लामिकां"चें संरक्षण करण्यासाठीं जीवन वेंचावयास हवें.'[3] पाकिस्तान, बंगाल व उस्मानिस्तान हीं सार्वभौम राज्यें झालीं पाहिजेत असा लेखकाचा आग्रह आहे. आसाम हा बंगालचा केवळ उपान्तिक देश समजून त्याला बंग–इ–इस्लाम म्हणावें असें लेखकानें सुचवलें आहे. 'ज्या आंतर-राष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वानुसार इतर् राष्ट्रें आपापल्या अंकित प्रदेशांवर हक्क सांगतात, त्याच तत्त्वानुसार आम्हीहि उस्मानिस्तानावर आपला हक्क सांगत असतों; ब्रिटिश सरकार व 'निष्ठावान् मित्र' म्हणून ज्यांचें वर्णन करण्यांत आलेलें आहे असे उस्मानिस्तानचे आला हजरत यांच्यामध्यें जे मूळ तहनामे झाले, त्यांत उस्मानिस्तानावरील आपल्या सार्वभौमत्वाला न्याय्यतः (de jure) मान्यता देण्यांत आलेली आहे. या देशांत उस्मानिस्तानाचें स्थान अपूर्व आहे. कारण त्याच्यायेवढें सार्वभौमत्व दुसऱ्या कोणत्याहि राज्याला लाभलेलें नाहीं. या उस्मानिस्तानासंबंधींच्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी येथें सांगून ठेवणें उचित होईल. येवढें झालें म्हणजे पाकिस्तान, बंगाल व उस्मानिस्तान यांच्या भरभक्कम पायावर इतिहासांत कधींहि झालीं नसतील अशीं तीन समर्थ, बलाढ्य व स्वतंत्र राज्यें आम्हीं उभारून दाखवलीं पाहिजेत आणि तें आम्ही करून दाखवूं हें निःसंशय.'[४] 'हिंदुस्थानवादाच्या खोड्यांतून स्वतःची सुटका करून घ्यावयाची असेल, "हिंदुस्थाना"पासून पृथक् अशा राष्ट्रीयत्वाची प्रस्था-

१. दि मिल्लत ऑफ इस्लाम अँड दि मीनेस् ऑफ इंडियानिझम्, पृ. ६.
२. उक्त ग्रंथ, पृ. ११–१२. ३. उक्त ग्रंथ, पृ. १४.
४. उक्त ग्रंथ, पृ. १५.

पना आपणांला करावयाची असेल आणि आशियांतील दाक्षिणात्य राष्ट्रें म्हणून आपणांला एक गट तयार करावयाचा असेल, तर अखिल भारतीय मुस्लिम लीग मोडून टाकून तिच्याऐवजीं पाकिस्तान, बंगाल व उस्मानिस्तान या तीन राष्ट्रांचें सख्य निर्माण करण्याच्या प्रयत्नाला आपण लागलें पाहिजे.

'असें केलें तरच "हिंदुस्थानापासून" आपल्याला विभक्त होण्याला पक्केपणा प्राप्त होईल, आपल्या मिल्लतींत चैतन्य संचरेल आणि इतर कशानेंहि होणार नाहीं इतका परिणाम जगांतील लोकमतावर घडून येईल. इतकें कार्य आपल्या हातून पार पडलें म्हणजे आपण कसोटीला उतरलों, आपला मार्ग ठाम झाला, आपण कृतार्थ झालों आणि दक्षिण आशियांतील आपल्या जीवितकार्याला अभिनव स्वरूप प्राप्त करून दिलें, असें होणार आहे. तदनंतर आपल्या इतिहासदत्त जीवितकार्याविषयीं आपल्या बुद्धीचा निश्चय होऊन आपण आपला "चंद्रतारकांकित" ध्वज अंतिम विजयाच्या स्थानावर नेऊन रोवूं.'[1]

लेखक द्विराष्ट्र सिद्धांताचा किंवा शक्य तेथें मुसलमानी राज्यें स्थापन करावींत या भूमिकेचा कट्टर पुरस्कर्ता आहे हें यावरून दिसून येईल. पुस्तिका लिहितांना या तीन स्वतंत्र राज्यांचें क्षेत्रफळ, त्यांत राहाणाऱ्या मुसलमानेतरांचे अधिकार व "हिंदुस्थानां"त राहणाऱ्या मुसलमानांचे हक्क इत्यादि तपशिलाचे प्रश्न लेखकाला क्षुद्र वाटले असावेत आणि म्हणूनच त्यानें तत्संबंधीं ऊहापोह केला नसावा असें दिसतें. धर्मप्रवर्तकाचा अभिनिवेश त्याच्या अंगीं संचरलेला असून तपशिलाच्या बाबीमुळें त्याचें चित्त विचलित झालेलें दिसत नाहीं. एकदां का मुस्लिम राज्यें स्थापन झालीं, कीं सारें बेश होईल, तीं प्रस्थापित न झालीं तर मात्र कोणतीहि गोष्ट सरळ होणें शक्य नाहीं, असा त्याचा सिद्धांत असावा.

परंतु पाकिस्तान, वंगिस्तान व उस्मानिस्तानाची प्रस्थापना करून ज. रहमत अलींची तृप्ति झालेली नाहीं. १९४२सालीं पाक–योजनेचे ३,४,६ व ७ भाग त्यांनीं प्रकट केले. तत्संबंधीं प्रसिद्ध केलेल्या 'दि मिल्लत अँड दि

१. दि मिल्लत ऑफ इस्लाम अँन्ड दि मीनेस् ऑफ इंडियानिझम्, पृ. १६.

मिशन्' नामक आपल्या पुस्तिकेंत 'दिनियाच्या सप्तम खंडाबाबतच्या सात आज्ञा' त्यांनीं प्रतिपादन केलेल्या आहेत, त्या येणेंप्रमाणें :

(१) अल्पसंख्यत्वाचें संकट टाळावें.
(२) राष्ट्रीयत्व हें ब्रीद मानावें.
(३) लोकसंख्येनुसार प्रदेश मिळवावेत.
(४) मुस्लिम राष्ट्रांची एकजूट करावी.
(५) 'पाक कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स्'च्या द्वारा त्या राष्ट्रांत सहकार्य प्रस्थापित करावें.
(६) 'हिंदुस्थाना'ला 'दिनिया' बनवावें.
(७) दिनिया व तिचे अंकित प्रदेश यांचे 'पाक–आशिया' खंड बनवावें.

एतत्संबंधीं स्पष्टीकरणः—

**(१) अल्पसंख्यत्वाचें संकट टाळावें:**—'या आदेशाचा अर्थ असा आहे कीं, ब्रिटिशांनीं व हिंदूंनीं जरी आपल्याला घटनात्मक संरक्षणें देऊं केलीं, तरी आपण आपल्या अल्पसंख्य मुसलमान बांधवांना हिंदुभूमींत ठेवण्यास तयार होतां कामा नये !'

**(२) राष्ट्रीयत्व हें ब्रीद मानावें:**—वरील आदेशाला पोषक असा हा आदेश आहे. दिनिया व तिचे अंकित देश यांच्यामध्यें जेथें हिंदूंची बहुसंख्या असेल, तेथील अल्पसंख्य मुसलमानांच्या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाचा आग्रह धरण्यांत आला पाहिजे व त्याला मान्यता मिळवून घेतली पाहिजे. मोबदला म्हणून पाकिस्तान, वंगिस्तान व उस्मानिस्तानमधील हिंदू व शीख अल्पसंख्याकांनाहि आपण समान हक्क देऊं केले पाहिजेत. "व्यक्तीच्या जीवनांत यौवनावस्थेचें जें महत्त्व तेंच समाजाच्या जीवनांत राष्ट्रत्वा( Nation-hood )चें आहे," या तत्त्वानुसार वरील आदेश बनवण्यांत आलेला आहे. १९४० सालापर्यंत अशा प्रकारची मागणी करण्याच्या मार्गांत देशांतील परिस्थितीची अडचण उभी होती. परंतु आतां पाकिस्तानांत आपणांला स्वतंत्र स्थान असावें अशी मागणी शिखांनीं केलेली असल्याकारणानें तीहि अडचण इतःपर

उरलेली नाहीं. शिखांच्या या मागणीचा शक्य तितका अनुकूल उपयोग आपण करून घेतला पाहिजे, आणि लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रदेशाची मागणी केली पाहिजे. पतियाळा, नाभा व झिंद या तीन संस्थानांच्या टापूंत शिखांनीं केलेल्या मागणीची सोय आपण लावून दिली पाहिजे; पण ती या अटीवर कीं, दिनियामध्यें सिद्दिकिस्तान, फरूकिस्तान, हिंदुस्थान, मोमिनिस्तान, मोपलाइ-स्तान, सफिस्तान व नासरिस्तान असे बहुसंख्य हिंदूंचे जे सात देश निर्माण होतील, त्यांतील मुसलमान अल्पसंख्याकांना देखील शिखांप्रमाणेंच स्वतंत्र दर्जा देण्यांत आला पाहिजे...''[१]

(३) **लोकसंख्येनुसार प्रदेश मिळवावेतः**—दिनिया व तिचे अंकित प्रदेश यांमध्यें आपण आपल्या वांट्याचा भाग मिळवला पाहिजे. उदाहरणार्थ, संयुक्त प्रांत घ्या. तेथें आपली लोकसंख्या एकंदर लोकसंख्येमध्यें शेंकडा १५ टक्के असल्यामुळें आपणांला प्रांताच्या भूमिपैकीं १५ टक्के भूमि अथवा सुमारें १७,००० चौ. मैल प्रदेश मिळावयास हवा...त्याचप्रमाणें मध्यप्रांत, बिहार, ओरिसा इत्यादि विभागांतले समप्रमाण भाग हस्तगत करून घेऊन सिद्दि-किस्तानादिक आपलीं नवीन राष्ट्रीय स्थानें आपण प्रस्थापित करावयास हवींत.

(४) **मुस्लिम राष्ट्रांची एकजूट करावीः**—दिनिया व सीलोन यांसारख्या बहुसंख्य हिंदु वस्ती असलेल्या प्रदेशांत मुसलमानांनीं पांगलेल्या स्थितींत राहाणें धोक्याचें असल्याकारणानें तेथील मुसलमानांनीं समप्रमाणाच्या तत्त्वा-नुसार मिळालेल्या प्रदेशांतच वस्ती करून राहावें व संघटित होऊन तेथें राष्ट्रें प्रस्थापित करावींत असा या आदेशाचा अर्थ आहे.

(५) **पाक कॉमनवेल्थ ऑफ नेशन्सची प्रस्थापनाः**—या आदेशाचा अर्थ असा कीं, दिनियाचीं जीं दहा घटक राष्ट्रें लेखकानें कल्पिलेलीं आहेत, त्यांची एक आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करावी.

(६) **हिंदुस्थानच्या भूखंडाचें दिनियांत रूपांतर करणेंः**— ''हिंदी राष्ट्र-वादा''च्या सांपळ्यापासून हिंदुस्थानच्या देहाची व आत्म्याची सोडवणूक

१. रहमत अली : दि मिल्लत अँड दि मिशन्.

करून त्याला "दिनियावादा"च्या छत्राखालीं आणावयाचें आणि अशा प्रकारें जगांत या देशाला त्याचें पूर्वकालीन व न्याय्य स्थान प्राप्त करून द्यावयाचें, असा या आदेशाचा हेतु आहे. त्यासाठीं आपण आपल्या प्राचीन उद्दिष्टाखातर पुन्हां आपलें जीवन समर्पण करण्याची आवश्यकता असून आपल्या या नवीन व्रताचा विस्तार म्हणून आपण पुढील तीन मूलभूत मुद्द्यांवर आपलें लक्ष केंद्रित केलें पाहिजे. हिंदुस्थान हें हिंदी राष्ट्रवादाचें क्षेत्र आहे ही अत्यंत भ्रामक कल्पना आपण प्रथम उडवून लावली पाहिजे. हिंदुस्थान दिनियावादाच्या कक्षेंतच येतें ही सत्य कल्पनाच आपण प्रसारित केली पाहिजे आणि हिंदुस्थानचा भूप्रदेश हा 'दिनिया'मध्येंच अन्तर्भूत आहे हें ढळढळीत सत्य आपण जगजाहीर केलें पाहिजे.

**(७) दिनिया व तिचे अंकित प्रदेश यांचें 'पाक-आशिया' खंड बनवावें:-** पाकिस्तान, वंगिस्तान व उस्मानिस्तान हीं तीन स्वतंत्र राज्यें प्रस्थापित करून ज. चौधरी रहमत अलींचें समाधान झालेलें दिसत नाहीं; तर हिंदूंच्याकडे गेलेल्या प्रदेशांत सुद्धां, मुसलमानांच्या संख्येच्या प्रमाणानुसार भूमि घेऊन, तेथें मुसलमानी राष्ट्रें स्थापन व्हावींत व या सर्वांचें मिळून एक पाक-राष्ट्रमंडळ (Pak Common Wealth) बनवावें अशी त्यांची योजना आहे. हिंदुस्थान हें नांव देखील उरूं नये असें त्यांना वाटतें. 'India' या शब्दांतल्याच अक्षरांची उलटापालट करून बनलेल्या 'Dinia' (दिनिया) या नांवानें हा देश ओळखला जावा व पाक–आशियाच्या कक्षेंतील एक देश म्हणूनच तो राहावा अशी त्यांची मनीषा आहे.

पाकितानची कल्पना व पाकिस्तान हा शब्द या दोहोंचेहि जनक चौधरीसाहेबच असून स्वतंत्र मुसलमानी राज्यें प्रस्थापित व्हावींत असा दावा करणाऱ्यांत ते अग्रगण्य होत. संयुक्त राज्यघटनेला रुकार देऊन मुस्लिम मिल्लतीचा विश्वासघात गोलमेज–परिषदेला गेलेल्या मुसलमान प्रतिनिधींनीं केला असा निषेधाचा सूर त्यांनींच प्रथम काढलेला होता. मुस्लिम लीग आतां बऱ्याच प्रमाणांत आपल्या मताची बनली आहे असें ते म्हणतात. तेव्हां त्यांच्या योजनेचे आतां-

पर्यंत जे भाग प्रकाशित झाले आहेत व पुढें होतील, ते लीगला भाविष्यकाळांत मान्य होणारच नाहींत असें कोणी सांगावें ? आणि तसें झाल्यास एकादा दिवस असाहि उजाडलेला दिसेल, कीं ज्या वेळीं हिंदुस्थान हें नांवहि जगांत उरणार नाहीं आणि या देशांत सर्वत्र मिल्लतीचा अंमल जारी होऊन 'दिनिया' या नांवानेंच आपला हा देश ओळखला जाऊं लागेल !

## २०. डॉ० लतीफ यांची योजना

डॉ० एस्. ए. लतीफ यांनीं एक स्वतंत्र योजना बनवली असून **दि मुस्लिम प्रॉब्लेम् इन् इंडिया** (हिंदुस्थानांतील मुसलमानांचा प्रश्न) नांवाच्या पुस्तकांत त्यांनीं ती विस्तारपूर्वक मांडलेली आहे. अनेक गुंतागुंती उत्पन्न करणारी फाळणीची योजना त्यांत नसून, हिंदुस्थानचें एकीकरण नैसर्गिक रीतीनें साधतां यावें ही दृष्टि ठेवून आपण आपला आराखडा बनवलेला असल्याचा दावा लेखकानें केलेला आहे. एक–संस्कृति असलेल्या विभागांचें संयुक्त राज्य बनवावें आणि कॅनडामध्यें निरनिराळ्या भागांत राहाणाऱ्या दोन भिन्नवंशीय जमाती ज्याप्रमाणें उभयतांना सामान्य अशा एकाच देशासाटीं कार्यप्रवृत्त झालेल्या दिसतात तसाच प्रकार येथें व्हावा, असा त्या योजनेचा उद्देश आहे. आपली योजना विभागीकरणाची नसून एकीकरणाची आहे असें योजनाकारांचें म्हणणें आहे.[1]

त्यांच्या योजनेमधील कल्पना अशी आहे कीं, 'एकजिनसी वातावरण निर्माण करतां येईल असे मुसलमानांचे चार व हिंदूंचे किमानपक्षीं अकरा सांस्कृतिक विभाग हिंदुस्थानांत पाडतां येतील. देशभर जीं संस्थानें पसरलेलीं आहेत तीं त्यांच्या नैसर्गिक साधर्म्यानुसार या भिन्नभिन्न विभागांत वांटून टाकतां येतील. हा हरएक विभाग म्हणजे एकजीनसी राज्य असेल आणि त्यांत एकापेक्षां अधिक घटक समाविष्ट असतील, तर त्यांचा राज्यकारभार अत्यंत विकेंद्रित स्वरूपाचा, परंतु अखिल भारतीय संयुक्त राज्याशीं सुसंगत असा राहील.'[2]

१. एस्. ए. लतीफ : मुस्लिम प्रॉब्लेम् इन् इंडिया, पृ. २८–३८.

२. उक्त ग्रंथ, पृ. ३०.

**मुसलमानांचे सांस्कृतिक विभाग :**

(१) **वायव्य-गटः**—सिंध, बलुचिस्तान, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, आणि खैरपूर व भावलपूर हीं संस्थानें यांचीं सहा स्वयंतंत्र राज्यें बनवून त्यांच्या दरम्यान संयुक्त राज्यघटनेच्या स्वरूपाचे संबंध प्रस्थापित करण्यांत यावेत. त्यामुळें सुमारें २॥ कोटी मुसलमानांना स्वतःचें असें स्वतंत्र राज्य प्राप्त होऊं शकेल.

(२) **ईशान्य-गटः**—यांत कलकत्त्यासह पूर्व बंगालचा व आसामचा समावेश होईल व ३ कोटी मुसलमानांना राजकीय स्वातंत्र्य मिळेल.

(३) **दिल्ली-लखनौ-गटः**—वरील दोन गटांच्या दरम्यानच्या प्रदेशांत मुसलमानांची लोकवस्ती विषम आहे. या दोन गटांच्या नजीक जे मुसलमान राहात असतील त्यांना त्या गटामध्यें येऊन वस्ती करण्यासाठीं उत्तेजन द्यावें. उरलेली जी १ कोटी २० लक्ष मुसलमानांची संख्या आहे ती संयुक्तप्रांत व बिहारमध्यें वसलेली आहे. तिला पतियाळाच्या पूर्व हद्दीपासून थेट लखनौपर्यंत पसरलेल्या भूमीच्या तुकड्यांत एकत्र करावें. या विभागांत रामपूर, आग्रा, दिल्ली, कानपूर व लखनौ हीं स्थानें समाविष्ट होत असलीं, तरी बनारस, हरद्वार, अलाहाबाद व मथुरा हीं हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें या प्रदेशाच्या बाहेरच राहतात.

(४) **दख्खन-गटः**—हैदराबाद, वऱ्हाड व कर्नूल, कुडाप्पा, चित्तूर, उत्तर अर्काट आणि चिंगलपेट या जिल्ह्यांतून जाणारी व मद्रासपाशीं समुद्राला जाऊन मिळणारी एक चिरोटी त्यांत सामील करून हा गट तयार करावा. हिंदुस्थानच्या द्वीपकल्पांतल्या म्हणजे मध्यप्रांत, मुंबई व मद्रास प्रांत, म्हैसूर, कोचीन व त्रावणकोर येवढ्या प्रदेशांतल्या मुसलमान रहिवाशांना या दख्खनच्या गटांत गोळा करण्यांत यावें. ईशान्य व दिल्ली-लखनौ गटांतील जादा मुसलमानांनाहि येथेंच जागा करून देतां येईल. या चार गटांव्यतिरिक्त रजपुताना, गुजरात, माळवा व पश्चिम हिंदुस्थानांतील संस्थानें यांच्यामध्यें जे मुसलमान वसलेले आहेत त्याचें भोपाळ, टोंक, जुनागड, जावरा आदिकरून मुसलमानी संस्थानांत व अजमीरच्या स्वतंत्र नगरांत स्थलांतर करावें लागेल. हें स्थलांतर लोकसंख्येच्या अदलाबदलीच्या रूढ तत्त्वानुसार करण्यांत यावें.

**हिंदु सांस्कृतिक विभाग :**

(१) बिहारमध्यें घुसलेले पण बंगालशीं साधर्म्यभाव असलेले जे बंगालचे फाटे आहेत त्यांसकट बंगालच्या अवशिष्ट भागांत बंगाली हिंदूंचा गट बनवावा.

(२) उडिया बोलणाऱ्या सर्व रहिवाशांचा समावेश ओरिसांत करून एक गट बनवावा.

(३) पश्चिम बिहार, लखनौ–दिल्ली–गटाच्या सीमेपर्यंतचा संयुक्त प्रांताचा भाग व हिमालयापासून विंध्याचलापर्यंतचा टापू एका गटांत घ्यावा आणि त्यांत मध्य हिंदुस्थानांतील कांहीं संस्थानेंहि सामील करून घ्यावींत. हा खास हिंदुस्थानचा टापू बनेल. त्यांतली हिंदी भाषा पुनरुज्जीवित होईल व ती कदाचित् नवस्फूर्तीचें उगमस्थान बनेल.

(४) राजपुतान्यांतील रजपूत संस्थानांचा एक गट बनवतां येईल.

(५) काठिवाडमधील संस्थानांसह गुजरातचा एक गट बनवावा.

(६) महाराष्ट्र हा एक गट बनावा.

(७) कानडा, (८) आंध्र, (९) तामीळ, व (१०) मल्याळी या चार द्रावीड जमातींचा एक गट बनूं शकेल.

(११) हिंदू–शिखांचा एक गट बनवतां येईल. त्यांत वायव्य गटांतील काश्मीरपैकीं कांहीं भाग येईल.

या पुस्तकांत ज्या सीमारेषा सांगितलेल्या आहेत त्या केवळ सूचनांच्या स्वरूपाच्या असून बादशाही सीमासमितीमार्फत त्या योग्य प्रकारें निश्चित करून घेतां येतील.

मुसलमानी व हिंदु–विभागांत वसत असलेल्या हिंदूंना व मुसलमानांना शेजारच्या मुसलमानी व हिंदु–विभागांत पाठवून अधिक एकजिनसी विभाग तयार करण्यांत यावेत असा या योजनेंतला उद्देश आहे. आपण कोणत्या विभागांत कायमची वस्ती करावयाची तें ठरवण्याचें स्वातंत्र्य हरिजनांना द्यावें. लोकसंख्येची ही अदलाबदल अनेक वर्षांच्या काळांत मंद गतीनें करण्यांत

यावी आणि सुरवातीला प्रयोगादाखल कोणी आपखुषीनें स्थलांतर करीत असल्यास पहावें.

राज्यघटनेमध्यें पुढील तरतुदी केलेल्या असाव्यात :

(१) **हिंदी राष्ट्रांचा सार्वजनिक कायदाः**—हिंदुस्थानांतील कोणत्याहि एका अथवा अनेक राष्ट्रांतील नागरिक जर कांहीं विशेष कारणांस्तव आपल्या नैसर्गिक विभागाव्यतिरिक्त अशा विभागांत वसत असतील, तर त्यांना तेथें वैयक्तिक रक्षणाचे व नागरिकत्वाचे हक्क उपलब्ध असावेत.

(२) **धार्मिक स्थानें इत्यादि बाबतः**—धार्मिक स्थानें, स्मारकें, कबरस्थानें इत्यादींची निगा प्रत्येक संयुक्त राज्यानें मध्यवर्ति सरकारच्या नियंत्रणानुसार ठेवावी.

(३) **ख्रिस्ती, बौद्ध, पारशी आदि लोकः**—असल्या प्रकारच्या सर्व छोट्या राष्ट्रिकांना स्वतःची पृथगात्मता सुरक्षित ठेवतां यावी म्हणून जरूर तीं सर्व संरक्षणें प्रत्येक राज्याकडून मिळावींत. त्यांची इच्छा असेल, तर स्वतःसाठीं एकादा पेटा अथवा विभाग मागून घेण्याचा हक्कहि त्यांना असावा.

(४) **हरिजनः**—आपलें कायमचें वसतीस्थान हिंदु–विभागांत असावें कीं मुसलमान–विभागांत असावें, तें ठरवण्याची मोकळीक हरिजनांना देण्यांत यावी. तेथें त्यांना नागरिकत्वाचे निःशेष हक्क उपभोगावयास मिळाले पाहिजेत.

१९३५ च्या कायद्याऐवजीं चालू करतां येईल अशी एक राज्यघटनाहि योजनाकारांनीं बनवलेली आहे.

संयुक्त राज्याच्या प्रांतिक घटकांना तदनुसार शक्यतों संपूर्ण स्वायत्तता देण्यांत आलेली असून संयुक्त राज्याच्या अधिकारांची कक्षा अत्यावश्यक तेवढ्याच खात्यांपुरती मर्यादित केल्यामुळें त्या घटनेनुसार हिंदी संस्थानें व व संस्थानिक यांचे अधिकार सुरक्षित राहिलेले आहेत.

एकमेकांना लागून असलेल्या ज्या घटकांत सामर्थ्य असेल त्यांना सांस्कृतिक व आर्थिक बाबतींत समान धोरण आंखतां यावें म्हणून विभाग–मंडळें (Zonal or Regional Boards) स्थापन करावींत आणि जीं समान धोरणें

विभाग–मंडळांमार्फत मंजूर करण्यांत येतील, तदनुसार कायदे करण्याची मुभा प्रत्येक घटकाला असावी अशी तरतूद त्या घटनेंत आहे.

प्रत्येक प्रांतिक घटकामध्यें व त्याचप्रमाणें मध्यवर्ति ठिकाणीं इंग्रजी राज्य-घटनेच्या धर्तीचीं कार्यकारीमंडळें न राहतां संमिश्र व स्थिर कार्यकारीमंडळें असतील, व सर्वसंमत अशा धोरणानुसार त्यांच्याकडून कारभार चालवण्यांत येईल.

मुसलमान व इतर अल्पसंख्याकांना मध्यवर्ति ठिकाणीं व घटक राज्यांत सांस्कृतिक व इतर सुरक्षितता लाभावी म्हणून त्या योजनेंत तरतूद करण्यांत आलेली आहे.

या योजनेप्रमाणें हिंदुस्थानांत एक संयुक्त राज्यघटना होणार असून या संयुक्त राज्यांतील घटकांना संरक्षण, परराष्ट्रीय बाबी, व्यापार व वाहतुक यांसारख्या सर्वांना अगदीं समाईक असलेल्या बाबी सोडून जास्तींत जास्त स्वायत्तता राहील. शेषाधिकारहि घटकांनाच असावेत अशी व्यवस्था या योजनेंत केलेली आहे.

हिंदुस्थानांत निरनिराळ्या संस्कृती आहेत. या संस्कृतींना जोमानें वृद्धिंगत होण्याची मोकळीक अवश्य मिळाली पाहिजे. संयुक्त राज्यांत खुषीनें आणि समाधानानें राहण्यासाठीं त्यांना निर्धास्तपणा वाटणें आवश्यक असल्याकारणानें शक्यतोंवर सांस्कृतिक विषयांसंबंधींचे कायदे मध्यवर्ति सरकारनें टाळले पाहिजेत.

घटक राज्यांना संपूर्ण स्वायत्तता दिल्यावर संयुक्त राज्य व घटक राज्यें यांना सामाईक अशीं खातीं उरत नाहींत. त्यामुळें निरनिराळ्या विभागांत सुसूत्रता आणण्यासाठीं एकाद्या संस्थेची आवश्यकता निर्माण होते. यासाठीं अशी सूचना करण्यांत आली आहे कीं, घटक राष्ट्रांच्या गटांनीं समान प्रश्नांवर समान धोरणें आंखण्यासाठीं विभागमंडळें स्थापन करावींत व त्या धोरणानुसार कायदे करण्यास निरनिराळ्या घटकांना–मग तीं संस्थानें असोत अगर प्रांत असोत–मुभा द्यावी. अशीं विभागमंडळें स्थापन केल्यानें या घटकांचीं उप-

संयुक्त राज्यें करण्याची आवश्यकता उरणार नाहीं; अशा उपसंयुक्त राज्यांनीं केवळ राज्यकारभाराचा आणि विधिमंडळांचा लवाजमा वाढेल.

कोणत्याहि बहुसंख्य जमातींकडून जुलूम होण्याची शक्यता असल्यामुळें त्यावर संरक्षक उपाय म्हणून निरनिराळ्या गटांमधून व पक्षांमधून एक स्थिर परंतु संमिश्र कार्यकारी–मंडळ बनविण्याची तरतूद या योजनेंत केलेली आहे. त्या मंत्रिमंडळाचें धोरण निरनिराळ्या विचारसरणींत तडजोड घडवून आणून परस्पर–संमतीनें ठरविलें जाईल. अशी विचारांची तडजोड सर्व हिंदुस्थानच्या पक्षोपक्षांना एकत्र जमवून घडवून आणतां येईल. हें कार्यकारी–मंडळ म्हणजे एक सदोदित अस्थिर असें संमिश्र सरकार न राहतां अमेरिकेंतल्याप्रमाणें स्थिर अशा संमिश्र मंडळाचें स्वरूप त्याला येईल. या योजनेमध्यें विचारासाठीं म्हणून अशी एक सूचना मांडली आहे कीं, प्रांताच्या विधिमंडळांतील सर्व सभासदांनीं पंतप्रधानाची निवडणूक करावी व त्याची मुदत विधिमंडळाच्या मुदतीइतकीच असावी. निरनिराळ्या जमातींत अखिल हिंदुस्थानसाठीं एक जातीय प्रमाण सर्वानुमतें ठरविण्यांत आल्यावर त्या प्रमाणानुसार आपले सहकारी निवडण्यास मुख्य प्रधानास मुभा असली पाहिजे. निवडून आलेल्या मुख्य प्रधानानें अशा प्रकारें आपल्या कार्यकारी मंडळाची निवड केली म्हणजे विधि-मंडळाच्या विरोधी ठरावामुळेंसुद्धां तें पदभ्रष्ट होणार नाहीं.

मुसलमानांच्या संरक्षणासाठीं राज्यघटनेंत पुढील बंधनें असावींत :

(अ) कायदेमंडळांतील प्रतिनिधित्वः—(१) विभक्त मतदारसंघ व हल्लीं निरनिराळ्या प्रांतांत मुसलमानांचें जें प्रमाण आहे तें कायम राखणें. (२) हिंदी संस्थानांमार्फत मध्यवर्ति विधिमंडळांत पुरेसे मुसलमान—कमींत कमी एक-तृतीयांश तरी—धाडावेत. (३) विभागीय अगर प्रादेशिक मंडळांतून मुसल-मानांना योग्य व प्रभावी प्रतिनिधित्व असावें. या प्रतिनिधींची संख्या त्या त्या विभागांतील घटकांच्या विधिमंडळांत जितके मुसलमान प्रतिनिधी असतील त्यांच्या संख्येनुसार ठरवावी.

(आ) कायदेकानूः—धर्म, वैयक्तिक कायदे व संस्कृति यांच्याशीं निगडित

असलेले सर्व कायदे विधिमंडळांतील मुसलमान सभासदांनीं ठरवावेत. यासाठीं त्यांच्या खास समित्या नेमाव्यात. या समित्यांत मुसलमान सभासदांच्या संख्येच्या एकतृतीयांश इतके अधिक सभासद, मुसलमानी कायदा व धर्म यांत निष्णात असलेले नेमून त्यांच्या सहकार्यानें कायदे करावेत. या खास समित्यांचे निर्णय विधिमंडळानें मानावेत. या निर्णयांमुळें इतर जमातींवर परिणाम होणार असेल, तर त्या निर्णयांवर विधिमंडळानें फेरचर्चा करावी. मात्र त्यांतील मूलभूत प्रश्नांवर कोणत्याहि उपसूचना संमत करूं नयेत.

(इ) कार्यकारी-मंडळः—मंत्रिमंडळांत हिंदू व मुसलमान या दोघांचाहि समावेश व्हावा. त्याचें धोरण दोघांनाहि संमत असेंच रहावें. हें मंत्रिमंडळ काढून टाकण्याचा अधिकार अमेरिकेंतल्याप्रमाणें विधिमंडळाला असूं नये. मात्र मुख्य प्रधानाची निवड अमेरिकेप्रमाणें लोकांनीं न करतां सबंध विधिमंडळानें करावी. विधिमंडळ जितके दिवस अस्तित्वांत असेल, तेवढाच काल मंत्रिमंडळहि अस्तित्वांत रहावें. मुख्य प्रधानानें विधिमंडळांत जे निरनिराळे गट असतील त्यांच्यांतून मंत्री निवडावेत. त्यांत योग्य तितके मुसलमान असावेत. मुसलमान मंत्र्यांना विधिमंडळांतील मुसलमान सभासदांचा पाठिंबा असला पाहिजे. त्यांची निवड मुसलमान सभासदांनीं जी यादी सादर केली असेल, त्या यादींतूनच व्हावी. कायदा, सुव्यवस्था व शिक्षण या खात्यांना प्रत्येकीं एक मंत्री व उपमंत्री असावेत व यांपैकीं एक तरी मुसलमान असावा.

(ई) पब्लिक् सर्व्हिस् कमिशन्ः—ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य असतील त्यांतील कमिशनवर निदान एक तरी मुसलमान असावा. नोकऱ्यांतील मुसलमानांचें प्रमाण राखलें जात आहे कीं नाहीं, हें पाहणें, हें त्यांचें एक कार्य राहील.

(उ) न्यायः—मुसलमानांच्या वैयक्तिक कायद्यांचा निवाडा मुसलमान न्यायाधिशानें द्यावा.

(ऊ) मुसलमानांच्या आर्थिक सुधारणा व शिक्षण यांचें मंडळः—या मंडळाला मुसलमानी शिक्षणाची सांस्कृतिक बाजू, यांत्रिक व औद्योगिक शिक्षण

या गोष्टींवर ताबा व नियंत्रण असावें. त्या मंडळानें आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठीं निरनिराळे उपाय योजावेत.

(ए) खास कर :—जर कांहीं खास कारणासाठीं मुसलमान कर देण्यास तयार असतील, तर तसा कायदा पास करावा.

संक्रमणाच्या कालांत स्थलांतर करणें लोकांच्या मर्जीवर अवलंबून ठेवावें. यासाठीं प्रत्येक विभागाकरितां स्वतंत्र कायदे करावेत, आणि लोकसंख्या हळूहळू एका विभागांतून दुसऱ्या विभागांत हलविण्याचा कार्यक्रम आंखण्याकरितां एक बादशाही समिति नेमावी. अंतिम संयुक्त राज्याच्या कल्पनेस अनुरूप अशी संक्रमण कालाची राज्यघटना असावी. यासाठीं ताबडतोब लोकसंख्या न हलवितां सांस्कृतिक व भाषावार असे नवीन प्रांत पाडणें आवश्यक होईल. असे प्रांत हळूहळू एकेक पाडीत गेलें तरी चालेल; परंतु बिहार आणि संयुक्तप्रांत यांमध्यें सध्यां रहात असणाऱ्या मुसलमानांसाठीं म्हणून ताबडतोब एक नवीन प्रांत निर्माण करणें जरूर आहे. हा नवीन प्रांत मुस्लिम विभागांत समाविष्ट करून घेतां यावा यासाठीं त्या प्रांतांचा मुख्य प्रधान मुसलमान असावा व त्यानेंच प्रांताच्या धोरणाची सूत्रचालना करावी.

लतीफ-योजनेंत दोन गंभीर दोष आहेत. लोकसंख्येची देवाणघेवाण भरमसाट प्रमाणावर करावी लागणार आहे हा पहिला दोष. ही देवाणघेवाण कांहीं वेळां अत्यंत दूरच्या प्रदेशांमध्यें होणार आणि ती केवळ ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांतांतच नव्हे, तर ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें यांत सुद्धां करावी लागणार. यासाठीं अनेक वर्षांचा कालावधि लागणार आहे हें खरें असलें, तरी प्रचंड खर्च आणि यातायात यांमुळें ही गोष्ट अव्यवहार्य ठरत आहे. ज्या भागांत, वातावरणांत आणि हवामानांत लोक पिढ्यान्‌पिढ्या राहिले त्यांपासून त्यांना तोडून अज्ञात व अपरिचित अशा भागांत आणून सोडल्यानें लोकांचे कल्पनातीत हाल होतील. सामुदायिक स्थलांतर प्रथम खुषीवर अवलंबून असलें, तरी पुढें तें सक्तीचें होणारच. तें जर प्रत्येकाच्या मर्जीवर अवलंबून ठेवलें, तर फारसे हिंदू अगर मुसलमान तें अवलंबिणार नाहींत;

कारण दोन्ही आपापल्या भूमीशीं निगडित झालेले आहेत. उलटपक्षीं, त्याबाबत सक्ति झाली, तर लोकांचे हाल कुत्रा खाणार नाहीं. 'कॉन्फेडरसी ऑफ इंडिया' या पुस्तकांत 'पंजाबी' या गृहस्थांनीं दाखवल्याप्रमाणें लोकसंख्या इकडून तिकडे हलवायची झाली, तर हिंदुस्थानच्या जवळजवळ दोनतृतीयांश लोकांवर त्याचा परिणाम होईल. हजारों मैल भूप्रदेशांतील लक्षावधि लोक इकडून तिकडे हलविल्याचा दाखला उभ्या इतिहासांत नाहीं.

दुसरा आक्षेप असा कीं, या योजनेनुसार संस्थानें हल्लीं आहेत तशींच थोड्याफार फरकानें राहणार आहेत व जें संयुक्त राज्य होणार, तेंसुद्धां ब्रिटिशांच्या अमदानीखालींच होणार आहे. कदाचित् असें असूं शकेल कीं, लेखकानें ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांतील शास्ते व शासित यांच्यांतील परस्पर-संबंध निश्चित करण्याची मुभा प्रजाजनांनाच दिली असावी. परंतु, असली राज्यघटना तयार करतांना अशा प्रकारचे मूलभूत प्रश्न अनिर्णित ठेवून जातीय प्रश्नावरच लक्ष केंद्रित करून चालणार नाहीं. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाबाबत आपली एकवाक्यता असल्याचें सर्वच हिंदी पक्षांनीं आपल्या ठरावांद्वारें दर्शविलें आहे. याला प्रागतिक पक्षाचाच काय तो अपवाद आहे. कारण, वसाहतीचें स्वराज्य व संपूर्ण स्वातंत्र्य यांत तो पक्ष फरक करीत नाहीं. त्याचप्रमाणें संस्थानांतूनसुद्धां हल्लींचा एकतंत्री अंमल चालू राहूं देणें अशक्य आहे. जनतेच्या प्रतिनिधींच्या हातीं सत्ता देऊन तेथें लोकशाहीच स्थापन केली पाहिजे. संस्थानिकांना फार तर इंग्लंडप्रमाणें मर्यादित राजसत्ता आपल्या हातीं राहावी, अशी अपेक्षा धरतां येईल.

लेखकाच्या म्हणण्याप्रमाणें या योजनेचें स्वरूप केवळ सूचनात्मक असून ती योजना अमलांत आणण्याचें काम बादशाही समिति किंवा कोणत्या तरी तत्सम संस्थेमार्फतच झालें पाहिजे. अर्थात् आमची तत्संबंधींची टीकासुद्धां योजनेप्रमाणेंच प्रासंगिक आहे. तरीसुद्धां कांहीं गोष्टी निदर्शनास आणणें जरूर आहे. उदा० हैदराबाद, वऱ्हाड आणि कुर्नूल, कुडाप्पा, चित्तूर, उत्तर अर्काट व चिंगलपेट जिल्ह्यांतून मद्रासपर्यंत जाऊन पोंचणारा पट्टा मिळून

जो दख्खनचा विभाग निर्माण करावा असें सुचविलें आहे, त्याला कांहीं आधारच नाहीं. कारण मुंबई, मद्रास, हैदराबाद मध्यप्रांत, कोचीन आणि त्रावणकोर येथील सर्वच्या सर्व मुस्लिम लोकसंख्या जरी या टापूंत हल-विली, तरी त्या टापूचें क्षेत्रफळ मुसलमान लोकसंख्येच्या प्रमाणाच्या मानानें इतर विभागांतील बिगर–मुसलमानांना जे विभाग दिलेले आहेत त्यांशीं तुलना करितां किती तरी मोठें राहील. बरें, हा एकभाषा बोलणाऱ्यांचाहि प्रांत होणार नाहीं. कारण त्यांत मराठी, तेलगू, कानडी व कांहीं प्रमाणांत तामीळ बोल-णाऱ्यांचाहि समावेश होईल. फेरविभागणी करावयाचीच झाली, तर हैदराबाद संस्थानांतील भाषा बोलणारे विभाग वेगळे करून ते हिंदुस्थानांतील समान-भाषिक प्रदेशांशीं कां जोडण्यांत येऊं नयेत, असा प्रश्न उत्पन्न होतो. पण त्यासाठीं हैदराबाद संस्थानाचेहि तुकडे पाडावे लागतील; आणि हें जर नको असेल, तर ब्रिटिश प्रांतांचे लचके तोडून हैदराबाद संस्थानांत भर घालण्याची किचकट कल्पना सोडावी हें बरें. त्या विभागांतील विद्यमान् मुसलमानांत शेजारच्या विभागांतील मुसलमानांची भर घातली, तरी देखील या नव्या टापूंत मुसल-मानांची बहुसंख्या होईल किंवा नाहीं याची शंकाच आहे.

विभागमंडळें सुरू करण्याची कल्पना तर वायफळ वाटते. त्यांतील घटक एक तर स्वायत्त असणार किंवा स्वायत्त नसणार. मध्यवर्ति संयुक्त सरकार आणि घटक–राज्यें यांच्या दरम्यान आणखी एक अधिकारकेंद्र निर्माण करण्यानें परिस्थितींत कांहींएक सुधारणा घडून येणार नाहीं. दोन किंवा अधिक घटकांमधील विवाद्य प्रश्नांवर त्यांच्या विनंतीनुसार मध्यवर्ति सरकारनें दिलेला निर्णय अमान्य झाल्यास तो प्रश्न त्यासाठीं खास नेमण्यांत आलेल्या न्याय-मंडळामार्फत सोडवतां येईलच. घटनेसंबंधीं ज्या निरनिराळ्या तरतुदी या-खेरीज मांडल्या आहेत, त्यांची तपशीलवार चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. कारण, तसें करावयाचें म्हटल्यास बऱ्याचशा तरतुदींसंबंधीं सविस्तर विवेचन करावें लागेल. युनायटेड् स्टेट्स् किंवा स्वित्झर्लंडच्या राज्यघटनांत हिंदी परि-स्थितीला अनुसरून योग्य ते बदल करून आपल्याला एक राज्यघटना तयार

करतां येईल. अर्थात् मुसलमानांचें समाधान होत असेल, तरच हें करावयाचें. असो. या विषयावर आतांच चर्चा करण्याचें कारण नाहीं. खूप मोठ्या लोकसंख्या इकडून तिकडे हलवून प्रादेशिक फेरविभागणीचा मुद्दा या योजनेंत घुसडून दिलेला असल्याकारणानें तिच्या गुणावगुणांची पारख करण्याचें काम अधिकच बिकट होऊन बसणार आहे.

## २१. शिकंदर हयातखानांची योजना

'हिंदी संयुक्त राज्याच्या योजनेची रूपरेषा' (Outlines of a scheme of Indian Federation) या आपल्या पुस्तिकेंत मरहूम सर शिकंदर हयातखान यांनीं ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांसाठीं एक योजना सुचविली आहे.

(१) सर्व हिंदुस्थानचें एक संयुक्त राज्य प्रादेशिक पायावर स्थापन करण्यासाठीं देशाचे सात विभाग पाडले जातील.

विभाग १ ला—आसाम आणि बंगाल (विभागाचा आकार लहान करण्यासाठीं एकदोन पश्चिमेकडील जिल्हे वगळून); बंगालमधील संस्थानें व सिक्किम.

विभाग २ रा—बंगालमधील जो भाग ओरिसाला जोडला जाईल, त्यासकट ओरिसा व बिहार.

विभाग ३ रा—संयुक्त प्रांत व संयुक्त प्रांतांतील संस्थानें.

विभाग ४ था—मद्रास, त्रावणकोर, मद्रासमधील संस्थानें व कूर्ग.

विभाग ५ वा—मुंबई, हैदराबाद, पश्चिम हिंदुस्थान, मुंबईमधील संस्थानें व म्हैसूर आणि मध्यप्रांतांतील संस्थानें.

विभाग ६ वा—बिकानेर व जेसलमीर सोडून राजपुतान्यांतील संस्थानें, ग्वाल्हेर व मध्य-हिंदुस्थानांतील संस्थानें; बिहार व ओरिसांतील संस्थानें; मध्यप्रांत आणि वऱ्हाड.

विभाग ७ वा—पंजाब आणि सिंध; वायव्य सरहद्द प्रांत व काश्मीर; पंजाब-मधील संस्थानें व बलुचिस्तान; बिकानेर व जेसलमीर. ही आंखणी तात्पुरती असून जरुरीप्रमाणें तींत बदल करण्यास हरकत नाहीं.

(२) प्रत्येक विभागासाठीं एक प्रादेशिक विधिमंडळ राहील; त्यांत ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांचे प्रतिनिधी घेतले जातील. १९३५च्या कायद्या-नुसार प्रत्येक विभागाला संयुक्त विधिमंडळावर जेवढे प्रतिनिधी पाठवण्याचा अधिकार दिला आहे, तेवढे प्रतिनिधी प्रत्येक विभागानें धाडावेत.

(३) निरनिराळ्या प्रादेशिक विभागांच्या विधिमंडळांच्या प्रतिनिधींचें एक मध्यवर्ति संयुक्त विधिमंडळ बनेल. त्यांत पुढें परिच्छेद २१ मध्यें सांगितलेल्या शर्तींवर ३७५ प्रतिनिधी (२५० ब्रि. हिंदुस्थानचे व १२५ हिंदी संस्थानांचे) असतील.

(४) संयुक्त विधिमंडळांत $\frac{1}{3}$ सभासद मुसलमान असतील.

(५) इतर अल्पसंख्याकांना १९३५ च्या कायद्यानें संयुक्त विधिमंडळांत जेवढया जागा दिलेल्या होत्या तेवढया मिळतील.

(६) प्रादेशिक विधिमंडळांचें काम फक्त प्रादेशिक यादींत जेवढे विषय असतील त्यांसंबंधीं कायदे करण्याचें राहील. परंतु त्या विभागांतील दोन अथवा अधिक घटकांनीं विनंति केली, तर प्रांतिक यादींतील विषयांसंबंधीं कायदे कर-ण्याससुद्धां हरकत नाहीं. हे कायदे त्या विभागांतील घटकांत अंमलांत आणण्या-पूर्वीं त्यांना त्या घटकांच्या सरकारांची मंजुरी लागेल; व अशा मंजुरीनंतर त्या सरकारांनीं पूर्वीं त्या विषयांवर केलेले कायदे रद्द होतील.

(७) प्रादेशिक विधिमंडळांत प्रादेशिक यादींतील विषयांवर जे कायदे मांडले जातील ते पास होण्यासाठीं, लहानसहान घटकांना अधिक सुरक्षितता मिळावी म्हणून, कमींत कमी $\frac{2}{3}$ बहुमत लागेल.

(८) प्रादेशिक अगर प्रांतिक यादींतील विषयांसंबंधीं कायदे करण्याचा अधिकार प्रादेशिक विधिमंडळें मध्यवर्ति विधिमंडळाच्या हातीं सुपूर्त करूं शकतील. परंतु ७ प्रादेशिक विधिमंडळांपैकीं ४ विधिमंडळांनीं अशी विनंति

केल्याखेरीज हा अधिकार प्रत्यक्षांत येऊं शकणार नाहीं; आणि सातहि विभागांनीं अशी विनंति केली नाहीं, तर फक्त जे विभाग विनंति करतील त्या विभागांपुरताच हा नियम लागू होईल.

(९) मध्यवर्ति संयुक्त विधिमंडळानें विभागांनीं विनंति केल्यावरून अगर प्रादेशिक विधिमंडळांच्या घटकांनीं विनंति केल्यावरून, जे कायदे केले असतील ते कायदे रद्द व्हावेत, म्हणून जर किमानपक्षीं तीन विभागांनीं अगर विभागांतील निम्म्या घटकांनीं विनंति केली, तर ते कायदे रद्द समजले जातील.

(१०) संयुक्त मंत्रिमंडळांत बादशहांचा प्रतिनिधि म्हणून व्हाइसरॉय व संयुक्त राज्याचा मुख्य प्रधान धरून कमींत कमी ७ व अधिकांत अधिक ११ मंत्री राहतील.

(११) संयुक्त विधिमंडळांतील सभासदांमधून व्हाइसरॉय मुख्य मंत्र्याची नेमणूक करील. या मुख्य प्रधानाच्या सल्ल्यानुसार व्हाइसरॉय विधिमंडळाच्या सभासदांतूनच मंत्रिमंडळ निवडील. मात्र याबाबत पुढील गोष्टी पाळल्या पाहिजेत:—

(अ) प्रत्येक विभागातर्फे मंत्रिमंडळांत एक तरी प्रतिनिधि असला पाहिजे. (आ) $\frac{1}{3}$ मंत्री मुसलमान असले पाहिजेत. (इ) मंत्र्यांची संख्या ९ पर्यंत असेल तर २, किंवा ९ पेक्षां जास्त असेल तर ३ मंत्री संस्थानचे असले पाहिजेत. (आ) आणि (इ) यांची सांगड घातली गेली तरी हरकत नाहीं. इतर प्रमुख अल्पसंख्याकांनासुद्धां योग्य तें प्रतिनिधित्व मिळण्यासाठीं सर्वतोपरी प्रयत्न करण्यांत येतील. (ई) ही संयुक्त राष्ट्राची योजना सुरू झाल्यापासून पहिलीं २० किंवा १५ वर्षे व्हाइसरॉय संरक्षण व परराष्ट्रीय या खात्यांसाठीं आपले मंत्री नेमील. ते विधिमंडळाच्या सभासदांपैकीं किंवा बाहेरचेहि असतील. नंतर मात्र सर्व मंत्री विधिमंडळाच्या सभासदांतूनच निवडले जातील.

मंत्री व खातीं यांचीं जुजबी पदें व विभागणी पुढीलप्रमाणें सुचविली आहे:—(१) संयुक्त राष्ट्राचा मुख्य प्रधान (२) संरक्षणमंत्री (३) परराष्ट्रीय मंत्री. याला हिंदी संस्थानांकडेहि लक्ष पुरवावें लागेल. (४) अर्थमंत्री (५) गृह-

मंत्री (६) वाहतुकमंत्री (७) अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांकडे लक्ष पुरवण्यासाठीं मंत्री (८) निरनिराळ्या विभागांतील समाईक बाबतींत एकवाक्यता व सुसूत्रता येण्यासाठीं सुसूत्रतामंत्री (९) व्यापार व उद्योगमंत्री.

(१२) (अ) संयुक्त विधिमंडळ जितके दिवस अस्तित्वांत असेल, तितके दिवस म्हणजे सर्वसाधारणपणें ५ वर्षेपर्यंत मंत्री अधिकार राहतील. (आ) व्हाइसरॉयची मर्जी असेल तितकेच दिवस मंत्री अधिकारावर राहतील. (इ) एकाद्या मंत्र्यानें आपल्या प्रादेशिक विधिमंडळांतील बहुसंख्य सभासदांचा विश्वास गमावला, तर त्याला दूर करण्यांत येईल. (ई) संयुक्त विधिमंडळांत अविश्वासाचा ठराव पास झाला, तर परिच्छेद ११त दर्शविलेल्या मंत्र्यांखेरीज, सर्व मंत्रिमंडळ राजिनामा देईल.

(१३) प्रादेशिक विधिमंडळांतील प्रतिनिधी पुढील पद्धतीनें निवडले जातील:

(अ) ब्रिटिश हिंदुस्थानांतील घटकांचे प्रतिनिधी, १९३५च्या कायद्यांत संयुक्त विधिमंडळांतील प्रतिनिधींची निवड ज्या रीतीनें सांगितली आहे त्याच पद्धतीनुसार प्रांतिक विधिमंडळांतून निवडले जातील. (आ) हिंदी संस्थानांच्या प्रतिनिधींची निवड शक्य तों पुढील पद्धतीनें केली जावी:

(१) प्रादेशिक व संयुक्त विधिमंडळें सुरू झाल्यापासून पहिलीं दहा वर्षें एकंदर प्रतिनिधींच्या तीनचतुर्थांश प्रतिनिधी संस्थानिकानें नेमावेत व उरलेले एकचतुर्थांश संस्थानच्या विधिमंडळानें अगर तत्सम संस्थेनें जे उमेदवार निवडले असतील त्यांतून घ्यावेत. (२) पुढील पांच वर्षांत $\frac{2}{3}$ सभासद संस्थानिकानें नेमावेत व उरलेले $\frac{1}{3}$ वरील (१) प्रमाणें निवडलेले असावेत. (३) २५ वर्षांनीं निम्मे नेमलेले व निम्मे वरील (१) प्रमाणें लोकनियुक्त असावेत. (४) वीस वर्षें व त्यानंतर $\frac{1}{3}$ नेमावेत व $\frac{2}{3}$ वरील (१) प्रमाणें लोकनियुक्त असावेत.

जर एकाद्या संस्थानाला अगर संस्थानिकांच्या गटाला १ च प्रतिनिधि पाठवतां येत असेल, तर संस्थानिकानें पहिलीं पंधरा वर्षें स्वतः नेमणूक करावी व नंतर वरील (१) प्रमाणें निवडलेला प्रतिनिधि धाडावा.

(१४) संरक्षणाच्या प्रश्नावर सल्ला देण्यासाठीं एक संरक्षण—समिति असावी. अध्यक्ष म्हणून व्हाइसरॉय; संयुक्त राष्ट्राचा मुख्य प्रधान; संरक्षण, परराष्ट्र, अर्थ व वाहतुक इत्यादि खात्यांचे मंत्री; सर सेनापति; चीफ ऑफ दि जनरल् स्टाफ्; वरिष्ठ आरमारी अधिकारी; वरिष्ठ हवाई अधिकारी; सात विभागांचे सात प्रतिनिधी; व्हाइसरॉयनें नेमलेले ५ सरकारी तज्ज्ञ; व्हाइसरॉयनें नेमलेले २ बिनसरकारी सभासद आणि संरक्षण खात्याचा चिटणीस, हे त्या समितीचे सभासद असतील.

(१५) परराष्ट्रीय बाबतींत सल्ला देण्यासाठीं एक समिति तयार करावी. अध्यक्ष म्हणून व्हाइसरॉय; मुख्य प्रधान; परराष्ट्रमंत्री; सात विभागांचे सात प्रतिनिधी त्या त्या विधिमंडळांतून अध्यक्षांनीं निवडलेले; व्हाइसरॉयनें नेमलेले २ सरकारी व २ बिनसरकारी सभासद व परराष्ट्र खात्याचा चिटणीस, हे त्या समितीचे सभासद असतील.

यापैकीं कोणत्याहि समितीवर संस्थानांचे प्रतिनिधी ३ पेक्षां कमी असतील, तर विधिमंडळाच्या अध्यक्षानें नरेंद्रमंडळानें जी यादी सादर केली असेल, तिच्यांतून अधिक सभासद निवडावेत.

(१६) संयुक्त रेल्वे—समितींत सातहि विभागांतून, कमीत कमी प्रत्येकीं एक तरी, सभासद असावा.

(१७) राज्यघटनेंत पुढील गोष्टींसाठीं प्रभावी संरक्षक बंधनें असावींत:—

(अ) अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांसाठीं. (आ) ब्रिटनमध्यें जन्मलेल्या नागरिकांविरुद्ध जातीय पक्षपात केला जाऊं नये यासाठीं. (इ) हिंदी संस्थानांबरोबर जे करारमदार केले असतील त्यांचें उल्लंघन होऊं नये म्हणून. (ई) संयुक्त मंत्रिमंडळ अगर संयुक्त किंवा प्रादेशिक विधिमंडळांनीं ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें यांच्या घटकांत हस्तक्षेप करूं नये व त्याघटकांची स्वायत्तता अबाधित राहावी यासाठीं. (उ) परराष्ट्रापासून संरक्षण व निरनिराळ्या घटकांत आणि सबंध देशांत शांतता व सुव्यवस्था नांदावी म्हणून. (ऊ) एका घटकांतील अगर विभागांतील नागरिकांनीं दुसऱ्या घटकाविरुद्ध अगर विभागाविरुद्ध

प्रक्षोभक हालचाली करूं नयेत यासाठीं. (ए) अल्पसंख्याकांची संस्कृति व धार्मिक हक्क अबाधित राखण्याकरितां.

(१८) हिंदी सैन्याची जी रचना १ जानेवारी १९३७ ला असेल ती बदलूं नये. शांततेच्या काळांत जेवढें सैन्य लागतें त्यांत कमीअधिक करावयाचें झाल्यास त्यांतील १ जानेवारी १९३७चें जातीय प्रमाण बदलूं नये. युद्ध अगर गंभीर परिस्थिति निर्माण झाली, तर मात्र या नियमाला मुरड घालावी.

(१९) संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, वाहातुक, जकाती, टांकसाळ इ० सारखीं सबंध देशाच्या हितसंबंधांच्या दृष्टीनें किंवा राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं आवश्यक असणारीं खातींच तेवढी मध्यवर्ति सरकारच्या ताब्यांत राहतील. हल्लीं (१९३५ च्या कायद्यांत) जीं बाकीचीं खातीं संयुक्त सरकारच्या यादींत समाविष्ट केलेलीं आहेत, तीं घटकांकडे अगर विभागांकडे राहतील. संयुक्त सरकारच्या यादींत ज्या गोष्टींचा निश्चित उल्लेख नाहीं, त्यांसंबंधीं शेषाधिकार घटकांना मिळतील. ज्या गोष्टी विभागांकडे सोपविल्या आहेत, त्या प्रादेशिक विधिमंडळांकडे राहतील.

(२०) एकादा विषय संयुक्त सरकारच्या, प्रादेशिक विभागाच्या अगर प्रांताच्या किंवा संस्थानच्या कक्षेंत आहे किंवा समाईक आहे यासंबंधीं शंका निर्माण झाली, तर त्या बाबतींत व्हाइसरॉयचा स्वतःचा निर्णय अखेरचा मानला जाईल.

(२१) हल्लीं कौन्सिल् ऑफ स्टेट्मध्यें ज्या हितसंबंधांना प्रतिनिधित्व दिलेलें आहे त्यांच्या जागा सातहि विभागांत सारख्या वाटून दिल्या व संयुक्त विधिमंडळांत त्यांना जादा जागा देण्यांत आल्या, तर संयुक्त विधिमंडळ एकमंडलात्मक राहील.

(२२) अल्पसंख्याकांच्या हितरक्षणासाठीं मध्यवर्ति सरकारांत आणि प्रांतांत एक प्रभावी व पुरेशी अशी यंत्रणा उभारली जाईल.

या योजनेच्या बाजूनें असा दावा मांडला जातो कीं, ब्रिटिश हिंदुस्थानमधील प्रांत व हिंदी संस्थानें हे दोन विशिष्ट घटक मानून त्यांचें संयुक्त राष्ट्र

करण्याऐवजीं प्रादेशिक पायावर संयुक्त राष्ट्राची उभारणी केल्यानें मध्यवर्ति सरकारला स्थैर्य प्राप्त होऊन देशाचा एकसंधीपणा कायम राखला जाईल. एकमेकांलगतच्या घटकांत भौगोलिक सान्निध्य, एकभाषा व एकसारखे आर्थिक हितसंबंध यांमुळें नैसर्गिक बंध निर्माण होऊन निरनिराळ्या घटकांत विचारविनिमय होईल व त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठीं एक समान योजना आंखतां येईल. शेती व उद्योगधंद्यांसाठीं समाईक संशोधनसंस्था वगैरे उघडतां येतील. याशिवाय संयुक्त सरकारचें कार्यक्षेत्र मर्यादित केल्यामुळें घटकांनासुद्धां एकमेकांविषयीं संशय न राहतां अगर मध्यवर्ति सरकार अंतर्गत प्रश्नांत ढवळाढवळ करील कीं काय, यासंबंधीं संदेह न राहतां संयुक्त राज्यांत सामील होतां येईल. अल्पसंख्याकांना जास्त सुरक्षितता वाटेल आणि निरनिराळ्या घटकांना अधिक स्वायत्तता राहील.

परंतु ही योजना म्हणजे १९३५च्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्याची केवळ सुधारून वाढवलेली आवृत्ति आहे, हें सहज निदर्शनास येईल. त्या योजनेंत संपूर्ण स्वातंत्र्य हें ध्येय मानलेलें नाहीं. तींत भविष्यकालांत कधींहि हिंदी संस्थानांतून लोकशाही पद्धतीच्या निवडणुका करण्याची कल्पना नाहीं. संयुक्त आणि प्रादेशिक विधिमंडळांत दोन तऱ्हेचीं माणसें सभासद म्हणून राहतील: ब्रिटिश हिंदुस्थानांतले सभासद लोकांनीं निवडलेले प्रतिनिधी असतील आणि हिंदी संस्थानांतील सभासद संस्थानिकांनीं नेमलेले अगर लोकांनीं निवडलेल्यांमधून नेमलेले असतील; आणि संरक्षण व परराष्ट्रीय खातें यांसारख्या दोन महत्त्वाच्या खात्यांवर व्हाइसरॉयकडून नेमणुका व्हावयाच्या असल्याकारणानें मंत्रिमंडळांत बाहेरच्या लोकांना प्रवेश मिळवून देण्याची तरतूद या योजनेंत आहे. निरनिराळे मंत्री आपापल्या प्रादेशिक विधिमंडळाला जबाबदार राहणार व संयुक्त विधिमंडळानें अविश्वासाचा ठराव संमत करूनसुद्धां बाहेरचे मंत्री जाग्यावरच राहणार, अशी योजना यांत असल्यामुळें मंत्रिमंडळाची संयुक्त जबाबदारी नष्ट होणार आहे. बरें, मंत्र्यांची निवड करतांनासुद्धां जातीय, प्रादेशिक इत्यादि खास लायक्या निर्माण केल्यामुळें आडकाठी निर्माण होणार आहे. कारण

त्यामुळें कर्तृत्व व कौशल्य यांची सांगड घालतां येणार नाहीं. खेरीज निष्ठाहि द्विधा होईल तें वेगळेंच. तथापि, राजकीय अगर सांस्कृतिक कारणांसाठीं देशाची जातीयत्वावर फाळणी न करतां हिंदुस्थान हा एक देश आहे अशी तींत जाणीव राखलेली आहे, हा या योजनेचा एक मोठाच गुण समजला पाहिजे.

## २२. सर अबदुल्ला हरून–कमिटीची योजना

राज्यघटनात्मक सुधारणेच्या ज्या निरनिराळ्या योजना मांडलेल्या होत्या, त्यांच्या योजकांना १९४० च्या फेब्रुवारींत अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या परराष्ट्रीय समितीनें निमंत्रणें पाठवून त्या सर्व योजना सर्वांनीं मिळून अभ्यासून एक स्वतंत्र योजना तयार करण्याचा प्रयत्न केला. सर्व निमंत्रित एकत्र जमून त्यांनीं एक समिति तयार केली, व नंतरच्या बैठकींत मुस्लिम लीगच्या लाहोर–अधिवेशनांतील ठरावानुसार त्यांनीं एक योजना आंखली. हा ठराव परराष्ट्र–समितीचे चिटणीस सर अबदुल्ला हरून यांनीं जी रूपरेखा आंखली होती, तिच्या आधारें तयार केलेला होता. परंतु समितीनें बिगर–ब्रिटिश प्रदेशांतील मुसलमानांचाहि अंतर्भाव करून एक आराखडा तयार केला. त्यामुळें पाकिस्तान–ठरावापेक्षांहि तो अधिक व्यापक स्वरूपाचा झाला आहे.

त्या समितीनें पुढील शिफारसी केल्याः (१) वायव्येकडे जेथें मुस्लिम लोकसंख्या ६३ टक्क्यांच्या आसपास आहे, तेथें एक स्वतंत्र मुस्लिम–राज्य स्थापतां येईल; तसेंच ईशान्येस जेथें मुस्लिम लोकसंख्या ५४ टक्के आहे, तेथेंहि दुसरें मुस्लिम–राज्य स्थापतां येईल.

### कोष्टक ३.

(१) वायव्य–विभाग अगर राज्य (१९३१ च्या खानेसुमारीप्रमाणें)

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| प्रांत | एकूण लोकसंख्या | मुस्लिम लोकसंख्या |
| पंजाब | २,३५,८०,८५२ | १,३३,३२,४६० |
| सिंध | ३८,८७,०७० | २८,३०,८०० |

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| वायव्य सरहद्द प्रांत | २४,२५,०७६ | २२,२७,३०३ |
| वायव्य-सरहद्दीवरील वन्य-विभाग, ब्रिटिश अंमल | १३,६७,२३१ | १३,१७,२३१ |
| ब्रिटिश-बलुचिस्तान | ४,६३,५०८ | ४,०५,३०९ |
| दिल्ली प्रांत | ६,३६,२४६ | २,०६,९६० |
| एकूण | ३,२३,६०,०६३ (?) | २,०३,२०,०६३<br>किंवा ६२,७९ टक्के |

(२) ईशान्य-विभागांत आसाम, (बंकुरा व मिदनापूर जिल्हे सोडून) बंगाल व बिहारमधील पूर्णिया यांचा समावेश व्हावा.

| | | |
|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | ५,७०,१०,९४६ | |
| मुसलमान | ३,०८,७६,४२१ | किंवा ५४ टक्के |
| बिगर-मुसलमान | २,६१,३४,५२३ | किंवा ४६ टक्के |

बिगर-मुसलमानांत सर्वसाधारणपणें ८५,००,००० म्हणजे ३२ टक्के हरिजन, सुमारें १५,००,००० म्हणजे ६ टक्के वन्य जमाती, सुमारें ४ लाख ख्रिश्चन आणि उरलेले सवर्ण हिंदू आहेत.

(३) "बिगर-ब्रिटिश-हिंदुस्थानांत जेथें जेथें मुस्लिम वर्चस्व या ना त्या स्वरूपांत असेल, तेथें तेथें तें टिकवून धरणें हें केवळ त्यांच्याच नव्हे, तर इतर मुसलमानांच्याहि हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे हें निदर्शनास आणून देणें आपलें कर्तव्य आहे, असें समितीचें मत आहे. म्हणूनच मुसलमानांची राज्यघटना तयार करतांना जेथें जेथें मुसलमान राजे असतील, तीं सर्व संस्थानें सार्वभौम मुसलमान-राज्येंच आहेत असें समजलें पाहिजे...ही एक मूलभूत मागणी म्हणून मांडली पाहिजे. निजामच्या राज्याला बंदर देऊन व त्याची वाढ करून त्याचें स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या मागणीवर लीगनें भर देणें योग्य होईल. कारण त्यामुळें निजामच्या राज्याबाहेरील मुसलमानांना अमर्याद

सामर्थ्य प्राप्त होईल.[१] आपल्या वाढत्या सामर्थ्याचें केंद्र व संघटनाशक्तीचा मूलाधार म्हणून हैदराबादेची जोपासना करणें कालांतरानें मुसलमानांच्या हिताचें होण्याचाहि संभव आहे. म्हणून मुसलमानांच्या प्रभावाचें तिसरें विशालक्षेत्र या दृष्टीनें या प्रदेशाला महत्त्व आहे.

या समितीनें मुस्लिम राज्यालगतचीं हिंदी संस्थानें मुस्लिम संयुक्त राज्यांत सामील करून घेण्याची शक्यताहि विचारांत घेतली आहे. अशी व्यवस्था होऊं शकली, तर पुढीलप्रमाणें परिस्थिति दिसेल:

**कोष्टक ४.**

| नांव | एकूण लोकसंख्या | मुस्लिम लोकसंख्या |
|---|---|---|
| वर दाखविल्याप्रमाणें ब्रिटिश–हिंदुस्थानांतील प्रांत | ३,२३,६०,०६३ | २,०३,२०,०६३ |
| सरहद्दीवरील संस्थानें | | |
| दीर, स्वात, चित्रळ | ९,०२,०७५ | ८,५२,००० |
| बलुचिस्तानांतील संस्थानें | | |
| कलात | ३,४२,१०१ | ३,३१,२३४ |
| लास बेला | ६३,००८ | ६१,५५० |
| सिंध–संस्थानें | | |
| खैरपूर मिर्स | २,२७,१८३ | १,८६,५७७ |
| पंजाब–संस्थानें | | |
| भावलपूर | ९,८४,६१२ | ७,९९,१७६ |
| कपुरथळा | ३,१६,७५७ | १,७९,२५१ |
| पतियाळा | १६,२५,५२० | ३,६३,९२० |
| नाभा | २,८७,५७४ | ५७,३९३ |

१. दि पाकिस्तान इश्यू, पृ. ७९–८०.

| नांव | एकूण लोकसंख्या | मुस्लिम लोकसंख्या |
|---|---|---|
| फरीदकोट | १,६४,३६४ | ४९,९१२ |
| जिंद | ३,२४,६७६ | ४६,००२ |
| मालकोटला | ८३,०७२ | ३१,४१७ |
| लोहारू | २३,३३८ | ३,११९ |
| पतौडी | १८,८७३ | ३,१६८ |
| दुजाना | २८,२१६ | ५,८६३ |
| चंबा | १,४६,८७० | १०,८३९ |
| मंडी | २,७०,४६५ | ६,३५१ |
| सुकेत | ५८,४०८ | ७३३ |
| कालसिआ | ५९,८४८ | २१,७९७ |
| सिमलाहिल संस्थानें | ३,३०,८५० | १०,०१७ |
| सिरमूर | १,४८,५६८ | ७,०२० |
| बिलासपूर | १,००,९९४ | १,४५८ |
| काश्मीर | ३६,४६,२४३ | २८,१७,६३६ |
| बिकानेर आणि जेसलमीर येतील तर | | |
| बिकानेर | ९,३६,२१८ | १,४१,५७८ |
| जेसलमीर | ७६,२५५ | २२,११६ |
| एकूण | ४,३५,२६,१५१ | २,६३,३०,१९० किंवा ६९·४९ टक्के |
| बिकानेर व जेसलमीर सोडून | ४,२५,१३,६७८ | २,६१,६६,५२६ किंवा ६१·५४ टक्के |

वायव्य-विभागांतील निरनिराळ्या अल्पसंख्याकांचे आंकडे वेगळे काढण्या-साठीं समितीनें अतिशय परिश्रम घेतले. वायव्य-विभागांतील ब्रिटिश प्रांतांत हरिजनांची संख्या १४,१३,५३२ किंवा ४·३६ टक्के, शीख ३१,१९,९६४ किंवा ९·७० टक्के आणि सवर्ण हिंदू ७०,१९,२७८ किंवा २१·६९ टक्के

आहे. याचप्रमाणें हिंदी संस्थानांचे आंकडेसुद्धां दिलेले आहेत:—सवर्ण हिंदू २४,९४,०९३ किंवा २२·३३ टक्के आणि शीख १०,५८,१४२ किंवा १०,४२ टक्के. ( विशेष सूचना:—सवर्ण हिंदूंचें शेंकडा प्रमाण दाखवितांना गणिताची चूक झाली आहे. तें २४·५६ पाहिजे. २२·३३ चूक आहे.)

ईशान्य मुस्लिम–विभागाच्या शेजारच्या संस्थानांना सुद्धां त्यांत सामील होण्यासाठीं वळविणें शक्य आहे:—

**कोष्टक ५.**

| बंगाली संस्थानें | एकूण लोकसंख्या | मुसलमान |
|---|---|---|
| कुचबिहार व त्रिपुरा | ९,७३,३१६ | ३,१२,४७६ |
| आसामी संस्थानें | | |
| मणीपूर, खासी हिल | ६,२५,६०६ | २४,६०० |
| ब्रिटिश प्रांत | ५,७०,१०,९४६ | ३,०८,७६,४२१ |
| एकूण | ५,८६,०९,८६८ | ३,१२,१३,४९७ |
| | | किंवा ५३·१५ टक्के |

अल्पसंख्याकांचें शेंकडा प्रमाण:—

**कोष्टक ६.**

| भाग | सवर्ण हिंदू | हरिजन | वन्य | खिश्चन |
|---|---|---|---|---|
| ब्रिटिश–बंगाल | २९·९ | १३·७ | १·५ | – |
| बंगाली संस्थानें | ६४·९ | ३·० | – | – |
| ब्रिटिश आसाम | ३६·६ | २१·० | ८·२ | २·५ |
| आसामी संस्थानें | ४३·७ | ७ | ४४·९ | ७·४ |

दोन्ही विभागांत मिळून पुढील क्षेत्रफळ समाविष्ट होईल:—

| | ब्रिटिश हिंदुस्थान | संस्थानें | एकूण |
|---|---|---|---|
| | चौरस मैल | चौ. मैल | चौ. मैल |
| पूर्व-विभाग | २,२५,३५२ | २,१३,३७० | ४,३८,७२२ |
| वायव्य-विभाग | १,२९,६३७ | १७,७५४ | १,४७,३९१ |
| एकूण | ३,५४,९८९ | २,३१,१२४ | ५,८६,११३ |

सबंध हिंदुस्थानच्या दृष्टीनें पुढील परिस्थिति होईल:—

| | |
|---|---|
| सर्व हिंदुस्थानची एकूण लोकसंख्या | ३५,०५,२९,५५७ |
| मुसलमान | ७,७६,७८,२४५ |
| पूर्व व पश्चिम विभागांतील मुसलमान | ५,७५,४२,७८७ |
| | किंवा ७४·०७ टक्के |

येणेंप्रमाणें आपल्या योजनेनुसार ७४·०७ टक्के मुसलमानांना समितीनें आसरा दिलेला आहे.

प्रादेशिक राज्यांनीं संरक्षण, परराष्ट्रीय खातें, जकाती इ. अधिकार ताबडतोब हातीं घ्यावेत अशी मुस्लिम लीगच्या लाहोर-ठरावांतली कल्पना नाहीं. त्या ठरावाप्रमाणें संक्रमणावस्थेंत हे अधिकार सर्वांना समाईक अशा संस्थेमार्फतच चालवले पाहिजेत. वरील मुद्दा विचारांत घेतला नाहीं, तरीसुद्धां अशी सूत्रबद्धता आणणाऱ्या संस्थेची आवश्यता राहील. कारण, हिंदुप्रभुत्वाखालील संस्थानें व मुस्लिम—प्रभुत्वाखालील संस्थानें यांत कांहींतरी एक देहात्मक संबंध अस्तित्वांत असल्याखेरीज लाहोर—ठरावांतील अल्पसंख्याकांसाठीं या संरक्षक बंधनांची जी मागणी तिसऱ्या कलमांत केली आहे, ती पुरी करतां येणार नाहीं. संयुक्त राज्याची कल्पना मुसलमानांना रुचत नाहीं. कारण त्यांना अशी भीति वाटते कीं, हिंदुलोक बहुसंख्येच्या जोरावर मुसलमानांवर वरचष्मा करतील. ठरवांतील तरतुदी पार पाडण्यासाठीं दोहोंना समान अशी एक व्यवस्था आवश्यक असल्यामुळें मध्यवर्ति सरकारांत ज्यायोगें मुसलमानांना बिगर—मुसलमानांबरोबर समान भूमिकेवरून सत्तेचा वाटा मिळेल, अशी एक सर्वसंमत योजना आंखणें आवश्यक ठरतें.[१]

म्हणून समितीकडून अशी सूचना मांडली गेली कीं, ज्या ज्या राज्यांना 'सार्वभौम' अशी संज्ञा असेल त्यांनीं आपापसांत करार करून निरनिराळ्या घटक राज्यांसाठीं (१) परराष्ट्रीय संबंध (२) संरक्षण (३) वाहतुक (४) जकाती

---

१. दि पाकिस्तान इश्यू, पृ. ८७–८८.

(५) अल्पसंख्याकांसाठीं संरक्षक बंधनें आणि खुषीचें स्थलांतर इ. बाबींसाठीं एक समाईक संस्था निर्माण करावी. मात्र त्यांत पुढील अटी असाव्यात:—

(१) संरक्षण : प्रत्येक घटक राज्य आपल्या खर्चानें सैन्य राखील. लष्करी डावपेंचाच्या दृष्टीनें किती महत्त्व आहे यावर तें सैन्य किती असावें, हें अवलंबून राहील. सैन्याच्या बलानुसार मध्यवर्ति सरकार खर्चाचा ठराविक वांटा उचलील. शांततेच्या कालांत सैन्यावर त्या त्या राज्याचें प्रभुत्व राहील; परंतु युद्धकालांत मध्यवर्ति सत्तेच्या हातांत सैन्याचें सर्व नियंत्रण राहील.

(२) आरमार सर्वस्वीं मध्यवर्ति सरकारच्या ताब्यांत असेल. सर्व राज्यें सोंपविलेल्या विषयांखेरीज इतर सर्व गोष्टींचा कारभार पाहतील; शेषाधिकारहि त्यांच्याकडेच राहील. कार्यकारी-मंडळ व इतर समाईक संस्थांवर निम्मे मुसलमान असतील.

वरील योजना ज्या समितीनें तयार केली त्या समितीवर ९ सभासद होते. या योजनेवर त्यांच्यामध्यें विचारविनिमय सुरू असतांच 'स्टेट्स्मन' या पत्रांमध्यें तिला अकालींच प्रसिद्धी मिळाली. वर चर्चिलेल्या योजनांपैकीं एका योजनेचे पुरस्कर्ते प्रो० अफझल हुसेन काद्री, ह्या एका सभासदाचें मत असें होतें कीं संस्थानांचा अंतर्भाव केल्यामुळें, आणि मुस्लिम राज्यें व इतर हिंदुस्थान यांच्या परस्पर-संबंधांची घटना केल्यामुळें, ही योजना लाहोर-ठरावाच्या पलीकडे गेलेली आहे. अखंड हिंदुस्थानचें संयुक्त राज्य किंवा हिंदु—राज्य या कल्पनांचें त्यांना वावडें असल्यामुळें मुसलमानांच्या मागण्यांत कुठल्याहि तऱ्हेनें 'मध्यवर्ति यंत्रणा' किंवा 'मध्यवर्ति सरकार' इत्यादि गोष्टींचा शिरकाव करूं देण्यास त्यांचा जोराचा विरोध होता. वर चर्चिलेल्या योजनांपैकीं एका योजनेचे पुरस्कर्ते डॉ. सय्यद अबदुल लतीफ यांना वायव्य व ईशान्य विभागांची आंखणी नापसंत होती. ही विभागणी पंजाब, सिंध व संयुक्त प्रांतांतील सभासदांनीं केलेली होती. डॉ. लतीफ यांनीं सर हरून यांना असें कळविलें कीं, "जेथें निश्चित मुस्लिम बहुमत असेल, तेथें एकसंधी व स्वतंत्र विभाग अगर राज्यें तयार करणें हें लाहोर ठरावाचें उद्दिष्ट आहे. परंतु तुमच्या

समितीवरील पंजाब व अलिगढच्या सभासदांनीं, साम्राज्यवादी धोरणानें, काश्मीरपासून जेसलमीरपर्यंत निश्चित बिगर–मुसलमानी संस्थानांचासुद्धां अंतर्भाव करून पंजाब प्रांताची मर्यादा अलिगढपर्यंत वाढवण्याची आकांक्षा धरली आहे. त्यामुळें तेथील मुसलमानांचें प्रमाण ५५ टक्क्यांपर्यंत येऊन ठेपलें आहे. याचप्रमाणें ईशान्य–विभागांत सबंध बंगाल, आसाम व बिहारचा एक जिल्हा घेतल्यानें मुसलमानांचें प्रमाण ५४ टक्के होतें. माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें अशी विभागणी लाहोर–ठरावांतील तत्त्वाच्या व उद्दिष्टाच्या विरोधी आहे; कारण ईशान्य–विभागांत ४६ टक्के बिगर–मुसलमान व वायव्यविभागांत ४२ टक्के बिगर–मुसलमान असले, तर तुम्हांला त्या विभागांना कुठल्याहि अर्थानें मुस्लिम विभाग असें म्हणतां येणार नाहीं अगर मुस्लिम राज्यें असें नांव देतां येणार नाहीं.”[१]

ज. जिनांनीं या समितीला मान्यता देण्याचें नाकारलें; आणि त्या समितीच्या सूचनांना व्यक्तिगत अगर गटाच्या सूचना या पलीकडे किंमत दिली नाहीं.

याखेरीज दुसऱ्याहि कांहीं योजना आहेत. एक सर फेरोझखान नून यांनीं १९४२ सालीं अलिगढला केलेल्या भाषणांत मांडली आहे व दुसरी ज. रिझवानुल्ला यांची आहे. परंतु त्या योजना मीं पाहिल्या नसल्यामुळें येथें दिलेल्या नाहींत.

## २३. फाळणीच्या कल्पनेचें मूळ

या सर्व योजना १९३९ सालापासून, म्हणजे कांहीं लाहोर-ठरावाच्या अगोदर व कांहीं नंतर प्रसिद्ध झालेल्या आहेत. डिसेंबर १९३० सालीं अखिल भारतीय मुस्लिम–लीगच्या अधिवेशनांतील आपल्या अध्यक्षीय भाषणांत मरहूम सर महमद इकबाल यांनीं एका स्वतंत्र व वेगळ्या मुस्लिम राज्याची मागणी प्रथम मांडली असें सर्वसाधारणपणें म्हणण्यांत येतें. अर्थातच त्या

१. दि पाकिस्तान इश्यू, पृ. ९८–९९.

भाषणांतील कांहीं उतारे येथें देणें इष्ट आहे : "इस्लामचें धार्मिक ध्येय हें त्यानें जी सामाजिक व्यवस्था निर्माण केली तिच्याशीं संलग्न आहे. त्यामुळें एकाचा त्याग केला कीं कालांतरानें दुसरीहि गोष्ट सोडून द्यावी लागते. अर्थातच जिच्यामुळें इस्लामला प्रिय असणाऱ्या संहतीच्या तत्त्वाचा लोप होणार असेल अशी कोणतीहि राष्ट्रीय राजनीति मुसलमानांना संमत होणें केवळच अशक्य आहे....म्हणून हिंदी राष्ट्राचें ऐक्य वैविध्याच्या लोपांतून नव्हे, तर त्या विविधतेमध्यें निर्माण केलेल्या संवादित्वांतून व सहकार्यांतून सिद्ध करण्याचा प्रयत्न व्हावयास हवा....या दिशेनें केलेल्या प्रयत्नांवरच फक्त हिंदुस्थानचें नव्हे, तर संबंध आशियाचें भवितव्य खरोखर अवलंबून आहे....

"देशांत अशा तऱ्हेचें संवादित्व प्रस्थापित करण्याचे आपण केलेले प्रयत्न आतांपावेतों निष्फळ ठरलेले आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. या अपेशाचें कारण काय ? एकमेकांबद्दल आपल्या मनाला संशय वाटत असावा, दुसऱ्यावर कुरघोडी करण्याची मनांतून आपल्याला इच्छा होत असावी. परिस्थितीनें आपल्या हातीं जे अधिकार दिलेले आहेत, त्यांचा त्याग उच्चतर हिताकडे लक्ष देऊन करण्याची प्रवृत्ति आपल्यामध्यें नसावी. आपला अहंकार राष्ट्रवादाच्या बुरख्याआड लपवून बाह्यात्कारी उदार देशभक्तीचें सोंग आणावयाचें आणि मनांतून मात्र जाति–जमातीविषयींच्या संकुचित अभिमानापलीकडे जाण्याची तयारी नसावयाची, असेंहि आपल्या बाबतींत होत असेल. प्रत्येक गटाला आपापल्या सांस्कृतिक परंपरेनुसार अव्याहत विकासाचा हक्क असावयास हवा ही गोष्ट मान्य करण्याची आपली कदाचित् तयारी नसावी. परंतु आतापर्यंतच्या अपेशाचें कांहींहि कारण असलें तरी मला अजूनहि आशा आहे. कारण कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचें अन्तर्गत संवादित्व निर्माण होण्याकडे परिस्थितीचा कल दिसून येत आहे. मुस्लिमांच्या अन्तःकरणाचें मला जें कांहीं ज्ञान आहे त्यावरून मला असें निःसंशय म्हणावेसें वाटतें कीं, आपल्या संस्कृतीच्या परंपरेच्या मार्गानें स्वतःच्या मातृभूमीमध्यें स्वतःचा संपूर्ण व अनिर्बंध विकास करण्याचा हक्क मुसलमानांना आहे, हें तत्त्व जातीय तडजोडीचा आधार

म्हणून मान्य केलें गेल्यास, हिंदी स्वातंत्र्यासाठीं सर्वस्व पणाला लावण्यास येथील मुसलमान तयार होतील. प्रत्येक गटाला आपल्या कलानुसार आत्मविकास साधण्याची स्वतंत्रता असावी या तत्त्वाच्या मुळाशीं संकुचित जातीय भावना नाहीं... इतर जमातींच्या रूढी, कायदे, धर्म व सामाजिक संस्था यांच्यासंबंधीं माझ्या मनांत नितांत आदरभाव वसत आहे. फार काय सांगावें, कुराणाच्या शिकवणीप्रमाणें त्यांच्या धर्मक्षेत्रांचें जरूर तर संरक्षण करण्यास पुढें सरसावणें हेंहि माझें कर्तव्य ठरतें....

"युरोपांतल्याप्रमाणें येथील समाजाचे विभाग प्रदेशानुसार पडलेले आढळत नाहींत....येथें जातीय गट आहेत ही वस्तुस्थिति डोळ्यांआड करून युरोपांतील लोकसत्ताक पद्धतीचीं तत्त्वें हिंदुस्थानला लावूं पहाणें योग्य होणार नाहीं. म्हणून हिंदुस्थानांतर्गत मुसलमानी हिंदुस्थान बनवण्यांत यावा ही मुसलमानांची मागणी सर्वस्वीं रास्त ठरते....पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत, सिंध व बलुचिस्तान यांचा एक गट झालेला पहावा अशी माझी मनीषा आहे. मुसलमानेतरांचें आधिक्य असलेला अंबालासारखा टापू वगळण्यांत आल्यास हा प्रदेश कमी विस्ताराचा पण अधिक मुसलमान वस्तीचा होईल. हिंदी राजकीय जीवनांत विकासाचें पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालेले हे वायव्य हिंदुस्थानचे मुसलमान परचक्रापासून हिंदुस्थानचें उत्कृष्ट प्रकारें संरक्षण करतील; मग त्या परचक्राचें स्वरूप सशस्त्र आक्रमणाचें असो किंवा वैचारिक आक्रमणाचें असो. स्वायत्त हिंदुस्थानांत एकमुखी राजसत्ता-प्रकार रूढ करूं पाहाणें शुद्ध वेडेपणाचें आहे असें मला वाटतें. ज्यांना शेषाधिकार असें म्हणतात, ते सर्व स्वायत्त अशा घटक राष्ट्रांच्या हातींच सुपूर्त केले पाहिजेत आणि संयुक्त होणाऱ्या घटक राष्ट्रांच्या संमतीनें जे अधिकार स्पष्टपणें मध्यवर्ति सरकारच्या हातीं देण्यांत येतील तेच मध्यवर्ति सरकारनें वापरले पाहिजेत."[१]

सर महमद इक्बाल यांनीं ही जी योजना आंखलेली आहे तिच्यांत मध्य-

---

१. एफ्. के. खान दुराणी यांच्या 'दि मीनिंन् ऑफ पाकिस्तान'मध्यें उध्दृत, पृ. २०५-२१३.

वर्ति हिंदुस्थान–सरकार न मानणाऱ्या मुसलमानी राज्याची कल्पना केलेली नाहीं. आंत स्वायत्त घटक राष्ट्रें असलेलें संयुक्त राष्ट्र त्यांना इष्ट आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. म्हणून वायव्य भागांत नव्या सीमा आंखाव्यात व आंत मुसलमानांचें आधिक्य होईल व राज्यकारभाराच्या दृष्टीनें जे अधिक सोयीस्कर होतील असे प्रांत बनवावेत, अशी सूचना त्यांनीं पुढें मांडलेली आहे. देशाच्या संरक्षणासंबंधीं त्यांनीं व्यक्त केलेले विचार १९२६ सालीं 'नेशन्' पत्राच्या प्रतिनिधीजवळ त्यांनीं व्यक्त केलेल्या विचारांशीं सदृश असेच आहेत: 'कांहीं शंकेखोर वृत्तीच्या हिंदूंना अशी शंका येते कीं अफगाणांनीं हिंदुस्थानवर हल्ला चढवला, तर मुसलमान देशाचा विश्वासघात करतील. हिंदुस्थानच्या जनतेंत ऐक्य असेल व त्यांचा परस्परांवर विश्वास असेल, तर कोणीहि आक्रमक देशावर चाल करून आला तर त्याला जनता विरोध केल्यावांचून राहणार नाहीं. मग तो आक्रमक मुसलमान असो, वा आणखी कोणी असो. माझें घरदार व माझें स्वातंत्र्य यांचा नाश करण्यास जो कोणी उद्युक्त होईल त्याच्याविरुद्ध कमर कसून उभा राहिल्याशिवाय मी कधींहि राहणार नाहीं. येथील मुसलमान जिहाद करतील अशी शंकादेखील घ्यावयास नको. राजकीय महत्त्वाकांक्षा छपवण्याचें साधन म्हणूनच बहुधा जिहादचा उपयोग करण्यांत आलेला आहे. सामुदायिक जागृति वाढविणें हाच आपल्या सर्व रोगांवर उपाय आहे. आणि देवाणघेवाणीच्या वृत्तीनें एक राष्ट्रीय संघि घडवून आणला, तर अशा प्रकारची जागृति वाढण्यास खूप मदत होईल अशी माझी कल्पना आहे.'[१]

गोलमेज–परिषदेपर्यंत एक अल्पसंख्याक जमात या दृष्टीनें आपल्या हक्कांचें संरक्षण करण्यासंबंधींच्या मागण्या मांडण्यानें हिंदी मुसलमानांचें समाधान होत असे. परंतु पुढें फाळणीची कल्पना कशी वृद्धिंगत झाली, त्याचें वर्णन डॉ. शौकतुल्ला अन्सारी यांनीं आपल्या 'पाकिस्तान–हिंदुस्थानचा प्रश्न' या ग्रंथांत केलें आहे. येथें त्यांतले विस्तृत उतारे देणेंच योग्य होईल असें मला वाटतें.

"१९३०–३१ सालीं नवीन सुधारणा तयार केल्या जात होत्या. आणि

१. सर्चलाइट्, ३० एप्रिल १९२६.

पहिल्या दोन गोलमेज--परिषदांतून हिंदी संयुक्त राज्याच्या कल्पनेला मुसलमानांनीं स्वतःला बांधून घेतल्यासारखें दिसत होतें. १९३२ सालीं तिसऱ्या गोलमेज–परिषदेच्या वेळच्या आपल्या लेखांत जे कोट्मन्, सी. आय्. ई. हे लिहितात. 'एक अविभक्त व सामर्थ्यवान् असा हिंदुस्थान निर्माण करणें दिवसेंदिवस अशक्य कोटींतलें होत आहे. हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाची मूलभूत व पहिली अट म्हणजे सबंध ब्रिटिश हिंदुस्थान, हिंदी संस्थानें वायव्येकडील प्रांत यांचा त्यांत समावेश होणें ही होय, पण अखंड राष्ट्राऐवजीं वायव्य भागांत एक स्वतंत्र बलशाली मुसलमान–राज्य प्रस्थापित होणार असा रंग दिसत आहे. या राज्याची दृष्टि हिंदुस्थानपासून परावृत्त होऊन ती बाकीच्या मुस्लिम जगताकडे वळलेली असेल. या राज्याच्या दक्षिणेकडे आणि पूर्वेकडे कोणत्या प्रकारची परिस्थिति आढळून येईल? एकसंघ व संयुक्त असा हिंदु–हिंदुस्थान तेथें प्रस्थापित होईल कां? कदाचित् होईल! कीं प्राचीन हिंदुस्थानांतल्याप्रमाणें एकमेकांशीं सतत लढत राहणाऱ्या राज्यांत तो विस्तृत प्रदेश पूर्वीप्रमाणेंच विभागला गेलेला असेल? बहुतांशीं तसेंच घडण्याचा संभव आहे.'

"कांहीं मुसलमान तरुणांचा अखिल हिंदुस्थानच्या संयुक्त राज्याला विरोध होता. त्यांची अशी समजूत झालेली होती कीं, राज्यघटनेमध्यें जीं संरक्षक-बंधनें होतीं, तीं कुचकामी असून 'हिंदु–राष्ट्रीयत्वाच्या वेदीवर आमच्या या शूर परंतु मूक राष्ट्राचा बळी दिला जात आहे.' फाळणीच्या बीजाला या तरुण मुस्लिमांच्या मनांमध्यें अत्यंत अनुकूल अशी भूमि सांपडली. ज्या मुसलमान जमातीला आतांपावेतों एक अल्पसंख्याक जमात म्हणून संबोधिलें जात होतें तिला चौधरी रहमत आली या नांवाच्या एका पंजाबी मुसलमानानें १९३३ सालीं प्रथमच 'राष्ट्र' म्हणून नांव दिलें व मुसलमानी राष्ट्रवादाची ही चळवळ त्यांनीं नांवारूपाला आणली. पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत (अफगाण प्रांत), काश्मीर, सिंध आणि बलुचिस्तान यांचें पाकिस्तान नांवाचें एक स्वतंत्र मुस्लिम राज्य करावें या कल्पनेचा त्यांनीं पुरस्कार केला. त्यांची ही सूचना डॉ० इक्-

बाल यांच्या सूचनेहून वेगळी होती. डॉ० इक्बाल यांनीं असें सुचविलें होतें कीं, हे प्रांत एकत्रित होऊन अखिल हिंदुस्थानच्या संयुक्त राज्याचे एक घटक म्हणून त्यांनीं राहावें. उलट, चौधरी रहमत अली यांनीं या प्रांतांचें एक स्वतंत्र संयुक्त राज्य स्थापावें असा पुरस्कार केला. चौधरी रहमत अली यांनीं पाकिस्तानचा पुरस्कार करणारीं पत्रकें पार्लमेंटच्या सभासदांना व गोलमेज परिषदेंतील सभासदांना वाटलीं. परंतु कोणत्याहि हिंदु अगर मुसलमान प्रतिनिधीनें त्यांच्या या प्रचाराकडे अजिबात लक्षच दिलें नाहीं. जॉईंट् पार्लमेंटरी सिलेक्ट् कमिटीपुढें मुस्लिम साक्षीदारांनीं पाकिस्तान–कल्पनेसंबंधीं पुढीलप्रमाणें उद्गार काढल्याचें आढळून येतें:

ए. युसुफ अली : माझ्या माहितीप्रमाणें ही केवळ एक पुस्तकी योजना आहे; कोणत्याहि जबाबदार व्यक्तींनीं तिचा पुरस्कार केलेला नाहीं.

चौधरी झफरुल्ला खान : आम्हीं जो विचार केला, त्यावरून ही योजना आम्हांला केवळ एक अवडंबर वाटत असून ती अव्यवहार्य आहे, असें आमचें मत झालें आहे.

डॉ. खलिफा सुझाउद्दिन : या योजनेसंबंधीं येवढेंच सांगितलें तरी पुरे, कीं आतांपर्यंत कोणत्याहि प्रातिनिधिक गृहस्थानें अगर संस्थेनें तिचा विचारसुद्धां केलेला नाहीं.

"या परिषदेचे वेळींच पाकिस्तानसंबंधीं प्रश्न विचारले गेले होते हें लक्षांत ठेवावयास हवें. आणि याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे, प्रथम ब्रिटिशांनींच या कल्पनेबाबत प्रश्न उपस्थित केले. कागदपत्रांवरून असें दिसतें कीं, हिंदी (मुसलमान) प्रतिनिधींना त्याबाबत विशेष आस्था वाटत नव्हती व पुढच्या प्रश्नांकडे वळण्याची त्यांना घाई झालेली दिसत होती. परंतु ब्रिटिशांनींच या प्रश्नाचा आग्रह धरला. हिंदुस्थानांत तोंपावेतों कोणीहि पाकिस्तानसंबंधीं चकार शब्द काढला अगर ऐकला नव्हता आणि मुस्लिम प्रतिनिधींनीं त्याकडे दुर्लक्ष केलेलें होतें. तरीसुद्धां कट्टर साम्राज्यवादी वर्तमानपत्रें आणि कॉन्झर्वेटिव्ह पक्षांतील चर्चिल्–लॉइड् गट यांनीं त्याचा उदोउदो केला आणि पाकिस्तानच्या सूचनेचें

महत्त्व त्यांना उत्तरोत्तर अधिक वाटूं लागलें! याचा परिणाम असा झाला कीं पार्लमेंटमध्यें कित्येक प्रसंगीं यावर प्रश्न विचारण्यांत आले."[1]

फाळणीच्या कल्पनेचा उगम कांहींहि असो, अगर ती कल्पना कुठल्याहि गटामार्फत वाढीस लागलेली असो; डॉ० अन्सारींच्या शब्दांत सांगण्याचें म्हणजे या बीजाला सुपीक जागा मिळाली असून त्यानें आतां सर्वांचें लक्ष आपणाकडे वेधून घेतलें आहे, यांत तिळमात्र संशय नाहीं.

१. शौकत अन्सारीः पाकिस्तान–हिंदुस्थानचा प्रश्न, पृ. ४–७.

भाग चवथा

# अखिल भारतीय मुस्लिम-लीगचा पाकिस्तानवरील ठराव

## २४. ठरावाची संदिग्धता व त्याचा अभिप्रेत अर्थ

१९४० च्या मार्चमधील लाहोर येथें भरलेल्या अधिवेशनांत अखिल भारतीय मुस्लिम-लीगनें पुढील ठराव संमत केला:

(१) ७ ऑगस्ट, १७ व १८ सप्टेंबर, २२ ऑक्टोबर व ३ फेब्रुवारी १९४० च्या ठरावामध्यें अखिल भारतीय मुस्लिम-लीगच्या कार्यकारिणीनें आपल्या धोरणासंबंधीं जें सूचन केलेलें आहे, त्याला अखिल भारतीय मुस्लिम-लीगचें हें अधिवेशन अनुमति देत असून त्याचा तें स्वीकार करीत आहे. त्याचबरोबर, १९३५ च्या सरकारी कायद्यांत संयुक्त राज्यघटनेची जी योजना आंखण्यांत आलेली आहे, ती येथील विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां देशाला मुळींच न मानवणारी अशी असून मुस्लिम-हिंदुस्थानला तर ती संपूर्णपणें असंमत आहे, ही गोष्ट हें अधिवेशन पुनः एकवार आग्रहपूर्वक सांगत आहे.

(२) बादशहांच्या सरकारच्या वतीनें १८ ऑक्टोबर १९३९ रोजीं व्हाइसरॉयनें जी घोषणा केली, तिच्या द्वारा, १९३५ च्या कायद्याला आधारभूत असलेली नीति व योजना यांच्यासंबंधींचा फेरविचार हिंदुस्थानांतील विविध पक्ष, जमाती व हितसंबंध यांच्यासमवेत विचारविनिमय करून केला जाईल असें घोषित केलेलें असल्याकारणानें ती आम्हांला आश्वासनदायक वाटत असली, तरी सर्वच राज्यघटनात्मक योजनेचा मुळापासून फेरविचार झाल्याशिवाय मुस्लिम-हिंदुस्थानचें समाधान होणार नाहीं व त्याची संमति व मान्यता नसलेली कोणतीहि सुधारलेली योजना त्याच्याकडून स्वीकारली जाणार नाहीं, हें अधिवेशनाचें ठाम मत येथें नमूद करण्यांत येत आहे.

(३) पुढें दर्शविलेल्या मूलभूत तत्त्वांनुसार जी राज्यघटनाविषयक योजना आंखण्यांत आलेली नसेल, तिची अंमलबजावणी या देशांत होणें व तिचा स्वीकार मुसलमानांकडून होणें अशक्य आहे, असें या अधिवेशनाचें मत विचारपूर्वक बनलें असल्याचा ठराव करण्यांत येत आहे. हिंदुस्थानच्या वायव्य व पूर्व विभागांप्रमाणें ज्या विभागांत मुसलमानांची बहुसंख्या असेल व जे

विभाग भौगोलिक दृष्ट्या सलग असतील, ते वेगळे काढण्यांत यावेत. असें करतांना त्यांच्यांत जरूर ते प्रादेशिक फेरबदल करण्यांत यावेत व त्यांच्या 'स्वतंत्र राज्यां'चा गट बनवण्यांत यावा व या गटांतील घटकांना स्वयंतंत्रता व सार्वभौमत्वाचे अधिकार असावेत.

(४) या घटक राज्यांतील अल्पसंख्याकांना त्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, राज्यकारभार–विषयक व इतर बाबीसंबंधींचीं संरक्षणें त्यांच्याशीं विचारविनिमय करून देण्यांत यावींत. तीं भरपूर, परिणामकारक, व अनुल्लंघनीय (Mandatory) असावींत. हिंदुस्थानच्या ज्या इतर प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य असतील तेथें त्यांना व त्यांच्याप्रमाणेंच इतर अल्पसंख्याक जमातींनाहि धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, राज्यकारभार–विषयक व इतर बाबीसंबंधीं त्यांच्याशीं विचारविनिमय करून संरक्षणें देण्यांत यावींत व त्यांचा अन्तर्भाव घटनेमध्यें करण्यांत यावा.

या मूलभूत तत्त्वांनुसार राज्यघटनेची एक योजना तयार करण्याचा अधिकार हें अधिवेशन कार्यकारिणीला देत आहे. घटक विभागांना संरक्षण, परराष्ट्रीय व्यवहार, दळणवळण, जकात वगैरेंसारख्या खात्यांचे व आवश्यक त्या दुसऱ्या खात्यांचे अधिकारहि अखेरीस स्वतःच्या हातीं घेतां येतील, अशी तरतूद त्या घटनेंत केलेली असावी.

हा ठराव करतांना १९३५ च्या सरकारी कायद्यांतील संयुक्त राज्यघटना लीगच्या दृष्टिसमोर असावी आणि या देशांतील विशिष्ठ परिस्थितीमुळें ती योजना येथें चालू होणें अशक्य असून हिंदुस्थानांतील मुसलमानांनाहि ती अस्वीकार्य आहे वगैरे विचार लीगच्या लाहोर–अधिवेशनांतील ठरावांत व्यक्त झाले असावेत.

यॉ ठरावांतील मूलभूत तत्त्वांनुसार एक राज्यघटनेची योजना तयार करण्यासंबंधींचा अधिकार लीगच्या कार्यकारिणीला देण्यांत आलेला होता. पण तशी कोणतीहि योजना कार्यकारिणीनें अजून प्रसिद्ध केलेली नाहीं. ती तयार होऊन दप्तरीं पडून राहिलेली असल्यास नकळे. लीगचे अध्यक्ष ज० जिना यांनीं मद्रास येथें पुढीलप्रमाणें उद्गार काढलेले आहेत:

'हिंदुस्थानच्या वायव्य व पूर्व विभागांमध्यें संपूर्णपणें स्वतंत्र राज्यें प्रस्थापित व्हावींत व संरक्षण, चलन, इत्यादि खातीं अखेरीस त्यांच्या हातीं पूर्णतया यावींत हें अखिल भारतीय मुस्लिम लीगचें ध्येय आहे, ही गोष्ट शक्य तितक्या स्पष्ट शब्दांत मी तुमच्यासमोर मांडीत आहें. सर्व हिंदुस्थानचा समावेश करणारी व मध्यवर्ति एकमुखी सरकार असणारी राज्यघटना आम्हांला कोणत्याहि परिस्थितींत मान्य होणें शक्य नाहीं.'

योजनेचें अधिक विवरण करण्यांत यावें, पाकिस्तानांत कोणते प्रदेश समाविष्ट होणार त्यांचा व इतर बाबींचा तपशील द्यावा, अशी विनंति करण्यांत आली असतां जिनासाहेबांनीं ती धुडकावून लावलेली आहे. पाकिस्तानचें तत्त्व अगोदर मान्य करावें, तरच मी तपशीलवार यादी तयार करीन अथवा कलमवार माहिती सांगेन असा त्यांचा हट्ट आहे.

अगदीं अलीकडे म्हणजे १९४४ च्या एप्रिलमध्यें ज. जिना व पंजाबचे पंतप्रधान मलिक खिजर हयातखान यांच्यामध्यें पंजाबमधील युनियनिस्ट् मंत्रिमंडळाऐवजीं लीगचें अथवा लीग मुख्य असलेलें संमिश्र मंत्रिमंडळ स्थापन करण्याबाबत वाटाघाटी चालू असतां, मुसलमानेतर मंत्र्यांनीं अशी इच्छा प्रकट केली कीं 'योजनेंतील गुणावगुण सर्वांना पारखतां यावेत म्हणून तिचे राजकीय व घटनात्मक परिणाम नेमके काय होतील तें खुलासेवार सांगण्यांत यावें. पाकिस्तानमध्यें पंजाबच्या चतुःसीमा कोणत्या राहतील व या चतुःसीमा कोणत्या तत्त्वानुसार ठरवण्यांत येतील, याचा शक्य तितक्या स्पष्ट शब्दांत खुलासा करण्यांत यावा.' यावर जिनासाहेबांनीं असा शेरा मारला कीं, 'हा अखिल भारतीय स्वरूपाचा प्रश्न आहे व सूचित केलेल्या संमिश्र मंत्रिमंडळाच्या प्रस्थापनेसंबंधींच्या वाटाघाटींत तो अप्रस्तुत आहे.'[१]

पाकिस्तानसंबंधींची जर कांहीं योजना बनवलेली असेल, तर ती प्रकट करण्याच्या बाबत लीगचे अध्यक्ष इतके नाखुश कां असावेत तें समजणें, फार

१. स्टेटमेंट् ऑफ् नॉन् मुस्लिम मिनिस्टर्स, ता. १-५-४४; ता. ३-५-४४ च्या अमृत बझार पत्रिकेंत प्रसिद्ध झालेलें.

कठिण आहे. हिंदुस्थानांतील मुसलमान-समाजाच्या प्रतिनिधित्वाचा दावा करणारी एक जबाबदार संस्था एखाद्या सिद्धांताचा पूर्ण अर्थ काय होईल याचा विचार न करतांच सिद्धांत प्रतिपादन करील व तपशिलाचा विचार न करतांच एखादी योजना सुचवील, असें मानणें सयुक्तिक होणार नाहीं. उलटपक्षीं, आपली योजना विचारांत घेतली जावी व तिच्या गुणावगुणांची पारख होऊन तिचा स्वीकार करण्यांत यावा अशी जर लीगची इच्छा असेल, तर चर्चेसाठीं व योजना समजून घेण्यासाठीं जरूर तें स्पष्टीकरण करण्याकरतां लीग आतुर नसली, तरी निदानपक्षीं, सिद्ध असेल अशी अपेक्षा साहजिकच कोणीहि करील. बरें, माहिती व स्पष्टीकरण मागण्यांत येत आहे तें तपशिलाबाबत आहे असेंहि नाहीं. मूलभूत मुद्द्यांचें स्पष्टीकरण व्हावें अशी मागणी असून योजनेचा नीट विचार होण्यासाठीं तें अत्यावश्यक आहे.

उदाहरणार्थ, लीगच्या कल्पनेप्रमाणें कोणता टापू पाकिस्तानांत जाणार व कोणता हिंदुस्थानांत येणार तें समजणें आवश्यक होय. पाकिस्तानांतील मुसलमानेतर अल्पसंख्याकांचें संख्याबल किती असेल, आणि पाकिस्तानांतील हिंदूंच्या व हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या हक्करक्षणासाठीं लीगच्या मतें कोणकोणतीं संरक्षणें असावीं, याबद्दल ज्ञान झालेलें असणेंहि जरूर आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांना जीं संरक्षणें देण्यांत येतील तींच पाकिस्तानांत हिंदूंना मिळतील, येवढें लीगनें सांगितलें म्हणून तेवढ्यानें भागणार नाहीं. फाळणीची मागणी केलेला, अल्पसंख्याकांसाठीं इतरांकडून संरक्षणांची मागणी करणारा व अल्पसंख्याकांना संरक्षण देऊं म्हणणारा लीगव्यतिरिक्त दुसरा पक्ष नाहीं. तेव्हां फक्त मुसलमानांच्या साठींच नव्हे, तर इतरांच्या हितरक्षणासाठींदेखील कोणत्या योजना आपण तयार केलेल्या आहेत, त्या पुढें मांडण्याची जबाबदारी लीगवरच येते.

तसेंच, संरक्षणासंबंधींची जशास तसें वागण्याची किंवा परस्परानुकाराची ही योजना देशांतील निरनिराळ्या भागांत असणाऱ्या अल्पसंख्याकांच्या भिन्नभिन्न संख्याबलामुळें अव्यवहार्य ठरण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, एका

भागांत अल्पसंख्याकांचें एकंदर लोकवस्तीशीं असणारें प्रमाण ४० ते ५० टक्के असलें आणि दुसऱ्या भागांत तें सुमारें १० टक्क्यांइतकेंच असलें, तर ४० ते ५० टक्के प्रमाण असणाऱ्या अल्पसंख्य गटाची स्थिति, १० टक्क्यांच्या आसपास असलेल्या अल्पसंख्य गटाच्या मानानें कितीतरी चांगली असणार व संरक्षक हक्कांची बजावणी स्वबलावर करून घेण्याची अनुकूलता तिला लाभणार हें उघडच आहे. ही योजना ज्या दुसऱ्याहि एका करणास्तव अमान्य होण्याचा संभव आहे, त्याचा आतां सोदाहरण विचार करूं.

वायव्य व पूर्व विभागांतील किंवा पंजाब व बंगालमधील हिंदू जर असें म्हणूं लागले कीं, आम्ही अल्पसंख्य असलों तरी विधिमंडळांतून अथवा नोकऱ्यांमधून आम्हांला सवलती अथवा जादा जागा इत्यादि संरक्षणें नकोत, एकंदर लोकसंख्येंतील आपल्या लोकवस्तीच्या प्रमाणानुसार आपणांला प्रतिनिधित्व मिळालें म्हणजे पुरे; ख्रिश्चनादिक ज्या इतर अल्पसंख्य गटांना जादा प्रतिनिधित्व हवें असेल त्यांना तें बहुसंख्याकांनीं स्वतःच्या हिश्श्यांतून घस सोसून द्यावें, त्याचप्रमाणें आपण स्वतःसाठीं सवलती व जादा प्रतिनिधित्व मागत नसल्या कारणानें ज्या प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य आहेत तेथें त्यांनाहि जादा सवलती वगैरे देण्यांत येऊं नयेत आणि ख्रिश्चन वगैरे अल्पसंख्य गटांनीं मागणी केली तर जें कांहीं त्यांना द्यावयाचें तें बहुसंख्य हिंदूंनीं स्वतःच्या हिश्श्यांतून द्यावें. असें जर ते प्रतिपादन करूं लागले, तर कोणती परिस्थिति निर्माण होईल? ज्या प्रांतांत हिंदू बहुसंख्य आहेत तेथें हीच भूमिका ते निराळ्या पद्धतीनें मांडूं शकतील. आमच्या प्रांतांतल्या मुसलमान अल्पसंख्याकांना जादा प्रतिनिधित्व देण्यास आम्ही तयार नाहीं आणि ज्या प्रांतांत मुसलमानांची बहुसंख्या असेल तेथें त्यांनींहि हिंदूंना जादा प्रतिनिधित्व देऊं नये अशी भूमिका त्यांनीं मांडली तर? सर्व देशभर आपण अल्पसंख्य आहोंत कीं बहुसंख्य आहोंत त्याचा विचार न करतां जर हिंदूंनीं ही भूमिका पत्करली, तर तिच्यावर कोणताहि आक्षेप घेतां येण्यासारखा नाहीं. आणि अशी भूमिका हिंदूंनीं कां स्वीकारूं नये, याचें मलाहि कांहीं कारण दाखवतां येणार नाहीं. बंगालमधील हिंदूंचा तिच्या-

मुळें फायदाच होण्यासारखा आहे. १९३५च्या कायद्यानुसार विधिमंडळांत त्यांना ३२ टक्के जागा मिळाल्या आहेत, त्यांच्याऐवजीं त्यांना ४४ टक्के जागा मिळतील. पंजाब प्रांतामध्येंहि त्यांच्या स्थितींत थोडीशी सुधारणाच घडून येईल. बंगालमध्यें नोकऱ्यांच्या बाबतींत त्यांना ५० टक्क्यांच्या ऐवजीं ४४ टक्के नोकऱ्या मिळतील व पंजाबांत साधारणपणें आहे तीच परिस्थिति कायम राहील. सरहद्द प्रांत, सिंध व बलुचिस्तान या प्रांतांतील हिंदूंचें मात्र बऱ्याच मोठ्या प्रमाणांत नुकसान होईल. पण त्या प्रांतांतील हिंदूंची एकंदर लोकसंख्या फक्त १४॥ लाख असून विधिमंडळांतील जागा व नोकऱ्या कमी झाल्यामुळें त्यांना सोसावी लागणारी घस अगदीं किरकोळ स्वरूपाची असणार आहे. उलटपक्षीं, एकच बिहार प्रांत घेतला तर मुसलमानांना किती नुकसान सोसावें लागेल तें पहा. विधिमंडळांतील मुसलमानांच्या जागांचें प्रमाण २५ टक्क्यां-वरून १२ टक्क्यांवर आंणून ठेवावें लागेल, आणि नोकऱ्यांमध्यें तर खूपच घट होईल. सर्व मुसलमानी विभागांतील हिंदूंना प्रतिनिधित्वाच्या व नोकऱ्यांच्या दृष्टीनें सोसाव्या लागणाऱ्या एकंदर नुकसानीपक्षांहि हें नुकसान अधिक भरेल. कपातीचा घाव एकट्या बिहार प्रांताचा विचार केला तरी ४७ लाख मुसल-मानांच्या माथीं पडेल, मग संबंध हिंदुस्थानचा विचार केल्यास मुसलमानांना किती नुकसान सहन करावें लागेल त्याची कल्पनाच केलेली बरी.

संरक्षक बंधनांची अंमलबजावणी व्हावी यासाठीं राज्यघटनेनुसार कोणत्या प्रकारची हमी देण्यांत येणार आहे त्याचीहि स्पष्ट कल्पना प्रत्येक पक्षाला दिलेली असली पाहिजे. लीगच्या योजनेमुळें जे अनेक प्रश्न उद्भवतात, त्यां-पैकीं फक्त कांहींचा नामनिर्देश मीं येथें केला असून योजनेची चर्चा रीतसर व न्याय्य पद्धतीनें व्हावी व जाणतेपणानें तिचा स्वीकार व्हावा यासाठीं ज्या मुद्द्यांचें स्पष्टीकरण होणें मला आवश्यक वाटतें, त्यांतले कांहीं मुद्दे मीं येथें मांडले आहेत.

द्विराष्ट्र-सिद्धांताचे देखील जे अभिप्रेत अर्थ आहेत ते समजून घ्यावयास हवेत. पाकिस्तानचे पुरस्कर्ते इस्लामचा व त्यापासून सिद्ध झालेल्या सामाजिक व

राजकीय प्रथांचा आधार घेऊन असें प्रतिपादन करीत असतात कीं, मुसलमानांना पृथक् राष्ट्र म्हणून मान्यता देण्यांत आली पाहिजे. राष्ट्राचीं जीं अन्य लक्षणें आहेत, तीं हिंदुस्थानांतील विविध विभागांत वस्ती करून राहिलेल्या मुसलमान व मुसलमानेतरांच्या बाबतींत सारखींच लागू आहेत; तीं केवळ मुसलमानांनाच लागू पडणारीं आहेत असें नव्हे. पंजाबी हिंदू, पंजाबी मुसलमान, व पंजाबी शीख यांचे धर्म कितीहि वेगवेगळे असले, तरी ते एकच भाषा बोलतात. तीच गोष्ट वायव्य सरहद्द प्रांतांतील पठाणांची. मग ते हिंदू असोत वा मुसलमान असोत...साऱ्यांची भाषा पुश्तूच आहे. हिंदू व मुसलमान बंगल्यांचेंहि तसेंच आहे. ते सगळे बंगाली भाषाच बोलतात. एकाच भूभागावर ते राहात आहेत. इतर प्रांतांच्या प्रमाणें या भागांतील हिंदु—मुसलमान रहिवाशी एकाच राज्यकर्त्यांच्या म्हणजे इंग्रजांच्या अमलाखालीं गेलीं शंभरापेक्षां अधिक वर्षें नांदलेले आहेत.

फाळणीचें एकमेव कारण म्हणून धर्माचें नांव घेण्यांत येत असतें. परंतु धर्माची बाब सोडली, तर इतर महत्त्वाच्या सर्व नव्हे, तरी बहुतेक मुद्द्यांवर एकमेकांशीं सहमत असणारे लोक या देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत राहतात. या प्रश्नाबाबत ज० जिना यांच्याशीं बोलतांना मि. एड्वर्ड् थॉम्प्सन् यांनीं असें मत प्रदर्शित केलें होतें कीं, वरील दृष्टिकोनाचा अंगीकार केल्यास प्रत्येक खेड्यावर आणि प्रत्येक रस्त्यावर दोन राष्ट्रें आमनेसामने उभीं असल्याचें भयानक दृश्य दिसूं लागेल. हें दृश्य भयंकर खरें; परंतु त्याला दुसरा पर्यायच नाहीं, असें उत्तर ज. जिनांनीं दिल्याची बातमी आली होती.[1] वर्तमानपत्रांना नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतींत ज. जिनांनीं एड्वर्ड् थॉम्प्सन्‌ना मुलाखत दिल्याचा अगर त्यांचे म्हणून असलेले शब्द वापरल्याचा इन्कार केलेला आहे. परंतु त्यांनीं वरीलप्रमाणें शब्द उच्चारले कीं नाहीं किंवा एड्वर्ड् थॉम्प्सन् यांना मुलाखत दिली कीं नाहीं, हें मूळ मुद्द्यास सोडून आहे.

१. हें संभाषण एड्वर्ड् थॉम्प्सन् यांच्या 'एन्‌लिस्ट् इंडिया फॉर फ्रीडम्' या पुस्तकांत पृ. ५२ वर उध्दृत केलेलें आहे.

त्यामुळें धर्माच्या आधारावर उभारलेल्या द्विराष्ट्रवादानें खेडोपाडीं व रस्तोरस्तीं दोन राष्ट्रांची स्थापना होईल हें सत्य बदलणें शक्य नाहीं. हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांत राहणारा एकादा मुसलमान केवळ त्याचा धर्म अमुक आहे म्हणून जर तो ज्यांत सर्व मुसलमान आहेत अशा कोणत्या ना कोणत्या तरी हिंदुस्थानांतील कोपऱ्यांत असलेल्या राष्ट्राचा आणि त्याच्या शेजारीं राहणाऱ्या सर्व मुसलमानेतरांपासून विभक्त होणार असेल, तर प्रश्न साहजिकच उद्भवतो कीं कोणत्या राष्ट्राबद्दल त्या मुसलमानाच्या मनांत निष्ठा आहे ? ज्या राष्ट्रांत तो सदैव हिंडतो फिरतो आणि जें पाकिस्तानांत समाविष्ट होणारं मुसलमान राज्य नसेलहि, अशा राष्ट्राशीं तो एकनिष्ठ असणार, कीं आपला ज्याच्याशीं अजिबात संबंध नाहीं, परंतु केवळ ज्यांतील बहुसंख्य लोक एका विशिष्ट धर्माचे आहेत त्याच्याशीं तो एकनिष्ठ राहणार ? असाच प्रश्न मुसलमानी राज्यांत राहणाऱ्या मुसलमानेतराच्या बाबतींत उपस्थित होईल. कीं अशा परिस्थितींतल्या मुसलमानाला अथवा मुसलमानेतराला दुहेरी व्यक्तित्व आहे व त्याच्या निष्ठा द्विधा झालेल्या आहेत असें समजावयाचें ? असें समजल्यास युद्धासारख्या आणीबाणीच्या परिस्थितींत द्विधा निष्ठेमुळें कोणते परिणाम घडून येतील ?

पृथक् राष्ट्राच्या नागरिक असलेल्या व्यक्तीच्या दर्जाबाबत दुसरेहि कांहीं प्रश्न विचारतां येतील.

सामान्यपणें एकाद्या विशिष्ट राष्ट्राच्या प्रदेशांत राहाणाऱ्या नागरिकाचें पूर्वीचें राष्ट्रीयत्व कांहीं कां असेना, त्याला कांहीं अटी पाळल्यानंतर त्या राष्ट्राचें नागरिकत्व देण्यांत येतें. यामुळें त्याला एक विशिष्ट दर्जा प्राप्त होतो, कांहीं हक्क प्राप्त होतात आणि त्याच्यावर कांहीं जबाबदाऱ्या टाकल्या जातात. हिंदुस्थानांतील एकादा मुसलमान जर मुस्लिम किंवा किंवा बिगरमुस्लिम राष्ट्रांत असेल आणि त्याच्या धर्मामुळें जर तो मुस्लिम राष्ट्राचा नागरिक होणार असेल, तर अशा परिस्थितींत तो राहत असलेलें राष्ट्र मुसलमानेतर असल्यास त्याचें नागरिकत्व त्याला मागतां येईल काय ? आणि तसें नागरिकत्व त्याला देणें न्याय्य व रास्त तरी होईल काय ? मग तो स्वतः मुस्लिम

राष्ट्राचा नागरिक ठरल्यामुळें स्वतःच्या संरक्षणासाठीं आणि इतर सवलतींसाठीं या मुस्लिम राष्ट्रावर अवलंबून असणारा, अतएव त्या देशांतील एक परकीय म्हणूनच तो ठरणार नाहीं काय? त्याला फक्त परकीयांना जे हक्क असतील तेवढेच मागतां येतील. एकाद्या परक्या राष्ट्रांत काम व उद्योगधंदा करणारे परकीय लोक, व त्या राष्ट्राचेच नागरिक परंतु त्या राष्ट्रांतील इतर गटांच्या मानानें अल्पसंख्याक असे काम व उद्योगधंदा करणारे लोक यांच्यामध्यें फार फरक असतो, या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. अल्पसंख्याक लोक हे त्याच राष्ट्राचे नागरिक असतात व त्यांच्या हक्कांना योग्य ती मान्यता मिळालेली असते. परकीयांना राष्ट्रांतील अल्पसंख्याकांइतके अधिकार कधींहि असणार नाहींत. तेव्हां मुसलमान बहुसंख्य नसलेल्या प्रांतांतून आणि संस्थानांतून मुसलमान लोक जर आपण एका परक्या राष्ट्राचे नागरिक असल्याचा दावा करीत असतील, तर त्यांना त्याचवेळीं अल्पसंख्याकांचे हक्क मागतां येणार नाहींत. मुस्लिम राष्ट्रांतील बिगरमुसलमानसुद्धां जर स्वतःला दुसऱ्या राष्ट्राचे नागरिक म्हणवीत असतील, तर त्यांच्याहि बाबतींत हाच न्याय लागू पडेल.

वायव्येकडील आणि पूर्वेकडील मुस्लिम–राज्यें मुसलमानांच्या राष्ट्रकल्पनेप्रमाणें चालविण्याची मुस्लिम लीगची इच्छा असेल, तर त्या राज्यांतील बिगर-मुसलमानांचा दर्जा काय, असा प्रश्न उभा राहतो. त्यांना त्या राज्यांचें समान नागरिकत्व मिळणार कीं त्यांना गौण दर्जा प्राप्त होणार?

मुसलमानांच्या सार्वजनिक कायद्याप्रमाणें मुसलमान व धिम्मी यांत फरक करण्यांत येतो. बिगर–मुसलमानांना धिम्मींचा दर्जा मिळणार कीं आधुनिक लोकशाही राज्यांतल्याप्रमाणें समान नागरिकत्व मिळणार? अलिगढच्या मुस्लिम युनिव्हर्सिटीमधील ए. एस्. ट्रिटन् यांनीं लिहिलेल्या 'खलिफा व त्यांचे बिगर-मुस्लिम प्रजाजन' या पुस्तकांत खलिफांच्या अधिपत्याखालील बिगर-मुसलमानांच्या परिस्थितीबाबत विस्तृतपणें लिहिलें आहे. येथें त्या पुस्तकाचा सारांश देणें शक्य नाहीं. फक्त त्या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांतील कांहीं उतारे देऊनच मी भागवणार आहें. मि. ट्रिटन् म्हणतात, 'इस्लामी राज्य म्हणजे एक भारच

होता हें ईजिप्तमधील बंडाळीनें सिद्ध झालें. मुसलमानांच्या गरजा भागल्या-नंतर खजिन्यांतील उरलेली रक्कम धिम्मी लोकांना वाटून देण्याची आज्ञा दुसऱ्या उमरनें आपल्या अधिकाऱ्यांना दिलेली असेल; परंतु राज्याला लागतील ते पैसे त्यांनीं पुरविणें व त्यासाठीं त्यांना कांहींहि भरपाई न मिळणें, हा एक नियमच झालेला होता. कदाचित् प्रथम प्रथम अगोदरच्या सरकारला जितके कर द्यावे लागत त्यापेक्षां अधिक कर त्यांना द्यावे लागत नसतील; पण हळूहळू हें ओझें वाढतच गेलें. पहिल्या शतकाच्या शेवटीं दुसऱ्या उमरच्या कारकीर्दींत धिम्मी लोकांना निश्चितपणें जांच सुरू झाला. त्यांच्या पेहेरावावर निर्बंध घालण्यांत येऊन सरकारी अधिकाराच्या जागांवरून त्यांची हकालपट्टी होऊं लागली.... दुसऱ्या शतकानंतर मुसलमानांचा जोर अधिकच वाढला. पेहेरावासंबंधींचे कायदे अधिकच कडक झाले आणि ख्रिस्ती धर्ममठ बांधू नयेत अशी कल्पना बळावत चालली. कायद्यांतल्यापेक्षां प्रत्यक्ष राजांची वागणूक बरी असे ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे. कायद्याप्रमाणें धिम्मी लोकांचे लग्नसमारंभ, प्रेतयात्रा, मेजवान्या, धार्मिक सण इत्यादिकांवर अनेक निर्बंध होते. मुसलमानाच्या वस्त्रावर मुद्दाम पाऊल टाकल्यास शिक्षा होई, आणि त्यांना रस्त्याचा मध्यभाग मुसलमानांसाठीं मोकळा सोडावा लागत असे.

'समाराचा ख्रिश्चन धर्ममठ ज्या जागीं होता तेथें राजवाडा बांधण्याची इच्छा होऊन मुतासिमनें तो विकत घेतला. इतर खलिफांनीं तर स्वतःच्या इमारतींसाठीं चर्चें फोडून टाकलीं ! लोकांचे जमाव सदैव चर्चें व धर्ममठ उध्वस्त करण्यासाठीं तयार असत. धिम्मी लोक श्रीमंत असले तरीसुद्धां त्यांना राजाच्या लहरीवर आणि लोकांच्या जमावाच्या रागलोभावर अवलंबून राहावें लागत असल्यामुळें त्यांची हलाखीची स्थिति होती. अल् हकीमच्या कथेला माथेफिरूपणाच म्हटलें पाहिजे. तें सर्वसामान्य मुसलमानाचें लक्षण नव्हे. परंतु पुढच्या कालांत धिम्मींची परिस्थिति अधिकच वाईट झाली. लोकांच्या जमावांचे त्यांच्यावर अत्याचार होत. सामान्य लोक धर्मवेडे बनत चालले, तसतसे सुशिक्षित लोक अधिकच कडक झाले. वैचारिकदृष्टया इस्लामी धर्म इतर

विचारप्रवाहांपासून सर्वस्वीं अलग बनला. जगांत इस्लामी आणि इस्लामेतर असे दोन वर्ग पडले, आणि फक्त इस्लामलाच मान्यता देण्यांत येऊं लागली. याला कांहीं अपवाद सांपडतील; परंतु वरील म्हणणें सर्वसाधारणपणें खरें आहे. एकाद्या मुसलमानानें धिम्मी धर्माला मदत केली, तर त्याला तीन वेळां प्रायश्चित घेण्यास बोलावीत आणि त्यानें जर हेका धरला तर त्याला फांशीं देत. मुसलमानांचें उष्टें धिम्म्यांनीं खाण्यास योग्य आहे, अशी वस्तुतः सर्वसामान्य समजूत होती.'[१]

पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या कांहीं लेखकांनीं स्पष्टपणें असें लिहून ठेवलें आहे कीं, तें राज्य मुस्लिम बनेल. म्हणजेच तेथें सर्वांना समान न्याय मिळेल असें त्यांना वाटतें. वर उतारा दिलेला आहे त्यावरून बिगर–मुसलमान या मताशीं सहमत होणार नाहींत. म्हणून मुसलमानी राज्यांतील कारभारासंबंधीं योग्य तो निर्णय घेतां यावा, यासाठीं तत्संबंधींची निश्चित आणि स्पष्ट योजना आपल्यासमोर असावयास हवी. लाहोर–ठरावाचें स्पष्टीकरण व विवरण करण्याची मागणी न्याय्य आहे हें यावरून उघड होतें. आपलें द्विराष्ट्र–वादाचें तत्त्व आणि फाळणीची योजना मांडण्याच्या अगोदर मुस्लिम लीगनें हे आणि यासारखे इतर प्रश्न विचारांत घेतले असतील. आणि जर मुस्लिम–लीगमध्यें नसणाऱ्या मुसलमानांचा अगर बिगर–मुसलमानांचा तिच्या कार्यक्रमाला पाठिंबा हवा असेल, तर अशासारखे कठिण प्रश्न सोडविण्यासाठीं त्यांनीं इतरांशीं सहकार्य केलें पाहिजे. अर्थात् लोकांनीं फाळणीला डोळे मिटून पाठिंबा द्यावा, अशी त्यांची इच्छा असेल तर भाग वेगळा!

लीगला एका अस्पष्ट सर्वसामान्य तत्त्वाशीं आणि एका अनिश्चित योजनेशीं इतरांना बांधून घ्यावयाचें आहे; मागून हळूहळू त्यांतील अभिप्रेत अर्थ आणि तपशील प्रकट करावयाचा आहे; नंतर हे अभिप्रेत अर्थ आणि तपशील त्यांच्याकडून मान्य करून घ्यावयाचे आहेत; अभिप्रेत अर्थ मान्य असूनसुद्धां

१. ए. एस्. ट्रिटन् : खलिफा आणि त्यांचे बिगर–मुस्लिम प्रजाजन, पृ. २३०–३३.

तपशिलाची गोष्ट कांहींना अमान्य झाली, तर त्यांच्यावर अविश्वासाचा आरोप करून आपला शब्द त्यांनीं मोडला, अशी ओरड त्यांच्याविरुद्ध लीगला करावयाची आहे, असे आरोप जर कोणी ध्वनित करूं लागेल, तर त्याच्यावर अनुदारपणाचा ठपका येईल.

तथापि, या सर्व गोष्टींचा उलगडा ज्या पद्धतीनें होत आहे, त्यामुळें वरील अनुदार कल्पनेला पुष्टि मिळत आहे. प्रथम मुस्लिम–लीगच्या अध्यक्षांनीं फाळणीचें तत्त्व मान्य करा असा हेका धरला; त्यासाठीं त्यांनीं हिंदु एकत्र–कुटुंब-पद्धतींत विभक्त व्हायचें असेल तर प्रथम फाळणीचें तत्त्व मान्य करून मागून तपशील तयार केला जातो, याचा दाखला दिला. ही भूमिका त्यांनीं आतां बदललेली आहे. श्री० राजगोपालाचारी यांनीं गांधीजींच्या संमतीनें लाहोर-ठरावांतील शर्ती ज्यांत मान्य होतील अशी एक भरीव योजना मांडली, तेव्हां ज. जिनांनीं तिचा अत्यंत कडक शब्दांत धिक्कार केला. ही भूमिका कशी बदललेली आहे तें दाखवून देणें अवश्य आहे. महात्मा गांधींना आपल्या मुंबईतील बंगल्यांत भेटण्याचा निर्णय जाहीर करतांना ज. जिनांनीं राजगोपालाचारी यांची योजना झिडकारून पुढें म्हटलें कीं, 'फाळणीचें तत्त्व किंवा हिंदुस्थानच्या विभागणीची कल्पना श्री. गांधींनीं वैयक्तिक रीत्या तरी मान्य केलेली आहे. आतां फक्त ही गोष्ट कशी आणि केव्हां अमलांत आणावयाची तें ठरवावयाचें शिल्लक उरलें आहे.'[१] या घोषणेनंतर कुणाचीहि अशी समजूत झाली असती कीं तपशील आंखण्याअगोदर ज्या फाळणीच्या अगर देशविभजनाच्या तत्त्वावर येवढा मोठा भर दिला गेला होता, तें एकदां मान्य झाल्यानंतर तपशिलासाठीं जिना आपली स्वतःची अशी एक योजना पुढें मांडून श्री. राजगोपालाचारी यांच्या "लुळ्या–पांगळ्या, लंगड्या, वाळवी लागलेल्या पाकिस्ताना"हून ती कशी भिन्न आहे, हें दाखवून देतील. परंतु त्यानंतर जी दीर्घ चर्चा झाली, तिचे निर्णय गांधीजी आणि जिना यांमध्यें जो पत्रव्यवहार झाला त्यामध्यें दिलेले आहेत.

---

१. ३०–७–४४ रोजीं ऑल इंडिया मुस्लिम–लीग कौन्सिलपुढें लाहोरला केलेलें निवेदन.

त्यावरून त्या योजनेच्या तपशिलात्मक विवरणाऐवजीं द्विराष्ट्रतत्त्व आणि लाहोरचा ठराव यांना संपूर्णपणें मान्यता देण्याची नवीन मागणी पुढें करण्यांत आली. जिनांच्या शब्दांत सांगायचें, तर जें फाळणीचें तत्त्व गांधीजींनीं मान्य केलें होतें, त्याहून वेगळें असें सामान्य तत्त्व आणि योजनेचा सर्वसाधारण आराखडा मान्य करा असा आग्रह धरण्यांत आला. तपशिलाची चर्चा करण्याच्या अगोदर फाळणीचें तत्त्व मान्य करा या म्हणण्यांतून वास्तविक पाहतां तपशिलाची चर्चा निघावयास हवी होती. परंतु तसें न होतां फाळणीची कल्पना आणि लाहोर–ठराव या दोन्ही गोष्टींना आधारभूत असलेल्या द्विराष्ट्र–वादाच्या सिद्धांतास मान्यता देण्यांत यावी, अशी मागणी पुढें करण्यांत आली. या दोन्ही गोष्टी मान्य केल्या, तरी पुढें आणखी कोणत्या मागण्या करण्यांत येतील कुणास ठाऊक! फाळणीची योजना आणि तिला आधारभूत असलेलें द्विराष्ट्रत्व यांचा खंडशः विचार करा, असा आग्रह धरण्यांत आल्याकारणानें हा परिणाम घडून आलेला आहे.

## २५. संदिग्धपणापासून होणारे तोटे

पाकिस्तानमध्यें कोणते विभाग समाविष्ट करावेत, या मुद्द्याचा देखील जो एक इतिहास आहे तो सर्वांना ठाऊक नसेल. अगोदर दर्शविल्याप्रमाणें हिंदुस्थानचे हिंदु–विभाग आणि मुस्लिम–विभाग पाडण्यासाठीं अनेक व्यक्तींनीं निरनिराळ्या योजना आंखल्या होत्या. त्यांपैकीं कांहींना हे विभाग सांस्कृतिक उद्दिष्टांसाठीं हवे होते. केवळ मुस्लिम–विभागांत पडणाऱ्या प्रदेशांतच नव्हे, तर सर्व देशाच्या राज्यकारभारांत मुसलमानांना सुस्थिति प्राप्त व्हावी, हाहि त्या मागील हेतु होता. कांहींजणांना उघडउघड स्वतंत्र मुस्लिम–राज्यें स्थापन करावयाचीं होतीं. १९४०सालीं मार्चच्या शेवटच्या आठवड्यांत मुस्लिम लीगच्या लाहोर–अधिवेशनांत पाकिस्तानचा ठराव पास झाला, त्याच्या थोडे दिवस अगोदर म्हणजे १९४०च्या फेब्रुवारींत लीगच्या परराष्ट्रीय समितीनें 'हिंदुस्थानच्या राज्यघटनात्मक सुधारणांसाठीं ज्यांनीं ज्यांनीं निरनिराळ्या योजना आंखल्या होत्या, त्यांना वरील समितीच्या वतीनें एकत्र येऊन प्रत्येक

योजना सर्वांनीं मिळून अभ्यासावी व सर्वांची मिळून एक अखेरची भरीव योजना तयार होऊं शकेल कीं नाहीं हें पाहावें'[१] म्हणून आमंत्रणें पाठविलीं. यासंबंधीं मागें उल्लेख आलाच आहे. अखिल भारतीय मुस्लिम–लीगच्या परराष्ट्रीय उपसमितीचे अध्यक्ष सर अब्दुल्ला हरून यांनीं ज० जिनांना एक मसुदा सादर केला; आणि आतांच उल्लेखिलेल्या पत्रांत ते म्हणतात, 'गेल्या फेब्रवारींत तुमच्या (ज० जिना यांच्या) हातांत जो मसुदा मीं दिला, त्याच्या आधारें हा ठराव (लीगचा लाहोरचा ठराव) वर्किंग कमिटीनें तयार केला होता हें उघड आहे.'[२] हा मसुदा प्रसिद्ध झालेला नाहीं; त्यामुळें त्यांत काय होतें हें सांगणें अशक्य आहे.

वर निर्देश केलेल्या योजनांत, ज्यांचे योजक परराष्ट्रीय उपसमितीच्या निमंत्रणावरून एकत्र जमले होते, त्यांच्यांत दोन वेगळेगळे आणि परस्परविरोधी मतप्रवाह दिसून येतात. एक कल्पना अशी होती कीं, मुस्लिम–विभाग एकसंघी असावा, त्यांत मुसलमान अल्पसंख्य असलेले प्रदेश वगळण्यांत यावेत व मुसलमान लोकसंख्येचें प्रमाण ज्यास्तींत जास्त असावें, बहुसंख्य मुसलमानांचें प्रमाण खूप जास्त असून बिगर–मुसलमान अल्पसंख्याक अगदीं थोडे असल्यामुळें त्या विभागाचा कारभार बहुतांशीं मुसलमानांच्या इच्छेप्रमाणें चालावा. मुसलमानांचें बहुमत अल्प असल्यामुळें त्यांचें आसन डळमळित राहिल्यास स्वतंत्र मुस्लिम–विभाग असण्यामागील मूळ उद्देशच जरी नाहींसा झाला नसला, तरी त्याला खासच धोका उत्पन्न होईल. याउलट, दुसऱ्या बाजूच्या लोकांना मुस्लिम विभागांत हिंदुस्थानचा शक्य तेवढा जास्तींत जास्त प्रदेश समाविष्ट करून घ्यावयाचा होता; मग त्यांत मुसलमानांचें अगदीं अल्प संख्येनें मताधिक्य झालें, तरी त्यांची हरकत नव्हती. परराष्ट्रीय उपसमितीनें जी समिति नेमली होती, तिच्या

१. अखिल भारतीय मुस्लिम–लीगच्या परराष्ट्रीय उपसमितीचे अध्यक्ष सर अब्दुल्ला हरून यांचें १३ डिसेंबर १९४०चें पत्र. सदर पत्र 'पाकिस्तानचा प्रश्न' (दि पाकिस्तान इश्यू) यांत प्रसिद्ध झालें आहे, पृ. ७३–७४.

२. उक्त ग्रंथ, पृ. ७५.

उद्दिष्टांपैकीं एक उद्दिष्ट खात्रीनें या विरोधी विचारांचा मेळ घालावा हेंच असणार. मुस्लिम–लीगच्या वार्षिक अधिवेशनापर्यंत या समितीचें कार्य न संपल्यामुळें सर अबदुल्ला हरून यांनीं एक तात्पुरता आराखडा लीगच्या अध्यक्षांना सादर केला. या मसुद्याच्या आधारानें लाहोर–ठराव आंखला होता असें सर अबदुल्ला हरून यांचें मत आहे. हा ठराव पुढीलप्रमाणें सर्वसाधारण आणि अस्पष्ट शब्दांत मांडला होता असें दिसतें:

"हिंदुस्थानच्या वायव्य व पूर्व विभागांप्रमाणें ज्या विभागांत मुसलमानांची बहुसंख्या असेल व जे विभाग भौगोलिक दृष्ट्या सलग असतील, ते वेगळे काढण्यांत यावेत. असें करतांना त्यांच्यांत जरूर ते प्रादेशिक फेरबदल करण्यांत यावेत व त्यांच्या स्वतंत्र राज्यांचा गट बनविण्यांत यावा; व या गटांतील घटकांना स्वायत्तता व सार्वभौमता असावी."

या ठरावांत, 'घटक,' 'प्रदेश,' क्षेत्र,' व 'विभाग' असे शब्द प्रादेशिक मर्यादांसाटीं वापरण्यांत आलेले आहेत. देशाच्या प्रचलित राज्यघटनाविषयक व राज्यकारभारविषयक कागदपत्रांत हे शब्द कोठेंहि आढळणार नाहींत. हल्लीं सर्वसामान्यपणें 'जिल्हा,' 'तालुका,' 'तहशील,' 'प्रांत' असे शब्द वापरण्याचा प्रघात आहे. आणि जर ठरावांत अंधुकता, अस्पष्टता आणि संदिग्धता निर्माण करण्याऐवजीं स्पष्टपणा व निश्चितपणा असावा अशी इच्छा असती, तर वरील सर्वमान्य शब्द वापरल्यानें ती गोष्ट अत्यंत सुलभपणें करतां आली असती. परंतु दोन मतप्रवाहांतील भेद निश्चितपणा आणि ठरीवपणा आणण्यानें अधिकच विकोपास जाऊन उघड होऊं नयेत, म्हणून निश्चितपणा मुद्दाम टाळण्यांत आला असावा, असें तर नसेल? कारण कांहीं कां असेना, आपल्याला या शब्दांमागें काय अर्थ अभिप्रेत होता याचा विचार करावयाचा आहे.

ठरावांत ही संदिग्धता आणि अनिश्चितता असली, तरी त्यांत योजिलेले शब्द पुरेसे असंदिग्ध आहेत. मुस्लिम-लीगच्या अध्यक्षांसारख्यांनीं त्या शब्दांना अभिप्रेत अर्थानें आणि अप्रत्यक्षपणें निश्चित अर्थ आणलेला आहे. त्यांनीं केलेल्या अर्थाप्रमाणें हा ठराव छोटें क्षेत्रफळ असलेल्या मुस्लिम प्रदेशांत मुसल-

मानांची अत्यधिक बहुसंख्या असावयास अनुकूल व व्यापक क्षेत्रफळ असलेल्या प्रदेशांत मुस्लिमांचें नाममात्र बहुमत असावयास प्रतिकूल आहे.

या कल्पनेच्या पुष्टयर्थ मी कांहीं पुरावे देतों. इंटरनॅशनल् न्यूज सर्व्हिस ऑफ अमेरिका या संस्थेचे वार्ताहार मि० डब्ल्यू.डब्ल्यू. चॅप्मन् यांना दिलेल्या मुलाखतींत ज० जिना म्हणतात, "हिंदुस्थानच्या वायव्य आणि ईशान्य विभागांत मुसलमान जवळजवळ ७५ टक्के आहेत. तेथें स्वतंत्र मुस्लिम–राज्य अगर राज्यें निर्माण करून पाकिस्तान तयार केल्यानेंच हिंदुस्थानला खरेंखुरें स्वातंत्र्य मिळूं शकेल."[१] पंजाबमधील मुसलमानेतर बहुसंख्य असणारे जिल्हे वगळले तरच ही गोष्ट वायव्य विभागापुरती खरी आहे असें १९४१च्या खानेसुमारीवरून दिसून येतें.

**कोष्टक ७.**

| विभागाचें नांव | एकूण लोकसंख्या (लाखांत) | मुस्लिम लोकसंख्या (लाखांत) | बिगर–मुस्लिम लोकसंख्या (लाखांत) |
|---|---|---|---|
| वायव्य सरहद्द प्रांत | ३०·३८ | २७·८८ | २·४९ |
| सिंध | ४५·३५ | ३२·०८ | १३·२७ |
| ब्रिटिश बलुचिस्तान | ५·०२ | ४·३९ | ०·६३ |
| मुस्लिम बहुसंख्या असलेले पंजाबचे जिल्हे (मुसलमानेतरांची बहुसंख्या असलेले जिल्हे वगळून) | १६८·७१ | १२३·६४ | ४५·०७ |
| एकूण | २४९·४६ | १८७·९९ | ६१·४६ |

या कोष्टकाप्रमाणें मुस्लिम लोकसंख्या नेमकी ७५·३० टक्के व मुसलमानेतर लोकसंख्या २४·७० टक्के भरते. उलटपक्षीं, जर वरील कोष्टकांत पंजाबांतील

१. ज० जिनांचीं अलीकडचीं कांहीं भाषणें व लेख : संग्राहक–जामिलद्दिन अहमद, ३ री आवृत्ति (१९४३), पृ. ३६६.

मुसलमानेतर बहुसंख्य असलेल्या जिल्ह्यांची लोकसंख्या मिळवून सबंध पंजाब प्रांताची लोकसंख्या घेतली, तर पुढीलप्रमाणें परिस्थिति होईल :

| | एकूण लोकसंख्या ( लाखांत ) | मुस्लिम लोकसंख्या ( लाखांत ) |
|---|---|---|
| वर दिलेली एकूण | २४९·४६ | १८७·९९ |
| वगळलेल्या विभागाची | ११५·४८ | ३८·५४ |
| एकूण | ३६४·९४ | २२६·५३ |

या कोष्टकाप्रमाणें मुस्लिम लोकसंख्या ६२ टक्के भरते. याचप्रमाणें १९३१ च्या खानेसुमारीचे आंकडे घेतले तर पंजाब, सिंध, ब्रिटिश बलुचिस्तान व वायव्य सरहद्द प्रांत यांची एकूण लोकसंख्या ३,०३,५६,५०६ पैकीं १,८७,–९५, ८७२ किंवा ६१·९ टक्के मुसलमान भरतील.

अर्थातच मि० चॅप्मन् यांना निवेदन करतांना ज० जिना यांनीं वायव्य मुस्लिम विभागांत पंजाबच्या फक्त मुस्लिम बहुसंख्य असलेल्या भागाचाच समावेश केलेला असावा; सबंध पंजाब त्यांत समाविष्ट केलेला असणें शक्यच नाहीं.

दुसऱ्याहि एका पुराव्यावरून हाच निर्णय निघतो. मुस्लिम–विभाग बाकीच्या हिंदुस्थानपासून वेगळे काढण्याबाबत मि. एम्. आर्. टी. यांनीं ईस्टर्न् टाइम्स्-मध्यें बरेच लेख लिहिले आहेत. मुस्लिम–लीगच्या मार्च १९४० मध्यें भर-लेल्या लाहोर–अधिवेशनानंतर मुंबईस मलबार हिलवर माऊंट प्लेझंट रोडवर राहणाऱ्या श्री. एम्. एच्. सैयिद यांनीं "हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेचा प्रश्न" या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें, तें निश्चितपणें ज. जिनांच्या वती-नेंच लिहिलें असलें पाहिजे. स्वतः ज. जिना यांनीं त्याला प्रस्तावना लिहिलेली आहे. या प्रस्तावनेंत ज. जिना म्हणतातः "ज्यांना हिंदुस्थानच्या भावी राज्य-घटनेसंबंधींच्या प्रश्नांचा अभ्यास करावयाचा असेल, त्यांना हा संग्रह उपयोगी पडेल. याच हेतूनें कांहीं विचारपूर्वक बनवलेलीं मतें मीं या पुस्तिकेंत ग्रथित केलीं आहेत." पुढें ते म्हणतात, "अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या लाहोर–ठरावानें एक मूलभूत प्रश्न उद्भवलेला आहे, त्याचें विशदीकरण होण्यास

या पुस्तिकेचा बराच उपयोग होईल अशी मला आशा वाटते. आणि माझा असा विश्वास आहे कीं, या विस्तीर्ण उपखंडाचा प्रत्येक हितचिंतक या विषयाकडे पूर्वग्रह न धरतां, एकांगीपणा न बाळगतां, आणि भावनाविवश न होतां पाहील." या पुस्तकांतील ज० जिना यांनीं स्वतः निवडलेल्या लेखांत, लीग-अधिवेशनापूर्वींचा म्हणजे ५ जानेवारी १९४० रोजीं ईस्टर्न् टाइम्स्मध्यें प्रसिद्ध झालेला मि. एम्. आर. टी. यांचा लेख आहे. या लेखांत, मुसलमानांनीं संरक्षक बंधनें स्वीकारावींत कीं फुटून निघावें, याची चर्चा करतांना मि. एम्. आर. टी. लिहितात, "वायव्येकडे पंजाब, काश्मीर, सिंध, बलुचिस्तान आणि वायव्य सरहद्द प्रांत या पांच लगतच्या प्रदेशांत एकूण ४ कोटी २० लक्ष लोकसंख्येपैकीं त्यांची (मुसलमानांची) लोकसंख्या २ कोटी ८० लक्ष आहे. पंजाबच्या पूर्वसरहद्दीमध्यें जर फेरफार करण्यांत आले, तर मुसलमानांचें प्रमाण वाढवितां येईल. पंजाबमधून अंबाला विभाग आणि पूर्वेकडील शीख व हिंदू संस्थानें वगळलीं, तर पंजाबची लोकसंख्या २ कोटी ८५ लक्ष आहे ती २ कोटी १० लक्षानें कमी होईल; परंतु मुसलमानांचें प्रमाण ५५ टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढेल. वायव्येकडील सर्व मुस्लिम विभाग घेतला, तर हें प्रमाण याहूनहि जास्त भरेल. या सूचनेप्रमाणें पूर्व सरहद्दीची पुनर्रचना केली, तर वायव्य विभागांतील ३ कोटी ५० लक्ष लोकसंख्येपैकीं मुसलमानांची संख्या २ कोटी ७० भरेल व मुसलमानेतरांची संख्या ८० लाख होईल. मुसलमानांचें प्रमाण ७७ टक्के असेल, तर एक स्थिर असें सरकार कायमचें चालविण्याइतके ते समर्थ बनतील. आणि ही गोष्ट लोकसंख्येची अदलाबदल न करतां शक्य होईल."[१] पंजाबच्या ज्या भागांत मुसलमान बहुसंख्य नाहींत, तो भाग अलग करण्यास या योजनेची अनुमति आहे; आणि "लाहोर–ठरावाचें विशदीकरण करण्यास जिचा बराच उपयोग होईल" अशी ही योजना जिनांच्या अधिकृत संमतीनें प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

आणखी एका गोष्टीनें या दृष्टिकोनाला अप्रत्यक्षपणें पुष्टि मिळते. मुस्लिम-

---

१. हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेचा प्रश्न, पृ. ३३–३४.

लीगच्या परराष्ट्रीय उपसमितीनें सर अब्दुल्ला हरून यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति स्थापन केली होती तिच्याविषयीं मीं वर उल्लेख केलेलाच आहे. लाहोर-ठराव पास झाल्यानंतर या समितीचें कार्य तसेंच चालू राहून तिनें खरोखरीच एक योजना तयार केली. वायव्य विभागांत कोणते कोणते प्रदेश समाविष्ट केले होते त्याचा तपशील तींत दिलेला होता. या योजनेंत समितीनें सबंध पंजाब, पंजाबांतील हिंदी संस्थानें व काश्मीर, दिल्ली प्रांताच्या पूर्व सरहद्दीपलीकडील ब्रिटिश हिंदुस्थानचा कांहीं भाग, त्या विभागांत अलिगढचा समावेश व्हावा म्हणून अलिगढ जिल्ह्याचा कांहीं भाग आणि बिकानेर व जेसलमीर संस्थानें, येवढ्यांचा समावेश केलेला होता. परंतु १८ फेब्रुवारी १९४१ च्या स्टेट्स्-मन्मध्यें ( दिल्लीच्या ) या योजनेला अनधिकृत व अकालीं प्रसिद्धी मिळाली. आणि निरनिराळ्या प्रांतांतील वृत्तपत्रांच्या दिल्लीच्या वार्ताहारांनीं आपल्या केन्द्राना ताबडतोब असें कळवून टाकलें कीं, लीगच्या परराष्ट्रीय समितीनें १७ फेब्रुवारी १९४१ रोजीं आपला अहवाल प्रसिद्ध केलेला आहे. सर अब्दुल्ला हरून यांनीं ही योजना अभ्यासून तिच्यावर आपलें मत कळवा अशी विनंति डॉ. सैद अबदुल लतीफ यांना केली; त्याप्रमाणें त्यांनीं ८ मार्च १९४१ रोजीं आपलें मत व्यक्त केलें, आणि त्याची एक प्रत ज. जिनांना धाडली. यामुळें ज. जिनांना बहुतेक राग आला आणि त्यांनीं १५ मार्चला डॉ. लतीफना पत्र धाडून कळविलें कीं, "तुम्ही ज्याबद्दल वारंवार म्हणत आलां तसली कुठलीहि समिति मुस्लिम-लीगनें नेमलेली नव्हती, हें मी तुम्हांला आणि सर्वांना स्पष्ट करीत आहें. आणि या तथाकथित योजनांतील सूचनांना माझी अगर लीगची मान्यता मिळणें अशक्य आहे; मात्र व्यक्तींकडून अगर गटांकडून जर कांहीं सूचना आल्या तर मीं म्हटल्याप्रमाणें त्यांची योग्य ती दखल घेतली जाईल. म्हणून तुम्ही आणि सर अब्दुल्ला हरून या दोघांनींहि ही समिति आणि ती समिति अशी एकसारखी वाच्यता करून, व्यक्तींनीं अगर गटांनीं ज्या सूचना मांडलेल्या असतील त्यांमध्यें मुस्लिम-लीग अगर तिच्या अधिकृत व्यक्तींना गुंतवूं नये, असें माझें तुम्हांला स्पष्टपणें सांगणें आहे."[1]

---

१. दि पाकिस्तान इश्यू, पृ. १००.

या सर्वांचा मथितार्थ पुढीलप्रमाणें आहे: एकीकडे मुस्लम–लीगचे अध्यक्ष इंटर नॅशनल् न्यूज एजन्सीला असें जाहीर करतात कीं, वायव्य विभागांत मुसलमानांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के भरेल; पण ही गोष्ट त्या विभागांतील मुसलमानेतर बहुसंख्य असलेले पूर्व पंजाबमधील जिल्हे वगळले तरच शक्य आहे. ते स्वतः अनेक लेखांची निवड करतात आणि 'लाहोर-ठरावाचें विशदीकरण करण्यास त्यांचा बराच उपयोग होईल' म्हणून ते लेख प्रसिद्ध करतात; या लेखसंग्रहांत ज्यांनीं आपल्या पूर्व पंजाबांतील जिल्हे वगळले आहेत अशा मि. एम्. आर्. टी. यांच्या योजनेचा समावेश करतात; परंतु ज्यांनीं सबंध पंजाब प्रांत व ब्रिटिश हिंदुस्थानांतील इतर कांहीं भाग आपल्या योजनेंत समाविष्ट केलेला आहे, त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या योजना या लेखसंग्रहांत वगळण्यांत येतात. आणि मुस्लिम–लीगच्या परराष्ट्रीय उपसमितीनें सर अबदुल्ला हरून यांच्यासारख्या मुस्लिम लीगच्या प्रमुख सदस्याच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या समितीनें आपल्या योजनेंत सबंध पंजाब, अलिगढपर्यंतचा ब्रिटिश हिंदुस्थानांतील मुलुख आणि कांहीं हिंदी संस्थानें यांचा समावेश केला असतां ज. जिना वरील समितीचा निर्णय आणि ती समितीच झिडकारून टाकतात! यावरून मुस्लिम–लीगचे अध्यक्ष पंजाबचे पूर्व जिल्हे वगळलेल्या योजनेला अनुकूल व सबंध पंजाब समाविष्ट केलेल्या योजनेला प्रतिकूल होते, असा निर्णय काढणें अपरिहार्य होऊन बसतें. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां मुस्लिम–लीगच्या अध्यक्षांनीं हिंदुस्थानांतील मुसलमान व मुसलमानेतर जनतेला मोजक्या व निःसंदिग्ध शब्दांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणकोणते प्रांत आणि कोणकोणते जिल्हे वायव्य–विभागांत समाविष्ट करण्याची कल्पना होती, हें अधिकृतपणें सांगणें अत्यावश्यक ठरतें. परंतु, एप्रिल १९४४ पर्यंत पंजाबांतील मुसलमानेतर मंत्र्यांनीं पाकिस्तान–योजनेचा विचार करण्यासाठीं त्याच्या तपशिलाची मागणी करूनसुद्धां ज. जिना हा खुलासा करण्यास एकसारखा नकारच देत राहिले. पण जेव्हां श्री. राजगोपालाचारी यांनीं राज्य-घटनाविषयक आणि राज्यकारभारविषयक कागदोपत्रीं वापरण्यांत येणाऱ्या सुबोध

आणि सुस्पष्ट शब्दांत पाकिस्तानला भरीव स्वरूप दिलें तेव्हां, व म. गांधी-बरोबर झालेल्या मुलाखतींत आणि वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीचे वेळीं ज० जिना यांना असें जाहीर करणें भाग पडलें कीं, लाहोर–ठरावांत जे मुस्लिम–विभाग कल्पिलेले आहेत, त्यांत सध्यांच्या प्रांतांचा जशाच्या तसा समावेश करावयाचा असून जिल्हावार समावेश त्यांत करावयाचा नाहीं. याचा अर्थ असा कीं, वायव्य–विभागांत सर्व पंजाब प्रांताचा आणि पूर्व–विभागांत सबंध बंगाल आणि सबंध आसाम या प्रांतांचा समावेश त्यांना करावयाचा होता. सबंध पंजाब समाविष्ट करण्याच्या कल्पनेला स्वतः अध्यक्षांच्याच शब्दांनीं कसा हरताळ फांसला जातो, तें आपणच पाहिलेंच आहे.

आतां आपण पूर्व विभागाकडे वळूं. बंगालची एकूण लोकसंख्या ६,०३,-०६,५२५ आहे. त्यापैकीं मुसलमान ३,३०,०५,४३४ किंवा ५४·७३ टक्के आहेत. आसामची एकूण लोकसंख्या १,०२,०४,७३३ असून त्यांत ३४,-४२,४७९ किंवा ३३·७३ टक्के मुसलमान आहेत. लाहोर–ठरावाच्या अधि-प्रेत अर्थाचा हवाला देऊन पूर्वेकडील मुस्लिम विभागांत हे दोन्ही प्रांत सबं-धच्या सबंध समाविष्ट करण्याचा जो दावा हल्लीं करण्यांत येत आहे, तो मान्य केल्यास अशी परिस्थिति निर्माण होते कीं, दोन्ही प्रांतांच्या मिळून ७,०५,-११,२५८ इतक्या लोकसंख्येपैकीं ३,६४,४७,९१३ किंवा ५१·६९ टक्के इतकें मुसलमानांचें प्रमाण होईल. मुसलमानांची लोकसंख्या ७५ टक्के भरेल असें जिनांनीं मि० चॅप्मन् यांना सांगितलें, तें अर्थातच अवास्तव आहे. जरी बंगाल आणि आसामधील मुसलमानेतर बहुसंख्य असलेले जिल्हे वगळून मुस्लिम बहुसंख्य असलेल्या जिल्ह्यांचा समावेश केला, तरी मुस्लिम लोकसंख्येचें प्रमाण ६८–६९ टक्क्यांहून अधिक भरणार नाहीं. 'हिंदुस्थानच्या भावी घटनेसंबंधींचा प्रश्न' या पुस्तकांत उद्धृत केलेल्या लेखांत ३४ व्या पानावर मि, एम्. आर. टी. यांनीं पूर्व विभागासंबंधीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे :
"बंगालमध्येंसुद्धां पंजाबप्रमाणें सरहद्दींची पुनर्रचना केली, तर मुसलमान लोक-संख्येचें प्रमाण ८० टक्क्यांपर्यंत वाढेल. सध्यां पूर्व बंगाल आणि पूर्व बंगालच्या

लगतचे गोलपारा आणि सिल्हेट हे पश्चिम बंगाल्यांतील जिल्हे मिळून मुसलमानांचें ७५ टक्क्यांइतकें घसघशित बहुमत होतें. ही सर्व मुसलमान लोकसंख्या एकत्र करून पूर्वबंगाल आणि आसाम यांचा एक प्रांत बनविला, तर एकंदर ४ कोटी लोकसंख्येंत मुसलमानांची ८० टक्क्यांइतकी कायमची बहुसंख्या बनेल." मि. एम्. आर. टी. यांनीं दिलेले आंकडे चुकीचे आहेत हें पुढें दिसेलच. परंतु सबंध बंगाल आणि सबंध आसाम यांचा एक मुस्लिम पूर्वविभाग तयार करावयाचा अशी त्यांची कल्पना नसून त्यांत फक्त मुस्लिम बहुसंख्य असलेल्या भागाचा समावेश त्यांना करावयाचा आहे असें दिसतें. हरून–समितीच्या सूचनेप्रमाणें ईशान्य विभागांत हल्लींचे आसाम आणि बंगाल (बंकुरा आणि मिदनापूर जिल्हे वगळून) हे प्रांत, आणि बिहारमधील पूर्णिया जिल्ह्याचें वांशिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या बंगालशीं साधर्म्य असल्यामुळें तो जिल्हा, यांचा समावेश करावयाचा आहे. या समितीनेंसुद्धां बंगालमधील कांहीं जिल्हे वगळलेले आहेत. यावरून वायव्य–विभागासंबंधीं लीगची मागणी बदलली आहे एतत्संबंधीं जें सांगितलें, तेंच पूर्व–विभागालाहि तितक्याच अर्थानें लागू पडतें.

## २६. ठरावाचें पृथक्करण

लाहोर–ठरावांतील शब्द अस्पष्ट व संदिग्ध असल्यामुळें पूर्व आणि वायव्य विभागांत कोणत्या प्रदेशांचा समावेश करावयाचा यासंबंधीं निरनिराळे अर्थ कसे निघूं शकतात, हें आपण पाहिलेंच आहे. पाकिस्तानबाबतच्या योजनेचा मुसलमान व मुसलमानेतरांनीं समजूतदारपणानें व सम्यक् विचार करावा अशी इच्छा असेल, तर एक सुस्पष्ट, तपशीलवार आणि निश्चित अशी योजना मांडणें आवश्यक ठरतें. तथापि, आपल्याला येथें लाहोर–ठरावांतील शब्दांचा नेहमींचा आणि नैसर्गिक अर्थ लावून तो ठराव पास करण्यामागें मुस्लिम–लीगची काय इच्छा होती, कोणतें उद्दिष्ट होतें, याचा विचार करावयाचा आहे. म्हणून आपण त्याचें पृथक्करण करूं या.

ठरावाचे तीन भाग पडतात. पहिल्या विभागांत हिंदुस्थान–सरकारच्या १९३५ च्या कायद्यांतील संयुक्त राज्याची योजना या देशांतील विशिष्ट परिस्थितींत संपूर्णपणें गैरलागू असून मुस्लिम–हिंदुस्थानला तिचा स्वीकार करणें कदापि शक्य नाहीं, असें पुन्हां एकवार सांगितलें आहे. दुसऱ्या भागांत, व्हाइसरॉय यांनीं बादशाही सरकारच्या वतीनें १८ ऑक्टोबर १९३९ ला केलेल्या घोषणेबद्दल समाधान व्यक्त करून असें बजावण्यांत आलें आहे कीं, सबंध राज्यघटनात्मक योजनेचा पहिल्यापासून नव्यानें विचार केल्याखेरीज आणि तिला मुसलमानांची संमति व मान्यता मिळवलेली असल्याखेरीज मुस्लिम–हिंदुस्थानचें समाधान होणार नाहीं. हे दोन्ही भाग ब्रिटिश सरकारला उद्देशून आहेत व संकल्पित राज्यघटनात्मक योजनेसंबंधींची लीगचीं मतें यांत व्यक्त झालेलीं आहेत. आपल्या प्रस्तुतच्या चर्चेंत त्यांचें महत्त्व इतकेंच कीं, ज्या तिसऱ्या भागांत हिंदुस्थानांतील वायव्य आणि पूर्व विभागांत स्वतंत्र मुस्लिम–राज्यांच्या निर्मितीबाबत ऊहापोह केलेला आहे, त्या भागाची पार्श्वभूमि म्हणून त्यांचा उपयोग होण्यासारखा आहे.

पहिल्या परिच्छेदांतील तिसऱ्या भागांत पुढील मत विचारपूर्वकपणें व्यक्त केलेलें आहे: "पुढें दर्शविलेल्या मूलभूत तत्त्वानुसार जी योजना आंखण्यांत आलेली नसेल, तिची अंमलबजावणी या देशांत होणें व तिचा स्वीकार मुसलमानांकडून होणें अशक्य आहे. हिंदुस्थानच्या वायव्य व पूर्व विभागांप्रमाणें ज्या विभागांत मुसलमानांची बहुसंख्या असेल व जे विभाग भौगोलिक दृष्ट्या सलग असतील ते वेगळे काढण्यांत यावेत. असें करतांना त्यांच्यांत जरूर ते प्रादेशिक फेरफार करण्यांत यावेत व त्यांचा स्वतंत्र राज्यांचा गट बनविण्यांत येऊन या गटांतील विभागांना सार्वभौमत्वाचे अधिकार असावेत."

दुसऱ्या परिच्छेदांत असें म्हटलें आहे कीं, अल्पसंख्याकांच्या धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, राज्यकारभार–विषयक आणि इतर हक्कांचें आणि हितसंबंधांचें संरक्षण करण्यासाठीं मुस्लिम व मुस्लिमेतर विभागांतील अल्पसंख्याकांशीं विचारविनिमय करून राज्यघटनेमध्यें योग्य, प्रभावी आणि बंधनकारक संरक्षक बंधनें स्पष्टपणें सांगितलेलीं असावींत.

तिसऱ्या परिच्छेदानें मुस्लिम–लीगच्या वर्किंग कामिटीला वरील पायाभूत-तत्त्वांच्या आधारें एक राज्यघटनेचा आराखडा तयार करण्याचा अधिकार दिलेला आहे. या घटनेंत, निरनिराळ्या विभागांनीं संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, वाहतुक आणि यासारखेच इतर आवश्यक ते अधिकार आपल्याकडे घ्यावेत, अशी तरतूद केलेली असावी.

परंतु यानंतर पुढील प्रश्न उद्भवतात: (अ) राज्यघटना कोणी तयार करावयाची ? (ब) या राज्यघटनेचें स्वरूप काय राहणार ? आधिदैविक, लोकशाही-प्रधान, वरिष्ठवर्गीय, कीं हुकूमशाही पद्धतीची ? (क) या स्वतंत्र राज्याचे ब्रिटिश साम्राज्याशीं आणि मुसलमानेतर विभागांशीं कोणते संबंध राहणार ? (ड) वरील अनुल्लंघनीय संरक्षक बंधनांपैकीं एकादें बंधन मोडलें गेलें, तर तीं संरक्षक बंधनें कोण, कशीं व कोणत्या सामर्थ्यावर विसंबून अमलांत आणील ? (इ) मुस्लिम–राज्यांत कोणत्या प्रदेशांचा समावेश होईल ? (फ) त्यांची साधन-सामग्री आणि त्यांचा दर्जा कोणता राहील ? (ग) घटनासमितीची बैठक भरून स्वतंत्र राज्यांनीं सत्ता हातांत घेईपर्यंतच्या संक्रमणकाळांत संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, वाहतुक, जकाती आणि यासारख्या इतर बाबी कुणाच्या ताब्यांत राहणार ?

मुस्लिम–विभागांत कोणते प्रदेश समाविष्ट होणार या प्रश्नाव्यतिरिक्त जे हे इतर प्रश्न आहेत त्यांच्या दृष्टीनें या ठरावाचा अर्थ कोणता, हें नीट समजून घेणें आवश्यक आहे. कारण लाहोर–ठराव मान्य केलाच पाहिजे असा ज. जिनांचा आग्रह आहे.

(अ) राज्यघटना कुणी तयार करावयाची ?:–ठरावाचा आराखडा आणि नव्या राज्यघटनेच्या योजनेसंबंधींचा उल्लेख ध्यानांत घेतां, ब्रिटिश पार्लमेंटनें केलेला १९३५चा कायदा लीगनें अमान्य केलेला असूनसुद्धां, प्रस्तुत घटना ब्रिटिश पार्लमेंटनेंच तयार करावयाची आहे. घटना तयार झाली म्हणजे तिला रुकार आणि मान्यता मिळण्यासाठीं ती मुसलमानांना स्वीकारार्ह वाटली पाहिजे असें असूनसुद्धां ती तयार करतांना मात्र हिंदी लोकांना, किंबहुना मुसलमानांनासुद्धां, कांहींहि भाग घेतां येणार नाहीं. क्रिप्स्–योजनेमध्येंसुद्धां हिंदी लोकांचा घटना

बनविण्याचा अधिकार निःसंदिग्ध शब्दांत मान्य केलेला असल्यामुळें ठरावाचा हा भाग मान्य केला असता, तर आपल्याला–क्रिप्स् योजनेपेक्षांहि कमी पत्करावें लागलें असतें. ब्रिटिश सरकारच्या इतर अधिकाऱ्यांनींसुद्धां आपल्या निवेदनांतून जो हक्क मान्य केलेला आहे, तो हक्क सुद्धां लीगच्या ठरावांतील हा भाग स्वीकारून सोडून द्यावा, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.,

(ब) संकल्पित राज्यघटनेचें स्वरूप काय राहील? आधिदैविक, लोकसत्ताक, वरिष्ठवर्गीय, कीं हुकूमशाही पद्धतीची?:– या विषयावर ठरावांत कांहींहि सांगितलेलें नाहीं. हिंदुस्थानला लोकशाही पद्धतीचें सरकार गैरलागू आहे असें लीगचें मत आहे आणि कितीएक प्रसंगीं तिच्या अध्यक्षांनीं तें बोलूनहि दाखवलेलें आहे. ज० जिनांच्या भाषणांतील आणि लेखांतील कांहीं नमुनेदार उतारे खालीं दिले आहेत:

"साडेतीन कोटी मतदारांचा विचार केला तर असें आढळून येईल कीं, त्यांच्यापैकीं बहुतेक लोक संपूर्ण अडाणी, अशिक्षित, शेंकडों वर्षें चालत आलेल्या भ्रामक समजुतींखालीं असलेले, सांस्कृतिक दृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या एकमेकांशीं संपूर्ण विरोधी असे आहेत. या घटनेच्या प्रत्यक्ष कार्यावरून पार्लमेंटरी पद्धतीचें लोकशाही सरकार हिंदुस्थानांत चालविणें अशक्य आहे, असें स्पष्टपणें दिसून आलेलें आहे."[1]

"ब्रि. पार्लमेंटच्या सभासदांतसुद्धां हिंदी परिस्थितीबाबत इतकें अज्ञान आहे कीं, पूर्वींचा सर्व अनुभव असूनसुद्धां, या प्रकारचें सरकार हिंदुस्थानला अजिबात चालणार नाहीं याची जाणीव त्यांना अजूनसुद्धां झालेली नाहीं. इंग्लंडसारख्या एकसंधी राष्ट्रावर आधारलेली लोकशाहीची पद्धत हिंदुस्थानसारख्या विस्कळित देशांना कधींहि लागू पडणार नाहीं, या वास्तविक परिस्थितींतून हिंदी राज्यघटनेच्या कटकटी उद्‌भवल्या आहेत....पाश्चिमात्य लोकशाही हिंदु-

---

१. 'ज. जिनांचीं अलीकडील भाषणें व लेख' या पुस्तकांत पृ. ८६ वर उध्दृत केलेलें 'मँचेस्टर गार्डियन'ला केलेलें निवेदन.

स्थानला संपूर्णपणें निरुपयोगी असून ती हिंदुस्थानवर लादल्यानें हिंदी राजकीय जीवनाला ती एक कीड लागलेली आहे."[1]

पाकिस्तानी राज्याचें स्वरूप काय राहणार त्याची स्पष्टपणें व्याख्या करणें आवश्यक आहे; कारण त्यायोगें लोकांना सदरहू राज्याच्या स्वरूपाची छाननी करून तें स्वीकारार्ह आहे कीं नाहीं तें ठरवितां येईल. पाश्चिमात्य पद्धतीची लोकशाही मुस्लिम–लीगला अमान्य आहे, त्याअर्थी दुसरी कोणती पद्धति लीगला योग्य वाटते अगर पाश्चिमात्य पद्धतीच्या लोकशाहींत कोणते फेरफार लीगला करावेसे वाटतात, त्याचें ज्ञान मुस्लिम व मुस्लिमेतर विभागांतील अल्पसंख्याकांप्रमाणेंच बहुसंख्याकांनाहि असणें आवश्यक आहे. हिंदुस्थानांतील एकूण लोकसंख्येपैकीं मुसलमानांचें प्रमाण बरेंच मोठें असल्यामुळें हिंदी जनता एकजिनसी नाहीं या सबबीवर पाकिस्तानचे प्रवक्ते लोकशाहीला नकार देतात. पण मुस्लिम–विभागांची फाळणी केल्यानंतर त्या विभागांतील हिंदू आणि इतर बिगर–मुसलमानांचें प्रमाण कांहीं झालें तरी हल्लीं अखंड हिंदुस्थानांत मुसलमानांचें जें प्रमाण आहे त्याहून कमी भरणार नाहीं; त्याअर्थीं फाळणी केल्यानें वर दिलेली कारणमीमांसा संपुष्टांत येत नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा २६·८३ टक्के आहे. मुसलमानी वायव्य विभागांत संबंध पंजाबचा समावेश केला, तर त्या विभागांतील मुसलमानेतरांचें प्रमाण ३७·९३ टक्के होईल; आणि मुसलमानेतर बहुसंख्य असलेले पंजाबचे जिल्हे वगळले तर तें प्रमाण २४·६४ टक्क्यांइतकें होईल. याचप्रमाणें पूर्व विभागांतसुद्धां मुसलमानेतर बहुसंख्य असलेले जिल्हे समाविष्ट केले तर बिगर–मुसलमानांचें प्रमाण ४८·३१ टक्के होईल आणि ते जिल्हे वगळले तर तें ३०·५८ टक्के होईल. हिंदुस्थानांत मुसलमान अल्पसंख्य आहेत म्हणून हिंदुस्थानला लोकशाही अयोग्य आहे असें म्हटलें, तर पाकिस्तानांत ही परिस्थिति उलट होऊन मुसलमान बहु-

---

१. लंडनच्या 'टाइम् अँड टाइड्'मध्यें १९ जानेवारी १९४० ला लिहिलेला लेख. सदरहू लेख 'ज. जिना यांचीं अलीकडील भाषणें व लेख' या पुस्तकांत पृ. १११–११३ वर उध्दृत केला आहे.

संख्य व मुसलमानेतर अल्पसंख्य झाले तर लोकशाही योग्य होईल, असें म्हणणें कोणत्याहि दृष्टीनें तर्कशुद्ध अगर न्याय्य ठरणार नाहीं. अर्थात् ज्याअर्थी मुस्लिम लीगचे अध्यक्ष हिंदुस्थानला लोकशाही अयोग्य आहे असें म्हणतात, त्याअर्थी निश्चितपणें असा निर्णय काढतां येईल कीं पाकिस्तानलासुद्धां ती तितकीच अयोग्य आहे आणि होईल. अर्थातच दुसऱ्या कोणत्या तरी पद्धतीची राज्य-घटना त्यांच्या मनांत असावी. मग अशा राज्यघटनेचें स्पष्ट स्वरूप सर्व संबं-धित लोकांना कां दिलें जाऊं नये ? म्हणजे तिच्या गुणावगुणांचें मोजमाप करून निदान उघड्या डोळयांनीं तरी तिचा स्वीकार करतां येईल !

(क) या स्वतंत्र मुस्लिम–राज्यांचा ब्रिटिश साम्राज्याशीं आणि बिगरमुस्लिम विभागांशीं कोणता संबंध असेल ?:—त्यांचा मुसलमानेतर विभागांशीं कांहींहि संबंध असणार नाहीं हें स्पष्ट आहे; परंतु ब्रिटिश साम्राज्यापासून तीं विभक्त होतील किंवा काय हें मात्र स्पष्ट नाहीं. तीं राज्यें ब्रिटिश साम्राज्यापासून विभक्त होणार असतील, तर त्यांची राज्यघटना करण्याची विनंति ब्रिटिश पार्ले-मेंटला करण्यांत अगर त्याच्याकडून तशी अपेक्षा बाळगण्यांत कांहींहि अर्थ नाहीं. तिसऱ्या भागांतील तिसऱ्या परिच्छेदावरून अगदीं सुरवातीला तरी संपूर्ण स्वातंत्र्य गृहीत धरलेलें नाहीं हें स्पष्टपणें निदर्शनास येतें. संपूर्ण स्वातंत्र्याच्या अगो-दर कांहींतरी संक्रमणावस्था राहील; त्या कालांत संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, वाह-तुक, जकाती आणि यासारख्या गोष्टींचे अधिकार दुसऱ्या कुठल्या तरी सत्तेच्या हातीं असणार आहेत. मध्यंतरींच्या कालांत कोणतीहि हिंदी सत्ता निर्माण केली तरी त्यांत हिंदू बहुसंख्य राहणार असल्यामुळें हे अधिकार मध्यवर्ति सरकारच्या हातीं देण्याची कल्पना ज्याअर्थी लीगनें धुडकावून लाविली आहे, त्याअर्थी या मध्यंतरांत ते अधिकार ब्रिटिश सरकारच्या हातीं असणार हें सरळच आहे. ठरावाच्या तिसऱ्या भागाच्या तिसऱ्या परिच्छेदांतील "शेवटीं" हा शब्दच असें सुस्पष्ट करतो कीं, या स्वतंत्र राज्यांचें स्वातंत्र्य सुरवातीला मर्यादित स्वरूपाचें असणार आहे. या स्वतंत्र राज्यांची संस्थापना आणि त्यांच्याकरवीं सर्व सत्तेचें ग्रहण या दोन गोष्टींमध्यें संक्रमणकाल लोटणें आवश्यक आहे. तो काल किती

असणार हें सूचित केलेलें नाहीं; हा काल किती असणार हें अर्थातच त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून आहे आणि जेव्हां तो ठराव पास केला त्या वेळीं या परिस्थितीची कल्पना करणें अशक्यच होतें. यावरून स्वातंत्र मुस्लिम राज्यांचा सुरवातीचा दर्जा वेस्ट्मिन्स्टर कायद्याप्रमाणें ब्रिटिश कॉमनवेल्थमधील वसाहतींच्या दर्जापेक्षां कमी राहणार आहे. आणि ब्रिटिश नियंत्रणापासून त्यांना मुक्त व्हावयाचें आहे कीं नाहीं, तें सुद्धां स्पष्ट झालेलें नाहीं. येथें सांगितलेला अर्थ निराधार नाहीं हें ज० जिनांनीं लंडनच्या 'न्यूज कॉनिकल'ला दिलेल्या मुलाखतीवरून दिसून येईल. ही मुलाखत ४ मार्च १९४४च्या 'अमृतबझार पत्रिकें'त प्रसिद्ध झालेली आहे:

प्रश्न : अंतर्गत यादवीयुद्ध होईल हें निश्चित आहे. तुम्ही जें हिंदी अल्स्टर निर्माण करीत आहां, त्यावर अखंड हिंदुस्थानच्या नांवानें हिंदू लोक स्वारी करतील.

ज० जिना : हें मला पटत नाहीं. नव्या राज्यघटनेप्रमाणें स्थिरस्थावर करण्यासाठीं एक संक्रमणकाल येईल; या कालांत परराष्ट्रीय संबंध आणि सैन्य या बाबतींत ब्रिटिश सत्ता सार्वभौम राहील. हीं दोन राष्ट्रें आणि ग्रेट ब्रिटन नवी राज्यघटना ज्या वेगानें प्रस्थापित करतील, त्यावर संक्रमणकालाची मर्यादा अवलंबून राहील.

प्रश्न : शेजारी शेजारी म्हणून एकत्र राहण्याइतके हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्यामधील संबंध चांगले नाहींत, या सबबीवर ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडण्यास नकार दिला तर काय होईल?

ज० जिना : हें शक्य आहे, परंतु संभवनीय नाहीं. आणि असें जरी झालें तरी आम्हांला कांहीं प्रमाणांत स्वायत्तता मिळेल; तशी स्वायत्तता आम्हांला आतां मुळींच नाहीं. हल्लींच्या पेंचप्रसंगामुळें आम्हांला ब्रिटिश सरकारशीं तडजोड करतां येत नाहीं. एक वेगळें वसाहतींचें राज्य या नात्यानें आमची परिस्थिति सुधारेल आणि तशी तडजोड करणें आम्हांला शक्य होईल.

जातां जातां वर उद्धृत केलेल्या वाक्यांतील 'वसाहतीचें राज्य' हा शब्दप्रयोग

बरोबर नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. संक्रमणकालांत पाकिस्तानमध्यें परराष्ट्रीय संबंध आणि सैन्य या बाबतींत ब्रिटिश सत्ता सार्वभौम राहील. परंतु ब्रिटिश वसाहतींत ब्रिटिश सत्ता सार्वभौम नसून वसाहतींचें सरकारच सार्वभौम असतें.

वरील संदर्भानें पाहूं लागलें तर 'स्वतंत्र राज्य' या शब्दाचा अर्थ 'आतांच्या आतां ताबडतोब वसाहतीचें स्वराज्य' असा सुद्धां होणार नाहीं; मग ब्रिटिश नियंत्रणापासून संपूर्ण स्वातंत्र्य अगर त्या विभागांतील जनतेला सर्व सत्ता मिळेल, असा अर्थ तर दूरच राहिला. उरलेल्या हिंदुस्थानला जरी ब्रिटिश नियंत्रणापासून संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें, तरी त्या स्वतंत्र देशाला ब्रिटिशांचें नियंत्रण असलेल्या विभागांशीं संबंध ठेवावाच लागेल; त्यांत मुसलमान बहुसंख्य असतील येवढाच काय तो फरक राहील. हे प्रदेश स्वतंत्र हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचे बालेकिल्लेच बनतील. खरें म्हटलें तर त्यांना बाकीच्या हिंदुस्थानपासून विभक्त व्हावयाचें आहे, ब्रिटिश साम्राज्यापासून नाहीं. निदानपक्षीं, सुरवातीच्या कालांत तर नाहींच नाहीं.

फाळणीमुळें निर्माण झालेल्या नवीन राज्यांच्या दर्जाबाबत ज० जिनांच्या निवेदनांतील आणखी एक उतारा मी देतों. लाहोर–ठराव पास झाल्यानंतर १ एप्रिल १९४० रोजीं वृत्तपत्रांना दिलेल्या निवेदनांत पुढील उतारा आढळतो:

मुसलमानांच्या मातृभूमीचा ग्रेट ब्रिटनशीं काय संबंध असेल, हें सांगतांना ज० जिनांनीं लाहोर–ठरावाचा उल्लेख करून म्हटलें होतें कीं, "उरलेल्या हिंदुस्थानचे जे विभाग होतील, त्यांचा–आमचा संबंध आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा राहील. यासाठीं हिंदुस्थानचा हल्लीं सिलोन व ब्रह्मदेशाशीं जो संबंध आहे तो उदाहरणादाखल घेतां येईल." यावरून हें उघड आहे कीं, केवळ पाकिस्तानच नव्हे, तर हिंदुस्थानसुद्धां ब्रिटिश साम्राज्याचाच एक भाग राहावा अशी त्यांची कल्पना दिसते. या दोन राज्यांचा परस्परसंबंध हिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि सिलोन यांच्या हल्लींच्या संबंधांप्रमाणेंच असेल; आणि ब्रिटिश सरकारशींसुद्धां हल्लींसारखाच त्यांचा संबंध राहील.

---

१. मि. एम्. आर्. टी.: हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेचा प्रश्न, पृ. ३१.

ज० जिनांनीं आपल्या मुलाखतींत सैन्य आणि परराष्ट्रीय संबंध यांचाच उल्लेख केला; परंतु ठरावांत 'वाहतुक, जकाती आणि यासारख्या आवश्यक गोष्टी' यांचा निर्देश आहे. बाकीच्या हिंदुस्थानला यांपैकीं कसल्याहि बाबतींत सत्ता असणार नाहीं; आणि त्या मध्यन्तरांत या बाबतींत मुस्लिम–विभाग सत्ताग्रहण करणार नाहींत, यावरून हेंच अनुमान निघतें कीं "वाहतुक, जकाती आणि यांसारख्या इतर आवश्यक बाबतींत "सुद्धां ब्रिटिश सार्वभौमत्व कायम राहील. यामुळें ब्रिटिशांची सत्ता फार व्यापक क्षेत्रावर पसरेल. आणि कांहीं बाबतींत तर १९३५ च्या हिंदुस्थानसरकारच्या कायद्यान्वयें प्रांतिक सरकारांना जेवढे अधिकार होते, त्यापेक्षांहि कमी सत्ता या मुस्लिम–विभागांना राहणें असंभवनीय नाहीं.

स्वतंत्र मुस्लिम–राज्यांत व उरलेल्या हिंदुस्थानमध्यें दोन स्वतंत्र देशांतल्या प्रमाणें तह होईल असें म्हटलें आहे. परंतु मुस्लिम–विभागांत परराष्ट्रीय बाबतींत जर ब्रिटिशांचें सार्वभौमत्व कायम राहणार असेल, तर या विभागांच्या सरकारला उरलेल्या हिंदुस्थानशीं तह कसा करतां येणार ? तह झालाच तर तो बाकीचा हिंदुस्थान आणि ब्रिटिश सत्ता यांच्यामध्यें होईल. किंवा जास्तींत जास्त हल्लीं ज्याप्रमाणें हिंदुस्थान–सरकार अफगाणिस्तानशीं तह करूं शकतें, त्याप्रमाणें ब्रिटिश अंमलाखालील मुस्लिम–विभाग ब्रिटिशांच्या सूचनांप्रमाणें उरलेल्या हिंदुस्थानशीं तह करूं शकतील.

(ड) अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठीं असलेल्या संरक्षक बंधनांपैकीं एकाद्याचा भंग झाला तर तीं संरक्षक बंधनें कोण आणि कोणत्या सामर्थ्याच्या जोरावर अमलांत आणील ?:—मुस्लिम–लीगच्या ठरावांत यासंबंधीं अवाक्षरहि काढलेलें नाहीं. मुस्लिम आणि मुस्लिमेतर राष्ट्रांचा एकमेकांशीं कांहींहि संबंध नसल्यामुळें व दोघांनाहि समान अशी कोणीहि मध्यवर्ति सत्ता अस्तित्वांत नसल्यामुळें कायद्याच्या अगर राज्यकारभाराच्या साह्यानें या अनुल्लंघनीय तरतुदी प्रत्यक्ष अंमलांत आणण्यास कोणतीच सत्ता उरणार नाहीं. या संरक्षक अटी पाळल्या गेल्या नाहींत, तर एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध

केलेल्या शत्रुत्वाच्या कृत्यासारखीच ही गोष्ट होईल; व मित्रत्वाची तडजोड घडून आली नाहीं, तर आंतरराष्ट्रीय कलह ज्या पद्धतीनें मिटविले जातात त्याच पद्धतीनें, म्हणजे वकिलातीमार्फत अथवा आंतरराष्ट्रीय लवादामार्फत ते प्रश्न मिटवावे लागतील.

अशा प्रसंगीं एका देशांतील अल्पसंख्याक दुसऱ्या स्वतंत्र राष्ट्रांतील आपल्या बांधवांची मदत घेऊं शकतील काय? निदानपक्षीं, तशी मदत घेणें सुलभ होईल काय? हिंदुस्थानांतून निर्माण केलेलीं मुसलमानी राष्ट्रें हींच काय ती सबंध जगांतील मुसलमानी राष्ट्रें आहेत असें नव्हे. हिंदुस्थानच्या शेजारीं दुसरींहि कांहीं मुसलमान–राज्यें आहेत. हिंदुस्थानांत मुसलमान–अल्पसंख्याकांना आपल्यावर झालेल्या जुलमाविरुद्ध या मुस्लिम राष्ट्रांकडे दाद मागणें आतांपर्यंत कधींहि शक्य झालें आहे काय? काँग्रेस–मंत्रिमंडळांनीं मुसलमानांचा छळ केल्याच्या कथेंत कांहीं तथ्य असेल आणि त्या छळामुळें नवीं मुसलमान–राज्यें निर्माण करण्यासाठीं योग्य तें समर्थन मिळूं शकत असेल, तर हल्लींच्या मुस्लिम–राज्यांना त्याविरुद्ध हस्तक्षेप जरी नाहीं, तरी राजनैतिक मार्गांनीं निदान निषेध करण्यास पुरेसें सबळ कारण मिळालें असतें. विशेषतः, मुसलमान लोक कोठेंहि रहात असोत, केवळ त्यांच्या धर्मामुळें, इतर कोणत्याहि गोष्टी लक्षांत न घेतां, त्यांचें एक राष्ट्र होऊं शकतें हा युक्तिवाद खरा असेल, तर वरीलप्रमाणें निषेध अवश्य व्हावयास हवा होता! मुस्लिम–अल्पसंख्याकांनीं अशी मदत मिळविण्याचा प्रयत्न तरी केला होता काय? स्वतंत्र राष्ट्रांमध्यें कोणतीहि गोष्ट समान राहूं शकत नसल्यामुळें, पाकिस्तानमध्यें बिगर–मुसलमानांवर जुलूम करण्यांत आला, तर हिंदुस्थानला हस्तक्षेप करणें अशक्य जरी नसलें, तरी अतिशय अवघड जाईल. उलटपक्षीं, हिंदुस्थानांतील मुसलमान–अल्पसंख्याकांच्या बाजूनें हस्तक्षेप करणें पाकिस्तानलाहि तितकेंच अवघड होऊन बसेल.

युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांमधील अल्पसंख्याकांना राष्ट्रसंघाच्या हमीमुळें मिळालेल्या अल्पसंख्याकांच्या तहनाम्यांनुसार जीं संरक्षणें मिळालीं होतीं, त्यासंबंधीं त्यांना कोणते अनुभव आले, ते येथें नमूद करणें उपयुक्त होईल.

"सर्वसामान्यपणें बोलायचें झालें, तर अल्पसंख्याकांच्या नशिबांत हालच होते. त्याला नव्या व जुन्या राज्यांतून कांहीं अपवाद आढळतील; परंतु जवळजवळ प्रत्येक देशांत अल्पसंख्याकांबाबतच्या तहनाम्यांना उघड उघड धुडकावून लावण्यांत आल्यामुळें अल्पसंख्याकांना छळ सोसावा लागला. आणि या छळाबद्दल त्या राष्ट्रांना प्रत्यक्षपणें कांहींसुद्धां भुर्दंड बसला नाहीं. कांहींहि असो; अल्पसंख्याकांचे बाबतींत राष्ट्रसंघाकडून मिळालेली ही हमी बेभरंवशाची ठरलेली आहे हें नाकारणें शक्य नाहीं. दुःखाची गोष्ट अशी कीं, राष्ट्रसंघानें परिणामकारक हस्तक्षेप केल्याचें अत्यंत विरळा असून जेव्हां असा हस्तक्षेप केला तेव्हांसुद्धां अल्पसंख्याकांना न्याय मिळावा या हेतूपेक्षां इतर गोष्टीच विचारांत घेतल्या गेल्या होत्या."[१]

पाकिस्तान आणि हिंदुस्थान या दोन स्वतंत्र देशांत अल्पसंख्याकांना चांगली वागणूक मिळावी म्हणून पुढील मुद्दा सुचविण्यांत आला आहे: "वस्तुतः हिंदुस्थान आणि मुस्लिम–राज्यें या दोहोंतहि अल्पसंख्याक असल्यामुळें उभय राष्ट्रांना समान धोरण आंखतां येऊन अल्पसंख्याकांमध्यें विश्वास उत्पन्न करतां येईल व त्यामुळें अखेरीस आहे त्या परिस्थितींत ते समाधान मानूं लागतील."[२] "हिंदुस्थानची फाळणी केली तर त्या त्या विभागांतील बहुसंख्य लोकांवर अल्पसंख्याकांमध्यें सुरक्षिततेची जाणीव निर्माण करून त्यांचा संपूर्ण विश्वास संपादन करण्याची एक मोठी जबाबदारी येऊन पडेल."[३] बहुसंख्याकांमध्यें अल्पसंख्याकांविषयींच्या जबाबदारीची जाणीव निर्माण करून त्यांनीं अल्पसंख्याकांचा विश्वास संपादन करावयाचा असेल, तर फाळणीची जरुरी नाहीं. खरोखर अशा जबाबदारीच्या जाणीवेची वाढ व्हावयाची असेल, तर त्यासाठीं ऐक्यानेंच अधिक अनुकूल वातावरण निर्माण होईल; आणि फाळणी झालेली असो अगर नसो, ऐक्याची जोपासना करावयास हवी आहे. फाळणीमुळें खरी-

---

१. सी. बी. मॅक्आर्टने : नॅशनल् स्टेट्स् अँड नॅशनल् मायनॉरिटीज् ( १९३४ ), पृ. ३९०. २. मि. एम्. आर्. टी. : उक्त ग्रंथ, पृ. ४१.

३. उक्त ग्रंथ, पृ. ३० वरील जिनांचें भाषण.

खुरी जबाबदारीची जाणीव निर्माण होईल असा वरील उताऱ्याचा अर्थ दिसत नाहीं; तर दुसऱ्या देशांतील बहुसंख्य प्रजेच्या मनावर आपल्या कृत्याचा काय परिणाम होईल यासंबंधीं जी धास्ती फाळणीमुळें निर्माण होणार आहे, तीच धास्ती वरील उताऱ्यांत अभिप्रेत दिसते. अशी धास्ती पुढील दोहोंपैकीं एका कारणामुळें घडून येईल. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राकडून हस्तक्षेप होण्याची भीति वाटून तें आपली वागणूक सुधारील. वर दाखविल्याप्रमाणें याची शक्यता फारच कमी आहे. किंवा आपल्या देशांतील अल्पसंख्याकांना वाईट वागणूक दिली तर दुसरें राष्ट्र त्याचा बदला घेईल, अशा धास्तीनें त्याची वागणूक सुधारेल. याचाच अर्थ असा कीं, एका सरकारच्या हातांतील अल्पसंख्याक दुसऱ्या सरकारच्या सद्वर्तनाची हमी म्हणून ओलीस ठेवलेल्या माणसांप्रमाणें राहतील. व्यवहारांत ही गोष्ट कितपत उपयुक्त होईल त्याची शंकाच आहे. दुसऱ्या एका स्वतंत्र सरकारनें दुराचरण केलें, म्हणून त्या सरकारबरोबर कोणत्याहि प्रकारचा संबंध नसलेल्या व ज्यांनीं स्वतः कोणत्याहि प्रकारचें दुराचरण केलेलें नाहीं अशा नागरिकांचा आपण छळ सुरू करावा, ही कल्पनाच आपल्या न्यायबुद्धीला इतकी घृणास्पद वाटते, कीं पाकिस्तानांत काय किंवा हिंदुस्थानांत काय, या बदला घेण्याच्या धोरणाचा स्वीकार करण्यांत येईल असा संभव दिसत नाहीं. राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांनीं केलेल्या छळाची हकिगत सत्य असती, तर मुसलमानी मंत्रिमंडळांना त्याचा बदला घेणें सहज शक्य झालें असतें. कारण हिंदुस्थान–सरकारच्या कायद्याप्रमाणें सर्व मंत्रिमंडळांना सारखेच अधिकार होते. निदानपक्षीं, मध्यवर्ति सरकारवर दडपण आणून मुसलमान अल्पसंख्याकांचें रक्षण करण्यासाठीं प्रांतिक गव्हर्नरांमार्फत मध्यवर्ति सरकारला आपली सत्ता वापरण्यास त्यांना उद्युक्त करतां आलें असतें. परंतु बदला घेण्याच्या दृष्टीनें, किंवा गव्हर्नरांनीं आपले खास अधिकार वापरावेत म्हणून मुसलमानी मंत्रिमंडळांनीं कांहीं केल्याचें प्रत्ययास आलेलें नाहीं. मुसलमानी मंत्रिमंडळांविरुद्ध मुसलमानेतर अल्पसंख्याकांचीं कांहीं गाऱ्हाणीं नव्हती असाहि प्रकार नव्हता. त्यांच्या तक्रारी खूप गंभीर स्वरूपाच्या होत्या. आणि विधिमंडळांतून व

वृत्तपत्रांतून त्यांना तोंडहि फोडण्यांत आलें होतें. परंतु मुसलमानी मंत्रिमंडळांनीं जीं कृत्यें केलीं, तीं इतर प्रांतांतील मुसलमान—अल्पसंख्याकांच्या संरक्षणार्थ केलेल्या कृत्यांच्याच स्वरूपाचीं होतीं असें कोणीहि म्हटलेलें नाहीं. या सर्वांचा अर्थ इतकाच होतो कीं, छळाबद्दलच्या तक्रारी या न्याय्य नव्हत्या. निदानपक्षीं, मुसलमानी मंत्रिमंडळांनीं त्यांचा बदला घेण्यास प्रवृत्त व्हावें इतक्या तरी त्या खासच गंभीर नव्हत्या. आतां मात्र त्यांची सबब पुढें करून हिंदुस्थानची फाळणी करावी अशी मागणी करण्यांत येत आहे ही गोष्ट निराळी! राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळांकडून ज्या काळीं तथाकथित "अत्याचार व छळ" चालू होते, त्या काळीं वायव्य पूर्व भागांत मुसलमानी मंत्रिमंडळें अधिकारारूढ होतींच. मग आतां तेथें स्वतंत्र मुस्लिम—राज्यें स्थापन केल्यानें अधिक काय साधणार आहे? सबंध हिंदुस्थानपासून तीं अलग पडल्यामुळें त्याचा उलट परिणाम होण्याचा मात्र संभव दिसतो. हिंदुस्थान अखंड ठेवला, तर मुसलमानांना बहुसंख्याक दडपून टाकतील, त्यांना छळतील, या भीतीवरच फाळणीची मागणी आधारलेली आहे. पण हिंदुस्थानांतील लोकसंख्येमध्यें मुसलमानांचें प्रमाण इतकें मोठें असतांना बहुसंख्य हिंदू अशा प्रकारचे अत्याचार जर बेधडक करणार असतील, तर हिंदुस्थानांतील मुसलमानांचें प्रमाण बऱ्याच अंशीं घटल्यावर व त्यामुळें बहुसंख्याकांपासून चांगली वागणूक मिळवण्याच्या बाबतींत ते असमर्थ झाल्यावर हिंदूंचें वर्तन अधिक सुधारेल, अशी आशा करण्यास कोणता आधार आहे? स्वतंत्र मुसलमान—राज्यांना अशा प्रसंगीं हस्तक्षेप करणें अशक्य नसलें, तरी अत्यंत बिकट होणार. त्यामुळें स्वतंत्र राज्यांच्या घटनांमध्यें जीं संरक्षणें दिलेलीं असतील तीं पाळण्याची बहुसंख्य प्रजाजनांची इच्छा असेल अथवा त्यांची अंमलबजावणी करून घेण्याइतकी ताकद अल्पसंख्याकांमध्यें असेल, तरच तीं परिणामकारक ठरतील. न्याय्य व रास्त वर्तन बहुसंख्य हिंदूंकडून होणार नाहीं हा तर गृहीत सिद्धान्त म्हणून मानण्यांत आलेला आहे! हिंदुस्थानांत उरणारे मुसलमान संख्येच्या दृष्टीनें आतांपेक्षांहि दुर्बळ होणार आहेत. राज्यघटनेंतील संरक्षणें अनुल्लंघनीय अशीं समजण्यांत

आली असली, तरी हीं स्वतंत्र राष्ट्रें खऱ्या अर्थानें स्वतंत्र असतील तर त्या संरक्षणांत फेरबदल करण्याचा अधिकार त्यांना राहीलच. आणि त्यांत फेरबदल न करतां तीं राज्यटनेमध्यें तशीच कायम राहूं दिलीं, तरीहि वर दिलेल्या कारणां-स्तव तीं पोकळ ठरण्याचा कसा संभव आहे, तें राष्ट्रसंघानें दिलेल्या संरक्षणाच्या अनुभवांवरूनहि लक्षांत येण्यासारखें आहे.

पुढील पृष्ठावर दिलेल्या कोष्टकांत १९४१ च्या शिरगणतीनुसार ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रांतांमधल्या जातवार लोकसंख्येचा तपशील दिलेला आहे. या कोष्टकाचा अभ्यास केल्यास देशाच्या फाळणीसंबंधीं केलेल्या मागणीचें स्वरूप संपूर्णपणें समजण्यास मदत होईल.

*

## कोष्टक ८.

### ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकसंख्येची जातवार विभागणी व तिचें शेंकडा प्रमाण (आंकडे लाखांत आहेत.)

| प्रांत | ए. लोकसंख्या | स्पृ. हिंदू | अस्पृश्य हिं. | ए. हिंदू | मुस्लिम | ख्रिस्ती | शीख | वन्य | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मद्रास | ४९३·४२ | ३४७·३१ | ८०·६८ | ४२७·९९ | ३८·९७ | २०·४६ | ०·०४ | ५·६२ | ०·३६ |
| | | (७०·४) | (१६·३) | (८६·७) | (७·९) | (४·१) | (०·०) | (१·१) | |
| मुंबई | २०८·५० | १४७·०० | १८·५५ | १६५·५५ | १९·२० | ३·७५ | ०·०८ | १६·१४ | ३·७६ |
| | | (७०·५) | (८·९) | (७९·४) | (९·२) | (१·८) | (०·०४) | (७·७) | |
| बंगाल | ६०३·०७ | १७६·८० | ७३·७९ | २५०·५९ | ३३०·०५ | १·६६ | ०·१६ | १८·८९ | १·७० |
| | | (२९·३) | (१२·२) | (४१·५) | (५४·७) | (०·२८) | (०·०३) | (३·१) | |
| संयुक्तप्रांत | ५५०·२१ | ३४०·९५ | ११७·१७ | ४५८·१२ | ८४·१६ | १·६० | २·३२ | २·८९ | १·११ |
| | | (६२·०) | (२१·१) | (८३·२) | (१५·३) | (०·२९) | (०·४२) | (०·५३) | |
| पंजाब | २८४·१९ | ६३·०२ | १२·४९ | ७५·५१ | १६२·१७ | ५·०५ | ३७·५७ | ... | ३·८९ |
| | | (२२·१) | (४·४) | (२६·५) | (५७·०) | (१·७) | (१३·२) | ... | |
| बिहार | ३६३·४० | २२१·७४ | ४३·४० | २६५·१४ | ४७·१६ | ०·३३ | ०·१३ | ५०·५६ | ०·०६ |
| | | (६१·०) | (११·९) | (७२·९) | (१२·९) | (०·१०) | (०·०४) | (१३·९) | |
| मध्यप्रांत व | १६८·१४ | ९८·८१ | ३०·५१ | १२९·३२ | ७·८४ | ०·५८ | ०·१५ | २९·३७ | ०·८७ |
| वऱ्हाड | | (५८·८) | (१८·१) | (७६·९) | (४·६) | (०·३५) | (०·०९) | (१७·४) | |
| आसाम | १०२·०५ | ३५·३७ | ६·७६ | ४२·१३ | ३४·४२ | ०·४१ | ०·०३ | २४·८५ | ०·२० |
| | | (३४·६) | (६·६) | (४१·२) | (३३·७) | (०·४०) | (०·०३) | (२४·३) | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वायव्य— | ३०·३८ | १·८० | ... | १·८० | २७·८९ | ०·११ | ०·५८ | ... | ०·००१ |
| सरहद्द | | (५·९) | ... | (५·९) | (९१·७) | (०·३६) | (१·९) | ... | |
| ओरिसा | ८७·२९ | ५५·९५ | १२·३९ | ६८·३४ | १·४६ | ०·२८ | ०·००२ | १७·२१ | ०·००६ |
| | | (६४·१) | (१४·१) | (७८·२) | (१·६) | (०·३२) | (०·०) | (१९·७) | |
| सिंध | ४५·३५ | १०·३८ | १·९२ | १२·३० | ३२·०८ | ०·२० | ०·३१ | ०·३७ | ०·०९ |
| | | (२२·९) | (४·२) | (२७·१) | (७०·७) | (०·४५) | (०·६८) | (०·८१) | |
| अजमीर— | ५·८४ | ३·७६ | ... | ३·७६ | ०·९० | ०·०६ | ०·००९ | ०·९१ | ०·११ |
| मेरवाडा | | (६४·५) | ... | (६४·५) | (१५·४) | (०·९९) | (०·१५) | (१५·६) | |
| अंदमान व | ०·३४ | ०·०८ | ... | ०·०८ | ०·०८ | ०·०३ | ०·००७ | ०·११ | ०·०३ |
| निकोबार | | (२४·९) | ... | (२४·९) | (२३·७) | (७.७) | (२·२) | (३२·८) | |
| बलुचिस्तान | ५.०२ | ०·४० | ०·०५ | ०·४५ | ४·३९ | ०·०६ | ०·१२ | ... | ०·००१ |
| | | (७·९) | (०·९) | (८·८) | (८७·५) | (१·२) | (२·३) | ... | |
| कूर्ग | १·६९ | १·०५ | ०·२६ | १·३१ | ०·१५ | ०·०३ | ... | ०·२० | ... |
| | | (६२·१) | (१५·३) | (७७·४) | (८·७) | (२·०) | ... | (११·६) | |
| दिल्ली | ९·१८ | ४·४५ | १·२३ | ५·६८ | ३·०५ | ०·१७ | ०·१६ | ... | ०·१५ |
| | | (४८·४) | (१३·४) | (६१·७) | (३३·२) | (१·९) | (१·७) | ... | |
| पंथ | ०·०५२ | ०·०३७ | ०·००९ | ०·०५ | ०·००३ | ०·००२ | ... | ०·०००१२ | ०·००१ |
| पिप्लोदा | | (७१·२) | (१७·३) | (८९·७) | (४·७) | (४·१) | ... | (०·२२) | |
| एकूण | २९५८·०० | १५०८·९० | ३९९·२० | १९०८·१० | ७९३·९० | ३४·८० | ४१·६० | १६७·१० | १२·४० |
| | | (५१·०) | (१३·५) | (६४·५) | (२६·८) | (१·१९) | (१·४१) | (५·६५) | (०·४२) |

## २७. ठरावाचें पृथक्करण ( पुढें चालू )

### मुसलमानी राज्याच्या सीमा

(इ) [१]मुसलमानी राज्य वा राज्यें यांत कोणत्या प्रदेशांचा समावेश होणार ?:— मुस्लिम-लीगच्या ठरावांत वा लीगच्या कोणत्याहि अधिकाऱ्यानें प्रांतांचे वा त्यांच्या सीमांचें स्पष्टीकरण केलेलें नाहीं. परंतु लीगनें आपल्या ठरावांत मूलभूत तत्त्वाबाबत असा खुलासा केला आहे कीं, हे प्रांत भौगोलिक दृष्टया एकसंधी असावेत आणि त्यांत जरूर ते फेरफार अशा तऱ्हेनें करावेत, कीं त्यांत मुसलमान बहुसंख्य राहतील. उदा० वायव्य टापू व पूर्वेकडील टापू—हे टापू स्वतंत्र राज्यें बनतील अशा तऱ्हेनें एकत्रित करावेत. आणि अशा घटकांना आपआपल्या प्रांतापुरती स्वायत्तता व सार्वभौमत्व असावींत. यांत अमुक एका घटकाचा समावेश करावयाचा किंवा नाहीं हें ठरविण्याचे निकष असे आहेत कीं (१) मुसलमानी राज्यांत समावेश करण्यांत येणाऱ्या दुसऱ्या घटकांशीं हा घटक एकसंधी आहे किंवा नाहीं ? (२) या घटकांत मुसलमान बहुसंख्य आहेत किंवा नाहींत ? (३) पहिल्या दोन गोष्टी ठरविण्यासाठीं जो प्रादेशिक बदल करावा लागेल तो शक्य आहे किंवा नाहीं ? शिवाय या टापूंतील प्रत्येक घटक हा स्वायत्त व सार्वभौम असणार.

मुस्लिम-लीगच्या अध्यक्षांनीं अधिकृतरीत्या सांगितलें आहे कीं, लाहोर-ठरावानें हिंदी संस्थानांचा प्रश्न हाताळलेला नाहीं. त्याबद्दल ज. जिना म्हणतात, “जीं महत्त्वाचीं संस्थानें आहेत, तीं पूर्वेकडील टापूंत नसून वायव्येकडील टापूंत आहेत. उदा० काश्मीर, भावलपूर, पतियाळा इत्यादि. मुसलमानी मायभूमींत येण्याची या संस्थानांची इच्छा असेल, तर त्यांचेबरोबर योग्य व सन्माननीय तडजोड करण्यास आम्ही आनंदानें तयार होऊं. मात्र कोणत्याहि तऱ्हेनें जबरदस्ती करण्याची वा त्यांना धाकदपटशा दाखविण्याची आमची इच्छा नाहीं.”[२] ज० जिनांबरोबर चाललेल्या १९४४च्या सप्टेंबरमधील वाटाघाटी-

---

१. पृ. ३५४ पहा.

२. १ एप्रिल १९४० ला दिलेलें प्रेस स्टेटमेंट्. ‘इंडियाज् प्रॉब्लेम् ऑफ हर फ्यूचर कॉन्स्टिटयूशन्’ या पुस्तकांत हें प्रसिद्ध झालेलें आहे, पृ. ३०.

मध्यें, मूळच्या मागणींत काश्मीरचा समावेश केला आहे किंवा काय हें जाणून घेण्याची इच्छा जेव्हां गांधीजींनीं प्रदर्शित केली, तेव्हां पाकिस्तानमध्यें आम्ही फक्त सिंध, बलुचिस्तान, पंजाब व वायव्य सरहद्द या प्रांतांचाच समावेश करतों असें सांगण्यांत आलें. तेव्हां आपणांस पाकिस्तानच्या सीमा ठरवितांना संस्थानांचा विचार करण्याचें कारण नाहीं.

मुसलमानी विभागांत कोणत्या प्रदेशांचा समावेश करावयाचा याबद्दलचें वाक्य पुष्कळसें गुंतागुंतीचें आहे आणि त्यांतील शब्दयोजना सद्यःकालीन राजकारणांत वा घटनेंत ब्रिटिश सरकारच्या कागदोपत्रीं न आढळणारी अशी आहे. उदा० त्यांत 'घटक,' 'टापू,' 'प्रदेश' हे शब्द वापरले आहेत. यांच्या व्याख्यादेखील लीगनें केलेल्या नाहींत, आणि चालू राजकीय साहित्यांत हे शब्द वापरांत असलेले दिसत नाहींत. सध्यां वापरण्यांत येणारे शब्द 'प्रांत, जिल्हा,' तहशील, तालुका, ठाणा, आदि आहेत. जर ठरावाच्या जनकांना त्याचा अर्थ स्पष्ट माहीत असता आणि असंदिग्धपणें तो इतरांस—मुसलमान, मुसलमानेतर व ब्रिटिश सरकार यांस कळावा अशी त्यांची इच्छा असती, तर पूर्वोक्त शब्द वापरून त्यांना तसें सहज करतां आलें असतें. दुटप्पी शब्दयोजना करून मागण्यांचा तपशील प्रकट करण्याची व त्यांतील अभिप्रेत अर्थ स्पष्ट करण्याची त्यांना इच्छा नसावी ही एक दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यामुळें या योजनेवर लक्ष केंद्रीभूत करणें अशक्य होऊन बसलें असून, अनेक अनधिकृत खुलाशांना त्यामुळें ऊत आलेला आहे. शिवाय, कित्येकांच्या मनांत अशाहि कांहीं शंका उद्भवतात कीं, अशी दुटप्पी भाषायोजना काय म्हणून अवलंबिण्यांत आली? याचा असा तर अर्थ नसेल, कीं फाळणीची मागणी करणाऱ्या या जनकांतच जे मतभेद आहेत ते अनिश्चित रहावेत? त्यांतल्या एका पक्षाचा असा आग्रह आहे कीं, पूर्व व वायव्य विभागांत अत्यंत प्रभावी जरी नव्हे, तरी मोठ्या प्रमाणांत बहुसंख्य अशीं एकजिनसी मुसलमानी राज्यें असावींत व दुसऱ्या पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, जर जास्त प्रदेशाचे तुकडे खिशांत टाकतां येत असतील तर मुसलमानांची बहुसंख्या नाममात्र असली तरी चालेल. कां जन-

दृष्टीस ती पडून त्यांच्या टीकेचा वर्षाव सर्व योजना प्रकट करून आतांच आपल्या अंगावर ओढून घेणें त्यांना अनुचित वाटतें ? मुसलमानी राज्यांत कोणत्या प्रदेशांचा समावेश होईल व कोणत्या प्रदेशांचा होणार नाहीं, हें स्पष्ट करण्याबद्दल येवढे आढेवेढे कां घेण्यांत येत आहेत ? सध्यांच ही योजना अनिश्चित आणि दुटप्पी ठेवल्यास उत्तम आणि योग्य काय आहे, हें नंतर आयत्या वेळीं प्रकट करतां येईल म्हणून कीं काय ? कां, एकदां मुसलमानेतरांनीं फाळणीच्या तत्त्वाला मान्यता दिली म्हणजे सीमा ठरविण्याचे वेळीं त्यांनीं कांहीं प्रश्न उपस्थित केले तर अशा मुसलमानेतरांवर गैरविश्वासू असा शिक्का मारतां यावा म्हणून असें चाललें आहे ? कांहीं का असेना, लीगचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला आहे हें उघड आहे. संपूर्ण ठरावाकडे लक्ष दिल्यास त्यांतील वाक्यांवरून सामान्यतः असाच अर्थबोध होतो कीं, मुसलमान अल्पसंख्य असलेला प्रदेश यांत समाविष्ट करतां येणार नाहींच हें निःसंशय आहे. पण समाविष्ट करण्यांत येणारा टापू मुसलमानांची बहुसंख्या असलेल्या दुसऱ्या टापूशीं सलग आहे कीं नाहीं तेंहि पहावें लागेल. वायव्य व पूर्व विभागांत स्वतंत्र राज्यें अस्तित्वांत येण्यासाठीं ज्या प्रदेशांचा समावेश व्हावयाचा, त्यांना आपण या निकषावर प्रांतवार व जिल्हावार तपासून पाहूं.

## १. वायव्य विभाग

१९४१ च्या शिरगणतीचे आंकडे खालीं दिले आहेत. ( कंसांत शेंकडा प्रमाण दिलें आहे. )

कोष्टक ९.

| सिंध जिल्हे | क्षेत्रफळ चौ.मै. | लोकसंख्या | हिंदूंची संख्या | | मुस्लिम | | हिंदी ख्रिश्चन | | वन्यजाती | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दादू | ७,३७० | ३,८९,३८० | ५८,३७२ | (१४·९९) | ३,२९,१११ | (८४·७४) | ७४ | (०·२६) | १५४ | ७८९ |
| हैदराबाद | ४,४७६ | ७,५८,७४८ | २,४५,८४९ | (३२·४०) | ५,०७,६२० | (६६·९०) | ४९० | (०·६९) | ७६९ | ४,०२० |
| कराची | ८,३५७ | ७,१३,९०० | २,२२,५९७ | (३१·१८) | ४,५७,०३५ | (६४·००) | ११,३१० | (४·८०) | ८८४ | २२,०७४ |
| लारखाना | २,८५७ | ५,११,२०८ | ९१,०६२ | (१७·८१) | ४,१८,५४३ | (८१·८५) | ४९ | (०·३१) | ... | १,५५४ |
| नवाबशहा | ३,९०८ | ५,८४,१७८ | १,४०,४२८ | (२४·०४) | ४,३६,४१४ | (७४·७२) | २१२ | (१·२५) | १,३२६ | ५,७९३ |
| सक्कर | ५,५५० | ६,९२,५५६ | १,९५,४५८ | (२८·२२) | ४,९१,६३४ | (७०·९८) | २७७ | (०·७८) | ५१ | ५,१३६ |
| थरपार्कर | १३,६४९ | ५,८१,००४ | २,४७,४९६ | (४२·५८) | २,९२,०२५ | (५०·२६) | ८०० | (७·१४) | ३३,६३५ | ७,०४३ |
| उत्तर सिंधहद्द | १,९६९ | ३,०४,०३४ | २८,६६४ | (९·४२) | २,७५,०६३ | (९०,४७) | २० | (०·१०) | ... | २८७ |
| एकूण | ४८.१३६ | ४५,३५,००८ | १२,२९,९२६ | (२७·१२) | ३२,०८,३२५ | (७०·७५) | १३,२३२ | (२·१३) | ३६,८१९ | ४६,७०६ |

वरीलपैकीं ' इतर ' या सदरांत शीख ३१,०११ ( ·६८ ), अहिंदी ख्रिश्चन ६,९७७, जैन ३,६८७, पारशी ३,८३८ बौद्ध १११, ज्यू १,०८२ एकूण ४६,७०६ हे जिल्हावार दाखविलेले नाहींत. शेवटच्या तीन सदरांतील लोकसंख्येचें शेंकडा प्रमाण एकत्र दाखविलेलें आहे.

## कोष्टक १०.

| वायव्य सरहद्द प्रांत जिल्हे | क्षेत्रफळ (चौ. मैल) | एकूण लोकसंख्या | हिंदू | मुसलमान | हिंदी ख्रिस्ती | | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हजारा | ३,००० | ७,९६,२३० | ३०,२६७ (३·८०) | ७,५६,००४ (९४·९४) | ३१४ | (१·२५) | ९,६४५ |
| मर्दान | १,०९८ | ५,०६,५३९ | १०,६७७ (२·१०) | ४,८३,५७५ (९५·४६) | ३७६ | (२·४२) | ११,९११ |
| पेशावर | १,५४७ | ८,५१,८३३ | ५१,२१२ (६·०१) | ७,६९,५८९ (९०·३४) | ३,३९७ | (३·६४) | २७,६३५ |
| कोहट | २,७०७ | २,८९,४०४ | १७,५२७ (६·०६) | २,६६,२२४ (९१·९९) | ५९६ | (१·९५) | ५,०५७ |
| बन्नू | १,६९५ | २,९५,९३० | ३१,४७१ (१०·६३) | २,५७,६४८ (८७·०६) | ४६७ | (२·३०) | ६,३४४ |
| डेरा इस्माइल खान | ४,२१६ | २,९८,१३१ | ३९,१६७ (१३·१४) | २,५५,७५७ (८५·७८) | २७६ | (१·०७) | २,९३१ |
| एकूण | १४,२६३ | ३०,३८,०६७ | १,८०,३२१ (५·९४) | २७,८८,७९७ (९१·७९) | ५,४२६ | (२·२६) | ६३,५२३ |

वरील कोष्टकांतील इतर या सदरांत—५७,९३९ (१·९१) शीख, ५,४६३ अहिंदी ख्रिश्चन, २५ बौद्धधर्मीय, ७१ ज्यू, १ जैन, २४ पारशी—एकूण ६३,५२३ यांचा समावेश केला आहे.

## कोष्टक ११.

| बलुचिस्तान जिल्हे | क्षेत्रफळ (चौ. मै.) | एकूण संख्या | हिंदू | मुसलमान | हिंदी ख्रिस्ती | | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्वेटा पिशिन | ५,३१० | १,५६,२८९ | २८,६२९ | १,१३,२८८ | २,२९६ | | १२,०७६ |
| | | | (१८·३२) | (७२·४८) | | (९·१९) | |
| लोरलाय | ७,३७५ | ८३,६८५ | ३,१२९ | ७९,२७३ | ११८ | | १,१६५ |
| | | | (३·७४) | (९४·७३) | | (१·५३) | |
| झोब | १०,४७८ | ६१,४९९ | ४,२८६ | ५५,९८७ | ७८ | | १,१४८ |
| | | | (६·९७) | (९१·०४) | | (१·९९) | |
| बोलन | ४०७ | ६,००९ | ९५० | ४,८१२ | २२ | | २२५ |
| | | | (१५·८१) | (८०·०८) | | (४·११) | |
| चगाओ | १९,४२९ | २९,२५० | १,२०४ | २७,८६४ | १ | | १८१ |
| | | | (४·१२) | (९५·२६) | | (०·६२) | |
| सिबी | ११,४५७ | १,६४,८९९ | ६,४२५ | १,५७,७०६ | ११८ | | ६५० |
| | | | (३·८९) | (९५·६३) | | (०·४६) | |
| एकूण | ५४,४५६ | ५,०१,६३१ | ४४,६२३ | ४,३८,९३० | २,६३३ | | १५,४४५ |
| | | | (८·८९) | (८७·५१) | | (३·६०) | |

वरील कोष्टकापैकीं इतर या सदरांत—११,९१८ (२·३८) शीख, ३,३६९ अहिंदी ख्रिश्चन, ७ जैन, ७५ पारशी, ४३ बौद्धधर्मीय, १९ ज्यू, आणि इतर १४—एकूण १५,४४५ यांचा समावेश केला आहे.

सदरहू कोष्टकांवरून असें दिसून येईल कीं, सिंधमध्यें कोणत्याहि जिल्ह्यांत मुसलमानेतर बहुसंख्य नाहींत. मुसलमानांचें अत्युच्च बहुसंख्य प्रमाण उत्तर-सिंध जिल्ह्यांत शेंकडा ९०·४७ इतकें असून किमान प्रमाण थरपार्कर जिल्ह्यांत शेंकडा ५०·२६ आहे. प्रांतांतील जातवार प्रमाणः मुसलमान शेंकडा ७०·७५, हिंदू शेंकडा २७·१२ व शीख, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, ज्यू आणि वन्य जाती मिळून इतर शेंकडा २·१३ आहे. हा प्रांत बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत व पश्चिम पंजाब याना संलग्न आहे.

तसेंच वायव्य सरहद्द प्रांतांतील सर्वच्या सर्व जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत. त्यांचें सर्वांत जास्त प्रमाण मर्दान जिल्ह्यांत ९५·४६ असून किमान प्रमाण डेरा इस्माईलखान या जिल्ह्यांत शेंकडा ८५·७८ इतकें आहे. प्रांताचें जातवार प्रमाणः मुसलमान ९१·७९, हिंदू ५·९४, शीख १·९१ धरून इतर २·२६ आहे. हा प्रांत सिंध, बलुचिस्तान आणिपश्चिम पंजाब यांना संलग्न आहे.

बलुचिस्तानमध्येंहि सर्व जिल्ह्यांतून मुसलमान बहुसंख्य आहेत. त्यांचें सर्वांत जास्त प्रमाण सिबी जिल्ह्यांत शेंकडा ९५·६३ आणि किमान प्रमाण क्वेट्टा पिशिन जिल्ह्यांत शेंकडा ७२·४८ आहे.

प्रांताचें जातवार प्रमाणः—मुसलमान शेंकडा ८७·५१, हिंदू ८·८९ आणि शीख शेंकडा २·३८ धरून इतर ३·६० असें आहे. हा प्रांतदेखील सिंध, वायव्य सरहद्द प्रांत व पंजाब यांना संलग्न आहे.

तेव्हां वायव्य विभागांत स्वतंत्र मुसलमानी राज्यांत या तीन ब्रिटिश प्रांतांचा समावेश मुस्लिम—लीगच्या लाहोरच्या ठरावान्वयें करतां येण्याजोगा आहे यांत शंका नाहीं.

पंजाबची परिस्थिति भिन्न असल्याचें सोबतच्या १२ व्या कोष्टकावरून दिसून येईल. ( आंकडे १९४१ च्या शिरगणतीचे आहेत. )

या कोष्टकांतील आंकड्यांचें विवरण करण्याआधीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, 'इतर' या सदरांत आदिधर्मी, जैन, पारशी, ज्यू , आणि ज्यांनीं आपला कोठलाच धर्म सांगितला नाहीं अशांचा समावेश होतो. यांपैकीं आदिधर्मी हे

सर्वांत जास्त आहेत. कमिशनरचा रिपोर्ट असा आहे कीं, हे लोक अस्पृश्यांपैकीं आहेत, परंतु त्यांनीं आपण हिंदू आहोंत हें नाकारलें, त्यामुळें त्यांचा हिंदू वा अस्पृश्य यांत समावेश होऊं शकला नाहीं. त्यांची संख्या ३,४३,६८५ किंवा पंजाबच्या शेंकडा १·२१ आहे. जलंदर विभागांत त्यांचें सर्वांत जास्त प्रमाण असून तेथें त्यांची संख्या २,५०,२६७ किंवा त्या विभागाच्या शेंकडा ४·६० आहे. त्या खालोखाल मुलतान व लाहोर विभागांत त्यांची लोकवस्ती अनुक्रमें ६८,६४१ व २०,४८८ आहे. अंबाला व रावळपिंडी विभागांत त्यांची वस्ती फारच थोडी म्हणजे अनुक्रमें २,७९५ व १,५३४ आहे. १९३१च्या शिरगणतीच्या अहवालांत असें नमूद केलेलें आढळतें : सध्यांच्या शिरगणतींतील विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी आहे कीं, चांभार, चुब्रा या अस्पृश्यांनीं हिंदू हें नांव टाकून त्याजागीं आदिधर्मी हें नांव स्वीकारलें आहे. यापूर्वी त्यांचा समावेश हिंदूंमध्यें केला जात असे. १९४१च्या अहवालांतहि असें नमूद केलें आहे कीं, हे आदिधर्मी लोक अस्पृश्य आहेत, पण ते हिंदू म्हणवून घेण्यास तयार नाहींत. अशा तऱ्हेनें गेल्या दोन वेळेस हे लोक गळल्यामुळें तेथील हिंदूंची संख्या रोडावल्यासारखी दिसते.

सिंध, वायव्य सरहद्दप्रांत व बलुचिस्तान या प्रांतांत मुसलमानांची बहुसंख्या पुष्कळ म्हणजे अनुक्रमें शेंकडा ७०·७५, ९१·७९ व ८७·५१ आहे. पंजाबमध्यें त्यांची नाममात्रच बहुसंख्या आहे. कारण तेथील मुसलमान लोकवस्ती शेंकडा फक्त ५७·०६ आहे. शिवाय येथें त्या प्रांतांप्रमाणें सर्वच्या सर्व जिल्ह्यांतून मुसलमान बहुसंख्य आहेत असेंहि नाहीं. उलट, कांहीं जिल्ह्यांत मुसलमानांचेंच प्रमाण फार मोठें आहे. लाहोर–ठरावांत वापरलेला शब्द 'संख्याधिक्य' असा असून संख्याधिक्याच्या प्रमाणाबद्दल कोठेंहि उलगडा केलेला नाहीं. त्यामुळें संख्याधिक्य म्हणजे नाममात्र संख्याधिक कीं आत्यंतिक संख्याधिक्य, याविषयीं वाद करण्यास अवसर मिळतो. फाळणीमागील हेतु विचारांत घेतां असाच निष्कर्ष काढणें क्रमप्राप्त होतें कीं, 'संख्याधिक्य' याचा 'आत्यंतिक संख्याधिक्य' असाच अर्थ त्यांना अभिप्रेत असावा. अलग होण्यांत त्यांचा हाच

हेतु आहे कीं, त्यांच्या इच्छेनुसार विकसित होण्यास त्यांना अवसर मिळावा. याबद्दलचा त्यांचा युक्तिवाद असा आहे कीं, आम्ही एक संपूर्णतया भिन्न असें राष्ट्र आहोंत व धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवन आणि दृष्टिकोन या बाबत आमचे विचार इतर कोणाशींहि मिळतेजुळते नाहींत. अर्थात् जेथें आपण सर्वसत्ताधीश असूं अशी एक मायभू आम्हांला आवश्यक आहे. जर नाममात्र बहुसंख्यत्व असेल, तर मुसलमानांना स्वेच्छेनुसार विकास करण्याची संधी मिळणार नाहीं. कारण तेथें अल्पसंख्य लोक प्रबळ असल्यामुळें ते मुसलमानांशीं एकजीव होण्यास तयार होणार नाहींत. इतकेंच नव्हे, तर आपल्या इच्छेनुसार आपला विकास साधण्याचा जन्मसिद्ध हक्क बजावण्यासाठीं ते सदैव तत्पर असतील. धर्मभिन्नता आणि तदनुषंगानें उद्भवणारी अलग संस्कृति, सामाजिक जीवन व दृष्टीकोन यांमुळें जर नाममात्र संख्याधिक्य असलेल्यांनासुद्धां विभिन्न मायभू असण्याचा हक्क पोंचतो, तर तोच हक्क नाममात्र अल्पसंख्य असलेल्यांना न्याय्यपणें कां पोहोंचूं नये ? हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, वायव्येकडील प्रांतांतील परस्परांतील फरक ध्यानांत घेऊनच लीगच्या ठरावांत असें नमूद केलें आहे कीं, स्वतंत्र राज्यांतील हे घटक आपल्या प्रांतापुरते स्वायत्त व सार्वभौम असतील. एका मोठ्या स्वतंत्र राज्याचा घटक आपल्या प्रांतापुरता सार्वभौम कसा आणि किती प्रमाणांत होऊं शकतो, हा प्रश्न आपण क्षणभर बाजूला ठेवून त्या घटकांतील परस्पर-संबंध कसे राहतील याचा विचार केल्यास प्रत्येक घटकास आपल्या अंतर्गत राज्यकारभासाठीं स्वतःच्या सामग्रीवर अवलंबून रहावें लागेल यांत शंका नाहीं. हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, स्वतंत्र मुसलमानी राज्याची घटना जर लोकशाहीतत्त्वाप्रमाणें म्हणजे जाती-धर्म-वर्ण-निरपेक्ष पद्धतीनें चालणारी व लोकमतानुवर्ति असेल, तर तिला नाममात्र संख्याधिक्याच्या जोरावर केवळ मुसलमानांच्याच कल्पनांप्रमाणें राज्यशकट हांकणें अशक्य नसलें, तरी व्यवहारतः दुर्घट होऊन बसेल. तेव्हां अगदीं न्याय्यपणें असा दावा मांडतां येईल कीं, सांप्रत पंजाब प्रांतांत मुसलमानी लोकसंख्या फक्त ५७ टक्के असल्यानें तो प्रांत लीगच्या

ठरावाच्या कसोटीस उतरत नाहीं. साहजिकच वायव्य-विभागांतील मुसलमानी राज्यांतील एक घटक बनविणें योग्य नव्हे व तें शक्यहि होणार नाहीं. अर्थात् मुसलमानी राज्यांत संपूर्ण प्रांताचा समावेश मुसलमानांचें अत्यधिक संख्याधिक्य असल्यासच करावयाचा असें मानल्यास हाच एक निष्कर्ष निघतो. आणि याच कारणास्तव 'पंजाबी' यांनीं आपल्या 'हिंदी राष्ट्रमंडळ' या पुस्तकांत व श्री. एम्. आर. टी. यांनीं आपल्या लेखांत सर्व पंजाब प्रांताचा समावेश न करतां त्यांच्या दृष्टीनें जेथें मुसलमान अल्पसंख्य आहेत, तो भाग वगळून बाकीच्या प्रांताचा समावेश केलेला आहे.

"पंजाबमधून अंबालाविभाग आणि पूर्वेकडील शीख व हिंदू संस्थानें वगळलीं, तर पंजाबची लोकसंख्या २ कोटी ८५ लक्ष आहे ती २ कोटी १० लक्ष इतकी कमी होईल. परंतु मुसलमानांचें प्रमाण ५५ टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढेल. वायव्येकडील सर्व मुस्लिम विभाग घेतला तर हें प्रमाण याहूनहि अधिक भरेल. या सूचनेप्रमाणें पूर्व सरहद्दीची पुनर्रचना केली तर वायव्य–विभागांतील ३ कोटी ५० लक्ष लोकसंख्येपैकीं मुसलमानांची संख्या २ कोटी ७० लक्ष भरेल व मुसलमानेतरांची संख्या ८० लक्ष होईल. मुसलमानांचें प्रमाण ७७ टक्के असेल, तर एक स्थिर सरकार कायमचें चालविण्याइतके ते पुरेसे समर्थ बनतील आणि ही लोकसंख्या इकडून तिकडे न हालवितां करतां येतील."[1]

"पंजाबच्या पूर्वसीमेचा प्रश्न महत्त्वाचा असून केव्हां तरी त्याबाबत मुसलमानांचा मतभेद होण्याचा संभव आहे. कांहींचें मत असें पडेल कीं, यमुना नदी किंवा सिंधू व गंगा या नद्यांना विभक्त करणारा पाणलोट ही पूर्वेकडील नैसर्गिक सीमा समजावी, तर कांहींजण पंजाबमधील अंबालाविभाग, होशियारपूर जिल्ह्याचा कांहीं भाग व कांग्रा जिल्ह्याचा हिंदु टापू त्यांतून गाळावा असें म्हणतील. यांपैकीं पहिल्या मतासंबंधीं असें म्हणतां येईल कीं, हिंदुस्थान व हिंदुस्थानचा पंजाब हा घटक यांना विभक्त करणारी यमुना नदी वा उपरोक्त पाणलोट या नैसर्गिक सीमा होऊं शकतात. परंतु प्रदेश वगळून सिंधु-

१. इंडियाज् प्रॉब्लेम् ऑफ हर फ्यूचर कॉन्स्टिटयूशन्, पृ. ३३–३४.

प्रदेशाचें संयुक्त राज्य स्थापण्याचा उद्देश मुसलमानांचे शेतकीविषयक, सांस्कृतिक आणि औद्योगिक हितसंबंधांचें रक्षण करणें हा असल्यानें वरीलप्रमाणें विभक्तीकरण केल्यास यमुना नदी वा तो पाणलोट हे आग्नेयेस दिल्ली ते अरवली पर्वत या दिशेनें जात असल्यानें आपला उद्देश सफल होणार नाहीं. कारण, त्यामुळें आमच्या प्रदेशांत चीफ कमिशनरचा दिल्ली हा प्रांत, अंबालाविभाग, हिंदूंचें पुष्कळ संख्याधिक्य असलेले प्रदेश हे समाविष्ट करावे लागतील, आणि त्यामुळें हिंदूंचें वाढलेलें संख्याप्रमाण आपणांस अर्थातच बाधक ठरेल. म्हणजे या सीमेमुळें हिंदु–हिंदुस्थानपासून सांस्कृतिक दृष्ट्या अलग होण्याचा आपला प्रयत्न सफल होणार नाहीं. शिवाय, हिंदुस्थानांतील हिंदूंकडे या हिंदूंचा निसर्गतःच ओढा असणार, त्यामुळें आपल्या अडचणी अधिकच वाढतील. या महत्त्वाच्या मुद्याचा विचार केल्यास कोठलाहि प्रबळ हिंदु टापू आपल्या विभागांत समाविष्ट करावयाचा नाहीं हें दुसरें मतच जास्त सुरक्षिततेचें ठरेल."[१]

"मुसलमानांनीं आतांपासूनच पंजाबच्या पूर्वसीमेबाबत करावयाच्या बदलाबद्दल नेट धरला पाहिजे व वरील हिंदू टापू त्यांतून गाळण्याच्या मागणीवरहि भर दिला पाहिजे."[२]

आणखी एका विचारसरणीबद्दल बोलावयाचें झाल्यास, ज्यांत मुसलमान बहुसंख्य नाहींत असा प्रदेश पाकिस्तानमध्यें समाविष्ट करावा, अशी मागणी कट्टर पाकिस्तानवालेसुद्धां न्याय्य म्हणून मागूं शकणार नाहींत. जर अशी एकादी मागणी करण्यांत आली तर तें लाहोर–ठरावाच्या "जेथें मुसलमानांचें संख्याधिक्य असेल" या शब्दांच्या तत्त्वाविरुद्ध ठरेल; इतकेंच नव्हे, तर मुसलमानेतरांवर मुसलमानी राज्य लादण्याचा हा डाव आहे, असा त्याचा सरळ अर्थ मुसलमानेतर करतील.

सर अब्दुल्ला हरून–कमिटीनें आपल्या योजनेंत वायव्य–मुस्लिम–राज्यांत

---

१. पंजाबी : कॉन्फेडरसी ऑफ इंडिया, पृ. २४३–४४.

२. उक्त ग्रंथ, पृ. २४६.

सर्वच्या सर्व पंजाबचा, इतकेंच नव्हे, तर दिल्लीप्रांत व अलीगढ जिल्ह्याचा कांहीं भाग यांचाहि समावेश केला आहे. सांस्कृतिक प्रदेशांत मुसलमानांचे हित-संबंध रक्षिण्यासाठीं हिंदुस्थानचे विभाग करावेत, असें मत प्रथम प्रतिपादन करणारे डॉ. सय्यद अबदुल लतीफ हे १९४१ सालीं हरून यांच्या योजने-बद्दल लिहितात कीं:—

"कमिटीच्या रिपोर्टाप्रमाणें वायव्य व पूर्व विभागांच्या ज्या चतुःसीमा ठर-विण्यांत आल्या आहेत, त्या माझ्या दृष्टीनें असमाधानकारक आहेत. लाहोर—ठरावाचा हेतु एक एकजिनसी व भक्कम मुसलमानी राज्य असावें हा आहे. परंतु आपल्या कमिटींतील पंजाब व अलीगढचे सदस्य मूलतः मुसलमानेतर असलेल्या प्रदेशांबद्दलच्या आपल्या आक्रमक संकल्पामुळें काश्मीरपासून जेस-लमीरपर्यंत आणि थेट अलीगढपर्यंतचा व बृहत्पंजाब, मुसलमानांचें प्रमाण त्यांत केवळ ५५ टक्के असूनहि समाविष्ट करण्यास उद्युक्त झाले आहेत. त्याच-प्रमाणें पूर्वेकडील विभागांत अखिल बंगाल व आसाम आणि बिहारचा एक जिल्हा, यांचा समावेश मुसलमानी प्रमाण ५४ टक्क्यांपर्यंत कमी होत असून-हि करूं इच्छितात. माझ्या अल्प मतीस अशा चतुःसीमा ठरविणें लाहोर—ठरा-वांतील साध्याच्या व तत्त्वाच्या विरुद्ध आहे असें वाटतें. कां कीं, ईशान्य—विभागांत ४६ टक्के व वायव्य—विभागांत ४२ टक्के मुसलमानेतर असतांना त्या शब्दांच्या कोठल्याहि अर्थानें त्याला मुसलमानी राज्य किंवा मुसलमानी टापू असेंहि म्हणतां येणार नाहीं. पंजाब, सिंध आणि युक्तप्रांतीय सदस्यांकडे ही गोष्ट सोपविली गेली असल्यानें मी या चतुःसीमांस जबाबदार नाहीं. जेथें निदान ८० टक्के बहुमत आहे अशा राज्यनांच मी माझीं मुसलमानी राज्यें असें नांव देईन. मग तीं लहान असेनात का."[1]

लीगच्या लाहोर—ठरावानुसार ती समिति मुस्लिम—लीगच्या परराष्ट्रीय उप-समितीचे अध्यक्ष हाजी सर अबदुल्ला हरून, एम्. एल्. ए. यांनीं बनविली

---

१. दि पाकिस्तान इश्यू, पृ. ९८–९९.

होती व या समितीनें आपला अहवाल अधिकृतरीत्या २३ डिसेंबर १९४०ला लीगच्या अध्यक्षांना सादर केला होता. तरीसुद्धां ज. जिनांनीं ही योजना डॉ. लतीफ यांना लिहिलेल्या १५ मार्च १९४१च्या पत्रांत धिःकारलेली आहे. श्री. एम्. आर. टी. वा श्री. 'पंजाबी' या मुसलमानांचें हितसंबंध रक्षण करूं पाहणाऱ्यांच्या दृष्टीनें काय किंवा ज्या बहुसंख्य मुसलमानेतरांना मुस्लिम–राज्यामध्यें समाविष्ट करण्याचा खटाटोप चालू आहे त्यांच्या दृष्टीनें पाहिलें काय, ज्या टापूमध्यें मुसलमान अल्पसंख्य आहेत तो टापू पाकिस्तानांत समाविष्ट करण्याची कल्पना, फाळणीची योजना मान्य केली तरीहि रास्त वा स्वीकारार्ह ठरत नाहीं. लाहोर–ठरावांतील मुख्य दृष्टि हीच असल्यानें पंजाबच्या परिस्थितीचा विचार करूं. आपल्याला असें आढळून येईल कीं, सिंध व बलुचिस्तान यांना जोडलेल्या पंजाबमधील मुलतान–विभागांत मुस्लिमांचें संख्याधिक्याचें प्रमाण पुष्कळच म्हणजे ७५·४१ टक्के आहे. या विभागांतील प्रत्येक जिल्ह्यांत मुसलमानांचें संख्याधिक्य आहे. तेथील अत्युच्च प्रमाण डेरा गाझीखान या जिल्ह्यांत ८८·१९ टक्के आहे. आणि त्यांचें किमान प्रमाण ल्यालपूर जिल्ह्यांत ६२·८५ टक्के आहे. तसेंच वायव्य सरहद्द प्रांताशीं सलग असलेल्या रावळपिंडी विभागांत मुस्लिमांचें संख्याधिक्य पुष्कळच म्हणजे ८५·५२ टक्के आहे. अटक जिल्ह्यांत तें अत्युच्च म्हणजे ९०·४२ आहे. आणि रावळपिंडी जिल्ह्यांत किमान म्हणजे ८० टक्के आहे. तेव्हां परिणामीं जर फाळणी व्हावयाचीच असेल, तर हे दोन्ही विभाग वायव्येच्या राज्यांत लाहोरच्या ठरावानुसार समाविष्ट करतां येतील.

लाहोर–विभागांतील परिस्थिति जरा गुंतागुंतीची आहे. सर्व विभागांत मिळून मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ५८·१८ आहे. अर्थात् हें प्रमाण प्रचंड नाहीं आणि म्हणून हा मुसलमानी प्रदेश असें अधिकारवाणीनें ठीगला म्हणतां येणार नाहीं. गुरुदासपूर जिल्ह्यांत मुसलमानांचें प्रमाण जवळजवळ समान म्हणजे ५१·१४ टक्के आहे, तर अमृतसर जिल्ह्यांत ते अल्पसंख्य आहेत. या विभागांत गुजरानवाला जिल्ह्यांत त्यांचें प्रमाण अत्युच्च म्हणजे शेंकडा ७०·४५ आहे. लाहोर, सियाल-

कोट आणि शेखपुरा जिल्ह्यांत हें प्रमाण अनुक्रमें शेकडा ६०·६२, ६२·०९, व ६३·६२ आहे. वरील कसोटीनुसार कोठल्याहि परिस्थितींत, मुस्लिमांचें अल्पसंख्यत्व असल्यानें अमृतसर जिल्ह्याचा मुसलमानी प्रदेश म्हणून उल्लेख करतां येणार नाहीं. गुरुदासपूरवर दोघेंहि आपला अधिकार औचित्यानें सांगू शकतील. मुसलमानांचें प्रमाण बरेंच मोठें पाहिजे असा जर आग्रह धरला नाहीं, आणि अधिकांश संख्या हीच जर एक कसोटी असेल, तर ६० ते ७० टक्के प्रमाण असलेल्या इतर जिल्ह्यांची मुसलमानी टापूंत गणना करतां येईल.

जलंदर विभाग नेमका कोठें बसतो हें अगदीं स्पष्ट आहे. येथें मुसलमानांचें प्रमाण फक्त ३४·५३ टक्के इतकेंच आहे. शिवाय येथील कोठल्याहि जिल्ह्यांत ते बहुसंख्य नाहींत. त्यांचें अत्युच्च प्रमाण जलंदर जिल्ह्यांत ४५·२३ टक्के व किमान प्रमाण कांग्रा जिल्ह्यांत ४·८१ टक्के आहे. सर्व विभाग घेतला तरी केवळ हिंदूंचें प्रमाण ३५·८७ म्हणजे मुसलमानांच्या ३४·५३ टक्क्यांपेक्षांहि जास्त आहे. मात्र या भागांतील पांच जिल्ह्यांपैकीं जलंदर व फेरोझपूर यांत मुसलमानांचें प्रमाण जास्त म्हणजे अनुक्रमें ४५·२३ व ४५·०७ आहे. परंतु या जिल्ह्यांतहि एकंदरींत ते अल्पसंख्य आहेत. तेव्हां लीगच्या ठरावाच्या कसोटीस जलंदर विभाग उतरत नाहीं. शिवाय लाहोर–विभागामुळें यांतील जिल्हे रावळपिंडी व मुलतान विभागांतील जिल्ह्यांपासून अलग झाले आहेत.

अंबाला–विभागांत मुसलमानांचें प्रमाण फक्त २८·०७ टक्के इतकें आहे. गुरगांव जिल्ह्यांत त्यांचें प्रमाण अत्युच्च म्हणजे ३३·५६ टक्के आहे. याच्या उलट हिंदूंचें प्रमाण सर्व विभागांत ६६·०१ टक्के आहे. त्यांचें कमाल प्रमाण रोहटक जिल्ह्यांत ८१·६१ टक्के व किमान प्रमाण अंबाला जिल्ह्यांत ४८·४० टक्के आहे. तेव्हां लीगच्याच ठरावानुसार हा विभाग किंवा यांतील कोणताहि जिल्हा वायव्येच्या मुसलमानी स्वतंत्र राज्यांत समाविष्ट करतां येणार नाहीं.

आतां आपण सर्व वायव्य–विभागाचा विचार करूं. वर सांगितलेले भाग वगळून पुढीलप्रमाणें परिस्थिति असल्याचें दृष्टोत्पत्तीस येईलः—

## कोष्टक १३.

| प्रांत | एकुण लोकसंख्या | मुस्लिम संख्या | मुस्लिमांचें शें. प्रमाण. |
|---|---|---|---|
| सिंध | ४५,३५,००८ | ३२,०८,३२५ | ७०·७५ |
| वायव्य सरहद्द | ३०,३८,०६७ | २७,८८,७९७ | ९१·७९ |
| बलुचिस्तान | ५,०१,६३१ | ४,३८,९३० | ८७·५१ |
| पंजाब ( अंबाला, जलंदर विभाग आणि अमृतसर जिल्हा वगळून ) | १,६८,७०,९०० | १,२३,६३,६६९ | ७३·२८ |
| वायव्य टापूंतील एकूण संख्या | २,४९,४५,६०६ | १,८७,९९,७२१ | ७५·३६ |

पंजाबमधील मुसलमानेतर बहुसंख्य भाग न वगळल्यास वायव्येच्या मुसलमानी राज्यांत ३,६४,९३,५२५ लोकसंख्येपैकीं मुसलमानांची संख्या २,२६,-५३,२९४ किंवा ६२·०७ टक्के राहील. फक्त येवढेंच संख्याधिक्य असतांना अशा टापूस 'मुसलमानी' टापू म्हणतां येईल कीं काय याची शंका वाटते.

आतां आपण पूर्वेच्या टापूकडे वळूं. प्रथम बंगाल घेऊं:—

१४ व्या कोष्टकाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास असें दिसून येईल कीं, बरद्वान विभागांत मुसलमान अगदीं अल्पसंख्य म्हणजे त्या विभागाच्या लोकसंख्येपैकीं शेंकडा १३·९० आहेत. त्यांतील अत्युच्च प्रमाण २७·४१ टक्के व किमान प्रमाण ४·३१ टक्के आहे. आणि या विभागांतील सर्व जिल्ह्यांच्या चहूंबाजूस मुसलमानेतरांची बहुसंख्या असलेले बिहार, बंगाल व ओरिसाचे जिल्हे आहेत. याला अपवाद फक्त बिरभूमा व बरद्वान या एका बाजूस बंगालचे मुसलमानी बहुसंख्य जिल्हे असलेल्यांचा आहे. परंतु या अपवादभूत जिल्ह्यांच्या इतर बाजूंनासुद्धां मुसलमानेतर बहुसंख्य जिल्हेच आहेत. अर्थात् पूर्वेच्या मुसलमानी राज्यांत हा विभाग लाहोर–ठरावान्वयें बसूं शकत नाहीं.

कलकत्ता धरून प्रेसिडेन्सी विभागांत मुसलमान अल्पसंख्य आहेत. कारण

तेथें त्यांचें प्रमाण फक्त ४४·५६ आहे. या उलट, हिंदूंचें प्रमाण ५३·७० आहे. परंतु यांतील कांहीं जिल्ह्यांतून मुसलमानांचें संख्याधिक्य आहे. उदा० नादिया, मुर्शिदाबाद व जेसोर या जिल्ह्यांत त्यांचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ६१·२६, ५६·५५ व ६०·२१ आहे. २४ परगणे व खुलना या जिल्ह्यांत त्यांचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ३२·४७ व ४९·३६ असून केवळ हिंदूंचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ६५·३२ व ५०·३१ आहे. कलकत्त्यांत मुसलमानांचें प्रमाण फक्त २३·५९ टक्के किंवा एक चतुर्थांशापेक्षांहि कमी आहे, तर तेथें हिंदूंचें प्रमाण ७२·६२ टक्के आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें सर्व विभागाचा मुस्लिम प्रदेशांत समावेश होऊं शकणार नाहीं; आणि जिल्हावार समावेश करावयाचा झाल्यास त्यांतून २४ परगणे, कलकत्ता, व खुलना हे जिल्हे गाळावे लागतील. कलकत्त्याचा विचार करावयाचा झाल्यास कितीहि प्रादेशिक फेरफार केला तरी, त्याचे सर्व बाजूस मुसलमानेतर टापू असल्यानें त्याचा समावेश मुसलमानी प्रदेशांत करतां येणार नाहीं.

राजशाही—विभागांत जालपैगुरी व दार्जीलिंग या जिल्ह्यांत मुसलमानांचें प्रमाण पुष्कळ कमी म्हणजे अनुक्रमें शेंकडा २३·०८ व २·४२ आहे, तर दिनाजपूर या सीमेवरील जिल्ह्यांत ५०·१९ टक्के मुस्लिम लोकसंख्या आहे. यांतील इतर जिल्ह्यांत मुसलमानांचें संख्याधिक्य आहे. त्यांचें अत्युच्च प्रमाण बोग्रा जिल्ह्यांत ८३·९३ टक्के व किमान प्रमाण माल्दा जिल्ह्यांत ५६·७८ टक्के असें आहे. तेव्हां जालपैगुरी दार्जीलिंग हे जिल्हे व ५० टक्के संख्या असलेला दिनाजपूर जिल्हा यांचा 'मुसलमानी' टापूंत समावेश करणें अनुचित होईल.

डाक्का—विभागाची परिस्थिति याचे उलट आहे. तेथें मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ७१·५९ आहे, आणि यांतील प्रत्येक जिल्ह्यांत त्यांचें संख्याधिक्य आहे. त्यांचें अत्युच्च प्रमाण मैननसिंग जिल्ह्यांत ७७·४४ व किमान प्रमाण फरीदपूर जिल्ह्यांत शेंकडा ६४·७८ असें आहे.

चितागांग—विभागांतहि मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ७५·४० असल्यानें

त्यांचें संख्याधिक्य आहे. चितागांगच्या टेकाड टापूंतील २·८४ हें त्यांचें प्रमाण सोडल्यास बाकी सर्व जिल्ह्यांत ते बहुसंख्य आहेत. या टेकाड टापूंत वन्य जातींचें शेंकडा ९४·४७ इतकें संख्याधिक्य आहे.

सध्यांच्या संपूर्ण बंगाल इलाख्याचा विचार केल्यास बरद्वान, प्रेसिडेन्सी, राजशाही, डाक्का व चितागांग असे पांच विभाग त्यांत येतात व प्रांतांतील मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ५४·७३ भरतें. अर्थात्‌च इतकें नाममात्र संख्याधिक्य असतांना त्याचा 'मुसलमानी' प्रदेश म्हणून निर्देश करून स्वतंत्र मुसलमानी राज्याचा दर्जा त्याला देऊं पाहणें अन्याय्य होईल. यामुळें या राज्यांत कोठल्याहि स्थायी सरकारची प्रस्थापना करणें अशक्यप्राय होईल. आणि युगानुयुगें हिंदुस्थानशीं एकजीव होऊन राहिलेल्या या प्रांताचे विभक्तीकरणासारख्या प्रश्नावर मूलगामी मतभेद असतांना खंड पाडण्याचा अट्टाहास केवळ ५४·७३ टक्के संख्याधिक्य असलेल्यांनीं कां धरावा, याचें कांहींच कारण दिसत नाहीं.

जर आपण जिल्हावार पाहिलें, तर मुसलमानी विभागांतून बरद्वान विभागाचे सर्व जिल्हे, २४ परगणे, व खुलना, कलकत्ता हे प्रेसिडेन्सी विभागाचे जिल्हे, आणि जालपैगुरी व दार्जीलिंग हे जिल्हे वगळावे लागतील. तसेंच वर सांगितल्याप्रमाणें जवळजवळ समप्रमाण असलेल्या दिनाजपूर जिल्ह्यावर दोन्ही पक्ष आपला हक्क सांगूं शकतील. राजशाही–विभागांतील बाकीचे जिल्हे तसेंच डाक्का व चितागांग विभागांतील जिल्हे–चितागांगचा टेकाड टापू सोडून–यांचा मुसलमानांचें संख्याधिक्य असल्यानें मुसलमानी राज्यांत समावेश करणें लीगच्या ठरावाप्रमाणें शक्य आहे.

समजा, दिनाजपूर जिल्हा व चितागांगचा टेकाड टापू यांचा मुसलमानी राज्यांत समावेश केला तर बंगालमधील जिल्ह्यांची काय स्थिति राहील, तें १४ व्या कोष्टकावरून दिसून येईल.

जर या भागांचा मुसलमानी राज्यांत समावेश केला नाहीं, तर परिस्थितींत कांहीं प्रमाणांत बदल होईल.

वर सांगितल्याप्रमाणें मुसलमानी विभागामध्यें लोकसंख्येंतील मुसलमानांचें प्रमाण ७०·०९ टक्के, हिंदूंचें प्रमाण २७·७९ टक्के व वन्य जातींचें प्रमाण १·७२ टक्के राहील. मुसलमानेतर प्रदेशांत हिंदू ७०·७० टक्के वा मुसलमानी विभागांतील मुसलमानांच्या प्रमाणापेक्षां किंचित् जास्त, मुसलमान २२·२१ टक्के वा मुसलमानी विभागांतील हिंदूंच्या प्रमाणापेक्षां बरेच कमी व वन्य जाती ६·११ टक्के असें लोकसंख्येंतील प्रमाण राहील. सर्व प्रांतांतील वन्य जातींची लोकसंख्या १८,८९,३८९ किंवा ३·१३ टक्के आहे. परंतु त्यांचा विचार नंतर करूं. कारण आसाममध्येंहि ह्याच प्रश्न जास्त प्रामुख्यानें निर्माण होणार आहे. म्हणून आसाममधील आंकड्यांचा विचार करतांनाच बंगालच्या या प्रश्नाचा विचार करणें जास्त सोयीचें होईल.

आतां आपण आसामची काय परिस्थिति आहे तें पाहूं या. पुढील पृष्ठांवर दिलेल्या १५ व्या व १६ व्या कोष्टकाकडे पाहतां कोणत्या मुद्द्यांवर आसाम हा मुसलमानी टापू आहे असें म्हटलें जातें तें समजत नाहीं.सर्व प्रांतांत मुसलमानांची संख्या फक्त ३३·७३टक्के आहे. तर हिंदूंची संख्या४१·२९टक्के आहे. जिल्ह्यांची परिस्थिति पाहिल्यास फक्त सिल्हेट या जिल्ह्यांतच मुसलमान बहुसंख्य असून तेथें त्यांचें प्रमाण ६०·७१ आहे. दुसऱ्या कोणत्याहि जिल्ह्यांत ते बहुसंख्य नाहींत. काचर आणि गोलपारा या जिल्ह्यांत मात्र अनुक्रमें ३६·३३ टक्के व ४६·२३ टक्के म्हणजे इतर जातींच्या मानानें भरभक्कम आहेत. फार तर सिल्हेट हा एकच जिल्हा मुसलमानी संख्याधिक्य असलेला असा आहे. परंतु त्यांत असलेलें ६०·७१ टक्के हें प्रमाण कांहीं प्रचंड नव्हे. कांहीं लहानलहान जिल्ह्यांतून केवळ वन्य जातींचेंच संख्याधिक्य आहे आणि तसें जेथें नाहीं, तेथें हिंदू व वन्य जाती मिळून मुसलमानेतरांचें मोठें संख्याधिक्य भरतें. प्रांताच्या चौदापैकीं आठ जिल्ह्यांत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा पांचाहून कमी असून त्यांतील तीन जिल्ह्यांत तर तें शेंकडा एकसुद्धां नाहीं. मुस्लिम-लीग ही अमुक एक भाग मुसलमानी आहे असा दावा तेथील मुसलमानांच्या संख्याधिक्याच्या जोरावरच मांडीत असल्यानें, केवळ एक जमात या दृष्टीनें त्यांचें प्रमाण कांहीं भागांत सर्वांत जास्त

## कोष्टक १५.

| सर्मा व्हॅली आणि हिल डिव्हिजन | क्षेत्रफळ चौ. मै. | ए. लोकसंख्या | मुस्लिम | हिंदू | ख्रिस्ती | वन्य | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| काचार | ३,८६२ | ६,४१,१८१ | २,३२,९५० (३६·३३) | २,२५,८१६ (३५·२२) | ३,९७९ (०·६२) | १,७८,२६४ (२७·८०) | १७२ (०·०३) |
| सिल्हेट | ५,४७८ | ३१,१६,६०२ | १८,९२,११७ (६०·७१) | ११,४९,५१४ (३६·८८) | ३,०५५ (०·०९) | ६९,९०७ (२·२४) | २,००९ (०·०६) |
| खासी व जयंतिया टेकड्या | २,३५३ | १,१८,६६५ | १,५५५ (१·३१) | १२,७३९ (१०·७४) | ४२४ (०·३६) | १,०३,५६७ (८७·२७) | ३८० (०.३२) |
| नागा टेकड्या | ४,२८९ | १,८९,६४१ | ५३१ (०·२८) | ४,११८ (२·२१) | ३० (०·०२) | १,८४,७६६ (९७·४३) | ११६ (०·०६) |
| लुशाई टेकड्या | ८,१४२ | १,५२,७८६ | १०१ (०·०६) | २,४४७ (१·६०) | ५१ (०·०३) | १,४७,०४२ (९६·२४) | ३,१४५ (२·०६) |
| एकूण | २४,१२४ | ४२,१८,८७५ | २१,२७,२५४ (५०·४२) | १३,९४,७१४ (३३·०६) | ७,५३९ (०·१८) | ६,८३,५४६ (१६·२०) | ५,८२२ (०·१४) |

आसाम-व्हॅली-विभाग

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गोलपारा | ३,९६९ | १०,१४,२८५ | ४,६८,९२४ (४६·२३) | ३,०६,२२३ (३०·१९) | २८५ (०·०३) | २,३७,९९३ (२३·४६) | ८६० (०·०८) |
| कामरूप | ३,८४० | १२,६४,२०० | ३,६७,५२२ (२९·०७) | ६,९६,५४९ (५५·०९) | १,१६८ (०·०९) | १,९७,९२६ (१५·६५) | १०,३५ (०·०८) |
| दारंग | २,८०४ | ७,३६,७९१ | १,२०,९९५ (१६·४२) | ३,४७,७५८ (४७·१९) | ६,६४३ (०·९०) | २,६०,७४८ (३५·३८) | ६४७ (०·०९) |
| नौगांग | ३,८९८ | ७,१०,८०० | २,५०,११३ (३५·१८) | २,८८,३५१ (४०·५६) | ४,१४७ (०·५८) | १,६६,५२५ (२३·४२) | १,६६४ (०·२३) |
| शिवसागर | ५,१२८ | १०,७४,७४१ | ५१,७६९ (४·८१) | ६,४३,१९१ (५९·८४) | १५,७०७ (१·४६) | ३,६०,७६८ (३३·५६) | ३,३०६ (०·३१) |
| लखीमपूर | ४,१५६ | ८,९४,८४२ | ४४,५७९ (४·९८) | ५,०१,०३६ (५५·९८) | ४,७४५ (०·५३) | ३,३५,२३० (३७·४६) | ९,२५२ (१·०३) |
| गारो टेकड्या | ३,१५२ | २,२३,५६९ | १०,३९८ (४·६५) | १४,३०७ (६·३९) | २९, (०·०१) | १,९८,४७४ (८८·७७) | ३६१ (०·१६) |
| एकूण | २६,९४७ | ५९,१९,२२८ | १३,१४,३०० (२२·१२) | २७,९७,४१५ (४७·२६) | ३२,७२५ (०·५५) | १७,५७,६६४ (२९·७०) | १७,१२५ (०·२९) |

(कोष्टक १५ चालू)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सादिया सरहद्द टापू | ३,३०९ | ६०,११८ | ८६४ (१·४३) | १८,५०६ (३०·७८) | ५१६ (०·८६) | ३९,९७४ (६६·४९) | २५८ (०·४३) |
| बालीबारा सरहद्द टापू | ५७१ | ६,५१२ | ६१ (०·९४) | २,५८८ (३९·७४) | ३१ (०·४८) | ३,८१२ (५८·५३) | २० (०·३१) |
| एकूण आसाम | ५४,९५१ | १,०२,०४,७३३ | ३४,४२,४७९ (३३·७३) | ४२,१३,२२३ (४१·२९) | ४०,८१० (०·४०) | २४,८४,९९६ (२४·३५) | २३,२२५ (०·२३) |

## कोष्टक १६.

आसाममधील मुसलमानी व मुसलमानेतर जिल्हे

| विभाग किंवा जिल्हे | क्षेत्रफळ चौ. मै. | ए. लोकसंख्या | मुसलमान | हिंदू | ख्रिस्ती | वन्य | इतर | एकूण मुसलमानेतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुसलमानी प्रदेश सिल्हेट जि. | ५,४७८ | ३१,१६,६०२ | १८,९२,११७ (६०·७१) | ११,४९,५१४ (३६·८८) | ३,०५५ (०·०९) | ६९,९०७ (२·२४) | २,००९ (०·०६) | १२,२४,४८५ (३९·२७) |
| मुसलमानेतर प्र. सि. जि. सोडून सर्व आसाम | ४९,४७३ | ७०,८८,१३१ | १५,५०,३६२ (२१·८७) | ३०,६३,७०९ (४३·२२) | ३७,७५५ (०·५३) | २४,१५,०८९ (२४·०७) | २१,२१६ (०·३०) | ५५,३७,७६९ (७८·१३) |

असलें, तरी जेथें त्यांचें निर्विवाद संख्याधिक्य नाहीं तेथें तिचा हा दावा टिकणार नाहीं. दुसऱ्या कोणत्याहि जमातीनें आपण निराळी जमात आहोंत या तत्त्वावर विभक्तीकरणाची मागणी केलेली नाहीं; इतकेंच नव्हे, तर या कल्पनेलाहि सर्वांचा विरोध आहे. म्हणून लीगला अशी मागणी करावयाची असेल, तर ती मुसलमानांच्या संख्याधिक्याच्या जोरावरच करतां येईल.

याबाबत वन्य जातीची काय स्थिति आहे. हें पाहणें आवश्यक ठरेल. पुढील पृष्ठावरील १७ व्या कोष्टकावरून त्यांतील लोकांचा धर्म कोणता हें लक्षांत न घेतां त्यांच्या मूळ वन्य जातीच शिरगणतींत ध्यानांत घेतल्या गेल्यामुळें हिंदूंचें कसें नुकसान झालें आहे तें दिसून येईल.

तसेंच प्रांतांतील मुसलमानांची लोकसंख्या कशी वाढत गेली तेंहि आपणांस कळून येईल. हें ध्यानांत येण्याजोगें आहे कीं जी लोकसंख्या १९३१ सालीं ब्रि. आसाममध्यें ५७·२० टक्के होती, ती १९४१ सालीं ४१·२९ पर्यंत कमी झाली; व संस्थानें मिळून सर्व आसाममध्यें जी ५६·२८ होती, ती ४१·५४ पर्यंत खालीं आली. या उलट, वन्य जातींची संख्या ब्रि. आसाममध्यें ८·२५ टक्क्यांवरून २४·३५ टक्क्यांपर्यंत आणि सर्व आसाममध्यें १०·७३ टक्क्यांवरून २५·८४ टक्क्यांपर्यंत वाढली. ही येवढी तफावत एकदम दहा वर्षांत कशी पडली याचें स्पष्टीकरण १९४१ च्या शिरगणतीचे आसामचे सुपरिंटेंडेंट श्री. के. डब्ल्यू. पी. मरार यांनीं केलें आहे:

"मुख्य मुद्दा असा आहे कीं, या कोष्टकांत त्यांचा धर्म न दाखवितां त्यांची मूळ वन्य जात दाखविण्यांत आली आहे. आम्हांला अधिक वेळेची वा पैशाची सवलत असती, तर तपशील देऊन या शिरगणतीचा दुवा १९३१ च्या शिरगणतीशीं जोडतां आला असता. परंतु या अपुऱ्या शिरगणतीमुळें तें शक्य झालें नाहीं. जात व धर्म हे जवळजवळ एकच अतएव अविभाज्य आहेत, असें पुष्कळांना वाटतें व बहुधा तसें असतेंहि. परंतु वन्य जातींत असे भेद असूं शकतात. म्हणून सध्यांच्या शिरगणतींत त्यांची गणना धर्मवार न करतां जातवार करण्यांत आली आहे. उदाहरणार्थ, आतांपर्यंत 'खासी' या वन्य जातीचे

## कोष्टक १७.

### १९०१, ११, २१, ३१ व ४१ मधील शिरगणतीनुसार जातवारी

(आंकडे दशसहस्रांत आहेत)

| प्रान्त | एकूण लोकसंख्या | | १९४१ | १९३१ | १९२१ | १९११ | १९०१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ब्रिटिश आसाम | १,०२,०४,७३३ | हिंदू | ४,१२९ | ५,७२० | ५,४३३ | ५,४१८ | ५,५७८ |
| | | मुसलमान | ३,३७३ | ३,११६ | २,८९८ | २,८१० | २,६८९ |
| | | वन्य | २,४३५ | ८२५ | १,४७९ | १,६५२ | १,६५२ |
| आसामी संस्थानें | ७,२५,६५५ | हिंदू | ४,५१६ | ४,३६२ | ५,११४ | ५,८१६ | ५,११६ |
| | | मुसलमान | ४३६ | ३१३ | ४५५ | ४१९ | ३६५ |
| | | वन्य | ४,६७४ | ४,४११ | ३,४३३ | ३,७५८ | ३,६३२ |
| एकूण आसाम | १,०९,३०,३८८ | हिंदू | ४,१५४ | ५,६२८ | ५,४६१ | ५,४३८ | ५,५१८ |
| | | मुसलमान | ३,१७८ | ३,००७ | २,७७८ | २,६१३ | २,५८१ |
| | | वन्य | २,५८४ | १,०७३ | १,५७३ | १,७५५ | १,७४४ |

लोक हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती किंवा वन्य यांपैकीं कोठल्याहि धर्माचे म्हणून गणले जात; परंतु यावेळीं मात्र त्या सर्वांचा 'खासी' जातींतच समावेश करण्यांत आला आहे. ख्रिश्चनांचें खूपच प्रमाण आणि हिंदू व बौद्ध यांचें कांहीं प्रमाण या शिरगणतींत घटल्याचें दिसतें. त्याचें कारण मुख्यतः हेंच आहे. परंतु त्याच गणतींत वन्य जातींची लोकसंख्या वाढलेली दिसते...वर दिलेल्या गोष्टींचा विचार करून जर या आंकडयांकडे आपण दृष्टि फेंकली, तर कोठल्याहि 'भयंकर' घटना निर्माण झालेल्या नाहींत हें दिसून येईल. सर्व जातींची संख्या नैसर्गिकपणें वाढीकडे झुकल्याचेंच दिसून येईल. म्हणून देशांतरामुळें झालेले फरक सोडल्यास प्रांतांतील जातींचें प्रमाण जवळजवळ पूर्वीप्रमाणेंच राहिल्याचें दिसेल.

"हिंदू वा ख्रिश्चन यांना हुसकून देण्याचा येथें प्रश्न नाहीं. ख्रिश्चनांबद्दल एक वेगळी टिप्पणी पुढें येईलच. हिंदूंचें प्रमाण तर पूर्वीप्रमाणेंच राहिलेलें आहे. वन्य जातींची धर्म व जात या सदरांत वेगळी नोंद न करतां १९३१ प्रमाणेंच गणती केली असती, तर प्रांतांतील या महत्त्वाच्या जमातीची गणना नेमकी किती आहे तें सांगतां आलें नसतें. त्यांची गणना ही आसाममध्यें एक महत्त्वाची गोष्ट होय. कारण यापुढें त्यांचेसाठीं खूप मोठया प्रमाणांत जमिनी राखून ठेवण्यांत येणार आहेत."[1]

जर वन्य जातींची नोंद करून त्यांची धर्मवार नोंदणी करण्यांत आली असती, तर आमचें कांहीं म्हणणें नव्हतें. शिरगणतीचे अधिकारी म्हणतात, "हिंदूंचें प्रमाण पूर्वीसारखेंच आहे." परंतु त्यांचा आंकडा व प्रमाण काय आहे हें पाहण्यासाठीं कोष्टकाकडे नजर टाकल्यास, परिस्थिति आहे त्यापेक्षां कांहीं वेगळी दिसून येते !

ख्रिस्ती व हिंदू लोकसंख्येंत आलेल्या या घटीबद्दल वरीलप्रमाणें विवरण केल्यावर १९४१ च्या अपुऱ्या शिरगणतींतसुद्धां त्यांचा आंकडा काय आहे हें नक्की करण्याचा त्यांनीं शक्य तो प्रयत्न केला आहे. संस्थानांसहित सर्व आसामचा आंकडा अंदाजें ३,८६,००० असावा असें त्यांनीं लिहिलें आहे. अधि-

१. हिंदुस्थानची शिरगणती, १९४१, खंड ९ वा : आसाम, पृ. २१–२२ वरील कोष्टकें.

कृत गणतींत मात्र हा आंकडा ६७,१८४ आहे. म्हणून त्यांच्या आंकड्यांत अंदाजें ३,१९,००० चा फरक पडला असावा असें १९४१ च्या शिरगणतीच्या आधारें त्यांचें मत आहे. ख्रिस्ती लोकांची संख्या सामान्यपणें किती असावी हें त्यांनीं लिहिलें आहे. हिंदूंबाबत मात्र संख्या न देतां "हिंदूंची संख्या सामान्यतः तितक्याच प्रमाणांत आहे" येवढ्या शेऱ्यावरच त्यांनीं काम भागविलें आहे.

१९४१ सालांतील हिंदी शिरगणतीचे प्रमुख अधिकारी मि. एम्. डब्ल्यू. एम्. यीटस् हे वन्य जातींची नोंद धार्मिक पायावर न करतां त्यांच्या मूळ जातीप्रमाणेंच करण्याची काय आवश्यकता आहे, हें समजावून सांगतांना पुढें लिहितात, 'वस्तुस्थिति अशी आहे कीं, मुसलमान, ख्रिस्ती या धर्मांत आणि इतर धर्मांत अशी एक तटबंदी आहे कीं, जी धर्मांतरित इसमास ओलांडावीच लागते. परंतु सामान्यतः वन्यधर्म म्हणून ज्यांचा मोघमपणें उल्लेख करण्यांत येतो ते धर्म व सर्वसमावेशक हिंदुधर्म यांच्यांत अशी तफावत नाहीं. या दोहोंत फक्त बरेचसें अंतर आहे. आणि एकाद्या वन्य जातींतला मनुष्य जेव्हां हिंदुधर्माच्या कोणत्या तरी जातींत धर्मांतरित होतो, तेव्हां त्यास कोणत्याहि एका विशिष्ट मतपंथाचा स्वीकार करावा न लागतां अथवा लोकसंख्येंतील एकाद्या विशिष्ट गटांत जाऊन बसावें न लागतां फक्त आपला मूळचा धर्म आणि हिंदुधर्म यांतील अंतर तोडावें लागतें.

"हें संक्रमण होण्यास पुष्कळ म्हणजे जवळजवळ एका पिढीहूनहि अधिक काल लागतो. आणि संक्रमणाची ही प्रक्रिया कोठल्या विशिष्ट कालांत किंवा पिढींत पूर्ण झाली, हें फक्त एकाद्या तज्ज्ञालाच सांगतां येईल....म्हणून हे सर्व लक्षांत घेऊनच, जातवारी व त्याप्रमाणें यांच्या कोष्टकांचें परीक्षण केलें पाहिजे. त्या दृष्टीनें ब्रिटिश हिंदुस्थानांत ६४½ टक्के हिंदू, २७ टक्के मुसलमान व १ टक्का ख्रिस्ती आणि ५½ टक्के वन्यजाती असें प्रमाण होईल. या ५½ टक्के वन्य जातींपैकीं सुमारें एकवीसांश संख्या ख्रिस्ती लोकांची भरेल. बाकीचे सर्व थोड्याफार प्रमाणांत बहुसंख्य हिंदूंशीं समरस झाले आहेत असें म्हटल्यास

वावगें होणार नाहीं. एकीकडे त्यांचे वन्य आचार पूर्ववत् चालू आहेत, तर दुसरीकडे त्यांचें हिंदुधर्माशीं पूर्ण संमीलन झालें आहे; आणि दरम्यानचे लोक संक्रमणाच्या हरएक टप्प्यावर उभे असल्याचें दिसून येतें. अर्थात् याचें प्रमाण प्रांताप्रांतांतून वेगवेगळे असून त्याबाबतचा अंदाज स्थानिक परिस्थिति पाहून करावयाचा आहे, हें मीं सांगितलेंच आहे."[१]

पुढें ते लिहितात, "वन्य जातींचा प्रश्न सोडल्यास बंगालमधील हिंदु-मुसलमानांचें प्रमाण १९३१पासून सामान्यतः कायम राहिलें आहे. बिहार, मध्यप्रांत व आसाम येथें हा वन्यजातींसंबंधींचा प्रश्न उद्भवतो ही गोष्ट खरी. परंतु वन्य जातींची वर्गवारी १९३१ प्रमाणें करावयाचें ठरविल्यास हिंदूंचें प्रमाण अगदीं अल्प अंशानेंच कमी झाल्याचें दिसून येईल"[२]

वन्य जातींचें साम्य हिंदूंशींच जास्त आहे, असें अधिकारी लोकांचें मत आहे आणि हें संक्रमण आज हजारों वर्षें प्रचंड प्रमाणावर चालू आहे. वन्य जातींची हिंदूंत समाविष्ट होण्याची ही क्रिया पूर्वापार अखंडपणें चालत आली आहे आणि आज ती जवळजवळ संपूर्णावस्थेप्रत पोंचली आहे. तेव्हां अगदीं न्याय्यपणें त्या सर्वांची, निदान १९४१ पूर्वी हिंदूंत गणल्या गेलेल्या सर्वांची, गणना हिंदू म्हणूनच व्हावयास पाहिजे होती.

मि. व्हेरियर एल्विन्, एम्. ए. हे आज अनेक वर्षें मध्यप्रांतांतील वन्य जातींत राहून त्यांचा व त्यांच्या संस्कृतीचा सखोल अभ्यास करीत आहेत. ते १९४४सालच्या दिल्ली येथें भरलेल्या इंडियन् सायन्स् कॉंग्रेसच्या ३१ व्या बैठकीच्या मानवशास्त्र व पुराणवस्तुशास्त्र या विभागाचे अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणासाठीं "मानवशास्त्रांतील सत्यकथन" हा विषय निवडला होता व मानवशास्त्र हिंदुस्थानांत प्रस्थापित व्हावें यासाठीं सर्व तद्विषयक संशोधनामध्यें अत्यंत काटेकोरपणें सत्यपालन करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं भर दिला. ते म्हणाले, "या गोष्टीवर भर दिलाच पाहिजे. कारण

१. हिंदुस्थानची शिरगणती, १९४१, खंड१लाः हिंदुस्थान,पृ.२८-२९.

२. उक्त ग्रंथ, पृ. ३०.

मानवशास्त्राकडे हिंदुस्थानांत संशयित दृष्टीनें पाहिलें जातें. याचीं कारणें अनेक आहेत. यांपैकीं एक असें कीं, कांहीं पंडितांनीं आणि राजकीय कार्यकर्त्यांनीं शिरगणतीच्या वेळीं हिंदूंपासून वन्य जातींना वेगळें काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळें पुष्कळांची समजूत अशी झाली कीं, विज्ञानशास्त्राचा उपयोग राजकीय आणि जातीय ध्येयांसाठीं केला जातो. यापूर्वीं शिगणतीच्या अधिकाऱ्यांनीं वन्यधर्म व हिंदुधर्म हे पृथक् आहेत असें मानण्याची प्रवृत्ति दाखविली. तदनंतर वन्यधर्मीय असा शब्दप्रयोग उपयोगांत येऊं लागला. त्यासाठीं त्या लोकांना 'तुम्ही हिंदू देव मानतां कीं वन्य देव मानतां' असें विचारण्यांत येई. पण हा प्रश्न निरर्थक होता. कारण, ज्यास धर्मशास्त्रवेत्ता वन्य म्हणेल, असा पुष्कळ भाग खुद्द हिंदुधर्मांत असल्यानें निदान दक्षिण भारतांतील अनेक वन्य जातींचा धर्म हिंदुधर्माची एक शाखा ठरतो, हें उघड आहे. म्हणून धर्मवार वर्गीकरणांत आदिवासींचा समावेश सुरवातीपासून हिंदूमध्येंच करावयास पाहिजे होता. दुसरें कोणतेंहि वर्गीकरण अगदीं निरर्थक आहे. वेगवेगळ्या वन्य जातींचा धर्म नेमका कोणता आहे, ही अगदीं पटाईत धर्मशास्त्रवेत्त्यांसहि समजण्यास कठिण अशी गोष्ट आहे. मग अक्षरशत्रू आणि अडाणी अशा गणकाला तर ही गोष्ट अनाकलनीयच आहे. देशाच्या राजकारणांत त्यांना न्याय्य हिस्सा मिळावा यासाठीं येथील मूळ जातींची लोकसंख्या किती आहे याची माहिती आम्हीं करून घ्यावयास हवी. परंतु त्यांची धार्मिक वा वांशिक परिस्थिति काय आहे याची नेमकी माहिती आम्हांसहि सध्यां नाहीं. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, वन्यधर्म व हिंदुधर्म यांच्यांतील भिन्नता कोणत्या प्रकारें व्यक्त करावी या किचकट प्रश्नांत मानवशास्त्रवेत्ते गुंतून पडल्यानें जनतेच्या दृष्टीनें आमच्या शास्त्राची किंमत कमी झाली आहे."[१] वरील प्रकारें शिरगणतीच्या अधिकाऱ्यांनीं घोटाळे केल्यानें त्याचा परिणाम हिंदुस्थानांत कांहीं प्रांत व संस्थानें यांतून हिंदू लोकांची संख्या व प्रमाण घटण्यांत झालेला आहे आणि ही गोष्ट त्यांनीं मान्यहि केली आहे. हिंदु-

१. एकतिसाव्या हिंदी शास्त्रीय परिषदेचें कामकाज, १९४४, पृ. ९१.

स्थानच्या शिरगणतीचे मुख्याधिकारी मि. यीट्स यांनीं दाखवून दिलें आहे, कीं, "वन्य जातींच्या प्रश्नाचा मुसलमानांच्या संख्येवर कांहीं परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. पूर्वीच्या दशकांत झालेली उत्तरोत्तर वाढ येथें नमूद झालेली आहे. त्याचीं कारणें या वर्षाच्या अहवालांत सविस्तरपणें सादर केलेलीं आहेत. बंगालच्या परिस्थितींत फारसा फरक झालेला नाहीं. पंजाबमध्यें ही (मुसलमानांची) वाढ अर्धा ते एक टक्क्याइतकी झाली आहे. परंतु सर्वांत उल्लेखनीय वाढ आसाममध्यें झाली असून मैमनसिंग व पूर्व बंगालमधून येथें मुसलमानांनीं देशांतर केल्याचा हा दृश्य परिणाम आहे."[१]

१७ व्या कोष्टकांत आसामच्या लोकसंख्येंतील महत्त्वाच्या वर्गवारीचें प्रमाण दिलेलें आहे. हिंदूंच्या संख्येंत एकदम घट झालेली दिसण्याची कारणें वर दिलीं आहेतच. मुसलमानांच्या संख्येंत सतत वाढ होत आलेली आहे हेंहि त्यावरून दिसून येईल. १९०१ मध्यें ब्रि. आसामांत त्यांचें प्रमाण २६·८९ टक्के होतें, तें १९४१ सालीं ३३·७३ टक्क्यापर्यंत वाढल्याचें दिसतें. याचें कारण पूर्व बंगालमधून, विशेषतः मैमनसिंग जिल्ह्यांतून, आसाममधील जिल्ह्यांत येत असलेला मुसलमानांचा ओघ हेंच होय. १९३१च्या शिरगणतीच्या अहवालांत या प्रश्नाच्या विवेचनासाठीं एक संपूर्ण प्रकरण खर्च करण्यांत आलें आहे. त्यांत असें दाखविलें आहे कीं, या ओघांत तीन मुख्य प्रवाह आहेतः (१) आसामच्या चहाच्या मळ्यांत कामासाठीं आलेल्या लोकांचा; (२) पूर्व बंगालमधील वसाहतींमधून आलेल्या लोकांचा; व (३) नेपाळमधून आलेल्या लोकांचा. आसाममधील १९३१ च्या शिरगणतीचे प्रमुख मि. सी. एस्. मुलन, आय्. सी. एस्. हे लिहितात कीं, "सध्यांच्या शिरगणतींत मात्र एक मोठा बदल झालेला आहे. पूर्वीच्या दशकांतहि बंगालमधून आसाममध्यें जनौघ येत होता. परंतु पूर्वीं ज्या प्रांतांतून मजुरांची आयात होत असे तेथून

---

१. हिंदुस्थानची शिरगणती, १९४१, खंड, १ ला : हिंदुस्थान, पृ. २९ वरील कोष्टकें.

त्या प्रमाणांत आतां आयात होत नाहीं."[1] पूर्व बंगाल्यांतून आसाममध्यें येणाऱ्या जनौघाबद्दल आसामच्या शिरगणतीच्या अहवालांतील एक मोठा उतारा येथें देणें आवश्यक वाटतें.

"या प्रांतांत गेल्या पंचवीस वर्षांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जमिनीच्या शोधार्थ निघालेला बंगाली जनतेचा ओघ ही होय. हे लोक बहुशः पूर्व बंगाल, विशेषतः मैमनसिंग जिल्हा येथील असून ते बहुतेक मुसलमान आहेत. १८२० सालीं आलेल्या ब्रह्मी जनौघामुळें आसामाचें सामाजिक व सांस्कृतिक नुकसान जसें झालें, तसेंच, किंबहुना त्यापेक्षांहि निश्चित स्वरूपाचें नुकसान या ओघामुळें होईल व आसामचें भवितव्य आजिबात पालटून जाईल असा संभव दिसतो. हा ओघ १९११चे पूर्वींपासून सुरू झाला व या आक्रमणाचा पहिला उल्लेख त्या वर्षीच्या शिरगणतींत आढळतो. परंतु आतां आपणांस माहिती झाल्याप्रमाणें १९११ सालीं गोलपारा जिल्ह्यांतील प्रथमच गणना झालेले हे लोक म्हणजे त्यांच्या पाठोपाठ सैन्याप्रमाणें प्रचंड संख्येंत येऊं घातलेल्या लोकांचे केवळ मार्गदर्शक अथवा बिनीचें पथक होतें. १९२१ पर्यंत आसाममध्यें प्रविष्ट झालेल्या या पहिल्या जथ्यानें सर्व गोलपारा जिल्हा व्यापला होता. १९११ व २१च्या दरम्यान काय घडलें त्याचें वर्णन १९२१ च्या शिरगतीच्या अहवालांत खालीलप्रमाणें केलें आहे: '१९११मध्यें पूर्व बंगालमधील कांहीं शेतकरी गोलपाऱ्याच्याहि पलीकडे जाऊन ठेपले होते. आसाम–खोऱ्यांतील इतर जिल्ह्यांत गणना झालेले जे कांहीं थोडे हजार लोक होते ते बहुतेक कारकून, व्यापारी किंवा इतर धंदेवाले होते. गेल्या दशकांत (१९११–२१) खोऱ्यांतील पार टोकांपर्यंत त्यांची प्रगति झाली आहे. मध्य आणि दक्षिण भागांतील चारी जिल्ह्यांत त्यांचें प्रमाण बरेंच आहे. शिबसागर व लखीमपूर या दोन उत्तरेकडील प्रदेशांत मात्र त्यांचा शिरकाव अद्यापि झालेला नाहीं. गोलपारामधील जवळजवळ २० टक्के संख्या या नवागतांची

---

१. हिंदुस्थानची शिरगणती, १९३१, खंड ३ रा: आसामचा अहवाल, भाग १ ला, पृ. ४४.

आहे. त्यानंतर नौगांग जिल्ह्यांत त्यांचें प्रमाण सुमारें १४ टक्के आहे. कामरूपमधील विशेषतः बारपेटा या उपविभागांतील ओसाड प्रदेश झपाट्यानें त्यांचे हातीं पडत आहेत. दारंग जिल्ह्यांत त्यांची वसाहत अजून प्रथमावस्थेंत असून ब्रह्मपुत्रेच्या किनाऱ्यापलीकडे फार दूरपर्यंत त्यांचे हात अद्यापि पोहोंचूं शकले नाहींत. आसामकडे येणाऱ्या प्रत्येक आगगाडींत व बोटींत त्यांचे थवे असतातच. त्यामुळें लौकरच त्यांचा मोर्चा खोऱ्याच्या वरच्या टोंकापर्यंत नदी-किनाऱ्यापासून दूरवर पोहोंचेल असें दिसतें.'

"आतां १९२१ पासून या आक्रमणाची प्रगति कोठवर आली आहे तें पाहूं. प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आसामध्यें प्रवेश केल्यानंतरच्या नवजात बालकांची 'आसामी' म्हणूनच गणना करण्यांत आलेली आहे; म्हणून खालीं दिलेल्या कोष्टकांत त्यांचा आंकडा समाविष्ट केलेला नाहीं. शिवाय त्यांत नुसत्या वसाहतवाल्यांचाच नव्हे, तर सर्वच्या सर्व बंगाली लोकांचा समावेश केलेला आहे. तरीपण गेल्या दहा वर्षांत परिस्थिति कशी बदलत गेली याची कल्पना आपणांस स्थूलमानानें येईल.

## कोष्टक १८.

आसाम खोऱ्यांमधील प्रत्येक जिल्ह्यांतील, बंगालमध्यें जन्मास आलेल्यांची १९११, १९२१, व १९३१ मधील संख्या (मै.=मैमनासिंग जिल्हा. आंकडे हजारांत आहेत.)

| जिल्हा | १९११ | १९२१ | १९३१ |
|---|---|---|---|
| गोलपारा | ७७ (मै. ३४) | १५१ (मै. ७८) | १७० (मै. ८०) |
| कामरूप | ४ (मै. १) | ४४ (मै. ३०) | १३४ (मै. ९१) |
| दारंग | ७ (मै. १) | २० (मै. १२) | ४१ (मै. ३०) |
| नौगांग | ४ (मै. १) | ५८ (मै. ५२) | १२० (मै. १०८) |
| शिबसागर | १४ (मै.०) | १४ (मै.०) | १२ (मै.०) |
| लखीमपूर | १४ (मै.०) | १४ (मै.०) | १९ (मै.२) |

"मैमनसिंग जिल्ह्यांतूनच मुख्यतः लोकांची आवक असल्यानें प्रत्येक आंकड्यापुढें मैमनसिंग जिल्ह्याचा आंकडा कंसांत दिला आहे.

"हे आंकडे मोठे विस्मयकारक आहेत आणि त्यामुळें दक्षिण आसाममधील जिल्हे ही मैमनसिंग जिल्ह्याचीच एक वसाहत कशी होत चाललेली आहे, तें दिसून येईल......मीं मागेंच असे उद्गार काढले आहेत कीं १९२१ च्या सुमारास आसाममध्यें प्रविष्ट झालेल्या या जथ्यानें सर्व गोलपारा जिल्हा जिंकून घेतला होता. १९२१–३१ मध्यें त्यांच्या पाठोपाठ आलेल्या दुसऱ्या जथ्यामुळें या लोकांचें आसन गोलपारा जिल्ह्यांत भक्कम झालें आणि नौगांग जिल्ह्याचें आक्रमण पूर्ण झालें. कामरूपमधील बारपेटा उपविभागहि पूर्णपणें त्यांचे कबजांत गेला आहे आणि दारंगवर त्यांची चढाई सुरू आहे. शिबसागर जिल्हा मात्र अजून त्यांचे तडाख्यांतून वांचलेला आहे. परंतु उत्तर-लखीमपूरमध्यें असलेले जे मैमनसिंगी आहेत, त्यांच्या सहाय्यानें पुढील दशकांत फार मोठया हालचाली होण्याचा संभव आहे....

"(आसाममध्यें जन्माला आलेलीं त्यांचीं मुलें जमेस धरून) या पूर्व बंगाली वसाहतवाल्यांची संख्या निश्चितपणें किती आहे, याची गणना करणें अवघड आहे. मि. लॉइड् यांनीं १९२१सालीं असा अंदाज केला होता कीं, आसाम प्रांतांत हे लोक आल्यानंतर त्यांच्या मुलांसकट त्यांची एकूण संख्या निदान ३ लाख तरी असावी. माझ्या कल्पनेप्रमाणें आतां हा आंकडा निदान पांच लाख तरी झाला असावा. त्यांतील नवीन आलेल्या लोकांची संख्याच निदान १,४०,००० असेल, आणि जुन्या वसाहतवाल्यांची संख्याहि अर्थातच वाढलेली असेल हें निःसंशय. १९२१च्या अहवालाप्रमाणें हे वसाहतवाले सडे न येतां सहकुटुंब येऊन आपलें बस्तान बसवीत असतात. मैमनसिंग जिल्ह्यांत जन्म-लेल्या व आसाममध्यें गणना झालेल्या ३,३८,००० संख्येपैकीं १,५२,००० स्त्रिया आहेत यावरून वरील विधानास पुष्टी मिळते. भविष्यकाळांत कोणती परिस्थिति निर्माण होईल? सध्यांच्या स्थितीवरून निष्कर्ष काढतां असें म्हणतां येईल कीं, ही चढाई अजून पूर्ण झालेली नाहीं. कारण आसाममध्यें विशेषतः

लखीमपूरच्या उत्तरी उपविभागांत अजूनहि पुष्कळ प्रदेश ओसाड पडलेले असून कामरूपमध्यें जरी गेल्या दहा वर्षांत अनेक लोकांनीं वसाहती केल्या असल्या, तरीहि तेथें अजूनहि पुष्कळ लोक बसूं शकतील. त्याचप्रमाणें मंगलादाय उपविभागांतहि आणखी लोकांसाठीं जागा होईल. गोलपारा व नौगांग जिल्ह्यांतील सर्व जागा व्यापली गेली असल्यानें साहजिकच हा ओघ आतां कामरूप, मंगलादाय व उत्तर लखीमपूर या जिल्ह्यांकडे वळेल. तेथें नांगरणीची वाट पहात भलें मोठें क्षेत्र पडलेलें आहे ही गोष्ट त्यांच्या कानीं पडण्याचा अवकाश, कीं या प्रदेशावर ते टोळधाडीप्रमाणें तुटून पडतील !

"ही गोष्ट दुःखदायक पण अगदीं शक्य आहे, कीं तीस वर्षांनंतर शिबसागर हा आसामचा एकच जिल्हा असा राहील, कीं जेथें आसामी इसमाला आपण स्वप्रांतांत आहोंत असें वाटेल."[१]

या बाबतच्या १९४१च्या शिरगणतीच्या अहवालाच्या अखेरीला एक छोटेंच पण अर्थपूर्ण वाक्य असून तें वर उद्धृत करण्यांत आलेंच आहे. तें असें कीं, "सर्वांत उल्लेखनीय वाढ (मुसलमानांची) आसाममध्यें आहे आणि पूर्व बंगालमधून विशेषतः मैननसिंग येथून मुसलमानांनीं मोठ्या प्रमाणावर देशांतर केल्याचा हा दृश्य परिणाम होय."[२]

बंगालमधील मुसलमानांनीं आसाममध्यें वसाहती करून तो प्रदेश व्यापावयाचा हें धोरण आसाममधील सर सादुल्ला यांचें लीग–मंत्रिमंडळ व बंगालमधील सर नझिमुद्दिन यांचें मंत्रिमंडळ यांच्या संयुक्त मार्गदर्शनानुसार चालविण्यांत येत होतें. आक्टोबर १९४४च्या शेवटच्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या खालील 'कम्युनिक्'वरून हें विधान सिद्ध होईल.

आसाम सरकारनें २१ जून १९४०च्या ठरावानें, १ जानेवारी १९३८ नंतर आसाममध्यें आलेल्या बाहेरील लोकांशीं जमिनीचे व्यवहार करण्यास

१. हिंदुस्थानची शिरगणती, १९३१, खंड ३ राः आसामचा अहवाल, भाग १ ला, पृ. ४९–५२. २. हिंदुस्थानची शिरगणती, १९४१, हिंदुस्थान, पृ. २९ वरील कोष्टकें.

मनाई केलेली होती. लागवडीच्या प्रदेशांची अतिशय चणचण असल्यानें जेथून आसाममध्यें जमिनीच्या शोधार्थ लोक येतात, अशा मैमनसिंगसारख्या हद्दीवर असलेल्या परप्रांतीय जिल्ह्यांवर या ठरावाचा परिणाम झाला. आसाम सरकारनें काढलेल्या या हुकुमामुळें त्यांच्या (बंगालच्या) शेतकऱ्यांची जी गैरसोय होते ती दूर करण्यासाठीं व सांप्रतचीं सर्व बंधनें काढून टाकण्यासाठीं हिंदुस्थान–सरकारला आग्रह करण्याची गव्हर्नरसाहेबांना विनंति करणारी एक सूचना बंगालच्या वरिष्ठ कायदेमंडळांच्या गेल्या बैठकींत पास करण्यांत आली. त्याप्रमाणें शेतकऱ्यांची गैरसोय दूर करण्यासाठीं व आंतरप्रांतीय सलोखा राखण्याकरितां, उपरोक्त ठरावानें कायद्यांत असलेलीं बंधनें काढून टाकण्यांत वा स्थगित करण्यांत यावी, अशी विनंति बंगाल–सरकारनें आसाम–सरकारला केली.

"आसाम सरकारनें त्यास असें उत्तर धाडलें आहे कीं, बाहेरील लोकांनीं येथील जमिनीवर वसाहत करण्यासंबंधींचें धोरण शिथिल करण्यांत आलें आहे. तसेंच धंदेवायिकांसाठीं राखून ठेवलेल्या कुरणांच्या अतिरिक्त जामिनी नवागतांची गैरसोय होऊं नये म्हणून मोकळ्या करण्यांत येत आहेत. मात्र वरील बंधनें पूर्णतया काढून टाकण्यास आसाम–सरकार असमर्थ आहे.कारण, विशेषतः जेथें वन्य जातींचें प्रमाण पुष्कळ आहे तेथें, बाहेरील लोकांनीं येऊन वसाहती केल्यानें त्या वन्य जातींचें पूर्वीं नुकसान झालेलें असल्यामुळें ते या नवागतांकडेहि साशंक दृष्टीनें पाहतात. परंतु आसाम–सरकारनें असें आश्वासन दिलेलें आहे कीं, हीं बंधनें क्रमशः काढून टाकण्याचें, स्वप्रांतीयांसाठीं जामिनी राखण्याचें, व वन्य जातींच्या संरक्षणाचें धोरण कायम ठेवून शक्य तों या लोकांसाठीं नवीन नवीन पडित जामिनी देण्यांत येतील."

सर सादुल्ला यांच्या पूर्वींच्या मंत्रिमंडळानें जी एक संवर्धन–योजना आणली होती, तिचा सर्व बाजूनें विचार करून आसामचे भूतपूर्व गव्हर्नर यांनीं ती झिडकारून लावली. ही गोष्ट स्पष्ट आहे कीं, ही योजना झिडकारण्यामागें जी भूमिका होती, तिच्या विरुद्ध वर्तन सादुल्ला–मंत्रिमंडळानें सदर ठराव मांडून केलें आहे. नुकत्याच लिहिलेल्या एका लेखांत सर रीड म्हणतात, "आसाममध्यें

पूर्वीपासून स्थायिक झालेल्या तत्प्रांतीय वन्य जातींना, आसाम खोऱ्याच्या प्रदेशांत बंगाल्यांतील मैमनसिंगच्या मुसलमानांच्या फार मोठया लाटेनें बुडवून जरी टाकलें नसलें, तरी त्यांचा तेथें पूर खास लोटला आहे."

यामुळें मुसलमानांना जरी आनंद होत असला, तरी हिंदूंना तसा आनंद होणें शक्य नाहीं. कारण, आसाममध्यें मुसलमानांची संख्या जसजशी वाढत जाईल, तसतशी पाकिस्तानवाल्यांची बाजू बळकट होणार.[1] तद्देशीय लोकांचें स्वास्थ्य सुरक्षित रहावें, व राखीव कुरणांचा प्रदेश अबाधित रहावा म्हणून जी एक विशिष्ट सीमा आंखून दिलेली होती, तेथपर्यंत हा हल्ला आहे असें नव्हे; तर तो ब्रिटिश सत्ता येथें कायम झाल्यापासून परवांपर्यंत ज्यांचेवर आक्रमण झालेलें नव्हतें अशा या सीमेच्या पलीकडील प्रदेशावरहि आहे. हेच प्रदेश कुरणांसाठीं राखून न ठेवतां या नवागतांसाठीं मोकळे करण्यांत येत आहेत.

आसाम–सरकारनें जें पत्रक काढलें आहे तें याच कुरणांबाबत असून त्यांत उत्तरोत्तर बंधनें दूर करण्याचें व या नवागत लोकांना वाव देण्याचें आश्वासन दिलें आहे.

हिंदू व वन्य जातीहि ज्याचें महत्त्व विसणार नाहींत, असा हा आसामी हिंदूंवर दुहेरी हल्ला आहे. जो प्रदेश हातचा जाऊं देणें हिंदूंना इष्ट नाहीं आणि ज्याची त्यांना आत्यंतिक आवश्यकता आहे, असा कुरणांसाठीं राखून ठेवलेला प्रदेश पूर्व बंगालमधील, विशेषतः मैमनसिंगामधील नवागत मुसलमानांसाठीं राखून ठेवावयाचा, हा हल्ल्याचा एक भाग होय. आणि त्याचबरोबर वन्य जातींना हिंदूंपासून अलग करून हिंदूंची संख्या कमी करावयाची, त्यांना अल्पसंख्य बनवावयाचें आणि निदान असें दाखवावयाचें कीं, कोठल्याहि एका धर्माचे लोक बहुसंख्य नाहींत, हा त्या हल्ल्याचा दुसरा भाग होय. यांत सर्वांत गमतीची गोष्ट अशी आहे कीं, १९४१ च्या शिरगणतीचे कमिशनर मि. यीटस् हे वन्य जातींची वेगळी गणना करणें योग्य आहे असें म्हणतात. आणि त्याला

१. १९ डिसेंबर १९४४ च्या 'हिंदुस्थान स्टँडर्ड'मध्यें प्रसिद्ध झालेल्या 'आसाममध्यें होत असलेल्या देशांतराची पार्श्वभूमि' या लखांत उद्धृत.

कारण काय, तर म्हणे हिंदुस्थान–सरकारचीं ९१ व ९२ हीं कलमें ज्यांच्या फायद्यासाठीं अमलांत आणलीं आणि पूर्णतः वा अंशतः राखीव अशा कुरणांची जागा गव्हर्नरांच्या खास जबाबदारीखालीं ज्यांच्यासाठीं ठेवली, त्या वन्य जातींची संख्या तरी किती आहे तें पाहिलें पाहिजे.[१]

आसाममधील या राखीव जागांबाबतची गव्हर्नरची जबाबदारी कशी पार पाडली जात आहे, हें आसामचे एक अनुभवी आय्. सी. एस्. अधिकारी श्री. एस्. पी. देसाई यांच्या पुढील अहवालावरून दिसून येईल : ‘आसामच्या जमीन आणि धारा कायद्याचें अस्तित्व या देशांतरित लोकांपुरतें तरी निदान जवळ जवळ संपुष्टांतच आलें आहे. आम्हीं स्थानिक अधिकारीवर्गाला ‘बनविलें’ असा त्यांचा उघड दावा आहे. या राखीव जागांमध्यें हरघडी नित्य नवीन बांबूंच्या झोंपड्या व आसरे उभारण्यांत येत आहेत. मला दिसून आलें आहे कीं, हे लोक प्रांतापासून सरसकट सर्व अधिकाऱ्यांकडे इतकें दुर्लक्ष करितात कीं, त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचीहि ते कदर बाळगीत नाहींत. तेथें जे थोडे नेपाळी गुराखी व आसामी ‘पामुआ’ लोक आहेत ते दुसऱ्या कोठूनहि रक्षण मिळण्याची आशा खुंटल्यामुळें बादशहानें तरी आपलें रक्षण करावें असें म्हणतात. याला नवागत लोकांपैकीं कांहींनीं अविचारीपणानें अशीं उत्तरें दिल्याचें ऐकिवांत आहे कीं, “आम्हीच बादशहा आहोंत!” आसामी लोकांच्या अपमानाचा हा प्याला आतां कांठोकांठ भरलेला आहे. आसामचा कायदा हा नवागत लोकांसाठीं नसून आपल्यासाठीं आहे अशी त्यांची समजूत आहे. परंतु त्यांच्या हितसंबंधाचे विश्वस्त अशा या सरकारनें त्यांना फशीं पाडलें आहे असें त्यांना वाटतें. जनतेंतील सर्व थरांतून भीतिग्रस्तता पसरलेली असून त्यांच्या बोलण्यांतून त्याचीं पाळेंमुळें किती खोलवर गेलीं आहेत तें दृग्गोचर होतें.’[२]

---

१. हिंदुस्थानची शिरगणती, १९४१, खंड १ लाः हिंदुस्थान, पृ. २८–वरील कोष्टकें. २. १९ डिसेंबर १९४४च्या ‘हिंदुस्थान स्टँडर्ड’मध्यें प्रसिद्ध झालेल्या ‘आसाममध्यें होत असलेल्या देशांतराची पार्श्वभूमि’ या लेखांत उद्धृत.

मुस्लिम–लीगच्या मंत्रिमंडळाचें उत्तेजन व कायदे–मंडळांतील नवागतांच्या प्रतिनिधींचें सहाय्य मिळाल्यानें या लोकांनीं निरनिराळ्या तऱ्हेचें बेकायदेशीर वर्तन बेधडकपणें करण्यास सुरवात केली. जनावरांना जखमी करणें, धनगरांच्यावर हल्ले करणे, कांहीं वेळां त्यांचे खूनहि करणें वगैरे प्रकार करण्यासहि त्यांनीं सुरवात केली. अर्थात् यामुळें सर्व देशभर तिटकाऱ्याची लाट पसरली. नोव्हेंबर १९४४ च्या आसामच्या कायदे–मंडळाच्या बैठकींत जवळजवळ अडीच वर्षांनंतर प्रथमच बनविण्यांत आलेल्या संमिश्र विरोधी पक्षाकडून सरकारवर सडकून टीका करण्यांत आली. आणि जनतेंत पसरलेला हा गंभीर असंतोष शमविण्यासाठीं, जमीनधारणेच्या पद्धतीचा प्रश्न पूर्णपणें सोडवतां यावा व त्याबाबत सरकारला कांहीं उपाय योजतां यावेत यासाठीं, एक परिषद् बोलावण्यांत यावी अशीहि एक सूचना सर महमद सादुल्ला यांचेपुढें मांडण्यांत आली. स्वतः गव्हर्नरनें कायदे–मंडळांत याबाबत भाषण करून वेगवेगळ्या जातींत सौख्य आणि शांति नांदावी अशी इच्छा प्रदर्शित केली. सर सादुल्ला यांनीं विरोधी पक्षाची ही सूचना मान्य केली आणि त्याप्रमाणें डिसेंबर १९४४ मध्यें एक परिषदहि बोलावण्यांत आली. परिषदेंत जमीनधारणेच्या समग्र प्रश्नाचा दोन मुख्य मुद्द्यांना धरून खल करण्यांत आला: (१) नवागत लोकांप्रमाणेंच आसाममधील जमीन नसलेल्या स्थानिक लोकांनाहि ओसाड जमिनीचा वाटा देण्याबाबत धोरण आंखणें. (२) अतिक्रमण केलेल्या लोकांना घालवून देऊन राखीव कुरणांचें अस्तित्व अबाधित ठेवणें. परंतु परिषदेनंतर १९४५ च्या जानेवारींत जे कायदे करण्यांत आले, त्यांत परिषदेमध्यें मान्य करण्यांत आलेल्या संरक्षक बंधनांचा समावेश नव्हता. कांहीं कायदे तर या निर्णयाच्या मूलभूत तत्त्वांविरुद्ध होते. उदा० परिषदेचा निर्णय असा होता कीं १९३८ पूर्वी आलेल्या व स्थायी झालेल्या नवागतांनाच जमिनीबाबत हक्क द्यावेत. परंतु सरकारी कायद्यांत मात्र १९३८ नंतरहि आलेल्या कांहीं परप्रांतीय उपऱ्यांचा अपवादादाखल समावेश केला होता, आणि त्याबाबत तारतम्य वापरण्याची जबाबदारी स्थानिक अधिकाऱ्यांवर

सोपवली होती. ओसाड प्रदेशांबाबत असा नियम करण्यांत आला कीं 'ज्यांच्या ताब्यांत पांच बिघे जमीन आहे त्यांचा कोठल्याहि तऱ्हेनें नवीन जमिनीवर हक्क पोंचत नाहीं.' तत्प्रांतीय शेतकऱ्याजवळ पांच बिघे जमीन असली, तरी आर्थिक दृष्ट्या ती अपुरी असल्यानें या कायद्यामुळें त्यालाहि एक मोठीच अडचण निर्माण झाली. त्याचप्रमाणें जो प्रदेश वन्य जातींसाठीं राखून ठेवावयाचा तोहि निश्चित करण्यांत आलेला नव्हता. त्यामुळें पुष्कळ अनिश्चितता व घोटाळे निर्माण होण्याचा संभव होता. मार्च १९४५ च्या कायदे—मंडळांतील बैठकींत हा प्रश्न पुनः हातीं घेण्यांत आला. या वेळपर्यंत विरोधीपक्षाचें बळ वाढलें होतें आणि पराजय होऊन राजीनामा द्यावा लागेल या भीतीनें सर सादुल्ला यांनीं विरोधी पक्षाशीं तडजोड केली. त्यांनीं त्यांच्या मंत्रिमंडळांतील लीगचा महसूलमंत्री काढून टाकण्यास संमति दिली आणि विरोधी पक्षानें नेमलेल्या इसमास त्या पदावर नेमण्याचें कबूल केलें. असेंब्ली तहकूब झाल्यानंतर मात्र तडजोड शक्य तों लौकर अमलांत आणण्याऐवजीं नवीन ठराव प्रसिद्ध करण्यासच त्यांनीं तीन महिने लाविले. सध्यांची बातमी अशी आहे कीं, ते आणि त्यांचे लीगमधील सहकारी हे ती तडजोड अमलांत आणण्याच्या कामांत शक्य ते अडथळे आणीत आहेत. अशीहि वदंता आहे कीं मुस्लिमलीगचे पुढारी ज. जिना हे मंत्रिमंडळानें अनुसरावयाच्या तडजोडीच्या संपूर्णतया विरुद्ध अशा सूचना पाठवीत आहेत. दरम्यान कायदेमंडळ बरखास्त होण्याचाहि संभव दिसत आहे आणि म्हणून यापुढें काय घटना घडतील तें आतांच सांगतां येणार नाहीं.

इतकें असूनहि सर्व प्रांताची संख्या पाहिल्यास त्यांत मुसलमानांपेक्षां हिंदूंचीच संख्या अधिक आहे. हिंदूंत वन्य जातींचा समावेश केल्यास होणारें संख्याधिक्य तर याहूनहि जास्त आहे. हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, लीगच्या ठरावांत दोनहि विभागांतील घटक स्वायत्त व सार्वभौम राहतील असें म्हटलें आहे. तेव्हां मुसलमानांची संख्या आसाममध्यें फक्त ३३·७३ टक्के असतांना व तेथें मुसलमानेतरांचें संख्याधिक्य असतांना आसाम हा मुसलमानी प्रांत

कसा होऊं शकतो हें समजणें कठिण आहे. जर कांहीं होणारच असेल, तर तें मुसलमानेतरांचें स्वायत्त व सार्वभौम राज्य होऊं शकेल. परंतु जर मुसलमानांची बहुसंख्या असलेला सिल्हेट जिल्हा आपण बाजूला काढला, तर त्याचें इतर सर्व जिल्ह्यांशीं प्रमाण १६ व्या कोष्टकांत दाखविल्याप्रमाणें होईल.

परंतु पाकिस्तानच्या जनकांच्या डोक्यांत अनंत युक्त्या सांठविलेल्या आहेत. खालील कारणांस्तव आसामचा मुसलमानी प्रांतांत समावेश व्हावा, असा युक्तिवाद ते मांडीत असतातः—

(१) मुसलमान–बहुसंख्य असलेल्या टापूंत आसाम प्रांत आहे.

(२) आसाममधील मुसलमानेतरांपैकीं बहुसंख्य वस्ती वन्य जातींची आहे.

(३) आसाममध्यें मुसलमान बहुसंख्य आहेत हा निष्कर्ष खालीलप्रमाणें निघतोः आसामची लोकसंख्या १ कोटी ९ लाख आहे. यापैकीं फक्त ४५ लाख किंवा ४१·५ टक्के वस्ती वन्य जातींची आहे. या वन्य जाती कोठल्याहि सुधारलेल्या राज्यांत राहण्यास नालायक आहेत, म्हणून घटनात्मक सर्व चर्चांतून त्यांना गाळलें पाहिजे. अल्पसंख्याकांचे सनदशीर हक्क सुधारलेल्या लोकांनाच म्हणजे ८० लाख लोकवस्तीच्या हिंदू व मुसलमान यांनाच मिळणें योग्य आहे. आसामच्या चहाच्या मळ्यांतून व तेलाच्या विहिरींतून काम करण्यासाठीं लोकसंख्येचा बराचसा भाग गुंतलेला आहे. परंतु हे लोक स्थायिक नसलेले, भटक्ये असे आहेत. आणि म्हणून या उपऱ्या मागासलेल्या लोकांना घटनात्मक विचार करतांना गाळणें आवश्यक आहे. त्यांची संख्या १५·२ लक्ष आहे. तेव्हां ८० लाख सुधारलेल्या लोकांतून हे १५ लाख कमी केल्यास ६५ लाख लोक राजकीय हक्क घेण्यास लायक असे उरतात. म्हणून ३४,७५,००० लोकसंख्या असलेले मुसलमान हे प्रांतांत बहुसंख्य आहेत.

(४) बंगालच्या हद्दीवरील जे शेतकरी उत्तर खोऱ्यांतील ओसाड जमीनींत वस्ती करावयास आले आहेत, ते बहुतेक मुसलमान आहेत. त्यांच्या आर्थिक आणि इतर सुव्यवस्थेसाठीं मध्यमवर्गीयांचा–हिंदूंचा–भरणाहि तेथें होत असून ते व्यापारी, दुकानदार, महाजन, डॉक्टर वगैरे धंद्यांतील आहेत. थोडक्यांत म्हणजे पूर्व बंगालमधील जिल्ह्यांचाच आसाममध्यें विस्तार होत आहे.

(५) नुसत्या प्रांतांतच नव्हे, तर प्रत्येक विभागांतूनहि मुसलमानांचें संख्याधिक्य आहे. सुरमाखोऱ्याचे विभागांत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ५१ आहे. वन्य जाती सोडल्यास मुसलमानांचें राजकीय हक्कास लायक असलेल्यांशीं प्रमाण ६५ टक्के होतें. आसाम खोऱ्यांतील जिल्ह्यांत हिंदूंचें प्रमाण फक्त ४७ टक्के असल्यानें ते उघडच अल्पसंख्य आहेत. परप्रांतीय बहुतेक सर्व लोक आसाम खोऱ्यांतच काम करीत असल्यानें आणि ते सर्व हिंदू असल्यानें तेथील मूळ हिंदू रहिवाशांचें प्रमाण शेंकडा १२·९८ आहे. अर्थात् येथेंहि राजकीय हक्कांस लायक असलेल्यांत मुसलमानांचें संख्याधिक्य आहे.[1]

(६) पूर्वेकडील पाकिस्तानला त्यांतील प्रचंड लोकसंख्येसाठीं जास्ती जमिनीची आवश्यकता आहे आणि ती गरज आसाम भागवील.

(७) आर्थिक आणि सांपत्तिक दृष्टया बलाढय व्हावयाचें असल्यास पूर्व पाकिस्तानमध्यें दाट जंगलांनीं, आणि कोळसा, तेल इत्यादि खनिज संपत्तीनें युक्त असलेल्या आसामचा समावेश केलाच पाहिजे.

(८) आसाममधील बहुसंख्य लोकांची भाषा बंगाली आहे.

आतां आपण या कारणांचा विचार करूं या.

नं. १:—एकाद्याची अशी कल्पना होईल कीं, जेथें मुसलमान बहुसंख्य आहेत, तो मुसलमानी विभाग असें समजावयाचें. परंतु येथें कांहीं वेगळाच प्रकार दिसतो. कारण केवळ मुसलमानी प्रदेशांच्या कक्षेंत एकादा प्रांत येत असेल, तर मुसलमान अल्पसंख्य असूनहि त्या प्रदेशाचा पाकिस्तानांत समावेश व्हावा, अशी लीगची अपेक्षा दिसते.

नं. २:—केवळ चर्चेखातर वन्य जाती या हिंदू नाहींत असें मानलें, तरीसुद्धां आसामच्या मुसलमानेतरांमध्यें वन्य जातींचें संख्याधिक्य नसून हिंदूंचेंच आहे.

---

१. मुजिबुर रहमान : पूर्वेकडील पाकिस्तान—तेथील लोकसंख्या, सीमा आणि अर्थशास्त्र. एच्. एन्. बारुआ यांच्या 'आसाम व पाकिस्तानवरील विचार' या पुस्तकांतील उतारा, पृ. ८२—८३.

नं. ३ आणि ५:—ज. मुजिबुर रहमान यांनीं दिलेले आंकडे गृहीत धरले तर असें दिसतें कीं, २९ लक्ष वन्य जातींच्या लोकांना हिंदूंपासून तर वेगळें काढलेंच, पण त्यांना राजकीय सुधाणेच्या दृष्टीनें त्यांनीं नालायकहि ठरवून टाकलें ! त्यामुळें "सुधारलेल्या" लोकांचा आंकडा १०९ लक्षांवरून ८० लक्ष इतका खालीं आला आहे. तरीसुद्धां ४५ लक्ष हिंदूंचें तेथें निर्विवाद संख्याधिक्य आहे. निदान ३४,७५,००० मुसलमानांपेक्षां तर ते संख्येनें अधिक आहेत हें निश्चित. चहाच्या मळ्यांतून व तेलाच्या खाणींतून काम करणारे आणखी १५·२ लक्ष हिंदू वजा केले तरच मुसलमानांचें सनदशीर-रीत्या संख्याधिक्य दाखवितां येईल, आणि मग मात्र आसाम हा मुसलमान बहुसंख्य प्रांत बनेल खरा ! आंकडेशास्त्राच्या जादुगिरीची याहून अधिक कल्पना करणें अशक्य आहे !

या युक्तिवादांतील दोष एवढाच कीं, हिंदूंची संख्या कमी करण्याचे हेच मार्ग जर उपयोजिले, तर अखिल हिंदुस्थानांतहि हिंदू अल्पसंख्य आहेत असें दाखवितां येईल ! पण मग सर्व हिंदुस्थानचेंच पाकिस्तान होऊन जाईल, आणि मग हिंदुस्थानच्या ईशान्य व वायव्य प्रदेशाचे लचके तोडून त्यांचें पाकिस्तान बनविण्याची जरूरच राहणार नाहीं !

नं. ४, ६, आणि ७:—आसामजवळ जमीन आहे आणि त्या जमिनीची पाकिस्तानला आवश्यकता आहे. आसामजवळ जंगलें, खाणी, पेट्रोल, कोळसा आणि इतर नैसर्गिक पुरवठा आहे आणि त्याची पाकिस्तानला जरुरी आहे. एवढीं कारणें पुरेशीं नाहींत काय ? मग पाकिस्तानच्या गरजा भागविण्यासाठीं आसामचा त्यांत समावेश कां करूं नये ? कोठल्याहि साम्राज्यपिपासू आणि वसाहतीच्या सरकारनें आपलें प्रभुत्व स्थापण्यासाठीं यांहून निराळीं कारणें दाखविलेलीं नाहींत ! मग पाकिस्ताननें तरी निराळीं कारणें काय म्हणून द्यावींत? म्हणजे हिंदुस्थाननें स्वतःची फाळणी करून घ्यावयास राजी व्हावयाचें, इतकेंच नव्हे, तर पाकिस्तानच्या चरितार्थाची तरतूदहि करावयाची आहे !

जर सध्यांच्या मागणीप्रमाणें बंगाल व आसाम या दोन्ही प्रांतांचा पाकि-

स्तानमध्यें समावेश केला, तर पूर्वेच्या मुस्लिम–विभागांतील जातीय परिस्थिति खालीलप्रमाणें होईल:–

### कोष्टक १९.

| | बंगाल | आसाम | एकूण |
|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | ६,०३,०६,५२५ | १,०२,०४,७३३ | ७,०५,११,२५८ |
| मुस्लिम | ३,३०,०५,४३४ (५४·७२) | ३४,४२,४७९ (३३·७३) | ३,६४,४७,९१३ (५१·६९) |
| हिंदू | २,५०,५९,०२४ (४१·५५) | ४२,१३,२२३ (४१·२९) | २,९२,७२,२४७ (४१·५१) |
| हिंदी ख्रिस्ती | १,६६,५०९ (०·२८) | ४०,८१० (०·४०) | २,०७,३१९ (०·२९) |
| वन्य | १८,८९,३८९ (३·१३) | २४,८४,९९६ (२४·३५) | ४३,७४,३८५ (६·२०) |
| इतर | १,८६,१६९ (०·३१) | २३,२२५ (०·२३) | २,०९,३९४ (०·३०) |
| एकूण मुसलमानेतर | २,७३,०१,०९१ (४५·२७) | ६७,६२,२५४ (६६·२७) | ३,४०,६३,३४५ (४८·३०) |

जर आपण दोन प्रांतांतील फक्त मुस्लिम–बहुसंख्य जिल्हे घेतले, तर पुढील पृष्ठावर कोष्टक २० मध्यें दाखविल्याप्रमाणें परिस्थिति होईल.

बंगाल व आसाम हे दोन्ही प्रांत साकल्यानें घेतल्यास त्याचा परिणाम असा होतो कीं, आधींच कमी असलेलें मुसलमानांचें ५४·७३ इतकें संख्याधिक्य ५१·६९ टक्के होतें. म्हणजेच नाममात्र ठरतें. जर मुसलमानेतर बहुसंख्य जिल्हे वगळले, तर बंगाल व आसाममधील मुसलमानांच्या संख्याधिक्याचें प्रमाण ६९·४२ पर्यंत वाढतें. तेव्हां दोन्ही प्रांत साकल्यानें एकत्र केल्यास त्याला 'मुसलमानी टापू' म्हणणें योग्य होणार नाहीं. परंतु मुसलमानेतर विभाग सोडल्यास या टापूचें होणारें ६९·४२ टक्के प्रमाण ज. जिनांनीं चॅप्मन् यांच्या मुलाखतींत उल्लेखिलेल्या ७५ टक्के प्रमाणाच्या अधिक नजिकचें आहे. म्हणून मुसलमानेतर बहुसंख्य टापू वगळणें जास्त श्रेयस्कर ठरेल.

## कोष्टक २०.

| | मुसलमानेतर जिल्हे सोडून बंगाल | मुसलमानेतर जिल्हे सोडून (सिल्हेट जिल्हा) आसाम | पूर्व प्रदेशांतील मुसलमानी बहु-संख्य जिल्ह्यांची एकूण |
|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | ४,०९,६४,७७९ | ३१,१६,६०२ | ४,४०,८१,३८१ |
| मुस्लिम | २,८७,१०,४६२ (७०·०९) | १८,९२,११७ (६०·७१) | ३,०६,०२,५७९ (६९·४२) |
| हिंदू | १,१३,८४,४९५ (२७·७९) | ११,४९,५१४ (३६·८८) | १,२५,३४,००९ (२८·४३) |
| हिंदी ख्रिश्चन | ५४,७३२ (०·१३) | ३,००५ (०·०९) | ५७,७८७ (०·१३) |
| वन्य | ७,०६,६१५ (१·७२) | ६९,९०७ (२·२४) | ७,७६,५२२ (१·७६) |
| इतर | १,०८,४७५ (०·२६) | २,००९ (०·०६) | १,१०,४८४ (०·२५) |
| एकूण मुसलमानेतर | १,२२,५४,३१७ (२९·९०) | १२,२४,४८५ (३९·२७) | १,३४,७८,८०२ (३०·५७) |

आंकड्यावरून व्यक्त झालेल्या शिरगणतींतील परिस्थितींचें सार खालील-प्रमाणें आहे:—

(१) सिंध, वायव्य सरहद्द आणि बलुचिस्तान या प्रांतांत व प्रांतांतील प्रत्येक जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत.

(२) पंजाबमध्यें रावळपिंडी व मुलतान या विभागांतील प्रत्येक जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत. अर्थातच या दोन्ही विभागांतील १२ जिल्ह्यांतून व बलुचि सरहद्द हा जिल्हा मानल्यास १३ च्या १३ जिल्ह्यांत ते बहुसंख्य आहेत.

(३) पजाबमधील लाहोर—विभागांत ते बहुसंख्य आहेत. परंतु अमृतसर जिल्ह्यांत त्यांची संख्या ४६·५२ टक्के असल्यानें तेथें ते अल्पसंख्य आहेत. गुरुदासपूर या जिल्ह्यांत त्यांचें संख्याधिक्य नाममात्रच आहे.

(४) पंजाबमधील जलंदर—विभागांत मुसलमान अल्पसंख्य आहेत. त्यांचें तेथील प्रमाण शें. ३४·५३ आहे, तर हिंदू व शीख यांचें प्रमाण अनुक्रमें

शेंकडा ३५·८७ व २४·३१ आहे. अस्पृश्य वर्गाच्या आदिधर्मीयांचा समावेश हिंदूंमध्यें जर केला, तर तेथील हिंदूंचें संख्याबल अधिकच सुधारतें.

(५) पंजाबमधील अंबाला–विभागांत मुसलमान अल्पसंख्य आहेत. त्यांचें प्रमाण २८·०७ टक्के आहे, तर हिंदूंचें ६६·०१ टक्के आहे.

(६) वायव्य मुसलमानी राज्यांत जर सिंध, बलुचिस्तान, पंजाब व वायव्य सरहद्द या चारी प्रांतांचा समावेश केला, तर मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ६२·० टक्के राहील.

(७) या प्रदेशांतून अंबाला व जलंदर हे विभाग आणि लाहोर–विभागांतील अमृतसर जिल्हा वगळला, तर राहील तो पंजाबचा मुसलमानी बहुसंख्य प्रांत, सिंध, वायव्य सरहद्द व बलुचिस्तान हे सर्व मिळून होणाऱ्या प्रदेशांत मुसलमानांचें प्रमाण ७५·३६ टक्के होईल.

(८) पूर्व विभागामध्यें आसामप्रांतांत मुसलमान अल्पसंख्य असून त्यांचें तेथील प्रमाण ३३·७३ टक्के आहे, तर हिंदू व वन्य जाती यांचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ४१·२९ व २४·३५ आहे. जवळजवळ हिंदु म्हणूनच वावरणाऱ्या या वन्य जातींचा जर हिंदूंत समावेश केला, तर येथें हिंदूंचें प्रमाण ५० टक्क्यांपेक्षां पुष्कळच वर जातें. या प्रांतांतील फक्त सिल्हेट या एकाच जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य म्हणजे ६०·७१ टक्के आहेत.

(९) सर्व बंगालमधील मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ५४·७३ आहे.

(१०) डाक्का व चितागांग या दोन विभागांत चितागांगचा टेकाड टापू सोडल्यास प्रत्येक जिल्ह्यांत मुसलमान बहुसंख्य आहेत.

(११) राजशाही–विभागांत त्यांचें संख्याधिक्य आहे. त्यांपैकीं दार्जीलिंग व जालपैगुरी जिल्ह्यांत ते अल्पसंख्य असून त्यांचें प्रमाण अनुक्रमें २३·०८ टक्के व २·४२ टक्के आहे. दिनाजपूर जिल्ह्यांत त्यांचें नाममात्र संख्याधिक्य (५०·२० टक्के) आहे.

(१२) कलकत्त्यासकट प्रेसिडेन्सी विभागांत मुसलमान अल्पसंख्य आहेत. त्यांचें प्रमाण ४४·५६ टक्के आहे, तर हिंदूंचें ५३·७० टक्के आहे. परंतु

त्यांतील जेसोर, नादिया, व मुर्शिदाबाद या जिल्ह्यांत ते बहुसंख्य असून खुलना जिल्ह्यांत त्यांचें प्रमाण निम्म्याहून किंचित् कमी म्हणजे ४९·३६ टक्के आहे.

(१३) बंगालमधील मुसलमानी विभागांत फक्त मुसलमान बहुसंख्य जिल्ह्यांचांच जर समावेश केला, तर मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ७०·९० टक्के होतें.

(१४) मुसलमान अल्पसंख्य असलेल्या जिल्ह्यांतून त्यांचें प्रमाण शेंकडा २२·२१ टक्के आहे.

(१५) आसाम आणि बंगाल हे दोन्ही प्रांत जर मुसलमानी टापूंत समाविष्ट केले, तर मुसलमानांचें प्रमाण शेंकडा ५१·६९ होतें.

(१६) पूर्वभागांतील मुसलमान–अल्पसंख्य टापू वगळल्यास त्यांचें प्रमाण शेंकडा ६९·४२ टक्के होईल.

हिंदुस्थानच्या कांहीं भागांत मुसलमान बहुसंख्य आहेत या विधानाच्या जोरावर, पाकिस्तानची मागणी करण्यांत येत असते. जर आपण सर्व हिंदुस्थानमधील त्यांचा आंकडा ध्यानांत घेतला–आणि हिंदुस्थान एक रहावा असाच नैसर्गिक संकेत आणि अशीच ऐतिहासिक परंपरा दिसते–तर संस्थानांसह सर्व हिंदुस्थानांत मुसलमानांचें प्रमाण शेंकडा २३·८ टक्के असून मुसलमानेतरांचें प्रमाण ७६·२ टक्के आहे. संस्थानें सोडून ब्रिटिश हिंदुस्थानांतील मुसलमानांचें प्रमाण शेंकडा २५·८ टक्के आणि मुसलमानेतरांचें प्रमाण शेंकडा ७३·२ टक्के आहे. मुसलमानेतरांचें वायव्य टापूंतील प्रमाण शेंकडा ३८ व २५ आहे व पूर्व प्रदेशांत त्यांचें प्रमाण शेंकडा ४८ व ३२ आहे. अर्थात् हें प्रमाण मुसलमानेतर टापू सामील करावयाचे कीं वगळावयाचे, यावर अवलंबून राहील. इतकें प्रमाण असूनहि जर तेथील लोकांना पाकिस्तानांत सामील होण्यास सांगण्यांत येतें, तर मुसलमानांची संख्या सर्व हिंदुस्थानांत २३·८ टक्के असतांना व ब्रिटिश हिंदुस्थानांत २६·८ असतांना त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच पुढेंहि हिंदुस्थानांत कां राहूं नये? जर ७५ टक्के किंवा त्याहूनहि कमी प्रमाण असतांना मुसलमान न्याय्यपणें पाकिस्तानच्या मागणीचा हट्टीपणानें पुरस्कार करून दुसऱ्यांवर तें लादण्याचा प्रयत्न करतात, तर सर्व हिंदुस्थानांत हिंदूंची लोकसंख्या

७६·२ टक्के व ब्रिटिश हिंदुस्थानांत ७३·२ टक्के असतांना दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठीं नाहीं, तरी निदान शेंकडों वर्षांची परंपरा ध्यानांत घेऊन पाकिस्तानची मागणी त्यांनीं धुडकावून कां लावूं नये ?

लीगच्या लाहोरच्या ठरावानुसार वायव्य व पूर्व टापूंतील पाकिस्तानच्या सीमा काय असतील, याचें मीं यापूर्वी विवेचन केलें आहे. मी माझ्या स्वतःच्या कल्पनांप्रमाणें या सीमा मर्यादित करीत आहें असें समजण्याचें कारण नाहीं. ही गोष्ट, ज्या प्रांतांचा पाकिस्तानमध्यें समावेश करावयाचा तेथील लोकांच्या इच्छेवर राहील. आणि त्या प्रांतांतील रहिवाशी म्हणजे केवळ मुसलमान नव्हेत, तर मुसलमानेतरहि आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. केवळ चर्चेसाठीं मी असें थोडा वेळ गृहीत धरतों कीं, या वायव्येच्या व पूर्व प्रांतांतील बहुसंख्य मुसलमानांचा पाकिस्तानला पाठिंबा आहे. आणि असें गृहीत धरूनच सिंध, बलुचिस्तान व वायव्य सरहद्द हे सर्व प्रांत, पश्चिम पंजाबमधील जिल्हे, बंगालमधील पूर्वेचे व कांहीं उत्तरेकडील जिल्हे आणि आसाममधील सिल्हेट जिल्हा यांचा मीं या मुसलमान विभागांत समावेश केला आहे. परंतु जोंपर्यंत तेथील मुसलमानांनीं निर्विवाद बहुमतानें व निःसंदिग्धपणें पाकिस्तानला अनुकूल असा कौल दिला नाहीं, तोंपर्यंत तेथील बहुसंख्य मुसलमान फाळणीला प्रतिकूल मत प्रदर्शित करण्याचा संभव आहे असें म्हणणें गैरवाजवी ठरणार नाहीं. परंतु मुसलमान सोडले तरीहि तेथें अन्य रहिवाशी आहेत व त्यांचेकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखें नाहीं.

## २८. शीख आणि बंगाली लोकांची फाळणी

ब्रिटिश पंजाब आणि पंजाबी संस्थानें यांत केंद्रित झालेल्या शिखांबद्दल आपण विचार करूं. पंजाबचा कोठल्याहि हिंदुस्थानपासून विभक्त करणाऱ्या प्रत्येक योजनेबद्दलचा विरोध त्यांनीं प्रदर्शित केला असून वाटेल तें करून आम्ही त्या योजनेचा प्रतिकार केल्याशिवाय राहणार नाहीं, असा आपला निश्चयहि त्यांनीं घोषित केला आहे. परंतु जर देशावर फाळणी लादण्यांत आलीच

तर त्यांचा असा आग्रह आहे कीं, जेथें ते फार मोठया संख्येनें राहतात, जेथें त्यांचीं देवालयें वगैरे आहेत, आणि ज्यांच्याशीं त्यांचें ऐतिहासिक आणि धार्मिक घनिष्ट संबंध आलेले आहेत, त्या सर्व प्रदेशांचें एक अलग राज्य प्रस्थापित व्हावें. पश्चिमेस चिनाबपर्यंत, पूर्वेस यमुना नदीपर्यंत, दक्षिणेस राजपुतान्याच्या हद्दीपर्यंत व उत्तरेस काश्मीर संस्थान व डोंगराळ मुलुखापर्यंत या राज्याच्या सीमा असाव्यात असें त्यांचें म्हणणें आहे. श्री. व्ही. एस्. भट्टी यांनीं आपल्या 'खालिस्तान' नामक पुस्तिकेमध्यें पश्चिमेस पाकिस्तान व पूर्वेस हिंदुस्थान असलेल्या या राज्याला मध्यराज्य असें संबोधिलें असून त्याच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणें दाखविल्या आहेतः—

"या खालिस्तानच्या सीमा खालीलप्रमाणें असतीलः—उत्तरेस काश्मीर. वायव्येस, पश्चिमेस आणि नैऋत्येस चिनाब आणि मुलतानच्या पलीकडील पंजाब. दक्षिणेस राजपुताना आणि कच्छचें आखात आणि पूर्वेस यमुना नदी आणि ईशान्येस सिमला टेकडीवरील संस्थानें आणि कुलू हे प्रदेश व्यापले जातील. हें शीख राज्य खालसा लोकांचें वसतिस्थान राहील. तेव्हां त्याला खालिस्तान हें नांव उचित ठरेल. त्यांत अदमासें पुढील संस्थानें व प्रांत यांचा समावेश होईलः–शीख संस्थानें म्हणजे पतियाळा, नाभा, झिंद, फरीदकोट, कपुरथळा, कालसिया, मालरकोटला, सिमला टेकडीवरील संस्थानें आणि लुधियाना, जलंदर कुलू, अंबाला, फेरोझपूर, लाहोर, अमृतसर, ल्यालपूर, गुजरानवाला, शेखपुरा, मॉंटगोमरी, हिस्सार, रोहटक, कर्नाळ, मुलतान आणि दिल्ली हे प्रांत वा जिल्हे. तसेंच सिंध, भावलपूर, आणि राजपुताना यांतून जाऊन कच्छच्या आखाताला मिळणारा एक लहानसा जमिनीचा पट्टाहि असावयास हवा. कारण जर या शीख संस्थानाला समुद्राची वाट मोकळी मिळाली नाहीं, तर त्याची गळचेपी होऊन त्याला व्यापारासाठीं सर्वस्वीं दुसऱ्यांवर अवलंबून रहावें लागेल."[१]

'हिंदुस्थान रिव्ह्यू'मधील एका लेखांत श्री. संत निहालसिंग लिहितात, 'पंजाबच्या फाळणीच्या योजनेंत असें दाखविलें आहे कीं, जर पाकिस्तान निर्माण

१. व्ही. एस्. भट्टी : खालिस्तान, पृ. ४.

होणारच असेल, तर शिखांना त्यांचा एक 'स्वतंत्र पंजाब' मिळालाच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. त्याच्या योजकांच्या कल्पनेप्रमाणें त्यांत ब्रि. हिंदुस्थानांतील ३५ लाख, संस्थानांतील साडेबारा लाखपेक्षांहि जास्त म्हणजे १९४१ च्या शिरगणतींतील ५१ लाख शिखांपैकीं सुमारें ४८ लाख शीख असतील. या योजनेप्रमाणें स्थापन व्हावयाच्या 'आझाद पंजाब'च्या सीमा जरी तपशीलवार तयार केल्या असल्या, तरी त्या अद्यापि अनिश्चित आहेत. म्हणून चतुःसीमा ठरविण्याचा हा प्रश्न अशा एका समितीकडे सोंपाविण्यांत यावा, कीं जी उपस्थित होणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रश्नांचा निःपक्षपातीपणें विचार करूं शकेल.'

५ जून १९४३ ला आपला निर्णय जाहीर करतांना त्या योजनेच्या जनकांनीं म्हणजे शिरोमणी अकाली दलाच्या लोकांनीं अशी अट घातली कीं, सीमा ठरविण्यापूर्वी लोकसंख्या, मालमत्ता, जमीनमहसूल, सांस्कृतिक परंपरा आणि ऐतिहासिक संबंध वगैरे सर्व गोष्टींचा योग्य विचार व्हावा. या योजनेप्रमाणें चार कमिशनरचे विभाग राहणार आहेत. त्यांत मुलतानचा कांहीं भाग, लाहोर, जलंदर, आणि अंबाला यांचा समावेश होईल व खालील जिल्ह्यांशीं त्याचा संबंध पोहोंचेल:—

मुलतान विभागः—मुलतान (कांहीं भाग), मॉटगोमरी, ल्यालपूर, झांग, मुझफरगड.

लाहोर-विभागः—लाहोर, शेखपुरा, गुजरानवाला, अमृतसर, गुरुदासपूर आणि सियालकोट.

जलंदर-विभागः—जलंदर, होशियारपूर, कांग्रा, लुधियाना आणि फेरोझपूर.

अंबाला-विभागः—अंबाला, कर्नाळ, हिसार, रोहटक, गुरगांव आणि सिमला.

'आझाद पंजाब'मध्यें राहणाऱ्या २ कोटी जनतेचें प्रमाण (मॉटगोमरी शेजारील मुलतान जिल्हा सोडून) खालीलप्रमाणें राहील:—

| | |
|---|---|
| शीख | ३४,४२,५०८ |
| मुसलमान | ९१,९१,६०८ |
| शीख सोडून मुसलमानेतर (बहुतेक हिंदू) | ७२,४५,३३६ |
| एकूण | १,९८,७९,४५२ |

श्री. संत निहालसिंग लिहितात, "हिंदूंवरील अविश्वासामुळें मुसलमानांची मनें बिघडून पाकिस्तानची योजना निघाली. आतां मुसलमानांवरील अविश्वासामुळें शिखांचीं मनें कलुषित होऊन पंजाबच्या फाळणीची योजना निघाली. या योजकांच्या राजकीय आणि संघटनात्मक चातुर्याइतकेंच निश्चयाचें बळहि त्यांचेपाशीं आहे."

म्हणून पाकिस्तानचा आग्रह जर धरला गेला, तर शिखांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. ते स्वतःच्या अटीवर पंजाबची फाळणी करून घेतल्याशिवाय राहणार नाहींत.

१९०५सालीं लॉर्ड कर्झननें बंगालची फाळणी करून प्रांतिक सरकारें स्थापन केल्याची या ठिकाणीं आठवण होणें साहजिक आहे. बंगालमधील पूर्वेकडील व उत्तरेकडील जिल्हे आणि आसाम यांचें एक, व बिहार, ओरिसा व बंगालमधील बाकीचे जिल्हे याचें दुसरें. या योजनेस बंगाली हिंदूंचा व कांहीं प्रतिष्ठित मुस्लिमांचाहि तीव्र विरोध होता आणि त्याचा परिणाम म्हणून विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांतील फाळणीविरोधी प्रचंड चळवळ निर्माण झाली. तिचा प्रभाव दूरवर पोहोंचून देशभर राष्ट्रीय जागृती फैलावली व ब्रिटिश–मालावरील बहिष्काराच्या आणि स्वदेशीच्या चळवळीस प्रारंभ झाला. आणि त्यामुळें, फाळणी पक्की झाली असें जरी सरकारनें जाहीर केलें असलें, तरी ती त्यांना शेवटीं रद्द करावी लागली. आणि त्यामुळें ज्यांचे फायद्यासाठीं फाळणी केलेली आहे असें एके काळीं सांगण्यांत येत असे, त्या मुसलमानांच्या मनांमध्यें असंतोष निर्माण झाला.

येथें जो मुद्दा आम्हांला प्रामुख्यानें मांडावयाचा आहे तो असा कीं, मुस्लिम–लीगच्या मार्च १९४०च्या ठरावानुसार जो प्रदेश अलग करून मागण्यांत येत आहे, तो १९०५च्या पूर्वबंगालमधील फाळणीशीं सदृश असा आहे.

ज्या बंगाली हिंदूंनीं १९११सालीं आपल्या आंदोलनाच्या सामर्थ्याच्या जोरावर रद्द ही फाळणी करून घेतली, ते आतां ही मागणी मुकाट्यानें मान्य करतील हें संभवनीय नाहीं. आणि बंगालप्रांत हिंदुस्थानपासून अजिबात

तोडला जावा, या योजनेला त्यांची संमति मिळणें सुतराम् शक्य नाहीं. बंगाल-बाहेरील हिंदूंकडूनहि त्यांना राष्ट्रव्यापी पाठिंबा मिळेलच. म्हणून लाहोर-ठरावाचे पुढें कसे गुंतागुंतीचे परिणाम होतील, एवढेंच मीं सध्यां दाखवून दिलें आहे.

भाग पांचवा

# मुसलमानी राज्यांची साधनसामग्री

# २९. शेती

आतां आपणांला मुसलमानी राज्यांच्या साधनसंपत्तीचा विचार करावयास हवा. हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे; आणि मुसलमान किंवा बिगर-मुसलमान बहुसंख्य असलेले प्रदेश घेतले, तरी त्यांतील सर्वस्वी शेतीवरच अवलंबून राहणाऱ्यांचें प्रमाण एकंदर लोकसंख्येच्या मानानें खूपच आहे. म्हणून या दोन्ही प्रदेशांचें शेतीविषयक काय स्थान आहे, हें विचारांत घेणें अत्यावश्यक ठरतें.

## १. पूर्व-विभाग

प्रथम पूर्वेकडील प्रदेशांचा विचार करूं. हा प्रदेश सुपीक आहे. परंतु तेथील लोकसंख्येचें प्रमाण प्रत्येक चौरस मैलास ७८७ म्हणजे खूपच आहे. आणि म्हणून प्रदेश सुपीक असला, तरी तेथील प्रचंड लोकसंख्येला पुरेल इतकें धान्य तेथें पिकूं शकत नाहीं, हें खालील माहितीवरून लक्षांत येईल.

बंगालची एकंदर लोकसंख्या १९४१साली सहा कोटी तीन लक्षाहून किंचित् जास्त होती. आणि १९३६–३७साली जंगलें व निरुपयोगी प्रदेश सोडल्यास एकंदर पिकाऊ जमीन ३,५१,०७,०४९ एकर होती. यापैकीं शेतीसाठीं प्रत्यक्ष उपयोगांत आणलेला प्रदेश २,४४,६६,३०० एकर होता, आणि जर सर्वच्या सर्व चांगली जमीन उपयोगांत आणली असती, तर पिकासाठीं आणखी १,०६,४०,७४९ एकर मिळूं शकले असते. म्हणजे दरमाणशीं ०·४० एकर जमीन प्रत्यक्ष उपयोगांत येत होती आणि दरमाणशीं ०·१७ एकर अधिक जमीन उपयोगी पडूं शकली असती. तेव्हां १९४१च्या शिरगणतीप्रमाणें हिशेब केल्यास, जरी सर्वच्या सर्व सुपीक जमीन उपयोगांत आणली, तरीहि दरमाणशीं ०·५७ एकरापेक्षां जास्त जमीन मिळूं शकत नाहीं. जर आपण वर ठरविल्याप्रमाणें मुसलमान व बिगर-मुसलमान प्रदेशांसाठीं वेगळी गणती केली, तर पुढीलप्रमाणें परिस्थिति होईल:—

## कोष्टक २१.

| | | मुसलमानी प्रदेश | बिगर-मुसलमानी प्रदेश |
|---|---|---|---|
| एकंदर पिकाऊ जमीन | एकूण एकर | २,३९,४८,४६२ | १,११,५८,५८७ |
| | दर माणशीं एकर | ०·५८ | ०·५७ |
| पिकाखालील जमीन | एकूण एकर | १,७८,३३,६०० | ६६,३२,७०० |
| | दर माणशीं एकर | ०·४३ | ०·३४ |
| पिकाखालीं नसलेली, पण पिकाऊ जमीन | एकूण एकर | ६१,१४,८६२ | ४५,२५,८८७ |
| | दर माणशीं एकर | ०·१४ | ०·२३ |
| पिकाखालील जमिनीचें शेंकडा प्रमाण | | ७४·४ | ५९·४ |
| पिकाऊ जमिनीचें शेंकडा प्रमाण | | २५·६ | ४०·६ |

यावरून असें दिसून येतें कीं, मुसलमान व बिगर–मुसलमान बहुसंख्य प्रदेशांत दर माणशीं पिकाखालीं येऊं शकणाऱ्या जमिनीचें प्रमाण जवळजवळ सारखेंच आहे. परंतु मुसलमान–बहुसंख्य प्रदेशांत शेतीसाठीं वापरांत आलेली जमीन पुष्कळच असून पिकाखालीं न आलेल्या पिकाऊ जमिनीचें प्रमाण फार अल्प आहे. या उलट, बिगर–मुसलमान बहुसंख्य प्रदेशांत त्या मानानें बरीच जमीन उपयोगांत येण्यासारखी आहे. विरळ वस्तीच्या चितागांगच्या टेकाड टापूची ही परिस्थिति आहे. आणि तेथील लोकवस्ती बहुतेक वन्य जातींची आहे. म्हणून तौलनिक दृष्टया पिकाऊ पण पिकाखालीं नसलेल्या जमिनीचें प्रमाण येथें जास्त आहे. उदा. २,४७,०५३ लोकसंख्येमागें १४,२२,-०१७ एकर जमीन आहे. म्हणजे मुसलमान प्रदेशांतील दर माणशीं ०·१४ एकर जमिनीशीं तुलना करतां या (चितागांग) जिल्ह्यांत दर माणशीं ५·७५ एकर जमीन अधिक वापरतां येईल. जर हा टापू वन्य जातींसाठीं राखून ठेवला– असें होणें शक्य आहे–तर दर माणशीं वापरांत येण्याजोग्या पिकाऊ जमिनीचें प्रमाण वर दाखविल्यापेक्षां कमी होईल.

हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, लोकसंख्येचें प्रमाण वाढतें आहे आणि प्रांताच्या

पूर्वेकडील म्हणजे मुसलमान–बहुसंख्य प्रदेशांत हें प्रमाण जास्त आहे. दाट लोकसंख्येच्या जिल्ह्यांतील १९३६–३७ सालीं पिकाखालीं आलेल्या पिकाऊ जमिनीचें प्रमाण पुढीलप्रमाणें आहे: डाक्का (चौ. मैलास लोकसंख्या १'५४२) शेंकडा ९५'६. मैमनसिंग (चौ. मैलास लो. सं. ९७९) शेंकडा ८४. फरीदपूर (चौ. मैलास लो. सं. १'०२४) शेंकडा ९९. टिप्पेरा (चौ. मैलास लो. सं. १,५२५) शेंकडा ९३. नोआखली (चौ. मै. लो. सं. १,३३७) शेंकडा ९२. डाक्का व चितागांग या विभागांतील (हे विभाग मुसलमान–बहुसंख्य प्रदेशांत येतात) लोकसंख्येच्या वाढीचें १८८१ व १९३१ च्या दरम्यानचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा ६० व शेंकडा ८८ असें होतें. तेंच १९३१ व १९४१ च्या दरम्यान अनुक्रमें शेंकडा १९'९ व २५'२ होतें. दोन जिल्हे वगळून बाकीचा सर्व राजशाही–विभाग मुसलमानी टापूंतच मोडतो. तेथेंहि १८८१ ते १९३१ च्या दरम्यान लोकसंख्येंत शेंकडा २६ टक्के व १९३१ ते १९४१ च्या दरम्यान १२'८ टक्के वाढ झाली. कलकत्ता व चोवीस परगणे सोडल्यास इलाखा–विभागांतहि ही वाढ १९३१ व १९४१ चे दरम्यान शेंकडा १५'६ झालेली आढळते.

यावरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, बंगालमध्यें पिकाखालीं आणतां येण्याजोगी जमीनहि फार मर्यादित आहे; आणि विशेषतः मुसलमान–बहुसंख्य प्रदेशांत तर ती त्याहून मर्यादित, नगण्य आहे. तेव्हां लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीबरोबर शेतीचें समप्रमाण राहूं शकणार नाहीं. भविष्यकालीन लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न तूर्त बाजूला ठेवून, सद्यःस्थितींत बंगाल हा अन्नधान्याच्या दृष्टीनें स्वावलंबी बनूं शकतो कीं नाहीं, याचा विचार केल्यास काय दिसून येतें तें पाहूं. पुढें दिलेल्या कोष्टकांत बंगालचा अन्नपुरवठा बंगालसाठींच कसा अपुरा आहे हें दाखविलें आहे. ही गोष्ट १९४३च्या दुष्काळांत अत्यंत दुःखपूर्ण रीतीनें आपल्या नजरेस आली आहे. या शोकजनक घटनेस दुसरींहि कारणें आहेत यांत संशय नाहीं. परंतु हें कारण डावलून वा त्याचें महत्त्व कमी लेखून चालणार नाहीं. सर अझिझुल हक्क याबाबत आपल्या 'दि मॅन्

बिहाइंड दि प्लाऊ' या पुस्तकांत लिहितात, "प्रांतांतील ( बंगाल ) लोकांचें भात हेंच प्रमुख अन्न होय. तेथील शेतकऱ्याचें मुख्य अन्नहि भात आणि डाळ हेंच असून त्याला भाजीपाला, मासे वा मांस हा आहार क्वचितच मिळतो. त्याचें सकाळचें आणि संध्याकाळचें जेवण भात खाऊनच होतें व न्याहरीलाहि तो भातच खातो. म्हणून प्रांताच्या दृष्टीनें तांदुळाचें उत्पादन हा एक राष्ट्रीय आरोग्याचा व सुरक्षिततेचा प्रश्न आहे. परंतु बंगालमध्यें तर स्वतःच्याहि उपजीविकेस पुरेसा तांदूळ पैदा होऊं शकत नाहीं."[१]

१९३१ च्या शिरगणतीच्या आधारें त्यांनीं असें गणित केलें आहे कीं ५,१८,७३,४३६ लोकसंख्येपैकीं भात न खाणाऱ्यांना वगळल्यास आणि मुलें वगैरेंची जितकी संख्या कमी अन्न पुरेल अशांची आहे त्यांचें पूर्ण अन्न खाणाऱ्यांच्या संख्येंत प्रमाण काढल्यास त्यांची संख्या चार कोटीहून अधिक भरते. "प्रत्येक प्रौढास प्रतिदिनीं १४ छटाक तांदूळ लागतो असें समजलें, तर प्रांताला प्रतिवर्षी ३१९ दशलक्ष मण तांदुळाची आवश्यकता आहे असें ठरतें.[२]

---

१. सर अझिझुल हक : दि मॅन् बिहाइंड दि प्लाऊ, पृ. ५१.

२. एक औंस तांदुळानें १०८ ते ११४ कॅलरी उष्णता मिळूं शकते. (आर. एन्. चोप्रा : ट्रॉपिकल् थिरॅपिटिक्स्, पृ. १६३२) एका औंसामुळें १११ कॅलरी उष्णता मिळते आणि एक छटाकांत २·२ औंस असतात असें मानलें, तर एक छटाक तांदुळानें २४४ औंस उष्णता मिळते असं होईल. आपल्याला १४ छटाकानें ३४१६ कॅलरी व १२ छटाकानें २९२८ कॅलरी इतकी उष्णता मिळूं शकते. अर्थात् यांत तांदुळाचा थोडाहि अंश वांया गेला नाहीं असें गृहीत धरण्यांत आलें आहे. पण प्रत्यक्षांत तसें होत नाहीं. कर्नल आर. एन्. चोप्रा म्हणतात, "जो मनुष्य अगदीं थोडे शारीरिक कष्ट घेऊन घरीं आरामांत आयुष्य घालवितो त्याला २५०० कॅलरी, उष्णता बस आहे. जो बैठें आयुष्य घालवितो त्याला ३००० कॅलरी, कांहींसा व्यायाम होत असेल किंवा तो सामान्य मजूर असेल तर ३५०० कॅलरी आणि जर त्याला पुष्कळ शारीरिक कष्टाचें काम करावें लागत असेल तर ४००० कॅलरी, किंवा त्याहूनहि अधिक उष्णतेची आवश्यकता आहे." (उक्त ग्रंथ, पृ. १५३).

हें धान्यप्रमाण जेलइतकें, म्हणजे प्रत्येकीं १२ छटाकांप्रमाणें गणलें, तरीसुद्धां २७ कोटी ३० लक्ष मणांहून थोडें जास्त इतकें धान्य आवश्यक आहे. तांदुळा-ऐवजीं भात घेतलें तर १४ छटाकाच्या मापानें ४७ कोटी ९० लाख मण भात लागेल."[१] १९३६–३७ सालीं पिकाखालीं २ कोटी २० लाख एकर जमीन होती. या जमिनीसाठीं दर एकरीं एक मण याप्रमाणें २ कोटी २० लाख मण भात बियाण्यासाठीं निराळें ठेवावें लागलें. माणशीं प्रतिदिनीं १४ छटाक धरल्यास एकूण पन्नास कोटी एक लाख मण, व बारा छटाकांप्रमाणें ४३ कोटी वीस लाख मण भात लागेल. १९२७–२८ ते १९३६–३७चें वार्षिक उत्पाद-नाचे आंकडे लक्षांत घेऊन त्यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं दरवर्षींची सरासरी तूट १४ छटाकांच्या मापानें १६ कोटी १० लाख मण व १२ छटाकां-प्रमाणें ९ कोटी ३० लाख मण येत गेली. याप्रमाणें बंगालला नित्याच्या अन्नपुरवठ्याची सुद्धां वाण पडत आहे. आतां पुनः निर्यात वजा जातां प्रति-वर्षीं आयात होणारा सरासरी तांदूळ अडीच लाख टन आहे. अडीच लाख टन तांदूळ म्हणजे पावणेचार लाख टन किंवा जवळजवळ एक कोटी मण भात. या आयात भाताची भर प्रांताच्या उत्पन्नांत पडते.

"प्रांताची तूट सुमारें १६ कोटी १० लाख मण आहे. यांपैकीं आयाती-मुळें जरी १ कोटि मणाची तूट भरून निघाली तरीहि प्रांताचा अन्नपुरवठा प्रांताच्या आवश्यकतेपेक्षां पुष्कळ कमी आहे, या परिस्थितींत म्हणण्यासारखा कांहीं बदल होत नाहीं."

श्री. कालिचरण घोष यांनीं आपल्या 'फॅमिन्स इन् बंगाल १७७०–१९४३' या पुस्तकांत खालीलप्रमाणें गणित केलें आहे:—

"प्रत्येक माणशीं प्रतिवर्षीं ५·५ मण लागतात असें समजल्यास, बंगालला २५७ दशलक्ष मण किंवा ९३,७०,००० टन तांदुळाची जरुरी आहे." हें गणित करतांना त्यांनीं लहान मुलें, विधवा आणि इतर—कीं ज्यांना पूर्णांश अन्नाची जरुरी लागत नाहीं—यांचा विचार केलेला आहे. या गरजा भाग-

१. हक : पृ. ५२.

विण्यासाठीं ८५ लाख टनांचा सरासरी धान्यपुरवठा होऊं शकतो. म्हणजे १३,४६,००० टन किंवा ३,६७,००,००० मण वार्षिक तुटवडा येतो.[१] सर अझिझुल हक्क यांनीं दाखविलेल्या तुटीपेक्षां ही तूट बरीच कमी दिसते. याचें कारण श्री. घोष यांनीं सर हक्क यांचेप्रमाणें प्रतिदिन माणशीं १४ किंवा १२ छटाक न धरतां १० छटाकांपेक्षांहि कमी परिमाण ठेवलें आहे.

आपण आतां हें पाहिलें कीं, बंगालमध्यें, विशेषतः मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रदेशांत लोकसंख्येंतील वाढ व नवीन पिकाऊ प्रदेश यांचें सम-प्रमाण राहूं शकत नाहीं. प्रांतिक धान्यपुरवठा वाढविण्याच्या दृष्टीनें याला उपाय पिकाऊ जमीन वाढविणें हा नसून, आहे त्या जमिनीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें हा होय.

बंगालमध्यें जीं दोन धरणें आहेत तीं बरद्वान व मिदनापूर जिल्ह्यांत आहेत; आणि मुसलमान—बहुसंख्य प्रदेशांतील लोकांना सर्वस्वीं हवामान व पाऊस यांवर अवलंबून रहावें लागतें. सध्यांच्या परिस्थितींत धरणें बांधून किंवा दुसऱ्या कोण-त्याहि प्रकारें मुसलमान—बहुसंख्य प्रदेशांत पाण्याची सोय करण्याची शक्यता नाहीं. कृत्रिम साधनांनींहि असें करणें शक्य आहे किंवा काय याची बरीच शंका आहे. आणि पाण्याची सोय करणें शक्य झालेंच तरीहि त्याचा उपयोग किती होईल याचीहि शंका आहे. कारण त्या प्रदेशांपैकीं पुष्कळसा भाग हा सामा-न्यतः ओला असतो आणि अवर्षणापेक्षांहि पूर व वादळें यांनींच जास्त नुक-सान होण्याची तेथें शक्यता आहे. मात्र या मोठ्या नद्यांमुळें तेथें राहणाऱ्या लोकांना विशिष्ट कालावधींत पूर वगैरेमुळें जें प्रचंड नुकसान सोसावें लागतें, त्याऐवजीं शास्त्रीय संशोधनामुळें याच शक्तीचा उपयोग जास्ती पीक काढण्या-साठीं कसा करून घेतां येईल, हें समजणें अशक्य कोटींतील ठरणार नाहीं, अशी अशा करावयास हरकत नाहीं.

पिकाऊ जमिनीचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्यामागेंहि कांहीं अड-चणी आहेत. याला कारणें दोन : व्यक्तिगत शेतजमिनींचा आकार आणि

१. के. सी. घोष : बंगाल्यांतील दुष्काळ, १७७०–१९४३, पृ. १९३-९४.

अशा जमिनींचेहि वांटण्यामुळें होणारे त्याहून लहान विभाग. सर अझिझुल हक यांनीं असें गणित काढलें आहे कीं, पांच माणसांचें कुटुंब धरलें, तर त्या कुटुंबास सात एकर जमीन नांगरावयास मिळावी. यापैकीं ५·३ एकर जमीन लागवडीखालीं व १.७ एकर जमीन पडीत राहते. आणि कांहीं भाग दुपिकी असतो हें गृहीत धरल्यास दर कुटुंबास प्रत्यक्ष शेतीसाठीं उपयोगांत आणतां येण्याजोगा भाग हा ६·५ एकर असतो. यापैकीं पांच एकर भात पिकविण्यासाठीं, अर्धा एकर ज्यूटसाठीं, आणि एक एकर इतर पिकांसाठीं उपयोगांत आणला जातो.[1] हेंहि लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं, जरी शेतकऱ्याच्या ताब्यांत सात एकर जमीन असली, तरी ती अनेक लहान तुकड्यांत विभागलेली असते. पुष्कळ वेळां हे तुकडे दुसऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी मध्यें आल्याकारणानें एकमेकांपासून अगदीं अलगहि झालेले असतात. अशा लहान लहान तुकड्यांची उत्पादनशक्ति खताखेरीज आणखी इतर उपायांनीं म्हणण्याजोगी वाढविणें ही गोष्ट कठिण दिसते. शिवाय, पुष्कळ पाऊस पडून खत वाहून जात असल्यामुळें, आणि जमिनीचा पुष्कळसा भाग दीर्घ काळपर्यंत पाण्याखालीं रहात असल्यानें कृत्रिम खतें वापरण्याची शक्यता सुद्धां कमीच आहे. लहानलहान जमिनीच्या तुकड्यांवर शक्ति खर्चण्यापेक्षां मोठ्या प्रमाणावर शेती करून कांहींतरी उत्पादनशक्ति वाढेल असें जरी गृहीत धरून चाललें, तरी यासाठीं कोठल्या तरी प्रकारची सामदायिक शेती हाच एक मार्ग आहे. हा शेतकरी कांहींएक ठराविक रक्कम जमीनदाराला दिल्यानंतर जवळजवळ मालक म्हणूनच शेतावर राबत असतो. अशा शेतकऱ्याचें—मग तो हिंदु असो किंवा मुसलमान असो—आपल्या त्या लहानशा जमिनीच्या तुकड्यावर फार प्रेम असल्यामुळें त्याला गोडीगुलाबीनें किंवा धमकीनें इतरांबरोबर सामुदायिकरीत्या काम करावयास लावण्याची शक्यता फार थोडी असते. म्हणून सामुदायिक शेती हीसुद्धां सहजासहजीं जमेल अशी गोष्ट नव्हे.

ऊस, कडधान्यें, किंवा गळिताचीं धान्यें यांपैकीं कशाचेंहि प्रांताला पुरेल

---

१. हक : पृ. ९३–९४.

इतक्या प्रमाणावर उत्पादन होत नाहीं. प्रांताच्या गरजा भागविण्यासाठीं ही धान्यें किंवा तज्जन्य पदार्थ यांची आयातच करावी लागते.

साखर हा लोकांच्या अन्नांतील महत्त्वाचा पदार्थ आहे. आणि एकेकाळीं साखरेचें भरपूर उत्पादन बंगालमध्यें होत असे. परंतु ती परिस्थिति आतां राहिली नाहीं. 'हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या व तयार होणाऱ्या साखरेपैकीं बंगालमध्यें १३ टक्के साखर लागते. परंतु हिंदुस्थानांतील एकंदर उत्पादनाच्या सुमारें शेंकडा २·८ इतकीच साखर बंगालमध्यें तयार होते. १९३५–३६ सालीं बंगालमध्यें २०,७९,४९४ मण गूळ, व २९,४३,३११ मण साखर आयात करण्यांत आली. १९३६–३७ सालीं बंगालमध्यें एकंदर ६,२५,१७५ मण साखरेचें उत्पादन झालें. परंतु ३५,३९,२५० मण साखरेचा बंगालमध्यें वापर झाला.'[1]

योग्य आहारासाठीं तेल ही देखील एक महत्वाची बाब आहे. सर अझिझुल हक म्हणतात, "बंगालला अजून सर्व प्रांतांपेक्षां मोहरीचें तेल जास्त लागतें. तरी पण त्यासाठीं १९१४–१५ सालीं १४,५९,१०० एकर जमीन लागवडीखालीं होती. तर १९३४–३५ सालीं हा आंकडा ७,२३,८०० एकर इतका खालीं आला. म्हणजे हा आंकडा वीस वर्षांत निम्म्यावर आला."[2] १९३९–४० सालीं बंगालमधील सर्व प्रकारच्या गळिताच्या धान्यांचें उत्पादन 'स्टॅटिस्टिकल् ॲब्स्टॅक्ट ऑफ् इंडिया'च्या[3] गणतीप्रमाणें केवळ २,०५,००० टन किंवा ५५,९६,५०० मण होतें. ५५,९६,५०० मणांचें ३३·३ या प्रमाणांत तेलाचा उतारा धरल्यास १८,६५,५०० मण किंवा दरमाणशीं सव्वा शेर तेल असा पडेल. जर दरमाणशीं प्रतिदिनीं अर्धा छटाक तेल लागतें असें समजलें, तर त्यावर्षीं तर दरमाणशीं सुमारें १० शेर तेलाची तूट पडल्याचें दिसून येतें. दरमाणशीं तेलाचें धरलेलें हें प्रमाण तुरुंगांतील प्रमाणापेक्षांहि कमी आहे. हेंच दुसऱ्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास असें म्हणूं कीं, बंगालला

---

१. हकः पृ. ९१. २. हक : पृ. ३९. ३. स्टॅटिस्टिकल् ॲब्स्टॅक्ट ऑफ इंडिया, १९३०–३१ ते १९३९–४०, पृ. ५५६.

लागणाऱ्या तेलापैकीं फक्त ११ टक्के तेल बंगालमध्यें तयार होतें व बाकीचें म्हणजे जवळजवळ आठपट आहारोपयोगी तेल त्याला आयात करावें लागतें. कडधान्याचा साधारण अंदाज केल्यास त्यांत सुमारें ८० टक्के तूट दिसून येते व आयात करून ती भरून काढावी लागते.

बंगालमधील अन्नपरिस्थिति किती बिकट आहे, याची कल्पना आपणांस १९४३ च्या दुष्काळानें आली. तसेंच बिहारच्या १९३४ च्या भूकंपाच्या वेळे-प्रमाणेंच बंगालच्या १९४३च्या दुष्काळांतहि अखिल हिंदुस्थान दुष्काळ-ग्रस्तांच्या मदतीस कसा धांवून आला हेंहि दिसून आलें. फरक येवढाच कीं, कलकत्त्याच्या हमरस्त्यांत, गल्लयांत, खेडोपाडीच्या रस्त्यारस्त्यांतून, शेतोशेतीं लक्षावधि पुरुष, स्त्रिया, मुलें तडफडत किड्या–मुंग्यांप्रमाणें मेलीं. हें दृश्य बिहारच्या भूकंपाच्या दृश्यापेक्षां भयाण व असह्य होतें. कारण भूकंपाचे दुष्प-रिणाम दीर्घ कालपर्यंत होत असले, तरी त्यानें आपलें विध्वंसनाचें कार्य चार-दोन क्षणांतच उरकून टाकलें होतें. या दुष्काळाच्या धक्क्याचे दुष्परिणाम अजून गेले नाहींत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें म्हणजे खाईत उडी टाकण्यासारखें आहे. एकाद्या स्वतंत्र राष्ट्राला त्याच्या शेजारच्या राष्ट्रानेंहि अशा परिस्थितींत इतक्या त्वरेनें मदत पोंचविल्याचीं दुसरीं उदाहरणें आहेत कीं नाहींत तें मला ठाऊक नाहीं. (उदा० बंगालला मध्यवर्ति व निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं दिलेली वा बिनसरकारी दुष्काळ समित्यांकडून मिळालेली मदत.) मग हजारों मैल लांब असणाऱ्या देशांकडून अशी मदत मिळणें तर दूरच राहो.

बंगाल प्रांतिक वरिष्ठ विधिमंडळांतील प्रश्नोत्तराच्या प्रसंगीं २४ जुलै १९४४ ला तेथील एक मंत्री श्री. सुऱ्हावर्दी यांनीं सांगितलें कीं जानेवारी व डिसेंबर १९४३ चे दरम्यान सर्व ठिकाणांहून बंगालमध्यें आयात केलेला तांदूळ व भात अनुक्रमें ५४,३३,४३७ मण व ५,२७,९३४ मण होता. यापैकीं २६,१८,००९ मण तांदूळ व ३,३८,५३२ मण भात तरी निदान बिहार व ओरिसा या प्रांतांतूनच आला होता. तांदूळ, गहूं, गव्हाचे पदार्थ, ज्वारी, बाजरी,

मका, चणे, कडधान्यें, जव, या एप्रिल व डिसेंबरच्या दरम्यान आयात केलेल्या अन्नोपयोगी पदार्थांची किंमत सुमारें २१,१८,६४,१६५ रु. होईल.[१]

अन्नमंत्री श्री. जे. पी. श्रीवास्तव यांनीं श्री. ए. एन्. चट्टोपाध्याय यांना माहिती देतांना २८ फेब्रुवारी १९४५ रोजीं मध्यवर्ति विधिमंडळांत असें सांगितलें कीं बंगाल-सरकारनें १९४४सालीं विकत घेतलेलें एकंदर धान्य सुमारें दहा लाख टनाहून जास्त होतें, आणि मध्यवर्ति सरकारनें २,३५,४७० टन तांदूळ-पुरवठ्याची व्यवस्था, नोव्हेंबर १९४३ ते २ नोव्हेंबर १९४४ चे दरम्यान व ४,६७,१२७ टन गव्हाची पुरवठ्याची व्यवस्था एप्रिल १९४३ ते एप्रिल १९४४ चे दरम्यान केली होती.[२]

हिंदुस्थानचा घटक असण्याचा आणि हिंदुस्थानांत एक मध्यवर्ति सरकार असण्याचा फायदा बंगालला संकटप्रसंगीं झाला असून पुढेंहि कदाचित् होईल.

एका पिकाच्या बाबतींत मात्र बंगाल भाग्यशाली आहे. हें पैसा हातीं देणारें पीक म्हणजे ज्यूट होय. १९३६-३७सालीं बंगालमध्यें ज्यूटखालीं लागवडीस आलेल्या २१,५४,८०० एकर जमिनीपैकीं निदान २०,११,८०० एकर जमीन ही पूर्वेच्या व उत्तरेच्या प्रदेशांत-म्हणजे मुसलमानी विभागांत येते. १९३६-३७सालचें एकंदर उत्पादन ४०० पौंडाचा एक गठ्ठा याप्रमाणें १०४ लाख गठ्ठे होतें. यापैकीं ५९ लाख गठ्ठे हिंदी गिरण्यांना लागले व ४९ लाख गठ्ठे निर्यात केले गेले. १९३६-३७ पूर्वीच्या पंधरा वर्षांचें सरासरी वार्षिक उत्पादन ९५ लाख गठ्ठे होतें. आणि देशी व परदेशी मागणीचें प्रमाण जवळजवळ समान होतें. परंतु त्याच्या किंमतींत मात्र १९२५-२६ सालीं दरमणीं रु. १८-१३-० पासून १९३२-३३, १९३३-३४, १९३४-३५ सालीं दरमणीं रु. ३-८-० चढउतार झाला.[३] हें पैसा हातीं देणारें पीक असल्यानें व शेतकऱ्याला खंड, कापड वगैरे रोख पैसे लागणाऱ्या गोष्टींसाठीं ज्यूटवर अवलंबून रहावें लागत असल्यानें ग्रामीण अर्थव्यवस्थेंत

---

१. हिंदुस्थान स्टँडर्ड, ता. २६-७-४४.

२. उक्त पत्र, ता. २-३-४५. ३. हक : पृ. ६६-६८.

या पिकाचें स्थान फार वरचें आहे. मात्र मागणी व पुरवठा यांत फरक होतो म्हणून नव्हे, तर व्यापाऱ्यांच्या उलाढालीमुळें याचें मूल्य वारंवार बदलत असतें. अधिक किंमत येईपर्यंत आपला माल सांठवून ठेवण्याइतकी ऐपत शेतकऱ्यांमध्यें नसल्यानें आर्थिकदृष्ट्या निरुपाय होऊन ग्राहक म्हणतील त्या भावानें त्याला आपला माल विकावा लागतो व देशी–विदेशी गिरणीमालक आपल्या इच्छेप्रमाणें मालाचे भाव फिरवतात. अशा स्थितींत त्याच्या अन्न-पुरवठ्याबाबत वा इतर ज्या कांहीं गरजा आहेत त्यांबाबत ज्यूटवर अवलंबून राहणें, निदान सध्यांच्या परिस्थितींत त्याला शक्य नाहीं. कारण त्याला रोख पैसा मिळवून देणाऱ्या या पिकाचा भाव अत्यंत अस्थिर व अनिश्चित बनलेला आहे. पूर्व बंगालमध्यें स्वतंत्र व सार्वभौम असें मुसलमानी राज्य प्रस्थापित झालें तरीसुद्धां, ज्यूटचें देशी व विदेशी गिऱ्हाईक बंगाल प्रांताबाहेरच असल्यानें, एक विशिष्ट मूल्य ठरवून शेतकऱ्यास फायदा करून देण्याबाबत त्याला कितपत यश येईल याची शंकाच आहे.

शिवाय बंगाल हा अन्नाच्या दृष्टीनें तुटवड्याचा प्रांत असल्यानें, ज्यूट विकवून त्याच्या मूल्यांत त्याच ठिकाणीं धान्याचें उत्पादन करून जेवढें धान्य मिळेल, त्यापेक्षां अधिक धान्य जर विकत घेतां येणार नसेल, तर अन्नधान्य पिकविण्यासाठीं ज्यूटची लागवडहि बऱ्याच प्रमाणांत बंद करावी लागण्याची शक्यता आहे. सर अझिझुल हक्क यांचें असें म्हणणें आहे कीं, "सध्यांच्या (१९३६–३७) बाजारभावाची स्थिति पाहतां, सरासरी किमान दरमणीं रु. पांच जर शेतकऱ्यास मिळूं शकणार नसतील तर ही गोष्ट त्याला अगदीं बिन-किफायती ठरेल."[१] आणि त्यांनीं असें दाखवून दिलें आहे कीं १९२८–२९ पासून १९३४–३५ पर्यंत बंगाली किसानाला बरीच खोट बसली आहे.

सिल्हेट हा मागें दर्शविल्याप्रमाणें असा एकच आसाममधील जिल्हा आहे कीं जो पूर्वेकडील मुसलमान–विभागांत बसतो. त्याचें क्षेत्रफळ ५,४७८ चौरस मैल असून लोकसंख्या ३१,१६,६०२ म्हणजे दर चौरस मैलास ५६९ आहे

---

१. हक्क : पृ. ६२.

(१९४१ च्या शिरगणतीप्रमाणें). १९३१ च्या शिरगणतींत हेंच प्रमाण दर चौरस मैलास ४८७ होतें. म्हणजे १० वर्षांत शेंकडा १४·४ इतकी वाढ झाली. त्या प्रांतांतील दुसऱ्या कोठल्याहि जिल्ह्याची लोकसंख्या दर चौरस मैलास ३२९ पेक्षां जास्त नाहीं. आणि प्रांताचें सरासरी प्रमाण पाहिल्यास तें दर चौ. मैलास १८६ इतकेंच आहे. तेव्हां बंगालप्रमाणेंच सिल्हेट जिल्हाहि दाट लोकवस्तीचा आहे हें स्पष्ट होतें. १९३६–३७ सालीं अन्नधान्यासाठीं (तांदूळ, कडधान्यें वगैरे) लागवडीखालीं असलेली आसामांतील जमीन ५६,-८३,७७४ एकर म्हणजे दर माणशीं १·८ एकर होती. सिल्हेट जिल्ह्यांत एकंदर अन्नधान्यासाठीं लागवडीखालील जमीन १९,८२,५६६ एकर म्हणजे दर माणशीं ०·६३ एकर होती. १९३६–३७ पर्यंतच्या पंचवार्षिक सरासरी-प्रमाणें दर एकरीं ८९६ रत्तल उत्पादन असतें असें मानल्यास, दरमाणशीं दरवर्षीं ५६४ रत्तल धान्य म्हणजे प्रतिदिनीं १·५ रत्तल असें प्रमाण पडतें. सर्व पिकाऊ प्रदेश तांदुळाच्या उत्पादनासाठींच उपयोजिला जाईल असें आपण मानून चाललों आहोंत. हा अतिशयोक्तिपूर्ण आंकडा खरा मानला तरीसुद्धां सर्वसामान्य निरोगी माणसाला इतकें धान्य पुरणार नाहीं. याबाबत आणखी खोलांत जाण्याचें कारण नाहीं. कारण बंगालमधील मुस्लिम–विभागाच्या उलट येथील परिस्थिति असून या जिल्ह्यांमध्यें ज्यूटसाठीं अत्यल्प जमीन उपयोगांत आणली जाते. तरीहि बंगालची अन्नतूट या जिल्ह्याला मोठ्या प्रमाणावर भरून काढतां येणें अशक्य आहे.

गेलीं जवळजवळ चाळीस वर्षें बंगालमधील लोकांचा ओघ फार मोठ्या प्रमाणावर आसामकडे चालला आहे हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. या देशां-तरामुळें आसाममधील मुसलमान–लोकवस्तींत भर पडली असली, तरी त्यामुळें बंगालमधील अन्न–परिस्थिति कोठल्याहि प्रकारें सुधारलेली नाहीं. याच कालांत बंगालची लोकसंख्या १८१ लाखांपेक्षां जास्त वाढली आहे. आणि गेल्या दश-कांत (१९३१–४१) तर ही संख्या १०२ लाखांनीं म्हणजे जवळजवळ संपूर्ण

आसामइतक्या लोकसंख्येनें वाढली आहे. अर्थात् या परिस्थितींत बंगालची अन्नपुरवठा–विषयक परिस्थिति सुधारेल अशी अपेक्षाहि करतां येत नाहीं.[1]

बंगाल व आसामचें चहा हें व्यापारदृष्ट्या एक महत्त्वाचें उत्पादन आहे. या बाबतहि मुसलमान–बहुसंख्य जिल्ह्यांची परिस्थिति असमाधानकारक आहे. १९३६–३७ सालीं चहासाठीं उपयोगांत आणलेल्या २,०३,१०० एकर जमिनीपैकीं फक्त ७,७०० एकर जमीन मुसलमान–बहुसंख्य प्रांतांत येते, आणि उरलेली १,९५,४०० एकर जमीन जालपैगुरी आणि दार्जीलिंग या बिगर–मुसलमान–बहुसंख्य जिल्ह्यांत आहे. या दृष्टीनें आसाममधील मुसलमानांची परिस्थिति बरी आहे. १९३६–३७ सालची आसाम प्रांतातील एकंदर चहाखालील जमीन ४,३८,९२५ एकर होती. यापैकीं ८८,९५७ एकर सिल्हेट या मुसलमान–बहुसंख्य जिल्ह्यांत होती. राहिलेली सर्व जमीन पुढील जिल्ह्यांत प्रामुख्यानें विभागली गेली आहे:—शिबसागर, लखीमपूर, दारंग, आणि काचार. हे चारी जिल्हे बिगर–मुसलमान प्रदेशांत मोडतात.

## २. वायव्य–विभाग

या विभागांतील प्रदेशांकडे नजर टाकल्यास शेतकी व अन्नधान्यें यांबाबत त्यांची परिस्थिति जास्त बरी आहे असें दिसून येईल. पंजाबमधील मुसलमान–बहुसंख्य प्रदेशांतील लोकसंख्येचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे:—

| लोकसंख्या | क्षेत्रफळ चौ. मैल | दर चौ. मैलास लोकसंख्येचें प्रमाण |
|---|---|---|
| १,६८,७०,९०० | ६३,७७५ | २६४ |

दर चौरस मैलास लोखसंख्येचें हेंच प्रमाण प्रमाण वायव्य सरहद्द, सिंध व बलुचिस्तान या प्रांतांत अनुक्रमें २१३,९४ व ९ असें आहे. पूर्व भागांतील लोकसंख्येशीं तुलना करितां पंजाबमधील कांहीं प्रदेश, वायव्य सरहद्द, सिंध व बलुचिस्तान मिळून होणाऱ्या विभागांतील लोकसंख्येचें प्रमाण दर चौ. मैलास १३८ आहे. हेंच प्रमाण बंगालच्या मुसलमानी विभागांत ८१० आणि सिल्हेट जिल्ह्यांत ५६९ असें आहे.

---

१. हिंदुस्थानची शिरगणती, खंड १ ला: पृ. ६२ वरील कोष्टकें.

प्रत्यक्ष लागवडीखालीं आलेली जमीन पश्चिमोत्तर विभागांत किती आहे याचें १९३९–४० चें कोष्टक पुढील पानावर दिलें आहे. यांत बलुचिस्तानचा समावेश केलेला नसून सर्व पंजाबचा मात्र समावेश केला आहे. हे आंकडे १९३९–४० चे आहेत.

पुढें दिलेल्या २२, २३ व २४ या कोष्टकांवरून असें दिसून येईल कीं, बंगाल–गटापेक्षां पंजाब, सिंध व वायव्य सरहद्द या प्रादेशिक गटांत दर माणशीं लागवडीखालील जमीन जास्त आहे. इतकेंच नव्हे, तर अधिक मिळण्याजोगी पिकाऊ जमीनहि पहिल्या गटापेक्षां येथेंच जास्त आहे. याला कारण दुसऱ्या गटास पंजाब व सिंधमधील विस्तृत पाटबंधाऱ्यांच्या योजनांचा फायदा मिळतो हें होय.

इतर प्रांतांची आंकडेवारी जशी मला मिळूं शकली तशी बलुचिस्तानची आंकडेवारी मला मिळूं शकलेली नाहीं. बलुचिस्तानची १९३३–३४ सालीं पेरणी झालेली जमीन ४,४९,०९४ एकर व कापणी झालेली जमीन २,७३,-८७२ एकर होती असें दिसतें. म्हणजे १९३१ च्या शिरगणतीनुसार याचें दरमाणशीं प्रमाण अनुक्रमें १·१ एकर व ०·७ एकर असें ठरतें. १९४१ ची शिरगणती प्रमाणभूत धरल्यास हेंच प्रमाण अनुक्रमें ०·८१ व ०·५४ असें होतें.

पंजाब व सिंध यांना सुदैवानें मोठ्या प्रमाणावर कालवे, पाटबंधारे वगैरे पाणीपुरवठ्याच्या योजनांचा फायदा मिळतो आणि म्हणून अशी आशा करावयास हरकत नाहीं, कीं उत्तरोत्तर अधिकाधिक क्षेत्रफळ लागवडीखालीं आणतां येईल. इतकेंच नव्हे, तर लागवडीखालील जमिनींतून जास्तींत जास्त उत्पादन होऊं शकेल.

पुढें दिलेल्या २५ व २६ या कोष्टकांत १९३९–४० सालची लागवडीखालील आणि पाटबंधाऱ्यांखालीं भिजणाऱ्या जमिनीची आंकडेवारी दिली आहे.

१९३७–३८ च्या 'ॲग्रिकल्चरल् स्टॅटिस्टिक्स् ऑफ इंडिया'च्या आधारें पंजाबमधील मुसलमानी व बिगर–मुसलमानी प्रदेशांतील दर माणशीं जमिनीचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे. ( आंकडे एकरांचे आहेत. )

### कोष्टक २२.

| | एकंदर जमीन एकर | शेतीस निरुपयोगी जमीन | शेतीस उपयोगी जमीन | लागवडींत नसलेली पिकाऊ जमीन | लागवडी-खालील जमीन | अन्नधान्यासाठीं लागवडीखालील जमीन |
|---|---|---|---|---|---|---|
| पंजाबचा बिगर–मुसलमान–बहु-संख्य प्रदेश | २,१८,९२,३३८ | ६७,३९,५७६ | १,५१,५२,७६२ | ३७,६८,६४९ | १,१३,८४,११३ | ९७,७८,९८१ |
| पंजाबचा मुसल-मान–बहुसंख्य प्रदेश | ३,८२,६२,३८६ | ८२,५७,५५३ | ३,००,०४,८३३ | १,४०,९२,०६९ | १,५९,१२,७६४ | १,१६,३२,१०७ |
| सिंध | ३,०१,७९,४८६ | १,४२,६६,३४७ | १,५९,१३,१३९ | ५८,९९,५१२ | ४८,७३,२४८ | ४२,९६,२११ |
| वायव्य सरहद्द | ८४,३७,५८३ | ३०,३९,९८४ | ५३,९७,५९८ | २८,५१,७०० | २१,०९ ०२९ | २१,१२,९२९ |

## कोष्टक २३.

(आंकडे एकरांचे आहेत.)

| | गळिताच्या धान्यासाठीं लागवडी खालील जमीन | उंसाच्या लागवडी खालील जमीन | कापसाच्या लागवडी खालील जमीन | लोकसंख्या | दर माणशीं लागवडी खालील जमिनीचें प्रमाण | दर माणशीं लागवडी-साठीं अधिक मिळूं शक-णारी पिकाऊ जमीन | दर माणशीं अन्नधान्या-साठीं लाग-वडीखालीं असलेली जमीन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पंजाबांतील बिगर-मुसलमान-बहुसंख्य प्रदेश | ४,१२,७७१ | २,५६,५५० | ७,७९,७७९ | १,१५,४७,९१९ | ०·९८ | ०·३२ | ०·८४ |
| पंजाबांतील मुसलमान-बहु-संख्य प्रदेश | ४,८८,७८३ | २,५३,४६४ | २३,५५,७५२ | १,६८,७०,९०० | ०·९४ | ०·८३ | ०·६९ |
| सिंध | २,१३,५१२ | ७,४२० | ९,७०,१७४ | ४५,३५,००८ | १·०८ | १·३० | ०·९४ |
| वायव्य सरहद्द | ९१,७३९ | ७०,०८४ | २२,१९५ | ३०,३८,०६७ | ०·६९ | ०·९३ | ०·६९ |

## कोष्टक २४.

| प्रांत | लागवडी खालील एकूण एकर | | तांदूळ | गहूं | इतर अन्नधान्यें | अन्नधान्या-खालील एकर | कापूस (४०० पौंडांचा १ गठ्ठा) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब | २,५७,४४,१२९ | एकर | ९,७६,५५२ | ९५,६५,९७६ | ९३,५५,८६९ | १,९८,९८,३९७ | २६,४१,१०५ |
| | | टन | २,८७,००० | ३,७६,००० | १४,७२,००० | ५५,१९,००० | (१०,१७,०००) |
| पंजाबचें दर | ०·९ | | ... | ... | ... | ०·७ एकर | ०·०९ |
| माणशीं प्र. | | | ... | ... | ... | ५·३ मण | ... |
| वायव्य | २०,००,६१७ | एकर | ३६,४२३ | ९,३१,३७३ | ९,७७,२३५ | १९,४५,०३१ | १७,३५१ |
| सरहद्द | | टन | ... | २,६०,००० | ३,२३,००० | ५,८३,००० | (३,०००) |
| वा. स. चें. | ०·६६ | | ... | ... | ... | ०·६५ एकर | ... |
| दर माणशीं प्र. | | | ... | ... | ... | ५·२ मण | ... |
| सिंध | ४९,४५,८४३ | एकर | १३,२८,७१३ | १२,७०,५६३ | १६,४५,०१० | ४२,४४,२८६ | ८,५४,३९० |
| | | टन | ४,४३,००० | ३,२६,००० | १,९०,००० | ९,५९,००० | (३,०९,०००) |
| सिंधचें दर | १·१ | | ... | ... | ... | ०·९३ एकर | ०·१८ |
| माणशीं प्र. | | | ... | ... | ... | ५·८ मण | ... |
| तिन्ही | ३,२६,९०,५८९ | एकर | २३,४१,६८८ | १,१७,६७,९१२ | २,०७,७८,११४ | २,६०,८७,७१४ | ३५,१२,८४६ |
| प्रांतांची एकूण | | टन | ७,३०,००० | ४३,४६,००० | १९,८५,००० | ७०,६१,००० | (१३,२९,०००) |
| तिन्ही प्रांतांचें | ०·९० | | ... | ... | ... | ०·७० एकर | ०·१० |
| दर मा. प्र. | | | ... | ... | ... | ५·४ मण | ... |

(शेवटच्या रकान्यांतील कंसामधील आंकडे गठ्ठयांचे आहेत.)

### कोष्टक २५.

| | पिकाखालील जमीन एकर | कालव्यांखालीं भिजणारी जमीन एकर | कालव्यांचा फायदा मिळणाऱ्या जमिनीचें लागवडीखालील जमिनीशीं शेंकडा प्रमाण | कालवे, पोट कालवे, पाट वगैरे मैल | १९३९–४० अखेर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| पंजाब | २,५७,४४,१२९ | १,३५,२१,८८९ | ६२·५ | २०,१९३ | ३९,२६,९०,२६८ |
| सिंध | ४९,४५,८४३ | ४२,४३,९४९ | ८५·८ | ९,६२० | ३०,००,८८,७६० |
| वायव्य–सरहद्द | २०,००,६१७ | ४,७५,४१३ | २३·५ | ९७९ | ३,१५,२१,४४४ |
| बलुचिस्तान | ४,४९,०९४ | १,४५,४०२ | ३२·३ | २५२ | १,४५,११,२७६ |
| वायव्य–प्रदेशांतील एकूण बेरीज | ३,३१,३९,६८३ | १,८३,८६,६५३ | ५५·४ | ३१,०४४ | ७३,८८,११,७४८ |
| ब्रिटिश हिंदुस्थानची एकूण बेरीज | २०,९९,५९,७८६ | २,८२,९२,९३८ | १३·४ | ७४,९११ | १,५३,८९,४२,४३३ |
| वायव्य–प्रदेशाचें ब्रिटिश हिंदुस्थानशीं शेंकडा प्रमाण | १५·६ | ६१·४ | ... | ४१·४ | ४७·९ |

कोष्टक २६.

| | प्रत्यक्ष वा अ-प्रत्यक्ष एकंदर उत्पन्न | प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष खर्च | प्रत्यक्ष उत्पन्न रु. | एकंदर भांडवलाशीं शेंकडा प्रमाण | कालव्यानें पिकविलेल्या पिकाचें उत्पन्न रु. | पिकाच्या मूल्याशीं दर माणशीं प्र. रु. आ. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब | ७,१०,९०,१४८ | १,५३,९८;२२२ | ५,५६,९१,९२६ | १४·१९ | ५०,७४,५७,६९६ | १७– ३–० |
| सिंध | १,६८,६१,२९३ | ६८,८५,५५४ | ९९,७५,७३९ | ३·३२ | ११,०२,१२;६७७ | २४– ५–० |
| वायव्य-सरहद्द | २३,२२,५५७ | ९,८०,०७१ | १३,४२,४८६ | ०·४२ | २,६६,८२,९१२ | ८–१२–० |
| बलुचिस्तान | ३,९४,५४० | २,५५,९५५ | १,३८,५८५ | ०·९५ | ४,४८,३९८ | ०–१४–० |
| वायव्य-प्रदेशाची एकूण | ९,०६,६८,५३८ | २,३५,१९,८०२ | ६,७१,४८,७३६ | ९·०८ | ६४,४८,०१,९८५ | १७–१०–० |
| ब्रि. हिंदुस्थानची एकूण | १४,६०,४२,१२७ | ४,५६,९३,४७१ | १०,०३,४८,६५६ | ६·५२ | १,३६,२९,०८,३७३ | ३– ८–० |
| वायव्य-प्रदेशांचें ब्रि. हिंदुस्थानशीं प्रमाण | ६२·४ | ५१·४ | ६६·९ | ... | ४७·५ | ... |

सरकारी पाटबंधाऱ्यांखालीं भिजणाऱ्या जमिनींबाबत पंजाबमधील मुसलमानी व मुसलमानेतर विभागांची तुलना केली, तर पुढीलप्रमाणें परिस्थिति आढळून येते. यांत विहिरी, तलाव वगैरे खाजगी साधनांनीं भिजणाऱ्या क्षेत्राचा समावेश केलेला नाहीं.

| | सरकारी कालव्यांखालीं भिजणारी एकर जमीन | प्रांतांतील एकूण भिजणाऱ्या जमिनीशीं सरकारी कालव्यांखालीं भिजणाऱ्या जमिनीचें प्रमाण |
|---|---|---|
| मुसलमान—बहुसंख्य प्रदेश | ८७,०८,०८९ | शेंकडा ७८ टक्के |
| बिगर—मुसलमान—बहुसंख्य प्रदेश | २४,९५,१९९ | शेंकडा २२ टक्के |
| एकूण | १,१२,०३,२८८ | |

येणेंप्रमाणें मुसलमान—बहुसंख्य प्रदेशास सरकारी कालवे वगैरेंचा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर फायदा मिळतो असें दिसतें. यावरून हें स्पष्ट होईल कीं, सर्व ब्रि. हिंदुस्थानशीं तुलना करतां या पश्चिमोत्तर प्रदेशांची परिस्थिति निदान कालवे वगैरेंच्या बाबतींत तरी चांगली आहे. या प्रदेशांतील लागवडीखालील जमिनीचें ब्रिटिश हिंदुस्थानांतील एकंदर जमिनीशीं प्रमाण शेंकडा १५·६ इतकेंच आहे. परंतु पाटांखालीं भिजणाऱ्या जमिनीचें प्रमाण शेंकडा ६१·४ इतकें आहे. ब्रि. हिंदुस्थानच्या कालवे, पाट वगैरेंच्या एकंदर ७४,९११ मैल लांबीपैकीं ३१,०४४ मैल म्हणजे शेंकडा ४१·४ लांबीचे कालवे पश्चिमोत्तर प्रदेशांत आहेत. एकंदर ब्रिटिश हिंदुस्थानच्या १५३·८९ कोटी भांडवलापैकीं कमींत कमी ७३·८८ कोटी म्हणजे शेंकडा ४७·९ भांडवल या विभागांत गुंतलेलें आहे. पाणीपट्टीची गोष्ट घेतल्यास एकंदर १०·०३ कोटीपैकीं ६·७१ म्हणजे शेंकडा ६६·९ इतकें उत्पन्न याच विभागांतून मिळतें. पाटांच्या सहाय्यानें काढण्यांत येणाऱ्या पिकांचें या भागांतील दर माणशीं प्रमाण १७ रुपये १० आणे आहे, तर तेंच प्रमाण ब्रि. हिंदुस्थानांत दर माणशीं ३ रु. ८ आ. असल्याचें आढळतें.

हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं, पंजाबच्या सर्व उत्पन्नापैकीं किमान ४२

टक्के उत्पन्न केवळ पाणपट्टीचें असतें. सिंध आणि वायव्य सरहद्द या प्रांतांतील पाणीपट्टीचें प्रमाण अनुक्रमें शेंकडा १३·४ व ७·५ इतकें आहे.

इतकें असूनहि अन्नप्रश्नाच्या दृष्टीनें गरजेहून अधिक पिकविणारा हा विभाग आहे असें म्हणतां येणार नाहीं. त्यांत ज्या धान्याचें थोडें जास्त उत्पादन होतें, तें अतिरिक्त धान्य शेजारच्या प्रदेशांत खपतें. जून १९३४ मध्यें सिमल्यांत ज्यावेळीं धान्ययोजना–परिषद् भरली होती, त्यावेळीं साम्राज्याच्या शेतकी–संशोधन–मंडळानें प्रांतवार भात व गहूं यांचें उत्पादन कसें होतें याचें विवेचन केलें होतें. पंजाबबद्दल बोलतांना त्यानें असा अभिप्राय दिला कीं, पंजाब विशेष प्रमाणावर तांदूळ पिकवीत नाहीं व खातहि नाहीं. गव्हाच्या बाबतींतहि फार अधिक गहूं तेथें पिकतो असें म्हणतां येणार नाहीं. आणि जें थोडें अधिक उत्पादन होतें, तें शेजारील प्रांतांत वा कलकत्त्याला निर्यात होतें. जेव्हां सिंध-मध्यें २० लक्ष एकरपर्यंत जमीन गव्हाच्या लागवडीखालीं येईल, तेव्हांच म्हणण्यासारखें अतिरिक्त उत्पादन या वायव्य–विभागांत होण्याचा संभव आहे, असा त्यांचा अभिप्राय होता.[1] वर दिलेल्या कोष्टकावरून सिंध प्रांताला हा आंकडा १९३९–४० पर्यंत तरी गांठतां आला नव्हता असें दिसतें.

जानेवारी १९४५ मध्यें पंजाबच्या संवर्धन खात्याचे मंत्री सरदार बलदेव-सिंग यांनीं कलकत्त्याला असे उद्गार काढले कीं, "तीन वर्षांपूर्वी जरी पंजाब हा भाताचे बाबतींत तुटवड्याचा प्रांत होता, तरी १९४४–४५ सालीं तेथें ३० लक्ष टन भाताचें अतिरिक्त उत्पादन झालें." अशा तऱ्हेनें सिंध व पंजाब हे प्रांत आपल्या शेतीची वाढ मोठ्या झपाट्यानें करीत असून हे प्रांत आपल्या इतर प्रांतांना मोठ्या प्रमाणांत अन्नपुरवठा करूं लागतील असा संभव आहे. अर्थात् ही वाढ युद्धामुळेंच झालेली आहे हें निःसंशय.

प्रत्येक प्रौढाला प्रतिदिन १४ छटाक वा १२ छटाक अन्नधान्य आवश्यक

---

१. धान्ययोजना–परिषदेचें कामकाज (दिल्ली १९३४) पृ. ७–१०. प्रो. बी. के. सरकार यांच्या 'लोकसंख्येचें समाजशास्त्र' या पुस्तकांत दिलेल्या पृ. ३८–३९ मधील उताऱ्यावरून.

आहे असा हिशेब केल्यास आणि शेंकडा ७५ टक्के लोकांना प्रौढाइतक्या अन्नाची जरुरी आहे असें मानल्यास पंजाब, सिंध व वायव्य सरहद्द या प्रांतांचें कोष्टक पुढीलप्रमाणें होईल:—

कोष्टक २७.

| | पंजाब | सिंध | वायव्य सरहद्द |
|---|---|---|---|
| लोकसंख्या | २,८४,१८,८१९ | ४५,३५,००८ | ३०,३८,०६७ |
| प्रौढ लोकसंख्या (लोकसंख्येच्या ७५ टक्के) | २,१३,१४,११४ | ३४,०१,२५६ | २२,७८,५५० |
| वार्षिक उत्पादन (मण) | १५,०६,६८,७०० | २,६१,८०,७०० | १,५९,१५,९०० |
| प्रत्येकीं प्रतिदिन १४ छटाकांप्रमाणें धान्याची जरुरी | १७,०१,७९,७९० | २,७१,५६,७३० | १,८१,९२,६९५ |
| तूट (मण) | १,९५,११,०९० (११·४२) | ९,७६,०३० (३·५९) | २२,७६,७९५ (१२·५१) |
| प्रत्येकीं प्रतिदिन १२ छटाकांप्रमाणें धान्याची जरुरी | १४,५८,६८,२३५ | २,३२,७७,५१० | १,५५,९३,८९५ |
| अतिरिक्त धान्य-पुरवठा (मण) | ४८,००,४६५ (३·२९) | २९,०३,१९० (१२·४७) | ३,२२,००५ (२·०६) |

सरहद्द प्रांतांतहि दुसरीकडे कोठेंहि नाहीं इतक्या झपाट्यानें लोकसंख्येंत वाढ होत आहे. १८९१ ते १९४१ या पन्नास वर्षांत व १९३१–१९४१ या दहा वर्षांत किती वाढ झाली याचें कोष्टक पुढें दिलें आहे.

विस्तृत कालव्यांच्या पद्धतीमुळें अन्नधान्याचें उत्पादन वाढलें आहे आणि तें याहूनहि वाढण्याची शक्यता आहे. परंतु ही वाढ लोकसंख्येच्या वाढीशीं समप्रमाण राहूं शकत नाहीं असें दिसतें. कारण गेल्या पन्नास वर्षांत पंजाब, सिंध व वायव्य सरहद्द प्रांतांत अनुक्रमें शेंकडा ५२,५७ व ६३ इतकी वाढ झालेली आहे. लोकसंख्येच्या वाढीचा हा प्रश्न देशव्यापीच आहे. तौलनिकदृष्टया या भागाची परिस्थिति सध्यां तरी सापेक्षतया चांगली आहे असें म्हणतां येईल.

## कोष्टक २८.

| प्रांत | १९४१ ची लोकसंख्या | १८९१ ची लोकसंख्या | १९४१ व १८९१ सालांच्या लोकसंख्येंतील फरक व शें. प्रमाण | १९३१ ची लोकसंख्या | १९४१ व १९३१ सालांच्या लोकसंख्येंतील फरक व शें. प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| पंजाब | २,८४,१८,८१९ | १,८६,५२,६१४ | ९७,६६,२०५(५२·३) | २,३५,८०,८६४ | ४८,३७,९५५(२०·५) |
| सिंध | ४५,३५,००८ | २८,७५,१०० | १६,५९,९०८(५७·०) | ३८,८७,०७० | ६,४७,९३८(१६·७) |
| वा. सरहद्द | ३०,३८,०६७ | १८,५७,५१९ | ११,८०,५४८(६३·५) | २४,२५,०७६ | ६,१२,९९१(२५·२) |
| बलुचिस्तान | ५,०१,६३१ | ३,८२,१०६ | १,१९,५२५(३१·२) | ४,६३,५०८ | ३८,१२३(८·२) |
| ब्रि. हिं.तील प्रांत | २९,५८,०८,७२२ | २१,२९,७०,६१६ | ८,२८,३८,१०६(३८·८) | २५,६७,५७,८१८ | ३,९०,५०,९०४(१५·२) |

अन्नधान्याखेरीज वायव्य–विभागांत विशेषतः पंजाब आणि सिंधमध्यें खूप मोठ्या प्रमाणावर कापसाचें उत्पादन होतें. १९३९-४० सालीं पंजाबमध्यें प्रत्येकीं ४०० पौंडांचा एक गठ्ठा याप्रमाणें १०,१७,००० गठ्ठे, सिंधमध्यें ३,०९,००० गठ्ठे व वायव्य सरहद्दींत ३,००० गठ्ठे कापूस तयार झाला. ब्रिटिश हिंदुस्थानांत उत्पादन झालेल्या ३३,८१,००० गठ्ठयांपैकीं १३,२९,००० गठ्ठे म्हणजे शेंकडा ३९·३ टक्के कापूस वायव्य–विभागांत तयार झाला, हें लक्षांत घेतल्यास हें किती महत्त्वाचें पीक आहे तें समजून येईल. या प्रांतांतील कापसाच्या लागवडीखालील क्षेत्रफळ अनुक्रमें २६,४१,१०५, ८,५४,३९० व १७,३५१ एकर इतकें होतें.[१] कापसाची विशेषतः उत्कृष्ट दर्जाच्या कापसाची लागवड सिंधच्या सक्कर धरणाच्या टापूंत प्रतिवर्षी वाढत आहे. उदा० १९३२–३३ सालीं (धरण बांधण्यापूर्वी) कापसाच्या लागवडीचें क्षेत्रफळ ३,४२,८६० एकर होतें, तें कायम पाणीपुरवठ्याची सोय झाल्यानें १९३९–४० सालीं ८,५५,२७७ एकरांपर्यंत वाढलें. शिवाय हें जें पीक वाढलें तें सर्व भरपूर किंमत येणाऱ्या अमेरिकन (लांब धाग्याच्या) कापसाचेंच आहे.[२] पंजाबमधील परिस्थितीहि तंतोतंत हीच नसली तरी जवळजवळ अशीच आहे.

१९३९ च्या सरासरी किंमतीप्रमाणें हिशेब केल्यास एका ४०० पौंडांच्या गठ्ठयाला १०५ रु. याप्रमाणें सर्व हिंदुस्थानच्या कापसाची किंमत ३५¾ कोटी झाली. यापैकीं सुमारें ९ कोटीचा कापूस पंजाबमध्यें व ३¼ कोटीचा कापूस सिंधमध्यें तयार झाला.

पंजाबमध्यें कापडाच्या गिरण्या फारच थोड्या आहेत आणि हातमागांची जरी तेथें बरीच ख्याति असली, तरी त्यांना कांहीं थोड्या प्रमाणांत कापूस पुरेसा होतो. बाकीचा देशी परप्रांतीय गिरण्यांकडे जातो किंवा विदेशी निर्यात केला जातो. १९३८–३९ सालीं हिंदुस्थानांत ३८० कापडगिरण्या होत्या.

---

१. स्टॅटिस्टिकल् ॲब्स्ट्रॅक्ट फॉर ब्रि. इंडिया, १९३०–३१ ते १९३९–४०, पृ. ५५४.

२. सिंधच्या शेतकीखात्याचा १९३९–४० चा वार्षिक अहवालः पृ.७–८.

त्यांत एकंदर दहा लक्ष चात्या व दोन लक्ष माग होते. यापैकीं पंजाब व सिंध-मधील एकूण सात गिरण्यांतून फक्त ७२,००० चात्या २,००० माग होते. वायव्य सरहद्द व बलुचिस्तान येथें तर एकहि कापडगिरणी नव्हती.[1]

वरील सर्व ऊहापोहांतून वायव्य-विभाग म्हणजे मुसलमानेतर टापू धरून सर्व पंजाब, सिंध व वायव्य सरहद्द असें मानलें आहे.

## ३०. खनिज-पदार्थ

अमेरिकेंतील कोलंबिया विश्वविद्यालयांतील भूगर्भशास्त्राचे प्रोफेसर श्री. चार्लस् एच्. बेर हे 'फॉरिन् अफेअर्स'मध्यें लिहितात कीं, "ब्रह्मदेश वगळून हिंदुस्थान हा आतां नसला तरी लौकरच जागतिक व्यापारांत पुढील गोष्टी-मुळें महत्त्वाचें स्थान पटकावून बसेल:—कोळसा, पेट्रोल, अशुद्ध लोखंड, अशुद्ध मँगनीज, क्रोम, सोनें, बॅक्साईट, क्षार पदार्थ, मग्नेसाईट, अभ्रक, जिप्सम, रत्नें, मोनासाईट इत्यादि.

"आधुनिक जगांत औद्योगिक शक्ति कोळसा, लोखंड आणि तेल या त्रयीं-वर अवलंबून आहे. आधुनिक युगांत कोळसा व लोखंड हा औद्योगीकरणाचा पाया होय. मानवाच्या शारीरिक वाढीसाठीं ज्याप्रमाणें प्राणवायु व हैड्रोजन यांची आवश्यकता असते, तशीच औद्योगीकरणास कोळसा व लोखंड यांची आवश्यकता आहे. त्यांचा एकत्र वास असावयास हवा. तेल हें जरी मह-त्त्वाचें असलें तरी इतकें आवश्यक नसतें. शांततेच्या काळांत एखाद्या राष्ट्रा-जवळ कोळसा भरपूर असल्यास व खनिज-पदार्थांची देवघेव मोकळेपणें चालत असल्यास, तेल अजिबात मिळालें नाहीं तरी त्या राष्ट्राचें चालू शकतें. आणि जरी अशा राष्ट्राजवळ तेल नसलें, तरी जर्मनीप्रमाणें कोळशाचें द्रव-जळणांत रूपां-तर करतां येईल. लोखंड वा पोलाद यांचे कामींहि तेलाचा प्रत्यक्ष संबंध येत नसल्यानें त्याला फारसें मूल्य नाहीं. जोंपर्यंत कोळशाचे जागीं उपयोगांत आणतां

---

१. एम्. पी. गांधी : इंडियन् टेक्स्टाइल कॉटन् इंडस्ट्री (१९३९ चें ॲन्युअल्), पृ. ६२.

येईल असा दुसरा पदार्थ नाहीं, तोंपर्यंत कोळसा ही एक अत्यावश्यक चीज म्हणूनच राहणार.

"यावरून उघड निघणारा निष्कर्ष असा कीं, जरी हिंदुस्थानांत तेलाच्या खाणी नसल्या तरी लोखंड, कोळसा व पोलाद तयार करण्यास लागणारे इतर खनिज–पदार्थ तेथें भरपूर आहेत. दुय्यम दर्जाचे खनिज–पदार्थहि तेथें पुष्कळ प्रमाणांत आहेत. या सर्वांच्या जोरावर हिंदुस्थान हें एक सामर्थ्यवान् व पुरेसें स्वावलंबी असें औद्योगिक राष्ट्र बनूं शकेल. खनिज–पदार्थांच्या पुरवठयाचे येथील दर माणशीं प्रमाण तौलनिकदृष्टया फार कमी आहे. तरीहि भविष्यकाळां-तील आवश्यक पदार्थांच्या पुरवठयांत कांहींहि विशेष बाध न आणतां हें प्रमाण वाढवितां येणें अगदीं शक्य आहे."

आतां ते खनिज पदार्थ–हिंदुस्थानांत कसकसे विभागलेले आहेत आणि पूर्वेकडील व वायव्येकडील मुसलमानी विभागांतील त्यांचें प्रमाण काय आहे तें पाहूं.

पुढें दिलेल्या २९ व ३० या कोष्टकांत पश्चिम–पंजाबांतच तयार होणारें मीठ (६४,६७४ टन), सर्वस्वीं मुसलमानेतर प्रदेशांतच तयार होणारें बॅक्साईट (१०,१३४ टन) व इतर बिनमहत्वाच्या पदार्थांचा समावेश मीं केलेला नाहीं.

कोळसा सर्वांत मूल्यवान् पदार्थ आहे हें सरळ आहे. पंजाब व बलुचिस्तान येथें मिळणारा थोडासा कोळसा सोडल्यास बाकी सर्वच्या सर्व कोळसा मुस्लिम टापूच्या बाहेर मिळतो. बंगालमधील कोळशाच्या सर्व खाणी बरद्वान जिल्ह्यांत आहेत आणि तेथील मुसलमान लोकसंख्या शेंकडा १८ असल्यानें हा जिल्हा मुसलमानेतर प्रदेशांतच साहजिकपणें गणला जाणार. आसाममधील तेलाच्या खाणींचीहि हीच स्थिति आहे.

पंजाब, वायव्य सरहद्द व बलुचिस्तान या प्रांतांतील खाणींतून थोड्याफार प्रमाणांत तेल निघतें. जिऑलॉजिकल् सर्व्हे ऑफ इंडियाचे सुपरिंटेंडंट, डॉ. जे. कॉगिन् ब्राउन् यांनीं आपल्या "इंडियाज् मिनरल् वेल्थ" (हिंदुस्थानची खनिज–संपत्ति) या पुस्तकांत सन १९०० ते १९३३चे, म्हणजे जेव्हां

ब्रह्मदेशचा हिंदुस्थानांत समावेश होत असे तेव्हांचे, पेट्रोलच्या सरासरी वार्षिक उत्पन्नाचे आंकडे दिले आहेत. १९२९ ते ३२च्या कालांत पेट्रोलचें प्रमाण पुढीलप्रमाणें होतें:–ब्रह्मदेश ८१'४ टक्के, आसाम १५'५ टक्के आणि पंजाब ३'१ टक्के. त्यांनीं आपल्या पुस्तकांत सर एडविन् पास्को यांचा खालील उतारा दिलेला आहे : "परंतु पंजाबच्या पुष्कळ भागांत आणि बलुचिस्तानांत तेलाचे खडक जमीन धुपल्यामुळें फार खोलवर उखणले गेले आहेत अगर भूकंपादि हालचालींमुळें उध्वस्त झाले आहेत. त्या कारणानें मूळचे तेलाचे सांठे नाहींसे झाले आहेत. तेलाचे पाझर अनेक ठिकाणीं आढळून येतात. परंतु त्यांपैकीं बहुतेक दिखाऊच ठरतात. यांत्रिक साधनांनीं ज्यांचा उपसा करतां येईल अशा सांठ्यांशीं त्यांचा संबंध नसतो. प्रयोगादाखल केलेलें कांहीं खोदकाम व्यर्थ गेलें आहे. परंतु खौर येथील तेलाचें उत्पादन मात्र यशस्वीपणें चालू आहे."[1]

### कोष्टक २९.

( १९३८ चें उत्पादन व मूल्य रुपये )

| | | मुसलमानी बंगाल | पंजाब | सिंध | वायव्य सरहद्द | बलुचिस्तान |
|---|---|---|---|---|---|---|
| कोळसा (टन) | उ. | ... | १,८४,०२८ | ... | ... | १४,३८८ |
| | मू. | ... | १०,२०,८५६ | ... | ... | ९१,८१२ |
| पेट्रोल (गॅलन) | उ. | ... | २,११,१३,४२० | ... | ... | ... |
| | मू. | ... | ५२,७८,३५५ | ... | ... | ... |
| क्रोमाइट (टन) | उ. | ... | ... | ... | ... | २१,८९२ |
| | मू. | ... | ... | ... | ... | ३,२६,०१४ |
| तांबें (टन) | उ. | ... | ... | ... | ... | ... |
| | मू. | ... | ... | ... | ... | ... |
| लोखंड (टन) | उ. | ... | .. | ... | ... | ... |
| | मू. | ... | ... | ... | ... | ... |

१. जे. सी. ब्राउन् : हिंदुस्थानची खनिज-संपत्ति, पृ. ६०.

( कोष्टक २९ चालू )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मँगनीज (टन) | उ. | ... | ... | ... | ... | ... |
| | मू. | ... | ... | ... | ... | ... |
| मॅग्नेसाइट (टन) | उ. | ... | ... | ... | ... | ... |
| | मू. | ... | ... | ... | ... | ... |
| अभ्रक (हं.) | उ. | ... | ... | ... | ... | ... |
| | मू. | ... | ... | ... | ... | ... |

## कोष्टक ३०.

| धातू | | मुसलमानी प्रदेश | ब्रिटिश हिंदुस्थान | मुसलमानेतर ब्रिटिश हिंदुस्थान |
|---|---|---|---|---|
| कोळसा (टन) | उ. | १,९८,४१६ | २,५२,७८,२१८ | २,५०,७९,८०२ |
| | मू. | ११,१२,६६८ | ९,४६,३०,७१८ | ९,३५,१८,०५० |
| पेट्रोल (गॅलन) | उ. | २,११,१३,४२० | ८,७०,८२,३७१ | ६,५९,६८,९५१ |
| | मू. | ५२,७८,३५५ | १,६५,४३,१४२ | १,१२,६४,७८७ |
| क्रोमाइट (टन) | उ. | २१,८९२ | २७,०८६ | ५,१९४ |
| | मू. | ३,२६,०१४ | ४,२५,९४२ | ९९,९२८ |
| तांबें (टन) | उ. | ... | २,८८,०७६ | २,८८,०७६ |
| | मू. | ... | ३२,४०,६४० | ३२,४०,६४० |
| लोखंड (टन) | उ. | ... | १४,२१,७०१ | १४,२१,७०१ |
| | मू. | ... | २६,९१,८२९ | २६,९१,८२९ |
| मँगनीज (टन) | उ. | ... | ७,६६,३४१ | ७,६६,३४१ |
| | मू. | ... | ३,२०,९३,७०९ | ३,२०,९३,७०९ |
| मॅग्नेसाइट (टन) | उ. | ... | २३,०५२ | २३,०५२ |
| | मू. | ... | १,३४,८७६ | १,३४,८७६ |
| अभ्रक (हं.) | उ. | ... | १,०८,८३४ | १,०८,८३४ |
| | मू. | ... | ४०,८९,४८८ | ४०,८९,४८८ |
| एकूण मूल्य रु. | | ६७,१७,०३७ | १५,३८,५०,३४४ | १४,७१,३३,३०७ |

सबंध ब्रिटिश हिंदुस्थानच्या खनिज उत्पादनाचें एकंदर मूल्य १९३८ सालीं १५,३८,५०,००० रु. होतें. यांपैकीं मुसलमानी पूर्वविभागांत कांहींहि उत्पन्न नसून वायव्य भागांत एकूण ७६,१७,००० रु. किंमतीचें म्हणजे फक्त ४·३ टक्के उत्पादन झालें. संस्थानी विभागांतील उत्पन्नाचा समावेश केला तर मुसलमानांची स्थिति याहूनहि निकृष्ट झाल्याचें दिसेल. यावरून प्रो. बेर यांनीं जो निष्कर्ष काढला आहे त्याबद्दल आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. ते म्हणतात, "हिंदुस्थानांतील खनिजसंपत्ति अशा तऱ्हेनें विभागली गेली आहे कीं तिची धर्मानुसार विभागणी केल्यास हिंदु-प्रदेश हा संपन्न व मुसलमानी प्रदेश अतिशय निकृष्ट असल्याचें दिसेल. दोन विभागांतील संपन्नतेमध्यें असणारा हा फरक इतका मोठा आहे कीं, लोकसंख्येच्या घनतेचें या विभागांतील प्रमाण लक्षांत घेतलें, तरी तो फारसा सौम्य होण्यासारखा नाहीं. सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, हिंदु-विभागाच्या वांट्याला अधिक खनिज-संपत्ति केवळ आतांपुरतीच आली आहे असें नाहीं. भविष्यकाळीं हिंदुस्थानांत औद्योगीकरणाची वाढ झाल्यावर तर हा फरक अधिकच जाणवेल. पाकिस्तान-बाबतच्या महत्त्वाच्या प्रश्नाशीं ही गोष्ट अगदीं निगडित आहे. हिंदु-प्रदेशांत कोळसा व लोखंड यांचे सांठे आहेत; तसेंच पोलाद तयार करण्यासाठीं लागणाऱ्या इतर धातूंचेहि पुष्कळ सांठे आहेत. अर्थात् यासाठीं आणखीहि कांहीं महत्त्वाच्या धातूंची आयात करावी लागते. तसेंच इतर खनिज-संपत्ति आणि सोनें यांचे व बरेचसें बॉक्साइट व कांहीं प्रमाणांत तांबें यांहि धातूंचे सांठे आहेत. पाकिस्तानमध्येंहि मँगनीज व क्रोमियम सोडल्यास पोलाद तयार करण्यासाठीं लागणाऱ्या इतर धातूंचे सांठे आणि मॅग्नेसाइट सोडून इतर दुय्यम धातूहि आहेत. शिवाय बहुतेक सर्व तेलसांठे पाकिस्तानच्याच प्रदेशांत आहेत.

"आमचा दुसरा निष्कर्ष थोडक्यांत असा आहे कीं, हिंदुस्थानचे हिंदु व मुसलमान प्रादेशिक विभाग परस्परावलंबी आहेत. हिंदु-प्रदेशाला पाकिस्तान-मधील कांहीं पुरवठ्यांची गरज भासेलच. परंतु पाकिस्तानच्या औद्योगिक जीवनासाटीं पाकिस्तानला हिंदुस्थानच्या भरपूर पुरवठ्याची अत्यावश्यकता वाटेल."

यानंतर प्रोफेसर बेर आपल्या परीक्षणाच्या शेवटीं असें म्हणतात कीं, "हिंदी जनतेच्या धार्मिक भावनांची किंमत आम्हांला कमी लेखावयाची नाहीं. तसेंच हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन यांच्यांतील तडजोडींबाबतच्या विलंबाचा दोषहि कोणाच्या माथीं आम्ही लादूं इच्छीत नाहीं. आम्हांला येवढेंच नमूद करावयाचें आहे कीं, हिंदु व मुसलमान प्रदेश यांची जशी परस्पर–सान्निध्यांत वृद्धि झाली, तसे खनिज–संपत्तीबाबत आर्थिक दृष्ट्या ते परस्परावलंबी आहेत. आम्हांला इतकेंच आग्रहानें सांगावयाचें आहे कीं, जर या प्रदेशांचें आर्थिक दृष्ट्या परस्परावलंबित्व इतकें निगडित आहे, तर राजकीय दृष्ट्याहि ते परस्परावलंबी असावेत हा उत्तम मार्ग होय. अर्थात् आम्ही असें गृहीत धरतों कीं, जर धार्मिक बाबीवर राज्याची फाळणी करण्यांत आलीच, तर त्यापासून हिंदूंपेक्षां मुसलमान ज्ञातीचेंच जास्त नुकसान आहे. आम्ही शेवटीं असें सूचित करूं इच्छितों कीं, सर्व हिंदुस्थानचा आर्थिक प्रश्न घेतला, तरी तो आशिया खंडांतील इतर भागांशींहि निगडित आहे."

सर होमी मोदी व डॉ. मथाई यांनींहि असाच निष्कर्ष काढला आहे. ते लिहितात:—

"आर्थिक संवर्धनाच्या दृष्टीनें जरूर असलेलें क्षेत्रफळ, लोकसंख्या व नैसर्गिक पुरवठा यांबाबत जरूर तें प्रमाण, अमेरिकन संयुक्त राष्ट्रें व रशिया सोडल्यास, जगांतील कुठल्याहि एका राष्ट्रापेक्षां हिंदुस्थानपाशींच पुरेसें आहे.... हिंदुस्थानची फाळणी केल्यास पाकिस्तान व हिंदुस्थान हीं दोन्ही दुर्बल होतील. परंतु तौलनिक दृष्टीनें खनिजसंपत्तीबाबत कोळसा, लोखंड व त्यासाठीं लागणारे इतर धातू नसल्यानें पाकिस्तान निर्बल होऊन त्याचें खूपच नुकसान होईल. आणि त्यामुळें भविष्यकालीन प्रगतीस जरूर असलेल्या औद्योगीकरणाच्या दृष्टीनें खनिज–संपत्तीबाबत पाकिस्तानची स्थिति बरीच कमकुवत होईल.[1]

"मात्र मुसलमानी प्रदेशाला एक अनुकूलता आहे. हिंदुस्थानच्या जलविद्युत्-

---

१. सर होमी मोदी आणि डॉ. मथाई : ए मेमोरँडम् ऑन दि इकानॉमिक् अँड फायनॅन्सियल् आस्पेक्ट्स् ऑफ पाकिस्तान, पृ. २५–२६.

निर्मितीबाबतच्या परीक्षणानें असें दिसून आलें आहे कीं, सतत किमान पुरवठा होऊं शकेल अशी २८,७७ हजार किलोवॅट इतकी जलशक्ति पाकिस्तानला उपलब्ध होण्याजोगी आहे. याची वांटणी पूर्वविभागांत १०,८४ हजार किलोवॅट व वायव्य–विभागांत १७,९३ हजार किलोवॅट अशी होईल. 'हिंदुस्थान'ला मात्र १३,४३ हजार किलोवॅट इतकीच जलशक्ति मिळूं शकेल."[१]

## ३१. जंगलें

जंगलें हें एक मोठें भांडवल आहे असें सर्व देशांतून समजलें जातें. त्यांचें संवर्धन हिंदुस्थानांत पूर्णपणें झालेलें नाहीं आणि त्यांपासून होणारी प्राप्तीहि एकंदरींत क्षुल्लक आहे. म्हणून त्यांबाबत खूप खोलांत जाण्याची जरूर नसून त्यांबाबत सर्वसामान्य परिस्थिति थोडक्यांत निवेदन केली तरी चालेल.

पूर्व टापूंत, म्हणजे बंगालमध्यें जंगलखात्यानें त्याचे उत्तर–विभाग व दक्षिण–विभाग असे दोन विभाग पाडले आहेत. उत्तर–विभागांतील जंगलें हीं सर्वस्वीं बिगर–मुसलमान टापूंत येतात आणि दक्षिण–विभागापैकीं एक तृतीयांश बिगर–मुसलमान टापूंत व दोन तृतीयांश मुसलमानी टापूंत येतात. सबंध बंगाल प्रांताचें १९३९–४० सालचें जंगलाचें उत्पन्न ६,५८,०३३ रु. होतें. आणि जंगलखात्यानें केलेल्या विभागणीप्रमाणें उत्पन्न पाहिल्यास मुसलमान टापूंत २ लाख रु. व बिगर–मुसलमान टापूंत जवळजवळ ४॥ लाख रु. अशी त्या उत्पन्नाची विभागणी होते.[२]

पंजाबमध्यें जंगलाचें एकंदर क्षेत्रफळ ५,१८४ चौ. मैल आहे. यांपैकीं बिगर–मुसलमान टापूंत येणाऱ्या पूर्व–विभागांत ३,८७७ चौ. मैल क्षेत्रफळ येतें, व मुसलमान टापूंत येणाऱ्या पश्चिम–विभागांत १,३०७ चौ. मै. इतकें येतें. दोन्ही विभागांचें १९३७–३८ सालचें उत्पादन २३,६०,१९२ रु.

१. सर होमी मोदी आणि डॉ. मथाईः ए मेमोरँडम् ऑन दि इकानॉमिक् अँड् फायनॅन्शियल् आस्पेक्ट्स् ऑफ पाकिस्तान, पृ. १६.

२. जंगलखातें, बंगालच्या १९३९–४०च्या रिपोर्टाच्या आधारें.

व खर्च २२,८५,००७ रु. इतका होता. म्हणजे सर्व प्रांताच्या वांट्याला ७५,१८५ रु. शिल्लक आली.[१]

## ३२. उद्योगधंदे

आतां उद्योगधंद्यांबाबत काय स्थिति आहे तें पाहूं:—

### कोष्टक ३१.

सन १९३९ मधील उद्योगधंदे

**१. सरकारी व स्थानिक मदतीवर चालणारे कारखाने**

| कायम धंदे | | बंगाल | पंजाब | सिंध | वायव्य सरहद्द | ब्रि. बलुचिस्तान | ब्रिटिश हिंदुस्थान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कापड | अ | — | १ | — | — | — | २ |
| | ब | — | १०९ | — | — | — | २,१५७ |
| दारू गाळणें | अ | — | — | १ | — | — | २ |
| | ब | — | — | ३४ | — | — | १७५ |
| सुतारकाम | अ | — | — | — | — | — | ३ |
| | ब | — | — | — | — | — | ५४९ |
| कापडाच्या गिरण्या | अ | १ | १ | — | — | — | ५ |
| | ब | १९ | १९५ | — | — | — | १,७०१ |
| गोद्या | अ | ४ | — | — | — | — | ८ |
| | ब | २,०४८ | — | — | — | — | ४,९४३ |
| इलेक्ट्रिकल एंजिनिअरिंग | अ | ९ | ९ | १ | ५ | — | ३४ |
| | ब | १,११५ | १,०९९ | ४३ | १४८ | — | ३,५९२ |
| सर्वसामान्य एंजिनिअरिंग | अ | १० | ५ | ३ | — | १ | ५२ |
| | ब | १,९१२ | ९२० | ५८१ | — | ४८ | ७,७४५ |
| गवताचे गठ्ठे बांधणें | अ | — | — | — | — | १ | १ |
| | ब | — | — | — | — | ४३ | ४३ |
| टांकसाळ | अ | १ | — | — | — | — | २ |
| | ब | ९३३ | — | — | — | — | १,८३६ |

१. जंगलखातें, पंजाबच्या १९३७–३८ च्या रिपोर्टाच्या आधारें.

( कोष्टक ३१ चालू )

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शस्त्रास्त्रांचे कारखाने | अ | ३ | ६ | १ | ५ | १ | २५ |
| | ब | ९,२७५ | ६,५५६ | ५३५ | २७० | १,०७५ | ३०,७०९ |
| छापखाने | अ | ११ | ६ | १ | १ | — | ४५ |
| | ब | ३,५२१ | १,४८० | १७५ | १०५ | — | १२,५५५ |
| रेल्वे-वर्कशॉप्स् | अ | १६ | ७ | ५ | — | — | ७४ |
| | ब | १५,१७३ | ११,४०२ | १,७३६ | — | — | ५५,७८४ |
| लाकूड कापणें | अ | १ | १ | १ | — | — | ६ |
| | ब | २५ | ८ | — | — | — | २४५ |
| कांतडीं कमावणें | अ | १ | — | — | — | — | १ |
| | ब | ३२ | — | — | — | — | ३२ |
| तार-खातें | अ | १ | — | — | — | — | २ |
| | ब | १,११८ | — | — | — | — | १,३३१ |
| पाणी खेंचण्याचीं स्टेशनें | अ | ५ | १ | २ | १ | — | २६ |
| | ब | ७७० | ६५ | ६२ | २२ | — | २,१०१ |
| लोकरीच्या गिरण्या | अ | १ | — | — | — | — | ३ |
| | ब | १६१ | — | — | — | — | ६२६ |
| इतर | अ | ४ | ६ | २ | — | ५ | ५४ |
| | ब | ५६७ | ५२६ | ९७ | — | ४२३ | ४,९४२ |
| एकूण कायम धंदे | अ | ६८ | ४३ | १७ | १२ | ८ | ३४५ |
| | ब | ३६,६६९ | २२,२७० | ३,२६३ | ५४५ | १,५८९ | १,३१,०६६ |
| हंगामी धंदे | | | | | | | |
| गवताचे गठ्ठे बांधणें | अ | — | ४ | — | ६ | — | १९ |
| | ब | — | १०८ | — | २२५ | — | १,०४८ |
| इतर | अ | — | १ | — | — | — | १० |
| | ब | — | २४ | — | — | — | ३३२ |
| एकूण हंगामी धंदे | अ | — | ५ | — | ६ | — | २९ |
| | ब | — | १३२ | — | २२५ | — | १,३८० |
| एकूण कायम व हंगामी धंदे | अ | ६८ | ४८ | १७ | १८ | ८ | ३७४ |
| | ब | ३६,६६९ | २२,४०२ | ३,२६३ | ७७० | १,५८९ | १,३२,४४६ |

अ = कारखान्यांची संख्या      ब = हजर कामगारांची रोजची सरासरी

## कोष्टक ३२.

### सन १९३९ मधील उद्योगधंदे

### २. इतर कारखाने

| कायम धंदे | | बंगाल | पंजाब | सिंध | वायव्य सरहद्द | ब्रि. बलुचिस्तान | ब्रिटिश हिंदुस्थान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. कापडाच्या गिरण्या | | | | | | | |
| कापूस (कांतणें, विणणें इ०) | अ | ३३ | १४ | ... | ... | ... | ८३६ |
| | ब | ३१,८५९ | ९,२११ | ... | ... | ... | ४,८६,८५३ |
| तागाच्या गिरण्या | अ | ९७ | ... | ... | ... | ... | १०६ |
| | ब | २,८१,२२९ | ... | ... | ... | ... | २,९८,९६७ |
| होजिअरी | अ | ४१ | ६२ | १ | ... | ... | १५२ |
| | ब | १,९४५ | १,८६३ | ३० | ... | ... | ७,७०८ |
| रेशमाच्या गिरण्या | अ | ६ | ४ | २ | ... | ... | १०७ |
| | ब | १,८८६ | ५६३ | ७० | ... | ... | ६,२५१ |
| लोकरीच्या गिरण्या | अ | ... | ६ | ... | ... | ... | १३ |
| | ब | ... | २,६६१ | ... | ... | ... | ६,८०७ |
| इतर | अ | ६ | २५ | ... | ... | ... | ८९ |
| | ब | ९९१ | १,९३६ | ... | ... | ... | १०,४९१ |
| एकूण | अ | १८३ | १११ | ३ | ... | ... | १,३०३ |
| | ब | ३,१७,९१० | १६,२३४ | १०० | ... | ... | ८,१७,०७७ |
| २. एंजिनिअरिंग | अ | २५९ | ५५ | २९ | २ | ४ | १,००१ |
| | ब | ६५,२४७ | ३,११६ | २,२२८ | ९४ | २६५ | १,४८,४२४ |
| ३. खाणीकाम व धातुकाम | | | | | | | |
| ओतकाम | अ | ... | ४६ | २ | ... | ... | ११० |
| | ब | ... | १,५५४ | ६४ | ... | ... | ६,०६६ |
| लोखंड, पोलाद वगैरे शुद्ध बनविण्याच्या गि. | अ | ६ | ... | ... | ... | ... | ९० |
| | ब | १६,९१४ | ... | ... | ... | ... | ४०,७९० |
| शिसें शुद्ध करण्याच्या गिरण्या | अ | १ | ... | ... | ... | ... | १ |
| | ब | २६२ | ... | ... | ... | ... | २६२ |

( कोष्टक ३२ चालू )

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पेट्रोल शुद्ध करण्याच्या गिरण्या | अ | ... | २ | ... | ... | ... | ४ |
| | ब | ... | ८०३ | ... | ... | ... | २,९८१ |
| इतर | अ | ६ | २३ | ... | ... | ... | ५३ |
| | ब | ४५७ | १,१०८ | ... | ... | ... | ५,०२४ |
| एकूण | अ | १३ | ७१ | २ | ... | ... | १८७ |
| | ब | १७,६३३ | ३,४६५ | ६४ | ... | ... | ५५,१२३ |
| ४. धान्यें, तंबाखू व दारू | | | | | | | |
| पिठाच्या गिरण्या | अ | ११ | १८ | १३ | ... | ... | ८० |
| | ब | १,१८१ | १,१७८ | ७८९ | ... | ... | ५,७९४ |
| तांदुळाच्या गिरण्या | अ | ४०० | ४३ | ... | ... | ... | १,१५८ |
| | ब | १८,७४२ | १,०५६ | ... | ... | ... | ४५,४०९ |
| तंबाखू | अ | ४ | १ | १ | ... | ... | १६५ |
| | ब | १,३३९ | ५० | ७७ | ... | ... | १९,८३९ |
| इतर | अ | २७ | २६ | ९ | ४ | ... | ४७७ |
| | ब | २,९२४ | ९९५ | ३०१ | ९६ | ... | २६,३६५ |
| एकूण | अ | ४४२ | ८८ | २३ | ४ | ... | १,८८० |
| | ब | २४,१८६ | ३,२७९ | १,१६७ | ९६ | ... | ९७,४०७ |
| ५. रसायनें, रंग वगैरे | अ | ११८ | ३२ | ९ | ... | ... | ५८८ |
| | ब | १७,२१२ | १,५५४ | १,६४२ | ... | ... | ५५,९४५ |
| ६. कागद व छापखाने | | | | | | | |
| कागदाच्या गिरण्या | अ | ४ | १ | ... | ... | ... | १४ |
| | ब | ६,२६८ | ९९५ | ... | ... | ... | ११,५५३ |
| पुस्तक-छपाई व बांधणी | अ | ९६ | ४४ | १६ | ५ | ... | ६५५ |
| | ब | ६,५७५ | २,०१९ | ५०९ | १०९ | ... | ३०,९४२ |
| इतर | अ | १७ | २ | ... | ... | ... | ४० |
| | ब | १,०९६ | ५६ | ... | ... | ... | १,८८२ |
| एकूण | अ | ११७ | ४७ | १६ | ५ | ... | ७०९ |
| | ब | १३,९३९ | ३,०७० | ५०९ | १०९ | ... | ४४,३७७ |

( कोष्टक ३२ चालू )

७. लाकूड, कांच, शिल्प वगैरे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विटा, कौलें, सुतारकाम | अ | १५ | ७ | ६ | ... | ... | १८६ |
| | ब | १,३५७ | १,०१७ | ३२५ | ... | ... | २०,५३३ |
| सिमेंट, चुना, कुंभारकाम | अ | १३ | ५ | २ | ... | ... | ४६ |
| | ब | ३,५१४ | ८३५ | ५२४ | ... | ... | १३,०८८ |
| कांच | अ | १२ | ३ | ... | ... | ... | ७४ |
| | ब | २,२८० | २०४ | ... | ... | ... | ८,९३४ |
| लाकूड कापणें, शिल्पकाम व इतर | अ | १८ | ४ | १ | ... | २ | १५९ |
| | ब | १,१३७ | १५१ | ४१ | ... | १०९ | ९,७१५ |
| एकूण | अ | ५८ | १९ | ९ | ... | २ | ४६५ |
| | ब | ८,२८८ | २,२०७ | ८९० | ... | १०९ | ५२,२९० |
| ८. कांतडीं कमावणें | अ | ५ | २ | १ | .... | ... | ६६ |
| | ब | ४,०१७ | १५५ | १६ | ... | ... | १२,९०६ |
| ९. जिनिंग फॅक्टरीज | अ | ३३ | ... | ... | ... | १ | १८१ |
| | ब | १९,१५५ | ... | ... | ... | ६० | २५,९८७ |
| १०. दोर वळणें व इतर | अ | ५८ | २ | ५ | ... | ... | २१८ |
| | ब | ९,६६५ | १८७ | २३२ | ... | .... | १९,७१२ |
| एकूण कायम धंदे | अ | १,२८६ | ४२७ | ९८ | ११ | ७ | ६,५९८ |
| | ब | ४,९७,२५२ | ३३,२६७ | ६,८४८ | २९९ | ४३४ | १३,२९,२४८ |

हंगामी धंदे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अन्न, दारू, तंबाखू, तांदुळांच्या गि. | अ | ... | ... | १०२ | ... | ... | १०२ |
| | ब | ... | ... | २,०३७ | ... | ... | २,०३७ |
| साखर | अ | १३ | ४ | १ | ... | ... | २५४ |
| | ब | ३,५५८ | १,३०३ | १७७ | ... | ... | ७४,८७२ |
| चहा | अ | २८८ | १० | ... | ... | ... | १,०५५ |
| | ब | १८,८२८ | २१५ | ... | ... | ... | ६७,३०३ |
| कॉफी, तंबाखू व इतर | अ | ... | ... | ... | ... | ... | ९७ |
| | ब | ... | ... | ... | ... | ... | ५,८३६ |
| एकूण | अ | ३०१ | १४ | १०३ | ... | ... | १,५०८ |
| | ब | २२,३८६ | १,५१८ | २,२१४ | ... | ... | १,५०,०४८ |

( कोष्टक ३२ चालू )

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| केमिकल्स व रंग | अ | ... | ... | ... | ... | ... | २२ |
| | ब | ... | ... | ... | ... | ... | १,९८९ |
| कापूस व गठ्ठे बांधणें | अ | ८ | ३११ | १०३ | ७ | ... | १,८७९ |
| | ब | २,३६३ | २१,११५ | १२,५६५ | १९९ | ... | १,२३,८७९ |
| ज्यूट प्रेसेस व इतर | अ | ६२ | ... | ३ | ... | ... | ८५ |
| | ब | १२,८६९ | ... | १०५ | ... | ... | १३,५२७ |
| एकूण हंगामी धंदे | अ | ३७१ | ३२५ | २०९ | ७ | ... | ३,४९४ |
| | ब | ३७,६१८ | २२,६३३ | १४,८८४ | १९९ | ... | २,८९,४४३ |
| इतर सर्व धंद्यांची एकूण | अ | १,६५७ | ७५२ | ३०७ | १८ | ७ | १०,०९२ |
| | ब | ५,३४,८७० | ५५,९०० | २१,७३२ | ४९८ | ४३४ | १६,१८,६९१ |
| सरकारी व स्थानिक मदतीवर चालणारे आणि इतर सर्व धंदे यांची एकूण | अ | १,७२५ | ८०० | ३२४ | ३६ | १५ | १०,४६६ |
| | ब | ५,७१,५३९ | ७८,३०२ | २४,९९५ | १,२६८ | २,०२३ | १७,५१,१३७ |

अ= कारखान्यांची संख्या.    ब= हजर कामगारांची रोजची सरासरी

या दृष्टीनें सिंधची स्थिति बरी आहे. सिंधमध्यें जंगलांचें क्षेत्रफळ १,१३४ चौ. मैल असून १९३९–४० सालीं ७,७६,३४८ रु. उत्पन्न व ३,६२,-७४१ रु. खर्च म्हणजे ४,१३,६०६ रु. निव्वळ फायदा झाला.''[1]

३१ व ३२ या कोष्टकांत बंगाल व पंजाबचे जे आंकडे दिलेले आहेत ते सर्व प्रांताचे असे दिले आहेत. तेव्हां या आंकड्यांनीं विशेषतः बंगालबाबत गैरसमज होण्याचा संभव आहे. कारण बंगालमधील उद्योगधंदे कलकत्ता व आसपासच्या प्रदेशांत म्हणजे मुसलमानेतर टापूंत केंद्रित झालेले आहेत. तागाचें उत्पादन मुसलमानी टापूंत होतें यांत शंका नाहीं. परंतु बहुतेक सर्वच्या सर्व

१. जंगलखातें, सिंधच्या १९३९–४० च्या रिपोर्टाच्या आधारें.

ज्यूटच्या गिरण्या कलकत्ता येथें किंवा त्यापासून कांहीं मैलांच्या अंतरावर हुगळी नदीच्या मुखावर आहेत. बंगालच्या ३० कापड गिरण्यांपैकीं ७ गिरण्या सोडून बाकीच्या सर्व मुसलमानेतर टापूंत आहेत. गिरण्यांतील चात्या व माग यांचे आंकडे पाहतां, या सात गिरण्यांत १,१२,००० चात्या व २,६०० माग आहेत, तर सर्व हिंदुस्थानांतील गिरण्यांतून १०,००,००० चात्या व २ लाखांवर माग आहेत. सर्व धंद्यांत तागाच्या गिरण्यांमुळेंच जास्तींत जास्त लोकांना कामधंदा मिळतो. लोखंड व पोलादाचे कारखानेहि सर्वच्या सर्व पश्चिमेच्या मुसलमानेतर जिल्ह्यांतून आहेत. तसेंच सर्व प्रांतभर पसरलेल्या तांदुळाच्या गिरण्या व तागाचे गठ्ठे बांधण्याचे कारखाने सोडले, तर बाकीचे धंदे कलकत्ता व त्याच्या आसपास केंद्रीभूत झालेले आढळतात.

सरकारी व स्थानिक व संस्थांच्यातर्फे चाललेल्या धंद्यांपैकीं दारुगोळ्याचें कारखाने, रेल्वे वर्कशॉप्स्, गोदीकाम व छापखाने हे महत्त्वाचे आहेत व तेहि कलकत्ता व उपनगर येथेंच आहेत. तेव्हां आपण असें स्पष्टपणें म्हणूं शकतों कीं सबंध बंगालचे आंकडे जरी समाधानकारक दिसत असले, तरी उद्योगधंद्यांबाबत त्यांचा संबंध अधिकांशानें मुसलमानी विभागापेक्षां मुसलमानेतर विभागाशींच आहे.

प्रो. कूपलंड यांनीं या परिस्थितीचें संक्षेपतः खालीलप्रमाणें विवेचन केलें आहे : "सध्यां बंगालची लोकसंख्या ब्रि. हिंदुस्थानच्या एक पंचमांश असून त्यांत ब्रि. हिंदुस्थानच्या एक तृतीयांश उद्योगधंदे आहेत. कलकत्ता वगळून पूर्वबंगालचा विचार केल्यास ब्रिटिश हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांशीं त्याचें प्रमाण २·७ टक्के इतकें राहतें."[१]

पंजाबमधील परिस्थिति याहून किंचित् भिन्न आहे. तेथील उद्योगधंदे लाहोर व त्याच्या आसपास विखुरलेले आहेत आणि लाहोर हें मुसलमानी टापूंत येतें; म्हणून पंजाबमधील उद्योगधंद्यांबाबतचे आंकडे मुसलमानी टापूंतील उद्योगधंद्यांच्या परिस्थितीचे किंचित् अत्युक्त असे निदर्शक आहेत. तेव्हां मुसलमानी

१. आर. कूपलंड : दि फ्यूचर ऑफ इंडिया, पृ. ९६.

प्रदेशांतील उद्योगधंद्यांची परिस्थिति पहावयाची झाल्यास बंगालचे आंकडे ध्यानांत न घेतां सर्व पंजाबचे आंकडे घ्यावयाचे व त्यांबरोबरच वायव्य सरहद्द, सिंध व बलुचिस्तान यांच्या आंकड्यांचा समावेश करावयाचा; म्हणजे आपणांस स्थूल मानानें त्याची कल्पना येईल. सरकारी, स्थानिक व इतर भांडवलावर चालणाऱ्या गिरण्या व कारखाने पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द व बलुचिस्तान या प्रांतांत मिळून १,१७५ आहेत आणि त्यांत १,०६,५८८ लोक काम करतात. प्रांतांतील कारखाने ब्रि. हिंदुस्थानांतील कारखान्यांच्या मानानें लहान आहेत. संबंध ब्रिटिश हिंदुस्थानांतील कारखान्यांची संख्या १०,४६६ असून त्यांतून १७,५१,१३७ मजूर कामावर आहेत. वायव्य–विभागांतील कारखान्यांची संख्या ब्रि. हिंदुस्थानांतील संख्येच्या ११·२३ टक्के असली, तरी त्यांत काम करणारांची संख्या ६·१ टक्केच आहे.

किंवा ब्रि. हिंदुस्थानांतील एका कारखान्यांत सरासरी रोजीं १६७ मजूर काम करतात असें म्हटलें, तर वायव्य–विभागांतील कारखान्यांत ९० मजूर कामावर असतात असे म्हटलें पाहिजे. वायव्य–विभागांतील बरेचसे कारखाने सरकारी व स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या मार्फतच चालविण्यांत येतात. असे ९१ कारखाने आहेत. पण त्यांत २८,०२४ लोक कामावर आहेत याचा अर्थ तेथील सरकारी कारखान्यांचें प्रमाण ७·७ टक्के असलें तरी कामगारांचें प्रमाण २६·३ टक्के आहे. म्हणजेच तेथल्या मोठ्या गिरण्या सरकारी मालकीच्या आहेत. कापसाची सरकी काढणें व गठ्ठे बांधणें हा एकच मोठयापैकीं धंदा तेथें आहे. या व्यतिरिक्त रेल्वेशॉप्स् किंवा दारुगोळ्याचे कारखाने यांसारखे पुष्कळ लोक कामावर घेतां येतील असे दुसरे खाजगी धंदे पंजाब व सिंधमध्यें नाहींत.

यावरून हें स्पष्ट होतें कीं, ब्रिटिश हिंदुस्थानची जेवढी औद्योगिक प्रगति झाली आहे, तेवढी देखील या वायव्य–विभागांत झालेली नसून जे मोठमोठे कारखाने आणि गिरण्या आहेत त्यादेखील सरकारी मालकीच्या आहेत.

यावरून बंगालचे उद्योगधंदे हे मुसलमानेतर प्रदेशांत आहेत म्हणून सोडले, तर पूर्व व वायव्य–विभागांची औद्योगिक स्थिति ब्रिटिश हिंदुस्थानच्या मानानें

फारच असमाधानकारक असल्याचें आपणांस दिसेल. वायव्य सरहद्द, सिंध, बलुचिस्तान व पंजाब आणि बंगालमधील मुसलमानी प्रदेशांची लोकसंख्या एकंदर ब्रि. हिंदुस्थानच्या २६·७ टक्के इतकी भरते. परंतु सरकारी, व इतर कारखाने, गिरण्या वगैरेंची संख्या फक्त १३·९ टक्के इतकी आणि कामावर वर असलेल्यांची संख्या फक्त ७·३६ टक्के होते. दारुगोळ्याचे कारखाने व रेल्वे वर्कशॉप्स् हेच तेथील मोठे धंदे होत हें वर सांगितलेंच आहे.

हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणांत भांडवल गुंतविलेले धंदे म्हणजे कापड–गिरण्या, तागाच्या गिरण्या व साखरेच्या गिरण्या हेच होत. पंजाब व सिंधमध्यें पुष्कळ कापूस पिकतो व पूर्व–बंगालमध्यें तागाचें खूपच उत्पादन होतें हें जरी खरें असलें, तरी बहुतेक गिरण्या पूर्व व वायव्य मुसलमानी विभागांच्या बाहेरच आहेत. १९३९–४० सालीं हिंदुस्थानांत नोंदविलेल्या समायिक भांडवलाच्या कंपन्यांपैकीं कापडाच्या गिरण्यांची मालकी असलेल्यांचें भरपायी झालेलें भांडवल ३३,९३,००,००० रु. व परदेशी कंपन्यांचें १९३८–३९ चें भांडवल २७१,७७८ पौंड इतकें होतें. तसेंच तागाच्या गिरण्यांचें भांडवल अनुक्रमें २०,४६,००,००० रु. व ३,२९५,५८७ पौंड इतकें होतें. साखरेच्या कारखान्यांत १०,९७,००,००० रु. व ३०६,६५६ पौंड इतकें भांडवल गुंतविण्यांत आलें होतें. या उद्योगधंद्यांमध्यें मुसलमानी विभाग फारच थोडा आहे. त्याचप्रमाणें खाणींच्या कंपन्यांचें भरपायी झालेलें हिंदी भांडवल १९,–९८,००,००० रु. व परदेशी भांडवल १११,०५६,४४४ पौंड इतकें असून या धंद्यांत तर मुसलमानी विभागांचा मुळींच वांटा नाहीं. कारण त्यांत कोळसा, लोखंड, तांबें वगैरे धातू नाहींत. पेट्रोलच्या धंद्यांत मात्र त्यांचा थोडासा भाग आहे. या आंकड्यांवरून 'फॉरीन अफेअर्स'मध्यें लिहिलेल्या लेखांतील प्रो. चार्लस् बेर यांचीं विधानें खरीं ठरल्याचें दिसून येतें.

मात्र जातां जातां लक्षांत ठेवण्याजोगें आहे कीं, प्रोफेसर बेर यांनीं हे निष्कर्ष सर्व बंगाल व पेट्रोलच्या खाणी असलेला ईशान्येच्या टोकासकट आसाम हा मुसलमानी विभागांत येतो, असें समजूनच काढलेले होते. पण लीगच्या ठरावांतून

असा अर्थ निघालेला नाहीं हें आम्हीं मागें दाखवून दिलेंच आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं सर्व पंजाब प्रांतांचा वायव्य–मुसलमानी विभागांत समावेश केलेला आहे.

कोळशाच्या खाणींनीं व इतर बहुतेक सर्व उद्योगधंद्यांनीं समृद्ध असा बंगालचा पश्चिम विभाग, सिल्हेट जिल्हा सोडून तेलाच्या खाणींत समृद्ध असलेला सर्व आसाम, आणि थोडयाफार प्रमाणांत कां होईना, ज्यांत उद्योगधंदे विखुरलेले आहेत असे पंजाबमधील पूर्वेकडील जिल्हे हे मुसलमानेतर विभागांत येतात म्हणून वगळले असते, तर हिंदुस्थानची धर्माच्या निमित्तानें केलेली फाळणीची योजना खुद्द मुसलमानांच्या हिताच्या दृष्टीनेंहि घातुक आहे असें त्यांनीं याहूनहि जोरानें प्रतिपादन केलें असतें हें निश्चित.

डॉ० ए. एम्. लोरेन्झो यांनीं हिंदुस्थानांतील उत्पादक उद्योगधंद्यांची काय परिस्थिति आहे याचें आक्सफर्डच्या हिंदी प्रश्नांबाबतच्या पुस्तिकांपैकीं 'ॲट्लास् ऑफ इंडिया' या आपल्या पुस्तकांत फार छान विवेचन केलें आहे:—

"हिंदुस्थानांतील औद्योगिक उत्क्रांतीचा व प्रगतीचा दृष्टीकोन हा बहुतांशीं मनःस्थितीच्या व परिस्थितीच्या योगानें बनविणें शक्य आहे. एका विशिष्ट टापूमध्यें गोळा होण्याची प्रवृत्ति हिंदी उद्योगधंद्यांत दिसून येते.

"बंगाल व बिहारमधील कोळसा व लोखंड यांचे धंदे त्या खाणींच्या आसपास स्थिर झाले असून त्यांचीं औद्योगिक केंद्रें जमशेदपूर, कल्टी, बर्णपूर आणि मनोहरपूर हीं आहेत. मुंबईचें हवामान कापड–गिरण्यांसाठीं योग्य असल्यानें व कच्च्या मालाचा पुरवठा जवळून होत असल्यानें कापड–गिरण्यांचा धंदा मुंबई प्रांतांत केंद्रीभूत झाला असून त्याचीं प्रमुख ठिकाणें मुंबई, सोलापूर, हुबळी, अहमदाबाद हीं आहेत; तागाच्या गिरण्या कलकत्ता व त्याच्या आसपास आहेत. संयुक्तप्रांत व बिहारमधील ऊंस पिकणाऱ्या प्रदेशांतून रेल्वेलाइनच्या अनुरोधानें ठिकठिकाणीं साखरेच्या गिरण्या विखुरलेल्या आहेत. चुनखडी, जिप्सम, माती वगैरे कच्चा माल जवळ असल्यानें मध्य व दक्षिण पठारापाशीं सीमेंटचें उत्पादन होतें. कागदाच्या बहुतेक गिरण्या बंगाल,

मुंबई आणि संयुक्तप्रांत येथें आहेत, तर कांतडयाचा धंदा मुख्यत्वें संयुक्त-प्रांत व मद्रास येथून चालतो. आणि कांचेचे कारखाने मध्यप्रांत व गंगेच्या वरील प्रदेशांत आहेत."[१]

या ग्रंथांत वायव्य–विभागांतील एकाहि प्रांताचें नांव चुकूनहि असें नसून बंगाल प्रांताचे जे उल्लेख आहेत, ते सर्व मुस्लीम–विभागाबाहेरच्या कारखान्यां-संबंधीं आहेत.

हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, सध्यांचीच परिस्थिति भविष्यकालांत दृढमूल होत जाईल. एकाद्या प्रांतांत विशिष्ट धंद्यांना चालना देण्यास कारण झालेली भौतिक परिस्थिति बदलणार नाहीं किंवा राजकीय तडजोडीनें हद्दी वाढविल्या वा स्वतंत्र राज्यें निर्माण केलीं, तरी खनिजसांठे आपली जागा बदलूं शकणार नाहींत.

पुढें उध्दृत केलेल्या ३३ व्या कोष्टकांत पूर्व–विभाग व वायव्य–विभाग या मुसलमानी प्रदेशांशीं इतर ब्रिटिश हिंदुस्थानचा किती व्यापार झाला याचे

## कोष्टक ३३.

## पूर्वेकडील प्रान्त

| प्रांत | | कोळसा व दगडी कोळसा | कापूस | कापड | धान्यें, डाळी, पीठ व तांदूळ | गहूं |
|---|---|---|---|---|---|---|
| आसाम | निर्यात | ७० | १२३ | २ | २०७ | ... |
| | आयात | ३,३४५ | २ | २६६ | १,१८० | ७३ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| बंगाल | निर्यात | १,४७,०४३ | १४३ | १२९ | ७,२९१ | २९ |
| | आयात | ६३,४८७ | २०७ | ९५७ | ७,६५२ | २३० |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |

१. ए. एम्. लोरेन्झो : अॅट्लास् ऑफ इंडिया, विभाग ८.

( कोष्टक ३३ चालू )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| कलकत्ता | निर्यात | ३,९६३ | ६२ | १,७३७ | ८,५०४ | १७८ |
| | आयात | १,५३,६११ | ४२९ | १,५६३ | ३,००२ | ३,४६४ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण | निर्यात | १,५१,०७६ | ३२८ | १,८६८ | १६,००२ | २०७ |
| | आयात | २,२०,४४३ | ६३८ | २,७८६ | ११,८३४ | ३,७६७ |
| | शिल्लक | –६९,३६७ | –३१० | –९१८ | ४,१६८ | –३,५६० |

| प्रांत | | लोखंड व पोलाद | गळिताचीं धान्ये | मीठ | साखर | ताग |
|---|---|---|---|---|---|---|
| आसाम | निर्यात | ११२ | ४७३ | २ | ४ | २,८५१ |
| | आयात | १,२६६ | २० | १,२९० | ४७५ | २ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| बंगाल | निर्यात | ४,०४० | ३७४ | ५९४ | ३७८ | २६,०५२ |
| | आयात | ६,४०९ | १,८२३ | ५,८२२ | १,५४० | १३७ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| कलकत्ता | निर्यात | ७,२७९ | ४१७ | १०,६०७ | ८०४ | २०९ |
| | आयात | ७,९६३ | ७,२१६ | ११० | १,०५६ | ३०,६८७ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण | निर्यात | ११,४३१ | १,२६४ | ११,२०३ | १,१८६ | २९,११२ |
| | आयात | १५,६३८ | ९,२३९ | ७,२२२ | ३,०७१ | ३०,८२६ |
| | शिल्लक | –४,२०७ | –७,९७५ | ३,९८१ | –१,८८५ | –१,७१४ |

## वायव्येकडील प्रान्त

| प्रांत | | कोळसा व दगडी कोळसा | कापूस | कापड | धान्यें, डाळी, पीठ व तांदूळ | गहूं |
|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब | निर्यात | ७०६ | ६,६३७ | १७६ | १,४८३ | १३,५४२ |
| | आयात | ४४,८६६ | १२ | १,३५८ | १,३१० | ७९ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |

( कोष्टक ३२ चालू )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वायव्य सरहद्द प्रांत | निर्यात | १ | १३३ | ४ | २९ | १८ |
| | आयात | २,५३९ | १ | ३०० | १७४ | २७८ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| सिंध व बलुचिस्तान | निर्यात | २५ | २,१६३ | ४२ | ५,५०८ | ६,४७३ |
| | आयात | ८,९४३ | ४१ | ४६७ | ४८ | ४३ |
| | शिल्लक | ... | ... | .. | ... | ... |
| कराची | निर्यात | ८८० | २ | ६५४ | १ | १ |
| | आयात | १,५८६ | ६,२७१ | ५५ | २,९५२ | ८,३३५ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण | निर्यात | १,६१२ | ८,९३५ | ८७६ | ७,०२१ | २०,०३४ |
| | आयात | ५७,९३४ | ६,३२५ | २,१८० | ४,४८४ | ८,७३५ |
| | शिल्लक | –५६,३१३ | २,६१० | –१,३०४ | २,५३७ | ११,२९९ |

| प्रांत | | लोखंड व पोलाद | गळिताचीं धान्यें | मीठ | साखर | ताग |
|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब | निर्यात | ३९२ | २,२५२ | १,९४६ | ६४ | ६ |
| | आयात | ३,०१० | ४६२ | ३१३ | ३,६२४ | २ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| वायव्य सरहद्द प्रांत | निर्यात | १२ | ४३ | ... | ५३ | ... |
| | आयात | २६० | ५६ | ३३४ | ३२२ | ७५ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| सिंध व बलुचिस्तान | निर्यात | १८७ | २,९२२ | ११ | १३ | ... |
| | आयात | ९४६ | १२१ | २८० | ३२२ | १ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| कराची | निर्यात | १,४६६ | ३८ | २३२ | १,०५६ | ... |
| | आयात | १७७ | २,४८० | १२ | ९०४ | ४ |
| | शिल्लक | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण | निर्यात | २,०४७ | ५,२५५ | २,१८९ | १,१८६ | ६ |
| | आयात | ४,३९३ | ३,११९ | ९३९ | ५,१७२ | ८२ |
| | शिल्लक | –२,३३६ | २,१३६ | १,२५० | –३,९८६ | –७६ |

१९३९–४० चे आंकडे दिले आहेत. आंकडे हजार मणांत असून जेथें निर्यातीपेक्षां आयात अधिक झाली तेथें उणें चिन्ह केलें आहे. दोन्ही विभागांत दगडी कोळसा, कापड, लोखंड, पोलाद, साखर यांची आयात अधिक झालेली दिसून येते. मिठाची व पूर्व विभागांत गहूं वगळल्यास तांदुळासकट सर्व अन्नधान्याची निर्यात अधिक आहे. वायव्य–विभागांतून कापूस, गहूं व गळितांचीं धान्यें यांची निर्यात आयातीपेक्षां अधिक होत असते. मात्र हे आंकडे त्या दोन विभागांतील सर्व प्रांतांसंबंधींचे आहेत. पूर्व–विभागांतील मुसलमानेतर जिल्हे वगळले तर दगडी कोळसा, कोळसा, व लोखंड आणि पोलाद यांबाबतची त्याची स्थिति अधिकच निकृष्ट होईल. परंतु तागाबाबत मात्र स्थिति सुधारेल. याचें कारण असें कीं दगडी कोळसा, कोळसा, लोखंड व पोलाद यांचें उत्पादन बंगालच्या पश्चिमेकडील मुसलमानेतर जिल्ह्यांत होतें, तर तागाचें उत्पादन बंगालच्या पूर्व जिल्ह्यांत होतें.

गहूं हें पंजाबचें निर्यातीचें मुख्य धान्य आहे. त्याबाबत असें म्हणतां येईल कीं, ज्याप्रमाणें मुसलमानी प्रदेशांना कोळसा, लोखंड वगैरे गोष्टींसाठीं मुसलमानेतर प्रदेशांवर अवलंबून रहावें लागतें, तद्वत् मुसलमानेतर प्रदेशांना गव्हासाठीं मुसलमानी प्रदेशावर अवलंबून रहावें लागणार नाहीं. कारण जेवढा गहूं या प्रदेशांना लागतो तेवढा तो येथें उत्पन्न होतो. शिवाय पंजाबमधील गव्हाला बाजारांत ऑस्ट्रेलियन गव्हाशीं चढाओढ करावी लागेल. कारण त्या गव्हाची आयात १९३५–३६ ते १९३८–३९ या तीन वर्षांत १३,००० टनांपासून १,५०,००० टनांपर्यंत वाढली आहे.

नियोजित प्रदेशांची हिंदुस्थानांतून फाळणी झाल्यास तेथें राहणाऱ्या जनतेची सुरक्षितता ज्यांवर अवलंबून आहे असे हे प्रश्न श्री. हर्बर्ट एल्. मॅथ्यूज यांनीं मुलाखतीचे वेळीं श्री. जिना यांचेपुढें टाकले असतां ते असें म्हणाल्याचें 'न्यूयॉर्क टाइम्स्'च्या २१ सप्टेंबर १९४२ च्या अंकांत आलें आहे कीं, "अफगाणिस्तान हा गरीब देश आहे पण त्याचेंहि कसें तरी चाललेंच आहे. इराकहि टिकला आहे. आणि आमच्या ७ कोटी लोकसंख्येच्या मानानें त्यांची

लोकसंख्याहि फार थोडी आहे. स्वतंत्र होऊन, गरिबीनें पण सुखपणें आम्ही राहण्यास तयार असूं, तर त्यास हिंदूंची हरकत कां असावी ? आर्थिक बाबींचें काय व्हायचें असेल तें होईल." वादविवादांत हें उत्तर ठीक वाटेल. पण ७ कोटी मुसलमानांच्या हिताहिताचा हा प्रश्न, जिच्या घडणीला शेंकडों वर्षें लागलीं त्या संस्कृतीला अशा अघोरी पद्धतीनें धुडकावून लावून, निश्चित सुटणार नाहीं.

## ३३. कर आणि खर्च

आतां यापुढें मुसलमानी प्रदेशांची सरकारी कर व खर्च यांबाबत काय परिस्थिति होईल तें पहाणें इष्ट ठरेल. लीगच्या ठरावांत पूर्वविभाग व पश्चिम विभाग अशीं दोन स्वतंत्र राज्यें अभिप्रेत आहेत आणि अखेरीस त्यांच्या हातीं संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, वाहतुक, जकात, चलन व व्यापार यांबाबत अधिकार जावेत असेंहि म्हटलेलें आहे. इतकेंच नव्हे, तर लीगच्या ठरावांत व ज. जिनांच्या १९४१ च्या मद्रासच्या भाषणांतहि 'राज्यें' असा अनेकवचनी उल्लेख आहे. आणि असें दिसतें कीं, हीं राज्यें हिंदुस्थानपासून तर स्वतंत्र असतीलच, परंतु एकमेकांपासूनहि स्वतंत्र असतील. या ठरावांत असेंहि सूचित केलेलें आहे कीं, या दोन राज्यांतील घटक स्वायत्त व सार्वभौम असतील. अशा घटकांचें एक संयुक्त राष्ट्र होईल कीं काय हें मात्र स्पष्ट केलेलें नाहीं. 'सार्वभौम' हा शब्द असल्यामुळें व 'संयुक्त राष्ट्र' हा शब्द गाळण्यांत आलेला असल्यामुळें त्याचा उलटा अर्थ होणेंहि स्वाभाविक आहे. आपण घटकाभर अशी कल्पना करूं कीं, वायव्य-विभागांत अशीं संयुक्त राष्ट्रें निर्माण करण्याचा त्यांचा विचार आहे. अर्थात् या प्रत्येक संयुक्त राष्ट्राला एकाद्या सार्वभौम राष्ट्राप्रमाणें संयुक्त राज्यकारभार, त्यांचीं तीं सर्व खातीं आणि लवाजमा वगैरे अमलांत आणावा लागेल. प्रत्येक घटकाला स्वतःच्या राज्यकारभाराची जबाबदारी स्वीकारावी लागेल. म्हणजे हिंदुस्थानप्रमाणें मध्यवर्ति सरकार व प्रांतिक सरकारें असे दोन भाग या दोन्ही संयुक्त राष्ट्रांना पाडावे लागतील. मग मध्यवर्ति व प्रांतिक अशीं दोन खर्चांचीं व करांचीं अंदाजपत्रकें होतील. प्रत्येक प्रांतिक सरकारला

राज्ययंत्राप्रमाणेंच सामाजिक कार्यक्रम किंवा राष्ट्रोन्नतीसाठीं शिक्षण, आरोग्य वगैरेंकडे लक्ष द्यावें लागतें व त्यासाठीं त्याला करपट्टी, जकात वगैरे उत्पन्नाच्या बाबीहि असतात. मध्यवर्ति सरकारला परराष्ट्रीय खातें, संरक्षण खातें वगैरे अनेक महत्त्वाचीं खातीं सांभाळावीं लागतात, आणि संयुक्त राष्ट्रांतील सर्व घटकांच्या सुखाकडे लक्ष द्यावें लागतें. हल्लींच्या मध्यवर्ति व प्रांतिक सरकारां-प्रमाणेंच तेथील कारभार थोड्याफार प्रमाणांत चालेल असें मानूं या. अर्थात् अशा परिस्थितींत उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबीहि सारख्याच असणार. तेव्हां सध्यां त्या त्या प्रांतांतून प्रांतिक व मध्यवर्ति सरकारसाठीं आय व व्यय किती होतो तें पाहूं. याबाबत असलेल्या दोन अडचणी मात्र लक्षांत ठेवावयास हव्यात. सर्व प्रांताचें अंदाजपत्रक जसें आपणांला सुलभतेनें मिळूं शकतें, तसे जिल्हावार आंकडे मिळणें दुरापास्त होतें. म्हणून सबंध प्रांतांतील फक्त कांहीं जिल्हेच मुसलमानी विभागांत येत असतील व इतर बाहेर रहात असतील, तर मुसलमानी विभागांच्या आय-व्ययासंबंधींचे बिनचूक आंकडे मिळणें असं-भाव्य नसलें, तरी फार कठिण आहे. आणि मध्यवर्ति सरकारच्या अंदाजपत्रकां-तील किती वांटा कोणत्या प्रदेशाकडे जातो हें अजमावणें त्यापेक्षांहि कठिण होईल. तसेंच हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, घटक वा मध्यवर्ति सरकार यांच्या सांपत्तिक स्थितीबद्दल केलेली चर्चा व निष्कर्ष तात्पुरतेच राहणार. युद्धामुळें अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, भूतकालीन अंदाजपत्रकावरून केलेली कोठलीहि गणती जुजबी स्वरूपाचीच होणार. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनहि सध्यांच्या अंदाजपत्रकाप्रमाणें काय परिस्थिति आहे ती पाहणें वावगें होणार नाहीं. त्यानुसार पूर्व व वायव्य-विभागांतील प्रांतिक व मध्यवर्ति अंदाजपत्रकें यांचा अलगपणें विचार करण्याचें मीं योजिलें आहे.

प्रथम प्रांतिक अंदाजपत्रक घेतों. १९३८-३९ व १९३९-४० हीं युद्धा-पूर्वींचीं दोन सर्वसामान्य वर्षें होतीं, तेव्हां तीं आधारभूत मानावयास हरकत नाहीं.

## कोष्टक ३४.

प्रांतिक उत्पन्न ( लक्ष रुपयांत )

| बाब | | बंगाल | आसाम | पंजाब | वायव्य सरहद्द | सिंध |
|---|---|---|---|---|---|---|
| जकात | अ | २२१·२७ | ११·६९ | — | — | — |
| | ब | २२१·९७ | १३·३९ | — | — | — |
| प्राप्तीवरील कर | अ | ३०·०० | ३·०० | १२·०० | १·५० | ३·०० |
| | ब | ५५·८० | ६·४१ | २२·३२ | २·७९ | ५·५८ |
| मीठ | अ | ०·१२ | ०·२ | — | — | — |
| | ब | — | — | — | — | — |
| शेतसारा | अ | ३२४·१० | ११२·६४ | २६३·५३ | १८·४१ | ३६·०४ |
| | ब | ३८६·१० | १३६·९० | २३४·२० | १८·५९ | ३६·८५ |
| प्रान्तिक-दारू-वरील कर वगैरे | अ | १५९·३५ | ३५·३३ | १०१·५९ | ८·७६ | ३७·४६ |
| | ब | १६५·२८ | ३३·९६ | १०४·९८ | ८·८७ | ३६·३३ |
| तिकिटें | अ | २५७·७७ | १८·१२ | ७८·१२ | ७·४० | १६·८९ |
| | ब | २५६·४४ | १७·६३ | ७४·५५ | ७·०६ | १७·१६ |
| जंगल | अ | २२·४१ | १६·६९ | २३·०३ | ५·९७ | ८·६५ |
| | ब | २३·९८ | १७·४६ | २५·३९ | ५·२२ | ७·७६ |
| रजिस्ट्रेशन | अ | २४·१२ | १·७७ | ८·३६ | ०·६७ | २·०० |
| | ब | २७·३२ | २·०१ | ८·५० | ०·६९ | २·०७ |

( कोष्टक ३४ चालू )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वाहन-कायदा | अ | २१·९० | ३·७१ | १२·८३ | २·०८ | २·१० |
| | ब | २१·३१ | ४·०९ | १३·४९ | २·३८ | २·६८ |
| इतर कर | अ | ३८·९४ | ०·६ | २·८१ | ०·५९ | ३·६४ |
| | ब | ४६·६१ | २·३७ | ११·४४ | १·१३ | ६·६६ |
| एकूण | अ | १,०९९·९८ | २०३·०३ | ५०२·२७ | ४५·३८ | १०९·७८ |
| | ब | १,२०४·८१ | २३४·२२ | ४९४·८७ | ४६·७३ | ११५·०९ |
| रेल्वे व दुय्यम रेल्वे कंपन्या | अ | ०·१४ | — | — | — | — |
| | ब | ०·१४ | — | — | — | — |
| पाणी-पुरवठा-खातें | अ | ४·६५ | — | ४५१·१७ | १२·४७ | ७२·३९ |
| | ब | — | ०·१ | ५०८·७० | १३·८१ | ८८·७१ |
| मुलकी कारभार | अ | ९०·९३ | १३·३५ | ८०·७९ | ८·३४ | १०·५६ |
| | ब | ९३·६८ | १३·३७ | ९०·३२ | ८·०७ | १४·७६ |
| मुलकी कामें | अ | २९·०९ | १०·३३ | ४३·४७ | ११·२० | १०·६० |
| | ब | ३५·५० | १०·९१ | ३९·६५ | १०·१३ | ९·९६ |
| इतर उत्पन्न | अ | २१·०९ | १·६२ | ३१·२४ | २·८६ | १·६३ |
| | ब | २५·७७ | ४·५२ | २८·३१ | ३·२३ | २·९१ |
| कर्ज पुरवठा, व्याज वगैरे | अ | २९·३५ | ०·१२ | ४·६१ | ०·५८ | ४·७३ |
| | ब | २९·६२ | ०·२६ | ३·७६ | ०·६३ | ७·३१ |
| एकूण | अ | १७५·२५ | २५·४२ | ६११·२८ | ३५·४५ | ९९·९१ |
| | ब | १८४·७१ | २९·०७ | ६७०·७४ | ३५·८७ | १२३·६५ |

( कोष्टक ३४ चालू )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मदत-मध्यवर्ति सरकारकडून | अ | ०·३० | ३०·०३ | ३·०७ | १००·०१ | १०५·०४ |
| | ब | ०·३० | ३०·०४ | ३·८५ | १००·०१ | १०५·१२ |
| विशेष जमा | अ | १·०८ | — | १९·२४ | — | ५५·५६ |
| | ब | ४१·८५ | — | ४१·६३ | — | ८५·११ |
| एकूण जमा | अ | १,२७६·६१ | २५८·४८ | १,१३५·८६ | १८०·८४ | ३७०·२९ |
| | ब | १,४३१·६७ | २९३·३३ | १,२११·०९ | १८२·६१ | ४२८·८७ |

अ = सन १९३८–३९  ब = सन १९३९–४०

## कोष्टक ३५.

प्रान्तिक खर्च ( लक्ष रुपयांत )

| बाब | | बंगाल | आसाम | पंजाब | वायव्य सरहद्द | सिंध |
|---|---|---|---|---|---|---|
| वसुली खातें | अ | ९७·६४ | ३५·९२ | ८६·४६ | ८·५३ | २६·०३ |
| | ब | १०४·६५ | ४८·५८ | ८५·०६ | ८·५१ | २८·२६ |
| पाणी-पुरवठा | अ | ३८·९२ | ०·६९ | १४९·८२ | ४·७७ | १२७ ९८ |
| | ब | ३८·९७ | ०·५९ | १५८·२६ | ४·५८ | १७०·६७ |
| कर्जरोखे वगैरे | अ | १५·७३ | ३३·९० | –२१·०२ | २·४० | १·६७ |
| | ब | १७·१५ | ४·१२ | –१७·४६ | १·८२ | ५·१७ |
| मुलकी कारभार (अ) सर्वसामान्य | अ | ५१९·७१ | ७९·८६ | ३२९·५८ | ७२·१२ | ८३·०० |
| | ब | ५३४·७१ | ८२·११ | ३२८·७४ | ७८·१६ | ८५·०० |

( कोष्टक ३५ चालू )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| (ब) सार्वजनिक | अ | ३०८·०९ | ७१·४१ | ३२३·८४ | ३६·६८ | ५२·५२ |
| | ब | ३२४·८८ | ७३·८६ | ३२५·८८ | ३८·२५ | ५५·८५ |
| मुलकी कामें | अ | १२८·६९ | ४३·८३ | १४०·३७ | ३९·५४ | २३·९९ |
| | ब | १४२·३२ | ४७·८४ | ९२·३४ | ३७·५१ | ३०·३४ |
| इतर | अ | १५४·६४ | ३३·८७ | १५२·२३ | १२·६३ | २८·६२ |
| | ब | १९४·७७ | ३५·२३ | १९५·४७ | १५·२९ | २७·६० |
| करखातें व इतर | अ | १३·२० | — | — | १·६३ | ९·९९ |
| | ब | १०·८२ | — | — | ०·७४ | २·१९ |
| वीज खातीं भांडवलावरील व्याज | अ | — | — | — | — | — |
| | ब | — | — | २७·३२ | २·०९ | — |
| विशेष बाबी | अ | — | — | — | — | — |
| | ब | २·९७ | — | — | — | — |
| एकूण | अ | १,२७६·६२ | २९९·४८ | १,१६१·२८ | १७८·३० | ३४५·८० |
| | ब | १,३७१·२४ | २९२·३३ | १,१९५·६१ | १८६·९५ | ४०५·०८ |

(ब) सार्वजनिक खर्चाचा तपशील

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| विज्ञान | अ | ०·२९ | ०·४ | ०·३६ | ०·५ | — |
| | ब | ०·३० | ०·५ | ०·२९ | ०·५ | — |
| शिक्षण | अ | १५५·१८ | ३६·०५ | १६१·३५ | २२·२५ | ३०·६१ |
| | ब | १६२·६० | ३८·६७ | १६३·५१ | २३·३८ | ३१·३१ |

( कोष्टक ३५ चालू )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वैद्यक | अ | ५५·९६ | १४·५४ | ५२·५८ | ६·७५ | ७·८८ |
| | ब | ५६·३३ | १४·४० | ५०·६० | ७·७६ | ८·५४ |
| आरोग्य | अ | ४०·६० | ८·८६ | २०·३७ | १·७७ | २·५७ |
| | ब | ३९·३९ | ८·२१ | १८·०१ | १·५९ | २·६६ |
| शेतकी | अ | १४·०३ | ५·७८ | ३५·५० | २·३७ | ७·७२ |
| | ब | २१·६४ | ६·३० | ३६·६२ | २·४१ | ९·६७ |
| गुरांचें आरोग्य | अ | ५·३० | १·५८ | १७·६० | १·६० | १·१९ |
| | ब | ५·८३ | १·६३ | १८·४९ | १·५३ | १·२३ |
| सहकारी खातें | अ | १३·३८ | ०·९६ | १४·९२ | १·२१ | १·२८ |
| | ब | १४·४९ | ०·९२ | १७·८१ | १·२१ | १·२३ |
| उद्योगधंदे | अ | १८·३२ | २·७३ | १९·३६ | ०·६२ | ०·८५ |
| | ब | २०·२२ | २·७८ | १८·८० | ०·२५ | ०·९१ |
| विमान-वाहतूक | अ | — | — | — | — | — |
| | ब | — | — | — | — | — |
| नभोवाणी | अ | — | — | — | — | — |
| | ब | — | — | — | ०·४ | — |
| इतर | अ | ५·०३ | ०·८७ | १·८० | ०·६ | ०·४२ |
| | ब | ४·०८ | ०·९० | १·७५ | ०·३ | ०·३० |
| एकूण | अ | ३०८·०९ | ७१·४१ | ३२३·८४ | ३६·६८ | ५२·५२ |
| | ब | ३२४·८८ | ७३·८६ | ३२५·८८ | ३८·२५ | ५५·८५ |

अ = सन १९३८–३९ ब = सन १९३९–४०

## कोष्टक ३६.[1]

हिंदुस्थान–सरकारच्या सुधारलेल्या हुकुमान्वयें ( महसूल–वांटणी ) खात्यानें मध्यवर्ति केंद्राकडून प्रांतांना दिलेली रक्कम. ( आंकडे लक्ष रुपयांचे आहेत. )

| प्रांत | प्राप्तीवरील कर | | ज्यूटवरील जकात | | इतर मदत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९३८–३९ | १९४५–४६ | १९३८–३९ | १९४५–४६ | १९३८–३९ | १९४५–४६ |
| बंगाल | ३०·०० | ४६५·८० | २२१·२७ | १२१·२२ | — | — |
| मुंबई | ३०·०० | ४६५·८० | — | — | — | — |
| मद्रास | २२·५० | ३४९·३५ | — | — | — | — |
| संयुक्त प्रांत | २२·५० | ३४९·३५ | — | — | २५·०० | — |
| पंजाब | १२·०० | १८६·३२ | — | — | — | — |
| मध्यप्रांत | ७·५० | ११६·४५ | — | — | — | — |
| बिहार | १५·०० | २३२·९० | १७·१२ | ७·८० | — | — |
| आसाम | ३·०० | ४६·५८ | ११·६९ | १०·०८ | ३०·०० | ३०·०० |
| ओरिसा | ३·०० | ४६·५८ | ०·९२ | ०·९० | ४३·०० | ४०·०० |
| वायव्य सरहद्द | १·५० | २३·२९ | — | — | १००·०० | १००·०० |
| सिंध | ३·०० | ४६·५८ | — | — | १०५·०० | — |

१. सिंधनें आपलें कर्ज फेडून टाकल्यामुळें त्या प्रांतास मिळणारी मदत १९४३–४४ सालापासून अनावश्यक म्हणून बंद करण्यांत आली आहे.

३४ व ३५ या कोष्टकांकडे पाहिल्यास असें आढळून येईल कीं, प्रत्येक प्रांताचा आय आणि व्यय हा समतोल आहे, आणि विभक्त झाल्यावर जर अशाच तऱ्हेनें खर्च वगैरे चालेल तर ते समतोल राहतील असें समजावयास हरकत नाहीं. मात्र हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आसाम, वायव्य सरहद्द व सिंध यांना अनुक्रमें ३० लाख, १ कोटी, व १ कोटी ५ लाख रुपयांची मदत मध्यवर्ति सरकारला दरसाल द्यावी लागते, तेव्हांच त्याचा आय आणि व्यय समतोल राहतात. आपापल्या प्रांतांत त्यांना पुरेसें उत्पन्न येत नाहीं म्हणून ही मदत मिळत नसती, तर त्यांना केवढी तरी तूट आली असती.[१] आसाममध्यें सामाजिक सुधारणांसाठीं १९३८–३९ व १९३९–४० सालीं अनुक्रमें ७१,४१,००० रु. व ७३,८६,००० रु. व्यय झाला. यावरून हें स्पष्ट होतें कीं, मध्यवर्ति सरकारची मदत नसती तर यापैकीं निम्मा खर्च करतां आला नसता. वायव्य सरहद्द प्रांताची तर या मदतीवांचून फारच बिकट परिस्थिति होईल. त्या प्रांतांत राज्यकारभाराचा खर्चहि भरून निघत नाहीं. आणि या मदतीवांचून वर दिलेल्या दोन वर्षांत केवळ राज्यकारभारांतच त्याला अनुक्रमें २२,२५,००० रु. व २८,५०,००० रु. तूट आली असती. आणि सार्वजनिक व मुलकी कामाची खातीं अजिबात बंद करावीं लागलीं असतीं. सिंधमध्येंहि राज्यकारभाराच्या खर्चांत तूट पडली असती, पण ती वायव्य सरहद्द प्रांतापेक्षां जरा कमी पडली असती इतकेंच. बलुचिस्तानचा भार तर मध्यवर्ति सरकारवरच आहे. १९३२–३३ सालीं तेथील उत्पन्न २०,५४,००० रु. व खर्च ९१,५६,००० रु. होता. म्हणजे मध्यवर्ति सरकारला त्या वर्षीं ७१ लाखांपेक्षां जास्त झीज सोसावी लागली. आपण आतां पाहिलें कीं जर आसाम, वायव्य सरहद्द, सिंध, बलुचिस्तान हे अलग झाले, तर दोन्ही मुसलमानी विभागांतील संयुक्त राष्ट्रांना ही मदत चालू ठेवावी लागेल. म्हणजे त्यांना १९३८–३९,१९३९–४० च्या दर्जाप्रमाणें राज्यकारभार चालविण्यासाठीं पूर्व–प्रदेशांना ३० लाख रु. व वायव्य–प्रदेशांना

---

१. मागें दिलेल्या कोष्टक ३६ वरील टीप पहा.

२ कोटी ७६ लाख रु. द्यावे लागतील. सार्वजनिक खात्यासाठीं खर्च करण्यांत येणारी रक्कम मुळांतच अत्यल्प असल्यानें पुढेंहि हेंच प्रमाण ठेवणें युक्त होणार नाहीं. अर्थात् यांत खर्च वाढला म्हणजे एक तर नवीन कर बसवावे

### कोष्टक ३७.

सार्वजनिक खात्यावर खर्च होणाऱ्या रकमा

| प्रांत | सार्वजनिक कार्यासाठीं १९३९–४० सालीं खर्च झालेली रक्कम ( लाख रु. ) | दर माणशीं सरासरी खर्च झालेली रक्कम रु. आ. पै. |
|---|---|---|
| बंगाल | ३१६·४८ | ०– ८–५ |
| आसाम | ७२·६३ | ०–११–३ |
| पंजाब | ३२४·८६ | १– २–३ |
| वायव्य सरहद्द | ३७·४६ | १– ३–८ |
| सिंध | ५४·१८ | १– ३–१ |

लागतील, किंवा मध्यवर्ति सरकारकडून मदत घ्यावी लागेल. आहे यापेक्षां कमी खर्चांत राज्यकारभार हांकणें अशक्य आहे असें वाटतें. वायव्य सरहद्द सोडून इतर कोटल्याहि प्रांतानें राज्यकारभाराबाबत होणारा खर्च जास्त आहे व त्यांत कपात केली जाते असें दर्शविलेलें नाहीं. त्या प्रांताबाबत असें म्हटलें जातें कीं, वरिष्ठ अधिकाऱ्यांना राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानानें भरमसाट प्रमाणांत पगार दिले जातात. मंत्र्यांचें पगार कॉंग्रेसनें इतके अल्प ठेवले ते याच हेतूनें, कीं राज्यकारभाराचा खर्च प्रत्यक्ष कमी करतां आला नाहीं, तरी या मुद्द्याचें महत्त्व चांगलें लक्षांत यावें. पण ही विचारसरणी अखिल भारतीय मुस्लिम–लीगनें व तिच्या मंत्रिमंडळांनीं स्वीकारलेली नाहीं. आणि राज्यकारभाराविषयक खर्चांत काटकसर करण्याची त्यांची इच्छा असल्याचें दिसून येत नाहीं. राज्यकारभारांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पगारांत कपात होणार नसेल, तर कनिष्ठ दर्जाच्या नोकरांचे पगार कमी करणें चूक ठरेल. एकंदरीनें राज्यकारभाराच्या

खात्यांत विशेष काटकसर होणें संभवनीय दिसत नाहीं. म्हणून सार्वजनिक सुखसोयींसाठीं अजून करण्यांत येणारा वाढता खर्च प्रांतांतील करांमध्यें नवीन वाढ करून किंवा मध्यवर्ति सरकारकडून अधिक मदत घेऊनच करतां येण्यासारखा आहे.

प्रांतिक अंदाजपत्रकांबाबत आणखी एक मुद्दा सांगणें आवश्यक आहे. वर दिलेल्या कोष्टकांत आणि चर्चेमध्यें बंगाल, आसाम आणि पंजाब हे संबंधच्या सबंध प्रांत मुस्लिम–विभागांत समाविष्ट होतील असें गृहीत धरलें आहे. परंतु फक्त मुलिम–बहुसंख्य असलेले त्या प्रांतांचे कांहीं भागच तेवढे मुस्लिम–विभागांत सामील करतां येतील हें दुसऱ्या एका प्रकारणांत आम्हीं दाखविलेंच आहे. असें झालें तर त्या प्रांतांचें उत्पन्न आणि खर्च दोन्हीहि कमी होतील; परंतु त्यांत नेमकी किती घट होईल हें अचूक सांगतां येणार नाहीं. जिल्हानिहाय आंकडे उपलब्ध नाहींत. आणि दर जिल्ह्याचे आंकडे गोळा करावयाचें म्हटलें, तर त्यासाठीं किचकट व दीर्घकालीन संशोधन करावें लागेल. लोकसंख्येच्या प्रमाणांत सर्व जिल्ह्यांवर प्रांताचें उत्पन्न आणि खर्च विभागतां येतील; आणि मुसलमान व बिगर-मुसलमान जिल्ह्यांचें उत्पन्न आणि खर्च स्थूलमानानें ताबडतोब काढतां येतील. परंतु या पद्धतीमुळें उत्पन्नाची कांहींशी कल्पना आली, तरी खर्च बरोबर समजणार नाहीं. एकाद्या स्वायत्त आणि सार्वभौम प्रांताला किंवा संयुक्त राज्याच्या घटकाला निरनिराळीं खातीं, घटक–प्रमुख आणि राज्यकारभाराकरितां नोकरवर्ग इ. साठीं खर्च करावा लागतो. मग प्रांत किती कां लहान असेना. उदा० बंगालची मुसलमान व मुसलमानेतर विभागांत फाळणी केली, तर एकाऐवजीं दोन प्रांत–प्रमुख व राज्यकारभारासाठीं दुप्पट नोकरवर्ग लागेल. जिल्ह्याचा कारभार पाहण्यासाठीं तेवढाच खर्च लागेल. परंतु प्रांत–प्रमुख, चिटणीस इत्यादिकांचा खर्च एक मुसलमान व एक बिगर–मुसलमान असे दोन विभाग पाडल्यामुळें जवळजवळ दुप्पट होईल. प्रत्यक्ष खर्च किती येईल तें काढणें कठिण आहे. तथापि लोकसंख्येच्या प्रमाणांत खर्चाची विभागणी करून मुसलमान–जिल्ह्यांच्या वांट्याला किती खर्च येईल हें काढलें, तर त्यापेक्षां प्रत्यक्ष प्रांतिक राज्य-

कारभाराचा खर्च कितीतरी जास्त येईल हें निश्चित. त्यामुळें बंगाल व पंजाबमध्यें हल्लींच्या खर्चाच्या मानानें खूपच जास्त खर्च करण्याची तयारी असली पाहिजे. अशी अडचण आसाम प्रांताच्या बाबतींत येणार नाहीं. कारण मुस्लिम-बहुसंख्या असलेला सिल्हेट जिल्हाच तेवढा मुसलमान–विभागांत मोडतो. आणि तो बंगालमध्यें समाविष्ट केला, तर प्रांतिक कारभाराची वेगळी व्यवस्था उभारावी लागणार नाहीं. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर कोष्टक ३४ आणि ३५ मध्यें दाखविल्याप्रमाणें पंजाब व बंगालच्या अंदाजपत्रकांत जमाखर्चाची तोंडमिळवणी होते, तशी मुसलमानेतर जिल्हे वेगळे काढले तर होणार नाहीं. ही तूट किती येईल तें काढतां येणार नाहीं. तथापि ही तूट भरपूर असणार यांत प्रत्यवाय नाहीं. ही गोष्ट ज्या प्रांतांमधून वेगळे प्रांत निर्माण केले गेले आहेत, त्यांच्या उदाहरणावरून सिद्ध झालेली आहे. सिंध आणि ओरिसा यांचा अनुभव अलिकडचाच आहे. वेगळे निघाल्यानंतर दोन्ही प्रांतांना आपापल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करतां आलेली नाहीं. त्यामुळें मध्यवर्ति सरकारला त्यांच्या मदतीसाठीं देणग्या द्याव्या लागतात. सिंधला दरवर्षी १कोटी ५ लाख रुपये मिळतात आणि ओरिसाला १९३८–३९ आणि १९३९–४० या दोन्ही वर्षी ४३ लाख रुपये मिळाले हें आपण पाहिलेंच आहे. प्रांतिक अर्थपरिस्थितीच्या या मुद्द्यावर अधिक भर देण्याचें कारण असें कीं प्रो. कूपलंड यांनीं पाकिस्तानच्या अर्थ–परिस्थितीबद्दल काळजीपूर्वक पृथक्करण केलेलें असलें, तरीसुद्धां "प्रांतिक अर्थव्यवहार अखंड हिंदुस्थानांत सध्यां जसा चालू आहे तसाच पुढेंहि चालू राहील,"[१] असें गृहीत धरून त्यांनीं आपला युक्तिवाद केलेला आहे. अर्थात् त्यांना या बाबतींत विशेष लक्ष घालण्याची आवश्यकता भासली नाहीं. सर होमी मोदी आणि डॉ. मथाई यांनीं सप्रू–समितीला सादर केलेल्या मसुद्यांतहि ही गोष्ट वगळलेली आहे.

बंगाल, पंजाब आणि आसाम या प्रांतांतील मुसलमान–जिल्ह्यांचे लोकसंख्येच्या प्रमाणानुसार उत्पन्नाचे व खर्चाचे आंकडे देण्याची जरुरी नाहीं. त्या

१. आर. कूपलंडः हिंदुस्थानचें भवितव्य, पृ. ९१.

## कोष्टक ३८.[1]

उत्पन्न ( लक्ष रुपयांत )

| बाब | १९३८–३९* मध्यवर्ति | १९३८–३९* वायव्य–विभाग | १९३९–४०** वायव्य–विभाग | १९३९–४०** पूर्व–विभाग |
|---|---|---|---|---|
| जकाती | ४०५०'५३ | ४४८'०६ | ५८२'९ | १२३६'३ |
| अबकारी | ८६५'७३ | १००'९२ | ७८'० | १२१'१ |
| कार्पोरेशन कर | २०३'७२ | १५'२८ | १७'१ | ७३'३ |
| इतर प्राप्ती–कर | १३७४'४४ | १२१'१० | १५०'४ | २९७'५ |
| मीठ | ८१२'०४ | ७६'६५ | ११९'१ | २०७'६ |
| अफू | ५०'८९ | — | — | — |
| रेल्वे | १३७'३२ | १५०'०० | –१११'८ | –१४०'८ |
| पोस्ट–टेलिग्राफ–चलन–टांकसाळ | ४१'४० | ५'१७ | २१'३ | ३६'० |
| इतर बाबी | १०३'२० | १८'८७ | १९'८ | १.६ |
| एकूण | ७६३९'२७ | ९३६'०५ | ८७६'८ | १८३२'८ |

१. मूळ ग्रंथांतील आंकडे १९३८–३९ व १९३९–४० या वर्षांचे आहेत. पुढें कोष्टक ४० यांतील आंकडे अधिक अलिकडचे आहेत. १९४५–४६च्या हिंदुस्थान–सरकारच्या अंदाजपत्रकाबरोबर एक स्पष्टीकरण–पत्रिका देण्यांत आली होती त्यांतून हे आंकडे घेतले आहेत. प्रांतांचे आंकडे सर्व प्रांतांचे मिळून दिलेले आहेत; दर प्रांतासाठीं वेगळे आंकडे नाहींत. युद्धामुळें पंजाब व सिंध यांना तात्पुरती भरभराट झालेली असली, तरी सर्वसाधारण ओघ होता तसाच आहे. बंगालची तूट अधिकच वाढलेली आहे. ( कोष्टक ४० पहा. )

* आर कूपलंड : हिंदुस्थानचें भवितव्य, पृ. ९२.

** सर होमी मोदी आणि डॉ० मथाई : पाकिस्तानच्या आर्थिक आणि सांपत्तिक बाजूसंबंधीं अहवाल, पृ. ७.

कोष्टक ३९.

खर्च ( लक्ष रुपयांत )

| बाब | १९३८–३९* मध्यवर्ति | १९३८–३९* वायव्य–विभाग | १९३९–४०** वायव्य–विभाग | १९३९–४०** पूर्व–विभाग |
|---|---|---|---|---|
| करावरील प्रत्यक्ष बोजा | ४२३·६० | ५१·४९ | ... | ... |
| पाणी–पुरवठा | ९·२४ | ७·०२ | ... | ... |
| कर्ज–पुरवठा | १,३३८·५४ | १८६·०० | २१६·४ | ४४१·७ |
| मुलकी कारभार | ९८४·६९ | १४५·५६ | १४५·८ | २०३·१ |
| मुलकी कामें | २१९·५८ | १०·८३ | ... | ... |
| अवांतर | २०४·३२ | ३३·१३ | ... | .. |
| संरक्षण | ४,६१८·०० | ... | ... | ... |
| देणग्या इ० | ३०६·३२ | २०५·०० | ... | ... |
| जादा भत्ता | ... | ... | ४०·७ | ६५·५ |
| प्रांतांना मदत | ... | ... | २०५·० | ३०·० |
| इतर बाबी · | ... | ... | ३०·४ | ४७·६ |
| एकूण | ८,१०४·१९ | ६३९·०३ | ६३८·३ | ७८७·९ |

* आर. कूपलंड : हिंदुस्थानचें भवितव्य, पृ. ९२.

** सर होमी मोदी आणि डॉ. मथाई : पाकिस्तानच्या आर्थिक आणि सांपत्तिक बाजूसंबंधीं अहवाल, पृ. ७.

## कोष्टक ४०.

१९३८–३९ पासून हिंदुस्थानचें सार्वजनिक उत्पन्न, खर्च आणि कर्ज ( कोटी रुपयांत ).

| | १९३८–३९ | १९३९–४० | १९४४–४५ (सुधारलेलें) | १९३९–४० ते १९४४–४५ पर्यंत | १९४५–४६ (अंदाजपत्रक) |
|---|---|---|---|---|---|
| **१. मध्यवर्ति सरकारचें अंदाजपत्रक** | | | | | |
| (अ) करापासून उत्पन्न | ८४·५२ | ९४·५७ | ३५६·८८ | १,१२२·६१ | ३६२·३४* |
| (आ) खर्च | ८५·१५ | ९४·५७ | ५१२·६५ | १,५९९·५५ | ५१७·६३ |
| (इ) शिल्लक (+) किंवा तूट (–) | –०·६३ | ... | –१५५·७७ | –४७६·९४ | –१५५·२९ |
| (ई) (अ) व (आ) यांचें शेंकडा प्रमाण | ९९·३ | १००·०० | ६९·७० | ७०·२० | ७०·०० |
| **२. एकूण सरकारी खर्च** | | | | | |
| (अ) हिंदुस्थानसाठीं | ८५·१५ | ९४·५७ | ५७२·०६ | १,४७८·*३ | ५३५·३९ |
| १ मुलकी खर्च | ३८·९७ | ४५·०३ | ११५·४२ | ४०२·२२ | १२३·४० |
| २ संरक्षणासाठीं खर्च | ४६·१८ | ४९·५४ | ४५६·६४ | १,३४६·७१ | ४११·९९ |
| अ कॅपिटल अकाउंट | ... | ... | ५९·४१ | १४९·३८ | १७·७६ |
| ब रेव्हेन्यू अकाउंट | ४६·१८ | ४९·५४ | ३९७·२३ | १,१९७·३३ | ३९४·२३ |
| (१) नेहमींचें अंदाजपत्रक | ३८·०७ | ३६·७७ | ३६·७७ | २२०·६२ | ३६·७७ |

(कोष्टक ४० चालू)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (२) किंमतींत वाढ | ... | १.१९ | १६.९२ | ४७.४८ | १९.७६ |
| (३) युद्धखर्च | ... | ३.५२ | ३३४.२२ | ८७८.४६ | ३२८.५१ |
| (४) नॉन इफेक्टिव् चार्जेस् | ८.११ | ८.०७ | ९.३२ | ५०.८० | ९.१९ |
| ३ संरक्षणखर्च व एकूण खर्च यांचें शें. प्र. | ५४.२ | ५२.४० | ७७.५० | ७४.९० | ७६.२० |
| (आ) भरून निघण्याजोगा युद्धखर्च | ... | ४.०० | ४३९.५३ | १३९३.८८ | ४८८.८० |
| ३. वर्षाकाठीं मध्यवर्ति सरकारचें कर्ज | १,२०५.७६ | १,२०३.८६ | १,८१९.०२ | ... | २,१८०.५७ |
| ४. प्रांत | | | | | |
| (अ) उत्पन्न | ८४.७४ | ९०.८३ | २००.७८ | ७८४.१२ | १८८.१७ |
| (आ) खर्च | ८५.७६ | ८९.२२ | २०८.०५ | ७६७.९६ | १९१.७४ |
| (इ) शिल्लक (+) तूट (−) | −१.०२ | +१.६१ | −७.२७ | +१६.१६ | −३.५७ |
| (ई) एकूण कर्ज ** | १६३.२० | १६७.६१ | २१५.४९ | ५२.२९ | ... |

* नवीन कर धरून

** (१) कायम कर्ज (२) तरतें कर्ज (३) वसूल न झालेलें कर्ज (४) मध्यवर्ति सरकारकडून कर्ज

प्रांतांतील मुसलमान–जिल्ह्यांच्या लोकवस्तीचें प्रांतांतील एकूण लोकसंख्येशीं पुढील प्रमाण राहील : बंगाल ६७·९ टक्के, आसाम ३०·५ टक्के आणि पंजाब ५९·४ टक्के.

वायव्य आणि ईशान्य मुसलमानी संयुक्त राज्यांना हिंदुस्थानच्या मध्यवर्ति सरकारच्या उत्पन्नापैकीं आणि खर्चापैकीं किती हिस्सा वांटून द्यावा हें आतां पहावयाचें आहे. वर सांगितल्याप्रमाणेंच याहि बाबतींत बिनचूक आंकडे मिळवणें ही अडचण अनुल्लंघनीय आहे. प्रो० कूपलंड यांनीं "हिंदुस्थानचें भवितव्य" या आपल्या पुस्तकांत आणि सर होमी मोदी व डॉ. मथाई यांनीं बरींच गुंतागुंतीचीं गणितें करून जे आंकडे काढले आहेत, तेच मीं येथें वापरलेले आहेत; जेथें ते वापरले नाहींत तेथें तसा उल्लेख केला आहे. प्रो० कूपलंड यांचे आंकडे १९३८–३९ सालचे आहेत. सर होमी मोदी आणि डॉ० मथाई यांनीं थोडयाफार फरकानें त्यांचीच पद्धति स्वीकारून १९३९–४० सालचे आंकडे दिले आहेत. मागील ३८ व ३९ या कोष्टकांत या दोन वर्षांचे आंकडे दिले आहेत.

त्या कोष्टकांवरून असें दिसून येईल कीं, रेल्वेच्या उत्पन्नाबाबत सर होमी मोदी व डॉ० मथाई यांनीं दिलेल्या आंकडयांत खूपच मोठा फरक आहे. प्रो० कूपलंड यांच्या माहितीप्रमाणें "१९३८–३९ सालीं पाकिस्तान–विभागांत व्यापारी वाहतुकीपासून रेल्वेला १२८ लाख रुपये नफा झाला; परंतु लष्करी वाहतुकीमुळें १८२ लाख रुपये तूट आली." ही तूट लष्करी कारणासाठीं आलेली असल्यामुळें तिचा विचार त्यांनीं संरक्षणासंबंधींच्या बाबतींत केलेला आहे. तरीसुद्धां १५० लाख रु. फायदा सुटणें अशक्य दिसतें. रेल्वेभाडयांत वाढ केल्यानें रेल्वे–उत्पन्नांत जी अपेक्षित वाढ होईल ती त्यांनीं जमेस धरली आहे; ही पद्धति वापरल्यामुळें उत्पन्न उगीचच फुगलेलें दिसतें. प्रो० कूपलंड यांच्या स्वतःच्या आंकडयांत रेल्वेचें उत्पन्न (१२८–१८२)–५४ लाख आणि वायव्य–विभागाचें एकूण उत्पन्न ९कोटी ३६लक्ष ५हजार, याऐवजीं ७कोटी ३२लक्ष ५हजार व्हावयास हवें.

खर्चाचा हिशेब करतांना प्रो. कूपलंड यांनीं स्वतःच उल्लेख केलेल्या कितीतरी गोष्टी विचारांत घेतलेल्या नाहींत. वेगळे प्रांत करून त्यांचा राज्यकारभार करावयाचा म्हटलें, तर खूपच जास्त खर्च येतो हें आपण पाहिलेंच आहे. त्याचप्रमाणें स्वतंत्र संयुक्त राज्यालासुद्धां असाच जास्त खर्च येईल. एवंच, स्वतंत्र सार्वभौम राज्याचा लवाजमा सांभाळण्यासाठीं केलेल्या अंदाजापेक्षां कितीतरी जास्त खर्च येईल ही भीति रास्त ठरते. परंतु आहेत हे आंकडे मान्य केले, तर १९३८–३९च्या आंकड्यांनुसार वायव्य–विभागाला ९३ लाख २ हजार रुपये शिल्लक राहतील व १९३९–४०च्या आंकड्यांनुसार २ कोटी ३८ लक्ष ५० हजार शिल्लक राहतील. या विधानांत संरक्षणाच्या खर्चाचा समावेश केलेला नाहीं. आणि येवढ्या तुटपुंज्या शिलकेमधून वायव्येकडील स्वतंत्र मुसलमान–राज्याचा संरक्षणखर्च भागेल कीं नाहीं हा विचार करण्याजोगा मुद्दा आहे. प्रो. कूपलंड यांच्या सबंध पुस्तकांत मुस्लिम–लीगच्या दृष्टिकोणाला पाठिंबा असल्याचें दिसून येतें. तथापि त्यांनींसुद्धां असाच निष्कर्ष काढलेला आहे कीं, वायव्य–विभागाला संरक्षणखर्च झेंपणार नाहीं. त्यांचा निर्णय त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणें आहे:—

“पाकिस्तानची सर्वांत मोठी अडचण आणि सर्वांत गंभीर धोका संरक्षणखर्च कसा भागवावयाचा हा आहे. वर सांगितलेल्या संभाव्य गोष्टी खरोखरी होणारच असल्या, तर पाकिस्तानला आपल्या वायव्य सरहद्दीचें रक्षण हिंदुभारताच्या मदतीखेरीज करावें लागेल; हल्लींच्या नवीन शस्त्रास्त्रांचा अफाट खर्च करणें हें तर त्याच्या शक्तीबाहेरचें आहेच; परंतु युद्धपूर्वकालीन खर्चसुद्धां त्यांना झेंपण्यासारखा नाहीं. आवश्यक असलेल्या पैशांचा कांहीं हिस्सा जरी उभा करावयाचा असें म्हटलें, तरी एका बाजूनें इतकी जादा करवाढ करावी लागेल व राज्यकारभाराच्या आणि सामाजिक कार्यांच्या खर्चांत दुसऱ्या बाजूनें इतकी काट करावी लागेल, कीं त्यायोगें सर्वसाधारण राहणीचें मान खूपच खालीं येईल. आणि त्यामुळें आधींच मागासलेले लोक अधिकच मागासतील. इतकेंच नव्हे, तर त्याच स्थितींत त्यांना पुढील अनेक वर्षें तसेंच खितपत

पडावें लागेल. ही गोष्ट येवढ्यावरच संपत नाहीं. पाकिस्तानच्या पूर्व सरहद्दीच्या सुरक्षिततेचीसुद्धां काळजी उत्पन्न होणार नाहीं काय ? या प्रकरणाच्या सुरवातीस फाळणीच्या फायद्यांसंबंधीं शक्य तितक्या निःपक्षपातीपणानें विवरण केलें आहे; म्हणून फाळणीचे तोटेहि तितक्याच निःपक्षपातीपणानें अभ्यासिले पाहिजेत. संरक्षणासारख्या महत्त्वाच्या बाबतींत वस्तुस्थिति आणि संभाव्यता यांपासून निघणारा निष्कर्ष कोणत्या स्वरूपाचा आहे ? हिंदुस्थानचा एक भाग म्हणून पाकिस्तानला आजवर जी सुरक्षितता मिळाली ती पाकिस्तानला कधींहि लाभणें शक्य नाहीं, हें निर्विवाद नाहीं काय ? संरक्षणासाठीं लागणाऱ्या किमान खर्चानेंच पाकिस्तानच्या साधनसामग्रीवर इतका ताण पडेल, कीं जनतेची सामाजिक प्रगति त्यामुळें थोपविली जाईल. मग युद्धजन्य इतर धोक्यांना

## कोष्टक ४१.

सन १९३९–४० ( आंकडे लक्ष रु. चे आहेत )

| उत्पन्न | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| बाब | पूर्व–विभाग | वायव्य–विभाग | बाब | पूर्व–विभाग | वायव्य–विभाग |
| जकाती | ७७५·० | ४०२·२ | मुलकी कारभार | १२६·८ | १००·६ |
| अबकारी | ७५·५ | ५३·८ | कर्जे | २७६·७ | १४९·५ |
| कार्पोरेशन–कर | ४६·० | १२·० | | | |
| इतर प्राप्ती–कर | १८६·५ | १०३·७ | पेन्शन भत्ता | ४१·० | २८·० |
| मीठ | १३०·० | ८२·२ | | | |
| पोस्ट, टेलिग्राफ, चलन, टांकसाळ | २२·० | १४·७ | प्रांतांना मदत | १८·८ | १४१·४ |
| रेल्वे–तूट | –८८·५ | –७७·२ | अवांतर | ३०·० | २१·० |
| अवांतर | १·० | १३·६ | | | |
| एकूण | १,१४७·५ | ६०५·० | एकूण | ४९३·३ | ४४०·५ |

त्यास तोंड द्यावें लागेल तें निराळेंच."[1] आपल्या मताच्या समर्थनार्थ त्यांनीं सर शिकंदर हयातखान यांचें पंजाब–विधिमंडळांतील भाषणहि उद्धृत केलें आहे.

पूर्व–विभाग अगर मुसलमानेतर वगळून केलेले मुसलमान–विभाग यांविषयीं प्रो. कूपलंड यांनीं कांहींच लिहिलेलें नाहीं. सर होमी मोदी व डॉ० मथाई यांनीं या दोहोंविषयींहि विवरण केलेलें आहे. मागील उताऱ्यांत बंगाल व आसाम हे सबंध प्रांत मिळून झालेल्या पूर्व–विभागाचे आंकडे दिले आहेत. पुढें पूर्व आणि वायव्य–विभागांतील उत्पन्न आणि खर्चाचे जिल्हानिहाय, म्हणजे मुसलमानेतर जिल्हे वगळून, आंकडे दिले आहेत.

त्यावरून असें दिसून येईल कीं शिल्लक कमी होईल, परंतु संरक्षणखर्च कमी होणार नाहीं. दोन्ही विभागांतील लोकसंख्येच्या प्रमाणांत संरक्षणखर्च विभागल्यानें संरक्षणाच्या प्रश्नाकडे योग्य तऱ्हेनें पाहतां येणार नाहीं. दोन्ही विभाग सरहद्दीवर असल्यामुळें जमिनीवरून होणाऱ्या शत्रुहल्ल्यापासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं खर्चाचा बोजा साहजिकच त्यांच्यावर पडेल. वायव्य–सरहद्दीवरून शत्रुस्वारी होण्याचा धोका नेहमींच असल्यामुळें अगदीं मुसलमानांच्या सुलतानी अमलापासून आजतागायत ब्रिटिश अमदानीमध्येंहि त्यानुसार धोरण राखण्यांत आलें आहे. या युद्धापासून पूर्व सरहद्दीवरूनहि तसा धोका आहे हें सिद्ध झालें आहे आणि भविष्यकालांत त्याकडे डोळे झांकून चालणार नाहीं. या दोन मुस्लिम–विभागांतील समुद्रकिनारा छोटा आहे हें खरें. पण तरीसुद्धां त्यासाठीं पुरेसें नाविक संरक्षणहि ठेवावेंच लागेल. लोकवस्तीच्या प्रमाणांत संरक्षणखर्च विभागणें असमाधानकारक असून त्यामुळें दिशाभूल होण्याचा संभव असला, तरी ज्या आधारावर चालू युद्धाला अनुसरून संरक्षणखर्च विभागला तर संरक्षणावरील खर्चामुळें किती भरमसाट तूट येते तें दिसून येईल. त्यांत आधुनिक शस्त्रास्त्रांचा खर्च अधिक घातलेला नाहीं तें वेगळेंच.

---

१. कूपलंड: पृ. ९५–९६.

### कोष्टक ४२.

**पूर्व-विभाग** (आंकडे लक्ष रुपयांचे आहेत).

| | प्रांतानुसार | | | जिल्हानुसार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | संरक्षणासाठीं राहिलेली शिल्लक | संरक्षण खर्च | तूट | संरक्षणासाठीं राहिलेली शि. | संरक्षण खर्च | तूट |
| १९३९–४० | १,०४४·९ | १,१९७·८ | १५२·९ | ६४४·२ | ७४८·९ | १०४·५ |
| **पश्चिम-विभाग** ( आंकडे लक्ष रुपयांचे आहेत ) | | | | | | |
| १९३८–३९ | ९३·०२ | ६४२·०१ | ५४८·९९ | ... | ... | ... |
| १९३९–४० | २३८·५ | ६१९·७६ | ३८१·२६ | १६४·५ | ४२३·७३ | २५९·२ |

संरक्षणविषयक प्रश्नाच्या दुसऱ्या एका मुद्द्याकडेहि दुर्लक्ष करून चालणार नाहीं. स्वतंत्र मुसलमान–राज्याला स्वतःच्या संरक्षणासाठीं आपल्या राष्ट्रांतील जनतेंतून सैन्य उभारावें लागेल आणि त्यासाठीं खर्च सोसावा लागेल. बाकीच्या हिंदुस्थानलासुद्धां आपल्या जनतेंतून सैन्य उभें करून त्यासाटीं खर्च करावा लागेल. संरक्षणाच्या दृष्टीनें पाहतां या फाळणीमुळें वायव्य–मुसलमान–विभागाला सांपत्तिक दृष्ट्या फारच तोटा होणार आहे. १९३० सालीं हिंदी सैन्यांतील ५८·५ टक्के सैनिक वायव्य–विभागांत राहणाऱ्या लोकांतून घेतलेले होते हें डॉ. आंबेडकर यांनीं निदर्शनास आणून दिलें आहे.[१] मुसलमानांचें सैन्यांतील प्रमाण स्वतंत्रपणें काढण्यांत आलें आहे आणि डॉ० आंबेडकर यांनीं असें दाखवून दिलें आहे कीं, हिंदी पायदळांत मुसलमान ३६ टक्के असून घोडदळांत ३० टक्के आहेत. हे जवळजवळ सर्वच्या सर्व सैनिक वायव्य–सरहद्द व पंजाबमधील आहेत.[२] हा विभाग हिंदुस्थानपासून अलग करून त्याची स्वतंत्र राज्य म्हणून स्थापना झाली म्हणजे उरलेला हिंदुस्थान स्वाभाविकपणेंच आपलें सैन्य आपल्या राष्ट्रिकांतून उभारील; आणि वायव्य–विभागांतील सर्व सैनिकांना त्यांच्या स्वतंत्र राज्यानें नोकरीवर घेतलें नाहीं तर बेकार व्हावें

---

१. डॉ. आंबेडकर: पाकिस्तानवरील विचार, पृ. ७०.

२. उक्त ग्रंथ, पृ. ७६–७७.

लागेल. डॉ० आंबेडकर यांनीं असा हिशेब केला आहे कीं, "पाकिस्तान-विभागांतून जरी सैन्यभरती होत असली तरी मध्यवर्ति सरकारला तेथून फारच थोडी मदत मिळते.

कोष्टक ४३.

मध्यवर्ति सरकारला खंडणी :

| | | |
|---|---|---|
| पंजाब | ... | १,१८,०१,३८५ रु. |
| सरहद्द प्रांत | ... | ९,२८,२९४ रु. |
| सिंध | ... | ५,८६,४६९१५ रु. |
| बलुचिस्तान | ... | ... |
| एकूण | ... | ७,१३,७६,५९४ रु. |

या उलट हिंदुस्थानचे प्रांत पुढील खंडणी देतातः

| | | |
|---|---|---|
| मद्रास | ... | ९,५३,२६,७४५ रु. |
| मुंबई | ... | २२,५३,४४,२४७ रु. |
| बंगाल | ... | १२,००,००,००० रु.* |
| संयुक्त प्रांत | ... | ४,०५,५३,००० रु. |
| बिहार | ... | १,५४,३७,७४२ रु. |
| मध्यप्रांत—वऱ्हाड | ... | ३१,४२,६८२ रु. |
| आसाम | ... | १,८७,५५,९६७ रु. |
| ओरिसा | ... | ५,६७,३४६ रु. |
| एकूण | ... | ५१,९१,२७,७२९ रु. |

" यावरून असें दिसून येईल कीं, पाकिस्तानी प्रांत फारच थोडी खंडणी भरतात. खंडणीचा मुख्य वांटा हिंदुस्थानचे प्रांतच उचलतात. वस्तुतः अशी परिस्थिति आहे कीं, हिंदुस्थानच्या प्रांतांनीं दिलेल्या पैशांवर सध्यांचें हिंदुस्थान—सरकार पाकिस्तानी प्रांतांचा कारभार पाहत असतें. पाकिस्तानी प्रांत हे हिंदुस्थानांतील प्रांतांच्या गळ्यांतील धोंड बनले आहेत. हे प्रांत केवळ

*निम्मी लोकसंख्या हिंदु असल्यामुळें निम्मी खंडणी दर्शविलेली आहे.

कमी खंडणी भरतात इतकेंच नाहीं, तर मध्यवर्ति सरकारकडून त्यांना खूपच मोठी रक्कम मदतीदाखल मिळते. मध्यवर्ति सरकारच्या १२६ कोटी रु. उत्पन्नापैकीं दरवर्षी ५२ कोटी रु. सैन्यावर खर्च होतात. ही रक्कम कोठें खर्च केली जाते ? या ५२ कोटी रुपयांपैकीं महत्त्वाचा हिस्सा कोण देतो ? या ५२ कोटी रुपयांपैकीं मोठा वांटा पाकिस्तानी प्रदेशांतून जमविलेल्या मुसलमान सैन्यावर खर्च होतो. या ५२ कोटी रुपयांतील मोठा वांटा हिंदुप्रांत देतात व तो बहुतेक अहिंदु सैन्यावर खर्च केला जातो."[१]

यावरून मध्यवर्ति–सरकार उरलेल्या हिंदुस्थानमधून पैसा गोळा करून वायव्य–प्रदेशावर जी अफाट रक्कम खर्च करतें, तेवढीच केवळ वायव्य–प्रदेशाला गमवावी लागणार नाहीं; तर आपल्या सैन्याला आवश्यक तो पैसा त्यांना उभा करावा लागेल. ही 'अदृश्य देणगी' म्हणजे एक भली मोठी रक्कम आहे हें श्री. के. टी. शहा यांनीं दाखवून दिलें आहे. ते म्हणतात. "हिंदी सैन्य बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पंजाबमधून भरती केलें जात असल्यामुळें त्या सैन्याचे पगार, पेन्शन व कंत्राटदारांचा फायदा मिळून एकंदर भरमसाट पैसे होतात. युद्धपूर्व कालाप्रमाणें पंजाबला दरवर्षी किमानपक्षीं १० कोटी रु. तरी अदृश्य देणगीच्या रूपानें मिळत होते. युद्धामुळें यांत वाढ झाली आहे हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. युद्धोत्तरकालांत ही रक्कम सालीना २५ कोटी रुपयांहून कमी भरणार नाहीं."[२]

सर शिकंदर हयातखान यांनीं आपल्या योजनेंत सरहद्दींची पुनर्घटना करतांना किंवा प्रादेशिक सरकारें स्थापन करतांना १ जानेवारी १९३७ पूर्वी सैन्यामध्यें मुसलमानांचें जें प्रमाण होतें तें कांहीं झालें तरी कमी करूं नये असा जो आग्रह धरला होता, त्याचें एक कारण पंजाब प्रांताला सोसावी लागणारी ही तूट हेंच असावें. या युद्धांतसुद्धां वायव्य–प्रदेशानें हिंदी सैन्याला बऱ्याच मोठ्या प्रमाणांत लढवय्ये पुरवले आहेत आणि श्री. के. टी. शहा

१. आंबेडकर : पाकिस्तानवरील विचार, . ८६–८७.

२. के. टी. शहाः पाकिस्तान कां असावें आणि कां नसावें ?, पृ. १६४.

यांनीं उल्लेख केल्याप्रमाणें त्यापासून कमाई करून घेतली आहे. मार्च १९४५ मध्यें मध्यवर्ति विधिमंडळांत युद्धमंत्र्यानें एका प्रश्नाला उत्तर देतांना असें सांगितलें कीं, एकूण हिंदी सैनिकांपैकीं पंजाबनें २९·९ टक्के, सरहद्द प्रांतानें ४ टक्के, सिंधनें ०·४ टक्के असे एकूण ३४·३ टक्के सैनिक पुरवले आहेत.

## सार्वजनिक कर्ज (१९३९-४०)

१९३९-४० अखेरी मध्यवर्ति आणि प्रांतिक सरकारांचें एकूण सार्वजनिक कर्ज पुढें दिलें आहे.

### कोष्टक ४४.

मध्यवर्ति सरकार

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थानांत | ... | ५,०५,५१,१०,८१६ रु. |
| इंग्लंडमध्यें | ... | ९,४४,६१,५५,३९९ रु. (३२९,३२८,३९४ पौंड; १३ रु. म्हणजे १ पौंड प्रमाणें) |

प्रांत

| | | | |
|---|---|---|---|
| बंगाल | ... | ३०,००,००० रु. | |
| आसाम | ... | ५०,००,००० रु. | |
| पंजाब | ... | ३४,०५,५०,५१५ रु. | एकूण रुपये ६३,१९,५२,१६७ (पंजाब, सरहद्द, सिंध) |
| सरहद्द | ... | ५७,२४,९०० रु. | |
| सिंध | ... | २३,५६,७६,७५२ रु. | |
| कूर्ग | ... | ३,६२,५८२ रु. | |
| मद्रास | ... | ११,९६,९२,३११ रु. | |
| मुंबई | ... | ३१,१८,७२,७२० रु. | |
| संयुक्त प्रांत | ... | ३१,१३,९२,८८६ रु. | |
| बिहार | ... | — | |
| मध्यप्रांत—वऱ्हाड | ... | ४,८८,४०,८६३ रु. | |
| ओरिसा | ... | — | |
| एकूण | | १,४३,२१,१२,९३७ रु. | |

प्रांतांना असलेल्या एकूण १४३ कोटी रुपये इतक्या सार्वजनिक कर्जापैकीं पंजाब, सिंध व सरहद्द प्रांतांच्या सरकारांना ६३ कोटी रुपयांहून अधिक कर्ज आहे. तथापि त्यांतील बहुतेक कर्ज पाटबंधाऱ्यांच्या कामांत गुंतविलें असल्यामुळें पंजाबमध्यें तें किफायतशीर होऊं लागलें आहे. सिंधमध्येंहि पंजाबप्रमाणेंच तें काम किफायतशीर होईल अशी आशा वाटत आहे. पूर्व–विभागाला विशेष असें सार्वजनिक कर्ज नाहीं. पुढील कोष्टकांत सर्व प्रांतांना आजतागायत किती कर्ज आहे तें दिलें आहे.

## कोष्टक ४५.

१९३६–३७ पासून प्रांतांना असलेलें कर्ज (कोटी रुपयांत)

| | १९३८–३९ अखेर | १९४४–४५ अखेर |
|---|---|---|
| १ सार्वजनिक कर्ज | | |
| (अ) कायमचें कर्ज | १५·०७ | ५०·९२ |
| (ब) तरतें कर्ज | १·५० | ६८·२३ |
| (क) मध्यवर्ति सरकारकडून कर्ज | १२३·२४ | ६६·५७ |
| २ वसूल न झालेलें कर्ज | २३·३९ | २९·७७ |
| ३ एकूण कर्ज (१ व २ मिळून) | १६३·२० | २१५·४९ |
| ४ नक्त कर्ज | १०२·४८ | १८५·७९ |

फाळणी करावयाची झाली, तर मुसलमान आणि बिगर–मुसलमान विभागांना सार्वजनिक कर्ज कोणत्या प्रमाणांत विभागून द्यावयाचें याचा हिशेब करणें मोठें गुंतागुंतीचें काम होऊन बसेल. परंतु एक गोष्ट निश्चित कीं वायव्य आणि पूर्व विभागांना आपला वांटा उचलावा लागेल, आणि हें ओझें लहानसहान असणार नाहीं.

याखेरीज युद्धकालांत मध्यवर्ति सरकारचें कर्ज अफाट वाढलेलें आहे. १९३९–४०च्या आंकड्यांवरून कसलाहि हिशेब केला तरी तो फारच भ्रामक ठरण्याचा संभव आहे. १९३९–४० सालीं एकूण कर्ज ९४४½ कोटी होतें,

तें आतां २००० कोटी झालेलें असेल; आणि जरी दोन विभागांतील मुसलमान–जिल्ह्यांना हें कर्ज लोकवस्तीच्या प्रमाणांत विभागून दिलें तरीसुद्धां हा वांटा आणि स्वतःचें कर्ज मिळून ५०० कोटी रुपये इतकी रक्कम होईल. ३ टक्के दरानें या रकमेचें व्याज दरवर्षी १५ कोटी रुपये भरावें लागेल. संरक्षणखर्च जमेस न धरला तरी राज्यकारभारावर खर्च होऊन उरणाऱ्या रकमेच्या जवळजवळ दुपटीनें ही व्याजाची रक्कम होईल. तथापि कर्ज विभागून देणें ही साधीसुधी गोष्ट नव्हे; तें काम अत्यंत जिकिरीचें व गुंतागुंतीचें आहे हें वर आलेंच आहे. सर आरदेशर दलाल म्हणतात, "ब्रिटिश हिंदुस्थानचे तुकडे पाडावयाचे झाले तर आर्थिक आणि सांपत्तिक अडचणी इतक्या येतील, कीं त्या दूर करणें जवळजवळ अशक्य होऊन बसेल. रेल्वे, पोस्ट, तारायंत्रें, पाटबंधारे आणि पाणीपुरवठा यांची विभागणी करावी लागेल. या सर्व योजनांसाठीं जें राष्ट्रीय कर्ज उभारण्यांत आलेलें आहे त्याची हल्लींची व्यवस्था मोडून टाकून नवीन व्यवस्था करावी लागेल. सैन्यांतसुद्धां याप्रमाणेंच विभागणी करावी लागेल. पूर्वीचें कर्ज आणि भविष्यकालीन खर्च यांत फेरबदल करावा लागेल. सिंधमधील सक्करच्या धरणासारख्या योजनांसाठीं मध्यवर्ति सरकारचा अफाट पैसा खर्च झालेला आहे. पाकिस्तानमध्यें अशाच प्रकारचीं जीं अन्य कामें हिंदी सरकारनें स्वखर्चानें केलीं, त्या पैशांची फेड पाकिस्तानला करावी लागणार आहे. सध्यांच्या हिंदी सरकारनें हिंदुस्थानी विभागांत पाकिस्तानच्या हिश्शापैकीं जो हिस्सा खर्च केला आहे, तो या परतफेडीच्या वेळेस वजा घालतां येईल. या सर्व किचकट, बिकट व जिवाला तापदायक वाटणाऱ्या उलाढाली संपल्यानंतर आणि त्यादेखील जातीय वैमनस्य व प्रक्षोभ न माजवतां करतां आल्यानंतर जें पाकिस्तान निर्माण होईल तें दरिद्री, साधनविहीन असें पाकिस्तान असेल. तात्काल सोडवलेच पाहिजेत असे असंख्य प्रश्न पुढें उभे राहिलेलें व कर्जाचा दुर्लंघ्य असा डोंगर समोर असलेलें हें पाकिस्तान आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या उज्ज्वल भवितव्य असलेल्या स्वायत्त हिंदुस्थानपासून अलग पडणार आहे.

## कोष्टक ४६.

रेल्वे १९३९–४० ( हजार रुपयांत )

| रेल्वे | एकूण भांडवल | सर्व उत्पन्न | नेहमींचा खर्च | नक्त उत्पन्न | नेहमींचा खर्च व एकूण उत्पन्न यांचें प्रमाण | नक्त उत्पन्न आणि भांडवल यांचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| आसाम–बंगाल | २,६४,८७४ | २१,३३५ | १६,८२६ | ४,५०६ | ७८·८६ | १·७० |
| बंगाल व एन्. डब्ल्यू. | २,२८,४९४ | ३६,२९० | १८,४८२ | १७,८०८ | ५०·९३ | ७·७९ |
| बंगाल–नागपूर | ७,८४,५९७ | १,१०,४४६ | ७४,३४४ | ३७,१०२ | ६७·३१ | ४·६० |
| बी. बी. सी. आय्. | ७,७५,०२० | १,२८,७०३ | ७४,१०० | ५४,६०३ | ५७·५७ | ७·०५ |
| पूर्व–बंगाल | ५,३०,६४६ | ६३,६५९ | ५५,३२० | ८,३३९ | ८६·९० | १·५७ |
| ईस्ट इंडियन | १४,९९,४१७ | २,१५,५४६ | १,३१,०८४ | ८४,४६२ | ६०·८२ | ५·६३ |
| जी. आय्. पी. | ११,७७,९७० | १,४२,२९८ | ९१,१०१ | ५१,१९७ | ६४·०२ | ४·३५ |
| एम्. एस्. एम्. | ५,६३,४६० | ८०,१७१ | ४८,९२६ | ३१,२४५ | ६१·०० | ५·५५ |
| नॉर्थ वेस्टर्न (एकूण*) | १५,३२,६०२ | १,६८,९७९ | १,१९,६४५ | ४९,३३४ | ७०·८० | ३·२२ |
| रोहिलखंड | ४७,५९१ | ७,६९३ | ३,७१९ | ३,९७४ | ४८·३४ | ८·३५ |
| साउथ इंडियन | ४,८६,८५३ | ५५,१२६ | ३८,६८८ | १६,४३८ | ७०·१८ | ३·३८ |
| *नॉर्थ वेस्टर्न (व्यापारी) | ११,९४,४३१ | १,५५,०४३ | १,००,७०० | ५४,३४३ | ६४·९५ | ४·५५ |
| *नॉर्थ वेस्टर्न (लष्करी) | ३,३८,१७१ | १३,९३६ | १८,९४५ | –५,००९ | १३५·९५ | –१·४८ |

ब्रिटिश-हिंदुस्थानांतील या प्रमुख रेल्वेपैकीं ईस्टर्न बंगाल रेल्वे जवळजवळ सर्वच्या सर्व आणि आसाम-बंगाल रेल्वे कांहीं प्रमाणांत पूर्व विभागांत आहे. यांत गुंतवलेलें एकून भांडवल ७९कोटी ५५लक्ष रुपये असून त्यावर १ कोटी २८·४५ लाख रुपये म्हणजे १·६ टक्के इतका नफा सुटतो. एन्. डब्ल्यू. रेल्वे वायव्य-विभागांत असून तिचें एकूण भांडवल १५३·२६ कोटी रुपये आहे. त्यापासून नक्त नफा ४ कोटी ९३·३४ लाख रुपये म्हणजे ३·२२ टक्के होतो. या दोन विभागांतील रेल्वेपासून जो नक्त फायदा होतो तो ब्रिटिश-हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रमुख रेल्वेच्या फायद्यापेक्षां कमी आहे. म्हणजे याहि बाबतींत इतर हिंदुस्थानपेक्षां मुसलमान-विभाग निकृष्ट परिस्थितींत आहेत. रेल्वेच्या या अर्थव्यवहाराला आतां अधिकच महत्त्व प्राप्त झालेलें आहे. कारण हिंदुस्थानांतील बहुतेक रेल्वे सरकारी मालकीच्या आहेत, आणि त्यांपासून जो फायदा मिळेल तो निरनिराळ्या सरकारांच्या उत्पन्नांत जमा होणार किंवा त्यापासून जो तोटा होईल तोहि सरकारी तिजोरींतून भरून काढावा लागणार.

## ३४. फाळणीच्या सूचनेवर टीका

### १. पाकिस्तानचें समर्थन

हिंदु आणि मुसलमान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आहेत, या हिंदुस्थानच्या फाळणीच्या मूलभूत तत्त्वासंबंधीं आपण विस्तृत विवेचन केलेलें आहे. लाहोर-ठरावाचा अर्थ, मुस्लिम-लीगची भूमिका, पाकिस्तानमध्यें समाविष्ट होणारे प्रदेश इत्यादि गोष्टींचाहि भरपूर खल झालेला आहे. आतां आपल्याला स्वतंत्र मुसलमान-विभाग व मुसलमानेतर-विभाग यांच्या दृष्टीनें सध्यांची आंतरराष्ट्रीय परिस्थिति लक्षांत घेऊन फाळणीच्या कल्पनेचा सर्वसाधारण विचार करतां येईल.

प्रो० कूपलंड यांनीं मांडलेला पाकिस्तानच्या समर्थनाचा सारांश अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मला त्यापेक्षां जास्त चांगल्या रीतीनें तो मांडतां येणार नाहीं. म्हणून तोच येथें संपूर्णपणें उद्धृत करतों.

'(१) पहिली गोष्ट अशी कीं, फाळणी केल्यानें हल्लीं हिंदु-मुसलमानांत जी तेढ आहे तिचें मुख्य कारण म्हणजे मुसलमानांना वाटणारा न्यूनगंड आणि भीति बऱ्याच प्रमाणांत कमी होईल. हिंदुस्थानांतील निम्म्याहून अधिक मुसलमानांना हिंदु-राज्यापासून विभक्त केल्यानें हिंदु-राज्याविषयीं त्यांना जी सध्यां भीति वाटत आहे ती नाहींशी होईल. फाळणी केली तर एका मोठ्या राज्यांतील अल्पसंख्य जनतेचें रूपांतर दोन छोट्या देशांतील बहुसंख्याकांत होऊन त्यांचा स्वाभिमान राखला जाईल; आणि हिंदी-संघराज्यांतील एक जमात म्हणून न राहतां एक राष्ट्र म्हणून त्यांना मान्यता मिळेल. त्यांना आपल्या राष्ट्रभूमीच्या स्वातंत्र्याचा हक्क प्राप्त होईल. त्यांचें जगांतील स्थान व्यापक बनेल....मध्यपूर्वेंतील मुसलमानी राष्ट्रांचे शेजारी म्हणून त्यांना राहतां येईल. हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेरील देशांत राहणाऱ्या मुसलमान-जनतेविषयीं त्यांच्या मनांत सध्यां आहे त्यापेक्षां अधिक उत्कट बंधुभावना जागृत होईल. उलट-पक्षीं, जर ह्या बाह्य जगाकडे विन्मुख होऊन ते स्वतंत्र हिंदुस्थानांत हिंदु-बहुसंख्याकांच्या आधिपत्याखालीं कायमचे राहण्यास तयार झाले, तर त्यांची अवस्था युरोपमधील अल्पसंख्याकांसारखीच म्हणजे हलाखीची होईल....

'(२) पाकिस्ताननें जितका अल्पसंख्याकांचा प्रश्न सुटणार आहे तितका तो दुसऱ्या कशानेंहि सुटणार नाहीं. पाकिस्तानमुळें दोन्ही जमातींत खराखुरा सत्तेचा समतोल निर्माण होऊन तो प्रभावी ठरेल. मुस्लिम-राष्ट्रांना सारखाच राष्ट्रीय दर्जा असल्यामुळें तीं राष्ट्रें हिंदु-राष्ट्रांशीं तुल्यबळ ठरतील. त्या सर्व राष्ट्रांमध्यें अल्पसंख्याक असतील....जनता जातीयदृष्ट्या एकसंधी असावी हें उद्दिष्ट अव्यवहार्य असल्यामुळें हिंदु-राज्यांत लक्षावधि मुसलमान असतील. तथापि त्यांचा प्रश्न कदापि गंभीर असणार नाहीं. याचें कारण अगदीं साधें आहे. हिंदुस्थान ब्रिटिश-नियंत्रणापासून मुक्त होण्याचा संभव दिसतांच जमातीं-जमातींत सत्ता बळकाविण्यासाठीं सुरू झालेले झगडे विभक्त राज्यांत बंद पडतील. संमिश्र मंत्रिमंडळें स्थापन करणें आणि अल्पसंख्याकांना इतर संरक्षणें देणें हा मुस्लिम-लीगचा मुसलमानी राज्यांबाबतचा कार्यक्रम आहे.

तथापि अल्पसंख्याकांना अशीं संरक्षणें देण्यांत येत असलीं, तरी तीं राज्यें मुसलमान-राष्ट्रें असणार हें निश्चित आहे. आणि हिंदु-राज्यांत ज्याप्रमाणें हिंदु-संस्कृतीचें प्रभुत्व राहील, तसें या राज्यांत मुसलमानी-संस्कृतीचें प्रभुत्व राहील हेंहि निश्चित. अखिल हिंदुस्थानसाठीं एक मध्यवर्ति सरकार होणार नसल्यामुळें कोणत्याहि जमातीपुढें त्या सरकारांत वर्चस्व प्राप्त करून घेण्याचा प्रश्नच उरणार नाहीं. म्हणून हिंदु वा मुसलमान राज्यांत अल्पसंख्याकांना बहुसंख्याकांविरुद्ध झगडा करण्यास उत्तेजन मिळणार नाहीं. फाळणी झाल्यानंतर उभय राज्यांतील बहुसंख्याक आपल्यावरची जबाबदारी पार पाडतील आणि अल्पसंख्याकांमध्यें आपल्या दर्जाविषयीं समाधानी वृत्ति राहील अशी शक्यता अधिक आहे, असाहि एक युक्तिवाद करण्यांत येतो. कारण संयुक्त राज्यांत प्रांतांऐवजीं स्वतंत्र राज्यें प्रस्थापित झाल्यामुळें कोणत्याहि राज्यांतील अल्पसंख्याकांवर अन्याय झाल्यास त्याचा बदला घेण्याची अधिक शक्यता निर्माण होईल.

'(३) तिसरा असा मुद्दा मांडण्यांत येतो कीं, फाळणीमुळें सर्व हिंदुस्थानच्या संरक्षणाचा प्रश्न सुलभ होईल. हल्लीं सरहद्द प्रांताला जें महत्त्व प्राप्त झालें आहे, तें महत्त्व वायव्येकडे मुसलमान-राज्य झाल्यामुळें खलास होईल. या सरहद्द प्रांतापलीकडे असणाऱ्या सर्व वन्य टोळ्या मुसलमान आहेत. हल्लीं त्यांच्यांत मुसलमानेतरांविरुद्ध धर्मयुद्ध लढण्याची जी राजकीय व धार्मिक खुमखुमी आहे ती शेजारच्या राज्यांत मुसलमानी अंमल आहे अशी जाणीव झाल्यामुळें कमी होईल. याखेरीज पाकिस्तानी व शेजारील मुसलमानी राष्ट्रांशीं शांततेचे तह करून अधिक स्थैर्य निर्माण करतां येईल. सादबादच्या तहान्वयें तुर्कस्तान, इराक, पर्शिया व अफगाणिस्तान या राष्ट्रांनीं परस्पर-सुरक्षितेसाठीं दोस्ती केलेली आहे. त्या दोस्तराष्ट्रांत पांचवें राष्ट्र म्हणून सामील होण्यास पाकिस्तानला काय म्हणून हरकत असावी ?

'(४) हिंदुस्थान अखंड राहिला तर लष्करी संघटना हिंदी लोकांच्या म्हणजे हिंदूंच्याच हातांत राहणार. अर्थात् अशामुळें मुसलमानांचें सैन्यांतील

प्रमाण कमी होईल...असें घडलें, तर मुसलमान–सैनिकांचें प्रमाण १९३९ सालीं तिसऱ्या हिश्श्याहून अधिक आणि आतां ३०·८ टक्के आहे, तें खात्रीनें एकचतुर्थांश होईल. हल्लीं पंजाबमध्यें सैनिकांना पगार व पेन्शनें देण्यासाठीं कितीतरी पैसा लागतो. मुसलमानांचें सैन्यांतील प्रमाण कमी झाल्यामुळें पंजाब लोकांचें राहणीचें मान कमी होईल. इतकेंच नव्हे, तर हिंदूंच्या हातीं लष्करी सूत्रें दिल्यासारखें होईल.

'(५) पांचवा मुद्दा असा कीं, केवळ पाकिस्तानच्या योगानेंच मुसलमानांना आर्थिक स्वयंनिर्णय प्राप्त होऊं शकेल. हिंदु–मुसलमानांत तेढ उत्पन्न होण्यास आर्थिक कारणहि महत्त्वाचें आहे. आणि हिंदु–राज्याची मुसलमानांना भीति वाटते त्याचें प्रमुख कारण म्हणजे त्यामुळें हिंदूंना सर्व हिंदुस्थानभर आपलें आर्थिक वर्चस्व कायम राखतां येईल हें होय....मुसलमानांच्या खेड्यापाड्यांतून हिंदू दुकानदारांना आणि सावकारांना किरकोळ व्यापारांत जणुं मक्तेदारीच प्राप्त झालेली आहे. आणि पंजाब व सिंधमध्यें देखील शहरांतून व्यापारांत व उद्योगधंद्यांत हिंदूंचें प्राबल्य आहे. ही गोष्ट मुसलमानांच्या दृष्टीनें अगोदरच कितीतरी हानिकारक होती. पण औद्योगीकरणामुळें तर अगदीं कहरच झालेला आहे....वायव्येकडील मुसलमान प्रामुख्यानें शेतकरी आहेत. तेथील लोकसंख्या सर्व हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या १२·१ टक्के आहे; तथापि तेथील उद्योगधंद्यांचें प्रमाण ५·१ टक्के आणि खनिज–संपत्तीचें ५·४ टक्के आहे. बंगालप्रांत औद्योगिकदृष्ट्या अधिक पुढारलेला आहे. तेथील लोकसंख्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या २० टक्के आहे. गिरण्यांतील मजुरांच्या संख्येनुसार तेथील उद्योगधंदे हिंदी उद्योगधंद्यांच्या ३३ टक्के आहेत. परंतु तेथील औद्योगिक प्रदेश मात्र बहुसंख्य हिंदू असलेलें कलकत्ता व त्या शेजारचा भाग हा आहे. कलकत्त्याचा भाग सोडला तर ईशान्येकडील मुसलमान–भूमि वायव्येकडील मुसलमान–भूमीपेक्षां अधिकच कृषिप्रधान आहे. हिंदी उद्योगधंदे प्रामुख्यानें हिंदु–विभागांत आहेत; त्यांवर हिंदू भांडवलदारांची मालकी आहे. आणि त्यांमध्यें मुख्यतः हिंदू मजुरांच्याच पोटापाण्याची सोय होते....

पाकिस्तानला किमानपक्षीं स्वतःची अर्थव्यवस्था तरी ताब्यांत ठेवतां येईल; वायव्य–विभागांत उद्योगधंदे स्थापून त्यांचें संरक्षण करतां येईल. आपल्याकडील कापूस मुंबईच्या गिरण्यांना न धाडतां तेथेंच गिरण्या काढून आपल्या मालाला जकात बसवून संरक्षण देतां येईल. त्यानंतर भांडवल मिळाल्यास जलशक्तीचा उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं उपयोग करतां येईल. कराची बंदराची सुधारणा घडवून आणतां येईल, आणि वायव्य–हिंदुस्थानचें आयातीचें बंदर म्हणून पुढेंमागें कराची मुंबईलाहि मागें टाकील.'[१]

## २. विभक्तीकरणाच्या युक्तिवादाचें खंडन

वर दिलेल्या प्रत्येक मुद्द्याचा विचार करूं याः—

(१) भावना व पूर्वग्रह यांचीं पाळेंमुळें लोकांच्या मनांत फार खोलपर्यंत रुजल्यावर अशा महत्त्वाच्या गोष्टींचा शांतपणें आणि विकारवश न होतां विचार करणें ही गोष्ट असंभवनीय नव्हे, पण किती दुर्घट होऊन बनली आहे हें ध्यानांत घेतलें पाहिजे. सामान्यतः भित्रेपणा घालविण्यास अहंभावाचें औषध उपयोगी पडावयास पाहिजे. परंतु प्रो. कूपलंड यांचें पृथःकरण बरोबर मानल्यास तीं दोन्ही एकत्र नांदूं शकतात असें म्हणावें लागतें. परंतु हा भित्रेपणा आला तरी कोठून ? हिंदुस्थानची राजकीय सत्ता व अधिकारसूत्रें हातीं आल्यापासून येथें ब्रिटिश लोकच राज्यकारभार चालवीत आले आहेत. मुसलमानांचें श्रेष्ठत्व आणि त्यांची अनुकूल परिस्थिति जर गमावली असेल तर ती हिंदू वा अन्य मुसलमानेतर यांनीं सत्तेचा दुरुपयोग केल्यामुळें खास नव्हे. कारण मुसलमानांप्रमाणेंच त्यांचेहि सर्व सत्ताधिकार हिसकावून घेण्यांत आले होते. ब्रिटिश राजवटीच्या आरंभींच्या काळांत हिंदूंपेक्षां मुसलमानांनाच जास्त संशयित समजण्यांत येत होतें आणि प्रथमच्या कांहीं वर्षांत त्यांचेवर अन्याय व दडपशाही यांचें हत्यार चालविण्यांत आलें हें ऐतिहासिक सत्य आहे. परंतु जेव्हां ब्रिटिशांच्या सत्तेस आव्हान देण्याची हिंदू तयारी दर्शवूं लागले, तेव्हां हिंदूंचे लाड करण्याची वेळ जाऊन त्याऐवजीं मुसलमानांचे लाड करण्याची वेळ येऊन

१. आर. कूपलंड : हिंदुस्थानचें भवितव्य, पृ. ७५–७९.

ठेपली आहे असें ब्रिटिशांनीं ठरविलें, हेंहि नाकबूल करतां येणार नाहीं. याचा निःसंशय असा परिणाम झाला कीं, हिंदू व मुसलमान यांचेमध्यें परस्परांबद्दल अविश्वास निर्माण होऊन या तिसऱ्या पक्षाला मात्र अबाधितपणें कांहीं काल तरी आपल्या सत्तेचा उपभोग घेतां आला. या घटनांचा आणि परिस्थितीचा निःपक्षपातीपणें आणि विकारवश न होतां विचार करण्यांत आला असता, तर या तिसऱ्या पक्षाचीं कृत्यें आणि त्याचे उद्देश यांबद्दल संशय निर्माण झाला असता. परंतु दुर्दैवानें सत्यस्थितीचा विपर्यास करण्यांत आला. मुसलमान मागासलेले राहण्यांत कोठल्याहि तऱ्हेनें हिंदूंना जबाबदार धरतां येत नाहीं. ज्यांचे हातीं गेलीं दीडशें वर्षांहून अधिक कालपर्यंत सत्ता केंद्रित झालेली आहे त्या ब्रिटिश सरकारचाच हा दोष आहे. जी कांहीं सत्ता हिंदी लोकांचे हातीं देण्यांत आली, ती १९१९ व १९३५ च्या कायद्यांन्वयें देण्यांत आली आणि हे कायदे करण्याची जबाबदारीहि सर्वस्वीं ब्रिटिशांचीच आहे. १९३५ च्या कायद्याप्रमाणें जेथें मुसलमानांचें संख्याधिक्य आहे अशा प्रांतांत आणि जेथें ते अल्पसंख्य आहेत त्या आसाम प्रांतांतहि मुसलमानांच्याच हातीं सत्ता आहे. विशेषतः पंजाब व बंगाल या दोन सर्वांत मोठ्या प्रांतांत, आणि सिंधमध्येंहि, एप्रिल १९३७ मध्यें तो कायदा अमलांत आल्यापासून अविरतपणें मुसलमान सत्ताधीश आहेत. मध्यवर्ति सरकार ब्रिटिशांचेच हातीं कायम आहे. जेथें मुसलमान अल्पसंख्य आहेत अशा प्रांतांतहि बहुसंख्य हिंदूंना राज्यकारभार चालविण्याची संधी—मधील २७ महिन्यांचा काल सोडल्यास—केव्हांहि मिळालेली नाहीं. असें असतांना मुसलमान मागासलेले राहिले असल्यास त्याचा दोष हिंदूंकडे कसा जातो? मध्यवर्ति सरकारांत जाण्याची संधीहि हिंदूंना कधीं मिळालेली नाहीं. मुसलमानांच्या प्रगतीच्या मार्गांतील अडथळे दूर करण्यासाठीं पूर्व व वायव्य विभागांतील मुसलमान मंत्र्यांनीं तरी गेल्या आठ वर्षांत काय प्रयत्न केले? जर असें मानलें कीं, अल्पसंख्य हिंदूंच्या विरोधामुळें त्यांना कोठलीहि आमूलाग्र सुधारणा घडवून आणतां आली नाहीं—मात्र या विधानास कोठेंहि पुष्टीकारक पुरावा नाहीं—तर मग त्यांना खरोखर असें नाहीं का

विचारतां येणार, कीं जर हेच अल्पसंख्य लोक फाळणीनंतरहि तुमच्या स्वतंत्र राज्यांत राहणार असतील पर परिस्थिति कशी काय सुधारेल? अर्थात् या अल्पसंख्य हिंदूंचे राजकीय हक्क नष्ट करून व अन्य उपाय योजून त्यांना इतकें दडपून टाकण्यांत येईल, कीं बहुसंख्य मुसलमानांना सनदशीर विरोध करण्याचेंहि त्राण त्यांच्यांत राहणार नाहीं, असा तर उद्देश यांत नसेल ना? स्वतंत्र मुसलमानी राज्यांतून, विशेषतः पंजाब व बंगालमधून, कोठल्या तरी मार्गानें अल्पसंख्याकांना काढून लावावयाचा बेत असेल तर गोष्ट निराळी. पण तसा हेतु असल्याचें दिसत नाहीं. लीगच्या ठरावांतील विधानें मान्य केल्यास पाकिस्तानमध्येंहि अल्पसंख्य तसेच राहतील व 'अल्पसंख्याकांचा सल्ला घेऊन मुसलमानेतर–हिंदुस्थानांत मुसलमानांना ज्या प्रमाणांत हक्क असतील त्या प्रमाणांत धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, रा यकारभाराबाबत आणि इतर हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं पुरेशीं, परिणामकारक आणि अनुल्लंघनीय अशीं संरक्षणें' त्यांना घटनेप्रमाणें देणें क्रमप्राप्त होईल हें स्पष्ट आहे. मुसलमानांची संख्या सर्व पंजाबमध्यें ५७ टक्के, वायव्य–विभागांत सर्व पंजाबचा समावेश केल्यास ६२ टक्के व या विभागांतील मुसलमानेतर टापू वगळल्यास ७५ टक्के होणार असल्यानें हिंदूंची अल्पसंख्या क्षुल्लक समजतां येणार नाहीं, हें आपण पाहिलेंच आहे. तसेंच पूर्व विभागांतहि सबंध आसाम व बंगालचा समावेश झाल्यास मुसलमानांचें प्रमाण ५१ ते ५२ टक्के व मुसलमानेतर टापू वगळल्यास जास्तींत जास्त ६९ टक्के होईल. मुसलमानांचें प्रचंड संख्याधिक्य असेल तरच त्यांना 'मुसलमानी टापू' म्हणतां येईल ही व्याख्या मान्य केल्यास, या विभागांना मुसलमानी प्रांत कसें म्हणतां येईल तें समजत नाहीं. अर्थात् एका मोठ्या राज्यांतील अल्पसंख्य म्हणवून घेण्यापेक्षां दोन छोट्या राष्ट्रांत बहुसंख्य म्हणवून घेण्याचें समाधान त्यांना मिळेल हें खरें. परंतु यांत मुसलमानांनीं विचार करण्याजोगा मुद्दा आहे तो असा कीं, केवळ आपल्या अहंभावाचें समाधान करून घेण्यासाठीं त्यांनीं इतकी जबर किंमत देणें योग्य आहे कीं काय? जगांतील त्यांची पत वाढण्याची बाबसुद्धां तीं राज्यें किती प्रमाणांत खऱ्या अर्थानें

मुसलमानी आहेत यावर अवलंबून आहे. पूर्व व वायव्य विभागांतील राज्यांमध्यें जितक्या प्रमाणांत मुसलमानेतर असतील तितकें प्रमाण असलेलें मुसलमानांचें राज्य जगांत इतरत्र कोठेंहि नाहीं. येथील मुसलमानांनीं जगांतील इतर मुसलमानी राष्ट्रांशीं सहानुभूति बाळगण्यास कोणतीहि हरकत नसून याबाबत हिंदूंनीं त्यांना कधींहि आडकाठी केलेली नाहीं. मात्र हिंदूंची अशी अपेक्षा असणें साहजिक आहे, कीं हिंदुस्थानच्या कसोटीच्या वेळीं मुसलमानांनींहि सर्वतोपरी आपलें वजन खर्चे करण्यास सिद्ध असावें. मुसलमानेतरांनीं पंजाबमधील हिंदू, मुसलमान, शीख आदि सर्व हिंदी लोकांवरील अन्याय दूर करण्यासाठीं त्याग केला आणि हाल सोसले, तद्वतच मुसलमानांच्या जगांतील इतर भागांतल्या हक्कांचें रक्षण व्हावें येवढयासाठीं खिलाफत–चळवळीचे वेळींहि त्यांनीं त्याग केला आणि मुसलमानांच्या खांद्यास खांदा लावून एकजुटीनें व नेटानें लढा दिला. कोणत्याहि मुसलमानी राष्ट्राचें हिंदूंनीं कांहींहि नुकसान केलेलें नाहीं. परस्परांच्या फायद्यासाठीं मध्यपूर्वेच्या राष्ट्रांनीं जर एकाद्या तहनाम्यावर सही केली, तर हिंदुस्थानहि त्यांत आनंदानें भागीदार होईल. परंतु हें सर्व असलें तरी स्वतः दुर्बळ राहणारें आणि इतर हिंदुस्थानास दुर्बळ करणारें राज्य प्रस्थापित करण्याचा हट्ट धरून स्वतःचा अहंभाव पूर्ण करावयाचा, कीं बलिष्ठ आणि अखंड हिंदुस्थानच्या निर्मितीमुळें मिळणारे ऐतिहासिक घनिष्ट संबंध आणि तदनुषंगिक वर्तमान व भविष्यकालीन फायदे उपभोगावयाचे, याबाबत अखेरचा निर्णय घेण्याचा अधिकार सर्वस्वीं मुसलमानांचा आहे. मात्र जर त्यांनीं फाळणीच पसंत केली, तर ज्या प्रदेशांतून फाळणीची रेषा जाईल ती रेषा गेल्या आठ शतकांच्या इतिहासाचेहि त्याचबरोबर तुकडे करणार असल्यानें, अशा जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत आपलें मत व्यक्त करण्याच्या हक्कापासून तत्रस्थ मुसलमानेतरांनाहि वंचित करतां कामा नये.

फाळणीच्या योजना आणि त्याच्या जनकांचीं–दूरचीं कां होईनात–प्रकट साध्यें काय आहेत, तें समजल्यावर त्या प्रदेशांतील आणि बाहेरीलहि मुसलमानेतर जनता तिकडे इतक्या साशंक नजरेनें कां बघते हें अगदीं सहज

समजण्याजोगें आहे. द्विखंड हिंदुस्थानचा आवाज परराष्ट्रीय बैठकींत अखंड हिंदुस्थानच्या आवाजापेक्षां फारच दुबळा ठरेल हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. व्यापारी सवलतींबाबत, औद्योगिक संवर्धनाबाबत आणि इतर शेंकडों गोष्टींबाबत इतर देशांपासून पूर्वीसारख्या अनुकूल अटी मिळविणें त्यांना शक्य होणार नाहीं. हिंदु-हिंदुस्थानपेक्षां छोट्या मुसलमानी राज्याची स्थिति याबाबत जास्तच अनुकंपनीय होईल. परंतु हिंदुस्थानचीसुद्धां फाळणीमुळें खूपच हानि होणार आहे. पण याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट आहे ती ही कीं, पाकिस्तानच्या प्रचारकांनीं जाहीर केलेल्या उद्दिष्टांमुळें एक सत्य भीति निर्माण झालेली आहे. फाळणीच्या मागोमाग मुसलमानी सुलतानशाहीचा उदय होण्याची भीति अगदींच निराधार नाहीं, हें खालीं दिलेल्या माझ्या उताऱ्यावरून दिसून येईल. जनाब एफ्. के. खान दुराणी यांनीं आपल्या 'पाकिस्तानचा अर्थ' या पुस्तकास परवां परवां म्हणजे नोव्हेंबर १९४३मध्यें लिहिलेल्या प्रस्तावनेंत खालील उतारा आढळून येतो:

"आमच्या पूर्वजांनीं आपल्या रक्ताची किंमत ज्यासाठीं दिली नाहीं अशी एक इंचभरहि भूमि हिंदुस्थानांत नाहीं. आमच्या पूर्वजांनीं सांडलेल्या रक्ताशीं आम्हीं बेइमान होऊन चालणार नाहीं. म्हणून सर्वच्या सर्व हिंदुस्थान हाच आमचा वारसा असल्यामुळें इस्लामसाठीं तो आपण पुनः पादाक्रान्त केलाच पाहिजे. आपल्या प्रभावाचें क्षेत्र वाढविणें हें आमच्या धर्माचें मर्म आहे. त्यांत हिंदूसंबंधीं द्वेषभावना वा शत्रुत्व अभिप्रेत नाहीं. आत्मिकदृष्ट्या व राजकीयदृष्ट्याहि इस्लामच्या निशाणाखालीं हिंदुस्थानचें एकीकरण करणें हें आमचें अंतिम साध्य असलें पाहिजे; त्याखेरीज हिंदुस्थानचें राजकीयदृष्ट्या पूर्ण विमोचन होणें शक्य नाहीं."[1] 'पंजाबी' म्हणतात, "आमच्या प्रदेशांची हिंदु-हिंदुस्थानपासून फाळणी करणें हें आमचें साध्य नसून आदर्श इस्लामी राज्य स्थापण्याचें तें एक साधन आहे, हें स्पष्ट करणें आवश्यक आहे. सूचित फाळणीमुळें हिंदूंच्या आर्थिक गुलामगिरींतून आमची सुटका

१. एफ्. के. खान दुराणी : पाकिस्तानचा अर्थ, प्रस्तावनेचें पृ. १०.

होईल यांत शंका नाहीं. पण आदर्श इस्लामी राज्य प्रस्थापित करणें हें आमचें ध्येय असल्याकारणानें तत्पूर्वी संपूर्ण स्वातंत्र्य हस्तगत करणें क्रमप्राप्त ठरतें. म्हणून आम्हांला इस्लामी तत्त्वानुसार जागतिक क्रांतीची घोषणा करावी लागेल आणि अखेरीस तशी क्रान्ति घडवून आणणें हें आमचें ध्येय राहील. विभक्तीकरण, हिंदूंच्या आर्थिक आणि ब्रिटिशांच्या घटनात्मक गुलामगिरींतून मुक्तता ही आमच्या जागतिक इस्लामी क्रांतीचीं कांहीं साधनें होत."[१]

'जगाच्या इतर भागांत भिन्नधर्मीयांबरोबर भूतकालांत अगदीं सलोख्यानें अल्पसंख्य मुसलमानांनीं काळ कंठलेला आहे. परंतु जेव्हां जेव्हां संख्या आणि शक्ति यांचे जोरावर एकादें बलवान् मुसलमानी राष्ट्र म्हणून राहतां येईल असें त्यांना वाटलें, तेव्हां तेव्हां ती भूमिका त्यांनीं तत्काल टाकून दिलेली आहे... हिंदुस्थानांतील स्वतंत्र मुसलमानी राज्याच्या या चळवळीमुळें आतांपर्यंत अल्पसंख्य म्हणून राहिलेल्या चीन व रशिया येथील मुसलमानांच्या तत्सदृश चळवळींनाहि जोराची चालना मिळेल.

'मध्य आशियाच्या आठ कोटी लोकांपैकीं जवळजवळ ९५ टक्के मुसलमान असले, तरीदेखील सध्यां ते चीन व रशियाच्या गुलामगिरीखालीं दडपले गेले आहेत.

'मुसलमानांचा राजकीय प्रश्न सर्व ठिकाणीं परस्पर–संबद्ध आहे. अर्थात् एका राष्ट्राच्या मुक्तीचा दुसऱ्यावर साहजिकच परिणाम होणार. हिंदुस्थानांतील मुसलमानांचें काय होतें, याचा जगाच्या इतर भागांतील व विशेषतः जेथें मुसलमान बहुसंख्य आहेत अशा चीनच्या पश्चिमेकडील प्रांतांतील व रशियाच्या पूर्व व दक्षिण विभागांतील मुसलमानांवर प्रत्यक्ष परिणाम होईल. हिंदुस्थानसारख्या या खंडप्राय देशांत अल्पसंख्य म्हणून रहावयाचें ठरलें, तर त्यामुळें हिंदुस्थानांतील ९ कोटी मुसलमानांच्या नशिबाची विल्हेवाट लागेलच. शिवाय रशियांतील ३ कोटी व चीनमधील ५ कोटी मुसलमानहि कायमचे गुलाम बनतील.

---

१. पंजाबी : हिंदी संघ–राज्य, पृ. २६९–७०.

'राष्ट्रसभेच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीयत्वाच्या पायावर जर हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालें, तर या तीनहि देशांत मुसलमानांनीं गुलामच रहावें यासाठीं चीन व रशियाशीं राष्ट्रसभा करारनामे करील असें मुसलमानांनीं मानल्यास तें अगदीं साहजिक आहे. मध्य आशियामध्यें स्वतंत्र मुसलमानी राज्य प्रस्थापित झाल्यास राष्ट्रसभा भावी काळांत त्याकडे साशंक नजरेनेंच पाहणार; कारण त्याच्या अस्तित्वामुळें हिंदुस्थानांतील मुसलमानांमध्येंहि फाळणीच्या चळवळीला जोर आल्यावांचून राहणार नाहीं.'[1]

'केमाल अतातुर्क यानें आपल्या आयुष्यांत सय्यद जलील अहमद सिन्यूसी यांच्या आशीर्वादानें जगांतील सर्व मुसलमानी राष्ट्रांचें एकीकरण करण्याची जी चळवळ ( सिलसिला–ई–जमीया–वहदद–उमाम–इस्लाम ) तिचाच एक भाग म्हणजे हिंदुस्थानांतील मुसलमानांनीं आपलें स्वतंत्र राज्य प्रस्थापित करण्याची केलेली मागणी होय. जीं मुसलमानी राज्यें सध्यां विद्यमान आहेत त्यांच्या जोडीला मुसलमान बहुसंख्य असलेल्या प्रदेशांतहि मुसलमानी राज्य प्रस्थापित करणें हा त्यांतील एक उद्देश आहे. संकल्पित केलेल्या दहा नवीन मुसलमानी प्रजासत्ताक राज्यांमध्यें मुसलमानी बंगाल, मुसलमानी वायव्य-विभाग व हैदराबाद संस्थान यांचा समावेश होतो.'[2]

हिंदुस्थानांत मुसलमानी राज्य प्रस्थापित करणें, मध्य आशियांत चीन व रशिया यांचें जूं झुगारून देणें व अखेरीस इस्लामी तत्त्वावर जागतिक क्रांति घडवून आणणें, हे मुसलमानांचे जाहीर हेतू असल्यानें पुढें घडणाऱ्या गोष्टींची, हिंदुस्थानच्या फाळणीची सूचना ही त्यांच्या अंतिम उद्दिष्टांचें केवळ सूतोवाच आहे, अशी जर मुसलमानेतरांची समजूत झाली तर त्यांना दोष देतां येणार नाहीं. हिंदू, चिनी, रशियन यांना मुसलमानांना दडपून टाकण्याव्यतिरिक्त दुसरा व्यवसायच नाहीं अशी स्वतःची निराधार समजूत करून घेतल्यामुळें जें संशयाचें व अविश्वासाचें वातावरण निर्माण झालें आहे, त्यांतून इस्लामी जागतिक क्रांतीची कल्पना उद्भवलेली आहे. असें असलें तरी इस्लामी जागतिक

---

१. एम्. आर. टी. : हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेचा प्रश्न, पृ. ६०–६७.

२. अन्सारी : पाकिस्तान–हिंदुस्थानपुढील प्रश्न, पृ. ४७.

क्रांतीची कल्पना करणाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षेचें कौतुक करण्यास हरकत नाहीं ! तथापि, त्यामुळें हिंदुस्थान इतकेंच नव्हे, तर सर्व जगहि पादाक्रांत करण्याची उमेद बाळगणाऱ्या या जबरदस्त मुसलमान–अल्पसंख्याकांचा हिंदू–बहुसंख्य छळ करतील हा बागुलबोवा मात्र व्यर्थ ठरतो.

(२) हिंदुस्थानच्या बाहेर दोन नवीन मुसलमानी राज्यें निर्माण केल्यानें हिंदुस्थानांतील व नवीन प्रस्थापित होणाऱ्या राज्यांतील अल्पसंख्याकांचा प्रश्न कसा सुटेल हें समजणें कठिण आहे. संपूर्णतया एकजिनसी समाज असलेलें राष्ट्र आज जगाच्या पाठीवर कोठेंहि नाहीं. प्रत्येक राष्ट्रांत अल्पसंख्य साहजिकच असणार आणि हिंदुस्थान काय किंवा फाळणी झाल्यावर बनतील तीं दोन्ही राष्ट्रें काय, या नियमास अपवाद होऊं शकत नाहींत. मुसलमानी व मुसलमानेतर प्रदेशांतून अल्पसंख्याकांची अदलाबदल करण्याचा मार्ग आर्थिक वा मानवतेच्या भूमिकेवरून अव्यहार्य अतएव त्याज्य ठरविण्यांत आला असून तें अगदीं योग्य आहे. मुसलमानी राज्यांत अल्पसंख्याकांचें प्रमाण काय राहील तें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां संख्या हें गमक धरल्यास हिंदु व मुसलमान विभागांत पुष्कळच अल्पसंख्य राहतील हें स्पष्ट आहे. मुसलमानेतर प्रदेशांतील मुसलमानांच्या १३·२२ टक्के वा १०·७५ टक्के या प्रमाणापेक्षां मुसलमानेतरांचें वायव्य प्रदेशांतील २५ वा ३८ टक्के आणि पूर्व प्रदेशांतील ३१ वा ४८ टक्के हें प्रमाण पुष्कळच अधिक राहणार. म्हणून मुसलमानेतर प्रदेशांतील अल्पसंख्य मुसलमान हिमालयापासून केप कामोरीनपर्यंत आणि पंजाबपासून बंगालपर्यंत विखुरलेले राहिल्यानें त्यांचा प्रभाव कोठल्याहि विशिष्ट टापूंत राहणार नाहीं. उलट, अल्पसंख्य मुसलमानेतर दोन छोट्या विभागांत केंद्रित झाल्यानें स्वतःचे हक्क बजावण्याबाबत ते अधिक प्रभावी ठरतील. खूप मोठ्या प्रमाणावर जर अल्पसंख्याकांची अदलाबदल करण्यांत आली, तरच अल्पसंख्याकांच्या प्रश्नाचें निराकरण करणें शक्य होईल. ही अदलाबदल खुषीनें तरी होईल किंवा सक्तीनें तरी होईल. कोट्यवधि मुसलमान व मुसलमानेतर स्वखुषीनें परप्रांतांत जातील अशी कल्पनाच करवत नाहीं. बाल्कन राष्ट्रांतील यासंबंधींचा अनुभव फारच निराशाजनक

आहे. याचें अगदीं साधें कारण असें आहे कीं, आपलें जुनें वातावरण सोडण्यास लोक आपण होऊन तयार होत नाहींत. आणि हिंदुस्थानांत तर हिंदू व मुसलमान या दोघांनाहि आपल्या भूमीबद्दल इतकें जबरदस्त आकर्षण आहे, कीं केवळ दुसऱ्या राज्याचा नागरिक होण्यासाठीं कोणीहि आपल्या जागा सोडण्यास तयार होणार नाहीं असें निःशंकपणें म्हणतां येईल. तसेंच खिलाफत—चळवळींचे वेळीं हिजरात (देशत्याग) चा जो अनुभव आला तोहि फारसा उत्साहजनक नाहीं. आणि प्रादेशिक अंतर, वातावरणांतील, भाषेंतील,

## मुसलमानेतर प्रांत

(अ) मुसलमानी विभागांत पंजाब, बंगाल व आसाम या सर्व प्रांतांचा समावेश केला तर होणारी परिस्थितिः

### कोष्टक ४७.

| प्रांत | ए. लोकसंख्या ( लाख ) | मुसलमान ( लाख ) | मुसलमानांचें ए. लोकसंख्येशीं शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| मद्रास | ४९३·४२ | ३८·९६ | ७·९० |
| मुंबई | २०८·५० | १९·२० | ९·२१ |
| संयुक्त प्रांत | ५५०·२१ | ८४·१६ | १५·३० |
| बिहार | ३६३·४० | ४७·१६ | १२·९८ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | १६८·१४ | ७·८४ | ४·६६ |
| ओरिसा | ८७·२९ | १·४६ | १·६८ |
| अजमीर—मेरवाडा | ५·८४ | ०·९० | १५·४० |
| अंदमान ते निकोबार | ०·३४ | ०·०८ | २३·७० |
| कूर्ग | १·६९ | ०·१४ | ८·७८ |
| दिल्ली | ९·१८ | ३·०५ | ३३·२२ |
| एकूण | १,८८८·०१ | २०२·९५ | १०·७५ |

## कोष्टक ४८.

(ब) मुसलमानी विभागांतून पंजाब, बंगाल व आसाममधील मुसलमानेतर जिल्हे वगळले तर होणारी स्थितिः

| प्रांत | ए. लोकसंख्या (लाख) | मुसलमान (लाख) | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| बंगाल | १९३·४२ | ४२·९५ | २२·२१ |
| आसाम | ७०·८९ | १५·५० | २१·८९ |
| पंजाब | ११५·४९ | ३८·५४ | ३३·३७ |
| एकूण | ३७९·८० | ९६·९९ | २५·२७ |
| इतर मुसलमानेतर प्रांत | १,८८८·०१ | २०२·९५ | १०·७५ |
| एकूण बेरीज | २,२६७·८१ | २९९·९४ | १३·२२ |

हवामानांतील आणि जेथें जाऊन रहावयाचें तेथील जनतेच्या चालीरीतींमधील फरक इतका मोटा असणार कीं देशांतर करणारे लोक निरुत्साही बनतील. येवढेंच नव्हे, तर अशा धाडसाची कल्पनाहि त्यांना सोडून द्यावी लागेल; शिवाय जेथें त्यांचें पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्य आहे अशा ठिकाणाहून कोट्यवधि लोकांना उचलून अगदीं भिन्न वातावरणांत वसविण्याचा खर्च इतका होईल कीं लोकांना जरी नुकसान भरपाई दिली, तरी तो खर्च सोसण्याची ताकद हिंदू वा मुसलमान, कोणत्याहि राष्ट्राला राहणार नाहीं. या योजनेमुळें लोकांचे अनन्वित हाल होतील. आर्थिक वा राज्यकारभाराच्या दृष्टीनेंहि ती यशस्वी होणें अगदीं अशक्य दिसतें. जर सक्तीचा उपयोग करण्यांत आला तर या अडचणी शंभरपट वाढतील आणि त्यांत सैन्य व पोलीस यांचे पहाऱ्यांत लोकांना हलवावें लागल्यामुळें निर्माण होणाऱ्या अडचणींची भर पडेल. ग्रीस आणि तुर्कस्तान येथील कांहीं लाख लोकांच्या अदलाबदलीचें उदाहरण जे देतात त्यांच्या ही गोष्ट लक्षांत येत नाहीं कीं हिंदुस्थानांतील प्रश्न हा कांहीं लाखांचा नसून ६ कोटी ८० लाख, निदान ५ कोटी तरी लोकांचा आहे. तसेंच येथल्या प्रांताप्रांतांतील अंतरहि अतिशय

# मुसलमानी प्रांत

## कोष्टक ४९.

| प्रांत | मुसलमानेतर जिल्हे वगळल्यास | | | मुसलमानेतर जिल्ह्यांचा समावेश केल्यास | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ए. लोकसंख्या (लाखांत) | मुसलमान (लाखांत) | शेंकडा प्रमाण | ए. लोकसंख्या (लाखांत) | मुसलमान (लाखांत) | शकडा प्रमाण |
| बंगाल | ४०९·६५ | २८७·१० | ७०·०८ | ६०३·०६ | ३३०·०५ | ५०·७३ |
| आसाम | ३१·१६ | १८·९२ | ६०·७१ | १०२·०५ | ३४·४२ | ३३·७३ |
| पंजाब | १६८·७० | १२३·६३ | ७३·२५ | २८४·१९ | १६२·१७ | ५७·०७ |
| वायव्य—सरहद्द | ३०·३८ | २७·८९ | ९१·७९ | ३०·३८ | २७·८९ | ९१·७९ |
| सिंध | ४५·३५ | ३२·०८ | ७०·७५ | ४५·३५ | ३२·०८ | ७०·७५ |
| बलुचिस्तान | ५·०२ | ४·३९ | ८७·५० | ५·०२ | ४·३९ | ८७·५० |
| एकूण | ६९०·२६ | ४९४·०१ | ७१·५६ | १,०७०·०५ | ५९१·०० | ५५·२३ |

मोठें आहे, आणि त्यासाठीं इतका खर्च येईल कीं जरी तो या राज्यांनीं सोसला तरी दीर्घकालपर्यंत त्यांना क्षीणावस्था प्राप्त होईल.

लीगच्या ठरावांत असें सूचित केलें आहे कीं, 'अल्पसंख्याकांचा सल्ला घेऊन धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, राज्यकारभाराबाबत, आणि इतर हक्क व हितसंबंध यांचें रक्षण करण्यासाठीं पुरेशीं, परिणामकारक आणि अनुल्लंघनीय संरक्षणें मिळतील.' मुसलमान व मुसलमानेतर स्वतंत्र राज्यें होणार असल्यावर आणि त्यांची राज्यघटना ते स्वतःच ठरविणार असल्यानंतर ते अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यासाठीं त्यांना हक्क देतीलच हें कशावरून? समजा, अशीं राज्यें अस्तित्वांत येऊन तीं स्वतंत्र झाल्यावर आपल्या घटनेंत असे अधिकार देण्याचें त्यांनीं नाकारलें, तर त्यांना ते कसे पाळावयास लावणार? समजा, त्यांनीं सुरवातीला संरक्षणें दिलीं आणि नंतर अल्पसंख्याकांना फायदेशीर अशीं त्यांतील कलमें काढून टाकलीं किंवा सर्वच हक्क रद्द केले, तर त्यांच्यावर ते परत देण्याची सक्ती कशी करणार? राज्यघटनेमध्यें संरक्षणें अंतर्भूत करण्यांत आलीं, परंतु त्यांची अंमलबजावणी करण्याची टाळटाळ होऊं लागली किंवा अपुरी अंमलबजावणी होऊं लागली, तर त्याबाबत एका स्वतंत्र राज्यावर दुसऱ्या स्वतंत्र राज्याला उपाय योजणें कसें शक्य होईल? अर्थात् आपण हें गृहीत धरून चाललों आहोंत कीं, हीं राज्यें स्वतंत्र असतील आणि त्यांचा एकमेकांवर अधिकार चालणार नाहीं. तसेंच घटना योग्य प्रकारें अमलांत आणली जात आहे कीं नाहीं, हें पाहण्याकरितां या दोन्ही राज्यांवर देखरेख ठेवणारें एकादें मध्यवर्ति सरकार नसेल असेंहि आपण गृहीत धरून चाललों आहोंत. संरक्षणें अनुल्लंघनीय व घटनासमाविष्ट असावींत असें शाब्दिक आश्वासन देऊन उपयोगी नाहीं. कारण त्यांची अंमलबजावणी करवून घेणारी कोणतीहि सत्ता अस्तित्वांत नसणार व प्रत्येक राज्याला आपापले कायदे बदलून घेण्याचें स्वातंत्र्य राहणार. राष्ट्रसंघानें तहाचीं अल्पसंख्याकांबद्दलचीं कलमें अमलांत आणविण्याची हमी घेतली. पण ही हमी कृतींत आणविण्यासाठीं परकीयांची मदत मिळविणें मोठया मुष्किलीचें आहे असा अनुभव आला.

माणसें ओलीस ठेवण्याची प्रथा व्यवहारांत निरुपयोगी ठरते. आणि एकानें गाय मारली म्हणजे दुसऱ्यानें वांसरू मारावें हेंहि न्याय्य ठरत नाहीं. 'शठं प्रति शाठ्यम्' हा न्यायसुद्धां एकाचें पाप दुसऱ्यानें फेडावें वा दुसऱ्याच्या चुकीसाठीं तिसऱ्यास ठोसा मारावा असें सांगत नाहीं. कोठल्याहि मानवी व नैतिक तत्त्वांमध्यें केवळ दोन्ही गटांचा धर्म एकच आहे म्हणून एका गटानें कांहीं कृत्यें केलीं किंवा केलीं नाहींत याबद्दल दुसऱ्या गटांतील लोकांचा छळ करावा हें बसत नाहीं. 'ओलीसचें तत्त्व व्यवहार्य नाहीं आणि जर तें तत्त्व व्यवहारांत आणलें तर त्यामुळें राजकारणाचा सांस्कृतिक आधार नष्ट होऊन त्याला रानटीपणा प्राप्त होईल'[१] असें एका प्रमुख मुसलमानानें म्हटलें आहे आणि तें योग्यच आहे.

पाकिस्तानचे प्रचारक कांहींहि म्हणोत; मुसलमान आणि हिंदू यांमधील सत्प्रवृत्त लोक पुन्हां या रानटीपणाकडे जाण्यास तयार होतील यावर माझा विश्वास बसत नाहीं.

एका संयुक्त राज्याचे घटक म्हणून नांदत असतां एका घटकांतील प्रजाजनांना दुसऱ्या घटकाकडून चांगली वागणूक मिळविणें सोपें असतें. परंतु हे घटक स्वतंत्र राज्यें म्हणून राहूं लागल्यास ही गोष्ट दुरापास्त होईल. प्रजाजनांना मिळणाऱ्या वागणुकीसंबंधीं कांहीं आणीबाणीची परिस्थिति उपस्थित झाल्यास वकीलातीमार्फत बोलणीं करण्याचा एकमेव सनदशीर मार्ग स्वतंत्र राज्यांना उपलब्ध असतो. तो खुंटला कीं युद्धावांचून गत्यंतर रहात नाहीं; मग तें युद्ध आर्थिक स्वरूपाचें असो वा शस्त्रास्त्रांचें असो. दुसरा मार्गच नाहीं अशी परिस्थिति निर्माण झाल्याखेरीज, गंभीर कारणासाठीं देखील युद्ध पुकारणें ही सोपी गोष्ट नव्हे. बारिकसारीक खुसपटाप्रीत्यर्थ युद्ध पुकारणें तर अशक्यच असतें.

राष्ट्रावर जबरदस्त आघात झाल्याखेरीज तें युद्धाच्या खाईत उडी घेण्यास तयार होणार नाहीं; आणि युद्ध करावें कीं न करावें याचा निर्णय घेण्याची

---

१. सर सुलतान अहमद : हिंदुस्थान व ब्रिटन यांमधील तह, पृ. ८४.

वेळ येईल, तेव्हां तेथील जनमताचा कौल देशामध्यें दूर अंतरावर व एका कोपऱ्यांत असलेल्या आपल्या स्वधर्मीयांच्या हितापेक्षां स्वहिताकडेच अनिवार्यपणें झुकण्याचा संभव आहे.

ही केवळ तात्त्विक चर्चा आहे असें नव्हे. हिंदुस्थानच्या शेजारीं मुसलमान राष्ट्रें सध्यांच अस्तित्वांत आहेत आणि हिंदी मुसलमानांना वाईट तऱ्हेनें वागविलें म्हणून ती हिंदुस्थानशीं लढावयास सिद्ध झाल्याचें सबंध इतिहासांत कोठेंहि उदाहरण नाहीं. ब्रिटिश सरकारच्या येवढ्या दीर्घ आमदानींत किंवा कॉंग्रेस–सरकारांच्या २७ महिन्यांच्या कारकीर्दींत मुसलमानांवर तथाकथित अन्याय होत असतांना या मुसलमानी राज्यांत यत्किंचितहि प्रक्षोभ उत्पन्न झाल्याचें दिसून आलेलें नाहीं. किंबहुना, पंजाब, बंगाल व सिंधच्या लीगपक्षीय मंत्रिमंडळानेंहि कधीं एक शब्दहि उच्चारला नाहीं. दोन नवीन मुसलमानी राज्यें प्रस्थापित केल्यानें मुसलमानी वा मुसलमानेतर अल्पसंख्याकांना अगदीं न्याय्य वागणूक मिळण्याची खात्री वाटण्याइतकी परिस्थिति पालटून जाईल अशी कल्पना करणें हें निव्वळ भ्रमाचें द्योतक आहे. कोणत्याहि सुसंस्कृत अशा मानवसमाजाच्या–मग तो समाज कोठल्याहि धर्माच्या असो–वर्तणुकीचें नियंत्रण करणाऱ्या मूलभूत मानवी प्रवृत्ती व सनातन नैतिक तत्त्वें यांवरच अल्पसंख्याकांना सदैव अवलंबून रहावें लागणार. मुसलमानेतरांना मुसलमानांचा छळ व जुलूम करण्याखेरीज दुसरा धंदाच नाहीं असें अट्टाहासानें म्हणावयाचें, आणि त्याच वेळीं मुसलमान दुसऱ्या कोणावरहि कसलाहि अन्याय करणें असंभवनीय आहे असें मुसलमानेतरांनीं मात्र मानलेंच पाहिजे असाहि हट्ट धरावयाचा, ही सर्व अर्थशून्य बडबड आहे. मुसलमानांचा इतरांवर विश्वास नसणें शक्य नाहीं व ते कोणत्याहि प्रकारच्या मध्यवर्ति–सत्तेच्या अंकित राहूं इच्छीत नाहींत, मग त्या मध्यवर्ति सरकारची सत्ता कितीहि सौम्य व मर्यादित केलेली असो, असें ते सांगतात. पण हें सांगत असतांनाच ते असेंहि विधान करतात कीं आम्ही इतरांना अगदीं औचित्यानें वागवूं, हें आश्वासन तुम्हीं मान्य केलें पाहिजे. या विधानामध्यें साळसूद स्वार्थाची वृत्ति दिसून येते. विश्वासानें

विश्वास वाढतो तसा अविश्वासानें अविश्वासहि वाढतो. आणि जर तुम्ही प्रत्येक वेळीं पावलागणिक मुसलमानेतरांच्या चांगुलपणाचा संशय घेणार असाल, तर तेहि तसे वागणार नाहींत अशी तुम्हीं अपेक्षा करणें चूक होईल. स्वतंत्र राज्यें प्रस्थापून अल्पसंख्याकांचा प्रश्न सुटणार तर नाहींच, पण जास्त कठिण मात्र होऊन बसेल. त्यामुळें मुसलमान किंवा मुसलमानेतर जे अल्पसंख्य राहतील ते अधिक पोरके आणि स्वतःच्या अधिकार–रक्षणासाठीं दुसऱ्याची मदत मिळविण्याच्या बाबतींत अधिक अपात्र होतील.

(३) व (४) हिंदुस्थानच्या पूर्व वा वायव्य हद्दीवरील संरक्षणाचा प्रश्न पाकिस्तानमुळें सुलभतेनें सुटणार नाहीं. वायव्य सरहद्दीपलीकडील लोक व टोळ्या मुसलमान आहेत, आणि एकदां त्या विभागांत मुसलमानी राज्य प्रस्थापित झालें म्हणजे त्या विभागांतील मुसलमानेतरांविषयीं त्यांचें जें धार्मिक व राजकीय वैमनस्य आहे तें नष्ट होईल असें सांगण्यांत येतें. या आशावादाला इतिहासांत कांहींहि आधार सांपडत नाहीं. मुसलमानांचें हिंदुस्थानांत राज्य असण्याची ही पहिली वेळ नव्हे. कुतुबुद्दीन ऐबक हा स्वतः दिल्लीच्या तख्तावर बसल्यापासून तों हिंदुस्थानच्या वायव्येकडील कोपऱ्यांत शीखांनीं आपलें राज्य प्रस्थापित करीपर्यंत एकादें तरी मुसलमानी राज्य हिंदुस्थानांत होतेंच. या ६०० वर्षांहून अधिकच्या प्रदीर्घ कालांत त्या कोपऱ्यांतून ज्या स्वाऱ्या हिंदुस्थानवर झाल्या त्या मुसलमानांनींच मुसलमानी राज्यांवर केलेल्या होत्या. कारण त्या काळांत हिंदूंचें राज्यच तेथें नव्हतें. अल्लाउद्दीन खिलजीच्या कालापासून दिल्लीचा जो मुसलमान बादशाह असेल त्याला त्या कोपऱ्यांतून येणाऱ्या हल्ल्यांना तोंड द्यावें लागलें. अल्लाउद्दीनला आपल्या हद्दीच्या संरक्षणासाठीं तेथील मोक्याच्या जागा तटबंद कराव्या लागल्या होत्या. तरीसुद्धां मुसलमानांच्या स्वाऱ्या होतच राहिल्या आणि मुसलमानांच्या आमदानीमध्यें हेंच धोरण कायम राहिलें. कांहीं सुप्रसिद्ध स्वाऱ्यांचा निर्देश करावयाचा झाल्यास असें सांगतां येईल कीं तैमूरलंग, बाबर, नादिरशहा, अहमदशहा अबदाली या सर्वांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानांतील मुसलमान

राज्यांविरुद्धच होत्या. तेव्हां वायव्य विभागांत एकदां मुसलमानी राज्य प्रस्थापित झालें म्हणजे मुसलमानांच्या स्वारीची भीति राहणार नाहीं हें जें सोयीस्कर विधान करण्यांत येत असतें, त्याला इतिहासांत कोठेंहि पुष्टी मिळत नाहीं. केवळ हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यांवरच बाहेरच्या मुसलमानांनीं चढाया केल्या असेंहि नव्हे. त्यांचे आपआपसांतहि सत्ता, राज्य, सिंहासन इत्यादि गोष्टींसाठीं झगडे झालेले आहेत. इस्लामी धर्माचा स्वीकार केल्याबरोबर वंशभेद वा राष्ट्रभेद विसरले गेले पाहिजेत अशी इस्लमची शिकवण असूनहि, स्वधर्मीयांतील युद्धें टाळण्याचे बाबत तो खिश्चन धर्माप्रमाणेंच अयशस्वी ठरला आहे. याचें उदाहरण शोधण्यास फार दूर जावयास नको. कारण पहिल्या महायुद्धांत अरबांनीं तुर्की लोकांविरुद्ध लढण्यास कमी केलें नाहीं हें सर्वश्रुत आहे. तुर्कस्तानच्या सुलतानाचे खिलाफतीचे अधिकार कायम रहावेत म्हणून हिंदुस्थानांतील मुसलमान जेव्हां आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते, तेव्हां अरब लोक त्याच सुलतानाविरुद्ध बंड पुकारून उभे होते ! युरोपीय सत्तांनीं तेथल्याच मुसलमानांच्या सहाय्यानें केलेल्या कारस्थानांमुळें 'आधुनिक इराणचा जनक' या नांवानें आपल्या कर्तृत्वानें ओळखला जाणारा रेझा शाह पेहलवी याला आपल्या वृद्धापकालांत गादी सोडून देऊन हद्दपारींत दिवस कंठावे लागत आहेत. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या कालांत अफगाणिस्तानांत निदान दोन तरी राज्यक्रांत्या झाल्या : अमानुल्लाचे जागीं बच्चा–इ–साकू आला आणि बच्चा–इ साकूची जागा नादिरशहानें घेतली. आणि हे सर्वजण मुसलमानच होते ! आजसुद्धां इराण, तुर्कस्तान आणि अफगाणिस्तान यांना वगळून सर्व अरब–राष्ट्रांना एकत्रित आणण्याचे प्रयत्न चालूच आहेत. याप्रमाणें भिन्न वंशांचे आणि भिन्न देशांचे तर काय, परंतु एकाच राष्ट्रांतील मुसलमानहि एक होऊं शकत नाहींत. आणि युद्ध व रक्तपात टाळून राहण्याची मुसलमानांसुद्धां जगांतील सर्व राष्ट्रांना बुद्धि व्हावी अशी आशा करण्यांत येत असली, तरी मुसलमान एकमेकांत युद्ध करणारच नाहींत असें समजण्यांत अर्थ नाहीं.

ही झाली वायव्येकडून मुसलमानांच्या चढाईबद्दलची गोष्ट. पूर्व विभागाबाबत तर हीहि सबब सांगतां येणार नाहीं. इतःपर वायव्य विभागापेक्षां पूर्व-विभागांत स्वारीचें संकट कमी आहे असेंहि नाहीं. पूर्वेकडे मुसलमानी राष्ट्र निर्माण होण्याचा येवढाच परिणाम होईल कीं मुसलमानेतर–हिंदुस्थानला आपली एक नैसर्गिक तटबंदी गमावून बसावें लागेल. आणि तेथें प्रस्थापित होणाऱ्या मुसलमानी राज्याला सरहद्दीपलीकडे समानधर्मी राज्य असल्यामुळें जो फायदा मिळेल असें सांगण्यांत येतें, तो फायदाहि त्याला मिळणार नाहीं.

वायव्येच्या मुसलमानी विभागांबाबत फक्त हा युक्तिवाद लागू करतां येईल. मुसलमानांच्या संरक्षणासाठीं हा युक्तिवाद पुढें करण्यांत येतो हीच गोष्ट मुसलमानेतरांच्या संरक्षणाचा प्रश्न जास्त अधिक कठिण करण्यास पुरेशी आहे. मुसलमानांचें हिंदुस्थानांतील विद्यमान मुसलमानेतर–राज्यासंबंधींचें धार्मिक व राजकीय वैमनस्य जर इतकें तीव्र असेल, तर हिंदुस्थानच्या नैसर्गिक हद्दींत आणखी एक मुसलमानी राज्य निर्माण केल्यास व वायव्य सरहद्दीवर असलेली पर्वतांची नैसर्गिक तटबंदी गमावल्यामुळें आपल्या प्रदेशांचें संरक्षण कसेंबसें करण्याची पाळी हिंदुस्थानवर आल्यास हें वैमनस्य अधिकच पेट घेईल. पाकिस्तान–स्थापनेसाठीं हा युक्तिवाद पुढें करण्यांत येत आहे तो साधार असेल, तर पाकिस्तान स्थापनेनंतरचीं उद्दिष्टें जाहीर झाल्यामुळें या योजनेपाठीमागें हिंदुस्थानचें संरक्षण काढून घेण्याचा दुष्ट हेतु आहे, अशी शंका मुसलमानेतरांच्या मनांत उद्भवणें अगदीं साहजिक आहे. अशा परिस्थितींत कोणत्याहि स्वरूपांत पाकिस्तानला संमती देण्यास ते प्रवृत्त होणार नाहींत. 'खात्रीच्या सरहद्दीपेक्षां खात्रीच्या सैन्यावर विसंबणें अधिक श्रेयस्कर'[1] हा जो सिद्धांत डॉ. आंबेडकर यांनीं मांडला आहे त्यांतहि बरेंच तथ्य आहे.

'लढाईचीं नवनवीन हत्यारें आणि त्यामुळें बदललेलें डावपेचांचें तंत्र लक्षांत घेऊनच संरक्षणाचा प्रश्न हाताळला पाहिजे. तथापि जुन्या युद्धतंत्राच्या दृष्टीनें पाहिलें तरी देखील असा पुष्कळच समुद्रकिनारा उघडा राहील कीं ज्याचा

---

१. डॉ. आंबेडकरः पाकिस्तानवरील विचार, पृ. ९५.

बचाव वायव्य व पूर्व विभागांतील मुसलमानांना करावा लागेल. तद्व्यतिरिक्त हिंदुस्थानला बचाव करावा लागेल असा अवाढव्य किनारा शिल्लक राहील तो वेगळाच. यामुळें मुसलमानी व मुसलमानेतर राज्यांना उपलब्ध असणाऱ्या बचावाच्या साधनांचा प्रश्न तत्काल उभा राहतो. त्यांना हिंदुस्थानवर परदेशामधून स्वारी झाल्यास त्यास तोंड देण्याची व सद्यःकालीन हद्दींत प्रस्थापित होणाऱ्या मुसलमानी व मुसलमानेतर राज्यांमध्यें बखेडा माजल्यास त्यास तोंड देण्याचीहि तयारी करावी लागेल. फाळणीनंतर मुसलमानी व मुसलमानेतर राज्यांच्या साधनसंपत्तींत खूपच घट होऊन संरक्षक साधनांची आवश्यकता मात्र अतोनात वाढल्यामुळें आपल्या प्रजाजनांवर असह्य भार टाकल्यावांचून कोणत्याहि प्रकारचा परिणामकारक बचाव करणें त्यांच्या शक्तीबाहेरचें होईल. हें समजण्यास विशेष आंकडेमोडीची जरूर आहे असें नाहीं. अर्थव्यवस्था आणि औद्योगिक साधनसामग्री या बाबतच्या प्रकरणांत आपण मुसलमानी व मुसलमानेतर राज्यांची परिस्थिति काय राहील तें पाहिलेंच आहे. त्यावरून असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं कीं फाळणीमुळें दोन्ही राज्यें दुर्बल होणार असलीं तरी सुद्धां मुसलमानेतर राज्य मुसलमानी राज्याच्या मानानें निश्चितच प्रबल राहील. मुसलमानी राज्यांना आपल्या संरक्षणासाठीं पैसाहि राहणार नाहीं आणि द्रव्यहि राहणार नाहीं. कांहींहि झालें तरी "हिंदुस्थानचें संरक्षण विस्कळित, अनेकविध, आवांक्याबाहेरच्या खर्चाचें आणि निष्परिणामी होणार नाहीं इतक्या बारकाव्याचें होऊं नये, ही गोष्ट हिंदुस्थानच्या प्रत्येक नागरिकाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. हिंदुस्थानचें आंतरराष्ट्रीय व्यवहारांतील स्थान पक्कें झालें पाहिजे."[1]

प्रो. कूपलंड यांनीं या संरक्षणाच्या प्रश्नाचा एक दुसरा पैलू दाखवून दिला आहे; त्याचा पाकिस्तानच्या प्रवर्तकांनीं अधिक विचार करावयास पाहिजे. मुसलमानी व मुसलमानेतर राज्यें स्थापन झाल्यास त्यांना आपलें सैन्य, आरमार व विमानदल हीं निःसंशय उभारावीं लागतील. साहजिकच त्यांतील

---

१. सुलतान अहमद : पृ. ८७.

सैनिक त्या त्या राज्यांतीलच नागरिक असणार. याचा परिणाम सैन्याची बनावट बदलण्यांत निश्चितच होईल. डॉ. आंबेडकर यांनीं दाखवून दिलें आहे कीं, बंडाच्या किंचित् आधीं १८५६ मध्यें हिंदी पलटणींतून पूर्व हिंदुस्थान, संयुक्त प्रांत व बिहार यांमधील ९० टक्के लोक होते व वायव्य प्रदेशांतील लोकांचें प्रमाण दहा टक्क्यांहूनहि कमी होतें. १८५८ मध्यें म्हणजे बंडानंतर लगेच बदललेल्या धोरणामुळें हें प्रमाण पार बदलून गेलें; आणि वायव्य प्रांतांतून ४७ टक्के, नेपाळ, गढवाल व कुमाऊन यांमधून ६ टक्के आणि पूर्व हिंदुस्थान, बिहार व संयुक्तप्रांत येथून ४७ टक्के हें प्रमाण ठेवण्यांत आलें. १८७९ सालीं जातींमध्यें लढाऊ व बिनलढाऊ असा भेद मानण्याचें जें तत्त्व स्वीकारण्यांत आलें आणि जें तदनंतर लॉर्ड रॉबर्ट्स् यांनीं विचारार्ह ठरविलें, त्याला लॉर्ड किचनेर यांची मान्यता मिळून हिंदुस्थानी सैन्यामध्यें तदनुसार भरती होऊं लागली. परंतु हिंदुस्थानी फौजेंत वायव्येकडील लोकांचा जो भरणा झालेला आढळतो, त्याचा या तत्त्वाशीं कांहीं संबंध नाहीं. १८५७नंतर अवलंबिलेल्या धोरणाचा असा परिणाम झाला कीं १९३० च्या सुमारास वायव्य-प्रांतांतील सैनिकांचें प्रमाण ५८·५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत आलें आणि त्याचबरोबर ईशान्य विभाग, संयुक्त प्रांत व बिहार यांचें प्रमाण ११ टक्क्यांपर्यंत उतरून दक्षिण हिंदुस्थानांतील सैनिकांचें प्रमाण ५·५ टक्के व ब्रह्मदेशांतील सैनिकांचें प्रमाण ३ टक्के झालें.[1]

हिंदी सैन्यांतील जातवारीच्या प्रमाणांत फार मोठा बदल होत आलेला आहे ही गोष्ट डॉ. आंबेडकर यांच्या पुस्तकांतील पुढें दिलेल्या ५० व्या कोष्टकावरून निर्विवादपणें दिसून येतें.

त्या आंकड्यांवरून पंजाबी मुसलमान व पठाण यांची संख्या बेसुमार वाढलेली दिसते. शीखांचें पहिलें स्थान जाऊन त्यांना तिसरें व रजपुतांना चौथें स्थान मिळाल्याचें आणि संयुक्त प्रांतांतील मुसलमान, ब्राह्मण आणि तामीळी यांना तर वर्ज्यच केल्याचें दिसून येतें. १९३० मधील सैन्यांतील जातवारीच्या

---

१. डॉ. आंबेडकरः पाकिस्तानवरील विचार, पृ. ७०.

## कोष्टक ५०.

| प्रदेश व जाती | १९१४ तील शें. प्रमाण | १९१८ तील शें. प्रमाण | १९१९ तील शें. प्रमाण | १९३० तील शें. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| (अ) पंजाब आणि वायव्य–सरहद्द व काश्मीर | ४७·० | ४६·५ | ४६·० | ५८·५ |
| १ शीख | १९·२ | १७·४ | १५·४ | १३·५८ |
| २ पंजाबी मुसलमान | ११·१ | ११·३ | १२·४ | २२·६ |
| ३ पठाण | ६·२ | ५·४२ | ४·५४ | ६·३५ |
| (ब) नेपाळ, कुमाव व गढवाल | १५·० | १६·६ | १२·२ | १६·४ |
| गुरखे | १३·१ | १६·६ | १२·२ | १६·४ |
| (क) उत्तर हिंदुस्थान | २२·० | २२·७ | २५·५ | ११·० |
| १ संयुक्त प्रांतीय रजपूत | ६·४ | ६·८ | ७·७ | २·५५ |
| २ हिंदुस्थानी मुसलमान | ४·१ | ३·४२ | ४·४५ | ० |
| ३ ब्राह्मण | १·८ | १·८६ | २·५ | ० |
| (ड) दक्षिण हिंदुस्थान | १६·० | ११·९ | १२·० | ५·५ |
| १ मराठा | ४·९ | ३·८५ | ३·७ | ५·३३ |
| २ मद्रासी मुसलमान | ३·५ | २·७१ | २·१३ | ० |
| ३ तामीळी | २·५ | २·० | १·६७ | ० |
| (इ) ब्रह्मी | ० | दुर्लक्षणीय | १·७ | ३·० |

आंकड्यांचें पृथःकरण केल्यावर डॉ. आंबेडकर यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, सर्व पायदळांत मुसलमानांची संख्या गुरखे घेतल्यास ३० टक्के व ते वगळल्यास ३६ टक्के होते. आणि घोडदळांतील त्यांची संख्या ३० टक्के होती. दिल्लीभोंवतालच्या मुसलमानांची एक टक्का ही क्षुल्लक संख्या सोडल्यास पायदळांतील बाकी सर्व मुसलमान व घोडदळांतील १९ टक्क्यांपेक्षांहि जास्त इतके मुसलमान पंजाब व वायव्यसरहद्द या प्रांतांतील होते.[१] १९३० नंतरचे आंकडे मध्यवर्ति कायदेमंडळांतील सदस्यांनीं प्रश्न विचारूनहि सरकारनें दिले नाहींत. अर्थात् सर शिकंदर हयातखान यांनीं हिंदी संयुक्तराष्ट्राच्या योजनेची स्थूल आंखणी करतांना १९३७ सालीं हिंदी सैन्याचें जें जातवार प्रमाण होतें तें बदलण्यांत येऊं नये आणि मुसलमानांचें प्रमाण कमी केलेंच तर तो बदल युद्धजन्य अथवा तत्सम परिस्थितींतच करावा, इतर वेळीं करूं नये, असा जो आग्रह धरला होता त्यास सबळ कारणें असावींत. याखेरीज १९३० मध्यें १३·५८ टक्के प्रमाणांत असलेले शीखहि पंजाबचेच रहिवासी होते. फाळणीचा ताबडतोब एक अटळ परिणाम असा होईल कीं, मुसलमानेतर प्रदेशांत पुष्कळ प्रमाणांत भरती झालेल्या मुसलमानांना कामावरून कमी करावें लागेल. आणि मग शक्य असेल तर या लोकांना मुसलमानी राज्यांतील सैन्यांत घ्यावें लागेल. फाळणी न झाली तरीहि सध्यांची सैन्यांतील जातवार संख्या बदलून ती प्रांतानिहाय अधिक न्याय्य अशी करणें कोणत्याहि राष्ट्रीय सरकारला भाग पडेल. मग फाळणीमुळें हिंदुस्थानच्या सैन्यांतील नोकऱ्यांचा मार्ग अजिबात खुंटल्यावर त्यांची परिस्थिति किती खालावेल याची कल्पनाच केलेली बरी.

यावर कोणी असें म्हणेल कीं, सांप्रत हिंदुस्थानच्या सैन्यांत नोकरी करीत असलेल्यांची पाकिस्तानी सैन्यांत भरती करतां येईल. कदाचित् तसें होईलहि. परंतु सैन्यांतून काढून टाकलेल्या सर्वच्या सर्व लोकांना सामावून घेण्यायेवढी फौज पदरीं बाळगणें मुसलमानी राज्याला कठिण जाईल. या सर्व सैनिकांना त्यांत दाखल करून घेतलें असें मानलें तरी त्यासाठीं मुसलमानेतर—हिंदुस्थानची

---

१. डॉ. आंबेडकर : पाकिस्तानवरील विचार, पृ. ७५–७६.

मदत मिळणार नसल्यानें, त्याचा सर्व खर्च मुसलमानी राज्यालाच सोसावा लागेल. हे सर्व सैनिक हिंदुस्थानी नोकऱ्यांतून सुटल्यानें पाकिस्तानचें नुकसान होईल. या उलट, या लोकांसाठीं जो खर्च करावा लागला असता तो वांचून स्वतःच्याच राज्यांतील कर भरणाऱ्यांवर त्याचा विनियोग करतां आल्यामुळें मुसलमानेतर विभागाचें त्यामुळें कल्याणच होईल.

(५) केवळ पाकिस्ताननेंच मुसलमान आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणें शक्य आहे असें म्हटलें जातें. या आर्थिक प्रश्नाच्या दोन बाजू आहेत. नोकऱ्या ही त्याची एक बाजू होय. जर मुसलमानी विभागांत मुसलमानी राज्यें स्थापन झालीं तर नोकऱ्यांबाबतची तेथील मुसलमानांची परिस्थिति अधिक सुधारणार आहे असें नव्हे. सार्वजनिक खात्यांतून नोकऱ्यांचें जातवार प्रमाण ठरलेलें असून तें अयोग्य आहे असें वाटल्यास तें बदलून घेतां येईल. मात्र मुसलमानेतरांना केवळ धर्मभिन्नतेमुळें सरकारी नोकऱ्यांतून अजिबात वगळावयाचें, किंवा त्यांचें प्रमाण अगदीं क्षुल्लक ठेवावयाचें असें ठरविल्याखेरीज विद्यमान प्रमाणांत फारसा बदल कसा करतां येईल तें कळत नाहीं. मुसलमानेतर राज्यांतील मुसलमानांचें जें प्रमाण आहे त्यापेक्षां मुसलमानेतरांचें मुसलमानी राज्यांतील प्रमाण अधिक असल्यानें नोकऱ्यांबाबतची परिस्थिति त्यांनाच जास्त अनुकूल असणार. मुसलमानांचें मुसलमानेतर राज्यांतील प्रमाण १ ते १३ टक्के आहे, म्हणून मुसलमानेतरांचें मुसलमानी राज्यांतील प्रमाण २५ ते ४८ टक्के असतांना मुसलमानेतरांइतक्याच जागा आम्हांला देण्यांत याव्यात असा आग्रह धरणें मुसलमानांना अशक्य नसलें, तरी फार अवघड आहे. याचा परिणाम साहजिकच असा होईल कीं, मुसलमानेतर राज्यांतील मुसलमानी नोकरांचें प्रमाण कमी होईल, पण मुसलमानी राज्यांतील मुसलमानेतर नोकरांच्या संख्येंत मात्र तेवढी घट होणार नाहीं. जादा सवलतींसंबंधीं जे करार झाले आहेत त्यांत फाळणीनंतर फेरबदल करावा लागेल. कारण ज्यावेळीं हे करार झाले त्यावेळीं फाळणी करण्याची कल्पना गृहीत धरून ते केलेले नव्हते. संयुक्त राज्याचे नागरिक म्हणून नांदत असतांना तेथील नागरिकांना ज्या सवलती देण्यांत

येतील त्या सवलती फाळणीनंतर सर्वस्वीं पृथक् होणाऱ्या राज्यांतील नागरिकांना मिळणें शक्य नाहीं व आवश्यकहि नाहीं. येणेंप्रमाणें सरकारी नोकऱ्यांचा विचार केला असतां हिंदुस्थानांतील मुसलमानांचा तोटाच होणार आहे. मुसलमानी राज्यांतील मुसलमानांना अधिक प्रमाणांत नोकऱ्या मिळूं लागतील असें धरून चाललें तरीहि या तोट्याची भरपाई होईल असें नव्हे.

औद्योगीकरणाची वृद्धि करून आर्थिक स्थिति सुधारावयाची ही या प्रश्नाची दुसरी बाजू होय. मुसलमानेतरांनीं आर्थिक क्षेत्रांत जें महत्त्वाचें स्थान पटकाविलें आहे तें त्यांना राजकीय सवलतींच्या आधारानें मिळालें आहे असें म्हणतां येणार नाहीं. जी काय राजकीय सत्ता हिंदुस्थानांत आहे ती हिंदू वा मुसलमान यांपैकीं कोणाच्याहि हातीं नसून ब्रिटिशांचेच हातीं आहे. आणि हिंदूंना आर्थिक जगांत जें स्थान मिळालें आहे तें त्यांच्या हातीं असलेल्या राजकीय सत्तेमुळें मिळालेलें नसून त्यांच्या धाडसामुळेंच मिळालेलें आहे. लोकसंख्येच्या प्रमाणांत मिळालेल्या राजकीय हक्कांवर जर आर्थिक बल अवलंबून असतें, तर आपणांला हिंदुस्थानांत अत्यल्प संख्या असलेली पारशी जमात या आर्थिक जगांत कोठेंहि दिसली नसती. तरीहि पारशी लोकांचें स्थान हिंदूंपेक्षां वरचढ नसलें तरी कोणत्याहि जमातीपेक्षां कमी महत्त्वाचें नाहीं. त्यांच्या संपन्नतेचा कोणीहि हेवा करीत नाहीं, आणि त्यांनींहि सभोंवार पसरलेल्या अन्य जातींनीं आपली पिळवणूक चालविली आहे असा ओरडा कधीं केलेला नाहीं. म्हणून हिंदूंकडे आर्थिक वर्चस्व आहे हें म्हणणें निरर्थक ठरतें. मुसलमानी राज्यांनीं न्याय्यपणें आपले अधिकार न वापरतां जातीयदृष्ट्या त्यांचा उपयोग करण्याचें ठरविलें, तरच ते हिंदूंना त्यांच्या स्थानापासून पदच्युत करूं शकतील. दुसऱ्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, हिंदूंविरुद्ध पक्षपाती धोरण स्वीकारल्याखेरीज त्यांचें आर्थिक प्रभुत्व नाहींसें होणार नाहीं. पाकिस्तानच्या प्रचारकांची जर हीच इच्छा असेल—तशी ती असावी असें त्यांच्या प्रचारावरून वाटतें—तर हिंदू हा अन्याय सहन करण्यास तयार होतील अशी अपेक्षा त्यांनीं बाळगूं नये! जर हिंदूंच्या हातीं राजसत्ता येऊन तिचा त्यांनीं दुरुपयोग केल्यामुळें आणि

मुसलमानांवर अन्याय केल्यामुळें त्यांना हें स्थान मिळालें असतें, तर गोष्ट निराळी. पंजाबमधील कांहीं शीख व हिंदू यांनीं स्वसामर्थ्याच्या व धाडसाच्या जोरावर पंजाबच्या बाहेरसुद्धां आपले उद्योगधंदे प्रस्थापित केले आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राजपुताना, काठेवाड, गुजरात आणि चेट्टीनाड येथील हिंदू, आणि मुसलमानांतील खोजा व मेमन, या हिंदुस्थानांतील व्यापारी जाती होत. त्यांना जें स्थान प्राप्त झालें आहे तें त्यांच्या हातीं राजकीय सत्ता होती म्हणून नव्हे. इतर सर्वांना दडपून टाकल्याखेरीज मुसलमानांना आपली स्थिति सुधारतां येईलसें दिसत नाहीं. पण जर अशी दडपशाही झाली, तर तो मुस्लिम-राज्यांतील मुसलमानेतरांवर एक घोर अन्याय होईल.

## ३. पाकिस्तानवादाचें खंडन

ज्या मुद्दयांच्या आधारावर पाकिस्तानची मागणी करण्यांत येते, ते एक तर फोल आहेत किंवा अन्याय्य आहेत. त्यामुळें फाळणीच्या तत्त्वाचा न्याय्य आधार म्हणून ते कुचकामी ठरतात. पण पाकिस्तानच्या विरुद्ध जाणारे मुद्दे फार भरीव असे आहेत. त्यांतील कांहीं मुद्दे खालीलप्रमाणें:—

(१) छोटीं छोटीं स्वतंत्र राज्यें असण्याचे दिवस अगदीं संपले नसले, तरी जवळजवळ संपुष्टांत आले आहेत. छोट्या राष्ट्रांना आपलें स्वातंत्र्य टिकवितां येत नाहीं असा अगदीं ताजा अनुभव आहे. मोठाल्या राष्ट्रांनासुद्धां आपलें स्वातंत्र्य बिनधोक राखतांना नाकीं नऊ येतात. संयुक्त राज्यें बनविण्याकडे आज सर्वांचा कल आहे. बलिष्ठ राष्ट्रांवरहि नियंत्रण चालविणारें एक श्रेष्ठतर राज्य अस्तित्वांत येणें हेंहि आज राजकीय दृष्ट्या अव्यवहार्य वाटत नाहीं. म्हणून हिंदुस्थानची शक्ति व आकार कमी करून तेथें अनेक राज्यें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणें हें प्रवाहाविरुद्ध जाण्यासारखें होय. अलग राहण्याची ही प्रवृत्ति फाळणी केल्यानंतर कदाचित् संपणारहि नाहीं. आणि एकदां ही चक्रें फिरूं लागलीं, म्हणजे मुसलमान व मुसलमानेतर राज्यांचींहि अनेक शकलें पाडल्यावांचून तीं राहणार नाहींत. मग संस्थानांची गोष्टच बोलावयास नको. अशा प्रकारें अनेक शकलें पडल्यावर जरी स्वातंत्र्य मिळालें, तरी देशांत

भयंकर भाऊबंदकी माजेल आणि परकीय सत्तांच्या कारस्थानांसाठीं एक चांगलीच भूमि तयार होईल. परिणामतः सर्व राज्यें निर्बल झाल्यामुळें आक्रमक परसत्ता त्यांची शिकार करील किंवा त्यांना एकमेकांविरुद्ध झुंजवील हें अगदीं शक्य आहे.

(२) जर परस्परांना नांदवून घेण्याची आणि परस्पर–सहकार्याची वृत्ति असेल, तर राष्ट्रसंपत्तीचा विनियोग सर्वांसाठीं अधिक चांगल्या प्रकारें करतां येईल. वेगवेगळीं राज्यें झाल्यास ही गोष्ट अशक्यच होईल. कारण फाळणीमुळें अशा वृत्तीला पायबंद बसतो. सर्वच छोट्या राष्ट्रांत निसर्ग–संपत्ति सारखी विभागलेली नसल्यानें आणि बहुतेकांना आधुनिक राष्ट्राच्या संरक्षणासाठी कोठल्या ना कोठल्या तरी अत्यावश्यक अशा वस्तूंच्या बाबतींत दुसऱ्यावर अवलंबून रहावें लागत असल्यानें छोट्या राष्ट्रांना मोठ्या योजना करणें अशक्य होईल. राष्ट्रप्रदेश जितका व्यापक असेल तितकें त्यांत कृषीविषयक, खनिज व शक्त्युत्पादक नैसर्गिक साधनांच्या विपुलतेचें आणि वैविध्याचें प्रमाण अधिक असतें, आणि तेथें अर्थ–व्यवहारांची योजनाबद्ध आंखणी करण्याची शक्यताहि अधिक संभवते. हिंदुस्थानचें आणि विशेषेंकरून पूर्व व वायव्य मुसलमानी राज्यांचें फाळणीमुळें नुकसान होणार आहे हें अन्यत्र दाखविलेंच आहे. राज्यकारभारासाठीं व स्वसंरक्षणासाठीं होणारा खर्च भागण्याइतकीहि साधनसामग्री मुसलमानी राज्यांजवळ राहणार नाहीं हेंहि आपण पाहिलें.

(३) राष्ट्रसंवर्धन खात्यावर अधिकाधिक खर्च करण्याची आज हिंदुस्थानला अत्यावश्यकता आहे. ब्रिटिश सरकार स्वतःस केवळ अंमलदारी सरकार समजत असल्यानें आणि राष्ट्रसंवर्धन खात्याकडे त्याचें अतिशय दुर्लक्ष झाल्यानें भूतकालांत हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान झालेलें आहे. ही हानि भरून काढण्यासाठीं सर्व राष्ट्रलाच खूप प्रयत्न करावे लागतील. मुसलमानी राज्यें त्याला अपवाद ठरणार नाहींत. फाळणीमुळें साधन–पुरवठा संकुचित होईल. त्यामुळें राष्ट्रसंवर्धनाचा वाढता खर्च भागविणें मुसलमानी व मुसलमानेतर अशा दोन्ही राष्ट्रांना अवघड जाईल.

(४) मुसलमानी राष्ट्रांतसुद्धां राजकारण व अर्थकारण यांचा धर्मापासून अलग विचार व्हावा अशी प्रवृत्ति दिसून येते. मुस्लीम–लीगचे व पाकिस्तानचे प्रचारक कांहींहि म्हणोत; आज जगांतील मुसलमानी राष्ट्रें युरोपांतील ख्रिश्चन राष्ट्रांप्रमाणेंच भौतिकवादी बनलीं आहेत किंवा बनत चाललीं आहेत. हा सर्व प्रवाह परतवून दुसऱ्या कोणत्याहि पायावर एकराज्य प्रस्थापित करणें व तें टिकविणें हिंदी मुसलमानांना शक्य आहे किंवा काय हा प्रश्न आहे.

(५) पाकिस्तानच्या सूचनेस सर्व मुसलमानेतरांकडून व कांहीं मुसलमानांकडूनहि जोराचा विरोध होत आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. अधिकांश मुसलमानांचें प्रतिनिधित्व मुस्लिम–लीगकडे जातें कीं जमीयत–उल्–उलेमा, जमीयत–उल्–मोमीन, अहरार, राष्ट्रीय मुस्लिम संघ, अखिल भारतीय शिया परिषद् आणि इतर संस्था यांचेकडे जातें, हा वाद सध्यां मी घालूं इच्छीत नाहीं. कांहींहि असलें, तरी ही गोष्ट सत्य आहे कीं या संस्थांनीं फाळणीला विरोध दर्शविला आहे. मुसलमानांचें कांहींहि म्हणणें असो, शीख व हिंदू यांनीं पाकिस्तानला विरोध करण्याचा निश्चय निःसंदिग्धपणें प्रकट केला आहे; आणि फाळणी करण्याचा मुसलमानांचा हट्ट जसजसा वाढत जाईल, तसतसा त्यास प्रतिकार करण्याचा त्यांचा निश्चयहि वाढेल. भविष्यकाळीं या झगड्यास कोणतें वळण मिळेल तें सांगणें कठिण आहे. मात्र एक गोष्ट निश्चित आहे कीं ज्यांचा पाकिस्तानशीं जास्तींत जास्त संबंध आहे त्यांच्या राजीखुषीनें तें प्राप्त होणें संभवनीय नाहीं; आणि योजना यशस्वी होऊन फाळणी झाली, तरी हें परस्पर–वैमनस्य कायम टिकल्याशिवाय राहणार नाहीं. या सर्व योजना अविश्वासावर उभारलेल्या असल्यामुळें तो उत्तरोत्तर वाढतच जाईल व फाळणीनंतर वातावरण निवळेल व स्वतंत्र राज्यांमध्यें परस्पर–सख्य निर्माण होईल ही कल्पना मृगजलाप्रमाणें ठरेल. वैमनस्य व अविश्वास यांच्यामुळें एकमेकांशीं मिळतें घेणें मुष्किलीचें होऊन संरक्षक सैन्यें पदरीं बाळगणें दोघांनाहि आवश्यक होऊन बसेल. आणि दुसरें कांहीं झालें नाहीं, तरी त्यांची आर्थिक झटापट होणें अशक्य नाहीं.

( ६ ) या सर्व गोष्टींमुळें स्वतंत्र राज्यांतील अल्पसंख्याकांची परिस्थिति फारच बिकट होईल. आणि मुसलमान व मुसलमानेतर—राज्यांतील बहुसंख्य गटांमध्यें अशा प्रकारचे बखेडे उत्पन्न झाल्यामुळें कोणत्याहि राज्यांत अल्पसंख्याकांबद्दल सहानुभूति न राहून त्यांची परिस्थिति सध्यांपेक्षांहि कठिण होईल. एवंच, अल्पसंख्याकांची स्थिति आगींतून निघून फोफाट्यांत पडल्याप्रमाणें होणार आहे. फाळणी झाली तर या आपत्ती मुसलमानेतरांवर लादल्याप्रमाणें होईल. परंतु अल्पसंख्य मुसलमान मात्र याबद्दल कोणासहि दोष देऊ शकणार नाहींत. कारण मग त्यांनीं आपण होऊन, स्वतःच्याच आग्रहानें, स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतल्यासारखें होईल !

याशिवाय पूर्वीं दाखविल्याप्रमाणें आपल्या संख्याबलामुळें आणि केंद्रीकरणामुळें मुसलमानी राज्यांतील अल्पसंख्याक, मुसलमानेतर—राज्यांतील विरळ व कमी संख्याबलाच्या मुसलमान—अल्पसंख्याकांपेक्षां स्वसंरक्षणाबाबत जास्त प्रभावी ठरतील. अधिकारांच्या आणि सवलतींच्या बाबतींत परस्परानुकरणाच्या तत्त्वालाहि विशेष वाव मिळणार नाहीं. कारण असें कीं, पुरेसा मोबदला देण्याइतकें सामर्थ्य मुसलमानी राज्यांत राहणार नाहीं व त्यामुळें आपल्या राज्यांतील मुसलमानांना अधिक सवलती देण्याबाबत मुसलमानेतरांनाहि फारसा उत्साह वाटणार नाहीं.

भाग सहावा

# पाकिस्तानचे पर्याय

## ३५. क्रिप्स्–योजना

१९४० च्या मार्चमध्यें मुस्लिम–लीगनें आपल्या लाहोरच्या अधिवेशनांत पाकिस्तानचा ठराव पसार केल्यानंतर हिंदुस्थानांतल्या मुसलमानांच्या न्याय्य आकांक्षा तृप्त करण्यासाठीं निरनिराळ्या योजना मांडल्या गेल्या आहेत. त्यांना पाकिस्तानचे पर्याय असें मानतां येईल.

ब्रिटिश–युद्धमंडळानें ज्या योजनेचा खर्डा मांडला होता, त्याला या योजनांमध्यें पहिलें स्थान दिलें पाहिजे. सर स्टॅफोर्ड क्रिप्स् यांनीं ही योजना हिंदी जनतेला प्रथमच सांगितल्यामुळें क्रिप्स्–योजना हें तिचें नांव लोकांत रूढ आहे. त्या योजनेंत जी तात्पुरती व्यवस्था सुचविण्यांत आली होती तिच्याशीं अगर नंतर ज्या वाटाघाटी झाल्या त्यांच्याशीं आपल्याला येथें कर्तव्य नाहीं. आपल्याला फक्त त्यांत हिंदी संयुक्त राज्य व त्याची घटना ठरविण्याकरितां जी यंत्रणा क्रिप्स्–योजनेंत सांगितलेली होती तिचा विचार करावयाचा आहे. हिंदुस्थानला जास्तींत जास्त लवकर स्वराज्य प्राप्त होण्यासाठीं जो मार्ग बादशाही सरकारनें सुचविला होता तो स्पष्ट व रेखीव शब्दांत मांडणें हा त्या घोषणेमागील हेतु होता. 'एक नवीन वासाहतिक स्वरूपाचें हिंदी संघराज्य निर्माण करून इतर वसाहतींप्रमाणें त्याचा युनायटेड किंग्डमशीं व बादशहांशीं संबंध राखावा असें या घोषणेचें उद्दिष्ट आहे. मात्र अंतर्गत बाबतींत अगर परराष्ट्रीय संबंधांत त्याचा दर्जा इतर ब्रिटिश–वसाहतींपेक्षां कोणत्याहि दृष्टीनें कमी असणार नाहीं.' 'युद्ध संपल्यानंतर ताबडतोब वर सांगितल्याप्रमाणें हिंदुस्थानची नवीन घटना तयार करण्यासाठीं एक लोकनियुक्त समिति स्थापण्याची व्यवस्था करण्यांत येईल. त्या समितींत संस्थानांचा भाग घेतां यावा म्हणून तरतूद करण्यांत येईल, आणि अशा घटनासमितीकडून तयार करण्यांत आलेली घटना स्वीकारून अमलांत आणण्याची ब्रिटिश सरकार खालील अटींवर हमी घेत आहे.

'(१) ब्रिटिश–हिंदुस्थानांतील ज्या प्रांतांना नव्या घटनेंत सामील होण्याची इच्छा नसेल, त्यांना हल्लींची घटना चालू ठेवण्याचा हक्क राहील. मात्र त्यानंतर

त्यांना नव्या घटनेंत जावयाचें झाल्यास तशी तरतूद केली जाईल. नवीन राज्यघटनेंत समाविष्ट न होऊं इच्छिणाऱ्या प्रांतांची इच्छा असेल, तर वर सांगितल्याप्रमाणेंच अशा प्रांतांना स्वतःची नवी घटना करण्यास बादशाही सरकारची मंजुरी मिळेल. त्यांचा दर्जा संपूर्णपणें हिंदी संघराज्याप्रमाणेंच राहील.

'(२) ब्रिटिशांच्या हातून हिंदी लोकांच्या हातांत संपूर्ण सत्ता देण्यासाठीं आणि धार्मिक व वांशिक अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठीं बादशहांचें सरकार व घटनासमिति यांच्यामध्यें एक तहनामा होईल; परंतु ब्रिटिश–कॉमनवेल्थ-मधील इतर राज्यांशीं भविष्यकालांत काय संबंध असावेत याबाबत हिंदी संयुक्त राष्ट्रावर कोणतेहि निर्बंध घालण्यांत येणार नाहींत. युद्ध संपण्यापूर्वी हिंदुस्थानां-तील प्रमुख जमातींनीं आपापसांत विचारविनिमय करून घटनासमितीबाबत जर दुसरी एकादी योजना आंखली नाहीं, तर घटनासमिति पुढीलप्रमाणें तयार करण्यांत येईल.

'युद्ध संपल्यानंतर प्रांतिक निवडणुका होणें आवश्यकच असल्यामुळें त्या निवडणुकांचे निकाल समजल्यानंतर निरनिराळ्या प्रांतांतील कनिष्ठ विधि-मंडळें हीं एक मतदारसंघ बनून प्रमाणित प्रातिनिधित्वाच्या तत्त्वानुसार घटनासमितीची निवड करतील. या नवीन संस्थेची संख्या मतदारसंघाच्या एकदशांश राहील. संबंध ब्रिटिश–हिंदुस्थानांतील प्रतिनिधींप्रमाणें निर-निराळ्या हिंदी संस्थानांना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आपले प्रतिनिधी नेम-ण्यासाठीं आमंत्रण दिलें जाईल. संस्थानी प्रतिनिधींचे अधिकार ब्रिटिश–हिंदु-स्थानांतील प्रतिनिधींसारखेच राहतील.'

वर दिलेल्या सारांशावरून असें दिसून येईल कीं, युद्ध थांबल्यानंतर ताबड-तोब एक नवीन हिंदी संयुक्त राज्य निर्माण करण्याची ब्रिटिश सरकारची कल्पना होती. या हिंदी संयुक्त राज्याचा दर्जा वसाहतीच्या राज्याप्रमाणेंच असून वाटल्यास ब्रिटिश कॉमनवेल्थमधून फुटून निघण्याचाहि अधिकार त्याला देण्यांत आला होता. तथापि, ही योजना निरनिराळीं स्वतंत्र राज्यें गृहीत धरून आंखली गेली नव्हती; परंतु हिंदी संयुक्त राज्यापासून सुरुवात करून कोणत्याहि

प्रांताला घटना मान्य झाली नाहीं तर संयुक्त राज्यांत सामील न होतां ब्रिटिश सरकार व हिंदी संयुक्त राज्य यांच्याइतकाच दर्जा अशा प्रांतांना देण्याची सोय त्यांत केलेली होती. प्रो० कूपलंड म्हणतात, "एक नवीन घटना बनवून नव्या वासाहतिक राज्याच्या स्वरूपाची हिंदी संयुति निर्माण करणें हें आपलें उद्दिष्ट असल्याचें ब्रिटिश सरकारनें स्पष्ट शब्दांत मांडलें होतें. हिंदी संयुक्त राज्यांत सामील न होण्यासाठीं च्या तरतुदी बादशाही घोषणेंत होत्या, त्या केवळ हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्यासंबंधींच्या सर्व योजना कोलमडून पडूं नयेत यासाठीं शेवटला उपाय म्हणूनच होत्या, हें बादशाही घोषणा वाचणाऱ्या कोणाच्याहि ध्यानांत येईल."[1] बादशाही घोषणा मुस्लिम-लीगनें झिडकारिली ती मुख्यतः या कारणासाठींच; कारण तिच्यांत फुटून निघण्याला अनुकूल अशी स्पष्ट घोषणा नव्हतीच आणि जरी तिच्यांत पाकिस्तान अध्याहृत असलें, तरी एकापेक्षां जास्त संयुक्त राज्यें निर्माण करण्याची शक्यता अत्यंत दूरची म्हणून त्यांत मानण्यांत आलेली होती.

४ एप्रिल १९४२ च्या मुस्लिम-लीगच्या अलाहाबाद-अधिवेशनांतील आपल्या अध्यक्षीय भाषणांत आणि १३ एप्रिल १९४२ रोजीं प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत जनाब जिना यांनीं क्रिप्स्-योजना अत्यंत स्पष्ट शब्दांत पुढील मुद्द्यांवर झिडकारिली होती:—(१) तिचें प्रमुख उद्दिष्ट एक नवीन हिंदी संयुक्त सरकार निर्माण करावें असें होतें; अल्पसंख्याकांना फुटून निघण्याचा हक्क त्यांत दिलेला होता तो केवळ आभासात्मक होता. (२) अकरा प्रांतांतील विधिमंडळांतील सभासदांचा एक मतदारसंघ कल्पून प्रमाणित प्रतिनिधित्वाच्या तत्त्वावर घटनासमितीची निवडणूक होणार होती; विभक्त मतदारसंघांना त्यांत स्थान नव्हतें. विभक्त मतदारसंघ जरी असते, तरी त्यांत मुसलमान सभासदांची संख्या २५ टक्क्यांहून अधिक झाली नसती; प्रमाणित प्रतिनिधित्वाच्या पद्धतीमुळें तर ही संख्या अधिकच कमी झाली असती. घटनासमितीचे निर्णय साध्या बहुमतानें घेण्यांत येणार असल्यामुळें त्या समितीनें अखंड हिंदुस्थानसाठींच

---

१. आर. कूपलंड : इंडियन् पॉलिटिक्स् १९३६ ते ४२, पृ. २७६.

घटना केली असती हें सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ आहे. (३) सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रांत आपला फुटून निघण्याचा अधिकार कसा अमलांत आणणार हा होय. जर प्रांतीय विधिमंडळांतील ६० टक्के सभासद फुटून निघण्यास अनुकूल असतील तर प्रश्नच मिटतो. परंतु जर अनुकूल ५९ टक्के व प्रतिकूल ४१ टक्के अशी विभागणी झाली तर प्रांतांतील जनतेचें सामुदायिक मतदान होईल. यावरून मुस्लिम–राष्ट्राच्या एकजिनसीपणाला अगर राष्ट्रीयत्वालाच मान्यता दिलेली नव्हती. वास्तविक पाहतां प्रांतांची हल्लींची विभागणी केवळ ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील धोरणामुळें झालेली आहे. पण तिचें वायफळ स्तोम माजविण्यांत आलेलें आहे. याशिवाय दोन राष्ट्रांना मिळून स्वयंनिर्णयाचा हक्क दिलेला असला, तरी मुस्लिम–राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला सुस्पष्ट शब्दांत स्वतंत्र मान्यता दिलेली नाहीं. मुस्लिम–बहुसंख्य असलेले दोन सर्वांत मोठे प्रांत म्हणजे पंजाब व बंगाल; पण तेथें विधिमंडळांत मुसलमान सभासद बहुसंख्य नसल्यामुळें ते सर्वस्वीं हिंदु–अल्पसंख्याकांच्या कृपेवर अवलंबून राहतील. सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतांतहि बिगर–मुसलमानांना जें जादा प्रतिनिधित्व दिलेलें आहे, त्यामुळें मुसलमानांना आपलें उद्दिष्ट साध्य करून घेणें जड जाईल.

पाकिस्तान निःसंदिग्धपणें दिलें नाहीं म्हणून व मुसलमानांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला मान्यता न दिल्याबद्दल वरील योजना स्वीकारण्यांत आली नाहीं. मात्र फाळणीच्या तत्त्वाला मान्यता दिल्याबद्दल संतोष व्यक्त करण्यांत आला.[१]

## ३६. प्रो. कूपलंड यांची प्रादेशिक योजना

प्रो० कूपलंड यांनीं " हिंदुस्थानचें भवितव्य " ( फ्यूचर ऑफ इंडिया ) या आपल्या ग्रंथांत प्रादेशिकत्वाच्या पायावर एक योजना मांडली आहे. प्रादेशिकत्वाची कल्पना त्यांनीं सर शिकंदर हयातखान यांच्या हिंदी संयुक्त राज्याच्या योजनेवरून घेतली आहे. आणि हिंदुस्थानचे शिरगणतीचे अधिकारी

१. ज. जिना यांचीं भाषणें व लेख. पृ. ३५०–३६४.

मि. एम्. डब्ल्यू. एम्. यीट्स् यांच्या कल्पनेबरहुकूम कूपलंड यांनीं प्रादेशिक मर्यादा ठरविलेल्या आहेत. या योजनेप्रमाणें उत्तर हिंदुस्थानची तीन नद्यांच्या खोऱ्यांत विभागणी केलेली आहे: (१) काश्मीरपासून कराचीपर्यंत पसरलेलें सिंधु नदीचें खोरें (म्हणजे राजकीयदृष्ट्या पाकिस्तान); (२) पंजाब आणि बंगाल यांच्यामधला गंगानदीच्या खोऱ्याचा टापू (म्हणजे हिंदुस्थान); आणि (३) बिहार ते पूर्व सरहद्दीपर्यंत गंगा व ब्रह्मपुत्रा यांची खोरीं (ईशान्य हिंदुस्थान). गंगाखोऱ्याचे जे दोन विभाग पाडले आहेत ते भौगोलिक वस्तुस्थितीला धरूनच आहेत. १५० मैलांवर ब्रह्मपुत्रेला जाऊन मिळण्यासाठीं बिहारच्या पूर्व सरहद्दीवर गंगानदी दक्षिणेकडे वळूं लागते, त्या भागापासून त्या प्रदेशाची परिस्थिति बदलण्यास सुरुवात होते. हा प्रदेश उत्तरेकडील सपाट मैदानांत मोडत नाहीं; तो मोठा दुआब आहे.[१] (४) चौथा विभाग म्हणजे जवळजवळ मोठें द्वीपकल्पच आहे. प्रो० कूपलंड यांच्या मताप्रमाणें नद्यांच्या खोऱ्यांनुसार केलेली प्रादेशिक विभागणी आर्थिक गरजांना धरूनच आहे. आर्थिक सुबत्ता ही बहुतकरून प्रचंड जलशक्तीचा योग्य तऱ्हेनें उपयोग करून घेण्यावरच अवलंबून असते. जलविद्युत् तयार करण्याचे कारखाने उभारण्यासाठीं व नद्यांचा संपूर्ण उपयोग करून घेण्यासाठीं दीर्घकालीन योजना आंखावी लागते. अशी योजना वेगवेगळ्या प्रदेशांत किंवा प्रांताप्रांतांच्या पृथक् पृथक् साधनसामग्रीनें पार पाडतां येण्यासारखी नाहीं. त्यासाठीं आंतरप्रांतीय सुसूत्रता आवश्यक असून त्यासाठीं लागणारा खर्च व नियंत्रण फक्त प्रादेशिक पायावरच उभारतां येईल.

प्रमाणाचा हिशेब करतांना प्राध्यापक महाशयांनीं अंकगणिताची छोटीशी चूक केलेली आहे. पुढील कोष्टकांत मीं ती दुरुस्त केली आहे. हें कोष्टक तयार करतांना त्यांनीं दिलेले लोकसंख्येचे आंकडे घेतले असून ते पुढील पृष्ठांवर लोकसंख्येच्या दोन स्तंभांत दिले आहेत.

---

१. आर. कूपलंड : हिंदुस्थानचें भवितव्य, पृ. १२०.

कोष्टक ५१.

(आंकडे लक्ष रुपयांचे आहेत)

| विभाग | ब्रि. हिंदुस्थानांतील प्रांत | हिंदी संस्थानें | क्षेत्रफळ १००० चौरस मैलांत: संस्थानें धरून | क्षेत्रफळ १००० चौरस मैलांत: संस्थानें सोडून | संस्थानें धरून: हिंदु | संस्थानें धरून: मुसलमान | संस्थानें धरून: वन्यजाति |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सिंधु | वा. सरहद्द | काश्मीर | ५६९·७३ | | ... | ... | ... |
| | पंजाब | वा. स. प्रांत-सं. | | २१८·३५ | ... | ... | ... |
| | ब्रि. बलुचि- | पंजाब-संस्थानें | | | २१·३४ | ... | ... |
| | स्तान | डोंगरी संस्थानें | | | ... | ३१·९० | ... |
| | सिंध | बलुचिस्तान-सं. | | | ... | ... | १·२२ |
| | अजमीर- | राजपुताना-सं. | | | ... | ... | ... |
| | मेरवाड | (अ) व (ब) सोडून | | | | | |
| गंगा | संयुक्त प्रांत बिहार | सं. प्रांत-संस्थानें ग्वाल्हेर | ३११·८० | | ... | ... | ... |
| | ओरिसा | ओरिसा-संस्थानें | | २०८·२० | ... | ... | ... |
| | | मध्य हिंदु. संस्थानें | | | ९१·८९ | ... | ... |
| | | ग्वाल्हेरच्या पूर्वेकडील संस्थानें | | | ... | १४·०३ | ... |
| | | छत्तीसगड-संस्थानें | | | ... | ... | ९·८१ |
| | | राजपुताना-संस्थानें (क) सोडून (अ) भरतपूर, बिरिदि, धोलपूर, कारनळी, कोटा | | | ... | ... | ... |

| लोक-संख्या | संस्थानें सोडून लोकसंख्या | | | | लोकसंख्येचें प्रमाण संस्थानें धरून | | | संस्थानें सोडून | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | हिंदु | मुसलमान | वन्यजाती | एकूण | हिंदु | मुसलमान | इतर | हिंदु | मुसलमान | इतर |
| ... | ९·३८ | ... | ... | ... | ३४·८ | ... | ... | २५·२ | ... | ... |
| ... | ... | २२·७५ | ... | ... | ... | ५२·० | ... | ... | ६१·३ | ... |
| ... | ... | ... | ०·१३ | ... | ... | ... | १३.२ | ... | ... | १३·५ |
| ... | ... | ... | ... | ३७·०८ | ... | ... | ... | ... | .... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ६१·२५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ७९·१५ | ... | ... | ... | ७८·७ | ... | ... | ७९·० | ... | ... |
| ... | ... | १३·२९ | ... | ... | ... | १२·० | ... | ... | १३·२ | ... |
| ... | ... | ... | ७·०७ | ... | ... | ... | ९·३ | ... | ... | ७·८ |
| ... | ... | ... | ... | १००·०९ | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| ११६·५५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |

(कोष्टक ५१ पुढें चालू)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दुआब | बंगाल | बंगाली संस्थानें | १५६'९६ | | — | — | — |
| | आसाम | आसामी संस्थानें | | १३२'३९ | — | — | — |
| | | सिक्किम | | | ३०'६६ | — | — |
| | | | | | | ३६'८५ | — |
| | | | | | | | ५'५९ |
| दख्खन | मद्रास | पश्चिम हिंदु. सं. | ५३९'२५ | | — | — | — |
| | मुंबई | मध्य हिंदु. संस्थानें | | ३०२'७९ | — | — | — |
| | मध्यप्रांत-वऱ्हाड कूर्ग, पंथ-पिपलोदा | ग्वाल्हेरच्या पश्चिमेचीं व दक्षिणेचीं सं. | | | ११०'४४ | — | — |
| | | गुजरात-संस्थानें बडोदा-संस्थानें | | | — | ११'२२ | — |
| | | राजपुतान्यापैकीं (ब) बंसवारा, दान्ता डुंगरपूर, छत्तीसगडमधील | | | — | — | ८'७७ |
| | | पालनपूर संस्थानें (क) बस्तर चिखिदान, कुंकर, कवर्धा, खैरगड, नांदगांव | | | — | — | — |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| — | २९·२७ | — | — | — | ४१·७ | — | — | ४१·५ | — | — |
| — | — | ३६·४५ | — | — | — | ५०·१ | — | — | ५१·६ | — |
| — | — | — | ४·३७ | — | — | — | ८·२ | — | — | ६·९ |
| — | — | — | — | ७०·५१ | — | — | — | — | — | — |
| — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| ७३·५० | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| — | ७२·४२ | — | — | — | ८०·५ | — | — | ८३·० | — | — |
| — | — | ६·६१ | — | — | — | ८·२ | — | — | ७·५ | — |
| — | — | — | ५·१३ | — | — | — | ११·३ | — | — | ९·५ |
| — | — | — | — | ८७·१८ | — | — | — | — | — | — |
| — | — | — | — | — | — | — | — | — | — | — |
| १३६·८२ | — | — | — | — | — | — | — | — | — | — |

या प्राध्यापकांचें असें मत आहे कीं, प्रादेशिक विभागणी एका दृष्टीनें फाळणीहून व दुसऱ्या दृष्टीनें संयुक्त राज्याहून भिन्न आहे. हिंदुस्थानचें अखंडत्व कायम राहून त्या विभागांचें एक आंतरप्रादेशिक मध्यवर्ति केंद्रहि त्यांत अभिप्रेत आहे. परंतु हें मध्यवर्ति सरकार एका नवीन धर्तीवर स्थापण्यांत येईल. हिंदुस्थानचें अखंडत्व कायम राखण्यासाठीं जेवढे कमींत कमी अधिकार आवश्यक असतील, तेवढेच किमान अधिकार या सरकारला राहतील; पण हे अधिकार अखिल हिंदुस्थानच्या मतदारांकडून साक्षात् मिळालेल्या मुखत्यारी-मुळें त्याच्या हातीं येणार नसून ते अधिकार प्रादेशिक घटकांचा प्रतिनिधि म्हणून किंवा त्यांच्या समायिक कारभाराचा व्यवस्थापक म्हणून त्याच्या हातीं आलेले असतील.

बाहेरील देशांना ज्यायोगें हिंदुस्थानचें अखंडत्व दृष्टोत्पत्तीस येईल असे मध्यवर्ति सरकारचे अधिकार कमींत कमी पुढीलप्रमाणें राहतील: (१) परराष्ट्रीय बाबी आणि संरक्षण; (२) परदेशांशीं व्यापार किंवा जकातींचें धोरण; आणि (३) चलन. संरक्षणसत्ता म्हणजे परकीय आक्रमणाविरुद्ध देशाच्या संरक्षणासाठीं नाविक व हवाईदल धरून जेवढें सैन्यबल आवश्यक असेल तेवढें सज्ज ठेवून त्यावर नियंत्रण ठेवण्याची सत्ता होय.

परदेशगमन किंवा परदेशांतून आगमन आणि नागरिकत्व मिळविण्यासंबं-धींचें सर्व नियंत्रण परराष्ट्रीय संबंधांत समाविष्ट होईल. त्या गोष्टी अर्थातच मध्यवर्ति सरकारकडे राहतील. तथापि, एकाद्या विभागाला आपल्या स्वतंत्र राष्ट्रीयत्वाची जोड द्यावयाची झाल्यास वरील गोष्टीमुळें त्यास बाध येणार नाहीं.

परराष्ट्रखातें, जकातवसुली इत्यादि खात्यांच्या नोकरवर्गासाठीं मध्यवर्ति सरकारला भरमसाट खर्च येणार नाहीं. खूपच खर्च लागणारें एकच खातें म्हणजे संरक्षणखातें होय. आणि चालू युद्धापूर्वी संरक्षणखात्याचा खर्च अजमासें परदेशीय मालावरील जकातीइतका होई. आलेली तूट भरून काढण्यासाठीं मध्यवर्ति सरकारलाच कर लादण्याचे अधिकार देण्यांत यावेत, कीं ही तूट प्रादे-शीय सरकाराकडून राज्यघटनेंत ठरविल्याप्रमाणें ठराविक खंडणी घेऊन भरून

काढावी हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. याचप्रमाणें जी शिल्लक उरेल ती प्रादेशीय विभागांत कशी वांटून द्यावयाची यासंबंधींहि घटनेंत तरतूद करतां येईल.

वर सांगितलेल्या किमान आवश्यक मध्यवर्ति खात्यांत रेल्वे व हवाई वाहतुक, किनाऱ्यालगतची समुद्रावरील वाहतुक, रेडिओ, टेलिफोन, टेलिग्राफ आणि शक्य झाल्यास पोस्टखातें इत्यादिकांचा समावेश केला, तर तें अधिक सोयीचें होऊन खर्चांत बरीच बचत होईल. परंतु शांततेच्या काळांत आंतरविभागीय मध्यवर्ति सरकारला या गोष्टींची आवश्यकताच आहे असें नव्हे; आणि युद्धकालांत आणीबाणीच्या वेळेसाठीं म्हणून या गोष्टींचा ताबा मध्यवर्ति सरकारनें घेण्याची तरतूद राज्यघटनेंत असावी म्हणजे झालें. खानेसुमारी, देशाची शास्त्रीय दृष्टया पाहणी, औद्योगिक सुधारणा, खाणी आणि तेलप्रदेशांवर नियंत्रण, महत्त्वाचीं बंदरें व नाविक वाहतुकीवर नियंत्रण, स्फोटक पदार्थ, शस्त्रास्त्रें यांवर नियंत्रण, यांसारखीं आणखी कांहीं खातीं मध्यवर्ति सरकारच्या कक्षेंत आणलीं तरीहि तें सोयीचें व काटकसरीचें होईल; परंतु सत्तेचें प्रादेशिक विकेंद्रीकरण केलें तर त्या बाबी प्रादेशीय विभागांकडे सोंपवितां येतील. ज्या गोष्टींत सर्व विभागांत एकसूत्रीपणा आणणें आवश्यक असेल, त्या बाबतींत मध्यवर्ति सरकारनें प्रादेशीय विभागांनीं विनंति केली तर कायदे करावेत, अशी तरतूद करण्यांत यावी.

आंतरप्रादेशिक संयुक्त-राज्य म्हणजे एक विस्कळित संयुक्त-राज्य असें त्याचें वर्णन करतां येईल. परंतु प्रादेशिकत्वाच्या तत्त्वानें एक नवीन कल्पना किंवा तर्कदृष्टया पुढचें पाऊल टाकलें गेलें आहे ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. या योजनेनें अनेक मोठया राज्यांत हिंदुस्थानची फाळणी केलेली आहे. हीं वेगळालीं मोठीं राज्यें संपूर्णपणें स्वतंत्र राहूं शकलीं असतीं. परंतु कांहीं विशिष्ट समान हेतूंसाठीं आपली सत्ता समायिक करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे, अशी त्या योजनेंतील कल्पना आहे. हल्लीं अस्तित्वांत असलेल्या सर्व संयुक्त-राज्यांत राष्ट्रीय ऐक्य व स्थानिक स्वायत्तता या दोन तत्त्वांचा

मेळ बसेल अशा रीतीनें सत्ता विभागलेली असते. परंतु प्रादेशीय विभागणी-च्या योजनेंत असा कोणताहि दुहजबी हेतु नाहीं. त्यांत मध्यवर्ति सरकार ही एक निवळ आंतरप्रादेशीय संस्था आहे. त्याचें स्थान प्रातिनिधिक राहील. त्यांतील कार्यकारी मंडळाचे आणि कायदेमंडळाचे सभासद आपापल्या प्रादे-शिक विभागांचे प्रतिनिधी म्हणून कार्य करतील. परंतु प्रादेशीय विभागणी आणि संघ—राज्य यांत मात्र फरक आहे; संघ—राज्य हा एक संघ म्हणूनच असतो; संघ—राज्याला स्वतःची सत्ता अगर इतर अधिकार कोणतेच नसतात. त्यानें जे निर्णय घेतलेले असतात ते निरनिराळे घटक मान्य करतात, आणि स्वखर्चानें ते निर्णय अमलांत आणतात. उलटपक्षीं, आंतरप्रादेशीय मध्यवर्ति केंद्र हें एक खरेंखुरें सरकार राहील. तें आपल्या सैन्याला व अधिकाऱ्यांना स्वतंत्र आज्ञा देऊं शकेल व योग्य वाटेल त्या रीतीनें त्यांना पगार देईल. या आंतरप्रादेशीय मध्यवर्ति सरकारचा दर्जा संघ—राज्यापेक्षां जास्त व सामान्य संयुक्त राज्यापेक्षां अधिक असतो. म्हणजे त्याचें स्थान त्या दोहोंच्या मधलें असतें.

आंतरप्रादेशिक मध्यवर्ति सरकारचें विधिमंडळ १९३५ च्या कायद्यांत अभिप्रेत असलेल्या संयुक्त विधिमंडळाप्रमाणें, हिंदी राष्ट्रवादाचें सामर्थ्य आणि त्याच्या आकांक्षा व्यक्त करूं शकणार नाहीं. याचें अगदीं साधें कारण असें आहे कीं, प्रादेशिक विभागणीची मूळ कल्पनाच हिंदुस्थानांत अखंड राष्ट्रीय-यत्व सिद्ध झालेलें नाहीं यावर आधारलेली आहे. त्यामुळें या आंतरप्रादेशीय मध्यवर्ति केंद्रांत त्या त्या प्रदेशांत असलेल्या पृथक् पृथक् राष्ट्रीयत्वांचें प्रति-बिंब दिसेल. या कायदेमंडळावर प्रत्येक विभागामार्फत सारखेच प्रतिनिधी असतील; विभागांतील घटकांना योग्य तें प्रतिनिधित्व मिळण्यासाठीं जेवढी किमान संख्या आवश्यक असेल त्याहून अधिक जागा मिळणार नाहींत. ही गोष्ट विभागाचें क्षेत्रफळ अगर त्याची लोकसंख्या यावर अवलंबून असणार नाहीं. हे सभासद प्रादेशिक विधिमंडळामार्फत निवडले जावेत; त्यांना आपले अधिकार प्रादेशिक विभागांकडून मिळावेत व त्यांनाच ते जबाबदार असावेत. हे सभासद निवडतांना अशी पद्धति स्वीकारावी, कीं ज्यामुळें त्या त्या

विभागांतील प्रांतांना व संस्थानांना योग्य तें प्रतिनिधित्व मिळेल. उदा० गंगा-विभाग आणि दख्खन टापूंतील प्रांतांनीं व संस्थानांनीं जर प्रादेशिक विभागांत सामील न होतां वेगवेगळाले प्रांत व संस्थानें म्हणून राहावयाची इच्छा व्यक्त केली, तरीसुद्धां त्यांना आंतरप्रादेशीय केंद्रावर प्रतिनिधित्व देतांना या बिगर–प्रादेशीय प्रांतांचे प्रादेशिक विभाग झाले असते तर जितके प्रतिनिधी मिळाले असते, तेवढेच प्रतिनिधी मिळण्याची व्यवस्था करणें आवश्यक आहे. वेगळ्या शब्दांत सांगावयाचें तर आंतरप्रादेशीय मध्यवर्ति विधिमंडळांत सिंधु-खोरें व दुआब या प्रदेशांना जेवढे प्रतिनिधी पाठवतां येतील, तेवढेच प्रतिनिधी गंगाखोरें आणि दुआबप्रदेश यांना धाडतां येतील; मग गंगाखोरें व दुआब यांचे प्रादेशीय विभाग बनवलेले असोत वा नसोत.

मध्यवर्ति सरकारचें कार्यक्षेत्र तीन खात्यांइतकेंच मर्यादित असल्यामुळें चार प्रधानांचें मंत्रिमंडळ बनेल; त्यांतील एकदोघांना अजिबात खातींच मिळणार नाहींत. संमिश्र मंत्रिमंडळ असावें असा कायदा करावा. त्यासाठीं कांहीं मर्यादेपर्यंत स्वित्झर्लंडच्या घटनेचा उपयोग होईल. पंतप्रधान आणि इतर मंत्री विधिमंडळानें निवडावेत; त्यांचें आयुर्मान विधिमंडळाच्या आयुर्मानाइतकेंच राहील. एकादा कायदा पास करावयाचा असेल, तर त्यांना विधिमंडळांत बहुमताचा पाठिंबा आवश्यक आहे. स्वित्झर्लंडच्या कार्यकारी मंडळाप्रमाणें हें मंत्रिमंडळहि फक्त येवढ्यापुरतेंच विधिमंडळावर अवलंबून राहील; परंतु दररोजच्या कारभारांत तें विधिमंडळाला जबाबदार राहणार नाहीं. आणि स्वित्झर्लंडच्या धर्तीवरच अंमलबजावणीच्या अधिकाराच्या जागा निरनिराळ्या विभागांत सारख्या विभागून द्याव्यात. प्रत्येक विभागाला किमानपक्षीं एक जागा द्यावी. मात्र दोन जागांहून जास्त जागा देऊं नयेत. जे प्रांत प्रादेशिक विभाग तयार करणार नाहींत त्यांचेसुद्धां या कारणासाठीं गट पाडावेत. मुख्य प्रधान आलटून पालटून एकदां हिंदु व एकदां मुसलमान असावा.

सर्वांत वरिष्ठ कोर्टाला हल्लींच्या फेडरल कोर्टाप्रमाणेंच घटनेचा अर्थ लावण्याचा अधिकार राहील. या कोर्टांत दर विभागाचा एक न्यायाधीश असावा. त्यासाठीं बिगर–प्रादेशीय गट पाडावेत.

या नवीन पद्धतीचा घटनात्मक प्रश्नावर काय परिणाम घडून येईल? प्रो. कूपलंड यांच्या मतानें मध्यवर्ति सरकारांतील जातीय प्रमाण ज्या धर्तीचें असेल, तिच्यावर हें अवलंबून राहील. या प्रादेशीय पद्धतीनुसार आंतर-प्रादेशीय विधिमंडळांतील प्रतिनिधींच्या निवडणुकींत कोणत्याहि दृष्टीनें राष्ट्रीय प्रतिनिधी असणार नाहींत. हे सदस्य फक्त आपल्या प्रादेशीय विभागांचेच प्रतिनिधी राहतील. त्यांना आपल्या सरकारांच्या आणि विधिमंडळांच्या आज्ञा मान्य कराव्या लागतील व त्याप्रमाणें मतदान करावें लागेल. येणेंप्रमाणें मध्यवर्ति विधिमंडळांत जातीय समप्रमाण वैयक्तिक सदस्यांना अगर पक्षांना अनुसरून न राहतां प्रादेशीय विभागांच्या धोरणाला अनुसरून राहील. यामुळें दोन प्रमुख जमातींच्या प्रतिनिधींना हिंदुस्थानची सेवा करण्यासाठीं एकत्र काम करण्याची संधी दररोज मिळेल आणि मग एक दिवस असा उगवेल कीं जेव्हां हिंदूंना आणि मुसलमानांना स्वित्झर्लंड अगर कॅनडांतल्याप्रमाणें आपलीं स्वतंत्र वैशिष्ट्यें संभाळूनसुद्धां स्वित्झर्लंड अगर कॅनडामधल्या इतकीच हिंदी राष्ट्रीयत्वाची खरीखुरी जाणीव राहील. म्हणूनच प्रो. कूपलंड यांचा हिंदूंना असा सल्ला आहे कीं, त्यांनीं कोणत्याहि अटींवर संघराज्य कबूल करावें; यामुळें शेवटीं तें प्रत्यक्षांत येण्याची शक्यता निर्माण होईल. त्यांची मुसलमानांनाहि अशी विनंति आहे कीं जरी त्यांच्या योजनेंत मुसलमान–राज्याला संपूर्ण स्वातंत्र्य दिलेलें नसलें, तरीहि त्यांचे इतर एकूणएक हक्क तींत मान्य केलेले असल्यामुळें मुसलमानांनीं तिचा स्वीकार करावा. द्विराष्ट्र–कल्पना तींत मान्य केलेली आहे. या योजनेनें एक किंवा अधिक राष्ट्रीय राज्यांत हिंदी मुसलमानांचें राष्ट्र प्रस्थापित होईल. त्या राज्यांचा आकार अगर लोकसंख्या कितीहि असो. त्यांचा दर्जा हिंदु–राज्यांइतकाच अगर प्रांतगटांइतकाच राहील, याला त्या योजनेंत मान्यता मिळालेली आहे. त्यांच्या स्वतःच्या स्वातंत्र्याला धक्का न लागतां, त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत इतर राज्यांबरोबर त्यांची सत्ता त्यांना मर्यादित क्षेत्रांत विभागून घेतां येईल.

प्रो. कूपलंड यांची योजना शक्य तेवढी त्यांच्याच शब्दांत मांडली आहे.

या विद्वान् ग्रंथकारांनीं लिहिल्याप्रमाणें ही योजना हिंदुस्थानांत दोन राष्ट्रें आहेत, एक अखंड असें हिंदी राष्ट्रच अस्तित्वांत नाहीं, या आधारावर उभारली गेली आहे यांत संशय नाहीं. मुस्लिम-लीगची फाळणीची मागणी शक्य होईल तितकी मान्य केली पाहिजे, या गृहीत कृत्यावरच त्यांनीं ही योजना तयार केली आहे. आणि त्यासाठीं भौगोलिक आणि आर्थिक ऐक्यावर आधारलेल्या प्रादेशिक तत्त्वाचा उपयोग करून त्यांनीं धार्मिक व जातीय प्रमाणांत विभागल्या गेलेल्या मुसलमान-लोकवस्तीसाठीं स्वतंत्र राज्य असावें अशी तरफदारी केली आहे. डॉ. राधाकमल मुकर्जी म्हणतात, "आर्थिक तत्त्वानुसार केलेल्या प्रादेशिक विभागणीचें एकरूपत्व मुसलमानांच्या पाकिस्तानच्या राजकीय विभागाबरोबर कल्पिल्यामुळें प्रो. कूपलंड यांच्या हातून कृषिभूगोल-शास्त्रांतला एक फार मोठा प्रमाद घडून आला आहे."[1]

या योजनेवर पुढें असाहि गंभीर आक्षेप घेतां येईल, कीं तिच्यामध्यें प्रादेशिकत्वाचें सुद्धां काटेकोरपणें आणि तर्कशुद्धपणें पालन केलेलें नाहीं. पंजाबचा बराचसा भाग गंगाखोऱ्यांत मोडतो हें ते एकीकडे कबूल करतात; तथापि त्याचा प्रत्यक्ष समावेश मात्र त्यांनीं सिंधुखोऱ्यांत केलेला आहे. ज्या प्रदेशाला प्राध्यापक महाशयांच्याच शब्दांत सांगावयाचें तर "विशिष्ट असे भौतिक व नैतिक स्वभावधर्म आहेत" त्या राजपुतान्यांतील तीन चतुर्थांश भागाला सिंधुखोऱ्यांत सह्लग्न करण्यास कोणतेंहि भौगोलिक कारण देतां येणार नाहीं. इतकें असूनहि हा प्रदेश सिंधुखोऱ्यांत समाविष्ट करण्यास कांहीं कारणें असलीं तरीसुद्धां ज्या दक्षिणेकडील संस्थानांचा गुजरातशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं त्यांचा आणि गुजरातचा एक विभाग करण्याचें कांहींहि कारण दिसत नाहीं. तसेंच गुजरातचा जो उत्तर विभाग बहुतांशीं अरवली पर्वतांत उगम पावणाऱ्या नद्यांनीं आणि तेथील मुसळधार पावसानें भिजवला जातो, तो या दुसऱ्या विभागांत सामील न करतां दख्खन-विभागाला जोडून देण्याचें कारण काय ?

गंगाखोऱ्याकडे पाहिलें तर अशीच परिस्थिति दिसते. त्यांतसुद्धां भौगोलिक

---

१. डॉ. राधाकमल मुकर्जी : अर्थशास्त्रज्ञाच्या चष्म्यांतून पाकिस्तान, पृ. १२.

कारणें धुडकावून लावून वाटेल तसे प्रदेश जोडलेले आहेत. हिमालयांत उगम पावणाऱ्या अनेक नद्यांचे उगम ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर आहेत; त्या नद्यांच्या पुरांची व्यवस्था करणें किती अवघड आहे हें सर्वांना माहीत आहे. उत्तर बिहारमध्यें सर्व प्रदेश उध्वस्त करणारी कोशी नदी हें एक असें उदाहरण आहे. याच्या जोडीला मुझफरपूर आणि दरभंगा जिल्ह्यांमध्यें महापुरानें सत्यानाश करणाऱ्या बागमती आणि इतर नद्यांचीं नांवें घेतां येतील. शोण व नर्मदा या दोन्ही नद्यांचीं उगमस्थानें अमरकंटकाच्या डोंगरांत असलीं तरी त्यांचे प्रवाह विरुद्ध दिशेनें वाहतात. अमरकंटक पर्वतांत मुसळधार पाऊस पडला तर एकमेकांपासून खूप दूर असलेल्या प्रदेशांतहि महापुरानें हाहाःकार उडतो. याचीं उदाहरणें म्हणून शहाबाद, पाटणा व बिहारमधील सारण या जिल्ह्यांची किंवा जबलपूर, होशंगाबाद या दक्षिण मध्यप्रांतांतील जिल्ह्यांची किंवा गुजरातमधील कांहीं भागांचीं नांवें सांगतां येतील.

प्रो. कूपलंड यांनीं अमेरिकेंतील 'टेनेसी व्हॅली अथॉरिटी' योजनेचा खूपदां उल्लेख केलेला आहे, आणि तदनुसार नद्यांच्या खोऱ्यांची आपली योजना केलेली आहे. परंतु असली कोणतीहि योजना यशस्वी होण्यास लागणाऱ्या एका गोष्टीकडे त्यांचें दुर्लक्ष झालें आहे. नद्यांनीं भिजलेल्या प्रदेशाच्या वाढीची कोणतीहि योजना पार पाडावयाची असली, तर नदीचे आपल्याला वाटतील तसे विभाग पाडून योजना करणें उचित होणार नाहीं. नदीच्या उगमापासून तों थेट ती जेथें दुसऱ्या नदीला अगर समुद्राला मिळते त्या प्रदेशापर्यंचा सर्वच्या सर्व भाग एकदम विचारांत घ्यावा लागतो. प्रो. कूपलंड यांनीं केवळ स्वतःच्या लहरीप्रमाणें गंगानदी जेथें दक्षिणेकडे वळते तेथपर्यंत एक भाग पाडला आहे. तेथला प्रदेश आणि जमिनीचें स्वरूप विचारांत घेतलें तर बिहारचा उत्तरभाग आणि बंगालचा उत्तरभाग व आसाम–दरी यांत कांहींसुद्धां फरक आढळणार नाहीं. आणि जरी प्राध्यापक महाशयांनीं सुचविलेल्या ठिकाणीं गंगेचे दोन विभाग पाडले, तरीसुद्धां ते विभाग एकसंधी व समान असणार नाहींत. कारण गंगेचे दोन फांटे फुटतात. एका फांट्याला प्रथम

भागीरथी व नंतर हुगळी असें नांव असून त्यामुळें बंगालमधील जिल्ह्यांना पाणी मिळतें. दुसऱ्या फांट्याला मेघना आणि पद्मा हीं नांवें असून त्यामुळें पूर्व बंगालमधील जिल्ह्यांना पाणी मिळतें. या पश्चिम बंगालच्या जिल्ह्यांचें बिहारशीं साधर्म्य आहे, पूर्व बंगाली जिल्ह्यांशीं नाहीं. याखेरीज छोटानागपूर विभागांतून उगम पावणारी दामोदर नदी पश्चिम बंगालमधून वाहते व तिच्या पुरापासून या विभागाला खूपच उपद्रव पोंचतो. प्रो. कूपलंड यांच्या प्रादेशिक तत्त्वानुसार विभागणी करावयाची असली, तर त्यासाठीं गंगाखोरें आणि दुआब या दोहोंच्या सहकार्यानें हा उपद्रव थांबविण्याची व्यवस्था करावी लागेल. खरी गोष्ट अशी आहे कीं, पाध्यापक महाशयांनीं जी योजना सुचविलेली आहे ती केवळ स्वच्छंदीपणाची असून प्रादेशिक विभागणीचें तें एक विडंबन आहे. या तत्त्वाचा योग्य आणि नैसर्गिक तऱ्हेनें उपयोग केला तर विभागणी वेगळ्या तऱ्हेनें करावी लागेल. त्या विभागणींत उत्तर हिंदुस्थानशीं तुल्यबल असे दोन मुसलमान-विभाग आढळणार नाहींत. परंतु देशाचे चार प्रादेशीय विभाग पाडण्यामध्यें प्रो. कूपलंड यांचा नेमका हाच हेतु आहे.

उत्तरेकडील तीन प्रदेश वगळून उरलेल्या देशाचा एक विभाग बनविलेला आहे हें ध्यानांत घेतलें, तर वरील अनुमान जास्त स्पष्ट होतें. हा १००० मैल लांबीचा व ५०० मैल रुंदीचा विस्तीर्ण प्रदेश म्हणजे एक विभाग व्हावयाचा असेल, तर सबंध देश म्हणजेच एक प्रादेशीय विभाग आहे असें मानण्यास कुठलीच हरकत नाहीं ! अर्थात् एक अपवाद आहे. तो म्हणजे दोन मुस्लिम-विभाग इतर हिंदुस्थानशीं तुल्यबल दाखवावयाचे असतील, तर बाकीच्या प्रदेशाचे दोनच विभाग पाडले पाहिजेत. ते दोनापेक्षां जास्त किंवा कमीहि असून चालणार नाहींत. प्रो० कूपलंड यांनीं दख्खन-विभागाची जी आंखणी केली आहे ती कोणत्याहि नदीच्या खोऱ्याला अनुसरून केलेली आहे असें म्हणतां येणार नाहीं, याची जाणीव त्यांना असेलच. कारण बाकीचे तीन विभाग पाडल्यानंतर उरलेल्या प्रांतांची आणि संस्थानांची मोट बांधून दख्खन-विभाग तयार करण्यांत आला आहे हें उघड आहे.

या विद्वान् प्राध्यापकांनीं प्रदेशांची आंखणी करतांना दुसरी कोणतीहि गोष्ट विचारांत घेतलेली नाहीं. "प्रादेशीय समाजशास्त्रांत एकाद्या प्रदेशांतील राहण्याची पद्धति, तेथील लोकांचे उद्योगधंदे, भाषा, परंपरा आणि संस्कृति हीं एक आहेत अशी प्रादेशिकत्वाची कल्पना मांडलेली असते," हें डॉ० राधाकमल मुकर्जी यांनीं दृष्टोत्पत्तीस आणून दिलेलें आहे. ते पुढें म्हणतात, "भाषिक आणि सांस्कृतिक वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करणें म्हणजे प्रादेशीय तत्त्वाची निव्वळ थट्टाच आहे."[१] निरनिराळ्या भागांत भाषेमध्यें व सांस्कृतिकदृष्ट्या फरक असल्यामुळें हिंदुस्थान एकराष्ट्र बनूं शकत नसेल, तर मग हे सर्व फरक असलेले प्रादेशिक विभागहि केवळ हिंदुस्थानच्या छोट्या छोट्या आवृत्त्याच बनतील; आणि हे अंतर्गत फरक असलेले विभाग जर अखंड राहूं शकत असतील, तर हिंदुस्थानहि अखंड कां राहूं शकणार नाहीं तें समजत नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपली प्रादेशिक विभागणी कोणत्याहि सयुक्तिक तत्त्वावर आधारण्यांत आलेली नसल्यानें एकाद्या प्रदेशांतील घटकदेखील त्यांत सामील होण्यास संमति देणार नाहींत याची जाणीव प्रो० कूपलंड यांना आहे. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें सिंधु आणि दुआब प्रदेशांच्या घटकांचें एकमत होऊन त्यांचे प्रादेशिक विभाग होण्यांत कसलीहि अडचण राहणार नाहीं. परंतु गंगाखोरें आणि दख्खन–विभाग यांच्या बाबतींत मात्र कुलंगडीं उपस्थित होतील अशी त्यांची कल्पना आहे. आणि एकदां कां अशा भानगडी निर्माण झाल्या कीं दोन मुसलमान–विभागांचा दोन मुसलमानेतर–विभागांशीं समतोल राखणें अशक्य होऊन बसेल. परंतु यामुळें विचलित न होतां, या दोन प्रदेशांतील घटकांचे विभाग होवोत अगर न होवोत, ते जणुं दोन प्रादेशिक विभाग झालेच आहेत असें मानून त्यांना प्रादेशिक केन्द्रावर प्रतिनिधित्व देण्याची सूचना या प्राध्यापक महाशयांनीं केलेली आहे !

हे चार प्रदेश पाडतांना त्यांच्या क्षेत्रफळाचा अगर त्यांतील लोकसंख्येचा सुद्धां विचार त्यांनीं केलेला नाहीं. ५१ व्या कोष्टकांत दर्शविलेल्याप्रमाणें

---

१. मुकर्जी : अर्थशास्त्रज्ञाच्या चष्म्यांतून पाकिस्तान, पृ. १३.

दुआब विभागाचें क्षेत्रफळ संस्थानें सामील झालीं तर १लक्ष ५६हजार १६०चौरस मैल होईल व तीं सामील झालीं नाहींत तर तें १लक्ष ३२हजार ३९०चौरस मैल होईल. तसेंच गंगाखोरें व दख्खन-टापू या विभागांचें क्षेत्रफळ संस्थानें सामील झालीं तर अनुक्रमें ३ लक्ष ११ हजार ८०० चौरस मैल व ५लक्ष ३९हजार २५०चौरस मैल होईल; आणि संस्थानें सामील न झालीं तर तें अनुक्रमें २लक्ष ८हजार २००चौरस मैल व ३लक्ष २ हजार ७९०चौरस मैल होईल. त्या विभागांतील लोकसंख्यांमध्यें असलेला फरक तर चांगलाच घसघशीत आहे. संस्थानें सामील केलीं तर सिंधु-विभागांत ६ कोटी १२लक्ष ५०हजार व दुआब-विभागांत ७कोटी ३५लक्ष लोकसंख्या आहे; तर गंगाखोऱ्यांत ११कोटी ६५लक्ष ५०हजार व दख्खन-विभागांत १३कोटी ६८लक्ष २०हजार लोकसंख्या आहे. आणि संस्थानें सामील झालीं नाहींत तर सिंधु-खोऱ्यांत ३ कोटी ७० लक्ष ८० हजार, दुआब-विभागांत ७ कोटी ५ लक्ष १० हजार, गंगाखोऱ्यांत १० कोटी ९० हजार आणि दख्खन-विभागांत ८ कोटी ८१ लक्ष ८० हजार लोकसंख्या आहे. या चारी विभागांतील मुसलमान व बिगर-मुसलमान लोकसंख्येमधील प्रमाण पाहिलें तर अशी विलक्षण परिस्थिति आढळून येते. सिंधु-विभागांत आणि दुआब-विभागांत संस्थानी व खालसा मुलुख सामील केला, तर तेथें बिगर-मुसलमान अनुक्रमें ४८ टक्के व ४९ टक्के असल्यामुळें मुसलमानांना ५२ टक्के व ५१ टक्के इतकें नाममात्र बहुमत मिळेल. या दोन विभागांत फक्त खालसा मुलुखच समाविष्ट केला, तर तेथें बिगर-मुसलमान ३८·७टक्के व ४८·४टक्के होतील व मुसलमानांची संख्या अनुक्रमें ६१·३ व ५१·६ टक्के इतकी राहील. येणेंप्रमाणें मुस्लिम-विभागांत मुसलमानांचें नाममात्र मताधिक्य असेल. उलट, गंगा-विभागांत आणि दख्खन-विभागांत बिगर-मुसलमानांचें प्रचंड मताधिक्य होईल. त्या दोन विभागांत संस्थानी आणि खालसा मुलुख घेतला तर मुसलमानेतर अनुक्रमें ८८ व ९१ टक्के आणि मुसलमान १२ आणि ८·२ टक्के असतील; आणि फक्त खालसा मुलुखच घेतला तर गंगा-विभागांत मुसलमानेतर

८६'८ टक्के व मुसलमान १३'२ टक्के आणि दख्खन-विभागांत मुसलमानेतर ९२'५ टक्के व मुसलमान ७'५ टक्के भरतील.

आणि ही सर्व विसंगति व विचित्रपणा निमूटपणें सहन करावयाचा तो येवढ्यासाठींच कीं दोन मुस्लिम-विभाग दोन मुसलमानेतर-विभागांशीं तुल्य-बल व्हावेत! आणि हाच एकमेव हेतु असेल तर मग दुसऱ्या कशाचाहि विचार न करतां सरळसरळ खरेपणानें सांगावें कीं मुस्लिम-प्रांत व संस्थानें यांना बिगर-मुस्लिम-प्रांत व संस्थानांइतकीच सत्ता व दर्जा असावा, आणि जबाब-दारी व ओझें मात्र समान असूं नये! या योजनेला प्रादेशिक तत्त्व आणि आर्थिक सोय या गोष्टींचा जो बुरखा चढविलेला आहे तो इतका झिरझिरीत आहे कीं त्यामुळें मुसलमान काय किंवा बिगर-मुसलमान, काय कोणीच फसूं शकणार नाहींत.

प्रो. कूपलंड यांनीं जी घटना सुचविलेली आहे, तिच्यामुळें त्यांची भूमिका बरीचशी स्पष्ट होते. आंतरप्रादेशीय केन्द्रीय सरकारच्या विधिमंडळांतील सभा-सदांना कोणताहि व्यक्तिगत दर्जा असणार नाहीं; ते केवळ आपापल्या प्रादे-शिक विभागांच्या आज्ञेनुसार काय करणारे प्रतिनिधी राहतील. हें बंधन केवळ त्यांच्यावरच नव्हे, तर कार्यकारी-मंडळाच्या सदस्यांवरहि राहील. परंतु त्या प्राध्यापक महाशयांच्या हें ध्यानांत येत नाहीं, कीं जर कोणत्या योजनेपासून जास्तींत जास्त भांडणतंटे निर्माण होणार असतील, तर ते त्यांच्याच योजने-पासून होतील. बाकीच्या सर्व घटनांतून भावी पेंचप्रसंग उद्भवण्याची शक्यता अगोदरच ध्यानांत घेऊन त्यासाठीं तरतूद केलेली असते. पण प्रो. कूपलंड यांच्या राज्यघटनेमध्यें पेंचप्रसंगांना तर दार सताड उघडेंच ठेवलेलें आहे; इतकेंच नव्हे, तर तिच्यामुळें पेंचप्रसंग न उद्भवणें अशक्यप्राय होणार आहे! परंतु पेंचप्रसंग उद्भवणें इतकें निश्चित असूनहि त्यावर उपाय काय तें मात्र सांग-ण्यांत आलेलें नाहीं. मध्यवर्ति केन्द्रांत एकत्र काम केल्यानें ऐक्यभावना निर्माण होईल असा जो आशावाद व्यक्त करण्यांत आला आहे, तो सर्वस्वीं निराधार आहे. कारण त्या ठिकाणीं एकत्र काम करणाऱ्या व्यक्तींनीं आपापसांत विचार-

विनिमय व चर्चा केल्यानंतर त्यांना जें योग्य, न्याय्य व उत्कृष्ट वाटेल तें करावें अशी अपेक्षा नसून केन्द्रस्थानापासून हजारों मैल दूर असणाऱ्या व प्राप्त प्रसंगांसंबंधीं विचारविनिमय करून योग्य व न्याय्य काय तें ठरविण्याची संधी न मिळणाऱ्या लोकांच्या मतानुसार त्यांनीं वागावें, अशी व्यवस्था या योजनेमध्यें करण्यांत आलेली आहे. त्यामुळें एकत्र काम करणें निरर्थक ठरणार आहे. कारण ज्यांच्यावर कार्य करण्याची जबाबदारी आहे, ते परप्रत्ययनेय अशा कळसूत्री बाहुल्यांप्रमाणें बनणार आहेत; आणि जे प्रत्यक्ष कार्यकर्ते आहेत, त्यांना एकत्र येण्याची संधी मिळणार नसून आपल्या हातांतील या कळसूत्री बाहुल्यांमार्फत दूर अंतरावरून त्यांना काम करवून घ्यावें लागणार आहे. याशिवाय निरनिराळ्या घटकांना प्रथमपासूनच मुसलमान व मुसलमानेतर ही भावना ठेवून कार्य करावयास लावलें जाणार आहे. त्यांत राष्ट्रीयत्वाला चुकूनसुद्धां अस्तित्व ठेवलें जाणार नाहीं. अशा परिस्थितींत ऐक्य निर्माण होण्याची आशाच कुठली?

प्रस्तुत घटना केवळ मुसलमान—विभागांना बिगर—मुसलमान—विभागांइतका दर्जा आणि अधिकार देण्याच्या हेतूनेंच केलेली आहे, हें निदर्शनास आणून दिल्यानंतर त्या घटनेच्या इतर बाजूंकडे लक्ष्य देण्याचीसुद्धां आवश्यकता नाहीं. या समान अधिकार आणि समान दर्जाबरोबरच या चारी विभागांनीं जबाबदारीचा सारखाच बोजा उचलावा अशी कल्पना कुठेंहि सुचवलेली दिसत नाहीं; उलट, याच्या नेमकें विरुद्धच गृहीत धरलें आहे. संरक्षण खात्यावरचा खर्च सोडला, तर आंतरप्रादेशीय केन्द्रासाठीं विशेष खर्च येणार नाहीं असें योजनाकारांचें म्हणणें आहे. महायुद्धापूर्वी जकातीच्या उत्पन्नांतून संरक्षणखर्च भागत असे; आणि महायुद्धानंतर अशीच परिस्थिति राहिली तर या खर्चासंबंधीं प्रश्नच राहणार नाहीं असें मानण्यांत आलें आहे. या चार विभागांनीं यासाठीं पूर्वी किती रक्कम दिली आणि भविष्यकालांत त्यांच्याकडून किती अपेक्षा आहे यासंबंधीं कांहींहि निर्देश करण्याची आवश्यकता या विद्वान् प्राध्यापकांना वाटलेली नाहीं ! पैसा खर्च करण्याच्या बाबतींत इतर विभागांच्या

बरोबरीचा अधिकार मुसलमानी विभागाला बहाल करण्यांत आला असून तो पैसा उभा करण्याच्या जबाबदारीचें ओझें मात्र मुसलमानेतर–विभागांच्या माथीं देऊन प्राध्यापक महाशय मोकळे झाले आहेत! ऐक्य असावें हें उत्तम; तथापि, वाटेल त्या अटींवर केलेलें ऐक्य फार महागांत पडण्याचा संभव असतो.

## ३७. सर सुलतान अहमद यांची योजना

सर सुलतान अहमद यांनीं "हिंदुस्थान व युनायटेड किंग्डम् यांच्यांतील तह" या आपल्या पुस्तकांत एक तिसरी योजना मांडलेली आहे. पाकिस्तान–योजनेचा विचार करून त्यांनीं पुढीलप्रमाणें निष्कर्ष काढला आहे:– "वायव्य आणि ईशान्य पाकिस्तानें सार्वभौम झालीं आणि त्यांचा हिंदुस्थानशीं घटनात्मक दृष्टया कसलाहि संबंध राहिला नाहीं, तर व्यवहारांत तीं अयशस्वी ठरतील. कारण त्यांना एक तर लष्करी अगर आर्थिक सुरक्षितता लाभणार नाहीं; आणि दुसरें कारण असें कीं बाकीच्या हिंदुस्थानमधील मुसलमानांना वरील पाकिस्तानांमुळें शांतता व न्याय प्राप्त होणार नाहींत. यासाठीं इतर पर्याय शोधून काढून त्यांवर विचार केला पाहिजे. मात्र हें करतांना जीवनांतील प्रत्येक क्षेत्रांत आपल्यावर हिंदूंचें वर्चस्व राहील अशी भीति बाळगणाऱ्या हिंदुस्थानांतील मुसलमानांचें समाधान झालें पाहिजे, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे."[१] आपण पर्यायादाखल मांडलेली योजना व्यवहार्य आहे आणि हल्लींच्या विशिष्ट परिस्थितींत ती गैरवाजवी नाहीं असा त्यांचा दावा आहे. ब्रिटिश सरकारनें आपल्या योजनेचा जो खर्डा मांडला त्याला आधारभूत मानून सर सुलतान अहमद यांनीं आपली योजना मांडलेली आहे. त्यांच्या योजनेंत निरनिराळ्या सार्वभौम घटकांचा एक केन्द्रयुक्त राज्यसंघ कल्पिलेला आहे. या घटकांच्या सरहद्दी आवश्यक वाटल्यास पुन्हां ठरवितां येतील. वायव्येकडील आणि ईशान्यकडील प्रांतांचे असे दोन घटक बनतील. त्यांच्या सरहद्दी

१. सर सुल्तान अहमद: हिंदुस्थान व युनायटेड किंग्डम् यांमधील तह, पृ. ८८.

वाटल्यास बदलण्यांत येऊन त्या घटकांत मुसलमानांची बहुसंख्या खूपच जास्त करतां येईल. हे घटक स्वायत्त आणि सार्वभौम असतील. त्या घटकांना अंतर्गत बाबतींत संपूर्ण स्वातंत्र्य मिळेल. बाह्य व्यवहारांसंबंधींचें त्यांचें स्वातंत्र्य, घटकराज्यांनीं परस्परांच्या अनुमतीनें जी सत्ता संघराज्याच्या हातीं सुपूर्त केली असेल, त्या सत्तेनें मर्यादित असें राहील.

(१) अधिकारः—मध्यवर्ति सरकारला खालील खात्यांवर अधिकार व नियंत्रण ठेवतां येईलः संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, चलन, जकाती, नभोवाणी, हवाई मार्ग, रेल्वे, नौकानयन, पोस्ट आणि टेलिग्राफ. शेषाधिकार घटकांकडे राहतील.

(२) संयुक्त विधिमंडळाची रचना पुढीलप्रमाणें राहीलः—मुसलमान ४० टक्के, हिंदू ४० टक्के, दलितवर्ग १० टक्के आणि हिंदी ख्रिश्चन, अँग्लो-इंडियन, वन्यजाती इत्यादींना उरलेले १० टक्के. या व्यवस्थेमुळें कोणाहि एकाकडे कायमचें बहुसंख्यत्व न राहतां तें बदलतें राहील आणि निरनिराळ्या गटांच्या संगनमतावर तें अवलंबून राहील. त्यामुळें बहुसंख्य बनण्याची संधी हिंदूंना काय किंवा मुसलमानांना काय सारखीच मिळेल. पण अशा प्रकारें मिळालेलें बहुसंख्यत्व इतकें बेताचें असेल, कीं विरुद्ध पक्षाच्या सौजन्यावर व साहाय्यावर अवलंबून राहणें त्या बहुसंख्य गटाला भागच पडेल.

(३) घटनाकारी समिति पुढीलप्रमाणें असावीः—हिंदू व मुसलमान या दोघांना ८० जागा मिळाव्यात. या ८० जागा ४० द्विमतदारसंघांतून भराव्यात. प्रत्येक मतदारसंघांतून एक मुसलमान व एक हिंदु प्रतिनिधि निवडला जावा. या प्रत्येक मतदारसंघाचे ५०० विभाग करावेत. प्रत्येक विभागानें साक्षर, घरमालक आणि कोणत्याहि प्रकारचा कर भरणाऱ्या सज्ञान हिंदूंच्या व मुसलमानांच्या स्वतंत्र याद्या बनवाव्यात. प्रत्येक विभागातर्फे अशा मतदारांनीं एक हिंदु व एक मुसलमान स्वतंत्रपणें निवडून द्यावा. अशा प्रकारें प्रत्येक मतदारसंघांत ५०० मुसलमान आणि ५०० हिंदू विभक्त मतदानपद्धतीनें निवडले जातील. या १००० लोकांनीं संयुक्त मतदान पद्धतीनें एक मुसलमान व एक हिंदु प्रतिनिधि निवडावा. अस्पृश्य आणि इतर वर्गांसाठीं

अशीच सोयीस्कर पद्धत अवलंबितां येईल. अशा रीतीनें निवडलेल्या कनिष्ठ विधिमंडळांतील ५ अगर १० टक्के प्रतिनिधी मिळून घटनाकारी समिति बनवितां येईल.

(४) कार्यकारी मंडळः—(अ) मंत्रिमंडळांत विधिमंडळाप्रमाणेंच जातीय प्रमाण राहील. (आ) मंत्रिमंडळ विधिमंडळास जबाबदार राहील. (इ) पंतप्रधान आलटून पालटून मुसलमान व बिगर-मुसलमान राहील. (ई) पंतप्रधान हिंदु असल्यास उपपंतप्रधान मुसलमान व पंतप्रधान मुसलमान असल्यास उपपंतप्रधान हिंदु असावा. (उ) सेनापति बिगर-मुसलमान असल्यास संरक्षणमंत्री मुसलमान असावा व सेनापति मुसलमान असल्यास संरक्षणमंत्र्याचें पद बिगर-मुसलमानास मिळावें. (ऊ) संयुक्त जबाबदारीची रूढी पाडण्यांत यावी. यांतील तत्त्वाचा विचार बाजूस ठेवला तरी त्यामुळें कोणत्याहि जमातीचें मत विचारांत न घेतां त्या जमातीवर परिणाम करणारा कोणताहि निर्णय घेतला जाणार नाहीं हा तिच्यापासून फायदा आहे. कारण त्या जमातीच्या मंत्र्यांनीं राजीनामा दिल्यावर मंत्रिमंडळ टिकवून ठेवणें अशक्य होईल.

(५) मुलकी नोकऱ्याः—मुलकी नोकर नेमतांना लायकीनुसार शक्य तोंवर वर दिलेलें प्रमाणच कायम राखावें. सर्वसाधारणपणें लायकी आणि वरिष्ठपणावर बढती अवलंबून ठेवावी.

(६) सार्वजनिक संस्थाः—स्थानिक स्वराज्य संस्था, कार्पोरेशन, नगरपालिका आणि यांसारख्या इतर संस्थांतून वरप्रमाणेंच जातीय प्रमाण असावें.

(७) सैन्यांतील नोकऱ्याः—५० टक्के मुसलमान आणि ५० टक्के मुसलमानेतर यांचें सैन्य बनवावें.

(८) संरक्षक बंधनेंः—या बाबतींत कॉंग्रेसनें काढलेला मूलभूत हक्कांचा जाहीरनामा आणि ज. जिनांनीं १४ मुद्यांत मागितलेलीं संरक्षक बंधनें यांचा उल्लेख करणें जरूर आहे. हीं संरक्षणें (अ) धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक आणि (ब) राजकीय व राज्यकारभारविषयक अशीं आहेत. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बंधनांचा विचार करतांना 'वन्दे मातरम्'मधील आक्षेपार्ह

भाग वगळून उरलेलें पद्य आणि महंमद इक्बालचें 'सारे जहाँसे अच्छा' हीं अधिकृत राष्ट्रगीतें समजावींत. कॉंग्रेसच्या निशाणावर मुसलमानी बोधचिन्हास जागा असावी. गोहत्या आक्षेपार्ह मानूं नये. परंतु सार्वजनिक गोवध बंद करावेत. आझाँ पुकारण्यास हरकत असूं नये. मशिदीसमोरून जातांना हिंदु-मिरवणुकीनें गायनवादन बंद टेवल्यास ती मिरवणूक विनाहरकत जाऊं देण्यांत यावी. भांडणतंटा नको म्हणून मध्यवर्ति केन्द्रांत इंग्रजी भाषा व रोमन लिपी यांचा वापर करावा. प्रांतांमध्यें स्थानिक भाषांचा उपयोग करण्यास परवानगी असावी. राजकीय व राज्यकारभारविषयक बंधनांचा विचार करतांना प्रादेशिक पुनर्रचनेमुळें प्रांतांतील मुसलमान—बहुसंख्येवर होणारा परिणाम लक्ष्यांत घ्यावा लागेल; मुसलमानांचा व्यक्तिगत कायदा आणि संस्कृति यांना कायदेशीर संरक्षण मिळावें, आणि स्थानिक संस्थांतील व सरकारी नोकऱ्यांतील जातीय प्रमाण कायद्यानें टरवून द्यावें. पाकिस्तानचा विचार सोडल्यास पहिला प्रश्नच उद्भवत नाहीं. बाकीच्या गोष्टी मात्र केव्हांहि मान्य केल्याच पाहिजेत. मध्यंतरीच्या काळांत उद्भवलेल्या इतर गाऱ्हाण्यांचाहि विचार व्हावयास हवा.

(९) संरक्षक बंधनांची हमीः—क्रिप्स्-योजनेंत अल्पसंख्याकांबाबत ब्रिटनवर असलेली जबाबदारी कायम राखण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. सार्वभौम हिंदी संघराज्य किंवा संपूर्ण वासाहतिक दर्जाचें सरकार, परकीय सत्तेनें घेतलेली हमी परिणामकारक रीत्या पार पाडूं शकेल असा विश्वास जर हिंदी लोकांना वाटत असेल, तर असल्या प्रकारच्या परकीय हमीला हिंदुस्थानकडून मान्यता मिळणें शक्य नाहीं. " अशी परिस्थिति असेल, तर आम्ही आमच्या भूमींतील कायद्यावर विश्वास टेवून घटकांच्या कोर्टामार्फत अगर संघराज्याच्या वरिष्ठ कोर्टामार्फत अगर आंतरराष्ट्रीय कोर्टामार्फत आमच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेऊं " असें ग्रंथकर्त्यानें म्हटलें आहे.

(१०) धार्मिक स्वातंत्र्य आणि शैक्षणिक व धर्मादाय संस्थांबाबत सांस्कृतिक संरक्षक बंधनें टेवतांना इस्टोनियांतील सांस्कृतिक स्वातंत्र्याच्या कायद्याला अनुसरून संरक्षणें द्यावींत; अल्पसंख्याकांच्या संस्था, धार्मिक, सामाजिक आणि

शैक्षणिक हक्कांची व्यवस्था ठेवण्यासाठीं आणि त्यांच्या संस्कृतीचें संरक्षण करण्यासाठीं घटका–घटकांतून सांस्कृतिक मंडळें स्थापावीत.

(११) राजकीय संरक्षणें:—एकाद्या बिलानें कोणत्याहि जमातीवर प्रतिकूल परिणाम होणार असेल, तर त्या जमातीच्या तीनचतुर्थांश सभासदांनीं अनुकूलता दर्शविल्याखेरीज त्या बिलाचें वाचन सुरू करूं नये.

(१२) शीख जमातीसंबंधींचे ठराव फक्त पंजाबच्या विधिमंडळामध्यें मांडण्यांत यावेत व (९) व्या परिच्छेदांतील संरक्षणें त्यांना लागू असावींत.

(१३) पारशी जमातीसंबंधींचे ठराव फक्त मुंबईच्या विधिमंडळामध्यें मांडण्यांत यावेत व (९) व्या परिच्छेदांतील संरक्षणें त्यांना लागू असावींत.

## घटक

संयुक्त राज्याचीं विधिमंडळें मंत्रिमंडळें व नोकऱ्या यांच्यांतील हिस्सेवारीसंबंधीं पुढील सूचना विचारांत घेतल्या जाव्यात:—

(अ) अल्पसंख्याकांचा विभक्त मतदारसंघाचा हक्क राखण्यांत यावा. परंतु 'घटनाकारी समिति' या मथळ्याखालील परिच्छेदांत प्रतिनिधित्वाची जी पद्धति सुचविण्यांत आली तिचा अवलंब करण्यांत यावा.

(आ) बंगालव्यतिरिक्त सर्व प्रांतांतील अल्पसंख्याकांच्या जादा जागा कायम ठेवाव्यात. युरोपियनांना देण्यांत येणाऱ्या जादा जागांत बरीचशी कपात करावी.

(इ) घटकांच्या चतुःसीमा अवश्य तर बदलण्यास हरकत नाहीं. तथापि तेथील बहुसंख्याकांना अल्पसंख्यत्व प्राप्त होईल, अशा रीतीनें त्या बदलूं नयेत.

(ई) यावच्छक्य व कार्यक्षमतेला बाध न येईल तर प्रांतिक विधिमंडळांमध्यें जें जातवारीचें प्रमाण आहे, तेंच येथील विधिमंडळांत व मंत्रिमंडळांत ठेवावें.

(उ) (४), (५), (६), (८), (९), (१०), (११), (१२) यांत दिलेल्या तरतुदी लागू पडतील तेवढ्या मर्यादेपर्यंत व विशेषेंकरून अल्पसंख्याकांच्या संरक्षणाच्या बाबतींत घटकांनाहि त्या लागू कराव्यात.

दुसरा एक पर्याय सुचविण्यांत आला आहे तो असा कीं, मध्यवर्ति सरकारांत समानतेचें तत्त्व राखण्यासाठीं हिंदू व मुसलमान यांना आलटून पालटून

५१टक्कयांचें प्रमाण देऊन त्यांचें निर्विवाद बहुमत करावयाचें. यामुळें स्वतःचे बाजूस मतें ओढण्याच्या कारस्थानाची जरुरी न राहून समजूतदारपणा आणि एकवाक्यता यासाठीं आवश्यक असलेलें वातावरण निर्माण होईल. हातांतील हें तारू कांहीं काळानें दुसऱ्या पक्षाच्या हातीं जाणार आहे आणि आपण कांहीं गडबड केल्यास त्याचा बदला घेतला जाण्याचा संभव आहे याची कल्पना असल्यानें, दोन्ही पक्षांतील विकृत प्रवृत्तींना चांगलाच आळा बसेल. यांत उणीव आहे ती ही कीं, ४० : ४० प्रमाण असलेल्या योजनेमध्यें ज्या अन्य अल्पसंख्याकांच्या हातीं कांहीं निर्णायक सत्ता राहिली असती, ते अल्पसंख्याक या योजनेमुळें जवळजवळ नामशेष होत आहेत.

सर सुलतान अहमद यांच्या वर दिलेल्या योजनेंत निःसंदिग्धपणाचा गुण प्रामुख्यानें दिसून येतो. प्रादेशिकवादाच्या किंवा तत्सम कोणत्याहि वादाच्या शब्दजंजालाआड आपल्या इच्छा व हेतू दडविण्याचा यांत प्रयत्न नसून त्यांना खरोखर काय पाहिजे तें त्यांत सरळ सरळ सांगितलेलें आहे. म्हणून एक योजना या दृष्टीनें तिची विचारपूर्वक पारख करणें आवश्यक आहे. लीगच्या विचारसरणीच्या आहारीं न गेलेल्या सर्वांसच संयुक्त–राष्ट्र असणें संमत आहे. कोठल्याहि परिस्थितींत, आणि कितीहि मर्यादित अधिकाराचें संयुक्त–राष्ट्र अमान्य असणारी मुस्लिम–लीग ही एकटीच संस्था देशांत विद्यमान आहे. मध्यवर्ति सरकारच्या हातीं सोंपविण्याच्या खात्यांबाबतहि तडजोड न होण्याइतके अनुल्लंघनीय अडथळे आहेत असें नव्हे. सर सुलतान अहमद यांनीं दिलेली यादी जवळजवळ संपूर्ण आहे. त्यांतून वगळण्यांत आलेल्या एका महत्त्वाच्या म्हणजे नियोजनांच्या बाबतींत मतभेद होणें शक्य असलें, तरी तो मतभेद न मिटवितां येण्याइतका तीव्र होईल हें संभवनीय नाहीं. ज्या अखिल भारतीय राष्ट्रसभा समितीवर सरकारकडून व अखिल भारतीय मुस्लिम–लीगच्या अध्यक्षांकडून एवढी जहरी टीका करण्यांत येत असते, त्या समितीनें ऑगस्ट १९४२ चा ठराव पसार केल्यानंतर प्रांतांकडे शेषाधिकार जावेत, याबद्दल कोणाहि राष्ट्रसभावाद्याची हरकत असणें शक्य नाहीं.

बाकीची योजना कांहीं विशिष्ट गृहीत कल्पनांवर आधारलेली आहे. बहुसंख्याक असलेले हिंदू एक होऊन मुसलमानांवर पूर्वीपासून जुलूम करीत आले आहेत आणि यावच्चंद्रदिवाकरौ ते असाच जुलूम करीत राहणार, ही त्यांतील एक मूलभूत कल्पना आहे. म्हणून त्यांच्या या जुलुमास प्रतिबंध करण्यासाठीं एकादी राज्यघटनात्मक योजना आंखणें क्रमप्राप्त आहे. या योजनेंत हिंदूंवर तिहेरी प्रहार करण्यांत आले आहेत. पण अर्थातच त्यांस सरसाहेब जबाबदार नाहींत. अस्पृश्यांना हिंदूंपासून वेगळे काढून लोकसंख्येंतील हिंदूंच्या प्रमाणांत घट करावयाची हा त्यांतील पहिला प्रहार होय. वन्य-जातींची गणना हिंदूंमध्येंच करावयास पाहिजे, असें अधिकारी वंशशास्त्रज्ञांचें ठाम मत असल्याचें अन्यत्र दाखविलेंच आहे. असें असूनहि या वन्य-जातींना हिंदुजातीपासून फोडावयाचें हा दुसरा प्रहार होय; आणि अखेरचा प्रहार म्हणजे कायदेमंडळांतील कार्यकारी-मंडळांतील आणि सरकारी नोकऱ्यांतील त्यांचें न्याय्य प्रतिनिधित्वहि घटनेच्या जोरावर आहे त्याहूनहि कमी करावयाचें. सरसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं १३·५ टक्के अस्पृश्य व ५·६५ टक्के वन्यजाती वगळून, सर्व लोकसंख्येच्या ५१टक्के प्रमाणांत राहिलेल्या हिंदूंना मध्यवर्ति सरकारांत ४० टक्के प्रतिनिधित्व असावें. उलट, २६·८३ टक्के प्रमाणांत असलेल्या मुसलमानांनाहि ४० टक्के प्रतिनिधित्व मिळावें. ज्या अस्पृश्यांचा पुळका आल्याचें लीग दाखविते, त्यांचें प्रमाणहि १३·५ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत खालीं आणण्यांत आलें आहे. या प्रकरणीं नुकत्याच घडलेल्या इतिहासांतील एक लहानसा दाखला देणें अप्रस्तुत ठरणार नाहीं. राष्ट्रसभा व मुस्लिम-लीग यांमध्यें झालेल्या लखनौ-करारान्वयें मुसलमान-अल्पसंख्य असलेल्या प्रांतांतून त्यांना जादा सवलती देण्यांत आल्या. तदनुसार संयुक्तप्रांत व मद्रास या प्रांतांत त्याचें प्रमाण अनुक्रमें १४ टक्के व ६·१५ टक्के असतांना त्यांना अनुक्रमें ३० टक्के व १५ टक्के या प्रमाणांत प्रतिनिधित्व देण्यांत आलें. तसेंच बिहार व ओरिसा येथें त्यांचें प्रमाण १० ते ११ टक्के असतांना तेथें त्यांना २५ टक्के प्रतिनिधित्व देण्यांत आलें. मात्र ते बहुसंख्य

असलेल्या पंजाब व बंगाल प्रांतांत ५२·३ टक्के व ५१ टक्के या प्रमाणाऐवजी त्यांना अनुक्रमें ५० टक्के व ४० टक्के प्रतिनिधित्व मिळालें. ब्रिटिश सरकारनें हा करार स्वीकारून १९२० च्या घटनेंत हें प्रतिनिधित्वाचें प्रमाण अंतर्भूत केलें. परंतु मुसलमान असंतुष्टच राहिले व त्यांनीं ही घटना झिडकारिली. कारण त्यांचें असें म्हणणें होतें कीं, ते बहुसंख्य असलेल्या प्रांतांतून त्यांचें प्रमाण घटविण्यांत आल्यानें त्यांचेवर अन्याय होतो. कोठेंहि बहुसंख्याकांचें प्रमाण ते अल्पसंख्य बनतील किंवा त्यांचें समप्रमाण होईल इतकें घटविण्यांत येऊं नये अशी त्यांनीं मागणी केली. आतां मात्र त्यांनीं पलटी मारली आहे. बहुसंख्य हिंदूंना असहाय्य अल्पसंख्याकांच्या पंक्तीला आणून बसविणाऱ्या योजनेचा मुस्लिम–लीगच्या विचारसरणीचे लोक गंभीरपणें पुरस्कार करीत आहेत! सर्व हिंदुस्थानमध्यें हिंदू बहुसंख्य असले तर त्यांचें राज्य मात्र घातुक ठरतें; परंतु वायव्य व पूर्व–विभाग यांसारख्या मुसल्मानी बहुसंख्य प्रदेशांत मुसलमानांचें राज्य असलें तर तें मात्र घातुक ठरत नाहीं, असा हा युक्तिवाद आहे! मध्यवर्ति सरकारांतील सरसाहेबांच्या नियोजित प्रतिनिधित्वामागें हीच विचारसरणी आहे. त्यांत हिंदूंशीं समप्रतिनिधित्व साधतां यावें म्हणून हिंदूंचें प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत घटविण्यांत आलें असून मुसलमानांचें प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत आलें आहे. हिंदु–मुसलमानांमध्यें समतोल राखण्याचीं सूत्रें अन्य अल्पसंख्याकांच्या हातीं राहतील हा सर सुलतान आपल्या योजनेंतील एक विशेष गुण समजतात. पण हा समतोल राखण्याचें कार्य कायदेमंडळांपुरतेंच आहे असें नव्हे; त्याचे धागेदोरे थेट कार्यकारी–मंडळ आणि सरकारी नोकऱ्या येथपर्यंत गेले आहेत. कांहीं बाबतींत तर त्याची मजल यापुढेंहि गेली आहे. या योजनेनुसार आळीपाळीनें मुसलमान व मुसलमानेतर पंतप्रधानाची नेमणूक करण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. मुसलमानेतरांमध्यें ख्रिस्ती, पारशी, वन्यजाती, अस्पृश्य आणि इतर सर्वांचा समावेश होतो. अर्थात् हिंदूदेखील यांतच समाविष्ट आहेत. पंतप्रधानाची जागा कांहीं विशिष्ट कालावधीनंतर मुसलमानांस मिळेल याची या योजनेंत निश्चिती असून हिंदूंना यांत

वाऱ्यावर सोडलेलें आहे ! कां कीं, मुसलमानांशीं सर्व अल्पसंख्याकांनीं एकजूट केली तर हिंदूंना पंतप्रधानकी कधींच लाभणार नाहीं. हिंदूंना ती जागा मिळूं नये म्हणून इतर सर्व अल्पसंख्याक कट करतील असें समजून चालणें योग्य होणार नाहीं, असा युक्तिवाद कदाचित् करण्यांत येईल. सर्व मुसलमानेतर मुसलमानांविरुद्ध कांहींतरी कावा करतील असें समजून चालण्यापेक्षां वरील समजूत खचित अधिक अन्याय्य नाहीं. या दोन्हींपैकीं कोणतीहि गोष्ट होण्याची शक्यता सारखीच आहे. केवळ हिंदू व मुसलमान यांच्यापुरतीच पंतप्रधानाची जागा आळीपाळीनें राखून ठेवण्यांत आली नाहीं हाहि सरसाहेबांचा चांगुलपणाच म्हणावयाचा ! तीच गोष्ट संरक्षणखात्याची. संरक्षण–मंत्री मुसलमान असल्यास सरसेनापति मुसलमानेतर व संरक्षण–मंत्री मुसलमानेतर असल्यास सर सेनापति मुसलमान असावयाचा. यांतसुद्धां मुसलमान व इतर अहिंदू यांनीं मनांत आणल्यास त्यांना हिंदूंना दोन्ही जागांपासून दूर ठेवणें अगदीं सहज शक्य आहे. सनदशीर मार्गांनीं मुसलमानांच्या हितसंबंधाचें रक्षण करण्यापेक्षां सूडबुद्धीनें हिंदूंची छळणूक नि गांजणूक करण्याचाच उद्देश यांत अधिक दिसतो.

सर सुलतान यांच्या योजनेंतील परिच्छेद ६, मधील सार्वजनिक संस्थांसंबंधींची तजवीज तर न समजण्यासारखी आहे. लोकसंख्येंतील प्रमाण कांहींहि असलें, तरी सर्व प्रांतांतून कॉर्पोरेशन, म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांतसुद्धां हिंदु–मुसलमानांचें ४०:४० हेंच प्रमाण लागू करावें, असा त्यांचा उद्देश आहे कीं काय ? अशी योजना कोठल्याहि खऱ्याखुऱ्या चर्चेंत विचारांतसुद्धां घेतां येणार नाहीं. याची निष्पत्ती खरोखर काय होईल याचा कांहींएक विचार न करतांच सरसाहेबांनीं ही योजना मांडली असावी, असा मला संशय येतो ! जेथें त्यांचें संख्याप्रमाण एक ते दीड टक्का आहे अशा ओरिसा प्रांतांतील म्युनिसिपालिटीमध्यें वा स्थानिक संस्थांमध्यें मुसलमानांना ४० टक्के प्रतिनिधित्व असावें असें सरसाहेब मनापासून सुचवितील अशी कल्पनाच मला करवत नाहीं !

सैन्यांतील जातवारीचें प्रमाणहि मुसलमान व मुसलमानेतर यांना ५० : ५०

टक्के असावें असें त्यांनीं सूचित केलें आहे. त्यांत एकहि हिंदु नसला तरी तें घटनेविरुद्ध वा बेकायदेशीर होणार नाहीं, असाहि याचा अर्थ होऊं शकेल. उदा० मुसलमानेतर सैन्यविभागांत सर्वच्या सर्व सैनिक शीख वा ख्रिश्चनहि असूं शकतील. सर सुलतान यांना खरोखरीच तसा अर्थ अभिप्रेत नाहीं असें यावर म्हटलें जाईल. मीं फक्त वरील विधानाचा काय अर्थ होऊं शकेल तें दाखविलें आहे. मुसलमानी हक्कांचा संबंध आल्यास अगदीं निःसंदिग्ध शब्दयोजना करणाऱ्या सरसाहेबांनीं इतर बाबतींतहि कांटकोर भाषा वापरावी अशी आमची अपेक्षा असल्यास त्यांत अनुचित काय आहे ?

धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संरक्षणाबाबतच्या तपशिलांत शिरण्याची आवश्यकता नाहीं. येवढें सांगितलें म्हणजे पुरे, कीं या योजनेनुसार गोवध वा 'आझाँ' बाबत ढवळाढवळ करतां येणार नाहीं असें अपेक्षिण्यांत आलें असून हिंदूंची मिरवणूक चालली असेल तर त्यांनीं मात्र दंगा होऊं नये म्हणून मशिदीवरून जातांना आपलीं वाद्यें बंद केलीं पाहिजेत अशी अपेक्षा दिसते !

भाषा व लिपी यांबाबत वाद निर्माण होऊं नये म्हणून त्यांनीं 'मुले कुठारः' या न्यायानें असें सुचविलें आहे कीं, मध्यवर्ति सरकारांत इंग्रजी भाषा व रोमन लिपी यांचा उपयोग करावा व प्रांतांना आपल्या स्थानिक भाषेचा उपयोग करण्याचें स्वातंत्र्य असावें.

या योजनेंतील पक्षपातीपणा व त्यामुळें होणारा हिंदूंवरील अन्याय मीं स्पष्ट केला असला, तरी या योजनेंत चर्चिण्याजोगा कांहींच अंश नाहीं किंवा उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा शांतपणें, निःपक्षपातीपणें व पूर्वग्रहविरहित विचार केल्यास यांत सुधारणा करतां येणार नाहींत, असें माझें म्हणणें असल्याबद्दलचा गैरसमज मात्र कोणीं करून घेऊं नये.

## ३८. सर आर्देसर दलाल यांची योजना

१९४३ च्या मे महिन्यांत वृत्तपत्रांतून 'पाकिस्तानचे पर्याय' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालेल्या कांहीं लेखांत सर आर्देसर दलाल यांनीं दाखवून आहे कीं, हिंदुस्थान हा समुद्र आणि पर्वत यांनीं मर्यादित अशा नैसर्गिक सीमा असलेला केवळ एक भौगोलिक घटक आहे असें नव्हे; तर अनादिकालापासून सांस्कृतिक व आध्यात्मिक दृष्टयाहि तो एक आहे. सहिष्णुता व लवचिकपणा हीं हिंदी संस्कृतीचीं जां वैशिष्टयें, त्यांच्यामुळें हिंदुस्थानांत येऊन दाखल होणाऱ्या टोळ्यांना अथवा जेत्यांना येथें स्थिर होण्यास संधी देऊन आणि त्यांना आपल्यामध्यें सामील करून घेऊन जो समाज बनत गेला, त्यांतील अनेक पिढ्यांच्या संस्कृतींतून, परंपरेंतून व चालीरीतींतून या एकतेचा उदय झालेला आहे. आणि या एकीचाच पाकिस्तानच्या योगानें नाश होणार असल्यानें निरुपाय झाला तरच पाकिस्तानचा विचार करणें उचित होईल." पाकिस्तानचे परिणाम काय होतील याचा थोडक्यांत परामर्श घेऊन त्यांनीं असा निर्णय दिला आहे कीं, "पाकिस्तानमुळें इतरांच्यापेक्षां मुसलमानांचेंच अधिक अकल्याण होईल आणि हिंदुस्थानचा हा अखंड घटक छिन्नविच्छिन्न केल्यास अशा कांहीं आर्थिक अडचणी निर्माण होतील कीं त्या दूर करणें जवळजवळ अशक्य ठरेल." "जोंपर्यंत राजकीय पक्षांची उभारणी राजकीय व आर्थिक तत्त्वांपेक्षां धार्मिक तत्त्वानुसार होत राहील, तोंपर्यंत येथें ब्रिटिश—लोकसत्तेच्या पद्धतीची लोकसत्ता प्रस्थापित झाल्यास आपणांला गुलामगिरींतच रहावें लागेल, आणि इतर देशांतील राजकीय पक्षांप्रमाणें अधिकारसूत्रें हातीं घेण्याची संधी आपणांला मिळणार नाहीं, अशी शंका मुसलमानांच्या मनांत वावरत असते. अखंड हिंदुस्थानच्या मध्यवर्ति सरकारला त्यांच्याकडून होणाऱ्या विरोधाचें मूळ हें आहे. अल्पसंख्याकांच्या मनांत हा जो अविश्वास निर्माण झालेला आहे तो नाहींसा करून त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठीं रास्त तो त्याग करणें हें बहुसंख्य हिंदूंचें कर्तव्य ठरतें" या दृष्टीनेंच त्यांनीं आपली पर्याययोजना मांडली असून ती पुढीलप्रमाणें आहेः—

**हिंदुस्थानची भावी राज्यघटना** संयुक्त पद्धतीची व अपरिवर्तनीय अशी राहील. त्यांत मंत्रिमंडळ व न्यायमंडळ असेल. देशांमध्यें सर्वश्रेष्ठ संयुक्त न्यायालय प्रस्थापित होईल व कायद्यानुसार घटनेची अंमलबजावणी होईल. अगदीं जरूर तेवढींच खातीं मध्यवर्ति सत्तेच्या हातीं देण्यांत येऊन इतर सर्व खातीं व शेषाधिकार घटकांच्या हातीं सुपूर्त करण्यांत येतील.

**मध्यवर्ति खात्यांत** संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, चलन, जकाती, प्रांतीवरील संयुक्त सरकारचे कर, आगगाड्या, टपाल व तारखातें, जलमार्ग व व उद्योगधंद्यांची वाढ यांचा समावेश होईल. ज्या विभागांत मुसलमानांची बहुसंख्या आहे, तेथें त्यांना स्वायत्तप्राय अशीं राज्यें प्रस्थापित करतां यावींत म्हणून, घटकांच्या चतुःसीमांची फेरआंखणी करण्यास प्रत्यवाय नसावा.

व्यक्तिमात्राचें वैयक्तिक, मुलकी व धार्मिक स्वातंत्र्य अबाधित राहील अशी हमी देणारा मूलभूत हक्कांचा जाहीरनामा तयार करण्यांत यावा व तो पुढील पद्धतीवर असावाः—

हिंदी संयुक्त–राज्यांतील सर्व नागरिकांना न्यायासनासमोर समान लेखण्यांत येईल.

भाषण–स्वातंत्र्य, मुद्रण–स्वातंत्र्य व संघ–स्वातंत्र्य अबाधित राखण्यांत येतील. कोणत्याहि व्यक्तीची चौकशी करण्याचें अथवा तिला शिक्षा देण्याचें काम लायक अशा कोर्टाकडून कायदेशीरपणेंच करण्यांत येईल.

हरएक निवासस्थान पवित्र समजलें जाईल.

कोणाहि व्यक्तीला तिच्या धर्मामुळें अथवा मतपंथामुळें किंवा ती एकाद्या विशिष्ट वंशाची, जातीची वा वर्गाची आहे म्हणून कोणाहि प्रकारें कमी लेखण्यांत येणार नाहीं.

धर्मासंबंधीं स्वमतानुसार आचार करण्याची संधी राहील. उपासना, प्रचार, संघटना व शिक्षण याबाबतचें स्वातंत्र्यहि त्यांत समाविष्ट आहे. कायद्यानुसार सर्व धर्मांना समान लेखण्यांत येईल.

अल्पसंख्य म्हणून स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठीं ज्या गोष्टी

मूलभूत मानण्यांत येत असतील त्यांचें पूर्ण संरक्षण सरकार करील. शिक्षण, भाषा, धर्म व वैयक्तिक कायदा यांच्याविषयीं अल्पसंख्याकांना खास संरक्षण मिळेल. स्वतःच्या खर्चानें धर्मादायाच्या व धार्मिक संस्था स्थापन करून व शाळा काढून तेथें शिक्षणाची व स्वधर्मासंबंधींचें ज्ञान करून देण्यासंबंधींची सोय स्वभाषेंतून करण्याचा हक्क सर्व अल्पसंख्याकांना सारखाच राहील.

ज्या खेड्यांमध्यें अल्पसंख्य जमातींतील किमानपक्षीं पन्नास तरी मुलांच्या शिक्षणाची ज्यांच्यावर कायदेशीर जबाबदारी आहे अशा व्यक्तींनीं मागणी केल्यास त्यांच्या भाषेंतून शिक्षण देण्याची प्राथमिक शाळा तेथें स्थापन करण्यांत येईल.

अल्पसंख्याकांनीं जर शाळा, विश्वविद्यालयें इत्यादीं सारख्या संस्था स्थापन केल्या असतील व त्या नियमानुसार चालत असतील, तर सार्वजनिक अथवा बहुसंख्य जमातींनीं काढलेल्या संस्थांप्रमाणेंच त्यांनाहि सरकारकडून मदत मिळण्याचा हक्क राहील.

**मतदानाचा हक्क** अधिक व्यापक करण्यांत येईल. परंतु, जातीय मतदार–संघ मात्र कायम ठेवावे लागतील. मुसलमानांव्यतिरिक्त ज्या अल्पसंख्य जमाती आहेत, त्यांच्यासाठीं अनेकसंख्य मतदारसंघांमध्यें राखीव जागा ठेवण्याचा जो उपाय अवलंबिण्यांत आला आहे, तो त्यांची इच्छा असल्यास व्यापक करण्यांत यावा. मुसलमानांची इच्छा असल्यास त्यांच्याहि बाबतींत अशीच योजना करण्यांत यावी. स्थानिक स्वराज्याच्या संस्थांमध्येंहि याच पद्धतीचा स्वीकार करण्यांत यावा.

मुसलमान व अस्पृश्य जाती यांना मिळालेल्या जादा जागा कायम ठेवण्यांत याव्यात. बंगाल–प्रांताच्या बाबतींत मात्र शक्य तर परस्परांच्या संमतीनें पुणें–करारामध्यें फेरबदल घडवून आणावा. घटकराज्यांच्या चतुःसीमा बदलण्यांत आल्यास जागांचीहि फेरवांटणी करावी लागेल. फेरआंखणी झालेल्या घटकांमध्यें जर मुसलमान अल्पसंख्य असतील तर त्यांना हल्लींच्या प्रमाणांतच जादा जागा देण्यांत येतील. परंतु जेथें हिंदू अल्पसंख्य असतील तेथें त्यांनाहि तशीच सवलत द्यावी लागेल. कोणत्याहि घटकांमध्यें अल्पसंख्याकांना इतक्या जागा देण्यांत येऊं नयेत, कीं ज्यामुळें बहुसंख्याकांना अल्पसंख्यत्व प्राप्त होईल.

घटकराज्यांतील मंत्रिमंडळ विधिमंडळांत निवडून आलेल्या प्रतिनिधींतूनच निवडण्यांत येईल. परंतु तें संमिश्र स्वरूपाचें असेल व तें बनविण्याची पद्धति खालीलप्रमाणें राहील:—

ज्या अल्पसंख्याकांचें लोकसंख्येंतील प्रमाण एका निश्चित केलेल्या मर्यादेहून अधिक असेल, त्यांना एकंदर लोकसंख्येंतील त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत मंत्रिमंडळांमध्यें जागा मिळण्याचा हक्क सर्वसामान्यतः राहील. किंवा पर्याय म्हणून विधिमंडळांत त्यांचें जें प्रमाण असेल त्या प्रमाणानुसार त्यांना मंत्रिमंडळांत जागा देण्यांत येतील.

मंत्र्यांची संख्या नेमकी किती असावी तें समिति नेमून ठरवून घ्यावें लागेल. प्रत्येक जमातीचे प्रतिनिधी म्हणून जे मंत्री असतील त्यांची निवड विधिमंडळांतील त्या जमातीच्या प्रतिनिधींमार्फत प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वावर करण्यांत येईल. अल्पसंख्याकांच्यासाठीं कायद्यानें मंत्र्यांची जी संख्या निश्चित केलेली असेल, तिच्या व्यतिरिक्त एकादा मंत्री अल्पसंख्य जमातींतून घ्यावा असें मुख्य प्रधानाला वाटल्यास त्याच्या मार्गांत वरील नियमामुळें कोणताहि बाध येणार नाहीं.

मध्यवर्ति कायदेमंडळांत मुसलमानांना ज्या जागा देण्यांत येतील त्यांची संख्या एकंदर जागांच्या ३३$\frac{1}{3}$ टक्के असेल. परंतु स्त्रिया अथवा मजूर, जमीनदार, व्यापारी इत्यादि खास वर्गांना दिलेल्या जागा वगळून ज्या जागा इतर सर्व अल्पसंख्याकांना देण्यांत येतील, त्यांची गोळाबेरीज एकंदर जागांच्या ५० टक्यांहून केव्हांहि अधिक असणार नाहीं.

केंद्रीय मंत्रिमंडळ संमिश्र असेल व त्यांत एकतृतीयांश मंत्री मुसलमान असतील. ते विधिमंडळांतील मुसलमान–प्रतिनिधींमार्फत प्रमाणशीर मतदानाच्या पद्धतीनें निवडले जातील. त्याच पद्धतीनें शीखांचा एक व अस्पृश्यांचा एक मंत्री निवडण्यांत येईल. अल्पसंख्याकांचें प्रतिनिधित्व करणाऱ्या मंत्र्यांची संख्या पन्नास टक्यांहून अधिक असणार नाहीं. परंतु मुख्य प्रधानाला जरूर वाटल्यास कायद्यानें निश्चित केलेल्या या प्रमाणव्यतिरिक्त अल्पसंख्य जातींतून मंत्री घेण्याचा अधिकार त्यास राहील.

मंत्रिमंडळ विधिमंडळाला जबाबदार राहील आणि मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव विधिमंडळाला करतां येईल. परंतु अशा ठरावासाठीं विधिमंडळांतील बहुसंख्य मतें निर्विवादपणें ठरावाच्या बाजूनें पडलीं पाहिजेत व सभास्थानीं एकंदर सभासदांच्या संख्येपैकीं दोनतृतीयांश सभासद हजर असले पाहिजेत. आपल्या सांस्कृतिक व धार्मिक हितसंबंधांना बाध येतो अथवा आतांपर्यंत प्रचलित असलेल्या वैयक्तिक कायद्याच्या विरुद्ध आहे म्हणून जर एकाद्या कायद्याला किंवा ठरावाला किंवा त्यांतील एकाद्या भागाला विधिमंडळांतील कोणत्याहि जमातीच्या प्रतिनिधींपैकीं तीनचतुर्थांश प्रतिनिधींनीं विरोध दर्शविला, तर तो कायदा अथवा ठराव अथवा त्यांतील तो भाग कोणत्याहि विधिमंडळांत संमत करण्यांत येऊं नये. ज्या जमातीला विधिमंडळांतील एकंदर सभासदांच्या संख्येपैकीं किमानपक्षीं पंधरा टक्के प्रतिनिधित्व नसेल, तिला वरील अधिकार राहणार नाहीं. या कलमाच्या कक्षेंत एकादा कायदा वा ठराव येतो किंवा नाहीं यावर मतभेद निर्माण झाल्यास, तत्संबंधींचा निर्णय संयुक्त सरकारच्या न्यायालयाकडे सोंपविण्यांत येईल.

संयुक्त न्यायालयांत पांच न्यायाधीश असतील व त्यांपैकीं दोन मुसलमान असतील.

मुसलमानांचें सैन्यांतील प्रमाण १९३८ च्या प्रमाणाहून कधींहि कमी असणार नाहीं.

हिंदुस्थान सरकारच्या नं. एफ्. १४।१७ व्हीं ३ ३ या जुलै १९३४ च्या ठरावामध्यें नोकऱ्यांतील जें जातवार प्रमाण घालून देण्यांत आलेलें आहे, तेंच आवश्यक अशा किरकोळ सुधारणा करून राज्यघटनेंत समाविष्ट करण्यांत येईल. तत्प्रीत्यर्थ भरविण्यांत आलेल्या मध्यवर्ति कायदेमंडळाच्या बैठकीमध्यें दोनतृतीयांश बहुमत झाल्याशिवाय आणि घटकराज्यांमध्यें वरिष्ठ व कनिष्ठ अशीं कायदेमंडळाचीं दोन गृहें असतील तर त्यांच्या संयुक्त बैठकीमध्यें नाममात्र बहुसंख्येनें अनुकूल अभिप्राय मिळाल्याशिवाय राज्यघटनेमध्यें कोणत्याहि प्रकारचा बदल घडवून आणतां येणार नाहीं.

कोणत्याहि कायद्याचें घटनाविहितत्व संयुक्त न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून राहील.

वरिष्ठ विधिमंडळें, समान व विभक्त अधिकारक्षेत्रें इत्यादि जे अनेक मुद्दे हिंदुस्थानची राज्यघटना ठरवीत असतांना निर्माण होतात, तत्संबंधींच्या कोणत्याहि सूचना वरील योजनेमध्यें केलेल्या नाहींत. घटनाकारी समितीनेंच तत्संबंधीं निर्णय घ्यावयास हवा. तथापि, अल्पसंख्याकांना संरक्षण देण्याचा जो मुख्य प्रश्न त्याला यामुळें बाध आलेला नाहीं.

हिंदी संस्थानांचा प्रश्न सध्यां वगळलेलाच बरा.

वर आंखलेली राज्यघटना आदर्श आहे असें म्हणण्याचा आशय नाहीं. 'संमिश्र मंत्रिमंडळें स्थापन करणें हें या सूचनांचें सार आहे असें मी मानतों' असे उद्गार सर दलाल यांनीं काढले आहेत. ही घटना लेखनिविष्ट केलेली असून ती बदलण्याचा जो मार्ग सुचविण्यांत आला आहे, त्यामुळें अल्पसंख्याकांना स्वमतप्रतिप्रादनार्थ पुरेसा वाव मिळणार आहे, त्यांच्या धार्मिक व सांस्कृतिक स्वायत्ततेचें संरक्षण होणार आहे, सैन्यासकट सर्व सरकारी नोकऱ्यांमध्यें त्यांना न्याय्य वांटा मिळवून देण्याची हमी त्यामध्यें आहे, हीं या घटनेंतील वैशिष्ट्यें होत. विधिमंडळांमध्यें अल्पसंख्याकांना जादा जागा देण्यांत आलेल्या असून मध्यवर्ति मंत्रिमंडळांत व घटकराज्यांच्या मंत्रिमंडळांमध्येंहि त्यांना प्रतिनिधित्व देण्यांत आलेलें आहे. कोणत्याहि संयुक्तराज्यव्यवस्थेमध्यें जितकी स्वायत्तता घटकराज्यांना देतां येणें शक्य आहे, तितकी स्वायत्तता या घटनेनुसार देण्यांत आलेली आहे. घटनेनें दिलेल्या सवलतींचें उल्लंघन झाल्यास संयुक्त न्यायालयास हस्तक्षेप करण्याचा अधिकारहि घटनेनुसार दिलेला आहे.

हीं संरक्षणें केवळ कागदी संरक्षणें नव्हत. घटनेचा संपूर्णपणें भंग केल्यावांचून त्या संरक्षणांचें उल्लंघन करणें शक्य होणार नाहीं. त्यांचें उल्लंघन झाल्यास कदाचित् यादवी माजेल. ही घटना अगदीं टाकाऊ आहे असें मानलें, तरी तिची वहिवाट फक्त दहा वर्षेंच करावयाची असून तदनंतर मनांत आल्यास मुसलमानांना आपला स्वतंत्र मार्ग चोखाळण्याची मुभा तींत ठेवण्यांत आलेली आहे.

तसेंच महायुद्ध संपल्यानंतर पूर्वीच्या राष्ट्रसंघाहून अधिक समर्थ अशी एकादी आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण झाल्यावांचून राहणार नाहीं, हेंहि आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठीं कांहींतरी खात्रीची उपाययोजना शोधून काढणें हें त्या संस्थेचें कर्तव्य ठरणार आहे.

सर आर्देसर दलाल यांच्या योजनेची रूपरेषा वरीलप्रमाणें आहे. ते जातीनें पारशी आहेत. ज्यामध्यें सत्ताविरोध मुख्यत्वेंकरून उपस्थित होतो, त्या हिंदु वा मुसलमान जातींपैकीं कोणत्याहि जातीचे ते नाहींत. म्हणून एका निःपक्षपाती गृहस्थाची ही योजना आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

## ३९. सर राधाकुमुद मुकर्जी यांचा जातीय प्रश्नाबाबत नवा दृष्टिकोण

'जातीय प्रश्नाबाबतचा एक नवा दृष्टिकोण' या नांवाच्या एका पुस्तिकेमध्यें आपले कांहीं निर्णय डॉ. राधामुकुद मुकर्जी यांनीं मांडलेले असून ते पुढें सारांशरूपानें देण्यांत आले आहेत. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या विद्यमानें युरोपांतील विविध देशांत करण्यांत आलेल्या अल्पसंख्याकांसंबंधींच्या करारनाम्यांच्या बाबतींत जे अनुभव आले आणि सोव्हिएट रशियाच्या राज्यघटनेचा व तिच्या विकासाचा जो विचार त्यांनीं केला, त्यांवरून हा निष्कर्ष काढण्यांत आलेला आहे.

जातीय प्रश्न हा जागतिक प्रश्न झालेला आहे. कारण वांशिक, धार्मिक व सामाजिक सरहद्दींशीं ततोतंत जुळत्या अशा राजकीय व राष्ट्रीय सरहद्दी आंखणें मानवी शक्तीबाहेरचें काम आहे. प्रत्येक राज्याला नानाविध जातींना व जमातींना आपल्या समाजांत सामावून घ्यावेंच लागतें. अल्पसंख्याकांचें निर्मूलन करणें कोणत्याहि राज्याला शक्य झालेलें नाहीं. म्हणून त्यांचा प्रश्न सोडविण्याची उपाययोजना करणें आवश्यक ठरतें. पहिलें महायुद्ध होण्यापूर्वी क्रिमियन युद्धानंतर ३० मार्च १८५६ रोजीं पॅरिसचा जो तहनामा झाला, त्यांत असें नमूद करून ठेवण्यांत आलें होतें कीं, वांशिक वा धार्मिक कारणास्तव कोणत्याहि एका

वर्गाला दुसऱ्या वर्गाहून नीच मानण्यांत येऊं नये. पहिलें महायुद्ध संपल्यानंतर जी योजना आंखण्यांत आली, तिला अल्पसंख्याकांच्या हक्कांच्या आश्वासनाचे तहनामे, अशा स्वरूपाचा कायदेशीर दर्जा देण्यांत आला आणि राष्ट्रसंघामध्यें सामील असलेल्या निरनिराळया राष्ट्रांवर ते बंधनकारक करण्यांत आले होते. एका काळीं या राष्ट्रसंघामध्यें जगांतील बावन्न राष्ट्रें समाविष्ट होतीं.

एकाच राज्यछत्राखालीं राहणाऱ्या विविध जमातींमध्यें जे भेद असतात, ते पुढें दिलेल्या तीन सदरांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी सदरांत घालतां येतील. १ भाषिक; २ वांशिक; ३ धार्मिक. अल्पसंख्याकांना खास वागणूक हवी असेल तर तुर्की राज्यघटनेंत म्हटल्याप्रमाणें त्यांचें लोकसंख्येंतील प्रमाण बरेंच मोठें असलें पाहिजे. हें प्रमाण एकंदर लोकसंख्येच्या शेंकडा वीस टक्के तरी असलें पाहिजे असें ठरविण्यांत आलें आहे. कारण त्याहून लहान प्रमाणांत असणाऱ्या अल्पसंख्य जमातीला खास वागणूक देणें आर्थिक दृष्टया व राज्यकारभाराच्या दृष्टीनें अशक्य होतें.

अल्पसंख्याकांना जें संरक्षण द्यावयाचें तें फक्त वंश, धर्म व भाषा यांच्यापुरतेंच मर्यादित करण्यांत आलें होतें. या तिन्हींमधून उत्पन्न होणारी जी ऐतिहासिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यें तींच मान्य व आदरणीय समजलीं जात. त्यांच्या आश्रयानें अल्पसंख्य जमातींनीं आपल्या प्रकृतिधर्माला अनुसरून आपली प्रगति साधावी आणि मानवसमाजाच्या सर्वसामान्य संस्कृतींत भर घालावी असा या तहनाम्यांतील हेतु होता; म्हणून स्वभाषेचें संवर्धन करण्याचा जमातींचा हक्क मान्य करण्यांत आला. जमातींमधील मुलांना मातृभाषेंतून शिक्षण द्यावें, त्यांच्या स्वतःच्या लिपीचा उपयोग त्यांनीं आपल्या शाळांतून करावा, आणि एका शालेय विभागांत कमींत कमी चाळीस विद्यार्थी असतील तर सरकारनें अल्पसंख्याकांच्यासाठीं स्वतंत्र शाळा उघडाव्यात असें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें प्राथमिक शाळांना मिळणाऱ्या सरकारी सहाय्यापैकीं योग्य तो वांटा अल्पसंख्याकांच्या शाळांनाहि मिळावा असेंहि ठरलें.

विशिष्ट शिष्टाचार, रूढी, व्यक्तिगत कायदे, लग्नविधी, इत्यादि गोष्टींच्या

द्वारा जमातीची जी एकरूपता व पृथगात्मता व्यक्त होत असते, त्या गोष्टींचें रक्षण करण्याचा हक्क हरएक जमातीला असतो, असें जाहीर करून वांशिक रक्षणाचें आश्वासन देण्यांत आलें. प्रत्येक जमातींच्या धार्मिक हक्कांचें संरक्षण तर हरएक सुधारलेल्या देशामध्यें गेलीं कित्येक वर्षें होत आहे. या बाबतींत तुर्की राज्यघटनेमध्यें केलेल्या तरतुदी आधारभूत म्हणून मानतां येतील. त्यांत असें म्हटलें आहे कीं, 'सार्वजनिक सुव्यवस्था व नैसर्गिक तत्त्वें यांना अविरोधी असलेले जे मतपंथ, धर्म वा श्रद्धा असतील, तदनुसार जाहीर किंवा खाजगी रीतीनें वर्तन करण्याचा हक्क प्रत्येक रहिवाशास राहील. मुसलमानेतर अल्पसंख्य जमातींमधील जे तुर्की राष्ट्रिक आहेत, त्यांना कायद्याच्या बाबतींत व व्यवहाराच्या बाबतींत इतर तुर्की राष्ट्रिकांच्या बरोबरीचेंच संरक्षण व वागणूक मिळेल....'

राज्यकारभारामध्यें अल्पसंख्याकांचें स्थान कोणतें त्याबाबत तुर्की राज्यघटनेमध्यें असें नमूद केलें आहे कीं 'मुलकी व राजकीय हक्कांच्या उपभोगाच्या बाबतींत कोणत्याहि तुर्की राष्ट्रिकाला त्याच्या धर्मभेदामुळें अपाय होणार नाहीं. मुसलमानेतर–अल्पसंख्याकांमधील तुर्की राष्ट्रिकांना मुसलमानी राष्ट्रिकांप्रमाणेंच मुलकी व राजकीय अधिकार प्राप्त होतील. तुर्कस्तानांतील सर्व रहिवाशांना न्यायासनासमोर समानतेनें वागविण्यांत येईल. सरकारी नोकऱ्या, समारंभ, सन्मान, फौजी हुद्दे, आदीकरून सर्व बाबतींत सर्व राष्ट्रिकांना समानतेनें वागविण्यांत येईल.'

येणेंप्रमाणें कांहीं हितसंबंधांच्या बाबतींत अल्पसंख्याकांना निश्चितपणें संरक्षण देण्यांत आलेलें असून त्यापुरते संपूर्ण स्वातंत्र्याचे व स्वायत्ततेचे अधिकार त्यांना बहाल करण्यांत आलेले आहेत. परंतु अल्पसंख्याकांच्या संरक्षणाला मर्यादा घालण्यांत आलेली आहे. राज्याचें रक्षण करण्याची जबाबदारी सर्व जमातींवर सारखीच पडत असून तत्संबंधींचें आपलें कर्तव्य सर्वांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा करून केलें पाहिजे, आणि अतिशयोक्त व अचाट कल्पनांच्या भरीस पडून राज्याचें अखंडत्व लयास जाईल असें वर्तन कोणत्याहि जमातीला करण्याचा हक्क असतां कामा नये, असेंहि धोरण त्यांत ठेवण्यांत आलें आहे.

सोव्हिएट रशियाला तर अत्यंत बिकट अशा जातीय प्रश्नांना तोंड द्यावें लागत आहे. सोव्हिएट रशियाच्या संयुक्त राज्यांत (१) सतरा कोटी लोकसंख्या आहे, (२) एकशेंऐंशी निरानिराळीं राष्ट्रकें आहेत, (३) एकशेंएकावन्न निरनिराळ्या भाषा आहेत, (४) अकरा राष्ट्रीय लोकशाह्या आहेत, आणि (५) बावीस स्वायत्त लोकशाह्या आहेत. झारची सत्ता नाहींशी झाली ती जातीय समस्येचा वारसा सोव्हिएट सरकारच्या हातीं देऊन गेली. त्यावेळीं तो प्रश्न कमालीचा अवघड होऊन बसलेला होता. आपल्या विस्तीर्ण प्रदेशांमध्यें वस्ती करून राहिलेल्या अनेकविध लोकांमध्यें एकोपा निर्माण व्हावा, ही गोष्ट झारला इष्ट नव्हती. त्यांनीं परस्परांशीं वैरभाव धरून रहावें हेंच त्याच्या दृष्टीनें अधिक हितकारक होतें. ग्रेट रशियन जमातीच्या हितसंबंधांकडे दृष्टि ठेवूनच रशियन साम्राज्याचा राज्यकारभार चालविण्यांत येत असे. बाकीच्या सर्व राष्ट्रिकांना व जमातींना त्यांच्याहून हीन लेखण्यांत येई. आक्रमक व चढाऊ रशियन राष्ट्रवादाचा स्वीकार करण्यांत रशियनेतर राष्ट्रकांना रशियन संस्कृतीची दीक्षा जबरदस्तीनें देण्याची नीति बुद्धिपुरस्सर अवलंबिण्यांत आली. यामुळें अल्पसंख्याकांच्या मनावर प्रतिकूल परिणाम घडून येऊन ज्या फुटीर प्रवृत्ती सर्वत्र बळावल्या, त्यांना स्वयंनिर्णयाच्या तत्त्वामुळें अधिकच प्रतिष्ठा व जोर प्राप्त झाला. बोल्शेव्हिक पक्ष अधिकारारूढ झाल्यानंतर त्यानें झारकालीन नीति बदलून मुसलमान, तार्तर, तुर्क इत्यादि जमातींना असें आश्वासन दिलें कीं इतःपर रशियन प्रदेशांमध्यें वस्ती करून राहिलेल्या सर्व जमातींच्या स्वकीय संस्था व संस्कृती यांना भरपूर स्वातंत्र्य दिलें जाईल. राष्ट्रकांनीं स्वखुषीनें बनविलेल्या सोव्हिएट संयुक्त राज्याची प्रस्थापना १९१८ च्या राज्यघटनेप्रमाणें करण्यांत आली आणि त्याला रशियन–समाजवादी–संयुक्त–सोव्हिएट–लोकसत्ता असें नांव देण्यांत आलें. या राज्यघटनेच्या धर्तीवर बोल्शेव्हिकांनीं इतरहि ठिकाणीं म्हणजे युक्रेन, व्हाइट रशिया, ट्रान्स, कॉकेशिया व मध्यआशिया येथें समाजवादी लोकसत्ताक राज्यें एकत्रित करून त्यांचें एक बृहत्तर संयुक्त राज्य बनविण्यांत आलें व त्याला समाजवादी–सोव्हिएट–लोकसत्ताक–राज्यांची

संयुति (यू. एस्. एस्. आर.) असें नामाभिधान प्राप्त होऊन त्यांमधून रशियन हा शब्द वगळण्यांत आला.

हें राज्य संयुक्त असून त्यांतील घटकांचें स्वरूपहि संयुक्त राज्याचेंच आहे. या बृहत्तर संयुक्त राज्यामध्यें जीं अकरा घटक–राज्यें आहेत त्यांना शक्य ते सर्व अधिकार देण्यांत आले आहेत. त्यांना संपूर्ण स्वायत्तता असून यू. एस्. एस्. आर.च्या सूत्रचालनामध्यें आपल्या प्रतिनिधींमार्फत त्यांना भाग घेतां येतो. त्याचप्रमाणें त्यांना स्वत:पुरती पूर्ण मुखत्यारी देण्यांत आलेली असून यू. एस्. एस्. आर.मधून फुटून निघण्याच्या हक्कापर्यंत तिची मर्यादा वाढविण्यांत आलेली आहे. हा हक्क १९३६ च्या घटनेंतील १७ व्या कलमाप्रमाणें कायम करण्यांत आलेला आहे. या अकरा राष्ट्रांच्या खालोखालचा दर्जा असणारी जीं बावीस स्वायत्त लोकसत्ताक राज्यें आहेत त्यांना फुटून निघण्याइतकें स्वातंत्र्य नसलें, तरी स्थानिक बाबतींत त्यांना संपूर्ण मुखत्यारी देण्यांत आलेली आहे. यानंतर तिसऱ्या दर्जाच्या आणखी स्वायत्त संघटना असून त्यांची संख्या वेळोवेळीं बदलत असते. त्याचप्रमाणें त्यांची स्वायत्ततादेखील स्थानिक व्यवहारांपुरतीच मर्यादित ठेवलेली असून हे संघ ज्या प्रदेशांत वसलेले असतील त्या प्रदेशांवर राज्य करणाऱ्या संयुक्त लोकशाहीचें अथवा स्वायत्त लोकशाहीचें नियंत्रण त्यांच्यावर असतें. आपली सत्ता निर्माण करण्यासाठीं व तिला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठीं नवीन राज्यघटनेला राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वानुसार आणि भौगोलिक व आर्थिक विचारांचा आधार घेऊन आपल्या प्रदेशाची फेरवांटणी पहिल्या प्रथम करावी लागली.

केंद्रीय सत्ता व राज्यांतील निरनिराळ्या दर्जांचे विविध घटक यांच्या दरम्यान सत्तेची जी विभागणी करण्यांत आलेली आहे, ती स्थूलमानानें अशी आहे कीं परराष्ट्रीय धोरण, वाहतुक, टपाल व तारखातें यांचा सर्व कारभार मध्यवर्ति सरकार पाहतें. आर्थिक, भांडवलविषयक व कामगारविषयक खातीं मध्यवर्ति सरकार व घटक–राज्यें यांच्या संयुक्त अधिकाराखालीं असतात; आणि कायदा, सार्वजनिक आरोग्य व शिक्षण हीं खातीं स्वायत्त लोकसत्ताक

राज्यांच्या व घटक–राज्यांच्या स्थानिक नियंत्रणानुसार चालतात. येणेंप्रमाणें या घटक–राज्यांना स्वयंशासनाचे अधिकार असून त्यांना संपूर्ण सांस्कृतिक स्वायत्तता लाभलेली आहे. रशियांतील विविध भाषांच्या लोकांना समानतेनें वागविणें आणि मागासलेल्या प्रदेशांचा व जमातींचा सांस्कृतिक, बौद्धिक व आर्थिक दर्जा स्वयंशासनाच्या द्वारा इतरांच्या बरोबरीला आणून ठेवणें हीं या नवीन जमान्याचीं मुख्य लक्षणें आहेत. तेथील हरएक जमात आपल्या मुलांना स्वभाषेंतून शिक्षण देते. ज्या लोकांच्या भाषेंत मूळाक्षरें नव्हतीं त्यांना तीं बनवून देण्यांत आलीं, आणि अशा प्रकारें १९३४ पर्यंत ७४ जमातींना मूळाक्षरांचा लाभ झाला.

तथापि, अल्पसंख्याकांना जें स्थानिक स्वातंत्र्य व स्वायत्तता देण्यांत आलेली आहे, त्यांच्यामुळें राज्याच्या सामर्थ्याला धक्का पोहोंचूं नये म्हणून त्यांच्यावर निर्बंधहि घालण्यांत आलेले आहेत. वेब–पतिपत्नींनीं म्हटल्याप्रमाणें 'राज्यानें आपली शक्ति अबाधित राखलेली आहे आणि इतर संयुक्त राज्यांप्रमाणेंच या राज्यांतहि सत्तेच्या केंद्रीकरणाची वाढ केलेली आहे. तथापि, सत्तेचें केंद्रीकरण एकीकडे होत असतां अल्पसंख्याकांच्या आर्थिक स्वायत्ततेला हानि पोहोंचूं नये याची दक्षता फक्त यू. एस्. एस्. आर. मध्येंच घेण्यांत येत असते.' तथापि, या बाबतींत जी मूलभूत गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी ती ही आहे कीं, सर्व देशाच्या व त्यांतील प्रत्येक विभागाच्या समग्र जीवनाला आपल्या सर्वंकष योजनेमध्यें समाविष्ट करून घेणारी जी आर्थिक योजना बनविण्यांत आलेली आहे तीच या राज्यघटनेचा पाया आहे; आणि या आर्थिक योजनेचीं सूत्रें केवळ संयुक्त सरकारच्या हातींच ठेवण्यांत आलेलीं आहेत. संयुक्त सरकारच्या शक्तींना निर्बंधित करणारें राज्यघटनेचें जें पंधरावें कलम आहे, त्यामुळें जमातींना फक्त त्यांच्या सांस्कृतिक स्वायत्ततेपुरतें व खास करून त्यांच्या मातृभाषांपुरतें संरक्षण व्यवहारतः मिळत असतें.

फुटून निघण्याचा जो हक्क आहे तो सार्वत्रिक नसून फक्त अकरा राष्ट्रीय लोकसत्ताक राज्यांपुरताच मर्यादित ठेवण्यांत आलेला आहे. स्टालिननें म्हटल्या-

प्रमाणें "आंतरराष्ट्रीय परिस्थितीचें जें प्रत्यक्ष स्वरूप दिसून आलें व क्रान्तीच्या हिताच्या दृष्टीनें जें जरूर वाटलें, तदनुसार फुटून निघण्याच्या हक्काबाबत कम्युनिस्टांनीं आपलें धोरण ठरविलें. राष्ट्रसंघापासून वसाहतींनीं फुटून निघावें म्हणून कम्युनिस्ट लढतात. पण त्याचबरोबर रशियाच्या सरहद्दींवरील राष्ट्रांनीं फुटून जाऊं नये म्हणूनहि ते लढतात, तें याचसाठीं." तत्पूर्वीं तीन वर्षें म्हणजे १९१७ सालीं स्टालिननें असें लिहिलें होतें कीं, "गुलाम राष्ट्रांना फुटून निघण्याचा हक्क आहे, त्यांना स्वतःचें भवितव्य ठरविण्याचा हक्क आहे असें आम्ही म्हणतों. पण रशियन–राज्यांतून कोणत्या क्षणीं फुटून निघावें याचा निर्णय आम्हीं आतांच घेतलेला आहे, असें त्यावरून म्हणतां येणार नाहीं...म्हणून कामगार-वर्गाच्या व कामगारक्रान्तीच्या हिताचा विचार करून तदनुसार फुटून जाण्याच्या हक्काला पाठिंबा देण्याची अथवा त्याला विरोध करण्याची मुभा आम्हांला आहे."

१९३७–३८ सालीं रशियांतील कम्युनिस्ट–पक्षाची जी शुद्धी करण्यांत आली, त्यावेळीं यू. एस्. एस्. आर. मधून कांहीं प्रदेशांना फुटून जाण्याची चिथावणी दिल्याचे आरोप अनेक लोकांवर वृत्तपत्रांतून करण्यांत येत असत.

आपल्या घटक लोकराज्यांना विभक्त होण्याचे अधिकार देऊं करून यू. एस्. एस्. आर. ला स्वतःची उभारणी करावी लागली आहे. एकदां समाविष्ट झाल्यानंतर या घटकराज्यांना आतां फुटून निघण्याची इच्छा राहिलेली नसून तीं स्वतःच या संयुक्तराज्याला अधिकाधिक बळकट बनवीत आहेत. हिंदुस्थान हा सध्यां तरी एक अखंड घटक आहे. तो नव्यानें बनत आहे असें नव्हे. त्याची बनावट पूर्ण झालेली असून गेल्या शतकाहून अधिक वर्षें सध्यांचें सरकार एक अखंड देश म्हणूनच हिंदुस्थानवर राज्य करीत आहे. म्हणून बसलेली घडी विस्कटून टाकण्यापेक्षां स्वतंत्र मुस्लिम–राज्याची मागणी करणारे व त्या मागणीला विरोध करणारे जे लोक आहेत, त्यांच्या विरोधी दृष्टिकोणांत सलोखा घडवून आणण्याच्या दृष्टीनें यू. एस्. एस्. आर. च्या धर्तीवर भिन्न-भिन्न जातींना सांस्कृतिक स्वायत्तता देण्याची योजना तयार करणें उचित होईल. बहुसंख्य हिंदूबरोबर संयुक्त राज्य स्थापन केल्यास ते मुसलमानी राज्यावर

अतिक्रमण करतील अशी भीति मुसलमानांना वाटते. परंतु या शंकेचा परिहार संयुक्त राज्य राखून आणि मातृभूमीचें विच्छेदन न करतांहि अनेक मार्गांनीं करतां येण्यासारखा आहे. (१) केंद्रीय व प्रांतीय विषयांच्या याद्या तयार करून प्रांतांना अधिकांत अधिक सत्ता देतां येईल व व्यवहारतः पाकिस्तानी राज्यांना सार्वभौमत्व देतां येईल. (२) किंवा यू. एस्. एस्. आर. प्रमाणें हरएक जमातीला सांस्कृतिक स्वायत्तता देतां येईल. (३) अथवा आर्थिक दृष्ट्या शक्य असल्यास प्रांतांची भाषावार पुनर्रचना करून हा प्रश्न सोडवितां येईल.

असल्या प्रकारच्या कोणत्याहि योजनेस जनाब जिनांच्या भाषेंत सांगावयाचें झालें, तर असा आक्षेप येतां येईल कीं, "घटनानिविष्ट संरक्षणांचा काय किंवा इतर संरक्षणांचा काय, कांहींहि उपयोग होणार नाहीं. कारण केंद्रस्थानीं जोंपर्यंत हिंदूंची जातीय बहुसंख्या कायम आहे, तोंपर्यंत हीं संरक्षणें नुसतीं कागदोपत्रींच राहणार." यावर उत्तर येवढेंच देतां येण्यासारखें आहे, कीं अल्पसंख्याकांचे सांस्कृतिक स्वायत्ततेचे हक्क घटनेच्या व कायद्याच्या द्वारा सुरक्षित ठेवण्याचें धोरण ठेवण्यांत येईल. अल्पसंख्याकांना दिलेल्या हक्कांची अंमलबजावणी करणारी सर्वश्रेष्ठ न्यायालयासारखी एक पृथक् संस्था स्थापण्यांत यावी आणि कोणत्याहि जमातीला आपल्या तक्रारी अशा न्यायासनासमोर मांडण्याची पूर्ण मुभा असावी, अशी तरतूद घटनेमध्यें करतां येईल. निरनिराळ्या पक्षांच्या संमतीनें हिंदुस्थानचें संयुक्त राज्य प्रस्थापित होणार असल्याकारणानें त्या संयुक्त राज्याच्या घटनेमध्यें जीं संरक्षणें समाविष्ट केलीं जातील, तीं रद्द करण्याचा किंवा मागें घेण्याचा अधिकार संयुक्त सरकारला राहणार नाहीं; आणि सर्वश्रेष्ठ न्यायालयाची रचना जातिवादातीत असल्यामुळें त्याला संरक्षणांची अंमलबजावणी करून घेणेंहि शक्य होईल.

## ४०. कम्युनिस्ट-पक्षाचा पाकिस्तानला पाठिंबा

अखिल भारतीय मुस्लीम-लीगनें केलेल्या पाकिस्तानच्या मागणीला दिलेल्या पाठिंब्याचें समर्थन करतांना हिंदुस्थानांतील कम्युनिस्ट-पक्षाच्या पुढाऱ्यांनीं यू. एस्. एस्. आर.च्या राज्यघटनेकडे व श्री. स्टालिन यांच्या लिखाणाकडे धांव घ्यावी, याचें कोणास आश्चर्य वाटावयास नको ! परंतु अखंड हिंदुस्थान-परिषदेचे अध्यक्ष डॉ. राधाकुमुद मुकर्जी यांनीं देखील त्याच साधनांचा आश्रय घ्यावा व त्यांच्या आधारें स्वतःच्या सूचना मांडाव्यात याचें नवल वाटतें ! पाकिस्तानला पाठिंबा देणारे व विरोध करणारे दोघेहि एकाच साधनाचा उपयोग करीत असल्याकारणानें कम्युनिस्ट-पक्षानें स्वीकृत केलेला व १९१७ च्या ऑक्टोबर-क्रांतीनंतर क्रमशः विकसित झालेल्या यू. एस्. एस्. आर. च्या राज्यघटनेमध्यें अंतर्भूत झालेल्या स्टालिनच्या दृष्टिकोणाचें जरा तपशीलवार विवेचन करणें आवश्यक आहे.

श्री. स्टालिन लिहितात, " भाषा, प्रदेश, आर्थिक जीवन, व मनोरचना या बाबतींत समधर्मी असलेली व तो समधर्म संस्कृतीच्या द्वारा व्यक्त करणारी स्थिर व युगशः विकसित होत आलेली मानवसंहति म्हणजे राष्ट्र होय."[१] इतिहासविषयक बनलेल्या इतर प्रत्येक घटनेप्रमाणें, " राष्ट्रालाहि स्थित्यंतरांतून जावें लागतें, त्याला स्वतःचा इतिहास असतो. जन्म व मृत्यु या उपाधी त्यालाहि चिकटलेल्या असतात. वर जीं वैशिष्ट्यें दाखविलेलीं आहेत त्यांपैकीं कोणत्याहि एका वैशिष्ट्यामुळें राष्ट्र बनणार नाहीं, ही गोष्ट स्पष्ट करणें आवश्यक आहे. उलटपक्षीं, त्यांपैकीं एकादेंहि लक्षण अनुपस्थित असेल, तरीहि राष्ट्राचें राष्ट्रीयत्व नष्ट होणें अगदीं शक्य आहे."[१] "आधुनिक राष्ट्रें हीं एका विशिष्ट कालखंडाची म्हणजे उदयोन्मुख भांडवलशाहीच्या कालखंडाची निर्मिती आहे. सरंजामशाहीचा विनाश व भांडवलशाहीचा विकास यांची जी संयुक्त प्रक्रिया सुरू होती ती प्रक्रियाच मानवसमाजांना राष्ट्रांचा आकार आणून देण्यास कारणीभूत

---

१. स्टालिन : मार्क्सिझम् अँन्ड दि नॅशनल् अँन्ड कलोनियल् क्वेश्चन, पृ. ८.

झालेली आहे. विघटित झालेल्या सरंजामशाहीवर मात करून भांडवल-शाहीच्या विजयाची ग्वाही ज्याकाळीं युरोपखंडांत गाजूं लागली, त्याचकाळीं ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन व इटालियन लोकांनीं आपलीं राष्ट्रें प्रस्थापित केलेलीं आहेत.

"ज्या ज्या देशांमध्यें राष्ट्रांच्या रचनेच्या कालींच मध्यवर्ति सत्तेनें युक्त अशी राज्यसत्ता प्रस्थापित झाली, त्या त्या देशांत राष्ट्रांना सहजींच राज्यत्वाची प्राप्ति होऊन त्यांना स्वतंत्र भांडवलशाही-राष्ट्रीय-राज्यांचें स्वरूप प्राप्त झालें. आयर्लंडव्यतिरिक्त ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व इटली हीं अशा प्रकारच्या राज्याचीं उदाहरणें होत. याच्या उलट प्रकार पूर्व युरोपमध्यें झाला. तेथें सरंजामशाही विलयास जाण्यापूर्वींच तुर्क, मंगोल वगैरेंच्या स्वाऱ्यांपासून आत्मरक्षण करण्याचा प्रसंग उद्भवल्यामुळें केंद्रानुवर्ती राज्यें प्रस्थापित झालीं; म्हणजे राष्ट्रांची रचना होण्यापूर्वींच राज्यांची घडण बनली. याचा परिणाम असा झाला कीं या राष्ट्रांचा विकास एकजिनसी राष्ट्रीय राज्यांत न होतां त्यांना संमिश्र, अनेकविध, बहु-राष्ट्रीय-भांडवलदारी राज्यांचें स्वरूप प्राप्त झालें. त्यांपैकीं एक राष्ट्र सामर्थ्य-वान् व प्रभुत्व उपभोगणारें आणि बाकीचीं इतर दुर्बल व दास्यवृत्तीनें राहणारीं असत. ऑस्ट्रिया, हंगेरी व रशिया हीं या प्रकारचीं राज्यें होत.

"फ्रान्स व इटलीप्रमाणें जीं स्वतःच्या राष्ट्रीय सामर्थ्यावर उभीं असलेलीं राज्यें होतीं, त्यांना सर्वसामान्यपणें अल्पसंख्याकांवर होणाऱ्या जुलुमाचा फारसा परिचय नव्हता असें म्हणतां येईल. परंतु बहुराष्ट्रीय राज्यांमध्यें एकच राष्ट्र अथवा त्यांतील शास्त्यांचा वर्ग हाच प्रभावी असल्यामुळें व त्यांची सत्ता इतर राष्ट्रांवर चालत असल्यामुळें अल्पसंख्याकांवरील दडपशाही व त्यांच्या राष्ट्रीय चळवळी यांचीं तीं राष्ट्रें उगमस्थानें बनलीं. प्रभुराष्ट्रें व गुलामराष्ट्रें यांच्यांतील हितविरोध अशा प्रकारचे असतात, कीं त्यांचा परिहार झाल्याखेरीज बहुराष्ट्रिक राज्यांचें अस्तित्व टिकून राहणें अशक्य होऊन बसतें. बहुराष्ट्रिक भांडवल-दारी राष्ट्रांचें नशीब असें खडतर असतें, कीं या आंतरविरोधांचा परिहार करणें त्यांना शक्य होत नाहीं. आणि खाजगी मालमत्ता व वर्गीय विषमता हीं कायम राखून अल्पसंख्याकांचीं राष्ट्रें समपातळींत आणण्याचा आणि त्यांचें

हक्क–संरक्षण करण्याचा प्रयत्न ज्या ज्या वेळीं तीं करूं पाहतात, त्या त्या वेळीं त्यांच्या नशिबीं अपयश येतें व राष्ट्रीय वैमनस्यांचा अग्नि अधिकच पेट घेतो.

“नंतरच्या काळांत युरोपमध्यें झालेली भांडवलशाहीची वाढ, नवीन बाजारपेठांची गरज, कच्चीं द्रव्यें व जळण यांचा शोध आणि या सर्व व्यवहारांतून वाढीस लागलेल्या साम्राज्यवादामुळें आणि तदनुषंगिक भांडवलाची निर्यात आणि जलमार्ग व लोहमार्ग यांचें संरक्षण करण्याची आवश्यकता यांमुळें जुन्या राष्ट्रीय राज्यांना नवीन प्रदेश जिंकून घेणें आणि त्यांचे बहुराष्ट्रिक (वासाहतिक) राज्यांत रूपांतर करणें अवश्य होऊन बसलें. युरोपांतील बहुराष्ट्रिक राज्यांमध्यें जे विरोध व जीं वैमनस्यें निर्माण झालीं, तीं या बहुराष्ट्रिक साम्राज्यांमध्येंहि दिसून येऊं लागलीं. त्याचबरोबर जुन्या बहुराष्ट्रिक राज्यांमध्यें प्रभुत्व गाजविणारीं जीं राष्ट्रें होतीं, त्यांना आपल्या राज्यांच्या चतुःसीमा कायम राखण्यांत समाधान वाटेनासें होऊन शेजारच्या राज्यांतील अल्पसंख्य–राष्ट्रांना आपल्या राज्यांत समाविष्ट करून घेण्याची धडपड त्यांनीं सुरू केली. अशा रीतीनें राष्ट्रवादाचा प्रश्न अधिकच व्यापक बनला व कालमानानें वसाहतींच्या प्रश्नाशीं तो एकरूप झाला. अल्पसंख्य–राष्ट्रावर होणाऱ्या दडपशाहीच्या प्रश्नाचें देशांतर्गत स्वरूप नष्ट होऊन त्याला आंतरराष्ट्रीय व प्रबल राष्ट्रांतील आंतरविरोधाचें स्वरूप प्राप्त झालें.”[१]

पहिल्या महायुद्धामुळें ग्रेटब्रिटन, फ्रान्स, इटली आदिकरून विजयी साम्राज्यशाही राज्यांमध्यें राष्ट्रीय लढे अगदीं विकोपाला पोंचले. पूर्वीचीं जीं ऑस्ट्रिया हंगेरी, रशियासारखीं बहुराष्ट्रिक राज्यें होतीं तीं सर्वस्वीं लयास गेलीं आणि पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, फिनलंड, जॉर्जिया, आर्मेनिया वगैरे नवीं, भांडवलदारी राष्ट्रीय राज्यें निर्माण झालीं. या नवीन राज्यांपैकीं प्रत्येकांत अल्पसंख्य होतेच. तीं राज्यें खाजगी मालमत्ता व वर्गीय विषमता यांच्यावर आधारलेलीं असल्याकारणानें (अ) स्वतःच्या अल्पसंख्याकांचा छळ केल्यावांचून (व्हाइट रशियन, ज्यू, लिथुआनिअन व युक्रेनियन यांचा पोलंड छळ

१. स्टालिनः पृ. २७०–७१.

करीत आहे; आसेट्स्, व अबखासियन्स् यांचा छळ जॉर्जिया करीत आहे; क्रोटस्, बोस्नियन्स् वगैरेंचा छळ युगोस्लाव्हिया करीत आहे), (ब) शेजारच्या राष्ट्रांकडून प्रदेश हिसकावून घेतल्यावांचून व त्यामुळें विरोधांना व युद्धांना आमंत्रण दिल्यावांचून आणि (क) आर्थिक व लष्करी दृष्ट्या प्रबल साम्राज्यशाही राष्ट्रांची गुलामगिरी पत्करल्यावांचून त्यांना टिकून राहणें शक्य होणार नाहीं.

खाजगी मालमत्ता व भांडवलशाही हीं लोकांमध्यें वैमनस्य पेरण्यास, राष्ट्रवादाला आक्रमक बनविण्यास व अल्पसंख्याकांच्या छळाचें स्वरूप तीव्र बनविण्यास कारणीभूत होत असल्याकारणानें वरील सिद्धांत अपरिहार्यच ठरतो. उलटपक्षीं, सामुदायिक मालकी व सामुदायिक श्रम यांच्यामुळें जनतेमध्यें एकता निर्माण होते, राष्ट्रीय झगडे लयास जातात व अल्पसंख्याकांचा छळ संपुष्टांत येतो. समाजवादी व्यवस्थेमध्यें राष्ट्रांचें दास्यविमोचन हें जितकें अपरिहार्य आहे, तितकेंच भांडवलशाही पद्धतीमध्यें राष्ट्रांचें दास्यत्वहि अपरिहार्य आहे. म्हणून समाजवादी राज्यपद्धतीचा विजय होऊन कामगारवर्गाची सर्वाधिकारशाही प्रस्थापित होणें ही गोष्ट राष्ट्रीय दास्याचें उच्चाटन होण्यासाठीं, राष्ट्रामध्यें समता निर्माण होण्यासाठीं व राष्ट्रांतील अल्पसंख्याकांच्या हक्कांचें संरक्षण होण्यासाठीं अवश्य ठरते. रशियामध्यें सोव्हिएट–पद्धति प्रस्थापित झाल्यामुळें व तदंतर्गत राष्ट्रांना फुटून निघण्याचा हक्क असल्याची घोषणा करण्यांत आल्यामुळें त्या राष्ट्रांतील श्रमजीवी वर्गांतल्या परस्पर–संबंधांमध्यें कायापालट घडून आलेला आहे. हीं राष्ट्रें एकमेकांपासून फुटून राहतील तर भांडवलदारी राष्ट्रांकडून होणाऱ्या संभाव्य आक्रमणाच्या भीतीमुळें त्यांचें अस्तित्व अनिश्चित व अस्थिर बनलें असतें. परंतु संरक्षणाच्या बाबतींत सर्वांचें हितसंबंध समाइक असल्यामुळें, महायुद्धामध्यें उध्वस्त झालेल्या उत्पादन–साधनांची पुन्हां उभारणी करणें अवश्य असल्यामुळें आणि धान्याच्या दृष्टीनें समृद्ध असलेल्या सोव्हिएट प्रजाराज्यांनीं अपुरें धान्य पिकविणाऱ्या प्रजाराज्यांना मदत करणें आवश्यक ठरल्यामुळें, या सर्व प्रजाराज्यांची एक राजकीय संहति तयार करणें हाच साम्राज्यवादी

राष्ट्रांच्या गुलामगिरींतून सुटण्याचा व अल्पसंख्याकांचा छळ थांबविण्याचा एक-मेव मार्ग पत्करणें परिस्थितीनें भाग पाडलें.[१]

रशियांतील कम्युनिस्ट–पक्षानें जीं तत्त्वें स्वीकारलीं आहेत, तीं वरील उताऱ्या-वरून अधिकृतपणें समजून येतील. १९१७ च्या क्रांतीपूर्वीं कित्येक वर्षां-पासून तों तहत आजमितीपर्यंत स्टालिन व इतर मंडळी यांनीं आपल्या भाषणां-तून व लिखाणांतून या तत्त्वांचें विस्तृत विवेचन केलेलें आहे. या तत्त्वांच्या व विवरणाच्या अनुरोधानें आपण मुस्लीम–लीगच्या म्हणण्याची छाननी करूं. हिंदुस्थानांत जें राष्ट्र अथवा राष्ट्रें आहेत, त्यांच्याहून हिंदुस्थानांतील मुसलमानांचें पृथक् असें एक राष्ट्र असून विभक्त होण्याचा त्यांचा हक्क केवळ मान्य करून चालणार नाहीं; तर हिंदुस्थानांतील ज्या प्रदेशांत ते बहुसंख्य आहेत ते प्रदेश हिंदुस्थानपासून या घटकेला वेगळे करण्यांत यावेत, अशी त्यांची मागणी आहे.

कम्युनिस्टांच्या तत्त्वानुसार पाहूं गेल्यास हिंदुस्थानांतील सर्व मुसलमानांचें मिळून एक राष्ट्र बनतें असें म्हणतां येणार नाहीं. ते सर्वजण एक भाषा बोलत नाहींत. निरनिराळ्या प्रांतांत व विभागांत ते निरनिराळी भाषा बोल-तात. वस्तुस्थिति अशी आहे कीं, एकाद्या प्रांतांतील मुसलमानेतर रहिवाशी जी भाषा बोलतात, तीच मुसलमानांमध्येंहि प्रचलित असते. आणि ती भाषा इतर प्रांतांमध्यें प्रचलित असलेल्या भाषांहून खूपच भिन्न असते.. एकमेकां-पासून दूर असणाऱ्या प्रांतांच्या बाबतींतच तेवढी ही गोष्ट सत्य आहे असें नव्हे; वायव्य–विभागांतील जे प्रांत एकमेकांना लागून आहेत, तेथेंहि बलुची, सिंधी, पुश्तु व पंजाबी अशा चार भिन्न भाषा तेथील रहिवाशी बोलतात. हिंदी अथवा हिंदुस्थानी, बंगाली व गुजराती या भाषांहून वरील भाषा जितक्या भिन्न आहेत, तितक्याच त्या एकमेकींहून भिन्न आहेत.

हिंदुस्थान हा अखंड देश आहे हें गृहीत धरल्यावांचून हे लोक एकाच देशांतले रहिवाशी आहेत असें विधान करतां यावयाचें नाहीं. मुसलमानांची बहुसंख्या असलेले जे वायव्येचे व पूर्वेचे विभाग त्यांच्यामध्यें सुमारें एक

---

१. स्टालिनः पृ. २७३–७४ मधील मजकुराचा सारांश.

हजार मैलांचें अंतर आहे. मुसलमानेतरांहून मुसलमानांचें आर्थिक जीवन भिन्न आहे असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. ज्या प्रदेशांमध्यें मुसलमान वसलेले आहेत तेथील मुसलमानेतरांशीं सदृश असेंच त्यांचें आर्थिक जीवन असून भिन्न आर्थिक जीवन असलेले जे अन्य प्रदेश आहेत, त्यांतील मुसलमानेतरांप्रमाणेंच मुसलमानांच्याहि आर्थिक जीवनापेक्षां त्यांचें आर्थिक जीवन भिन्न आहे.

राष्ट्राच्या पृथगात्मतेचा आधार म्हणून श्री० स्टॅलिननें धर्माचा मुळींदेखील उल्लेख केलेला नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. खरें म्हणजे केवळ भिन्न-धर्मीय म्हणून ज्यू लोकांचें राष्ट्रहि भिन्न ठरतें, या सिद्धांताला त्यानें आपल्या लेखनांत अनेकवार हास्यास्पद ठरवल्याचें दिसून येतें. परंतु 'सांस्कृतिक एकतेच्या द्वारा प्रकट होणारी मानसिक घडण' म्हणून जिचा उल्लेख स्टॅलिननें केलेला आहे तिच्यांत धर्माचा अन्तर्भाव होतो, असें आपण समजून चालूं या. कारण समाजाच्या सांस्कृतिक विकासावर धर्माचा परिणाम खूपच प्रमाणांत होत असतो. इस्लामची शिकवण कोणतीहि असो, हिंदुस्थानांत जी इस्लामी संस्कृति दिसून येते, ती येथून तेथून सर्व एकरंगी आहे असें म्हणतां येणार नाहीं. निरनिराळ्या ठिकाणीं तिच्या अर्थांत व स्वरूपांत फरक पडलेले आढळतात, आणि इतर जमातींप्रमाणेंच मुसलमानांची जमातहि बहुरंगी असल्याचें दिसून येतें. शिया व सुन्नी यांच्यातील भेद तर जवळजवळ इस्लामच्या स्थापनेपासूनचे आहेत. हिंदूंच्या वारसा-कायद्याप्रमाणें चालणारे अनेक मुसलमानी पंथ आहेत. ज्या हिंदूंच्या जमातींमधून ते प्रथम आले, त्यांच्यांतील अनेक चालीरीती त्यांच्यामध्यें अजूनहि रूढ आहेत. नवीनच अस्तित्वांत आलेला कादियानी पंथहि या देशांत आहे. यांपैकीं पुष्कळसे भेद धर्माच्या शिकवणुकीबाबत व तत्त्वाबाबत असले, तरी मुसलमानांच्या सामाजिक जीवनामध्येंहि त्यांचे धागेदोरे पसरलेले आहेतच. तरीहि सर्वांचें उपबृंहण करणारी एक मुसलमानी संस्कृति म्हणून कांहीं वस्तु आहे हें आपणांस मान्य करावेंच लागेल. पण तसें पाहूं गेल्यास हिंदु-मुसलमानांमधील भेदांनाहि पुरून उरणारी एक सर्वव्यापी हिंदी संस्कृति आहे ही गोष्टहि मान्य करणें अवश्य होय. म्हणून

कम्युनिस्टांच्या व्याख्येनुसार पाहूं गेल्यास हिंदुस्थानांतील मुसलमान हे स्वतंत्र राष्ट्र नाहींत असें सिद्ध होतें. हिंदी कम्युनिस्टहि ही गोष्ट जाणून आहेत. 'धर्माला राष्ट्रीयत्वाचा आधार म्हणून मानण्याच्या गांधीजी अगदीं विरुद्ध आहेत. एकस्या धर्माच्या आधारें राष्ट्र बनत नसतें या दृष्टीनें त्यांची भूमिका रास्त वाटते. लोकांची मानासिक घडण व राष्ट्राची संस्कृति बनविण्याच्या कामीं धर्माचा परिणाम कितपत होत असतो, त्याची चर्चा येथें अप्रस्तुत आहे. परंतु इतकें म्हटलें तरी पुरे होईल, कीं ते एकधर्मी आहेत येवढयाच कारणास्तव हिंदी मुसलमानांना राष्ट्र म्हणून गणतां येणार नाहीं. तथापि, येवढेंच विधान करून थांबल्यास अर्धीच वस्तुस्थिति निवेदन केल्याप्रमाणें होईल.'[१] संबंध वस्तुस्थिति सांगावयाची झाल्यास हिंदुस्थान हा विविध राष्ट्रांचा एक संघ आहे असें म्हणावें लागेल, असें श्री. जोशी यांचें मत असावें.

दुसरा विचारार्ह मुद्दा ऐतिहासिक आहे. राष्ट्रकांची वाढ कशी होत जाते हा तो मुद्दा होय. श्री. स्टालिन यांनीं त्याचे तीन कालखंड कल्पिलेले आहेत. 'पश्चिमेंतील सरंजामशाहीचा मोड होऊन भांडवलशाही यशस्वी झाली तो पहिला कालखंड. जनतेची राष्ट्रांमध्यें संघटना होण्याची क्रिया या कालखंडांत घडून आली.'[२] उदा० आयर्लंडव्यतिरिक्त ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व इटली हे देश. 'पूर्व युरोपमध्यें उलटपक्षीं अशी गोष्ट घडून आली कीं, सरंजामशाहीचा पाडाव व राष्ट्रकांचा उदय आणि मध्यसत्तानुवर्ति राज्यांची निर्मिती हीं समकालीं घडून आलीं नाहींत...त्यामुळें संमिश्र राज्यें निर्माण झालीं. म्हणजे स्वतंत्र राष्ट्रांचें स्वरूप ज्यांना अद्यापि प्राप्त झालेलें नाहीं, अशीं अनेक राष्ट्रकें एकाच राजसत्तेच्या छत्राखालीं एकत्र आलीं...पूर्व युरोपांत उदित झालेल्या या बहुराष्ट्रिक राज्यांतच अल्पसंख्याकांच्या छळणुकीचीं बीजें रुजलीं आणि त्यांतूनच नंतर राष्ट्रीय वैमनस्यें, राष्ट्रीय चळवळी, राष्ट्रीय समस्या व त्या सोडविण्याचे नानाविध उपाय इत्यादिकांचा उगम झाला.'[३] झारच्या आमदानींतील

१. पी. सी. जोशी : दे मस्ट मीट अगेन, पृ. ७.

२. स्टालिनः पृ. ९९. ३. स्टालिनः पृ. ९९–१००.

रशिया हें एक वरील प्रकारचें राज्य होतें. ग्रेट रशियन लोकांनीं आपल्या सरहद्दीवरील प्रदेशांतील जनतेचा छळवाद आरंभिल्यामुळें तेथेंहि हे प्रश्न निर्माण झाले होते.

'पूर्व युरोपांतील दुसऱ्या कालखंडाचें वैशिष्ट्य असें कीं झेक, पोल, युक्रेनियन आदिकरून गुलाम राष्ट्रांमध्यें जागृति व चैतन्य निर्माण झालें आणि साम्राज्यवाद्यांतील महायुद्धामुळें त्याला अवसर मिळून जुनीं बहुराष्ट्रिक भांडवलदारी राष्ट्रें लयास गेलीं आणि बलाढ्य राष्ट्रें म्हणून संबोधण्यांत येणाऱ्या राष्ट्रांच्या दावणीला बांधलेलीं नवीं राष्ट्रें त्यांच्याऐवजीं जन्मास आलीं.

'तिसऱ्या कालखंडाला सोव्हिएट-कालखंड म्हणतां येईल. त्यांत भांडवलशाहीचा बीमोड झाला व अल्पसंख्य राष्ट्रिकांच्या छळाचा अंत झाला.'[1]

हिंदुस्थानांत अशाप्रकारें विकास झाल्याचें आढळून येत नाहीं. सर्व ब्रिटिश हिंदुस्थानवर पसरलेलें व हिंदी संस्थानांवर निरंकुश सत्ता गाजविणारें एक मध्यवर्ति राज्य येथें आहे. पण या मध्यवर्ति राज्याचीं अधिकारसूत्रें हिंदुस्थानांतील कोणत्याहि जमातीच्या वा कोणत्याहि प्रांताच्या हातीं आतांपर्यंत आलेलीं नव्हतीं. पूर्व युरोपांत अथवा खास करून युरोपांत ज्याप्रमाणें घडलें, त्याप्रमाणें हिंदी लोकांच्या एकाद्या गटानें अथवा जमातीनें मध्यसत्तेचीं सूत्रें स्वतःच्या हातीं घेऊन इतर राष्ट्रकांचा छळ आरंभला असा प्रकार हिंदुस्थानांत घडलेला नाहीं. या देशांतील दरोबस्त जमाती एकाच परकी सत्तेच्या दासी बनलेल्या आहेत. म्हणून येथें एकमेकांपासून आपले हक्क सुरक्षित राखण्याचा प्रश्न उपस्थित होत नसून जी मध्यवर्ति सत्ता आपला अंकुश सर्व जमातींवर सरसहा सारखाच चालवीत असते, तिच्यापासून कसें मुक्त व्हावयाचें हा येथें खराखुरा प्रश्न आहे. म्हणून हिंदुस्थानची स्थिति युरोपांतील राष्ट्रकांसमान न मानतां ती इतर वसाहतींप्रमाणें आहे असें मानलें पाहिजे. तेव्हां साहजिकच प्रश्नांचा क्रम लावतांना गुलाम बनलेल्या राष्ट्रकांची एकमेकांपासून फाळणी कशी करावी या प्रश्नाला प्राधान्य देण्याऐवजीं ग्रेट ब्रिटनच्या जोखडाखालून

---

१. स्टालिनः पृ. १००–१०१.

देशाला मुक्त करण्याच्या प्रश्नाला तें देण्यांत यावयास हवें; आणि राष्ट्रसभेचा जो आग्रह आहे तो नेमका याच मुद्यावर आहे.

आतां परकीयांच्या वर्चस्वापासून व छळापासून मुक्त झाल्यानंतर अस्तंगत झालेल्या साम्राज्यवाद्यांच्या जागीं जो पक्ष बहुसंख्येमुळें आरूढ होईल त्याच्या हातून पूर्वीसारखाच त्रास व जाच सहन करण्याची पाळी अल्पसंख्याकांवर ओढवणार नाहीं याविषयीं त्यांना आश्वासन मिळालें पाहिजे, असें म्हणणें उचित ठरेल. आणि सोव्हिएट रशियाच्या राज्यघटनेंत जशा प्रकारच्या आवश्यक मर्यादा घातलेल्या आहेत, तशा प्रकारच्या मर्यादांनीं युक्त असा स्वयंनिर्णयाचा हक्क अल्पसंख्याकांच्या बाबतींत मान्य करण्याचें आश्वासन देणें शक्यहि होईल. 'फुटून निघण्याची मोकळीक राष्ट्रकांना आहे, म्हणजे वाटेल तेव्हां त्यांनीं फुटून वेगळें झालेंच पाहिजे असा त्याचा अर्थ करण्यांत येऊं नये...छळाला बळी पडलेल्या राष्ट्रकांचा विभक्त होण्याचा व स्वतःचें राजकीय भवितव्य ठरवण्याचा हक्क आम्हीं मान्य केला, म्हणजे अमुक एका क्षणीं रशियनराज्यांतून अमुक एका राष्ट्राला फुटून जाण्याच्या हक्काला आम्हीं मान्यता दिली असा त्याचा अर्थ होत नाहीं. राष्ट्राचा विभक्त होण्याचा हक्क मी मान्य करतों, याचा अर्थ त्याला विभक्त होण्यास मी भाग पाडीन असा नव्हे. राष्ट्राला विभक्त होण्याचा हक्क असला, तरी परिस्थिति पाहून तें विभक्त होईल अथवा होणार नाहीं. म्हणून कामगार–वर्गाचें, कामगार–क्रान्तीचें हितानहित लक्षांत घेऊन विभक्तीकरणाच्या वतीनें अथवा विरुद्ध चळवळ करण्याची मोकळीक आम्हांला आहे. यासाठीं प्रत्येक प्रसंगीं विभक्तीकरणाच्या प्रश्नाचा विचार स्वतंत्रपणें, विद्यमान परिस्थिति लक्षांत घेऊन करावयाचा असतो. म्हणून विभक्तीकरणाचा हक्क व विभक्तीकरणाचें एका विशिष्ट परिस्थितींतलें औचित्य यांची गल्लत आपण करतां कामा नये.''[१] हिंदुस्थानमध्यें जी मागणी करण्यांत येत आहे, ती विभक्तीकरणाच्या हक्काला मान्यता मिळावी अशी नसून, या घटकेला,

---

१. स्टालिन: पृ. ६४.

साम्राज्यशाही वर्चस्वाचें जूं मानेवरून दूर होण्याच्या पूर्वींच, फाळणी करण्यांत यावी असें तिचें स्वरूप आहे.

परिस्थितीचें वैशिष्टय लक्षांत न घेतां सर्व देशांत एकाच नमुन्याची नीति अंगीकारण्यांत यावी असा श्री. स्टालिन यांचा किंवा रशियन कम्युनिस्टांचा आग्रह नाहीं, हें यावरून उघड होतें. खास करून श्री. स्टालिन यांनीं तर इतर देशांना छळणाऱ्या साम्राज्यवादी देशांतील क्रान्तींत व वसाहती आणि परावलंबी गुलाम देश यांच्यांतील क्रान्तींत जे भेद असतात, ते आग्रहानें प्रतिपादन केलेले आहेत.[१] 'परकीय वर्चस्वामुळें सामाजिक विकासाच्या मार्गांत एकसारखे अडथळे निर्माण होतात' आणि 'म्हणून परकीय भांडवलदारांना झुगारून देणें हा वसाहतींतल्या क्रांतीचा श्रीगणेशा होय' हीं चीन व हिंदुस्थान यांसारख्या देशांसंबंधींचीं कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या एका प्रबंधांतलीं वाक्यें अधिकृत म्हणून त्यांनीं उध्दृत केलेलीं आहेत.[२]

राष्ट्रांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला व आपलें स्वतंत्र राजकीय जीवन निर्माण करण्याच्या त्यांच्या हक्काला कम्युनिस्ट-पक्षानें आपल्या नीतीमध्यें समाविष्ट करून घेतलेलें असलें, तरी खाजगी मालमत्ता व भांडवल यांचें उच्चाटन झाल्यावांचून, सामुदायिक मालमत्ता व श्रम यांची स्थापना झाल्यावांचून परपीडित राष्ट्रकांना खरी मुक्ति लाभणार नाहीं हा सिद्धांतहि तितक्याच ठामपणें त्यांनीं मांडलेला आहे. एवंच, एका संयुक्त राज्यांतील जनविभागांत जो बंधुभाव निर्माण करावयाचा तो राष्ट्रकांच्या विभक्तीकरणाच्या हक्काबरोबरच सोव्हिएट स्वरूपाच्या राज्याची प्रस्थापना व कामगारशाहीची निर्मिती यांना मान्यता देऊन निर्माण करावयाचा आहे. त्यांतलें फक्त विभक्तीकरणाचें सिद्धांत-सूत्रच तेवढें उचलून भागणार नाहीं. दोन्ही सूत्रें अखंड स्वरूपांत चालविण्याचें धोरण स्वीकारलें, तर अनेक कुलंगडीं उपस्थित होतील हें स्पष्ट आहे. मुस्लिम-लीगच्या पाकिस्तानला जे मान्यता देत आहेत, ते ही गोष्ट जाणून आहेत. म्हणूनच ते फक्त एकाच सिद्धांताचा गाजावाजा करीत असतात आणि दुसऱ्या सिद्धांता-

---

१. स्टालिन : पृ. २३२. २. उक्त ग्रंथ, पृ. २३६.

बाबत तोंड उघडीत नाहींत. लीगला हिंदुस्थानी कम्युनिस्टांकडून जो जोरदार टेकू देण्यांत येत असतो त्यासंबंधीं जनाब जिनांची व लीगची वृत्ति शत्रुत्वाची नसली, तरी ती फारशी उत्सुकतेची नसल्याचें दिसतें, तें कांहीं उगीच नव्हे.

## ४१. सप्रू-समितीच्या सूचना

कांहीं दिवसांपूर्वीं सर तेज बहादूर सप्रू यांच्या अध्यक्षतेखालीं एका समितीची स्थापना करण्यांत आली. ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें यांतील प्रतिष्ठित सरकारी नोकर व सार्वजनिक कार्यकर्ते या समितींत होते. त्यांतील सदस्यांचा कोठल्याहि जातीय पक्षाशीं घनिष्ट संबंध नसल्यानें आणि हिंदुस्थानांतील घटनात्मक वा राजकीय समस्या सोडविण्यासाठीं मांडण्यांत येणाऱ्या कोठल्याहि योजनेचा त्यांनीं अंगीकार केलेला नसल्यानें ते निःपक्षपाती अशाच सूचना मांडतील असा या समितीचा दावा होता. या समितीनें आपले निर्णय दोन खंडांत प्रसिद्ध केले आहेत. पहिला खंड मध्यवर्ति राष्ट्रीय सरकारच्या प्रस्थापनेसाठीं कराव्या लागणाऱ्या तात्पुरत्या व्यवस्थेबाबत असून दुसरा खंड हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेबाबतचा आहे. येथें मी या दुसऱ्या खंडाचाच परामर्श घेणार आहें.

समितीच्या प्रसिद्ध झालेल्या योजनेंत हिंदी स्वातंत्र्याबाबत कोठलीहि निश्चित सूचना नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटनेंच ती अमलांत आणावयाची आहे. तथापि ती अमलांत आणण्याच्या ब्रिटिश पार्लमेंटच्या अधिकाराबाबतचा विचार तूर्त बाजूला ठेवला, तरी या योजनेचें स्वरूप असें आहे कीं जें वासाहतिक राज्यघटना अथवा स्वतंत्र हिंदुस्थानची घटना या दोन्हींशीं सुसंगत होऊं शकेल.

सर स्टॅफोर्ड क्रिप्स् यांनीं मांडलेल्या कच्च्या खर्ड्यांच्या कलम (३) मध्यें नियोजित केलेल्या पद्धतीनुसार घटनाकारी मंडळ बनविण्यांत येईल. मात्र त्यांत पुढीलप्रमाणें सुधारणा करण्यांत याव्यात: (१) या मंडळांतील सभासदांची संख्या एकूण १६० करण्यांत येऊन त्यांची वांटणी पुढीलप्रमाणें केली जाईल: व्यापार व उद्योगधंदे, जमीनदार, विश्वविद्यालयें, कामगार व स्त्रिया यांच्या खास हितसंबंधांना १६; सवर्ण हिंदू ५१; मुसलमान ५१; हरिजन २०, हिंदी खिस्ती ७;

शीख ८; मागासलेले प्रदेश व वन्यजाती ३; अँग्लो इंडियन् २; युरोपियन १; इतर १. समितीनें घटनाकारी मंडळांतील सदस्यांची संख्या १६० असावी असें ठरविलें आहे. क्रिप्स्-योजनेमध्यें कायदेमंडळांतील जी संख्या सदस्यांच्या एकदशांश इतकी असावी असें सुचविण्यांत आलें होतें, ती संख्याहि १६० च्याच आसपास झाली असती. याबाबत क्रिप्स्-योजना व सप्रू-योजना यांतील फरक पुढीलप्रमाणें आहेः—सप्रू-योजनेंत प्रत्येक हितसंबंधाला अथवा जमातीला देण्यांत यावयाच्या जागांची संख्या ठरवून टाकलेली असून सवर्ण हिंदू व मुसलमान यांचें समप्रमाण करण्यांत आलेलें आहे. उलट, क्रिप्स्-योजनेंत प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वावर प्रत्येक हितसंबंधाची व जमातीची संख्या ठरविण्यांत आल्यानें कायदेमंडळांत निवडून आलेल्या एकाद्या गटसंख्येच्या प्रमाणांतच त्यास घटनाकारी मंडळांतहि प्रतिनिधित्व मिळालें असतें. यामुळें अर्थात् सप्रू-समितीच्या योजनेंतील जागांपेक्षां त्यांत मुसलमानांना कमी व हिंदूंना अधिक जागा मिळाल्या असत्या. जातीय ऐक्याप्रीत्यर्थ वरील बदल करणें समितीला योग्य वाटलें असावें.

मतदान करणाऱ्या उपस्थित सदस्यांपैकीं तीनचतुर्थांश सदस्यांचा पाठिंबा असल्याखेरीज घटनाकारी मंडळाचा कोठलाहि निर्णय पक्का झाला असें म्हणतां येणार नाहीं. घटनाकारी मंडळानें घेतलेल्या निर्णयानुसार बादशहाचें सरकार ती घटना कायदेशीरपणें अमलांत आणील. घटनाकारी मंडळास आवश्यक तें बहुमत मिळत नसेल, तर जरूर तेथें सरकारनें त्याला निर्णय पक्के करण्यास मदत करावी.

**हिंदुस्थानचें विभक्तीकरणः**—हिंदुस्थानचे दोन वा अधिक तुकडे पाडून वेगळीं स्वतंत्र सार्वभौम राज्यें निर्माण करण्यास या समितीचा विरोध आहे. कारण त्यामुळें देशाची शांततामय प्रगति तर धोक्यांत येतेच, शिवाय कोठल्याहि जमातीस त्यामुळें म्हणण्यासारखा फायदाहि होत नाहीं, असें या समितीचें मत आहे.

**हिंदी संस्थानेंः**—संयुक्त हिंदुस्थानांत एकमेकांस सम्मत अशा अटींवर त्यांना समाविष्ट करण्याची तजवीज असावी; पण त्यांपैकीं एका वा अनेकांच्या समाविष्ट होण्यावर संयुक्त हिंदी सरकारची प्रस्थापना अवलंबून ठेवण्यांत येऊं नये.

**अलग राहण्याचा व फुटून निघण्याचा हक्कः**–ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोठल्याहि प्रांतास अलग राहण्याचा आणि समाविष्ट झालेल्या कोठल्याहि प्रांतास वा संस्थानास फुटून निघण्याचा हक्क असणार नाहीं.

भाषा वा संस्कृतीनुसार प्रांतरचनेंत फेरबदल करण्यासाठीं नवीन घटना व्यवहारांत आणण्यास विलंब करणें समितीस नापसंत आहे. हा बदल नंतर करण्यांत यावा.

घटनाकारी मंडळास समितीच्या शिफारसी पुढीलप्रमाणें आहेतः—

संयुक्त हिंदी राज्याचा एक मुख्याधिपति राहील व त्यास पुढील अधिकार असतीलः–(अ) घटनेंत वा घटनेनुसार त्यास मिळालेले वा बहाल केलेले सर्व अधिकार; (ब) इंग्लंडच्या बादशहांच्या हातीं असलेले हिंदी संस्थानांबाबतच्या अधिकारासकट इतर सर्व अधिकार. या मुख्याधिपतीची मुदत पांचवर्षेंपर्यंत राहील. आणि तो सामान्यतः एकापेक्षां अधिक वेळां ती जागा स्वीकारणार नाहीं. या मुख्याधिपतीची निवड (१) संयुक्त कायदेमंडळांच्या दोन्ही गृहांतील सदस्यांच्या निवड–मंडळाकडून होईल. या मंडळाच्या निवडीच्या क्षेत्रावर कोठलेंहि बंधन नसेल किंवा किमान लोकसंख्या वा करवसुली वा दोन्हींची मर्यादा असलेल्या संस्थानाधिपतींपुरतेंच निवडीचें क्षेत्र मर्यादित करण्यांत येईल. किंवा (२) वर सांगितलेले संस्थानाधिपती आपल्यांतूनच त्याची निवड करतील. किंवा (३) इंग्लंडचे बादशहा संयुक्त हिंदुस्थानच्या अमात्य–मंडळाच्या सल्ल्यानुसार त्याची निवड करतील. या निवडीला कोठलेंहि बंधन नसेल किंवा वर सांगितलेल्या संस्थानाधिपतींपुरतेंच तें मर्यादित असेल.

या तिसऱ्या धर्तीवर जरी त्याची निवड होऊन ब्रिटिश साम्राज्याशीं असलेला आपला संपर्क कायम राहिला, तरी भारतमंत्र्यांची जागा व तो किंवा ब्रिटिश मंत्रिमंडळ यांचे हातीं असलेलें हिंदी राज्यशासनाबाबतचें अधिकार-नियंत्रण रद्द करण्यांत यावें.

हिंदी संस्थानांव्यतिरिक्त घटकांच्या प्रमुखांची नेमणूक मुख्याधिपतीनें संयुक्त भारताच्या सल्ल्यानें करावी.

**संयुक्त कायदेमंडळः**—मुख्याधिपति व वरिष्ठ आणि कनिष्ठ कायदेमंडळ या दोन्हींचें मिळून सयुक्त कायदेमंडळ बनवावें. त्यांतील संख्या प्रत्येक दश-लक्षास एक प्रतिनिधि या प्रमाणांत असावी. जमीनदार, व्यापारी आणि उद्योग-धंदेवाले, कामगार व स्त्रिया यांच्या खास हितसंबंधांसाठीं एकदशांश जागा राखून ठेवाव्यात. राहिलेल्या जागा पुढील जमातींमध्यें वांटून द्याव्यातः—सवर्ण हिंदू, मुसलमान, अस्पृश्य, शीख, हिंदी ख्रिस्ती, अँग्लेइंडियन् आणि इतर. विभक्त मतदारसंघांच्या ऐवजीं राखीव जागा ठेवून संयुक्त मतदारसंघांना जर मुसलमान-जमातीनें मान्यता दिली, तरच खास हितसंबंधांना दिलेल्या जागा वगळून बाकीच्या हिंदुस्थानला मध्यवर्ति कायदेमंडळांत मिळालेल्या जागा सवर्ण हिंदूंनीं मुसलमानांशीं समप्रमाणांत वांटून घेण्याची तयारी दर्शवावी, अशी या समितीची शिफारस आहे. वरील शिफारस जर संपूर्णतया अमलांत आणली गेली नाहीं, तर हिंदूंना समप्रतिनिधित्व असंमत करण्याची, इतकेंच नव्हे, तर जातीय निवाड्याच्या पुनर्विचाराची मागणी करण्याची मोकळीक असावी.

शीख व अस्पृश्य यांना हिंदी सरकारच्या सद्यःकालीन कायद्यांप्रमाणें देण्यांत आलेलें प्रतिनिधित्व अपुरें आणि अन्याय्य असल्यानें तें वाढविण्यांत यावें. ही वाढ किती करावयाची याचा निर्णय घटनाकारी मंडळानें घ्यावा.

संयुक्त कायदेमंडळांतील राखीव जागा सोडून इतर जागांच्या प्रतिनिधींची निवड प्रौढ मतदान-पद्धतीनें व्हावी.

**सत्तेची वांटणीः**-या बाबतची संपूर्ण यादी घटनाकारी मंडळानें तयार करावी. या मंडळाच्या मार्गदर्शनासाठीं पुढील शिफारशी समिति करीत आहे:—

मध्यवर्ति सरकारच्या हातीं शक्य तितके किमान अधिकार असावेत. मात्र त्यांत खालील अधिकारांचा समावेश व्हावा:—(१) परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, हिंदी संस्थानांचे संबंध, वाहतुक, व्यापार, जकाती, टपाल व तारखातें या अखिल हिंदुस्थानचा संबंध असलेल्या बाबी. (२) घटक-राज्यांतील एकमेकांचे झगडे मिटविणें. (३) वेगवेगळ्या घटकांच्या कायद्यांमध्यें व राज्यव्यवस्थेमध्यें जरूर तेथें एकसूत्रीपणा निर्माण करणें आणि (४) हिंदुस्थान किंवा त्याचा

कोणताहि भाग यांच्या रक्षणासाठीं वा शांतताप्रस्थापनेसाठीं, किंवा हिंदुस्थानचें राजकीय अखंडत्व आणि आर्थिक ऐक्य कायम रहावें यासाठीं किंवा कोठल्याहि आणीबाणीच्या परिस्थितीसाठीं आवश्यक वाटतील त्या सर्व गोष्टी करण्याचे अधिकार.

**शेषाधिकारः**—संयुक्त राज्य वा त्यांतील घटकराज्यें यांच्या अधिकारांच्या यादींत समाविष्ट न झालेले सर्व अधिकार घटकराज्यांकडे राहतील. घटकांमधील जकात—बंधनें रद्द केल्यामुळें ज्यांचें नुकसान होईल अशा घटकांची नुकसान-भरपाई करण्याची तयारी मध्यवर्ति सरकारनें दर्शविल्यास तीं जकातबंधनें रद्द करण्यांत यावींत.

**मध्यवर्ति कार्यकारी-मंडळः**—संयुक्त राज्याच्या कार्यकारी-मंडळावर पुढील जमातींचे प्रतिनिधी घेण्यांत येणार असल्याकारणानें तें संमिश्र राहील. (१) सवर्ण हिंदू. (२) मुसलमान. (३) अस्पृश्य. (४) शीख. (५) हिंदी ख्रिस्ती. (६) अँग्लो इंडियन्. कार्यकारी-मंडळांतील या जमातींचें संख्याबल शक्यतों त्यांच्या कायदेमंडळांतील संख्याबलाच्या प्रमाणांत असावें.

जरी एकाद्या जमातीनें आपला प्रतिनिधि त्यांत धाडण्याचें नाकारलें, तरी त्याची अनुपस्थिति जमेस न धरतां कार्यकारीमंडळ सनदशीरपणें अमलांत आलें असें समजण्यांत येईल.

हें मंत्रिमंडळ संयुक्त रीत्या कायदेमंडळास जबाबदार राहील आणि त्यास एकत्रित ठेवण्याचें व त्याचें नेतृत्व करण्याचें कार्य पंतप्रधान करील. निर्विवाद बहुमत असणाऱ्या एका वा अनेक पक्षांच्या पुढाऱ्यास पंतप्रधानाचीं वस्त्रें मिळावींत. पंतप्रधानपद व उपपंतप्रधानपद एकाच जमातीकडे कायमचें जाणार नाहीं, अशी प्रथा पाडण्यांत यावी.

पंतप्रधानाखेरीज उपपंतप्रधानासुद्धां सर्व मंत्र्यांची नेमणूक पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार करण्यांत यावी. उपपंतप्रधान पंतप्रधानाच्याच जातीचा असूं नये, असा नियम करण्यांत यावा.

वरील योजनेस दुसरा एक पर्याय सुचविलेला आहे; तो असा कीं, मध्यवर्ति

कायदेमंडळांच्या संयुक्त सभेंत क्रमदेय मतदानपद्धतीनें वरप्रमाणेंच जातवारी असलेलें मंत्रिमंडळ निवडलें जावें, आणि या मंत्रिमंडळाची मुदत या कायदेमंडळांच्या आयुर्मर्यादेइतकी असावी. तसेंच सभागृहांनीं वेगवेगळ्या जातीचा अध्यक्ष व उपाध्यक्ष या मंत्रिमंडळांतून निवडावा.

**हिंदी संस्थानांचे मंत्रीः**—हिंदी संस्थानांसंबंधींच्या कार्यासाठीं एक मंत्री नेमण्यांत येऊन तीनपेक्षां कमी व पांचपेक्षां अधिक संख्या नसलेलें एक सल्लागार-मंडळ त्याचेबरोबर सहकार्य करण्यासाठीं हिंदी संस्थानांच्या संमतीनें नेमण्यांत यावें. या मंडळाचें नांव 'हिंदी संस्थानांबाबतचें सल्लागार-मंडळ' असें राहील. मंत्र्यांना या सल्लागार-मंडळाचा सर्व महत्त्वाच्या बाबतींत सल्ला घ्यावा लागेल, आणि घटनात्मक कायद्यांत उल्लेखिलेल्या कांहीं विशिष्ट बाबतींत त्यांची संमतीहि मिळवावी लागेल.

**न्यायखातेंः**—संयुक्त राज्यांत एक सर्वश्रेष्ठ आणि घटक राज्यांत एक वरिष्ठ न्यायालय असेल. प्रथमतः घटनात्मक कायद्यान्वयें न्यायाधीशांची संख्या व त्यांचे पगार ठरविण्यांत येतील. त्यांत बदल करतां येणार नाहीं; आणि बदल केलाच तर त्यास घटक-राज्यांतील वरिष्ठ न्यायालय, तत्प्रांतीय सरकार व सर्वश्रेष्ठ न्यायालय यांची शिफारस आणि मुख्याधिपतीची संमति असली पाहिजे. मात्र पगारांत हा बदल करतांना कोठल्याहि न्यायाधीशाच्या नोकरीची मुदत संपेपर्यंत त्याची हानि होणार नाहीं अशी दक्षता घ्यावी.

मुख्याधिपति सर्वश्रेष्ठ न्यायाधीशाची नेमणूक करील व या न्यायाधीशाच्या सल्ल्यानें सर्वश्रेष्ठ न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांचीहि नेमणूक तोच करील. घटक-राज्यांतील वरिष्ठ न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाची नेमणूक मुख्याधिपतीनें घटक-राज्यांतील प्रमुखाचा व सर्वश्रेष्ठ न्यायाधीशाचा सल्ला घेऊन करावयाची आहे. घटक-राज्यांतील वरिष्ठ न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांची नेमणूक मुख्याधिपतीनें सर्वश्रेष्ठ न्यायाधीश, घटक-राज्यांतील प्रमुख व न्यायालयांतील प्रमुख न्यायाधीश यांचा सल्ला घेऊन करावयाची आहे. वरिष्ठ न्यायालयांतील वा सर्वोच्च न्यायालयांतील न्यायाधीशांची नेमणूक आजीव करण्यांत यावी.

**संरक्षणः**—संरक्षणखात्याचा मंत्री कायदेमंडळास जबाबदार असला, तरी व्यवहारतः सैन्याच्या शिस्तपालनाचें व नियंत्रणाचें कार्य सरसेनापतीकडे सोंपविण्यांत यावें.

शक्य तितक्या लौकर राष्ट्रीय सैन्य उभारून त्यांचें संवर्धन करण्यांत यावें. अशा सैन्याच्या उभारणीबाबत समितीच्या शिफारसी पुढीलप्रमाणें आहेतः—(अ) हिंदुस्थानच्या कार्यक्षम संरक्षणासाठीं तात्पुरते आवश्यक वाटतील तेवढे सैन्यविभाग, आणि आवश्यक तितके हिंदी शिक्षित अधिकारी तयार होईपर्यंत जरूर तितके ब्रिटिश सैन्याधिकारी संयुक्त राज्य आणि बादशहांचें राज्य यांमध्यें तह करून नोकरीवर ठेवण्यांत येतील. (ब) युद्धसमाप्तीबरोबर ब्रिटिश अधिकाऱ्यांची हिंदी सैन्यांतील भरती थांबविण्यांत यावी. विशिष्ट कामासाठीं आवश्यकता नसलेले व हिंदी सैन्यांत पूर्वी नसलेले ब्रिटिश सैन्याधिकारी आपआपल्या ब्रिटिश सैन्यांतील पूर्वस्थानीं पाठविण्यांत यावेत. सैन्य, नाविकदलें आणि हवाईदल या तिन्हींमध्यें आवश्यक तितक्या अधिकाऱ्यांच्या शिक्षणासाठीं एक विद्यालय प्रस्थापित करण्यांत यावें. विद्यमान शिक्षणपद्धतीमध्यें (सैन्य वगैरेच्या) असलेले दोष सुधारण्यांत यावेत. विश्वविद्यालयीन सैन्याधिकारी दल (यू. टी. सी.) नसेल तेथें स्थापन करण्यांत यावें व असेल तेथें वाढविण्यांत यावें.

**सरकारी नोकऱ्यांतील प्रतिनिधित्वः**— नवीन घटना अमलांत येईपर्यंत सरकारी नोकऱ्यांतील जातवार प्रमाणाबाबतचे मध्यवर्ति सरकारचे हुकूम अस्तित्वांत रहावेत. मात्र समितीची अशी शिफारस आहे कीं शीख, हिंदी ख्रिस्ती, ॲंग्लो इंडियन व पारशी यांना सध्यां मिळत असलेल्या ८$\frac{1}{3}$ टक्के प्रमाणाची फेरवांटणी पुढीलप्रमाणें करावीः—शीख ३$\frac{1}{3}$ टक्के, हिंदी ख्रिस्ती ३ टक्के, ॲंग्लो इंडियन् आणि पारशी १$\frac{2}{3}$ टक्के. परंतु या शिफारसीमुळें १९३५ च्या हिंदुस्थान—सरकारच्या २४२ व्या कायद्याप्रमाणें कांहीं विशिष्ट नोकऱ्यांबाबत ॲंग्लो इंडियनांसाठीं जी तजवीज केलेली आहे तिला बाध येत नाहीं.

सरकारी नोकऱ्यांबाबतच्या संयुक्त आणि घटकराज्यांतील कमिशनचे अध्यक्ष

व सदस्य यांची नेमणूक मुख्याधिपति वा घटक-राज्यांतील प्रमुख यांनीं संयुक्त राज्याच्या वा घटक राज्याच्या पंतप्रधानांचा सल्ला घेऊन करावयाची आहे.

**मूलभूत हक्कः**—मूलभूत हक्कांचा एक व्यापक जाहीरनामा राज्यघटनेमध्यें समाविष्ट करण्यांत यावा व त्यांत (अ) व्यक्तिस्वातंत्र्य, (आ) मुद्रण व संघ-स्वातंत्र्य, (इ) सर्व राष्ट्रकांना समान नागरिकत्वाचे हक्क, (ई) संपूर्ण धार्मिक सहिष्णुता, (उ) सर्व जमातींच्या भाषांचें व संस्कृतींचें संरक्षण, (ऊ) परंपरेनें अस्पृश्य वर्गावर घालण्यांत आलेल्या निर्बंधांचें निराकरण व शीखांच्या कृपाण-धारणासारख्या विशिष्ट धार्मिक आचारांचें रक्षण करण्यांत येईल, असें त्यांत समाविष्ट करण्यांत यावें.

**अल्पसंख्याक समितिः**—अल्पसंख्याकांबाबत मध्यवर्ति (संयुक्त) व प्रांतिक (घटक) राज्यांत एक स्वतंत्र समिति असेल व कायदेमंडळांतील प्रत्येक जातीच्या प्रतिनिधींनीं निवडलेल्या प्रतिनिधीचा (हा प्रतिनिधी त्याच जातीचा असला पाहिजे असें नव्हे) त्यांत समावेश होईल. कायदेमंडळांतील कोठल्याहि प्रति-निधीला या समितीवर निवडून जातां येणार नाहीं, व अशा निवडून गेलेल्या प्रतिनिधीची मुदत कायदेमंडळाच्या मुदतीइतकी असेल. या समितीचें कार्य पुढीलप्रमाणें राहीलः—(१) त्या त्या जमातीच्या हितसंबंधांबद्दल अव्याहत जाग-रूक राहणें. (२) कमिशनला योग्य वाटेल ती माहिती मागविणें. (३) मूल-भूत हक्कांची अमलबजावणी कशा तऱ्हेनें होत आहे याचें वारंवार परीक्षण करणें व तदनुसार पंतप्रधानास अहवाल सादर करणें. समितीच्या शिफारसींचा मंत्रि-मंडळाकडून विचार करण्यांत येईल. समितीचा अहवाल तदनुसार करण्यांत आलेल्या उपाययोजनांच्या संपूर्ण माहितीसह पंतप्रधान कायदेमंडळापुढें मांडतील आणि त्याबाबतच्या चर्चेसाठीं कायदेमंडळास सर्व प्रकारें सवलत देण्यांत येईल.

**पंजाबमधील अल्पसंख्याकः**—ही समिति घटनाकारी मंडळाचें लक्ष शीख, हिंदू आणि हिंदी ख्रिस्ती यांना पंजाब-कायदेमंडळांत देण्यांत आलेल्या प्रति-निधित्वाकडे वेधूं इच्छिते व त्याचें समग्र परीक्षण व्हावें असें सुचविते.

**घटनेस उपसूचनाः**—घटना प्रसिद्ध झाल्यानंतर सहा महिनेपर्यंत संयुक्त

कायदेमंडळांत घटनेस उपसूचना सुचविणारा ठराव मांडतां येणार नाहीं. आणि वरिष्ठ व कनिष्ठ कायदेमंडळ या दोन्हींमध्यें एकंदर संख्येच्या दोन-तृतीयांश सभासदांनीं पाठिंबा दिल्याखेरीज ही उपसूचना संमत झाली असें मानलें जाणार नाहीं. शिवाय ही उपसूचना किमानपक्षीं दोनतृतीयांश घटक-राज्यांच्या कायदेमंडळांची मान्यता मिळाल्याखेरीज अमलांत आणली जाणार नाहीं.

घटना अमलांत आल्यापासून पांच वर्षेपर्यंत घटनानिविष्ट अशा महत्त्वपूर्ण बाबतींत कसल्याहि तऱ्हेचा ठराव मांडतां येणार नाहीं.

निरनिराळ्या व्यक्तींनीं निरनिराळ्या दृष्टिकोणांतून या योजनेवर टीका केलेली आहे. या योजनेंतील जी गोष्ट एकाद्यास दोषास्पद वाटली, तीच दुसऱ्यास गुणास्पद वाटली. अशा तऱ्हेनें अनेक टीकांचा परस्पर-छेद होतो. कोठल्याहि एकांतिक दृष्टिकोणांतून ती मांडण्यांत आलेली नाहीं, हा या योजनेस पूरक असाच मुद्दा आहे. त्यांत मुस्लिम-लीगची पाकिस्तानची मागणी झिडकारली आहे, तर घटनाकारी मंडळांत, तसेंच वरिष्ठ कायदेमंडळांत व संयुक्त मंत्रि-मंडळांत सवर्ण हिंदू व मुसलमान यांस समप्रतिनिधित्व देण्यांत आलें आहे. पण त्याचबरोबर अशी शर्त घालण्यांत आली आहे, कीं मुसलमानांनीं विभक्त मतदारसंघाचा हक्क सोडून द्यावा.

यांत स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे काणाडोळा केला नसला, तरी वसाहतीच्या स्वराज्यासाठींहि दरवाजा उघडा करून दिलेला आहे. मुख्याधिपतीची जागा निवडणूक करून भरण्यांत यावी या तरतुदीबरोबरच मतदारांच्या निवडणुकीचें क्षेत्र संस्थानिकांपुरतेंच मर्यादित करण्यांत आलें आहे. संस्थानिकांच्या बाबतचे हक्क संयुक्त सरकारच्या मंत्रिमंडळाच्या हातीं सुपूर्त करण्यांत आलेले असले, तरी मुख्याधिपति बनण्याचा अधिकार फक्त संस्थानिकांनाच देण्यांत आलेला आहे. मुख्याधिपतीच्या पदाची आयुर्मर्यादा पांच वर्षांची ठेवण्यांत आली असली, तरी तें बड्या संस्थानिकांच्या गटांमध्येंच फिरतें राहील अशी शक्यता या योजनेमुळें निर्माण झाली आहे. मंत्रिमंडळ विधिमंडळाला जबाबदार ठेवण्यांत आलें असलें, तरी विधिमंडळांतील निरनिराळ्या गटांचे प्रतिनिधी त्यांत समाविष्ट

करून त्याला संमिश्र स्वरूप देण्यांत आलें आहे. विधिमंडळांमध्यें जातवार गट पाडलेले आहेत. परंतु मतदारसंघ संयुक्त बनवून इतर गटांच्या सभासदांच्या निवडणुकीवर सर्व जातीय गटांना आपला प्रभाव पाडतां येण्याची शक्यता त्यांत आहे. एकमेकांस शह देऊन परस्परांचा समतोल साधावा आणि कोणत्याहि एका जातीय गटाला घटनाकारी मंडळामध्यें वा संयुक्त राज्याच्या विधिमंडळामध्यें वा मंत्रिमंडळामध्यें वर्चस्व गाजवितां येऊं नये, हा या योजनेचा हेतु आहे. घटनेचा तपशील बनविण्याचें कार्य घटनाकारी मंडळाकडे सुपूर्त करण्यांत आलें आहे.

इतर सर्व टीका बाजूला ठेवली, तरी कांहीं विशिष्ट संस्थानिकांपुरताच मुख्याधिपतीचा अधिकार मर्यादित करण्याचें—आणि तेंहि, त्यांचे अधिकार त्यांच्या प्रजाजनांच्या हातीं संक्रमित करण्याची योजना केलेली नसतांना—कांहीं कारण दिसत नाहीं. संस्थानिकांनीं लोकसत्ताक राज्यघटनेनुसार वागण्याची आपली इच्छा वा लायकी असल्याचा कोणत्याहि प्रकारचा पुरावा पुढें आणलेला नाहीं. अशा परिस्थितींत त्यांचे अधिकार, त्यांच्या प्रजाजनांच्या हातीं देण्याच्या ऐवजीं केवळ त्यांच्याच संस्थानांच्या नव्हे, तर अखिल हिंदुस्थानच्या मुख्याधिपतिपदाची ठेकेदारी त्यांना देण्याची योजना केली जावी, हें विचित्र होय.

## ४२. डॉ. आंबेडकरांची योजना

डॉ. आंबेडकरांनीं जातीय प्रश्नावर नुकताच एक नवीन उपाय सुचवलेला असून तो पाकिस्तानपेक्षां चांगला आहे असा त्यांचा दावा आहे. बहुसंख्य जमातीला प्रतिनिधित्व देतांना सापेक्ष बहुमत द्यावें, तिला निखालस बहुमत कधींहि देऊं नये, या तत्त्वाचा अवलंब करून त्यांनीं आपला उपाय सांगितला आहे. हिंदु बहुसंख्य असलेल्या आणि मुसलमान बहुसंख्य असलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या प्रांतांना हें तत्त्व लागू करण्यांत आलें आहे. कोणत्याहि ठिकाणीं बहुसंख्य जमातीला ४० टक्क्यांहून अधिक प्रतिनिधित्व दिलेलें नाहीं. घटनासमितीच्या कल्पनेला डॉ० आंबेडकरांचा स्पष्ट विरोध आहे. कारण त्यांच्या

मतें १९३५ च्या हिंदुस्थान–सरकारच्या कायद्यांत हिंदुस्थानच्या घटनात्मक प्रश्नासंबंधीं इतक्या गोष्टी आहेत, कीं घटनासमिति स्थापन करण्याचें कारणच उरत नाहीं. फक्त त्या कायद्यांत वसाहतीच्या स्वराज्याशीं विसंगत असलेलीं कलमें काढून टाकलीं कीं काम भागण्यासारखें असल्यामुळें, आहे तीच गोष्ट पुन्हां तयार करण्यासाठीं घटनासमिति स्थापन करणें त्यांना अनवश्यक वाटतें.

कायदेमंडळांतील, कार्यकारी–मंडळांतील आणि सरकारी नोकऱ्यांतील प्रतिनिधित्व अशा तीन विभागांत जातीय प्रश्नाची फोड करून या प्रत्येक विभागासाठीं कोणतीं तत्त्वें लागू करावींत, हें डॉ. आंबेडकरांनीं सांगितलें आहे. हिंदू, मुसलमान व हरिजन यांना कायदेमंडळांत जें प्रतिनिधित्व मिळालें असेल, त्या प्रमाणांत त्यांना कार्यकारी–मंडळांत प्रतिनिधित्व असावें. इतर अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व मिळण्यासाठीं एकदोन जागा राखून ठेवाव्यात आणि मंत्र्यांना जे पार्लमेंटरी चिटणीस लागतील त्यांत त्यांना योग्य प्रमाणांत जागा मिळाव्यात, असा संकेत प्रस्थापित करावा.

कार्यकारी–मंडळ कायदेमंडळांतील बहुमतवाल्यापक्षाची समिति बनूं नये; तर कायदेमंडळांतील अल्पसंख्य व बहुसंख्य या दोघांचेंहि पाठबळ त्याला असावें. कायदेमंडळाची मुदत संपेपर्यंत तें कामावरून दूर केलें जाऊं नये. पण त्यांतील सदस्य कायदेमंडळाच्या सभासदांतून निवडलेले असावेत व त्यांना सभागृहांत बसण्याचा, बोलण्याचा, मतदान करण्याचा व प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा अधिकार असावा.

सरकारच्या कार्यकारी–मंडळाचा प्रमुख म्हणून पंतप्रधान त्यांतील सर्व सभासदांच्या विश्वासांतील असावा. मंत्रिमंडळांतील अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधींवर त्या जमातीच्या कायदेमंडळांतील सभासदांचा विश्वास असला पाहिजे. राजद्रोह अगर लांचलुचपत या आरोपाखालीं कायदेमंडळानें चौकशी करून दोषी ठरविलें, तरच एकाद्या मंत्र्याला काढून टाकतां येईल. इतर कोणत्याहि कारणासाठीं त्याला काढण्यांत येऊं नये. या तत्त्वांचा अवलंब करून सभागृहांतील सर्व सभासदांनीं क्रमदेय मतदानपद्धतीनें पंतप्रधान व बहुसंख्य जमातींतील

मंत्र्यांची निवड करावी आणि निरनिराळ्या अल्पसंख्याकांतील मंत्र्यांना विधिमंडळांतील त्या त्या जमातींच्या प्रतिनिधींनीं क्रमदेय मतदानपद्धतीनें निवडावें.

निरनिराळ्या जमातींना पुढीलप्रमाणें प्रतिनिधित्व मिळावें:—

## कोष्टक ५२.

एकुण लोकसंख्येशीं जमातींचें असलेलें प्रमाण व त्या जमातींना मिळणाऱ्या जागा खालीं दर्शविल्या आहेत:—

| | | | |
|---|---|---|---|
| मध्यवर्ति विधिमंडळांत | ५४·६८ टक्के | हिंदूंना | ४० टक्के |
| | २८·५ टक्के | मुसलमानांना | ३२ टक्के |
| | १४·३ टक्के | हरिजनांना | २० टक्के |
| | १·१६ टक्के | ख्रिस्त्यांना | ३ टक्के |
| | १·४९ टक्के | शिखांना | ४ टक्के |
| | ०·५ टक्के | ॲंग्लो इंडियनांना | १ टक्के |

(एकुण लोकसंख्येमधून वन्यजाती वजा करून निरनिराळ्या जमातींचें शेंकडा प्रमाण तयार केलें आहे.)

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई प्रांतांत | ७६·४२ टक्के | हिंदूंना | ४० टक्के |
| | ९·९८ टक्के | मुसलमानांना | २८ टक्के |
| | ९·६४ टक्के | हरिजनांना | २८ टक्के |
| | १·७५ टक्के | ख्रिस्त्यांना | २ टक्के |
| | ०·०७ टक्के | ॲंग्लो इंडियनांना | १ टक्के |
| | ०·४४ टक्के | पारशांना | १ टक्के |
| पंजाब प्रांतांत | ५७·०६ टक्के | मुसलमानांना | ४० टक्के |
| | २२·१७ टक्के | हिंदूंना | २८ टक्के |
| | १३·२२ टक्के | शिखांना | २१ टक्के |
| | ४·३९ टक्के | हरिजनांना | ९ टक्के |
| | १·७१ टक्के | ख्रिस्त्यांना | २ टक्के |

वरील विभागणी पुढें दिलेल्या तत्त्वांना धरून केलेली आहे असें डॉ. आंबेडकरांचें म्हणणें आहे:—

१) बहुसंख्याकांनीं राज्यकारभार चालविणें तत्त्वतः असमर्थनीय आणि व्यवहारतः अन्याय्य आहे.

(२) बहुसंख्याकांना मिळणारें सापेक्ष बहुमत, लहानांत लहान अल्पसंख्याकांच्या मदतीनें राज्यकारभार चालवितां येईल इतकें मोठें असूं नये.

(३) बहुसंख्य जमातीनें प्रमुख अल्पसंख्य जमातीशीं संगनमत केल्यानें त्या दोघांना अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष करून चालतां येईल इतकें बहुमत असणार नाहीं, अशी खबरदारी जागांची वांटणी करतांना घेण्यांत यावी.

(४) जागांची विभागणी अशा रीतीनें करण्यांत यावी, कीं ज्या योगें सर्व अल्पसंख्याक एकत्र झाल्यास त्यांना बहुसंख्याकांवर अवलंबून न राहतां आपलें सरकार स्थापन करतां यावें.

(५) बहुसंख्य पक्षाच्या ज्या जागा कमी करण्यांत येतील त्या अल्पसंख्याकांना त्यांची सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थिति या बाबतींतील लायकीच्या उलट प्रमाणांत वांटून देण्यांत याव्यात; म्हणजे जी अल्पसंख्य जमात लोकसंख्येच्या दृष्टीनें मोठी असेल व जिची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रतिष्ठा अधिक असेल, तिला तिच्याहून हीन दर्जाच्या अल्पसंख्य जमातीपेक्षां कमी जागा देण्यांत याव्यात.

आपली योजना मुसलमानांच्या दृष्टीनें पाकिस्तानपेक्षांहि अधिक चांगली आहे असा डॉ. आंबेडकरांचा दावा आहे. कारण (१) पाकिस्तानला आधारभूत झालेला बहुसंख्य लोकांकडून होणाऱ्या दडपशाहीचा धोका तींत नाहीं; (२) हल्लीं मुसलमानांना जें जादा प्रतिनिधित्व मिळालेलें आहे तें कमी केलेलें नाहीं; (३) हिंदू बहुसंख्य असलेल्या प्रांतांतून मुसलमानांना खूपच जास्त प्रतिनिधित्व देण्यांत आलेलें आहे. पाकिस्तान स्थापन झालें, तर इतकें प्रतिनिधित्व त्यांना मिळणार नाहीं.

बहुसंख्याकांचें सरकार असावें हा आग्रह हिंदूंनीं सोडून दिला पाहिजे;

कारण असा आग्रह धरल्यामुळें जातीय प्रश्नाबाबत अनंत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तेंव्हां डॉ० आंबेडकरांचा हिंदूंना असा सल्ला आहे, कीं त्यांनीं अल्पसंख्याकांना दिलेलीं समाधानकारक संरक्षणें मान्य करून सापेक्ष बहुमता-वर संतुष्ट रहावें आणि आपला आग्रह सोडून द्यावा.

वरील तत्त्वांचा किंचित् विचार केला तरी असें आढळून येईल, कीं हिंदूंना आणि मुसलमानांना एकत्र येतां येणार नाहीं किंवा खरें म्हणजे त्यांनीं एकत्र येऊंच नये, हेंच डॉ० आंबेडकरांचें गृहीत कृत्य आहे. पण तें तत्त्वतः तसेंच व्यवहारतःहि असमर्थनीय आहे. बहुसंख्याकांनीं किंवा बहुसंख्याक आणि सर्वांत छोटे अल्पसंख्याक या दोघांनीं राज्य केलें, तर तें तत्त्वतः असमर्थनीय व व्यवहारतः अन्याय्य आहे असें एकीकडे प्रतिपादन करीत असतां, दोन अल्पसंख्याकांनीं एकत्र येऊन फक्त बहुसंख्याकांवरच नव्हे, तर बहुसंख्याक आणि इतर सर्व अल्पसंख्याक यांच्यावर हुकुमत गाजविण्यांत त्यांना कोणताहि अन्याय दिसत नाहीं ! त्यांनीं दिलेल्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं बहुसंख्याकांची व्याप्ति कितीहि असली, तरी त्यांना फक्त ४० च टक्के प्रतिनिधित्व देण्यास ते तयार आहेत आणि राहिलेल्या जागा इतर अल्पसंख्याकांमध्यें वांटून टाका-वयाच्या आहेत. अर्थात् त्यामुळें बहुसंख्याकांना मंत्रिमंडळ बनविण्याची संधी कधींहि न देणें अल्पसंख्याकांना शक्य होईल. त्यांनीं सांगितलेलें तिसरें तत्त्व मध्यवर्ति विधिमंडळाच्या अगर त्यांनीं आंकडे तयार केलेल्या दोन प्रांतांच्या बाबतींत त्यांनीं स्वतःच लागू केलेलें नाहीं ! कारण त्यांनीं मध्यवर्ति–सरकारा-बाबत आणि मुंबई प्रांताबाबत जे आंकडे दिले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं, बहुसंख्य जमात व कोणतीहि प्रमुख अल्पसंख्य जमात यांना दोन्ही ठिकाणीं चांगलेंच मताधिक्य मिळवतां येईल; किंवा दोन प्रमुख अल्पसंख्याकांना एकत्र येऊनहि असें मताधिक्य प्राप्त करून घेतां येईल.

त्यांचें पांचवें तत्त्व नावीन्यपूर्ण आहे. परंतु तें तत्त्व फक्त हरिजनांच्या बाबतींतच लागू करावें असा त्यांचा मानस दिसतो ! शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक दृष्टया वन्य–जमाती आपल्या देशांत सर्वांत मागासलेल्या आहेत

यावर दुमत होणें शक्य नाहीं. परंतु एकूण लोकसंख्येच्या आंकड्यांतून त्यांची संख्या वजा करण्यांत आली आहे हें दर्शविण्यापलीकडे सबंध योजनेंत त्यांनीं त्यांचा उल्लेखसुद्धां केलेला नाहीं! ब्रिटिश हिंदुस्थानांतील एकूण लोकसंख्येपैकीं मुसलमानांची संख्या २६·८३ टक्के व हरिजनांची १३·५० टक्के, खिस्त्यांची १·१८ टक्के व शिखांची १·४१ टक्के आहे, तर वन्य–जमातींची संख्या ५·६५ टक्क्यांहून कमी भरणार नाहीं. कांहीं प्रांतांत तर ते हरिजनांपेक्षांहि जास्त भरतात. उदा० आसाममध्यें हरिजन ६·६३ टक्के आहेत, तर वन्य–जमाती २४·३५ टक्के आहेत; बिहारमध्यें हरिजन ११·९४टक्के आहेत, तर वन्य–जमाती १३·९१टक्के आहेत; ओरिसामध्यें हरिजन १४·१९टक्के आहेत, तर वन्य-जमाती १९·७२ टक्के आहेत; मध्यप्रांत–वऱ्हाडमध्यें त्यांची संख्या जवळजवळ हरिजनांइतकी म्हणजे हरिजन १८·१४ टक्के व त्या १७·४७ टक्के आहेत; आणि मुंबईमध्यें वन्य–जमाती ७·७४ टक्के व हरिजन ८·८९ टक्के आहेत. बिहार, मध्यप्रांत व ओरिसामध्यें त्यांची संख्या मुसलमानांहूनहि अधिक आहे; त्या प्रांतांतील मुसलमान एकूण लोकसंख्येच्या अनुक्रमें १२·९८, ४·६६ आणि १·६८ टक्के आहेत. सर्व हिंदुस्थानच्या व प्रांतांच्या एकूण लोकवस्तीमधील त्यांचें प्रमाण पाहिलें, तर अनेक प्रांतांत त्या हरिजनांहून जास्त व कांहीं प्रांतांत मुसलमानांहूनहि अधिक भरतील; म्हणून त्यांना वगळलेलेंच बरें असा डॉक्टर महाशयांनीं विचार केलेला दिसतो! त्या जमाती मागासलेल्या असल्यामुळें डॉ. आंबेडकरांचें पांचवें तत्त्व लागू केलें, तर त्यांना हरिजनांपेक्षांहि जास्त प्रतिनिधित्व मिळेल; आणि मग मुसलमान व हरिजन या दोघांत सत्ता वांटून घेण्याची ही सर्व योजना कोलमडून पडेल!

डॉक्टर महाशयांनीं जीं तत्त्वें सांगितलेलीं आहेत तीं सोडलीं तर दुसरींहि कांहीं तत्त्वें त्यांच्या योजनेंत अभिप्रेत आहेत. मंत्र्यांची निवड करतांना अल्पसंख्याकांना आपले मंत्री स्वतःचे स्वतःच निवडतां येतील; परंतु बहुसंख्याकांमधील मंत्री मात्र सबंधच्या सबंध सभागृहानें क्रमदेय मतदान–पद्धतीनें निवडावयाचे आहेत. याचा परिणाम असा होईल, कीं बहुसंख्याकांना केवळ

त्यांच्याच मतांनीं ४० च्या पुन्हां ४० टक्के म्हणजे फक्त १६ टक्केच मंत्री आपल्यांतून निवडतां येतील. बहुसंख्याकांच्या वांट्याला आलेल्यापैकीं उरलेले सर्व किंवा अधिकांश मंत्री अल्पसंख्याकांनाच निवडतां येतील. त्यामुळें अल्पसंख्याकांना विधिमंडळांतील आपल्या सभासदांच्या प्रमाणांत केवळ आपलेच मंत्री निवडण्याचा अधिकार मिळणार नसून त्याबरोबरच त्यांना बहुसंख्याकांच्यापैकीं देखील पुष्कळ मंत्र्यांची निवड करतां येईल.

हिंदू व मुसलमान यांनीं आपसांत एकी केली नाहीं, तर हरिजनांच्या मदतीखेरीज त्यांच्यापैकीं कोणालाहि सरकार बनवितां येणार नाहीं; परंतु त्यांच्यापैकीं एकाद्यानें जर हरिजनांबरोबर संधी केला, तर दुसऱ्या बहुसंख्य जमातीची अगर इतर कोणत्याहि अल्पसंख्याक गटाची दखल न बाळगतां त्याला स्वतःचें सरकार स्थापन करतां येईल.

डॉ. आंबेडकरांची जेवढी योजना वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेली आहे त्यावरून त्यांनीं फक्त मध्यवर्ति सरकार, मुंबई व पंजाब प्रांत यांसाठींच आंकडे तयार केले आहेत असें दिसून येतें. इतर सर्व प्रांतांचे आंकडे तयार केले, तर हीं तत्त्वे प्रत्यक्षांत आणण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद आहे असें स्पष्टपणें ध्यानांत येईल. उदा० वायव्य सरहद्द प्रांतांतील ८·२१ टक्के अल्पसंख्याकांमध्यें ६० टक्के जागा डॉ० आंबेडकर कशा वांटून देणार आहेत तें सांगणें कठिण आहे. ओरिसाचेंहि असेंच उदाहरण देतां येईल. वन्य—जमाती जमेस धरल्या नाहींत, तर तेथें हरिजन १४ टक्के, मुसलमान १·६८ टक्के व ख्रिस्ती ०·३२ टक्के आहेत. या फक्त १६·१९ टक्के अल्पसंख्याकांमध्यें ६० टक्के जागा कशा विभागतां येतील ?

## ४३. श्री. एम्. एन्. रॉय यांच्या योजनेचा मसुदा

श्री. एम्. एन्. रॉय यांनीं एक कच्चा मसुदा प्रसिद्ध केला आहे. तो 'मूलभूत तत्त्वें आणि मतभेदाचे प्रश्न यांबद्दल असून तपशील मागाहून भरण्यांत यावयाचा आहे.' (१) सत्तासंक्रमणाचा क्रम, (२) राज्याची रचना, (३) सत्तेचें अधिष्ठान, हे ते तीन मूलभूत प्रश्न होत. अस्पृश्यांसारख्या इतर

जातींचें स्थान काय हाहि एक वादग्रस्त प्रश्न आहे. या मसुद्यांत मूलभूत प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा व वादग्रस्त मुद्द्यांचें निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. 'लोकशाही स्वरूपाची घटना आंखावयाची झाल्यास सर्व हिंदी जनतेच्या हातीं सत्ता गेलेली असली पाहिजे' हा यांतील गृहीत सिद्धांत आहे. क्रांतीच्या अभावीं घटनाकारी मंडळ अस्तित्वांत येणें व्यवहारतः अशक्य असल्यानें सत्तासंक्रमणाचा उपक्रम ब्रिटिश पार्लमेंटनेंच प्रथम करावयास हवा. त्यासाठीं प्रथमतः हिंदी जनतेच्या हातीं सर्व सत्ता औपचारिक आणि कायदेशीर रीत्या सुपूर्त करण्यांत आली पाहिजे, आणि मग हिंदी जनतेच्या हातीं आलेल्या या सार्वभौमत्वाचा वापर करण्यासाठीं एक घटनात्मक अधिकारमंडळ निर्माण करावयास हवें. 'सार्वभौमत्वाचे अधिकार संक्रमणरूपानें एकाचे हातून दुसऱ्याचे हातीं जात असतांना तात्पुरत्या सरकारची प्रस्थापना ही त्या प्रक्रियेंतील अपरिहार्य गोष्ट होय.' ज्याप्रमाणें मृत्युपत्र करणारा मुखत्यार नेमतो, त्याप्रमाणें ब्रिटिश पार्लमेंटनें हें हंगामी सरकार बनविलें पाहिजे. यासाठीं एक वारसापत्र तयार करावें लागेल व तदनुसार (१) ब्रिटिश–हिंदुस्थान व हिंदी संस्थानें यांतील सर्व प्रदेशाबाबतचे अधिकार हिंदी जनतेच्या हातीं सुपूर्त करावे लागतील. (२) ब्रिटननें हिंदी संस्थानांशीं केलेले सर्व पूर्व–करार त्या उभयताच्या संमतीनें रद्द करावे लागतील. (३) पुढें नमूद केलेली घटना स्वीकारावी लागेल. (४) हंगामी सरकारची नेमणूक करील अशा गव्हर्नर जनरलची नेमणूक करावी लागेल. या हंगामी सरकारला कायद्यानें सर्वाधिकार दिलेले असल्याकारणानें कोठल्याहि निवडून दिलेल्या प्रतिनिधि–मंडळास तें जबाबदार असणार नाहीं. हें सरकार (१) लोकसमित्यांच्या अधिकारांतील प्रदेशांची व्याप्ति व लोकसंख्या यांचें प्रमाण ठरवील, (२) भाषिक व सांस्कृतिक एकतेच्या दृष्टीनें व राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनेंहि जरूर त्याप्रमाणें प्रांतांची फेरआंखणी करील, (३) प्रांतिक लोकमंडळें व प्रांतिक मुख्याधिकारी यांची निवड करून प्रांतिक सरकारें स्थापन करील, (४) संयुक्त हिंदुस्थानच्या घटनेबाहेर राहण्याची या नवनिर्मित प्रांतांची इच्छा आहे किंवा काय याची चांचणी

घेईल, (५) गव्हर्नर जनरलची आणि संयुक्त कायदेमंडळांत जाणाऱ्या सदस्यांची नेमणूक करून संयुक्त राज्याचें सर्वश्रेष्ठ लोकमंडळ तयार करील. अशाच प्रकारचे जरूर ते उपक्रम हिंदुस्थानच्या संयुक्त राज्यांत दाखल होणाऱ्या व न होणाऱ्या प्रांतांतहि हंगामी सरकारकडून करण्यांत येतील. प्रांतिक व संयुक्त सरकारांतील कार्यकारीमंडळें स्थापन झाल्याबरोबर हें हंगामी सरकार कार्यनिवृत्त होईल.

संस्थानिकांच्या विशिष्ट स्थानामुळें जी अडचण निर्माण झालेली आहे, ती दूर करण्याचा उपाय म्हणून असें सुचविण्यांत आलें आहे कीं, हिंदुस्थानांतील प्रदेशांवर राज्य करण्याचे आपले अधिकार सोडून देण्यास व आपल्या इतमामास साजेलशा तनख्यावर राहण्यास ब्रिटिश सरकारनें त्यांची संमति मिळवावी.

मूलभूत तत्त्वें व हक्क यांची घोषणा करण्यासंबंधींची तरतूद या राज्यघटनेंत आहे. 'सर्व निवडून आलेल्या संस्थांतून विभक्त मतदार-संघातर्फे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचा अवलंब करण्यांत अल्पसंख्याकांच्या हक्कांचें रक्षण करण्यांत येईल अशी तरतूद आहे.' संयुक्त राज्याचें स्वरूप निश्चित करीत असतां राज्यघटनेमध्यें असें कलम घालण्यांत आलें आहे कीं "जो प्रांत संयुक्त राज्याच्या बाहेर राहूं इच्छीत असेल, त्याला त्या राज्याचा घटक मानलें जाणार नाहीं."

हिंदुस्थानचें संयुक्त राज्य प्रस्थापित होण्यापूर्वी राज्यघटनेनुसार जीं प्रांतिक लोकमंडळें निवडलीं जातील, त्यांना संयुक्त राज्यांतून प्रांतानें बाहेर रहावें असा निर्णय करण्याचा अधिकार असेल. अशा प्रकारचा प्रस्ताव बहुमतानें संमत झाल्यास तो प्रांताच्या जनतेकडे मतासाठीं पाठविण्यांत येईल. प्रांतांतील मतदारांचें बहुमत मिळालें, तरच असा प्रस्ताव पक्का समजण्यांत येईल. जे प्रांत संयुक्त राज्याच्या बाहेर राहतील त्यांचाहि कारभार राज्यघटनेंतील तरतुदीनुसार चालेल आणि त्यांना स्वतःचें दुसरें संयुक्त राज्यहि स्थापतां येईल. जकाती, चलन व रेल्वेकारभार यांसारखे जे सामाजिक विषय असतील त्यांबाबत सहकार्याचे व परस्पर-सहाय्याचे करारनामे हिंदुस्थानच्या संयुक्त

राज्याला या प्रांताशीं करतां येतील. ब्रिटिश-कॉमनवेल्थ या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या एका बृहत्तर संयुक्त राज्याचा घटक म्हणून हिंदुस्थानचें संयुक्त राज्य राहील व तत्संबंधींच्या अटींचा समावेश एका तहनाम्यामध्यें करण्यांत येईल. हिंदुस्थानचें संयुक्त राज्य प्रस्थापित झाल्यानंतरहि त्यांतील घटकांना संयुक्त राज्यांतून फुटून निघण्याचा नैसर्गिक हक्क राहीलच. फुटून निघण्यासंबंधींचा प्रस्ताव प्रांतिक सरकारला लोकमतासाठीं सादर करावा लागेल व प्रांतांतील लोकसंख्येचें बहुमत त्याला अनुकूल झाल्यास तो अमलांत येईल.

संयुक्त राज्यांतील कनिष्ठ व वरिष्ठ विधिमंडळें, सर्वश्रेष्ठ लोकविधिमंडळ, गव्हर्नर जनरल, कायदेकानू करण्याच्या अधिकाराचीं साधनें, अंमलबजावणी करण्याच्या अधिकाराचीं साधनें, प्रांत, समाजाचें आर्थिक संघटन, न्यायाधिकारी, स्थानिक स्वराज्य, इत्यादिकांसंबंधीं या घटनेमध्यें जे भाग आहेत त्यांचा सारांश मीं येथें दिलेला नाहीं. आपलें विवेचन जातीय प्रश्नासंबंधीं व त्यावर पाकिस्तानचा जो उपाय सुचविण्यांत आला आहे त्यासंबंधीं असल्याकारणानें आणि वगळण्यांत आलेल्या विभागांचा या दोन प्रश्नांशीं संबंध नसल्याकारणानें त्यांचा सारांश मीं येथें दिलेला नाहीं. जातीय प्रश्नाशीं संबद्ध अशी कोणतीहि खास सूचना त्यामध्यें नसतांना केवळ जातांजातां त्यांतील महत्त्वाच्या विचारांचा परामर्श घेणें उचित ठरणार नाहीं.

जातीय प्रश्नासंबंधीं ज्या सूचनांचा सारांश वर देण्यांत आला आहे त्यांच्याबाबत श्री. रॉय यांचें असें म्हणणें आहे कीं, 'मुस्लिम लीगची मागणी पुरी करण्यांत आलेली आहे. हिंदुस्थानच्या जनतेकडे सत्ता संक्रमित करण्यापूर्वींच कांहीं टापू विभक्त करण्यांत यावेत ही मागणी क्रमविरुद्ध ठरते. माझ्या मसुद्यामुळें ही अडचण दूर झालेली आहे. हिंदुस्थानचा एक अखंड घटक कल्पूनच सत्तासंक्रमण व्हावयाचें आहे. तदनंतर तात्पुरत्या सरकारनें आंखून दिलेले प्रांत कोणत्याहि निवडून आलेल्या हिंदी मंडळास जबाबदार न राहिल्यामुळें त्यांना संयुक्त राज्यांत सामील न होण्याचें स्वातंत्र्य राहील. परंतु विभक्त होऊं इच्छिणाऱ्या प्रांतांना फुटून निघण्याची तरतूद केल्यानंतर फुटीर प्रवृत्तींना

ज्यांत यत्किंचितहि अवसर राहणार नाहीं, असें संयुक्त राज्य बनविण्याची योजना या मसुद्यांत आहे. येणेंप्रमाणें संयुक्त राष्ट्रवाद व केंद्रीय सत्तावाद यांचा समन्वय साधण्यांत आला आहे.'

याबाबतींत इतकेंच निर्दिष्ट केलें म्हणजे पुरे, कीं फाळणीच्या प्रश्नाबाबतचा निर्णय भविष्यकालावर सोंपविण्यास अथवा प्रांतांतील सज्ञान व्यक्तींच्या मतदानाचा कौल घेण्यास मुस्लिम–लीग तयार आहे असें वाटत नाहीं. तसेंच भाषिक व सांस्कृतिक एकतेच्या आधारानें प्रांतांची फेरआंखणी करण्यास ती तयार होईल असें वाटत नाहीं. कारण तशा प्रकारची आंखणी झाल्यास प्रांतांच्या सीमा धार्मिक व जातीय सीमांशीं जुळतीलच असें नाहीं. शिवाय, हीं फेरआंखणी करणाऱ्या अधिकारमंडळाच्या रचनेसंबंधीं इतकीच माहिती दिलेली आहे कीं तें गव्हर्नर जनरलकडून नेमण्यांत येईल, आणि त्या गव्हर्नर जनरलची नेमणूक पार्लमेंट करील. विभक्त मतदारसंघांनीं प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानुसार पाठविलेले प्रतिनिधी सर्व निवडलेल्या संस्थांवर असावेत व त्यांच्या द्वारा अल्पसंख्याकांच्या हक्कांचें संरक्षण करण्यांत यावें, या कलमांनींहि लीगचें समाधान होणें संभवनीय नाहीं.

## ४४. भरतवाक्य

हिंदुस्थानच्या वायव्येला व पूर्वेला स्वतंत्र मुसलमानी राज्यें स्थापन करण्यासंबंधींची मुस्लिम–लीगची जी योजना आहे, तिला पर्याय म्हणून ज्या विविध योजना मांडण्यांत आलेल्या आहेत त्या पूर्वीच्या भागांत दिलेल्या आहेत. हेतु असा कीं वाचकानें त्यांचा विचार करून आपलें तत्संबंधींचें मत बनवावें. माझी याबाबत कोणती योजना आहे तें मांडण्याची आवश्यकता नाहीं. हिंदुस्थानची फाळणी करून मुसलमानी व मुसलमानेतर स्वतंत्र राज्यें प्रस्थापित करण्याची योजना मुस्लिम–लीगव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि जातीय गटानें वा संस्थेनें मांडल्याचें माझ्या कानीं आलेलें नाहीं. मुसलमानांत देखील या सूचनेला विरोध करणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. मुसलमानांपैकीं किती संख्येच्या वतीनें या संस्था बोलूं शकतात तें ठरवणें हें माझें काम नाहीं. जें कार्य प्रस्तुत

आहे, त्यासाठीं अशा प्रकारचें गणित करीत बसण्याचेंहि कारण नाहीं. मुसलमानेतरांच्या ज्या संस्था आहेत, त्यांनीं तर माझ्या समजुतीप्रमाणें या योजनेला एकजात विरोधच केलेला आहे. फाळणीची कोणतीहि योजना मान्य नसलेली ही जी मंडळी आहेत, त्यांनीं आतांपर्यंत दिलेल्यापैकीं कोणतीहि एक योजना चर्चेला घ्यावी व सर्व पक्षांना मान्य होईल अशी न्याय्य व रास्त योजना घडवून दाखवावी. गोलमेज–परिषद भरवून अशा प्रकारची एक योजना तयार करणें शक्य होईल असें मला वाटतें. म्हणून मागें तपशीलवार ज्या योजना दिलेल्या आहेत त्यांत अथवा मला अद्यापि ज्ञात न झालेल्या योजनांत आणखी एका योजनेची भर घातल्यानें गोलमेज–परिषदेच्या विचारकार्याला फारसें साहाय्य होईल असें मला वाटत नाहीं. मुस्लिम–लीगच्या बाबतींत बोलावयाचें, तर तिनें आपले अध्यक्ष व इतर प्रमुख पुढारी यांच्या द्वारा आपला निर्णय देऊन टाकलेला आहे, कीं लीगच्या लाहोर–ठरावाला प्रथम मान्यता मिळाल्यावांचून कोणत्याहि योजनेची चर्चादेखील करण्यास आपण तयार नाहीं. तेव्हां ही शर्त मान्य झाल्याशिवाय लीगला दुसऱ्या कोणत्याहि योजनेशीं कांहीं कर्तव्य नाहीं. फार काय सांगावें, लाहोर–ठरावाचा लीगप्रणीत जो अर्थ आहे, तो मान्य नसणारी कोणतीहि योजना विचारांत घेण्यास लीग तयार नाहीं, आणि त्या ठरावाचा अर्थ समजेल अशा भाषेंत विशद करून आपल्या मागणीचें स्वरूप सुस्पष्टपणें मांडण्याचीहि तिची तयारी नाहीं ! लीगचा जो लाहोर–ठराव आहे त्याची पूर्ति आपल्या योजनेनुसार होत आहे, असा दावा श्री० राजगोपालाचारी यांच्याकडून मांडण्यांत आलेला होता. ज्या गोष्टींचा उल्लेख लाहोर–ठरावामध्यें केवळ तात्त्विक विचार म्हणून व सर्वसाधारण परिभाषेंत करण्यांत आलेला होता, त्यांना वास्तव स्वरूप देण्याच्या उद्देशानें त्यांनीं योजना बनवली होती. परंतु तिचा विचार करण्यासहि लीगच्या अध्यक्षांनीं संमति दिली नाहीं ! महात्मा गांधींच्याबरोबर त्यांचें जें प्रदीर्घ बोलणें झालें त्यावेळीं देखील तपशीलाला हात न लावतां लाहोर–ठरावाला आधारभूत असणाऱ्या तत्त्वासंबंधीं व नीतीसंबंधीं गांधीजींना 'ज्ञान' शिकविण्याचाच यत्न जनाब जिनांनीं केला !

तात्पर्य, लीगला कोणत्याहि प्रकारच्या वास्तव योजनेची आवश्यता भासलेली नाहीं. म्हणून आहेत या योजनांमध्यें आणखी एका योजनेची भर घालूं नये असा निर्णय थोड्याशा विचारांतीं मीं घेतला आहे. तथापि जी कोणती योजना करण्यांत येईल तिला दोन मूलभूत अटी पाळाव्याच लागतील. सर्व जमातीं-विषयीं तिचें धोरण रास्त व न्याय्य असावयास हवें. पण येवढें देखील पुरेसें नाहीं. वर्तमानकाळीं माजलेल्या वादाळीचा स्वतःला स्पर्श होऊं न देतां उच्च भूमिकेवर उभें राहून या देशासाठीं तिनें असें भवितव्य रेखाटावें, कीं ज्याचा या देशाला आणि त्यांतील कोट्यवधि जनांना अभिमान वाटावा, व त्याच्या-साठीं जीवन समर्पित करण्याची त्यांची सिद्धता असावी. व्यक्ति ही समष्टीचा घटक असते ही गोष्ट सत्य आहे. पण व्यक्ति ही मानवी असते हें त्याहूनहि श्रेष्ठ तत्त्व आहे असें म्हणतां येईल. म्हणून जातीय प्रश्न कांटेकोरपणें सोडवणारी योजना व्यक्तिमात्राच्या मानवतेची आबाळ करणार असेल, तर ती योजना कवडीमोल गणली पाहिजे. गतकालीन जीवनापेक्षां अधिक आनंदी व अधिक उच्च जीवन प्रत्येक नागरिकाला ज्या योजनेमुळें लाभेल, ती योजना या महान् देशांतील रहिवाशांना शोभून दिसेल.

खरी गोष्ट अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील जनतेपुढें दोन पर्याय आहेत. त्यांतून त्यांनीं कोणत्या तरी एकाची निवड करावी. देशाचे खंड पाडून त्याचे विभाग बनवावेत व जनतेची विभागणी करून स्वतंत्र राष्ट्रें स्थापावींत हा एक पर्याय; देशाचें अखंडत्व अबाधित राखून येथें वसलेल्या छोट्यांतल्या छोट्या गटासकट सर्व गटांच्या नैतिक, बौद्धिक व ऐहिक संवर्धनाची तरतूद करावी व त्या संवर्धनाच्या आड येणारे राजकीय, सामाजिक, आर्थिक आदिकरून सर्व प्रकारचे अडथळे दूर करावेत हा दुसरा पर्याय. या दोहोंपैकीं एकाचा स्वीकार येथील लोकांना करावा लागणार आहे. मग ते मुसलमान असोत, हिंदू असोत वा इतर कोणी असोत. आणि ही निवड दक्षतेनें, उलट-सुलट विचारप्रवाह नीट तपासून व समजून घेऊन त्यांना करावी लागणार आहे. दुसऱ्या पक्षाला नामोहरम करण्याच्या हेतूला येथें सवड नाहीं. या प्रश्नाचें

महत्त्व अत्यंत मोठें आहे आणि केवळ या देशांतील रहिवाशांच्याच दृष्टीनें नव्हे, तर जागतिक व्यवहाराच्या व इतर देशांत राहणाऱ्या कोट्यवधि लोकांच्या हिताच्या दृष्टीनेंहि त्याला अतोनात महत्त्व आहे, हें नाकबूल करतां येणार नाहीं. जो जो प्रश्न उपस्थित होईल त्याचा शांत डोक्यानें आपण विचार केला पाहिजे. त्यापेक्षांहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे बुद्धीची सचोटी राखून व सर्वांना न्याय मिळावा हा हेतु मनांत धरून आपण हरएक प्रश्नाचा विचार करावयास हवा आहे. न्यायबुद्धि व सचोटी मनांत असेल, तर सर्वांना संमत होईल असा निर्णय घेणें अशक्य होणार नाहीं. गतकालांत केलेले सर्व तड-जोडीचे प्रयत्न फसले आहेत हें सांगून कांहीं उपयोग नाहीं. त्यामुळें फक्त आपली दुर्बलता व आत्मविश्वासाचा आपल्या ठिकाणीं असलेला अभाव उघड होईल.

परंतु तडजोडीसंबंधींची चर्चा सफळ व्हावी, किंबहुना, ती शक्य व्हावी असें वाटत असेल, तर निर्वाणीचे खलिते जाहीर करण्याचें आपण बंद केलें पाहिजे. चर्चेच्या आधीं शर्ती घालण्याचें व त्या मान्य झाल्या तरच चर्चा सुरू होईल अशी भाषा करण्याचें आपण सोडून दिलें पाहिजे. विचार–विनिमय मतपरिवर्तन, देवाण–घेवाण हेच मार्ग आपणांला उपलब्ध आहेत, आणि हेच खरे सभ्यतेचे मार्ग आहेत. सभ्य समजण्यांत येणाऱ्या राष्ट्रांकडून या व्यति-रिक्त अशा मार्गांचें अनुसरण फार भयंकर प्रमाणावर चालू असल्याचें दृश्य आज आपण डोळ्यांनीं पाहात असलों, तरी त्या मार्गांचें अनुकरण करण्याचा विचारहि आपण मनांत आणतां नये.

युरोपांत जीं अगदीं लघुतर व लघुतम राष्ट्रें आहेत, त्यांच्याहून क्षेत्रफळ व लोकसंख्या या दोन्ही बाबतींत पाकिस्थान मोठें असेल, असें एल्. हमजा यांनीं आराखडे काढून दाखवलें आहे. पण युरोपांतल्या फक्त लघुतर व लघुतम राष्ट्रांहून मोठें असण्यावरच आपण काय म्हणून समाधान मानावें ? युरोपां-तल्या व अमेरिकेंतल्या मोठ्यांतल्या मोठ्या राष्ट्राहून समर्थ होण्याची व आशिया खंडांतील सर्वांत प्रबळ राष्ट्राच्या बरोबरीनें समर्थ बनण्याची महत्त्वा-कांक्षा आपण काय म्हणून बाळगूं नये ? जीवन समर्पण करण्याला उचित अशी

ही आकांक्षा नाहीं काय? जीं राष्ट्रें आमच्याहून लहान व दुर्बळ असतील त्यांना दडपतां यावें म्हणून आम्हांला मोठें बनवावयाचें नाहीं. हिंदुस्थानचा जो दीर्घकालीन इतिहास आहे, त्यांत शेजारच्या किंवा दूरच्या देशावर आम्ही आक्रमण केल्याचा एकहि दाखला मिळत नाहीं. स्वतःची व इतरांची सेवा करतां यावी, आमच्यांतील लहानांतल्या लहानाची व इतरांमधील दुबळ्यांतल्या दुबळ्याची सेवा करतां यावी, म्हणूनच आम्हांला मोठें बळ हवें आहे. या आमच्या इष्ट कार्यांत जर कांहीं अडथळे असतील तर ते जरूर दूर करा. अल्पांना व दुबळ्यांना चिरडण्याची जी शक्ति बळामुळें अंगीं येते, तिला उत्तेजन देण्याचे प्रयत्न जर होत असतील तर ते निष्ठुरपणें हाणून पाडा. पण निराश होऊन हताश मनानें कोणत्या तरी मार्गाचा अवलंब आपण केला असें घडूं नये.

तडजोड म्हणून देशाच्या फाळणीची जी योजना पुढें मांडण्यांत येत आहे, ती निःसंशय निराशेच्या पोटींच जन्माला आलेली आहे. अल्पसंख्याकांचा प्रश्न या योजनेमुळें जरी अधिक बिकट होणार नाहीं असें मानलें, तरी तो तिच्या योगानें सुटतहि नाहीं. मला तर अशी भीति वाटते कीं तो प्रश्न या योजनेमुळें अधिकच बिकट बनेल! अत्यंत कटु अशी परंपरा तिच्यामुळें निर्माण होईल! ही योजना सक्तीनें अमलांत आणल्यास एक पक्ष आनंदानें बेभान बनेल, तर दुसरा पक्ष मनांत कष्टी होऊन असंतोषानें कुढत राहील. आणि अशाच भावनांतून गृहकलहांच्या व आंतरराष्ट्रीय युद्धांच्या ज्वाळा भडकत असतात. या भावनांना क्षुद्र लेखण्याची चूक आपण न करावी हें बरें. हजार वर्षांच्या सहजीवनामुळें व सहकार्यामुळें जो स्नेहभाव संचित झालेला आहे व ज्याच्या बळावर आपणांला अजूनहि उभय पक्षांना समाधानकारक अशी तडजोड घडवून आणणें शक्य होईल, त्याचें महत्त्व कमी लेखण्याचा प्रमादहि आपण टाळणें उचित होईल.

पण—आणि या 'पणा'कडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं—हा सर्व युक्तिवाद निष्फळ ठरला आणि देशाची फाळणी अपरिहार्य झाली, तर मागून उद्भवणाऱ्या वादळांना तोंड देण्याची तयारीहि आपण ठेवावयास हवी. फाळणी केली कीं मग सारें सुरळीत चालू होईल, अशा भ्रमांत आपण राहूं नये. फाळणीमुळें अवतरणाऱ्या सुखांचीं रम्य चित्रें जितक्या सुलभतेनें काढण्यांत येतात,

तितक्याच सुलभतेनें तिचें भयंकर परिणामहि आपणांला आपल्या नजरेसमोर उभे करतां येतील. कांहीं असलें तरी सचोटीनें, न्यायानें व रास्त मार्गानें जाण्याची तयारी आपण ठेवावी हें उत्तम. आपल्या व्यवहारांत व आपल्या जीवनांत आपण सर्वांनीं जर हे गुण आणले तर अजूनहि पुढें उद्भवणाऱ्या संकटांचें व कटुतेचें स्वरूप आपणांस सौम्य बनवणें शक्य होईल. निराशेच्या सुरांत या ग्रंथाचा समारोप करावा अशी माझी इच्छा नाहीं. हिंदु, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पारशी आदि करून जी येथील जनता आहे तिच्या न्यायबुद्धीवर व सुज्ञपणावर माझी श्रद्धा अद्यापि कायम आहे; आणि मला अजूनहि असें वाटतें कीं गौरवास्पद, पुढील पिढ्यांना अभिमानास्पद, पीडित जगाला अनुकरणीय अशी एकादी योजना ही जनता निर्माण करण्यास समर्थ ठरेल. पण ही गोष्ट सत्यदीपाच्या प्रकाशांत आपण चाललों आणि अहिंसेचें शस्त्र हातीं धरलें तरच साध्य होणें शक्य आहे.

आपण आपल्या पिढीमध्यें दोन संहारक महायुद्धें पाहिलीं. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रीय राज्यें स्थापन करून राष्ट्रीयत्वाचा प्रश्न सोडवण्याचे जे प्रयत्न झाले, ते अपेशी ठरले आणि त्यांतूनच दुसरें अधिकच व्यापक व संहारक युद्ध प्रकट झालें! हीं दोन प्राणसंकटें येऊन गेल्यावर देखील युरोपचे डोळे कदाचित् उघडणार नाहींत आणि एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं टपून बसलेल्या राष्ट्रांवर रखवालीस बसून जगांत शांतता टिकवण्याचा आपला अट्टाहास तें कदाचित् कायम ठेवील! पण आपल्या देशांत सर्व तऱ्हेचे भेद असूनहि—वाटल्यास कटु स्मृती असूनहि असें म्हणा—जर असें राज्य आपणांला स्थापन करून दाखवतां आलें, कीं जें प्रजाजनांचें केवळ रक्षणच करणार नाहीं, तर त्यांच्या उच्चतम आकांक्षाहि सफळ करील, तर आपण जगाला एक मोठा आदर्श दिल्याप्रमाणें होणार नाहीं काय? असें घडून आल्यास स्वयंनिर्णयाचा हक्क नाकारल्याप्रमाणें होणार नसून उलट त्याची पूर्ति केल्याप्रमाणें होणार आहे. फक्त सर्वांनीं तें कार्य पार पाडण्याचा निश्चय करून मनःपूर्वक व सचोटीनें कार्याला प्रारंभ करण्याचाच काय तो अवकाश आहे.

# ब्रिटिश-हिंदुस्थान

## जातवार लोकसंख्या

| | लोकसंख्या | शें. प्र. |
|---|---|---|
| अ | २९,५८,०८,७२२ | १००·०० |
| आ | २१,६४,९०,२१९ | ७३·२६ |
| इ | ७,९३,१८,५०३ | २६·८३ |
| ई | १९,०८,९०,९४३ | ६४·५० |
| उ | १५,०८,९०,९४६ | ५१·०० |
| ऊ | ३,९९,२०,८०७ | १३·५० |
| ए | १,६७,१३,२५६ | ५·६५ |
| ऐ | ३४,८२,४३० | १·१८ |
| ओ | ४१,६५,०१७ | १·४१ |
| औ | १२,३८,४८३ | ०·४२ |



# हिंदी संस्थानें




## जातवार लोकसंख्या

| | लोकसंख्या | शें. प्र. |
|---|---|---|
| अ | ९,०८,५७,३०१ | १००.०० |
| आ | ७,८१,६८,३०८ | ८६.०७ |
| इ | १,२६,५१,५१३ | १३.९३ |
| ई | ६,४१,३१,५५३ | ७०.५७ |
| उ | ५,५२,२७,१८० | ६०.७८ |
| ऊ | ८८,९२,३०३ | ९.७१ |
| ए | ८७,२८,२३३ | ९.६१ |
| ऐ | २८,३४,११९ | ३.१२ |
| ओ | १५,२६,३५० | १.६८ |
| औ | ९,९०,०५३ | १.०९ |

# हिंदुस्थान (ब्रि. हिंदुस्थान व संस्थानें)

## जातवार लोकसंख्या




| | लोकसंख्या | शें. प्र |
|---|---|---|
| अ | ३८,६६,६६,६२३ | १००·०० |
| आ | २९.४६,०८,५२८७ | ७६·११ |
| इ | ९.२०,५८,०९६ | २३·८९ |
| ई | २५.४१,३०,५०६ | ६५·९३ |
| उ | २०.६१,१७,३२६ | ५३·३१ |
| ऊ | ४.८८.१३,१८० | १२·६२ |
| ए | २,५४,४१,४८१ | ६ ५८ |
| ऐ | ६३·१६,५४१ | १·६३ |
| ओ | ५६,११,४४७ | १·४७ |
| औ | २२,३८,५३६ | ०·५७ |

# ब्रिटिश-हिंदुस्थानांतील अल्पसंख्य जमाती

फाळणीनंतरच्या मुसलमानी व बिगर-मुसलमानी विभागांशी तुलना केल्यास




वायव्य-विभाग आणि पूर्व-विभाग
या प्रदेशांतील मुसलमान व बिगर-मुसलमान
२००.०० इं.प्र
शेकडा प्रमाण
१००
९०
८०
७०
६०
५०
४०
३०
२०
१०
०
मुसलमान
बिगर-मुसलमान
सिंध
वायव्य सरहद्द प्रांत
बलुचिस्तान
पंजाब
बंगाल
आसाम

# हिंदू-बहुसंख्य प्रांत



# पाकिस्तान : वायव्य-विभाग

## जिल्हावार

सिंध, वायव्य सरहद्द प्रांत बलुचिस्तान आणि पंजाब (अंबाला व जलंदर विभाग व अमृतसर जिल्हा वगळून)




## जातवार लोकसंख्या

| | लोकसंख्या | शें.प्र |
|---|---|---|
| अ | २,४९,४५,६०६ | १००·०० |
| आ | ६१,४५,८८५ | २४·६४ |
| इ | १,८७,३३,७२१ | ७५·३६ |
| ई | ३७,३८,१७९ | १४·९९ |
| उ | ३२,९४,४७० | १३·२१ |
| ऊ | ४,४३,७०९ | १·७८ |
| ए | १७,८४,७२३ | ७·१५ |
| ऐ | ४,६१,१२१ | १·८८ |
| ओ | ३६,८२२ | ०·१५ |
| औ | १,१७,०३२ | ०·४७ |

# पाकिस्तान : वायव्य-विभाग

## प्रांतवार

(सिंध, वायव्य-सरहद्द प्रांत, बलुचिस्तान व पंजाब)




### जातवार लोकसंख्या

| | लोकसंख्या | शें. प्र |
|---|---|---|
| अ | ३,६४,१३,५२५ | १००.०० |
| आ | १,३८,४०,२३१ | ३७.९३ |
| इ | २,२६,५३,२९४ | ६२.०७ |
| ई | ९०,०५,२४२ | २४.६८ |
| उ | ७५,५१,८७१ | २०.७२ |
| क | १४,४५,३७१ | ३.९६ |
| प | ३८,५८,२५९ | १०.५७ |
| ऐ | ५,४२,०४१ | १.४८ |
| ओ | ३६,८२२ | ०.१० |
| औ | ३,६७,८५७ | १.०१ |

# पाकिस्तान: (पूर्व विभाग)

## जिल्हावार

बंगाल - बरद्वान विभाग, व २४ परगणे, कलकत्ता, खुलना, जालपैगुरी व दार्जीलींग हे जिल्हे वगळून.

आसाम - फक्त सिल्हेट जिल्हा.

## जातवार लोकसंख्या




| | लोकसंख्या | शें. प्र. |
|---|---|---|
| अ | ४,४०,८१,३८१ | १००.०० |
| आ | १,३४,७८,८०२ | ३०.५८ |
| इ | ३,०६,०२,५७९ | ६९.४२ |
| ई | १,२५,३४,००१ | २८.४३ |
| उ | ८२,४९,१६८ | १८.७१ |
| ऊ | ४२,८४,८४१ | ९.७२ |
| ए | ५७,७८७ | ०.१३ |
| ऐ | ७,७६,५२२ | १.७६ |
| ओ | १,१०,४८४ | ०.२५ |

# पाकिस्तान : पूर्व विभाग

प्रांतवार
(बंगाल व आसाम)

## जातवार लोकसंख्या




| | लोकसंख्या | शें. प्र. |
|---|---|---|
| अ | ७,०५,११,२५८ | १००.०० |
| आ | ३,४०,६३,३४५ | ४८.३१ |
| इ | ३,६४,४७,९१३ | ५१.६९ |
| ई | २,९२,७२,२४७ | ४१.५१ |
| उ | २,१२,१६,९८६ | ३०.०९ |
| ऊ | ८०,५५,२६१ | ११.४२ |
| ए | २,०१,३१९ | ०.२९ |
| ऐ | ४३,७४,३[illegible] | ६.२० |
| ओ | २,०९,३[illegible] | ०.३० |

# उद्योगधंदे

हजर कामगारांच्या रोजच्या सरासरीच्या दृष्टीनें —



# खाणींचें उत्पादन (किंमतीचे दृष्टीनें)

## १९३८ मधील ब्रि. हिंदुस्थान आणि त्याचे मुसलमानी व बिगर-मुसलमानी विभाग यांमधील




| | ब्रि. हिंदुस्थान | शें.प्र. | हिंदु-विभाग | शें.प्र. | मुसलमानी-विभाग | शें.प्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| कोळसा | ३,४६,३०,७२८ | ६१·५० | ३,३४,१८,०५० | ६०·७८ | ११,१२,६६८ | ०·७२ |
| पेट्रोल | १,६५,४३,१४२ | १०·७६ | १,१२,६४,७८७ | ७·३३ | ५२,७८,३५५ | ३·४३ |
| तांबें | ३२,४०,६४० | २·१० | ३२,४०,६४० | २·१० | ... | ... |
| लोखंड | २६,९१,८२९ | १·७५ | २६,९१,८२९ | १·७५ | ... | ... |
| मॅंगनिज | ३,२०,५३,७०९ | २०·८६ | ३,२०,५३,७०९ | २०·८६ | ... | ... |
| अभ्रक | ४०,८९,४८८ | २·७० | ४०,८९,४८८ | २·७० | ... | ... |
| क्रोमाईट किंवा मॅग्नेसाईट | ५,६०,८९८ | ०·३७ | २,३४,८०४ | ०·१६ | ३,२६,०१४ | ०·२१ |